१८२२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा

काव्य २१६४

अनेक कविकृत कविता भाग - १

सन १८८८

RLFBK-0019892

२१६

# उपोद्घात.

हा बीडकर कवि रामदास स्वामीचा ( शा० शक १५३०–१६०३ ) समकालीन होता असे यानें आपल्या ग्रंथाच्या शेवटीं दिलेल्या शकवर्षावरून दिसतें. यानें शके १५९६त रुक्मिणीस्वयंवर केलें व शके १५९९त सीतास्वयंवर केलें असे आम्हीं तत्कृत बिल्हणचरिताचे शेवटी त्याच्या ग्रंथातील उताऱ्यांवरून दाखविलें आहेच. आज रसमंजरीचें महाराष्ट्र भाषांतर छापण्यास आरंभ करीत आहो ते त्यानें शा० शके १६०१त प्रभव संवत्सरीं शहागड येथें केले असे शेवटच्या श्लोकांत आहे. ह्या भाषांतराचे एकंदर १३९ श्लोक आहेत असे कवि म्हणतो. परंतु आम्हास वे० शा० सं० रा० रा० गणेश शास्त्री तरटे यांजकडून रावसाहेब कृष्णाजी परशुराम गाडगीळ याचे मार्फत मिळालेल्या पोथींत फक्त १२४ श्लोक मात्र आहेत. ह्यावरून ह्या ग्रंथाचे १५ श्लोक हल्लीं उपलब्ध नाहींत असें उघड होतें. मूळ संस्कृत ग्रंथाचा कर्ता भानु या नावाचा आहे. त्याच्या बापाचे नांव गणेश्वर असून तो विदेहदेशांत राहणारा होता इतकीच काय ती त्यानें आपल्या विषयीं माहिती संस्कृत ग्रंथाच्या शेवटीं दिली आहे. कलकत्ता येथे छापलेल्या काव्यसंग्रहांत मूळ ग्रंथ छापला आहे. त्यांतून प्रत्येक श्लोकाचें मूळ पहिल्या ओळींत देऊन नंतर महाराष्ट्र भाषांतर देण्याचा क्रम ठेविला आहे. त्यामुळे वाचकांस हा ग्रंथ मूळ ग्रंथाशीं ताडून पाहण्यास सुलभ पडेल. बिल्हणचरित्र व रसमंजरी या ग्रंथांवरून हा विठ्ठल मोठा शृंगाररसप्रिय होता असें वाटतें. कूटें रचण्याविषयींची ह्याची ख्याति जगद्विश्रुत आहेच हीं कूटें मिळविण्याचा आम्ही यत्न बराच केला. परंतु आम्हास त्यांत फारसें यश आलें नाहीं. आमच्या संग्रहीं असलेले दोन कूट श्लोक मासल्याकरितां येथें देतोः—

कोणे एक वनीं विचित्र पुतळा जेवावया बैसला
पात्रीं जेवण जेवितां अतिबळें पात्रें चि तो भक्षिला ॥
त्याची जे वनिता वनांत फिरता सूर्यास प्रार्थी सदा
बोले विठ्ठल हा पदार्थ उगवा षण्मासचा वायदा ॥ १ ॥
रामाचा जनिता तथा यमपिता हे दोघें बधू कसे ।
सूर्याची भगिनी यमाचि जननी हे नातें ऐसें कसे ॥
सूर्याचा पुतण्या यमासि ह्मणतो मी बाप तूझा सदा ॥
बोले विठ्ठल हा पदार्थ उगवा षण्मासचा वायदा ॥ २ ॥

या कोड्यांपैकीं पहिल्याचें उत्तर "भ्रमर" असें आहे. दुसऱ्याचें उत्तर रामा=कोकिला, यम=कावळा, सूर्या=कावळी असे अर्थ घेतले म्हणजे बसतें.

यांखेरीज पुढील तीन कूट श्लोकही त्याचेच असावे असें वाटतें. परंतु त्याचे शेवटीं विठ्ठलाचें नांव नाहीं:—

कोणी एक वनीं सुलक्षण वधू मेघोदकें जन्मली ।
बाल्लीं नैरनाम तीस असता स्त्रीनामें ती पावली ॥
पांचैहीं प्रणिली* तयातुनि तिहीं अत्यादरें सेविली ।
तेथें ती श्रम पावली म्हणुनियां कर्णाश्रमीं राहिली ॥ १ ॥
अलिकुलवहनींचें वहन आणीत होतें ।
शशिधरवहनानें लोटिलें जाण मातें ॥
नदिपति रिपु ज्याचा तात भगोनि गेला ।
रविसुत महिसगें फार दुःखीत झाला ॥ २ ॥
येते हेमाद्रिकन्यापतिसुतललना यौवनामाजि जेव्हां ।
रामस्त्रीनामकाना त्यजुनि उरत तें पीडितें होय तेव्हां ॥
हस्ती हस्तीद्रवृंदांतक[ ? ] रिपुचें नामपूर्वार्धे नाहीं ।
या लागीं भूसुतेशाअरिअनुज प्रिया स्वल्प ही येत नाहीं ॥ ३ ॥

याखेरीज कवीच्या कूटरचनेविषयीं बारामतीकर मोरोपंत पराडकर (शा० शक १६५१-१७१७) सन्मणिमालेंत म्हणतात:—

विठ्ठल कविच्या भलता लघु न शके चि चित्र कूटातें ॥
मवळतर हि पर जेवि श्रीरामनिवास–चित्रकूटातें ॥ ७४ ॥

असो. हें भाषांतर कित्येक ठिकाणीं चांगलें उतरलें आहे तरी ह्यांत कांहीं दोष आहेत असें वाचकाच्या लक्षांत येईलच.

शृंगार, वीर, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत, व शांतरस या नऊ रसांपैकीं पहिला जो शृंगार तदाधारभूत जी नायिका (स्त्री) तिजविषयींच या रसमंजरींत विचार आहे. साहित्यशास्त्रकार नायिकेचे स्वीया (स्वतःचीस्त्री),

१ ओघ. २ लैखणी. ३ बोर्डे. ४ कानावर ५ अलिकुलवहन=भ्रमरसमूहाचें वहन म्ह० कमळ ६ त्या कमलाचें वहन म्ह० पाणी. ७ शशिधरवहन=शिवाचें वहन बैल. ८ नदिपतिरिपु=समुद्रशत्रु अगस्त्य. ९ अगस्त्यतात=कुंभ (मडकें, घडा) १० रविसुत=कर्ण (कान) ११ हेमाद्रिकन्या=भागीरथी तिचा पति समुद्र त्याचा पुत्र चंद्र त्याची स्त्री रात्र १२ रामस्त्री=सीता (या शब्दाचा काना काढिला म्हणजे बाकी सीत (=थंडी) उरते. १३ दवशत्रु हिरण्यकशिपु त्याचे नावाचें पूर्वार्ध म्ह० हिरण्य (सुवर्ण) १४ भूसुता=सीता तिचा ईश राम त्याचा अरि (शत्रु) रावण त्याचा अनुज कुंभकर्ण त्याची प्रिया निद्रा * प्रणिली=वरिली.

परकीया (दुसऱ्याची), व सामान्य स्त्री असे तीन भेद करितात. नंतर स्वीयेचे मुग्धा (जिला नुकतेच तारुण्य प्राप्त झालें आहे अशी), मध्या (जिच्यावर लज्जा व मदन यांचा समान अमल असतो ती), व प्रौढा अथवा प्रगल्भा असे आणखी तीन भेद करितात. नंतर पुनरपि मध्या व प्रगल्भा यांपैकीं प्रत्येकीचे धीरा, अधीरा, व धीराधीरा असे तीन तीन भेद केल्यामुळें ह्या दोहींचे सहा प्रकार होतात. ह्या सहांपैकीं प्रत्येकीच ज्येष्ठा (वडील) व कनिष्ठा (धाकटी) असे दोन भेद मानून एकंदर बारा प्रकार होतात. हे बारा, परकीयेचे परोढा (दुसऱ्याशीं विवाहित) व कन्या (अविवाहित) हे दोन, सामान्य वनिता, व मुग्धा मिळून एकंदर सोळा प्रकारच्या नायिका होतात. या सोळा नायिका ग्रंथाचे अखेरीस परिशिष्ट नंबर १ यांत दाखविल्या आहेत. परिशिष्ट नंबर ६ यांत नायिकेच्या नऊ अवस्था दिल्या आहेत त्या प्रत्येकीचे ठिकाणीं कल्पून १६ नायिकांचे १४४ भेद होतात. परिशिष्ट नं० १६ यांत नायिकातारतम्य-त्रय दिलें आहे तें या १४४ पैकीं प्रत्येकीचे ठिकाणीं कल्पिलें म्हणजे १४४चे ४३२ भेद होतात. या ४३२ पैकीं प्रत्येकीचे दिव्या, अदिव्या, व दिव्यादिव्या असे तीन भेद कल्पून एकंदर १२९६ प्रकार नायिकेचे होतात. कित्येक ग्रंथकार अवस्थानवक न मानितां अवस्थाष्टकच मानितात. त्यांच्या दृष्टीनें १६ नायिकांचे (१६×८×३×३=११५२) ११५२ भेद होतात. नायिकेच्या अवस्थाष्टकाचें वर्णन कल्याणमल्ल कवीनें अनंगरंगांत येणेंप्रमाणे केलें आहे:—

निखिलसुरतचिन्हैरंकितांगः सतन्द्रा अरुणकलुषनेत्रोऽनिद्रया जागरितश्च ॥
समयमधुरवाक्यः प्रातरभ्येति यस्याः कथयति भरतस्तां खंडिताख्यां पुरंध्रीम् ॥ ५० ॥

वनिता शुभवासवेश्मनि मृदुशय्यामधिवासिनी निशि ॥
पतिमार्गचिरार्पितक्षणा कथिता वासकसज्जिता बुधैः ॥ ५१ ॥

सागस्तया चरणगं दयितं प्रचण्डैर्वाक्यैर्निरस्य बहुकोपत एव पश्चात् ॥
संजायते विरहतापविलापदीना या तां वदन्ति कलहांतरितां प्रवीणाः ॥ ५२ ॥

मदनाकुलितातिनिस्त्रपा कृतभूषा निशि गूढचारिणी ॥
सुरताय परालयं व्रजेत् कवयस्तामभिसारिकां जगुः ॥ ५३ ॥

प्रियतममुपनेतुं प्रेषयित्वैव दूतीं स्वयमतिरतिलोला याति संकेतदेशम् ॥
तदनु पतिविहीनामागतां वीक्ष्य तां या वहति बहुल[illegible] सोच्यते विप्रलब्धा ॥ ५४ ॥

दयिते परदेशसंस्थिते शशिपंकेरुहचंदनादिभिः ॥
परितप्यत एव यद्वपुः कथिता सा कविभिर्वियोगिनी ॥ ५५ ॥

वैराग्यवत्सकलकेलिकलाकलासु कांतो [illegible] गमनगर्लीयात् ॥
यस्याः स्त्रियः सुरतसौख्यविवंचिता सा [illegible] ॥ ५६ ॥

[illegible] आहे. + ५० नंबर. प्रदिष्टा

विविधकुसुममालाभूषितांगी मनोज्ञा सुरतरसविलोला सानुरागा स्वकांते ॥
निवसति चटुलाक्षी वासगेहे चिरं या वरकविभिरिहोक्ता सा किलोत्कठितेति॥ ५७॥
अनगरग—दशमस्थल.

वरील वर्णनांत प्रोषितभर्तृकेला कल्याणमल्लानें वियोगिनी असें म्हटलें आहे. हा अनगरग ग्रंथ कवीनें लोदीवंशांतील अहमदलाडखाननामक राजाकरितां केला असें पुढील पद्यांत आहे. यावरून इ० स० १५२६चे पूर्वी हा ग्रंथ झाला असावा असें होतें, कारण त्या सनांत लोदीवंश नष्ट झाला:—

लोदीवंशावतंसो हतरिपुवनितानेत्रवारिप्रपूर-
प्रादुर्भूतांबुराशीरमलवरयशा लीलया ख्यापितारिः ।;
तत्पुत्रः ख्यातकीर्तिरहमदनृपतिः कामसिद्धांतविद्वान्
जीयाच्छ्रीलाडखानः क्षितिपतिमुकुटघृष्टपादारविंद. ॥ २ ॥
अस्यैव कौतुकनिमित्तमनंगरंग ग्रंथं विलासिजनवल्लभमातनोमि ।
श्रीमन्महाकविरशेषकलाविदग्धः कल्याणमल्ल इति भूपमुनिर्यशस्वी ॥ ३ ॥
अनगरग—प्रथमस्थल.

विठ्ठलानें आपल्या ग्रंथाचे तीन उल्लास केले आहेत. पहिल्यांत २८ श्लोक आहेत. त्यांत मुग्धादि सोळा नायिकांचें व त्यांच्या कांहीं पोटभेदांचें वर्णन आहे. दुसऱ्यांत २९ पासून ८६ पर्यंत ४८ श्लोक आहेत त्यांत प्रोषितभर्तृकादि नायिकावस्थानवकाचें व त्याच्या पोटभेदांचें वर्णन आहे. शेवटच्या तिसऱ्या उल्लासांत ८७ पासून १२२ पर्यंत ३६ श्लोक आहेतत्यांत नायिकातारतम्य, सखीकर्म, दूतिकर्म, पतिभेद, नायकभेद, सात्विकभावाष्टक, शृंगारभेद, अवस्थादशक व दर्श[illegible] या नऊ विषयांपैकीं कांहींचें वर्णन आहे. शेवटचे दोन श्लोक १२३ व १२४ हे उपसंहारात्मक आहेत. तसेच पहिले दोन श्लोक उपोद्घातात्मक आहेत. पहिला उल्लास व दुसरा उल्लास या प्रत्येकाच्या अखेरीस उपसंहारात्मक एकेक श्लोक असून, दुसऱ्या उल्लासाचे आरंभीं एक उपोद्घातात्मक श्लोक आहे. हे तीन श्लोक धरून या ग्रंथांत एकंदर १२७ श्लो[illegible] [illegible] निदान १२ तरी १२०त मात्र विषयप्रतिपादन आहे. या [illegible] श्लोक पाहिजेत ते शोधकांनीं मिळविण्याची तसदी घ्यावी अशी सविनय प्रार्थना आहे.

म्ह०
य. १ अगस्त्य[illegible]
भागीरथी तिचा पति स[illegible]
या शब्दाचा काना काढिला [illegible]
कशिपु त्याचे नावाचें पूर्वार्ध म्ह० हिरण्य
[illegible] रावण त्याचा अनुज कुंभकर्ण

विठ्ठलकविकृत

# रसमंजरी.

आत्मीयं चरणं दधाति०— ॥ १ ॥

ठेवी पाय पुढे स्वकीय च सदा नीचोच्च भूमीवरी
कातेला श्रम हो म्हणोनि तरुपुष्णे स्वहस्तें हरी ॥
पर्यंकास मृगाजिनें करि रतीनिद्रा स्वभागे करी
अत प्रेमभरालसा प्रियतमा अंगीं पुरारी धरी ॥ १ ॥

विद्वज्जनमनोभृंग०— ॥ २ ॥

रसाळ रसमञ्जरी प्रगट भानुनामा करी
कवींद्र धरणीवरी रसिक हर्षवी अंतरीं ॥
मनोमधुर चातुरी करुनि भोगिती अंतुरी
सुधा हि न पवे सरी नव रसें विराजे बरी ॥ २ ॥

गतागतकुतूहलं० — ॥ ३ ॥

गतागतकुतूहलें नयनिच्या अपांगांवरी
स्मितद्युति पडे पतिव्रतवधू सबिंबाधरी ॥
सुधेपरिस गाढ तें वचन कांतकानीं करी
सतीस जरि कोप ये तरि बुडे तिच्या अंतरीं* ॥ ३ ॥

आज्ञप्तं किल कामदेवधरणीपालेन०— ॥ ४ ॥

आले यौवन कामदेवधरणीपाळें स्वयें धाडिले
केलें वास्तुविधान एणनयनीगात्रीं बसाया भलें ॥
डोळां खंजनचातुरी मुखकळा सौधाधरी+ माधुरी
वाचा ते हि सुधासमुद्रलहरी लावण्य अंगीकरी ॥ ४ ॥

---

१ नीचोच्च=उंचसखल. २ म्हणे=म्हणून ३ तरु=झाड ४ हरी=काढी ५ पर्यंक=पलंग ६ मृगाजिन=हरणाचें कातडें. ७ पुरारी=शिव ८ अंतुरी=स्त्री. ९ सुधा=अमृत. १० कुतूहल=कौतुक ११ अपांगावरी=डोळ्याच्या कोंपऱ्यापर्यंत. १२ स्मितद्युति=हसण्याचें तेज. १३ बिंबाधरी=तोंडल्या सारखा लालचा ओंठ आहे जीचा अशी * या श्लोकांत पतिव्रतेचें वर्णन आहे १४ यौवन=तारुण्य १५ कामदेवधरणीपाल=मदनराजा. १६ एण=हरिण १७ खंजन=एक पक्षी आहे. १८यात मुग्धेचें वर्णन आहे + सौधाधरी=सुधेला कमीपणा आणणारी

**नीरात्तीरमुपागता०** --॥ ५ ॥

नीरांतूनि[19] निघोनि नीरज[20]मुखी तीरास आली असे
कानीं काय सरोज[21] खोवुनि बसे आकर्ण नेत्रां पुसे ॥
शेवाळांकुर का न जाणि अजुनी रोमाळि घाली बळें
श्रोणीभार न जाणतां घडिघडी बोले बहू भोगलें[22] ॥ ५ ॥

**स्वयंभुः शंभुरंभोजलोचने०**-- ॥ ६ ॥

कुच स्वयंभु हि शंभु तुझा दिसे । परम सुंदर गौर हि हा असे ॥
कवण धन्य करील नखें तरी । शशिकळा बरवी शिवशेखरीं[23] ॥ ६ ॥

**हस्ते धृतापि शयने०**--॥ ७ ॥

हातीं ही धरिली स्वयें बुझविली[24] शय्येवरी आणिली
बाळा नीजविली परंतु नवलो तीची बहिर्देखिली ॥
पारा स्थीर करी धरूनि च करीं जो देख भूमीवरी
तो भोगील परोपरी करूनियां नारी नवी नोवरी[25] ॥ ७ ॥

**ईषन्मुकुलितनेत्रपालि०** -- ॥ ८ ॥

काहीं एक[26] निमीलितक्षणभरी नीरीं बरी सांवरी
ऊरु[27]युग्म बरावरी करूनियां हस्ते कुचांते धरी ॥
कांताशीं न करी च गोड वचनें निद्रेसि अंगीकरी
ऐसी भूमिवरी समस्त हि असे विश्रब्ध नारी परी[28] ॥ ८ ॥

**स्वापे प्रियाननविलोकनहानिरेव** -- ॥ ९ ॥

निद्रा करीन तरि कांतमुखा न पाहें । जागी असेन तरि कामुक भोगिताहे ॥
ऐसी सरोजनयना मनिं चिंतिताहे । निद्रा नये नयनिं जागर हा न साहे ॥ ९ ॥[29]

**संस्पृश्य स्तनमाकलय्य०**-- ॥ १० ॥

पानें चोळुनिशानें वदनकमळ ही आकळीलें पतीनें
कंठीं आलिंगनानें निजवुनि अधरीं चुंबिलें आदरानें ॥
साडी फेडूनि केलें रत तव हरिलें चित्त सूर्योदयानें
चैलांतानें[30] वधूनें श्रवणसरसिजां झांकियेलें छलानें[31]+ ॥ १० ॥

**नखक्षतमुरस्थले०**-- ॥ ११ ॥

नखक्षत उरावरी रद[32]व्रणासि बिंबाधरीं

१९ नीर=पाणी २० नीरज=कमल. २१. सरोज=कमल २२ यांत अज्ञातयौवना नाईकेचें वर्णन २३ यांत ज्ञातयौवना ना०चें वर्णन २४ बुझविली=समजाविली. २५ यांत सप्रश्रयनवोढा ना० वर्णन. २६ निमीलित=मिटलेले २७ ऊरु=मांड्या २८ यांत विश्रब्धनवोढेचें वर्णन आहे २९ अतिविश्रब्धनवोढेचें यात वर्णन आहे ३० चैल=वस्त्र ३१ छल=मिष + यात प्रगल्भेच्या रतिप्रीतीचें वर्णन ३२ रद=दांत.

चळे बकुळमालिका गळित होय मुक्तावळी
रतातसमयीं असें सकळ देखिलें म्या सये
नसे स्मृति नसे रती शिकविलें तुझें तें [13] नये ॥ ११ ॥

**लोलालिपुंजे०-- ॥ १२ ॥**

भ्रमद्भ्रमरपुंज ही दुरिल कुंज तूं सेविला
श्रमें करूनियां तुला बहुत घर्म हा जाहला ॥
हरीन नालनीदळें करूनि मंदमंदानिळें
वदे वचन गोड ते अमृत जोडल्याने [14] छळें ॥ १२ ॥

**जातस्ते निशि जागरो०-- ॥ १३ ॥**

रात्रीं जागर जाहला तुज असे नेत्रीं मला शोणिमा[15]
तूं प्यालास मधूस[16] तें करितसे माझ्या मनीं विभ्रमा[17] ॥
भ्राम्यद्भृंगघनीं निकुंजभवनीं तूं पावसी श्रीफळा[18]
मारी मारशरीं करूनि मजला मी भोगिते त्यांफळा ॥ १३ ॥

**कान्तानुरागचतुरोऽसि०-- ॥ १४ ॥**

कांता प्रीतिकरा मनोहरवरा तारुण्यभूषाकरा
धीरा वीर्यपराक्रमैकचतुरा स्वामी मला तूं खरा ॥
ऐसें बोलुनि कामिनी ठिवितस स्वप्रांत कांताननीं
श्वासोच्छ्वास करूनि बाष्प भरलें संपूर्णचंद्राननीं ॥ १४ ॥

**नो तल्पं भजसे०-- ॥ १५ ॥**

पर्यंकीं[21] न चढेसि बोलसि न कां पियूष[22]वाक्यें मशीं
स्वपाते हि सनाथ[23] तूं न करिसी कोपप्रकाशें कशी ॥
ऐसे केतकगर्भगौरदयिते कोपासि संगोपिसी[24]
जें वक्रीं स्मित तें सखी न करिती तें सत्य तूं [25]कोपसी ॥ १५ ॥

**प्रतिफलमवलोक्य०-- ॥ १६ ॥**

शशीचे कळेमाजि देखोनिशानें । शिवा आपुलें बिंब कोपे त्वरेनें ॥
हराचे शिरीं दूसरी कोण राहे । करानें हरा भेडसावूनि पाहे ॥ १६ ॥

**तल्पोपान्तमुपेयुषि०-- ॥ १७ ॥**

येतां तल्पसमीप कांत ललना ते वक्र घोणा[27] करी

---

१३ यांत प्रगल्भेला झालेल्या संमोहाचें वर्णन १४ यांत मध्याधीरेचें वर्णन १५ शोणिमा=लाली १६ मधु=मद्य १७ विभ्रम=चळ १८ श्रीफळ=बेलफळ किंवा नारळ. १९ यात अधीरा मध्या ना० वर्णन आहे २० धीराधीरा मध्या ना० वर्णन. २१ पर्यंक=पलंग. २२ पीयूष=अमृत. २३ सनाथ=धन्य, सुखी २४ संगोपिसी=झांकतोस २५ यात प्रगल्भ धीरेचें वर्णन. २६ यांत अधीरा प्रगल्भेचें वर्णन. २७ घोण=नाक.

बोले दीनपणें करूनि वचनें तेव्हा स्मितश्री धरी ॥
हस्तीं हस्त ठिवीतसे तव पुन्हा कोपास अंगीकरी
नेत्रांतें पसरीतसे पतिवरी रक्तोत्पलाचे [47]परी ॥ १७ ॥

**एकस्मिन् शयने०— ॥ १८ ॥**

एके अयुरणीं सरोजनयना दोघी निजेल्यावरी
ग्रीवे[48] उच्च करूनि पाहत पती तों एकि निद्रा करी ॥
गेला अन्यवधूप्रती मृदु करें चैलांचलातें धरी
केली गुप्त निशारती तव वधू ते होय जागी [49]वरी ॥ १८ ॥

**अंतःकोपकषायितप्रियतमे०— ॥ १९ ॥**

अंतःकोपक[50]षायित प्रियतमा देखोनि दोघी वनीं
पुण्यें वंचवयास योजित असे एकीस नम्राननी ॥
अर्धोन्मीलि[51]तनेत्रकोणें[52] नवले रामानना[53] पाहतो
स्मेरा[54]धरपल्लवीं नव वधू आणीक[55] आलिंगितो ॥ १९ ॥

**धैर्याधैर्यपरिग्रहग्रहिलयोः०— ॥ २० ॥**

धैर्याधैर्यपरिग्रहाग्रहधरा दोघी प्रिया सुंदरा
त्यांला प्रीतिकरावया पति धरी रत्नांसि त्यां सादरा ॥
एकीला दिधले त्वरें करूनिया नेदी दुजीला खरा
ते ज्ञेचे बहुसाल वल्लभ तिच्या चुंबीत बिंबाधरा ॥ २० ॥

**अयं रेवाकुंजः०— ॥ २१ ॥**

स्मेराला[56] सेवाया धरणिवरि रेवा[57]तट वसे
सुगंधाचा वारा मलय[58]ज बरा वाहत असे ॥
पहा प्रावृट् धन्या नव जलद विस्तारून वसे
सखे वो कांहीं ही करि मन पराधीन च असे ॥ २१ ॥

**श्वश्रूः क्रुध्यति०— ॥ २२ ॥**

सासू कोपतसे सुहृज्जन तसे जाऊ हि निंदीतसे
त्या गेहांत निर्जनसें सखि पुन्हा माझे मनीं ही नसे ॥

---

४८ यांत धीराधीरा प्रगल्भेचें वर्णन ४९ ग्रीवा=मान ५० यात धीरा ज्येष्ठा कनिष्ठा वर्णन आहे. ५१ कोपकषायित=रागानें लाल झालेले. ५२ उन्मीलित=उघडलेले. ५३ कोण=कोपरा ५४ रामानन=स्त्रीमुख. ५५ स्मेर=गालात हसणें ५६ आणीक=दुसरी. ५७ यात अधीरा ज्येष्ठा कनिष्ठा वर्णन ५८ यात धीराधीरा ज्येष्ठा कनिष्ठा वर्णन. ५९ स्मर=मदन. ६० रेवा=नर्मदा नदी. ६१ मलय=पर्वत विशेष. ६२ यात परोढेचे वर्णन आहे.

भारी मूषक[६३] थोर कोणकुहरीं[६४] राहोन ते मांजरी
उत्फालेन करी करूनि मजला पीडा शरीरीं [६५]करी ॥ २२ ॥

**निबिडतमतमाल०— ॥ २३ ॥**

तमालतरु दाटती बहुत मालती फूलती
सुवाससुख भोगिती भ्रमरपुंज ही गुंजती ॥
निकुंज [६६]तटिनीतटीं असति पांथ जा त्यांप्रती
निदाघ[६७]तपनातपें श्रमति ते तया सेविती[६८] ॥ २३ ॥

**दासाय भवननाथे०— ॥ २४ ॥**

घरधणी म्हणतां निज सेवका । त्वरित हा बदरीद्रुम[६९] तोडिकां ॥
अइकतां रमणी अति शाहणी । त्यजि जळांत हिमांतिं[७०] कुठारिणी[७१] ॥ २४ ॥

**यद्भूतं तद्भूतं०— ॥ २५ ॥**

जें जालें जितकें समस्त तितकें होऊनि गेलें असे
जें होईल पुढें पुढें सकळ ही ते होउ देवू तसें ॥
जें होतें सखि होत [ आजि ] असतां वीलंब कां दाविसी
लज्जा सोडुनि बोल गोड वचनें कां तू वृथा [७३]कोपसी ॥ २५ ॥

**एते वारिकणान् किरंति०— ॥ २६ ॥**

हे मेघ [७४]वारिकण वर्षति नो नरांसी
हे शैल[७५] देति तृण नेदिति पूरुषांसी ॥
हा वृक्ष ही फळ फळे न फळे जनासी
कैसी विधी[७६] पुरविली कुलटा[७७]असोसी[*][७८] ॥ २६ ॥

**समुपागतवति चैत्रे०— ॥ २७ ॥**

लवंगलतिकादळें झडति चैत्रमासीं बळें
परोढ[७९]वनितावळीं करित दुःख ते आगळें ॥
कपोल[८०]तल पांढरें धरिति तालपत्रापरी
विशेष मदनानळें जळतसे सदा [८१]अंतरीं ॥ २७ ॥

---

६३ मूषक=उंदीर ६४ कोणकुहर=कोपऱ्यातलें बीळ. ६५ यांत गुप्ता वर्णन ६६ तटिनी=नदी. ६७ निदाघ=उन्हाळा ६८ यात वाग्विदग्धा वर्णन ६९ बदरीद्रुम=बोरीचें झाड ७० हिमांत=हिवाळ्यांत. ७१ कुठारिणी=कुऱ्हाड. ७२ यांत क्रियाविदग्धा-वर्णन. ७३ यांत लक्षिता वर्णन. ७४ वारि=पाणी. ७५ शैल=पर्वत ७६ विधी=नशीब. ७७ कुलटा=जारिणी. * असोशी=उत्कट इच्छा. ७८ यांत कुलटावर्णन ७९ परोढ=दुसऱ्यानें जिच्याशीं लग्न केलें आहे अशी. ८० कपोल=गाल. ८१ यांत परोढावर्णन.

**निद्रालुकेकिमिथुनानि०-- ॥ २८ ॥**

निद्रा मयूरमिथुनें करिती कपोती
गाती नवीन तरुपल्लव हालवीती ॥
तैशीं च आणिक वनें किति ही नसेती
खेदींसि कां करिसि जा पति भोगिं राती ॥ २८ ॥

**कर्णकल्पितरसालमंजरी०--- ॥ २९ ॥**

रसाळतरुमंजरी धरुनि कृष्ण कानीं बरी
त्वरें करुनियां वराप्रति पाहतसे सुंदरी ॥
प्रतप्तविरहानळें नयनिं वाहताती जळें
मनीं म्हणत राधिका हरि वरील गोपीकुळें ॥ २९ ॥

**गोष्ठेषु तिष्ठति पतिः०--- ॥ ३० ॥**

जाऊ हीनविलोचिनी नणद ते बैराट कानीं असे
राहे कांतहि गोठणी तरुणि ते संतोष मानीतसे ॥
चोळी दाटतसे उरावरि धरी बिंबाधरीं शोणिमा
साडी नेसुनियां त्वरें करितसे पांथास कामभ्रमा ॥ ३० ॥

**किंचित्कुंचितहारयष्टि०--- ॥ ३१ ॥**

कांहीं वक्रित हार फार सरळा भ्रू वांकडी हांसते
प्रीतीं भोंवति लोचनें भुजि ठिवी कर्णावतंसास ते ॥
[१०]अंगोळीस जडांत घालुनि मुदी कानास कांडोळिते
ऐशी ते नृपकन्यका हि दयिताव्याजें स्वयें पाहते ॥ ३१ ॥

**आनंदाश्रुपयांसि मुंचति०--- ॥ ३२ ॥**

आला देखुनि आंगणी बहुधनीं दाता मनीं हर्षली
आलिंगीति परस्परें स्तन तिचे चोळी उरीं दाटली ॥
आनंदाश्रुजळें त्यजी घडिघडी धम्मिल्लमौलाछळें
आकर्णांतविलोचना पतिपशीं येऊनि बैसे वेळें ॥ ३२ ॥

**त्वं दूति निरगाः०--- ॥ ३३ ॥**

गेलीस तूं कुंज पाहावयासी । त्या पापियाच्या सदना नसेसी ॥
पलाशपुष्पाभरणें धरीसी । ऐसें वदे कामिनि दूतिकेसी[१६] ॥ ३३ ॥

---

८२ यांत अनुशयानावर्णन आहे. ८३ रसाळतरु=आंब्याचें झाड. ८४ यांत ही अनुशयानावर्णन आहे. ८५ हीनविलोचनी=अधळी ८६ बैराट=बहिरी. ८७ शोणिमा=लाली. ८८ यांत मुदितावर्णन आहे ८९ कर्णावतंस=कर्णभूषण १० अंगोळी=बोट. ११ व्याज=मिष. १२ यांत कन्यका वर्णन आहे १३ धम्मिल्ल=केंस. १४ छळ=मिष. १५ यांत चित्रात्रोपाधि सामान्य वनिता वर्णन आहे. १६ यांत अन्यसंभोगदुःखितावर्णन आहे

वपुषि तनोति०— ॥ ३४ ॥

भूषणे जडित लेउनिशानें । धन्य होसि सखि कांतकृपेनें ॥
अतरेल पति रूप पहाया । भूषणें मज न देत धरांया ॥ ३४ ॥

कलयति कमलोपमानमक्ष्णोः— ॥ ३५ ॥

लोचनास उपमा कमळाची । दे पती सुवचनास सुधेची ॥
सांग काय करूं यत्न तयाचा । दोष कांत धरि शातपणाचा ॥ ३५ ॥

स्वेदांबुभिः क्वचन०— ॥ ३६ ॥

स्वेदोदकें१०० करुनि पिच्छल१ आंग बाई । होऊनि कंटकित शोभत ठाइ ठाईं ॥
हा कांत अन्य वधु जे घडि पाहताहे। कोठें ठिवील पद मान२ तुझा न साहे ॥ ३६ ॥३

यद्गोत्रस्खलनं तत्र०— ॥ ३७ ॥

चुकोनि तें नाम मुखास आलें । हें सत्य मानी सखि एक बोलें ॥
न मानिसी तें दिवँ४ मी करीतों । रोमावळीव्याळें५ करीं धरीतों ॥ ३७ ॥६

दयितस्य निरीक्ष्य०— ॥ ३८ ॥

कपाळीं पतीचे परस्त्रीपदाचा । पडे डाग देखोनियां यावयाँचा७ ॥
प्रियालोचनप्रांत आरक्त झाले। प्रियाचे मनीं भासतो कामभाले ॥ ३८ ॥८

पूर्वी प्रोषित भर्तृका परिसणें त्यानंतरें खंडिता
ती पूढें कलहांतरा चतुर ते स्त्री
उक्ता वासकसज्जिका तदुप
जाणावी अभिसारिका नवम ते प्राप्यात्प्रयो नायिका ॥

दुसरा उल्लास प्रारंभ.

दुःखं दीर्घतरं०— ॥ ३९ ॥

लज्जेनें तरि दीर्घ दुःख सखयांपाशीं न ये बोलतां ।
शैवालास्तरणीं न ये पहुडतां शंका पडे सांगतां ॥
कंठीं गद्गदवाणि लोचनजळें द्रावेति ना अन्यथा ।
संतापाकुळ फार पद्मनयना कंदर्प९ जाणे व्यथा ॥ ३९ ॥१

१७ यांत प्रेमगर्वितावर्णन आहे. १८ सुधा=अमृत. १९ यांत सौंदर्यगर्वितावर्णन आहे. १०० स्वेद=घाम. १ पिच्छल=व्याप्त, कर्दमयुक्त. २ मान=गर्व. ३ यांत मानवती ( नं १ ) वर्णन आहे. ४, दिव=शपथ. ५ व्याळ=साप. ६ यांत मानवती ( नं २ ) वर्णन आहे ७ यावक=अळिता ८ यांत मानवती ( नं ३ ) वर्णन आहे ९ कदर्प=मदन १ यांत मुग्धा प्रोषितभर्तृका वर्णन आहे

**निद्रालुकेकिमिथुनानि०-- ॥ २८ ॥**

निद्रा मयूरमिथुनें करिती कपोती
गाती नवीन तरुपल्लव हालवीती ॥
तैशी च आणिक वनें किति ही नसेती
खेदासि कां करिसि जा पति भोगिं राती ॥ २८ ॥

**कर्णकल्पितरसालमंजरी०— ॥ २९ ॥**

रसाळतरुमंजरी धरुनि कृष्ण कानीं बरी
त्वरें करुनियां वराप्रति पाहतसे सुदरी ॥
प्रतप्तविरहानळें नयनिं वाहताती जळें
मनीं म्हणत राधिका हरि वरील गोपीकुळें ॥ २९ ॥

**गोष्ठेषु तिष्ठति पतिः०— ॥ ३० ॥**

जाऊ हीनविलोचैना नणद ते बैराट कानीं असे
राहे कांतहि गोठणीं तरुणि ते संतोष मानीतसे ॥
चोळी दाटतसे उरावरि धरी बिंबाधरीं शोणिमा
साडी नेसुनियां त्वरें करितसे पांथास कामभ्रमा ॥ ३० ॥

**किंचित्कुंचितहारयष्टि०-- ॥ ३१ ॥**

कांहीं वक्रित हार फार सरळा भ्रू वांकडी हांसते
प्रीती भोवति लोचनें भुजि ठिवी कर्णावतंसास ते ॥
[९०]अंगोळीस जडीत घालुनि मुदी कानास कांडोळिते
ऐशी ते नृपकन्यका हि दयिताव्याजें स्वयें पाहते ॥ ३१ ॥

**आनंदाश्रुपयांसि मुंचति०-- ॥ ३२ ॥**

आला देखुनि आंगणी बहुधनी दाना मनीं हर्षली
आलिंगीति परस्परे स्तन तिचें चोळी उरीं दाटली ॥
आनंदाश्रुजळें त्यजी घडिघडी धम्मिल्लमीलाच्छळें
आकर्णांतविलोचना पतिपशीं येऊनि बैसे बळें ॥ ३२ ॥

**त्वं दूति निरगाः०-- ॥ ३३ ॥**

गेलीस तूं कुंज पाहावयासी । त्या पापियाच्या सदना नसेसी ॥
पलाशपुष्पाभरणें धरीसी । ऐसें वदे कामिनि दूतिकसी[९६] ॥ ३३ ॥

---

८२ यांत अनुशयानावर्णन आहे. ८३ रसाळतरु=आंब्याचें झाड. ८४ यात ही अनुशयानावर्णन आहे. ८५ हीनविलोचनी=अधळी ८६ बैराट=बहिरी. ८७ शोणिमा=लाली. ८८ यात मुदितावर्णन आहे ८९ कर्णावतंस=कर्णभूषण ९० अंगोळी=बोट. ९१ व्याज=मिष. ९२ यांत कन्यका वर्णन आहे ९३ धम्मिल्ल=केस. ९४ छळ=मिष. ९५ यात चिंतामात्रोपाधि सामान्य वनिता वर्णन आहे. ९६ यांत अन्यसंभोगदुःखितावर्णन आहे

वपुषि तनोति०— ॥ ३४ ॥

भूषणे जडित लेउनिशानें । धन्य होसि सखि कांतकृपेनें ॥
अंतरेल पति रूप पहाया । भूषणें मज न देत धरांया ॥ ३४ ॥

कलयति कमलोपमानमक्ष्णोः— ॥ ३५ ॥

लोचनास उपमा कमळाची । दे पती सुवचनास सुधेची ॥
सांग काय करू यत्न तयाचा । दोष कांत धरि शांतपणाचा ॥ ३५ ॥

स्वेदांबुभिः क्वचन०— ॥ ३६ ॥

स्वेदोदकें[100] करुनि पिच्छल[1] आंग बाई । होऊनि कंटकित शोभत ठाइं ठाईं ॥
हा कांत अन्य वधु जे घडि पाहताहे । कोठें ठिवील पद मान[2] तुझा न साहे ॥ ३६ ॥

यद्गोत्रस्खलनं तत्र०— ॥ ३७ ॥

चुकोनि तें नाम मुखांत आलें । हें सत्य मानी सखि एक बोलें ॥
न मानिसी तें दिवें[4] मी करीतों । रोमावळीव्याळें[5] करीं धरीतों ॥ ३७ ॥

दयितस्य निरीक्ष्य०— ॥ ३८ ॥

कपाळीं पतीचे परस्त्रीपदाचा । पडे डाग देखोनियां यावकांचा[7] ॥
प्रियालोचनप्रांत आरक्त झाले । प्रियाचे मनीं भासतो कामभाले ॥ ३८ ॥

पूर्वी प्रोषित भर्तृका परिसणें त्यानंतरें खंडिता
ती पूढें कलहांतरा चतुर ते स्त्री विप्रलब्धान्विता ।
उक्ता वासकसज्जिका तदुपरी स्वाधीनभर्तृका
जाणावी अभिसारिका नवम ते प्रोष्यत्प्रियो नायिका ॥

---

दुसरा उल्लास प्रारंभ.

दुःखं दीर्घतरं०— ॥ ३९ ॥

लज्जेनें तरि दीर्घ दुःख सखयांपाशीं न ये बोलतां ।
शैवालास्तरणी न ये पहुडतां शंका पडे सांगतां ॥
कंठीं गद्गदवाणि लोचनजळें स्रावेंति ना अन्यथा ।
संतापाकुळ फार पद्मनयना कंदर्प[9] जाणे व्यथा[10] ॥ ३९ ॥

---

९७ यात प्रेमगर्वितावर्णन आहे. ९८ सुधा=अमृत. ९९ यात सौंदर्यगर्वितावर्णन आहे. १०० स्वेद=घाम. १ पिच्छल=ओलसर, कर्दमयुक्त २ मान=गर्व. ३ यांत मानवती ( नं १ ) वर्णन आहे. ४ दिव=शपथ. ५ व्याळ=साप. ६ यांत मानवती ( नं २ ) वर्णन आहे ७ यावक=अळिता. ८ यांत मानवती ( नं ३ ) वर्णन आहे. ९ कदर्प=मदन १० यांत मुग्धा प्रोषितभर्तृका वर्णन आहे

**वासस्तदेव वपुषो॰ -- ॥ ४० ॥**

हीं कंकणें मनगटीं सखि वस्त्र तें चीं । श्रोणी[११] निबद्धरसना मणियुक्त कांची[१२] ॥
गुंजारव भ्रमरवाणि किमर्थ आजी । हें साग गे सखि पुसे मति काय डोंजी[१३] ॥ ४० ॥

**माला बालांबुजदलमयी॰ -- ॥ ४१ ॥**

माला बालांबुजदलगलन्हार मुक्ताफळाचा ।
काची श्रोणी त्यजुनि जघनीं नेणवे भाव साचा ॥
बाहूमूळीं चढति वलयें का पुसे दूति वाचा ।
प्रस्थानीं हें किमपि पतिच्या साग गुह्यार्थ साचा[१४] ॥ ४१ ॥

**श्वश्रूः पद्मदलं॰ — ॥ ४२ ॥**

सासू पंकजपत्र दे *तदपि ते केले झणे भूलवे* ॥
कंदर्पें परितेस संस्तव करी नैवे व्यथा लङ्घवे ॥
वाचे नो बॅलवे[१५] सुत्दृगणमुखे याउत्तरा दे वदे ।
उष्ण श्वास निघेति एणनयना कोणास जाणें नदे ॥ ४२ ॥

**विरहविदितमन्तः॰ — ॥ ४३ ॥**

विरह विदित व्हावा प्रेम कांतासि दावी ।
पुनरपि भन द्यावें आपुलीं प्रीति लावी ॥
मरिचें[१७] नयनपक्षीं घालुनी बाष्प[१८] आणी ।
धृत उभि पुरयोषा द्वार कांतप्रयाणी[१९] ॥ ४३ ॥

**वक्षः किमु कलशांकितं॰ -- ॥ ४४ ॥**

हृदय कां कलशांकित[२०] हें तया । पतिस इच्छित दार[२१] पुसावया ॥
प्रियतमें मग चिन्हित देखिली ॥ मग धरूनि करें परिरंभिली[२३] ॥ ४४ ॥

**वक्षोजचिन्हितमुरो॰ -- ॥ ४५ ॥**

वक्षोजचिन्हित उरा पतिचे निरीक्षी । उच्छ्वास टाकित असे न वदे परीक्षी ॥
प्रातउठोनि मुख मार्जितसे[२४] करानें । बोला विलोचन पुसी पटपल्लवानें[२६] ॥ ४५ ॥

**कान्तं वीक्ष्य विपक्ष॰ -- ॥ ४६ ॥**

माझें चिन्ह सपत्निचे स्वनयनी देखोनिया बोलिली ।

---

११ श्रोणी=कुल्हे. १२ काची=कमरपट्टा १३ यात मध्या प्रोषितभर्तृका वर्णन आहे. १४ यांत प्रौढ प्रोषित भर्तृका वर्णन आहे. १५ बलवे=बोलवे. १६ यात परकीय प्रोषित भर्तृका वर्णन आहे १७ मरिच=मिरीं, मिरची १८ बाष्प= अश्रु १९ यांत सामान्य वनिता प्रोषित भर्तृका वर्णन आहे. २० कलशांकित=( स्तन ) कुंभचिन्हित. २१ दार= स्त्री. २२ यात मुग्धखडिता वर्णन आहे २३ परिरंभिली=आलिंगिली. २४ मार्जितसे= धूत असे. २५ यांत मध्या खडिता वर्णन आहे २६ पल्लव=पदर

पादालॆक्तमुखावलिप्त मग ते चित्रोपमा राहिली ॥
टाकी श्वास अधोमुखें न वदली आणोनि नेत्रोदक ॥
प्रीतिदर्पण[27] दाविला मज तिणें ऐसें वदे नायकें ॥ ४६ ॥[28]

**कान्तं निरीक्ष्य वलयांकित कंठदेश०-- ॥ ४७ ॥**

देखे प्रियासि वलयांकित[29] कंठ देशी । मुक्ताक्षतादि न वदे परुषा विशेषीं ॥
दूतीकडे मृगदृशा उभि दूरि पाहे । नेत्राश्रुगत करिता जळपूर्ण[30] वाहे ॥ ४७ ॥

**उरस्तव पयोधरांकितमिदं०-- ॥ ४८ ॥**

उरी स्तन कुचवले मदनमोक्ष कोणे स्थळी ॥
नसे स्मरण आमुचें पति तुम्हास वक्षोत्पळी ॥
वदे प्रचलचेतसा प्रियतमासि वारस्त्रियीं[31] ॥
हरोनि करकंकणा त्वरित घेतसे त्याचियीं[32] ॥ ४८ ॥

**अनुनयति पतिं०— ॥ ४९ ॥**

न वदत पतिला उगी भिडेनें । न कथिति सखियां सलज्जतेनें ॥
मलयमरुतें[33] पै सुगंधि वाहे । मनि सुख नसता जिला न साहे ॥ ४९ ॥[34]

**विरमति कथनं विना०— ॥ ५० ॥**

उसरमा मनिचा वदता नये । जरि वदो तरि लाजतसे सये ॥
उगि अधोमुख यास्तव ते असे । किमु वदों न वदों विदधीतसे[35] ॥ ५० ॥

**अकरोः किमु नेत्रशोणिमानं०— ॥ ५१ ॥**

रुधिर[36] नेत्र फिके मन का तुझे । करसरोरुहतर्जन[37] मी बुझे ॥
कलहकोप किमर्थ तयावरी । सखि म्हणे हित काय तनूदरी[38] ॥ ५१ ॥[39]

**भर्तुर्यस्य कृते०— ॥ ५२ ॥**

भर्तारा लघु मानिलें वचन म्या नाकर्णिलें त्या गुणें ॥
गेलें धैर्यधन त्रपा उडविली जैसी समीरें[40] तृणें[41] ॥
बिंदुप्राय तटाकिनी[42] पळविली म्यां नीति देशांतरें ॥
क्रोधे धिक्कृत बुद्धिधिग्विधिवशा बोले रसोळोत्तरें[43] ॥ ५२ ॥

---

२७ दर्पण=आरसा २८ यात प्रौढा खंडिता वर्णन आहे २९ वलयांकित=कंकण-चिन्हित. ३० यात परकीय खंडिता वर्णन आहे. ३१ वारस्त्रिया=वेश्या ३२ यात सामान्य वनिता खंडिता वर्णन आहे. ३३ मलयमरुत=मलय पर्वतावरून येणारा वायु ३४ यांत मुग्धा कलहांतरिता वर्णन आहे ३५ यांत मध्या कलहांतरिता वर्णन आहे ३६ रुधिर=लाल ३७ तर्जन=झिडकारणे. ३८ तनूदरी=सिंह-कटी ३९ यात प्रौढा कलहांतरिता वर्णन आहे. ४० समीर=वायु ४१ तृण=गवत ४२ तटाकिनी=नदी ४३ यात परकीया कलहांतरिता वर्णन आहे

**वासस्तदेव वपुषो० -- ॥ ४० ॥**

हीं कंकणें मनगटीं सखि वस्त्र ते ची । श्रोणी[11] निबद्धरसना मणियुक्त कांची[12] ॥
गुंजारव भ्रमरवाणि किमर्थ आजी । हें सांग गे सखि पुसे मति काय हीजी॥ ४० ॥

**माला बालांबुजदलमयी० -- ॥ ४१ ॥**

माला बालांबुजदलगलन्हार मुक्ताफळांचा ।
कांची श्रोणी त्यजुनि जघनीं नेणवे भाव साचा ॥
बाहूमूळीं चढति वलयें का पुसे दूति वाचा ।
प्रस्थानीं हें किमपि पतिच्या साग गुह्यार्थ साचा[13] ॥ ४१ ॥

**श्वश्रूः पद्मदलं० -- ॥ ४२ ॥**

सासू पंकजपत्र दे तदपि तें घेतें ह्मणे भूलवे ॥
कंदर्पे परितप्त यास्तव करें नेघे व्यथा उद्भवे ॥
वाचे नो बलवे[14] सुत्दद्गणमुखें याउत्तरा दे वदे ।
उष्ण श्वास निघेति एणनयना कोणास जाणें नदे ॥ ४२ ॥

**विरहविदितमन्तः० -- ॥ ४३ ॥**

विरह विदित व्हावा प्रेम कांतासि दावी ।
पुनरपि धन दावें आपुली प्रीति लावी ॥
मरिचें[17] नयनपद्मीं घालुनी बाष्प आणी ।
धृत उभि पुरयोषा द्वार कांतप्रयाणीं[19] ॥ ४३ ॥

**वक्षः किमु कलशांकितं० -- ॥ ४४ ॥**

ह्रदय कां कलशांकित[20] हें तया । पतिस इच्छित दार[21] पुसावया ॥
प्रियतमे मग चिन्हित देखिली[22] ॥ मग धरुनि करें परिरंभिली[23] ॥ ४४ ॥

**वक्षोजचिन्हितमुरो० -- ॥ ४५ ॥**

वक्षोजचिन्हित उरा पतिचे निरीक्षी । उच्छ्वास टाकित असे न वदे परीक्षी ॥
प्रातउठोनि मुख मार्जितसे[24] करानें । बोला विलोचन पुसी पटुपल्लवानें[25] ॥ ४५ ॥

**कान्तं वीक्ष्य विपक्ष० -- ॥ ४६ ॥**

माझें चिन्ह सपत्निचें स्वनयनीं देखोनिया बोलिली ।

---

११ श्रोणी=कुल्हे १२ काची=कमरपट्टा. १३ यात मध्या प्रोषितभर्तृका वर्णन आहे. १४ यांत प्रौढ प्रोषित भर्तृका वर्णन आहे. १५ बलवें=बोलवे. १६ यांत परकीय प्रोषित भर्तृका वर्णन आहे १७ मरिच=मिरीं, मिरची. १८ बाष्प= अश्रु १९ यात सामान्य वनिता प्रोषित भर्तृका वर्णन आहे. २० कलशांकित=( स्तन ) कुंभचिन्हित. २१ दार= स्त्री. २२ यात मुग्धखडिता वर्णन आहे २३ परिरंभिली=आलिंगिली. २४ मार्जितसे= धूत असे. २५ यांत मध्या खडिता वर्णन आहे २६ पल्लव=पदर

पादालीक्तमुखावलिप्त मग ते चित्रोपमा राहिली ॥
टाकी श्वास अधोमुखें न वदली आणोनि नेत्रोदक ॥
प्रौंत[२७]र्दर्पण दाविला मज तिणें ऐसें वदे नायकें ॥ ४६ ॥

**कान्तं निरीक्ष्य वलयांकित कंठदेश०-- ॥ ४७ ॥**

देखे प्रियासि वै[२९]लयांकित कंठ देशीं । मुक्ताक्षतादि न वदे परुषा विशेषीं ॥
दूतीकडे मृगदृशा उभी दूरि पाहे । नेत्राम्बुपात करिता जळपूर्ण वा[३०]हे ॥ ४७ ॥

**उरस्तव पयोधरांकितमिदं०-- ॥ ४८ ॥**

उरीं स्तन कुचबले मदनमोक्ष कोणे स्थळीं ॥
नसे स्मरण आमुचें पति तुम्हांस वक्षोत्पळीं ॥
वदे प्रचलचेतसा प्रियतमासि वारस्त्रियौं[३१] ॥
हरोनि करकंकणा त्वरित घेतसे त्याचियौं[३२] ॥ ४८ ॥

**अनुनयति पतिं०-- ॥ ४९ ॥**

न वदत पतिला उगी भिडेनें । न कथिति सखियांस लज्जतेनें ॥
मलयमरु[३३]तैं पै सुगंधि वाहे । मनिं सुख नसता जिला न सा[३४]हे ॥ ४९ ॥

**विरमति कथनं विना०-- ॥ ५० ॥**

उसरमा मनिचा वदतां नये । जरि वदों तरि लाजतसे सये ॥
उगी अधोमुख यास्तव ते असे । किमु वदों न वदों विदधीतसे[३५] ॥ ५० ॥

**अकरोः किमु नेत्रशोणिमानं०-- ॥ ५१ ॥**

रु[३६]धिर नेत्र फिके मन का तुझें । करसरोरु[३७]हैंतर्जन मी बुझें ॥
कलहकोप किमर्थ तयावरी । सखि म्हणे हित काय तनूदरी[३८][३९] ॥ ५१ ॥

**भर्तुर्यस्य कृते०-- ॥ ५२ ॥**

भर्तारा लघु मानिले वचन म्यां नाकर्णिले त्या गुणें ॥
गेलें धैर्यधन त्रपा उडविली जैसी समीरें[४०] तृणें[४१] ॥
बिंदुप्राय त[४२]टाकिनी पळविली म्या नीति देशांतरें ॥
क्रोधें धिक्कृत बुद्धिधिग्विधिवशा बोले र[४३]साळोत्तरें ॥ ५२ ॥

---

२७ दर्पण=आरसा २८ यांत प्रौढा खडिता वर्णन आहे. २९ वलयांकित=कंकण-चिन्हित. ३० यात परकीय खडिता वर्णन आहे. ३१ वारस्त्रिया=वेश्या. ३२ यांत सामान्य वनिता खडिता वर्णन आहे. ३३ मलयमरुत=मलय पर्वतावरून येणारा वायु ३४ यात मुग्धा कलहांतरिता वर्णन आहे ३५ यांत मध्या कलहांतरिता वर्णन आहे ३६ रुधिर=लाल ३७ तर्जन=झिडकारणे. ३८ तनूदरी=सिंह-कटी ३९ यात प्रौढा कलहांतरिता वर्णन आहे ४० समीर=वायु. ४१ तृण=गवत ४२ तटाकिनी=नदी ४३ यात परकीया कलहांतरिता वर्णन आहे

**यत्पंकेरुहलक्ष्म पाणिकमलं ॥ ५३ ॥**

हातीं पंकजचिन्ह भाळपटळीं भाग्याक्षरें वेधसें[४४] ॥
जे जें पैं लिहिलें यथार्थ सखिये योजूनि आलें तसें ॥
केला त्यां परि कोप का पति वृथा धिग्बुद्धि धिग् बोलणें ॥
धिक् तारुण्य वयासि धिग्धिगे सये चातुर्य धिक् यौवनें ॥ ५३ ॥

**आलीभिः शपथैरनेक कपटैः— ॥ ५४ ॥**

आलीनीं[४६] शपथा करूनि कपटें नेली निकुंजालया ॥
तेथें कांत नसे ह्मणोनि उगली पावोनियां विस्मया ॥
पाहे क्रोधित पद्मपत्रनयना कुंजोपकंठाकडे[४७] ॥
गुंजत्कार मिलिंद[४८] मंद करिती पैं दृष्टि त्यासी जडे ॥ ५४ ॥

**संकेतकेलिगृहमेत्य० — ॥ ५५ ॥**

संकेतकेलिसदनीं[५०] दयितासि[५१] पाहे । तेथें नसे थबकली उगलीच राहे ॥
वाचेस शब्द न फुटे विकचार्धदृष्टी[५२] । तांबूलवीडि[५३] वदनीं करि चित्र सृष्टी ॥५५॥

**शून्यं कुंजगृहं निरीक्ष्य० — ॥ ५६ ॥**

देखे शून्य निकुंजसद्म[५५] मग ते कामानळें व्यापिली ॥
सांगेना गुज दूतिकेसि न पुसे वार्ता उगी राहिली ॥
शंभू शंकर चंद्रचूड भगवन् श्रीकंठ ऊमापती ॥
त्राहि[५६] त्राहि ह्मणे मृगेक्षणि करी ऐशी शिवाची स्तुती ॥ ५६ ॥

**दत्वा धैर्यभुजंगमूर्ध्नि चरणं ॥ ५७ ॥**

धैर्यव्याळफडेसि देऊनि पदा उत्तीर्णलज्जापगा[५८] ॥
अंगीकारूनि जाय वाट तिमिरा देखे चि ना सौभगा[५९] ॥
संतापाकुळ पैं प्रतप्त मदनें तो होय मेघध्वनी ॥
क्रोधें पाहतसे कृतांतमहिषा[६०] सादृश्य मानी मनीं ॥ ५७ ॥

**कपटवचनभाजा० — ॥ ५८ ॥**

कपट करून कोणी एक वारांगनेनें । कथुनि रसिक गोष्टी कांत नेला स्त्रहेनें ॥

---

४४ वेधसें=ब्रह्मदेवानें. ४५ यांत सामान्य वनिता कलहांतरिता वर्णन आहे. ४६ आलि=सख्या ४७ उपकंठ=प्रदेश ४८ मिलिंद=भ्रमर. ४९ यांत मुग्धा विप्रलब्धा वर्णन आहे. ५० केलिसदन=क्रीडागृह. ५१ दयित=प्रियकर. ५२ विकच=विकसित. ५३ तांबूल वीडि=पट्टी ५४ यांत मध्या कलहांतरिता वर्णन आहे. ५५ सद्म=गृह. ५६ त्राहि=रक्षण-कर. ५७ यात प्रौढा विप्रलब्धा वर्णन आहे. ५८ उत्तीर्ण लज्जापगा=उतरून गेली आहे लज्जारूप नदी जी अशी ५९ सौभगा=प्रियकर. ६० कृतांत=यम. ६१ यात परकीया विप्रलब्धा वर्णन आहे.

हसति मधुपनेत्रा[६२] कुंजकेलि[६३]प्रसंगीं । विकचकुसुमवर्णा प्रीति लावी पैलगीं[६४] ॥ ५८ ॥

**यन्नाद्यापि समागतः०— ॥५९ ॥**

कां अद्यापि न ये गृहा मनिं ह्मणे अन्यांगने पावला ॥
लज्जेनें न पुसे सखिप्रति कदा कंदर्प[६५] झेंपावला ॥
दीर्घ श्वास न टाकिले थबकली पाहे न कोणाकडे ॥
तापें पक्वपलांडु[६६]पाडुरनिभा दोहीं कपोलीं[६७] पडे ॥ ५९ ॥

**आनेतुं न गता किमु० —॥ ६० ॥**

आणायासि न गेलिस प्रियसखी[६८] ऱ्याला दुजे सर्पिणी ॥
क्रोधें काय निषेधिलें मज गमे वार्ता वदें धर्मिणी ॥
कर्णीं केतकपत्र त्यावरि तदा बाष्पांबु टाकीतसे ॥
जाले रक्तक पक्ष्म पंकजदशी खेदासि मानीतसे ॥ ६० ॥

**आतर्निकुंज सखि यूथ०— ॥ ६१ ॥**

आता निकुंज सखि वल्लि रसाळ[७०] तात । माता क्षपा[७१] पितृतमासि पुसे वृतांत ॥
नीलांबुदाभ[७२] इकडून नसे न गेला । दामोदर प्रिय दुजे प्रमदेन नेला ॥ ६१ ॥

**स्नानं वारिदवारिभिः०— ॥ ६२ ॥**

जालें स्नान घनोदकें वसति पें केली महाकानन[७४]ीं ॥
शीतश्चंदन चर्चिला स्मर[७५] सदा आराधिला आसनीं ॥
केलें जागरणव्रतासि रजनी[७६] लज्जा दिली दक्षिणा ॥
ऐसें म्या तप साधिलें फळ नव्हे हे प्रोक्त मध्यक्षणा ॥ ६२ ॥

**कथं न कांतः समुपैति कुंजं०— ॥ ६३ ॥**

कां मित्र ये ना चि निकुंजगेहा । चिंता करी खेद विशेष देहा ॥
टाकी शरीरावरि बाष्पधारा । द्रव्याभिलाषास्तव पण्यदारा[७८] ॥ ६३ ॥

**हारं गुंफति तारकातिरुचिरं०— ॥ ६४ ॥**

माळा गुंफित हार हेमरशना[८०] गंधें सुगंधादिकें ॥
पात्रें सिद्धकरी प्रदीप करुनी कार्य प्रयोजी निकें ॥

---

६२ मधुपनेत्रा=भुंग्यासारखे काळे आहेत डोळे जीचे ती. ६३ केलि=क्रीडा ६४ यांत सामान्य वनिता विप्रलब्धा वर्णन आहे. ६५ कंदर्प=मदन ६६ पलांडु=कांदा. ६७ कपोल=गाल. ६८ यांत मुग्धा उत्कंठिता वर्णन आहे. ६९ यांत मध्या उत्कंठिता वर्णन आहे. ७० रसाळ=आंबा ७१ क्षपा=रात्र. ७२ नीलांबुदाभ=निळ्या ढगासारखा. ७३ यांत प्रौढा उत्कंठिता वर्णन आहे ७४ कानन=अरण्य. ७५ स्मर=मदन. ७६ रजनी=रात्र ७७ यांतपरकीया उत्कंठिता वर्णन आहे ७८ पण्यदारा=वेश्या. ७९ यांत सामान्य वनिता उत्कंठिता वर्णन आहे. ८० रशना=कमरपट्टा.

या रात्रीं रति नेमिली प्रियतमें दूतीस भाषीतसे ॥
हांसे चंद्रमुखी प्रसन्नवदना दूरस्त पाहातसे ॥ ६४ ॥

**शिल्पं दर्शयितुं करोति०— ॥ ६५ ॥**

गुफी हार कुतूहलें चतुरता कांता निरीक्षावया ॥
चित्रालोकनकैतवें करुनियां द्वारीं विलोकी तया ॥
लें रत्नाभरणें नवीं पतिमिसें देखे सखी लोचनीं ॥
पद्माक्षीचरितासि पाहुनि तदा कंदर्प हांसे मनीं ॥ ६५ ॥

**कृतं वपुषि भूषणं०— ॥ ६६ ॥**

करी वपुषि भूषणें चिकुरधोरणी धूपिलें ॥
करुनि उपचार त्यां शयनसन्निधीं ठेविले ॥
न ये प्रिय तदां वृथा सखि कदापि त्या स्पर्शिना ॥
म्हणे कनककांतिमा उगवलासि कां दुर्दिनीं ॥ ६६ ॥

**श्वश्रूं स्वापयति च्छलेन च०— ॥ ६७ ॥**

सासेला निजवी प्रदीप विझवी सौधीगृहा भीतरी[10] ॥
आकर्णी श्रवणीं कपोत घुमती चेष्टा बुजे सुंदरी ॥
पाहे रत्नविभूषणेंश्रु गळतां शोभे कपोलद्युती ॥
आला काय नसेल कांत शयना हस्ताब्ज लावी सती ॥ ६७ ॥

**चोलं नीलनिचोलकर्षणविधौ०— ॥ ६८ ॥**

हांसे ओढिल वस्त्र चुंबिल तदा चूडामणी मागणें ॥
कांची याचिन हस्त ठेविल कुचीं तेव्हां चि त्या कारणें ॥
आंगीं लाविन चंदनोत्तम तया कस्तूरिका भूषणें ॥
तैं माझे पुरती मनोरथ म्हणे वारांगना पाहाणें ॥ ६८ ॥

**मध्ये न कृशिमा स्तने न०— ॥ ६९ ॥**

मध्ये न कृशता कुचीं न घनता देहीं नसे भास्वता ॥
श्रोणीं न पृथुता गतीं न जडता नेत्रीं नसे वक्रता ॥
लौस्या न दृढता न वाणिपटुता हास्या न गंभीरता ॥

---

८१ रति=क्रीडा, संभोग. ८२ यांत मुग्धा वासकसज्जा वर्णन आहे. ८३ कुतूहल=हौस, आनंद ८४ कैतव=मिष ८५ लें=धारण करी ८६ यांत मध्या वासकसज्जा वर्णन आहे. ८७ चिकुरधोरणी=केशपाश ८८ यांत प्रगल्भ वासकसज्जा वर्णन आहे. ८९ सौध=गच्ची. १० भीतरी=आत ११ यांत परकीया वासकसज्जा वर्णन आहे. १२ चूडामणी=मुदराखडी १३ यांत सामान्य वनिता वासकसज्जा वर्णन आहे. १४ जडता=मंदत्व. १५ यांत-मुग्धा स्वाधिनपतिका वर्णन आहे.

ऐशार्था दयिता मशी च वशता नेणें सखे समता ॥ ६९ ॥

**यद्यपि रतिमहोत्सवे न कारो०-- ॥ ७० ॥**

सुरतोत्सवकाम जरी न करीं । दृढ नीरि जरी स्वकरें न धरीं ॥

पति सोडि नं पृष्ठि तथापि कधीं । करणें तरि काय सखे विधिंधीं ॥ ७० ॥

**रक्तस्याधरपल्लवस्य०-- ॥ ७१ ॥**

पीयूषाधरपल्लवा सुवचसा हास्यादि पैं जाणत्या ।

नाना स्पष्टविलासिनी मृगदृशा आहेत कित्येक त्या ॥

स्वप्नीं नावडती न जाय परता नेत्रीं न पाहे कदां ।

कांता भेद करील कोण मजला तो वश्य आहे सदां ॥ ७१ ॥

**स्वीयाः संति गृहे०-- ॥ ७२ ॥**

आहेत प्रमदा सखे निजगृहीं साळकता धीमता ।

कांचीनूपुरककणादिकझणत्कारा न विश्राम्यता ॥

त्या कोणी नलगे तो मज सर्वे प्राणेश भेटे सदां ॥

कांतारीं सदनीं विसबत नसे दृष्टी न सोडी कदा ॥ ७२ ॥

**संत्येव प्रतिमंदिरं०-- ॥ ७३ ॥**

आहेत प्रतिमंदिरीं मृगदृशा शीलसुधाब्धीसमा ।

स्रोतस्यूतसरोजसुंदरचमत्कारा दृशाविभ्रमा ॥

मोठी चित्रविचित्रमन्मथकळा प्रीति स्वभर्ता करी ।

पाहें चित्त समेत वित्त मज दे हा हेतु नेणें तरी ॥ ७३ ॥

**दूती विद्युदुपागता०-- ॥ ७४ ॥**

दूती विद्युलतामुपागत समप्राणप्रिया हो निशा ।

गर्जे ज्योतिषि मेघ दावित असे प्रस्थानवेळा दिशा ॥

झिल्लीचे रव होति तेचि तिमिरीं मागल्य जल्पे क्षमा ।

जालासे दयिताभिसारसमयो मुग्धे त्यजावी त्रपा ॥ ७४ ॥

**भीतासि नैव०--॥ ७५ ॥**

म्याली नसेसि किमु पथिं भुजंगमासी । शकेसि मद्रुज विलोकुनि तेवि त्यासी ॥

---

९६ स्वकरें=आपल्या हाताने ९७ 'नो सडि' मूळांत. ९८ पृष्ठि=पाठ. ९९ यात मध्या स्वाधीन पतिका वर्णन आहे. १०० पीयूष=अमृत १ यांत प्रौढास्वाधीन पतिका वर्णन आहे २ प्रमदा=स्त्रिया ३ नुपूर=पैंजण. ४ प्राणेश=प्रियकर ५ कातार=अरण्य. ६ यात परकीया स्वाधीन पतिका वर्णन आहे ७ यात सामान्य वनिता स्वाधीन पतिका वर्णन आहे ८ झिल्ली=कीटक विशेष (रातकीडा) ९ तिमिर=अंधार १० क्षपा=रात्र. ११ अभिसार=प्रियकराचे भेटीस जाऊन जाणें. १२ यात मुग्धा भिसारिका वर्णन आहे. १३ त्रपा= लाज १४ भुजंगम=साप

अंभोधरध्वनिस म्यालिस कीं कळावें । मद्धाषणें वदन वक्र किमोचरावें ॥७५॥

**स्फुरद्गुरासिजभारभंगुरांगी०--॥ ७६ ॥**

*स्तनकळशांकित भार फार झाला । किसलय[16]कोमल कांतिमा[17] पदाला ॥*

गमन कसें करिशील सांग भावें । रजनि[18] मनोरथ त्या रथीं बसावें ॥ ७६ ॥

**रभसादभिसर्तुमुद्यतानां०--॥ ७७ ॥**

रभसा[20] जलदार्क[21][22] मानि लोभा । रजनी दिवसांधकार शोभा ॥
वन पैं वेश्म[23] विमार्ग मार्ग वाहे । प्रमदे कांत विचार सांगताहे[24] ॥ ७७ ॥

**चंद्रोदये चंदनमांगकेषु०--॥ ७८ ॥**

चंद्रोदयीं चदन लावि हातें । स्मेरानना[25] ऊदित[26] जावयातें ॥
भेदावया चित्त तिचें प्रतापी । कंदर्प लावी कुमुदां स्वबापी[27] ॥ ७८ ॥

**पल्लीनामधिपस्य०--॥ ७९ ॥**

पल्लीगोपनिमंत्रिता मृगदृशा पर्वोत्सवाकारणें ।
ते धाडी गृहिचीं पुढें[28] स्मितमुखी राहे मिसें पाहणें ॥
गोपीगोप समानयौवन मदें क्रीडा करूं लागलीं
नाना चुंबन कठलग्न सुरतें प्रेमोत्सवें रंतलीं ॥ ७९ ॥

**लोलच्चोलचमत्कृति०--॥ ८० ॥**

काचीचे झणकार होति जघनीं चांचल्य चैलांचळीं
वक्षोजां[29] दृढ कंचुकी गवसिलें मत्तेभ[30] गा भूतळीं ॥
रुक्मालंकृत[31] हर्षयुक्त मदनोन्मादप्रसन्नानना
श्रीमताप्रति जाय कुंजभवना क्रीडेसि वारांगना[32] ॥ ८० ॥

**प्रस्थानं वलयैः कृतं०-- ॥ ८१ ॥**

प्रस्थाना गत कंकणें सम तया नेत्रोदकें जाइजे
गेलें धैर्य म्हणोनि त्याहुनि पुढें प्रस्थान चित्तें किजे ॥
गेली निश्चित चित्तवृत्ति मग ते ठायीं विचारी हिता
धाडी जीवित आपुले पतिसवें देशांतरा योषिता ॥ ८१ ॥

---

१५ यांत मध्याभिसारिका वर्णन आहे १६ किसलय=पल्लव १७ कांतिमा=शोभा. १८ रजनि=रात्र १९ यांत प्रौढाभिसारिकावर्णन आहे. २० रभसा=वेगानें, २१ जलद=मेघ २२ अर्क=सूर्य २३ वेश्म=घर २४ यांत परकीयाभिसारिका वर्णन आहे. २५ स्मेर=हास्य २६ ऊदित=तयार. २७ यात ज्योत्स्नाभिसारिकावर्णन आहे. २८ यांत दिवसाभिसारिकावर्णन आहे. २९ वक्षोज=स्तन. ३० मत्तेभ=मदोन्मत्तहत्ती. ३१ रुक्म=सोनें. ३२ यांत सामान्यवनिताभिसारिकावर्णन आहे

**प्राणेश्वरो किमपि जल्पति०--॥ ८२ ॥**

प्राणेश्वराप्रति भिडेस्तव बोलवेना । क्षामोदरी वदन आगाळि वर्जवेना ॥
कुंजगृहीं सखि समीप वदे न जावे । उन्मत्तकोकिलकळें[33]ध्वनि आ[34]यकावे ॥ ८९॥

**गंतुं प्रिये वदति०--॥ ८३ ॥**

जातां प्रियो श्वसित नान वदे प्रयाणीं । स्फुदे न दीर्घनयना जलबिंदु नाणी ॥
आयुर्दिना मृगदृशा पठियेसि मोपी[35] । नेदी कळा करतळें निटिळा[36]सि [37]लोपी॥ ८३॥

**नायं मुंचति सुभ्रुवामपि०-- ॥ ८४ ॥**

का योषेसि न सोडिजे हरि तनुत्यागीं वियोगज्वरें ।
राधा प्रश्न करी कृताजळि पुढें कृष्णा निवेदी खरें ॥
कर्पूरोदक भेषँ[38] जाति कुसुमें तांबूल देती सदा
घेतां दुःसह कौ[39]ळकूट गमते संतोष नेदी कँ[40]दा ॥ ८४ ॥

**न्यस्तं पन्नगमूर्ध्नि०--॥ ८५ ॥**

सर्पाच्या फडियेसि पाय दिधले म्यां नीति पैं त्यागिली
त्याग श्रीगुरुभक्तिचा करुनियां माया खरी मानिली ॥
सर्वांगीं शत यातना हृदयुगीं प्रस्थान देखोनियां
कुंभीपा[41]क वियोग रौर[42]वें महाक्रोधें गमे स्वा[43]मिया ॥ ८५ ॥

**मुद्रां प्रदेहि वलयाय०-- ॥ ८६ ॥**

द्या मुद्रिका मज तुम्हीं करकंकणासी । तेणें वियोग तुमचा न कळे मनासी ॥
ऐसें वदोनि नयनोदकबिंदु गाळी । वारांगना प्रियतमाप्रति लोभ चा[44]ळी ॥८६॥

श्रीशृंगारलता रसाल रचना व्युत्पन्न हो आयका
नारी पंचविधा पृथक् नवजणी वाखाणिल्या नायका ।
साहित्यामृत सेविजे क्षितिसुत श्लोकांक चित्तीं धरा
प्रार्थी विठ्ठल दास हास्य वदनें उल्लास हा दूसरा ॥

दुसरा उल्लास समाप्त.

**पतिः शयनमागतः०--॥ ८७ ॥**

स्वभर्तृशयनागमीं कुच विचित्र उंचावले
रसाळ वचनामृतें अधर पाझरों लागले ॥

---

३३ कल=मधुर. ३४ यात मुग्धाप्रोष्यत्पतिकावर्णन आहे ३५ मोपी=मोजी. ३६ निटिळ=कपाळ ३७ यांत मध्याप्रोष्यत्पतिका वर्णन आहे. ३८ भेष=औषध. ३९ काळकूट=विष ४० यांत प्रौढाप्रोष्यत्पतिकावर्णन आहे. ४१ कुंभीपाक=एक नरक आहे ४२ रौरव=एक नरक आहे. ४३ यांत परकीया प्रोष्यत्पतिका वर्णन आहे. ४४ यांत सामान्यवनिता प्रोष्यत्पतिकावर्णन आहे.

प्रियासि उटि दे स्मितद्युति[45]पटीरपंकद्रवें
निरीक्षि[46] नयनांबुजें पतिस चंचळा पेलवें[47] ॥ ८७ ॥

**भ्रूसंज्ञया दिशसि तन्वि०--॥ ८८ ॥**

भ्रूसंज्ञया सकळ दाखवितेसि साक्षी । हांसोनि सुंदर **मुरारि** म्हणे मृगाक्षी ॥
बिंबाधरासि दशनव्रण दाट कां हे । **राधा** तदा उगि अधोमुख देखताहे[48]॥ ८८॥

**दिव्यं वारि कथं यतः०--॥ ८९ ॥**

या दिव्या न बुझे शिरीं सुरधुनी[49] दिव्याग्नि कैसा [50]दृशीं
आहे सर्प गळां **शिवा**प्रति म्हणे ते **शैल**जा मृगदृशी ॥
कैसें द्यूतविधीसि आजि तुजला मी पाठवूं हें वदे
घाली सुंदर हार **शंभु**सि **उमा** हांसोनि संतोष दे[51]॥ ८९ ॥

**अंचति रजनिरुदंचति०--॥ ९० ॥**

उगवला तम रात्र विकासली । चपळता मदनाप्रति फावली ॥
सुरस बोल सखोल सखे तया । हृदय मोहुनि आणिं निजों[52]लया ॥ ९० ॥

**चक्रे चंद्रमुखी प्रदीपकलिका०--॥ ९१ ॥**

केलीसे विधिनें प्रदीपकळिका निर्माण चंद्रानना ।
ते तों भ्राम्यदशोत्सव प्रगटली सेवेसि दिव्यांगना ॥
केला जाण तिणें प्रणाम तुजला **श्रीकृष्ण** जी जल्पली ॥
निस्नेहें तुझिया महांधतमसीं[53] सृष्टी बुडों लागली[54] ॥ ९१ ॥

**त्वं पीयूषमयूख मुंच०--॥ ९२ ॥**

तूं पियूषमयूख[55] वर्ष शिरसीं **चंद्रा** सुधाबूकणीं
**शेषा** वीजं[56] शनै शनै निजफणाभोगें[57] सुखें ये क्षणीं ॥
तूं मंदाकिनि[58] सिंच शीतळ जळें अंगें शिरीषोपमें
पर्थी **शैलसुते**सि दुःसह महा अत्यंत क्रांतिक्रमें[59] ॥ ९२ ॥

**पृथ्वी त्वं भव कोमला०--॥ ९३ ॥**

पृथ्वी कोमल होय तूं दिनकरा शैत्यांगिकारीं सदां
मार्गी तूं लघु होय मंद पवना ये खेद नेदीं कदां ॥
येई सन्निध दंडकावनगिरी जाई पथा बाहिरां

४५ पटीर=चंदन. ४६ यात मध्यमनायिका वर्णन आहे ४७ पेलव=कोमल ४८ यांतप्रियकृत परिहास ( थट्टा ) आहे. ४९ सुरधुनी=भागीरथी ५० दृशीं=डोळ्यात. ५१ यात प्रियाकृत परिहास आहे. ५२ यांत संघट्टन ( समागम ) वर्णन आहे. ५३ अंधतमस=गाढ अंधकार. ५४ यात विरहनिवेदन आहे. ५५ पीयूषमयूख=अमृतकिरण ५६ वीज=वारा घाल ५७ फणाभोग=फडेचा विस्तार. ५८ मंदाकिनी=भागीरथी. ५९ यात पतिवर्णन आहे.

उत्कंठी वनवास मत्सम महा सीता अती सुंदरी ॥ ९३ ॥

**आस्यं यद्यपि हास्यवर्जितमिदं०—॥ ९४ ॥**

देखे यद्यपि हास्यवर्जित तिनें लास्याहिनें बोलणें
आरक्तांबुजलोचनद्युति दिसे राहे उगा पाहणें ॥
घाली पंकजमाळिका मकरिकारंभा उरोजांवरी
धूपी कुंतलधोरणी[61] पति तिला संतोषवी या[62] परी ॥ ९४ ॥

**उदयति यदि रदि नैव०—॥ ९५ ॥**

न लज्जाभयक्रोधकारुण्य काहीं । नसे लोभ ना मोह निःशेष पाहीं ॥
जपापुष्पवर्णोपमा[63] कोमलांगी । पुन्हा हांसत त्याच्या न लागे कृशांगी ॥ ९५ ॥

**बाह्याकूतपरायणं०—॥ ९६ ॥**

बाह्याकारपरायण स्थिति तुझी वज्रोपमीं मानसीं ।
ऐशीं आइकिलीं उदास वचनें कांतें तिचीं तामसीं ॥
प्रातर्वीतविलोकनास्तव बळें प्रस्थान केलें असे ।
देखे त्या कृपणासि वामनयना मानीं शठत्वें असें ॥ ९६ ॥

**तमोजटाले हरिदंतराले०—॥ ९७ ॥**

अंधारदिक्प्रातनिशीकराळीं । जासी कसी एकट तू निराळी ॥
कुंजालया शैवलिनीतटासी । साह्यो तुला कोण सखे विलासी ॥ ९७ ॥

**कांते कनकजंबीरं०—॥ ९८ ॥**

हेमजबीर पैं कांत हातीं धरी । खेळवी त्यासि देखोनियां सुंदरी ॥
सूर्य रेखाटिला चित्र भिंतीवरी । चंद्रबिंबानना बिंदु दे त्यावरी ॥ ९८ ॥

**ऊरू रंभा दृगपि कमलं०—॥ ९९ ॥**

ऊरू[69] रंभा[70] नयन कमळे बाल शैवाल भागीं ।
इंदू वक्त्रीं अमृत वचनीं पद्मतंतू कृशांगीं ॥
नाभी कूप त्रिवळि सरितीं[71] पल्लवाकार पाणी ।
ऐसी योषा हृदयिं वसतां विधि तो काम बाणीं ॥ ९९ ॥

**यांत्या सरः सलिलकेलिकुतूहलाय०—॥ १०० ॥**

शोभे सरःसलिलकेलि[73] करावयातें । आली मिसें करूनियां सुरतस्थळातें ॥

६० यात अनुकूल पतिवर्णन आहे ६१ कुंतलधोरणी=केशपाश. ६२ यात मध्यम वैशिक वर्णन आहे. ६३ जपा=जास्वदीचें फूल (मुळांत बकुल आहे). ६४ यति अधम वैशिक वर्णन आहे ६५ यात मानीनायक वर्णन ६६ कराल=भयंकर. ६७ यात वचनव्यंगसमागम चतुरवर्णन आहे. ६८ यात चेष्टाव्यंगसमागमचतुरवर्णन आहे. ६९ ऊरू=मांड्या. ७० रंभा=केळ. ७१ सरिता=नदी. ७२ यात प्रोषितपतिवर्णन आहे. ७३ सलिल केलि=जलक्रीडा.

स्मेराननां द्युतिचमत्कृत उत्तमांगी[७४] । अंगीकरी स्मरतसे हृदयानुरागी[७५] ॥ १०० ॥

**शून्ये सद्मनि योजिता०—॥ १०१ ॥**

नेला शून्य निकेतना[७६] सहचरी[७७] निर्मानुषी कानना ।
पुष्पाचेनि मिसें करूनि झुरला बिस्फारितां लोचना ॥
द्यायालागिं विडा उरोज उघडे घालोनि गेल्यें तदां ।
तें नेणें पति चिन्ह यत्न किति म्यां केले नभिजे[७८] कदा ॥ १०१ ॥

**कोऽयं कोपविधिः प्रयच्छ०— ॥ १०२ ॥**

अक्रोधें करुणासगर्भ वचनें बोलेसि ना कामिनी ।
पीयूषें[७९] भरिं वापिका परिमळें आमोदवीं[८०] मेदिनी[८१] ॥
आतां सर्व असो स्वहार्थ नयनें तूं पाहसी ज्या क्षणें ।
त्याचें पैं तप धन्य कोपसि जया वंदीन त्या कारणे[८२] ॥ १०२ ॥

**आयातो कुसुमेश्वरो विजयते०— ॥ १०३ ॥**

चंद्राचे उदयीं सुशीतळ हळू ये वायु गंधासवें ।
पाहे कोकिल कूजती आळिकुळा उत्साह गुंजारवें ॥
ऐसे हे रस सिद्ध सर्व असतां कंदर्प वैद्य स्वयें ।
केल्यानें उपचार कां नव्हति पैं होती सखे निश्चयें[८३] ॥ १०३ ॥

**सा चंद्रसुंदरमुखी०— ॥ १०४ ॥**

तो नंदसूनु सखि चंद्रमुखी प्रसंगें । नेला निकुंजसदनाप्रति काम संगें ॥
चेटें करूनि मग ये कपटें नदीसी । तृष्णेपिडे जळमिसें सरला[८४] वरेसी ॥ १०४ ॥

**आनीय नीरजमुखीं०— ॥ १०५ ॥**

पद्माननां शयनिं आणुनियां विलासी । इच्छी मनांत कुचकंचुकिमोक्षणासी ॥
केला विनोद तंव एक विदूषकानें । प्रातोदयीं तरुण कुर्कुट[८५] शब्दमानें[८६] ॥ १०५ ॥

**स्वेदस्तंभोऽथरोमांच०— ॥ १०६ ॥**

रोमांच कंप स्वरभंग चिन्हें । स्वेदाश्रुपात प्रलयादि भिन्नें ॥
निवर्णता आणिक पात तोही । पैं आठ हे सात्विक भाव देही ॥ १०६ ॥

**भेदोवाचि दृशोर्जलं०— ॥ १०७ ॥**

वाचे भेद दिसे दृशीं जळ कुचीं स्वेद प्रकंपोधरा ।
भाळीं पांडुरता वपू पुलकिता चित्तें विलोकी धरा ॥

---

७४ उत्तमांग=मस्तक. ७५ यांत उपपतिवर्णन आहे. ७६ निकेतन=गृह ७७ सहचरी =सखी ७८ यात अनभिज्ञनायक वर्णन आहे. ७९ पीयूष=अमृत ८० आमोदवीं= सुवासित कर. ८१ मेदिनी=पृथ्वी. ८२ यात पीठमर्दवर्णन आहे. ८३ यात विटवर्णन आहे ८४ यांत चेटवर्णनआहे. ८५ कुक्कुट=कोंबडा ८६ यात विदूषक वर्णन आहे

देहीं आळस पादयुग्मिं जडता हे गोष्टि सागें खरी ।
मी जाणें नृपनायकासि नयनीं त्वां देखिलें सुंदरी ॥ १०७ ॥

**वियति विलोलति जलद०-- ॥ १०८ ॥**

कोकिळी बहु रसाळ कूजती । चचला लवति मेघसंतती ॥
तारकायुत मृगांक यामिनी । दोलती लहरि देववाहिनी[11] ॥ १०८ ॥

**प्रादुर्भूते नवजलधरे०— ॥ १०९ ॥**

प्रादुर्भूत नवीन वारिद तुझे पादाब्ज पाहावया ।
कंठीं प्राण वसे सरोजदृशीचा वक्त्रेंदु देखावया ॥
सांगों काय स्तनासि पक्ष फुटले पैं पल्लवाच्या छळें ।
दूती बोलतसे प्रियाप्रति मुखें मंदोत्तरें कोमळें[14] ॥ १०९ ॥

**तस्यां सुतनुसरस्यां०--- ॥ ११० ॥**

सरोजपत्रासदृशा निजेली । चित्तें दृगीं वस्ति तयांत केली ॥
बुडोनि तेथें मन मग्न राहे । चक्षू लघुत्वें भ्रमताति पाहे ॥ ११० ॥

**मया विधेयो मुहुरद्य०-- ॥ १११ ॥**

मी आजि जातें यमुने रमाया । कुजाल्यीं वेणुरवें स्फुराया ॥
राधा अधो पाहत विभ्रमातें । करूनि नेत्रोत्पलतोरणातें ॥ १११ ॥

**रामो लक्ष्मणदीर्घदुःखचकितो०-- ॥ ११२ ॥**

श्रीकाकुस्थ सुमित्र दुःखित महा कोणा कळेना व्यथा ।
नोष्णा श्वास न वारि नेत्र कमळीं नेदे कळों अन्यथा ॥
वातावर्त जसा स्मरज्वर तसा पीडी तया कारणें ।
सीतेच्या स्मरणें करूनि शमवी श्रीराम तो पाहणें ॥ ११२ ॥

**संस्पर्शः स्तनसंस्पर्शो०--- ॥ ११३ ॥**

पाहावा मुखचंद्रमा स्तनतटस्पर्शादि संभाषणें ।
स्त्रीशीं केलिकथा प्रलाप विरहावस्थेविना पाहणे ॥
वारंवार प्रतिक्षणीं विषय ते चित्तीं स्मरावी सदा ।
ऐसा हा विरही सखीप्रति वदे कालानुरूपे तदा ॥ ११३ ॥

**गरलकुसुमकंदमिंदुबिंबं० ॥ ११४ ॥**

---

८७ नृपनायक=( मुळांत " केशव " असें आहे ). ८८ यांत अष्ट सात्विक भाववर्णन आहे. ८९ कोकिल=( मुळांत ) " कपोत " आहे ) १० लहरी=लाटा. ११ देववाहिनी=भागीरथी. १२ यांत संभोग शृंगार वर्णन आहे. १३ वारिद=मेघ. १४ यांत विप्रलंभ शृंगार आहे. १५ यांत अभिलाषवर्णन आहे. १६ यांत चिंतावर्णन आहे. १७ वातावर्त=वावटळ. १८ यांत स्मृति वर्णन आहे. १९ यांत गुणकीर्तन वर्णन आहे

गॅरळद्रुमकंद चंद्र आहे । करुणापन्न वसंत दर्ति[1] पाहे ॥
रजनी स्मरखड्गवल्लि[2] जागे । करणें काय विधातयासि सांगें[3] ॥ ११४ ॥

**अर्द्धमुद्रीक्षणं चक्षु०-- ॥ ११५ ॥**

अर्द्ध विलक्षण चक्षु विलसे । अर्द्धसमीलन चित्त निवासे ॥
अर्द्ध ससंस्पृश हस्तगिरी हे । काय करूं सखि आजि मि पाहें[4] ॥११५॥

**प्रतिफल[5] मृतांशोः०--- ॥ ११६ ॥**

प्रतिफलें हिमधाम्नी[6] कांत देखे मृगाक्षी ।
स्मितमुख उदयातें मानिता होय साक्षी ॥
मग शिथिलित वाचे नोक्त साशक्यमानें ।
स्पृशति पुकलभाजी[7] पाणिपकेरुहानें[8] ॥ ११६ ॥

**किं रे विधो मृगदृशोः० --- ॥ ११७ ॥**

कां रे विधू[10] मृगदृशामुख अद्वितिय । कंदर्प दर्प न दगंबुज नान्यदीय ॥
झुंकारसी मधुकरा तनु तप्त होय । कर्मासि धिग्धिग्वपु ईदृश दृष्ट होयं[11]॥११७॥

**कोदंडं विशिखो मनो०-- ॥ ११८ ॥**

कामाचे धनुचे क्षुरप्रे[12] मनसीं भ्रूवल्लि नेत्रोत्पळें ।
तें पैं वस्त्र दृगंचलासि मिनलें चांचल्य मत्स्यागळें ॥
चंद्राचा उदयो प्रकाश मिरवे अन्यांगना पाहिना ।
तन्वगीप्रति भूलला पति तदा कोठें कदां जाइना ॥ ११८ ॥[13]

**पाणिर्नीरवकंकणं०-- ॥ ११९ ॥**

हातीं जो ध्वनि ककणें न करिती नाचेत ना भूषणें ।
जो तारासम दृष्टि निश्चळ नसे तो काय तें पाहणें ॥
नाहीं कांपविलें उरोजवसना तो भेद नोहे रते ।
त्वन्नामस्मरणे करूनि पुलकारंभो समुज्जृंभते ॥ ११९ ॥[14]

**मुक्ताहारं न च कुचगिरेः० --- ॥ १२० ॥**

मुक्ताहार स्तनगिरिं नसे ककणें नैव हातीं ।
कर्णी स्वर्णाभरण न दिसे देखिलें आजि राती ॥
स्वप्नामध्यें बकुलमुकुला[15] भूषणीं जो वसे तो ।

---

१०० गरलद्रुमकंद=विषवृक्षाचा कांदा. १ दंति=हत्ती २ खड्गवल्लि=तरवार ३ यांत उद्वेगवर्णन आहे. ४ यात प्रलापवर्णन आहे ५ प्रतिफल=प्रतिबिंब ६ हिमधाम=चंद्र ७ पुलकभाजी=रोमांच युक्त. ८ पाणिपंकेरुह=हस्तकमल. ९ यात कायिक व्यापार द्योतक उन्मादवर्णन आहे १० विधु=चंद्र ११ यांत वाचिकोन्माद आहे १२ क्षुरप्र=बाण १३ यात व्याधिवर्णन आहे. १४ यांत जडता वर्णन आहे. १५ मुकुल=कळा, कळी.

मंगेशकविकृत

# राधाविलास.

श्रीमंगळारमण मंगळदेवराया । त्वंन्मगळाचरणिं श्रीपद दे वराया ॥
लीला वदेन सितकृष्णपदद्वयाची । राधात्मभक्तिरचनेवरि अद्वयाची ॥ १ ॥
गोइंद्रियाकुळित गोकुळ हेतु काया । तत्साम्य गोकुळ तुळे न पुरे तुकाया ॥
आनंद नंद रतिमूर्ति सती यशोदा । कृष्णात्मता प्रकट जींस्तव ते यशोदा ॥ २ ॥
त्या इंद्रियीं चाळक देवतांतें । गोपत्व आरोपुनि देवतातें ॥
शुद्धात्ममाया तनुभाव नासी । धरोनि लोकीं तनुभावनासी ॥ ३ ॥
सद्वृत्ति गोपवनिता व्यभिचारबुद्धि । आरोपिती जन परी अविचार बुद्धि ॥
कीं सर्वदा स्थिरचरात्मक कृष्ण त्याचे । कर्तृत्व मोहक वदे मुख कृष्ण त्याचें ॥४॥
त्यामाजि बोध वृषभानु[1] अहीरें[2] याची । निर्मूनि भक्ति दुहितें[3] तिस फार याची ॥
कीं ते न अन्य भजनीं रत राधिका या । नामें प्रसिद्ध मिरवी रतिसिद्धि काया॥५॥
ते राधा विनिता सकाम वनिता निष्काम हो तीव्रता ।
स्वार्गीं भोगरता ह्मणोनि धिगि त्या कांता हि पातिव्रता ॥
जो तत्पुण्यकथा सकाम वदता वा स्त्रैणें[4] ही ऐकता ।
लागे मोक्षपथा कथान्वय रथा बैसोनि घे ऐक्यता ॥ ६ ॥
व्यासाचा हृदयावकाश ऱ्हद * हा आनंद कीं पद्म हें ।
झाले पद्मपुराण षट्पदपणें ऐकेल त्या सद्म[5] हें ॥
त्याचा कोश विशेष लेश वदतों आत्मप्रियाराधिका ।
भक्त्युक्ता विनिता अनन्य वनिता[6] आत्मप्रिया राधिका ॥ ७ ॥
परवधु विधिकर्मीं वर्तता कृष्णजीतें
अनुकुळ कसि ते कीं लाभ दे कृष्ण जीतें ॥
शिशु वय वरुषांचा तेधवां पूतनारी[7]
रमुनि अपुर्त[8] केली ते कशी पूत[9] नारी[10] ॥ ८ ॥
ऐका तच्चरितामृतौघसरिता[11] तत्राभिषेकां[12] मना ।
हे राहुग्रहणीं स्वशुद्धतरणी[13] गोदान द्या कामना ॥
सोहं हंस जपा स्वमंत्र अजपा टाकोनियां जल्पना ।

१ वृषभानु=राधेच्या बापाचें नाव. २ अहीर=गवळी. ३ दुहिता=कन्या. ४ स्त्रैण=स्त्रीलंपट ५ सद्म=घर ६ वनिता=स्त्री. ७ पूतनारी=पूतनेचा शत्रु कृष्ण. ८ अपूत=अपवित्र. ९ पूत=पवित्र. १० नारी=स्त्री. ११ सरिता=नदी १२ अभिषेक=स्नान. १३ तरणी=सूर्य. * ऱ्हद=डोह.

ज्ञानाग्नीखलिला मथूनि प्रबळा होमास घ्या कल्पना ॥ ९ ॥

आतां तुम्ही स्वतनु त्वत्कमनीयशोधा । पूर्वोक्त ज्यांत हरिची जननी यशोदा ॥
जो भक्तियोगविधि वर्तुनि आश्रमातें । कर्मीं अलिप्त न पवे सहसा श्रमातें ॥१०॥

अहो नंदा नंद प्रिय वधु सुविद्याद सुमती ।
उपासा विश्वासा गुरुपदिं करा वेदसुमती ॥
तदा कृष्णात्मत्वें प्रकट मग राधात्मवनिता ।
अनन्या तल्लीला क्षिरिं[१४] मथुनि घ्या हो नवनिता ॥ ११ ॥
आतां किंबहुना कथार्थ रचना कीजे यशोदा सती ।
आत्मत्वीं जननी परतु सदनीं[१५] कर्मीं सदा दास ती ॥
स्वांकस्थात्मसुता[१६] करोनि परता एके दिनीं स्वाश्रमी ।
वर्ते ते पहता हरी विषमता देखोनि झाला श्रमी ॥ १२ ॥

अहो पूर्व सस्कार कर्म प्रवृत्ति । स्फुरे येकदा हो तिते हर्म्यवृत्ती ॥
तदा पुत्र उत्तीर्णता देव दावी । तशी गोड येथोनि लीला वदावी ॥ १३ ॥
मी तात ब्रह्मादिगुणत्रयीचा । परतु झालों प्रिय पुत्र ईचा ॥
मन्मात आश्रम चि सूत्र पाहे । टाकूनि मी वाटतसे त्रपा[१७] हे ॥ १४ ॥
म्हणोनि कर्मी अवरोधनातें । तिच्या करी दाखवि रोदनातें ॥
नेदी चळों स्वाश्रमिं देह तीचें । दिसे निजागीं बळ हो हतीचें ॥ १५ ॥
शमादि षट्साधनभाव नासी । दावी ह्मणे ये जननी वनासी ॥
निर्मुक्त मी त्या मज निग्रहातें[१८] । करी अशा मी न वसें गृहातें ॥ १६ ॥
यशोदया अंक निशाक टाकी । भूमी पडे दाखवि सकटा कीं ॥
म्हणे इचें चिन्मय चित्त रागीं । तदर्थ मी होइन वीतरागी[१९] ॥ १७ ॥
गडबडा रुळते धरणीवरी । हरितनू[२०] सुख तें धरणी वरी ॥
हिम अबाधित कीं सुरशेखरा । प्रकट खेंवें[२१] दिसे हिमशेखरा ॥ १८ ॥

प्रसिद्ध ते मुनी गडे सबाह्य नग्न ऊघडे ।
तसे च ते ही खेळती म्हणे विचित्र खेळ ती ॥
हरीपदीं च लोळती निदेश चित्त घोळती ।
परस्परैक्य बोलती विरक्त चित्त डोलती ॥ १९ ॥
हरी हि त्यांत त्यां परी च खेळतो दिसे परी ।
महत चित्त साधनीं दिसे तयांत तो धणी ॥

१४ क्षिर (क्षीर)=दूध १५ सदन=घर. १६ अंक=मांडी. १७ त्रपा=लाज. १८ निग्रह=शिक्षा, अमल १९ वीतरागी=निष्काम. २० हरितनु=कृष्णाचें शरीर २१ खेंव=आलिंगन ( सं० क्षेम. )

त्रिलोकनाथ नेणता म्हणे स्वपुत्र नेणता ।
यशोदया पयोधरासि[22] पाजिते पयोधरा ॥ २० ॥
कडकडुनि यशोदा बालका खेंव देते ।
स्वसुतविधिपित्याते दीन देखे वदे ते ॥
त्वरित मज सुपुत्रा सांग बा हेतु कांहीं ।
पुरविन तव इच्छा ये क्षणी कौतुकांहीं ॥ २१ ॥
ये मत्कडेसि रडसी किति बाळका रे । अश्लाघ्य[23] शोक करिसी जगपाळ कां रे ॥
मी मात मान मज दे श्रम शोक टाकीं । कीं आश्रयोक्त हरि आरुढ मत्कटा कीं ॥२२॥
सदनिं नेउनि देइन भातुकें[24] । विपुल पुष्कळ जाण नभा तुकें[25] ॥
उलुसि साखर खर्जुर खोबरें । बहुत घेइ न रडों च नको बरें ॥ २३ ॥
अहो लोचनीं पूर वाहे जळाचा । मुखीं माखला रंग तो काजळाचा ॥
पुशीतो तसे स्पर्शवीले करानें । म्हणे तीव्रता मांडिली लेकरानें ॥ २४ ॥
धरी पोटशीं आवडी देख ब्रह्मा । ह्मणे व्यास वाटे महाश्चर्य आह्मा ॥
हरि क्षीरसिंधूंत झाला उदासी । अशा नित्य तृप्तासि पाजी दुधासी ॥ २५ ॥
झिंजाडुनी हात वदे हरी तो । वाक्यार्थ त्वत्संशय संहरीतो ॥
म्हणे अगे मज्जननी यशोदे । प्रबोध मायीक तुझा असो दे ॥ २६ ॥
मी पुत्र तू जननि हें मज तूज नातें । सादृश्य मान दिसतें सकळा जनातें ॥
माते परंतु तुज म्यां निज रूप माझें । केलें असे प्रकट सर्व निरूपमा जें ॥
कीं आपणासहित मद्वदनीं भुगोळा । देखोनि कां करिसि चित्सुखलाभ गोळा ॥
मन्मात तू परि जगत्रयतात माते । जाणोनि नेणसि पुन्हा भ्रमसी मनातें ॥ २९॥
रमा ब्रह्मा शंभू सुरवरमुनी कर्मकरि सी ।
त्रिलोकात्मा मी त्या त्यजुनि सदनी कर्म करिसी ॥
शिशुत्वें त्वत्पुण्यें तव सदनिं माझें विचरणें ।
अगे गेहारण्यीं भ्रमसिल कसी मत्त करणें ॥ ३० ॥
म्हणे तधीं मत्सुत देवराया । नित्योत्सवें हे सुख दे वराया ॥
भक्त्यात्मयोगाप्रति खेंव देते । मी धन्य मी धन्य मुखीं वदे ते ॥३१॥
हरी बोले तेव्हा जननि परिसें बोध सुमती ।
असे नित्यानंदीं विनित जरी अल्हाद सुमती ॥
तरी भक्त्यात्मैक्यें मन रमविं योगासन करीं ।
म्हणे राधा भक्ती तिशिं मज वियोगास न करीं ॥ ३२ ॥

---

२२ पयोधर=स्तन. २३ अश्लाघ्य=अयोग्य. २४ भातुकें=खाऊ

वचन परिसतां हें हर्ष झाला मनातें ।
मज तरि वृषभानू बधू सप्रेम नातें ॥
सहज प्रकट राधा मेहुणी कृष्णजीतें ।
अनुकुळ निज खेळा योजितो कृष्ण जीतें ॥ ३३ ॥
तथापि हे सुव्रत पूतनारी । सुखें क्रिडो ही सह पूत नारी ॥
ह्मणे असो हा हरि ईजपाशीं । शके न येऊ जननी च पाशीं ॥३४॥
अर्पूनि राधेप्रति नंदनातें । स्मरे निजानंद न नंदनातें ॥
पतिव्रता मी पतिसेवनातें । जातें ह्मणे मी जगजीवनातें ॥ ३५ ॥
मत्पुत्रसा व्यापक विश्व गे हा । रक्षी बरा मी निघतें स्वगेहा ॥
भक्त्यात्मयोगान्वय या गतीतें । घे ते क्रिया पुण्य दयागतीतें ॥३६॥
बोलोनि ऐसें जननी गृहातें । जातां हरी तो जननिग्रहातें ॥
टाकोनि राधा कुच उग्र हातें । मर्दी करी तीस अनुग्रहातें[25] ॥३७॥
हरी बोबडे बोल बोलोनि तीतें । हरी भेदनिर्भेद बोले नितीतें ॥
अगे विश्व मद्भोग्य भोक्ता हरी मी । स्वसभोग देऊनि माया हरीं मीं ॥३८॥
कडे साधु निष्काम वाटे सतीतें । परी दाविती कामवाटेस तीतें ॥
महाश्चर्य वाटे मनीं बाळकाचें । म्हणे अल्पधी तो चि हे बाळ काचे ॥ ३९॥
वरी लाज दावी परी अंतरगीं । भरे प्रेमसिंधू स्मरें वाक्तरंगीं ॥
सदा हास्य दाऊनि आनंद वाणी । वदे त्यांत अर्थास कांहीं न वाणी ॥४०॥
हरी[26] तू तों बाळा परवधु मि उन्मत्त करिणी[27] ।
कशी शोभे येथें तुज मजशिं उन्मत्त करणी[28] ॥
धिटाईनें वाक्यें वदसि परि हें युक्त न दिसे ।
मृषा[29] भासे जैसें मृगजळ जनी उक्त न दिसे ॥ ४१ ॥
ऐकोनि राधावचनावलीला । बोधी तयेतें निजभावलीला ॥
मी देह प्रामाण्य प्रसिद्ध लोकां । मत्पूर्णता ठाउक सिद्ध लोकां ॥ ४२ ॥
विनोदवाणी वदतो हरी कीं । तू हस्तीणी[30] मी चिमणा हरी कीं ॥
परस्परें विक्रम[31] तूं विचारीं । निदान होतां पडसी विचारीं ॥ ४३ ॥
विनोद ऐकून रमाधवांचा[32] । निलज्ज राधा महिमा[33] धवाचा ॥
वदे म्हणे मन्मथ[34]संगमातें । न वर्णवे उक्त प्रसंग मातें ॥ ४४ ॥
सौंदर्य त्याचें मदनासि नाहीं । काळत्रयीं तन्मदनाश नाहीं ॥

२५ अनुग्रह=कृपा २६ हरि=सिंह. २७ करिणी=हत्तीण. २८ करणी=कृत्य. २९ मृषा=खोटें. ३० हस्तिणी=हत्तीण. ३१ विक्रम=पराक्रम. ३२ धव=नवरा. ३३ महिमा=मोठेपणा. ३४ मन्मथ=मदन

काम प्रतापीवर मी तयाची । कांता रति प्रीति अमीत याची ॥ ४५ ॥
तेथे तुझा विक्रम तो कसारे । दृष्टीसि तू दीससि तूक[35]सो रे ॥
सामर्थ्य कैंचे रतिरंजनातें । राधा वदे वाक्य निरंज[36]नातें ॥ ४६ ॥
हासोनियां बोलतसे हरी तो । वाक्यार्थ त्वत्संशय संहरीतो ॥
निष्काम कैंचा मज काम कामी । देती फळें तद्वत काम कामी ॥ ४७ ॥
देखोनि वामन न जाणत दानवा[37]री । दे मत्करांत बळि तो महिदानवारी ॥
शेखीं धरा हरुनि मत्पदवि[38]क्रमानें । भूमीतळीं दडपिला महिवि[39]क्रमानें ॥ ४८ ॥
गोष्टी तशा वदसि तू मज तो कसा गे । पावोनियां परिहरी टळतो कसा गे ॥
शेखीं मला करुनि आत्मनिवे[41]दनाते । तू भोगिसी बळिस जे मनि वेदना ते ॥४९॥
असें वाक्य ऐकोनियां सार[42]साक्षी । खरा हा म्हणे सर्वसं[43]सारसाक्षी ॥
महादेवयोगें मला लाभला हो । तरी घेउ आत्मार्पणें लाभलाहो ॥५०॥
परी मी वसें दुष्ट लोकांसमाजीं । मनीं नित्य निंदा च लोकांस माजी ॥
नव्हे भक्ति आत्मैक्य योगप्रसिद्धी । जरी पावला मन्मनोधर्म सिद्धी ॥५१॥
कीं भवा[44]ब्धिसम सासुरवा[45]डा । युक्त काळ कइंचा सुरवा[46]डा ॥
मूर्तिमंत ससरा अभिमानी । मी समोर बसतां उभि मानी ॥ ५२ ॥
अविद्या मत्सासू सदनिं मम विश्वास न धरी ।
सदा माझी निंदा नणद छळि विश्वासुनि घरी ॥
पती काम क्रोधी दिर मद महा मत्सर करी ।
तसा भावा दंभ प्रतिदिनिं तसा मत्सरकरी ॥ ५३ ॥
मला ऊर्मी जावा सदवदन संतान सहसा ।
अशा सासुर्वासें सुखमय मि नांदेन सहसा ॥
दयाळा त्वद्भाग्यें कपट न शिरे सासुससुरीं ।
करीं तैसें कृष्णा तव करिं निंदानीसि ससुरीं ॥ ५४ ॥
ऐकोनियां वाक्य असें सतीचें । हरी हरी दुःख अशेष तीचें ॥
प्रस्तूत मातें जन तोक[47]सा गे । जाणे तुतें संशय तो कसा गे ॥५५॥
प्रत्यक्ष मी बाळक वत्सराचें । प्रस्तूत नाहीं भय मत्सराचें ॥
भावे क्रिडा सर्व विदूंस माजी । रासोत्सवीं सर्व व्रजासमाजीं ॥ ५६ ॥
मूल काय तरुणी सह साजे । संशयार्थ न मनी सहसा जे ॥

---

३५ तूक=बालक. ३६ निरंजन=कृष्ण. ३७ दानवारी=दैत्यशत्रु ३८ महि=पृथ्वी. ३९ विक्रम=पाऊल. ४० विक्रम=व्यापणें ४१ आत्मनिवेदन=आत्मार्पण. ४२ सारसाक्षी=कमलनेत्री. ४३ सर्वसंसारसाक्षी=सर्व संसार पहाणारा ईश्वर. ४४ भवाब्धि=संसारसागर. ४५ सासुरवाड=सासरें. ४६ सुरवाड=सुख. ४७ तोकसा=मुलासारखा.

सुज्ञ लोक अथवाज्ञ जनातें । व्याप्यव्यापकपणें मज नातें ॥ ५७ ॥
अहंमती दुर्जन सासुरा गे । निरापराधें जरि सासु रागे ॥
तथापि विश्वप्रिय मी कटातें । आहें तुझ्या नाशिन संकटातें ॥ ५८ ॥
भिवू नको तू मम विग्रहातें । कडेस घे नेइं तुझ्या गृहातें ॥
मनीं न मानीं जननिग्रहातें । करीन तूतें स्वअनुग्रहातें ॥ ५९ ॥
प्रबोधें या राधा जनभयनिरोधास न मनीं ।
शिशुत्वें घे वेघे हरि परि सुपर्णासि नमनी ॥
तिच्या वाटे दाटे स्वसुख तनुभावास विसरे ।
त्रपात्यागें वागे प्रकट तनुभा वास विसरे ॥ ६० ॥
परमहंसगती विमल क्षिती । क्रमुनि आत्म सुसभ्रम लक्षिती ॥
हळुहळू सदनाप्रति जातसे । हरि कडेस धरा तुम्हीं जा तसे ॥ ६१ ॥
भक्तिप्रसंगें हरिखेल गेहा । ये कीं गुरुत्वें जग बोळगे हा ॥
तथापि राधा अवतार भक्ती । म्हणूनि नाहीं हरिशीं विभक्ती ॥ ६२ ॥
भक्त्या मयोगप्रतिमा गृहातें । ज्याच्या तया निग्रहनुग्रहातें ॥
करावया शक्ति म्हणोनि वेदी । बोले हरी सर्व जना निवेदी ॥ ६३ ॥
हा लाभ इच्छूनि शिवें तपातें । केलें महा कीं हिम आतपातें ॥
सोसोनियां शांभव लाभला हो । घेयोनि गुर्वीपद लाभला हो ॥ ६४ ॥
तें अप्रयासें सुख गोकुळातें । दे जें न लाभे सुरसत्कुळातें ॥
कीं राधिकाकृष्णसुयोगलीला । चाले स्वगेहाप्रति तया गलीला ॥ ६५ ॥
जे या तनू व्रजपुरींत निजगृहातें । ये प्राण आणि मनि कुंभकनिग्रहातें ॥
साधोनियां हळुहळूच सुषुम्नि वाटे । चाले तया निकट सौख्यप्रद धाम वाटे ॥ ६६ ॥
तैसें दुरी देखुनि धाम तातें । संदेह वाटे बहुधा मतीतें ॥
कीं फार उच्छृंखळ सासुजावा । त्यांमाजि हा योग कसा सजावा ॥ ६७ ॥
चिंतेमधें धीर पुन्हा न सोडी । सदृढ हातीं हरिवाग्दसोडी ॥
ये स्वगृहीं दारिवठां उभी ते । निःशंक गेहांतरिं येउं भीते ॥ ६८ ॥
पुढें तों ये सासू श्वशुर दिर भावे स्वननदा ।
तशा जावा त्यांना उचित करणी ते दुषणदा ॥
परी राधा अंकीं हरि युग समावेश नमनीं ।
भरे तों त्या योगीं उदित जन निःशेष न मनी ॥ ६९ ॥

---

४८ विग्रह=शरीर. ४९ जननिग्रह=लोकभीति ५० सुपर्ण=गरुड. ५१ त्रपा=लाज. ५२ विभक्ति=वियोग. ५३ कुंभक=योगशास्त्रप्रसिद्धप्राणायाम विशेष ५४ सुषुम्नि=योगशास्त्र प्रसिद्ध नाडीविशेष. ५५ हरिवाग्दसोडी=कृष्णाचें भाषण हेंच कोणी वस्त्र त्याची दशा. (पदर).

अविद्या परी दीन होवोनि मामी[५६] । म्हणे धन्य राधे नमामी[५७] नमामी ॥
हरी पावला त्वत्प्रसादें स्वगेहा । हरी हृत्तमालागिं[५८] चिद्भास[५९] गे हा ॥ ७० ॥
अहंभाव[६०] टाकोन आनद मामा[६१] । मनी पावला वाजवीतो दमामा ॥
हरी कृष्ण गोविंद गर्जे ध्वनीतें । चिरें[६२] दिव्य विस्तारितो अध्वनीतें[६३] ॥ ७१ ॥

दिर मद सम दंभी मत्सरें युक्त भावा ।
निरखुनि सुखि झाले कृष्णराधाप्रभावा ॥
जयति जयति वाचे नाम सयुक्त टाळी ॥
पिटिति गजर होतो सर्व संदेह टाळी ॥ ७२ ॥
प्रकट नणद निंदा लाजली अस्तु तीचा ।
सहज चि घडला हो घोष झाला स्तुतीचा ॥
निरखुनि तिस जावा लीन झाल्या षडूर्मी ।
किमपि अचळसिंधूमाजि भासे न ऊर्मी[६४] ॥ ७३ ॥

पती काम संदेह टाकी मनाचे । हरी देखतां तो हि निष्काम नाचे ॥
तदा चित्सुखानद संसार सारा । अभेदीं बुडे भेदबुद्धीपसारा ॥ ७४ ॥

शुषुम्ना ऊर्ध्वाम्नानळ दळ कळा सिद्धि सकळा ।
वरी योगी भोगी मग रूळतसे तो शशि तळा ॥
तसा गेहद्वारीं श्वशुरसमुदायाशि शमला ।
म्हणे राधा कृष्णें अमृतसम केलें विष मला ॥ ७५ ॥

या नंतरें श्वशुरमंडळवृंद[६५] सारा । आनंदला करितसे अनुवाद सारा ॥
कीं भक्तियोग फळ ये निगमागमानें । ते राधिका हरिसमागम आगमानें ॥ ७६ ॥

हें ध्यान राधान्वित केशवाचें । करोनियां वर्णिन लेश वाचे
किंवा कथा ऐकुनिया तयाचें । तद्दोष हो नासति यातनांचे ॥ ७७ ॥

श्वशुरप्रमुख सासू कृष्ण आराधि केते ।
स्वहित विहित वाणी बोलती राधिकेतें ॥
त्रिभुवनभुवनात्मा प्रीय सर्वांस गे हा ।
निशिदिनिं अविलंबें खेळवीं या स्वगेहा ॥ ७८ ॥

जो मद्गृहीं ठाव रुचे निवासा । तेथें सुखें नेइं जगन्निवासा ॥
या कारणें मद्गृहकर्म टाकीं । शंको नको इतर कर्मठा कीं ॥ ७९ ॥
इच्छील हा जों जननीगृहांतें[६६] । जायास तों टांकुनि निग्रहातें[६७] ॥

---

५६ मामी=सासू. ५७ नमामी (नमामि)=मी नमस्कार करित्यें ५८ हृत्तम=अंत करणांतलें अज्ञान. ५९ चिद्भास=चैतन्यतेज ६० अहंभाव=मीपणा ६१ मामा=सासरा. ६२ चिरें=वस्त्रें. ६३ अध्वनीतें=मार्गांत ६४ ऊर्मी=लाटा. ६५ वृंद=समूह. ६६ जननीगृह=आईचें घर ६७ निग्रह=भीति.

नेई सुखें तू हरि नंदगेहा । जगोद्भवाचा बिजकंद गे हा ॥ ८० ॥

स्वशुरसमुह गर्जे घोष जो स्वस्तुतीचा ।
प्रकट श्रवण होता हेतु वो अस्तु तीचा ॥
अगणित सुरसिंधू दाटला अंतरंगीं ।
समुदित तनु भावा अष्ट दावीत रंगीं ॥ ८१ ॥

अंगीं स्वेदें गळे सकंपित स्खळे बासात वाचा लुळे ।
कंठीं बाष्प खळे सुशब्द नुगळे मौन्यें चि वाचा वळे ॥
सोह हंसगति क्रमी वसुमती ये उबऱ्या आरती ।
तों सिध्द्यष्टि दुती वदोनि जयति केल्या बऱ्या आरती ॥ ८२ ॥

राधाविद्युल्लता ती नवघन हरिच्या अंतरीं भासमाना ।
भावाभावप्रभावें समरसविभवें युग्म शोभा समाना ॥
गाजे तैशीं च तेजें विकसित परि तत्काळ लाजे क्षणातें ॥
तैसी राधा स्वकाया लपवुनि प्रकटी तेथ कंजेक्षणातें ॥ ८३ ॥

तेव्हां विस्मीत सासूश्वशुर म्हणति हा कृष्ण कीं सून माझी ।
यातें सुखें चि द्यावी किमपि प्रकट निर्भेद यासी नमा जी ॥
कीं योगी शुक्लकृष्णान्वय पर शिवशक्त्यात्मता विप्र सिद्धि ।
देतो देवें स्वगेहीं नटन करूनि आह्मास दावी प्रसिद्धि ॥ ८४ ॥

निशिदिनिं पति कामी गर्व कीजे निकामीं ।
ह्मणवुनि परि तीच्या दर्शनी तो निकामीं ॥
हरिमय पुरुषार्था देखतो राधिकेतें ।
बहुत चि गमला जो कृष्ण आराधि केतें ॥ ८५ ॥

इतर समुह तीतें त्याच रीती न भावी ।
मग हरिसम राधा योग चिंतूनि भावी ॥
प्रकट सदनिं हिंडे कोश दावी गृहाचे ।
निरखुनि हरि टाकीं मैं ह्मणे निग्रहाचे ॥ ८६ ॥

त्रिकुट सदनिं विश्वोद्भास तो भूगृहातें ।
त्यजुनि भवनकोशा चाळवी विग्रहातें ॥
प्रमित जड कि ऐशा केवि सार्धत्रिहस्तीं ।
अमित अजड शुद्धात्मैक्य साधे गृहस्थीं ॥ ८७ ॥

---

६८ स्वेद=घाम ( इं. Sweat) ) ६९ बाष्प=अश्रू ७० वसुमती=भूमि. ७१ आरती =आलीकडे. ७२ सिध्यष्ट=आठ सिद्धि. ७३ घन=मेघ ७४ समरसविभव=ऐक्यवैभव. ७५ कंजेक्षण=कमलनेत्र कृष्ण

रिघे श्री हटा आज तो तेजसाचा । उबारा स्वतेजांत निस्तेज साचा ॥
गमे ठाव अंगुष्ठपर्वप्रमाण[76] । मधें योग कैसा घडे अप्रमाण ॥ ८८ ॥
तया आंत गोलात मंदीर तीतें । दिसे कीं तम ध्वांत नेदी रतीतें ॥
गृहीं प्राज्ञ पर्वार्ध हो ठाव दावी । अशा मंदिरीं सिद्धि कैशी वदावी ॥ ८९ ॥
त्रिभुवनें त्रिमळांकित लक्षणें । म्हणुनि टाकियिलीं कमलेक्षणें ॥
मग हरी शिशु औट पिठासना । रूढ करीत असे गरुडासना ॥ ९० ॥
म्हणे राधिका मी हरी या स्वठाया । वसें तो मला चित्त नेदी उठाया ॥
सदा सर्वदा सोमधारामृतातें । स्रवे जीववी जीव भावी मृतातें ॥ ९१ ॥
हे ब्रह्मविद्याप्रद धाम माझें । सेवी न त्या अंतरिं काम माजे ॥
या शुद्धसत्वात्मक मंदिरा रे । येतां चळेना तव इंदिरा[77] रे ॥ ९२ ॥
विचित्रांतरीं रेखिली चित्रशाळा । चतुर्वर्ण रंगैक्य दावी विशाळा ॥
हरी नित्य मी भोग्य मत्कामना हो । म्हणे नूतना वाढवी काम नाहो[78] ॥ ९३ ॥
आतां हरी या भुवना च माजी । होतो तुझा योग अशी च माजी ॥
आशा असे या वरि देवराया । पूर्वोक्त सौख्यान्वय दे वराया ॥ ९४ ॥
म्हणोनि वदी हरिपादपद्मा । वसे जयामाजि अभेद पद्मा ॥
मग प्रबोधी हरि त्या सतीतें । करी समावेश निदेंशे तीतें ॥ ९५ ॥
राधा म्हणे हें निज धाम तूझें । साचें परी इच्छिसि सौख्य तूं जें ॥
तें मंदिरीं या तव सारसाक्षी । लाभे न कीं या स्थळिं मी स्वसाक्षी ॥ ९६ ॥
साक्षित्व जो तो व्यतिरेकसारा । हा व्यर्थ भासे मज लोक सारा ॥
यालागिं येथें तुज अन्वयाची । क्रीडा नव्हे मत्सह चिन्मयाची ॥ ९७ ॥
कीं शून्य मायामय दर्पणीतें । लक्षूनि केले स्वमदर्पणातें ॥
जाणोनि मी हें प्रतिबिंबलों कीं । माझें तथापि प्रतिबिंब लोकीं ॥ ९८ ॥
जो दृश्य द्रष्टा तव दर्शनातें । आलंब नव्हे स्वविमर्शनीतें ॥
या कारणें या स्थळिं आग्रहातें । टाकोनि ने आंतिलिया गृहातें ॥ ९९ ॥
येथें शमेना तव कामना हो । कीं धाम नेणे तव काम नाहो ॥
जो स्वैर येथें प्रकटोनि माला । नेईल तो लाभ तुझा निमाला ॥ १०० ॥

सकामी निष्कामी मम भजन इच्छूनि भलता
स्वबुद्धीतें कल्पतरु मि मज अंगीं शुभ लता ॥
चढे ज्याची त्याची सफळ करणें बुद्धि मनला

---

७६ अगुष्ठपर्वप्रमाण=अंगठ्याचे पेरा एवढा. ७७ इंदिरा=लक्ष्मी. ७८ नाहो=नवरा (सं० नाथ.). ७९ पद्म=कमल ८० पद्मा=लक्ष्मी ८१ निदेश=आज्ञा ८२ दर्पण=आरसा. ८३ स्वविमर्शन=आत्मविचार ८४ निमाला=नष्ट झाला.

अशा वाक्यें तीतें हरिल श्रम ऐसा समजला ॥ १०१ ॥
तदा राधा बोले तुज न भजतां गा व्रजपती
पुजा नाना यत्नीं करुनि, जन हे तीव्र जपती ।
फळें त्यां तूं देशी म्हणुनि हरि अद्याप मजला
तुझ्या दातृत्वाचा प्रकट महिमा ना समजला ॥ १०२ ॥
आतां किंबहुना जगत्रजिवना आज्ञा मला तूं जशी ।
देसी त्या च रितीं रमोनि सुरतीं भोगीन मीं तूजशीं ॥
जो कां कोश तुला असेल गमला तेथे मला धावरीं ।
नेई तू चि हरी विलंब न करीं निर्भेद मातें वरी ॥ १०३ ॥
अत्यंत नम्र वचनें परिसोनि तीचीं । श्रीकांत हे विनवणी ह्मणतो नितीची ॥
कीं मी शरण्य शरणागत आलियातें । धिःकार श्लाघ्य न दिसे करूणालयातें ॥१०४॥
या कारणें सदय तो सरसावला हो । घे राधिके मग म्हणे प्रिय लाभलाहो ॥
हें औठपीठ दृढ आसन देशिकाचें । येथे ह्मणी करिसि तूं अवदान कांचें ॥ १०५॥
जे धीरातूर दारा तदुपरि चतुरा जे उदारा निधानीं ।
माराधारा निवारा फलक गुरुकरा देह सोपोनि दानीं ॥
जे कांता कांतयुक्ता गुरुपुजनरता जे नियुक्ता स्वदासीं ।
ते युक्ता हेतुमुक्ता इतर कुवनिता सद्गुरु त्या उदासी ॥ १०६ ॥
आज्ञासमावेश हि सार केला । तो उक्त राधे असि सारिकेला ॥
तों ते म्हणे धर्मशिळे उभी ते । कांताम्रिसेजे कसि जाउं भीते ॥ १०७ ॥
मत्कामनाहो तपतीव्रतेनें । केला असे भस्म पतिव्रतेनें ॥
आतां मला तत्सहगामनातें । वाटे न कां उत्सव गा मनातें ॥ १०८ ॥
स्वामी कदापी परतें न मागें । त्वदंगसंगापरतें न मागें ॥
मी दीन तूं दीनदयाळ साचा। आतां नव्हे हा समयोऽळसाचा ॥ १०९ ॥
म्हणोनि वंदी हरिपादपद्मा । सलज्ज जैशी वरि पाद पद्मा ॥
तेव्हां हरी टाकुनि निग्रहातें । स्वयें चि ने अंतर स्वगृहातें ॥ ११० ॥
नयनिं भ्रमरगुफा स्वप्रभावो वरीते । निरखुनि मग राधा कृष्णनाहो वरीते ॥
कविमति प्रसरेना वर्णिता कोश तो हो। निगदित बहु नाकीं मूर्त संतोष जो हो॥१११॥
लावोनि मुद्रा जन नित्य खोली । तों देखिली तेथ विचित्र खोली ॥
उद्भासली अभ्रकपंजरीसि । तेथें स्वयें दीपक मंजरीसी ॥ ११२ ॥
निष्कोण भिंतिसुकिळांवरि चित्र जेथें । द्रष्टा विलोकन करी निज नेत्र तेथें ॥

---

८५ व्रज=गोकुळ. ८६ शरण्य=रक्षक. ८७ श्लाघ्य=स्तुतीस योग्य. ८८ करुणालय=कृपेचें घर. ८९ देशिक=गुरु ९० पद्म=कमल. ९१ पद्मा=लक्ष्मी. ९२ नाहो=नाथ, नवरा.

भूमी स्वयंभु वरि मंचक कौतुकाचा। दृष्टांत साम्य न दिसे मज त्या तुकीचा॥११३॥
सेजे सुपुष्परचना सुमनें मुनींचीं। जीं स्वच्छ स्वच्छ परि तीं उपमेस नीचीं॥
कीं साधक भ्रमर तत्पर मोदें पाना। ज साधनी भ्रमति गुजति सिद्ध पाना॥११४॥
निरालंब जो चांदवा मंडपाचा। लयोद्भास त्यामाजि सर्वे रूपाचा॥
अहो भोंवत्या शोभती मुक्तमाळा। तया साम्य दृष्टांत निर्मुक्तमाला॥ ११५॥
ह्मणों मंडपस्तंभ ते वेद चारी। तरी ते अहो भेदिले भेद चारी॥
तया भेदिलें क्षुद्रघंटानिनादें। अनूहात तो नाद घेवोनि नांदे॥ ११६॥
उगाळोनि काठिन्य सर्वे सुगंधा। स्वयें गंध होऊनि दे आशु गंधा॥
रसस्वादु तो आप हो द्राव झारी। नळें निर्मळें युक्त त्या हेमझारी॥ ११७॥
तसे तेजरूपैक्यतादीपज्योती। मुके दृश्यद्रष्टत्व पाहेल जो ती॥
पलंगातळीं धूपती धूपदानें। करी वायु चांचल्यतारूप दानें॥ ११८॥
तसें व्योमें होवोनि दिग्पुष्पमाळा। निवेदीतसे स्वांग सर्वोत्तमाला॥
अशा दिव्य पंचोपचारें विभूतें। अहो सर्वदा पूजिती पंचभूतें॥ ११९॥
अहं ब्रह्म तत्वोक्त जें बोलतें हो। अनिर्वाच्य होवोनिया बोल ते हो॥
दिसे बोध रंगीत चिद्रत्न ताटा। निषेवील त्याचा सरे यत्नताठा॥ १२०॥

तों राधा धामबोधान्विततनुविशदा न स्मरे शक्तिपातें।
जो ये देहीं विदेही पुनरपि निरखी तेथ चिच्छक्ति पातें॥
तेव्हां तो मंचकीं त्या विकसित वदनें रागतो तोकसा हो।
आता ऐका विचित्रान्वय रति रमतां देखिला तो कसा हो॥ १२१॥

येथोनिया भगवदागमसंग तीतें। झाला तथीं विसरली पुनरागतीतें॥
तों साधनश्रम जसा निज सिद्धि होतां। येतां चि सौख्य हरि तद्वत हो पहातां॥१२२॥
दूरस्थ श्रांत गमनें स्वजनगृहातें। पावोनि सन्निध बसे मनिं आग्रहातें॥
इच्छूनि कीं घरधणी मज आदरानें। नेईल तो चि मग मच्छ्रम आदरानें॥१२३॥
कोणेक हो कुळवधू श्वशुरगृहातें। श्रांता मनांत पतिशीं रतिनिग्रहातें॥
इच्छूनि ये हळु चि मंदिरद्वार लंघी। तों सुज्ञ तो करिं धरी बसवी पलंगीं॥१२४॥
तैशी च कोश फिरतां जगदासना कीं। ते काळिचा श्रम तिचा गणवे न अर्की॥
झाला प्रसिद्ध रतिसिद्धिद कोश तीचा। इच्छी स्वहस्तग्रहणादर श्रीपतीचा॥१२५॥

हरी तेव्हां तीच्या उदित निजभावा समजला।
म्हणे लाभे येथें उचित करितां पेश मजला॥
जसें होतां पाणिग्रहणसमयीं अंतरपटा।

---

१३ तुकाचा=तोडीचा १४ सुमनें=उत्तम मनें. १५ मोद=आनंद, सुवास १६ चांदवा=छत. १७ व्योम=आकाश. १८ तोक=बालक.

निवारावें तैशा परि हरि तिच्या सत्वर पैंटा ॥ १२६ ॥
निरंतरांत:पट अंबरांचीं । फिटे तधीं वेश दिगंबराचा ॥
हस्ताब्जेंयुक्ता भुजदंडमाला । अर्पी गळां श्रीपुरुषोत्तमाला ॥ १२७ ॥
गळां हस्तमाळा पडे त्या सुकाळीं । सुखी राधिका चित्सुखाच्या सुकाळीं ॥
अभेदप्रभा दर्पणीं दर्पणाची । खुणा सत हो हे चि आत्मार्पणाची ॥१२८॥
आत्मार्पणाचा क्रम साग जाला । तो मानला श्रीपशुपागजाला ॥
अशी च होवो विसरू पतीतें । म्हणोनि दे षड्गुणरूप तीतें ॥ १२९ ॥

ऐश्वर्य धर्म यश सश्रिय ज्ञान विद्या । वैराग्य हे गुण सहा हरिती अविद्या ॥
संयुक्त जो सगुण विग्रह केशवाचा । निर्वाच्य गूढ परि वर्णिन लेश वाचा ॥१३०॥
जीं पादपद्मवरि गर्जति नूपुरें हो । नाद प्रशासिन विरिंचि तनू पुरे हो ॥
वज्रांकुशाब्जसरोरुह ऊर्ध्व रेखा । ऐश्वर्य दायक पदें जन ऊर्ध्व रेखा ॥ १३१ ॥
सद्धर्म कोश विलसे पट केशरी हो । विद्युल्लता लव हि ती न टिके शरीं हो ॥
शोभे कटीं जडित सुंदर मेखळा ते । देखोनि धाक सुटतो असुरां खळांतें ॥१३२॥
निर्मूनि नाभिकमळांत विधातयातें । नेदी च अंत ठकवी बहुधा तयातें ॥
उद्दाम पोट वलयान्वित दोंद लेशें । वाटे तयात निज येश चि कोंदलेंसें ॥१३३॥
श्रीवत्स अंकित अहो उरुविक्रमींतें । वाचा वदों विसरल्या उरल्या क्रमातें ॥
दुर्बोध तर्क न चले म्हणवोनि वेदीं । उक्तार्थ यास्तव रमा स्वतनू निवेदी ॥१३४॥
सुंदरत्व जडता पदकाचें । साम्यतेप्रति महा पद काचें ॥
भक्तिरत्नरचना निकराची । ती प्रभा हरि रवींदुकराची ॥ १३५ ॥
कंबुग्रिवींमणि हि कौस्तुभ भासमान । जो त्यास ये न रविची अतिभा समान ॥
आपादकंठवरि सुप्रभ वैजयंती । श्रीयुक्त योग वदवे न दुरी जयती ॥ १३६ ॥
धर्मादि चारि पुरुषार्थद बाहुदंड । कामादि दैत्य दमिले बहुधा उदंड ॥
संयुक्त सोज्वळ गदाब्ज हि शंखचक्रें । छेदील शीं दिसती हो दितिपुत्रचक्रें ॥ १३७॥
करिशुंडदृष्टांतसपत्न बाहू । कवी वर्णिती ज्यासि आजानुबाहू ॥
अनिर्वाच्य लावण्य सामुद्रिकाचें । करीं बाहुटे अंगदांमुद्रिकांचे ॥ १३८ ॥
ज्ञानामृतोद्गलित रश्मि मुखेंदु ज्याचा । राधात्म दर्पणि अभेद परी दुजाचा ॥
चित्तात चंद्रमय चंद्रकळा पसारा । एकत्व यात भव ही स्वलिला पसारा ॥१३९॥

९९ पट=वस्त्र. १०० अंबर=वस्त्र. १ दिगंबर=नग्न, शिव. २ अब्ज=कमल ३ दर्पण=आरसा. ४ पशुपागज=गवळ्याचा पुत्र ( कृष्ण ) ५ अविद्या=अज्ञान ६ सरोरुह=कमल. ७ मेखळा=कमरपट्टा ८ उरुविक्रम=मोठा आहे पराक्रम ज्याचा असा. ९ रवींदुकर=सूर्यचंद्राचे किरण. १० कंबु=शंख. ११ ग्रीवा=कंठ. १२ भासमान=शोभायमान. १३ अतिभा=मोठें तेज. १४ वैजयंती=माळ. १५ उदंड=पुष्कळ. १६ दितिपुत्रचक्र=दैत्यसमूह १७ करिशुंड=हत्तीची सोंड. १८ अंगद=बाहुभूषण. १९ मुद्रिका=आंगठ्या २० रश्मि=किरण.

उद्बोधबोध मकराकृति कुंडलें हो । वाटे तयांत रविमंडल कोंदलें हो ॥
युग्भेद ऐक्य उदयान्वित भाव दावी । दुर्बोध तत्व रचना कवि हो वदावी ॥१४०॥
पूर्वेस पूर्ण उगवे शशि त्या सुकाळीं । बिंबप्रभे सभवती नभ भासुकाळीं ॥
तत्तुल्य केश कुरळान्वित सुप्रभा ते । गंडस्थळावरि जसा अरुण प्रभाते ॥१४१॥
वैराग्ययुक्त नवधीं भजनानुकारें । रत्नें तयात जडलीं विविधप्रकारें ॥
माथां मुकुट हरि भास दिवाकराचा । ओवाळितो गमतसे स्वदिवा कराचा ॥१४२॥

ऐश्वर्यादिक षड्गुणें सगुण जो सच्चिन्मुसे ओतिला ।
आनंदें खचिला स्वभाव पुतळा ऐसा दिसे हो तिला ॥
सर्वांगीं द्रवली अमोद स्रवली भोक्तृत्व ही न स्मरे ।
भक्त्यात्मैक्यजळीं निवोनि वरिलें मांगल्य ही न स्मरे ॥ १४३ ॥

अनंगरंगांबुधिच्या तरंगीं । रंगोनि राधा जडि अंतरंगीं ॥
झाला ह्मणे लाभ अलभ्य माला । म्हणोनि वंदी पुरुषोत्तमाला ॥ १४४ ॥
दाखवि स्मरविलासकळांतें । कोण वर्णिल तया सकळांतें ॥
मूर्तिमंत स्मररसा नटला हो । देतसे स्वसुख उत्कट लाहो ॥ १४५ ॥
सतप्त राधा त्रिविधा मदानें । तैं शांति आलिंगनदामदानें ॥
कामांकुशें त्यावरि काम तीचा । वळी हरी चेतक हो मतीचा ॥ १४६ ॥
नाना परी आसन भोगतीतें । दे स्थैर्यता तेथ मनोगतीतें ॥
होवोनि बोले मग देवराया । नित्योत्सवें हें सुख दे वराया ॥ १४७ ॥

मग गतमद राधा देहभावासि टाकी ।
विकळ हृदय तेव्हां देहभावा अटाकीं ॥
भ्रुवधनु शरअक्षीं भेदली अंतरंगीं ।
सहज चि घडला हो ते क्षणीं अंत रंगीं ॥ १४८ ॥

नित्योत्सवापेक्षित मानसाचा । उद्गार हा तो अभिमान साचा ॥
म्हणोनि तृप्ती वरि भोग तीतें । दे स्थैर्यता तेथ मनोगतीतें ॥ १४९ ॥
म्हणोनि टाकी श्रमधर्म राधा । तथापि लक्षी हरि सापराधा ॥
तों कामभोगीं तिस वीट भारी । आला पुरे यावरि कैटभारी ॥ १५० ॥
मी पुराण पुरुषोत्तम मातें । भोगिता परम संभ्रम मातें ॥
ऐशियास मज अर्भक सांगें । मानिलास परि सद्य कसा गे ॥ १५१ ॥

मातें बाळप्रभावें निरखुनि विभवें भोगिलें मीपणातें ।
त्वां तेव्हां विक्रमातें सुचवुनि वदलो स्वप्रभा मी पणातें ॥

---

२१ नवधा=नऊ प्रकारची २२ भजन=भक्ति २३ मातें=मला. २४ संभ्रम=आनंद.
२५ मातें=लक्ष्मीला. २६ अर्भक=लहान बालक.

कीं पूर्वीं या च उर्वीतळिं[२७] बळि छळिला देह घेवोनि दानीं ।
तू ही तैशीच देसी मज रमत गमे स्वात्मदेहो निदानीं ॥ १५२ ॥
प्रतिज्ञा हे माझी तरुणतनुमाजी विसरली ।
अहता तों तूझी त्वरित चि रतें केंवि सरली ॥
तथापि त्वद्वाणी दिनपरि मला साच न दिसे ।
मृषा भासे जैसें मृगजळ दिठी साच न दिसे ॥ १५३ ॥
वर्मभेद हरिची अशि वाणी । ऐकतां चि रुतली असिवाणी ॥
त्राहि त्राहि चुकव्यें भ्रम मातें । नाकळोनि तव सभ्रम मातें ॥ १५४ ॥
भोगितां चि तुज मी मद माजा । मूकली वितुळला मद माजा ॥
देह आस इतुक्या समयाची । मुक्तसग अमृतासम याची ॥ १५५ ॥
ऐसें बोलोनि राधा गतमद प्रमदा मुक्त होवोनि राहे ।
जैशी चिद्बोग्य बोधान्वित मति विशदा शक्तिपातीं नरा हे ॥
श्रांता श्वासासि टाकी सविकळ निरखी स्पष्ट बोले न वाणी ॥
निर्जीवा चित्ररेखासम गमत असे निर्मदा दीनवाणी ॥ १५६ ॥
मुक्तकेश गळती सुमनें हो । टाकिला स्वपरध्यास मनें हो ॥
सूक्ष्म देह ढळले नग तीचे । चिन्ह हें तंव निदान गतीचें ॥ १५७ ॥
दया उद्भवे तों पतग्यासनोला[२८] । विवर्जी त्वरेनें चि तत्रासनाला ॥
तदां स्वाग आच्छादुनी वस्त्र पाहे । विलोकी हरी राधिकेची त्रपा[२९] हे ॥ १५८ ॥
पलगावरी पुष्पनिर्मीत सेजे । उताणी दिसे योगनिद्रा तशी जे ॥
चिदानंदसिंधू तिच्या अतरंगीं । भरे अष्टधा प्रेम दावीत रंगीं ॥ १५९ ॥
मानेतळीं मग निवेदुनि चक्र पाणी । स्वांकाश्रयीं बसवि सद्गुरु चक्रपाणी ॥
प्रक्षाळितो वदन घेउनि आशु[३०] पाणी । ओंवीतसे शिथिल नासिकिचे सुपाणी॥१६०॥
अधिरता पळता बसवीतसे । अधर चुंबुनि तावुल देतसे ॥
शिथिल जें तिस नावर हो ढिले । वसन तें जघनावरि ओढिलें ॥१६१॥
पवन विंजितसे अजि पौलवें[३१] । मृदु असूगतिने अजपा लवे ॥
अधर शोणित नावरलें पुशी । गमतसे गगनावरि लेपसी ॥ १६२ ॥
राधात्मभक्ति प्रियदर्पणातें । लक्षूनि शृगारवि आपणातें ॥
अनन्य हें लाघव केशवाचें । निर्वाच्य हीं वर्णिन लेश वाचे ॥ १६३ ॥
कीं ऊटि चिच्चंदनकेशराची । चर्चूनिया विंचरि केशराजी ॥
कौश्यल्य दावोनि विचित्र वेणी । घालीतसे केवळ चि त्रिवेणी ॥१६४ ॥

---

२७ उर्वी=पृथ्वी २८ पतग्यासन=गरुडवाहन कृष्ण. २९ त्रपा=लज्जा ३० आशु=सत्वर. ३१ पालवें=पदरानें.

कृष्णांबु केश सितें[३२] अबुं[३३] सुपुष्पें[३४]जाती । भागीरथी धवैंळ[३५] मालतिपुष्पजाती ॥
नाडीं[३६] सरस्वतिजळ त्रय एक वीची[३७] । वेणी अतैव वदली रसना कवीची ॥१६५॥
घाली विचित्र भरणें तिचिया शुभागीं । चिच्छीसपुष्पाख्य हिमांशु भांगीं ॥
ज्ञानान्वयें लोचानें अंजनातें । लेवी कवी तो मनरंजनातें ॥ १६६ ॥
श्रवणनग तियेचे शक्तिपातें गळाले ।
अवयव हरिने जे ओंविले वेगळाले ॥
स्वरूप पदक कंठीं ध्यान दे हार तीतें ।
अनुभव सुख राधा घे विदेहा रतीतें ॥ १६७ ॥
तिते घालितां भक्तिसंस्कार चोळी । विनोदें तिचा श्रीहरी ऊर चोळी ॥
स्वयें नेसवी शांतिचिद्रास तीतें । स्तवीं लोटलें वाक्य तेव्हां सतीचें ॥१६८॥
अतिव निर्मळ शांतिसुसैंविलें । शिथिल तें स्वकरें सरसाविलें ॥
अनुभवोत्तर निर्भिड बोलते । अजि मनांत धरा दृढ बोल ते ॥ १६९ ॥
ब्रह्मीं निष्कर्मलीला गुरुवर नारायणैक्यावतारी ।
कृष्णा तो तूं त्वदंगाश्रय भवजलधीमाजि कीं नाव तारी ॥
योगी भोगी विरागी परि तव भजनीं हेतु नाहीं निमाला ।
मी त्वत्संगानुरक्ता अरि तरि न मनीं सर्वथा हा निमाला ॥ १७० ॥
भक्त्यात्मयोगचरितान्वय माधवाचा । नाशी अनादि तमकल्मष या भवाचा ॥
राधाविलास म्हणुनी प्रभु यासि नाम । ठेवोनि मंगेश कवीस करी अनाम ॥१७१॥

॥ संपूर्ण ॥

---

३२ सित=पांढरें. ३३ अबु=पाणी. ३४ पुष्पजाती=पुष्पसमूह. ३५ धवल=शुभ्र. ३६ नाडा=वेणीतील दोरी. ३७ वीची=लाट. ३८ सावळें=वस्त्र.

कांतिकिंकरकृत

# सुदामचरित्र.

स्मरें सर्वदा वारिधी मंगळाचा । स्वभावें च जो सोयरा मंगळाचा ॥
जगज्जीवनारंभ दारा जयाची । दरिद्र्यास दे संपदा राजयाची ॥ १ ॥
जितें वंदिती देव धाता कपाळीं । कृपालोकनें जे सदा लोक पाळी ॥
गुरूदेवदैत्यां प्रबोधी कवीतें । कवीतें कवित्वें नवीं शीकवीतें ॥ २ ॥
मुख्यप्राणाहूनि जो प्रीय भावें । मुख्यप्राणा वंदितों त्या स्वभावें ॥
विश्वाचा जो प्राण सर्वत्र पाहे । माझी रक्षी संकटीं तो त्रपा हे ॥ ३ ॥
दरिद्री सुदामा अपेक्षी सुदामा । परी त्या बदामेक नेदी कदा मा ॥
सदा वश्य कामा न राहे रिकामा । सुतापुत्रवामासमस्तांस पामा ॥ ४ ॥
दशाहीन जीर्णें न रेखा न वर्णें । नसे आदिमध्यांत अद्वैत पूर्णें ॥
विभूतीमळें लेपलीं सर्व गात्रें । हराचे परी दंपतीचीं सुवस्त्रें ॥ ५ ॥
झरोके घरा आसमंतात वारा । निजेल्या दिसे चांदणें चंद्र तारा ॥
मनीं कल्पिले ते ची कल्पून खाती । सुरेंद्रापरी संपती शोभताती ॥ ६ ॥
अती रम्य केळी तशा नारिकेली । न धंदा घरीं ती करी नारि केली[10] ॥
निजेल्या न लागे करी त्यास कोणी । महाराज तैसी नवी रीत दोन्ही ॥ ७ ॥
हरी शांकरी वा कधीं शीवरात्री । जयती क्वचिद् भोजनें मध्य रात्री ॥
फळें कंदमूळें जरी ही न मीळे । तरी काळ कर्मी जळें कीं अरोळें ॥ ८ ॥
न जेवावया पात्र तें लेंकरातें । ह्मणोनी सुपुत्रत्व आलें करातें ॥
घरीं लंघनें उंदिरांमांजराला । शरीरीं त्वचा लागली पंजराला ॥ ९ ॥
वदे एक दीसीं क्षुधावंत नारी । तुम्ही जा असे जे स्थळीं पूतनारी ॥
करी राज्य तेथें महा वैभवेंशीं । तुह्मा द्रव्य देईल काहीं मवेसी ॥ १० ॥
द्विज वदे ललने ललितानने । वदसि तूं परि संकट जाणणें ॥
नृपति मित्र कदापि ह्मणों नयें । न बुझवे गति काय बनोन ये ॥ ११ ॥
समान पक्षें विभवें असावें । तरी च त्याचे निकटीं बसावें ॥
नाहीं तरी मान कदा न राहे । लघुत्व येतें सहसा नरा हें ॥ १२ ॥
कामिनी वदन कानन संधी । युद्ध पर्वत शरीर समाधी ॥
छीट मित्र असमान विचारी । हें दुरून बरवें प्रिय नारी ॥ १३ ॥

---

१ वारिधि=सागर. २ दारा=स्त्री ३ सुदाम=पुष्कळ द्रव्य. ४ मा=लक्ष्मी. ५ वामा=स्त्री. ६ पामा=खरूज ७ दंपती=नवराबायको. ८ झरोके=खिडक्या. ९ नारिकेली=माड. १० केली=क्रीडा ११ लंघन=उपास. १२ पंजर=हाडांचा पिंजरा.

तथापि जावें जरि रिक्तपाणी । हीनत्व ये केंवि उरेल पाणी ॥
राजा गुरू दैवत हीं गृहस्थें । भेटों नये यांप्रति रिक्तहस्तें ॥ १४ ॥
तुम्हीं अन्य कांहीं व्यवस्था न कीजे । वधू बोलिली शीघ्र प्रस्थान कीजे ॥
पुरामाजि जाऊन भिक्षा पहातें । मिळाल्या पृथौ देत मुष्टीक हातें ॥ १५ ॥
पृथाबंधनालागिं जागा दिसेना । जुनें वस्त्र तें धड कोठें असेना ॥
दिली ग्रंथि तैशी च गांवास जाया । निघे त्या अनेका वदे युक्ति जाया ॥ १६ ॥
धुडुन येतिल युग्म सुवासिनी । भरुनि कुंभ निघेत सुवासनी ॥
गजतुरग सपाखर भेटती । शकुन मंगळसे प्रिय वाटती ॥ १७ ॥
क्रमितसे पथ जेपरी फावला । त्वरित मोक्षपुरी प्रति पावला ॥
कनकरत्नखचीत चहूंकडे । सभंवतें सरितापतिचें कडें ॥ १८ ॥
मकर नक्र फणीवर कांसवें । उसळती ललना उदकासवें ॥
मज गमे भ्रमलीं भवबंधनें । करिती मोक्षपुरीअवलबनें ॥ १९ ॥
तरूलता पवनें दृढ डोलती । गमत आर्त जना प्रति बोलती ॥
जरि पुरीप्रति ये नर येकदा । जननिच्या जठरास न ये कदा ॥ २० ॥
पोटीं स्थिती जाणुनि संपतिची । केली व्यवस्था सरितापतीची ॥
द्वारावती त्यावरि हेममुद्रा । समुद्र हें नाम पडे समुद्रा ॥ २१ ॥
पूर्वीं सुधार्मिक युगीं जन जे भजेती । ताही पुण्यांस विभवें स्वपदास नेती ॥
त्याचे कलींत न चले ह्मण देवतांनीं । द्वारावती वसविली सकळार्थदानी ॥ २२ ॥
देवीं दैत्यीं मथिला सिंधु पाहीं । चौदा रत्नें घेतलीं त्या च डोहीं ॥
पायींवातें रत्न योजून देती । पध्मावी हे द्वारका सर्वदाती ॥ २३ ॥
पुरीवीण नीधी च कोठें न थारे । हे पादपद्मी धरि वृत्ति थारे ॥
पुढें चालतां कोणि जाऊं न देती । ह्मणे जातसां कार्य बोला वदेती ॥ २४ ॥
सांगा नृपास तुमचा द्विज जो सुदामा । इच्छीत दर्शन कदापि न हेमदामा ॥
तैसे च दूत वदती रमापतीसी । नेणों अकिंचनें दिसे अमुचे मतींसी ॥ २५ ॥
ऐकोन नामा ह्मणतां सुदामा । तो हेमधामा विसरे गरीमा ॥
प्रेमाभरें धावुनियां सकामा । आलिंगिला मित्र दरिद्रसीमा ॥ २६ ॥
कांतापरिक्षा अनुपथ्य काळीं । सखा सुहृत् संकटवेळ टाळी ॥
मित्रपरीक्षा असमान वेळे । सच्छिष्य काया मन वाक्य मेळे ॥ २७ ॥
रुक्मिणी अति सत्वर पातली । चरणसन्नमनीं कव घातली ॥
बसविला द्विजराज निजासनीं । पुजित सन्मधुपर्क सुवासिनी ॥ २८ ॥
पदें चूरितां लागली ग्रंथि हातीं । असे धाडिलें काय दोघे पहाती ॥

---

१३ पृथा=पोहे १४ मोक्षपुरी=द्वारका १५ सरितापति=समुद्र. १६ अकिंचन=भिकारी

पृथा देखिल्या त्या मुखामाजि घाली । तदा रुक्मिणी भाग मागों निघाली ॥ २९ ॥
कसा प्रीतिचा आलुका देवराणा । फळें पुष्प घाली मुखाब्जीं च जाणा ॥
तसें देखतांलिंगितो भक्त आधीं । नमस्कार त्यानंतरें घे प्रसिद्धी ॥ ३० ॥
स्नेहें-बहू वहिनिनें मज घाडलो हे । यालागिं गोड सजणा अति लागली हे ॥
आहेत कीं कुशल सर्व कुटुंब देवा । तूझी दया म्हणउनी क्षम वासुदेवा ॥ ३१ ॥
करीं शेष देऊनियां ते स्वनारी । करू पाक सांगे तिला पूतनारी ॥
सुगंधीक तैलादिकीं मज्जनातें । स्वहस्तें करी आपल्या सज्ज नातें ॥३२॥
तदा स्नानसंध्यादिकर्मे विधीनें । करी तीं जशीं लाविलीं जीं विधीनें ॥
बरी ताटवाटी सुचामीकरांची[१७] । गमे निर्मिली हेमधामीं कराची ॥ ३३ ॥

शाका नाकींधिपातें[१८] न मिळति सहसा वाढिली सव्य पंक्ती ।
क्षीरी सक्षीरपूर्णा वळवट कितिका सेवया सूक्ष्मयुक्ती ॥
घाऱ्या मांडे गुरोळ्या घृतपचित पुऱ्या सत्य संपूर्ण पोळी ।
फेण्या खाजी करंजा मृदुतर लुचया शर्करेमाजि घोळी ॥ ३४ ॥

कमोद आमोदित तंदुळाचा । श्रीभक्त कीं आकर कुड्मलाचा ॥
कढी वडे पापड मीर घोटी । अप्राप्य शेषासि समीर घोटी ॥ ३५ ॥

सद्यस्तप्राज्य वाटी भरुनि तदुपरी साय दुग्धादधींची ।
किंवा मर्दून काढी सकळ मधुरता काय दुग्धोदधींची ॥
आंबे निंबें सुबेलें लवण मिरकुटे पक्ति कोशिंबिरींची ।
तिक्ताम्ले रायतीं ते रुचिकर चटणी हिंग कोथिंबिरींची ॥ ३६ ॥

मागतीचतुरतेपरिसीतें । मागतीचतुरतेपरिसीतें ॥
जेवणास्वविमानवतीतें । जेवणास्वविमानवतीतें ॥ ३७ ॥
दधी शोधी दुग्धें रसकर विबुधें चि कथिलें ।
तसें सत्कर्पूरा मिळवुन बरें मिष्ट मथिलें ॥
लवंगावेळानीं समरसच रामा मुखरणी ।
भरी पात्रें काढी सुरस बहु वाढी शिखरणी ॥ ३८ ॥

असा जेविला कृष्णपंक्तीस जैं जो । दिल्हा चित्रगुप्तें तयालागिं जो जो ॥
परीपूर्ण संतृप्त झाला रिकामा । तदा धूतले हात संसारकामा ॥ ३९ ॥
पर्णें सुवर्णें चिकणी सुपारी । विडा करीं दे मथुरानृपारी[१९] ॥
पूर्वील गोष्टी घडल्या वदेती । परस्परें हासुन हात देती ॥ ४० ॥
सुदामा तथा पूतनेचा अरांती[२०] । कथा सांगतां वर्तली मध्य राती ॥

---

१७ चामीकर=सोनें. १८ नाकाधिप=इंद्र १९ मथुरानृपारि=कंसशत्रु कृष्ण. २० अ-राति=शत्रु

पृथक् मंचकीं सेज दिव्यांबराची । तिवाशी उशी रम्य पीतांबराची ॥ ४१ ॥
करी कृष्ण चौथें तदा साहृयातें । वंदे सातवा मी भजें आठव्यातें ॥
तुम्हीं तीसरें ना कदां वीसरावें । पहीलें दुजें सर्वकाळीं करावें ॥ ४२ ॥
निजेले तदा श्रीहरी सुप्रभातें । उठे फांकली कौस्तुभाची प्रभा तें ॥
असे दीस गेले सहर्षे द्विजा या । करी फार उद्योग गांवास जाया ॥ ४३ ॥
हरीतें करी सूचना स्वप्रकारीं । कुटुंब्यास तों द्रव्य संतोषकारी ॥
भल्यानीं धनाशा कदा ना करावी । स्वधर्मीच निष्ठा महेशीं धरावी ॥ ४४ ॥
पुन्हां बोधवी ब्राह्मणी वाट पाहे । मुलें लेंकरें रक्षिती त्वत्कृपा हे ॥
परी श्रीहरी तो न बोले द्विजासी । पुन्हा अन्य वक्रें प्रबोधी गुजासी ॥ ४५ ॥
ऐसे परी करित विप्र उपाय नाना । पैं त्यास उत्तर न दे हरि हा न ना ना ॥
या नंतरें करुनि निष्ठुर मानसातें । जाता तऱ्ही किमपि देइल सर्व मातें ॥ ४६ ॥
प्रभातीं करी स्नानसंध्याजपातें । कटीं धोत्र बांधी निघे पक्षपातें ॥
ह्मणोनी असा जावया सिद्ध झाला । पुन्हा ये पुसे श्रीगरुडध्वजाला ॥ ४७ ॥
न मागे परी हेत मागावयाचा । उपायें वदे भाव सांगावयाचा ॥
हरी त्या करी प्रार्थना पूर्णभावें । कळेना सुरा गुह्य ज्याचें स्वभावें ॥ ४८ ॥

राहावे वदतां विरोध दिसतो स्वामित्व येतें पहा ।
जा हा शब्द अती उदास गमतो किंवा जसा शाप हा ॥
कांहीं ना वदणें तरी कठिणता तैसें च निर्भर्त्सणें ।
चिंतावें मज मानसीं निशिदिवा यावत्पुन्हा दर्शनें ॥ ४९ ॥
येथे वास कराल हो तरि सुखें पैं स्त्रीमुलें पीडती ।
जातां रिक्त करें भवीं कठिण तीं बाळें कशीं क्रीडती ॥
दु:खाचा घरचार निर्धन जिणें भोगावरी घालणें ।
स्मर्तव्या वैयमादरेण मनसा यावत्पुनर्दर्शन ॥ ५० ॥
द्यावें द्रव्य सुवर्ण नैश्वर पहा कोठें नसे स्थीर हो ।
वस्त्रें फाटति तें पशू मरति वा नेती बळी वीर हो ॥
आता काय असे जया क्षय नसे जें तें वृथा बोलणें ।
स्मर्तव्या वयमादरेण मनसा यावत्पुनर्दर्शन ॥ ५१ ॥

स्मरण हें सकळांत वरिष्ठ कीं । स्मरण नाशित सर्व अरिष्ट कीं ॥
स्मरण मोक्ष दया उपमा नसे । स्मरण हें धरणें निज मानसें ॥ ५२ ॥
धरीं एक भावें दुजें सहरावें । तीवातीत व्हावें तिघांसी मिळावें ॥
न चौघी स्मराव्या न चौघी नमी हो । त्यजी पाच पाचा सबाधें यमी हो ॥ ५३ ॥

---

२१ वय=आम्ही २२ नश्वर=नाशवंत.

वधीं साजणा ध्यास साचा करीं रे । त्यजीं सत्य सातां जनीं ते वरीं रे ॥
नको आट मित्रा धरीं आठ भावें । नवाते हरी त्या न वातें भजावें॥५४॥
हरी त्या करी या परी बोध भारी । परी चित्त चिंताकुळलें सभारी ॥
न बोधे चि तो तत्क्षणीं त्या स्वभावें । पुढें चित्त स्वस्थें फळे कीं स्वभावें ॥५५॥
द्विज निघे स्वमनांत विरामला । परि दिला विन बोल विरामला ॥
पद दशैक पुढें क्रमिल्यावरी । यवकला वसनाप्रति सांवरी ॥ ५६ ॥
न बोले हरी मोकली वीप्र आशा । पुढें चालतां भासती शून्य आशा[२३] ॥
विचारी म्हणे काय अव्हेर केला । कसा भाव दावी जसा आळुकेला॥५७॥

कळेना हें बोला तरि चतुर मी बोध करितां ।
नसे द्यायाला तैं नृपतिनगरी हेमभरिता ॥
सदा स्वेच्छाचारी उपरि मजशीं प्रीति धरितो ।
अभाग्यत्वें माझ्या किमपि वचनाशाद्य वरितो ॥ ५८ ॥

कठीण याचे चि चरित्र पाहें । कांहीं च आली न कशी त्रपा[२४] हे ॥
शठत्व केलें अति थोर यानें । रिक्ताकरें भोवडिलें रयें[२५]नें ॥ ५९ ॥
निराशा निघे विप्र तैं मद चाले । न दे कृष्ण कांहीं प्रयुक्ती न चाले ॥
फिरावें कसें या त्रपेनें निघाला । दुराशा मनामाजि घाली न घाला ॥६०॥

कैसा गांवास जाऊं रिणकरि मिळती काय त्यांलागि देऊं ।
स्त्रीबाळें खाउं खाउ करिति मज पुढें येति धांवूनि धाऊं ॥
लोकांला तोंड दावूं कवण गति दिली पूसती वित्त पाहूं ॥
आता जोगी च होऊं परमुलुख धरूं भस्म आंगास लावूं ॥ ६१ ॥

आजपर्यंत होता जना भर्वसा । देव देईल हा आमुतें सर्वसा ॥
ते कुटी बोलती अप्रतिष्ठाकरें । मानहानीहुनी मृत्यु होतां बरें ॥ ६२ ॥

हरिण्यारण्यतीं विहराति हरी[२६] शैलकुहरीं[२७] ।
दिशांतीं दिग्दती वनभुवन ते सेवित करी ॥
सुनेत्रीं[२८]च्या नेत्रां कुचकटिमुखासी न तुळती ।
अमान्यत्वें मानी मराति अथवा दूर पळती ॥ ६३ ॥

आशे राडे विनाशे अधम धनपिशे प्राणशोषे विशेषें ।
निर्लज्जे पोटपोशे अगणितकलुषे निर्फळ क्लेशकोशे ॥
निस्तोषे पापराशे निपट परवशे घोरनर्कप्रवेशे ।
आता ही दुःखदोषे पतित अवदशे सोडि हो काळपाशे ॥ ६४ ॥

---

२३ आशा=दिशा २४ त्रपा=लज्जा २५ रय=वेग २६ हरि=सिंह. २७ शैलकुहर=गुहा. २८ सुनेत्री=स्त्रिया.

दुःखाचें झाड तें तू अघफळ फळ तें घोर जुंबाड तें तूं ।
द्वाडाचें द्वाड तें तू नभ अपरमित महा कष्ट कावाड तें तू ॥
लोभाची धाड तू ते हरि हरि निपटे लड्ड लाबाड ते तू[२९] ।
॥ ६५ ॥

दक्षिणाशा धरी हस्तविस्तार तो । तेजहीनत्व पावे महाभाव तो ॥
अन्य सामान्य यांची कथा काय हो । कांतिमान्यत्व आशेमुळें जाय हो ॥६६॥
आशेनें भ्रमलों स्वधर्म भुललो वेडा तसा धावलों ।
मानातें मुकलों अवाच्य वदलों हीनत्व ही पावलों ॥
दारिद्र्यें पिडलों सुमित्र म्हणुनी सद्भाग्ने भाळलों ।
सर्वस्वें ठकलों हितास मुकलों ऐसा भवें नाडलों ॥ ६७ ॥
कापट्य यानें बहुसाल केलें । जाणोनि मन्मानस आळुकेलें ॥
मित्रत्व दावूनि शठत्व दावी । ते वृत्ति चांडाळ अशी वदावी ॥ ६८ ॥
याच्या घरा मी अविचार गेलों । यालागिं तेणें अवमान्य केलें ॥
यथार्थ जे अन्यगृहास जाती । आत्मस्थितीहीन कसे न होती ॥ ६९ ॥
देणें सामान्य कोणे न कळत म्हणणें थोर काठिण्यवाणे ।
जाती प्राणे प्रमाणें करिति मुकरणें पै न देतील नाणें ॥
टोणे टाणे विधानें बसतिल धरणें द्रव्य सर्वास माने ॥
हा ही तैसा च जाणें निज धन कृपणें वेचणें हे न होणें ॥ ७० ॥
याचें मी गुह्य जाणें कुटिल बहु गुणें नाडिले लोक यानें ।
कर्मै ही अन्यविन्ये करून मुकरणें पापपुण्यास नेणे ॥
येथें येऊन भेणें वसाति अति उणें नेणिजे भाग्य कोणें ॥
यानें आम्हास देणें नवल मति हिणे हे चि लाजीरवाणें ॥ ७१ ॥
वशाचा ठाव नाहीं बुध जन वदती बाप या दोन पाहीं ॥
माता ही दोन ठायीं पशुवळ विकिती दुग्ध घेऊन डोई ॥
ज्या बापें ही न कांहीं किमपि न दिधलें काय व्हावें निधीई
॥ ७२ ॥
आम्हाला काय द्यावें परि निजविभवें ठाकतो थोर दैवें ।
यानें चोरून खावें मखैण[३१] अनुभवे हें मला पूर्ण ठावें ॥
लंगोटे मित्रभावें भजति मनजिवें त्या कसें वीसरावें ।
लोकांतीं ही वदावें फजित अति जवें होय बाजार भावें ॥ ७३ ॥

---

२९ चवथा चरण आमचे जवळचे प्रतींत नाहीं. ३० या श्लोकाचा चवथा चरण मिळाला नाहीं. ३१ मखण=लोणी.

बाळत्वीं ख्याति जोडी उतरि उतरडी घे दधीदुग्धगोडी ।
शिकें झोंबून तोडी नवनित लुबडी भक्षुनी पात्र फोडी ॥
माता यालागिं झोडी बहुत चरफडी हा न सोडी च खोडी ॥
हे तों विख्यात खोडी खरचि न कवडी काय देतो बराडी ॥ ७४ ॥
आरंभी श्री निवारी अनय तदुपरी भद्र ठोकी टिकोरी ।
पक्षीप्राणातकारी वृषभ परिहरी अश्वहत्या स्विकारी ॥
जारी चोरी प्रचारी रजकवध करी दासिते अंगिकारी ।
शेखीं माम्यास मारी धन बहु न मिळे काय देतो भिकारी ॥ ७५ ॥
*अंगनांत अवब्रजरा । आणखी करित सग्रहा जरा ॥
हा सदा भजतसे परदारा । मोहिल्या निज गुणें परदारा ॥ ७६ ॥
बोलाचा लटका जिभेसि अटका नाहीं मुखें फाटका ।
गोपीला घुटका करून चटका लावी असा तोटका ॥
तोडी हि तटका न होत घटका भासे महा वीटका ।
ऐसा हा फटका किती म्हणू ठका पैका न दे नेटका ॥ ७७ ॥
कालिंदीडोह काळा निघुन अवलिळा नाथिला नाग काळा ।
बेधी बाळा अबाळा वरपतनिकळा कावळा प्रीय काळा ॥
भिल्ला विश्वांत काळा न गणित सकळा हा सुकाळा दुकाळा ॥
[1] जाणें नामें चि काळा परि मज गमले आत बाहेर काळा ॥ ७८ ॥
+होतो कापटय कोशी दैव प्याला सुखेशीं । परि न कुसमुसी झेलिले पर्वतासी ॥
× × × × याचि प्रख्यातिऐशी । न कळुन ह्मणती लोक माणूस यासी ॥७९॥
माझा हा हेतु होता धरून सदयता धान्य खंडोक देता ।
न कुटी ॰ काळ जाता ... भानहा। त्या पुढें देव दाता ॥
घ॰ ... कवण हि मरत... शैल काय बोलों वृताता ।
जातां येईल कांता स्मितमुख पुसता ते सेवि दाखवी कोण आता ॥ ८० ॥
केलें विश्वासघाता हर हर मुख त्या खासी ... री ऊसणें ।
देणें दातृपणें घडे न सुमनें द्यावें ... ... नफा चौगुणें ॥
ते ही जैन मनें उदीम करितां घे... धनपि न हे योजणें ।
अन्यातें वदणें उपाय रचणे केलें तकलु... पैक्या-उणें ॥ ८१ ॥
निष्ठूरें निगुणें कसा दवाडिलों नि... रवशे फुदता ये घरासी ।
ऐसा बोले मनासी उकसबुकसा त असा देखिली तेजरासी ॥
आला ग्रामप्रदेशीं तव पुरि सुर...

३२ दाव=अरण्याग्नि. * येथें अपपाठ अ... निराळे वृत्ताचे आहेत + येथेंही गोंधळ वृत्तस

[1] हे पहिले दोन चरण निराळे वृत्ताचे व दुसरे बंधानें दिसतो.

झोले द्वारावतीसी पुनरपि विवशी पातलों संभ्रमेशीं ।
हा हा हे भ्रांति ऐशी मज लघुतरशी फीरवी देशदेशीं ।। ८२ ।।
आता येथें न जाणें बहुत परि उणें थोर लाजीरवाणें ।
संकोचें अन्न खाणें असुखद बसणे काकशंकाप्रमाणें ।।
याचा हे शब्द दीनें गदगद वचनें श्लाघ्यता काय तेणें ।
हो का प्राणांत होणें परि सहजपणे पैं जिणें व्यर्थ जाणें ।। ८३ ।।
परतला नगरीहुनि जावया । निजसुतावनितादि भजावया ।।
उपवनीं पशु चारित गोवळी । पुसत त्यां वचनें अति कोंवळीं ।। ८४ ।।
नगर कोण कसा नृपराज तो । सदय कीं शठ दुर्जन राजतो ।।
वदति राज्य करी द्विजकामिनी । निगमनीति जशी सुरभामिनी ।। ८५ ।।
सुदामा पुराधीश ही त्या सुनारी । करी राज्य ते तुष्टला पूतनारी ।।
ह्मणे गोंवळे चाट पोरें टवाळी । दरिद्री असा मी करीती ढवाळी ।। ८६ ।।
पुढें जाय तों हें कळे ग्रामलोका । त्वरें चालिले विप्रराजा विलोका ।।
दहापांच गेले तयीं येक वाटे । द्विजाचे मनीं धाक अद्भूत वाटे ।। ८७ ।।
म्हणे निंदिला निंद्य शब्दें हरी तो । मला सत्य घालील कीं जोहरीं तो ।।
धरायास हे पातले दूत भारी । मनामाजि पैं कोपला कैठभारी ।। ८८ ।।
धरूनि स्वदूतां करीं झोडवीतो । तरी अन्य कैंचा मला सोडवीतो ।।
मतीमंद तार्तम्य मी चूकलों हो । कसा स्वार्थ मिथ्यार्थ या मूकलों हो ।।८९।।
किंवा स्वचित्तीं कळलें हरीला । रिक्ताकरें तो द्विज बोळवीला ।।
पाचारिलें कांहिक द्यावयाला । हे लोक आले तरि न्यावयाला ।। ९० ।।
पुरी तरी काचनयुक्त साजे । परंतु सिंधू न दिसे कसा जे ।।
या कारणें विभ्रम फार वाटे । की पातलों मीं तरि अन्य वाटे ।। ९१ ।।
कळे राजपत्नीस आला सुदामा । फिरे काननीं ये न तो चि स्वधामा ।।
त्वरें सिद्ध केली समग्रेक सेना । रजें दाटला मार्ग तो ही दिसेना ।। ९२ ।।
पुढें धुडितां देखिले सत्तमातें । नमस्कारितीं विप्रराजोत्तमातें ।।
पुरीं लोक तो आसमतें मिळाला । द्विजाचा मुखेंदू दिगतीं पळाला ।।९३।।
म्हणे पातलेती मला कां धराया । न हो न्या मला अप्रतिष्ठा कराया ।।
चला येतसें भूप मीं सन्निधानी । करा न्याय नीति विवेका विधानीं ।। ९४
तंव पटूकन लोकपती वनिता । कर जोडुन होउनियां विनिता ।।
अतितत्पर होउनिया नमनीं । परि तो भ्रमला सहसा न मनी ।। ९५ ।।
म्हणे स्वामी तुम्ही बहुत चि मनीं काय विवरा ।।
वरा राज्यश्री हे इज न सहसा अन्य नवरा ।।

वरा इंदिरेच्या नमुन चरणा बुद्धि अवरा ॥
वरा कैंची आशा दुर करुन पावा गति वरा ॥ ९६ ॥
विचारी मनीं नाथ हे नाटकाचे । न जाणोनियां चित्त माझे चि काचे ॥
नुपेक्षी दयावंत तो अंगिकारी । करी इंद्र सामान्य महाद्रिकारी ॥ ९७ ॥
जरी निंदिला स्यां न जाणोनि चित्तीं । अरी मित्र सामान्य आली प्रचीती ॥
हिरण्यासुरें दूषिला वर्जिला हो । तसा रावणें घेतला द्वेषलाहो ॥ ९८ ॥
शताधीक दुर्वाक्य चैद्यें[33] सभेसी । दिल्हीं दुष्ट नीं नाणवेती जिभेसी ॥
समस्तास या मुक्ति देतां नवाची । कसा तो स्वदासा नयस्या विवंची ॥ ९९ ॥
नमस्कारिला अंतरीं सर्वसाक्षी । चिरें घेत आणीत जीं सारसाक्षी ॥
करीती पुढें दूत सौख्यासनातें । किजे वेत्रधारीं जशा शासनातें ॥ १०० ॥
तुरें वाजती घोष तो दुंदुभीचा । महा हर्षला देवमेळा नभींचा ॥
पताका ध्वजाडंबरें छत्रहारी । शिरीं शोभती आतिपत्रें प्रहारीं ॥ १०१ ॥
पुरीमाजि शोभा गुढ्यांची उभारी । प्रवेशे जसा द्वारका कैठभारी ॥
प्रभांकीत दामोदरें हेमशाळा । हिरे माणिकें जोडिल्या ज्या विशाळा ॥१०२॥
सुदामा सुधामा सुधामीं प्रवेशे । गमे इंद्र इंद्रावतीतें प्रवेशे ॥
करी धर्म तो राज्य आनंदकारी । हरी तुष्टला काममोक्षप्रकारी ॥ १०३ ॥
सुदामाख्यानातें पठण करि जो प्रीति धरूनी ॥
दरिद्रातें त्याच्या हरि करि दुरी होउन ऋणी ॥
स्वकर्णीं आकर्णीं पठण करवी प्रेमविसरें[36] ॥
महा पापें वारी मधुमथन अतीं न विसरे ॥ १०४ ॥
भल्यांनीं सदा ग्रंथ वाचीत जावा । सहस्रापरी चक्रपाणी भजावा ॥
स्वभावें च ये साम्यता वै भवाची । विनंती नुपेक्षा कवीकिंकराची ॥१०५॥
अघांगार गंगातटीं पंचक्रोशी । उचिंचेसि वैजापुरी रत्नकोशी ॥
भले लोक तेथें दया शंकराची । असे त्यांत वस्ती कवी किंकराची ॥१०६॥
नदाब्धिरसभूशके ( १६३९ ) विवरिजे कार्तिकैराका गुरू
सिंधूरांबरचंद्र ( १०८ ) पद्यगणितीं हृत्पकजीं श्रीगुरू ॥
सूत्रीं तो वदवीत किंकरगिरा चातुर्य संतोषती ॥
श्रीरामार्पण सर्व कर्म करितें अर्थामृतें पोषती ॥ १०७ ॥

**समाप्त.**

---

३३ चैद्य=चेदी देशाचा राजा शिशुपाल. ३४ सारसाक्षी=कमलनेत्री. ३५ आतपत्र=छत्र ३६ प्रेमविसर=प्रीतिपुंज. ३७ राका=पूर्णिमा. * यीं गणिताप्रमाणें पाहिलें तर एक श्लोक यात कमी आहे

७९८२

कविकिंकरकृत

# शुकरंभासंवाद.

प्रणमुनि मुनिचित्तारामरामाख्य धुंडी । गुणगणपति ज्यातें संकटां सर्व धुंडी ॥
त्वरित दुर करीतो अनरींच्या तमातें । शरण शरण त्याला एक सर्वोत्तमातें ॥ १ ॥
जगीं धन्य जो इंद्रियांचा विदारा । करी लेखिना पातल्या द्रव्यदारा ॥
भजे आवडी रामदासा उदारा । तयाच्या सदा सेविती मुक्ति दारा ॥ २ ॥
शुकें जन्मतां आदरीलें तपातें । यमी प्राण सोसून शीतातपातें ॥
न लेखी विरक्तांतरें यौवनातें । जसा उन्मुळी चंडे वायू वनातें ॥ ३ ॥
शुक मनीं कमनीय मती भरे । तपवने पवनें क्रमितां भरें ॥
मन यमी नियमी तप आचरे । निज मुदीं समुदी गति सचरे ॥ ४ ॥
जवें इंडळी स्थान आखंडळाचें । ह्मणे वृत्त शोधा सुभूमंडळाचें ॥
शुकाची प्रशंशा किजे नारदानें । तुळेना तपाशीं मही फार दानें ॥ ५ ॥
अमरनाथ वदे मुनि नारदा । सकळ भूतभविष्यविशारदा ॥
सकळ विघ्न रचू तपखंडना । करिति दिव्य वधू शुकदंडना ॥ ६ ॥
त्वरित वदत जंभाराति आपूनि रंभा । झडकरि अविलंबा जाय वल्ली कदंबा ॥
भगवति जशि शुंभा सहरी त्या निशुंभा । तदुपरि शुकदंभालागीं जिंती स्वयंभा ॥ ७ ॥
वदोनि आज्ञा सुरनंदनाची । निंदूनि बुद्धी मुनिनंदनाची ॥
रंभोरु रंभा विनवी सुरेंद्रा । अपांगपातें छळितें मुनींद्रा ॥ ८ ॥
ज्ञात्याचें ज्ञान झोडूं यमद्रुम उपडूं धैर्यदुर्गास पाडूं ।
शांतीची खोड काढूं व्रततप विघडूं भक्तिभावास ताडूं ॥
वैराग्या दूर धाडूं जपफळ रगडूं नेमनिष्ठेस मोडूं ।
मोठ्या मोठयास नाडूं लघु शुकमुनिचा काय आम्हास पाडू ॥ ९ ॥
विश्वामित्रास कुत्रा करून फिरविलें वाढु वांध्यास मित्रा ।
भिल्लीमार्गे त्रिनेत्रा दवडुनि तुमच्या छिद्र गात्रोपगात्रा ॥
पुत्रीमोहीत धात्रा पतन बहु गुरूतल्पगा त्या रात्रिमित्रीं ।
मोठे ही कामयत्रा नमिति न गणितो व्यासपुत्रा किमात्रीं ॥ १० ॥

---

१ यमी=आकलन करी. २ शीतातप=थंडी व ऊन्ह ३ उन्मुळी=उपटी. ४ चंड=मोठा ५ आखंडल=इंद्र. ६ विशारद=निपुण. ७ जंभाराति=इंद्र ८ भगवति=देवी ९ रंभोरु=केळीसारख्या आहेत मांड्या जीच्या ( रंभा=केळ, ऊरु=मांडी ) १० अपांग=कटाक्ष ११ द्रुम=झाड १२ दुर्ग=किल्ला १३ पाड=हिशेब १४ रात्रिमित्र=चंद्र १५ किमात्र=य कश्चित

संतास सताप वसत कर्ता । समागमें घे समबुद्धिहर्ता ॥
आली सवेगें शुककानर्नीसी[१६] । यत्नें मुनीचा मनकाम नासी ॥ ११ ॥
आरामीं[१७] रम्य रामीं[१८] प्रविशत निरखी नारिकेलीकदंबा[१९] ।
आंबे जांबूळ बिल्वामलक सुकदळी पुष्पवल्ली कदंबा ॥
गधानदें मिलिंदें[२०] रुणझुण करिती कुंजि गुंजारवानें ।
सारें पारें मयूरें शुक पिकें[२१] निकरें चित्त रंजे रवानें[२२] ॥ १२ ॥
तेथें योगींद्र पद्मासन शुक विरची अंतरीं ध्यानमुद्रा ।
प्राणायामप्रतिष्ठा प्रणवें[२३] करुनियां साधिली योगनिद्रा ॥
त्याच्या उच्चाटनातें करित कुशळता गीतनृत्य प्रकारीं ।
पाहे तो नेत्रपातीं उघडुनि तंव ते देखिली दिव्य नारी ॥ १३ ॥
चपळा चमके चलिता वरि ते । अति चचळता बहु ते वरिते ॥
गजगामिनि ते गमनागमनीं । रव मजुळ मंजु वदे वदनीं ॥ १४ ॥
करी मंथरालाप[२४] ते गायनाचे । सलज्जीत लक्षी क्वचिद्भाय नाचे ॥
रवें रजवी रम्य सामान्य वीणा । मुनीमोहिनी जिम्हकामी[२५] नवीना ॥ १५ ॥
कुचवर्तुळ मन्मथकदुकैसे[२६] । स्मरपूजनकुंभ चि ते न कसे ॥
पवनें सरसावित अचळ तो । दिसतां मुनि होय न चंचळ तो ॥ १६ ॥
उदरत्रिवळी दिसतां उघडी । करि लज्जित होउनि देह घडी ॥
स्मित सत्वर तो न विलोकितसे । फिरता शर कीं वरि शोकितसे ॥१७॥
घनपीनपयोधर हार रुळे । वसनांतुन शोभति ते विरुळे ॥
कटि कांचिकलाप[२७] झणत्कारिती । श्रवणीं सुमनें सुमनें हरिती ॥ १८ ॥
चरणीं रव मजुळ नूपुर[२८] तें । नरमानस मोहुन ने पुरतें ॥
झुलती सुमनान्वित गुच्छ करीं । अशि कोण शुकाविण तुच्छ करी ॥१९॥
अतिसन्निध येउनियां विनटे । वदतां रददीप्तिस दावि नटे ॥
विनवी त्यजुनी निज मान मनीं । परि तो मुनि अल्प कदा न मनी ॥२०॥
रंभा वदे करितसां दृढ निग्रहातें । कां टाकिलें मुनिवरा रमणीगृहातें ॥
हे क्लेश दावित असां शरिरा युवातें । नेणोनिया उपडितां निज आयु वातें ॥२१॥
दामोदरें[२९] सुंदर संपतीसी । सदंबरें[३०] मंडित दासदासी ॥
चंद्रानना सद्गुण नित्य संगीं । हे भोगिती धन्य जगीं सभागी ॥ २२ ॥

---

१६ कानन=अरण्य १७ आराम=बाग, वन १८ रामा=सुंदर स्त्री. १९ नारिकेलीकदंब=माडांच्या झाडांचा समुदाय २० मिलिंदें=भुंगे २१ पिक=कोकिल. २२ रव=ध्वनि. २३ प्रणव=ओंकार २४ मंथरालाप=मृदु भाषण. २५ जिम्हकामा=कपटी. २६ कंदुक=चेंडू २७ कांचि=कमरपट्टा. २८ नूपुर=पैंजण. २९ दामोदरें=घरें. ३० सदंबरें =उत्तम वस्त्रें.

वातांबुपर्णाशी[31]न शैलवासी[32] । दिशांबरें स्वात्मसुखें विलासी ॥
सदैव निश्चिंत चि शांतिवंत । कौपीनवंत[33]: खलु[34] भाग्यवंत ॥ २३ ॥

घमघमित सुगंधें स्नेह चांपेल गंधें । भ्रमति बहु मिलिंदें कस्तुरीच्या सुगंधें ॥
कनकमय अगाधें हर्म्य पाची निबंधें । रजनिदिन विनोदें भोगिजे भाग्य वृंदें ॥२४॥

परतवुनि मनातें आंवरी कामनांतें । नियमुन पवनातें नित्य सेवी वनातें ॥
निरसुनि वसनांतें बद्ध पद्मासनातें । वरि धरुनि करातें पूज्य तो शंकरातें ॥२५॥

चतुर चपळ श्यामा षोडशी पूर्ण कामा । शशिमुखि गजगामा अंतविश्रामधामा ॥
लपटुन भुजदामा सर्व भोगी त्रियामीं[35] । सफळित नरनामा धन्य हे भाग्यसीमा ॥२६॥

नियमुनि विषयांतें कोंडिलें इंद्रियांतें । विवरि सुमन भूतें प्राप्त सोहंसुखांतें ॥
विरमुन दृढ चित्तें भोगिलें उन्मनीतें । झुरति सुर जयांतें भोगिजे भाग्यवंतें ॥२७॥

क्षिरसागर आतलसा अति सिंदुरवर्ण पितांबर ते* ॥
सिरसाफ मुसज्जर मंदिल बदरि छींट जरी दुपटे भरतें ॥
कुतनी कनकाचळ गुर्जरिचे कटिबंध सुशी तिवटे पटणी ॥
मखमाल परी सकलाद बरी वरि आयुरिजे सुजनीं सुजनीं ॥ २८ ॥

गोधडि फाटकि तूटकिसी अथ वा हरिणाजिन[36] वेष्टुन राहे ॥
वल्कल[37] कौपिन कीं बहिरांबर कीं च दिगंबरसा फिरताहे ॥
द्वंद्वसहिष्णु[38] समान जयाप्रति कांचन[39] लोष्ट[40] खडे मणि आहे ॥
हें जगडंबर अंबर तो नर शंबरशत्रु रिपू सम पाहे ॥ २९ ॥

कळा कौतुकें कीर्तनें गीत नाना । विणा टाळ वाद्यें करीती तनाना ॥
विनोदें नटी नृत्यती रंजवीती । असें सौख्य हें भोगिजे भाग्यवंतीं ॥ ३० ॥

कळा सर्व जाणे स्वचित्ता निरोधी । जना रंजवी राम रंजे न क्रोधी ‡ ॥
वेळा लवंगा चिकणी सुपारी । त्या कातगोळ्यातिसुगंध भारी ॥
पर्णें सुवर्णें कनकांग श्यामा । देते विडा हे अति भाग्यसीमा ॥ ३१ ॥

श्रीरामनामामृतपान नाहीं । तें वक्त्र दुर्गंधि अपान[41] पाहीं ॥
मुखीं सदा मंडन नाम ज्याचें । जन्मोनियां सार्थक भाग्य त्याचें ॥ ३२ ॥

वडे मांडे शाखा बहु लवण शाका रुचिकरा ॥
कढी कोशिंबीरी घृतपाचित घाऱ्या परिकरा ॥
महा क्षिप्रा फेण्या पुरणभरि भाता वर नवा ॥

---

३१ वातांबुपर्णाशन=वायु, पाणी, पानें खाणारे ३२ शैलवासी=डोंगराचे गुहेंत रहाणारे. ३३ कौपीनवंत=लंगोटी घालणारे ३४ खलु=खरोखर, खचित. ३५ त्रियामा=रात्र. ३६ अजिन=कातडें ३७ वल्कल=झाडाची साल ३८ द्वंद्वसहिष्णु=सुख दुःखादि सोसणारा. ३९ कांचन=सोनें. ४० लोष्ट=ढिपळ. ४१ अपान=गुदद्वार. * या चरणांत तीन अक्षरें कमी आहेत. ‡ या श्लोकाचें उत्तरार्ध नाहीं.

अशीं हीं दिव्यान्नें शिखरणी तुम्ही कां न करवा ॥ ३४ ॥
गळ्याखालीं अन्ने उतरतचि विष्ठा चि घडती ॥
रसास्वादासक्ती धरुनि नर नर्कांत पडती ॥
परी कंदें मूळें फळजळसमीरांशन भले ॥
मनाच्या संतोषें करुनि भगवंतीं विनटले ॥ ३६ ॥
दगडावरि वा गवतावरता गिरिकंदरकुंजगुहांतरवासी ॥
वरुषाऋतुमाजि पडे उघडा दृढ आतप शीत हि तो उपवासी ॥
न गणी दिनरात्रि न निद्रित ही मग कोण पुसे इतरां विषयांसी ॥
निज सेजमुखीं रतला नर धन्य किती पशु अन्य वृथा वय नासी ॥३७॥
रत्नखचीत मुद्या समुद्या कर शोभविनी कटकाभरणांनें ॥
अंगद पाचजडीत मनोहर मोहनमाळ रुळे मन मानें ॥
कांचि कटी कटिसूत्र विराजित कुंडल डोल झळाळित जाणे ॥
हे नर भूषणदायक अन्य दरिद्र फिरे जरि तो किलवाणे ॥ ३८ ॥
दान न पुण्य जया न घडे नर पामर लुब्धक तें किलवाणे ॥
रामकथा हि न नाम जपे मुख दंडितसे यम तें किल वाणें ॥
ज्ञान न सद्गुरु सेवुन साधित संगति संत न तें किल वाणे ॥
जन्म दरिद्र शताशत भोगित धिग्धिकसंपाति ते किलवाणें ॥ ३९ ॥
यागतपादि करून तथापि इहामुक लौकिक भोग यजावे ॥
ते अति दुर्लभ आम्हि च कीं तरि प्राप्त असोन कशास त्यजावें ॥
भूसुर कीं सुर यज्ञ न मानुन कां अतिशूद्र अंत्यज पुजावे ॥
तेंवि अशा वनितादिक भोग त्यजून तपादिक राग भजावे ॥ ४० ॥
यागतपादिक दान जपावृति होम कथा द्विजपूजन पाहें* ॥
जे करिती धनकाम इहामुक तो नर पामर संगृहिताहे ॥
धन्य जगीं नर मान्य विधी प्रति ईश्वर तत्परता करिताहे ॥

॥ ४१ ॥

सौगंधचंद्रवदना वसनादि गानें । तांबूल भोजन बरें स्तविजे जगानें ॥
शय्या विभूषण पहाष्ट हि भोग यातें । रंभा वदे परि मुनी न मनी तयातें ॥ ४२॥
दुर करी उदरींहुन अशुकां ॥ त्रिवलिसुंदर दावितसे शुका ॥
जनवधूपरि दुर्मळ हें नसे । अति सुगंधभरें चि सुमानसे ॥ ४३ ॥
शुक वदत जनित्रे रम्यराजीवनेत्रे । सुललितशुभगात्रे देवताप्रीतिपात्रे ॥
प्रथम जरि सुवक्त्रे जाणतों हें विचित्रे । तरि न इतर अंत्रे जन्मतों हो पवित्रे ॥४४॥

---

४२ समीराशन=वायुभक्षक. ४३ अंगद=वांकी. ४४ भूसुर=ब्राह्मण ४५ अशुक=वस्त्र ४६ राजीव=कमल. * या श्लोकाचें उत्तरार्ध नाहीं.

रंभा दंभास टाकी ह्मणत नवल हें तीव्र वैराग्य यातें ।
मदागधानिळानें हिमकर मदनें सोडिलें की जयातें ॥
झाली लज्जीत भारी त्वरित उलटली जाय इंद्रासनातें ।
सांगे साकल्य वार्ता अजित मुनि महा चित्र वाटे मनातें ॥ ४५ ॥

शुकाच्या चरित्रास जो नित्य वाची । तयाला नव्हे क्लिष्ट बाधा भवाची ॥
विरक्ती रमे साम्यता ये भवाची । प्रकाशे मनीं आणि चिद्वैभवाची ॥ ४६ ॥

अहो आल्या जन्मा विहित निज कर्मास करुनी ।
समर्पावें रामा सकळगुणधामास नुरुनी ॥
मनीं नित्य प्रेमा धरून तनु कामा विसरणें ।
अशी हे सद्युक्ती अवगमुनि[४७] मुक्तीस वरणें ॥ ४७ ॥

वैजापुरस्थकविकिंकर ताम्रसंगें । व्यापारयोग घडला ह्मणुनि प्रसंगें ॥
आला वराडवरघाट महाकरासी । तेथें कथार्पण किजे महिजावरासी ॥ ४८ ॥

खगपतिरिपु[४८] चित्तीं सर्वदा ध्यात जावा ।
खगहरधरवैरी[४९] हेत त्याचा त्यजावा ॥
खगपतिपतिकांतासक्ति[५०] सांडी नरा हे ।
खगपतिसुत[५१] तेव्हां दास होऊन राहे ॥ ४९ ॥

रसगुणऋतुभूमी ( १६३६ ) हीं शकें वाहनाचीं ।
जयकर दशमी जी पूज्य आश्वीन याची ॥
नभशर ( ५० ) रविवशोंसंस पादारविंदीं ।
अलमिति वर पद्यें वाचिजे ब्रह्मविंदीं ॥ ५० ॥

शुकरंभासंवाद समाप्त.

---

कविकिंकरकृत

## गरुडगर्वमोचन.

सकळसुरगणेंद्रा सर्वविद्यासमुद्रा । सुगुणसदनभद्रा पापसंहाररुद्रा ॥
नवलनयनमुद्रा योगनिद्रा वितंद्रा । निगमगगनचंद्रा ॐनमो रामचंद्रा ॥ १ ॥

वंदितो तनय त्या मरुताचा । बाध ज्या करि न कामरुताचा ॥
साधलें उदधिलंघन[१] ज्याला । तो सदा करु निलंघन ज्याला ॥ २ ॥

कां चचाट करणें नियमाचे । अंतरीं भय धरूनि यमाचें ॥

---

४७ अवगमुनि=जाणून. ४८ खगपतिरिपु=रावणशत्रु राम ४९ खगहरधरवैरी=शिवशत्रु मदन. ५० खगपतिपतिकांतासक्ति=द्रव्यासक्ति. ५१ खगपतिसुत=सूर्यपुत्र यम. १ उदधिलंघन=समुद्र वलांडणें

एक तत्पर करूनि मनाला । होइ सद्गुरुचिया नमनाला ॥ ३ ॥
नमो सद्गुरु एकनाथा महंता । सकृद्दर्शनें जो महाकाळहंता ॥
वनश्री जशी शोभवीजे वसंतें । तसें काव्य शोभे महारावसंतें ॥ ४ ॥
धिःकरूनि वदतों रसनेसी । चावटीस्तव कथारस नेसी ॥
लाभ घे नरहरीभजनाचा । व्यर्थ हा धरिसि लोभ जनाचा ॥ ५ ॥
बरा यादवेंद्रा मना आवराया । जरा यातना शोभती ना जरा या ॥
भराया किती फीरता दुर्भराया । मराया भितां कां भजा रामराया ॥ ६ ॥
बांधला निबिड बंध रसाचा । श्रय हा यमकबद्ध चि साचा ॥
वाचिता हरिस मोहरवी हा । वारितो चि तम मोह रवी हा ॥ ७ ॥
ज्या कथेसि हरिचा रस नाहीं । व्यर्थ ती श्रमविती रसना ही ॥
हा असे सुरस माधव धावा । या रसें भजति राघव धावा ॥ ८ ॥
कोणेके समयीं महेशगिरिजा हेमाचळीं राजती ।
वाणीअर्थ तया दिनेशकिरणें दोघें तशीं साजती ॥
नंदी भैरव बाण चंड गण हे स्वस्थानकीं शोभले ।
भावी अर्थ विचित्र तों अवचटें आश्चर्य झालें भलें ॥ ९ ॥
तार्क्ष्यानि बहु मानसीं निज मदें श्लाघीतसे भाविलें ।
मी पृष्ठीं जगदीश्वरासि धरितों गर्वीतसें दाविलें ॥
माझें धैर्य अचाट वीर्य म्हणता हें अंतरस्था कळे ।
त्याचा गर्व हरे परस्पर असा योजीत कोणे कळे ॥ १० ॥
गरुड उदरपूर्तीलागिं धुंडी वनातें । फिरत फिरत त्यानें देखिले वारणातें ॥
झडपुनि अति वेगें घातला थोर घाला । कलिवर शरसंख्या घेउनीयां उडाला ॥ ११ ॥
सुपक्षी चतुर्विंशती योजनाचा । पडे फार अंधार झाला जनाचा ॥
पुसे पार्वती चित्र चित्तीं हरातें । वदा काय जी काय या जोहरातें ॥ १२ ॥
तमाचा गमे चांदवा फीरवीला । नभीं जातसे काय लंघी रवीला ॥
नभामाजि विस्तीर्णसें फाकलेंसे । न दीसे रवीतेज तें झांकलेंसे ॥ १३ ॥
प्रियाशब्द आकर्णिता भाळनेत्रें । बरें लक्षिलें पूर्ण आभाळ नेत्रें ॥
अपर्णे पहा थोर आश्चर्य वाटे । सुपर्णें करीं नेइलें व्योमें वाटे ॥ १४ ॥
हा सहोदर तुझें अरुणाचा । फार गे तवक या तरुणाचा ॥
शीघ्रता न वदवे गमनाची । मंद ते गति सवेग मनाची ॥ १५ ॥
होय सदृढ अगाध बयाचा । नाथ जाण सति माधव याचा ॥

---

२ रसना=जीभ. ३ हेमाचळ=मेरुपर्वत. ४ तार्क्ष्य=गरुड ५ वारण=हत्ती ६ भाळनेत्र=शंकर. ७ अपर्णा=पार्वती ८ सुपर्ण=गरुड ९ व्योम=आकाश. १० तवक=गर्व.

साम्यता न करिती सुरयानें । वंदिजे सकळ *भूसुर यानें ॥ १६ ॥
या नसे उशिर एक पळाचा । काय वेग वदणें चपळाचा ॥
मानिती खचर भूचर याला । खेचरें न पवती च रयाला[11] ॥ १७ ॥
हें महात्म्य परिसोनि सतीनें । मानिलें परम साहस तीनें ॥
धन्य हें वहन रम्य हरीचें । स्थान सत्सुखसुधालहरीचें[12] ॥ १८ ॥
बैसतां पुरत कोड[13] मनाचें । कोण दुःख मग त्या गमनाचें ॥
साह्य होय समरांत[14] जयाला । काय विस्मय तया विजयाला ॥ १९ ॥
शांत रूप धरिलें वृषराजें[15] । पूर्ण निर्बळ गमे अपरा जें ॥
अंतरीं लपवूनी करणीसी । कान पाडुनि बसे धरणीसी ॥ २० ॥
तो वदे पुनरपी जगदंबा । कोण या स्तविल शक्तिकदंबा[16] ॥
या नरें तरि असें चि असावें । जें सुखें भलतसें चि बसावें ॥ २१ ॥
आमुचें निबर ढोर जळालें । खात पीत असतां चि गळालें ॥
भक्षितो सण कसा कडबा हो । दीसतो तदपि भुंकड बा हो ॥ २२ ॥
चारितो सरस बाटुक यातें । ढेंप लावित असे टुक यातें ॥
धारणा कितीं धरूं गवताची । तेल पीत रवि ऊगवतांची ॥ २३ ॥
ढोसितो परळ नित्य पयाचा । तो रतीब न ढळे नुप याचा ॥
भक्षितां अळस हीं न करी तो । मागती महि सदां उकरीतो ॥ २४ ॥
क्षार अम्ल रुचिचें भुस खातो । मूठ[17] घालित तयीं फुसखातो ॥
ठेवितां वरि पळेक वळी[18] ते । घाबरोनि धरणी कवळी ते ॥ २५ ॥
वेघतां कठिणशा वरडातें । तोंड उंच करि हंबरडातें ॥
चाळतां नयन ने मिचकीतो । उष्ण लागत रदां[19] विचकी तो ॥ २६ ॥
लावितां सरस या खरपा हा । येत धावत चि आखुरपा हा ॥
चालतां बहुत शेण करीतो । शेपडें सकळ आंग भरीतो ॥ २७ ॥
बैसतां चरण लांब करावे । भागले तरि कसे पसरावे ॥
जें प्रसंग पळणीं पडतो हो । चालतां चि मग तो अडतो हो ॥ २८ ॥
शेंपटा घडिघडी मुरडावें । दा म्हणूनि बहुधा वरडावें ॥
दांत लावुनि बळें करडावें । तो उभा चि मग काय रडावें ॥ २९ ॥
तांतडी करुनि जैं बडवावें । हाकि त्याप्रति फिरोनि डसावें ॥
आपुल शरिर या उचलना । दांतहीन कडबा कुच लना ॥ ३० ॥

---

११ रय=वेग. १२ सुधालहरी=अमृताची लाट. १३ कोड=हौस. १४ समर=युद्ध. १५ वृषराज=नंदी. १६ कदंब=समूह. १७ मूठ=बैलावर घालणेचें खोगीर. १८ वळी=पुठ्ठाच्या खालीं घालतात तें १९ रद=दात * भूसुर=ब्राह्मण.

लागला परम हा चुटका हो । नाशिला सकळ व्यर्थ टकीं[20] हो ॥
काय यासि करणें घुटका तो । वीकिल्या मणि न ये फुटका तो ॥३१॥
अरगडी रगडीत असे सदा । घनमणी न मनींहुनि तो कदां ॥
उगळितो गिळितो कवळा प्रती । विचरतो चरतो अति दुर्गती ॥३२॥
मौनरूप बसले त्रिपुरारी । नंदिकेश्वर मनांत थरारी ॥
पार्वतीवचन तीक्षण भाला । खोंचला बहु मनीं वृषभाला ॥ ३३ ॥
फार हे खगपती[21]बळ वाणी[22] । बोलिली किति मला छळवाणी ॥
जात जैं नभगें[23] मी निज लाहें । दाखऊ स्वरूप तैं इजला हें ॥ ३४ ॥
गर्गरां फिरवि वर्तुळ डोळे । बैसला शरिर कंपित डोले ॥
ठाणमाण करि लोमें[24] उभारी । थोकला धरुनि थोर उभारी ॥ ३५ ॥
कान उंच करि वासुनि नाका । लक्षिलें धरणिपासुनि नाकीं[25] ॥
जाइजे अंब नभीं खचरानें[26] । ओढिला दृढ अधोखचरानें ॥ ३६ ॥
सु.टला प्रळय झाडित वारा । पौंखरू[27] करित काय निवारा ॥
भूतळीं व्यर्वेति[28] सत्वर तारा । पावला खंग[29] तसाचि उतारा ॥ ३७ ॥
देखतां वृषभराजदरें[30]ते । सांवरी गिरिसुता पदरातें ॥
त्राहि[31] मां वदत शंकरजीतें । कोण ये घडिस या वरजातें[32] ॥ ३८ ॥
मंद मंद वचनें अवधूतें । स्थीर होय ह्मणिजेत वधूतें[33] ॥
हा विलंब न करी घटिकेचा । काय यत्न गरूडा सुटकेचा ॥ ३९ ॥
धैर्य वीर्य समुदें विरलेसे । अंतरी बहुत घाबरलेंसे ॥
गर्व दंभ मद जैं झुरला हो । तेधवां हरि मनीं स्फुरला हो ॥ ४० ॥
ये त्वरें सदय सत्वर रामा । राघवा मुनिमनीं अभिरामा ॥
पावतों फुकट या मरणातें । दाखवीं स्वकरुणे चरणातें ॥ ४१ ॥
दीनबंधु अइसें म्हणवीसी । तूं चि हे सकळ ही जन वीसी ॥
त्यांत काय मजला न गणीसी । स्वापराध म्हण कां वगणीसी ॥ ४२ ॥
नाम निर्मळ तुझें गुण गावे । त्या बळें भवजळांत जगावें ॥
तारिली जप करीत शुकाचा । कां तु लाविसि या शिशु काचा ॥ ४३ ॥
वेद ने असुर जैं मकरानें । आणिले वधुनि त्वां मकरानें ॥
मत्परिग्रहें[34]विनाश कराया । बोधवीं मज मदें दृढ राया ॥ ४४ ॥
मेघपृष्ठिवरती धरणीतें । दाविसी सुरजना करणी ते ॥

---

२० टका=पैका २१ खगपति=गरुड. २२ वाणी=वर्णी २३ नभग=पक्षी (गरुड). २४ लोम=केंस. २५ नाक=स्वर्ग २६ खचर=पक्षी (गरुड). २७ पाखरू=गरुड २८ व्यवती=पडती २९ खग=पक्षी. ३० दर=भीति. ३१ त्राहि=रक्षण कर ३२ वरजणें=हलणें. ३३ वधू=स्त्री. ३४ परिग्रह=शरीर.

मन्मती स्वरूप चंचल पाहें । त्यावरी करुनि निश्चळ पाहें ॥ ४५ ॥
उद्धरीस अवनी[35] वदनाग्रीं । ठेविलीस अचकी रदनाग्रीं[36] ॥
वृत्तिरूप मम भूमि अपायीं । पीडितें तव करी दृढ पायीं ॥ ४६ ॥
घेतलें नृहरिरूप पहा तें । मारिला कनककश्यप हातें ॥
मन्मदासुर[37] विभांडुनि याला । त्राहि भक्त निजभाव दयाळा ॥ ४७ ॥
वामनाकृति धरूनि बळीचा । मोजिली तनु बळी सबळाची ॥
मच्छरीर मति हे मुरवावी । धीमधें स्वरूपता भरवावी ॥ ४८ ॥
फर्श घेउनि करीं निकराचा । छेदिला नर सहस्रकरांचा[38] ॥
मन्मनोज बहु वृत्ति धरासी । सहरी सदय सद्गुणरासी ॥ ४९ ॥
दिव्य रूप करिशी च शिळेला । उद्धरीं मम मनी कुशिळेला ॥
शोधिली खचर मर्दुनि लंका । छेदिं तेवि मन मोहकलंका ॥ ५० ॥
मोडिलें शिशुपणीं शकटातें[39] । जो धरूनि मनिं ये कपटातें ॥
रक्षिलें व्रज धरूनि नगातें[40] । पाहि[41] मा चरित हें जन गातें ॥ ५१ ॥
पावसी जनमना व्रजनारी[42] । चिंतिती तुज मनीं व्रजनारी ॥
स्थापिलें विपरिता क्षपणीका[43] । मन्मतीसि करि साक्षप नीका ॥ ५२ ॥
मार्दशी निज करें यवनाला । मद्रिशीं अशुनि कां चव नाला ॥
काय वेळ तुमच्या शयनाची । झोंप कां न पुरली नयनाची ॥ ५३ ॥
सांडिली कणव[44] या भवनाची । लोटती पळ घडी अवनाची[45] ॥
क्लेश फार मजला वदवेना । येति या परम दुःखद वेणा[46] ॥ ५४ ॥
या पुढें अन मला सुचवेना । मागती महिस आवळवेना ॥
हस्तपाय ठकले पळवेना । काय हा तुज हि आकळवेना ॥ ५५ ॥
लेकरूं जरि अशीच अघोरी । माय काय तरि घालिल घोरीं ॥
भक्ति हे मम करीं करवावी । चित्तवृत्ति चरणीं धरवावी ॥ ५६ ॥
स्वरुपें स्वगुण जें वदवीसी । देसि तें सुगम तत्पदवीसी ॥
अंतरीं प्रकटुनी शिकवीसी । येत धी सुरस काव्य कवीसी ॥ ५७ ॥
श्रीपती उशिर तो न कराया । कोण तूजविण आणिक राया ॥
सोडि सोडि परती चि रमेला । धांव धांव तव किंकर[47] मेला ॥ ५८ ॥
हे विपत्ति घडतां खगपाळा । जाणवे सकळ तें जगपाळा ॥

---

३५ अवनी=पृथ्वी ३६ रदन=दांत. ३७ मन्मदासुर=माझा गर्व हाच राक्षस. ३८ सहस्रकर=कार्तवीर्य सहस्रार्जुन. ३९ शकट=रथ ४० नग=पर्वत. ४१ पाहि=रक्षण कर. ४२ व्रजनारी=गोकुळांतल्या स्त्रिया ४३ क्षपणीक=बौद्ध अवतार ४४ कणव=दया. ४५ अवन=रक्षण. ४६ वेणा=तिडका. ४७ किंकर=सेवक.

वोरसें करूनियां स्तविलासे । पाविजे म्हणुनि भक्त विलासें ॥ ५९ ॥
शेपुटीं वृष पदें दडपीला । नाग जेंवि हरिनें झडपीला ॥
मागुती वृषभ जों अवलोकी । तों पडे गरूड मानवलोकीं ॥ ६० ॥
श्वास दुर्धर परी तुटला हो । या परी गरुड तो सुटला हो ॥
रामरूप घन तो वळलासे । कामवृक्ष सफळीं फळलासे ॥ ६१ ॥
तो अनर्थ समुदा टळलासे । दंभ गर्व मद मावळलासे ॥
नंदिकेश्वर नमीत रमेशा । भेटले त्वरित तैं च उमेशा ॥ ६२ ॥
मी च थोर मद हा गरूडाला । मानसीं सतत सर्व उडाला ॥
द्वेष मत्सर समूळ बुडाला । लीनता विनित तींत दडाला ॥ ६३ ॥
नेणवे नवल काय विधीनें । तें असेल लिहिलें अवधीनें ॥
या निमित्त अति गर्व न कीजे । आर्जवें च अवलंबन कीजे ॥ ६४ ॥
चित्तभंग दुसऱ्या न करावें । दुष्ट वाक्य तिसऱ्या न वदावें ॥
प्रेम एक हरिचें चि धरावें । लीलया भवजळांत तरावें ॥ ६५ ॥
राहो असा हरिकथेस्तव हा उठावा । झाला प्रसंग तरि तो सकळांसि ठावा ॥
तात्पर्य काव्य यमकादिक सादरानें । पच्छाडिलें गरुड शंकरकिंकरानें ॥६६॥
भवबंधनमोचन गंगतटीं । अति रम्य मनोहर पंचवटी ॥
जन सज्जन मुक्त महा नगरी । वसती कवि किंकर नित्य करी ॥६७॥
खंड पूर्णरसभूप ( १६६० ) कराचा । मास मुख्य शमता प्रभवाचा ॥
श्लोक वारणऋतू (६८) प्रथमावें । ग्रंथ तैं हरिहरार्पण भावें ॥ ६८ ॥

॥ इति गरूडगर्वमोचन समाप्त ॥

---

## नरहरिकृत दानव्रत.

श्रीलक्ष्मीप्रियभक्तलक्षित कृपा कल्पद्रुमीं जो हरी ।
जैसा माणिक पुष्पराज मणि ही काचाश्मि कीं जोहरी ॥
प्रल्हादादिक पांडवादि गज ही दुःखार्णवीं जो हरी ।
तैसा स्थावरजंगमादिक जनीं कूटस्थ तू जो हरी ॥ १ ॥
रजतमादिकसत्वगुणीं जनीं । सकळ पाळिसि तूं परि जीवनीं ॥
करित कर्म जसें क्रियमाण ही । फळ तथा सुखदुःख प्रमाण ही ॥ २ ॥
सर्व टाकुनि प्रपंच असारा । मानिती हरि हि ब्रह्म चि सारा ॥
ते चि धन्य नर मानव लोकीं । त्वद्यामृत जना अवलोकीं ॥ ३ ॥

---

४८ नाग=हत्ती. ४९ हरि=सिंह. ५० लीलया=सहज. ५१ काचाश्म=कांच व दगड.

ते चि धन्य विजनीं जगिं राहतां । मैथिली पृथु भृगूजन पाहतां ॥
अंबु अंबुरुहपत्र अलिप्तता । विश्व विश्वचरणीं अलिप्तता ॥ ४ ॥
एवं असा तूं जगिं विश्वरूपा । तूझे कृपे ये जन विश्वें रूपा ॥
ऐशा तुतें अर्पिति नारदासी । त्या धन्य तूझ्या पति नारि दासी ॥ ५ ॥
परम दुर्लभ भागवतांत या । शुकमुखामृत भागवता तया ॥
निगम कल्पतरू फळ भोजनीं । सतत स्वादिति साफळ भोजनीं ॥ ६ ॥
मुक्तिरूप तरु हा परिसाचा । श्रीशुकामृत मुखें परिसाचा ॥
लाभ जो विषयबिंदु विराजे । गोष्पदीं सम न मानिति राजे ॥ ७ ॥
मोक्षरूप तरु ज्ञान रसाचा । सेवनीं सतत जो नर साचा ॥
जो स्वतृप्त हरिनामसुधेला । तो चि धन्य जगिं या वसुधेला ॥ ८ ॥
शुकाच्या मुखापासुनी द्राव झाला । नृपें कर्णरधांत घेतां अजाला ॥
न काढी तयापासुनी कर्ण धारें । भवीं मग्न त्यानें जसा कर्णधारें ॥ ९ ॥
करी प्रार्थना भूप सप्रेम वाणी । मुनी सांग ज्याच्या गुणाची न वाणी ॥
अशा कृष्णनाथासि ते दे मुनीतें । रमा सोडवी पूसतो हे विनीतें ॥१०॥
हरिगुणामृत हें फळ रोकडें । तव मुखें भव लघुनि ने कडे ॥
हरिपदीं स्वप्रपंच हि होमुनी । सदय त्यासि कथा कथि हो मुनी ॥११॥
वैकुंठाहुनि आगळी हरिपुरी द्वारावती देखिली ।
शोभा चित्र विचित्र गोपुर गृहें चित्रांगणीं रेखिलीं ॥
वीणादंड सुरम्य घेउनि करीं तो ब्रह्मपुत्रें त्वरें ।
पाहे तों अलकापुरीसम दिसे रत्नप्रभे चत्वरें ॥ १२ ॥
पाहोनि कृष्णासि सभेंत भारी । बाहु त्वरें ऊर्ध्व पथें उभारी ॥
श्रीमस्तकीं वंदुनि पादपद्मा । जें ध्यातसे स्वांत निवात पद्मा ॥ १३ ॥
स्तव करी द्विज नम्र सुधामती । निकट लक्षि प्रिया वसुधाम ती ॥
उदरिं पंकजसंभव आत्मभू । स्वमनिं ध्यात अखंड निजात्मभू ॥ १४ ॥
धरुनि दर्पण चामर वीजनी । मिळोनि राहुनि प्रौढ नवी जनीं ॥
विजनिं तार्क्ष्य समीप जयाकुळीं । कुलिशपाणिचि ही मति ज्याकुळीं ॥१५॥
धरुनि चरण हस्तीं सेवनी आदिमाया । निजप्रकृतिनिधानें निर्मिलीसे रमा या ॥
सुनुपुर कटि काची ककणें मुक्तहार । हरि करिं धरि जे जे सत्कृपेचा विहार ॥१६॥

---

५२ अंबुरुह=कमल. ५३ विश्व=सर्व. ५४ भागवत=भक्त. ५५ गोष्पद=गाईचे पावलाचा ठसा ५६ कर्णधार=सुकाण्या ५७ ब्रह्मपुत्र=नारद. ५८ अलकापुरी=कुबेरनगरी. ५९ पद्मा=लक्ष्मी. ६० पंकजसंभव=ब्रह्मा. ६१ आत्मभू=पुत्र. ६२ दर्पण=आरसा. ६३ चामर=चवरी ६४ वीजनी=पंखा. ६५ विजनीं=एकांतीं. ६६ तार्क्ष्य=गरुड. ६७ कुलिशपाणि=इंद्र.

निपट सिंहकटी सुपटीं घटीं । अगण तेज तुळे न गणीं घटीं ॥
गजगती सुदती मृदु हांसती । विडि करूनि समर्पि महा सती ॥ १७ ॥
नारदें करूनिया नमनातें । धन्य मीं म्हणतसे स्वमनातें ॥
उत्सवें विभव लक्षित नाना । गातसे हरिचरित्र तनाना ॥ १८ ॥
गृहें गोपुरें चत्वरें पुण्यभूमी । विलोकी हरीदर्शनीं पुण्यभू मी ॥
तडित्तेज एणाङ्कवक्त्रा सुमध्या । प्रगल्भा स्त्रिया बाळ प्रौढादि मध्या ॥१९॥
त्वरा द्वारका पाहणें हे मनेच्छा । मुनीची हरीपादपद्मीं च इच्छा ॥
विलोकी पुढें सत्यभामागृहातें । प्रवेशे मुनी श्रीविणादंड हातें ॥ २० ॥
मुनीचीं पादाब्जें शिरिं धरूनि लोटांगणरिती ।
करूनीया पूजा हरिचि चरितें होय पुसती ॥
म्हणे आम्ही धन्या तव चरणलाभें मुनिवरा ।
तुझे कृपें प्राप्ती मजप्रति हरी नित्य नवरा ॥ २१ ॥
मजविणें पुरूषोत्तम या गृहीं । न कधिं भक्षि विलासिक पान हीं ॥
गुरूजनादिक गाति प्रसिद्ध हें । श्रवण मात्र चि ईश्वर सिद्ध हें ॥ २२ ॥
अग अनंगसमान भुजंगपलंगिं अभंग भुजंगमनाचा ।
पत्रि पतत्रि धरूनि सुचित्र चरित्रि विचित्रि विहंगम नाचा ॥
ईक्षण निरीक्षणिं तीक्ष्ण कटाक्ष सुलक्षणिं व्याप जया मदनाचा ।
यादव माधव माधव वेध हि त्यास चि भक्तिचिया मद नाचा ॥ २३ ॥
म्हणे सत्यभामा मुनी नारदासी । हरीपादपद्में भजे नित्य त्यासी ॥
पती जन्मजन्मीं हरी हा असावा । वियोगो निमिष्यार्ध पायीं नसावा ॥२४॥
मद्रूप केवळ उमासम तें न माने । माने हरीस प्रिय मीं च रमेसमानें ॥
माने मनीं प्रिय जनार्दन हा चि भर्ता । भर्ता जनीं करि स्थिती क्षण हीं न भर्ता ॥२५॥
कोण्या उपायें मज जन्मजन्मीं । लाधेल हा विष्णु स्वयें अजन्मीं ॥
कैशा प्रकारें मुनि साग मातें । व्रतोत्तमें मात्रिक साग मातें ॥ २६ ॥
वदे ऐसें सत्या किमपि हि असत्यास न वदे ।
वदे तीतें विप्रो वणिक करितो जेंवि सवदे ॥
वसे दानीं वृद्धी विजवट समृद्धी फळिं वसे ।
वसे ऐसें केल्या शतजनमिं विष्णू च निवसे ॥ २७ ॥

६८ एणाङ्कवक्त्रा=चंद्रमुखी. ६९ बाला व प्रौढा याचें लक्षण —
याधत्षोडशसंख्यमब्दमुदिता बाला ततस्त्रिंशत
यावत् स्यात् तरुणीति बाणविशिखप्रख्य तु यावद् भवेत् ।
सा प्रौढेत्यभिधीयते कविवरैर्वृद्धा तदूर्ध्वं स्मृता
निंद्या कामकलाकलापविधिषु त्याज्या सदा कामिभिः ॥ १ ॥

तुवां पूर्वीं सत्ये बहुयुग असत्यासि शिवतां ।
सदा भक्तीमाजी त्यजुनि विबुधादीक शिव ता ॥
मुरध्वसी वंसी स्तविसि गति हसी श्रिहरि हा ।
अनताजन्माचे तव श्रम तुझे सर्व हरि हा ॥ २८ ॥

ऐके पुरंदर[७०] शची[७१] विबुधी[७२] सुधर्मा[७३] । बैसूनि गीष्पति[७४] वदे स्वमुखे सुधर्मा[७५] ॥
कीं जे वधू[७६] स्वपतिदान करी स्वभावें। तीतें अखंडपति तो चि वरी स्वभावें ॥२९॥

या नंतरें त्वां पतिदान कीजे । पदार्थि संदेह कदा न कीजे ॥
अन्यत्र टाकूनि अनत आधी । विप्रासि द दान अनंत आधीं ॥ ३० ॥

ऐकूनी मुनिउत्तरा नृपसुता आनदली मानसीं ।
जैशी हंसिणि मुक्तप्राप्ति घडता सतोषली मानसीं ॥
आता देइन दान मी श्रिहरिते हर्षे अशी सुंदरी ।
बोले तों गृहिं कृष्ण ये झटकरी आनदली कदरीं ॥ ३१ ॥

घेऊनि अकासनिं प्रीतिभावे । कर स्तनीं ठेवुनिया स्वभावें ॥
बिंबोपमा[७७] ओष्ठ हि लाल साजे । कुकू करीं चुबनि लालसा[७८] जे ॥ ३२ ॥

कुकममडित गोपति भाळीं । अबुज आननिं लिपि कपाळीं ॥
कांते हृदिं ते नख द्विजपंक्ती । गल्लस्फुरंति फुट द्विजपक्ती ॥ ३३ ॥

प्रार्थी राती कंसअराती[७९] । मी तों जाती पद्मिणि[८०] जाती ॥
फेडीं आधीं संशयआधी[८१] । तूतें साधी भाव असाधी ॥ ३४ ॥

तूझा रामा पुष्पअरामा । मध्ये भामा मी च अभामा ॥
रूपे श्यामा मीं तों श्यामा । मध्या तें नामा नित्य अनामा ॥ ३५ ॥

मीं तों साची भाव असा ची । गति हसाची सोहं साची ॥
ब्रह्मरसाची प्रीती साची । अन्य रसाची नोहे साची ॥ ३६ ॥

भामा म्हणे मज मनीं करुणैकराशी । दानीं अशा तुज द्विजा गुणवारिराशी ॥
द्यावा असा दृढ मनीं निरधार साचा । भोगीं तुतें युगयुगीं परमा रसाचा ॥३७॥

---

७० पुरंदर=इंद्र ७१ शची=इंद्राणी. ७२ बिबुधी=देवांची. ७३ सुधर्मा=सभा ७४ गीष्पति=बृहस्पति. ७५ सुधर्म=उत्तम धर्म ७६ वधू=स्त्री ७७ बिंब=तोंडलें. ७८ लालसा=उत्सुक ७९ अराती=शत्रु ८० पद्मिनीचें लक्षण.—

कमलमुकुलमृद्वी फुल्लराजीवगंधि. । सुरतपयसि यस्याः सौरभ दिव्यमगे ॥
चकितमृगदृशाभे प्रांतरक्ते च नेत्रे । स्तनगयुमनर्घ्यश्रीफलश्रीविडंबि ॥ १ ॥
तिलकुसुमसमाना बिभ्रती नासिका च । द्विजगुरुप्रियपूजा श्रद्धाना सदैव ॥
कुवलयदलकांति कापि चापेयगौरी । विकचकमलकोशाकारकामातपत्रा ॥ २ ॥
व्रजति मृदुललीला राजहंसीव तन्वी । त्रिवलिवलितमध्या हंसवाणी सुवेशा ॥
मृदु शुचि लघु भुक्ते मानिनी गाढलज्जा । धवलकुसुमवासोवल्लभा पद्मिनी स्यात् ॥३॥

८१ आधि=मनोव्यथा.

अर्से सत्य नेमा वदे सारसाक्षी । परब्रह्म जो सारसंसारसाक्षी ॥
वदे तीप्रती हृत्कलीगर्वहृता । करी दूरि तीच्या मनींची अहंता ॥ ३८ ॥
अवश्य आर्धी पतिदान कीजे । यदर्थ संदेह कदां न कीजे ॥
दे सत्य सत्यें द्विजवर्यदानीं । मी सिद्ध झालों त्वतपा निदानीं ॥ ३९ ॥
लाहे मती वसुमतीवरि तूजला हे । लाहे पती सुपति शेष सुधा जला हे ॥
लाहे प्रभाभवनिधी निधि प्रेम सत्ये । सत्येवरी नवरि तूं न कदां असत्ये ॥ ४० ॥
उदरिं विश्व अनंत अनत मी । वसवि सेज अखंड अनंत मी ॥
मम तनू म्हण हे जग दीसते । स्तविति जे हृदयीं जगदीश ते ॥ ४१ ॥
मन्वादि सिद्ध कपिलादि सुरेश ब्रह्मा । ध्याती जसें हृदय अस्मि सुरेशब्रह्मा ॥
मातें त्यजी लघु भजे अपसव्य साची । जे भक्ति अधतम जाणत सव्यसाची ॥ ४२ ॥
भजति अव्यभिचार मला गती । जरि सुरूप कुरूप हि असती ॥
सगुण त्या हृदयांत हि मी वसें । सतत जे करिती प्रिय मीवसें ॥ ४३ ॥
कथि सुबोध हि भागवतांत या । परम वैष्णव भागवतां तयां ॥
करु सुशांत हि सत्यवतीसुता । द्विज धिजे नदिसत्यवतीसुता ॥ ४४ ॥
सर्वज्ञ हा केवळ ब्रह्मपुत्र । वाटे जया हा भव ब्रह्मपुत्र ॥
यातें त्वरें पूजनि दानवारी । दे घे प्रिये हस्तांकि दानवारी ॥ ४५ ॥
वचन ऐकुनि मंथरगामिनी । त्यजुनि इंदिवरा सुख भामिनी ॥
मुनिप्रती पुसती हरिलालसा । त्वरित कृष्ण तु घे त्यजि आळसा ॥ ४६ ॥
नेघे वदे द्विजवराप्रति दे सती तू । सर्व स्त्रियाहुनि वरिष्ठ भली सती तूं ॥
ऐसें वदोनि कुतुकी द्विजनायकानें । अन्या द्विजा प्राति हरी मग नायका ने ॥ ४७ ॥
तया प्रार्थी सत्या किमपि हि असत्यासि न करीं ।
करीं घे श्रीकृष्णा हृदयिं जड तृष्णा दुर करीं ॥
करीं तुम्हा दानीं मम प्रियनिदानीं द्विजवरा ।
बरा जन्मोजन्मीं वरि हरि अजन्मी च नवरा ॥ ४८ ॥
वदति विप्र सुमध्यमदालसे । हरिस केवळ तूं प्रमदा लसे ॥
शृणु नितंबिनि हा मुनि अप्रिय । करि अकिंचन सज्जन तत्प्रिय ॥ ४९ ॥
वसन केवळ यासि दिगंबरी । पद न मात कदा महिअंबरीं ॥
उदरिं अंड अनंत क्षुधातुरी । न दिस घेइल या द्विज आतुरी ॥ ५० ॥
कुटुंब ज्याचें जन विश्व सारें । मानूनि हीं सार पुन्हा असारें ॥
मी एक एकाकि वदे असें तो । शुकोक्ति राजा अवधान देतो ॥ ५१ ॥

---

८२ सारसाक्षी=कमलनेत्री ८३ वसुमती=पृथ्वी. ८४ मथर=मंद. ८५ नितंबिनी=स्त्री.
८६ अकिंचन=भिकारी

चोरी करी गोपघरीं हरी हा । गोपस्त्रियांचें मन मोहरी हा ॥
जो जारकर्मी अति धीट साच । मी ब्रह्मचारी हि वदे तसा च ॥ ५२ ॥
चारी वर्नी गोपति नित्य गाई । असे गती केवळ तो अगाई ॥
संगी करी गोपसुतां असा गे । मीं ब्रह्म हें सज्जनिं गुह्य सांगे ॥ ५३ ॥
मी नाकळे वेदश्रुतीपुराणीं । वेदीं अशी गोष्ट जुनीपुराणी ॥
सागे समस्तां स्वमुखें शिराणी । त्या बद्ध दामीं करि नंदराणी ॥ ५४ ॥
विराट पार्थाप्रति जे सुतेजें । गोपाळ अग्रासम बधते जे ॥
सहस्र शीर्षें पद अक्ष सांगे । सहस्रशीर्षा वसतो असा गे ॥ ५५ ॥
हा राजराजेंद्र परोपकारी । आम्ही द्विजे दुर्बळ कीं भिकारी ॥
आम्हां घरीं अन्न कदापि नाहीं । वल्कांबरी वास वसों वना ही ॥ ५६ ॥
आम्हीं प्रपंचीक करूं कथा रे । आह्मा घरीं केंवि मुकुद थारे ॥
परस्परें बोलति विप्रजाती । हा तों दिसे कृष्ण स्वयें अजाती ॥ ५७ ॥
नसे जया गोत्र सुजात नांव । त्यातीत जें त्या भवसिंधुनाव ॥
ज्याची जनीं वृत्ति अलोकरीती । यासी असंगी प्रति होकरीतीं ॥ ५८ ॥

अशा ही गोविंदा वदनशशि कुंदासैमरदे ।
न घेऊं या दानीं तव सुरतदानीं समर दे ॥
तया शौरी नौरी दिसलि सम गौरी गजगती ।
न देसी दानातें तरि च वसणें ये चि जगती ॥ ५९ ॥
द्विजांची हे वाणी श्रवण करि सर्त्रीजितवधू ।
वधू मी गोविंदा तुझि च मम हृत्पेप भव धू ॥
बघुनी उत्कठा तुज द्विज स्विकारी झडकरी ।
करीं या स्नेहातें यिनित वदतें जोडुनि करीं ॥ ६० ॥

वचन ऐकुनि श्रीहरि मानसीं । परम मानवती च अमानसीं ॥
असिस पाहुनि सांगत तीस कीं । स्तविं पुन्हा मुनि ते प्रिय तूस कीं ॥ ६१ ॥
म्हणे सत्यभामा मुनीसत्तमातें । तुतें देतसें श्रीवरा उत्तमातें ॥
त्रिलोकांत तू धन्य भूदेवरासी । मला जन्मजन्मीं स्वभू दे वरासी ॥ ६२ ॥
समजुनि हृदयोब्जी कीं इतें गर्व भारी । कवतुक करूं आतां घेउनी कैटभारी ॥
सफळ दिवस माझा आज सगीं अनंता । उभय सुखसमाधी आजि भोगूं अनंता ॥ ६३ ॥
मुनि म्हणे गजमंथरगामिनी । करिं सुदान हरिप्रियभामिनी ॥

---

८७ कुंदासमरदे=हे कुंददंती ८८ सत्राजित=सत्यभामेच्या बापाचें नांव ८९ अब्ज=कमल. ९० कैटभारी=कैटभ दैत्याचा शत्रु कृष्ण. ९१ मथर=मंद. ९२ भामिनी=स्त्री.

वचन ऐकुनि कुंदनिभीं[९३] सती । हरिनिमित्य असो मुनि भासती ॥ ६४ ॥
साधी अर्थां अति अनर्था प्रति करिते । तेवी भर्ता वेळ न भर्ता धरि करिं ते ॥
क्षेमीं[९४] कर्ता भ्राति अकर्ता न रिपू ज्या । घेउनि तीर्था विप्र सुतीर्था करि पूजा ॥६५॥
बसवुनी मुनितें सुरसासनीं[९५] । षडरसास ति दे सुरसाशनीं[९६] ॥
विधिसयुक्त हरी धरुनी करें । द्विजकरीं पति दे मग सत्वरें ॥ ६६ ॥
पाणीस युक्ती सति रम्यपाणी । पाणी गृहीं घेउनि चक्रपाणी ॥
पाणी सुमुक्ता[९७] इव तेज भारी । भारी तुकेना मधुकैठभारी ॥ ६७ ॥
ऐशी समर्पी पति दानवारी । घाली मुनी हस्तकिं दानवारी ॥
तूं गृह्य गृण्हामि असें वदे तो । भोगीं पती हा वर जीस देतो ॥ ६८ ॥
उठें त्वरें चाल ममात्मसगीं । कृष्णा वसों शांत वनीं असगीं ॥
मिथ्या तुझी मायिक लोकरीती । टाकूनि संपादु अलोक रीती ॥ ६९ ॥
सकळ ही जन भ्रांतक साच रे । अचर तू जन कसा भ्रांत चरे ॥
त्रिविषयात्मक प्रकृति ही खरी । म्हणसि तूं मम प्रकृति ही खरी ॥ ७० ॥
तू टाकि स्त्रीसौख्य अमगळा तें । द्विजन्म सांगे अजमंगळातें ॥
करुनि सगा बिविधागनाचे[९८] । हे वृंदे[९९] पाहें विविधाग नाचे ॥ ७१ ॥
मुनी बोले कृष्णा विषयभवतृष्णा त्यजुनियां ।
करूं सच्चिद्रोष्टी पठण करु ब्रह्मास जुनिया ॥
स्वदंडा घे स्कंधीं सकळ भुषणातें दुर करीं ॥
स्ववस्त्रा काषायीं[१००] त्यजुनि सुचिरा वेष्टि सुकरीं ॥ ७२ ॥
करुनि भस्म विलेपन अतरीं । उभयतां भ्रमणें चि दिगंतरीं ॥
मम सुशिष्य असा मिरवीं ठसा । भवतरु[१] करु भस्म हि पीठसा ॥ ७३ ॥
मुनीवैभवा कोण लक्षील लोकीं । जगन्नाथ जो शिष्य झाला अहो कीं ॥
विरिंच्यादिकू[२] पाद सेवीत ज्याचे । जगीं धन्य कीं भाग्य त्या हो द्विजांचें[३] ॥ ७४ ॥
वसन द्विव्य जयासि पितांबर । गळिं सुकौस्तुभ हा चि पितां वर ॥
सकळ टाकुनि मूर्ति दिगबर । मुनि सुशिष्य फिरे महिं[४] अबेर[५] ॥ ७५ ॥
सकळ भुवन लोकीं धन्य हा ब्रह्मचारी । सतत हरिसमाजीं होतसे ब्रह्मचारी ॥
उभय कथन ब्रह्मीं वाद पातां जळाचा । मुनि भव हृदिं फेडी दाह हा काळनाचा ॥७६॥
साधूजनीं संगति जे करीती । निःसगता होय तयासि रीती ॥
निर्मोहता सर्व विरक्त भावीं । निश्चिलता होय तया स्वभावीं ॥ ७७ ॥

---

९३ कुंदनिभा=गौरवर्ण. ९४ क्षेम=कल्याण ९५ सुरसासन=उत्तम आसन ९६ अशन=भक्षण. ९७ मुक्ता=मोतीं. ९८ अगना=स्त्री. ९९ वृंद=समूह. १०० काषाय=लाल. १ भवतरु=ससारवृक्ष. २ विरिंची=ब्रह्मा ३ द्विज=ब्राह्मण. ४ मही=पृथ्वी. ५ अंबर=आकाश.

सायुज्यमुक्ती न पुन्हां न या या । उल्लघुनी अष्ट हि सिद्धि याया ॥
जपे च जे लक्ष धरोनि जाती । ते धन्य कोणी असता अजाती ॥७८॥
व्रतादि जे जे करिति कथा रे । सलोकता त्यांसि अखंड थारे ॥
सदैव जे ईश्वरसेवनातें । समीपता त्या जनि हे चि नातें ॥ ७९ ॥
गंगादितीर्थी विनिमज्ज होती । सरूपता पावाते कीं अहो ती ॥
जे ब्रह्मबुद्धी खलु बुद्धि ज्यांची । सायुज्यता पावति ते अजाची ॥ ८० ॥
तमोगुणीं भक्ति अखंड ज्याची । त्यां प्राप्ति कैसेनि घडे अजाची ॥
जे राजसी भाक्ति पुन्हा फिराया । ते भक्ति अधतम जाण राया ॥ ८१ ॥
भजति सत्वगुणें हृदयाबुजा । सतत विंदु तयां भव अबुजीं ॥
न मनिति सुखदुःख कदापि ते । हरिगुणामृतसार सदा पिते ॥ ८२ ॥
हें विश्व मिथ्या अवघे पसारे । मन्वादि हे बोलती सिद्ध सारे ॥
प्रपच हा निर्फळ भासला हो । त्यालागिं ब्रह्मीं च अखंड लाहो ॥ ८३ ॥
एव असा नारद वेद ब्रह्मा । जें बोलिलासे सुख वेद ब्रह्मा ॥
तें ब्रह्मसर्गी करूनी कथा रे । त्यांची करी अन्य कदा न थारे ॥८४॥

जो सर्वांसि अगम्यचरी मुनिवरांसगीं वसे गोचरीं ।
जो आत्मा स्थित गोचरीं वसतसे जो काननीं गोचरीं ॥
जो दुःखार्णव संहरी स्वशरणा जो वाजवी मोहरी ।
जो प्रल्हाद अवी* निघे नरहरी तो शिष्य झाला हरी ॥ ८५ ॥

हे मात ऐकोनि वरांगना ही । पहात ठेल्या श्रिवरांगना ही ॥
धुडाळिती श्रीहरि सारसा त्या । पाहों कधीं गोपदसारसा त्या ॥ ८६ ॥
नितंबिनी[६] सूक्ष्म माज लाहो त्यांमाजि ही शोक चि माजला हो ॥
आम्हीं विलोकूं कधिं कृष्णनाथा । त्या वेगळ्या सर्व जगीं अनाथा ॥८७॥
सकळ ही मिळुनी हरिनायका । स्तविति त्या हृदयीं व्रजनायका ॥
तंव कळा गमती त्यांदि मायिका । द्विजघरीं हरि ब्रह्म हि माय का ॥८८॥
तों एक बोले दुसरीस माजा । मुखीं न येई दुसरी समाजीं ॥
सुकिंकिणी नूपुरशब्द होती । देणार हे कोण द्विजा अहो ती ॥ ८९ ॥
सकळ जल्प करोनि हि हांसती । म्हणति तू चि वरिष्ठ महा सती ॥
द्विजकरीं पतिलागिं दिलें वरें । तुज गमे हरि हा गुळखोबरें ॥ ९० ॥
स्त्रीकदब जे भजे प्रिया प्रिया पतिव्रता । तीस त्या सत्या सत्या वदेति तू पतिव्रता ॥
एकटा अनाथ नाथ प्राप्तिची अतिव्रता । आचरे सखेद खेद दाविलाहि तीव्रता ॥९१॥

सकळ मिळुनि कांता प्रार्थिती त्या स्वकांता ।

---

६ नितंबिनी=स्त्रिया. * अवी=रक्षणी.

घननिळतनु शाता पाव आम्हा अनंता ॥
हृदि विरह अकांता तूं चि हर्ता अनंता
जनभवश्रमहता फोंड ईचीं अहता ॥ ९२ ॥
नितंबिनी प्रार्थिति गोपिनाथा । अनाथनाथा दिसतों अनाथा ॥
नाथाविया कांळिय तू असंगीं । संगीं तसा शोक करूं प्रसगीं ॥ ९३ ॥
समस्तांचिया अंतरी व्याप्त होतो । गृहीं मंदिरी स्त्रीसमाजीं अहो तो ॥
अकस्मात हा लाभ झाला पहा हा । अहाहा असा शोक झाला महा हा ॥९४॥
स्तवन करि मुखाब्जीं कामिनी कामरूपा ।
घननिळतनु श्यामा श्यामळा चित्स्वरूपा ॥
अभिनवगुणधामा माधवा कंठभारी ।
मधुरिपु जगदीशा शापि हा क्लेश भारी ॥ ९५ ॥
सकळभुवननाथा पद्मनाभा मुकुंदा । हरि हरि प्रिय कृष्णा देतपक्षी मुकुंदा ॥
सुनुपुरवनमाळी माधवा पीतवासा । धरि पद हृदि पद्मा मागतों त्याचि वासा॥९६॥
विष्णु जनार्दन मर्दनकंस सुवर्धनवंशज गोवर्धनधारा ।
दुर्जनतर्जन सर्जन अर्जविमार्जनतर्जनिनें नख धारा ॥
भर्जन पातकवर्जन देह सुगर्जन गर्जित आ भवधारा ।
कीरण सज्जन दुर्जन दुर्जानि स्वर्जय साधिति तीर्थसुधारा ॥ ९७ ॥
श्रीवत्सांकी पुंडरीकाक्ष देवा । तूझी प्राप्ती केंवि अह्मां अदेवां ।
त्यागूं देहा हा मनीं भाव आहे । वीयोगाची कोण भोगील आहे ॥९८॥
ऐशा प्रकारें वदती सकामा । कामातुरा देखुनि त्या अकामा ॥
कामास जो अंग स्वयें सृजीतो । जीतो स्वयें शंभु वदे अजी तो ॥९९ ॥
जाणोनियां भाव मनांत याचा । अन्याय कांहीं न दिसे स्त्रियांचा ॥
सांगे प्रियांलागिं असें हरी तो । जो गर्व त्यांचे अवघे हरीतो ॥ १०० ॥
हरी बोले ऐसें तुह्मि सकळ कांता द्विजवरा ।
त्वरें प्रार्थूनीयां पुनरपि हि पावाल नवरा ॥
मुकुंदाची वाणी श्रवण करितां हास्य सकाळां ॥
कळा हे जाणोनी मुनिस शरणा सर्व विकळा ॥ १०१ ॥
नारदा सांगती कामिनी कामना । खेद हा लाविला सांग तू कां मना ॥
श्रीधरावीण हो त्या गर्जा वाम ना । वाटतें अंतरीं शीघ्र दे वामना ॥१०२॥
प्रार्थी रामा पूर्णसकामा श्रीघनशामलरूप द्विजातें ।
सर्वधनातें मद्वसनातें वर्जित देऊं ये क्षणिं तूतें ॥

७ अंक=चिन्ह. ८ आहे=ज्वाळा. ९ सृजितो=उत्पन्न करीतो.

दे व्रजवासी खेद जिवासी नाशी भेटवि कुंदद्विजातें ।
धन्य ति कांता पाडि अकांता दे सत्या कमळेक्षणि तूतें ॥ १०३ ॥
ऐकोनि वाणी मुनिनारदानें । वदे तयां सुदतिलागिं दानें ॥
दिल्ही पुन्हा वस्तु न घे पुराणी । तथापि सत्या तरि पट्टराणी ॥१०४॥
पूर्वीं बळीआदिकरूनि राजे । आब्रह्मस्तभात सदा विराजे ॥
विप्रार्थ जें दान दिलें न घेती । शरीरदानास हि सिद्ध होती ॥ १०५ ॥

तुह्मि सकळ हि वामा मागतां श्रीहरी हा ।
पतित जन तयाचें दुःख जो सहरी हा ॥
करुनि तुळण याचे पौलटीं द्या सुवर्णा ।
वसु मनिं जरि वांछा कासया विप्र वर्णा ॥ १०६ ॥

श्रीगोविंदतुळा करूनि सकळा कांता विचारा मनीं ।
जे देईल सुवर्णभार तिजला मुद्रा मिळे वामनी ॥
ऐकोनी द्विजवाक्य स्वल्प श्रवणीं का खेद देऊ मना ।
त्या बोलेति तयात एक वदते फेडीन मी कामना ॥ १०७ ॥
बोलती एकमेकीस त्या लालसा । बैसता कां सख्या घ्या हरी लालसा ॥
वाटतो श्रीहरीप्राप्तिचा काळसा । त्याविणें मंदिरीं हो तुम्ही काळ सा ॥१०८॥
त्वरा करा कृष्ण तुकीं गणाया । द्या या तुळा सत्वर आंगणां या ॥
भामा म्हणे हेम तुळेसि आधीं । घालीन मीं नाशिन काम आधी ॥१०९॥
पूजासनीं बैसवि विप्र वर्णी । सत्या तुकीं वृष्टि करी सुवर्णीं ॥
कृष्णा तुळे घालुनि काय वर्णी । सर्वस्व घे बोलति गौरवर्णी ॥ ११० ॥
भुमिहुनी न ढळे हरिची तुळा । द्विज म्हणे धनभार हि केतुला ॥
सकळ भूषण घालितसे सती । तरि तुळा वरिचेवरि दीसती ॥ १११ ॥
सुवर्ण सारें सरलें सतीचें । आणीक ही सर्व दिलें पतीचें ॥
समग्र ही घालितसे तुळेसी । येती कशी साम्य हि आतुळेसी ॥ ११२ ॥
हासती बहु सर्व तिलें अबला । बहु तूं धनमान वसोनि बळा ॥
खरें सोडवु आम्हि तरी हरि तो । पद विप्रकराहुनि ही हरितो ॥११३॥

मिळुनि सकळ वामा माधवा सोडवाया ।
म्हणति सति पती जा व्यर्थ तूं सोड वांया ॥
वदति मुनिवरातें घे सुवर्णासि आधीं ।
करिति वसुसुवृष्टी नाशिती सर्व आधी ॥ ११४ ॥

---

१० कुंदद्विज=कुंदाचे कळ्यां सारखे आहेत दांत ज्याचे. ११ वामा=स्त्रिया. १२ पाल-टीं=बदल. १३ वसु=द्रव्य १४ तुळ=तराजूचें पारडें. १५ आधि=मनोव्यथा.

धन सकळ स्त्रियांचें घालिती पालटासी ।
तरि हरिसम येना ते तुळा पालटा सी ॥
मणिमय गळमाळालाबिनी कंकणादी ।
हरित सकळ झाल्या कांचना अंकणादी ॥ ११५ ॥

धनाढ्य ही लोक मिळोनि सारे । ज्याचे गृहीं कोटि वसू पसारे ॥
सुवर्ण, तें अर्पिति पालटा हो । न ये चि तैं मांडित येक टाहो ॥११६॥
धरि यष्टि करीं बहु वक्र कटी । वसुदेव हि येउनि त्या निकटीं ॥
बहु वृद्धसमागम बाधव ही । पुढे पाहत गोविद माधव ही ॥ ११७ ॥
ह्मणे ब्रह्म सनातन हें रूपडें । जरि हि द्विजन्माकरीं केवि पडे ॥
मुनी शोधिति अंतरी वेदमतें । पह शास्त्र मुखीं पढे वेदमतें ॥११८॥
हरिच्या तुळणीं वसु केवि तुके । धनकोटि अपार तया न तुके ॥
दिस सुंदर श्यामळ सौम्यपणें । म्हणुनी वधु देति तुकीं मिळणें ॥११९॥
विधि बोलत वेदमुखे विशदें[16] । पुतनास्तनपान तया विष दे ॥
करि शांत सदा शिवहृत्कमळा । विष त्यास किती पदहृत्कमळा १२०॥
तो देवकी येउनि त्या समाजीं । सुकंकणे किंकिणि दिव्य माजी ॥
काढूनि अर्पी हरिच्या तुकेसी । राजा पुढे प्रश्न करी शुकासी ॥१२१॥
सुवर्ण कोटयावधि भार झाला । कां हो न ये त्या तुळणा अजाला ॥
हें सांग आम्हीं द्विजवर्यराया । शुकोक्ति जे मुक्ति हि घे वराया ॥१२२॥
शुक म्हणे अजि अंड अनंत ही । उदरिं मात असा च अनंत ही ॥
पदयुगीं भुवनत्रय आटलें । दिसत कौतुक का तुज वाटलें ॥ १२३ ॥
द्रव्यहीन पुरि सर्व दिसे कीं । सोडवील तरि कोण असे कीं ॥
बोलती मग परस्पर रामा । पावल्या परम खेद विरामा ॥ १२४ ॥

शरण सकळ भीरू येति त्या उद्धवातें । व्यसनग्रथित झालों सोडवीं माधवातें ॥
भुजगशयनकांता जे रमा मुख्य राणी।सकळवधुसमाजीं ज्येष्ठ जीची शिराणी[17]॥१२५॥

कमळासन ध्यातसे हृत्कमळा । कमलाप्रियवल्लभ जी कमळा
कमळाकर जोडवि तैं कमळा । कमलासम जे करि पक्कमळा ॥ १२६
उद्धवा जाउनी आणि लक्ष्मीप्रती । तीविणें दीनरूपा सत्या दीसती ॥
जाय तू सत्वरें प्रार्थुनी इंदिरा । धन्य मानी जनीं पाहता मंदिरा ॥१२७॥
घालोंमि लोटांगण विश्वमाते । ज्या माजि हें हो जन विश्व मातें ॥
तें ब्रह्म झाले सति विप्रसंगीं । सांगें त्वरें दे वसु या प्रसंगीं ॥ १२ ॥
हें वाक्य त्याचे पडता चि कानीं । बोले हरी तो अजि वायकांनीं ॥

---

१६ विशदें=स्पष्ट १७ शिराणी=आवड.

दिल्हा असें ऐकुनि कौतुकानें । येतो कसा श्रीहरि या तुकानें ॥१२९॥
विचारी मनीं श्रीस ती विश्वमाता । अशीं कोटि अंडें जयामाजि माता ॥
उठे ठाव विस्तीर्ण लक्षा न येतो । तुळी मोजिता हेम[18] लक्षा नये तो॥१३०॥
ज्या स्थानिं निद्रेस भुजंग माचे । दुर्वार जें स्थावरजंगमाचें ॥
अरण्य जें शमनखीं पहाती । त्या अंगना अर्पिति विप्रहातीं ॥ १३१ ॥
अन्याय ऐसा मनिं भासला हो । कैसेन त्या कृष्ण घडेल लाहो ॥
दानार्थ हे ब्रह्म कदापि नाहीं । दिल्हे असें बोलत स्पष्ट नाहीं ॥१३२॥
करुनि मज्जन दिव्य सुधाजळीं[1] । तुळसिसंन्निध जोडुनि अंजळी ॥
हरि हि पक्कदळा तुळणे न ये । म्हणुनि पक्क करास निघो न ये॥१३३॥

स्तवी पद्मा भावें करुनि वदते माय तुळसी
तुळीं तू तें देणें तुळणि हरि वस्तू अतुळसी ॥
तुझी कंठीं माळा सतत पदलग्नी विलसती ।
तशी तूतें कृष्णा तुळणि करुनी तोषवु सती ॥ १३४ ॥

पात्रांतरीं घालुनि पत्र भावें । लक्ष्मी करीं घेउनियां स्वभावें ॥
स्वपल्लवें झाकुनि विश्व माया । निघे त्वरें कृष्णपदा नमाया ॥ १३५ ॥
नमुनिया तुळशीस सपल्लवा । करुनि सव्य प्रदक्षिण पल्लवा ॥
तुळसिपक्कदळा धरुनी सती । निघत वीज जशी नभिं दीसती ॥१३६॥
मेघरूप हे परि साची* । वीज त्यावरि रमा परिसाची ॥
स्थीर ब्रह्म वर ऊपर माया । चंचळागति निघे पर माया ॥ १३७ ॥

पुढें लक्षी पद्मा हरिचरणपद्मा झटकरी ।
करी साष्टांगेंशीं विनित कमळा जोडुनि करीं ॥
नमूनीयां विप्रा म्हणत तुळणें देत कनका ।
नका घालू हेमा दळि च तुकणें विश्वजनका ॥ १३८ ॥

घेऊनियां दळ रमा वरि हस्तकानें । घाली तुळेवरि रमा वरि हस्तका ने ॥
उचावलें गगन भीं द्विजलोक पावे । घेईल या दळि नभीं द्विजलोकपा हे ॥१३९॥

श्री पत्र घाली तुळणेसि हातें । श्रीरंग अंगा जन हे पहातें ॥
उचावले व्योमिं[2] पथीं विराजे । हें देखती कौतुक देवराजे ॥ १४० ॥
स्त्रिया काढिती आपुल्या भूषणातें । वदे द्वीज तैं श्रीयदूभूषणातें ॥
महा स्थूळ तू सूक्ष्म झालासि वाटे । सहस्रारपद्मीं जसा सूक्ष्म वाटे ॥१४१॥
सर्वांस या पदजनीं हरि उच्च वाटे । जे पाहती त्यजुनियां भव उच्च वाटे ॥

---

१८ हेम=सोनें  १ सुधाजळ=अमृतोदक  २ व्योम=आकाश. * या चरणात दोन अक्षरें कमी आहेत.

सर्वां मुखीं रव असा हरि गजराचा । कोणास वायु न लगे भवसागराचा ॥१४२॥
वसु समस्त हि काढिति नायका । स्तवि समस्त उभ्या यदुनायका ॥
स्मरनि त्या हृदयांत पितांबरा । युवतिगर्व तुवां हरिला बरा ॥ १४३ ॥
वांटूनि घेती वसुभूषणातें । त्या भाडती बोलति दूषणातें ॥
तों एक ऐशी दुसरीस माजीं । बोले म्हणे किंकिणि हे चि माझी ॥१४४॥
हारावळी हे नवरत्नभारी । माझ्या गळां घालित कंठभारी ॥
ते सोडिं माझी नवरत्नमाला । सांगेन आतां पुरुषोत्तमाला ॥ १४५ ॥
जडावाची वेणी लखलखित एणीसुनयना[२१] ।
धरूनीया ओढी वयसम नवोढातिशय ना ॥
दुजी बोले माझी हण जनसमाजीं बधितसा ।
नवी घे हस्तींची जडितसम ऐशी बधितसा ॥ १४६ ॥
बापें दिली किंकिणि आदणासी । तो एक बोले हरिच्या पणासीं ॥
म्यां जिंकिली ते तव हस्तकातें । देते कशी फोडिन मस्तकातें ॥ १४७ ॥
एकावळी तोडित खडखडीं । मुक्ताफलें साडत खडखंडी ॥
लक्ष्मी दले श्रीहरिखड खंडी । सत्कीर्ति फाके अशि खडखंडीं ॥ १४८ ॥
भीरू आणिक जनीं कनका हो । तृप्त मीं मज कदापि नका हो ॥
देव दे नर असा न दिसे तो । त्यांत न स्त्रिविषयीं गवसे तो ॥ १४९ ॥
घाली श्री तुळणेस पत्र तुळसी सद्भाव जाणे हरी ।
झाला तो हळु भार विश्वजनको स्त्रीगर्व ही सहरी ॥
आलिंगूनि हरीस आत्म हृदयीं ने मंदिरा श्री सती ।
लज्जायुक्त स्त्रिया समस्त दिसतां देवांगना हासती ॥ १५० ॥
नेउनी मंदिरा श्री स्वये श्रीधरा । जोडुनी पाणि नम्रा वदे हो धरा ॥
क्षांति प्रार्थी सती धन्य तूं श्रीधरा । त्वत्कृपें मानिलें आजि मी श्रीवरा ॥१५१॥
शुकातें पुसे भूपती त्या प्रसगीं । अजी नारदा कृष्ण होवोनि सगी ॥
पुन्हा पत्र भारी तुके हे अपूर्वा । कथा सांगसी विश्वरूपादिपूर्वा ॥ १५२ ॥
केवढें परम सूकृत तीचें । भाग्य यावरि सुधन्य सतीचें ॥
काय ते मज कथीं शुकराया । सांग हा भवसमुद्र तराया ॥ १५३ ॥
ऐकोनि बोले शुक राजयातें । म्या वर्णिले श्रीरमणीजयातें[२३] ॥
ते धन्य सर्वायुवतीसमाजीं । म्हणोनि धी बोलत दिव्य माझी ॥ १५४ ॥
जे आदिमाया हरिची सुविद्या । चैतन्य जे वेष्टित आदि विद्या ॥

---

२१ एणिसुनयना=मृगनेत्री  २२ नवोढा=तरुण नूतन विवाहित स्त्री  २३ श्रीरमणी=लक्ष्मी

ते योगमाया हरि अग्रभागी । तिच्या स्वअगा हरि हा विभागी ॥ १५५ ॥
सर्व ब्रह्मरस साठविलासे । त्या सभोंवति रमा च विलासे ॥
दीप आणिक उजेड निराळा । हा नव्हे द्विविध वायु निराळा ॥ १५६ ॥
जे आदिशक्ती त्रिपुटी वसे जे । ते हे रमा सेवित कृष्णसेजे ॥
जीच्या कृपे तो स्वरूपासि दावी । या कारणें श्रेष्ठ जनीं वदावी ॥ १५७ ॥

कोलापूरनिवासिनी परम जे काली महा दक्षिणी ।
श्रीविद्या परमा सरस्वति वसे वामांग सरक्षिणी ॥
धुडी सन्मुख सिद्धिदायक स्वयें पूर्णाग्रभागीं सती ।
श्रीयंत्रीं नव कोटि वेष्टित उभ्या कात्यायनी दीसती ॥ १५८ ॥

ते ही रमा केवळ आदिलक्ष्मी । ध्याती सदा श्रीद्विजपादलक्ष्मी ॥
या कारणें नारदहस्तकींचा । हरी हरी भूषण मस्तकींचा ॥ १५९ ॥
करूनिया द्विजसव्यप्रदक्षिणा । हरिकृपामृत घेउनि दक्षिणा ॥
नमुनिया मग नारद तो निघे । नभि सुगर्जित नाम निघे निघे॥१६०॥
सर्वांस हा विस्मय भासला हो । रमा सदा घे चरणाबुलाहो ॥
श्यामा अशी श्रीहरिमूर्ति साची । स्त्रीवृंदसेना दिसती असाची ॥१६१॥
नेला हरी रुक्मिणिनें असा गे । त्या एकमेकींप्रति एक सांगे ॥
वधूजनीं गर्व असा गळाला । ध्याती पुन्हा त्या अजमगळाला ॥१६२॥
हे निर्मिली श्रीहरिची कथा रे । येथें जयाचें जरि चित्त थारे ॥
तो धन्य वाची जरि श्लोक याचा । उद्धार तो येक करी वयाचा॥१६३॥
आजि समस्त हि कामिनिची खरी । कर्यांनि बोलति हे परि वैखरी ॥
हरिगुणामृतसार तथापि ते । म्हणुनि चित्त रसासि सदा पितें ॥१६४॥
दानव्रताची कथिली कथा हे । ध्याती सदा त्या बळ अन्यथा हे ॥
संपूर्ण हे दानकथा स्वकाळीं । केली वदे बोलत भद्रकाळी ॥ १६५ ॥

श्रीकृष्णामृतसारपान करितां अतृप्त वाटे मनीं ।
यालागीं रुचिनें सदा वदतसे पद्यें अशीं वामनी ॥
श्रीविष्णूचरणीं समर्पण कथा अर्पूनि लोटांगणीं ॥
मागे भिक्षुक मुक्ति जोडुनि करा राहे उभा अगणीं ॥ १६६ ॥

संवत्सरीं पुरि सुरम्य गृहें विचित्रे । चित्रोत्तरें नरहरी स्वमुखें चरित्रें ॥
केलीं समर्पण हरी पदसारसाचीं । वाटे मनीं अणिक सेविन या रसासी ॥१६७॥

इति दानव्रत संपूर्ण

कविकिंकरकृत

## द्रौपदीवस्त्रहरण.

स्वयें नमू साबव्या मोरयातें । नसे यौन सर्पारिनोमो रयोतें ॥
जशी दौमिनी शोभवी अर्बरातें । कटीं कासिलें तेंवि पीतांबरातें ॥ १ ॥
भ्रमें भल्लगडास दे दिव्य पुडा । धरी काळदर्डापरी चापकोडा ॥
रणीं रक्षमुडौंस तोडी उदडा । भजे मीं प्रचडा तया वक्रतुंडा ॥ २ ॥
सदा मानसीं पूजितों भारतीला । दिलीसे जिणें दिव्य शोभा रतीला ॥
प्रबोधीत जे भारतीं भारतीला । कवी घालितो सर्व ही भार तीला ॥३॥

हरी भक्तां तारी विषम जरि येतें दुर करी ।
स्वदासा कैवारी भवभय निवारी सुख करी ॥
धरी नानाकारी मकरसुकरी देह नृहरी ।
अरीतें सहारी कुमतिमद हारी यश वरी ॥ ४ ॥
अधीरें गांधारें दृढ कपटपाशांसें धरुनी ।
अधर्मै धर्माचीं सकळ विभवें घेत हरुनी ॥
दुरात्मा तो बधू अति कपटसिंधू च शकुनी ।
अधे चारी दुष्ट प्रमुख रविपुत्रापशकुनी ॥ ५ ॥
जसे चारी दुष्ट ग्रह शकुनि एकत्र मिळती ।
अनर्थाचीं तेव्हां परपिडकयंत्रें उसळती ॥
तसे हे चत्वारी मिळुनि सति पांचाळतनय ।
सभे आणा ऐसें वदति तिस कीजे अविनया ॥ ६ ॥

अंधात्मजू दुष्ट मदांध तेणें । दुःशासना सांगत उद्धतेनें ॥
अंतःपुरामाजि त्वरें प्रवेशा । आणा सभे जे सति जिह्मवेशा ॥ ७ ॥
मला हांसली ते समस्तांस लोकीं । तिचीं आजि गात्रें सभांतीं विलोकीं ॥
जसा मृत्युचा भृत्य तैसा निघाला । अकस्मात घाली दुराधर्ष घाला॥८॥
वसे कांत कांतांत एकांतवासीं । स्त्रियाधर्म पाळी यथा वैभवेशीं ॥
म्हणे चाल पाचारिलें कौरवानें । न येशील नेईन तैं गौरवानें ॥ ९ ॥
असे वर्णे आकर्णिता स्तब्ध राहे । म्हणे काय देईल जागा घरा हे ॥
कसा बोलिला काय हा उग्र वाचा । कळे कैंवि पा मर्म त्या पांडवांचा ॥१०॥

---

२४ यान=वाहन. २५ सर्पारि=गरुड २६ रय=वेग २७ दामिनी=वीज. २८ अबा=आकाश २९ चाप=धनुष्य. ३० रक्षमुंड=राक्षसांचीं डोकीं ३१ भारती=सरस्वती ३२ अरि=शत्रु ३३ गांधार=शकुनी. ३४ पाश=फासे ३५ विभव=द्रव्य. ३६ रविपुत्र=कर्ण. ३७ पांचाळतनया=द्रौपदी ३८ जिम्ह=कपट. ३९ वर्ण=अक्षरें, शब्द.

वदे मी असे जी स्त्रियाधर्मवती[40] । कसें आणवीलें सभे नीतिवंतीं ॥
प्रयुक्ती करी ती स्वचित्तें न मानी । धरूं धाविला निर्दयत्वें गुमानी ॥ ११ ॥
पळे तों वळे हात वेणीस घाली । जळातूनियां मीनि तैशी निघाली ॥
करी म्लाति ऊदड आक्रंद नारी । म्हणे काय झाले पती दुर्जनारी ॥ १२ ॥
जशी ओढिली गाय पचाननानें[41] । कपोतीस कोठ्यांतुनी दुर्जनानें ॥
कुरंगी[42] स्वयूथांतुनी[43] पारधीनें । रथीं घातली तेंवि दुर्वासिनीनें ॥ १३ ॥
भर्त्सना करि बहूवस तीतें । आणिलें नृपसभेस सतीतें ॥
राहुग्रस्त जसि चद्रकळा ते । देखतां नवल त्या सकळांतें ॥ १४ ॥
नवशशीवदना नतकंधरा[44] । उभि असे पतिधर्मधुरधरा ॥
अधम सादर रूप निरीक्षिती । यमदमें नियमें मन रक्षिती ॥ १५ ॥
दुरात्मा वदे दुष्ट गांधार तीतें । स्वरूपें जिणें लाजवीलें रतीतें ॥
तुळेना इशीं अगना किन्नराच्या । तया काय केवा भुजगांनराच्या ॥ १६ ॥
न म्यां पाहिली तों इच्या नेत्रबाणे । व्यथा फार केली मला पंचबाणें ॥
दिसे साजरा माज[45] कठीरवांचा[46] । वदे शब्द मजूळ गभीर वाचा ॥ १७ ॥
मग म्हणे जलजायतलोचने । निज रसें मदनज्वरमोचने ॥
धरिं मनीं मज सन्निध यावया । लवकरी करिं सार्थक या वया ॥ १८ ॥
धरिति दास्य तुझें शुभ कंधरा । कुशल दुर्लभ जाति पुरदरा ॥
धानिन हो सकळा विभवास ही । मजसमान न भाग्य भवास ही ॥ १९ ॥
अनुसरें सुमनें निज मानसें । न करिं अल्प कदा निज मानसें ॥
झटिति ये मम जानुवरी वरें । बइस हो न करीं मन घाबरें ॥ २० ॥
कठिण काळ तुझा उपशामला । उदय भाग्य असा गमला मला ॥
पति तुझे पतितापरि साजती । अधम दासजनात विराजती ॥ २१ ॥
तुज न योग्य अशा कुसमागमा । सह वया क्रमणें विषयागमा ॥
सकळ वैभव हें तव सुदरी । प्रविश हो कुरुनायकमंदिरी ॥ २२ ॥
असे बोलिला शब्द गांधार वाचा । मनीं बाण वेधे मदाधारवाचा ॥
फडी चेपितां नागिणी पीळ घेते । तशी क्रोध उल्का मुखाब्जीं निघे ते ॥ २३ ॥
वदे रे दुरात्म्या शठा पापराशी । न बोले असे शब्द कोणी परासी ॥
अती दुष्ट हें वाक्य सता न माने । तुझें अल्प काळें निसतान माने ॥ २४ ॥
मन मानत तें बरळेसि मुखें । परि भस्मसि रे अनुजप्रमुखें ॥
तुज कल्पि एक असे नवरी । न वरी परि ते नवरा नवरी ॥ २५ ॥

---

४० स्त्रियाधर्मवती=रजस्वला ४१ पचानन=वाघ ४२ कुरंगी=हरिणी. ४३ यूथ=कळप ४४ कंधरा=मान ४५ माज=कंबर. ४६ कठीरव=सिंह

सरळी कदळी करभार बरी । शयनीं मननीं भुल नैक बरी ॥
मुखरीण परी चवती अमरी । कुमरी हरि जीव हरीसमरी ॥ २६ ॥
स्वर्णालंकारश्यामा सघनवततनू पीनवर्तूळगात्रा ॥
लज्जासंकोचितांगी अवयव नुघडी जीवदानैकपात्रा ॥
सत्कार्यीं द्वंदषोढा अनशनव्रतधृक् त्वद्वपूसारसेव्या ॥
ऐशी हे तूज कांता परिस कवण ते भीमहस्तैकसेव्या ॥ २७ ॥
इच्छा तिची तूज रणीं वरावें । स्नेहें बरें मर्दन ही करावें ॥
संग्रामशाळेंत सुखें निजावें । जानूवरी बैसुनियां सजावें ॥ २८ ॥
द्रुपदिचीं वचनें शर सूटले । नृपतिच्या हृदयांत विघट्टले ॥
प्रजळला प्रळयानलज्वाळसा । खवळला अति दुर्धर काळसा ॥२९॥
वदत नम्र करा इजला धरा । उ[४७]रग शोपविजे कुटिला धरा ॥
वदलि हे अधमानृत जोहरा । द[४८]शन पाडुनियां र[४९]सना धरा ॥ ३० ॥
दुःशासनातें वदला पणातें । हरूनि वस्त्रें करिं शासनातें ॥
तो अप्रमत्तें उठिलानुमत्तें । काढी करातें झगटे चि[५०]रातें ॥ ३१ ॥
देखोनि हें सूटत काप तीला । दीनाननें लक्षित कां पतीला ॥
आवेश आला वरकोदरातें । मर्दूं म्हणे भूप सहोदरातें ॥ ३२ ॥
गदा करीं घेउनियां उठावें । तो होय पार्थाप्रति गुह्य ठावें ॥
नेत्रीं मुखीं ज्वाळ निघों पहाती । त्यातें धरी अर्जुन शीघ्र हातीं ॥३३॥
सत्वा न सोडीं स्थिर बंधुराया । धर्मार्थ कोपाप्रति आंवरा या ॥
हे मारितों एक चि सा[५१]यकानें । पैं वारिजे अग्रजनायकानें ॥ ३४ ॥
धर्माज्ञया सर्व जिवित्व जावें । परतु बंधुत्व कसे त्यजावें ॥
संबोखिला लावुनि धर्मवाटे । तों द्रौपदीलागिं निराश वाटे ॥ ३५ ॥
मग सभासद सर्व हि पाहिले । सुजन ते नतकंधर राहिले ॥
परि सहर्षिक संज्ञिक दुर्जनीं । स्मित मुखावरि ठेविलि तर्जनी ॥ ३६ ॥
नखशिखापरियंत निरीक्षिती । परम सादर धर्म न रक्षिती ॥
परि सुधीर सुधार्मिक जे भले । हरिपदीं मन तल्लिन हो भले ॥ ३७ ॥
म्हणतासि राया अनिती कराया । परि अन्यजाया मुळ भाग्य जाया ॥
न धरूनि पाया त्यजणें पथा या । चुकवा अपाया पतनासि पाया ।३८।
लंकेश्वराचें अमरेश्वराचें । भस्मासुराचें बाळिवानराचें ॥
जालंदराचे परयोषितेनें । भस्मात झालें शशि योषितेनें ॥ ३९ ॥
न मनूनि राजा वदला घरा जा । अनुयासि जा जाउनि ऊठ जा जा ॥
कथिलें करा जा वसनें हरा जा । निरखील आजा सह या समाजा ॥४०॥

४७ उरग=सर्प. ४८ दशन=दांत. ४९ रसना=जीभ. ५० चिर=वस्त्र. ५१ सायक=बाण.

असा वारिला भूप भीष्मादिकांनीं । परी दुष्ट चांडाळ नेघे च कानीं ॥
तदा द्रौपदी पूर्ण नीराश जाली । भयें घाबरी होय चित्तीं बुजाली ॥ ४१ ॥

उभी बाळा पाहे नृप अनुज राहे विहरणीं ।
तदा अश्रू वाहे भयचकित राहे कुहरणीं ॥
नव्हे कोणी साह्ये मग हरिस बाहे गहिंवरे ।
म्हणे माझे मायें कठिण समयो ये यदुविरे ॥ ४२ ॥

हरी वारीं वारीं रिपुभय निवारीं दहितसे ।
अरी भारी भारी अवघड उभारी धरितसे ॥
बदे चारी चारी अधम अविचारी दिसतसे ।
स्वधर्मारी मारी निशिचर तमारी हरितसे ॥ ४३ ॥

करुणाकरा ये कमळावरा ये । धरणीधरा ये जगदीश्वरा ये ॥
ममतापरा ये मम अंतरा ये । महदंबरा ये अतिसत्वरा ये ॥ ४४ ॥

राया त्वरा करुनि ये मम उद्धरा या । पायां तुझ्या पडतसें चुकवीं अपाया ॥
जाया उभी नृपसभेंत बुझे गुजा या । याया विलंब न करीं गति पाहिं या या ॥ ४५ ॥

रामा विचित्र निरखीं मदनाभिरामा । रामा कचीं धरुनि पावविली विरामा ॥
कामा विलंब करिसी परिपूर्णकामा । सामानवें पदरजा वधिसी स्वमामा ॥ ४६ ॥

विसावा मला होय तू चोविसावा । विसावा भजें मीं जपें तेविसावा ॥
धरावा नखीं त्वद्रुपीं पंधरावा । तरावा विपत्स्यूदधी ऊतरावा ॥ ४७ ॥

धर्मादीक पती नती स्विकरिती ग्रीवी[५२] अती खालती ।
त्यांची दीन गती सभासदनिती सांगेतना मानि ती ॥
अती तूं चि सतीपती मति किती वर्णील मद्वैखरी[५३] ।
बंधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबंधू हरी ॥ ४८ ॥

माझा धर्म पतिव्रतत्व कुरुजें शंखें श्रुतीचे परी ।
नेला दुष्टसभाबुधींत वळसे नाना परी उच्चरी ॥
हो तूं मत्स्य पुन्हां वधीं असुर हा मत्साह्यता हे करीं ॥
बधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबंधू हरी ॥ ४९ ॥

मद्वैर्याचळ पूर्णसिंधु बुडतो गांधार मंदाद्रि कीं ।
पाचातें असमर्थ देखुनि धरीं त्वद्दर्शनीं आळुकी ॥
हो तूं कूर्म कठोर पृष्ठ करुनी उद्धार त्याचा करीं ।
बंधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबंधू हरी ॥ ५० ॥

मल्लज्जाधरणी हरुनि दनुजें दुःशासनानें बळें ।

---

५२ ग्रीवा=कंठ, मान. ५३ वैखरी=वाणी.

पाताळीं कुरुमंडळींत हरितो भीमार्जुनाच्या सळें ॥
हो तू यज्ञवराहरूप पुढती संहार याचा करीं ।
बधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबंधू हरी ॥ ५१ ॥
मद्भावप्रहराद दुष्ट दनुजें दुर्योधनें गांजिला ।
शब्दासन्वितबाणमानशिखरा वन्हीमध्यें लोटिला ॥
या साठीं प्रकटे विभांडुनि सभास्तंभा हरी हे चिरीं ।
बधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबधू हरी ॥ ५२ ॥
मत्पातीव्रत इंद्रओजैंहरणी इच्छा बळें अंघजा ।
जो हें द्यूतशतादि याग करितो दांभिकधर्मी बुझा ॥
पाताळीं वितळीं रसातळतळीं या पाळिं गुह्योदरीं ।
बधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबंधू हरी ॥ ५३ ॥
मद्‍बुद्धी सुरभी बळें चि दनुजें दुर्योधनें चोरिली ।
मज्ञारेणुसुतेऽतिरम्य वसती संपूर्ण विध्वंसिली ॥
घे कोदंड करें करास निकरें विच्छेद याचा करीं ।
बधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबधू हरी ॥ ५४ ॥
मच्चिद्‍वृत्ति हरूनियां दशशिरें दुर्योधनें जानकी ॥
नेली दीन तशी सभासदवनीं क्रूरें जनीं जानकी ॥
श्रीरामांकित सोडवीं निज शरें संहार याचा करीं ।
बधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबंधू हरी ॥ ५५ ॥
माझा यागमनोरथ प्रचाळिला कौशीक बंदीन मी ।
प्रार्थी तूज सहानुज प्रकट ये कोदंडकांडाक्रमीं ॥
सूबाहू मरिची सहोदर कुरूनायासि व्यथा करीं ।
बधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबधू हरी ॥ ५६ ॥
प्राणाहारक दूत क्षमाधव वरी गांधारभू रावणें ।
नेलें बांधुनियां सभास्वनगरा आक्रंद दीनाननें ॥
श्रीरामा हनुमंत रूप धरूनी ये घात याचा करीं ।
बधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबधू हरी ॥ ५७ ॥
माझ्या मानसवृत्ति भूपदुहिता भौमासुरें कौरवें ।
दुर्वृत्तें हरूनी निरोध रचिला दुर्वार दुर्गौरवें ॥
त्याला संहरूनी स्वयें चि वरूनी सर्व स्वदासी करी ।
बधू ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबंधू हरी ॥ ५८ ॥

---

५४ ओज=तेज.

बुद्धीबोध मदीय तातजननी गांधार कंसासुरें ।
बंदी ठेवुनियां निरोधकतया मोहादिकें म्यासुरें ॥
कृष्णा त्यांप्रति सोडवीं सकळ हे मारूनि दैत्यापरी ।
बंधू ये अरिंबिंदु सिंधु गमला ये दीनबंधू हरी ॥ ५९ ॥
माझा मानगजेंद्र अंधकुमरें नक्रें जळीं ओढिला ।
आशादीपतिचा विचार कळतां म्यां भर्वसा सोडिला ॥
ये तूं चक्रधरा स्वचक्रनिकरें दुश्चक्र हें संहरीं ।
बंधू ये अरिंबिंदु सिंधु गमला ये दीनबंधू हरी ॥ ६० ॥
नगपतीसुतवाससुतापती । नगपतीतनयापति चिंतिती ॥
महिपती पतितोद्धरणा करीं । गजपती जपती तुजला हरी ॥ ६१ ॥
सरसीरूहजीव रणा हरि ये । सहसीरुहभूस्मरणा हरि ये ॥
सरसीरुहमित्रमुखा हरि ये । सरसीरुहनाभि हरी हरि ये ॥ ६२ ॥
सखया हरि ये सदया हरि ये । समया हरि ये हरि ये हरि ये ॥
सजणा हरि ये सगुणा हरि ये । सुमना हरि ये हरि ये हरि ये ॥६३॥
जैलजापति ये चिर सपति ये । अरि कांपति ये श्रुतिवित्पति ये ॥
करितें नति ये हरि उन्नति ये ॥ गति ये मति ये सति सद्गति ये ॥६४॥
गरुडासन ये यमशासन ये । कमळासनतोषणाशोषण ये ॥
मणिभूषण ये अघशोषण ये । खरदूषणद्वेषण भीषण ये ॥ ६५ ॥
जगमंडण ये अरिदंडण ये । नवखंडण ये खळखंडण ये ॥
खकगंजन ये भवभंजन ये । निजअंजन ये मनरंजन ये ॥ ६६ ॥
पतितोद्धरणा जगदाभरणा । करूणाकरणा मुरसंहरणा ॥
नमितें चरणा शरणा हरि ये । हरि ये हरि ये हरि ये हरि ये ॥६७॥
हरी जोहरीं पाव येथें निदानीं । धरीं उद्धरीं हो मला जीवदानीं ॥
भरी ऊभरी घालिती दुष्ट भारी । करीं किंकैरी मुक्त तूझी उभारी ॥६८॥
भावा धांवा करित बरवा भाव माझा बुझावा ।
धांवा धांवा करुनि कैंणवा वोणैवा वीझवावा ॥
पावा पावा अति दुसह जिवा जाच होतो पहावा ।
यावा जावा हरुनि पुरवा हेत माझा करावा ॥ ६९ ॥
अहीशय्या राया त्वरित करिं कल्याण मजला ।
जगामध्यें कीर्ती किति तुझि कवी कल्प वदला ॥

---

५५ सरसीरुह=कमल. ५६ जलजा=लक्ष्मी. ५७ किंकरी=दासी. ५८ कणवा=दया. ५९ वोणवा=वणवा ( दावाग्नि ).

अवस्था हे पाहें मि तुज निरवीं पामर जसें ।
जरी मर्मीकर्णा करि पुजिच वीजी वहिनसे ॥ ७० ॥
पुत्राच्या सुतसेवका त्वरित ये कांते सुतेच्या पती ।
आम्याच्या जनका विलब न करीं प्रार्थू तुला मी किती ॥
कांतापुत्रविदारका विनविते भ्राता कनिद्राकरा ।
ये ये शालकवशजा लवकरी पतू सुतेच्या वरा ॥ ७१ ॥
ऐशी पांचाळबाळा विलपत अबळा लोटती अश्रु डोळां ।
आक्रंदे शोक शीळा दिसत अवकळा भोवता दुष्टपाळा ॥
ज्याची कारुण्यलीला स्वजन अनुकुळा जो न आधीन काळा ।
धांवा त्या दीनपाळा कळत घननिळा पावला त्या च वेळां ॥७२॥
आला कितेक म्हणती पयसागरींचा । वैकुंठ अन्य वदती कनकागिरीचा ।
द्वारावतीहुनि यथामतिनें गतीतें । येथें च तो प्रकटला बुध सांगती तें ॥७३॥
झाला प्रकाश घनदीप्ति पितांबराची । तेणें सभा प्रकटली सदनांबराची ॥
हें जाणवे चरित भक्तसभाजनातें । आवेश वस्त्रहरणीं नृप दुर्जनातें ॥७४॥
तो आसुडीत महिपानुज अंबरातें । हें फेडिल्यावरि भजेल दिगंबरा ते ॥
तों दूसरें कनकरंगित नेसलीसे । सर्वां जना नवल सूचक भासलीसे ॥७५॥
हे नेसली जरि असेल दुजी घडी हो। हे ही हरूं मग दिसे तनु उघडी हो ॥
ह्या भावने करुनि फेडित दूसऱ्यातें। तों देखिलें गगनरंगित तीसऱ्यातें ॥७६॥
चवथ्यावरि पाच पुढें न गणे । मग आंसुडितां भरिजे गगनें ॥
नरतारि सुणा करनाटकिंचा । पुरवीत असे कर नाटकिंचा ॥ ७७ ॥
क्षिरसागर दिव्य पितांबर ही । रुधिरांबर जेंवि निलांबर ही ॥
कनकांकित इंद्रधनुष्य जसे । पुरवी निरखूनि मनुष्य तसे ॥ ७८ ॥
घटी गोमटी पचरंगी दुरंगी । जरी जुन्नरी रम्य साडी सुरंगी ॥
निळी पोफळी पीवळी श्यामरंगी । छडी जुन्नरी रंग नाना तरंगी ॥७९॥
कमळाकरवण बरा करळा । चळकांकित चपक चंद्रकळा ॥
नवरंग निघोट निजामपुरी । घन छीट मजीठ बऱ्हाणपुरी ॥ ८० ॥
मुगी पैठणी रेशमी म्यानबंदी । जरी साजिरी पल्लवी तारबंदी ॥
तिसे रंगरंगीं कुमवेल खासे । तडे तांबडे इंदिरेच्या न कासे ॥ ८१ ॥
गुलाली कुसुंबी विचित्रे मिराणी । सुरेंद्रांगनांलागिं ज्यांची शिराणी ॥
फिरंगान मुलतानचीं बंदरींचीं । किती कस्तुरी काश्मिरी सुंदरींचीं ॥८२॥

६० अंबर=वस्त्र. ६१ गगनरंगी=अस्मानीरंगाचें. ६२ नाटकिंचा=नाटकी जो कृष्ण त्याचा. ६३ सुरेंद्रांगना=अप्सरा. ६४ शिराणी=आवड.

ऐशीं चीरें सुचिर रुचिरें चारु चंद्रें चकोरें ॥
चद्राकारें चमकत चवरें चित्रवैचित्र फारें ॥
विश्वाधारें अमरवरवरें धीरगंभीरवीरें ।
दीनोद्धारें अभयवरकरें पूरवीलीं अपारें ॥ ८३ ॥

महिपानुजयुक्ति करी सुघडी । तिचि अल्प तनू न दिसे उघडी ॥
वसनाचळे देखुनि घाबरला । अभिमान गुमान भयें विरला ॥ ८४ ॥
वस्त्रांचा ढीग झाला कुरुपति वदला त्या घरामाजि याला ।
दूतीं उद्योग केला तंव लय घडला "अंबरीं अंबराला ॥
सजा चित्तीं विराला सकळिक वदती त्यास हा अंत आला ।
येखादें विघ्न याला उठुनि करि भला तैं बुवा भूप मेला ॥ ८५ ॥
नृपाची मुखश्री दिगंतीं पळाली । मनोवृत्ति लज्जासमुद्रीं बुडाली ॥
भयें वारिलें शीघ्र दुःशासनातें । न कोणी कदाचित् करी शासनातें ॥८६॥
वदे द्रौपदी कां गृहातीं प्रवेशा । मशीं खेळणें द्यूत कापट्य वेशा ॥
धरी पाश चिंतोनियां माधवातें । तिणें सोडवीलें स्वतां त्या धवांतें ॥८७॥
पुढें खेळता वारिती दुष्ट राया । न खेळा इशीं पूर्ण आतां करा या ॥
तदा धर्मभीमादिसंयुक्त जार्यां । निघाली स्वसत्वें वनालागिं जाया ॥८८॥
पराचें बरें दुःख दुर्योधनाला । परस्वाभिलाषीं बहु लोभ झाला ॥
हरी अंधजो पांडवांच्या धना हा । जनीं कोण यालागिं बोले भला हा ॥८९॥

व्योमा ही वरता विचारुनि पहा सिंधूचिये शेवटीं ।
सूर्याचे बुडखीं च मंदरगिरीमध्यें तनू गोमटी ॥
तात्पर्यें गिवसी नगांतळवटीं जो देव आहे असा ।
तो दासामति उद्धरी दृढ असे हा किंकरा भर्वसा ॥ ९० ॥

जो हें आकाश पृथ्वी तववरि विलसो वस्ति वैजापुराची ।
आकल्पानंद रूपीं सकळ जनिं असो भक्ति वैजेश्वराची ॥
व्यापारीं आपुलाल्या कुशळ धन जयो वृत्ति धर्मीं मनाची ।
सतासी प्रीति निष्ठा हरिगुणपठणीं आवडी किंकराची ॥ ९१ ॥
वाराशीरसभूमि ( १६३७ ) शालिवहना झालीं शकें निश्चिती ।
वर्षतूंत नभाष्टमी असति जे चद्या जयती तिथी ॥
श्रीरामें हृदयांतरस्थ मदये प्रेरुनि तें किंकरा ।
केला ग्रंथ असे यमांक ( ९२ ) गणना वाचा हरी जो हरा ॥ ९२ ॥

इति द्रौपदी वस्त्रहरणाख्यान समाप्त.

---

६५ वसनाचळ=वस्त्रपर्वत. ६६ अबरीं=आकाशात. ६७ धव=नवरे. ६८ जाया=स्त्री. ६९ नग=पर्वत. ७० नभ=श्रावणमास.

## चन्नलिंगकृत

# गजगौरीव्रत.

नृपति पुसत वैशंपायना नम्र वाचा । प्रकट कलह झाला कौरवांपांडवांचा ॥
कथिहुनि मुनि सांगा तृप्ति सूर्यात्मजाची । कथुनि हि करिजे विश्रांति नृप्तीक ज्याची ॥ १ ॥
परिसुनि मुनि बोले ऐक एकाग्र राया । कथि रत मृत पाडू धर्म कर्माचराया ॥
लघु शिशु धृतराष्ट्रें पाळिले पुत्रमानें । निरखुनि बहु कीजे द्वेष दुर्योधनानें ॥ २ ॥

**चाल**–श्रेष्ठ हा धर्म सत्वाचा सागर । भूतदया शांति विवेक आदर ॥
प्राणांतीं न करी असत्याचा आदर । ज्ञानिया भक्त भगवत सादर ॥ ३ ॥
पाडवां ऐसे महाराज जगीं थोडे ॥ ध्रु० ॥
परवनिता माता परद्रव्य पाषाण । परपीडा वारी देवोनियां प्राण ॥
बलप्रज्ञा ऐशी काळातें जिंकोन । ऐसें ही असता भीमासि ही ध्यान ॥ ४ ॥ पांडवां० ॥

**श्लोक**–बहु विद्या पार्थी तदुपरि हरीभक्तिरचना ॥
विलोकूनी खती शकुनिप्रति दुर्योधनमना ॥
सदा त्या पार्थाचा करिति त्रिजन द्वेष हृदयीं ॥
तदा आलें हस्तीव्रत करित गांधारि समयीं ॥ ५ ॥

**पद**–कोणीयेके वेळीं सखिया मेळीं गांधारि विराजे ॥
ब्रह्मपुत्र हा नारद तेथें अवचित केले बीजे ॥
कुरुपतिमाता परमाल्हादें नमिलीं पादाब्जें ॥
तव करुणामृत दृष्टि जयावरी नादति अक्षय भोजें ॥
आजि सुदिन पहाला हो । साधुलाभ जहाला हो ॥ ध्रु० ॥ ६ ॥
श्रीकारक गजगौरीव्रत हें बोलति निगमपुराणीं ॥
यथाविधि आचरणें जैशी वदली व्यासवाणी ॥
अर्कवार हस्त नक्षत्रीं भाद्रपदीं ये मिळणी ॥
पुत्राहातीं आणुनि माती हस्ति करावा रमणी ॥
बैसुनि वाणें दीजे हो । श्री इंद्राची हरिजे हो ॥ ध्रु० ॥ ७ ॥

**श्लोक**–निरूपी गांधारी वचन मग एकोत्तरशता ॥
अरे योजा हस्ती सकळिक तुम्हीं मन्मत व्रता ॥
अशीं वाक्यें तीचीं नमुनि सुत मृद्गोल स्वकरीं ॥
धरूनीयां आले करित गृहिं सावेव हि करी ॥ ८ ॥
करी शृंगारीला कनकमय तो भूषणाचिरें ॥

१ वनिता=स्त्री. २ सावेव=सावयव ३ करी=हत्ती.

द्विभागीं घंटांचे ध्वनि उमटती गर्जत स्वरें ॥
विलेपीला शुंडे तगतगित सिंदूर विलसे ॥
तळींच्या कल्यासी चतुर रथ तैंवी फिरतसे ॥ ९ ॥
**चाल**-मृत्तिकेचे गजीं आरूढोनि **गांधारी** । देतसे वाणें हरुषे अंतरीं ॥
ऐशी ते आली **कुंती**चे मंदीरीं । घेइ का वाण बोले ते सुंदरी ॥१० ॥
धन्य हो धन्य **गांधारी** वैभव । दृष्टि भरूनी पाहिले शांभवे ॥ ध्रु० ॥
**पद**—वस्त्राभरणीं अलंकारिली बैसे मंगलधामा ॥
ब्राह्मणसुवासिनी विधिमंत्रें भाट वर्णिती महिमा ॥
ऐशी वाजत गाजत मिरवत आली **कुंती**धामा ॥
देई वाण सोडि अभिमान एकोत्तरशतमहिमा ॥ ११ ॥
ऐशी बोले मानें हो । **कुंती**ला लाजिरवाणें हो ॥ ध्रु० ॥
**श्लोक**—गजाखालीं नारी उतरुनि दिलें वाण तिजला ॥
फिरे जों दुर्योधी कुमतिमतिनें वाक्य वदला ॥
अहो या वाणाचें त्वरित उसणें सिद्ध करणें ॥
न येतां तें आहे नरक पितरांला धिग जिणें ॥ १२ ॥
ऐके निष्ठुर वाक्य त्या कुमतिचें **कुंती** मनीं खोंचली ॥
झालेंसे मुख म्लान मान हरला दुष्टोत्तरें पोळली ॥
जैशी त्या पियूषिं असे निजमुखें व्याळें गरीं टाकिली ॥
तैसें वाक्य **सुयोधनें** चि वदतां **कुंती** जिवें खोंचली ॥ १३ ॥
**चाल**-ऐशी चिंता करी तत्क्षणीं । **पांडव** आले व्याहाळीं खेळोनी ॥
पाहाती माता चिंतेनें कवळोनी । राहिली पुसती समस्त मिळोनी ॥ १४ ॥
पांडवा ऐसे महाराज जनीं थोडे ॥ ध्रु० ॥
**श्लोक**—ऐशी दुःखित अंतरीं निज गृहीं तों **भीम** आला पुढें ॥
माते कां वदनेंदु हा उतरला सांगें मला एवढें ॥
ते सांगे गजवोवसा मम गृहा **गांधारि**नें आणिला ॥
जाता ज्येष्ठ कुबुद्धितें धरुनिया दुष्टोत्तरें बोलिला ॥ १५ ॥
घ्यावें वाण जिणें त्वरें निज करें द्यावें तिणें ऊसणें ॥
या दानासि विलंब हो न करणें केल्या कुळासी उणें ॥
ऐशीं तो कठिणोत्तरें वदुनियां मातेसवें गच्छला ॥
ऐकोनी मग **भीम** तो निज मुखें **कुंती**प्रती बोलला ॥ १६ ॥
**पद**—ऐक **भीमा** तुजलागीं सांगतें दुःख हो माझे जिवींचें ॥

---

४ पीयुष=अमृत. ५ व्याळ=साप. ६ गरा=विष. ७ वदनेंदु=मुखचंद्र.

गांधारीच्या हर्षा देखुनि अंतर माझें खोंचे ॥
एकोत्तर शत पुत्र मिळोनी व्रत पुरवीलें तीचें ॥
काय तुम्ही आणाल माती बळ किती पांचांचें ॥
काय सांगों भीमा रे । अधिक तिचा महिमा रे ॥ ध्रु० ॥ १७ ॥
अंकापासुनी पडतां तुझिया माते जन्मकाळीं ॥
शतयोजनें शिळा होती झाली ते रांगोळी ॥
आतां तरी तारूण्य आमुच्या भुजा कंद कल्लोळी ॥
शेष फणावरी माती जितुकी आणुनि देतों समुळीं ॥
तरी तुज पोटीं आलों गे । नाहीं तरि पायर झालों गे ॥ ध्रु० ॥१८॥

**श्लोक**—तो तू हा गजवोवसा निज सुखें आतां चि माते करीं ॥
योजूनी निज पायरी गजपुरीं हा मृत्तिकेचा करी ॥
ऐकोनी जननी म्हणे सुवचनीं हे सांडि रे योजना ॥
आणीं तू मृदु मृत्तिका निज करें जाऊनियां हो वना ॥१९॥

**पद**—ऐसें बोलुनियां मातेप्रति भीम आला अरण्या ॥
अमित मेदिनी[८] खाणुनी कर्दम[९] मेरूसम करि तुळणा ॥
आणुनि भरल्या हाटांबिदीं[१०][११] चौफेर न कळे गणना ॥
न भेटती कोणी कोणासी कोंडुनि पावति मरणा ।
म्हणती बरवें न दिसे हो, कुंती व्रत हें कैसें हो ॥ २० ॥

**श्लोक**—आणोनी मग टाकिला पवनजें मृद्गोल द्वारां पुढें ।
देखोनी जन सांगती जनानेत त्वद्भाग्य ह कवढ ॥
आतां आणिल पिंड तो हि दुसरा या ग्राममाथां धरी ।
देतो जीतसमाधि भीम सकळां नारीसपुत्रीं घरीं ॥ २१ ॥
ऐकोनि तीणें जनपीडनार्थी । भीमास वर्जी तंव गम्य पार्थी ॥
पार्थीतसे अर्जुन काय आहे । माता स्वपुत्राप्रति बोलताहे ॥ २२ ॥

**पद**—तों आले धर्मादिक किरिटीनकूळसहदेवेशीं ।
पाहति तंव ते प्रचंड माती भरली नगरप्रदेशीं ॥
येउनि पुसती निज माते प्रति तंव ते सखेद क्लेशीं ।
अर्जुन म्हणे अजि अपूर्व वाटे हिमकर कां ज्वर सोसी ॥
मजला कैसें कळलें हें । कोणें केले तुज छळ हे ॥ २३ ॥
पृथा म्हणे हो ऐक फाल्गुना पूर्व वृत्तांत मी सांगे ।
नारद येउनी व्रत सांगितलें तव गांधारी संगें ॥

---

८ मेदिनी=पृथ्वी ९ कर्दम=चिखल. १० हाट=बाजार. ११ बिदी=रस्ते.

एकोत्तरशत पुत्र मिळोनी गज केला अभंग ।
बैसुनि त्यावरि दिधलीं वाणें शोभविलें तिणें त्रिजग ॥
मजला दुःख तें भारी हो, कोण माझें संकट वारी हो ॥ २४ ॥
ऐशी सोळा दिवस पूजा करोनि दिधलीं वाणें ।
पुढिले जन्मी ऐरावतप्राप्ति होय सन्मानें ॥
ऐकोनी वीर हास्य करिती आइक माते वचनें ।
नेणों जन्म पुढील कोण अतां चि मज हें करणें ॥
आणितों ऐरावतितें । पाहें माझे गतितें ॥ २५ ॥

**श्लोक**—जन्मांतरें तीं तुटलीं स्वभावें । जेव्हांश्रिलें श्रीहरिपाद भावें ॥
मृद्रोलहस्ती तरि भव्य वाणा । पूजोनि पूढें फलप्राप्ति कोणा ॥२६॥

**चाल**—अर्जुन म्हणे याचेनि फळ काये । पुत्रातें माता कुंती सांगताहे ॥
गजपूजनें ऐरावतीप्राप्त होये । पुढिलीये जन्मीं येवढें फळ लाहे ॥२७॥
कवण हो खेद वाटला अंतरा । त्रिभुवन ऊभें करूं तुझ्या उत्तरा ॥
आतांची ऐरावत आणूं सत्वरा । तरीं च तूझा पुत्र मी हो खरा ॥२८॥
पुत्राची गोष्ट ऐकोनी हर्षली । म्हणे हो आजी गांधारी बैसली ॥
गजस्कंधीं बैसोनी मिरवली । आम्हांसि वाण देऊं जे पैं आली ॥२९॥

**श्लोक**—आता चि इच्छा करिं पूर्ण माते । आणीन ज्याची भगिनी रमा ते ॥
त्या चारदंता उतरोनी शिष्ट । आणूनि मी दाविन तूज [illegible] ॥३०॥

**पद**—बोलसि तूं अघटित वार्ता ऐकवेना जे कर्णीं ।
स्वर्गीचा ऐरावत प्रचंड केंवि पाय दे धरणी ॥
पूर्वीं रामें आपुल्या प्रौढी दगड तारिले जिवनीं ।
परि हा दिग्गजकुळमंडण तो नाहिं देखिला कोणीं ॥
आक्रमी भूमीसि हो । करणी उत्तम कैशी हो ॥ ३१ ॥
अर्जुन म्हणे जननीये आजि तूं पाहें आपुले नेत्रीं ।
स्वर्गींचा ऐरावती आतां चालवितो या धात्री ॥
तरी च पांडूकुमर तूं मानीं सोमवंशीचा क्षेत्री ।
नाहींतरि व्यर्थ चि भूभार होऊनि राहें धरित्री ॥
ऐसा केला जो पण हो । आणितां न लगे मज क्षण हो ॥३२॥

**श्लोक**—बोलोनि ऐसें मग वाण चापीं[१२] । लेहोनि पत्रा लिहिलें प्रतापीं ॥
मंत्रोनियां सायकें[१३] तीव्र सोडी । इंद्रालयालागिं सुशीघ्र धाडी ॥ ३३ ॥
कडकडाट तो थोर जाहला । भडभडां बहू वायु सूटला ॥

---

१२ चाप=धनुष्य. १३ सायक=बाण.

गडगडी तदा निर्जरींसभा । झडझडोनि इंद्राहिलौं उभा ॥ ३४ ॥
बाण पातला इंद्रआसनीं । लक्षिती पुढें देव लोचनीं ॥
त्या शचीवरें उठुनि पाहिलें । सायकामुखीं पत्र लेखिलें ॥ ३५ ॥
पद—देखुनि बाण सतेज पत्र मुखीं वज्रधर थरथर कांपे ।
गर गर गर फिरवी डोळे सद्गुरू पाहे कोपें ॥
चक चक चक सर्व हि झाले म्हणती कोणें भूपें ।
बाणाग्रीं लेहोनि पत्र कां पाठविलें इंद्रासमिपें ॥
ऐसा कोण बलि हा हो । करितो आम्हांसी रळी हो ॥ ३६ ॥
श्लोक—सोडुनी मग तिहीं सुपत्रिका । पाहिली वरि सुकुण्णमुद्रिका ॥
तो बृहस्पति सभेसि वाचितो । देवनाथ एकचित्त ऐकतो ॥ ३७ ॥
सकल हि उपमा जे जे तुम्हालागीं साजे । अह शतमखप्राप्ति स्वामि तेथील राजे ॥
नमन हे तुह्मि ध्यावें श्रीहरीसेवकाचें । तदुपरि परिसीजे कार्य पांडूसुताचें ॥ ३८ ॥
सुरकुळमणि तुम्हा एक विज्ञप्ति आहे । सुरगजवर कुंती स्वया व्रता इच्छिताहे ॥
म्हणउनि प्रभुवर्ये धाडिजे गौरवर्ण । नहि तरि न म्हणीजे पोर हें टीरवाणी ॥३९॥
चाल—अमरेंद्र ऐरावती पाठवावें । कुंतीव्रतकरावें वैभवें ॥
न दावें तरि तैसें ची लीहावें । काहीं एक मग करिजेल स्वभावें ॥४०॥
पद—व्रत झालिया सवें चि धाडूं ऐरावती सुरेशा ।
न पाठवाल तरि उणें येतसे अमुच्या सोमवंशा ॥
कीं उत्तर सत्वर हस्ति पाठवा ऐसा हा अंदेशा ।
नाहिं तरिं तैसा विचार करणें घडेल हो सर्वेशा ॥
पांडुकुमर आम्ही हो । कळों येइल स्वामी हो ॥ ४१ ॥
चाल—विचारी शक्र सद्गुरु सपन्न । मानवीं धरिला देवांशीं अभिमान ॥
बृहस्पति म्हणे ऐसें आहे जाण । अजिंक्य पांडु त्रिभुवनीं नदन*॥४२॥
पद—बृहस्पति म्हणे सुराधीशा ऐकें अमृतपान ।
पूर्वी राजे बहूत झाले कोण पाठवी बाण ॥
ऐशापरी पाठवूनि जरी किरिटी करि सधान ।
काय अम्ही अवघे करितों घेता अमुचा प्राण ॥
पांडुकुमार बळी हो । करिती रणखदळी हो ॥ ४३ ॥
चाल—आणीक नवल तयाचें नेणसी । हस्तगत झाला वैकुंठनिवासी ॥
त्रिभुवन हातीं देईल तयांसी । मग तूझी कथा काय ते ऐकसी ॥ ४४ ॥

---

१४ निर्जरीसभा=देवाची सभा। १५ मुद्रिका=शिक्का. १६ शतमख=इंद्र. १७ अमृतपान=हे इंद्रा * इंद्राहिला=इंद्र राहिला.

पद—कठिणोत्तरें ऐशीं ऐकून शचिवर क्रोध न साहे ।
शैलांची मी मौळें कुट केलीं वज्रघायें ॥
दितिपुत्राचें निर्मूळ केलें कोण पराक्रमि आहे ।
अर्जून बाल हें काल जन्मलें मजशीं भिडों पाहे ॥
अपूर्व कैसें वाटे हो ॥ रुपती नवनितकांटे हो ॥ ४५ ॥

सवाई—वाचुनि पत्र बृहस्पति त्यावरि पार्थपराक्रम सांगत इंद्रा ।
तो हरिचा बहु आप्त धनंजय हे निरखीं नयनीं हरिमुद्रा ॥
यास्तव आन मनीं न धरीं करिं सिद्ध सुशोभित धाडिं गजेंद्रा ।
ऐकुनियां गुरुवाक्य परी गज धाडुं असें न वटे मनिं इंद्रा ॥ ४६ ॥
हा गज विराजित ये स्थलिं तो अवनी[१८]वरि जाइल कैसा ।
हे गुरुराज मनीं उमजा तुम्हि यासि विचार सुचे मज ऐसा ॥
सांगुनि धाडु तया नृपराप्रति त्या करिं सिद्ध कळेल हि तैसा ।
दूत म्हणे बहु हे अमराधिप हस्तिस न्या कथिं हें हरिदासा ॥ ४७ ॥

चाल—प्रत्युत्तर ऐसें चि लिहावें । दिधला जी हस्ती नेइजे स्वभावें ॥
गज नेतां वळ कळेल स्वभावें । तेथें हें बहु कासया बोलावें ॥ ४८ ॥

पद—सुरगुरु म्हणे सुराधीशा ऐके सगुणराशी ।
पत्रीं लेहूनि धाडा ऐसें न्यावें ऐरावतीसी ॥
असेल जरि त्या भक्त पराक्रम कळों ये सर्वांसी ।
म्हणोनि लेहुनि बाणिं पाठविलें भूर्जपत्र तळासी ॥
मार्गणें[१९] उतरे कैसा हो ॥ सपक्ष अहिरिपु[२०] जैसा हो ॥ ४९ ॥
जैसा शंभू विराजमान बैसे सुरगणपाळीं ।
तैसा धर्म रत्नसिंहासनिं बंधूंच्या सम मेळीं ॥
भीष्म द्रोण कृपाचार्यादि हासति आनंदकल्लोळीं ।
तंव तो बाण मेघजळासम धर्मपाद प्रक्षाळी ॥
म्हणती अपूर्व धरणी हो ॥ पार्थे केली करणी हो ॥ ५० ॥
देवेंद्राचें पत्र कृपाचार्य वाचुनिया पाहे ।
स्वस्ति श्रीसालकृत पांडुकुमरा अक्षय राहें ॥
थोर पराक्रम बाणीं पाहुनि मम मानस सुख लाहे ।
सोमवंश कुळतीलकमंडण कृष्णकृपा तुज आहे ।
न्यावा दिग्गज तुम्हीं हो ॥ आटक न करू आम्हीं हो ॥ ५१ ॥

सवाई—येउनि दूत नरा प्रति सांगति शीघ्र असें तुम्हि हस्तिसि आणा ।

---

१८ अवनी=पृथ्वी. १९ मार्गण=बाण २० अहिरिपु=गरुड.

ऐकुनि सेवक वाक्य धनंजय ते क्षणिं चिंतित सद्गुरु द्रोणा ॥
शीतें[21] करें स्परशोनि करी शरवृष्टि नसे परमीत हि बाणा ।
ते नभिं वाट करी शरदाट अचाट पराक्रम पार्थ सुजाणा ॥५२॥

चाल—पत्रिकागर्भ कळला अर्जुनासी । शराचा सेतु बांधिला गगनासी ॥
महिपासुनियां अमरेंद्रभुवनासी । सुखरूप ऐरावति आणी सदनासी ॥५३॥

श्लोक—तेव्हां म्हणे अर्जुन भीमसेना । जाऊनि तुम्हीं सुरहस्ति आणा ॥
या बाणपंथीं ऐरावतीसी । जाऊनि बोला सुरनायकासी ॥ ५४ ॥
कोठें तुझा रे तनुशुभ्र हस्ती । आश्चर्य केलें विबुधीं[22] समस्तीं ॥
सांगे गुरु अर्जुनसेवकाचा । दावा त्वरें हस्ति तरी च वांचा ॥ ५५ ॥

चाल—उच्छिष्टें काढी धर्माचे मंदिरीं । अर्जुन वाजी हांकितो निज करीं ॥
एक वेळ झाला तयाची अंतुरी[23] । अल्प ही न्यून पडूं नेदी श्रीहरी ॥५६॥
दाऊनी ऐरावतो देवराये । निर्विघ्न व्हाव भलत्या उपायें ॥
बोलत मुखें भीम महावतींसी[24] । तूं चालवीं गज हा हस्तिनापुरासी ॥ ५७ ॥

श्लोक—महावतें तो ढकलूनि हस्ती । आला म्हणे हा गजराज मस्ती ॥
घालोनि शुंडा मग भीमसेना । ओढीतसे तो परि हा ढळेना ॥ ५८ ॥

चामर—धरोनि पाय हस्तकें गजासि नेतसे तुकें ।
करोनि शीघ्र मोटकें स्वपाठि बांधि कौतुकें ॥
करोनि सिंहगर्जना चतुष्पदीं च बांधिला ।
गदेसि घालुनी करीं धरोनि स्कंधिं चालिला ॥ ५९ ॥
सभेसि भीम जाउनी म्हणे सुरेंद्र बोलणें ॥
नगारि[25] बोलिला तुम्ही कदापि हो न रूसणें ॥
करींद्र हो विडंबिला नरेंद्र तो म्हणे असे ।
विडंबना विलोकिजे म्हणासि कोण या पुसे ॥ ६० ॥
विडंबना विलोकुनी सुरेंद्र कोपला मनीं ।
गजासि सोडवीतसे म्हणे अकीर्ति मेदिनी ॥
विभूषणें मि घालितों तुम्हीं क्षणेक पाहिजे ।
सुशोभितासि नेलिया तुम्हासि साध्य जाइजे ॥ ६१ ॥

श्लोक—चतुरदंतपती करिं भूषिला । चतुर स्कंधिं महावत बैसला ॥
चतुरपाणिसखाग्रजें[26] त्यावरी । बसुनि आणितसे अवनीवरी ॥ ६२ ॥
शरपथें उतरेल विराजती । घणघणामित किंकिणि[27] वाजती ॥

---

२१ शीत=मनुष्याचीकोरी २२ विबुध=देव. २३ अंतुरी=स्त्री. २४ महावत=हत्तीला हाकणार. महात. २५ नगारि=इंद्र. २६ चतुरपाणिसखाग्रज=भीमसेन. २७ किंकणी=घटा.

सकळिकां बहु कौतुक वाटलें । निरखितां जनिं सौख्य चि दाटलें ॥ ६३ ॥

पद—पाहतां दिसे शोभा दंता उटणें केलें ।
आरक्त नेत्रीं दीप्ति जैशी रत्न खेवणें केलें ॥
शुंडादंडें झोलित पर्वत मंद मंद गति चाले ।
ऐसा इभें उतरतां भूतळिं देखुनि कौरव भ्याले ॥ ६४ ॥
मारिति दुर्धर हांका हो, पोटीं भरले धाका हो ॥
आला ऐकुनि गज तो धर्म सांगे भीमसेना ।
धृतराष्ट्रादिक गौतमपुत्रा नमिजे भीष्म द्रोणा ॥
सर्वांप्रति जाऊनि वैरकोदर तो वंदित चरणा ।
ऐसे आले निजनगरासी नमिती दिग्गजचरणा ॥
म्हणती भगीरथ जेव्हां हो, गंगा आणी बरवी हो ॥ ६५ ॥

श्लोक—जरि पराक्रमसे तरि मानिती । न करि विक्रम कोणि न मानिती ॥
शचिवरें हि पराक्रम पाहिला । म्हणुनियां गज सत्वर धाडिला ॥ ६६ ॥

पद—मग तो वारणें पुजोनि सर्व हि आले मिरवत नगरीं ।
नाना वाद्यें वाजत पांडुरायाचे महाद्वारीं ॥
सखियामेळीं परमाल्हादें कुंती ये सामोरी ।
बोलावूनि झडकरि गांधारी पुजाविधितें सारी ॥
बैसली दिग्गजपृष्ठीं हो । घडलें नाहीं सृष्टीं हो ॥ ६७ ॥

श्लोक—करुनि रुचिर पूजा कुंति आरूढ झाली ।
मिरवत मग चाले देउ वाणा निघाली ॥
स्थिर करि सुरहस्ती नारि गांधारिगेहीं ।
उतरुनि मग देते वायनालागिं पाहीं ॥ ६८ ॥
निरखुनि सुरहस्ती नारि विस्मीत झाली ।
अघटित करणी हे या सुतें दाखवीली ॥
बहु सुत हरणीसी जाहले काय कामा ।
उपजत करिगेहें दाविती सिंहनामा ॥ ६९ ॥
म्हणउनि अति प्रेमें क्षेमें कुंतीस दीले ।
तव व्रत इह जन्मीं सांग सिद्धीस नेलें ॥
म्हणउनि तय वेळे आदरें बोलियेली ।
सुयुधनहृदयीं ते काळिमा वाढियेली ॥ ७० ॥

---

२८ इभ=हत्ती. २९ वरकोदर=वृकोदर (भीम). ३० वारण=हत्ती, गज ३१ क्षेम=आलिंगन.

चाल—वंदोनी गजा आरूढली त्वरित । तिळकंठें युक्त शर्करासमवेत ॥
नानापरिचीं वाद्यें हो वाजत । आनंदें कुंती वोवसा भरीत ॥ ७१ ॥

पद—ऐसा सोहळा हस्तिनापुरीं हस्तीचा पूर्ण झाला ।
अमरेशापति ऐरावत सन्मानें पाठविला ॥
ऐशी पूर्वज कीर्ती वैशंपायन जन्मेजयाला ।
सांगे द्रोणदक्षिणे द्रुपद बांधुनि हस्तीं दिधला ॥
केला सद्गुरू मान्य हो । बाळक राम अनन्य हो ॥ ७२ ॥

श्लोक—देखोनि तो विक्रम अर्जुनाचा । संतापला जीव सुयोधनाचा ॥
तें पासुनी मत्सर वाढलासे । रायासि पूर्वार्थ निरूपिलासे ॥ ७३ ॥

चाल—झुंजारी ऐसा नकुळ आगळा । सहदेव जाणे ज्योतिषा सकळा ॥
पांचा ही परिस द्रौपदी जवळा । क्षण एक न्यून पडूं नेदी सांवळा ॥ ७४ ॥
पांडवचरित्र वर्णिलें श्रीव्यासें । जगवंद्य केलें वैकुंठनिवासें ॥
श्रवणमात्रें तुटती भवपाश । बस्वलिंगा तारिलें सहवासें ॥ ७५ ॥

श्लोक—हा गौरीगजवोवसा परियसा पुण्यास व्यापारसा ।
सेवाना अळसा बहू भरवसा मानूं नका मानसा ॥
काळाचा वळसा कथामृतरसा एकाग्र चित्तीं वसा ।
नोहे जन्म असा पुढें तरि कसा श्रीकृष्णपायीं वसा ॥ ७६ ॥

॥ इति गजगौरीव्रत संपूर्ण ॥

---

## अथ महाबळभटचरित्र.

हरी जगत्रजननी प्रसूत कंसभुवनी ।
श्रीकृष्ण जन्मला मनीं करी जनासि मोहनी ॥ १ ॥
कित्येक बंधमोचनें तयासि काय बंधनें ।
करोनि पंथ मोकळा श्रीकृष्ण जाय गोकुळा ॥ २ ॥
रिपू म्हणे चला चला प्रसूतिकाळ पातला ।
विशेष कंस तो हटी पदीं धरोनि आपटी ॥ ३ ॥
बळेंचि हस्त पीटिला तसाचि हस्त निष्टला ।
म्हणे रिपु तुझा रिपू श्रीकृष्ण गोकुळाधिपू ॥ ४ ॥
मनांत कंस खोंचला उपाय एक सूचला ।
उपाय कोणसा भटो जिवाचि काळजी तुटो ॥ ५ ॥
वदे भटू नृपापुढें उकावला चढोवढें ।
बळें चि पैज मारितों तुझा रिपू विदारितों ॥ ६ ॥

बळें बळाविली कळी कटया भट्ट मामळी ।
उपाध्या कंस हा कुळा म्हणोनि वद्य गोकुळा ॥ ७ ॥
बळें बलाढ्य सूभटू बळें करोनियां हटू ।
बसोनियां चि नेहटू प्रशस्त वाचितो पट्टे[३२] ॥ ८ ॥
हटें हटें च उद्धटें कुटीळ काळलंपटें ।
उपायसा प्रयोजिला मुलासि घात योजिला ॥ ९ ॥
बहू मिळोनि सुंदरी मुखें म्हणे हरी हरी ।
तुम्हांसि वोखटी परी कुमार हो मुळावरी ॥ १० ॥
बहू मिळोनियां वधू कराल बाळकावधू ॥
तरी च वंश सावधू यथार्थ सांगतो विधू ॥ ११ ॥
हळू च कृष्णनाटकें चरित्र मांडि नेटकें ॥
उगा चि थोर मारका भटासि बैसला धका ॥ १२ ॥
पदार्थ मात्र चालवी भटासि पाद्य घालवी ॥
हरीलीळा कळे चि ना अचेतनास चेतना ॥ १३ ॥
सहाण खोड लाटणी कित्येक खुंट पाटणी ॥
इळ्या पळ्या परोपरी उठावल्या भटावरी ॥ १४ ॥
पलान[३३] तंग तोबरे लगाम जेरबंद रे ॥
बळाविली कुटाकुटी भटू बहुत हिंपुटी ॥ १५ ॥
सदेव पाट हालले समस्त देव चालिले ॥
बळें शुंभा[३४] धवाविती कित्येक ढेंकळें भिती ॥ १६ ॥
भरे मुखांत मृत्तिका पुरे पुरे नका नका ॥
हरीचरित्र हें भलें जनीं समस्त शोभलें ॥ १७ ॥
करील देहदंडणा हरील जन्मखंडणा ॥
उदास दास तो कवी बहु जनासि शीकवी ॥ १८ ॥
इति महाबळभटचरित्र संपूर्ण ॥

---

## अथ द्वादशमास.

गजास्यीं[३५] वंदूनीं कमळजसुता[३६] पाय सुमनीं ।
पुजूनीया भावें गुरुचरण ध्यातों अनुदिनीं ॥
सदां सर्तीं स्नेहें मम हित बहू हें चि करणें ।
हरीनामीं प्रीती जडवूनि निजानंद भरणें ॥ १ ॥

---

३२ पट्टे=पचांग. ३३ पलान=खोगीर. ३४ शुंभा=गोवऱ्या. ३५ गजास्य=गजमुख. ३६ कमळजसुता=सरस्वती.

शृंगारलीलारसपीयुषासी । न सेविती ते नर पापराशी ॥
विलासिनीकौतुकवृंद कर्णी । ऐकोनि ध्यावा हरि चक्रपाणी ॥ २ ॥

**सवाई**—एकदिनीं निशिचे समयीं प्रियकामिनि क्रीडति सुंदर सेजे ।
मोगरिचंपकजातिफुलें मद फार सुगंधित मचक बोजे ॥
तेल भरोनि सुगंध चहूंकड सोज्वळ दीपक मोहें विराजे ।
त्या समयीं रतिमन्मथनायक सिद्ध असे सह घेउनि फौजे ॥ ३ ॥

**श्लोक**—शृंगारसोळा करूनी सुखेंशीं । घालीत माळा प्रियकंठदेशीं ॥
परस्परें लावुनि चंदनासी । तांबूल देती स्वमुखें विशेषीं ॥ ४ ॥

कंठीं धरोनि कवळी पति तो प्रियेसी । चुंबीतसे वदन रोवुनियां रदांसी ॥
झाडी मुखासि तरुणी मग वक्र पाहे । तें सौख्य इंद्रपदतुल्य चि भासताहे॥५॥
धरूनि कुचयुगातें भोगकाळीं पतीनें । विवसन करूनी स्त्री तोषवीली रतीनें ॥
मग उठुनि मृगाक्षी सांवरी नीरिबंदा । हसत वदन बोले लागला थोर धंदा ॥ ६ ॥
ऐशी सुखें क्रमुनियां रजनी प्रभाते । बोले स्त्रियेसि पति आइक शब्द कांते ॥
आहे सुमूर्त गमना मज तीर्थयात्रे । आजि प्रयाण करणें रमणीयगात्रे ॥ ७ ॥

निर्धार संवत्सर एक पाहीं । जन्मोनियां सार्थक आन नाहीं ॥
वियोगदुःखानळ तो स्वदेहीं । नको करूं मत्पदआण वाहीं ॥ ८ ॥

पतिगमन मृगाक्षी ऐकुनी स्तब्ध झाली ।
सजळ नयन चित्तीं आठवी चंद्रमौळी ॥
शिव हर मृड शंभो त्रैहि कैलासवासी ।
स्मरत विकळ गात्रें अंग टाकी भुमीसी ॥ ९ ॥

**सवाई**—विव्हळ देखुनि ते युवती प्रिय धांवुनियां कवळी हृदयासी ।
अश्रु पुसोनि म्हणे ललने त्यजि खेद अधीर तु काय हि होसी ॥
या पुरुषासि प्रवास निरंतर धीर धरोनि विचार मनासी ।
तूज हि नेइन मी परि बाळक लाहन यास्तव राहि सुखेंशीं ॥ १० ॥

**श्लोक**—सबोधुनी वदन चुंबित कामिनीशी ।
पाकक्रियेसि उठवी गुणपूर्णराशी ॥
घालोनियां विविधभोजन हो पतीला ।
तांबूल देउनि तिणें प्रणिपात केला ॥ ११ ॥
धरूनि हनुवटीतें ऊठवीली पतीनें ।
मग मृदु पतिला ते शब्द बोले मतीनें ॥
स्मरण धरूनि माझें शीघ्र या प्राणनाथा ।

---

२७ वृंद=समूह. २८ रद=दांत २९ त्राहि=रक्षणकर

विरहजनितदुःखा कोण साहेल वेथा ॥ १२ ॥
बोले प्रियेसि पति आइक निश्चयातें ।
संवत्सरासि दिन एक न होय मातें ॥
आनंदरूप सदनीं असिजे प्रियेसी ।
ध्यावा निरंतर हरी हृदयावकाशीं ॥ १३ ॥
सवाई—मंजुळ शब्द वदोनि तिला समजावुनि कांत करी गमना ।
ते क्षणिं ते उँपरीवरि सत्वर वेंघुनि पाहि पतीवदना ॥
दृष्टिस गोचर तों अवलोकुनि जे क्षणिं तो न दिसे नयनाला ।
व्याकुळ निर्बळ चावर जाउनि कामिनि काय वदे सखियांला ॥ १४ ॥
श्लोक—कशी राहूं आता पतिविण सख्या हो क्षणभरी ।
त्यजावें या देहा त्वरित उदरीं घालुनि सुरी ॥
अळंकारा भारा हरुनि मृदु हारा विषधरीं ।
परी ज्याची तोडा त्वरित विखुरा मौक्तिकसरा ॥ १५ ॥
संवत्सरप्रतिपदेसि प्रियोत्तमानें । केलें प्रयाण सखि विप्र पुजूनि मानें ॥
त्या दीसहूनि तिणें मग मास बारा । कल्पासमान क्रमिले विसरे शरीरा ॥ १६ ॥
चैत्रीं आम्रवनें प्रफुल्लित बहू केलीं वसंतें बरीं ।
वाया शीतळ मंद वास कुसुमें मोव्या श्रमातें हरी ॥
तेथें जाति समस्त लोक वनिता घेवोनि संगे पहा ।
क्रीडा त्या विविधा करोनि सखया संतुष्ट होती महा ॥ १७ ॥
माझा पती जरि गृहीं असता सख्या हो । घेत्यें वसंत ऋतुचा अतिसौख्यलाहो ॥
रात्रीं निशाकर करी बहु तप्त देहा । आरण्य तुल्य सखि मानितसें स्वगेहा ॥ १८ ॥
वैशाखमास मधुसूदनतोषकारी । आला नसे पति सखे शिण होय भारी ॥
शृंगारयुक्त प्रियहस्त धरोनि नारी । न्हाती जळांत स्तविती वदती मुरारी ॥ १९ ॥
ऐकोनि केशवकथा जळकुंभदानें । देती द्विजासि दधिभोजन थोर मानें ॥
चर्चूनि चंदनसुगंध टिळे कपाळीं । लावूनि त्या निज सुखें सखि सर्व काळीं ॥२०॥
प्रातःकाळीं ये रिती पुण्यकर्मे । भक्तीयुक्ती सारुनी ते स्वधर्मे ॥
गाती गीती कृष्णगोपाळनामें । जेणें होती चिन्मयानंदधामें ॥ २१ ॥
वैशाखीं बहु चांदणें पडतसे पीयूषधारेपरी ।
ते वेळीं स्वपतीसमीप चतुरा त्या क्रीडती सुंदरी ॥
आलिंगोनि पतीस काय म्हणती लावा स्तना वदना ।
त्या मीसें कुचमर्दना करविती संतोषती अंगना ॥ २२ ॥

---

४० उपरी=माडी ४१ विषधर=साप.

रिझवुनि स्वपती वपु सुंदरा । कुसुमहारविराजित कंधरा ॥
प्रियमुखीं मुख घालुनि विव्हळा । रतिस इच्छित चंद्रकलोज्ज्वळा ॥२३॥
हा मास गे सखि पतीविण व्यर्थ गेला । वीयोगदुःख अनळानिळ दीप्त झाला ॥
आतां करूं कसि मि काय उपाय नाहीं । मातें नसे जिवित आस न आन कांहीं ॥२४॥
आला ज्येष्ठ विशेष ऊन पडतें वृक्षातळीं सावली ।
सेवूनी क्षण एक कांतसदनीं[४२] गाईन नामावली ॥
पावें जो श्रम तो हरी यदुपती नाहीं सुखाची कला ।
मार्गी होतिल कष्ट जाण सखिये भेटेल कैं हो मला ॥ २५ ॥
सावित्रीवट पूजुनी जंव गृहीं आली असे निश्चळा ।
देखोनी पतिवीण रिक्त सदना झाली असे व्याकुळा ॥
कैंची शुद्धि सुबुद्धि हारपुनियां दुःखीत झाली मनीं ।
कांतावीण दिशा समस्त विजना झाल्या मला साजणी ॥ २६ ॥
आषाढमास निघता प्रिय फार चिंतें । दे आम्रभोजन पवित्र सदा द्विजातें ॥
श्रीपंढरीशपदपंकजदर्शनाला । जाऊनि कीर्तन करी बहु हर्ष त्याला ॥ २७ ॥
आला श्रावणमास जाण पडळे गर्जे कसें अंबरीं ।
तेव्हां तें भययुक्त चित्त सखये होतें बहूतां परी ॥
वीजांचे कडके अनेक उठती घोरांधकारें दिशा ।
मेघाची जळवृष्टि फार पडते कैसा धरूं धींवसा ॥ २८ ॥
वाटे या समयीं पतीस हृदयीं आलिंगुनी मंचकीं ।
बैसोनी स्वमुखें सुगंधित विडा घालोनि त्याचे मुखीं ॥
आतां काय करू कसा धिर धरूं आणा तुम्ही स्वामिया ।
झाला जीव उदास श्वास भरला कीं आग लावा वया ॥ २९ ॥
**सवाई**—सावध होउनि काय वदे सखयाप्रति हात धरोनि कपोलीं[४३] ।
या महिन्यांत समस्त हि पूजिति शंकर सांब निशाकरमौळी[४४] ॥
नाथविना मि अनाथ असें सखि प्राणपती शिवपूजनकाळीं ।
संगि बसोनि मला विविधार्चन सारुनि जाणत तोषवि शूळी ॥ ३० ॥
**श्लोक**—नागपंचमी नागपूजनें । घालिती स्त्रिया फार भूषणें ॥
घेउनी करीं रम्य टीपरी । गाति नाचती त्या परोपरी ॥ ३१ ॥
गोकुळाष्टमी कृष्णपूजनें । देखुनी सये ये रिती जनें ॥
लोक सारिती विप्रभोजना । आठवे मनीं प्राणमोहना ॥ ३२ ॥
कृष्णभक्त पति साजणि माझा । भक्तियुक्त करि पूजन वोजा ॥

---

४२ सदन=घर. ४३ कपोल=गाल. ४४ निशाकरमौळी=चंद्रशेखर [ शिव ].

कांतिवीण न रूचे मज कांहीं । झोंबला विरहपन्नग देहीं ॥ ३३ ॥

सवाई—भाद्रपदी हरितालिकपूजन मी करिते परि गोड न वाटे ।
श्रीगणराजचतुर्थिव्रतास करीन सखे कधिं कांत सुभेटे ॥
मीन जसा उदकाविण व्याकुळ या परि सोशिन दुःखचपेटे ।
कांतवियोग कसा घडला हृदयीं विरहानळ फार च पेटे ॥ ३४ ॥
आश्विनमास जनास सुखास करी सजणी नवरात्रप्रसंगें ।
स्थापुनियां घट सप्तशतीस्तव वाचिति देविपुढे नर संगें ॥
होमविधान सिमाक्रमणा करिती जन नैष्ठिक आपुलि रंगें ।
येति गृहा तंव सन्मुख कामिनि देखुनि विव्हळ होति अनंगें ॥ ३५ ॥

श्लोक—ऐशा दुखाच्या दिवसांत कांतें । प्रयाण केलें सखि दूर पंथें ॥
वियोगदुःखास कदापि नेणें । त्या प्राणनाथाविण व्यर्थ जीणें ॥ ३६ ॥
कार्तीकमास बरवा हरितोषकारी । स्नानें करोनि स्वपती पुजिती मुरारी ॥
वृंदावनीं तुळसि पूजुनि दीपदानें । केल्या पुन्हा न जननीजठरासि येणें ॥३७॥
चंडचंडिकाअंचळें अती । अग्निचेपरी देह ताविती ॥
राहुनें निशानाथ ग्रासिला । मागुती कसा दुष्ट वांचला ॥ ३८ ॥
लोक अमृता यासि बोलती । व्यर्थ गे सखे नाम ठेविती ॥
विहिणी स्त्रिया जाळितो बळें । वैर सांडिलें थोर या खळें ॥ ३९ ॥
दूरि तो करा दुष्ट वेगळा । पाहुना कधीं या अमंगळा ॥
घातकी बहू दुष्ट वोंगळा । काळिमा दिसे मध्यमंडळीं ॥ ४० ॥

इति द्वादशमास संपूर्ण.

---

## महिम्नस्तोत्रसमश्लोकी

## उपोद्घात.

..............म्हणवित सुनैवेद्य जरि तो ॥ ३ ॥
गुणाकारें भूतें प्रकटुनि न जो लिप्त अगुणी ।
तयातें तांबूलार्पण उचित कैसें बहुगुणी ॥
करी जो त्रैलोक्या सफळ फळ त्या अर्पण कसें ।
स्वयें धाता नारायणमुनिमुखें बोलत असे ॥ ४ ॥
स्वरोमाचारधीं बहु भुवन अंडें धरितसे ।

---

१५ पन्नग=साप ४६ या प्रकरणाचा बाकी राहिलेला भाग आम्हास मिळाला नाहीं.

१ या स्तोत्राच्या उपोद्घाताचे पहिले पावणे तीन श्लोक मिळाले नाहींत.

तया माथां ढाळी जन मुढमती चामर कसें ॥
नटे सर्वी माया समजुनि तया नर्तन वृथा ।
महा घोषें नादध्वनि अनुभवें वाद्य नसतां ॥ ५ ॥
न जाणे ब्रह्मा तो श्रुतिनिगमशास्त्रा हि महिमा ।
शिणे लक्षूं जाता गुरु सुरपती शेष महि मा ॥
स्तवाया ऐशातें त्रिभुवनि दुजा योग्य न असे ।
करी स्तोत्रा त्याचें फळ सकळ ही त्यांत विलसे ॥ ६ ॥
स्वमतिची जंव ते अवधी पुरे । तंव सुनिश्चित स्तोत्र करी पुरें ॥
निज गिरेसें पवित्र करावया । स्तविन योग्य तथापि वरावया ॥ ७ ॥
न पूजेसि ठाव स्तुती तेथ कैशी । दिसे भिन्नता येथ शका चि ऐशी ॥
श्रुती वेद हे ज्या पर्ये सर्व जाती । तशी आवडीची असे एक जाती ॥८॥
असा भाव जाणोनियां पुष्पदंतें । स्वयें अर्पूनी वाक्यपुष्पें सुसतें ॥
पदें कल्पुनी अर्चिजे शूलपाणी । जनीं सज्जनीं ऐकिजे ते सुवाणी ॥ ९ ॥
महिम्नस्तुती जे अशी एक भावें । करूनी गणामाजी श्रेष्ठत्व पावे ॥
निजानंद अर्थीं भरे चित्त जेव्हां । निदिध्यासितां मुक्ति तात्काळ तेव्हां ॥१०॥

## समश्लोकी.

**महिम्नः पारं ते०**

परं पारा तूझ्या अविद्वुष असा योग्य न जरी ।
स्ववाणी ब्रह्मादि स्तविति न कळे अत हि तरी ॥
अवाच्या ऐशातें स्वमतिपरिणामंविधिवरी ।
अशा स्तोत्रा मातें हर निरपवादा परिकरीं ॥ १ ॥

**अतीतः पंथानं—**

नमो वाचा मार्गें अमित महिमा गोचर नसे ।
श्रुति व्यावृत्तीनें सचकित हि होतां नगि वसे ॥
असा वर्णूं कैसा अगणितगुणी कोण अशाई ।
पदा अर्वाचीना समकरणशब्दादिविषयीं ॥ २ ॥

**मधुस्फीताः—**

मधुस्फीता वाणी अमृत तव माधुर्यलहरी ।
तुझी हे ब्रह्माख्यस्तुति सुरगुरो विस्मय करी ॥

२ गिरा=वाणी. ३ महिम्न=मोठेपणाची ४ निदिध्यास=मनन. ५ अविद्वुष=मूर्ख.
६ अवाच्य=अवर्णनीय. ७ स्वमतिपरिणामनविधिवरी=यथाबुद्धि ८ अमित=अमर्याद.
९ महिमा=मोठेपणा. १० गोचर=ज्ञात ११ मधुस्फीता=मधा सारखी गोड.

गुणीं ऐशा माझी रसित रसनां[१२] पूत[१३] सदया ।
करावी या अर्थे त्रिपुरमथना निश्चित धिया ॥ ३ ॥

**तवैश्वर्यः—**

स्वऐश्वर्ये भूता[१४]स्थितिउदय[१५]नाशासि करिसी ।
त्रयावस्थाव्याप्त त्रिगुण तनु भिन्नासि धरिसी ॥
असंभाव्या ऐशा वरद रमणीया विरतिनें ।
जडा बुद्धिभ्रांते स्वमति दुषिती लोक रितिनें ॥ ४ ॥

**किमीहः किं कायः—**

दिसे आश्चर्यत्वें सकल खलु भूतें त्रिभवनीं ।
क आधारें ब्रह्मा रचित किमुपादान[१६] अवनी[१७] ॥
अतर्क्यैश्वर्यातें अनवसर बुद्धीहत वशों ।
कुतर्कभ्रांतीनें सकळ जग मोहास्पद वसे ॥ ५ ॥

**अजन्मानो॰**

अजन्मे कैसे ते निवसति जगीं सावयवता ।
विना आधिष्ठानें भव विधि तया केंवि पुरता ॥
अनीशें कर्तृत्वें भुवनजनितें कल्पित जरी ।
मतीमंदा त्याचा अमरवर नेणोनि हि तरी ॥ ६ ॥

**त्रयी सांख्यं—**

त्रिवेदीं सांख्यज्ञीं पशुपतिमतीं वैष्णवजनीं ।
स्वसामर्थ्ये सर्वी धरूनि धृतियोगादि विजनीं ॥
प्रितीनें आश्चर्ये कुटिळसरळें मार्ग धरूनी ।
मिळों जाती तूतें जलनिवह सिंधूं[१९]सि वरूनी ॥ ७ ॥

**महोक्षः खट्वांगं॰**

विभूती खट्वांगें[२०] अजिन[२१] धर नंदी दृढ अही[२२] ।
कपाळा घे हातीं परशु उपकर्णे सकळ हीं ॥
कृपादृष्टी सिद्धी निरखुनि कृपा सौख्य विलसे ।
निजात्मैक्यज्ञानें विषयमृगतृष्णा भ्रम नसे ॥ ८ ॥

**ध्रुवं कश्चित् सर्वं॰**

खरें कोणी यातें म्हणाति किति हें सर्व लटिकें ।

---

१२ रसना=जीभ. १३ पूत=पवित्र. १४ भूत=वस्तुमात्र. १५ उदय=उत्पत्ति १६ उपादान=ज्या वस्तूपासून एकादा पदार्थ बनवितात ती वस्तु. मडक्याचें उपादान माती, गोठपाटल्यांचें उपादान सोनें १७ अवनि=पृथ्वी १८ निवह=समूह. १९ सिंधु=सागर. २० खट्वाग=खाटेचें गात. २१ अजिन=कातडें २२ अही=सर्प.

खरें खोटें नोहे जग निरखितां दृश्य इतुकें ॥
असे आश्चर्यलें त्रिपुरमथना विस्मय परी ॥
स्तवाया लाजे हे मति चकित होऊनि हि तरी ॥ ९ ॥

**तवैश्वर्यं०**

तवैश्वर्यज्ञाना उपरि विधि खालें हरि रिघे ॥
तयातें सामर्थ्ये न कळासि बृहत्तेज[23] वपु घे ॥
तदा श्रद्धा भक्ती करुनि तुजला शीघ्र मिळती ॥
मनोवृत्ति ऐशा परि स्तविति त्यां कां न फळती ॥ १० ॥

**अयत्नादापाद्य०**

स्वयें त्वत्पादाब्जीं बहु निज शिरोब्जें निरवितां ॥
दशग्रीवें[24] भावें त्रिपुरहर सुव्यक्त स्तवितां ॥
अयत्नें त्रैलोक्या स्ववश जित निर्वैर करुनी ॥
स्वबाहू उग्रत्वें स्फुरत फिरतो गर्व धरुनी ॥ ११ ॥

**अमुष्य त्वत्सेवा०**

अशा त्वत्सेवेनें भुजवन बलाधिक्य म्हणुनी ।
महाषस्तिस्थानाचळ करित कैलासभुवनीं ॥
तदा अंगुष्ठाग्रें अलस चाळितें गोवित जसा ।
खळा देतां थोरी स्वगुण न चुके निश्चय असा ॥ १२ ॥

**यदृद्धिं सुत्राम्णो०**

महेंद्राची ऋद्धी दिवि[25] जित महा थोर हि परी ।
महा बाणें नेतां त्रिजग निज सत्तामय करी ॥
वसे त्वत्पादाब्जीं दिननिशि तया चित्र न दिसे ।
नमी भावें चित्तीं धरुनि तरि उग्रत्व विलसे ॥ १३ ॥

**अकांडब्रह्मांड०**

समस्त ब्रह्मांडीं क्षयचकित देवासुरभयें ।
कृपें रक्षी जेव्हां त्रिनयन विष प्राशुनि स्वयें ॥
भली शोभा कंठीं मिरवि जरि कल्माष[26] असता ।
विकारें[27] श्लाघ्या[28] हे भुवनभयभंगव्यसनता[29] ॥ १४ ॥

**असिद्धार्थानैव०**

प्रतिज्ञेनें मोही मुनिमनुजदेवासुरमही ।

---

२३ बृहत्=मोठ २४ दशग्रीव=रावण. २५ दिवि स्वर्गी, २६ कल्माष=काळें, २७ विकार=बदल, फेरफार, विरूपता. २८ श्लाघा=वाहवा, शाबासकी. २९ व्यसनता=तत्परता.

करी ऐसा जो कां जगति जय बाणे सरळ ही ॥
विलोकीतां तूंतें इतर सुर साधारण परी ।
अनंगत्वें तेव्हां स्मरण स्मर संसार न करी ॥ १५ ॥

**महीपालाघाता०**

पदाघातें पृथ्वी सभय धरित्ये संशय मनीं ।
भ्रमे तेव्हां स्वर्गी भुजपरिघ कंप ग्रहगणीं ॥
जटा मौळीं मुक्ता विलसत सुरा ताडन कृता ।
जगा रक्षाया जैं नटसि धरुनि श्रेष्ठ विभुता ॥ १६ ॥

**वियद्व्यापी तारा०**

नभ व्यापी तारागण सम जळीं फेन धरिते ।
प्रवाहें गंगा जे विलसत शिरीं बिंदुपरि ते ॥
समस्तां द्वीपांतें वलयसम शोभा जलनिधी ।
यया मानें धर्ती प्रकट महिमा दिव्य तनु धी ॥ १७ ॥

**रथः क्षोणी यंता०**

रथ क्षोणी[३०] शास्ता[३१] विधि रविशशी चक्र विलसे ।
धनू मेरू श्रीश त्रिभुवनपती सायक[३२] असे ॥
वधाया ऐसा हें त्रिपुरतृण आडंबर धरी ।
न तो स्वेच्छा क्रीडा करुनि विभुता दाखवि खरी ॥ १८ ॥

**हरिस्ते साहस्रं०**

सहस्राब्जें विष्णू चरणकमळा पूजित जयीं ।
उणें येता एका नयनकमळा अर्पित तयीं ॥
स्वशक्त्युत्कर्षाचो परिणति तया चक्रवपुनें ।
त्रिलोकी रक्षाया त्रिपुरहर सामर्थ्य गतिनें ॥ १९ ॥

**क्रतौ सुप्ते०**

क्रतू नोहे दाता सफळ गति जो तूं करि तया ।
अपूर्णे जीं [ होती ] पुनित तव नाम स्मरतया ॥
अशा त्वत्सामर्थ्यें क्रतु सुफळ दान त्रिभुवनीं ।
श्रुतीतें सुश्रद्धा धरुनि भजती त्या शुभ जनीं ॥ २० ॥

**क्रियादक्षो दक्षः०**

क्रियाज्ञाता दक्ष क्रतुपति तनू धारक हरी ॥
ऋषींचा आर्त्विज्यें सुरगण सदस्यत्व[३३] कुसरी ॥

---

३० क्षोणी=पृथ्वी ३१ शास्ता=सारथी ३२ सायक=बाण ३३ सदस्यत्व=सभासदपणा.

क्रतु भ्रष्टे ऐसा स्वक्रतु फळदाता न गणितां ॥
अश्रद्धाभक्ती जो तव पदिं अनन्यत्व नसतां ॥ २१ ॥

**प्रजानाथं नाथ०**

प्रजानाथें[३४] कन्या विषयसुखबुद्धी निरखितां ।
तदा रोही[३५] झाली म्हणुनि मृगमायेसि धरितां ॥
धनुर्हस्ता तूतें निरखुनि भयें देवभुवनीं ।
पळाला अद्यापि त्रसित मृगव्याधेंसि[३६] अवनीं ॥ २२ ॥

**स्वलावण्याशंसा०**

स्वलावण्यभ्रांती धरुनि धनुपुष्पाग्र शर तो ।
जिणों इच्छी तूतें त्वरित जहला दग्ध स्मर[३७] तो ॥
अशातें अर्धांगी नटुनि नगजा[३८] स्त्रैण म्हणन्ये ।
तरी अज्ञानत्वें युवति स्वगुणत्वें च शिणन्ये ॥ २३ ॥

**श्मशानेष्वाक्रीडा०**

श्मशानीं क्रीडे तो स्मरहर पिशाचा सह चरी ।
चिताभस्में रुंडस्रक[३९] नरकपाळा करिं धरी ॥
न कर्में मागल्यें दिसति परि नामें चि अखिलें ।
प्रिती गाती त्यातें परम सुख दे मंगल खिलें ॥ २४ ॥

**मनः प्रत्यक् चित्ते०**

मना प्रत्यक्प्राणा नियमुनि समाधान असतां ।
स्फुरद्रोमाचत्वें उदित नयनीं नीर दिसतां ॥
विलोकी आल्हादें हृदय अमृताब्धींत बुडतीं ।
धृती अंतस्तत्वें नियमिति तयां तूचि पुढती ॥ २५ ॥

**त्वमर्कस्त्वं सोमः०**

महेशा भानू तूं शशिपवनअग्निस्वरूप तूं ।
मही तू पाणी तूं दिवि सकळ आत्मा मन हि तूं ॥
गुणाच्या आकारें प्रकटत गिरा त्या परिणती ।
न तत्वार्थज्ञानें कळत गणना व्यर्थ शिणती ॥ २६ ॥

**त्रयीं तिस्रो वृत्तीः०**

त्रिवेदीं त्रैलोक्यीं त्र्यमित अवस्थात्रय गुणीं ।

---

३४ प्रजानाथ=ब्रह्मदेव ३५ रोही= हरणी. ( रोहिणीचा तारा ). ३६ मृगव्याध=रुद्र ( लुब्धक तारा ). रोहिणी, मृग, व व्याध यांची ही कथा ऐतरेय ब्राह्मणाचे तिसरे पंचिकेंत आहे. ३७ स्मर=मदन ३८ नगजा=पार्वती. ३९ रुंडस्रक=मुंडक्याची माळ.

अकारादीवर्ण त्रयिविकृतियोगें कवळुनी ॥
ध्वनी तुर्याधामीं निजमति प्रकाशकत्व करिती ।
अनेकीं एकत्वें शिव तुज चि ॐकार म्हणती ॥ २७ ॥

**भवः शर्वो रुद्रः०**

भवा शर्वा रुद्रा पशुपति हि उग्रादि महता ।
महा भीमेशाना इति सदभिधानाष्टक कृता ॥
अशा प्रत्यकूनामीं प्रविचरति देव श्रुतिमुखें ।
परधामीं प्रीती नमन करितों मी निज सुखें ॥ २८ ॥

**नमो नेदिष्ठाय०**

नमो नादीइष्टा सकललयकर्त्या तुज नमो ।
नमो माधुर्येष्टा स्मरहर महीव्यापक नमो ॥
नमो सर्वश्रेष्ठा चलगतिविशिष्टा तुज नमो ।
नमो विश्वव्याप्ता अखिलसुखदात्या तुज नमो ॥ २९ ॥

**बहलरजसे०**

निज रजगुणें सृष्टीकर्त्या भवाय नमो नमः ।
अतितमगुणें तत्सहर्त्या हराय नमो नमः
जनसुखकृता सत्वोत्कृष्टा मृडाय नमो नमः ।
निजपदरता गुणराहित्या शिवाय नमो नमः ॥ ३० ॥

**कृशपरिणतिचेतः०**

लघु परिणति चित्ता क्लेश वश्यत्व भोगे ।
अगणितगुणसीमा लंघिजे कोण योगें ॥
सचकित कृतबुद्धी भक्ति आराध्य भावें ।
तव पद युग अर्ची वाक्यपुष्पें स्वभावें ॥ ३१ ॥

**असितगिरिसमं०**

असितागिरिमषीतें घालुनी सिंधुपात्रीं ।
सुरतरुवर याची लेखनी भूमिपत्रीं ॥
लिहित जरि असे कीं शारदा सर्वदा हे ।
तरि तव गुणलेशातें कदापी न पाहे ॥ ३२ ॥

**असुरसुर०**

असुरसुरमुनींद्रीं इंदुमौल्यर्चनातें ।

---

४० तुर्या=चवथी. ४१ सदभिधानाष्टक=उत्तम आठ नांवें ४२ असितगिरि=काजळाचा पर्वत. ४३ सिंधुपात्र=समुद्रा एवढी दऊत.

प्रयुनि गुणमहिम्नें निर्गुणा अव्ययातें ॥
सकलगणवरिष्ठें पुष्पदंताभिधानें ।
रुचिरें[४४] अलघु[४५] वृत्तें स्तोत्र केलें तयानें ॥ ३३ ॥

**अहरहरनवद्यं०**

अघहरण असें हें धूर्जटिस्तोत्र लोकीं ।
पठन करुनि जो कां मानवी नित्य घोकी ॥
निवसत शिवलोकीं रुद्रतुल्यत्व पावे ।
स्वसुखधनसुपुत्रीं कीर्तिमंत स्वभावें ॥ ३४ ॥

**महेशा०**

महेशापरता देव महिम्नाहुनियां स्तुती ।
अघोरा परता मंत्र नाहीं तत्व गुरूहुनी ॥ ३५ ॥

**दीक्षादानं०**

दीक्षादानें तपें तीर्थें ज्ञानें यागादिकी क्रिया ।
महिम्नस्तोत्रपाठाची कळा षोडश ही नसे ॥ ३६ ॥

**शिवतत्वं०**

शिवतत्व न जाणें मी कैसा आहे महेश्वर ॥
जैसा दिसतसे शंभू तैशातें नमितों सुखें ॥ ३७ ॥

**आसमाप्त०**

आदि अंत असे पुण्य स्तोत्र गंधर्वभाषित ॥
अनुपम्य मनोहारी शैव ईश्वरवर्णन ॥ ३८ ॥

---

## उपसंहार.

असे हे महिम्नस्तुतिश्लोक सारे । स्वयें बोलिला जे महावाक्य सारे ॥
पढोनी रहस्यार्थ लाहेल याचें । कसें वर्णिजे भाग्य लोकीं तयाचें ॥ १ ॥

वदे पूर्व श्लोकीं मतिहिन स्तुती योग्य न जरी ।
कृपे स्तोत्रीं माझा हर निरपवादा परिकरी ॥
असें आरंभीं जो विनवुनि करी श्लोक पहिला ।
तिजा श्लोकीं वर्णी निज अनुभवें तत्व वाहिला ॥ २ ॥
ममत्वेतां वाणीं गुणकथनपुण्येन भवतः ।
पुनामीत्यर्थेऽस्मिन्पुरमथन बुद्धिर्व्यवसिता ॥
यया श्लोकार्धें जो विनवित असे अर्थ हि असा ।

---

४४ रुचिर=सुंदर. ४५ अलघु=मोठें.

पदाच्या आधारें कवि वदत तो शीघ्र परिसा ॥ ३ ॥
म्हणे जे हे वाणी तव गुणकथापुण्यचरितें ।
पवित्रत्वा पावो सुचरित सुधा सौख्य भरितें ॥
यया अर्थे स्तोत्रीं निजमतिप्रकाशत्व करितो ।
सुवाक्यार्थे चित्तीं विवरुनि निजानंद भरितो ॥ ४ ॥

अशा आशयें वर्णितां स्तोत्र जेथें । स्तुती शेवटीं बोलिला श्लोक तेथें ॥
महिम्नस्तवान्नापरस्तोत्र ऐसें । वदे वाक्य त्या अन्वया एक कैसें ॥ ५ ॥

यया प्रश्नोक्तीचें सुमनस गती वाक्य परिसा ।
घडे जैसें त्यातें झगडत क्षणीं लोह परिसा ॥
स्तुती आरंभीं तों निज अनुभवा शीघ्र वळवे ।
प्रमेयज्ञानाचे घडि घडि सुखाचे कैवळ घे ॥ ६ ॥

महिम्नस्तुतीमाजि श्रद्धासुभक्ति । असे मुख्य हें काढिलें श्रेष्ठ युक्ति ॥
बहू संमतें याशि ग्रंथांतराचीं । विलोकी समस्या पुरे अंतराची ॥ ७ ॥

श्रीमद्भागवतांत गोपिचरितीं ब्रह्मा स्तुती आदरी ।
गीतेमाजि तशीच अर्जुनमिषें जेथें वदे श्रीहरी ॥
श्रद्धाभक्ति अशी च मुख्य करुना तेथें जशी बोलती ।
सद्ग्रंथीं कविमुख्य या सुभजनीं आनंदले डोलती ॥ ८ ॥

पढोनी वेदांता सकळ हि श्रुती शास्त्र श्रवणें ।
निरोधोनी वायू महितळि सुयोगा मिरवणें ॥
शरीरें शोषूनी जप तप अनुष्ठान करिती ।
तरी आत्मैक्यत्वा न मिळति जरी हे न धरिती ॥ ९ ॥

बहु भक्त भक्तीं अनेका रितींच्या । करीती परी त्या न होती रितींच्या ॥
जरी राजसा तामसा सात्विका ही । तयातें निजानंद तो प्राप्त नाही ॥१०॥
अश्रद्धा गतीं रावणें भक्ति कैशी । तदा दक्षयज्ञादिकीं प्राप्ति जैशी ॥
सुश्रद्धाविना जे फलोत्पत्ति त्यातें । असे तीन श्लोकीं महिम्नांत त्यातें ॥११॥
तरी ईश्वरीं ऐक्यता याचि योगें । घडे जे सुश्रद्धा भक्ति प्रयोगें ॥
यया स्वानुभूती निजानंदलोकीं । सुखें घे पुन्हा तो महिम्नावलोकीं ॥१२॥

स्वयं तस्येताभ्यां तव किमनुवृत्तिर्न फलति ।
असें बोले त्याचा कविनर असा अर्थ करिती ॥
यया श्रद्धा भक्ती बहुत तरले आणिक पुढें ।
करीतीं घेती ते निज अनुभवा टाकुनी कुडें ॥ १३ ॥

---

४६ कवळ=घांस.

निज अनुभवद्वारें जो निजानंद पावे ।
तरि मग दुसरे ते श्रेष्ठ नाहीं स्वभावें ॥
म्हणुनि स्तुति कराया जाहला योग्य जेव्हां ।
इह पर सख त्यातें लाधल शीघ्र तेव्हां ॥ १४ ॥

स्वयें चाखता जाणिजे सर्व गोडी । अशी जाहली शीघ्र त्यालागिं जोडी ॥
म्हणोनी महिम्नापरा स्तुति नाहीं । असें बोलिला त्यात हा अर्थ पाहीं ॥१५॥
स्वमतिचा परिणाम हि सिद्ध तो । हरिगुणीं रमतां जरि सिद्ध तो ॥
प्रथम श्लोकिं च अर्थ अस असा । परि विनोद दुजा कथिला तसा ॥१६॥
गुणीं पूत वाणी करावी वदे कीं । तयामाजि बुद्धी अशी देव दे कीं ॥
परेच्या सुपारीं जरी ऐक्य चारी । पवित्रत्व तेव्हां घडे या विचारीं ॥ १७ ॥
असें ऐक्य हे तीन दृष्टात जेथें । स्तुती शेवटीं बोलिला श्लोक तेथें ॥
घडे ऐक्यता प्रश्न केला तयाचा । समस्या असे पूर्ण जे श्रोतयाची ॥१८॥

हरिगुणमहिमेचा पार कोणा कळेना ।
म्हणुनि स्तुतिसि ऐशा साम्य दूजें मिळेना ॥
कविवरकृत श्लोकीं अर्थ मुख्यत्व ऐसा ।
न परस्तुतिसि तेथें वर्णिला भाव तैसा ॥ १९ ॥

तरी दूसरा अर्थ कां व्यर्थ बोला । असें पूसतां देइजे चित्त बोला ॥
अनंतागुणीं आवडी फार वाटे । म्हणोनी दुजा धांवलों आडवाटे ॥ २० ॥
अज्ञान शब्दज्ञ परी शिवाचे । स्तुतीसि योग्यत्व नसोनि वाचे ॥
वर्णी हरीचीं सगुणाख्यनामें । त्या तारिजे निश्चय पूर्णकामें ॥ २१ ॥
श्रीमत लोकीं सुमनें सुवासें । जो पूजिजे तो सुमनें सुवासें ॥
त्या ईश्वरा दुर्बळ अज्ञ त्याही । अरण्य पुष्पीं पुजिजे न काई ॥ २२ ॥
नसे संस्कृती गम्य कांहीं तथापि । मुखा नाम हे ये हें चि श्रेष्ठत्व स्थापी ॥
महिम्नस्तुतीची टिका या चि साठीं । करीतों करूनी जिवामाजि साठी ॥ २३ ॥
गुरुत्वा जनीं पाहिजे जो गुरुत्वें । तया श्रीहरीपादपद्मीं गुरुत्वें ॥
स्वयें किंकरत्वें करी पूजनातें । विलोका सुखें प्रार्थितों हें जनातें ॥ २४ ॥

समाप्त.

हरिराजकृत

# मुद्गलाचार्यविरचित रामार्याचें श्लोकबद्ध भाषांतर.

**त्वयि विमुखे मखमुख्ये० ॥ १ ॥**

विमुख जरि हरी तूं होसि सत्कर्ममुख्या । तरि मज कवणाचें सख्य देईल सौख्या ॥
परिमितवसनातें तूं चि देसी जिवाला । म्हणवुनि रघुनाथा मूळ तूं जीवनाला ॥१॥

**परितः पश्यसि० ॥ २ ॥**

चहूकडे पाहसि कर्ण देसी । सबाह्य आभ्यंतर जाणतोसी ॥
या ती पदार्थां विरहीत झालों । लोकांत नाहीं मग काय बोलों ॥ २ ॥

**जानाति भूपमल्पो० ॥ ३ ॥**

अल्प लोक वळखे नृपतीला । नोळखे नृप कदापि तयाला ॥
अर्थ हा सकळ योग्य अविज्ञा । श्लाघ्य हा तुज नव्हे कळज्ञा ॥ ३ ॥

**अर्थिनि विलसति० ॥ ४ ॥**

मानी मनीं याचक फार घेणें । दाता म्हणे यासि दगाच देणें ॥
असो कथा हे कृपणास साजे । रमापते राम तुला न साजे ॥ ४ ॥

**अपि रंकमंकानिष्ठः० ॥ ५ ॥**

दुबळ्या पित्या जवळि बाळक राहे । निज इष्ट तें न लगता घडि लाहे ॥
जगबाप होउनि सुखास न देशी । तरि कष्ट कष्ट हरि मी परदेशी ॥५॥

**आशापाशनिबद्धं० ॥ ६ ॥**

आशापाशीं बांधुनी घट्ट देहीं । कारागारीं घातलें त्वां च पाहीं ॥
रामा मातें सोडवीनासि जेव्हां । द्यावें पोटा अन्न लागेल तेव्हां ॥ ६ ॥

**अनुचितमिदमेशादौ० ॥ ७ ॥**

आधी तुला उचित हे चि नव्हे मुरारी । श्रीमंत तूं निखिल मी तव दीन दारीं ॥
त्या ही वरी हळहळीत धरी नरातें । वृत्यर्थ हें मन तुझें न पवे व्यथेतें ॥ ७ ॥

**त्रिभुवनपालन० ॥ ८ ॥**

घेसि तूं भुवनपालनदीक्षा । रक्षणीं अचुक शक्ति समक्षा ॥
मीं अनन्य मम झोंकुनि कैशी । शक्ति हे स्फुरण घे जग पोषी ॥ ८ ॥

**यदि पुनरपराधानां० ॥ ९ ॥**

आहेति माझ्या अपराध कोटी । तो ही नसो तूज विषाद पोटीं ॥

---

१ अविज्ञ=अजाण २ श्लाघ्य=योग्य, स्तुत्य. ३ कारागार=बंदीखाना. ४ मुरारि=मुर नामक दैत्याचा शत्रु विष्णु.

हाणी जरी बालक फार लाया । तथापि दे लाड मनुष्यमाता ॥ ९ ॥

**अयि वद राघव० ॥ १० ॥**

अरे राघवा बोल तू सत्य साधें । तुला राग हा कोणत्या पापरोधें ॥
मृषा बोलसी तैं तुला आण आहे । पिता जो बहू मान्य त्याची च पाहें॥१०॥

**मामिह कृपणमनाथं० ॥ ११ ॥**

कृपण फार अनाथ हुरी असें । अमुप खेद धरूनि सदा वसें ॥
खुडित मस्तक हस्त पदा नमीं । धरिसि मौन धरूं किति धीर मी ॥११॥

**करुणाकर० ॥ १२ ॥**

मी दीन तूज शरणागत सुस्वभावें । हें युक्त जें सदय मानस त्वां करावें ॥
कीं दीन वत्सल अशा म्हणि मारिं हाका । टाकूनि दे बिरुदमाळ विशाळ बापा॥१२॥

**कुरु वा राघव करुणां ॥ १३ ॥**

मी दीन वत्सल दयाकर जाण ऐशी । गाळ्या वरी बिरुदमाळ न जाय तैशी ॥
मी दीन केवळ उपेक्षिसि आजि कैसा । रामा रमेश रघुराजकुलावतंसा ॥ १३ ॥

**सेवामपेक्ष्य दाता० ॥ १४ ॥**

घेऊनि सेवा मग त्यास देणें । हा तो मुशारा न वदान्य येणें ॥
सेवा न घेतां मज पाव तैसा । दे पल्वलीं जीवन मेघ जैसा ॥ १४ ॥

**सेवकवंश० ॥ १५ ॥**

स्वसेवकाचा सुत सत्य देवा । अपेक्षिसी यास्तव काय सेवा ॥
स्वसेवकाचा सुत जो गळाला । सांभाळिती भूप निसर्ग त्याला ॥ १५ ॥

**न हि निजजाठरवन्हेः० ॥ १६ ॥**

करूनि चरणसेवा पूर्वजीं नित्य पाहीं ।
निज जठर भराया अर्जिलें तूज जीहीं ॥
उपजति अळशी जीं लेंकुरें मूर्ख वंशीं ।
रघुतिलक नुपेक्षी वासना त्यांस ऐशी ॥ १६ ॥

**चित्तचमत्कृति० ॥ १७ ॥**

आधीं तुला कठिणता च कदां न साजे । हें देखतां मन चमत्कृत होय माझें ॥
त्या ही वरी कठिण तूं जरि सेवकाच्या । वंशावरी च वदों तरि काय वाचा ॥१७॥

**अंके तव गतपंके० ॥ १८ ॥**

निःपाप जें थोर घमंड मांडी । मी बैसलों पोष्य धरूनि मांडी ॥
तांबूल द्यावा मज राघवा त्वां । मी बाळ रे तूं मज पाळिं आतां ॥१८॥

---

५ अवतंस=भूषण. ६ वदान्य=दाता ७ पल्वल=डबकें. ८ जीवन=पाणी.

**चिबुकं सन्मुखतायै० ॥ १९ ॥**

मी बाळ ओटीं चिबुकासि हातें । समोर व्हाया तुजला पहा तें ॥
सिंदूरशैलावरि वास तूझा । सांभाळ आतां करिं तूं चि माझा ॥ १९ ॥

**याचिता त्वधृष्यता० ॥ २० ॥**

दंडाई जे रावणमुख्य राजे । अधृष्यता त्यांवरि युक्त साजे ॥
मी लेंकरूं त्वा मज लाडवावें । गोष्पाग्र नैकत्र तसें करावें ॥ २० ॥

**पितरौ यत्र० ॥ २१ ॥**

बापावरी शिशु रुसे स्तनपान तैं पी । रागांत माय तरि ये जनका समीपीं ॥
तूं मायबाप करुणा जरि तूज येना । थाया भरूनि करूं काय दुजें दिसेना॥२१॥

**न शृणोषि० ॥ २२ ॥**

दीनोक्ति नेणें झणि बोलसी वा । सर्वज्ञतेचा बहुसाल तावा ॥
आकर्णितां ही जरि मौन मुद्रा । हें ही तुला निंद्य कृपासमुद्रा ॥ २२ ॥

**किं वा तद्गुरु कार्यं० ॥ २३ ॥**

तें काम काय न कळे बहुतेक मोठें । होईल वाटत असे मज नेट पोटें ॥
वाचा मदीय बहुसाल विशाळ दीना । कानावरी तरि न ये चि कृपानिधाना ॥२३॥

**प्रायो राक्षसयुद्धे ॥ २४ ॥**

मारूनि फार रजनीचर ते अनंता । शेषावरी लवंडलासि शिणोनि आतां ॥
मीं वादुवेळ करितों किति कंठशोषा । झोंपेसि येउनि हरी न करीसि लेखीं ॥२४॥

**अपि दलति वज्रहृदयं० ॥ २५ ॥**

वज्राचें हृदय फुटेल आयकोनी । बोलीं [ तो ] दगड रडेल साच मानीं ॥
ऐसा म्यां तव अपराध काय केला । कारुण्योदधि हरि कां उदास झाला॥२५॥

**जल्पंतमल्पबुद्धिं० ॥ २६ ॥**

मी अल्प बुद्धि बहु काकुळतीस येतों । तूझा कृपालव नव्हे जन हा पहातो ॥
हा लोक हो कसमसा करितो बकावा । शोकारि तूं तुज अवद्य जडेल आवा ॥२६॥

**क्षीरेण दग्धजिव्हः० ॥ २७ ॥**

जो दूध घेतां बहु पोळला कीं । तो ताक फुंकूनि विशेष चाखी ॥
त्वां टाकिले दांभिक भक्त जैसे । सत्यक्त मी मानिति लोक तैसे ॥ २७ ॥

**मयि करुणा० ॥ २८ ॥**

कृपार्ह नोहें म्हणुनी कृपेनें । करूं नको वा मज इष्ट देणें ॥
स्वस्वामिभाव प्रकटीकरावा । दुर्भाव माझा विसरोनि द्यावा ॥ २८ ॥

---

१ चिबुक=हनवटी. १० रजनीचर=राक्षस. ११ लेखा=हिशेब. १२ उदधी=सागर.

**पायस इव राम० ॥ २९ ॥**

जेणें करूनी बहु खीर माखे । तसें वृथा तें घृत होय राखे ॥
पापी असें निश्चित मी च जेयें । सन्मंत्र हा काय करील तेयें ॥ २९ ॥

**संतप्तायसपिंडे० ॥ ३० ॥**

लोखंडाचा तप्त जो होय गोळा । कोडें थोडें तो करी नीरें[११] गोळा ॥
नित्याशौची मी जपें मंत्रमाळा । तीची होते राख राखें दयाळा ॥ ३० ॥

**मालिन्यदोषभीत्या० ॥ ३१ ॥**

आजन्म पापमय हा तंव देह आहे । श्रीरामनाम करुं काय शकेल पाहें ॥
कांहीं नुरे निवडिता उडिदांत काळें । निःपाप देह तरि होय कसें निराळें ॥३१॥

**कुरु मा साहसमित्थं० ॥ ३२ ॥**

करू नको साहस बोलतों मुखें । विहंगे[१२] फोडी दगडा जसा सुखें ॥
निंदूनि पापें करितों स्वयें स्वयें । प्रवृत्त दोषास्तव होत निश्चयें ॥ ३२ ॥

**मृगमदभूमौ० ॥ ३३ ॥**

कस्तूरिगोळा उपजे यखादा । दुर्वास तो टाकिल काय कादा ॥
तूझा च मी दास परंतु दोषां । न टाकितां कां करितोसि रोषा ॥ ३३ ॥

**सुकृतिन ईषत्पापे० ॥ ३४ ॥**

ज्याला पुण्य अगण्य त्यास जडलें जें स्वल्पसें पाप कीं ॥
प्रायश्चित रघूत्तमा विहित हें त्याला च मन्वादिकीं ॥
मातें पाहुनियां दडे मजकडे येना झुरे चावळे ॥
देखे गाय कराल वाघ विजनीं भिस्कीन जैशी पळे ॥ ३४ ॥

**परिगणना भगणानां० ॥ ३५ ॥**

मोजू शकेल गगनीं भगणासि कोणी । ऐसा असेल अणु जो गणनेसि आणी ॥
मद्दुष्कृतें कवण मोजिल फार काळीं । रामा नव्हेल गणना वदतों त्रिकाळीं ॥३५॥

**सर्वज्ञता श्रुता ते० ॥ ३६ ॥**

सर्वज्ञता ख्यात खरें वदावें । मी दास रूढीवरि ला न जावें ॥
संख्या किती काय मदीय पापा । न जाणसी वा तरि सांग बापा ॥ ३६ ॥

**अपराधिनं० ॥ ३७ ॥**

अपराधी अपराधी अपराधी मी रघूत्तमा आधीं ॥
पाळीं पाळीं पाळीं न गमे आणीक माय तूं साधी ॥ ३७ ॥

**उचितं वक्तुमभद्रं० ॥ ३८ ॥**

तुजसम नाथ असोनी वदनी कधिं ही अनाथसें नाणीं ॥

---

११ नीर=पाणी १२ विहग=पक्षी. १५ भगण=नक्षत्रसमूह.

टाकुनि दिधलें म्हणुनी लाजुनि राहे सनाथ हे वाणी ॥ ३८ ॥

**क्रोशंतं दीनास्यं० ॥ ३९ ॥**

दीन तोंड पसरूनि वांसरूं । बोहनां जवळि गाय ये गुरूं ।

काय भाग्य फळलें मनीं धरूं । कां कृपा तुज न ये जगद्गुरू ॥ ३९ ॥

**सर्वज्ञः स्वाधीनो० ॥ ४० ॥**

स्वाधीन सर्वज्ञ दयासमुद्रा । माझे विशीं तूज कठीण मुद्रा ॥

हें कां असें मीं पुसणार जेव्हां । देशील तूं उत्तर काय तेव्हां ॥ ४० ॥

**अपराधमार्गणेऽपि० ॥ ४१ ॥**

गवससी अपराध हरी जरी । क्वचित का करुणा करिसी तरी ॥

तजकरा करितों हरि हा खरा । कवण तो तव भक्त भवीं बरा ॥ ४१ ॥

**तस्य स्वल्पोपराधो० ॥ ४२ ॥**

जुने तयांचे अपराध थोडे । अमूप माझे अपराध गाढे ॥

हें कोण जाणे तरि तूंच रामा । शाबास सर्वज्ञपणासि सीमा ॥ ४२ ॥

**अग्रजजाया० ॥ ४३ ॥**

मारूनी निज सहोदर वाळी । वोहिनीशि रतला कुरवाळी ॥

सुग्रिवा वरि च त्या करुणा रे । राघवा बहुत जे दिस थारे ॥ ४३ ॥

**भ्रातुरवज्ञा० ॥ ४४ ॥**

अवज्ञामात्रानें सहज सहजीं वैर धरिलें ॥

कसें भासे जाणों जनक वधुनी वित्त हरिलें ॥

रघुत्तंसा आला तुज जवळि तो राक्षस असा ।

मला मानेना तो वद निरपराधी तरि कसा ॥ ४४ ॥

**अल्पाति० ॥ ४५ ॥**

दोषिक निक्षक असें ह्मणि मानि मातें ।

तो शांतिसिंधु जग वर्णि तुझ्या यशातें ॥

थाया भरोनि वदलों बहुसाळ कांहीं ।

तूझें जगत्त्रयपवित्र चरित्र पाहीं ॥ ४५ ॥

**आस्तामेतदसभ्यं० ॥ ४६ ॥**

परदोष गवेक्षणा [ हरी ] हे । अति निंदा तव परोक्ष पाहें ॥

धणि तूं चि विचित्र वृत्ति आधी । अपराधि म्हणें बिभीषणादी ॥ ४६ ॥

**स्वीयमणौ० ॥ ४७ ॥**

कुडा आपुला दाम अस्तां पराशीं । वृथा भांडणें ख्यात हे गोष्टि ऐशी ॥

---

१६ गवेक्षण=शोधणें.

करितोसि तूं जें मना मानलें कीं । वृथा द्वेष कां मीं करूं भृत्यलोकीं ॥ ४७ ॥

**वक्तव्यमेतदुक्तं ॥ ४८ ॥**

खत खत मनिं होतों बोलिलों सर्व हें जें ॥
झणि करिं रघुनाथा आमुचें आजि काज ॥
अजुनि जरि तुझ्या ही मानसीं राग आहे ॥
तव पतित असें मी त्वत्पदीं तूं च पाहें ॥ ४८ ॥

**प्रणिपातमात्र० ॥ ४९ ॥**

महंतांचा कोपानळ बळ धरी थोर जधवां ॥
विझे रामा पायीं नमनसलिलें[१] च तधवां
अहा कैसें माझें दुरित फळलें आजि सुजना ॥
नमस्कारानें ही तव हृदय रागास त्यजिना ॥ ४९ ॥

**त्वत्तुल्यो नास्ति ॥ ५० ॥**

दाता तुझ्या सम नसे च दुजा मुरारी
नाहीं तसा च मजश्शी सम तो भिकारी ॥
तूं रे अनाथजनपालक दीनबंधो
मीं काय आणिक वदों करुणैकसिंधो ॥ ५० ॥

**त्वयि च स्वयं प्रकाशे० ॥ ५१ ॥**

स्वप्रकाश हरि हा भुवनासी । भासवूनि भजनें भव नासी ॥
अंध मीं म्हणुनि काय दिसेना । कीं कृपा तुज मुळीं च असेना ॥ ५१॥

**नाभीष्टं करुणातः ० ॥ ५२ ॥**

बहुतक अपराधी तूं कृपा मी करीना ॥
म्हणसिल जरि कांहा इष्ट मी तूज देना ॥
कट कट करितां बा इष्टतूटी च झाली
तरि मज ढकलूनी दूरि बाहेरि घालीं ॥ ५२ ॥

**अरयोपि० ॥ ५३ ॥**

जे चालवीतां तुज वेरफेरे । वैरी असे ते सुख पावले रे ॥
मी दास होऊनि उदास होसी । कैसे दयाळा सुख तूं न देसी ॥ ५३ ॥

**नादत्तं दत्से० ॥ ५४ ॥**

दिल्या विना मी हरि देत नाहीं । येथें चुकी मी धरणार पाहीं ॥
बिभीषणें सुग्रिववानरानें । कधी दिलें हेमपुरें करानें ॥ ५४ ॥

---

१० सलिल=पाणी.

**श्रीदामतो गृहीताः० ॥ ५५ ॥**

पव्हे घेतले ते च द्यावे सुदाम्या। हरी काय एसें वदावें कसें म्या ॥
सुदाम्या द्विजें कायसें कृत्य केले। पदश्रेष्ठ इंद्रापरी त्यासि दीलें ॥ ५५ ॥

**उन्मोचितो गजेंद्रो० ॥ ५६ ॥**

जो पापयोगं जड जीव झाला। मदांध ओढी जळवास ज्याला ॥
अप्राप्य जें का जरि याग झाला। कसें दिलें त्वां पद त्या गजाला ॥५६॥

**उद्वृत्तचित्तवृत्ते० ॥ ५७ ॥**

पौ[18]लस्त्य जो बांदि[19]वडींत देवां। घालूनि देना सदनें भुदे[20]वां।
आश्रूनि लंकापूर ज्या खळानें। निबद्ध केले सुर शृंखळेनें ॥
कैलास तोलो निज बाहुदंड। पळोनि गेलीं च कुळें उदंड।
सीतेसि ने घे रूप जोगड्याचें। विख्यात आहे मत त्या गड्याचें ॥
मुनीश्वराचा तपराशि नाशी। कदां न टाकी निज आसनासी।
हे कोण बापा अवतारलीला। तो स्वर्गलोकावरि बैसवीला ॥
बापास कामास समस्त येतो। सत्पुत्र हे ख्याति अशी वदंती।
जो मान्य ऐसा निज तात त्याला। केला अधःपात नसेसि म्याला ॥५७॥

**सुग्रीवबिभीषणयोः० ॥ ५८ ॥**

उगे रावणाबंधु सुग्रीव दोघे। पृथक् राज्य साम्राज्य एकैक तो घे ॥
करी मारुती डोंगराच्या च खेपा। किती कष्टला तोषणें नेम त्या पा ॥५८॥

**यद्यत् करोषि० ॥ ५९ ॥**

जीं जीं हरी तूं करितोसि कर्मे। तीं चांगलीं कोण वदेल वर्मे ॥
कलंक माझा न गणूनि आतां। संरक्षिजे बा मजला अनंता ॥ ५९ ॥

**चैलांचले धृतोसि० ॥ ६० ॥**

पालवी हरि तुला धरिलेसे। जाण जासिल कसा वद तैसें ॥
जीवनार्थ हरि दे मज थारा। ये सभेसि अथवा व्यवहारा ॥ ६० ॥

**त्वं मम जननी० ॥ ६१ ॥**

तूं मायबाप हरि रे निज बंधु माझा। तूं शील तूं च कुल तूं च समस्त वोज्रा ॥
तूं निष्ठुरत्व धरिसी तरि येक काडी। ते हो घडेल मज वज्रसमान गाढी ॥ ६१ ॥

**कृपया द्रक्ष्यसि० ॥ ६२ ॥**

कृपादृष्टिनें पाहसि तूं च जेव्हां। तृणप्राय हा काळ लेखीन तेव्हां ॥
कृपा जें नसे तें तृणीं काळ भेटे ॥ बहू बोलणें कां मनीं सत्य वाटे ॥६२॥

---

१८ पौलस्त्य=रावण. १९ बांदवडी=बंदीखाना. २० भूदेव=ब्राह्मण

**अथ वा हो किं बहुना० ॥ ६३ ॥**

कसू नये धार्ष्ट्यं[21] त्रिभूपदें[22] खरें । बहून बोलें परि हें नव्हे बरें ॥
अनेक पापें पदरीं असेते रे । म्हणोनि आधी बहु बाधिती हरे ॥ ६३ ॥

**नाराधितोसि पूर्वं० ॥ ६४ ॥**

तुझी पूजा पूर्वीं उचित हरि नाहीं रचिलि रे ।
असो त या जन्मीं भजन त्यजुनी जीव विचरे ॥
असा पापी कोणी तुजवरि हरी नित्य रुसतो ।
सुखाशापाशानें फुकट दढसा मूढ दिसतो ॥ ६४ ॥

**दुर्वृत्तं० ॥ ६५ ॥**

अति दुर्मति दुर्वृति चोर गडी । कुच घेउनियां वधुचे रगडी ॥
तुज नाठवितां मज पाळिसि रे । हृदयात तुझ्या अति शांति शिरे ॥६५॥

**रचितापराधजाले० ॥ ६६ ॥**

अपराध सहस्र होय आगीं । परि जी जी करुणा विशेष भोगीं ॥
मनि हेतु खरा निरकुशा हे । रसैना[23] नामपरा परेश वाहें ॥ ६६ ॥

**नैवास्ति तेनुकंपा० ॥ ६७ ॥**

कृपा नसे ज्यांवरती तुझी रे । ते पापमुद्रा धरणार सारे ॥
त्यांचे मुखीं हें सुकृतैकधाम । न ये जगन्मगल रामनाम ॥ ६७ ॥

**तृष्णाव्यालविघातं० ॥ ६८ ॥**

तृष्णाभुजगें मज डसिलें रे । येऊनि घेरी पडलों हरी रे ॥
हा पाय भूमीवरता न थारे । तूं पाव आतां गरुडध्वजा रे ॥ ६८ ॥

**तृष्णानिदाघतप्तं ॥ ६९ ॥**

तृष्णाउन्हाळा गळशोषलाहे । निराश्रयें मी अति दीन पाहें ॥
कृपाकटाक्षद्रुमसाउलीतें । करूनि रामा करिं रक्षणातें ॥ ६९ ॥

**तृष्णाकल्लोलवती ॥ ७० ॥**

तृष्णानदीचे पडलों प्रवाहीं । बहूत फासाविस जीव पाहीं ॥
रामा कृपावीक्षण घालि जाळे । ओढूनि काढीं मजला निराळें ॥ ७० ॥

**तृष्णासुकेतुकन्याभीतं ॥ ७१ ॥**

तृष्णा सुकेतात्मजताटिकासी । आली अशी धांवत तोंड वासी ॥
मी भीत आलों तव पाठिशी रे । त्वां कौशिकाचे परि रक्षिजे रे ॥७१॥

**तृष्णासुबाहु० ॥ ७२ ॥**

तृष्णा गमे आजि सुबाहुरूपा । विघ्ना करी राघव राजभूपा ॥

---

२१ धार्ष्ट्यं=उद्धटपणा. २२ त्रिभू=प्रभू. २३ रसना=जीभ. २४ धाम=गृह.

त्या कौशिकाचा मख* सिद्धि जैसा । नेला तुवां जी मज रक्षि तैसा ॥७२॥

**पाषाणतां ॥ ७३ ॥**

जाया जशी शापित गौतमानें । पाषाण हे वृत्ति तशी तमानें ॥
जशी हरी उद्धरिली अहल्या । तशी मनोवृत्ति करीं विशल्या ॥ ७३ ॥

**अधिगतकोटियुगांतं ॥ ७४ ॥**

क्रमूनि हो कोटियुगांत कांहीं । द्विगुण वाढे मम पाप देहीं ॥
हे अडजामंडणरूढ प्रौढा । तोडी शिवाचाप हि दंड गाढा ॥ ७४ ॥

**निर्भूपीकृत० ॥ ७५ ॥**

सरोनि गेले नृप चक्रवर्ती । हरी सहस्रार्जुनराजकीर्ती ॥
हें जामदग्न्या परि दैन्य माझें । जिंतूनि टाकी अति वीर्य तूझें ॥७५॥

**मृगजलबुद्धि० ॥ ७६ ॥**

मृगतृष्णा धरूनी विशेष राहें । वन तैशी दिसते समृद्धि आहे ॥
वनितेच्या समवेत राघवा तूं । सहबंधू निघ माझिया मनात ॥ ७६ ॥

**सरयूतीरपुरेशं० ॥ ७७ ॥**

अयोध्यापुराची करी पातशाही । सुरेशागिरीशादिकां पूज्यसा ही ॥
सितेचा धणी तो धणी मानवाचा । धरी वेश ताईत तो हा जिवाचा ॥७७॥

**स्मेरमुखांबुज० ॥ ७८ ॥**

नें इंदिरामंदिरहास तेजें । या सूर्यवंशीं अवतंसतें जें ॥
नवीन मेघा परि नील वोजे । तें तेज माझें हरणार ओझें ॥ ७८ ॥

**धनुषा रिपुजयजनुषा० ॥ ७९ ॥**

परातें जें जिंती धनुष बरवें घे निज करीं ।
करीं आकारें हें रुचिर फुटती तीर उदरीं ॥
उषःकाली शोभा तरुण अरुणा तेज चरणा ।
वदों आता कैसें हृदयिं स्फुरली दिव्य करुणा ॥ ७९ ॥

**दशरथनंदननामा० ॥ ८० ॥**

रघुनंदननामचंदनाचें । रस घ्याया हृदयांत फार नाचें ॥
भरता रस भक्तिचा च प्याला । जिव नेमस्त झुलेल मस्त प्याला ॥ ८० ॥

**पातुः शरधनुराढ्या ॥ ८१ ॥**

धनुर्बाण हातीं चिदानंदगाभा । पदीं चालता बाणली ठाणशोभा ॥
मुनीमानसा मानला मान साजे । करी दूर दुःखें मनीं नित्य साजे ॥८१॥

---

* मख=यज्ञ.

रामाभिधाभिरामा० ॥ ८२ ॥

बहुत सुकृत केलें जे मिळाली सितेला ।
गडिण वडिल भोळी सावळी रम्य लीला ॥
गवसित गुण जीचे कुंठली वेदवाणी ॥
हृदय धरुनि राहा रम्य रामाभिधानी ॥ ८२ ॥

हीरमनोहरदशना० ॥ ८३ ॥

जे भावली भासकुलास लेणें । रदापुढें हीर विदीर्ण भेणें ॥
सुचे मणी काच च साच नाला । भरें भरे हे हृदयांत लीला ॥ ८३ ॥

तूणीकवचकृपाणी० ॥ ॥ ८४ ॥

कासेस भाता धरिते कृपाणी । घालूनि शीले धनुबाणपाणी ॥
वेणी गुणाची मृगशावनेत्रा । पिला गती वेदगुणा विचित्रा ॥ ८४ ॥

आननानिर्जितचंद्रा० ॥ ८५ ॥

मुखापुढें हा रवि लाजला हो । उन्निद्र आनद चि नाम लाहो ॥
जो रावणद्रावण रम्य मुद्रा । हा वेश आला हृदयीं वितंद्रा ॥ ८५ ॥

वामे कांचनवल्ली० ॥ ८६ ॥

चामीकराचा तरु चारु साजे । डावीकडे हेमलता विराजे ॥
नीलाकुरोद्रेक मध्यें उभावे । ध्यातां तया मानस हें सुखावे ॥ ८६ ॥

वामांगसंगि विद्युन्मालं० ॥ ८७ ॥

मदनकोटि झुरे रूप सांवळें । विज लवे रुचिनें उजु शोभलें ॥
दशरथा सुकृतास्तव लाधलें । अमृतसंभृतपुष्टि पहा भलें ॥ ८७ ॥

अभिनवपल्लवशयनां ॥ ८८ ॥

पायांस लावी विज येक हातें । पानें च जे आथरूणांस घेते ॥
उशाकडे हाटकदीग ठेला । यजीन जाईन धरीन लीला ॥ ८८ ॥

अकपटपटुकापि० ॥ ८९ ॥

हा वानरांचा भुभुकार भारी । भारी उभे बाहु कसे उभारी ॥
कपी सती जो मकरीत ठेले । न बोलवे सोंग मनीं उदेलें ॥ ८९ ॥

अंबरमणिकुलभूषा ॥ ९० ॥

हा सूर्यवंशास तुरा च साचा । सद्भक्तिची संदुक शंकराच्या ॥
पिके फळे भक्तपिकासि आंबा । मी पाहतों त्यास घडीक थाबा ॥ ९० ॥

अनिलतपःफलमग्रे० ॥ ९१ ॥

अनिलतप पुढारें पाठिसि लोभ पाहें ॥

---

२५ मृगशावनेत्रा=हरणाच्या बच्चासारखे डोळे आहेत जीचे अशी. २६ हेम=सोनें.

विमल कळवळ्यानें चामर छत्र वाहे ॥
लखलखित कुर्सीसि भक्तिउत्कर्ष दोघे ॥
झळकत घन मध्यें वीज तूं हे मनीं घे ॥ ९१ ॥

**सुरसरिद्वरज०** ॥ ९२ ॥

हें नाम रे स्वर्धुनिनीर वाहे । हें चैल तों चंपक तुल्य पाहें ॥
सुनीळसा शैलवरावलंबा । देईल आतां न करीं विलंबा ॥ ९२ ॥

**पाथोधिबद्ध०** ॥ ९३ ॥

ओढी धनुष्या शर फार मारी । हुंकारकारी रणचारु भारी ॥
जो योगिराजीं सुदुराप मोठा । तो कोप वंदीन मनांत माथां ॥ ९३ ॥

**अकपटपटुकपि०** ॥ ९४ ॥

स्वसंतोषानें जो करुनि बरवे वानर गडी ।
करी सेतूबंधा रजनिचरसेना च रगडी ॥
चिदानंदाचा कीं विशद तव हा कंद उमले ।
उठा वंदूं भावें उघड बहु हें दुःख जमलें ॥ ९४ ॥

**इंदीवरदलनयनं०** ॥ ९५ ॥

नीलोत्पैलाहूनि विशाळ डोळे । बाणें रणीं रावण वीर लोळे ॥
सुनील मेघावलिसांवळे तें । वंदीन जें दीनकृपेस लेतें ॥ ९५ ॥

**खंडितहरकोदंडा०** ॥ ९६ ॥

ब्रह्मांडाचा करंडा झगझगित तया मंडपा श्रेष्ठ झाली ।
खंडी चंडीशैंचापा उशिर न लगतां मूर्ति चित्तांत आली ॥
वैदेहीच्या* गळाची विमळ झळकती माळ दाळे निळांची ।
लीला आली विलासा लसलसित दिसे सानते हे सदांची ॥ ९६ ॥

**किं तव धनसुतजाया०** ॥ ९७ ॥

जायाधनाची तंव सोडि माया । वांयां घरातें करिसी असाया ॥
स्वरूप आनंद निमग्न काया । मना जपें श्रीरघुवीरराया ॥ ९७ ॥

**आपदि मां स्मरतीति०** ॥ ९८ ॥

आपत्ति देहीं स्मरणार्थ मातें । माझ्या स्मृतीनें तुज कार्य होतें ॥
संपत्ति दे तू तुज नाठवीता । तुटेल मा काय तुझें अनंता ॥ ९८ ॥

**अपनय दैन्यमुदग्रं०** ॥ ९९ ॥

हें दादुकें दैन्य धरूनि ठोकीं । चिंता हरावी सगळी विठो कीं ॥
तूं जाणसी टाकुनि अन्य यत्ना । मी न्याहळीतों तुज राजरत्ना ॥ ९९ ॥

---

१७ उत्पल=कमल. २८ चंडीशचाप=शिवधनुष्य. * वैदेही=सीता

**मम नाशयाधिवाधिं ॥ १०० ॥**

दुःखास तो देसवटा च द्यावा । चित्तौघ माझा सगळा हरावा ॥
सांभाळितो वत्सल एक तलें । मी दास आलों शरणागतलें ॥ १०० ॥

**दशशतकरवंश० ॥ १०१ ॥**

दशशतकरवंशीं जन्मला धन्य लोकीं ।
दशरथनृपतीचें पुण्य हें गोठलें कीं ॥
दशवदन तयाचा काळ जो रामराणा ।
धरुनि सुख धरावें मानसा टाकिं राना ॥ १०१ ॥

**त्यज निजगजवाजिकथां० ॥ १०२ ॥**

नगास दे जो जठरांत जागा । भजा वृथा हे गजवाजिपागा ॥
तो प्राप्त झाल्या तुज काय वाणी । न लाभतो तो न मिळे दुगाणी॥१०२॥

**हितमात्रं वांच्छसि चेत्० ॥ १०३ ॥**

आतां हिताची जरि चाड मोठी । घे रामपेटी स्वसुखा च साठीं ॥
स्त्रीपुत्रमित्रादिक चंचळें हें । चित्ता तुला वंचिति जाणलें हें ॥ १०३ ॥

**कर्तुमकर्तुं शक्तः ॥ १०४ ॥**

घडितो घडिनें अग हें विघडी । उघडी निज कोप गडी रगडी ॥
अभिराम गुणी धरिं राम धणी । धनकाम झणी धरिशील मनीं ॥ १०४ ॥

**दारिद्र्यदावशांत्यै० ॥ १०५ ॥**

दारिद्र्याभिध वन्हि जाळित असे नाना रिती सर्वदा ।
त्याची शांति करावया स्वकरुणादृष्टीजळा वर्ष गा ॥
अंकीं नित्य रमातडिद्विलसते तो इंद्रनीलप्रभा ॥
वैकुंठाख्यनभस्थलीं वसतसे त्या प्रार्थना अंबुदा ॥ १०५ ॥

**कमलायमाननेत्रा० ॥ १०६ ॥**

कोदंडें घाली निज बाहुदंडीं । नेत्रापुढें पंकज होय लंडी ॥
सौंदर्यसीमा धरणीसमा ची । ते माय पुंवेश नमूं सदांची ॥ १०६ ॥

**कुटिलाशयविषवल्लीं० ॥ १०७ ॥**

दुष्टास वाटे विषवल्लि तैशी । जटाल भाळीं श्रमबिंदु पूसी ॥
जे रावणा मारण वासना हो । जे नेसली वल्कल तीस पाहों ॥ १०७ ॥

**तृष्णानक्रनिकृष्ट० ॥ १०८ ॥**

तृष्णा सावज ओढितें भज हरी येनात कोणी तरी ।

---

२९ दशशतकर=सूर्य. ३० तडित्=वीज. ३१ अंबुद=मेघ. ३२ कोदंड=धनुष्य. ३३ पंकज=कमल.

सोडीना चिरकाळ कष्ट गमले नाहीं जिवाची उरी ॥
आतां श्रीरमणा करूनि करुणा तूं पाव मीं बेरसा ।
झाला उद्धरिला गजेंद्र धरिला त्या सावजें तो जसा * ॥ १०८ ॥

---

## उपसंहार.

गोदातीरीं विराज विमल बहु वरा मुद्गल श्रेष्ठ नाम ।
पावे सत्पुत्रसौख्या जननिकर जया सेवितां येक भावें ॥
शेंडे तेथील जोशी विबुध बहु भले वेदविद्याविचारें ॥
त्या वंशीं कश्यपाचा मुकुटमणि दिसे माणिकेशावतारे ॥ १ ॥
सत्पुत्र त्याचा हरिराज नामें । करी न विद्या न विधान नेमें ॥
करूनि आर्याश्रय अर्थ त्याणें । समर्पिला रामपदीं सुखानें ॥ २ ॥

---

* आमचे समहीं शा० श० १७८२ त छापलेलें मुद्गलाचार्य विरचित आर्याष्टोत्तरशतक सटीक आहे. त्यांत १०८ आर्या आहेत. तें मूळ पुस्तक व हें भाषांतर ताडून पाहतां ७० आर्यांपर्यंत यांतला व त्यांतला पद्यक्रम जमतो. पुढें खालीं लिहिल्याप्रमाणें यातील व त्यांतील पद्यांक मागें पुढें झाले आहेत.

| हरिराजकृत श्लोकांक. | मुद्गलार्यामुद्रित पुस्तकांक. | हरिराजकृत श्लोकांक. | मुद्गलार्यामुद्रित पुस्तकांक. |
|---|---|---|---|
| ७१ | ७२ | ९१ | ९२ |
| ७२ | ७३ | ९२ | १०५ |
| ७३ | ७४ | ९३ | १०६ |
| ७५ | ७६ | ९४ | १०० |
| ७६ | ७७ | ९५ | ९३ |
| ७७ | ८८ | ९६ | १०७ |
| ७८ | ८७ | ९७ | ८२ |
| ७९ | १०८ | ९८ | ७८ |
| ८० | ८९ | ९९ | ७९ |
| ८१ | ९६ | १०० | ८० |
| ८२ | ९० | १०१ | ८१ |
| ८३ | ९७ | १०२ | ८३ |
| ८४ | ९८ | १०३ | ८४ |
| ८५ | ९९ | १०४ | ८५ |
| ८६ | ९४ | १०५ | ८६ |
| ८७ | ९१ | १०६ | ९५ |
| ८८ | १०१ | १०७ | १०२ |
| ८९ | १०३ | १०८ | ७१ |
| ९० | १०४ | | |

छप्पनावे आर्येचें भाषांतर चार श्लोकांनीं केलें आहे. आमच्या जवळच्या टीकेचा कर्ता काकभट्ट म्हणून कोणी आहे. ११ निकर=समूह.

माता मृता शिशुपणीं पण वाढवीलें ॥
सद्बुद्धि देउनि मला मग सिद्ध केलें ।
तो माणिकेश्वर पिता नमिला पित्यानें ।
भावें करूनि हरिराज कवीश्वरानें ॥ ३ ॥

इति श्रीमहामुद्गलाचार्यविरचितश्रीरामार्याष्टोत्तरशतटीका श्लोकबद्धा समाप्ता.

---

## भस्मासुराख्यान.

जाळूनि भस्म करि भस्मनिशाचरातें[1] । चिंता पदीं भव निमिष्य अशा चरातें ॥
मोहोनि शंकर भवानिस ने भिकारी । त्या कीर्तिचा बुधसभेंस कवी भिकारी॥१॥
अहंकार भस्माख्य तो पाठि लागे । शिवा अर्जवी बुद्धि घेणें चि लागे ॥
तयीं सोडवी विष्णु अध्यात्मविद्या । रूपें मोहुनी भ्रांति नाशी अविद्या ॥ २ ॥
वर्णू कथा करुनि मीष हरीहरा या । जेणें जनांत कळिकल्मष[2] संहराया ॥
भस्में उपास बहु काळ धुमांबुपानें । केला प्रसन्न शिव सांब महा तपानें ॥ ३॥
माग शंभु म्हणतां वरदानें । अंत नसो म्हणिजे द्विरदानें ॥
तेंवि असुर वदे शिव साहे । मागतों म्हणि तुम्हां नवसा हे ॥ ४ ॥
ठेवीन ज्या शिरिं करा महा त्वरेनें । जाळूनि भस्म करिं मी च महास्वरानें ॥
तेव्हां समस्त सुर वीनविती विधींतें । कल्पी सुरद्रुम[3] वराप्रति दुर्बुधींतें ॥ ५ ॥
भस्मासुराप्रति प्रसन्न गणेशतातें । जो होउनी ह्मणतसे तुज इच्छितातें ॥
तेव्हां चि बुद्धि भ्रमली निजहस्तकातें । ठेवोनि भस्म करणें शिव-मस्तकातें ॥ ६ ॥
देखोनि सुंदर असूर हि शत्रुकामें । संमोहिला तप पडे सगळें रिकामें ॥
द्वेषें उभारुनि अभाग चि ये करातें । तेव्हां च त्या सुटतसे पळ शंकरातें ॥ ७ ॥
कां जाळिलें मज तसें चि करीन यातें । आटीन जेंवि रिति तुप्य करीन यातें ॥
संधीस साधुनि रिपू सुड जीवनासी । कामारि मार्ह न म्हणे जरि जीविनाशी ॥८॥
ध्यावें सवेग मनबुद्धिस आठळना । * * * *
पावे सहीत गिरिजा भव उल्लणातें । सोडी गजांबर[4] त्रिशूळ विशाल्वनातें ॥ ९ ॥
रुंडमाळ तुटली सुटल्या जटा । घंटिका गळति वाकि हि वाजटा ॥
धावरा निज शरीर हि सांवरी । पातल्या असुर त्यांत हि सांवरी ॥ १० ॥
पार्वती ह्मणत पाव मुरारी । संकटांत पडला त्रिपुरारी ॥
चिद्घनासि चिदैक्य रमेशा । पूर्णब्रह्म परमा परमेशा ॥ ११ ॥

---

१ निशाचर=राक्षस. २ कल्मष=मल, पातक. ३ सुरद्रुम=कल्पवृक्ष. ४ गजांबर=हत्तीचें कातडें.

अद्भुत कृष्णा सखया अनामा । रामा नमो विश्वमनोभिरामा ॥
रमारूपें वाढुनि अमृताला । त्या लाविला धाक दितीसुताला ॥ १२ ॥
थारे चि ना तूजपुढें अहंता । हंता अगा संग्रहिं तो महंता ॥
स्थापूनि विद्या प्रतिमावतारीं । तारी दिनें विश्व गुणें वितारी ॥ १३ ॥
वंदीं तुतें भक्तसुरद्रुमातें । मातें सखा तू चि हरीं श्रमातें ॥
माते तुझ्या रोममुळीं जगासी । गा शीकवूं त्या किति सौभगासी ॥ १४ ॥
तूं जाणसी सर्व मनोगतातें । तातें जसा स्नेह किजे सुतातें ॥
ऐशापरी येउनि दानवारी । वारा कडे काढुनि दानवारी ॥ १५ ॥
ऐशा रिती भगवती करुणा उभारी । तात्काळ तो प्रगटला मधुकैटभारी ॥
तो विश्वव्यापक हृषीकेश ती तयातें । ये जा नये आकळ माव विधातयातें ॥१६॥
जो तत्वता अगुसार असार साक्षी । तो मोहिनी-रूप धरी मग सारसाक्षी ॥
ज्याचे पदीं सकळ तीर्थ प्रयाग वेणी।त्याचे शिरीं कुरळ केश सलंब वेणी ॥१७॥
केला विचित्र हरिनें नकळे तमाशा । माथां शशी सिस फुलादिक मूद मासा ॥
भाळीं टिळा कौस्तुभ तेज नाकीं । ते देखुनी सुरसुरे खचोज नाकीं ॥ १८ ॥
नेत्रीं विशाळ अति चंचळ अंजनातें । देखूनि साम्य करि भूषण सज्जनातें ॥
कंदर्प-कोटि जननी मिरवे सुवासें । ब्रह्मांड-भेदन करी तरुच्या सुवासें ॥ १९ ॥
सौंदर्य शेष विधि वेद हि काय वर्णी ॥ * * * * * *
चाले अमंद धरणी गति राजहंसी । जे लक्षिजे निज मनीं मुनिराजहंसीं ॥ २० ॥
केला विशाळ वट वृक्ष सदाशिवासी । राहे उमा जाखिण होउनियां मुळासी ॥
हातीं धरूनि वट मध्य मुळासि माये । ठाकी उभी खळजना प्रति शोष माये ॥२१॥
देखूनियां सन्मुख मोहिनीचा । यावा वळें व्यापुनि मोह नीचा ॥
टाकूनियां लाग उमाशिवाचा । सांगें म्हणे कोण तियेसि वाचा ॥ २२ ॥
म्हणे मोहिनी ये वनीं कोण कामा । पुसोनी वृथा शीणसि का रिकामा ॥
तुतें चाड तें कृत्य जाणें मनाचें । जशी नाचतें मी तसा नाच नाचें ॥ २३ ॥
मी नाचतें त्या सम नर्तनातें । नाचेल जो गायुनि नर्तनातें ॥
माझे मनीं काम जया नरातें । त्या वश्य मी तीर्थ तपा न रातें ॥ ॥२४ ॥
तीन नेत्र विषकंठ धोगडा । नावडे जटिल वृद्ध जोगडा ॥
टाकुनी जंव अशा नवसा च । जाहलें फळ तुला करिं साच ॥ २५ ॥
येरू म्हणे नाचसि तूं तसा ची । नाचेन मी होय परतु साची ॥
दावी पदा गुल्फ धरूनि हातीं । नाचे तमाशा सुर हे पहाती ॥ २६ ॥

---

५ दितिसुत=दैत्य. ६ सुरद्रुम=कल्पवृक्ष. ७ हृषीकेश=हृषीका + ईश=इंद्रियांचा स्वामी.
८ सारसाक्षी=कमलनेत्रा. ९ कंदर्प=मदन.

धरी पाउलें पाद संधीस घोंटी । रमा ज्या पदाकारणें लाळ घोंटी ॥
ध्वजांकूशपद्मांकितें उर्ध्व रेखा । नखाग्रीं वसे चंद्ररेखा सुरेखा ॥ २७ ॥
भरे वांकियांचे स्वरें सप्त ताळें । झणत्कारिती नूपुरें तीं सुताळें ॥
कणत्किंकिणी कंकणें त्याचि माजी । घुमे घंटिका मेखळे त्या चि माजी ॥ २८ ॥
घरी पाउलें ती धरी जानु-चक्रा । खळू नाचतां हास्य ये देवचक्रा ॥
जयीं सुंदरी हात ठेवी कटासी । स्मरा श्रीविठो नाशितो संकटासी ॥ २९ ॥
गळां मुक्त एकावळी दिव्यहारा । कुचाग्रावरी दाविताती विहारा ॥
भरें नाचता ताल दे भोंवरी ते । तयीं शोभवी कांनिच्या भोंवरीतें ॥ ३० ॥
फुलें डल कोंयिंबिरी घोंस बाळी । डुले हालवी पाहती लोक-बाळी ॥
धरी अग्र कामी शयानें स्तनाचें । मदें लोचनीं घूर्णता मस्त नाचे ॥ ३१ ॥
जशी ती करीते तसा तो करीतो । मदें मातला मस्त जैसा करी तो ॥
स्तनींहूनि बाहूमुळीं हस्त ठेवी । चुकेना कदा दैत्य हा ते चि ठेवी ॥ ३२ ॥
अकस्मात दैत्यावरी धाड घाली । शिरीं हात ठेवूनि नाचूं निघाली ॥
सुरारी तया लक्षुनी लक्षणातें । तसा जो करी भस्मला तत्क्षणातें ॥ ३३ ॥
वर्षती सुर नभीं सुमनांतें । रोखिती हरिगुणासि मनातें ॥
घोषवाद्य बहु वाजति नाना । गात नारद गुणास तनाना ॥ ३४ ॥
समाधान झालें भवानीभवातें । हरें व्यापिला मोहिनी-वैभवातें ॥
स्मरें मोहला स्वरूप आपपातें । करा अंगना-संग ना तो गपातें ॥ ३५ ॥

भस्मासुर-वध समाप्त.

---

## अथ राधावर्णन.

सवाई ( मदिरा )

**केबरी वर्णन.**

वर्णितसें मि यथामति ही हरि सुंदरता तिचिया केबरीची
चंचल श्यामल कोमल ते हरि निंदिति बंधुरता चमरीची ॥
आनन पंक म्हणोनि अशंकित बैसलि पंक्ति गमे भ्रमरीची
कीं मुखइंदुसि दद म्हणोनि ते आलें ति हे तिमिरा च मरीची ॥ १ ॥

**दंतवर्णन.**

दत तिचे विधिनें जइं निर्मिले तैं हि असे हरि सुंदर होरा

---

१० किंकिणी=घंटा. ११ मेखला=कमरपट्टा. १२ सुरारि=देवशत्रु भस्मासुर
१ रा० रा० रामजी भौडजी खानोलकर मेडिकल चार्ज नेटिव ट्रुप्स् महिदपूर यांनीं हें व या पुढचीं सात प्रकरणें पाठविलीं. २ कबरी=वेणी. ३ बंधुरता=कोमलपणा.

चंद्रकळा च कि कर्वतिल्या द्विगुणीत बराबरि लाहन थोरा ॥
ते चि सुधा अधरीं मधुरी शुभ शोभतसे तो कळक चकोरा
आस्यं तिचें शुभ हास्य पहा अमवास्येसि लास्य करीन च कोरा ॥ २ ॥

**नेत्रवर्णन.**

आननपंकज खंजन कीं तरु तीत रुते शिव जीव विहंगम
लोचन कीं कवि जीव दिवानिशि शोभवि जेवि इडात्रयसंगम ॥
यौवन चाबुकस्वार फिरावित एकसरें कि विसरें तुरंगम
कीं मुखचंद्र मनोजव हा रथ भोंवइं रश्मिनियुक्त तुरंगम ॥ ३ ॥

**कुचवर्णन.**

यौवन शैशव रोमसिमेंत बळें उठले कुच पुंड पैरावे
त्यांचें शिरींहुनि रेच करूनि हरी बरव्या परि हाति धरावे ॥
देउनि कौल तुरे शिरपाव बरे मृगनाभिमदानें भरावे
पावल अस्त रवी मग मस्त तें कस्त करूनि तें दस्त करावे ॥ ४ ॥

**नितंबवर्णन.**

देखत चारु नितंब तिचा रथ चक्र फिरे शिरिं धूळि हि घाली
केळि जशा विपरीत तशा उरु पावलें तीं कमळें तळिं झाली ॥
लाजतसे गति देखुनियां गज हंस शिके तिजपासुनि चाली
योग्य तुम्हांस हरी भुवन त्रयिं माझे मनास ति एक चि आली ॥ ५ ॥

**श्रीकृष्णोक्ति.**

सांगणें एक तुला मनिंचें वद देइनसा मज दे अभयंकर
मार मला अनिवार शरें करिं मारितसे करूनि मज किंकर ॥
सोडविता रिपुपासुनियां मज कोण असे तुजवीण प्रियकर
मारिल यासि मला निववील तो भेटवि राधिकेचा कुचशंकर ॥ ६ ॥

**राधिकेची पत्रिका.**

देहलियेवरि देखियले सखि नागमुखीं शशिबिंब वसे
त्यावरि दाडिम त्यावरि तो द्रुम त्यावरि कोरकिं चंचु दिसे ॥
त्यावरि चंचळ खंजन दोन च त्यांवरि सुंदर भृंग वसे
त्यांवरि सज्ज शरासन सायक नायक मानस विंधितसे ॥ ७ ॥

**कचवर्णन.**

रतिसंगरिं भंगुर हा कचपाश हो यासि तों पाठिकडे दडणें

---

३ आस्य=मुख. ५ लास्य=नृत्य. ६ शैशव=बाळपण. ७ परावे=शत्रु. ८ मार=मदन.
९ किंकर=सेवक. १० शरासन=धनुष्य. ११ सायक=बाण. १२ कच=केस.

वदनें रदैंना मदनच्छदनामृत देउनि भेटि मुखें जडणें ॥
तुळणेस तुझे सुघन स्तन राधिकें यासि नसे दडणें पडणें
झगडयांत पुढें भिडणें म्हणुनी धरियेलिच कंचुकि कीं वडणें ॥ ८ ॥
हार धरी जळधार शिरीं घन चंदनपंक विभूति विराजे
श्यामलता वर जे दिसते सखि ते चि गळां गरळाकृति साजे ॥
राधें अबाधित कंठिं उमा प्रतिमा तुझिया कुचशंभुसमा जे
यासि हरी नखचंद्र करी शिरिं देखति गे कइं लोचन माझे ॥ ९ ॥

**दूतिगमन.**

नूति चरायकें दूति चली ललना औंर लाल भये ऍकठौरी
एककि श्याम मनोहर मूरत एकाकि सुंदर सूरत गोरी ॥
कुंदनमो मनों नीलमणी सिबनी जयरामकें सांइकि जोरी
मानों मधूकरयो छत छोरिकें चुबत चंपकफलपकोरी ॥ १० ॥
दीक्षित हे चि पुरोहित दूति मनोभव यज्ञ करी शुभ धर्में
ऋत्विज हस्त कुचद्वय बस्त चि सीत्कृत मंत्रित तांत्रिक कर्में ॥
राधिका वेदि वराग हि कुंडल स्वयंभु स्रुवा हा तो च स्वधर्में
सोमलता अधरामृतपान हो अवभृथस्नान रतांतजघर्में ॥ ११ ॥
सुदरि ते अति लज्जित होउनि कंचुकि लेउनिं झांकि स्वयंभू
घायळ हो कुच मन्मथकुंभि किं स्थावरता जणुं ताणिलों तंबू ॥
कीं वसनें कशिला चि मुखद्विजशंभुस अंभ भरोनि तों चबू ॥
कीं जैव शंबरवैरिभयें तों दिगंबर अंबर पांघुरे शंभू ॥ १२

इति राधावर्णन समाप्त.

---

## अनंतकविकृत गोपीगीत.

वंदूनियां सद्गुरु-पादुकांसी । प्रणम्य भावें मग सज्जनांसी
श्रीकृष्णनामें चि कैवल्यमुक्ती । गोविंद दामोदर माधवेति ॥ १ ॥
प्रभातकाळीं जननी यशोदा । उठीं म्हणे सत्वर बा मुकुंदा ॥
गोपाळ येती तुजला बहाती । गोविंद दामोदर माधवेति ॥ २ ॥
प्रकाश केला गगनीं रवीनें । गोपी दधीं त्या घुसळी रवीनें
त्या कंकणांचे बहु नाद येती । गोविंद दामोदर माधवेति ॥ ३ ॥
प्रक्षाळुनीयां मुख खाय रोटी । लोणी असे सुंदर तूजसाठीं
अशी कशी रे तुज झोप येती । गोविंद दामोदर माधवेति ॥ ४ ॥

---

१३ रदन=दांत. १४ कैवल्य=मोक्ष.

वृंदावना लागुनि जाय वाळा । उशीर माझ्या दळणासि झाला
जेवूनियां गोप घरासि येती । गोविंद दामोदर माधवेति ॥ ५ ॥
जाई त्वरेनें सखया वनातें । मागून मी धाडिन भोजनातें
गोपाळ हे सर्व तुला वहाती । गोविंद दामोदर माधवेति ॥ ६ ॥
करांबुजीं घेउनियां शुंकाला । अभ्यास गोपी करिती तयाला
रागस्वरें सुंदर बोलवीती । गोविंद दामोदर माधवेति ॥ ७ ॥
गोदोहना बैसति गोपदारा । पात्रांतरीं वाजति क्षीर-धारा
तेणें स्वरें मंजुळ गीत गाती । गोविंद दामोदर माधवेति ॥ ८ ॥
गाई वनावांचुनि दीन झाल्या । घरीं नसे रे तृण त्या भुकेल्या
दावीं नवीं तोडुनि धांव घेती । गोविंद दामोदर माधवेति ॥ ९ ॥
वेशीपुढें रे कुळें गोधनांचीं । केलीं उभीं सर्व हि यादवांचीं
गोपाळ हे सर्व तुला वहाती । गोविंद दामोदर माधवेति ॥ १० ॥
घेवोनि जातें दळु गोधुमातें । घर्मार्थबिंदू मुख-पंकजातें
सुवक्रकेशा हरिगूण गाती । गोविंद दामोदर माधवेति ॥ ११ ॥
कूपांतरीं घालुनि भांडदोरा । शोभतसे सुंदर गोपदारा
ओढोनि हस्तें श्रम फार होती । गोविंद दामोदर माधवेति ॥ १२ ॥
उलूखलीं घालुनि तंदुलांतें । गोपांगना कांडिति रम्य हस्तें
आलापुनी सुदर गीत गाती । गोविंद दामोदर माधवेति ॥ १३ ॥
पाकक्रिया सारिति गोपबाळी । लाटीतसे सुंदर पूर्ण पोळी
घोषार्णवें कंकण ढाळ देती । गोविंद दामोदर माधवेति ॥ १४ ॥
या नतरें घेउनियां शिदोरी । नेऊनि देतीं सखया मुरारी
घे स्वामिया श्रीपति ताट हातीं । गोविंद दामोदर माधवेति ॥ १५ ॥
गाईस चारा यमुनेसि पाणी । वळती करावी अजि तुम्ही कोणी
कृष्णासि माझ्या बहु श्रम होती । गोविंद दामोदर माधवेति ॥ १६ ॥
करीं अती सुदर मोहरीया । पांवा बहू वाजत थाकयेय्या
ते घोंगडीया कसे ऊडवीती । गोविंद दामोदर माधवेति ॥ १७ ॥
लिहूनि पत्र द्विज पाठवीला । हरी नये कां बहु वेळ झाला
ऐकोनि गोपी करिती अकांत । गोविंद दामोदर माधवेति ॥ १८ ॥
यादौ हरी लागुनि लुब्ध कैसे । जळांत हे मत्स्य सदैव तैसें
समर्थ कैसे हरिगूण गाती । गोविंद दामोदर माधवेति ॥ १९ ॥
गोविंद गोपाळ हे दोघ बंधु । जेवीत होते दहिं भात लिंबू

१५ करांबुज=हस्तकमल. १६ शुक=पोपट १७ गोधूम=गहू.

त्या भोजनाची रुचि फार येती । गोविंद दामोदर माधवेति ॥ २० ॥
गोविंद गोविंद हरे मुरारे । गोविंद गोविंद रथांगपाणे[18]
गोविंद गोविंद मुकुंदमूर्ती । गोविंद दामोदर माधवेति ॥ २१ ॥
वृंदावनीं सुंदर वृक्ष आहे । श्रीकृष्णनामें ध्वनि गर्जताहे
पक्षीकुळें यादव गीत गाती । गोविंद दामोदर माधवेति ॥ २२ ॥
कृष्ण कृष्ण हें मुखारविंदें[19] । घेवोनियां नाचति नामछंदें
ऐकोनि गाई बहु कान देती । गोविंद दामोदर माधवेति ॥ २३ ॥
कृष्ण कृष्ण हे विचित्र वाणी । हें बोलती वेद महा-पुराणीं
हे कृष्ण आनत करी विनती । गोविंद दामोदर माधवेति ॥ २४ ॥

समाप्त.

---

## अनंतकविकृत

# सीतास्वयंवर.

सिद्धि बुद्धि वर मंगलमूर्ति । दे मला गणपती अति स्फूर्ति
वंदितों तुज सरस्वति माते । [20]वक्त्रिं राहुनि कृपा करिं मातें ॥ १ ॥
चिंतितों सदय सद्गुरुराया । शीघ्र सदृढ भवाब्धि[21] तराया
श्रोतयां विनवि जोडुनि पाणी । आयका सकळ बोबडि वाणी ॥ २ ॥
अहल्या शिळा राघवें मुक्त केली । जडत्वासि टाकूनिया दिव्य झाली
रघूनायकें आणिलें गौतमाला । अहल्या करीं घातली पुष्पमाळा ॥ ३ ॥
अहल्या म्हणे राघवा तूं दयाळा । वियोगासि संयोग केला नृपाळा
पुढें तूज स्त्री प्राप्त होईल रामा । तथास्तू म्हणे हा अशिर्वाद आम्हा ॥ ४ ॥
उद्धरूनि पदिं गौतम-जाया । सिद्ध होति मिथिले[22] प्रति जाया
कौशिकादि म्हणती रघुनाथा । चाल तूजचि वरी महिसुता[23] ॥ ५ ॥

### दिंडी.

विश्वामित्रें केला यज्ञ थोर । तेणें मेळविले ऋषीश्वर
स्वयंवरासी चालिले थोर थोर । त्यांचिं नामें परिसा सादर ॥ ६ ॥
महाशुक्र माध्येम भार्गव । गृत्समद सप्तर्षि वामदेव
अत्री भरद्वाज महानुभाव । असंख्यात चालिले भूदेवें[24] ॥ ७ ॥

---

१८ रथांगपाणे=चक्र आहे हातीं ज्याच्या अशा. १९ मुखारविंद=वदनकमल. २० वक्त्र=मुख. २१ भवाब्धि=संसारसागर. २२ मिथिला=जनकनगरी. २३ महीसुता=भूकन्या सीता. २४ भूदेव=ब्राह्मण.

अथवा ही वैशंपायन । मौदवीहा तो आश्वलायन
महापयगी सनक सनंदन । सनत्कुमार आणि सनातन ॥ ८ ॥
धर्माचार्य जाणती बाह्रव्ये । पराशर साकल्यें बाभ्रवे
महाभारत मांडुक मांडव्ये । भाष्य भारत सुलभ लव्ये ॥ ९ ॥

श्लोक.

ऋषी राम सौमित्र ते शीघ्र आले । पुरा बाह्य येवोनीयां स्थीर झाले
विदेहां[25]प्रती सांगती दूत वार्ता । ऋषी आणिले ऐकतां तोष चित्ता ॥१०॥
प्रधाना सर्वे घेउनी बाह्य आला । समस्तांसि रायें नमस्कार केला
उठोनी ऋषी क्षेमें[26] देती नृपाशीं । नृपें देखिला राम तो तेजराशी ॥११॥
रघूराजवक्त्रांबुजीं लुब्ध झाला । न सोडी जसा भृंग नीलोत्पलाला
ऋषी सावधा बोलताती विदेहा । त्वरें चाल आम्हासि नेईं स्वगेहा ॥ १२ ॥
विदेहांतरीं थोर झाली अशंका । पुसे कौशिकें[27] भीड सोडोनि देखा
तुम्हीं कोठुनी आणिलीं दोन रत्नें । तुम्हा प्राप्त कैसेनि झालीं प्रयत्नें ॥१३॥

पृथ्वी अंतरिं सूर्यवंश जलधीमध्यें महा-पर्वणी ।
कौसल्योदरशुक्तिका दशरथ-स्वाती-जळें गर्भिणी ॥
झाले सुंदर पूर्ण मास सदनीं निर्माण हीं मौक्तिकें ।
होतां [28]निर्जर येउनी वरशतीं आनंदती कौतुकें ॥ १४ ॥
ऐसें त्यां परिसोनि जाउनि नृपा अत्यादरें प्रार्थिलें ।
यज्ञा रक्षक पुत्र देइं मजला दोघांसि मागीतलें ॥
कष्टींचे जिव काढुनी मम करीं दिल्हे अती संकटें ।
देवोनी नरवीतसे उभयतां कीं जे बहू गोमटे ॥ १५ ॥
दोघे नंदन घेउनी क्रमिं पथीं आली पुढें राक्षसी ।
रामें ओढुनि चाप तीक्ष्ण शरें ताडोनि पाडी तिसी ॥
माझा रक्षुनि यज्ञ पूर्ण करितां आली तुझी पत्रिका ।
येतां राघव पाहि तो जड शिळा झाली विधीपुत्रिका[29] ॥ १६ ॥
श्रीरामें पद लावुनी जडपणा पासोनि उद्धारिली ।
तेव्हा गौतम आणुनी रघुविरें ज्याची तया अर्पिली ॥
ऐसे दाशरथी पराक्रमि बहू हे सैंवरा आणिले ।
बोले तो नृपती सुलाभ घडला वंदी ऋषीपाउलें ॥ १७ ॥

क्षणक्षणा राममुखा भुकेला । मनीं म्हणे मीं पण व्यर्थ केला ।

---

२५ विदेह=जनकराजा. २६ क्षेम=आलिंगन २७ कौशिक=विश्वामित्र. २८ निर्जर=देव. २९ विधिपुत्रिका=अहल्या.

केसेनि हा लाविल चाप सीतीं[३०] । वरील हा बाळक काय सीता ॥ १८ ॥
समृद्धि अन्नोदक तें बिऱ्हाडीं । करोनि नेले ऋषिचे वऱ्हाडी ।
घेवोनि आज्ञा ऋषिची निघाला । अमात्य घेवोनि सभेसि आला ॥ १९ ॥
रायें मंडप घालुनी मग सभा शृंगारिली कूसरी ।
लोपे ते अलकापुरी[३१] सुरपुरी[३२] ते ही न पावे सरी ॥
दूतां धाडुनियां सभेसि जनकें पाचारिले भूपती ।
आले ते महिचे असंख्य नृपती वक्त्रें गणावे किती ॥ २० ॥
अग वंग भूपती कालिंग शुग पावती ।
गौड गुर्जरादि कांबोज भोज धांवती ॥
मागध माळवी नृपाळ चोळ भार चालले ।
मलियाळ पांचियाळ नेपाळ सर्व पातले ॥ २१ ॥
कामवीर कामरूप कास्मिरादि विक्रमें ।
द्रवीड रायचोर केरळादि येति संभ्रमें ॥
त्रिगूळ ते त्रिलिंगराय सैंवरा उचाटले ।
अचाट ते सुराष्ट्र माहराष्ट्र सभे पातले ॥ २२ ॥
मानदेश खानदेश राय वांइ देशिचे ।
वऱ्हाड मारवाड लाड गौड गूजराथिंचे ॥
भाद्रिपाट बद्रिकेदारिंचे ते भूपती ।
अचाट जाट ते दहाट आट काट मीळती ॥ २३ ॥
जे चउली प्रयाग रूम हापसाण देशिचे ।
भींवडी कल्याण बागलाण कालठाणिंचे ॥
बेदनूर चंद्राऊर बंकापूरिंचे किती ।
मच्छिबंदर रायबाग देशिचे विलासती ॥ २४ ॥
गोलकुंडि काबुलादि भूप हिंदुस्थानिंचे ।
शीवकांचि सोरटिचे राय सोमनाथिंचे ॥
घटीपली विजापूर भागानगरिंचीं दळें ।
येति झाडिचे द्रवीड फिरंगाण ते बळें । २५ ॥
बीड ते लाहूर वीर शूर ते शृंगालिंचे ।
मऱ्हाट हाटकर येति राय देशदेशिचे ॥
समस्त भूपती सभेसि वैभवासि दाविती ।
वंद्य वंद्य राय त्यासि बंदिलोक वानिती ॥ २६ ॥

---

३० सीत=धनुष्याची दोरी. ३१ अलकापुरी=कुबेरनगरी. ३२ सुरपुरी=अमरावती.

जनक जाउनी सुनम्र प्रार्थितो ऋषीश्वरा ।
चालिजे सभेसि राम घेउनी कृपा करा ॥
अनाथ मी ऋषी तुम्ही सनाथ केलें पाहिजे ।
आपुला समूह घेउनी सभेसि बैसिजे ॥ २७ ॥

नम्र भूपती बहुत बोलिला । ऐकतां ऋषीस हर्ष वाटला
राम लक्ष्मणासि घेउनी सभे । पावतांचि राव राहिले उभे ॥ २८ ॥
ते क्षणीं ऋषी समस्त बैसले । नम्रतेकरूनि रायें पूजिले
तें धनुष्य आणुं कीं सभांतरीं । विप्र बोलती आणि नोवरी ॥ २९ ॥
जाउनी नृपू स्वकीय मंदिरा । सांगे शीघ्र सिद्ध नोवरी करा
त्या वधूसि लावितां हरिद्रिकी । ऊपमेसि बाळ भानु तो तुका ॥ ३० ॥
गौर जानकी बहुत कांतिसीं । त्यावरी हरिद्रा चर्चिली तिशीं
जाणों हाटकासि ओपें दीधलें । तेंवि जानकीचें आंग ऊटिलें ॥ ३१ ॥
रत्नयुक्त रुक्मकुंभ ठेउनी । गुफिताति तंतुनें वऱ्हाडिणी
त्यांत बैसवीति ते अयोनिजा । न्हाणिती सुमंगळें नृपात्मजा ॥ ३२ ॥
न्हाणुनी स्वमंदिरांत आणिली । विद्युते परी [ च ] चीर नेसली
पल्लवीं निबीड शुद्ध मौक्तिकें । साम्यतेसि शुक्र पाहतां फिके ॥ ३३ ॥
आंगिं रेखिली सुरत्न कंचुकी । बैसली सुखासनीं ति जानकी
घालिती सुवासिनी सुकज्जला । नेत्र पाहतां विस्मिताबला ॥ ३४ ॥

## सवाई.

नेत्र इचे अति चंचळ देखुनि घालिति मत्स्य जळीं शरिरासी ।
वर्तुळ आणि विशाळ विलोकुनि नित्य कुरंग फिरे वनवासी ॥
अंजनयुक्त सुसुंदर पाहुनि लज्जित खंजन लाघे दिशांसी ।
सूर्य-विकासिनि पद्मिनि नेत्रदळां पहतां करि म्लान मुखासी ॥ ३५ ॥
देखुनियां मुखचंद्र इचा नभिं चंद्र म्हणे मज स्पर्धि उदेला ।
यासि कळंक नसे मजमाजि कळंक म्हणोनि सांचित हि झाला ॥
षोडश ह्या मजलागिं कळा अधरामृत मिश्रित बत्तिस त्याला ।
वास्तव तो शशि होउनि क्षीण दिसेंदिस वाळवि त्या शरिराला ॥ ३६ ॥
चंचुचि नासिक देखुनियां शुक लाजुनि पांख चि चुंचुसि खोंवी ।
आस्य तिचें अतिहास्य पहा अमवास्येसि लास्य चकोरीस दावी ॥

---

३३ हरिद्रिका=हळद. ३४ भानु=सूर्य. ३५ हाटक=सोनें. ३५ ओप=उजळा. ३७ रु-क्म=सोनें. ३८ अयोनिजा=सीता. ३९ कुरंग=हरण

सुदर दाडिम मी म्हणे दंत इचे पहतां उलले निज देहीं ।
बिंब प्रवाळ सुधारस सुंदर सुस्थळ देखुनि होति च स्थाई ।। ३७ ।।
मुष्टिप्रमाण इची कटि पाहुनि जाउनि सिंह द्विपांतरिं राहे ।
ही गति तों मज नाहिं म्हणे गज यास्तव मस्तक डोलविताहे ।।
पद्मदळाहुनि कोमळ सुदर राबति त्या सखियाद्वय पायें ।
आणुनि पादयुगांगुळिं भूषण लेववितीं ललना ल्वलाहें ।। ३८ ।।

**श्लोक.**

अंगुष्ठद्वयिं शोभती अनवटें तीं जोडवीं चोखटें ।
पोल्हारें विरुद्या दशांगुळिं वळीं गर्जोनियां पोंचटें ।।
वांकी गुर्जरिया सुनूपुरझणत्कारें विलासे सिता ।
कन्येचा पृथिवी विलास पहतां आनंदली तत्वतां ।। ३९ ।।
रुक्में माडेत रत्न मिश्रित प्रभा कासे विलासे सती ।
पाचू माणिक पद्मराग मर्कत वैदूर्य रत्नद्युती ।।
गोमेदांकित इंद्रनील जडिले पेरोज ते खेवनी ।
ऐसें तें कटिसूत्र सुंदर कटीं ल्याली [४०]क्षिती-नंदिनी ।। ४० ।।
[४१]मणिबंधीं मणिभूषणें करुनियां तीं कंकणें शोभती ।
त्यां पढें गजरे करांगुळिं वळीं त्या [४२]मुद्रिकी राजती ।।
दोहींतें भुज बाजुबंद अवळी चोळीवरी लेइली ।
काचोळीवरि हंस मोर लिहिले मोत्यें बहू खीळिलीं ।। ४१ ।।
चींतांका चिंचपेटिया गळसरी ते एकदाणे किती ।
मोत्यांचे सर आणि पचलडि तो कंठा गळां बांधिती ।।
कंठीं ताइत गोफ दाट पुतळ्या त्या गोंविच्या सांखळ्या ।
नाना मौक्तिक रत्नहार हृदयीं त्या माजि चांफेकळ्या ।। ४२ ।।
आधी ले बुगड्या फुल्या तळिं पहा बाळ्या बहूतांपरी ।
खुंटा टोप असे विशाळ झुबका मासोळि कोथिंबिरी ।।
नागोत्रे श्रवणीं विराजति फुल्या त्या दूहिरी सांखळ्या ।
त्यांचे हल्लक खोंविती वरि परी मत्स्यां पहा मोकळ्या ।। ४३ ।।
नाकीं बेसर घातलें मज गमे त्रैलोक्य मोलागळें ।
भाळीं सुदर शोभती बिजवरा भांगीं सुमुक्ताफळें ।।
दोन्ही मस्तकिं राजती रविशशी देखोनियां बोलती ।
आम्ही व्यर्थचि फीरणें म्हणउनी आस्ताचला धांवती ।। ४४ ।।

---

४० क्षितिनंदिनी=सीता. ४१ मणिबंध=मणगट. ४२ मुद्रिका=अगठी.

जैसा चक्रफणीवरी मणि दिसे वेणी तशी साजिरी ।
त्याली राखडी मूद बोर काळि ते शोभे तळीं कूहिरी ॥
त्या खालीं फुल ते चि ताइत पहा शीव्यावरी आंवळे ।
गोंडे ते कटि लोंबतां चि दिसती दोन्ही जसे जावळे ॥ ४५ ॥

यापरी करूनि सिद्ध नोवरी । वैसली अयोनिजा गजावरी
देखतां तिशी गभस्ति[४३] झांकला । सुप्रभे प्रकाश थोर फांकला ॥ ४६ ॥
भोंवती असंख्य दासिचीं शतें । मध्यभागिं रूप तें विराजतें
जेंवि चंद्र तो उडुगणांतरीं[४४] । तेंवि शोभते सिता [ती] सुंदरी ॥ ४७ ॥
स्वर्गिं मेनकादि त्या तिलोत्तमा । त्यापरीस दासि सर्व उत्तमा
त्या गजावरी बसोनि चालिल्या । वेत्र धारणी सभेसि पातल्या ॥ ४८ ॥
चामरासि वीजती[४५] [च] दूतिका । पातली सभेसि भूमिबाळिका
पावतां सभेसि फांकली प्रभा । त्या प्रभे करूनि झांकली सभा ॥ ४९ ॥

दीप्ति दाटतां सभेसि भूप नेत्र झाकिती ।
थोर थोर राय अंतरीं विचार तर्किती ॥
काय एकतां चि सूर्य सैंवरासि पातला ।
याज साठिं ह्या सभांतरीं प्रकाश दाटला ॥ ५० ॥
एक बोलताति व्यर्थ तर्क कां तुम्ही करा ।
पातली सभेसि भास्करोपमा हि सुंदरा ॥
यापरी नृपें सभेसि आणिली ति नोवरी ।
सेवकां म्हणे धनुष्य आणिजे सभांतरीं ॥ ५१ ॥
राय बोलतां अमात्य सेवकादि धांवती
जाउनी धनुष्य तें असंख्य लोक ओढिती
पाठिं कोटि मत्त हस्ति लोटिताति मस्तकें
आणिलें सभेसि ओढुनी अनंत हस्तकें ॥ ५२ ॥
ते क्षणीं उठोनि भूप बोलिला सभांतरीं
चाप सज्य जो करील त्यासि नोवरी वरी
ऐकतांचि अंग वग कैकयादि बोलिले
देणें नाहिं नोवरी म्हणोनि विघ्न निर्मिलें ॥ ५३ ॥
राव ते तटस्थ होउनी सभेसि बैसती
तों कुबेर-बंधु[४६] पूजुं चालिला पशूपती

४३ गभस्ती=सूर्य. ४४ उडुगण=नक्षत्रसमूह ४५ वीजती=वारा घालिती. ४६ कुबेर-बंधु=रावण.

ते क्षणीं *प्रहस्त घेउनी विमानिं बैसला
† अंबुधीमधूनि शंभुपूजनासि चालिला ॥ ५४ ॥
[४७]व्योममार्गिं विमान पातलें परी वरी
वाद्य वाजताति नाद कोंदला दिगंतरीं
ऐकतां दशाननें सचीव यासि पूशिलें
तेणें सर्व पूर्व ही दशानना निरूपिलें ॥ ५५ ॥
विदेह-राजयासि कन्यका सुरत्न लाधलें
मंदिरीं नृपें तिच्या स्वयंवरासि मांडिलें
धाडुनी मुळें समस्त आणिले चि भूपती
ऐकतांचि रावणें विमान प्रेरिलें क्षिती ॥ ५६ ॥
दूरि देखतां दशाननासि राय बोलती
लग्न हें चि विघ्न पातलें असे सुनिश्चिती
देखताचि समीप रावणासि राय ऊठले
त्या सहीत बैसले परंतु कंप सूटले ॥ ५७ ॥

गर्जोनि रावण म्हणे जनका विदेहा । धाडोनि आणिसि मुळें नृपती स्वगेहा
नेणेसि रे अजुनि तूं मज रावणाला । कैलास हालवुनि दावि न मीपणाला ॥५८॥
कन्या तुझी बहुत सुंदर आयकोनी । आलों असें त्वरित बैसुनियां विमानीं
मातें वरील तरि मीं वदुं काय वाचे । सूरांगना चूरिति पाय सदैव ईचे ॥ ५९ ॥
भाग्यासे वानूं तरि ते सुर बंदिशाळे । राहोनि काम करिती पुसती सुवेळे
जें काम वांटुनि दिलें तितुकें करावें । अधिक बोल करिती तरि म्यां चिरावें ॥६०॥

सुरेंद्र आणि माळिका अखंड चंद्र ऊदका ।
समीरणू[४८] चि झाडणी धरोनि झाडि आंगणीं ॥
वरूण घालि मार्जना[४९] करोनि यम गर्जना ।
अखंड घर्टि घालितो सुपर्ण[५०] ग्राम रक्षितो ॥ ६१ ॥
विरिंचि[५१] वाचि पांतडे[५२] मुखा करीत वाकडें ।
मराळ दावि दर्पणा श्रि सूर्य वाहे सर्पणा ॥
गणेश रासभें वळी नव ग्रह ते आवळी ।
करोनि त्यांसि पायरी चढूनि जाय ऊपरीं ॥ ६२ ॥
गृहीं [५३]विरिंचि-कूमरी अमंगळें चिरें चुरी ।

---

* प्रहस्त=रावणाचा प्रधान. † अंबुधि=समुद्र ४७ व्योम=आकाश. ४८ समीरण=वायु ४९ मार्जन=सडासारवण. ५० सुपर्ण=गरुड. ५१ विरिंची=ब्रह्मा ५२ पांतडें=पंचांग. ५३ विरंचीकुमरी=सरस्वती.

प्रसूति-काळिं लेंकुरें तयाचि वाचि अक्षरें ॥
या परी च देव सर्व मदिरींच राबती ।
मज परीस भाग्यवंत कोण आहे भूपती ॥ ६३ ॥

+ + + +
+ + + +

मौन तें धरूनि व्यर्थ कां उशीर लाविसी ।
न वदोनि नोवरीसि बैसवीं ये मांडिसी ॥ ६४ ॥

कुबेर भांडारें-गृहीं च राहे । तपें करोनी शिव अर्चिलाहे ॥
सुरत्न तो हाटक कोट माझा । तयासि तो खंदक सिंधु राजा ॥ ६५ ॥
हें भाग्य माझें असतां नृपाळा । आणीस ना कां हिन तूं कपाळा ॥
मी आसतां कोण वरील ईतें । तो भूपती वीनवि रावणातें ॥ ६६ ॥
आधीं च ग्यां व्यर्थ पणासि केलें । तयावरी भाग्य फळासि आलें ॥
बोलोनि गेलों पण लंक-नाथा । झाला तुम्हां देखुनि खेद चित्ता ॥ ६७ ॥
गर्वे म्हणें राक्षस वृंद-राजा । बोलें विदेहा पण काय तूझा ॥
जो चाप हें ओढुनि सीतें लावी । तेणें सुखें नोवरि हे वरावी ॥ ६८ ॥
ऐकोनियां रावण पूर्ण हासे । अजा गजाला बहु काय भासे ॥
तृणा-परी मोडिन मी धनुष्या । दावीन मी कौतुक या मनुष्यां ॥ ६९ ॥

उठोनी गेला तो दशमुख धनुष्यासि कवळी ।
बिभत्सीं देखोनी जनक-तनया ते दचकली ॥
अगे पृथ्वी माते दशवदन पाडीं कलथुनी ।
तवां धूळी मूर्खा फाजित करूनी घालि वदनीं ॥ ७० ॥
कुळस्वामीनी गे तुजप्रति करीतें विनवणी ।
त्वरें पावें माते दशमुख यशस्वी न करूनी ॥
अपेशा देईजे विस भुजि धनुष्या उचलितां ।
तुझीं मीं नौरात्रे करिन नव कोणा न कळतां ॥ ७१ ॥
शिवाच्या कोदंडा विनवि दशमुडासि कलथीं ।
करीं तू घोटाळा जरि करि उडाणा तरि मथीं ।
त्रिनेत्रा त्वां चापीं रिघुनि निज शक्ती जड करीं ।
त्वरें पापी चापा नुचालि तव पावे झडकरीं ॥ ७२ ॥
ऋषी साधू संता मुनिजनमहतां विनवितें ।

---

५४ भांडारगृह=खजीना. ५५ हाटक=सोनें ५६ सिंधु=समुद्र ५७ वृंद=समूह. ५८ सीत=दोरी. ५९ अजा-शेळी ६० बिभत्स=आकराळविकराळ.

करा तुम्ही याची गलित निज शक्ती बहुमतें ॥
सिता तैं सर्वांची स्तुति करुनि पाहे ऋषिबळीं ।
सगर्वे लंकेशू विसभुजिं धनुष्यासि उचली ॥ ७३ ॥
धनुष्या लंकेशें अमित बलकोशें उचलिलें ।
न थोरा भूमीसी पदयुगुल चापें कलथिलें ॥
त्वरें त्याचे वक्षस्थळिं बसुनि पाडी क्षितितळीं ।
उताणा आक्रंदे तंव महि मुखीं घालित धुळी ॥ ७४ ॥
मुखें मारी हाका म्हणत जनका काय पहसी ।
बरें मी मेल्यानें जिउनि मिथिळे काय रहसी ॥
जिता माझा बंधू करिल नृपती निर्मुळ तुझें ।
कुशब्दा ऐकोनी नृपवर धनू ओढिति भुजें ॥ ७५ ॥
मिळोनी पृथ्वीचे अमित नृपती ओढिति धनू ।
न सोडी तें त्याला घसरत तळीं राक्षस तनू ॥
नका तुम्ही चापा सहित मज ओढू फरफरां ।
भुमी त्राहटी पायें बहुत गुद वाजे परपरा ॥ ७६ ॥
भयासें ते राजे उलथुनि धनू पाडिति तळीं ।
उठोनी राक्षसाधिप दश मुखें क्षाळित जळीं ॥
सभेसी जावोनी गरगर नृपां पाहि नयनीं ।
मुखीं घे तांबूला बसुनि वदला काय वचनीं ॥ ७७ ॥
कैलासा हालवीलें स्वकिय भुजबळें त्रीजगा कांपवीलें ।
मातें होणार नकळे विपरित घडलें दंडिलें वंशीबाळें ॥
आतां कोण्या नृपाळें धनु करकमळें ऊचलीजे उताळे ।
पुढें हो जें कपाळें अमित वधुमुळें लोळती कंठनाळें ॥ ७८ ॥
ऐकोनी राव कानीं दृढतर वचनीं बोलिला तो उठोनी ।
गर्जोनी ऊर्ध्वपाणी करुनि म्हण नृपा आह कीं नाहिं कोणी ॥
निर्वीरा मेदिनी[६२] हे मज गमत मनीं चित्रिचे मानवांनीं ।
आतां तो नंदिनी[६३] हे वरविण सदनीं राहिलीसे निदानीं ॥ ७९ ॥
कौशीकू रायवाक्यें परिसुनि म्हणतो बोलतो हा विवेकें ।
कोणी ही ऊर्ध्व मूखें न करिति सुमुखें बैसलीं जेंवि रंकें[६४] ॥
तेंव्हां पंकेरुहाक्षा म्हणत ऋषि मुखें नोवरी पैल देखें ।

---

६१ वशमाळ=बांबूचें लहान कांबीट. ६२ मेदिनी=पृथ्वी. ६३ नंदिनी=मुलगी ६४ रंक=भिकारी. ६५ पंकेरुहाक्ष=कमलनेत्र ( राम. )

सौख्यें चापा विशीखें उचालें कवतुकें खालवीं सर्व नाकें ॥ ८० ॥

यशस्वी श्रीरामा परम गुणधामा तुं नवरी ।
तुला ध्यातें चित्तीं तुज रहित कोणासि न वरी ॥
त्वरें चांपीं[६६] सीता चढवि तुज सीता पहतसे ।
विदेहो देहाची करिन कुरवंडी म्हणतसे ॥ ८१ ॥
अनाथाच्या नाथा उठुनि रघुनाथा क्षणभरी ।
उभा ठाकें चापा उचलुनि सभा विस्मित करीं ॥
प्रतिज्ञेनें सुज्ञा वधुनि रिपु यज्ञा जिववीसी ।
अवाज्ञा तू माझी कधिं हि जनवंद्या न करिसी ॥ ८२ ॥
अमांगल्याची ती अनुदिनिं अहल्या रघुपती ।
तिला तूं साफल्या करिसि पद कल्याण सरती ॥
प्रतापीया आतां दशरथसुता चाप उचलीं ।
तुला देतों आशीर्वचन नवरी तूज दिधली ॥ ८३ ॥
घन·शामें रामें ऋषिसि अतिप्रेमें नमियलें ।
म्हणे स्वामी आज्ञा उठुनि जनकासी निववीलें ॥
नमस्कारी सर्वां स्तवित मग शर्वा निज मुखें ।
तुला ध्याती शंभो जप तप करोनी शतमखें ॥ ८४ ॥

रघूनाथ सौमित्र कोदंडें[६७] नेत्रें । सभे पाहतां बोलती भूपवक्त्रें ॥
लघू बाळकें कासया ऊठवीलीं । मघां रावणाची मुखें घोळवीलीं ॥८५॥

राम ऊठतां सभे तटस्थ भूपमंडळी ।
मेघनीळ बाळ काय कार्मुकासि[६९] ऊचली ॥
जानकी विदेह कौशिकादि विप्र अंतरीं ।
पूर्ण राघवासि येश चिंतिती स्वयंवरीं ॥ ८६ ॥
ते क्षणी धनुष्य तें अवेक्षुनी प्रदक्षणा ।
करीत अंबुजाक्ष तो विलोकितें सुलक्षणा ॥
अंतरीक्ष यक्ष किन्नरादि लक्ष धांवती ।
राम लक्ष्मणा अपेक्षुनी क्षितीस पाहती ॥ ८७ ॥
वाम पाणिनें चि राम तें धनुष्य ऊचली ।
देखतां सभा समस्त विस्मयें चि दाटली ॥
भूपती सभेसि बोलताति धन्य राघवा ।
विक्रमीं[७०] च मान गर्व हारिला तुं आघवा ॥ ८८ ॥

---

६६ चाप=धनुष्य. ६७ कोदंड=धनुष्य. ६८ वक्त्र=तोंड. ६९ कार्मुक=धनुष्य. ७० विक्रम=पराक्रम.

चाप पाणिसीं धरूनि राम राहिला उभा ।
अगंभा विलोकितां तटस्थ जाहली सभा ॥
अलव्य तें लवूनि सव्य बाहुनें धरी गुणीं
कोटि लाविता असंख्य कोटि दाविती खुणा ॥ ८९ ॥
राघवें करीं धरोनिया सुचाप ओढिलें ।
ओढि काढिता चि मुष्टिमाजि तें कडाडिलें ॥
राम हस्त लागला म्हणोनि गर्जना करी ।
धन्य धन्य मीच कृत कृत्य ये महीवरी ॥ ९० ॥
विक्रमें करूनियां असंख्य ओढि काढुनी ।
दुखड तें करूनि चाप टाकिलें विखंडुनी ॥
कडाकडा कडाडिलें धनुष्य तें स्वयंवरीं ।
अघोर घोष ऊठतांचि कोंदला दिगंबरीं ॥ ९१ ॥
क्षेत्रि ज्यां धरित्रिचे अमित्ररूप मारिले ।
कठोर मुष्टिपत्र त्या पवित्र हस्त लागले ॥
धन्य रामचंद्र वक्त्र तें चरित्र वानिती ।
पद्मपाणि पात्र चाप तें विचित्र गर्जती ॥ ९२ ॥
रामें तें स्वकरें धनुष्य निकरें ओढोनियां मोडिलें ।
त्या नादें करूनी क्षिती दुमदुमी आकाश तें गर्जलें ॥
नक्षत्रें बहु व्योमिचीं तटतटां तूटोनियां चेवती ।
इंदू-भास्कर-मंडळें गरगरा भूमी पडों पाहती ॥ ९३ ॥
देती कुंजर किंकव्या अमित पैं दाही दिशा धांवती ।
राजे ते पडिले सभे पटपटां मूर्छीत नेणों किती ॥
ऐशी सर्व सभा सुमूर्छित पहा व्याकूळ झाली असे ।
त्यामध्यें बहु सावधान असती चौघांसि मूर्छा नसे ॥ ९४ ॥
सीता कौशिक भूप शेष नयनीं श्रीराघवा पाहती ।
रामें सर्व सभा कृपामृतरसें आलोकितां भूपती ॥
झाले सावध पाहती दशमुखा आली असे कालिमा ।
राजे बोलति राघवा अनुपमा नाहीं बळाची सिमा ॥ ९५ ॥
सीता ते गज प्रेरूनी मग सभे आली विजेचे परी ।
श्रीरामा पहतां उताविळ पहा झाली असे घावरी ॥

७१ पाणि=हात ७२ अगभा=आंगाची कांति. ७३ गुण=दोरी ७४ दिगंबरीं=दिशा व आकाश यांत. ७५ अमित्र=शत्रु ७६ निकरें=जोरानें. ७७ क्षिति=पृथ्वी. ७८ कुंजर=हत्ती.

राया देखत राघवा मग तिनें माळा गळां घातली ।
ते काळी शिरि रामचंद्र स्मरणें गर्जे सभा-मंडळीं ॥ ९६ ॥
सक्रोधें दशनें दशानन उठे ओष्ठांसि चावोनियां ।
बोले रावण एक वेळ इजला जाईन घेवोनियां ॥
ऐशीं दुर्वचनें वदोनि शिबिके बैसोनियां चालिला ।
सांगातें करितो प्रहस्तें विनती लंकेसि आतां चला ॥ ९७ ॥
तेव्हा रावण गेलिया दशरथा रायें मुळा धाडिलें ।
साकेताहुनियां वऱ्हाड मिथिले आलें नृपें ऐकिलें ॥
राजा बाहिर जाउनी दशरथा वंदी पदा आदरें ।
क्षेमीं देउनि चालती तव पुढें वाद्यें असंख्यें तुरें ॥ ९८ ॥
राजा तोचि वऱ्हाडिकांसह पुरीमाजी नृपें आणिला ।
होता जानवसा सुरम्य नृपती नेवोनिया घातला ॥
आला मंडपिं भूपती मग त्वरें तें बाहुलें निर्मिलें ।
रात्रीं विद्युतभा असख्य गुढिया घेवोनि चाले मुलें ॥ ९९ ॥
चारी दाशरथी चतुर्मदगर्जा शृंगारुनी बैसवी ।
बाजारे फुलबाजिया बहु नळे ते सोडिती हावई ॥
सत्राणें बहु चक्र बाण फिरती त्या चंद्रजोती किती ।
दारूचे मृग वाघ सिंह वृके पैं ते एडके भांडती ॥ १०० ॥
ऐसा तो वधुमंडपासि नवरा त्या संभ्रमें आणिती ।
द्वारासन्निध पावतां मुद वधू ओंवाळुनी टाकिती ॥
हस्तीचे तळिं नोवरा उतरुनी श्रीमंडपा आणिला ।
तेव्हा तो मधुपर्क आसनिं द्विजीं बैसोनि आरंभिला ॥ १०१ ॥
सारोनी मधुपर्क अंत्रपट तो मध्यें धरोनी ऋषी ।
वक्त्रें मंगळ अष्टकें वदति पैं शास्त्रज्ञ ते ज्योतिषी ॥
ॐ पुण्या म्हणतां परस्पर शिरीं त्या अक्षता टाकिती ।
विप्री त्या सुतवूनियां निज करीं ते कंकणें बांधिती ॥ १०२ ॥
लज्जाहोम करोनियां वधुवरें पूजोनि गौरीहरा ।
ग्रंथी देउनियां रघूत्तम कटीं देती वधू सुंदरा ॥
आलीं तैं बहुल्यावरी तंव सिते त्या शिक्षिती सुंदरा ।
रामाला नमिं तूं सिते अति त्वरें तेव्हां विलोकी धरा ॥ १०३ ॥

---

७९ प्रहस्त=रावणाच्या प्रधानाचे नाव. ८० साकेत=अयोध्या ८१ क्षेम=आलिंगन
८२ वृक=लांडगा. ८३ एडका=मेंढा.

रामाचें पद लागतां जड शिळा झाली त्वरें कामिनी ।
यासाठीं न नमी रघूत्तमपदें भाळीं सुरत्नें मणी ॥
रत्नाच्या युवती सुरम्य सवती होतील मातें सदा ।
रामाची बहु अप्रीति मजवरी होईल गे सर्वदा ॥ १०४ ॥

ऐसें संभ्रम लग्न तें मग बरें झालें चतुर्थी दिशीं ।
रायें देउनि शालिसी मग सुता घाली नृपा ओंटिशी ॥
आज्ञा घेउनियां वऱ्हाड तितुकें आलें अयोध्ये-प्रती ।
मार्गीं भार्गव येउनी बहुत तो सक्रोध ऊभा क्षिती ॥ १०५ ॥

तेजःपुंज विलोकुनी दशरथें घेवोनियां पूजना ।
पूढें येउनि भार्गवासि नमितां धाडीं म्हणे नंदना ॥
रामा सन्मुख देखुनी मग म्हणे कोदंड त्वा भंगिलें ।
माझें तें दृढवीर्यशृंग बहुतां काळें तुवा मोडिलें ॥ १०६ ॥

रे रे दुर्मति विकृती नरपतींवंशाधमा राघवा ।
शास्त्रें विप्रपणा कधीं प्रगट म्या केलें नसे भार्गवा ॥
एकी छेदुनियां निशाचरि महा तूझी तनू फूगली ।
राक्षेसी वधिली परंतु द्विज म्यां माता नसे मारिली ॥ १०७ ॥

निक्षत्री वसुधा करोनि असुनी शत्रू मि क्षत्री-कुळा ।
हें तों सत्यचि बोलतां द्विजवरा मीं कोण सांगा मला ॥
ऐकोनी बहु व्यंग बोल श्रवणीं खोंचोनियां अंतरा ।
आला तो बहु क्रोध भार्गव म्हणे येईं मशीं संगरा ॥ १०८ ॥

स्वामी भूदेव तुम्हीं अनुदिन हृदयीं मस्तकीं पूज्य आम्हां ।
गाई विप्रा निघाता वर शर धरितां कांपतो हा ममात्मा ॥
आम्हीं एक्या गुणानें तुम्हि तों नव गुणें पूर्ण वेदें पुराणें ।
ऐकोनी भार्गवानें मग निज वदनें बोलिला साभिमानें ॥ १०९ ॥

होतें तें जीर्ण साचें धनु मम करिंचें हें करीं सज्य आतां ।
ऐकोनी राघवानें धरुनि धनु करीं बाण लावूनि सीता ॥
ओढोनी राम बोले म्हण द्विज तुमचा कोणता मार्ग रोधूं ।
रोधूं या व्योमपथा मग करशाधरें वंदिला शेषबंधू ॥ ११० ॥

ऐशीं तीं च वऱ्हाडिकें कवतुकें आलीं अयोध्या सुखें ।
रामाचें जितुकें चरित्र तितुकें कर्णासि लागे निकें ॥

---

८४ सज्य=दोरीनें युक्त. ८५ शेषबंधु=राम ( शेष=लक्ष्मण )

श्रीरामा शतकें जरी म्हण मुखें निर्दग्ध तैं पातकें ।
सालकार तुकें अनंत यमकें वर्णी भल्या भावुकें ॥ १११ ॥

समाप्त.

---

## शिवरामकृत कटाव-मुद्रिका.

रामें वेधिलें मन हो बाई, सांगों मी काई ॥ धृ० ॥ मोठी तूं ज्ञान-गर्भ-पेटी, आलीस मजसाठीं, मी प्राक्तनांची खोटी, विचित्र पंचवटी, पवित्र गंगा-तटी, बांधुनि पर्णकुटी, भोंवतीं ऋषी-दाटी, तों बुद्धि उफराटी, जाहली माझे पोटीं, मायीक मृग दीठीं, सुवर्ण-काती पाठी, देखुनि हेतू ऊठी, कंचुकीलोभा साठीं, श्रीराम जगजेठी, लाविला मृगापाठीं, छळुनी दुष्ट गोष्टी, सौमित्र पाठोपाठीं, धाडिला उठाउठी, परम संकटीं, करोनी रेखोटी, गेला तो क्रोध-भ्रूकुटी, तेव्हांची मी कष्टी, जाहली राम-त्रुटी, संन्यासवेश नटी, धरूनी दुष्ट कपटी, हरीत दशकंठी, आणिलें सिंधु-बेटीं, अशोकतळवटीं, ठेविली एकटी, गे माय संकटीं, सांगतां फुटे सृष्टी, हें काय परमेष्ठी, लिहिलें ललाटीं, वियोग पर त्रुटीं, युगाचीपरी लोटीं, हें दुःख कोण घोंटी, न होता राम-भेटी, जीवाची केली साटी, राघव-नाम-अमृत सेवुनी, वाट पाहत मनीं, चिंतित चरण दिन-रजनी ॥ १ ॥

होसी तूं रामसहवासी, सौभाग्य भोग-रासी, माय तूं भाविकासी, म्हणुनी तुजपाशीं, सांगतें हृद्रतासी, अयोध्यापूर-वासी, अवताराची रासी, जो वंद्य त्रिजगासी, अलभ्य आत्मरासी, भूषण सूर्यवंशीं, मायिक विषयासी, इच्छोनी त्याज पाशीं, दुरावलें तयासी, त्या पापें यातनेसी, भोगितें या तनूसी, पापीण मज ऐशी, नाहीं च या क्षितीसी, विरक्त बाळवेशी, सौमित्र संगतीसी, दुर्वाक्य दुष्ट द्वेषी, दुःखिलें पवित्रासी, छळीलें राघवासी, होईन त्याची दासी, झाडीन चरण केशीं, मागेन उपवासी, जगमित्र पाप नाशी, मम अपराधाशी, क्षमील निश्चयेसी, तूं माय बहीण होशी, सन्निध वल्लभासी, श्रीराम लक्ष्मणासी, सोडुनि कोणे देशीं, लंघुनी सागरासी, आलिस या वनासी, कां किंव राघवासी, सौमित्र देवरासी, नये ची माझी कैसी, मारुनी रावणासी, शिवराम प्रभू भक्तांचें भूषण पदीं देवासी स्थापुनी, मज सोडवुनी, नेईल केव्हा साजणी ॥ २ ॥

समाप्त.

---

८६ प्राक्तन=नशीब. ८७ त्रुटी=अति अल्प काळ. ८८ देवर=दीर, नवऱ्याचा भाऊ.

## शिवरामकृत कटिबंध

### रामजन्म

श्रीराम सगुण-स्वरूपें अवतरला सुर-साहकारी ॥ धृ० ॥ असतां श्रीशेषाचें शयनीं, क्षीर-सिंधुचे अंतर-भुवनीं, तेथें प्रार्थियलें अमरानीं, त्यांप्रति झाला तो वरदानी, तो सर्वेश अयोध्यापुरपती पूर्णब्रह्म अज अव्यय अक्षर अनादि अगणित अपार अनुपम अतर्क्य अद्वय असंग अद्भुत अप्रमेय अजरामर आत्मा अद्वितीयपर अनत अनंग-जनिता असद्विनाशन अरूप अनुकूळ अजातशत्रू असगनाशन अखिल अमर-वर भाव्य अनुभव अपाणि अचरण अनंग अकरण अचक्षु अणु पर अशेष अवगत अपरंपर अज अनाद्य अवेद्य आनंद प्रपंच निर्गुण निराभास निष्कलंक निरूपम नित्य निरामय निराधार निज निर्मळ निश्चळ निरुपाधि निज निगमसार जलनिधिदुहिताप्रियवर नारायण नरनाथ नरोत्तम तो रघुवल्लभ दशरथ उदरीं प्रगटे हें परिसावें चतुरीं प्रार्थियला जो विधि हर परि नरतनुधारी प्रेमळ दासांचा कैवारी ॥ १ ॥

जन्मकाळीं, पूर्ण सुकाळीं, आनंद-बहळीं, दिव्य झळाळित मध्यान्हाप्रति येतां हेलीं, सौख्य-मेळीं, निजगति अकळीं, विमान-यानीं सुरवर-पाळीं, पाहों येती देव निराळीं, गिरिजा जवळीं, सहित कपाली, सुख-कल्होळीं, कमलासन हरि श्रीविन-माळी, तो दभोलीधर निजमेळीं, संत-मंडळी, प्रेम-समेळीं, देति अरोळी, भावुक प्रेमळ वाहती टाळी, नाम गोंधळी, भाळी भोळी, नारद तुंबरु, विद्याधर-गण गंधर्वादिक किन्नर कविवर, सिद्धपुरुष बुद्धीचे सागर, मुनिवर स्तवितो नमिती सुर तों कौसल्या-उदरीं प्रगटे सांवळा, आपाद माळा, कासे कशियला पटें पिंवळा बाळतरणिसम तेज उमाळा, तो सुख सोहळा, देखुनि डोळा, निरखित कौसल्या निज बाळा, खचित मुकुट श्रीकुंडल-मंडित, गंडें ललित बाहु रम्य सरळ निज नासिक सुंदर इंदु-वदन नव-कुंद-रदन अति अधर मधुर मृदु कंबु-कंठ वैकुंठ-नायक जगजीवन जग-पालक बाळक होउनि अंकीं येतां श्रीरघुनंदन देखुनी तान्हा, कौसल्येप्रति आला पान्हा, बाळ-भावना, दावित नाना, पाहतां अद्भुत सुख जननयना, हर्षे जन करिति तनाना, त्या निज गजरें जयजयकारें, दशरथ नृपवर ऋषि-सभारें, मंगळ जळि निजस्नान सारुनि, पुत्र-वदन पाहुनियां विप्रा दान देत, देहभान रहित, बहु मंगळध्वनी, वाजंत्रें दुंदुभिनादें

---

८९ अनगजनिता=मदनपिता. १० अपाणि=हस्तरहित. ११ करण=इंद्रिय. १२ हेलि=सूर्य (ग्रीक शब्द Helios.) १३ पाळी=समूह. १४ निराळीं=आकाशात. १५ गिरिजा=पार्वती. १६ कपाली=शिव १७ दभोलीधर=इंद्र. १८ पट=वस्त्र १९ तरणि=सूर्य. १०० गंड=गाल. १ रदन=दांत. २ कंबु=शंख ३ सभार=समूह.

अंबर कोंदे जयजय शब्दें सुरवर वर्षती सुमनें याच रीती चौघांचें जातक करी नृपनाथ अद्भुत कौतुक गमलें हे त्रिपुरारी ॥ २ ॥

राघव सरयू तीर विहारी, सुमित्र-रूपें अवतारी, भावुक भरत परम सुखकारी शत्रुघ्नासह बंधू चारी, तो जगजीवन, जगत्पाळ जगदात्मा जगत्पती जन्म-जराहर, जीवन रघुवीर बाळपणीं कौसल्या-भुवनीं, रांगत रांगत जननीच्या निज अंकीं बैसुनी, श्रीकरकमळें वोढुनियां स्तन चोखितसे, जगडंबर जो अजि पोसितसे, वरि काळकृतांत शोषितसे, विभुता अति सुंदर हास्य करुनि करें जननी कुरवाळितसे, मुख तें सुख काय वदेल किती नर शेष अशेष मुखें श्रमला मग अंग पलग सुरग करोनी भजंग रमे भव-भंग असा श्रीरंग सगुण तो प्रौढपणीं निज वैराग्यासी दावुनिया वेदांतमतासी, विवरितसे श्रुतिसार-सुखासी, असतां आत्मा अज अविनाशी, काय असे आयास, तयासी दावितसे सन्मार्ग जनासी, सज्जन कार्या, साधक चर्या, दावित आर्या, जो प्रभु पूर्ण जगत्रय-चेष्टा, निर्मित स्रष्टा, वंद्य वरिष्ठा, प्रिय जो शिष्टां, तारक श्रेष्टां, सकलही द्रष्टा, धरि निज निष्ठा, दुष्ट दमन खंडित खळ नष्टा, कष्टहरण तारक भवभ्रष्टां, तो गुरु स्वामी वसिष्ठा, वंदुनी, इह-सुख निंदुनी, घे उपदेशा, कोण तमाशा, गमत महेशा, श्रीगुरु चरणीं भाव अचळ धरी निज गुज कर्णीं सांगत सद्गुरु तें चो आकर्णुनी शिवरामसुता तारी ॥ ३ ॥

समाप्त.

---

## राघवकृत कटिबंध.

## कृष्णचरित्र.

नंदाचे गृहीं दावितो हरि लीला ॥ धृ० ॥ समयीं होय कदापी न वृष्टी, म्हणउनी दुर्धर व्रजजन कष्टी, याजिती योग याग व्रत इष्टी, भुलले सर्व ही निज परमेष्टी, गोष्टी अशा निज कर्ण-पुटीं जगजेठी, ऐकुनी स्पष्ट वदे अति नष्ट सुराधिपें खष्ट त्यजुनी सुधृष्ट असा बहु पुष्ट गुणें नगश्रेष्ट महा पूजितां फलदायक भाव नसे अजि भाव धरा वदतां मृदु भाषण त्या ललना विविध पाक करोनी, हरि-वचनीं विश्वास धरोनी, उत्तम अन्नें शकट भरोनी, सामुग्री उपचार वरोनी, अहंभाव-पद समूळ हरोनी, गोवर्धन-नग सकळ पुजोनी, धूप दीप नैवेद्य अर्पितां मूर्तिमत प्रत्यक्ष साक्ष जो मोक्षरूप तो वृक्षपती मुखीं भक्ष्य भोज्य रुचि भक्षितसे, गण यक्ष देव जन लक्षितसे, सुरराज वृथा खवळोनी बळें घनदाट लाट सम पाट जसे, घनदाट थाट गृह-कपाट वाहती, पाट घाट जैं अचाट तिळभर वाट नसे,

---

४ अंबर=आकाश. ५ अंक=मांडी ६ कृतांत=यम ७ व्रज=गोकुळ. ८ सुराधिप=इंद्र. ९ नग=पर्वत १० ललना=स्त्री. ११ शकट=गाडा, छकडा.

घडघडाट सम गजशुंड प्रचंड उदंड वर्षतां संकटीं विक्रम दाखविला, उचलोनी गिरि व्रज वांचविला, अमरेश मनीं अति लाजविला, अभिमान हुताशन[12] मालविला बळ क्षीण म्हणोनी पदीं लावियला, स्तुती घोष मुखें दृढ गाजविला शचीनाथ कृपें हृदयीं धरिला, सुरभि क्षिरानें हरि न्हाणियला गोविंद-सुखोत्सव चालविला मग इंद्र निज स्थळीं पाववला हलधर ऐसा विचरत नाना छंद मुकुंद स्वयें करितां प्रिय आनंदवी जननीला ॥ १ ॥

चिमण्या गोप गड्यांचा मेळा, भोंवता वेष्टितसे घननीळा, चरती धेनू न होउनि गोळा, तत्समयीं करि अद्भुत लीला, रुचिर अधर वर कर धरि मुरली, प्रचुर मधुर स्वर पदरज दर-पुटीं, प्रखर निकरतर समर धीर गभीर अमर मुनि नरवर-दायक, असुर-दमन हरप्रीय गिरिधर प्रभु लहरपणें विहरत अति सुंदर सुरतरु वरी बळधोनी जळीं फळ टाकुनियां शिशु आळ मिसें उसळोनी घालितां डोहीं उडी, पावती भय गडी, शोधिती नदीथडी, देउनी दाट बुडी, रोधुनी नाकपुडी, झांकुनि झांपडी, हिंपुटी बापुडी, लोटिल्या बहु घडी, तरी न सोडी, अडी, चित्सुख आत्मजोडिसी नसे कांहीं खोडी, बांधुनी धैर्यशिडी, चढती भक्तिगढी, कर्माची घोर गुढी, ठायीं न पडे कुडी, शीत बहु तनुसी येत हुडहुडी, धांवति गडबडी, पडती मुरकुडी, न सुचे भव गोडी, व्रजासी श्रुत करितां शब्द बोबडी, श्रवणीं पडतां च प्रजा सह नंद येत तातडी, तळीं हरि नृत्य करित आवडी, अहि[13] शिरीं पुच्छ धरुनि करीं, स्वस्थपणें फणी[14] होतां व्याकुळ येउनि कन्या दीन मुखें दृढ जोडुनी पाणी, गाती गाणीं, अपार स्तव करुनी, तोषविला पद-प्रहारीं, खळ सोडविला, भुजग सिंधू उदरीं ठेविला, यमुने बाहेर स्वयें प्रगटला, मातृ-पितृ-चरणासी लागला, प्रजा गोप सर्वांसी भेटला, द्वादश गांवें[15] वन्हि[16] भक्षिला, पूर्व सुकृतें पुत्र लाभला, नंदें उत्सव परम मांडिला, ऐशा क्रीडा चित्र विचित्रा पवित्र करी क्षिति भार निवारण व्हावयासी अवतरोनीं चिद्रूप हर्षवी जो अवनीला ॥ २ ॥

कालिंदीचे येउनि पुलिनीं[17], उत्तम शरद सुखाची रजनी, निर्मळ पूर्ण-सुधाकर[18] गगनीं, मधुकर गुंजाति पद्मिनी जिवनीं[19], गर्जती शुक-पिक मंजुळ वदनीं, नर्तित दिव्य सुखीं त्रसदनीं, उडती हंस यूथ नभ भुवनीं, विचरती निर्भय पशु मृग गगनीं, उच्च शाल तमाल विशाल असे तरु अगर तगर करवीर, मलयगिर देवदार, वटमोगर, चपक पारिजात पुन्नाग बकुल मुनि जाई जुई, मुचुकुंद कुंद कल्हार केतकी लाल गुलाब गुलबास गोकर्ण केतक गुल दावदी गेंदा, कदंब सेवती मालतिका

१२ हुताशन=अग्नि. १३ अहि=सर्प. १४ फणी=सर्प. १५ गांवें=योजनें १६ वन्हि=अग्नि. १७ पुलिन=तट १८ सुधाकर=चंद्र. १९ पद्मिनी जीवन=सरोवरांतील पाणी.

तुलसी मृदु बेल जपा कचनार अनार, सिताफळ नारिकेळ पुगीफळ खर्जूर, रातांजन अजीर, आम्र नारंग्या पोफळी निंब निचुल, अशोक मोह दाळिंब्या खिरण्या, मातुलिंग बदरी जंबुफळ धात्री अननस बदाम लवंगी नागवेलिका, सघन कर्दळी द्राक्षांचे घड जड वड-पिंपळ इत्यादिक डोलती फळभारें, सुगंध पसरत मंद समीरें[20], कोण गणी कल्पद्रुम-वारें, तत्समयीं करीं जगदुद्धारें, वाजविला प्रिय वेणु सुमारें, नाद ब्रह्म पडताची श्रवणीं, व्रजिच्या गृहिणी, चपला हरिणी, वनीं धांवती लगबग लगबग, अस्ताव्यस्त मन स्वस्थ नसे अशा मस्तपणें हरि-सन्निध येतां, हस्त धरुनियां रास नाचती, असख्य-रूपें धरुनि श्रीपति, परस्परें करीं कर गुतविती, मालाकार तनुतें करिती, नीलपदक मणी हेम शोभती, नृत्य गीत गणि भाव दाविती, सुरत-युद्धीं मन्मथ हरविती, करूनी रात्र षाण्मासिक निगुती, यथास्वेच्छ सुविहार विहरती, एवं अघटित घटित घटित करि करणी, शेवटीं यज्ञ-मिसें मथुरेप्रति जाउनि, क्रोधबळें रिपु कंस वधोनी राघव-वरदायक सोडवी तद्भगिनीला ॥ ३ ॥

समाप्त.

---

अमृतरायकृत कटाव.

## द्रौपदीवस्त्रहरण.

महाराज द्रौपदिके काज गरुडारूढ दुडदुड दौरे ।ध्रु०॥ कपटी कांहा करे दै मारे । कपट कर कर फांसे डारे । कपटी कौरव दुर्जन हारे । कपटें पांडव जीते सारे । निपट कपट कर लपट रहत रिपु । अपट अपट रहे चपट न काजे । खटपट निपट करे तन दुर्जन विपन करत मोहे सिताब भैया दौर करो तो रहत शरम प्रभु वेग पवन रथ तेजी[21] जोतके पांउपे योद न ही तो आपने दैरे प्रभुजी न ही तो आपने दैरे ॥ १ ॥

भैया भगतराज प्रभु प्यारे । भैया बळिभद्रसों प्यारे । भैया शूर बीर हत यारे । ऐसे नर कौरव सहारे । कवन काज पर विलंब कीनी । कबलों अपनो प्राण धरूं मै । मान जाय अपमान आवे गो । लाज गई नाहा रही सरम कछु । जस जाय अपेस आवे गो देस देस अकीर्ति होयगी । इस कारण प्रभु सीसें[22] नमाऊं । राख लाज मै शरण आयकी । सिताब भैया साहेब मेरे भक्तकाज पर बहोरे प्रभुजी भक्तकाजपर बहोरे ॥ २ ॥

पटपट्टन काशीतें ल्यावे, पैठण ज्याहलनीं मंगवावे । कौरव छीनत हारी आवे । प्रभुजी आपने बेहेनको पेहरावे । जर्द लाल सो सफेद कारे । नील गुलाबी गुलाल चीरे पीत पितांबर रंग केसरी । जरी कुसुंबी गुले अनारी रंग करारी ।

---

२० समीर=वारा २१ तेजी=घोडा. २२ सीस=मस्तक.

मरम रेशमी। बोहोत रमासा। मोल हजारा। अमोल सारी। जडे जोहरे। अंचल सारे सरस किनारे। जैसे तारे। अजब प्यारे। न्यारे न्यारे तापरवारे। लटकत मोती छुटकत पल्लव झटकत कौरव कलाबतूके। चिकन कसीदा। तार सुनेरी झुने रंगके। अवहि दुशाला दिल्ली-लाहुरी। करनाटकके बंदर-मछरी तैलंगनके। चदिचंदावर। जुन्नरके कलसपाक। कल्याण कनोरी। ताडपत्र सातारा पुना उज्जन सारी। खदार दख्खन गौडबंगाला। सबमुलताना। गाव उ-देसी। वराड बावन रूप कोकणी। विलायतसे पट भर ल्याये। उचित नावसे हलक पदर पर खलक जनावर मुलुक मुलुकके। हंस मोर और चकोर तोते। सिंह चित्ते। हरना भैसा। बाघ रीछ और हाती घोरे। गऊ बैल रथ चद्र सुरज और चित्र विराजत जगत निरंजन अमृतराव प्रभु देत बेहेनको अपने करसो जोरे। प्रभुजी अपने करसो जोरे॥ ३॥

समाप्त.

---

मागे ती लुगडी सकाप बुगडी आठां दिसां बांगडी
घालीते फुगडी कधीं न रगडी फाडीतसे आंगडी
खैराची सगडी तशी घडधडी तोंडाळ मोठी खुडी
सोन्याच्या लगडीस देखुनि गडी ऐशी महा धांगडी॥ १॥
दारीं देत कडी सदां कडकडी बोले महा नांकडी
दाणे चोरुनि फांकडी न कळता घेते मुळे कांकडी
खाते ती जसि माकडी वसवसी दांतीं दिसे खेंकडी
या योगे अमृतेश्वरासि रुचली गंगा तिरीं झोंपडी॥ २॥
बोले मातंग बोली मम गति हरिली कामिनी मस्त झाली
शुंडा मांडीस तोली बिदिस मिरवली कीर्ति माझी बुडाली
माथ्याची वस्तु नेली कुचयुगीं धरिली जाचणी थोर केली
दे राया दाद हर्षी म्हणउनि गज तो मस्तकीं धूळि घाली॥ ३॥

---

## उद्धव चिद्घनकृत

# शुकरंभासंवाद.

### दिंड्या.

शुक रंभा संवाद परीसावा। आरंभीला आरंभ सिद्धि न्यावा॥
सावधानें आनन्द बाळगावा। कथारभीं आपत्य भूषणावा॥ १॥

नीरंजनीं उद्यान विवेकाचें । शोभताहे वैराग्य वसन्ताचें ॥
तेथें आसन शुकविरक्ताचें । अनुष्ठानीं अभग धैर्य ज्याचें ॥ १ ॥
तपस्तेजें प्रखर-भानु लोपे । अमराचें आसन चळ कांपे
फणीमाथा हा धरातळीं तापे । तपा तीव्रा मांडिलें अनूतापें ॥ २ ।
सुराधीशें नारदा प्रश्न केला । धरे सुकृता कोण तो आचरला ॥
वदे नारदू शूक ऊदयाला । तपस्तेजें बहू तो चि उद्यावला ॥ ४ ॥
शचीनाथें मानसीं विचारिलें । मग तपाशीं विघ्न योजियेलें ॥
मोहनीनें त्रैलोक्य भूलविलें । तया रंभेशीं सिद्ध उभें केलें ॥ ५ ॥
जळो जळो हा संग वनीतेचा । जिणें केला कीं घात बहूतांचा ॥
सदाशिवाशीं होय लिंगपतन । हरि वृन्देशीं सेवीतसे स्मशान ॥ ६ ॥
त्रिधिं कैसा पाहीं जाय तो भुलोन । ईतराचा हा पाड तिथें कोण ।
असे तयेशीं इन्द्र सांगताहे । मृत्युलोकासी जाय लवलाहें ॥ ७ ॥
छळोनीया शुकासी येथ बाहें । आणुनियां तूं करीं सर-साहे ॥
परीसुनीयां इन्द्रवचनातें । वदे रंभा हे स्वीय वैभवातें ॥ ८ ॥
तुम्हीं सूचित्त स्थिर असा चित्तें । क्षणमात्रें भोगीन तापसातें ॥
आम्हा भुलले थोर थोर सिद्ध । रुक्मांगद आणी नारद ॥ ९ ॥
पुरूरवा पराशर सुंद उपसुंद । रावणाचा आम्हीं केला वध ॥
गाधिसुतींचा गर्व भंगियेला । पराशराच्या तपा नाश केला ॥ १० ।
अहल्येचा संयोग तुम्हां झाला । त्याचा केविं विसर पडीयेला ॥
वदोनियां आवेश धरी आंगीं । भरीयेला शेंदूर भर भांगीं ॥ ११ ॥
चन्द्र सूर्याचे तेज दोहीं भागीं । जडित पुष्पें बांधिलीं मस्तकाग्रीं ॥
कृष्ण कुरळाची वळीयेलि वेणी । मोर मोतीं नाकींचें सुपाणी ॥ १२ ॥
जडित कर्णफुलें वोळगती दोन्ही । भाळीं बिजवरा पूर्ण हे मोहीनी ।
भृकुटीचे मेढे चढवीले । काजळाचे ते सर सोडियेले ॥ १३ ॥
नेत्र विशाल भाल पसरीलें । कटाक्षाचें सुतेज सत्य चाले ॥
दिव्य तेजाचें वस्त्र परीधान । कंचुकीचें संकोच ठाणमाण ॥ १४ ॥
उत्तमांगीं अनंग पुढे दीन । किती वर्णावें स्वर्गीं रचने ॥
हंस चाली चालतां झणत्कारें । डोल डोलत मत्त गजाभारें ॥ १५ ॥

---

१ उद्यान=बाग. २ प्रखर=तीक्ष्ण. ३ भानु=सूर्य. ४ अमर=देव ५ फणी=शेष सर्प. ६ शचीनाथ=इंद्र. ७ विचारिलें=विचार केला. ८ वनिता=स्त्री. ९ विधि=ब्रह्मा. १० सुर—साहे=देवांस मदत. ११ पुरूरवा=राजविशेष. १२ गाधिसुत=विश्वामित्र. १३ उत्तमांग=मस्तक. १४ अनंग=मदन.

वनामाजी वसंत वोळगला । पुष्पवाटिकासंभार विकासला ॥
मलयानिल सुवास दुणावला । अलिकुलीं झुंकार वरी केला ॥ १६ ॥
शुकापाशीं येवोनि उभी दारा । पल्लवांनें घालीत वरी वारा ॥
फिरे भोंवरियों देत चमत्कारा । चेव नोहे त्या ध्यानसुखी सारा ॥ १७ ॥
निजस्वरूपाची उघडली दृष्टी । पाहे स्वरूपसमान दिसे सृष्टी ॥
पृथुकाकारें पहातां परिपाटी । तंव देखीली पुढें गोरटी ॥ १८ ॥
म्हणे स्त्रिये तूं एकली वनामाजी । यौवनांगी फिरशी कोण कां जी ॥
हरिणाक्षी इच्छित साक्ष तेजीं । अलंकारें सहित कांत कुजीं ॥ १९ ॥
वसन्ताचा आरोप वनीं झाला । पुष्पवटिकासंभार विकासला ॥
यौवनांगीचा संग दुणावला । अनायासें एकात वोढवला ॥ २० ॥
धिग्धिग हें जीवन मानवाचें । भोगसौभाग्यासी चित्त नव्हे ज्याचें ॥
वदे हृदयें सुशील गुणातीत । ज्ञान योगेची हरपलें चित्त ॥ २१ ॥
ऐसें वैराग्यें निःसीम अद्भुत । बद्ध मोक्षाविरहित परिख्यात ॥
'सर सर' परती बोलत योगिराजा । सगदोषें तपासी भंग माझ्या ॥२२॥
भोगकाळीं चन्दन सुवासित । जायफळें कर्पूरलवंगात ॥
नागवल्लीचीं दळें पक्व पीत । नपुंसकां होय जियें सत्य चेत ॥ २३ ॥
नदी भरोनी जाय जलवेगें । कांहीं केल्यानें न फिरे मागें ॥
तेवीं आयुष्य वेंचि भोगसंगें । विषभोजनीं हित काय सांगें ॥ २४ ॥
पीनें अवयव गोर वाटोळे । आत काठिण वरि बिंदु काळे ॥
भासताति अनेक हार-मेळे । करीं न धरि जो यांसी रतिकाळें ॥ २५ ॥
मांस-गोळे गोठली रक्तकोठी । वयें उतार झोल-शेवटीं ॥
विजशोभा मृगांबुनदी मोठी । दिसताहे डोळयांसी परि खोटी ॥ २६ ॥
नाभी विशाल गोर उदर । त्रिवळीनें शोभत सुगंभीरें ॥
कटी मुष्टी सकोच गुह्यद्वार । भोग भोगिता सौख्य निरतर ॥ २७ ॥
नरक-सांठवण कृमी-जन्तु-धारा । माजी दुर्गंधी स्त्रवे रुधीरा ॥
अपवित्र हा संग सदा दारा । तिथें रमतो तो मूर्ख असे सारा ॥ २८ ॥
म्हणे रंभा शुकासी अवधारीं । मानसिल येथिल जशा नारी ॥
फोडियेलें दावीत उदरीं । केशराचा सुवास कस्तूरी ॥ २९ ॥
म्हणे माते गे जैं जन्म झाला । नारा वरुषें म्यां नरक भोगियेला ॥
नसे ठावें गे खेद उपजला । नाहीं येतों तुझ्या च उदराला ॥ ३० ॥

---

१५ मलयानिल=मलय वायु. १६ अलिकुल=भ्रमरसमूह. १७ दारा=स्त्री. १८ पल्लव=पदर. १९ गोरटी=स्त्री. २० यौवन=तारुण्य २१ पीन=पुष्ट. २२ मृगांबु=मृगजल. २३ सुगभीर=फार खोल. २४ रुधीर=रक्त

रंभा येवोनी गर्वहत झाली । शुका अंगीं निजशान्ति दुणावली ॥
लोकत्रयीं कीर्ति विस्तारली । सुरीं सुमनें वृष्टि वरीं केली ॥ ३१ ॥
गुरु-अभय कर जया माथां । येत अपाय टळे मागुता ॥
चिद्‌घन हें मुखीं नाम घेतां । तरे उद्धव जाण अवचीता ॥ ३२ ॥
उद्धव चिद्‌घन कृत " शुकरंभा संवाद " समाप्त.

---

उद्धवचिद्‌घनकृत

## नागनाथचरित्र.

॥ साक्या ॥

नागेश्वर मधरनगतन्यावर प्रगटुनि यत्भूलोका ॥
नागनाथ हें नाम धरीशी मॉनूरीये अवलोका ॥ १ ॥
बरवीं सतचरित्रें हो ॥ पावन पुण्य पवित्रें हो ॥ ध्रु० ॥
कुश्चित स्वरूप नोळखत कोणी धरूनि राहसि माळीं ॥
अगावरि विंचू किरडें बहु कोणि न येती जवळी ॥ २ ॥
जो देखे तो उपेक्षीतो हिव वृष्टी वरि सोशी ॥
एकलिंग तेली सद्भावें आला चरणापाशीं ॥ ३ ॥
भावे सेवा करूनी निशिदिनि पर्णकुटी रचियेली ॥
उत्तम अन्ने करूनि घरींहुनि येउनि भोजन घाली ॥ ४ ॥
एके दिवशीं सायकाळीं नीजगृहा प्रति जातां ॥
मार्गीं कांहीं नवल वर्तलें ऐका सज्जन आतां ॥ ५ ॥
वर्दमा हे शिलवत कुमारी सोळा वर्षें झालीं ॥
आयुः सरतां प्राणा त्यजुनी प्रेतरूप पाडियेली ॥ ६ ॥
माड रचोनी जाति मिळाली स्मशान भूमी नेती ॥
एकलिंग तो दृष्टी पाहे उतरूनि धरूनी वरुती ॥ ७ ॥
भूमीशीं हात घांसुनि तीचे भाळीं चर्ची भावें ॥
नागनाथ बोलावित म्हणता उठोनि पाठी धांवे ॥ ८ ॥
भय पावोनी समस्त जन हे समीप कोणी येना ॥
राक्षस पिशाच भूतें प्रेतें खेळवितातीं नाना ॥ ९ ॥
नऊ नाथ चौसष्टी सिद्धा वार्ता हे श्रुत होतां ॥
व्याघ्रा सिंहावरुतें बैसुनि येती दर्शन अर्था ॥ १० ॥
ऐसें जाणोनि एकलिंगा स्वमुखें आज्ञा करिती ॥

---

२५ मानूरी=मामारीगाव.

सामोरा तूं जा ह्मणतां तंव रचीत होता भिती ॥ ११ ॥
येऊ वरुता बैसोन चिखल घोंडे रचीत होता ॥
नागोबाची आज्ञा होतां चाल ह्मणे तिसि आतां ॥ १२ ॥
भिती चालुनि जाउनि त्यातें भेटुनि घेउनि आला ॥
पर्णकुटीके नागदेव तो काय करीता झाला ॥ १३ ॥
नग्न स्त्री सेवा करिताहे वाम चरण उतरोनी ॥
वरद वश्वेश्वर नाम तियेचें स्त्रीचा पुरुष करोनी ॥ १४ ॥
शंकर साक्षात्कार जाणुनी सिद्ध लागती पायीं ॥
लीला विग्रहि अवतारी हा येथें संशय नाहीं ॥ १५ ॥
हेगराज हा सराफ कोणी मोहळ गांवीं राहे ॥
मानूरासी जातां सहज चि नागनाथपद पाहे ॥ १६ ॥
अनुग्रहा संपादुनि गांवा जाया निरोप मागे ॥
अपल्या आश्रमिं स्वामी येउनि पवित्र कीजे अंगे ॥ १७ ॥
नागनाथ म्हणती परि येतों ओळख राखीं चित्तीं ॥
हेगराज विनवी तव स्वामी मुके न अगुले स्वहितीं ॥ १८ ॥
विसर पाडुनी एके दिवशीं मोहळनगरा आला ॥
कुश्चित विपरित वेश बीभत्स ऐसा ज्यानें धरिला ॥ १९ ॥
गोचर्मांबर साजुक ऐसें पांघरला उफराटा ॥
मस्तकिं मासे भारा मध्यें मत्स्य भक्षितो वाटे ॥ २० ॥
लक्ष मक्षिका घोंगाती वरि पोर लागती पाठी ॥
लोकांमाजी हेगराज तो देखुनियां निज दृष्टी ॥ २१ ॥
ओळखिला निज सद्गुरु अपुला लोटांगण घे चरणा ॥
जवळी भारा मस्तकिं घेउनि नेला अपुल्या सदना ॥ २२ ॥
मंचक घालुनि वरि बसवूनी सेवा केली भारी ॥
देखुनि स्वपाति वाळित टाकुनि हाड रोविलें द्वारीं ॥ २३ ॥
संभाषणीं वर्ज म्हणोनी जवळि न येती कोणी ॥
एके दिवशीं निज स्वामीशीं बोले विनोद वाणी ॥ २४ ॥
श्राद्ध पित्याचें ब्राह्मण न येति कोणी जेवायासी ॥
नागदेव म्हणताती स्थळ करिं बाहेरी स्वयपाकासी ॥ २५ ॥
सिद्धटेकडी वरुतीं वस्त्र घरें हीं रचीयेलीं ॥
रुदन होतां कुटुंब काळीं पित्रां आज्ञा केली ॥ २६ ॥

---

१६ विग्रही=शरीरधारी. १७ अनुग्रह=कृपा. १८ बीभत्स=घाणेरडा.

आरीमांदी उतरलि तेथें मंत्रघोष बहु होती ॥
गावकरी द्विज सकळ मिळाले कौतुक पाहाताती ॥ २७ ॥
भोजन करूनी बाहिर येतां जोशी देखे बापा ॥
कोणी काका कोणी नातू कोणी आजा बापा ॥ २८ ॥
सिद्धेंकडी धावा धांवा मेलीं भेटी येती ॥
एकामेका कंठीं मिठिया घालुनि गृहासि नेती ॥ २९ ॥
त्रिअहोरात्रीं केली भेटी गोष्टी मोठी झाली ॥
चवथा प्रातःकाळ हि होतां जेथिल तेथें गेलीं ॥ ३० ॥
नागदेव हा शंकर जाणुनि सकळीं पूजीयेला ॥
हेंगराज हा स्थापुनि तेथें वडवाळेसी आला ॥ ३१ ॥
ऐका येथुनि अद्भुत तेणें पवाडा काय केला ॥
वृक्ष वठोनी पडला होता वटमारें निजवीला ॥ ३१ ॥
सहिरभट हा प्रतिष्ठानीं विद्या विनयें पुरता ॥
मान लौकिकीं असतां त्याच्या ऐका कैसें चरिता ॥ ३३ ॥
गंगा स्नाना करुनि जपतप माध्यान्हिका सारी ॥
गृहासि येउनि भोजन येरू करितसे सहपरिवारीं ॥ ३४ ॥
शोक अळवनी ऐसा स्त्रीशीं कांहीं विनोद करितां ॥
साठी वर्षांची आम्ही प्रति उत्तर दे कांता ३५ ॥
ऐसें ऐकुनि विरक्त चित्ता सचरला अविनाशी ॥
सत्य मात बोलसी ह्मणोनि वंदी निज भार्येसी ॥ ३६ ॥
भिंडेसि घालुनि गृहासि नेती यास्तव रागें रागें ॥
यवन पुरोहित याच्या गृहासि धांवुन गेला वेगें ॥ ३७ ॥
हिंदुसि अविंध करितां पुण्य मिळेल तुमच्या धर्मीं ॥
तिहिं अवश्य ह्मणोनी त्यानीं भ्रष्टविला निजकर्मीं ॥ ३८ ॥
सर्व चि येउनि ब्रह्मसभेमधिं साष्टांग नमीयेलें ॥
भ्रम चित्ताचा काय करावें विपरीत ऐसें झालें ॥ ३९ ॥
नेत्रीं अश्रू कंठ दाटला अनुतापानें भरला ॥
शास्त्र पाहुनी प्रायश्चित्तें पुनरपि ब्राह्मण केला ॥ ४० ॥
पांचासातां दिवसां येऊनि ब्रह्मसभेमाधिं पुशिलें ॥
प्रायश्चित्तें लिंगा वरूतें आम्हुनि चर्म न आलें ॥ ४१ ॥
अविंधासी भांडे माझे कान चि नाहीं बुजिले ॥
व्यर्थ कातडें कापोनी मज अविंध कैसें केलें ॥ ४२ ॥

पिसा चि होउनि नग्न बहिरापिसाची नांव मिरवी ॥
फिरत फिरत आला वडवाळे नागेशाचे गांवीं ॥ ४३ ॥
नागदेव घुमट बांधाया सरकाळाचे गाडे ॥
हस्तीतुल्या धोंडी वरूत्या जुंपियले माकोडे ॥ ४४ ॥
त्यांतें छळुनी बहिरापीसा पुसे मी मज कोण सांगा ॥
हिंदू किंवा अविंध म्हणतां सद्गुरू आला रागा ॥ ४५ ॥
हातीं काठी बळें घातली उचलुनि टाळूवरुती ॥
घेरी येउनि भूमिसि पडतां नाठवे वृत्ति निवृत्ती ॥ ४६ ॥
मुसळ अणोनी शिष्या हातीं कांडविला पिंडासी ॥
अस्थिमास कांडोनी गोळी केली मेणा ऐशी ॥ ४७ ॥
पुनरपि त्यांनीं त्याची मूर्ती निर्मीली स्वाहस्तें ॥
अवलोकीता अमृत दृष्टीं अवलोकीलें त्यातें ॥ ४८ ॥
ब्रह्मरूप हा तनु ओतिव माजी चैतन्याचा वास ॥
बहिऱ्यापीशा सावध ऐसें पाचारीलें त्यास ॥ ४९ ॥
येरू उठोनी चरण वंदिले कोण तु ऐसें पूसे ॥
याति वर्ण ना नाम रूप तें माझें मज चीं भासे ॥ ५० ॥
मस्तकिं हस्तक ठेवुनि केला सकल्पाहुनि परता ॥
भक्त बहुत आणिक तारिले जयजय नागनाथा ॥ ५१ ॥
ऐसे अपार संत वर्णितां सद्गाय सर्व हि जातो ॥
आठवलें तें ऐका भावें उद्धवचिद्घन गातो ॥ ५२ ॥
॥ इति श्रीनागनाथचरित्र संपूर्ण ॥ ५ ॥

---

## उद्धवचिद्घनकृत
## मृत्युंजयचरित्र साक्या.

शहामहंमद तो बमणी करि बेदरींची पाच्छाई ॥
मृत्युंजय साधूचा राजा ऐका त्याचि नवाई ॥ १ ॥
बरवीं संतचरित्रें हो । पावन परम पवित्रें हो ॥ ध्रु० ॥
एके दिवशीं सजियावरुता सयली घेउनि संगें ॥
उत्तम साकर केळें मेवा भक्षी सानूरागें ॥ २ ॥
साली सोलुनि झरोकियाच्या मार्गें खालीं टाकी ॥
भणग कोणी रोड अतीशय बैसुनि तेथे चोखी ॥ ३ ॥

देखुनि राणी निज स्वामीते वरोनि दाखवि हातें ॥
अटक महालामध्यें हा जिव आला कैसा येथें ॥ ४ ॥
पातशाह क्रोधानें द्वारपाळा ताडण करिता ॥
तिहीं जाउनिया त्या भणगातें मारियल्या बहु लाता ॥ ५ ॥
ते वेळीं तो दुःख न मानी निर्भय तो बहु हांसे ॥
राजा वर्जी दुतांसि तेव्हां दीर्घ रडे आक्रोशें ॥ ६ ॥
विपरित ऐसें देखुनि खांसा सन्मुख तो त्या पुसतां ॥
सालि चोरितां हे फळ तुझिया दुःखा रडतों आता ॥ ७ ॥
ऐशा वचनें हृदय भेदलें सांडुनि राज्य निघाला ॥
कोणाहि न कळतांची रात्रीं कल्याणासी गेला ॥ ८ ॥
तेथें ही ध्वज दिंडया मृदंग हरिचे गुण गाती ॥
विठ्ठलनामें घोषें यात्रा पंढरिसी ते जाती ॥ ९ ॥
तो चि समागम सार्थक जोडुनि पंढरपुरासि आला ॥
करुनि चंद्रभागेचे स्नाना पांडुरंग नमियेला ॥ १० ॥
शास्त्र-गुरु मज देइ विठोबा म्हणोनि धरणें बैसे ॥
विवेकसिंधू पुस्तक आणुनि दिधलें मग पंढरिशें ॥ ११ ॥
सहजानंदी सद्गुरु मूर्ती कल्याणीं सांगितला ॥
पुढती यात्रे संगें येउनि शिष्य तयाचा झाला ॥ १२ ॥
सद्गुरु-मूखें श्रवणें मननें अनुभव निज ध्यानासी ॥
मृत्युंजय या नामें सरतां नारायणपुरवासी ॥ १३ ॥
लिंगाइत ते समयीं राजा काशीपति कल्याणीं ॥
प्रत्यहिं दाहा सहस्र जंगम भोजन पुजेसि आणी ॥ १४ ॥
साठी गाडे शालिग्राम हि एके रात्रीं आणी ॥
शालिग्रामतळें बहु निर्मल तेथिल अपूर्व पाणी ॥ १५ ॥
त्यांतिल कोणी एक भवऱ्या मृत्युंजय-पद वंदी ॥
अविंधाचा शिष्य म्हणोनी जंगम समुहा निंदी ॥ १६ ॥
तेणें जाउनि स्वामीपाशीं सांगितलें गाऱ्हाणें ॥
येथोनी मृत्युंजयचरित्र ऐका विनोदवाणें ॥ १७ ॥
भोजन समयीं समस्त जंगम लिंगातें पाहाती ॥
अवघे लिंगाविरहित लाजिरवाणे झाले चित्तीं ॥ १८ ॥
त्यातें काशीराज विचारी अन्याया आचरला ॥
सांगा साधू पुरुषा छळुनी येथें कोणी आला ॥ १९ ॥

भवच्या अविधशिष्य म्हणोनी निंदित कैसे होतो ॥
राजा सांगे भावें जाउनि मृत्युंजयासि प्रार्थी ॥ २० ॥
समस्त जगम शरण हि भावें साष्टांगें नमियेले ॥
वेदांत हि सिद्धांत हें कुतरे समीप दोन्ही आले ॥ २१ ॥
वंदुनि तोंडें पसरोनि तिहीं लिंगें रिचविलीं धरणीं ॥
अपुलें अपुलें वळखुनि घेतां न येति अद्भुत करणी ॥ २२ ॥
ज्याचें त्याचें जवळी पुढती जयजयकारो केला ॥
ज्ञानसागर आया म्हणुनी सकळीं पूजीयेला ॥ २३ ॥
ऐसे अपार संत वर्णितां संशय सर्व हि जातो ॥
आठवलें तें भावें ऐका उद्धवचिद्घन गातो ॥ २४ ॥

---

## कृष्णकौतुक[1] सर्ग १० वा.

**मालिनी**—अभिनव नटधारी भक्तकैवारकारी ।
दुरिततिमिरवारी[2] देवशत्रूस मारी ॥
त्रिभुवननरनारी चिंतिती ज्यासि भारी ।
हरि सकळ शरीरीं खेळवी कर्मदोरी ॥ १ ॥

**शा० वि०**—ऐसें कृष्ण बळें करूनि बरवे जो नांदवी लोक तो ॥
कंसाचा ससरा उठावुनि बरा आला जरासंध तो ॥
सांगातें बळवंत सैन्य पुरतें तेवीस अक्षोहिणी ॥
कोपें युद्ध करावयासि मथुरा ते वेढिली तत्क्षणीं ॥ २ ॥

**नंदिनी**—मग आयुधासहित सारथि साजे । समवेत सुंदर बरे सुरकाजे ॥
रथ दोनि सज्ज गगनींहुनि आले । हरि राम ते वरि बरे चढियेले ॥३॥
रण पाडिलें करुनियां शत खंडें । वरती उडोनि पडती नरमुंडें ॥
बहुसाल[3] नृत्य करिती मग धडें । + + + + + + ॥ ४ ॥

**भुजंगप्रयात**–रथीं रोहिणीच्या सुतें[4] जिंतियेला । धरूनी जरासंध तो सोडियेला ॥
मनीं लाजियेला वना चालियेला । जनीं वारियेला स्वदेशासि गेला ॥५॥

**शा० वि०**–सांडीना अभिमान यादवकुळा जिंतावया चालिला ।
कृष्णें बाहुबळें करूनि सतरा वेळां असा जिंतिला ॥
ऐसें वैर नसेच जों निरसिलें तों नारदें धाडिला ।
कृष्णाच्या नगरीस काळयौवन पुढें म्लेंच्छां सवें पातला ६ ॥

---

१ हें प्रकरण रा० रा० वामन दाजी ओक हल्लीं वास्तव्य सबळपूर यांनीं नागपूरीं असतांना पाठविलें. २ दुरित-तिमिर=पापांधकार. ३ बहुसाल=पुष्कळ. ४ रोहिणीचा सुत=बळराम.

आर्धी अर्बुनिधींत एक नगरी केली बरी द्वारका ।
वेगें योगबळें समस्त जन ही नेले तया स्थानका ॥
रामाशीं समवेत कृष्ण मथुरे पासूनि जों चालिला ।
मागें धाव धरूनि काळयवनें तों लाग केला भला ॥ ७ ॥

**नंदिनी**—लटकें धरूनि भय कृष्ण पळाला । अति दूर पर्वत-दरींत लपाला ॥
अतिवेग काळयवनें परि केला । अवलोकिला पुरुष अन्य निजेला ॥८॥
हरि हा च काय मज भीउनि आला । मिष घेतलें दर-कुटींत लपाला ॥
म्हणऊनि काळयवनें परिसीला । चरणें प्रहारुनि बळें उठवीला ॥९॥

**मालिनी**—नयन उघडुनियां पाहियेलें तयानें ।
यवनपति जळाला अग्निदाहें त्वरेनें ॥
विरचुनि परभारी यापरी थोर लीला ।
तदुपरि वनमाळी त्या पुढें राहियेला ॥ १० ॥

**स्रग्धरा**—देवाचें काज केलें रिपुकुळ वधिलें इच्छिलें लब्ध झालें ।
ऐकांतीं स्थान आलें उपरि उठविलें ज्या जनें तें नळालें ॥
कृष्णातें देखियेलें पदयुग नमिलें आदरें वर्णियेलें ।
आज्ञेतें मानियेलें मग पन उरलें तें बरें भोगियेलें ॥ ११ ॥

**वसंततिलका**—देऊनि भेटि मुचकुंद महीपतीसी ।
आला मुकुंद मग तो मथुरापुरीसी ॥
तें सर्व ही यवनसैन्य विनाशियेलें ।
त्या द्वारकेप्रति धनादिक चालवीलें ॥ १२ ॥

**मालिनी**—त्वकर अठरावें युद्ध तें व्हावयाला ।
पुनरपि मथुरेसी तो जरासंध आला ॥
कपटभय धरोनी कृष्ण वेगें पळाला ।
लपणि धरुनि एके पर्वतीं तो निघाला ॥ १३ ॥
कटक निकट नेलें त्या जरासंध भूपें ।
गिरिवर चहु आंगीं जाळिला थोर कोपें ॥
नकळत कवणासी उच्च शृंगावरूनी ।
सहित हलधराशीं कृष्ण गेला उडोनी ॥ १४ ॥
यदुपति अतिवेगें द्वारकेसी मिळाला ।
परतुनि निजमार्गें तो जरासंध गेला ॥
बहु फुरकटलासे बोल बोले उताने ।

---

५ अर्बुनिधि=समुद्र.

परि हरि करणीचें गुह्य कांहीं न जाणे ॥ १५ ॥
अभिनव[६] तनया जे रेवती रेवताची ।
परम सगुण ते स्त्री रोहिणीच्या सुताची ॥
विधिवचनविलासें योग होऊनि ठेला ॥
सकल बुध जनांच्या मानसीं मान्य झाला ॥ १६ ॥
यदुकुल-तिलकाची कीर्ति सेवून ऐशी ।
चटपट मग मोठी लागली रुक्मिणीसी ॥
अभिमत सकळांचें यापरी जें तयेचें ।
परि मन शिशुपाळीं लागलें रुक्मयाचें ॥ १७ ॥
हरि वर मजजोगा मानला भीमकासी ।
परि हट शिशुपाळाकारणें रुक्मयासी ॥
म्हणुनि परम चिंता लागली रुक्मिणीसी ।
हित अहित विचारी आपुलीया मनासी ॥ १८ ॥
हितकर मज कोणी आपुलेंसें न भासे ।
अहह वडिल भाऊ हा परावा चि दीसे ॥
स्वजन कवण आतां पाठवूं द्वारकेसी ।
मज हरिचरणाची भेटि होईल कैशी ॥ १९ ॥

## भुजंगप्रयात.

अशी यापरी रुक्मिणी बोलियेली । मनांतूनि पूर्वीं बरी आठवीली ॥
स्वहस्ताक्षरें पत्रिका सिद्ध केली । सुदेवद्विजाचे[७] करीं अर्पियेली ॥ २० ॥
त्वरें विप्र[८] तो पातला द्वारकेसी । बरा भेटला पूजिला गौरवेशीं ॥
तयीं पत्रिका दाखवी रुक्मिणीची । हरीच्या निरोपें स्वयें तो चि वाची

## वसंततिलका.

श्रीमत्समस्तगुणमंडळ-मंडितासी । लीलावतार-यदुवंश-विभूषणासी ॥
पादारविंद[९]-परिचारक[१०]-रुक्मिणीचें । साष्टांग हें नमन सात्विक भक्ति सचें ॥ २२ ॥
श्रोत्रीं[११] रिघोनि गुणदैहिक ताप हारी । नेत्रीं भरूनि बरवेंपण लाभकारी ॥
ऐसें तुझें सकळ कौतुक आयकीलें । लज्जा त्यजूनि मन हें तुजमाजि आलें ॥ २३ ॥
हे धीट फार न पुसे कवणासि कैशी । ऐसा विकल्प हृदयांत झणी धरीसी ॥
ऐसा विवाह समयीं सकळाधिकांतें । जाणूनि कोण नवरी न वरील तूतें ॥ २४ ॥
सेवे निमित्य दिधली तनु भक्ति भावें । त्वां तों तुतें चि वरिलें मज तां[१२] वरावें ॥

---

६ अभिनव=नवीतरणी ७ द्विज=ब्राह्मण. ८ विप्र=ब्राह्मण. ९ पादारविंद=पदकमल. १० परिचारक=सेवक. ११ श्रोत्रीं=कानांत. १२ तां=त्वां.

वीरांस मी न गवसें शिशुपाळ मातें । गोमायु जेंवि गजराज महाबळीतें ॥२५॥
जन्मांतरीं विविध पुण्य-विलास भारि । आराधिला जरि असे भगवंत भारी ॥
येऊनि कृष्ण मजला परिणो परंतु । चैद्यादि-भूमिपति हे परिणू नयेतु ॥ २६ ॥
सेनासमेत परि गुप्तपणें त्वरेशीं । येऊनि कुंडिनपुराप्रति पूर्व दीशीं ॥
पीडूनि सैन्य मगधेश्वर-सैन्यकातें । रक्षोविधी* करुनि ने परिणूनि मातें ॥ २७ ॥
कोणा न मारुनि गृहांतुनि कोंवि लाहे । शंका अशी जरि मनीं तरि युक्त आहे ॥
येईन पूर्व दिवशीं पुर-बाह्य-देशीं । देवी-समीप कुळधर्म करावयासी ॥ २८ ॥
ज्याच्या पदांबुजरजें अभिषेक हो का । इच्छा अशी बहु शिवादिक सर्व लोकां
तो तूं कृपा न करिसी तरि हे त्यजूनी । पावेन तूज शत जन्म तपें करूनी ।२९।
ऐसा द्विजें लिखित-भाव निवेदियेला । गोविंद कुंडिनपुराप्रति चालियेला ॥
केळावला वर असे शिशुपाळ राजा । आईत भीमक गृहीं बहुसाल्य वोजा ॥३०॥
चिंतावली मग मनीं नवरी विचारी । का लागला यदुपतीस विलंब भारी ॥
अद्यापि तो द्विज न ये परतूनि का पां । आला समीप दिस हा करणें कसें पां ।३१।

## भुजंगप्रयात.

असें बोलतां पावला विप्र वेगें । समाचार सांगे सुखाच्या निरंगें ॥
अहो रुक्मिणी देखसी थोर लीला । सवें राम घेऊनि गोविंद आला ॥ ३२ ॥
द्विजाची अशी आइके गोष्टि कानीं । मनीं फार आभारली हर्ष मानी ॥
म्हणे यासि उत्तीर्ण होईन कैशी । नमस्कार साष्टांग घाली तयासी ॥ ३३ ॥
जसा रुक्मिणीच्या मतें कृष्ण आला । बरा भीमकें आदरें पूजियेला ॥
तसा रुक्मयाच्या मतें चैद्यराजा । असे राहिला मान पावूनि वोजा ॥ ३४ ॥
अहो रुक्मिणी–जोगता कृष्ण आहे । जनाच्या मनीं हा अभिप्राय राहे ॥
हरीच्या प्रतापें मनीं तापलासे । जरासंध चैद्याकडे वोढलासे ॥ ३५ ॥
हरिद्रा विमर्दूनी अभ्यंग केला । समारंभ दोहीं गृहीं चालियेला ॥
वृथा हर्ष मानी मनीं चैद्यराजा । वधूचा तयीं लाभ होणार दूजा ॥ ३६ ॥
अलंकार लेवूनियां संभ्रमेशी । वधू चालिली अंबिकेच्या स्थळाशीं ॥
प्रवेशू न देती दुजीया जनासी । असे चालती वीर रक्षावयासी ॥ ३७ ॥
भवानीस वंदूनि पूजूनि भावें । तयीं रुक्मिणी हें चि मागे स्वभावें ॥
अहो देवि गौरी असें त्वा करावें । अकस्मात मातें हरीनें वरावें ॥ ३८ ॥
तयीं स्थानकांतूनि बाहेर आली । हळू पाय ठेवीत चालू निघाली ॥
अकस्मात येऊनि नेणें हरीनें । अशीया मतें न चाले त्वरेनें ॥ ३९ ॥

---

१३ गोमायु=कोल्हा. १४ परिणो=लग्नकरो. १५ चैद्य=चेदिदेशचा राजा. १६ हरिद्रा=हळद. * राक्षसविवाह.

तयींची प्रभा साजिरी देखियेली । कितेकां जनीं भूलि टाकोनि गेली ॥
मनीं फारसा गर्व वाहात होते । पडूं लागले वाहना खालते ते ॥ ४० ॥
स्वभावेंचि जो पाहिलें भूपतीतें ॥ अकस्मात तो देखिलें कृष्णजीतें ॥
समाधान झालें तयेच्या मनाचें । भये दाटलें चित्त येरां जनांचें ॥ ४१ ॥
जयामाजी वारा प्रवेशू शकेना । असे रक्षितां दाटती वीर नाना ॥
रथीं वेंघतां पाय जो उच केला । वधूनें तयीं कृष्ण घेऊनि गेला ॥ ४२ ॥
हरीनें वधूतें रथीं बैसविलें । नृपाचें तयीं सैन्य चालूनि आलें ॥
तयाशीं तयाशीं महा युद्ध झालें । कितीयेक मेले किती ते पळाले ॥ ४३ ॥
भुकेल्या पुढोनी जसें जाय भोंने । तयाच्या मनीं होतसे दुःख दूणें ॥
तशी रीति झाली न बोले चि लाजा । हिवासूनि राहे तयीं चैद्यराजा ॥ ४४ ॥
बळें गोवळें आमुची मूल नेली । करावें कसें या कुळीं लाज झाली ॥
म्हणोनी तयीं रुक्मया सैन्य-योगें । रणा कारणें धावला लागवेगें ॥ ४५ ॥
असें देखतां यादवांच्या कटेंशीं । उभा राहिला कृष्ण झुंजावयासी ॥
घडी एक तें युद्ध केलें तयासी । तयीं नेटला शीघ्र मारावयासी ॥ ४६ ॥
तयीं रुक्मिणीनें नमस्कार केला । पतीपासुनी बंधु तो वांचवीला ॥
तरी त्यास चोजंबनी फार झाली । मिशी आणि डोई बरी बोडियेली ॥ ४७ ॥
अशीया परी बांधिला सोडियेला । प्रतिज्ञा नव्हे रुक्मया लाजियेला ॥
पुरीमाजि मीं काय जाऊं म्हणोनी । निराळा असे गाव मोठा करूनी ॥ ४८ ॥
असा कृष्ण घेऊनियां रुक्मिणीसी । महाविभवें पावला द्वारकेसी ॥
यथाशास्त्र तेथें असें लग्न केलें । समस्तांसि अन्नें धनें पूजियेलें ॥ ४९ ॥

## वसंततिलका.

सत्राजितें वर तपें रवि तुष्ट केला । त्यानें स्यमंतक महा माण अर्पियेला ॥
तो माधवें सहज मागितला विनोदें । नेदीच तो निरसनी धरिली मुकुंदें ॥५०॥
सत्राजिताजवळुनी अनुजे प्रसेनें । मागीतला मणि गळां धरिला सुमानें ॥
हर्षे करूनि मग तो मृगयेस गेला । सिंहें तुरंगम समेत च मारियेला ॥ ५१ ॥
तेथूनि सीमतमणि घेउनि चालियेला । तों जांबुवंत बळवत्तर आड आला ॥
तेणें तयासि वधिलें वर रत्न नेलें । तें पाळणा निजसुतावरि बांधियेलें ॥ ५२ ॥
जेव्हां प्रसेन परतोनि न देखियेला । सत्राजितें मग मनांत विकल्प केला ॥
मागीतला मणि नसे दिधला म्हणोनी । कृष्णें तयासि वधिलें कपटें करूनी ॥५३॥
जाणूनि कान घसणी हरि चालियेला । लोकांस तो सकळ माग हि दाखवीला ॥
सेखीं भुयार अवलोकुनि आंत गेला । बाहेर तो जन समस्त हि राहियेला ॥५४॥

---

१७ भानें=पात्र

त्यामाजि बाळक रडे म्हणऊनि नारी । उच्च स्वरें करुनि मंजुळ सादं मारी ॥
झालें प्रमेय बरवें जडिलें निवातीं । ऐशा परी नवल गायन गात होती ॥ ५५ ॥
सिंहें प्रसेन वधिला सहज प्रतापें । सिंहास ही निवटिलें तुझिये नि बापें ॥
आला गृहासि मणि का रडतोसि बाळा । तूं भोग घे समज सत्वर चारुशीळा[१८] ॥५६॥

शा० वि०—कानीं गायन आयकोनि हरि तो बाळा पुढें नेटला
छाईनें भय मानिलें गलबला केला नभीं दाटला ॥
आला धावुनि जांबुवंत तवके झुंजावया लागला
अठ्ठावीस दिनप्रमाण झगडा झाला बरा चांगला ॥ ५७ ॥
शेवटीं हा कळला महापुरुषसा तेव्हां बरा पूजिला
कन्या जांबुवती स्यमंतकमणी प्रेमादरें अर्पिला ॥
दूणा लाभ असा हरीस घडला तेथोनियां चालिला
लोकीं तों हुलि पाडिली मग पुरी माझारि तो पावला ॥ ५८ ॥
आली आळ निवारिली मणि हि तो ज्याचा तया दीधला ।
तेणें ही निजकन्यके सहित तो याच्या करीं अर्पिला ॥
कन्या तों यदुनायकें परिणिली ते सत्यभामा बरी ।
ऐसा ही मणि तो परतु दिधला सत्राजिताच्या करीं ॥ ५९ ॥

मालिनी—जतुगृहिं[१९] दहनें[२०] त्या जाळिलें पांडवासी ।
म्हणउनि हरि गेला कौरवांच्या पुरासी ॥
तदुपरि कृतवर्मा आणि अक्रूर यांहीं ।
कपट चि रचियेलें संधि पाहोनि कांहीं ॥ ६० ॥
नियत करुनि आज्ञा कारणें सत्यभामा ।
अवगुण नसतां ही सांडिला बोल कामा ॥
मग भय धरुनीयां अर्पिली माधवासी ।
तरि न दिसत मारूं शीघ्र सत्राजितासी ॥ ६१ ॥
मथवुनि शतधन्वा प्रेरिला कूट[२१] याचा ।
मग वध करवीला सुप्त[२२] सत्राजिताचा ॥
मणि हि हरुनि नेला गोष्टि देशांत गेली ।
परम कठिण पीडा सत्यभामेसि झाली ॥ ६२ ॥
भययुत शतधन्वा तो पळाला त्वरेनें ।
धडकुनि मिथिळेसी मारियेला हरीनें ॥

१८ चारुशील=सुस्वभाव. १९ जतु=लाख. २० दहन=अग्नि. २१ कूट=कपट. २२ सुप्त=निजलेला.

परि मणि न दिसे तो कृष्ण गांवासि चाले ।
वध-कर अपराधी दोष हीं ते पळाले ॥ ६३ ॥

इंद्रवज्रा—अक्रूर काशीस पळूनि गेला । तेथूनि कृष्णें मग आणवीला ॥
त्या पासुनीयां मणि मागितीला । घेऊनि सर्वां दिधला तयाला ॥ ६४ ॥
सत्राजिताचा वध शीघ्र होणें । त्या सत्यभामेसि कळों न देणें ॥
यालागिं ऐसें कवशल्य केलें । कृष्णें स्वनीरापण दाखवीलें ॥ ६५ ॥

स्रग्धरा—इंद्रप्रस्थासि गेला यदुपति मग तो पांडवांसी मिळाला ।
कालिंदी नाम ऐशी दिनकरें[२३]-तनया देखिली चारुशीला ॥
अंगीकारूनि तीतें परिसुनि बरवा सोहळा दाखवीला ।
जावा ऐसा न वाटे म्हणउनि सुहृदीं गोविला राहवीला ॥ ६६ ॥
त्यांची घेऊनि आज्ञा तदुपरि दहनें जाळिलें खांडवासी ।
दाहापासूनि कृष्णें कणव[२४] करूनिया सोडवीलें मयासी ॥
तेव्हां आभारुनीयां अति नवल सभा यापरी सिद्ध केली ।
जेथें दुर्योधनासी स्थळ जळ न कळे भूमि टाकोनि गेली ॥ ६७ ॥
त्यांची घेऊनि आज्ञा परतुनि हरि तो द्वारकेमाजि आला ।
कालिंदीशीं विवाह प्रभुपण विभवें सर्व विख्यात केला ॥
केलें होतें तयेनें बहु तप फळलें पावली माधवातें ।
सेवाधर्मे करूनी अति नियतपणें तोषवी ते तयातें ॥ ६८ ॥
आतेची एक कन्या सकळ परि बरी चांगली मित्रविंदा ।
तीचे भाऊ दुरात्मे अरिपण[२५] करिती बोलती फार निंदा ॥
ते इच्छी आपणातें म्हणउनि हरि तो तीस काढूनि आला ।
दुष्टांतें जिंतियेलें परिणुनि बरवा सोहळा थोर केला ॥ ६९ ॥

शा० वि०—माझ्या सप्त वृषांसि जो निज बळें जिंती निराळेपणें ।
सत्या नामक रूपवंत तनया देणें तयाकारणें ॥
रायें नग्नजितें महा पण असा लोकांत विस्तारिला ।
गळे मोडुनि थोर थोर मग हा श्रीकृष्णजी चालिला ॥ ७० ॥
गोन्हे सात हि जिंतिले परिणिली ते कन्यका आदरें ।
सत्या नाग्नजिती जये असति हीं नामें अशीं सुंदरें ॥
येतां मार्गी धरूनियां खळपणें जे राहिले भूपती ।
त्यांतें हा पळवूनियां हरि तयीं आला स्वदेशाप्रती ॥ ७१ ॥
भद्रानामक कन्यका दुसरिया आतेचिया मंदिरीं ।

---

२३ दिनकरतनया=सूर्यकन्या. २४ कणव=दया. २५ अरिपण=शत्रुत्व.

तीचे सोदर शाहणे हरिगुणीं संतोषती अंतरीं ॥
त्याहीं ते मग आर्पिली शुभ दिनीं गोविंदजीकारणें ।
पूजा मान करूनि फार दिधलीं नानापरी आंदणें ॥ ७२ ॥

**रथोद्धता**--जीस नाम वदताति लक्ष्मणा । मद्रराज-तनया सुलक्षणा ॥
ते स्वयंवर-विधी करूनियां । सज्जली वर बरा वरावया ॥ ७३ ॥
धांव घालुनि तया स्थळा प्रती । जिंतिले सकळ सर्व हि भूपती ॥
आणिली हरूनियां पराक्रमें । लक्ष्मणा परिणिली यदूत्तमें ॥ ७४ ॥

**वसंततिलका.**

[illegible]

जीं कुंडलें अति मनोहर आयकीलीं । इंद्राचिये जननिये जवळूनि नेलीं ॥७५॥
ऐसें स्वदुःख अवघें मग देवराजें । सांगीतलें यदुपतिप्रति आत्मकाजें ॥
होती समीप पद सेवित सत्यभामा । तीतें कळे दुसरियासि कळे कसें मा ॥७६॥
तीशीं समेत गरुडावरि बैसुनीयां । तें दैत्यसैन्य अनिवार विदारूनीयां ॥
भौमासुरासि वधिलें जननी तयाची । पृथ्वी करी स्तुति बरी मग फार त्याची ॥७७॥
पृथ्वीचिया विनवणीस हि मानियेलें । भौमात्मजास हि पदावरि बैसवीलें ॥
त्याच्या गृहीं धन समस्त गवेशिपेलें । तेथें अपूर्व इतुकें अवलोकियेलें ॥ ७८ ॥
सोळा सहस्र शत एक हि चांगलीया । भौमासुरें निज बळें अवरोधिलीयें ॥
निष्ठा धरूनि असती क्षितिपाळकन्या । याचें चि चिंतन मनीं म्हणऊनि धन्या ॥७९॥
त्या सर्व ही सकळ वित्त हि मानियेलें । अत्यादरें स्वनगरा प्रति धाडियेलें ॥
जाऊनि इंद्रभुवनाप्रति कुंडलें हीं । प्रेमेंकरूनि अदितीस निवेदिलीं हीं ॥ ८० ॥
स्त्रीनें मनोहर म्हणोनि अपेक्षियेला । तो पारिजात उपडूनि हि चालवीला ॥
आला सुराधिपति युद्ध करावयाला । तो जिंतिला परतला स्वपुरीस गेला ॥ ८१ ॥
कैसें कृतघ्नपण हें असिया न पाडें । विस्तारिलें सुरपती करवे निवाडें ॥
स्त्रीवश्य लोक असती कवणे प्रकारें । तें आपणा वरूनि दाखविलें विकारें ॥८२ ॥
ऐशी करूनि बरवी नवलाव लीला । तो द्वारकेस परिवारसमेत आला ॥
स्त्रीनें अपेक्षुनि सुरद्रुम आणवीला । तीच्या च अंगण-तळीं मग लावियेला ॥८३॥
सोळा सहस्र शत एक करूनि रूपें । तावत्प्रमाण गुरु बांधव मायबापें ॥
सोळा सहस्र शत आगळिया स्त्रियांसी । एके घडींत वरिले अति संभ्रमेंशीं ॥८४॥
सर्वांसि सुंदर गृहें वर भोग लीला । सर्वांसि भूषण विलास समान केला ॥
सर्वांसि उत्कट धनें पशु दास दासी । सर्वांसि सन्निध असे हरि तो विलासी ॥८५॥

**शा० वि०**—प्रत्येकीं दश पुत्र एक च सुता संतान ऐसे परी ।
झाले त्या सकळां स्त्रियांसि न दिसे कांहीं उणीशी परी ॥

२१ अवरोधिल्या=कोंडल्या. २० सुरद्रुम=पारिजात.

त्याचें लग्नविधान शीघ्र बरवें झालें कुळा सारिखें ।
आहे फार परंतु मुख्य वदतों तें आयकावें सुखें ॥ ८६ ॥
आहे जांबुवती विवाह-समया आधींच ते रुक्मिणी ।
प्रद्युम्नास बरेंपरी प्रसवली आनंदली तद्गुणीं ॥
दाहा दीस न झालिया च पुरते तों शंबरें चोरिला ।
वैरी हा म्हणऊनियां जळनिधी माझारि तो टाकिला ॥ ८७ ॥
मत्स्यानें गिळिला त्वरें करुनियां आहार तो आपुला ।
काहारीं मग जाळियांत धरिला तो मत्स्य ही चांगला ॥
रायायोग्य असे म्हणूनि दिधला तो शंबराकारणें ।
तेणें राधवणां-समीप दिधला रांधावया कारणें ॥ ८८ ॥
त्याचें पोट विदारितां प्रकटलें तें बाळ ही चांगलें ।
तीहीं रांधवणीं मिळोन अवघीं जीं कारणें अर्पिलें ॥
कामाची रति ते जनांत मिरवी माया असें नाम ही ।
तेथें येऊनि नारदें शिकविली बाळासि पाळीं सही ॥ ८९ ॥
तीनें वाढविला तयासि पहिला वृत्तांत सांगीतला ।
तेणें शंबर दैत्य तो निवटिला संग्राम केला भला ॥
माया नामक पूर्व जन्म नवरी ते द्वारके आणिली ॥
त्या दोघास विलोकितां मग मनीं ते रुक्मिणी तोषली ॥ ९० ॥
नामें रुक्मवती महागुणवती ते रुक्मयाची सुता ।
तीचे भोजकटीं स्वयंवर बरें आरंभलें तत्वतां ॥
तेथें एकरथासमेत बळिया प्रद्युम्न तो धावला ।
तीतें ही वरिलें नृपास दमिलें तीयुक्त आला भला ॥ ९१ ॥
प्रद्युम्नाहुनि धाकुटे उजवले ते नवसख्याक ही ।
त्यांची चारुमती सुरूप भगिनी जीचें सदा कोड ही ॥
तेथें जो कृतवर्मनामक असे त्याच्या सुताकारणें ।
कृष्णें ते सुविधान युक्त दिधली जे मानली सद्गुणें ॥ ९२ ॥
झाला रुक्मवतीस पुत्र बरवा सर्वांपरी आगळा ।
तो नामें अनिरुद्ध शुद्ध हृदयीं जाणे समस्ता कळा ॥
ऐसा तो वर रुक्मयासि रुचला पुत्रात्मजाकारणें ।
केली ते मग सोयरीक तिसरी दो सोयरीका गुणें ॥ ९३ ॥
नातू तो अनिरुद्ध नाति बरवी नावें बरी रोचना ।

---

८८ सही=सखी ९१ नवसख्याक=नऊजण.

दोघां भोजकटीं विवाह घडला तो मानला सज्जना ॥
सार्डीना परि वैरभाव हृदया पासूनियां रुक्मया ।
द्यूतें यादव जीतणें ह्मणुनिया इच्छा करी क्रोधिया ॥ १४ ॥
मित्राच्यानि मतें सभा करुनियां तो रुक्मया बैसला ।
तेथें आळविला ह्मणूनि बळिया तो राम ही पातला ॥
ऐसे दोघ मिळूनि उत्कट घनें तें द्यूत आरंभिती ।
राजे आणि समस्त यादव हि ते दूरुनियां पाहती ॥ १५ ॥
आरंभीं अकरा सहस्र शत ही मुद्रा सुवर्णांचिया ।
रामें ठेविलिया सुखाउनि मनीं जिती तयां रुक्मया ॥
ऐसें हारविलें बळें म्हणउनी कालिंगराजा तवें ।
बत्तीशी रैंद[१] वासुनी खदखदां हासे मदें वैभवें ॥ १६ ॥
लक्षाचा मग डाव भीमकसुतें तो मांडिला चांगला ।
सर्वां देखत शीघ्र लाग न धरे तो तेधवां जिंतिला ॥
रुक्मा तो परि नाठ जाउनि वदे नाहीं च तां जिंतिला ।
रामें न्यर्बुद वित्त कोप धरूनी डावीं तयीं ठेविला ॥ १७ ॥
ऐसा डाव हि जिंतिला हलधरें रुक्मा ह्मणेना खरें ।
बोले तोंड बळें भरें दुसरिया मिथ्यत्वें × × × ॥[२]

समाप्त.

---

## गंगाधरकृत[१]

## रसकल्लोल.

नवरसरसिक सदा नवदानवसहारहारमाभोगी ॥
भोगीमचकशायी[२] पावो यदनुग्रहें[३] चि लाभो [४]गी ॥ १ ॥
श्रीमद्धानिकशिरोमणि दाजी बुटिची श्रवण करुनि वाणी ॥
रसकल्लोलग्रथीं मीं नव रस लक्षणें स्वयें वार्नी ॥ २ ॥

### अथ मूल संस्कृतश्लोकाः

शृंगार हास्यकरुणरौद्रवीरभयानकाः ॥
बीभत्साद्भुतशांताश्चेत्यमी नव रसा स्मृताः ॥ १ ॥
रतिर्हासश्च शोकश्च क्रोधोत्साहौ भय तथा ॥
जुगुप्साविस्मयशमाः स्थायीभावाः प्रकीर्तिताः ॥ २ ॥

---

१• रद=दात. २१ हा सर्ग आमचेकडे असा अपूर्तांच आला आहे. आलेला भाग येथें सपला. १ हें प्रकरण रा• रा• वामन दाजी ओक हल्लीं वास्तव्य सबळपूर यांनीं पाठविलें २ भोगीमंचकशायी=शेषरूपी पलंगावर निजणारा. ३ अनुग्रह=कृपा. ४ गी=वाणी.

कारणान्यथ कार्याणि सहकारीणि यानि च ॥
रत्यादेः स्थायिनो लोके तानि चेन्नाटयकाव्ययोः ॥
विभावा अनुभावास्ते कथ्यते व्यभिचारिणः ॥
नाटयमाहार्य आरोपः शब्दार्थौ काव्यमिष्यते ॥ ४ ॥
स्तंभः स्वेदोथ रोमांचः स्वरभंगोथ वेपथुः ॥
वैवर्ण्यमश्रुप्रलया इत्यष्टौ सात्विका मताः ॥ ५ ॥
निर्वेदग्लानिशंकाख्यास्तथासूया मदः श्रमः ॥
आलस्य चैव दैन्य च चिंता मोहः स्मृतिर्धृतिः ॥ ६ ॥
व्रीडा चपलता हर्ष आवेगो जडता तथा ॥
गर्वो विषाद औत्सुक्य निद्रापस्मार एव च ॥ ७ ॥
सुप्तं विबोधोमर्षश्चाप्यवहित्थमथोग्रता ॥
मतिर्व्याधिस्तथोन्मादस्तथा मरणमेव च ॥ ८ ॥
त्रासश्चैव वितर्कश्च विज्ञेया व्यभिचारिणः ॥
रतिर्देवादिविषया तथा स्याद्व्यभिचारिणी ॥ ९ ॥
हावाः शृंगारचेष्टाः स्युः पुरंध्रीणा निसर्गजाः ॥
लीलाविलासो विच्छित्तिर्विभ्रमः किलकिंचितं ॥ १० ॥
मोट्टायित कुट्टमितं बिब्बोको ललित तथा ॥
विह्रत चेति विज्ञेया दश हावास्तु योषितां ॥ ११ ॥

असे मूळ ग्रंथातील श्लोक झाले. आतां येथें अनुक्रम असा जाणावा कीं, पहिले विभाव, मग अनुभाव, मग सात्विकभाव, मग व्यभिचारीभाव, नंतर स्थायीभाव, त्यानंतर नव रस, त्या नंतर दाहा हाव निरूपण केले असें जाणावें. आतां लक्षणें आणि उदाहरणें लिहितों. त्यांत प्रथम विभावाचा लक्षणोदाहरणक्रम दाखवितों.

## आलंबनोद्दीपन विभावांचें लक्षण.

जो रस उपजवितो हा विभाव आलंब प्राणिउद्दीप ॥
आश्रय आलंबन उद्दीपन त्याचे प्रकाशनीं दीप ॥ ३ ॥

## आलंबनविभावोदाहरण.

सखि मदन-तरूची मंजरी प्राणनाडी ॥
गुणगणमणिपेटी फार चातुर्य-गोडी ॥
मम मनहरिणाचे चारण्यालागिं वाडी ॥
क्षणि नयनचकोरा चंद्रिका होय जोडी ॥ ४ ॥

५ चंद्रिका=चांदणें.

### उद्दीपनविभावाचें उदाहरण.

सघनघनघटीं ही आलिँ पर्जन्यबिंदू ।
टपकति वनभूमी हीरवी नाहिं इंदू ॥
चमकति अति वीजा मोर कोकावती ते ।
नसति जन हि कोणी का नये सुंदरी ते ॥ ५ ॥

### अनुभावाचें लक्षण.

जो रस दाखवि अकपटकार्य रसाचा करी रसातें जो ॥
जो अनुभाव वदावायाचे सग्रह कवित्व हे तें जो ॥ ६ ॥

### अनुभावाचें उदाहरण.

लक्ष्मीलागीं कटीक्षें श्रुतिसि हसतसे यज्ञ जीवास शोकी ॥
क्रोधें क्षत्रास देखे दशमुखसमरीं शूर जो गोपलोकीं ॥
लोणी चोरोनि भीतो चकित चि पळतो म्लेच्छरक्तें चि युकी ॥
दंतें पृथ्वी धरी वा हरि मुनि परि तो नासिकीं दृष्टि झोंकी ॥ ७ ॥

### सात्विकभावाचें लक्षण.

देहावरि होती जे देती पुष्टी रसासि अविनाशी ॥
व्यभिचारी सात्विक ते भाव असे अष्ट सर्व रस देशी ॥ ८ ॥

### सात्विकभावाचें उदाहरण.

फुटे न पद कंचुकी भिजलि अंग रोमांचिलें ।
तसा स्वर ही पालटे तनुसि कांपणें सचिलें ॥
विवर्ण मुख जाहलें नयनिं अश्रु संचारिले ।
वनांत हरि पाहता मन हि लीन टकारिलें ॥ ९ ॥

### व्यभिचारी भावाचें लक्षण.

व्यभिचारिणी जशी स्त्री भोगी सकळांप्रति तसे भाव ॥
जे पोषिति सर्व रसा त्यांचें व्यभिचारि हें असे नांव ॥ १० ॥

येथें विभाव, अनुभाव, सात्विकभाव, यांचीं उदारणें संक्षिप्त लिहिलीं. कारण रसाचे उदाहरणांत हे स्पष्ट होतील. परंतु व्यभिचारीभाव स्पष्ट होणार नाहींत म्हणून वेगळालीं उदाहरणें लिहितों.

### निर्वेदलक्षण.

तत्वज्ञानापासुनि होतो निर्वेद चिन्ह त्या ऐसें ॥
अश्रू घाम शरीरीं येणें हें जाण पडिता लेसें ॥ ११ ॥

---

६ घटा=समूह. ७ आलि=हे सखि. ८ कटाक्ष=डोळ्याचा कोंपरा ९ विवर्ण=फिकट. १० निर्वेद=कंटाळा.

उदाहरण.

विद्याभ्यास करूनि पंडित भले म्यां जिंकिले चांगले ॥
नाना देश फिरूनि कष्ट करुनी ते द्रव्य म्यां संचिले ॥
ते ते भोग हि नाशवत असतां म्यां भोगिले व्यर्थ कीं ॥
नाहीं त्या हरिला कधीं हि भजलों आपूलिये सार्थकीं ॥ १२ ॥

ग्लानिलक्षण.

कष्टतृषाभूकेनें होते ग्लानी तिचें ही चिन्ह असें ॥
नेत्रभ्रमण ढिलेपण रंगभेद आणि कृशत्व हें हि असे ॥ १३

उदाहरण.

तृषित जनककन्या दंडकारण्यदेशीं ॥
नयन फिरवुनीयां पाहते राघवासी ॥
कृशतनु बळ गेलें कांति ही मंद झाली ॥
न फुटत पद तेव्हां या परी ग्लानि आली ॥ १४ ॥

शंकालक्षण.

धाडटपण अपुलें जें जें दुसऱ्याचें कठोरपण तेणें ॥
होते शंका चिन्ह हि कंपक्रिया लपविणें असे जाणें ॥ १५ ॥

उदाहरण.

चोरूनि लोणि जननी-करिं काठि आहे ।
क्रोधें चि लाल नयनें बरि वाट पाहे ॥
पाहूनियां परिहरि बहु कंपयुक्त ।
पुसी मुखासि वसनें बहु-युक्ति-युक्त ॥ १६ ॥

असूयालक्षण.

दुष्टपणें क्रोधानें होय असूया तिचें असें जाणा ॥
चिन्ह हि दोषारोप क्रोधव्यापार यापरी नाना ॥ १७ ॥

उदाहरण.

अधि करिं हरिपूजा धर्मराजासि ऐसें ।
वदति सकल तेव्हां वाक्य ऐकूनि तैसें
मग खळ शिशुपाळ क्रोधयोगें वदे जें
कवण कपटिचोराशिं दळालागिं पूजे ॥ १८ ॥

मदलक्षण.

मद्यादिकपानानें होतो मद चिन्ह त्यास त्रिविध असें ॥

---

११ वसन=वस्त्र. १२ असूया=हेवा. १३ मद=झिंगणें.

रोदन गाणें हसणें नीचोत्तममध्य जिवभेद दिसे ॥ १९ ॥

**उदाहरण.**

यादव सर्व समुद्रतटीं निज कामिनिपुत्रसमेत भले ।
पाहुनि पर्व सुपुण्य महोदयतुल्य असे मग न्हाति जलें ॥
देउनि दान अनेक वसु द्विजभोजन ते मग मद्य पिले ।
गाति किती किति नाचति हासति ते निजती रडती मदले ॥ २० ॥

**श्रमलक्षण.**

रतिनें मार्गगतीनें बहु अभ्यासें चि होय श्रम त्याचें ॥
चिन्ह श्वासग्लानी खेदादिक होय जाण हें साचें ॥ २१ ॥

**उदाहरण.**

सुवर्णमणिमंचकीं शिथिलकंचुकी राधिका ।
रतांतसमयीं उगी च निजली रतीसाधिका ॥
शरीर बहु भीजलें वदनपद्म[१४] कोमाविलें ।
विरालि सकळा कळा श्वसित ही न थामाविलें ॥ २२ ॥

**आलस्यलक्षण.**

गर्भादिकेंचि होतें तें आलस्याणि§ चिन्ह त्यास असें ॥
कार्य न करणें देणें जांभाया फार या परी बहुसें ॥ २३ ॥

**उदाहरण.**

कुच-कंचुक हार लो धरी । परि ती रुक्मिणि गर्भिणी बरी ॥
न वदे न करें निवारिते । नयनातें फिरवूनि वारिते ॥ २४ ॥

**दैन्यलक्षण.**

विरहें दारिद्र्यानें होत असे दैन्यचिन्ह त्यास असें ॥
अगास कष्ट आणी पीडा बहु त्या क्षुधेंचि ही विलसे ॥ २५ ॥

**उदाहरण.**

टाकूनि गेला मजला विदेशीं[१५] । करूं कसें काय सखे उदासी ॥
शय्या पतीची जरि उष्ण झाली । दशा जशी नाव जळात गेली ॥२६॥

**चिंतालक्षण.**

प्रिय वस्तू जें त्याचे अप्राप्तिनें चि होतसे चिंता ॥
वैवर्ण्य[१६] ताप अश्रू श्वास असें चिन्ह होइ यतिमत्ता ॥ २७ ॥

---

१४ पद्म=कमळ. १५ विदेशीं=परदेशीं. १६ वैवर्ण्य=फिकटपणा. § आलस्याणि=आलस्य+आणि.

### उदाहरण.

राधा निकुंजवनिं त्या हरिला न पाहे । संतापअग्नि तिचिये तनुलागिं दाहे ॥
ते मंदपांडु नयनांतुनि अश्रु वाहे । श्वास प्रकंप अधरीं बहु दुःख साहे ॥ २८ ॥

### मोहलक्षण.

मोह भयानें होतो आवेगानें हि चिन्ह हे त्याचें ॥
पतनं स्तंभ विघूर्णन विस्मरणादर्शनादि कवि वाचे ॥ २९ ॥

### उदाहरण.

मोहिनीसि असुरेंद्र पाहुनी । मोहिले सकळ यापरी मनीं ॥
स्तब्ध होति पडती किती किती । ते सुधा विसरती विघूर्णती ॥ ३० ॥

### स्मृतिलक्षण.

अवलोकित नेत्रानें पूर्वी त्याचें चि चिंतनें स्मृति हो ॥
तीचें चिन्ह भ्रुकुटी उचलुनि अवलोकनादि चाले हो ॥ ३१ ॥

### उदाहरण.

वेणी हे भ्रमरापरी कुरळ कीं मोरापरी बोलणें ।
गोरा रंग तयांत कांति झमके हंसापरी चालणें ॥
वक्त्रेंदूवरि गोंधणें चमकती तेणे मला वाटते ।
ती राधा चि असेल कुंदरदना जी मानसीं दाटते ॥ ३२ ॥

### धृतिलक्षण.

ज्ञानें शक्तिभरें अणि प्रियलाभें होय ते धृति तीचें ॥
चिन्ह स्वस्थपणें बहु भोगादिक जाणिजे सुरीतीचें ॥ ३३ ॥

### उदाहरण.

स्वजनविरहझाला राज्य गेलें वनांतीं ।
वसति करितसे कीं कंद भक्षी दिनांतीं ॥
हिमजलपवनातें आणि उष्णासि सोसी ।
परि न करि कशाची धर्मसूनू असोसी ॥ ३४ ॥

### व्रीडालक्षण.

दुष्टाचारापासुनि होती व्रीडा तिचे हि चिन्ह असें ॥
मुखनयनप्रछादन मस्तकमनादि जाणिजे सरसें ॥ ३५ ॥

### उदाहरण.

निकुंजवनिं जाउनी हरिसि आण गे मंदिरीं ।
असें वचन ऐकुनी त्वरित गेलि ती सुंदरी ॥

---

१७ सुधा=अमृत. १८ रदन=दांत. १९ व्रीडा=लाज.

स्वयें हरिसि भोगुनी सुरतचिन्ह झांकावया ।
सुवेष बहुसा वरी फिरुनि मंदिरीं जावया ॥ ३६ ॥

### चपलता लक्षण.

मात्सर्यें द्वेषानें प्रीतीनें चपलतेचि हो वृद्धी ॥
चिन्ह कठुर वाणी अणि ताडन रिपुदर्शनादिचीं शुद्धी ॥ ३७ ॥

### उदाहरण.

विद्यापरीक्षार्थ सभासदांनीं । तो कर्ण तो अर्जुन चापपाणी ॥
पाचारिले पूर्व परास पाहे । द्वेषें बहू त्याप्रति मारिताहे ॥ ३८ ॥

### हर्षलक्षण.

प्रियदर्शनसुतजन्में होत असे हर्ष चिन्ह हें त्याचें ॥
स्वरभेद घाम अश्रू आणिक ही जाण अंग रोमांचे ॥ ३९ ॥

### उदाहरण.

गोकुळांत हरि जन्मला असें । ऐकतां व्रजप हर्षला असे ॥
काय अद्भुत समस्त देव ही । गद्गदां वदति गाति नांव ही ॥ ४० ॥

### आवेगलक्षण.

प्रियवस्तूचे श्रवणें शत्रूचे दर्शनें चि आवेग ॥
चिन्ह त्वराणि* पडणें विपरीताचरण जाण हा भोग ॥ ४१ ॥

### उदाहरण.

मथुरानगरींत कृष्ण आला । श्रवणीं हें पडतां चि लोक पाला ॥
अति सत्वरया पहावयाला । निघती कीं विपरीत भाव झाला ॥ ४२ ॥

### जडतालक्षण.

इष्टानिष्टविलोकनयोगें ती होय जाणिजे जडता ॥
चिन्ह अभाषण आणी अवलोकन एकतंत्र निश्चलता ॥ ४३ ॥

### उदाहरण.

पाहूनि मल्ल अति दुष्ट कठोर अंगीं । श्रीकृष्ण बाळ आणि कोमळ अंग रंगीं ॥
ते पौरे[२०] लोक अणि त्या लैलना[२१] समस्त। चित्रांत जेंवि लिहिले कि तसे चि सुस्त ॥ ४४॥

### गर्वलक्षण.

लावण्यबंधुसंपत्तिबळानें गर्व तो असे ॥
अवज्ञा उपहासाणि† अंगालोकन ही दिसे ॥ ४५ ॥

---

२० पौर=नगरवासी लोक. २१ ललना=स्त्रिया. * त्वराणि=त्वरा+आणि. † उपहासाणि=उपहास+आणि

ग्रंथ संग्रहालय

### उदाहरण.

ज्यां जिंकिले सुरपती ललना सुरांच्या । माझेवरि मुदितें आणि महीधरांच्या ॥
नाना निकुंजवनभूमि विदेहकन्ये । भोगीं मला कवण राम दरिद्र धन्ये ॥ ४६ ॥

### विषादलक्षण.

अपराध धावनादिक धनगमनादिक विषाद कारण तें ॥
चिन्ह सहायान्वेषण मुखशोषण वैमनस्य आदिमतें ॥ ४७ ॥

### उदाहरण.

लगबग करुनी वनांत आली । न दिसत कृष्ण म्हणोनि खिन्न झाली ॥
मग सहचरिलागिं शोधु पाहे । मुखकमळास बहूत शुष्कताहे ॥ ४८ ॥

### औत्सुक्यलक्षण.

प्रियस्मरणसंयोगें होतें औत्सुक्य चिन्ह हीं ॥
तंद्रा आणि शरीराचें जाडेपण हि होतहे ॥ ४९ ॥

### उदाहरण.

अर्भीवांचुनि पाक तो करितसे ऐसेंचि एणेक्षणी ।
ऐकूनी दमयंति उत्सुक असे ऐसेपरी कामिनी ॥
नेत्रानें कवणास पाहतसे चाले न थोडें तरी ।
केव्हां पाहिन राजहंस नल तो ऐसें मनीं ते धरी ॥ ५० ॥

### निद्रालक्षण.

आलस्यश्रमचिंतास्वभावयोगें चि होतसे निद्रा ॥
भ्रूनेत्रचलन आणी कडफेरन स्वप्न चिन्ह हे तंद्रा ॥ ५१ ॥

### उदाहरण.

रतिश्रमें निद्रित राधिकेचे । स्वप्नीं दिसे कौतुक तें चि साचें ॥
म्हणूनि सांगे सखिलागिं जागे । होऊनि हें अद्भुत काय कांगे ॥ ५२ ॥

### अपस्मारलक्षण.

अपवित्रतादिकानें होय अपस्मार चिन्ह त्यास असें ॥
देहास कंप लाळ हि फेंसादिक जाण या परी बहुसें ॥ ५३ ॥

### उदाहरण.

बृहन्नळेचें सुपवित्र चाप । स्पर्शी करें उत्तर त्या सकंप ॥
झाला अणी फेंस वमीतसे कीं । पडे धरित्री वरि धाप टाकी ॥ ५४ ॥

---

२२ मुदित=आनंदित. २३ विषाद=दु:ख २४ अन्वेषण=शोध करणें. २५ एणेक्षणी=हरिणासारखे डोळे आहेतजीचे. २६ अपस्मार=फेंपरें.

### सुप्तलक्षण.

निद्रेपासुनि होतें सुप्त तयालागिं चिन्ह जाण असें ॥
श्वासोच्छ्वास अभाषण लोचनमीलॅन हि घट्ट फार असे ॥ ५५ ॥

### उदाहरण.

कुंजामधें पल्लवमंचकीं तो ॥ लावूनि डोळे हरि झोंप घेतो ॥
त्या गोपिका येउनि अंगुळीनें ॥ जागें करूं पाहति त्या रितीनें ॥ ५६ ॥

### विबोध लक्षण.

निद्राविच्छेदानें विबोधॅ होतो तयास चिन्ह असें ॥
जृंभा अगुलिमोटन नेत्रां चोळणें शरीर मोड दिसें ॥ ५७ ॥

### उदाहरण.

डोळे चोळीत बाळी मृदुल करतळीं त्या उषःकाळिं चोळी ॥
काळीं वक्षस्थळीं जी लगबगित वळी आंवळी आणि बाळी ॥
नांभाळी देत खोलींतुनि निघत जळीं श्यांवळी वक्त्र भोळी ॥
भोळी अंगास कौळी कडकडित सळीं अंगुळी जेंवि चोळी ॥ ५८ ॥

### अमर्षलक्षण.

अपमानें आक्षेपें होय अॅमर्ष हि तयास चिन्ह असे ॥
घाम हि लाली नेत्रीं आणी मस्तक हि कांपणें चि दिसे ॥ ५९ ॥

### उदाहरण.

सभेमधें शूरजनासमीप । हा कर्ण हो अधॅरथी प्रलाप ॥
ऐकूनि ऐसा मग शांतनूजा । पाहे चि रक्तेक्षण कर्ण तेजा ॥ ६० ॥

### अवहित्थलक्षण.

लज्जाधृष्टपणानें कौटिल्यगौरवें चि अॅवहित्थ ॥
चिन्ह तया आकृतिचें संगोपन यापरि असे सार्थ ॥ ६१ ॥

### उदाहरण.

गेला बिभीषण हि सैन्य समग्र मेलें । तो कुंभकर्ण आणि पुत्र हि ते निमाले ॥
दुःखाकृती लपवुनी अशि रावणानें । केली सुवर्णमणिपेटि करांत त्यानें ॥ ६२ ॥

### उग्रतालक्षण.

अपराधदोषकीर्तनचौर्यादीनें चि उग्रता होते ॥
तीचें चिन्ह असें कीं तॅर्जन अणि ताडनादि जाणावें ॥ ६३ ॥

### उदाहरण.

लोणी दहीं चोरुनि कृष्ण आला । म्हणूनि जीला बहु राग आला ॥

---

२७ मीलन=मिटणें. २८ विबोध=जागृण, जागें होणें. २९ अमर्ष=राग ३० अवहित्थ=झांकणें. ३१ तर्जन=दहशत.

काठी यशोदा करिं घेवुनीयां । मारी बहू भीति हि दाववी या ॥ ६४ ॥

### मतिलक्षण.

बहुशास्त्रचिन्तनानें होते मति चिन्ह तीस हे जाणा ॥
करचालन चातुर्य भ्रूचालन धर्म सांगणें माना ॥ ६५ ॥

### उदाहरण.

कांहीं न ध्यावें कवणा जनाचें । बोलू नये लौकिक वर्म वाचे ॥
त्या श्रीपतीच्या चरणा भजावें । हळू भवाब्धीस तरूनि जावें ॥ ६६ ॥

### व्याधिलक्षण.

धातुविकारें मदनें क्लेशें व्याधी तयास चिन्ह असें ॥
देहोपद्रवकंपादिक अणि कार्श्यादि या परी बहुसें ॥ ॥ ६७ ॥

### उदाहरण.

खोखोखो बहु खोकले तडफडे कांपे थरारां बहू ।
बोले गद्गद वाणि कीं हरि हरी हें दुःख कैसें सहूं ॥
आणी मस्तक दूखतें झिरपतें हें नाक ऐसे परी ।
तापे तप्त तनू निजे स्थविर तो खाटेवरी अतरीं ॥ ६८ ॥

### उन्मादलक्षण.

प्रियविरहाणि* पराभवभ्रांतीनें होतसे उन्माद ॥
चिन्ह वृथा भाषण अणि वृथा हसित अणि वृथैव हा रोध ॥ ६९ ॥

### उदाहरण.

कांताचे विरहें रडूनि तरुणी त्या मंचकीं नीजली ॥
पाहे त्या सखिलागिं पूसत असे कां गें जळें भीजली ॥
ऐसे सांधित चंद्र पाहुनि म्हणे कां सूर्य हा तापतो ॥
वारा घालु गडे मला बहुत हा देतो कि संताप तो ॥ ७० ॥

### मरणलक्षण.

प्राणोत्क्रमें होय मृत्यु तया चिन्ह असें असे ॥
डोळ्यांचें फाडणें आणी अंगा आपटणें दिसे ॥ ७१ ॥

### उदाहरण.

त्या पूतनेचा स्तन श्रीहरीनें । पीतां चि मेली हरिचे भरानें ॥
फाडूनि डोळे हि विकीर्ण-केशी । पडे धरित्रीवरि त्या प्रदेशीं ॥ ७२ ॥

---

३१ व्याधि=रोग. ३३ कार्श्य=रोडकेपणा. ३४ स्थविर=म्हातारा ३५ उन्माद=वेड.
* विरहाणि=विरह+आणि.

### त्रासलक्षण.

श्रवणें घोर ध्वनिचे घोराचे दर्शनें असे त्रास[16] ॥
चिन्ह स्तंभ स्वेद स्वरभंगाणि‡ गाणि प्रकंप कसकास ॥ ७३ ॥

### उदाहरण.

गोवर्धनाचे शिखरीं सुखानें । चारूनि गाई अणि वासुरां ने ॥
तत्काल मेघध्वनि ऐकुनींया । तो घेतलासे पळ काढुनीया ॥ ७४ ॥

### वितर्कलक्षण.

साधकबाधकयोगें विचार जो तो वितर्क जाणावा ॥
चिन्ह शिरःकंपादिक अश्रू चाचल्यभाव बाणावा ॥ ७५ ॥

### उदाहरण.

कातेचें मुख पाहुनी तरूण तो पद्मास तर्कि मनीं ॥
तीचे नेत्र विलोकितां चपल ते हे भृग होती क्षणीं ॥
पाहूनी मृदु कठनाळ मग तो सौरभ्य[17] लाभावया ॥
घेतो गंध अणीक मान हलवी सौंदर्य पाहावया ॥ ७६ ॥

असे व्यभिचारी भाव झाले. याचा व्यभिचार कसा तो लिहितों. शृंगारात भेद दोन. एक संभोग आणि दुसरा विप्रलंभ. संभोगांत आलस्य, औग्य, जुगुप्सा, वज्राघात. विप्रलंभात शंका, असूया, ग्लानि, व्याधि, स्मृति, धृति, चिंता, औत्सुक्य चापल्य, व्रीडा, हर्ष, उन्माद, जडता, मद, विषाद, अवहित्थ, सुप्त. हास्यांत-श्रम, चपलता, ग्लानि, शंका, अवहित्थ, सुप्त, प्रबोध, निद्रा, असूया, आलस्य; करूणात चिंता, ग्लानि, निर्वेद, जाड्य, उन्माद, दैन्य, विषाद, मोह, आलस्य, व्याधि; रौद्रात असूया, उग्रत्व, स्मृति, आवेग, अमर्ष, चापल्य, गर्व, मद; वीरात अमर्ष, मति, धृति, गर्व, उग्रत्व, हर्ष, असूया, मद, वितर्क, आवेग; भयानकांत दैन्य, मोह, अपस्मार, मृति, आवेग, चपलता, शंका, त्रास; बीभत्सांत मति, विषाद, अपस्मार, मोह, आवेग, जाड्य, धैर्य, मोह; शांतांत स्मृति, मति हर्ष, उन्माद; आणि स्थायीभाव ही व्यभिचारी होतात ते लिहितों; शृंगारांत हास, रति म्हणजे प्रीति ती शांत करूण हास्यात; भय आणि शोक हे करूण आणि शृंगारात; क्रोध वीरांत; जुगुप्सा भयानकांत; उत्साह आणि विस्मय सर्व रसात; आणि सात्विकभाव जे पूर्वी सांगितले स्तंभादिक ते ही सर्व रसांत असतात; आणि जसजसे व्यभिचारी भाव रसास अनुकूल होतील ते ही विचार करून बसवावे; आणि शृंगारांत दहा अवस्था होतात त्या अशा की अभिलाष ( इच्छा ) १ स्मृति ( स्मरण ) २ चिंता ( ध्यान ) ३ निधन ( मरण ) ४

---

१६ त्रास=भीति. ‡ स्वरभंगाणि=स्वरभंग+आणि. १७ सौरभ्य=सुगंध.

गुणकीर्तन ५, व्याधि ६, प्रलाप ( बडबडणें ) ७, उन्माद ( अविचारकर्म ) ८, जडता ( जाड्य ) ९, उद्वेग ( निर्वेद ) १० ह्या ही अवस्था निरूपित व्यभिचारी भावात च जाणाव्या; यांची उदाहरणे येथें आणि रसमंजरींत आहेत. आतां स्थायीभाव सांगतों त्यांत,

### सर्व स्थायीभावांचें सामान्य लक्षण.

अनुभावविभावाणी§ व्यभिचारी भाव मिळुनि हे सकळ ॥
उपजविती ज्यातें तो चित्तस्थ स्थायिभाव रस विकळ ॥ ७७ ॥

### रतिलक्षण.

प्रियवस्तुदर्शनानें स्मरणें श्रवणें तयाचि इच्छा जी ॥
तज्जनितचित्तविकृती ती च अपरिपूर्ण रति असे गा जी ॥ ७८ ॥

### उदाहरण.

सखि नयनकटाक्षें अंकुरे बोलण्यानें । किसलयित विराजे पुष्पिता हांसण्यानें ॥
शशिमुखि तव अगस्पर्शयोगें फळो हा । नवमदनतरू कीं तापवायू पळो हा ॥ ७९ ॥
येथें फळो या शब्दानें अपूर्णता ॥

### हासलक्षण.

कौतुकनिमित्त जें कीं वेषवचनभेद भलतसे होणें
तेणें मनास होते विकृती आपरिपूर्ण हास हें जाणें ॥ ८० ॥

### उदाहरण.

फेंडा हालवितो उरास बघतो जो वांकडें चालतो ॥
नेत्रें चाळवितो हसूनि पळतो जो हें गडे बोलतो ॥
ऐसा मद्यप वेषधारक हरी पाहूनि गोपांगना ।
कांहीं एक हसूनि शेव शिरिंचा घेती कि आलिंगना ॥ ८१ ॥
एथें कांहीं एक शब्दानें अपरिपूर्णता ॥

### शोकलक्षण.

प्रियवस्तूचे नाशें मनास जो कीं विकार होत असे ॥
जो अपरिपूर्ण असता शोक म्हणावा कवींद्रवाक्य असें ॥ ८२ ॥

### उदाहरण.

मस्तकिं घालिते निजकरें वक्षस्थळा ठोकिते ।
मूर्च्छेनें पडते क्षणोक्षणिं पतिप्राणास ही शोकिते ॥
वाळीचे मरणीं विलोकुनि असा तारासमारंभ तो ।
केला अश्रुनि राघवेंद्रनयनीं येण्यास आरंभ तो ॥ ८३ ॥

§ विभावाणी=विभाव+आणि.

येथें आरंभ तो या शब्दानें अपूर्णता.

### क्रोधलक्षण.

अपुले अपमानानें अपराधानें मनास जी विकृती[38] ॥
ती अपरिपूर्ण जाणा क्रोध असे म्हणति जे कवींद्र कृती ॥ ८४ ॥

### उदाहरण.

यावच्छुंभ निशुंभ चंड आणि त्या मुंडादिरक्त भल्या ।
माझ्या योगिनि भैरवादिक चमू[39] संतृप्त ना जाहल्या ॥
तावत्काळ मदीय नेत्रकमळीं लाली पुरी येइना ।
किंचिन्निर्गतखड्ग[40] तोंवरि बरा म्यानांत[41] हा जाइना ॥ ८५ ॥
येथें पुरी येईना आणि किंचिन्निर्गतखड्ग या शब्दांनीं अपूर्णता.

### उत्साहलक्षण.

शौर्यदयादानांनीं विकार जो त्रिविध मानसीं विलसे ॥
वीरत्रयभेदानें अपूर्ण उत्साह तो चि जाण असे ॥ ८६ ॥

### युद्धवीरोत्साहाचें उदाहरण

सेना पाहुनि ती प्रचंड रिपुची शंखादिभेरीध्वनी[42] ।
ऐकूनी गजगंड[43]मंडित बरे उद्दंड युद्धांगणीं ॥
श्रीमद्राघव शत्रुखंडक असे दोर्दंड[44] लांबावुनी ।
दे दे दे कि म्हणे करीं झडकरी कोदंड[45] रे आणुनी ॥ ८७ ॥
येथें दे दे दे इत्यादि शब्दांनीं अपूर्णता.

### उदाहरण दयावीरोत्साहाचें.

कलियुगीं जन मंदमती असे । मग तया कशि मुक्ति मनीं असे ॥
करुनि चिंतन सत्यवतीसुतें[46] । निरखिले हरिभक्तिसुपूर्ण ते ॥ ८८ ॥
येथें निरखिले या शब्दानें अपूर्णता.

### उदाहरण दानवीराचें.

आदर्शार्थ शशांकमंडल दिलें दीपार्थ तो सूर्य ही ।
मेरु पर्वत तो गृहार्थ दिधला तैसे परी जी मही ॥
तीशीं तुल्य पदार्थ कोणि न दिला या ब्राह्मणालागिं हो ।
ऐसें मानुनि राम वारिधि[47]कडे पाहीं पहा लोक हो ॥ ८९ ॥
येथें वारिधिकडे पाही या शब्दानें अपूर्णता.

---

३८ विकृती=फेर, बदल. ३९ चमू=फौज. ४० खड्ग=तरवार ४१ म्यान=अर्थात तरवार ठेवतात तें वेष्टण. ४२ भेरी=नौबत. ४३ गंड=गाल. ४४ दोर्दंड=बाहुदंड. ४५ कोदंड=धनुष्य ४६ सत्यवतीसुत=व्यास. ४७ वारिधि=समुद्र

### भयाचें लक्षण.

मोठ्याचे अपराधें घोर ध्वनि घोर जीवदर्शन जें ॥
तेणें मनास होते विकृती भय हो अपूर्ण जाणविजे ॥ ९० ॥

### उदाहरण.

सत्राजिताजवळि जो मणि तो हिरावा । या हेतुनें वधुनि त्यास तिघें[३८] धरावा ॥
ऐशांत पाहुनि हरी बहु क्षुब्ध त्याहीं । केली पलायनमती लघु समर्त्यांहीं ॥ ९१ ॥
येथें केली या शब्दें अपूर्णता.

### जुगुप्सालक्षण.

अप्रिय वस्तूचें जें दर्शन तैशी स्मृती अणि स्पर्श ॥
होते मनास विकृती तीच जुगुप्सा अपूर्ण संदर्शे ॥ ९२ ॥

### उदाहरण.

त्या इंद्रकीलशिखरीं खरि अर्जुनाला । व्याघ्रें विदारितमृगाद्यवलोकनाला ॥
व्हावी मती न परि दुःखितमानसाला । दुःखाविषीं मति न होत किं मानसाला ॥ ९३ ॥
येथें न व्हावी परंतु झाली या अर्थानें अपूर्णता.

### विस्मयलक्षण.

स्मरण स्पर्शन दर्शन सुचमत्कृतवस्तुचे चि जें होतें ॥
तेणें मनास विकृती अपूर्ण विस्मय सुनाम ती वहते ॥ ९४ ॥

### उदाहरण.

नर करि बहु युद्ध तें विलोकी । अमरगणप्रभु विस्मित स्वलोकीं ॥
परि रविसुत वीर्य पाहुनीयां । हरि न च मनि बहु रणांगणीं या ॥ ९५ ॥
येथें न बहु मानी या शब्दें अपूर्णता.

येथें असें जाणावें कीं शांतरसाचा स्थायीभाव निर्वेद. त्यांचीं लक्षणें आणि उदाहरणें ३३ तेहतीस. व्यभिचारिभावनिरूपणप्रसंगीं प्रथमतःच निरूपण. कारण कीं तो व्यभिचारी भावांत ही आहे म्हणून. तस्मात् त्याचें लक्षण आणि उदाहरण व्यभिचारी भावांत आधींच समजून घ्यावें म्हणजे संशय होणार नाहीं. आतां रस निरूपण करितों. त्यांत प्रथम सर्व रसाचें सामान्य लक्षण सांगतों.

### श्लोक.

विभावानुभावें आणि सात्विकानें । व्यभीचारियोगें हि जो स्थायिकानें ॥
समारंभ केला मनीं पूर्ण त्याला । म्हणे तो कवी जाणिजे या रसाला ॥ ९६ ॥

---

३८ तिघें=शतधन्वा, कृतवर्मा, अक्रूर.

### त्यांत प्रथम शृंगार लक्षण.

स्त्रीपुरुषांचा जो कीं प्रमोद अन्योन्य पूर्ण रतिभाव ॥
त्याला कविंनें दिधलें रस शृंगाराख्य हें चि शुभ नांव ॥ ९७ ॥
भेद तयाचे दोन चि संभोग हि विप्रलंभ जाणवि गा ॥
बाह्येंद्रियसंयोगें होतो आनंद त्यास संभोगा ॥ ९८ ॥
मनामिळणीचीं दोघे आहेत खरीं परंतु विघ्नानें ॥
इष्टप्राप्ति न झाली त्या लागीं विप्रलंभ कवि मानें ॥ ९९ ॥
त्या शृंगाररसाचें दैवत विष्णू कि रंग ही श्याम ॥
म्हणुनी सकळ रसाचा मुगुटमणी पूर्ववर्णि सुखधाम ॥ १०० ॥

### संभोगाचें उदाहरण.

एकांतीं मणिमंचकीं जलधिची कन्या हरी पाहुनी ।
बोले सद्गद वाणिनें स्मित मुखें ती ही जशी पाहुनी ॥
बोलेना चटुलोक्ति हांसिंचि विडी हातीं च ती राहिली ।
नीवी ढीलि करोनि वेपथुदशा ती मैत्रिणी जाहली ॥ १०१ ॥

### विप्रलंभाचें उदाहरण.

प्रतिमंदिरिं काननीं जरि । बहु लीलोचित वस्तु सुंदरी ॥
मिळवी तरि कांत नालिया । मग ती अग्निकणासि तोलिया ॥१०२॥

### हास्यरसाचें लक्षण.

परिपूर्ण हास होतो जो तो जाणा कि हास्यरस पुष्ट ।
रंग हि शुभ्र जयाचा ज्याचा अधिदेव चंद्र जनतुष्ट ॥ १०३ ॥

### हास्याचें उदाहरण.

चोरी शंकरमंदिरीं करुनिया ते चोर कीं चालिले ।
हातीं शूळ कपाळ घेउनि अणी धत्तूर ही घेतले ॥
मार्गीं तंदुलबुद्धिनें चि हसती ते खाउनी डोलती ।
गाती नाचति ते विलोकुनि बऱ्या स्वर्गांगना हांसती ॥ १०४ ॥

### करुणरसाचें लक्षण.

गत वस्तूची आशा नसतां जो पूर्ण शोक तो करुण ।
रंग कपोतविचित्रित ज्याचा अधिदेव तो असे वरुण ॥ १०५ ॥

### उदाहरण.

प्रतिवार्नि फिरणारा अश्रुतें टाकणारा ।
सम कमळबिसाशीं अंग त्या रामवीरा ॥

---

४९ चटुल=चंचल. ५० वेपथु=कांपरें. ५१ विप्रलंभ=वियोग.

निरखुनि दिन उष्णें ताप चित्तीं धरी हो ।
भगण मिष करूनी रात्रि अश्रू झुरे हो ॥ १०६ ॥

### रौद्ररसाचें लक्षण.

उद्धत इंद्रिय सर्व हि ऐसा जो क्रोधपूर्ण तो रौद्र ॥
रंग हि लाल जयाचा ज्याचा अधिदेव तो असे रुद्र ॥ १०७ ॥

### उदाहरण.

फांसा हा सर्प चक्र प्रचुर रवि असे दंत भाले करीचे ।
तैसे हे वज्र नाना गिरिवर असता शस्त्र व्हावें कशाचें ॥
मी तों भीम प्रचंड प्रबल रणधनी दुष्ट दुर्योधनातें ।
संहारीं चंडबाहु प्रलयहुतवहे कोण जिंकील मातें ॥ १०८ ॥

### वीररसाचें लक्षण.

सर्वेंद्रियप्रहर्षप्रपूर्ण उत्साह तो चि रस वीर ।
युद्धदयादानानें त्रिविध सुरेंद्राधिदेव रुचि गौर ॥ १०९ ॥

### युद्धवीराचें उदाहरण.

संग्रामांगणिं रावणासि पहतां सौमित्र हासे मनीं ।
पाहे चंचळ मारुती करितसे सुग्रीव चिंता मनीं ॥
ऐसें सर्व परंतु त्या रघुविरें आनंद शृंगारिली ।
रोमांचाचित विग्रहें निज दशी कोदंडि संचारिली ॥ ११० ॥

### दयावीराचें उदाहरण.

राजा दिलीप गुरूची वनिं धेनु चारे । तीचेवरी चढुनि सिंह बहू डकारे ॥
हबा ध्वनी करुनि ते क्षणि हाक मारे । भूपें विलोकोनि दिलें निज अंग सारें ॥१११॥

### दानवीराचें उदाहरण.

येतां ब्राह्मण मंदिरीं जरि हरी दुग्धार्थ दुग्धाबुधी ।
क्षारार्थी लवणाबुधी अणि तसा इक्ष्वर्थ इक्षवबुधी ॥
दाता देइल हा तरी विरह मी कैसा सहूं या भयें ।
ज्याचे पाय न सोडि जान्हवि तया रामासि वंदूं धियें ॥ ११२ ॥

### भयानकाचें लक्षण.

सर्वेंद्रियविक्षोभप्रपूर्ण भय तो भयानक सुनाम ॥
प्रेतपती अधिदैवत ज्याचा तो रंग जाणिजे श्याम ॥ ११३ ॥

### उदाहरण.

राहूचें मुख पाहतां बहु भयें तो बाल सीतद्युती ॥

---

५२ हुतवह=विस्तव. ५३ रुचि=रंग. ५४ प्रेतपती=यम. ५५ सीतद्युती=चंद्र.

गंगेचे आंठि बूडतो अणि जटाजूटीं भ्रमे त्या रिती ॥
शंभूचे नयनाग्निनें जळतसे भोगी[56] फणातीं लपे ॥
कानीं होउनि कूबडा घुसु ह्मणे भीती अशी त्या खुपे ॥ ११४ ॥

### बीभत्साचें लक्षण.

सर्वेंद्रियसंकोचित पूर्ण जुगुप्सा[57] चि होय बीभत्स[58] ॥
रंग जया नील असे देव महाकाल जात निर्भत्से ॥ ११५ ॥

### उदाहरण

सच्छिन्न नाक अणि कान हि रक्तधारा । पाहूनि शूर्पणखिचे मनुजेंद्रवीरा ॥
आले कि कंटक थुके अणि दूर जाये । नेत्रासि फीरवि कसा अणि कस्कसा ये ॥ ११६ ॥

### अद्भुतरसाचें लक्षण.

जो कीं प्रपूर्ण विस्मय तो अद्भुत रस रसाळ लोकांहीं ॥
जाणावा पिवळा अणि ब्रह्मा अधिदेव अस्तशोकांहीं ॥ ११७ ॥

### उदाहरण.

लीलेकरूनि जलधीवरि सेतु बांधी । जो रावणास सहजांत रणात रोधी ॥
आलिंगनें जनकराजसुकन्यकेचे । तो राम धन्य गणितो अपणास साचें ॥ ११८ ॥

### शांतरसाचें लक्षण.

संसारदोषरहित प्रपूर्ण निर्वेद जाण रस शांत ॥
नीरंग रंग भासे आत्मा अधिदेव जाणिजे तात ॥ ११९ ॥

### उदाहरण.

उद्धारिले पितर जान्हविचे जळानें । पुत्रासि राज्य दिधलें कि भगीरथानें ॥
उन्मत्त बाळक पिशाच्यसुवेषधारी । नासाग्रदृष्टि मन ब्रह्मपदीं च धारी ॥ १२० ॥

असे नव रस झाले. आतां शृंगाररसांत हाव दहा असतात ते ही सांगतो.

स्त्रीचे स्वाभाविक जे होती शृंगारचेष्टितें हाव ॥
त्यांचें लक्षण आणी उदाहरण सांगतों तसें नाव ॥ १२१ ॥

### लीलालक्षण.

पतिभुषणाचें जें स्त्री सादृश्य करी तया लीला ॥
सखिकौतुकें चि होते प्रिय परिहासार्थ जाण बाणीला ॥ १२२ ॥

### उदाहरण.

जाणूनी रविअस्तसंधि सखिची मानूनि ती कौतुकें ॥
वंशीचा रव शांचिका करितसे तैसा कधीं ना चुके ॥

---

५६ भोगी=साप. ५७ जुगुप्सा=निंदा. ५८ बीभत्स=किळस आणणारा.

त्या सर्धीत मुकुंद सुदर बहु क्रोधावला धांवला ।
अन्या शंकित कुंजि पाहुनि तिला स्मेरावलारावला ॥ १२३ ॥

### विलासलक्षण.

प्रियदर्शनस्मरणानें गमनवदननेत्र आणि भ्रुकुटीचे ॥
जे किं विशेष विलास प्रीतिप्रकटादि चिन्ह सुकटीचें ॥ १२४ ॥

### उदाहरण.

बोले शंकितिकांचिचंचलतनू भ्रूवल्लि त्या नाचती ।
ग्रीवा वांकलि कीं वलित्रय दिसे तीं कुंडलें चमकती ॥
ऐसे रीति वदोनि अंबुजमुखी टाकी जयाचेवरी ।
वक्रा दृष्टि सुचचल प्रिय करी तो शक्रराज्यावरी ॥ १२५ ॥

### विच्छित्तिलक्षण.

सौंदर्यक्रोधानें क्लेशें ऐश्वर्यसौकुमार्यानीं ॥
टाकी भूषण नारी ती विच्छित्ति च फळेल गर्व मनीं ॥ १२६ ॥

### उदाहरण.

मंजीरें न पदीं करीं न कटकें माला नसे ती शिरीं ।
कस्तुरी तिलकें चि कांति झमके लावण्यसिंधूवरी ॥
तस्मात्यापरि जाणुं कीं विधि लिही सर्वांपरी गौरवें ।
किंवा काम नृपें चि मस्तकिं दिली ती मुद्रिका मीरवे ॥ १२७ ॥

### विभ्रमलक्षण.

मदउत्कंठाप्रीतीयोगें वचनांत भूषणांत हि जो ॥
पालट तो विभ्रम त्या चिन्ह प्रीय सहचारि हासते जो ॥ १२८ ॥

### उदाहरण.

क्रीडेचे अंतिं लक्ष्मी गलित वसन तें घ्यावया श्रीहरीचे ।
नेसूनी पीत वस्त्रा चमकत सदनांतूनि नानापरीचे ॥
हांसे बाहेर चाले हरिन निरखितां क्रोध नेत्रें चि दावी ।
बोले जो कौतुकानें स्मितमुख सुख तो देत संसार दावी ॥ १२९ ॥

### किलकिंचितलक्षण.

नवयौवनउदयानें चाचल्यें होतसे किं संकर जो ॥
श्रमभयकोपेच्छेचा तें किलकिंचित अकार्य निश्चय जो ॥ १३० ॥

### उदाहरण.

धनुष्य तें उग्र दिसे किलाली । आली अलीला कमलांत लाली ॥
सुधारसें दृष्टिचि कप मानी । मेल्हसि ये घाम किमर्थ मानीं ॥ १३१ ॥

### मोट्टायितलक्षण.

सवतीचे लोकांचे त्रासें लज्जेकरूनि होते जे ॥
गोष्टि न वदता दर्शन इच्छा मोट्टायित प्रेम मनीं जें ॥ १३२ ॥

### उदाहरण.

ने कीं स्नेह कथा परतु गळलें तें रत्न घ्यावें असें ।
दावूनी मिष त्या सैपत्निसि घरा बाहेर झाली असे ॥
नेत्रे चाळवि वस्त्र हालवि कुचद्वंद्वास ही दाखवी ।
खेदें भीजवि हात कृष्णनिकटीं राधा रसा चाखवी ॥ १३३ ॥

### कुट्टमितलक्षण.

दशनक्षतादिकानें असतां सुख दुःख स्वरादि जे भाव ॥
कपटें सीत्कारादिक चिन्ह जया त्यास कुट्टमित नांव ॥ १३४ ॥

### उदाहरण.

करें चि अवरोधितां अचल अंगुली भासली ।
भ्रुवें कुटिल पाहतां दशि हि अंतरिं हासली ॥
मिठी दृढ करें पती न पद अर्ध वल्कीलसे ।
अकंप शिरिं कामिनी मुख समोर त्याचे असे ॥ १३५ ॥

### बिव्वोकलक्षण.

तारुण्यादिमदानें जो आनादर तयासि बिव्वोक ॥
म्हणति तया चिन्ह असे दुर्वच दुःप्रेक्षणादि अविवेक ॥ १३६ ॥

### उदाहरण.

जोडूनि हात भयभीत पती समोरी । आला परी न च विलोकि तयास नारी ॥
त्या कीं सखी वदनिं कुंडल रत्नरेषा । पाहावयास मनिं इच्छितसे सुवेषा॥ १३७॥

### ललितलक्षण.

चित्तप्रसादधैर्ये प्रियअनुरागें चि कामिनी करिते ॥
सर्वांगिं सुवेषादि ललित चिन्ह पतीवशीकरण वरिते ॥ १३८ ॥

### उदाहरण.

असे क्वणत कांचिला चपलता अणी कुंडला ।
प्रमोद मुखमण्डला चपलता अणी कुण्डला ॥
तनू पुलक आंवरी अधर बोलणें सांवरी ।
अशी हंसत सुंदरी चपल चालली मंदिरीं ॥ १३९ ॥

---

५९ सपत्नी=सवत. ६० क्वणत=झुमझुम वाजणारा. ६१ कांची=कमरपट्टा ६२ पुलक=कांटा

## विव्हतलक्षण.

लज्जेनें कपटानें जे प्रियसन्निध मनोरथापूर्ती ॥
ते जाण विव्हति चिन्ह हि विपरीताचरण सघटत जूर्ती ॥ १४० ॥

## उदाहरण.

तिलक शिरिं लिहावे शंकरानें शिवेच्या ।
तंव मन धरि कांपा या परी जाण वाचा ॥
अहिपतिभययोगें अंग तें कांपवूनी ।
विझविर तिदिव्याला वस्त्रवातें भवानी ॥ १४१ ॥

असे विभाव, अनुभाव, सात्विकभाव, व्यभिचारीभाव, स्थायीभाव, नवरस, हाव लक्षणां समेत उदाहरणां सह झाले. येथें जो सशय पडेल तो या ग्रथाचे परिभाषेत आणि प्रक्रियेत दूर होईल. आतां ग्रंथकार पितामातागुरुनामकीर्तनपुरःसर आपलें नांव संप्रदायानुरोधें करून लिहितो.

ज्याचा विठ्ठल तात पडित जनें सन्मानिला पूजिला ।
माता रुक्मिणि विश्वनाथ गुरु तो ज्यानें चि संराजिला ॥
दाजी बुद्धि विनंतिनें चि रसकल्लोलाख्य जो ग्रथ कीं ।
बोले तो ललिताबिकापद नमी गंगाधर स्वार्थकी ॥ १४२ ॥

इति श्रीमल्ललितांबिकाचरणसरोजभ्रमरायमानश्रीरुक्मिणीवल्लभसूरिसूनु विश्वनाथ-सूरिवर्यशिष्यश्रीमद्बुद्धीकुलालंकारचूडामणीधनिकजनगणभासमानचंद्रायितगुणिजन-कामपूरककल्पवृक्षायित श्रीदाजीबाबुट्युद्योचित श्रीगंगाधरकविविरचितोरसकल्लोलना-मा ग्रथः समाप्तिमगमत् ॥

---

६३ अहि=सर्प ६४ सूरि=विद्वान्. ६५ सूनु=पुत्र.

## गजगौरीव्रतांतील पाठभेद.

मागें पृष्ठ ८८ पासून पृष्ठ ९६ पर्यंत गजगौरीव्रतप्रकरण छापलें आहे त्यांत आढळलेले पाठभेद व अधिक पद्यें:—

श्लोक ५ चरण २ व ३

विलोकोनी सूती शकुनिसुतदुर्योधनमनां
सदां ते पार्थांचा त्रिजन करिती द्वेष हृदयीं

श्लोक ९ चरण ४.

तळीं चक्रें त्यासी चतुर फिरवीतां फिरतसे

श्लोक ९ यापुढें अधिक श्लोक.

बसोनी गांधारी सकळ सुत ते ओढिति करें ।
पुढें नाना वाद्यें घनस्वर नफेर्यादिक तुरें ॥
उभारोनी पाणी अगणित मुखी भाट स्तविती ।
अशी कुंती गेहाप्रति निरखुनीं ये सुतवती ॥

श्लोक १२ चरण २.

फिरे जों तों दुर्योधन कुमतिनें वाक्य वदलां

श्लोक १३ चरण १ व ३

ऐकोनी कटु वाक्य त्या कुमतिचें कुंती मनीं खोंचली
जैशी त्या पियुषांतरीं वमुनियां व्याळें गरा टाकिली

श्लोक १९ चरण १

तूं गौरीगजवोवसा निजसुखें आतां चि माते करीं.

श्लोक २५ या पुढें अधिक श्लोक

गौरीकरीं हें व्रत आचरावें । त्या मृत्तिकेच्या द्विरदा पुजावें
जन्मातरीं स्वर्गज पाविजेतो । त्यानंतरें उत्तर पार्थ देतो

श्लोक ३० चरण ३ व ४

त्या चारदंता उतरोनि सृष्टी । आणून मी दाविन तूज दृष्टीं

श्लोक ३४ चरण ३.

गडबडी तदा निर्जरीसभा.

श्लोक ३९ चरण २

सुरगजवर कुंती त्यावरीं इच्छिताहे

---

१. हे पाठभेद व पद्यें रा० रा० रामजी धोंडजी खांनोलकर महितपूर यांनीं पाठविलीं. २. सुत=अधिरथपुत्र कर्ण ३. त्रिजन=तिघेजण ( शकुनि, कर्ण, दुर्योधन ). ४ नफेरी=वाद्यविशेष. ५. तुरें=वाद्यें ६. पाणी=हात. ७. पीयुष=अमृत. ८ व्याळ=साप. ९. गरा=विष. १०. द्विरद=हत्ती.

सवाई—४७ चरण १ व ४

हा गजराजविराजित०

वाहुनि दूत म्हणे अमराधिप हास्तिस त्या कार्थि जा हरिदासा

चाल ५३ त्यापुढें अधिक पद्यें

बांधोनि बाणीं मग स्वर्गमार्ग तो । जाया जनाला पदवाट दावितो

हा येवढा विक्रम वैष्णवी असे । + + + + + भयभीत होतसे ॥

शक्रासि तो सद्गुरु वाक्य बोलिला । या नंतरे पाहिं विचार आपुला

मनुष्य हे येतिल सर्व निर्भयें । ओढोनि नेतील बळें सुरालयें[11] ॥

श्लोक ५४ चरण ३ व ४

त्या बाणपथे अमरावतीसी । जाऊनि बोले सुरनायकासी

श्लोक ५५ चरण ३

सांगे गुरु सेवक अर्जुनाचा

चाल ५७ चरण ३ व ४

बोले मुखें भीम महावतासी । रे चालवीं हा गज हस्तिनासी

श्लोक ५८ चरण १

महावतें तो चिकळोनि हस्ती

चामर ५९ चरण १ व २

धरोनि चार दंत चार पाय दोन हस्तकें ।

महीस पाडिला करींद्र तो *उतान कौतुकें ॥

चामर ६० चरण १

सभेसि भीम जाउनी म्हणे सुरेंद्र बैसणें

चामर ६१ चरण १, ३, ४

विडंबना विलोकुनी सुरेंद्र लाजला मनीं ।

विभूषणें मिं घालितों तुम्हां क्षणैक बैसिजे ॥

सुशोभितासि नेलिया तुम्हांसि श्लाघ्य जाणिजे ।

श्लोक ६२ च० १

चतुरदंत पदीं करिं भूषिला

श्लोक ६३

शरपथें इभपती[12] उतरे क्षिती । घणघणा अमित किंकिणि[13] वाजती

सकळिकां बहुत कौतुक वाटलें । निरखितां गज गजाहय लोटले

---

११ सुरालयें=देवांचीं घरें. १२. इभ=हत्ती. १३. किंकिणी=घंटा. * उतान=उताणा.

पद ६७ च्या पुढें अधिक श्लोक

सुरगज मग भीमें आणिला मंदिरासी ।
निरखुनि जननी ते तुष्टली सौख्यराशी ॥
करि सति निज भावें हस्तकें हस्तिपूजा ।
विविध कुसुममाळा घातल्या शीर्षिं वोजा ॥

श्लोक ६९ चरण २ व ४

अघटित करणी हे त्वत्सुतीं दाखवीली ।
उपजत करिगंडीं[१४] दारितो[१५] सिंहनामा.

श्लोक ७० चरण २

तव व्रत इह जन्मीं साङ्ग सिद्धीस गेलें.

पद ७२ पुढें श्लोक.

\+ + + + + + ।
\+ + + + + + ॥
सुरगज मग भीमें धाडिला इंद्रलोका ।
परिसुनि पडिलासे तक्षकालागिं धोका ॥

श्लोक ७६

हा गौरीगजवोवसा परियसा पुण्यांश घ्या फारसा ।
सेवाना अळसा कथामृतरसा एकाग्र चित्तीं वसा
काळाचा वळसा बहू भरंवसा मानूं नका मानसा
नोहे जन्म असा पुढें तरि कसा श्रीकृष्णपायीं वसा

समाप्त.

## आचार्यकृत मनीषापंचकाची समश्लोकी टीका[१६]

### उपोद्घात.

**चांडालरूपिणं०**

दृष्टीसूनि देहात्मवर्णा[१७] मग तो आचार्य बोले तया
दूरं गच्छ सदोष जाति निच तूं स्पर्शाधिकारी न या
चांडाळें यतिवाक्य ऐकुनि बरें प्रत्युत्तरें देतसे
ज्या वाक्यें चि समूळ भ्रांति निरसे आत्मा चि दाटे मुसे ॥ १ ॥

**अन्नमयादन्नमयमथवा०**

मीं तूं भेद देहावरि जरि घडे तो देह षट्कोशकें
पिंडब्रह्मांडादि समस्त घडला एकें चि पंचात्मकें

---

१४. करिगंड=हत्तीचें गंडस्थल १५. दारितो=फोडितो. १६ ही समश्लोकी टीका रा० रा० रामजी धोंडजी खानोलकर यांनी च पाठविली. १७. वर्ण=अंगाचा रंग, जात.

आत्मा व्यापक खंपरी घटमठीं चैतन्य साक्षी सदा
दोहींमाजि न भेद कां द्विजवरा गच्छेति दूरं वदा २

**किं गंगांबुनि०**

भानू हा सम साम्य बिंबत जळीं चांडाळकूपीं महा
गंगेमाजि तसा च कांचन[१८]घटीं मृत्कुंभि ही एक हा
नित्यानंद चिदब्धिं[१९] वेदक तसा जो निस्तरंग[२०] स्वयें
येथें भेद धमासि कारण नसे हा विप्र चांडाळ हें ३

## मनीषापंचक.

**जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु०**

जाग्रत्स्वप्नसुषुप्ति[२१]ज्ञान स्फुट त ज्याच्या प्रकाशें कळे
आब्रह्मादिपिपीलिकांत[२२] जग हें सूत्रें जया ओंविले
येथें मी तुं न तो विवर्त दुसरा हे स्थिर ज्याची मती
हो विप्रादि हि हो अनामिक[२३] तरी मातें गुरु निश्चिती १

**ब्रह्मैवाहमिदं०**

ब्रह्मैवाहमनंतरूप जग हें मद्रूपसत्ता स्फुरे
सत्तारश्मिं[२४] असत्य तोयं[२५] सवित्यां[२६] अगीं नसे हें खरें
मायाकल्पित कार्य[२७]कारणगुणाभासा अधिष्ठान[२८] मी
हे ज्याची दृढबुद्धि विप्रश्वपचो[२९] मानीं गुरुत्वेंच मी २

**शश्वन्नश्वरमेव०**

हेमीं हेमें[३०] अशे नगा[३१]कृति नसे भासे तरी ते चि ते
तेंवी विश्व अशील शाश्वत रुपीं नाहींपणें भासतें
ऐसा निश्चय देशिकोक्ति[३२] घडला जो नित्य शांतात्मना
ब्रह्माकार अखंड व्याज[३३]रहिता नाहीं दुजी वेदना[३४]
आतां भूतभविष्यकालकलना दुःस्वप्न चेता न ते
कर्मे संचित कामुकें प्रतिदिनीं वर्ते क्रियेमाण तें
जन्मादायक दुष्कृतें भयकरें भस्मोनि ज्ञानाग्निनें
प्रारब्धासि शरीर अर्पुनि स्थिरा माझी मती जाणणें ३

---

१८. कांचन=सोनें. १९ चिदब्धि=चैतन्य सागर. २०. निस्तरंग=ज्यांत लाटा नाहींत असा. २१. जाग्रत्स्वप्नसुषुप्ति=जागेपणा, स्वप्नावस्था, व निद्रा. २२. आब्रह्मादिपिपीलिकान्त=ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत २३. अनामिक=चांडाल २४. रश्मि=किरण २५. तोय=पाणी. २६. सविता=सूर्य. २७. कार्य=परिणाम २८. अधिष्ठान=स्थल, आसन, जागा २९. श्वपच=कुत्रा शिजवून खाणारा चांडाल ३०. हेम=सोनें. ३१. नग=दागिने. ३२ देशिक=गुरु. ३३. व्याज=कपट. ३४. वेदना=ज्ञान.

यत्सौख्यांबुधि०

ज्या सौख्यांबुधिलेश लाधुनि सुखें निर्वृत्त शक्रादया
जें पावोनि मुनि प्रशात सहजें उत्कर्ष चित्तीं जयां
ऐसा नित्यसुखाब्धि तें गलितधी मी ब्रह्मस्फूर्ती मुरे
कश्चित्सोपि सुरेंद्रवदिततनू मद्‌बुद्धि हे नीकरे ४

या तिर्यङ्नर०

या तिर्यङ्नरदेवयोनि स्फुट ज्या भोगी अहंता गुणें
ज्या भासे मन चक्षुदेहविषया स्फूर्ती सदा चैनने
दात्री अभ्र लपोनिया रवितसा आत्मा मुढां दुर्गम
योगी निर्वृत विप्र हो त्यज अरी देशीकें बुद्धी मम ५

### उपसंहार.

आचार्यें निगमान्ततत्व कथिलें अप्रांत निष्कर्ष जें
जें बुद्धीस नव्हे चि गम्य परते ज्या प्रत्ययी निर्बुजे
चांडालाकृति पालटोनि सरिसे आचार्य आलिंगिले
संवादीं नभ आटलें उभयता मीतूपणा मूकले ६

---

## वामनकृत बोध.

मुकुंदप्रतापा न जो गाढ वानी । तया निंदिलें नेणत्या गाढवांनीं
यमाच्या भटाची बसे लात त्याला । शिरीं पापरूपी च मेला तयाला ॥ १ ॥
सुमनसेज सद्‌द्रुव अंगना । बहुत मान्य जना अणि दे घना
सुत गाजता रमा सकळा कळा । मजसमान दुजा नच सोहळा ॥ २ ॥
निगमचिद्रस साधुमुखें मिळो । नवविधा भजनें ममता गळो
मरणजन्म समूळ मृषी टळो । स्वपद चिन्मय केवळ आतळो ॥ ३ ॥
वृथा हिंपुटी कासयालागिं होता । गृहीं आयता मोक्ष लाभे स्वहस्ता
वदे एक सांगों तशा साधनाला । मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळा ॥ ४ ॥
स्नुषा पांडुची द्रौपदी राजकन्या । मुखीं कृष्णनामें स्मरे लोकमान्या
सभेमाजि वस्त्रप्रदाता तियेला । मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळा ॥ ५ ॥
बुडो हे धरा कीं लया विश्व जावो । पडो काळ हस्तें शिरीं वज्रघावो

---

३५ शक्रादया=इंद्रादिक ३६. तिर्यङ्=पशु. ३७ देशीक=मार्गदीप ३२ पहा. ३८. निगमान्त=वेदाचा शेवटचा भाग ( उपनिषदें ). ३९ प्रत्यय=अनुभव, खातरी. ४०. या समश्लोकी टीकेचा कर्ता माहीत नाहीं

१. वानी=वर्णन करी. २. भट=शिपाई. ३. सुमन=फूल, ४. अंगना=स्त्री. ५. मृषा=खोटें.

विसंबे चि ना सर्वथा नाममाळा । मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळा ॥ ६ ॥
नका याग माडूं नका प्राण कोंडूं । नका द्रव्य दारा घरें भोग सोडूं
नका कष्टुनी पर्वताग्रीं तपाला । मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळा ॥ ७ ॥
वधू गौतमीची पतीशापडोहीं । बुडाली अयाची शिळारूप होई
पदीं उद्धरी जो विरिंच्यात्मजेला । मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळा ॥ ८ ॥
रघूनाथकाजीं झिजे देह ज्याचा । न त्या प्राप्त बोलों शके वेदवाचा
जटायू विमानीं मुखीं बैसवीला । मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळा ॥ ९ ॥
फळें भिल्लणी वेंचिता गान ओवी । जिभे गोड तें राघवालागिं ठेवी
तिच्या आवडीलागिं भक्षी भुकेला । मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळा ॥ १० ॥
प्रतापें जळीं नाम तारी शिळेतें । रणीं भीडता येश गोळांगुळातें
नसे ताप ज्याला रुचे नाममाळा । मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळा ॥ ११ ॥
असा निश्चयें वामनें या मनाला । सुखप्राप्तिलागीं असा बोध केला
म्हणूनी तुम्हां प्रार्थितों भाविकाला । मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळा ॥ १२ ॥

इति श्रीवामनबोध संपूर्ण.

---

## वामनकृत स्फुट श्लोक.

वदे शुकाचार्य परिक्षितीतें । कीं धन्य राया करिती क्षितीतें[10]
श्रीमूर्ति जे ब्रह्मसुखानुभूती । ती भोंवत्या खेळति त्या विभूती ॥ १ ॥
कलियुगीं जरि कृष्णकथारती । तरि नव्हे भवकटक धारती
जित चि मुक्ति तरी पदिं धारसी । जरि नरा रमशील कथारसीं ॥ २ ॥
रति धरा हरिची बहु तीव्र जी । हरि असे तुमचा मति ती व्रजीं
हरि रुचे स्मरतां बरवा मना । करि दया कनकांबर वामना ॥ ३ ॥

---

## अनंतसुत-मुद्गलकृत

# रुक्मिणी-स्वयंवर.[13]

केला प्रश्न परिक्षिती-क्षितिपती योगींद्र शूका प्रती ।
श्रीकृष्णें भिमकात्मजा-हरण हे केलें कथीजे स्थिती ॥
देखोनी दृतप्रश्न आदर मुखें बाले महा-कौतुकें ।
उल्हासें मग भूपती प्रति मुनी सांगे महाकौतुकें ॥ १ ॥

---

६. याग=यज्ञ. ७. गौतमाची वधू=अहल्या. ८. विरिंच्यात्मजा=ब्रह्मदेवाची कन्या. ९. गोळांगुल=वानर. १०. क्षिति=पृथ्वी ११. रति=आवड. १२ कनकांबर=पीतांबरधारी कृष्ण. १३ हे प्रकरण व याचे पूर्वींचे प्रकरण रा० रा० रामजी धोंडजी खानोलकर मेडिकल चार्ज नेटिव्ह स्टेट महिदपूर यांनीं पाठविलीं.

येवोनी नट नृत्य तो करि सभे श्रीकृष्णकीर्ती ठसा ।
ऐकोनी भिमकात्मजा लय धरी त्या श्रीहरी-डोळसा ॥
पाहे चंचळ विव्हळा बहु असें राजा विचारी मनीं ।
श्रीकृष्णा सगुणा दिली परम हे संकल्प केला मनीं ॥ ५ ॥
राजाचे वचनोत्तरें खवळला रुक्मा कुपुत्र कसा ।
कृष्णा गोवळ आत्मजासि भिमकी पित्रार्थ हा कायसा ॥
चैद्यीं[14] नमिलि रुक्मिणी परम ते खेदासि ते पावली ।
कृष्णासी मग पत्रिका द्विजवरा हातीं तया धाडिली ॥ ३ ॥
श्रीकृष्णा मनमोहना निधिगुणा निर्गुण गुणातिता ।
भक्तोद्धारकरा कृपा हरि हरा दीनोद्धरा अच्युता ॥
पत्नी केसरिची[15] तियेसि करिती जंबूक[16] नावें वरा ।
ये काळीं जरि पावसी नरहरी कीर्ती तुझी दुर्धरा ॥ ४ ॥
श्रीकांतें मग वाचुनी बहुश्रुती संतोष तो मानिला ।
वाहू[17] जुंपुनि स्यंदना[18] द्विजवरा आरूढ तो जाहला ॥
कौंडण्यपुर पावला हरि त्वरें बाहेरि तो राहिला ।
ऐकोनी बळराम सैन्य सबळें कृष्णाप्रती पावला ॥ ५ ॥
चैद्यासी सह मागधादि[19] प्रमुखें सैन्यें दळें चालिले ।
कौंडण्याधिपती तयास नृपती येवोनिया भेटले ॥
सन्मानें करुनी तयांसि नमुनी जानीवसा[20] आणिलें ।
आले ऐकुनि रामकृष्ण नृपती धांवोनि आलिंगिले ॥ ६ ॥
राजा तो सुख मानुनी मग म्हणे जानीवसा येइजे ।
बोले कृष्ण फुका विरोध स्थळ हें अंबालयीं देइजे ॥
जाणोनी मनिंचें तदा बहु बरें मानोनियां भीमकें ।
अंबेच्या निज स्थानकीं हलहरी[21] नेले महा कौतुकें ॥ ७ ॥
बोले शुद्धमती[22] नृपासि पुढती त्या रुक्मिणी अंबिके ।
तो पुत्र श्रवणांतरीं दचकला हें तों दिसेना निकें ॥
श्रीकृष्णू कपटी सुशक्तिसदनीं[23] तो ते स्थळीं राहिला ।
ऐसा भ्याड बहू म्हणोनि भिमकें धिःकारुनी टाकिला ॥ ८ ॥

---

१४ चैद्य=चेदि देशाचा राजा शिशुपाल. १५. केसरी=सिंह. १६. जंबूक=कोल्हा. १७. वाहू=घोडा. १८ स्यंदन=रथ. १९. मागध=मगधदेशचा राजा जरासंध. २० जानीवसा=वऱ्हाडी उतरण्याची जागा. २१. हल=बलराम. २२. शुद्धमती=रुक्मिणीच्या आईचें नांव. २३. सुशक्तिसदन=देवीचें आलय.

वर्मी खोंचुनि रुक्मया मग म्हणे मी तों न मानीं असें ।
आता येतिल रामकृष्ण समरीं लावीन त्याला पिसें[२४] ॥
ऐसें बोलुनि रुक्मया भगिनिसी मेलें त्वरें अंबिके ।
होता दर्शन स्पर्शनें भिमकिसी माळा दिली कौतुकें ॥ ९ ॥
उल्हासें निघता पुढें यदुपती न्याहाळिला सत्वरी ।
दृष्टी देखुनि घाबरी निजकरीं माळा त्वरें सावरी ॥
वीरांचा अभिमान मोह निरसे झुगोनिया सोडिला ।
वैदर्भी[२५] रथिं वाहुनी नरहरी रामा प्रती पावला ॥ १० ॥
दोनी सावध पाहती भिमकिसी तों ना दिसे पैं विरा ।
हाका देउनि चालिले गवसिती श्रीकृष्णदामोदरा ॥
दोनी ते दळभार संगरिं महा रणतूर्णी भीडले ।
श्रीरामें हलें[२६] घेउनी धिर विरा घायातळीं आणिले ॥ ११ ॥
घेवोनी हल चालिला तव जरासधू पुढें सूदला ।
तो वाटा म्हण आपुला म्हणुनिया युद्धा पुढें राहिला ॥
पाहे सैन्य सभोंवते हलधरें खडोनिया पाडिलें ।
दृष्टी बुद्धि विचारुनी मग जेंरें[२७] गंतव्य आरंभिलें ॥ १२ ॥
वैदर्भीप्रति पावला तंव शिशूपाळापुढें देखिलें ।
त्यातें घेउनि मागधें निजदळें चैद्यापुरा पावले ॥
रुक्मीया श्रुत होउनी मग तया क्रोधाग्नि तो जाहला ।
रागें नीकट चालिला हलहरी जेथें असे राहिला ॥ १३ ॥
शास्त्रास्त्रीं वरुषे तया मग हरी सन्नीध तो भीडला ।
बाणें वर्षत पावला निज हरी देखोनियां भूलला ॥
सर्वस्वें दुसरा करोनि धरिला वीर्दाविला बांधिला ।
देखोनी दिनरूप राय बळिनें सोडोनियां दीधला ॥ १४ ॥
गेला आपण भोजकोट-नगरा वस्तीस तो राहिला ।
ते वेळीं भिमकें मनीं निजसुखें कृष्णासि तो भेटला ॥
लग्नासी मुळ माधवें यदुविरें आगा निका नेमिला ।
बोलावू त्वरि द्वारकादिकरुनी आणावया धाडिला ॥ १५ ॥
येतां भूपवरें तयासि गजरें घोषें बहू आणिकें ।
वाद्यांचे गजरें स्वयंवर निकें नेलें महा कौतुकें ॥

---

२४. पिसेंः=वेड   २५. वैदर्भीः=विदर्भ देशचा राजा भीम याची कन्या रुक्मिणी.   २६. हलः=नागर   २७. जरेंः=जरासधानें.

आज्ञा घेउनि श्रीहरी भिमकिसी नेलें त्वरें द्वारका ।
ऐसें येउनि द्वारके तव हरी सिंहासनीं बैसका ॥ १६ ॥
वैंमाकीं भिमकात्मजा मुनिजना देखोनि संतोषला ।
ते काळीं हरिनें तदां सकळिका सन्मान तो दीधला ॥
आनंदू सुतमुद्रलू मग मनीं देखोनि संतोषला ।
ऐशी रुक्मिणिचीस्वयंवर-कथा अष्टादशा नेमिला ॥ १७ ॥
कथा संपली येथुनी सैंवराची । कथा जाण तूं वाक्य दिव्यांबराची ॥
सकाळीं पढे त्यासि मुक्तीसि ठावो । सुखें सपदा नांदती पुत्र रावो ॥ १८ ॥

इति श्री-रुक्मिणीस्वयंवर समाप्त.

---

## देवनाथकृत* कृष्णजन्म.

श्लोक—भूभार फार चि विकाररहीत त्याला ।
घे अमृताशनि समागमि त्या पित्याला ॥
गेला शरण विधि तो अविधीविनाशा ।
जो दीनवत्सल प्रभू पुरवी मनाशा ॥ १ ॥

दिंडी—नीवेदिलें सकळ हा वृत्त देवराया ।
प्रार्थियेलें अजास दुष्टकुळा हराया ॥
तों ऐकतां ध्वनि अकल्पित सूर कानीं ।
जो बोलिजे विभु जगत्रयपालकांनीं ॥ २ ॥

श्लोक—मी आवतरेन यदुच्या कुळीं तसा रे ।
सारे तुम्ही सुर हि यादव व्हा पसारे ॥
मारूनि दुष्ट करूं पालन सज्जनाचें ।
हे ऐकतां सुरसमुच्चय सज्ज नाचे ॥ ३ ॥
विदर्भाचे वशीं जगजननि लावण्यभरणी ।
अजन्मा ये जन्मा यदुकुळि च भूभारहरणी ॥
जया गाती वेद श्रुति कवि हि व्यासादि सुरसा ।
हरीची ते लीला श्रवणिं स्थिर होवोनि परिसा ॥ ४ ॥
उग्रसेनतनया अजि देवकी । नेमिला वर तिये वसुदेव कीं ॥
ओहेरें मिरविती रथ-यीनीं । कंस सारथि वरात-प्रयाणीं ॥ ५ ॥

दिंडी महोत्साहें मिरवितां वधुवरां या । थोर पोटीं स्वानंद कंस-राया ॥

---

२८ वामांकीं=डाव्या मांडीवर. * हें प्रकरण रा० रा० रामजी भोंडजी कालोलकर यांनीं पाठविलें. २९ ओहेरें=वधुवरें. ३० यान=वहन.

रथीं आपण सारथी जाहलासे। करी कौतुकालागि मन उल्हासे ॥ ६ ॥
शैलशिखरीं आदळे वज्र जैसें। तये समयीं जाहलें तया तैसें ॥
देवकीचा सूत आठवा चि कंसा। तुझ्या प्राणातें हरिल जाण ऐसा ॥७॥
वदे ऐशी अंबरीं[31] देववाणी। ऐकतां ची दचकला कंस कानीं ॥
म्हणे कैंची भगिनि हे मृत्युखाणी। रथाखालीं पाडीलि धरुनि वेणी ॥८॥
वधूं ईतें म्हणउनी हेत स्वमनीं। उभा ठाके खळ शस्त्र धरुनि पाणी ॥
घाबरी ते सुंदरी अश्रु नयनीं। वदे भावा तेधवां दीन वचनीं ॥ ९ ॥
काय कारण बा तुज वध कराया। काय केला अन्याय बंधुराया ॥
बहुत होती मजवरी तुझी माया। कशी निष्ठुरता आजि आलि हृदया ॥१०॥
माय मारी बाळासि जरी हाते। कोण त्यातें मग वांचवू पहातें ॥
कोण त्राता तुजवीण सांग मातें। बंधुराया दे प्राणदान मातें ॥ ११ ॥
**श्लोक**—बहू प्रार्थिजे ते हरी लागिं माया। परी हिंसका लागिं नाये चि माया ॥
करीं खेंड्ग[32] घे नागवे मारण्यातें। म्हणे मृत्युच्या ह्या वधूं कारणातें ॥१२॥
वसूदेव बोले धरोनी करा या। स्त्रिहत्या कशी आदरीली कराया ॥
सुजाणा तुझा सांग हेतू कसा हे। महा पाप तूं जाणसी ना कसा हें ॥१३॥
वदे यास तो स्वामि दैत्यादिकांचा। इचे पासुनी मृत्यु अस्मादिकांचा ॥
इचा आठवा पुत्र जो सत्य वाचा। करी घात तो आमुचीया जिवाचा ॥१४॥
**दिंडी**—ऐकोनी वसुदेव तया बोले। तुला अर्पीन होतील इला बाळे ॥
नव्हे वाणी असत्य कदां काळें। सोडि देई जिवदान वेल्हाळे ॥ १५ ॥
उभयतां त्या मग ठेवि बंदिशाळे। रक्षणातें मग बैसवि दैत्यपौळे[33] ॥
प्रथम झाला तिस पुत्र तये वेळे। दिला कंसा नेऊनि शीघ्र काळें ॥ १६ ॥
**ओवी**—रायें बाळ पाहोनि नयनीं। दया उपजली अंतःकरणीं
म्हणे मृत्यु यापासोनी। अम्हां लागोनी नसे ची ॥ १७ ॥
निःकारण कां वधावा। ऐसें विचारूनी तेधवां ॥
कंस म्हणे बा वसुदेवा। बाळ न्यावा निजठायां ॥ १८ ॥
वसुदेवें उचलोनी बाळा तया। आश्चर्य मानितसे हृदया ॥
म्हणे आली वाटपाडिया। कैशी दया उपजली ॥ १९ ॥
बाळ घेवोनी देवकी-रमण। बंदिशाळे आला न लागतां क्षण ॥
इकडे कंस-सभेलागुन। ब्रह्मनंदनें[34] पातला ॥ २० ॥
कंसरायें देवऋषी। बैसविला सन्मानेशीं ॥
करोनि पाद्यार्घ्याचमनासी। षोडशोपचारेंशीं पूजिला ॥ २१ ॥

---

३१ अंबर=आकाश. ३२ खड्ग=तरवार. ३३ पाळें=समुदाय. ३४ ब्रह्मनंदन=नारद.

श्लोक—ऋषिवर मग बोले सत्य हे चूक राया ।
वसुतें[३५] अरि[३६] प्रवर्ते कोण घाता कराया ॥
न कळुनि सुत त्याचा त्यासि दीला कसा रे ।
विधिसुत[३७] वदताहे मारिं हे तोकं[३८] सारे ॥ २२ ॥
गेला असें वदुनि तो हितशत्रु साचा ।
मानूनि कंस करि घात तसा च सांचा ॥
जों सातवा धरित भूधर[३९] गर्भ ठाणें ।
तों देवकीस बरिती विरश्री-उठाणें ॥ २३ ॥

छंद–गर्भा आये फणीपाळ[४०] । भयी देवकी खुशीयाल ॥
बडी आलियां भई लाल । मगनमस्त हालमों ॥ २४ ॥
भरी खाशी ललकार । मुसल नांगर हतीयार ॥
लावू दैत्यनको मार । करूं ठार पलखमों ॥ २५ ॥
बीरखानीं बजे चंग । वसुदेव भया दंग ॥
कहे कोन भया रंग । थरक अंग कांपता ॥ २६ ॥
कभूं जाने रखपाल । अभी होवेगा जजाल ॥
लाज राखो भूपाल । भूवनपाल नाथजी ॥ २७ ॥

ओंवी—असो सात मास झालिया । जे हरीची निज योगमाया ॥
निज सत्ते सांगे तया । काढोनि नेईजे गर्भासी ॥ २८ ॥
गर्भ नेवोनी ते अवसरीं । घातला रोहिणीचे[४१] उदरीं ॥
सप्तमासिका गर्भांतरीं । देखोनि घाबरी झाली ते ॥ २९ ॥
भ्रतार नसतां संन्निधानीं । नवल परी गर्भधानीं ॥
तंव वदली आकाशवाणी । चिंता रोहिणी करूं नको ॥ ३० ॥
हा वसुदेवाचा गर्भ देख । पुत्र होईल दैत्यांतक ॥
ऐसें ऐकतां सम्यक[४२] । जाहला हरिखें[४३] रोहिणीतें ॥ ३१ ॥
सिंहावलोकनें तत्वतां । श्रोतीं परिसिजे मागील कथा ॥
सातव्या गर्भाची अवस्था । झाली तत्वतां ऐशा परी ॥ ३२ ॥
गर्भ गळतांची वार्ता । दूतीं निवेदिली मथुरानाथा ॥
कंस म्हणे सर्वांथेता । जपा आतां आठव्यातें ॥ ३३ ॥
आठवा हा मोक्षदायक । म्हणोनि कंसासी बैसला धाक ॥

३५ वसुत=आठांत. ३६ अरि=शत्रु ३७ विधिसुत=नारद. ३८ तोक=बालक. ३९ भूधर=शेष ४० फणीपाळ=शेष. ४१ रोहिणी=वसुदेवाची दुसरी बायको. ४२ सम्यक्=चांगलें. ४३ हरिख=हर्ष ( आनंद ).

अट्टहास्यें करोनि हाक । दूतांसि देख सांगतसे ॥ ३४ ॥
दिंडी—आठव्याचा आठव बरा ठेवा । पूर्ण लक्षा तो आळसा न ठेवा ॥
मला गमला माझा च मोक्ष-ठेवा । रुचत नाहीं उपभोग दुजा ठेवा ॥३५॥
आठव्यानें व्यापिल्या दिशा दाही । दिसे त्यातें बाह्य अंतरीं हीं ॥
कोण त्याचा तो योग असा पाहे । वर्णिती त्या भाग्यासि पार नाहीं ॥३६॥
असो ऐसा लागला छंद कंसा । पुढें झाला वृत्तात कसा परिसा ॥
दीनबंधू त्या पयोनिधी-वासा । दया आली योजिला योग कैसा ॥ ३७ ॥
परित्रा॑णाय साधुच्या उभारा । धरी निवटाया सर्व भुमीभारा ॥
बंदिशाळे त्या तया दिनोद्धारा । घडे येणें त्रीभुवन सुकूमारा ॥ ३८ ॥
श्लोक—अज अजित अजन्मा जन्म घेऊं पहातो ।
प्रगट तिज पुढारीं अष्टवर्षी पहा तो ॥
चतुर्भुज करिं चारी आयुधें शोभती तें ।
निरखुनी मनिं देवा देवकी तोषली ते ॥ ३९ ॥
उभा जो प्रभू त्या जगत्कारणातें । रमावल्लभू दुःख संहारणातें ॥
नमूनी सती पादपद्मा वरीतें । वदे देवदेवा तया सुंदरी ते ॥ ४० ॥
कृपाळा प्रभू हे घनश्याम-वर्णी । तनू चित्प्रभा भा अशी कोण वर्णी ॥
फणी शीणला वेद मौनावलेती । महत्भाग्य मीं देखिलीं पावलें तीं ॥४१॥
कृपाळा स्मरे नेम पूर्वील साचा । नसावा कदा योग हा आळसाचा ॥
किती भोगिजे ही अशी बंदिशाळा । त्वरें बाळ हो तोडिं काळा विशाळा ॥४२॥
वदे श्रीहरी बाळ होतों कुळातें । त्वरें नेउनी घालिजे गोकुळांत ॥
दिसा थोडक्या बंदिशाळा तुटावी । अशी नेमिली चिंति चिंता नुठावी ॥४३॥
वदोनी असें सांडिली ती अहता । त्वरें बाळ होतो प्रभू कंसहंता ॥
इला वाटलें मद्गृहीं पूर्ण जन्मा । प्रभू जाहला बाळ कीं हा अजन्मा ॥४४॥
रघुविर जनकानें मारिला तो च मास ।
परि दिन अजि पूर्णा वृद्धि जे ये तमास ॥
तिथि तरि वसु जाणा काळ वर्षाऋतू कां ।
यदु कुळ-कुळदीपा जाहला जन्म तोका ॥ ४५ ॥
ते मध्य शर्वरि वासर सौम्य जाणा ।
सयुक्त रोहिणि शिशुत्व घडे कि जाणा ॥
होतां किशोरं सुर तोष करी तनाना ।

---

४४ परित्राण=रक्षण. ४५ पादपद्म=पदकमल. ४६ वसुतिथि=अष्टमी. ४७ शार्वरी=रात्र. ४८ सौम्यवासर=बुधवार. ४९ शिशुत्व=बाळपण. ५० किशोर=बालक.

त्या दुंदुभी सहित वाजति वाद्यें नाना ॥ ४६ ॥

**दिंडी**--विमानांची जाहली नभीं दाटी । सुरानंदें वर्षती सुमनवृष्टी ॥
विधीआदी अमरेंद्र धूर्जटी । बंदिशाळे पातले देव कोटी ॥ ४७ ॥
मित्रपुत्रादी आपणास तीतें । प्रदक्षोनी आदरी स्तुतीतें ॥
असें देखोनी हास्य किजे नाथें । नमुनि गेले ते आलिया सुपंथें ॥ ४८॥
दिशा व्यापीत तनू दीप्ति ज्याची । अशी पाहोनी मूर्ति श्रीअजाची ॥
हर्षवृत्ति सुर शेषतनू ज्याची । परी चित्तीं चिंता हि बहू ज्याची ॥ ४९ ॥
बहू सुंदर जाहलीं सहा बाळें । वधियेलीं या दुष्ट कंस-काळें ॥
कोटि भानूचें तेज नखीं लोळे । असें लाभे निववील कसे डोळे ॥ ५० ॥

**श्लोक**—वदे देवकी आपुल्या वल्लभातें । त्वरें गोकुळा न्या रमावल्लभातें ॥
म्हणे तो तिते जागिजे द्वारपाळीं । कपाटें ढ़दें दुष्ट मोठे कपाळीं ॥ ५१ ॥
असो लाज हे त्या जगत्पाळकास । वदोनी असें घे त्वरें बाळकास ॥
हृदीं लाविला तो शिशू चक्रपाणी । तयीं लोटिले लोचनालागिं पाणी ॥५२॥

**पद**—भाग्यहीन मी देवकि वदली विनवी वसुदेवा ।
निर्दय हृदयीं उचलुनी नेतां कसें देवदेवा हो ॥ धृ० ॥
सजल सघन घन गगनीं वळला वर्षत सुकाळीं ।
घोर शार्वरी आज भासते काळासम काळीं ॥
सदय मृदु अति हृदय कठिण कां मातें दुःखाळीं ।
लोटुनि नेतां चिद्रत्न जो शिशु हा ये काळीं हो ॥ १ ॥ निर्दय०॥
सहा मारिलीं बाळें कंसें सातवें गळालें ।
आठवा हा तुम्ही नेतसा मन कां हो चळलें ॥
घाबरला जिव निघूं पाहतो कर पद हे गळले ।
जन्मांतरिंचें कोण पाप तें नकळे हें फळलें हो ॥ २ ॥ निर्दय०॥
स्नेहभरें मीं "स्नेहें नाहीं जाउळ माखियलें ।
पायांवरि घेउनी कुमारा नाहीं न्हाणियलें ॥
नाहीं दिधली घुंटी स्वहस्तें नाहीं पाजियलें ।
कुळिंचें दैवत त्यातें नाहीं सटवीसी पुजिलें हो ॥ ३ ॥ निर्दय०॥
कठिण केलें मन वसुदेवें गमली सीमा या ।
मुक्त कपाटें झालीं घेउनि निघतां अमाया ॥
देवनाथप्रभुची हे ऐशी अति दुर्धर माया ।

---

५१ सुमन=फूल. ५२ शिशु=बालक ५३ लोचन=डोळे. ५४ स्नेह=तेल. ५५ घुटी=बाळकडू.

स्रवती लोचनीं जीवनबिंदु तीं खेद करी माया ॥ ४॥ निर्दय० ॥ ५३॥

**श्लोक**—तुटे शृंखळा मुक्त झालीं कपाटें । तया द्वारपाळांचिया नेत्र पाटें ॥
सुखें + × × माजि निद्रा कडाडा । पिता पुत्र घेवोनि जातो धडाडा ॥ ५४॥

**सवाईख्यालेरी**—मेहू गडाड गडाड बरासत बूंद बडी गहरी टपके ॥
आज रात अंधारी परि नही सूजत जात चलो पगके टपके ॥
फणिराज करे फणछाय तनू प्रभू छाति लगाय रह्यो चुपके ॥
चल ठाड रह्यो तटपे जमुना जल जात चढ्यो लैंहरी लबके ॥ ५५॥

**श्लोक**—शिरीं घे वसूदेव त्रैलोक्यराया । यमूना चढे पादरेणू वराया ॥
पदें स्पर्शतां भाग तो वेगळाला । त्वरें देव घेवोनि ये गोकुळाला ॥ ५६॥
यशोदेसि ते जाहली योग माया । तिनें लाविले लोक निद्रे रमाया ॥
पहा ते कशी नंदपत्नी सुदैवा । सुता घेत ठेवी वसूदेव देवा ॥ ५७ ॥
वसूदेव घे ते त्वरें मायराणी । पुन्हां पातला तो तया दुःखखाणी ॥
कपाटें तशीं जागती द्वारपाळी । पदीं शृंखळा दैव ठोकी कपाळीं ॥ ५८॥

**ओवी**—आनकदुंदुभीसें[५९] ते क्षणीं । कैसें वाटलें अंतःकरणीं ॥
कीं अमृतकुंभ ओलांडोनी । कांजी वदनीं घातली ॥ ५९ ॥
सुधापालटें[६०] घेतली कांजी । कल्पवृक्ष देवोनि घेतली भाजी ॥
वसुदेव तैसा झाला राजी । समयो पाजी म्हणोनियां ॥ ६० ॥

**श्लोक**—करीं देवकीच्या त्वरें दे तिला हो । अटाहास्य ते घेतसे शोकलाहो ॥
दुतीं जाणवीलें तया कंस-राया । उठे तो उतावीळ घाता कराया ॥ ६१॥
तिला दे म्हणे बाळ जैं त्रींदशारी । वदे ते नव्हे पुत्र तो हे कुमारी ॥
दयाळा तुझा क्रोध चित्तीं निवारीं । करीं कन्यकेचें च घे दानवारी[६१] ॥ ६२॥
न मानी च तो लोटुनीयां सुशाळे । पदीं गोवसोनी आपटावी च शीळे ॥
तदा निसुनी जाय ते अंबरीं[६२] हो । खळालागिं बोलावया आदरी हो ॥ ६३
वदे ती तया श्रीहरी जो अकर्ता । वसे भूवरी तो तुझा घात-कर्ता ॥
स्वयें गुप्त ते बोल ऐके उगा हा । अधोमूख तो पातला नीज गेहा ॥ ६४॥

**ओवी**—इकडे गोकुळीं नंद-सदनीं । यशोदा जागत जयीं ते क्षणीं ॥
पुढें सुकुमार कैवल्य-दानी[६३] । पुत्र नेटका देखिला ॥ ६५ ॥
जवळी आल्या परिचारिका । तिहीं देखिलें बाळका ॥
हर्षयुक्त गेल्या सुमुखा । नंदासि देखा सागावया ॥ ६६

[illegible] आनकदुंदुभी= वसुदेव. ६० सुधापालट=अमृताचा मोबदला. ६१ दानवारी=कन्यादानोदक. ६२ अंबरीं= आकाशात ६३ कैवल्य=मोक्ष.

नंदें उत्साहभरित मनें । उभविलीं गुढिया तोरणें ।
गोभूहिरण्यरत्न-दानें । द्विजां अपार दीधलीं ॥ ६७ ॥

**छंद**

अंगनांचे थवे दाट । आले ब्राह्मणांचे थाट ॥
वाद्य वाजती संघाट । नादें कौष्ठ[६४] घूमती ॥ ६८ ॥

**लटक चाल** ॥ बजे सनई घनघोर । नगारनकी लगे झोर ॥
बाजे कर्णा बंभेर । दिसों[६५] नाद घूमती ॥ ६९ ॥
ढोल जतर दुताल । बजे मृदंग और ताल ॥
बीना चपल करताल । अजब ख्याल सुनावे ॥ ७० ॥
झनक झांज झणत्कार । गुनी गावे ललकार ॥
सारमडल सीतार । सारंगी भी बाजती ॥ ७१ ॥
नेपुरी और मोरचग । घडियाल बजे दंग ॥
घनखुब मचा रंग । नंदद्वार सुघडी ॥ ७२ ॥
छुटे तोफां गरनाल । कडकबान सुतरनाल ॥
सभा सब हि भई लाल । गुलाल बुका मार है ॥ ७३ ॥
थरक पात्रा तत्कार । भये ठाडे चोपदार ।
खूब भरते ललकार । अजब भाग[६६] नंदका ॥ ७३ ॥
देवनाथप्रभु बिशाल । भयो नंदजीको बाळ ॥
दुष्ट दैत्यनकू काल । सुष्टुपाल दासकू ॥ ७५ ॥

**श्लोक**–असो ये रिती पूर्ण उत्साह होतो । तदां नंदराणीपुढें श्रीहरी तो ॥
कशी लेइली सर्व अगास न्हाणी । मधें शोभली वेष्टितां अंगनांनीं ॥७६॥
करें घे बरें बाळ पायांवरी ते । तदां त्यास न्हाणावया आदरीते ॥
भरी भक्तिगंगाळि ते प्रेमपाणी । स्नेहें माखिला तो शिशू चक्रपाणी ॥७७॥

**पद.**

न्हाणी हरितें सप्रेम नंदराणी । खाणी तिच्या भाग्याचि कोण वाणी हो॥धृ०॥
ज्याच्या स्नेहें देहभावा केले परते । ज्याच्या स्नेहें जाळीलीं सर्व दुरितें[६७] ॥
ज्याच्या स्नेहें सायुज्य–सौख्य भरितें । स्नेहें त्याचें जाऊळ माखी करिं ते हो ॥१॥
गंगा जन्मे ज्याचिया चरण-कमळीं । त्यावरी पाणी घालीती हस्तकमळीं ॥
ब्रह्मादिक वंदिती पदरजधूळी । पदींची ती घेवोनि लावी भाळीं हो ॥ २ ॥
देवनाथप्रभु अवर या विश्वा कीं । अंग त्याचें पुसोनि वस्त्रें झांकी ॥
सर्वात्मा जो व्यापक अणूरेणु कीं । मुख-अनिळें[६८] तयाचे कर्ण फुंकी हो ॥३॥७८॥

६४ काष्ठ=दिशा ६५ दिसों=दिशा. ६६ भाग=दैव. ६७ दुरितें=पापें. ६८ अनिल=वारा.

**घनाक्षरी**

अंत:करणाचे डोल्हारीं । आत्मा निजविला श्रीहरी ।
मनोमय लाउनी दोरी । ते सुंदरी हालवी ॥ ७० ॥
जन्मा आला येणें रीती । लीलाअवतारी श्रीपती ।
पुढें बाळलीला प्रीती । सादर श्रोतीं परिसिजे ॥ ८० ॥
देवनाथ-प्रभूची लीळा । अजन्मजन्माचा सोहळा ।
वर्णितां तो सिद्धि नेला । श्रीगुरुनाथ दयाळें ॥ ८१ ॥

इति श्रीकृष्णजन्म संपूर्ण.

---

## गोसाविनंदन-कृत रेणुकाष्टक.[69]

अंबे महात्रिपुर भैरव आदिमाय । दारिद्र्यदुःखभय हारुनि दावि पाय ॥
तूझा अगाध महिमा वदती पुराणीं । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ १ ॥
आतां क्षमा करिं शिवे अपराध माझा । मीं मूढ केवळ असें परि दास तूझा ॥
तूं सोडिसील मजला म्हणि हो निदानीं । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ २ ॥
लज्जा समस्त तुजला मज बाळकाची । तूं माउली अतिशयें कणवाळु[70] साची ॥
व्हावें प्रसन्न करुणा परिसोनि कानीं । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ ३ ॥
तूं धन्य या त्रिभुवनांत समर्थ कैशी । धाकें तुझ्या पळ सुटे रिपु दानवांसी ॥
येती पुजेसि सुर बैसुनिया विमानीं । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ ४ ॥
निष्ठुरता मनिं जरी धरशील आई । रक्षील कोण मज सांग उपाय कांहीं ॥
तूझा चि आश्रय असे जागीं सत्य मानीं । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ ५ ॥
नेणें पदार्थ तुजवांचुनि अन्य कांहीं । तूं मायबाप अवघें गणगोत पाहीं ॥
आणीक देव दुसरा हृदयांत नाणीं । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ ६ ॥
हें चालिलें वय वृथा भुललों प्रपंचीं । तेणें करोनि स्थिरता न घडे मनाची ॥
दुःखार्णवांत बुडतों धरिं शीघ्र पाणी[71] । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ ७ ॥
जाळीतसे मज चि हा भव-ताप आंगीं । त्याचें निवारण करीं मज भेट वेगीं ॥
आनंदसिंधु लहरीगुण कोण वर्णी । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ ८ ॥
जैसें कळेल तुजलागुनि पाळिं तैसें । मीं प्रार्थितों सकळ शास्त्र निदान ऐसें ॥
गोसाविनंदन म्हणे मज लाविं ध्यानीं । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ ९ ॥

## गोसाविनंदनकृत ध्यान.[72]

जयजय मंगळमूर्ति गजानन । चंचळ कर्णद्वय फणि-भूषण । झरत कपोल

---

६९ हें प्रकरण ही रा० रा० रामजी धोंडजी खानोलकर यानीं च पाठविलें. ७० कण-वाळु=दयाळु. ७१ पाणी=हात. ७२ हें व याचे पुढचीं दोन प्रकरणें रा० रा० खानोलकर यानीं च पाठविलीं.

सुगंधित अलिंगण । लड्डुप्रियतम घूमितलोचन । हार मुकुटमणि-मंडित कंकण । रक्तांबरधर सिंदुर धारण । सिद्धि-विनायक संकट नाशन । विघ्नांतक कलि-कल्मष भजन । देतो विद्या संपत मति धन । ऐसा तो गणराज दयाघन । स्वानंदें करी थैं थैं नृत्य । धमकति धमकति झंझं झमकांते । सुस्वर मृदंग वीणा-वादन । शंकित नारद तुंबर गायन । ब्रह्मा हरिहर सुरवर तल्लिन । शरणागत गोसावी-नंदन । जयजय मंगलमूर्ति गजानन ॥ १ ॥

जयजय सांब सदाशिव शंकर । विश्वंभर जय करुणासागर । नीलग्रीव शशी-धर-शेखर । सर्पाभरणीं जटिल दुमावर । त्र्यंबक त्रिपुरांतक भव-संहर । स्मरहर गंगाधर विश्वेश्वर । पशुपति भोलानाथ परात्पर । लीला धन्य अगाध अगोचर । कांपे काळ जया थर थर थर । इंद्रादि सुर सेवासादर । भूताधिपति वृषभारूढ सुंदर । भं भं भं शंखाचे सुस्वर । वाजे डुग डुग डमरु प्रियंकर । गर्जे त्रिभुवन हर हर हर । गोसावीनंदनाप्रियकर । जय जय सांब सदाशिव शंकर ॥ २ ॥

जय जय माते आदि भवानी । पावें भक्ता निज निर्वाणीं । त्रिभुवन अवघे तूझे ध्यानीं । महिमा अद्भुत वेद-पुराणीं । शेष सहस्र मुखें, गुण वर्णी । केवळ लावण्याची खाणी । तानवडें मणिमंडित कर्णीं । नाकीं मुक्ताफळ शिरीं वेणी । पीतांबर कटीं त्रिशूळ पाणी । शोभे नानारत्नाभरणीं । तेजःपुंजें लोपे धरणी । अगाध जगदंबेची करणी । आरूढ सिंहावर ते जननी । हुंकारें रूप पडतो धरणी । शुंभनिशुंभनृपनिर्दळणी । महिषासुर मर्दिला चरणीं । ब्रह्मा हरि हर पूजिति सुमनीं । गोसावीनंदन तुझिये ध्यानीं । स्मरा स्मरा ते आदिभवानी । जय जय माते आदिभवानी ॥ ३ ॥

जय जय राघव रविकुल-मंडन । राम अयोध्याधिप मुनिरंजन । दशरथसुत नृप धर्मपरायण । ताटिकांत अहल्योद्धारण । विश्वामित्र-ऋषिमखरक्षण । विशाल त्र्यंबक-कार्मुकभंजन । सीता वल्लभ वाळी मर्दन । पवनात्मजप्रिय सागर-बंधन । चाप ठणत्कारूनि ठण ठण । रामाचे शर सूटति सण सण । तेथें राक्षस पडती दण दण । मारूनि लंका-नायक रावण । राज्यीं स्थापुनि भक्त बिभीषण । नाम-स्मरणें गर्जे त्रिभुवन । सीताकांत-नामस्मरण । शरणागत गोसावीनंदन । जय जय राघव रविकुलमंडन ॥ ४ ॥

जय जय गोपी रमण मुरारी । गोकुळपति पीतांबरधारी । सुंदर यमुना-कुंजविहारी । मुरलीधर मनमोहन शौरी । स्मरतां सकळ हि दोष निवारी । निजभक्तांचा जो कैवारी । पतीत दीन अनाथा तारी । उत्तम अधम कदा न विचारी ।

---

७० मख=यज्ञ. ७१ कार्मुक-धनुष्य

केवळ ब्रह्म सदाविकारी । कालियमर्दन कंस-विदारी । देवकीवसुदेवबध निवारी । स्मरा स्मरा तो कृष्ण मुरारी । शरणागत गोसावी-नंदन तारी । जय जय गोपी-रमण मुरारी ॥ ५ ॥

समाप्त.

---

## मालोनाथकृत-नाथनामावलि.

गुणातीत अव्यक्त विद्या-विलासी । मुळारंभ आरंभ ऐश्वर्यतेसी
सदा सर्वदा सच्चिदानंदवस्था । नमस्कार माझा तया आदिनाथा ॥ १ ॥
अतीसौख्य-माहेर जें सज्जनाचें । पर धाम विश्राम योगीश्वराचे
निरालंबदेशीं अनूपम्य राजा । नमस्कार मत्स्येंद्रनाथासि माझा ॥ २ ॥
गुरुभक्ति जेथोनि रूपासि आली । महासिद्धि ज्या पासुनी व्यक्त झाली
कसा धांवण्या धांवतो दीनकाजा । नमस्कार गोरक्षनाथासि माझा ॥ ३ ॥
अनूहात सिंगी स्फुरन् लक्ष्य मुद्रा । अखंड स्वरूपीं स्थिती योग-निद्रा
जयाचा बहू आश्रयो योग-युक्ता । नमस्कार माझा तया गैनिनाथा ॥ ४ ॥
चळेना ढळेना टळे कर्ममार्ग । उपायाविना सापडे सत-संग
समानी वृती जया सत्य बोधीं । नमस्कार निवृत्तिनाथासि आधीं ॥ ५ ॥
प्रतापें गुणें आगळा सूर्य जैसा । स्वयंज्योति शुद्ध प्रकाशीत तैसा
जयाची असे या जगीं पूर्ण सत्ता । नमस्कार माझा तया ज्ञाननाथा ॥ ६ ॥
बसे अंतरीं शून्य सिंहासनीं जो । अवस्थात्रया लागुनी खेळवी जो
स्वयें सर्व कार्यां करोनी अकर्ता । नमस्कार माझा तया रंगनाथा ॥ ७ ॥
असे सत्य जें नित्य प्रत्यक्ष भासे । सबाह्यांतरीं पाहतां तें चि दीसे
जया पाहतां पाहणें सर्व मिथ्या । नमस्कार सत्यामळा प्राणनाथा ॥ ८ ॥
धरी रूप लावण्य भक्ताभिमानी । करी स्नेह कूर्मी परी मोक्षदानी
कृपाळूपणें दाखवी भक्तिपंथा । नमस्कार माझा तया गैबिनाथा ॥ ९ ॥
असोनी पुढें कातडें लोचनासी । परिच्छिन्न जे नाकळे कल्पनेसी
जया आदि ना अंत निर्मूळ वार्ता । नमस्कार माझा तया गुप्तनाथा ॥ १० ॥
जगीं थोर विस्तारली कीर्ति ज्याची । श्रवणमात्र होती धुनी पातकाची
जयाचे बळें जिंकिजे योग पैजा । नमस्कार उद्बोधनाथासि माझा ॥ ११ ॥
कसें साजिरें रूप आनंदराशी । विसावा घडे पाहतां लोचनासी
जयाची बहू आवडी या मनाला । नमस्कार श्रीकेशरीनाथजीला ॥ १२ ॥
सदानंदरूपी चिदानंद-मूर्ती । सदाचार बाह्यांतरीं लक्ष्य स्फूर्ती
गुरु संप्रदायांत श्रीनाथ भोळा । नमस्कार श्रीलक्ष्मीनाथजीला ॥ १३ ॥

निराकार निर्गुण जो मूळिंचा कीं । असे व्यापुनी सर्व देशीं परा कीं
त्रिकूटा हि पर्ता जयाचा ठिकाणा । नमस्कार माझा गुरू शीवदीना ॥ १४ ॥
शिवदिन वत्सले रक्षिले कीं नरा या । शरण गुरुपदा पातला शिष्यराया
तनु मन धन अर्पिले तराया भवाब्धि । नमस्कार गोविंदनाथासि आधीं ॥१५॥
गृहस्थाश्रमीं नाथ गोविंद भोळा । जपे मानसीं नाथ-नामावळीला
कृपाघन बरा वोळला तो हरीसी । नमस्कार माझा हरीनाथजोसी ॥ १६ ॥
स्मरण करित मालोनाथ नामावळीतें । नमन करित भावें त्यांचिया पादुकांतें
अभिनव फल प्राप्ती कोड जें मानसींचें । पुरवुनि दवडीलें दैन्य जन्मांतरींचें॥१७॥

---

## नामदेवकृत कौतुक.

चतुर्भुज मूर्ति देवाची । जगदवा ईश्वराची । बहुत कृपा पार्वतीची । नादणुक अमरावतीची । सभा राया इंद्राची । अढळपद ध्रुवाचें । दैव लक्ष्मीचें । सौभाग्य गौरीचें । लावण्य रंभेचें । नाद तुंबराचा । गायन सरस्वतीचें । नित्यदान गणेशाचें । शिखर मेरूचें । सिंहासन विक्रमाचें । बोलणें वक्तयाचें । जानवीं सुताचीं । अचिराव लोजाचा । दान कर्णाचें । आलिंगन बंधूचें । इच्छाभोजन श्रीयाळाचें । उत्साह पुत्राचा । विनोद बाळकाचा । कळा चंद्राची । तेज सूर्याचें । स्थीरपण पृथ्वीचें । उचीं गगनाची । खोली समुद्राची । वेद ब्रम्ह्याचे । मद सिंहाचा । वर्षाव मेघाचा । पीक धरित्रीचें । पिंडदान गयेचें । पूजा काशीविश्वेश्वराची । पत्री बेलाची । माळा तुळसीच्या । स्मरण रामाचें । बंधन यमाचें । उड्डान हनुमंताचें । फूल पारिजातकाचे । दुग्ध कामधेनूचें । रूची लवणाची । शीतता पवनाची । अवस्था स्त्रीची । महिमा वस्त्राची । सेवा भ्रताराची । फळ नारळीचें । व्रत एकादशीचें । नक्त सोमवाराचें । भक्ती तांबुलाची । रंग पोवळ्याचा । ढाळ मोत्याचा । भेट गंगेची । कविता नामदेवाची ।.

समाप्त.

---

### रामचंद्रवडवेकृत
## मयूरकविस्तुति*

भगवत्तनूं[1] हरिकथा करि आर्यांनीं अलंकृतीयुक्त[2] ॥
मोरेश्वरपंताची म्हणती पंडित अलं[3] कृती[4] युक्त[5] ॥ १ ॥

---

* हें प्रकरण पंतांचे वंशज वे० शा० स० रा० रा० मयूर पंडित यांजकडून रा० रा० अनंत विनायक सोहनी यांचे मार्फत आलें. १ तनू=शरीर. २ अलंकृती=दागिने ३ अलं=अतिशय ४ कृती=ग्रंथ. ५ योग्य.

मोरेश्वरपताची ऐकुनि कविता मनीं सुकवि लाजे ॥
पावे विवर्णता ते मीं किति वर्णू जनीं सुकविला जे ॥ २ ॥
मोरेश्वरपताची कविता रसनिपुणसत्सभागेयाँ ॥
अभिमानें सेर्ष्य कवन करितां सम सुरभिवत्स भागे या ॥ ३ ॥
अक्षरसगति यमकें सुशब्द अर्थाचिया चमत्कृतिला ॥
पाहुनि भुल कवि म्हणे बुडवू या काय मी च मत्कृतिला ॥ ४ ॥
आर्याकेका करित चि शिरला वाटे मयूर यमकवनीं ॥
सुजनासि फार पीडिल म्हणुनि भुलविला किरातयम कवनीं ॥ ५ ॥
यत्स्थिति पहतां मूर्धा डोलविला निज असेल जनकानें ॥
यच्छांति यत्सदयता ऐकोनि किती शिके सुजन कानें ॥ ६ ॥
आर्या अर्थविचारें गाता ही सुस्वर शिकतांना ही ॥
अक्षरसंगति यमकें वेधी मन जेंवि रसिक त्यांनांही ॥ ७ ॥
कवितेंत भाषणात हि भासे मृदुतेकरोनि शुकपिकसा ॥
विश्वफळ श्रीरामा घाली कव तेवि हा शिशु कपि कसा ॥ ८ ॥
सुश्लोक वामनाचा अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ॥
ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपताची ॥ ९ ॥
अष्टोत्तरशत केलीं जेणें रामायणें पृथग्रस तीं ॥
भारतभागवतादि ग्रंथ करी मान्य जे समग्र सतीं ॥ १० ॥
सर्वोत्कृष्ट कवन करि परि बाधे गर्व लेश ही न जया ॥
सत्कुलज नम्रता धरि गुण निभृतत्वें न होय हानि जया ॥ ११ ॥
कठिण ग्रंथ म्हणुनिया आर्यांतें निंदितां न सुकवी ते ॥
मोठ्या मोठ्या कविंचे मान्या यद्गुणिति ओष्ठ सुकवीतें ॥ १२ ॥
सुजनोत्य कवनसद्रस दुष्टास न घेववू सक कानीं ॥
संतोष मयूराच्या काय बिडाळीस होय केकानीं ॥ १३ ॥
सुस्वर कंठ रसिकें आर्या गातां मयूरबावाची ॥
वेधी सुजनमनातें न तशी धुन एक तार बावांची ॥ १४ ॥
खगशब्द ब्रह्मज्ञा म्हणउनि शुक धरितसे चि अभिधान ॥
हा धरि मयूरपत हि आणी गौणत्व यासि अभिधा न ॥ १५ ॥

६ विवर्णता=निस्तेजस्कता ७ रसनिपुणसत्सभागेया=रसिक जे सज्जन त्यांच्या समुदायास वर्णन करण्यास योग्य अशी. ८ सेर्ष्य=हेवायुक्त. ९ सुरभि=कामधेनु १० चमत्कृति=चमत्कार. ११ मत्कृति=माझा ग्रंथ. १२ केका=मोराचा शब्द १३ मूर्धा=मस्तक १४ शुक=पोपट. १५ पिक=कोकिल. १६ सुकवि=उत्तम विद्वान् १७ यद्गुणिति=ज्याचा ग्रंथ. १८ बिडाल=मांजर. १९ बावा=गोसावी, बैरागी. २० अभिधान=नाव. २१ गौणत्व=नीचत्व. २२ अभिधा=नाव.

वानी पंढरि न तसें साकेतींतें गयाविमुक्तातें ॥
वर्णी भक्ताभक्ता न तसे सत्यास भवविमुक्तातें ॥ १६ ॥
कवन सुरेंद्राद्यमरा मिळतें तरि हे सदार शिकते ते ॥
सावर मिळता सेविल नामाभासें उदार सिकतेतें ॥ १७ ॥
हें मिळता अन्य न मनि घृत मिळतां जेंवि सद्रसिक तेला ॥
वणिज न गंगेच्या ही आणुनि पावेल भद्र सिकतेला ॥ १८ ॥
रामायणभागवतीं मन्त्रोद्धारें चि रामहरिपूजा ॥
रूपादी म्हणुनि भिउनि कामादिक देति हे महे रिपू ज्या ॥ १९ ॥
कवनश्रवणक निर्बळ मानव न रमेल येथ न रमो तें ॥
परि सज्जनश्रुतीतें भूषविल चि तेंवि जेंवि नर मोतें ॥ २० ॥
केकारवें मयूरें विठ्ठलघन काय जाण नाचविला ॥
ऐशा ही कवनाच्या पशु तो नर काय जाणना चविला ॥ २१ ॥
या जन्मतां चि गेल्या काशीरामिश्वरा नमायाला ॥
प्रौढपणीं आर्यांतें जगतीतल ही पुरे न मायाला ॥ २२ ॥
आर्याग्रंथ रचुनि बहु विठ्ठल चित्तासि तोषवी फार ॥
त्या मोरेश्वरपंता माझा साष्टांग हा नमस्कार ॥ २३ ॥
मोरेश्वरपदपद्मा चोविसआर्यामयें कुसुमदामें ॥
पूजियलें नतिपूर्वक भावें वडवोपमामकें रामें ॥ २४ ॥
इति श्रीमयूरकविवर्णनार्या समाप्ताः ॥

---

### सखारामतनयकृत

## रुक्मिणीस्वयंवर. *

### आर्या.

वदुनि सद्गुरुचरणा भावें वर्णिन रमेशचरितातें
मूढा स्फूर्ति द्यावी अपुलें म्हणुनी उदार विधितातें ॥ १ ॥
भीमनृपाळ विदर्भाधिप हो न्कासिवो प्रजासि आकांता ॥
शुद्धमती त्या भार्या पतिव्रता ने मनोहरा कांता ॥ २ ॥

---

२३ वानी=वर्णन करी २४ साकेत=अयोध्या. २५ गया=क्षेत्रविशेष २६ विमुक्ता=काशीक्षेत्र. २७ भवविमुक्त=ज्यानें संसारत्याग केला आहे तो २८ सदार=स्त्रियांसह. २९ नामाभास=नांवाचा भ्रम. ३० सिकता=वाळू, रेती. ३१ भद्र=कल्याण ३२ मह=पूजा. ३३ कुसुमदाम=फुलांचा हार. ३४ नति=नमस्कार. * हें प्रकरण रा० रा० वामन दाजीओक हल्लीं वास्तव्य संबळपूर यांनीं नागपुरीं असतांना पाठविलें. १ एथें कांहीं अपपाठ आहे. २ कांता=सुंदर.

प्रसवलि पांचा पुत्रां विशालनेत्रा विदर्भनृपभार्या ॥
झाली कन्या शेवटिं रूपें सौदामिनी च समभार्यी ॥ ३ ॥
प्रियकर बहु रायातें प्राणापरि ते अनादि चिन्माया ॥
होता जपत बहुत दिस जीच्या उदरात मदन जन्माया ॥ ४ ॥
उपवर झाली कन्या नृपती विवरी मनास जामाता ॥
द्यावी कोणालागीं बाळा हे क्षीरसिंधुजा माता ॥ ५ ॥
तों कीर्तिरूप ब्राह्मण भाविक आला नृपाचिया भवना ॥
चरण प्रक्षाळणार्यचि आणवि नृप मानुनी सुताभ वना ॥ ६ ॥
तेणें कीर्तन करितां सादर पाहुनि नृपाळतनयेतें ॥
कथिलें सुचरित हरिचें श्रवणें रुचलें बहुत विनयेतें ॥ ७ ॥
धनि जो त्रैलोक्याचा ध्याती ज्याते उमेश विधि देव ॥
तो नरतनु धरि धरणी बाप जयाचा सदैव वसुदेव ॥ ८ ॥
बाळपणीं व्रजवासी मारुनि वृंदासुरारिच्या निकरें ॥
वधिलें कंसा दुष्टा जाउनि मथुरापुरीसि त्याचि करें ॥ ९ ॥
पळवि जरासंधाला सतरा वेळां वधोनि सेनेला ॥
साह्या यवन हि ये तो विलया कुंदाचिया मिसें नेला ॥ १० ॥
परिसुनि ऐशी कीर्ती तन्मय झाली विदर्भराजसु हो ॥
मूर्च्छित पाहुनि तिजला म्हणती न्याहो घरांत जन्या हो ॥ ११ ॥
जाणुनि चित्तीं भूपें केला स्वमनी विवाहसंकल्प ॥
द्यावी श्रीरंगातें टाकुनि चित्तीं समग्र वीकल्प ॥ १२ ॥
येउनि सांगे कांते केली कन्या मुरारिची जाया ॥
भवसागरिं या मलिना वंशा अमुच्या समस्त अघ जाया ॥ १३ ॥
शुद्धमती त्या कालीं हर्षे धरुनी धरेशचरणा हो ॥
बोले स्वामी याहुनि उपाय न दुजा भवाब्धितरणा हो ॥ १४ ॥
मातातातविचारा ऐकुनि न मने वडील पुत्रातें ॥
पायस सुवर्णपात्रीं युक्त चि सेवील काय कुत्रा तें ॥ १५ ॥
नेदीं भगिनी कृष्णा स्वयातिहीना दयाविहीनातें ॥
धन्य विचार हि तुमचा लावूं म्हणता अशांशि ही नातें ॥ १६ ॥

---

३ सौदामिनी=वीज. ४ समभार्या=सम + भा + आर्या=( विजे ) समान आहे भा म्ह० शोभा जीची अशी व आर्या म्ह० श्रेष्ठा. ५ विवरी=विचार करी. ६ क्षिरसिंधुजा=दुधाच्या समुद्राची कन्या ७ वन=पाणी. ८ व्रज=गोकुळ. ९ ' मनुनी ' पाठांतर.

मारुनियां अघ[10]किरडू उचलुनि वारुळसमान भूधरसा[11]
कालिय विरुळ्या जळिच्या दवडुनि मानी मनात भूधरसा[12] ॥ १७ ॥
चाराया गोवत्सां चपळ मनें बहु पळोनि जाय वना ॥
भेणें पळता रक्षी मुचकुंदा मारुनी अशा यवना ॥ १८ ॥
मागधनृपतीभेणें जळात राहे रचोनि दुर्गहुडे[13] ॥
गारुडियापरि सर्पा खेळवि आणी तयावरि च जो पहुडे ॥ १९ ॥
आप्तपणा नेणुनिया वधिला जेणें हटें सखा मामा ॥
येइल सांगा तो हा इतरा आम्हाचिया कसा कामा ॥ २० ॥
भीमनृपाची बाळा देइन निश्चय करुन शिशुपाळा ॥
या वचनासी टाळा द्याया शक्ती नसे महा काळा ॥ २१ ॥
निश्चय जाणुनि ऐसा त्रासे चित्तीं कुमारि रायाची ॥
विवरी हृदयीं युक्ती बधूवाणी वृथा करायाची ॥ २२ ॥
दुष्टमती भावातें आणि तयाच्या खलस्वभावातें ॥
जाणुनि रंभा[14] वातें चलल तैशा धरी स्वभावातें ॥ २३ ॥
कवण उपासू दैवत जें मज करि भेट कृष्णनाथाची ॥
सांगेल कोण विनती त्याला माझी अहो अनाथाची ॥ २४ ॥
मातेलागीं पुसावा विचार जरि तरि असाध्य हो तिजला ॥
पाषाण काष्ठ कैसा करणारा आर्द्रगोळ जो थिजला ॥ २५ ॥
यास्तव नकळत कोणा धाडू द्वारावतीसि मी देवा ॥
ऐशी करितां चिंता पाहे सन्मुख सुदेवभूदेवीं[15] ॥ २६ ॥
वदुनि विनवी त्यातें स्वामी जावें हरीचिया गावा ॥
देउनि पत्रा येथिल विचार हरिसी समग्र सांगावा ॥ २७ ॥
पुत्र जयाचा चतुरानन तो वृष्णीकुळांत उंच तुरा ॥
आणिल्या भक्तीं चतुरा निश्चय घडती तुला हि कीं चतुरा ॥ २८ ॥
घेउनि आज्ञा ब्राह्मण वेगें आला समुद्रतीरासी ॥
भूवैकुंठ चि पाहे द्वारावतितें सुखाब्धिची रासी ॥ २९ ॥
वर्णावी जरि नगरी तरि त्या लागेल बहूत कार्याची ॥
सादर पुरी न पाहे तांतडि घे भेटि कृष्णआर्याची ३० ॥
त्या लावण्य[16]समुद्रा देखुनि द्विज लाभि मीच निज मुद्रा[17] ॥
पाहुनि ऐशी मुद्रा[18] घाली त्याच्या करीं हरी मुद्रा ॥ ३१ ॥

---

१० अघ=अघासुरनामक राक्षस ११ भूधर=पर्वत १२ भूधर=शेष. १३ हुडे=बुरूज. १४ रंभा=केळ १५ भूदेव=ब्राह्मण १६ लावण्य=सौंदर्य १७ मुद्रा=मुख १८ मुद्रा=जीचेवर नाव खोदले आहे अशी अंगठी.

बोले श्रीहरि विप्रा कोठुनि येणें किमर्थ सांगा जी ॥
इच्छित असेल जे तें आळस न करुनि मला च मागा जी ३२ ॥
देश स्वामी तुमचा प्रजा स्वधर्मे करुनि पाळीं कीं ॥
याचक अलिया *दारादानीं सकळ हि दरिद्र जाळीं कीं ॥ ३३ ॥
द्विजराजा ज्या काजा येणें झालें तुम्हासि मजपाशीं ॥
निश्चय घडेल परि मज आधीं सांगुनि बसा मग जपासी ॥ ३४ ॥
ऐकुनि हरिवचनाला ब्राह्मण आनंदला महानमना ॥
मस्तक ठेवी हरिच्या चरणीं गोडी धरी महा नमना ॥ ३५ ॥
वार्ता अर्जुनमित्रा सांगुनि दे भीमकीचिया पत्रा ॥
वाचुनि वारिजनेत्रा झालें सुख बहुत देवकी पुत्रा ॥ ३६ ॥
त्रिभुवनिं सुदरपण अणि उदार गुण थोर परिसुनी मनिं ज्या ॥
आवाडि बहुत वराया श्रीपति तूतें त्यजूनिया लज्जा ॥३७ ॥
तुज ऐशा भर्तारा कोण वरीना वधू चतुर धीरा ॥
गुणसिंधू नरकेसरि तू सुखधामा मुकुंद यदुवीरा ॥३८ ॥
तुझ्या ठायीं निश्चय माझा जाया करिं मज सुरपाळा ॥
भाग तुझा केसरिचा न लभो कोल्ह्या कदापि शिशुपाळा ॥ ३९ ॥
जन्मांतरिं हरिपूजन पुण्य चि सर्वहि असेल मजपाशीं ॥
तेणें यदुपति पति हो न शिवो शिशुपाल दुष्ट हा मजसी ॥ ४० ॥
कूर्स न होतां कोणा सह सैन्येंशीं विवाहपूर्वदिनीं ॥
येउनि चैद्यादिक हे जिंकुनि राक्षसविधी मला पर्णी ॥ ४१ ॥
भावा न मारितां ही मातें न्याया उपाय एक असे ॥
कुळदेवीयात्रेसी येतां म्यावें हरोनि जगदीशें ॥ ४२ ॥
प्रसाद जो वर इच्छीं तो जरि न मिळे रमाकांता ॥
तरि सात जन्म स्तवना करुनी होइन तुझी च मी कांता ॥ ४३ ॥
यापरि वाचुनि पत्रा दृढ निश्चय जाणुनी मुरारी तो ॥
प्रयाण करिता झाला ज्याला ध्यातो मनीं मुरारी तो ॥ ४४ ॥
कळला राम म्हणे तरि गेला टाकोनि सर्व एकटका ॥
आटोपाया मार्गी हरिला घेवोनि ये स्वयें कटका ॥ ४५ ॥
तों आला शिशुपाळा पुत्रा घेऊनियां हि दमघोष ॥
पूजन करुनी अणिता रुक्मा करि दुंदुभी च सम घोष ॥ ४६ ॥

१९ वारिजनेत्र=कमलासारखे डोळे आहेत ज्याचे असा. २० कूर्स=माहीत. २१ चैद्य=चेदिदेशचा राजा शिशुपाल. २२ कटक=सैन्य. * दारा=लक्ष्मी, द्रव्य

नृपकन्येसि हरिद्रा लाविति तेव्हां मनीं हरा अठवी ॥
अंतःपुरीं असे परि भावी तें राजकन्यका अटैवी ॥ ४७ ॥
माधव बोले विप्रा जाउनि सांगा विशाळनयनेला ॥
आलों न करीं चिंता सिद्धीलागीं तुझा च पण नेला ॥ ४८ ॥
घेउनि आलों यदुपति ऐसें वदतां त्वरें द्विजातीनें ॥
हर्षोत्कर्षे करुनी केलें नमना तया द्विजा तीनें ॥ ४९ ॥
विदर्भराया कळतां गेला भावें हरीस सामोरा ॥
हर्ष मनीं त्या झाला नव मेघा देखुनी जसा मोरा ॥ ५० ॥
करुनी पूजन विनवी जानवशासी चला रहायाला ॥
आबाळवृद्धलोकां इच्छा या श्रीमुखा पहायाला ॥ ५१ ॥
अंबालयीं च राहूं हरि सांगे राजया महामतिला ॥
परिसुनि हरिवाक्यासी राजा करि तेथवां त्वरें नतिला ॥ ५२ ॥
मिरवत जातां मार्गीं म्हणती जन रुक्मिणीसि जोडा हो ॥
अवलोकनें निवाला वाटे संसारजन्य जो डाहो ॥ ५३ ॥
रुक्मा सांगे चैद्या आला गोपाळ करील कलहास ॥
लग्नघडी संपादा नाहीं तर होय कीं सकल हास ॥ ५४ ॥
येउनियां निज गेहा बोले आणा वधूसि बाहेर ॥
लग्नघडी भरली हो वर घेउनि या करोनि आहेर ॥ ५५ ॥
ऐकुनि सुतवचना शुद्धमती बोले विदर्भरायासी ॥
आधीं कन्या धाडा भगवतिची अर्चना करायासी ॥ ५६ ॥
सांडुनियां कुळधर्मा कोंनि करावा बळें अनाचार ॥
असेल कुळीं जो तो अचरावा कीं कसा हि आचार ॥ ५७ ॥
कोपें बोले रुक्मा मूढा या बायका अनाचारा ॥
वर्ते यांच्या बुद्धी तो नर पावेल सत्य नाचारा ॥ ५८ ॥
अंबास्थानीं यादव हरुनी जातिल जरी वधूला ते ॥
लज्जा होइल तैसी हाणी जैशी शिरीं अरि लाते ॥ ५९ ॥
नृप बोले रे मूर्खा होता बहु भरंवसा तुझा मातें ॥
परि कळतें मज आजी निर्बल अणिरुडविलेंसि नामातें ॥ ६० ॥
क्रोधें रुक्मा वदतो आजी वधितों यदूसमूहातें ॥
नेउनि रुक्मिणि अंबादर्शन करवीन मी चैमूहातें ॥ ६१ ॥
मागधचैद्यांच्या त्या वीरां धाडी वधूसि सांगातें ॥

---

२३ अटवी=अरण्य २४ चमू=सेना.

वैदर्भी करि पूजा देवीची आदरें शुभांगा ते ॥ ६२ ॥
विनवी माते अंबे दे वर मजला हरी च नवरा हो ॥
शिशुपाळ दुष्ट गमतो मातें चंद्रा जसा अरी राहो ॥ ६३ ॥
स्तवितां प्रसन्न स्तवनें झाली अंबा शिवा हि ते काळीं ॥
दिधली प्रसादमाला रुक्मिणि तोषे मनांत ते काळीं ॥ ६४ ॥
आला हरि ते समयीं नेणे कोणी दळांत त्याला हो ॥
अर्पुनि माळा कंठीं रुक्मिणि मानी मनांत सुखलाहो ॥ ६५ ॥
पाणिग्रहण करोनी बसवुनि नेतां तयेसि दिव्य रथीं ॥
सावध होउनि पुसती सुवासिनींसी समग्र वीर रथी ॥ ६६ ॥
त्या म्हणती रुक्मिणिनें वरिला कीं आज कृष्ण यदुराजा ॥
हीनपराक्रम तुम्ही वहनि लज्जावधू स्वनगरा जा ॥ ६७ ॥
वनितावचनें खोचुनि हृदयीं वीरहि समस्त फिरले हो ॥
यादव पाहुनि त्यातें युद्ध कराया चमूत शिरले हो ॥ ६८ ॥
झालें युद्ध तयांचें शस्त्रीं अस्त्रीं अनेक शरजाळीं ॥
कृष्णप्रतापअग्नी यादवहस्तें अरी तृणें जाळी ॥ ६९ ॥
शिशुपाळा श्रुत झालें नेली नवरी हरोनि यदुराजें ॥
युद्ध कराया त्याशीं निघता झाला स्वकीय सह राजे ७० ॥ ॥
मार्गीं मागध बोले त्यातें हा काळ साह्य गोपाळा ॥
युद्धीं राजे मज सह जिंकुनियां पळविले च शिशुपाळा ॥ ७१ ॥
जरि तूं रणासि जासी तरि अजि सेनेसहीत मरशील ॥
कृष्णबळें यादव जगजेठी अमरांस ही समरशील ॥ ७२ ॥
समजावुनि नाना युक्तींनीं आणिला फिरोनि नगरांत ॥
हित मानित दमघोष हि पुत्रप्रद तूं मला च समरांत ॥ ७३ ॥
वार्ता कळतां रुक्मा सिद्ध करोनी स्वसैन्य समराला ॥
गर्जोनि म्हणे परिसा शिक्षा करणार मी हि अमरांला ॥ ७४ ॥
त्या माझी भगिनी हा गोवळ नेतो कसा च हें पाहूं ॥
वीरांसि म्हणे समरीं यदुंच्या माना समग्र कापा हूं ॥ ७५ ॥
नाणीं सोडवुनी जरि भगिनी तरि मी न ये चि नगरास ॥
जाईन वना अथवा प्राणा देईन भक्षुन गरास ॥ ७६ ॥
शपथ करूनियां ऐशी आला कृष्णासमोर भांडाया ॥
हरि सांगे निज वीरां पळवा येयोनि बोलभांडा या ॥ ७७ ॥

---

२५ लज्जावधू=लज्जारूपी स्त्री.

जें जें धनु घे रुक्मा तें तें छेदी यदुपति तत्काळ ॥
सरली धनुसामुग्री झाला मेघासि त्या शरत्काळ ॥ ७८ ॥
स्यंदन[26] सोडुनि चरणीं धावे रथनिकट अश्व माराया ॥
कृष्णासि म्हणे चोरा कैशी चुकविशिल अधमा राया ॥ ७९ ॥
येतां जवळ हरीनें धरिलें धनु घालुनी तया कंठीं ॥
बंधन करितां स्तभीं लज्जित युगसम त्रुटी[27] लवा कंठी ॥ ८० ॥
वदन विटवुनि त्याचें केला अपमानरूप आहेर ॥
वैदर्भी मनिं भावी तुटलें अजिपासुनी च माहेर ॥ ८१ ॥
कृष्ण म्हणे गे कांते बधू विनमी म्हणोनि ओंवाळीं ॥
करिं भाउबीज यातें चित्तीं कल्पूनि आजि दिपवाळी ॥ ८२ ॥
यादव म्हणती वहिनी आनंद दिला तुम्हांसि मामांनीं ॥
मामी बहु मानाची येथुनि आता पुढें सिमा मानीं ॥ ८३ ॥
सोडुनि दिधला रामें हरिवरि रागें भरूनि कातेर[28] तो ॥
देसी हरि हरि जनगुरू भवजलनिधि नर कसा निका तरतो ॥ ८४ ॥
रुक्मिणिसहीत गेला हरि तो क्षेत्रास या प्रभासा हो ॥
विधि हर सुर वीर मुनी न शकति ज्याची कवि प्रभा साहों ॥८५॥
वैदर्भा श्रुत झालें नेली कन्या हरोनि यदुपतिनें ॥
कन्यादान कराया निज संपत्ती समग्र नरपति नें ॥ ८६ ॥
राहूनि श्रीकृष्णा आणवि वऱ्हडी हि मूळ धाडुनिया ॥
वसुदेवदेवकीप्रति विनती लिहि कीं समस्त झाडुनि या ॥ ८७ ॥
आधीं शुद्ध मतीनें नृप बसवी देवदेवकाला तो ॥
आला सहपरिवारें घेउनि वसुदेव देवकीला तो ॥ ८८ ॥
सुमुहूर्तीं शुभ लग्नीं सुदिनीं द्विजलाविती सुलग्नासी ॥
कंकण बांधिति हस्तीं पूर्णानंदीं सदा निमग्नासी ॥ ८९ ॥
विनवी नृपती कृष्णा करिजे आपण चतुर्थ होमातें ॥
दुखिया करुणा ईक्षणमात्रें भक्तां चतुर्थ हो मातें ॥ ९० ॥
उत्सव झाला फार चि मग अर्पिति याचकांसि दानासी ॥
याचकइच्छे गज रथ हय धन मणि भूमिका सिदा नासी ॥ ९१ ॥
सुनमुख पहावयाला वाऱ्हाडिणि सह मिळोनि वरमाय ॥
आली तिच्या बसाया मांडीवरि ते हि सून पर माय ॥९२ ॥
लेववुनी बहु लेणीं शेवटिं घाली गळ्यांत कारलिया ॥

---

२६ स्यंदन=रथ. २७ त्रुटी व लव=अत्यल्प काळ. २८ कातर=भितरा.

कारलिपातें भक्षी त्यागील कशी व्रतागिकारलिया ॥ ९३ ॥
श्रीरंग आणि रुक्मिणि दोघें शोभति बहूत बैहुलां हो ॥
घे बैसोनि विमानीं सहस्रनयन पुरुहूतँ बहु लाहो ॥ ९४ ॥
षड्रस पक्वान्नें यदुपति नरपति सर्व भोज भोजन हो ॥
करिती पावति तृप्ती ध्या श्रवणीं तुम्हि हि नित्य भो जन हो ॥९५॥
साडे झाले नृपती विनवी ध्याह्या सुता हि गोपाळा ॥
दिधली प्रियसुतसम हे पुत्रस्नेहें तुम्हीं इला पाळा ॥ ९६ ॥
सजळ करुनि नयनातें शुद्धमती विनवि त्या स्वविहिणीसी ॥
ओटींत घातले हो तुमच्या म्या आजि मायबहिणीसी ॥ ९७ ॥
यापरि कन्यादाना करुनियां तो नृप स्वनगरासी ॥
जातां आंदण दे जामाता गज रथ सुवर्णनगराशी ॥ ९८ ॥
द्वारावतीस आला घेउनि जाये हरि स्व गेहातें ॥
मधुसूदन लक्ष्मीसह लक्ष्मीपूजन करी स्वयें हातें ॥ ९९ ॥
भरुनी दुग्धें वाटी माता लावी हरीचिया ओंठीं ॥
ते शेषदुग्धवाटी सासू लावी सुनेचिया ओंठीं ॥ १०० ॥
वद हरि कीं मी धालों लक्ष्मी घेऊनियां गृहा आलों ॥
वद मुलि कीं मी धालें सोन्याच्या पाउलें गृहा आलें ॥ १०१ ॥
ऐसें वदतां हांसे ये पुरुषां आणि पूत नारींस ॥
वारंवार विलोकिति सर्व रमे आणि पूतनारींस ॥ १०२ ॥
ते रेवती रमेला हातीं धरुनी गृहामध्यें फिरवी ॥
गृहरीति नीति सांगुनि तिज लागुनि सर्व भाम्वसा निरवी ॥ १०३ ॥
रुक्मिणि बोले बाई ज्या तुम्ही दाविले सुवाटेतें ॥
सुखकारक कीर्तिप्रद म्हणउनि हित बहु मला हि वाटे तें ॥ १०४ ॥
घेडा नाचवितां हो स्मरती कुळदेवतांसि सन्मानें ॥
आप्तां सोयरियासी निरोप देती तदा बहु मानें ॥ १०५ ॥
लक्ष्मीसहीत सुखधन हरि तो द्वारावतीमध्यें नांदे ॥
श्रवणें स्मरणें मननें दास्यें सख्यें निजपद दीनां दे ॥ १०६ ॥
कृष्णाश्रयासि करुनी कृष्णकथा ही सुधेहुनी मधुरा ॥
कथिली जन पावन करणारी सौतामध्यें दुजी मधुरा ॥ १०७ ॥

---

२९ बहुला=बहुल्याधर. ३० पुरुहूत=इंद्र. ३१ पूतनारि=पूतनेचा शत्रु. ३२ काशी-कांची इत्यादि सात पुर्‍यांमध्यें जशी मथुरा पुरी ( ही दक्षिण हिंदुस्थानांत आहे ) तशी.

श्रोते हो या आर्याश्रवणें सुप्रिति च तुम्हाला हो ॥
निशिदिनिं आर्याछंदीं च सखारामाचिया सुता लाहो ॥ १०८ ॥

समाप्त.

---

## सदाशिवकविकृत

# उमाविलास*

अंकावरी धरूनि शंकर पार्वतीसी । नाना विलास करि वैसरहीत तीशीं ॥
तों पातला सुरमुनी 1नमुं त्र्यंबकातें । त्या देखुनी परम लज्जित अंबीका ते ॥१॥
तेंव्हां उठोनि गिरिजा सदनात गेली । ऐसें विलोकुनि वदे तिसि चंद्रमौळी ॥
शंका मनांत न धरीं उघडीं कवाड । दाक्षायणी वदत लागलें काय वेड ॥ २ ॥
आले बहू सुरमुनी तव पाद सेवूं । त्यां देखता कशि मि बाहिर नग्न येऊं ॥
त्यांचें मला भय नसे शिव वाक्य बोले। जा जा वधू म्हणत शाहणे फार झाले ॥३॥
माझें शहाणपण पाहसि काय आतां । गेला असे कथुनि पूर्वी च गे विधाता ॥
ऐसें वदे शिव तिलें परि ते न मानी । तों पातले समयिं नारद 2त्या सुठाणीं ॥४॥

बोले नारद शांभवा वधु बहू टाकोनि बोले 3कशी ।
नाहीं रे तुजलागिं वैभव गमे यासाठिं तूं सोसिसी ॥
कांतेला पति तो चि प्रीय हृदयीं जो कां असे जोडका ।
संपत्तीविण 4कांत तो वधु गणी जैसा कडू दोडका ॥ ५ ॥
तूं तीतें अतिआदरें करुनियां अर्धांगणीं वाहसी ।
ते तूझे वचनासि तुच्छकरिते हें तू 5कसें सोसिशी ॥
जेथें कामिनिचें असे बळ बहू 6निर्मोल्य तेथें पती ।
7तेणें कानन सेवणें परि न त्या यावें सुधामा प्रती ॥ ६ ॥
आर्या कामिनिचे कठोर वचनें क्रोधाग्नि तो चेतला ।
आज्याचा 8भग हो प्रजन्य वहता श्रीनारदें सिंचिला ॥
तेंव्हां स्त्रीगृह 9सोडुनी पशुपती कोपोनि गेला 10वना ।

---

* या प्रकरणाची एक प्रत रा० रा० वामन दाजी ओक याजकडून व एक रा० रा० रामजी धोंडजी खानोलकर यांजकडून आमचेकडे आली. १ अंक=मांडी. २ वास=वस्त्र ३ सुरमुनी=नारद ४ त्र्यंबक=शिव. ५ सदन=गृह. ६ दाक्षायणी=पार्वती. ७ धाम=घर. ८ आज्य=तूप

1 " शिवदर्शनातें पाठ." 2 " शिघ्र मुनी " पाठ. 3 " तुशीं. " पाठ. 4 " त्या वधू गणितसे " पाठ. 5 " किती " पाठ 6 " निर्मोल " पाठ. 7 " जीणें काय तथा सुधाम असुनी जावें अरण्याप्रती " असाही पाठ आहे. 8 " भरण " पाठभेद 9 " टाकूनी " पाठ. 10 " वनीं " पाठ.

11ऐसें जाउनि अंबिके प्रति मुखें त्या सांगती अंगना ॥ ७ ॥
तुला शिवें वाहिलें रम्य वाचे । न 12मानिलें तूं निज वाक्य त्याचें ॥
म्हणोनियां टाकुनि तूज गेला । ऐकोनि तीतें बहु कोप आला ॥ ८ ॥
ऐशी सख्यांची परिसोनि वाणी । सखेद चित्तीं वदली भवानी ॥
हा तो अकर्मीक असा चि आहे । मी सांगतें लक्षण तें चि पाहें ॥ ९ ॥
मला पूर्वीहूनी मदनअरि हा ठाउक असे ।
नसे पाठीपोटीं सकळ हि कुळा शून्य चि असे ॥
पिता माता बंधू भगिनि चुलता मातुळ नसे ।
13अकूळी हा आहे 14म्हणुनि नृकपाळा धरितसे ॥ १० ॥
करी वाहे यानें रथ त्यजुनि बैलावरि बसे ।
सुवस्त्रें सांडूनी गज अजिनें प्रावर्ण विलसे ॥
त्यजोनी कैलासा 15सम स्थळ स्मशानीं च बसतो
पिशाच्यांचे16 संगें अनुदिनि 17महा नृत्य करितो ॥ ११ ॥
सुरत्नें सूमुक्तें कनकमणिमाळांसि न धरी ।
मनुष्यांचीं डोकीं रुधिर सहितें कंठि च धरी ॥
सुगंधादि द्रव्यें त्यजुनि उधळी भस्म शरिरीं
सुवर्णाचीं पात्रें न धरुनि करीं खर्पर धरी ॥ १२ ।
तिरस्कारोनीया सुरतरुचि पुष्पादि कमळें ।
अतिप्रीतीनें जो निज शिरिं धरी धत्तुरफुलें ॥
सुधा अव्हेरूनी विष घट चि प्राशी पशुपती ।
सदा मागे भिक्षा अभिनव असा पार्वतिपती ॥ १३
मृदंगादी वाद्यें न धरुनि करी शंखस्फुरणा ।
अभावें ही ध्यातां त्वरित चुकवी जन्ममरणा ॥
अनेकां भोगांतें अवगणुनियां योग करणें ।
असा भंगी चंगी कुळवधु तया काय करणें ॥ १४ ॥
मला पर्णू आला तधिं जननि तातासि वदली ।
असे हा म्हातारा नृपति न दिजे यासि अवळी ॥

---

९ अगना=स्त्रिया १० अरि=शत्रु. ११ करी=हत्ती. १२ वाह=घोडे. १३ यानें =वाहनें. १४ अजिन=कातडें.

11 "ऐसें देखुनि पार्वतीप्रति दुती त्या सांगती येउनी" पाठ 12 "मानुनी त्वां" पाठ. 13 "अकाळीं" पाठ 14 "म्हणवुनि कपाळा" पाठ 15 "स्थळ मग" पाठ. 16 "सांगातें" पाठ. 17 "महा" पाठ.

विरागी हा आहे निपुण नर संसारिक नसे ।
अशाला हे देतां तरि इस पुन्हा हा भव नसे ॥ १५ ॥
असें वर्जी माता परि मम पित्यानें न मानिलें ।
विधात्यानें माझ्या निढळिं लिहिलें तेंच घडलें ॥
मुखें जें मातेनें कथिलें [18]दिसतें त्याहुनि दुणें ।
[19]असो आतां कोठें पशुपति असे शोध करणें ॥ १६ ॥
सख्या हो जा वेगीं त्रिपुरहर शोधा महिवरी ।
असे कोणे स्थानीं श्रुत मज करा या लवकरी ॥
असें ऐकोनीयां भ्रमण करिती त्या पिकरवा ।
[20]सख्या जावोनीयां हिमगिरिवरी देखति शिवा ॥ १७ ॥
दुरोनी देखोनी फिरुनि मग येती निज स्थळा ।
कथीती अंबेतें हिमगिरिशिरीं तो निरखिला ॥
धरोनी रुद्राक्षा जपत वदनीं श्रीरघुविरा ।
विराजे तो भूतावळिसहित ऐसा न दुसरा ॥ १८ ॥

उदास तूझा दिसतो पती गे । कैसा तुते वरिल तो नकळे गिरिजे ।
[21]त्या दूतिका कथिति या परि रम्य वाणी । येरीकडे विकळ शंकर काननीं ॥
कामानळें व्याकुळ होउनीयां तटस्थवृत्ती मग बैसुनीयां ॥ १९ ॥
आलों म्हणे मी त्यजुनि प्रियेसी । त्या नारदें ठकविलें मज निश्चयेसी ॥
या पर्वतावरि स्त्रिया तरि कोण आल्या । दृष्टी पडोनि पवनापरि शीघ्र गेल्या ॥२०॥
त्यांचे कटाक्ष नयनीं निरखोनी मातें । या काननीं न करवे तपसाधनातें ॥
आलों उगा चि म्हण मी त्यजुनी प्रियेसी । त्या नारदें ठकविलें मज निश्चयेसी ॥२१॥

विचार कांही बरवा न केला । संसार हा स्त्रीविण व्यर्थ गेला ॥
पुनःपुन्हा बोलत शंभु भोळा । उगा च मीं लागलों विप्रबोला ॥ २२ ॥
आता करावें तरि काय येथें । तों पातला नारद शीघ्र तेथें ॥
मुनी म्हणे कां मन [22]भंग केलें । [23]तो बोलिला का घर बूडविलें ॥२३॥
स्त्रीवांचुनी तो मज राहवेना । काकुळती ही तिज जाववेना ॥
तेव्हां वदे नारद सांडि चिन्ता । मंदाकिनी तूं करिं [24]शीघ्र कांता ॥२४॥
शरीर तीचें [25]शुभ हेमवर्णा । स्वरूप तीचें तरि कोण वर्णी ॥

---

१५ पिकरवा=कोकिळेसारखा गोड आहे शब्द ज्यांचा असा. १६ कानन=अरण्य. १७ मंदाकिनी=भागीरथी.

18 " पहिलें त्याहुनि " पाठ. 19 " बरें आहे " पाठ. 20 " विलोकोनी येती " पाठ. 21 " ऐशी दुती " पाठ. 22 " व्यग्र " पाठ 23 " शंभू ह्मणे त्यां " पाठ. 24 " नीज " पाठ. 25 " शुचि " पाठ

या ऊपरी ते [26]असे हो अपर्णी । जाणोनियां शंकर तीस पर्णी ॥२५॥
गंगेशीं करितां विलास विसरे [27]कैलासभू पार्वती ।
नाना नर्तन गायना [28]करि तदां बैसोनियां पर्वतीं ॥
वस्त्रें सुंदर भूषणें उभयतां लेती नवीं नित्य हो ।
घेती सौख्य असें परंतु न विटे त्यांचें कदा चित्त हो ॥ २६ ॥
हे चर्या नयनीं विलोकुनि मुनी आला उमाभूवनी ।
[29]बोले हा जननी शिवें तुं त्यजुनी केली दुजी कामिनी ॥
[30]क्रीडा रम्यवनीं [31]असंख्य करुनि भोगी सुमदाकिनी ।
हें तूतें कळुनी जीवत अवनी आहेसि तूं आजुनी ॥ २७ ॥
तेव्हां ते सति आननें तव ह्मणे कर्तृत्व हें नारदा ।
मी त्यातें वदतें अखंड परि तो चित्तासि नाणी कदा ॥
हें तों त्या प्रति तां च रे शिकविलें तो तों असे सावडा ।
नाहीं या उदमांत मी मनि ह्मणे तो ठाइंचा जोगडा ॥ २८ ॥
ऐसें ऐकुनि त्या हिमाद्रितनया बोले सख्यांसी मुखें ।
आता येइल गे सदाशिव तरी वर्जा तुम्ही त्या सखे ॥
जो मातें त्यजुनी रमे सवतिशीं तो काय आतां किजे ।
गेल्या प्राण हि गे परी शव हि त्या दृष्टीसि ना घालिजे ॥ २९ ॥
[32]जाल होति विनवू सुमतीनें । घेतलें घर कसें सवतीनें ॥
काय सार्थक या वरि कचुनी । वक्त्र त्यासि न दाखवि लोचनीं ॥ ३० ॥
झाली व्याकुळ अतरीं महिवरी लोळे रडे नेटकी ।
पीटी मस्तक हस्तकीं करुनियां काढी चिरी कंचुकी ॥
ऐसें तें गिरिजेस दुःख असतां झाली मदें विव्हळा ।
बोले हा भुलवूनियां सवतिनें केला अम्हां वेगळा ॥ ३१ ॥
व्याकुळा मग वदे शिवदारा । ना रुचे चि मज विक्षणवारा ॥
होतसे बहुत देहिं उबारा । चंद्रकीर्णे दिसती रवि बारा ॥ ३२ ॥
कोकिळांसि उडवा पळवा गे । कृष्णपुत्र मदना पळवा गे ॥
रतिनाथ तरि हा पळवा गे । होतसे शरिर हें पळवा गे ॥ ३३ ॥
लौकिकीं म्हणति शीतळ इंदू । हा तरी मज गमे विषबिंदू ॥
हार वाटति विखार चि जैसे । स्वामि आजुनि न येति च कैसे ॥ ३४ ॥

---

१८ पर्णी=लग्नकरी ( सं० परिणय=विवाह. )
26 " असूनी " पाठ. 27 " कैलासीची " पाठ. 28 " करितसे " पाठ. 29 " शीवें हो जननी तुतें त्यजुनियां " पाठ 30 " क्रीडे " पाठ. 31 " सुसौख्य " पाठ. 32 " ज्यासि घेतु विनवी सुमितीनें " पाठ.

बोलती जन सदाशिव भोळा । त्याचि तों दिसें अगाध चि लीला ॥
तापसांत म्हणवी मुनि योगी । कवि[33] हा सुरनदी[34]तरि भोगी ॥ ३५ ॥
यापरी वदुनि मूर्च्छित[35] ते पडे । वक्षभाळ पिटुनी वदनीं[36] रडे ॥
प्राण तो नयनिं येउनि राहिला । देखुनी त्वरित नारद चालिला ॥३६॥
जाउनी मुनि म्हणे मग शांभवा । तुजविना बहुत व्याकुळ ते भवा ॥
प्राण सांडिल गमे हृदयीं मला । ऐकुनी मग सदाशिव चालिला ॥ ३७ ॥
जाउनी मुनि म्हणे विरूपाक्षा । स्थीर व्याकुळ असे हरिणाक्षा ॥
वाक्य ऐकुनि उठे दशपाणी । जान्हवी नयनिं ढाळित पाणी ॥ ३८ ॥
जान्हवी वदतसे मग त्यातें । काय तूं त्यजुनिं जासिल मातें ॥
शंभु बोलत असे शृणु गंगे । चाल तूं श्रमहरे मजसंगें ॥ ३८ ॥
नेसि ते स्थळि च रे जरि तूं मला । क्रोध येइल बहू गिरिजा इला ॥
गुप्त ठेविन म्हणे तुज सुंदरी । दृष्टि ही न पडु दे तिचि तूवरी ॥ ३९ ॥
ते म्हणे वचन द्या मज हस्तकीं । ठेविली मग शिवें निज मस्तकीं ॥
या परी करुनि अदृश्य गौतमी । पातला शिव त्वरें गिरिजाश्रमीं ॥४० ॥
आला उलघोनि गिरीकपाटें । तों पार्वतीनें दिधलीं कपाटें ॥
[37]तो पातला शंकर शीघ्र तेथें । [38] दक्षात्मजा बोलत कोण येथें ॥४१॥

बोले श्रीहर नीलकंठ मि असे कां ओळखी सांडिसी ।
आहे ठाउक तूं मयूर मजला टाहो किती फोडिसी ॥
नोहे मोर मि काळकूटधर गे प्राथीं सुबद्धांजळी ।
येथें कां तरि पातलासि भुजगा जावें तुवां भूतळीं ॥ ४२ ॥
नोहे पन्नग मी शशांकवदने मी ऐक शूळी असे ।
जावें वैद्यगृहासि औषधगुणें तो शूळ नाशीतसे ॥
मी तो शूळि नसे मला बहु रसें स्थाणू असें बोलती ।
हें तों नाम वदे तरू तरि किजे वस्ती वनीं पर्वतीं ॥ ४३ ॥
मी तों स्थाणु नसें असें पशुपती कांते मला नेणसी ।
बैलाचें तरि काय काम मजला शृंगें शणी रोंविसी ॥
जें जें नाम वदे तया उडविसी मी रुद्र आतां प्रिये ।
रामाचें करिं दास वानरपती मी वश्य ना निश्चयें ॥ ४४ ॥
हें व्यंगोत्तर ऐकतां पशुपती विस्मीत झाला मनीं ।
आहे कामिनि हे परी मजहुनी भासे बहू शाहणी ॥

---

33 "हा तरी" पाठ. 34 "कशि" पाठ. 35 "व्याकुळ" पाठ. 36 "मग ते" पाठ. 37 "येऊनि शंभू मग हाक मारी" पाठ. 38 "ती बोलली हा असें कोण दारीं" पाठ.

आतां हे[39] करणें चि वश्य म्हणुनी तोडोनी [40]टाकी कड्या ।
जाऊनी धरितां चि ते वदतसे सोडीं मला जोगड्या ॥ ४५ ॥
तीतें शंभु पुसे कयीं [41]बहु रसें का रूसलीसी तरी ।
बोले ती मजला त्यजोनि दुसरी केली कशी सुंदरी ॥
[42]नाहीं जाणत मी सखे तुजविना गेलों तपासि वना ।
[43]आलों मी तुझिया भयें परि नये कां येश या प्रार्थना ॥ ४६ ॥
ऐकें गे सखये तुतें त्यजुनियां गेलों तपातें वनीं ।
तूं मातें नसतें च दूषण कसें तें लाविसी या जनीं ॥
मी तैसा व्यभिचार कर्म न करीं योगास तों आचरें ।
देवद्वीज विधीविधान करुनी आलों विचारीं बरें ॥ ४७ ॥
तुझें वक्त्र कां शंकरा म्लान झालें । अनुष्ठान गे म्यां निराहार केलें ॥
तुझे लोचनीं रक्तता [44]कैंवि आली । [45]म्हणे भक्षिल्या वह्नि त्यांची च लाली ४८
तनू [46]कां तुझी व्यापिली जीवनीनें[19] । पथीं चालतां घाम आला उन्हानें ॥
वधूचे रदांचा[20] दिसे दंश ओठीं । उठे[47] शंख नादें नसे मिथ्य गोष्टी ॥ ४९ ॥
नखांचीं क्षतें दीसती ठाइं ठाईं । म्हणे खेळलों फार भूतांशि पाहीं ॥
बहू येतसे वास तूझे शरीरीं । पुजा भक्ति केली सुगंधोपचारीं ॥ ५० ॥
कटीं कंकणाचें कसें चिन्ह झालें । सखे हें तरी मारिलें शृंग बैलें ॥
अशी सर्व संपादणी तेहि केली ॥ तदा पार्वतीची दिठी उर्ध्व गेली ॥ ५१ ॥
पृच्छा पार्वति शंकराप्रति करी [48] हें काय आहे शिरीं ।
प्यालों मी विष तें दहा बहु करी स्वगांबुं[21] माथां धरीं ॥
स्वगांबू वदसी तरी वदन कां त्या चंद्रचूडामणी ।
नोहे आनन [49]तें सुपंकजें[22] असे हें सत्य मानीं मनीं ॥ ५२ ॥
केलें हें प्रभु मान्य म्यां परि तया कां नेत्र हो दीसती ।
नोहे लोचन मीन ते तळपती पृच्छा करीसी किती ॥
कैशा शोभती भ्रूलता कायिं मुखें हें तूं मला त्र्यंबका ।
ते कांते अतिवक्रता सुउदकीं हेलावती वीचिका ॥ ५३ ॥

---

१९ जीवन=उदक २० रद=दात २१ अंबु=पाणी. २२ पंकज=कमल.

39 "हंम करीन" पाठ. 40 "गेला" पाठ. 41 "मज सखे" 42 "आतां घेउनि तीजला निशिदिनीं क्रीडा तुम्हीं जा वनीं" पाठ. 43 एथें कांहिं तुम्हांसि कारण नसे भोगा नवी कामिनी" पाठ. 44 "फार" पाठ. 45 "वनीं" पाठ. 46 "ही दिसे भीजली" पाठ. 47 "द्वते शख ओंठीं" पाठ. 48 "ही कोण नारी" पाठ. 49 "चंद्रबिंब दिसतें तू" पाठ.

50कां कृष्णालय वेणिका विलसते हें सांग शृंगीपते ।
हे तों पद्मपरागसेवनकराया बैसले भृंग ते ॥
श्रीमुक्ताफळमाळ शोभत गळां कैशी कथीं ये क्षणें ।
हे तों सान तरंग त्यांत उठती ऐकें कुरंगेक्षणे ॥ ५४ ॥
कां वक्षीं दिसती कुचद्वय शिवा हें सांग आतां मला ।
ते अबूतिरिं चक्रवाक 51मिनले तें अन्य भासे तुला ॥
मी तों सत्य समस्त सांगत तुला भासे जरी अन्यथा ।
देतों मी तुज दिव्य 52आज ललने हा शोध सांडीं वृथा ॥ ५५ ॥
वदे पार्वती दिव्य देईं पिनाकी । म्हणे शंभु डोहांत बांधोनि टाकीं ॥
न माने तरी स्नेह तावीं भवानी । तया माजि घालीन मी शीघ्र पाणी ॥५६॥
असो हें हि कुंभांत घालीं भुजंगा । धरोनी करीं काढितों मी निसंगा ॥
जरी दक्षकन्ये नये हें चि चित्ता । तरी दैवतें दाखवीं उग्र आतां ॥ ५७ ॥
तयांचे पदीं ठेवितों हस्त मीं गे । जरी सत्य आहे तरी काय भी गे ॥
वदे पार्वती बोलतां फार वाचे । परी मूळ शोधा तुम्ही बोलण्याचें ॥ ५८ ॥
53घालोनी कटिं सर्प दाखवुं तरी कर्णीं गळां हस्तकीं ।
54बांधोनी जळिं टाकु मीं तरि तुझ्या गंगा असे मस्तकीं ॥
आणूं तावुनि स्नेहें[२३] मी तरि तुझ्या नेत्रांत वन्ही सदा ॥
दावूं देव तरी समस्त 55हृदयीं ते वंदिती त्वत्पदा ॥ ५९ ॥
ऐसें ऐकुनियां सदाशिव बहू संतोषला अंतरीं ।
कंठीं घालुनियां मिठी कवळितो ते शांभवा सुंदरी ॥
झालीं तीं शिवशक्ति एक चि तदा ना भाव रे दूसरा ।
यासाठीं पुजितो सदाशिव कवी श्री पार्वतीशंकरा ॥ ६० ॥
ब्रह्मेंद्रादिकविष्णुयोगि तुजला ध्याती मुनी मानसीं ।
तो तूं कामिनिशीं विलास 56करितां ग्लानोतरें बोलसी ॥
शंभो पार तुझा अपार न कळे तूं शर्व सर्वांतरीं ।
सद्भावें विनवी सदाशिव कवी त्यातें प्रभू उद्धरी ॥ ६१ ॥

सदाशिव कविकृत उमाविलास समाप्त.

---

50 " कर्णी लोलक " पाठ. 51 " अबलें " पाठ. 52 " घेइ " पाठ. 53 " घालूं मी " पाठ. 54 " टाकू मी उदकांत या तरि वसे मंदाकिनी" पाठ. 55 "अवनी वंदीतसे सर्वदा " पाठ. 56 " करुनी " पाठ.

२३ स्नेह=तेल.

## * शंकराचार्यकृत हस्तामलकग्रंथाचें शिवरामकृत महाराष्ट्र भाषांतर.

**कस्त्वं शिशो॰ —**

बाळा कोण अहेस पूर्ण सखया कोठोनि आलासि रे ।
कोणाचा सुत नाम काय कवण्या ठायासि तूं जासि रे ॥
आतां जें पुसिलें समग्र अपुला वृत्तांत सांगे अम्हा ।
माझ्या स्नेहसुधाकरा उसळवी त्वत्प्रीतिचा चंद्रमा ॥ १ ॥

**नाहं मनुष्यो॰ —**

नव्हे मनुष्य देव मी नव्हें चि यक्ष विप्र मीं ।
नव्हें धराधिपाळे मीं नव्हे चि वैश्य शूद्र मीं ॥
तनूपनीत मी न मीं गृहस्थ ना वनस्थ मीं ।
न हंस आर्यहंस मी स्वबोधमात्र मीं चि मी ॥ २ ॥

**निमित्तं मनः॰ —**

जसा जगास चेष्टवी निमित्तमात्र तो रवी ।
तसा च मी मनाक्षिआदि इंद्रियांस चाळवीं ॥
समस्त अस्त पावल्या असे स्वबोध तो चि मी ।
जगत्त्रयांत सांचलों परब्रह्मस्वरूप मीं ॥ ३ ॥

**यमग्न्युष्णवत्॰ —**

जयाचिया महाश्रयें मनादि सर्व इंद्रियें ।
जडात्मकें प्रवर्तताति आपुलेन वीषयें ॥
स्वभाव अग्नि उष्णता अचंचल स्वरूप जें ।
स्वबोधमात्र तो चि मी सुखस्वरूप जाणिजे ॥ ४ ॥

**मुखाभासको॰ —**

सुदर्पणांत भासतां दुज्या मुखासि देखतां ।
तथापि जाहलीं न तीं मुखें द्विधा चि तत्वतां ॥
तसा चि मी बहूमतींत बिंबतां न भेदलों ।
मृषा जिवत्व कल्पिती अखंडरूप कोंदलों ॥ ५ ॥

**यथा दर्पणाभाव॰ —**

अभाव दर्पणा तयीं मुखावभास ही नसे ।
तरी विकल्प ही न तें मुख स्वयें सदा असे ॥

---

* मूळग्रंथ " अनेके " या सदराखालीं शंकराचार्यांचे प्रकरणांत छापला आहे.

तशी मती विरे तदां उपाधि वेगळा स्वतां ।
विशुद्ध चित्स्वरूप चि जसा तसा अहें अतां ॥ ६ ॥

मनश्चक्षुरादे०—
मनादि इंद्रियां सहीत खेळतो पराक्रमी ।
मनादि इंद्रियांचि ही मनादि इंद्रियें चि मीं ॥
मनादि इंद्रियांस ही न सांपडें चि शेवटीं ।
प्रसिद्ध बोधमात्र मी असें जगत्रयीं तटीं ॥ ७ ॥

य एको विभाति०—
विशुद्ध चित्प्रकाश जो विराजमान एकला ।
बहुप्रकार भासतो बहु मतींत बिंबला ॥
बहू घटोदकीं जसा दिनेश एकला दिसे ।
तसा च देह मीं अखंड कोंदलों असें ॥ ८ ॥

यथानेकचक्षुः०—
जसा अनेक डोळियां दिनेश हो उदेजुनी ।
प्रकाशवी पदार्थ ही अपाररश्मिच्या गणीं ॥
तसा बहूविधा मती प्रबोधवीत मी असें ।
म्हणोनि मत्स्वरूप तें प्रकाशतें अनारिसें ॥ ९ ॥

विवस्वत्प्रभातं०—
रवी प्रभे करी जशी दर्शोनि वस्तु घेइजे ।
जडासि भासक तथा विकर्तृता न सेविजे ॥
तसें चि मत्प्रभावळें करी विहार हे मती ।
असा स्वयंप्रकाशक भरोनि खेळतो भुतीं ॥ १० ॥

यथा सूर्य०—
जसा चळाचळोदकीं दिनेश एक बिंबला ।
तया उपाधिनें नसे स्थिरावला न हालला ॥
तसें चि बुद्धि चंचळा स्थिरावतां हि देख पां ।
अकंप मी विराजतो स्वबोधमात्र जाण पां ॥ ११ ॥

घनच्छन्नदृष्टिः०—
परेनि दृष्टि झांकिली जया मलीन लोचनें ।
घनें दिनेश लोपल्या तयासि निःप्रभा म्हणे ॥
तसा च खेळतां गुणी गुणांत नेणुनी मला ।
विमूढ बद्ध मानिती अगम्य मासि चित्कळा ॥ १२

समस्तेषु वस्तु॰—

समस्त वस्तुचें सबाह्य जें अखंड सांचलें ।
तरी समस्त नातळे जयासि आपुले बळें ॥
विशुद्ध नित्य निर्मळ स्वरूप या नभापरी ।
विराजतो सुखी सुखें नव्हे अशातशा परी ॥ १३ ॥

उपाधौ यथा॰—

उपाधि रंगतां मणी तसा च भासतो वसे ।
गुणत्रयांत खेळतां तसा चि हा तरी दिसे ॥
घटोदकांत हालतां जसा अचंचळू शशी ।
जगद्रूपें चि खेळतां जसा तसा चि आहसी ॥ १४ ॥

उपसंहार.

संवादः शंकराचार्यहस्तामलकयोरयं ॥
परार्थे शिवरामेण उदितो देशभाषया ॥

टीका.

चतुर्दश प्रबंधजाळ काळभीति नाशिते ।
करामलें गुरुप्रती कथीयलें स्वरूप तें ॥
गुरुत्व शिष्यता इथें समस्त अस्त पावती ।
परार्थ अर्थदीपिका प्रकाशिली यथामती ॥ १५ ॥

समाप्त.

---

## मुद्गलाचार्यआर्यांचें श्लोकबद्ध‡ महाराष्ट्र भाषांतरें.

त्वयि विमुखे॰—

तूझ्या दिलें निमित्त वस्त्रसदन्नपाणी ।
जीताति हे सकल जीव हि चापपाणी ॥
तूं यज्ञमुख्य मजला विमुख स्वभावें ।
त्यां केंवि अन्यजनसख्यसुखें जिवावें ॥ १ ॥

परितः पश्यसि॰—

सर्वत्र तूं ऐकसि पाहतोसी । समस्त हें जग जाणसी हे वशी ॥

---

‡ हें प्रकरण मि॰ M. E Palshe School Master Kategaon यानीं पाठविलें.

* मागें पृष्ठ १११-१२४ पर्यंत जें हरिराजकृत भाषांतर छापिलें आहे त्याहून हें भिन्न आहे. हें अपूर्ण असल्यामुळें याचा कर्ता समजला नाही.

मी त्या जगीं काय नसें चि मानसीं । न पाहसी नायकसी न जाणसी ॥ २ ॥

**जानाति भूपमल्पो०—**

जाणे नृपा दुर्बळ सर्व मानें । त्या दुर्बळा भूमिपती न जाणे ॥
हें बोलणें मूढ जनांत गाजे । सर्वज्ञ तूं हें तुज केंवि साजे ॥ ३ ॥

**अर्थिनि विलसति०—**

अर्थ्यापाशीं मागणें सिद्ध आहे । दात्याठायीं दान तें दूरि राहे ॥
कार्पण्याची हे असो गोष्टि कांहीं । लक्ष्मीकांता हे तुला योग्य नाहीं ॥ ४ ॥

**अपि रंकमंकनिष्ठं०—**

अंकीं[1] बसोनि शिशु रंकपित्यासि[2] याची ।
तो वासना पुरवितो परि त्या मुलाची ॥
हें दुःख विश्वजनका कवणा वदावें ।
त्वद्रक्षसी शिशु मनोरथ मी न पावें ॥ ५ ॥

**आशापाशनिबद्धं०—**

आशामहापाशगुणांत बांधलें । बंदीगृहीं या तनुचे चि घातलें ॥
ऐशा मला शीघ्र न सोडसी जरी । मज्जीवनोपाय तरी स्वयें करीं ॥ ६ ॥

**अनुचितमिदमेवादौ०—**

श्रीनाथ आपण तुझ्या बसोनि दारीं ।
मी दीन हें उचित काय वरें विचारीं ॥
तूं सन्निधी म्हण पराधिन म्यां असावें ।
या बोलणेंनि तुजला सुख केंवि व्हावें ॥ ७ ॥

**त्रिभुवनपालनदीक्षित०—**

शक्ती तुझी अक्षय सर्व काळीं । देऊनि दीक्षा जग सर्व पाळी ॥
टाकूनि मातें जग कां न्यहाळी । बळी जसे दुर्लभ वाक्य गाळी ॥ ८ ॥

**यदि पुनरपराधानां०—**

तूं लेखलासी अपराधकोटी । न बोलसी सत्वर या च गोष्टी ॥
हे मानुषी माय पहा मुलांनीं । ताडीयलें कीं परितोष मानी ॥ ९ ॥

**अयि वद राघव०—**

तो काय माझा अपराध झाला । तें सांग जेणें तुज कोप आला ॥
मृषा[3] जरी तूं वदशील कांहीं । तुझ्या पित्याची तरि आण पाहीं ॥ १० ॥

**मामिह कृपणमनाथे०—**

निर्नाथ मी कृपण येथ तुझ्या च शेलीं ।

---

१ अंक=मांडी. २ रंक=भिकारी. ३ मृषा=खोटें.

आम्हां स्वसेवकजनां वरि लोकराया
कां येतुलें धरियलें कठिणत्व बापा ॥ १७ ॥

अंके तव गतपंके०

लंकाधिराजदमना तुझिये च अंकीं ।
मी पोष्य बालक बसें अति निष्कलंकीं ॥
तूझ्या मुखाब्जमकरंदसुतांबुलासी ।
आहें उभा धरुनि आस विलोकिनासी ॥ १८ ॥

चुचुकं०—

व्हावासि तूं मजकडे म्हणऊनि गोडी ।
मी तूझिये हनुवटीस धरूनि ओढीं ॥
सिंदूरपर्वतनिवासिनि रामराये ।
टाकूनियां कठिणता क्षण एक पाहें ॥ १९ ॥

उचिता ह्यधृष्यता ते०—

काठिण्य हें उचित अग्रियराजयासि ।
मी बाळ कीं मजवरी म मनो जनासी ॥
काठिण्यवत्सलपणा बहु वैर पाहीं ।
एकत्र जेंवि नसती क्षण व्याघ्रगाई ॥ २० ॥

पितरौ यत्र०—

हीं मायतात असती जरि वेगळालीं ।
एक त्यजी तरि दुजें उदरांत घाली ॥
तें तूं च कीं जनक माय हि पाठि पोटीं ।
तूझी जरी अवकृपा मज हानि मोठी ॥ २१ ॥

न शृणोषि दीनभाषां०—

हें दीनवाक्य पण नायकसी स्वभावें ।
सर्वज्ञ पूर्ण तुज केंवि असें म्हणावें ॥
ऐकोनि होसि उगला चि म्हणोनि देहीं ।
कारुण्यसिंधु[५] तुज भाषण निंद्य हें ही ॥ २२ ॥

किंवा तद्गुरु कार्यं०—

सीतापते मज न सांगसि तो अपैसा ।
व्यासंग कोण पडला तुज थोर ऐसा ॥

---

५ कारुण्यसिंधु=दयासागर.

क्लेशां करीं बहु विधा मज घेरिलें कीं ॥
माथा पदांबुजि च लोळत पाहिनासी ।
कैसा उगा मज विलोकुनि राहिलासी ॥ ११ ॥

करुणाकर०—

हीं जीं ब्रिदें शरणवत्सलआदि कांहीं ।
गाड्या रया भरुनि ने तव पूर्ण नाहीं ॥
श्रीराघवा तरि मला शरणागतासी ।
कां सांग दीनकृपणासि उपेक्षितोसी ॥ १२ ॥

कुरु वा राघव०—

श्रीराघवा शरण मी तुज सर्व भावीं ।
ऐशा दिना मज कृपा तरि त्वां करावी ॥
नाहीं तरी स्वशरणागतपाल ऐसें ।
हें ब्रीद टाकि पण जें त्रिदिवांत पैसे ॥ १३ ॥

सेवामपेक्ष्य दाता०—

देताति जे जन अपेक्षुनि सेवनातें ।
दाते नव्हेति पण वेतनमात्र दाते ॥
हीना दिना स्वसुखदायक तूं तयासी ।
हा जेंवि मेघ जल दे नवपल्लवांसी ॥ १४ ॥

सेवकवंशभवत्वादपेक्षसे०—

मी सेवकात्मज म्हणोनि अमर्त्य माझे ।
देवा पहाल जरि सेवनकामना जे ॥
पृथ्वीश हे अलससेवकपुत्र त्यां ही ।
सांभाळिती पण अशी नृपनीति पाहीं ॥ १५ ॥

न हि न हि जाठर०—

माझ्या रामा आपुल्या पूर्वजांहीं ।
पोटासाठीं अर्जिलें तूज नाहीं ॥
हीना दीना सतती होत जाती ।
तीच्या होते सर्व पीडेस शांती ॥ १६ ॥

चित्तचमत्कृति०—

चित्ता विनोदकर कौतुक मात्र भावें ।
काठिण्य हें तितुकिया पुरतें असावें ॥

---

१ त्रिदिव=त्रैलोक्य.

आम्हां स्वसेवकजनां वरि लोकराया
कां येतुलें धरियलें कठिणत्व बापा ॥ १७ ॥

**अंके तव गतपंके०**

लंकाधिराजदमना तुझिये च अंकीं ।
मी पोष्य बालक बसें अति निष्कलंकीं ॥
तूझ्या मुखाब्जमकरंदसुतांबुलासी ।
आहे उभा धरूनि आस विलोकिनासी ॥ १८ ॥

**चुबुकं०—**

घ्यावासि तूं मजकडे म्हणऊनि गोडी ।
मी तूझिये हनुवटीस धरूनि ओढीं ॥
सिंदूरपर्वतनिवासिनि रामराये ।
टाकूनियां कठिणता क्षण एक पाहें ॥ १९ ॥

**उचिता ह्यधृष्यता ते०—**

काठिण्य हें उचित अग्निपराजयासि ।
मी बाळ कीं मजवरी न मनो जनासी ॥
काठिण्यवत्सलपणा बहु वैर पाहीं ।
एकत्र जेंवि नसती क्षण व्याघ्रगाई ॥ २० ॥

**पितरौ यत्र०—**

हीं मायतात असती जरि वेगळालीं ।
एक त्यजी तरि दुजें उदरांत घाली ॥
तें तूं च कीं जनक माय हि पाठि पोटीं ।
तूझी जरी अवकृपा मज हानि मोठी ॥ २१ ॥

**न शृणोषि दीनभाषां०—**

हें दीनवाक्य पण नायकसी स्वभावें ।
सर्वज्ञ पूर्ण तुज कैंवि असें म्हणावें ॥
ऐकोनि होसि उगला चि म्हणोनि देहीं ।
कारुण्यसिंधु तुज भाषण निंद्य हें ही ॥ २२ ॥

**किंवा तद्गुरु कार्यं०—**

सीतापते मज न सांगसि तो अपैसा ।
व्यासंग कोण पडला तुज थोर ऐसा ॥

---

५ कारुण्यसिंधु=दयासागर

जेणें अनाथ करुणावचनें चि माझीं ।
वेगें न पावति तुझ्या श्रवणासि कां जी ॥ २३ ॥

**प्रायो राक्षसयुद्धे०—**

बहुधा रणांत झुजतां दनुजांशीं ।
श्रमुनी सुचित्त भुजगीं निजलासी ॥
अति दीर्घ हाक करुणावचनासी ।
अवधारिनासि परि हेतु हि हा ची ॥ २४

**अपि दलति वज्रहृदयं०—**

माझेनि दीनवचनें दृढ वज्र भेदे ।
पाषाण हे विघरती मम वाक्यवेधें ॥
ते काय मत्कृत अशी अपराधराशी ।
जे तूं कृपार्णव उदासिन जाहलासी ॥ २५ ॥

**जल्पंतमल्पबुद्धिं०—**

तूझी कृपा न पहती जन सर्व जे ते ।
माझी च मंदमतिहाक दिसोन येते ॥
माझा जगांत उपहास चि होत आहे ।
हे श्लाघ्य शोकहरणा तुज सांग काय ॥ २६ ॥

**क्षीरेण दग्धजीव्हः—**

क्षीरें जळाली जिभ उष्ण मानुनी ।
पीतो पहा पामर तक्र फुंकुनी ॥
माझी तशी जाणुनि दांभिकी मती ।
त्वां टाकिलें पाहुनि लोक निंदिती ॥ २७ ॥

**मयि करुणामृदुभावात्०—**

माझीं अभीष्टें अपुल्या कृपावशें । करीत नाहींस तरी असो तसें ॥
जें कां तुझी थोरवि वर्णिती कवी । श्रीराघवा ते तरि शीघ्र दाखवीं ॥ २८ ॥

**पायस इव नाम सर्पिः०—**

क्षीरींत बरवें घृत घातलें परी ।
भस्मीं पडे तें मग काय तें करी ॥
तैसा तुझा मंत्रजप प्रसिद्धसा ।
पापात्म मी त्या मजला फळे कसा ॥ २९ ॥

---

६ भुजग=सर्प.

संतप्तायसि पिंडे०—

सतापला जेंवि तवा तयावरी । पाणी पडे आटतसे क्षणांतरीं ॥
मोहें महा तेंवि अशौच मी असें । तेथें तुझें नाम हि भस्म होतसे ॥ ३० ॥

मालिन्यदोषभीत्या०—

राशाउडीदांतुनि वेगळे चि जे ।
काळे किती काय म्हणोनि काढिजे ॥
माझी तनू तेंवि च पापपूतळी ।
किंवा तुझें नाम म्हणूनि आकळी ॥ ३१ ॥

मृगमदभूमौ जनितो०—

कस्तूरिभूमीस विरूढला कीं । तो काय कांदा निज गंध टाकी ॥
तैसा च मी दास तुझा च होय । दोषां त्यजीं हे तंव गोष्टि नोहे ॥ ३३ ॥

सुकृतिन ईषत्पापे०—

ज्या पुण्यात्म्या स्वल्पसें पाप आहे ।
रामा प्रायश्चित्त तो एक पाहे ॥
माझ्या भेणें तें पळे दूर पाहीं ।
जैशी धांवे व्याघ्र देखोनि गाई ॥ ३४ ॥

परिगणना भगणानां०—

नक्षत्रांतें मोजवे आकळूनी ।
मोजूं येती हे अणू ही धरूनी ॥
संख्या माझ्या पातकां योरसाना ।
कोणाचेनी नाणवे चि प्रमाणा ॥ ३५ ॥

अपराधिनम०—

अम्ही महापातकि हें असे खरें । परंतु तूझीं अनवाळ लेकरें ॥
सांभाळ वो पालक रामजननी । कांहीं न मागें च विशेष याहुनी ॥ ३७ ॥

उचितं वक्तुमभद्रं०—

तु नाथ आहेसि अम्हा रघूवरा । अनाथ हे मंगल ची नव्हे गिरा ॥
सनाथ तूझेनि च मी अनाथसे । किं बोलती त्वां चि उपेक्षिलें असें ॥ ३८ ॥

सर्वज्ञः स्वाधीनो०—

स्वाधीन सर्वज्ञ दयालु ही जरी । काठिण्य माझे विषयीं च कां तरी ॥
हे सांग ऐसें पुसतां महेश तें । देशी दिनां उत्तर काय आमुतें ॥ ४० ॥

अपराधमार्गणे०—

प्रवर्तसी तूं अपराधशोधनीं ।
उणीव तूझ्या करूणेसि ये जनीं ॥
संसारिं या भक्त तुझा महा भला ।
गतापराधी मज तो न भेटला ॥४१ ॥

तस्य स्वल्पोपराधो०—

थोडे तयाचे अपराध साने । बहूत माझे तरि कोण जाणे ॥
मी कीं तरी सर्व हि जाणिवेतें । अभ्यासिलें वास्तव काय तेथें ॥ ४२॥

अग्रजजाया०—

बंधुस्त्रियेच्या अभिलाषणे करी । वाळी वधावा मति हे चि अंतरीं ॥
सुग्रीव ऐसा पण त्यावरी कृपा । हें योग्य रामा तुज काय पाह पां ॥ ४३ ॥

भ्रातुरवज्ञामात्रात्०—

स्वबधुंनें हो अवमानिलें जरी । तेणें सरोषें चि उठोनि सत्वरी ॥
समीप आला अपुल्या बिभीषणू । निरापराधी परि त्यासि कैं ह्मणूं ॥ ४४ ॥

जल्पंति कल्पय०—

तक्षांतरें म्या अपशब्द बोलिले ।
न पाहिजे त्यां हृदयीं धरीयले ॥
पूर्वील माझें निज भाग्य तें खरें ।
क्षमार्णवा हीं आजि साहि उत्तरें ॥ ४५ ॥

आस्तामेतदसभ्यं०—

परोक्ष येना अपराध पाहणें । असो भवन्मोह कृती च लक्षणें ॥
तुझी च ऐशी निज कीर्ति ठाउकी । केलें मतें काय बिभीषणादिकीं ॥४६॥

स्वीयमणी गुणहीने०—

प्रत्यक्ष खोटें अपुले च रत्न कीं । कां हो करावा कलहो परीक्षकीं ॥
तूं तों स्वइच्छा करणार ईश्वरू । भृत्येनिशीं मत्सर व्यर्थ कां करू ॥ ४७ ॥

वक्तव्यमेतदुक्तं०—

गुपित जें जितुकें मनिहूनियां । तुज पुढें बदलों रघुराजया ॥
ह्मणि मला रुससी करुणानिधी । रूळवितों सहजें तुझिया पदीं ॥ ४८ ॥

प्रणिपातमात्र०—

भल्यांसि कोपाग्नि जरी उचंबळे । प्रणामनीरें शमतो म्हणे बळें ॥
माझीं कशीं पापफळें न पाहसी । अझूनि हा कोप हरी न सांडिसी ॥ ४९ ॥

त्वत्तुल्यो नास्ति०—

तुजसमान हि नसे दुसरा धणी । मज असा आयि दीन नसे जनीं ॥
दिनअनाथसख्या करुणार्णवा । अणिक काय वदूं तुज राघवा ॥ ५० ॥

त्वयि च स्वयंप्रकाशे०—

स्वयंप्रकाशा निज राम नाथा । त्रैलोक्य भासे तुज माजि पाहता ॥
कृपा चि का कीं न दिसे भुपाळा । नाहीं च किंवा पण मी च आंधळा ॥ ५१ ॥

नाभीष्टं करुणांत:—

अपार माझ्या अपराधराशी । म्हणोनि इच्छा पुरवीचनासी ॥
माझेनि बोलें दुखवोनि चित्तें । कां नेदिसी सांग निजात्मसत्ते ॥ ५२ ॥

अरयोपि०—

वैरस्वभावें निज शत्रु आपुले । सवेग तूझेनि अभीष्ट पावले ॥
मी दास कीं दान चि मागतों असा । होसी दयाळू उदसीन तूं कसा ॥ ५३ ॥

नादत्तं दत्से चेत०—

दिलें नाहीं त्याला म्हणसि कवडी नेदिं हि जरी ।
दिली होती कोणाप्रति विभिषणें हेमनगरी ॥
पुन्हां किष्किंधेचें विभवसह तें राज्य अपुलें ।
कपीसुग्रीवानें कवण पुरुषालागिं दिधलें ॥ ५४ ॥

श्रीरामतो गृहीता:०—

पोहे सुदामें दिधले तुला रे । द्यावे तुवां ते चि तया विचारें ॥
त्याला दिलें तें पद वासवाचे । त्वां पाहिलें काय असें तयाचें ॥ ५५ ॥

उन्मोचितो गजेंद्रो०—

पशूमध्ये अध चि कीं अधोक्षजा । नक्रामुखीं सोडविले तया गजा ॥
दाता बळी उद्भव सेवकाकुळीं । तो बांधला नेउनियां रसातळीं ॥ ५६ ॥

उद्धतचित्तवृत्ते:०—

उन्मत्तचित्त दशकंधर पापराशी ।
साक्षेप उत्तम गती दिधली तयासी ॥
साक्षाद्गुरू दशरथा अपुल्या वियोगें ।
केलें अध:पतनकर्म फळें अमोघें ॥ ५७ ॥

सुग्रीवविभीषणयो:०—

सुग्रीव आणालि विभीषण आपुलाले ।
ठायीं निरुद्यम तयां निज राज्य झालें ॥

सेवाश्रमें हनुमयासि प्रसन्न आहा ।
बोला म्हणे घड तया न च बोल हा हा ॥ ५८ ॥

**यद्यत्करोषि०—**

जें जें करूं च बससी प्रभुभावनेनें ।
तूझें तुला बहुत साजत थोरवीनें ॥
रामा असो सकळ ही मजलागिं पाहें ।
सेवापराङ्मुखकलंकित थोर आहे ॥ ५९ ॥

**चैलांचले धृतोसि०—**

एकांति सांपडविला धरिलासि कोठें ।
सैरा पळों पहासि हें मत टाकिं खोटें ॥
माझें मला स्वधन दे न मनेल येईं ।
निर्णय सज्जनसभेसि करून देईं ॥ ६० ॥

**त्वं मम जननी०—**

तू माय माझी आणि बाप बंधू । × × × × ×
तूं पाहसी निष्ठुर भाव जेव्हां । काडी मला भासत वज्र तेव्हा ॥ ६१ ॥

**कृपया द्रक्ष्यसि मां चेत्०—**

कृपेन तूं पाहसि चापपाणी । काळासि ही मी तृणतुल्य मानीं ॥
तुझी कृपा जैं मजलागिं नाहीं । काडी च होई मज काळ पाहीं ॥ ६२ ॥

**अथवा हो किं बहुना०—**

धारिष्ठ हें प्रभुपुढें करणें चि वाया ।
हें येरवीं उचित काय दयाळु राया ॥
आजन्म जन्मकृतदोषफळें विशेषीं ।
होताति कारण परंतु मनोव्यथेसी ॥ ६३ ॥

**नाराधितोसि पूर्वं०—**

पूर्वीं तुला मी भजलों च नाहीं । भावें अतां ही न भजें च कांहीं ॥
मनोरथातें तरि मागताहे । अपार माझी पण मूढता हे ॥ ६४ ॥

**दुर्वृत्तं दुर्बुद्धिं०—**

कामादिवश्य मतिमंद च मी स्वभावें ।
पापी पराङ्मुख हि तूज कसें करावें ॥
या ऐशिया मज कृपा करिशील कांहीं ।
मोठा क्षमाळु म्हणती तुज लोक पाहीं ॥ ६५ ॥

रचितापराधजाले०—

अपराधिया परम मी च असें कीं ।
असशी कृपाळु कळलें मज हें कीं ॥
वदनीं निरंकुश मम प्रकटूनी ।
जय रामनाम निघतें चि म्हणूनी ॥ ६६ ॥

नैवास्ति तेनुकंपा०—

हे ज्यावरी पण तुझी करुणा च नाहीं ।
त्याच्या मुखीं कधिं हि राम निघेल काई ॥
त्या त्या स्वधर्म कुल सर्व हि निंद्य मुद्रा ।
प्रेमें जया न रिझसी परि रामभद्रा ॥ ६७ ॥

तृष्णाव्यालविषार्तं०—

तृष्णाफणीच्या गरलें चि आवळें । धनध्वनीनें धरणीसि आदळें ॥
तापें मरें मी गरुडध्वजा जिवीं । देऊनियां जीवनदान जीववीं ॥ ६८ ॥

तृष्णानिदाघतप्तं०—

तृष्णामहाउष्णतपें सुके गळा ।
कांहीं नसे आश्रय शोषिलीं कळा ॥
करूनि कारुण्यसुवृक्षसाउली ।
करीं मला शीतळ राम पाउलीं ॥ ६९ ॥

तृष्णाकल्लोलवतो०—

तृष्णेचियामाजि पडोनि गंगे । नरस्तुतीच्या गळलों तरंगें ॥
घालीं कृपालोकन पूर्ण जाळें । काढूनि साभाळ किजे कृपाळें ॥ ७० ॥

तृष्णानक्रविकृष्टं०—

तृष्णा महा सावज ओढितें पदीं ।
मी कष्टतों कीं बहु काळ आपदीं ॥
कृपार्णवा राम जगत्रजीवना ॥
प्रेमें गजेंद्रापरि उद्धरीसि ना ॥ ७१ ॥

तृष्णासुकेतुकन्या०—

तृष्णासुकेतुतनयेसि मि फार भ्यालों ।
भावें तुझ्या शरण मी चरणासि आलों ।
विश्वेश्वरा सकळदुर्भरदुःखनाशा ।
त्या कौशिकापरि च पाळिं जगन्निवासा ॥ ७२ ॥

* सुकेतुकन्या=ताटका.

**तृष्णासुबाहुमुख्य०—**

तृष्णापुत्री या सुबाहू अमित्रीं । केलें मोठें विघ्न अध्यात्मसत्रीं ॥
दैत्यध्वंसा जानकीप्राणनाथा । विश्वामित्रायज्ञवत् पाळिं आतां ॥ ७३ ॥

**पाषाणतां प्रयातां०—**

ब्रह्मशापवत पूर्विल पापें । जाहलों दगड मी अनुतापें ॥
देह पावन करीं पण माझा । जेविं का सुखविली मुनिभाजा ॥ ७४ ॥

**अधिगतकोटिगुणांतं०—**

सात्वीक कोटिगुण खालविले प्रमादें । तें आमुचें प्रबळ पातक सिद्ध नांदे ॥
चंडीशदीर्घधनुषापरि सर्व भर्गी । होऊनि राहिं गरुडासन अंतरर्गी ॥ ७५ ॥

**निर्भूपीकृत०—**

जैसें रामें मरणभवना राजमित्रासि नेलें ।
माझ्या दैन्यें धरणित तसें ठाव नाहीं च केलें ॥
केलें सत्तारहित चि तया रेणुकेच्या कुमारा ।
रामा तैसें समुळ निरसीं दैन्य माझें उदारा ॥७६

**मृगजलबुद्धिसमृद्धं०—**

मृगजळवत बुद्धी विभ्रमें जेय आहे ।
विषयतरुवरांनीं आतपत्रू चि हो हें ॥
मम हृदयअरण्यामाजि येईं अपैसा ।
अनुजसहासितेसी काननाआंत जैसा ॥ ७७ ॥

**आपदि मां स्मरतांसि०—**

स्मरे विपत्तीसमयात मातें । तूं नेदिसी वास्तव संपदा ते ॥
रामा तुझे ज्या स्मरले च पाय । दृतावता तों तुज लाभ काय ॥ ७८ ॥

**अपनय दैन्यमुदग्रं०—**

समग्रदैन्यद्रुमें सर्व तोडीं । हें शून्य चिंतागृह सर्व मोडीं ॥
तूझ्या स्वरूपोन्मुखतेसि यत्न । रामा रिघेना मज मी सपत्न ॥ ७९ ॥

**मम नाशयाधिबाधिं०—**

माझे क्षमा करूनि हे अपराध नाशीं । चिंताब्धि शोषवुनि ने निज चित्पदासी ॥
मी दास पूर्ण शरणागत वत्सला रे । तूझ्या पदा शरण बोल कृपा तुषारें ॥८०॥

**समाप्त**

---

८ द्रुम=वृक्ष. ९ सपत्न=शत्रू १० हें प्रकरण आमचेकडे अपूर्णच आलेलें आहे.

# शुद्धिपत्र-अनेककविकृत-कविता-भाग २.

| पृष्ठ. | ओळ | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | १७ | या खेरीज | या |
| ३ | ६ | ( वडाल ) | ( वडील ) |
| ,, | १९ | जावितश: | जीवितेश: |
| ५ | १५ | सबिंबाधरी | सुबिंबाधरी |
| ६ | २१ | नाईकेचें | नायिकेचें |
| ,, | २४ | प्रगल्भेचा | प्रगल्भेचा |
| ७ | ८ | नालनी | नलिनी |
| १० | १७ | किंचित | किंचित् |
| ,, | २५ | माला | माला |
| ,, | ,, | छळें | छळें |
| ११ | १० | साहे | साहे |
| ,, | १२ | मानी | मानीं |
| ,, | १५ | यावयाचा | यावकाचा |
| १२ | ७ | जघनी | जघनीं |
| ,, | १४ | जाणें नदे | जाणों नदे |
| १३ | १५ | पै | पैं |
| १४ | १३ | थंकेत | संकेत |
| ,, | २१ | देऊनि | देउनि |
| ,, | २३ | तो | तों |
| ,, | ३२ | सौभगा | सौभग |
| १५ | ७ | कपोली | कपोलीं |
| ,, | १२ | जाले | जालें |
| ,, | ,, | दशी | दशी |
| ,, | २९ | उत्कांठिता | उत्कंठिता |
| १६ | २१ | कुची | कुचीं |
| १७ | ५ | विधघी | हि विधीं |
| ,, | १४ | ततो | चि तो |
| ,, | १५ | कातारीं | कांतारीं |
| ,, | ,, | दृष्ठी | पृष्ठी |
| ,, | २४ | क्षमा | क्षपा. |
| १७ | ३२ | ( राजकीडा ) | ( रातकिडा ) |
| ,, | ३३ | मुत्धा | मुग्धा. |

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १८ | २३ | तया | तयां |
| ,, | १४ | गृहिचीं | गृहिंची |
| ,, | २६ | योषिता | योषिता* |
| ,, | ३१ | रुक्म- | रुक्म |
| १९ | ७ | मोपी | मापी |
| ,, | २९ | मोपी | मापी |
| २० | ५ | मृगदृशी | सूदृशी |
| ,, | १३ | फावली | पावली |
| ,, | ३१ | गांढ | गाढ |
| २१ | १८ | शैवालि–नीतटासी | शैवलिनी–तटासी |
| ,, | २४ | वक्त्री | वक्त्रीं |
| ,, | ३० | यति | यांत |
| २२ | २६ | निवर्णता | निर्वैर्णता |
| २३ | २६ | स्मरावी | स्मरावे |
| २४ | ७ | प्रतिफल मृतांशो: | प्रतिफलममृतांशो: |
| ,, | १७ | वत्र | वक्त्र |
| ,, | २२ | तो | तों |
| २५ | १० | दामोधर | दामोदर |
| ,, | १५ | नवाब्धि | नवाब्धि ( ४९ ) |
| २७ | ६ | वत्त | वृत्त |
| ,, | ९ | पिरस्त्री | परस्त्री |
| ,, | ,, | गोलस्खलनादिजनिता | गोलस्खलनादिजनित. |
| २८ | १ | नायिकावस्थानकं | नायिकावस्थानवक |
| ३१ | ८ | चट | चेट |
| ३२ | ११ | दशन | दर्शन |
| ३५ | १० | तुके | तुके |
| ३८ | १५ | लाभें | लाभे |
| ३९ | ४ | मनी | मनीं |
| ,, | २९ | इतर | ईतर |
| ,, | ३० | टांकुनि | टाकुनि |
| ४० | २० | निकामीं | निकामी |
| ४१ | ८ | तो | तों |
| ४४ | ३० | पत्र | पुत्र |
| ४५ | १ | पुर्वेस | पूर्वेस |
| ,, | ,, | नभ भासुकाळीं | नभभा सुकाळीं |
| ५२ | २४ | हिरण्यारण्यतीं | हिरण्यारण्यंतीं |
| ५३ | १० | त्या | त्यां |
| ५४ | १६ | अवलिछा | अवलिला |
| ५५ | ६ | यांचा | याच्या |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५५ | ३१ | अतितसर | अतितत्पर |
| ५६ | २४ | उचिचेसि | उदीचेसि |
| ५७ | ६ | भजे | भजें |
| ६० | ३४ | ( टीप* ) श्लोकाचें उत्तरार्ध | श्लोकाचा एकचरण उपलब्ध |
| ६२ | १८ | दाविलें | दाविले |
| ,, | २७ | शद्व | शब्द |
| ,, | २८ | करीं नेइलें. | करी नेइला |
| ६३ | १५ | चारितो | चारितों |
| ६४ | २७ | तारिली | तारिला |
| ६६ | ७ | समुदा | समदा |
| ,, | १६ | पच्छाडिलें | पच्छाडिले |
| ,, | ,, | गरुड शंकरकिंकरानें | गरुडशंकर किंकरानें |
| ,, | ३० | अवलोकीं | अवलोकी |
| ६७ | २१ | रत्नप्रभे | रत्नप्रभा |
| ,, | २७ | ज्याकुळी | व्याकुळी |
| ,, | २८ | सेवनी | सेवना |
| ६८ | ३१ | सख्य | सख्य |
| ६९ | १७ | कांते | कांत |
| ,, | २१ | तों | अजि |
| ,, | ,, | तें नामा | नामा |
| ७० | ५ | सत्यें | सत्ये |
| ७१ | ६ | नाकळे | नाकळें |
| ७१ | १५ | होकरीतीं | होकरीती |
| ,, | २५ | ते | तो |
| ७२ | १३ | कसा भ्रांत | भ्रांत कसा |
| ७६ | १० | करीं | करिं |
| ,, | ११ | मुनी | मुनि |
| ,, | ,, | अंतरीं | अतरिं |
| ८१ | २ | द्वे भागीं | द्विभागीं |
| ,, | २३ | पांडवा | पाडवा |
| ,, | २३ | पीयुष | पीयूष |
| ९० | ३३ | कदम | कर्दम |
| ९२ | १४ | स्वया | स्त्रिया |
| ,, | १५ | गौरवर्णे | गौरवर्णा |
| ९४ | २६ | अकीर्ति | अकीर्ति |
| ९५ | १६ | पांडु | पांडू |
| ,, | ,, | महा | माहा |
| ९९ | १६ | दिसहूनि तिणें | दिसहूनि च तिण |
| १०० | २६ | शिवपजन | शिवपूजन |
| १०१ | ५ | सोशिन | सोशित |

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १०१ | १८ | सांडिलें | मांडिलें |
| ,, | २९ | स्वरोमाचा | स्वरोमाच्या |
| ,, | ३० | आम्हात | आम्हास |
| १०२ | १ | किंकरकविकृत | |
| ,, | ११ | पर | परा |
| ,, | २२ | परिणामवधि | परिणामावधि |
| १०३ | १० | त्रिभवनीं | त्रिभुवनीं |
| १०४ | १ | किंकरकविकृत | |
| ,, | ३२ | मोठ | मोठें |
| १०७ | ११ | कत्या | कृत्यीं |
| ,, | १९ | गुणराहित्या | गूणें हीना |
| ११० | १४ | हरिगुण | हरगुण |
| १११ | १२ | कळज्ञा | सकळज्ञा |
| ११२ | २३ | जोहीं | नाहीं |
| ११२ | २८ | च | जरि |
| ११४ | १५ | गोळा | गोळा |
| ११५ | १७ | मुभिवा | सुभिवा |
| ,, | २४ | निक्षक | निक्षुण |
| ,, | २५ | तों | तें |
| ११७ | ९ | पोलस्त्य[१८] | पौलस्त्य |
| ,, | ११ | निज | निज |
| ११८ | ३ | पडें | पुढें |
| ११९ | ५ | मनोवात्ति | मनोवृत्ति |
| ,, | १८ | मुररत्नांबुज | मुखांबुज |
| १२० | ४ | सावळी | सांवळी |
| ,, | १७ | चारु | दक्ष |
| १२१ | २ | वाहें | वाहे |
| १२३ | ६ | विराज | विराजे |
| ,, | ,, | नाम | नावें |
| ,, | २३ | ७८–९८ | ७७–९८ |
| ,, | २७ | छण्णनात्रे | सत्तावन्नावे |
| १२४ | ४ | नमिलों पित्यानें | नमिलादरानें |
| ,, | २२ | अनाग | अनार्य |
| १२६ | १ | हरिराजकृत | |
| ,, | ५ | कर्णाल्किकिणी | कर्णाल्किकिणी[१०] |
| ,, | १० | दल | डूल |
| ,, | १३ | ते चि | तेथ |
| ,, | १५ | जो | जों |
| ,, | १६ | स्वल्प आपपाते | स्वल्प ही आयपातें |

| पृष्ठ | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १२९ | १४ | घर्मार्थि | घर्माद्रि |
| ,, | २४ | तुम्ही | तुम्हि |
| १३० | ३० | भुकन्या | भूकन्या |
| १३१ | २२ | नरवीतसे | नरवीरसे |
| १३३ | २ | जनक | जनकू |
| ,, | ९ | आणि | आणिं |
| ,, | २९ | पंखि चि चुंचुसि | पंखि चि चचुसि |
| १३४ | ३ | स्थाई | स्थायी |
| ,, | १८ | त्यां पढें | त्यां पुढें |
| ,, | १९ | दोहीतें | दोहींतें |
| ,, | ३२ | आस्ताचला | अस्ताचला |
| १३५ | ४ | ते | तो |
| ,, | ८ | दासिचीं | दासिंचीं |
| ,, | ९ | [ ती ] | [ हि ] |
| ,, | ११ | धारणी | धारिणी |
| १३६ | ७ | पूर्व | वृत्त |
| ,, | २० | वानूं | वानु |
| ,, | २१ | आधिक | आधीक |
| १३७ | १२ | तो | तों |
| ,, | २२ | तवा | तया |
| १३८ | ६ | थोरा | थोरे |
| १३९ | २० | रावणाची | रावणाचीं |
| १४० | २ | पाणिसी[७१] | [७१]पाणिनें |
| १४२ | २० | खोंचोंनियां | खोंचोनियां |
| १४३ | २२ | मागेन | राहेन |
| १४५ | ३ | हे | हें |
| ,, | १० | भजग | भुजग |
| ,, | १५ | भवभ्रष्ठां | भवभ्रष्टां |
| १४६ | २२ | गांवें | [७५]गांवें |
| १४७ | २१ | जोतके | जोरके |
| ,, | २५ | नाही | नाहीं |
| १४८ | २३ | कीर्ति | कीर्त्ति |
| १४९ | १२ | सुर | सूर |
| ,, | २५ | भृकुटीचे | भ्रुकुटीचे |
| १५० | ८ | कांजी | काजीं |
| १५१ | ३ | वरीं | वरी |
| ,, | २९ | नऊ | नाग |
| १५२ | १६ | मुके | मुकें |
| ,, | ३२ | रूदन | ओदन |
| १५५ | २७ | समुद्रा | समुद्रो |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५६ | १२ | सग | सर्ग |
| १६० | १६ | पासुना | पासुनी |
| ,, | १७ | चो जबनी | वीटवना |
| ,, | २१ | पजीयेले | पूजीयेलें |
| ,, | २३ | माण | मणि |
| ,, | २७ | सीमत | सिंह |
| ,, | ३१ | माग | मार्ग |
| १६२ | ३३ | सुर्यकला | सुर्यकन्या |
| १६४ | २५ | श्रीवस्य | श्रीवश्य |
| १६६ | २३ | विभावाचा | त्रिभावाचा |
| १६७ | २४ | प्रति | प्रती |
| १६८ | ८ | ही | हि |
| ,, | ९ | रंग | स्वर |
| ,, | ,, | आणि | आणी |
| ,, | २१ | परिहरि | परिहरी |
| ,, | २४ | क्रोधाने | क्रोधानें |
| १६९ | २ | जिव | जीव |
| ,, | २९ | अप्राप्तिनें | अप्राप्तीनें |
| १७० | १२ | भ्रुकुटी | भ्रुकूटी |
| ,, | १७ | चमकती | चमकतें |
| ,, | २० | धृति | धृती |
| ,, | २८ | होती | होते |
| ,, | ३२ | मनादि | मानादि |
| १७१ | २३ | योगें | योगें |
| १७२ | ३ | माक्षेवरि | माक्षेवरी |
| ,, | १७ | पाहतसे | पाहत नसे |
| ,, | २९ | त्या तकप | त्यास कप |
| १७३ | १० | चोळणें | चोळण |
| ,, | १७ | असे | असें. |
| १७३ | २३ | कौटिल्य | कौटिल्यें |
| ,, | २४ | यापरि | यापरी |
| ,, | २६ | आणि | आणि |
| १७५ | १ | स्वरभंगाणि ‡ गाणि | स्वरभंगाणि ‡ हि |
| ,, | ,, | कसकास | शरिरास |
| ,, | १२ | तार्कि | तर्की |
| ,, | १७ | औग्न्य | औग्रय |
| ,, | १८ | औत्सुक्य | औत्सुक्य |
| १७६ | ४ | यांची | यांचीं |
| ,, | १३ | विराजे | विराजें |
| ,, | १७ | वेष | वेश |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १७६ | १८ | आपरिपूर्ण | परिपूर्ण |
| ,, | ,, | हे | हा |
| ,, | २२ | वेष | वेश |
| ,, | २३ | हसूनी | हसूनि |
| ,, | २७ | जो | तो |
| ,, | २९ | मस्तकीं घालिते | घालीते धुळि मस्तकीं |
| ,, | ३२ | अश्रुनिं | अश्रुंनि |
| १७७ | २४ | निरखिलें | निरखिले |
| १७८ | ६ | हेतूनें | हेतुनें |
| ,, | ७ | समल्यांहीं | सगल्यांहीं |
| ,, | २१ | मनि वहु | मानि वहू |
| ,, | २३ | त्यांचीं | त्याचीं |
| ,, | ३० | आाणि | अणि |
| १७९ | ३१ | टाकणरा | टाकणारा |
| १८० | ३३ | हूतवह | हुतवह |
| १८२ | १३ | ऐश्वर्य | ऐश्वर्य |
| ,, | ,, | सौकुमार्यानी | सौकुमार्यानीं |
| ,, | २२ | हासते | हासत |
| १८३ | ११ | दुःख | दुख |
| ,, | १५ | अतरिं | अंतरीं |
| ,, | २० | असे | असें |
| १८४ | ३ | संन्निध | सन्निध |
| ,, | ९ | विझविर तिदिव्याला | विझवि रतिदिव्याला |
| ,, | १८ | भ्रमरायमान | भ्रमरायमाण |
| ,, | २० | द्योचित | द्योतित. |
| १८५ | ३२ | पीयुष | पीयूष |
| १८७ | २६ | १७देहात्मवर्णां | देहात्मवर्णं१७ |
| ,, | ३१ | देहावरि | देहावरी |
| १८८ | १४ | गुरु | गुरू |
| १८९ | १ | गजगौरीव्रत | मनीषापंचक |
| ,, | १९ | मेला | माना |
| ,, | २१ | सुतगांजतां | सुरगजात |
| १९० | ५ | अथांबी | म्हणोनी |
| ,, | ३२ | टुम्स | टुप्स |
| १९२ | ३१ | नेलें | केलें |
| १९३ | ७ | अष्टादशा | अष्टादशू |
| १९४ | २ | लागि | लागिं |
| १९६ | १४ | निरखुनी | निरखुनि |
| १९८ | ५ | मेहू | अजि मेहू |

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १९८ | ६ | आज . | अजि |
| ,, | ,, | अधारी परि नही | अधारि परी नहि |
| ,, | ७ | प्रभू | प्रभु |
| ,, | १० | भाग | मार्ग |
| १९९ | २६ | वाणी | वानी |
| २०४ | ७ | भुल | भुले |
| २०५ | ५ | सपादी | संपादी |
| ,, | २४ | वदुनि | वदुनि |
| २०६ | ९ | सुताभ | सुलाभ |
| ,, | १७ | विलया कुदाचिया मिसें नेला | लयासि मुचकुद मिसे करुनि नेला |
| २०७ | ३० | लवि | लववि |
| २०८ | २७ | मुरारी | पुरारी |
| २११ | ९ | तुटलें | सुटलें |
| २१२ | २० | पूतनारीस | पूतनारीस |
| २१३ | ५ | गिरीजा | गिरिजा |
| ,, | ३० | शिघ्र | शीघ्र |
| २१५ | १६ | उदास तूझा | उदास फार चि तुझा। |
| २१७ | २१ | ना | कीं |
| ,, | ३३ | असें | असें |
| २१८ | १६ | भूताशिं | भूतांशिं |
| २१९ | १५ | काटि | घाटिं |
| २२२ | ८ | वसे | असे |
| ,, | २४ | तुझ्या | तुवां |
| २२३ | १३ | लद्वक्षसी | लद्वक्षसीं |
| २२७ | ६ | राशा | राशी |
| २२८ | ५ | मी कीं | सांगें |
| २२८ | ,, | तेथें | एथें |

समाप्त.

# अनेककविकृत कविता भाग ३ रा.

[ २४. ]

हा ग्रंथ

जनार्दन बाळाजी मोडक बी. ए. ( डेक्कन कॉलेज. )

यांनीं

यथामति शुद्ध करून प्रकाशित केला.

तो

पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिला.

शके १८०९

इ० स० १८८८.

# MISCELLANEOUS POEMS BY DIFFERENT MARATHI POETS

## Part III.

EDITED BY

**Janardan Balaji Modak** B. A.

*Printed at the "Dnyan Prakash" Press*

POONA.

1888 A. D.

# अनेककविकृत कविता भाग ३ रा.

## अनुक्रमणिका.


| प्रकरण. | कवि. | ग्रंथसंख्या | पृष्ठ. |
| --- | --- | --- | --- |
| १ स्यमंतकोपाख्यान | श्यामा | १२६ | १ |
| २ गणेशजन्म | ——— | ३४ | १३ |
| ३ रामस्तुति | जनार्दन | ९ | १६ |
| ४ अहिमहि आख्यान | अनंत | १४ | १७ |
| ५ वाराणसीवर्णन | ——— | ५ | २५ |
| ६ व्यंकटेशस्तुति | ——— | १० | २५ |
| ७ सीतास्वयंवर | गोसावीनंदन | ९ | २६ |
| ८ अन्याय कोणाकडे | ——— | ८ | २७ |
| ९ देवीस्तुति | कृष्णकेशव | ११ | २८ |
| १० लिंगमाळा | दामोदर | १२ | २९ |
| ११ जगदंबावर्णन | अमृतराय | १ | ३० |
| १२ नारदी | ,, | १ | ३२ |
| १३ सतमालिका | जयरामसुत | १ | ३३ |
| १४ तुकाईवर्णन | रामात्मज | १ | ३४ |
| १५ शिवपराक्रम | रघुनाथ यादव चित्रगुप्त | १७१ | ३५ |
| १६ भामिनीविलास भाषांतर-विलास १ ला | गंगाधरशास्त्री मघूळकर | १२८ | ७१ |
| १७ विलास २ रा | ,, | १८३ | ९७ |
| १८ विलास ३ रा | ,, | १९ | १२६ |
| १९ विलास ४ था | ,, | ४७ | १२८ |
| २० ध्रुवचरित | वामनपंडितशिष्य | १३६ | १३७ |
| २१ राधाकृष्णसंवाद | ——— | १६ | १४१ |
| २२ कृष्णचरित्र | आनंदतनय | ४० | १५० |
| २३ विश्वामित्रयज्ञरक्षण | ,, | ३८ | १५१ |
| २४ कृष्णदानकथा | रामात्मज | ४३ | १५८ |
| २५ शुकरंभासंवाद | वामन | ११ | १६३ |
| २६ आत्मनिरूपण | हरिकवि | २३ | १६४ |
| २७ वामनचरित्र | विठ्ठल | १५ | १६७ |
| २८ शुकरंभासंवाद | ——— | ४९ | १७३ |
| २९ सारीपाट | मुकुंद | ४९ | १७७ |
| ३० विचारमाला | नारायण | २५ | १८३ |
| ३१ कबीरजन्म | ,, | १०१ | १८६ |
| ३२ दामाजीपंतावर पवाडा | ——— | १ | १९२ |

| प्रकरण | कवि. | ग्रंथसंख्या, | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ३३ शिवनेरी किल्ल्यावर पवाडा | ———— | १ | १९४ |
| ३४ बापूगोखल्यावर पवाडा | सगनभाऊ | १ | १९६ |
| ३५ दुदुसीवधावर पवाडा | सहू अर्जुना | १ | १९७ |
| ३६ कोल्हापूर वर्णन | राम | १ | २०० |
| ३७ कटाव | अमृतराय | ६ | २०१ |
| ३८ थियाळचारित्र | उद्धवचिद्घन | २६ | २०८ |
| ३९ शिबिचक्रवर्ति आख्यान | आनंदतनय | ४६ | २१० |
| ४० ओव्या | नामदेव | ५ | २१५ |
| ४१ नारदाचा व्यासास उपदेश | ———— | १५ | २१५ |
| ४२ आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर यांचें वर्णन | परशुराम | ९ | २१६ |
| ४३ पद | निंबराज | १ | २१७ |
| ४४ नवरत्नमालिका | श्रीधर | १० | २१८ |
| ४५ राधाविलास | ———— | ६२ | २१९ |
| ४६ अष्टक | ———— | ८ | २२२ |
| ४७ मराठी सौंदर्यलहरी | ———— | १०४ | २२३ |
| ४८ नानासाहेब पेशवे यांस उपदेश | शिवराम | ९ | २३० |
| ४९ अष्टादशश्लोकी गीता | ———— | १९ | २४१ |
| ५० पदें | राजाराम प्रासादी | १४ | २४२ |


समाप्त

मराठी ग्रंथ… संस्थेस …

# अनेककविकृत कविता

## भाग ३ रा.

## श्यामाकविकृत स्यमन्तकोपाख्यानें.

आहे अद्वय पूर्ण तत्त्व न दिसे मायेचिया आरिसा ।
लीलावेश धरी प्रवेश विवरीं केला दमाया रिसा ॥
दावी कौतुक जो स्यमंतक हरी श्रीजांबुवंती हरी
तत्पादांबुज-वदनीं रत मना ग्रथक्रिया यावरी ॥ १ ॥
जे लीला अभिमन्युजा शुक वदे पारीक्षितातें मुनी ।
वैशंपायन जांबुवतिवरणा ते दृश्य भाषा जनीं ॥
माझी हकीति ऋक्षराज[1]-मानिची श्रीसत्यभामा हरी ॥
ऐकावी सुमनें स्यमंतक कथा जें पातकें सहरी ॥ २ ॥
पूर्वीं मारोनी रामें रजनिचरें[2] पतीं फोडिली बंदिशाळा ।
भद्रीं लंकेशबंधू करुनि चिरंजिवी आणिली भूमिबाळा ।
देवां इंद्रादि सर्वां सह कपि रिस ही बैसलासे विमानीं ।
आला तो राजधानीनिकट उतरला विश्व आनंद मानी ॥ ३ ॥
वामांगीं विलसे सुकांचनलता श्रीजानकी सुंदरी ।
श्रीगंगेहुनि शुभ्र चामर वसे शेषावतारा[3] करीं ॥
अग्रीं वायुसुतें विनीतसुचितें सभाविजे शासना ।
त्यां श्रीरामपदांबुजीं रत मना अन्यत्र निर्वासना ॥ ४ ॥
भेटोनि बंधुभरता मग राजधानी । केला प्रवेश सुखसिंधु सिमा न मानी ॥
राज्याभिषेक विधिपूर्वक सर्व झाला । आज्ञा करी नृप कपींरिस-राक्षसांला ॥ ५ ॥
दे उचीत सकळांप्रति राजा । भावपूर्वक म्हणे सदना जा ॥
स्नेहपूर्ण हृदयांत असावा । हेतु सार्थक पदीं च वसावा ॥ ६ ॥
तेव्हा ऋक्षपती करीत विनती अग्रें उभा राहिला ।
यावत्काळ बहुत समर[4] मही स्वर्गीं हि त्यां पाहिला ॥
मद्दोर्दंडें[5] प्रचंड कंडु सहसा अद्यापि गेला नसे ।
ना रे तो वर दे स्वदर्शन दिजे मत्प्रार्थना हे असे ॥ ७ ॥
ऐकोनियां वदत दाशरथी तयाला । जो इच्छिसी तव मनोरथ पूर्ण झाला ॥
आता मनीं समज पूर्ण तुझी अपेक्षा । द्वापार अंत-समयीं करिजे प्रतीक्षा[6] ॥ ८ ॥

---

१ ऋक्ष=अस्वल (ऋक्षराज=जांबवान्) २ रजनिचरपति=राक्षसराजा रावण.
३ शेषावतार=लक्ष्मण. ४ समर=लढाई ५ दोर्दंड=बाहुदंड ६ प्रतीक्षा=वाट पहाणें.

त्या नंतरे त्वरित वंदुनि पाद पद्मा । सिंधूतिरीं रिसपती अजि ये स्व सद्मा ॥
भूवीवरीं निजगृहीं मग शीघ्र आला ॥ राहे सुखें चि तंव काळ कितेक गेला ॥९
भावें भजे अनुदिनीं मनिं त्या अजाला । दैवी-कृपेकरुनि संतति लाभ झाला ॥
कन्या तया परम सुंदर एक झाली । कौशल्यता च विधिची स्वरुपासि आली ॥१०॥
तो पूर्ण ब्रह्म अवतार धरी हरी तो । नामें करुनि कलिकल्मष संहरीतो ॥
मा चचळा परि कदापि जया चळेना । शेषादिकां स्तवनलेश हि आकळेना ॥११॥
क्षीरांबुधींत उरगेंद्र करोनि माचा । राहे निजोनि सुख-सिंधु पराक्रमाचा ॥
कंसादिकीं बहुत पृथ्विस त्रास केला । ब्रह्मा स्तवी पय-निधी तिरिं त्या अजाला ॥१२॥
देव-स्तवें करुनि तोष विशेष झाला । माया विलास नटणें मग त्या अजाला ॥
जे जे क्रिया सकल ही करि त्या न केली । पूर्णावतार-चरिता मति हे भुकेली ॥१३॥

बाळ क्रीडा समाजीं खळ बळि वधिले कंसविध्वस केला ।
भक्तोद्धार प्रतापे करुनि वर-पदीं उग्र ही स्थापियेला ॥
आणी शौर्यक्रमानें भिम-कुल-ललना लोक-लीला नुपेक्षी ॥
लोकीं लौकीक रक्षी परम पुरुष तो सर्व-ससार-साक्षी ॥ १४ ॥
सत्राजीत म्हणोनि राजसुकुळीं होता गृहस्थाश्रमी ।
तेणें सूर्यप्रसन्नता तपवशें ते साधिली स्वाश्रमीं ॥
होता अब्द पुरें स्यमंतकमणी दे तोषुनी दिन्मणी ।
तो नित्य प्रसवे सुवर्ण वजनी भाँराष्ट तेजोगुणी ॥ १५ ॥
देतां त्यासि मणी वदे दिनमणी यत्नें यया रक्षिजे ।
त्वदेहीं अशुचित्व प्राप्तसमयीं आनर्थता पाविजे ॥
केला आक्षेप सज्जनीं म्हणाति तो भारिक जाणों कसा ।
लेखा लेखक वित्पती च परिसा लीलावतीचा असा ॥ १६ ॥
साडेचौतिस या मणांवरि निकें शेराष्टका लेखिजे ।
तोळे एकविसांवरी अधिक ते चत्वारि मासे दिजे ॥
सख्या भार सुवर्ण एक चि असा जो नित्य अष्टावधीं ।
भारांतें प्रसवे सुवर्णमणि तो प्रत्यक्ष तेजोनिधी ॥ १७ ॥
दे तो नित्य सुवर्णदान नगरीं शोभे विना याचकीं ।
विस्तारे अति कीर्त्ति लोक वदती वार्त्ताविना याच कीं ॥
प्रादेशीक अनेक विप्र तरले दारिद्र्य सिंधू-पुरा ।
झाले लोक अशोक दुःख न उरे रक्षा जशी कर्पुरा ॥ १८ ॥

७ सिंधु=समुद्र * सद्म=घर. ८ उरगेंद्र=शेषसर्प ९ उग्र=उग्रसेन राजा १० भार=
३४½मण, ८ शेर, २१ तोळे, ४ मासे असें पुढ १७ वे श्लोकांत आहे.

ऐशी ही लोक वाणी परिसत श्रवणीं कृष्ण बोले तयासी ।
कैचें हें हेम देशी अगणित विबुधां आणिकां याचकांसी ॥
तो बोले यादवेंद्रा [11]तरणि मज मणी दीधला भक्तियोगें ।
तो देतो फार सोनें प्रतिदिनि मग मीं दान देतो प्रयोगें ॥ १९ ॥
बोले हरी स्वहितअर्थ मनांत ध्यावा । होतो मणी तुज न योग्य नृपासि द्यावा ।
हा नीधि थारत नसे लघु आश्रमातें । जातां हि जे परम पावति ते श्रमातें ॥२०॥
[12]मृगमदें चि मरे मृग कर्दळी । निपजतां तिस कर्पुर निर्दळी ।
फणि मणिस्तव गो निजचामरें । मिरवि भूषण वास्तव तो मरे ॥ २१ ॥
सांगे हरी स्वहित तें न मने च त्यातें । आरंभिले अनहिता स्वकिया स्व हातें ॥
कंठीं प्रसेनअनुजा मणि बांधिलासे । जाणों दुजा दिनमणी च तसा प्रकाशे ॥२२॥
कोणेके काळवेळीं विपरित समयीं त्या प्रसेनें विहाळीं ।
केलें प्रस्थान झाली रजनितमवशें सर्व सेना निराळी ॥
एका अश्वोत्तमेशीं भ्रमण करितसे [13]सुप्ति नेत्रांसि आली ।
होणारा कोण टाळी अवचित विपिनीं [14]केसरी गांठि घाली ॥ २३ ॥
मारी अश्वोत्तमाला वधुनि नर मणी शीघ्र घेऊनि गेला ।
त्या काळीं ऋक्षराजा विहरण करितां त्या वनामाजि आला ॥
पाहे तों दीप्ति मोठी नवल मग करी काय आला [15]तमारी ।
शोधी [16]ब्रह्मावतारी चपळ पद [17]हरी देखताहे पुढारीं ॥ २४ ॥
मारी दोर्दंड कोपें वधुनि मग मणी घेतला तो प्रतापें ।
आलासे स्वाश्रमातें कुमरि म्हणतसे आणिलें काय बापें ॥
घाली कंठीं मणी तो उरत न विवरीं अंधकारासि थारा ॥
ऐकावें सावधानें म्हणत मुनिपुढें द्वारकेच्या विचारा ॥ २५ ॥
गेला प्रसेन म्हणती जन काय झाला । मागे हरी मणि न दे चि फळासि आला ॥
इच्छी समर्थ तरि सर्व हि शीघ्र द्यावें । दूराग्रहें सहित अर्थ जिवें चि जावें ॥ २६ ॥
लोकीं लौकीक ऐसा परिहरण करी कृष्ण शोधा निघाला ।
संगें घेऊनि सेना फिरत गिरिगुहा त्या वनामाजि आला ॥
पाहे तों वीर वाजी महिवरि पडले माग लागे हरीचा ।
त्यातें ही मृत्यु झाला रिसकरनिकरें लाविती लाग त्याचा ॥ २७ ॥
पुढें जातां जातां विवर नयनीं देखत [18]हरी ।
[19]हरी हा सद्रत्ना म्हणुनि वदती ते परिहरी ॥

११ तरणि=सूर्य. १२ मृगमद=कस्तुरी. १३ सुप्ति=झोंप. १४ केसरी=सिंह. १५ तमारी=सूर्य. १६ ब्रह्मावतारी=जांबवान्. १७ हरी=सिंह. १८ हरी=कृष्ण. १९ हरी=नेई.

[२०]हरीतें मारोनी करि कवण हे क्रूर करणी ।
रणीं त्याचे रक्तें करिन म्हणतो रक्त धरणी ।। २८ ।।
ठेविले सकळ सैनिक मागे । हे कथा नपवरा मनि सांगे ।।
जातसे विवरिं एकट राया । जो उदीत खळदंड कराया ।। २९ ।।
बोले मुनी सकळ सैनिक वीर द्वारीं । ठेवूनियां प्रविशला विवरीं मुरारी ।।
कैसा म्हणाल तरि तो विबुधावतारी । नव्हे चि त्यात परि एक चि धैर्य धारी ।३०।
ते बोलती परम काळ कठीण आला । झाला अनर्थ तरि काय विवेक पाला ।।
राहोनियां उपरि सार्थक होत नाहीं । द्वारावतीविण विचार न अन्य कांहीं ।।३१।।
सेना द्वादश दीन सर्व विवर-द्वारावरी राहिली ।
येतां मार्ग न देखती च हरीचा चिंतार्णवीं वाहिली ।।
प्रेतें प्राणविना स्वयें न चलती ज्यांतें नसे तारता ।
मध्यें [२१]स्यंदन चालवीत असती श्रीकृष्णजीचा रिता ।। ३२ ।।
येतां देखति लोक ते नगरिचे शोभा नसे [२२]वाहिनी ।
साक्षेपें जंव पाहतां न दिसते श्रीमूर्ति [२३]आब्वाहिनी ।।
कृष्णावीण रयोत्तमा निरखिता तो काळ भासे कसा ।
कोणा कोणि न शांतवी प्रळय हा सर्वां शिरीं कीं तसा ।।३३।।
दुःखांबुपूर अति अद्भुत तेय आला । शोकांबुधींत अवघा जन मग्न झाला ।।
उग्रादि राम पुसताति वृतांत सारे । सांगा त्वरें वदति दृश्य पदार्थ सारे ।। ३४ ।
जातां देखो प्रसेना मरण अवचटें केसरीचेनि हातें ।
होतां तेथूनि अग्रे [२४]निधन रिसकरें देखिले त्या हरीतें ।।
त्याचा ही शोध घेतां विवर मग पुढे एक तें घोर भारी ।
आम्हां ठेवूनि द्वारीं न धरि भय शिरे एकटा कैटभारी ।। ३५ ।।
आम्ही द्वादश दीन सर्व विवर-द्वारावरी राहता ।
कांहीं एक उपाय तेय न चले सर्वांमतें पाहतां ।।
आला वृत्त निवदनार्थ इतुक हे एकता त्या मुख ।
हाहाकार च वर्तला जनपदीं गेलीं गळालीं सुखें ।। ३६ ।।
गडबडां धरणीवरि लोळती । वदनिं खेदक शब्द हि बोलती ।।
हरिविना सुख तें कवणा असे । सकळ अंडकटाह रिता दिसे ।। ३७ ।।
पिता बोले कृष्णा न पुरवुनि तृष्णा मज कसा ।
वियोगाब्धीमध्ये बुडत पहसी शोकवळसा ।।

---

२० हरीतें=सिंहाला २१ स्यंदन=रथ. २२ वाहिनी=सेना. २३ आब्वाहिनी=मेघस दृश. २४ निधन=मरण.

अनेकां जन्मांचें सुकृतफळ देऊनि हरिलें ।
मुखीं कृष्णा कृष्णा म्हणत तव मूर्च्छेनं वरिलें ॥ ३८ ॥
वियोगें पुत्राच्या जगजनकमाता तळमळी ।
करें ताडी वक्त्रा जळ गळतसें नेत्रकमळीं ॥
अरे रे गोविंदा वदन नयनीं दाखविं हरी ।
न कंठे रे बाळा तुजविण मला देहकुहरीं ॥ ३९ ॥
विराली सर्वांगीं भिमक-तनया चिद्रुपकळा ।
अलंकारां त्यागी नयनिं जळ वक्त्रेंदु विकळा ॥
भुमी लोळे हातें उरशिरमुखा ताडण करी ।
किती सांगावी ते ल्हहरिवरि दुःखाब्धिलहरी ॥ ४० ॥
तों त्या भक्त हरिचे परमाप्त आले । जे कां चतुष्टयगती हरितें मिळाले
ते बोलती चतुर हो वचनावधारा । नेणा हरीचरित शोक वृथा उभारा ॥ ४१ ॥
बोले उद्धव भक्तराज सकळां कां आदरा शोक हा ।
बाललादि चरित्र चित्र हरिचें अद्यापि [ तुम्ही ] पहा ॥
दुष्टां दंड उदंड दैत्य वधिले कंसादिकां ही असा ।
काळाचा हि विशाळ काल हरि जो त्या मृत्यु माना कसा ॥ ४२ ॥
दिसे शोभा सर्वी अमळ दिसती या दश दिशा ।
न कांहीं दुश्चिन्हें हृदयकमळीं साक्षि ही अशा ॥
वदों हे सद्वाणी धरुनि असणें निश्चय मनीं ।
न जावें कोणीं ही चतुर नर हो शोक-भुवनीं ॥ ४३ ॥
ऐकतां नगर शोक-पसारा । पूशिलें विभर गूढ विचारा ॥
आयकें मुनि म्हणे कुरुराया । तो शिरे विवरिं गर्व हराया ॥ ४४ ॥
सकळ समुह-पंक्ती देखिली अंगनांची । अवचित तंव पाहे मूर्ति सर्वोत्तमाची ॥
जवळि कुमरि पाहे तो मणी कंठ-देशीं । हरुनि मग हरीनें घेतला सत्वरेशीं ॥४५॥
देखतां चि हरितें रिसदारा । बोलती अजि किमर्थ उदारा ॥
जाहलासि पतिचा अपराधी । कूर वीर सगुणा तुज बाधी ॥ ४६ ॥
कोपी उग्र पराक्रमी रिसपती त्याच्या बळाची सिमा ।
ब्रह्मा इंद्र कृतांत रावण-रिपू ते जाणती विक्रमा ॥
या लागीं अरविंद-सुंदर-दशा कारुण्य वाटे मना ।
जावें देउनि रत्न सत्वर घरा चित्तांचिया मोहना ॥ ४७ ॥
देखतां चि नयनीं छळशी रे । सुंदरा मग कसा पळशी रे ॥

२५ अरविंद=कमल.

वाटसी जिव जसा गुणरत्ना । सांगतों तव हितास्तव पत्ना ॥ ४८ ॥
बोले गर्जोनि वाचा त्रिभुवनपति तो सिंधु जो कीं बळाचा ।
जा जा तो चेववा जा न गणि विर दुजा गर्व नासू खळाचा ॥
तुम्हीं जाना च जाया धरुनि जरि भया ऋक्ष तो जागवाया ।
गर्वाच्या पर्वताची महिवरि निकरें ताडितो दीर्घ काया ॥ ४९ ॥
हें कठोर घन गर्जन कानीं । ऐकता च उठला दचकोनी ।
देखतां नयनिं मानव ऐसा । कोपला वनिं हुताशन तैसा ॥ ५० ॥
आरक्त नेत्र वदनीं विकराळ दाढा । क्रोधें करी दर्शन शब्द मुखें कडाडां ॥
रोमीं उभी कडकडी भुजकाळदंडा । ज्या विक्रमें गलितवीर्य विरप्रचंडा ॥५१॥
विष्णु तो त्रिजगनायक साचा । वर्णवे न पुरुषार्थ तयाचा ॥
सृष्टि-लेख करि फार विधीचे । कीं अगाधपण अंबुनिधीचें ॥ ५२ ॥
दोघे वीररसाबुधी उहुळले एकाकि ठेले बळें ।
हस्तें हस्त पदें पदा विदळती मल्ल क्रमें आगळे ॥
देती ते थडका चपेट कडका शब्दोद्भवें गर्जना ।
नाना युक्ति परस्परें उरशिरीं कोपाद्भुतें मज्जना ॥ ५३ ॥
अठ्ठावीस दिनावधी दरिगुहाअभ्यतरीं भीडती ।
एका एक ढळे चि ना किमपि ही नादें दणाणे क्षिती ॥
देवें युक्ति विचारिली निज मनीं त्रैलोक्यभारा तळीं ।
झाला बा न वधासि योग्य म्हणुनि भक्ताग्रणी हा बळी ॥ ५४ ॥
आणिला सबळ भूमि अहो तो । विस्मयें चकित अद्भुत होतो ॥
वीरसागर बळें तरलों कीं । मत्समान नवता सुरलोकीं ॥ ५५ ॥
अशा या परताईं पडत तंव चित्तांत विवरी ।
म्हणे आज्ञा घेता रघुपतिमतें गौरव करी ॥
करीं मी विज्ञप्ती प्रबळबळ योद्धा मज असा ।
घडावी त्वद्भेटी वर वरद मानूं भरंवसा ॥ ५६ ॥
अस्तू म्हणोनि नृप भास्कर-वंशरत्नें । हें पावसी पुढति जाण विना प्रयत्नें ॥
द्वापार-अंत-समयीं वरदान साचें । देईन दर्शन तुतें पद सारसाचें ॥ ५७ ॥
ऐशी वृत्ति विरे उपाधि विसरे तो क्रोध ही वोसरे ।
चित्तीं प्रेम भरे विरत्व उतरे संसारमाया सरे ॥
कंदर्पादि नुरे अहकृति सरे सर्वांग ही पाझरे ।

---

२६ दशन=दांत. २७. रोम=केश.

मागारें नयनांबुजीं निरखितां श्रीराम देखे त्वरें ॥ ५८ ॥
वज्रादिलक्षणसुलक्षण पादपद्मे । योगीशमानसमधुव्रतसेव्य सद्मे ॥
शापाभिमोचन पहा सतिगौतमाचें । ते देखिले चरण त्या पुरुषोत्तमाचे॥५९॥
रक्षोगणासि भय देत कठोर साचें । देतां निजां वरद ओघ सुधारसाचे ॥
सीताकरग्रहण मंगल मंगळाचें । ते देखिले कर तया शुभमंगळाचे ॥ ६० ॥
केले स्वभक्त भजने निजरूप सारे । इच्छावशें च पसरी अवघे पसारे ॥
त्याचे सुखासि मुख कोण जगीं निवेदी । नेणों म्हणोन धरिलें दृढ मौन वेदीं ६१
हें देखतां वदन सद्गद ऋक्ष झाला । अष्टाब्जू विमल सात्विकभाव आला ॥
सत्वादि शांति मग आदरिलें स्तवातें । वर्णी यथास्वमति राघववैभवातें ॥ ६२ ॥
श्रीसूर्यवंशवर राघव रामराया । श्रीवक्त्र निस्पृहजनांत खरें कराया ॥
तूं पूर्णकाम सुखधाम कृपैकसिंधू । केली दया मणिमिसें मज दीनबंधू ॥ ६३ ॥
स्वामी रूपें ज्या मज तोषवीले । तें रूप पाहू मनि इच्छियेले ॥
ऐकूनियां राम उदार-मूर्ती । झाला तयीं कृष्ण विशालकीर्ती ॥ ६४ ॥
कोपशील जरि तूं लघु मुगी । जों न होय पळ तों मज भगी ॥
मानिसी स्वपदरेणु रिसातें । मर्दिलें मज तुवां निज हातें ॥ ६५ ॥
असे आतां माझी विनति चरणीं एक परिसा ॥
न कांहीं आशंका तव पदरजें सार्थक रिसा ॥
कितेका काळांची विरूढालि गृहीं संततिलता ।
गमे हे अर्पावी तव चरणसेवेसि दुहिता ॥ ६६ ॥
त्वां जिंकिला मणि सुचंडपराक्रमानें । ईचे करीं ग्रहण या च अनुक्रमानें ॥
कीजे म्हणे हरि नुपेक्षित तो स्वदासा । अर्पी सुता मणिसहीत जगन्निवासा॥६७॥
तों ऐशा सुदिनीं प्रबंध वदनीं डोले हरीकीर्तनीं ।
स्कंधीं ब्रह्मविणा कथी हरिगुणा तत्काळ आला मुनी ॥
बोले ऋक्ष समस्त पुण्य फळलें उद्धार केला दिना ।
श्रीकृष्णें हि विनीतता मुनिचिया केलें पदीं वंदना ॥ ६८ ॥
केली पुजा विधिपुरःसर नारदाची । ऋक्षें सुकीर्त्ति कथिली भवपारदाची ॥
गांधर्वलग्न विधिपूर्वक लाविलेंसे । आश्चर्य हें मुनिवराप्रति दाविलेंसे ॥ ६९ ॥
नमूनी सर्वात्मा हरि म्हणतसे आजि सुदिनीं ।
करावें कीं येथें मज गमतसे गायन मुनी ॥
मुनी चित्तीं भावी नृपति परि हा गोवळ खरा ।
वनौकोंच्या[२१] साद्यें मज म्हणतसे गायन करा ॥ ७० ॥

---

१८ मधुव्रत=भ्रमर. २१ वनौकाच्या=अरण्यांत रहाणाऱ्या आचलाच्या

काहीं न बोलत मुनींद्र उगाच राहे । भक्तांसि गर्व हरितें सहसा न साहे ।।
आज्ञा करोनि मग आणवि रीसबाळें । गा रे कळेल तरि सांगितलें कृपाळें ।।७१।।

ऋषी हासि चित्तीं रिसशिशु करिति जे गायनकळा ।
हरी याचा भोक्ता तरि इतर सुकळा जेथ विकळा ।।
मनीं भावी ऐसें परि श्रवण उपहासार्थ करितो ।
मुनीतें लक्षेना हरि त्रिभुवनपती गर्व हरितो ।। ७२ ।।

देई विणा विनविला मुनि ऋक्षतोकीं । नेदी च ते समयिं त्यासि मुनींद्र तो कीं ।।
हे तंतु तीन तुटती रिसहस्तकामें । कैसें किजे म्हणत नारद कौतुकानें ।। ७३ ।।
सांगे हरी मुनिवराप्रति गायनाच्या । हे रीस जाणति कळा सकळा तयाच्या
दीजे विणा न करुनी अनमान साचा । ऐकोनि देत मुनि हस्तकिं त्या रिसांच्या ।।७४।।

वीणा घेउनियां करीं रिसशिशू लावी स्वरांच्या गती ।
तेव्हां श्रीहरि आणि नारद स्वयें कौतूक तें पाहती ।।
तंतू सर्व बरे स्वरासि मिळतां वाजे विणा सुस्वरें ।
गेला गर्व गळोनी नारदमुनी आश्चर्य मानी खरें ।। ७५ ।।

सप्तस्वरें करिति गायन औट मानी । जें ऐकतां मघवें[30] राजपदा न मानी ।।
तादस्थता वरित ते जन मूढ सारे । वेधे न नारद सुविद्य मुनी कसारे ।। ७६ ।।

केलें गायन सुस्वरें वनचरें ईशकृपा-ईक्षणें ।
गानाचीं विधिवत् समग्र असती ज्या गायनीं लक्षणें ।।
गानीं नारद जो विशारद[31] हि तो आश्चर्य मानी मनीं ।
झाले ऐकुनिया चकीत रिस ते तैशा च तद्भामिनी[32] ।। ७७ ।।
इच्छामात्रें च निर्मी भुवननिवहें[33] जो पूर्णब्रह्मा[34]वतारी ।
साक्षी अद्यापि दावी नयनिं जलनिधीं प्रस्तरा[35]लागिं तारी ।।
सर्वांचा ईश तो हा अघटित घडवी काय आश्चर्य माना ।
गानातें वन्यवक्त्रें करवि परिहरी नारदाच्याभिमाना ।। ७८ ।।
त्या गानें तद्वनींचे उपलें[36] विरुनियां होय तत्काळ पाणी ।
सत्तावैचित्र्य ज्याची नवल परि अशी दाखवी चक्रपाणी ।।
सकेतें श्रीहरीच्या महति मढिवरी ठेविली त्या रिसांनीं ।
आले ते पूर्वभावा दृशदें[37] सकळ ही गायनाच्यावसानीं ।। ७९ ।।

वीणा शिळेंत शिरतां स्वर शांत केला । लज्जीत नारदमुनी श्रवणा भुकेला ।।
पाहे विणा विधिज तों तंव अर्ध राहे । तों विस्मयें म्हणत गर्व हरी न साहे ।।८०।।

---

३० मघव=इंद्र. ३१ विशारद=निपुण ३२ भामिनी=स्त्रिया ३३ निवह=समूह. ३४ ब्रह्म=परमेश्वर. ३५ प्रस्तर=दगड ३६ उपल=दगड. ३७ दृशद=दगड.

वीणा जो घे मुनी तो न सुटत चि तळीं प्रस्तरीं लीन झाला ।
ऐसें पाहोनि गर्वा त्यजुनि मुनि नमी कृष्णपादांबुजांला ॥
निर्माणें श्रीहरीचें पदनमन तो मोह ही आकळेना ।
वृत्ती जों मानसाच्या न उपरमति तों कृष्ण आत्मा कळेना ॥ ८१ ॥

जगन्निवासा तुजला नमो जी । अन्याय माझा हरि हा न मोजीं ॥
मूर्ती कळाधार धरोनि तनू । जैसा तसा नाचविसी जगा तूं ॥ ८२ ॥
सबाह्य तू व्यापक या जगातें । सोनें उपादान जसें नगांतें ॥
मेणोनि ऐशी धरिली अहंता । होसी दयाळा परि गर्व-हर्ता ॥ ८३ ॥
देई विणा करित वदन देवराया । तूं तों समर्थ अपराध क्षमा कराया ॥
बोले हरी करुनि गायन घे मुनींद्रा । का आजि मानस नव्हे विरहीत तंद्रा ॥८४॥
मी बाळ बाळक किती छळशील आता । तू तों पितामह तथापि हि तात माता ॥
ताडी पदें करुनि बाळक माउलीतें । ते मानवी जनानि मानित तोष चित्तें ॥ ८५ ॥

ब्रह्मा इंद्र करोनि गर्व तुजशीं वत्सादि गोवर्धना ।
नानायुक्ति विचारणा विचरती ऐशा किती कल्पना ॥
जाणें मी अवघे परंतु घडली तैशी च माझी क्रिया ।
गेला गर्व गळोनि सर्व मजला देवें करावी दया ॥ ८६ ॥

ये हास्य तों हरि चराचर-पाळकातें । गा रे पुन्हां म्हणतसे रिस-बाळकांतें ॥
गाता चि ते गळित अश्म समस्त झाले । सप्रेम घेउनि विणा मुनिराज डोले ॥८७॥
हे लीला नवल त्रिलोकपाळकाची । वदी तो मुनिवर धूळि बाळकांची ॥
आता या उपरि कथा पवित्र राया । जे नौका भवसागराप्रती तराया ॥ ८८ ॥

पौरीं शोकरूपें चि मास भरला शोभा नसे सर्वथा ।
जैशीं सुंदर मंदिरें निशिभरें दीपाविणें कीं वृथा ॥
कोणेके सुदिनीं समस्त मिळती अंबालया जावया ।
बाळेआदिकरोनि अन्य नगरीं कोणी न पाहावया ॥ ८९ ॥

सद्भावें करितां सुपूजनविधी संतोषली कालिका ।
पृच्छा जों करिती वदे गगनवाक् चिंता करूं रे नका ॥
आहे स्वस्थ हरी करूनि युवती तो येतसे मंदिरा ।
शृंगारा नगरी त्वरीत जन हो साहित्य लग्ना करा ॥ ९० ॥
ऐशी ही शुद्ध वाणी परिसुनि श्रवणीं विश्व आनंद मानी ।
येता मार्गीं सुचिन्हीं खगमृगमिळणी वायसांची सुवाणी ॥

---

३८ उपादान=ज्याच्या पासून एकादी वस्तु होते तें; दागिने सोन्यापासून होतात म्हणून सोनें हें दागिन्याचें उपादान. ३९ नग=दागिने. ४० अश्म=दगड. ४१ गगनवाक्=आकाशवाणी.

बाहूनेत्र स्फुरोनी विकसित वदनीं हर्ष सीमा न मानी ।
नानावाद्यें विनोदें नगरजन पहा पावले राजधानी ॥ ९१ ॥
तों अकल्पित सुवार्तिक दोन्ही । वर्धमान करशब्द वदोनी ॥
दाविती अजि अजी हरि आले। ऐकतां सकळ सादर झाले॥ ९२॥
झाली सन्नध चातुरंग अवघे ग्रामस्थ ही लोटले ।
एका एक पुढें त्वरा करुनियां श्रीवल्लभा भेटले ॥
संगें नारद जांबुवंति हरितें देखूनियां कामिनी ।
आल्या घेउनि आरत्या निशिकरा तारा जशा यामिनी ॥ ९३ ॥
माता पिता नृपति वंदुनि देवदेवा । तो भेटला सकळिकांस हि वासुदेवा ।
आनंद हृत्कमलिं नागरिकांसि झाला । हर्षांबुपूर नयनीं न धरे चि आला ॥९४॥
त्या नंतरें सकलवृत्तविशारदानें । केलें निवेदन नृपा मुनि नारदानें ।
हे आणिली वधु सुयोग्य विवाह होणें । साहित्य आजि सुदिनीं च तुम्ही पहाणें ॥९५॥
बोलावोनि ऋषी पुरोहित तथा ग्रामस्थ अत्यादरें ।
जो उद्योग जयासि योग्य अवघे ते योजिती सादरें ॥
लक्ष्मी ज्या पदिं सेवनासि रतली त्याच्या गृहीं कायसें
साहित्यासि विलंब जाण नृपती आश्चर्य हें तों नसे ॥ ९६ ॥
सुमंत्रें वेदोक्तें वरुनि वधुतें मंगल करें ।
जशी ज्याची इच्छा पुरवुनि तशी अंबुजधरें ॥
चतुर्थी होमातीं निजगृहिं रमा पूजन-विधी ।
अशेषा संपादी हरि करि अशी यज्ञ अवधी ॥ ९७ ॥
आक्षेप हा जरि कदाचित चित्त भावी । ऋक्षात्मजा कशि सुलक्षण हो वदावी ॥
ऐसें कदापि न म्हणा बहु येथ साक्षी । काद्रव्यनादिनि सुलक्षण सारसाक्षी ॥९८॥
तैशी च ते गिरिसुता वनिता भवाची । सिंधूसुता न गणवे गति वैभवाची ।
सीता सती धरणिजा रघुवीरकान्ता । मत्स्योदरी शुकमुनीश्वरतातमाता ॥९९॥
या ऊपरी स्वसदनाप्रति ऋक्षराजा । आणोनि त्यासि वसुदेव करीत पूजा ।
केला विनोद तुमच्या सदनीं अहो तो । रातोत्पलोत्पति शिळेवरि सद्य होतो॥ १०० ॥
हें जसें चरित चित्र चि येथें । कीं सुयोग्य चि असे तरि तेथें ॥
कां शिळे चि वरि आकृति दावी । त्यास ही जलज वाणि वदावी ॥१०१॥
भाव कीं अजि अशा स्वरूपाशीं । हे सुता उपजली गुणराशी ॥
तो म्हणे अजि नपूसक देहीं । कामचार करि काम अदेही ॥१०२ ॥
याचा भाव तुझ्या कुळीं तरि पहा कीं शापिले पूर्वजें ।
नाहीं छत्रसिंहासनादिबिरुदें पौरुष ही सर्व जें ॥

तेथें या हरिची लिळा प्रकटली जे दुष्टसंहारिणी ।
गातां ऐकवितां मनें विचरितां संसारसंतारिणी ॥ १०३ ॥
तेथें यादव बोलती रिसपती जामात हस्तें पूजा ।
केली सांग म्हणोनि ऐकत असों हे अर्पिली आत्मजा ॥
बोले ऋक्ष अहो यथार्थ वदतां आत्मा जगाचा हरी ।
पूर्वीं म्यां वर इच्छिला भुजबळें तो तृप्ति माझी करी ॥ १०४ ॥
सर्वां या कैमठासि योग्य धरणें आहे गिरी-मंदरा ।
हे कां हो अवघे तुम्ही मिरवितां एके धराभी धरा ॥
येकें शंख विनाश येर अवघे ते योजिले आहरा ।
तैसे यादव हो तुम्ही मज पुढें कां गर्व मिथ्या करा ॥ १०५ ॥
या परी स्वसदना प्रति जाया । ऋक्षराज मुनि नारद राया ॥
दे निरोप मग वंदुनि जाती । जाहली पुढिल ऐक कथा ती ॥ १०६ ॥
तेव्हां सत्राजितातें मणिवर दिधला तो हि लज्जीत झाला ।
आम्ही ज्याच्या सुखानें सुखरुप असिजे त्या मनोभग केला ॥
ऐसे भावोनि चित्तीं सहित मणि सुता सत्यभामा हरीतें ।
द्यावी हें योजिलेंसे सुहृदसह मतें अर्पिजे या सुचित्तें ॥ १०७ ॥
तों ज्योतिषी भट पुरोहित सुज्ञसुज्ञां । आणोनि तो चि सुमुहूर्त विवाहयज्ञा ॥
वंदूनिया वडिल सद्गुरु सभ्य शिष्टा । केली त्वरीत मग मडपसुप्रतिष्ठा ॥१०८॥
अज्ञापितांति मग शिष्ट तयासि तेव्हा । अभ्यूदयीक करणें तुम्हि शीघ्र एव्हां ॥
स्थापूनि देवक मुहूर्त अनुक्रमानें । संपादिजे विधि जसा स्वकुळानुमानें ॥ १०९॥
झाली सीमांतपूजा उभय सदानें हां स्थापेती देवकातें ।
वस्त्रें घेऊनि देती शिववचनकरा दक्षणा याचकांतें ॥
वाक्‌दानाचे विधीनें वधुपुजन करा पूर्वींचे निश्चयासी ।
केलें प्रस्थान देवें रुखवत पाहिलें घेउनी अग्रयासीं ॥ ११० ॥
राया करोनि मधुपर्क विवाहवेळीं । केली उभी हरितरूपति वंशवेली ॥
मध्यें धरूनि सुपटासि सुभद्र वाणी । उच्चारिती गणक ते न करोनि वाणी १११
आले देव समस्त दिक्पति पहा दाटी विमानीं नभीं ।
वाद्यें वाजति दिव्य घोष गगनीं नाना ध्वनी दुंदुभी ॥
सर्वांचा जयकार शब्द उठला गंधर्व गाती स्वरें ।
पुष्पें वर्षति देव ते च समयीं त्रैलोक्य हर्षें भरे ॥ ११२ ॥
द्वैत अंत्रपट वेदविदांनीं । टाकुनी नयनिं मुक्तिप्रदानीं ॥

४२ कमठ=कासव.

दावुनी हरिति भेदतमाला । घालवीति हरिकंधरिं माळा ॥ ११३ ॥
झालें सुलग्न वरिली हरि सत्यभामा । साक्षाद्धरी स्वरूप यास्तव गर्वसीमा ॥
त्या नंतरें वधुपिता करि विप्रपूजा । जे त्या सभेंत करि त्याचि हि ते च पूजा ११४
रत्नादि आभरणयुक्त अनंत वासां । विध्युक्त अर्पित पुजोनि जगंन्निवासा ॥
धेन्वादि आंदण तसें बहु दास दासी । देई स्यमतकमणी हि सुखप्रदासी ॥११५॥
बोले सत्राजितातें अकपट हरि तो हा मणी त्वां चि घ्यावा ।
आम्ही लोकापवादा परिहरि दिधला जाण या सत्य भावा ॥
बंधू तो व्यर्थ गेला तुज हित न कळे सांगतां ही कळेना ।
आतां ही सावधानें जतन जिव करीं नीध हे आकळेना ॥ ११६ ॥
ब्रह्मेंद्ररुद्रमुनिदानवदेवदेव । तो जोडला सुहृद आपण वासुदेव ॥
मानूनि दे बहु द्विजांसि सुवर्णमुद्रा । आनंदला उदकवृद्धि जशी समुद्रा ॥११७॥
सुगंध तैलादिक मज्जनातें । साह्नियां घेति सुभोजनातें ॥
उत्साह ऐसा परि चारि राती । पूजोनिया तें करिती वराती ॥ ११८ ॥
खगेंद्राचे खांदीं चढत हरि घेऊनि युवती ।
पुढें मागें चाले भटसहित सेना गजवती ॥
प्रदीपांची शोभा गगनिं भरला निःस्वन तुरीं ।
असा जातो सद्मीं स्तवन करितां भाटचतुरीं ॥ ११९ ॥
श्रीचा पती परि तिच्या करि पूजनातें । भाग्योदयासि रिति दाखवितो जनातें ॥
कर्ता न होय वधुतें गृहकृत्य दावी । लीलाप्रवृत्ति हरिची किति हे वदावी ॥१२०॥
ऐसें विध्युक्त पाणिग्रहण यदुविरें लोक जैसे करीती ।
आत्मा जो पूर्णकाम प्रगट जगहिता तो नसे लोकरीती ॥
दिव्यालें दिव्य वस्त्रें सकळ सुहृद ही पूजियेले द्विजाती ।
भाटादीसेवकांतें उचित सकाळिकां देय दे सर्व जाती ॥ १२१ ॥
केले याचक तृप्त हेमवसनें धान्यादिकें गोधनें ।
हस्तीअश्वरथादि इच्छित जशीं त्यां दे तशीं वाहनें ॥
भूदानें नगरें त्रिवीध विधि जें धर्मादि दे सादरें ।
योगी भक्त विरक्त त्यांसि हृदयीं आलिंगिलें आदरें ॥ १२२ ॥
जो ज्ञानविग्रह अमूर्त अनंत राया । साकारला जग भवांतुनि उध्दराया ॥
त्यां तद्विवाह अजि वर्णियला असा रे । गातां जनांसि सुख दे हरि दुःख सारे १२३
ऐसें विवाहचरितामृत माधवाचें । जे प्राशिती श्रवणिं वा पढतील वाचे ॥
त्यां दे हरी स्वपद नासुनि आपदांसी । वदीतसे म्हणुनि संतत त्या पदांसी ।१२४।
अशा या रिती द्वारकाधीश नांदे । गृहस्थाश्रमीं सौख्य जो सज्जनां दे ॥

तयाची कथा हा चि साराश माना । नसे इच्छिलें जी कवींमाजि माना ॥१२५॥
लीला हे जगदात्मया श्रिहरिची त्रैलोक्यउध्दारिणी ।
तो श्रीवल्लभ कर्णधारक जना हे नाव उत्तारिणी ॥
आतां दुस्तर हा भवाब्धि तरतां नाहीं च धोका मना ।
श्रीरामस्मरणाविना इतर ते श्यामा नसे कामना ॥ १२६ ॥

समाप्त.

## गणेशजन्म.*

एके दिनीं स्नान करोनि भस्मा । चर्चीतसे जो करि भस्म भस्मा ॥
लावूनि नेत्रांबुज कंबुकंठा । ध्यानें करोनी बहु काळ कंठी ॥ १ ॥
येवोनि वदे पदयुग्म देवी । तुम्हाहुनी कोण वरिष्ठ देवीं ॥
सांगा मला सत्वर देवदेवा । ब्रह्मादिकां जो न कळे न देवां ॥ २ ॥
निराकार निर्गुण जो या प्रपंचा । नसोनी कदां वेद ज्यातें प्रपंची ॥
जगानंद हा स्वस्वरूपीं चिदात्मा । असे तो चि तूझा कळेना कदात्मा ॥ ३ ॥
श्रवण हें करुनी वदला शिवे । पुससि तू तुज काम मनीं शिवे ।
परम गुह्य तुला न कळे कदा । श्रुतिपुटीं परिसें तरि एकदा ॥ ४ ॥
असोनि ऐसा निजभक्त कामा । प्रसन्न होतो वरदेश कामा ॥
गुणत्रयाच्या करि हा विभागा । गणेश हें नाम असे विभागा ॥ ५ ॥
सुरेंद्रादि ज्या प्रार्थिती नम्र वाणी । असोनी जयाची मला कीर्ति वाणी ॥
प्रयत्नें करा हा चि प्रत्यक्ष मातें । स्मरे मी तसें वत्स जेंवी स्वमातें ॥ ६ ॥
शिव वदे सुवनीं करि या तपा । सहन वो शरिरीं शितआतपा ॥
करुनियां पवनांबु मुखांतरीं । धरुनि ध्यान वसे चि वनांतरीं ॥ ७ ॥
एकाक्षरी मंत्र जपोनि वाणी । ज्या शोधितां स्तब्धलि वेदवाणी ॥
सबीज तो मंत्र मुखें म्हणावा । प्रवाळमाळी करिं हा गणावा ॥ ८ ॥

घनाक्षरी

संख्या नित्य एक लक्ष । करीं जप हा सलक्ष ॥
द्वादशाब्दीं मे प्रत्यक्ष । प्रसन्न तुज गणपती ॥ १ ॥
राहोनियां एकनिष्ठ । सदा असोनी संतुष्ट ॥
मनीं नाणीं सुष्ट दुष्ट । महाघोर विपत्ती ॥ २ ॥

* हीप एथून बारा प्रकरणें रा॰ रा॰ रामजी भोडजी लानोळकर हास्पिटल असिस्टंट मेडिकल डिपार्टमेंट वेस्टर्न डिव्हिजन केस दक्षिण आफगाणिस्थान यांनीं पाठविलेलीं आहेत.

पावलीया थोर विघ्न । करिल देव हा निर्विघ्न ॥
चित्तवृत्ति हे निमग्न । करिल जैसा गणपती ॥ ३ ॥
क्षुधा तृषा अपहार । करोनि वर्जी उपहार ॥
आरक्त पुष्प महाहार । कंठीं घालीं पार्वती ॥ ४ ॥ ९ ॥
वदोनी असें कर्णरंध्रीं त्रिनेत्रें । सबीजाक्षरें आर्पिला पद्मनेत्रे॥
नमस्कारुनी सव्य घाली शिवातें। त्वरें चालिली वावडी जैशि वातें ॥१०॥
स्नेनाद्री बहु उच्च उत्तरदिशे तो पादपीं शोभला ।
त्यामाजीं च सरोवरीं कमळिणी तेणें चि तो दाटला ॥
तेथें स्नान करोनि धौत वसना नेसोनि ते पार्वती ।
घालोनी गिरिजासनावरि बसे एकाग्र चित्तीं सती ॥ ११ ॥
ठेवुनी गणेशा सु-मंडपीं । पूर्वमूख ते बैसली सती ॥
द्वादशाब्द ते लोटले तपा । तो दयानिधी पातली कृपा ॥ १२ ॥
प्रगटला तिच्या ध्यान ओवरीं । कोटि सूर्य ते न पावती सरी ॥
किरिट मस्तकीं श्रवणिं कुंडलें । मुक्तमाळिका पदक शोभलें ॥१३॥
दशभुजांवरी दिव्य आयुधें । शंख चक्र ही मिनलिं त्यामधें ॥
मुख्य विष्णु वक्त्र सव्य त्या शिवा । वाम भागिं त्या विरंचिची ग्रिवा
कोटि मदन ज्यावरुनि सांडणीं । दाटला बहुत अंगभूषणीं ॥
शेष मंचकीं कंज आसनीं । देखिला असा ध्यानसद्मनीं ॥ १५ ॥
दीर्घ शब्द तो करुनि बोलिला । पुससि पार्वती कोण तूं मला ॥
जपुनि मंत्र ज्या तूं अनुष्ठिसी । तो चि मी असें काय इच्छिसी ॥१६
ऐकोनी मचना वदे सुवचना मी याचि जे याचना ।
द्यावी हे सुचना अनेक रचना कांहीं मला सूचना ॥
जैसा हा बचनाग भक्षुनि जनीं कोणी च वांचे च ना ॥
तैसी हे चि विवचना मम मनीं झाली करीं सिंचना ॥ १७ ॥
देवारिदमना सुरेंद्रनमना मत्प्राप्ति जे कामना ।
तेणें मी भ्रमणा श्रमिष्ट सुमना तूं पाववीं वाम ना ॥
केलें आगमना सुबुद्धिरमणा आनंद झाला मना ।
त्वद्दीना क्रमणा त्रितापशमना वारीं त्वरें भ्रामना ॥ १८ ॥
अपत्याची इच्छा मज बहु असे विश्वजनका ।
नको कांहीं यावांचुनि तरि मला कातिकनका ॥
निकामी यासाठीं मम जठरिं त्वां शीघ्र जनणें ।
शिशुक्रीडा दावीं धणिवरि मला तोषवि मनें ॥ १९ ॥

ऐकुनि पार्वतिच्या वचना गणराज वदे वचनें सहजें ।
होउनि मी तव बाळक माय करीन मनोरथ पूरण तूझें ॥
त्यावरि कार्य निवेदिसि जें मज तें घडवीन यथार्थ वो जे ।
क्लेश कदा न करीं सुकुमारि तुं पावल जें मनिं तें मनिं जें जें ॥ २० ॥

वदोनी असें तो गणाधीश मूर्ती । निराकारिया पावला तो अमूर्ती ॥
जसा सूर्य आच्छादिला अभ्रकाळीं । तदां मग झाली सुखाच्या सुकाळीं ॥२१॥
तथापी म्हणे स्वप्न म्यां देखिलें कीं । प्रसिद्धोत्तरें बोलिला नाकळे कीं ॥
म्हणोनी करी मृत्तिकेच्या सुलेपा । भरी रंग नानापरी त्या अलेपा ॥ २२ ॥
पुढें ठेवुनी घेउनी पुष्पपूजा । गिरीजात्मजा अर्पिती पुष्पपूजा ॥
धरोनी पुन्हा ध्यान लंबोदराचें । जयाचें असे वाहनू उंदिराचें ॥ २३ ॥
यथासांग मंत्राग कर्मार्पणातें । विसर्जोनि पूजा करी स्थापना ते ॥
तदां पार्वती तत्पदीं हेतु ठेवी । महासिद्ध क्षेत्राभिधानासि ठेवी ॥ २४ ॥

हर्षयुक्त होउनी सख्यांसि हें निवेदिलें ।
मला गणेश पावला म्हणोनि पाय वंदिले ॥
छंद लागला मनासि कांहिं नाठवे तिला ।
बाळकासि देखुनी करी गणेश खेळिला ॥ २५ ॥
बोलती सख्या तिसी नव्हे गणेश बाळ हें ।
सर्व काळ देह वाळवोनि माळ घ्यासि हे ॥
असेल भाळिं या तरी च बाळ देखसी सखे ।
अर्धी च साहुनी मनात काय सेव वा सुखें ॥ २६ ॥
प्रमाण बोलता परंतु कीं तुं ज्यास जाणती ।
वेद ते मुखें करोनि नेति नेति बोलती ॥
चारमूख पांचमूख शेष तो हि श्रांतला ।
त्याचिया गुणीं ममात्मप्राण जाण रातला ॥ २७ ॥
सर्वसाक्ष पंकजाक्ष जे क्षणींच ईक्षिन ।
मुहूर्तीं त्या सुवासिनीसि वायनासि देइन ॥
करीन दान अवदान पावकीं घृतोत्पलें ॥
शर्करादियुक्त प्राशवीन या पयामृतें ॥ २८ ॥
पूर्वीं मातृगृहीं कुमारि असतां माते निवेदी पिता ।
आतां सांप्रत तें करीन सखिये ऐकें चतुर्थीव्रता ॥
मासीं भाद्रपदीं चतुर्थिदिवशीं त्या शुक्लपक्षीं महा ।
हस्तें पार्थिव हा गणेश करितां संप्राप्त हो काम हा ॥ २९ ॥

या व्रतें करूनि पावले वरा। अत्यंत प्रीय मी जाण त्या हरां ॥
वदोनियां असें व्रतारभितां। प्रसन्न जाहला तो जगत्पिता ॥ १० ॥
आनंदली मनीं दिव्य भामिनी। वंदुनी पदा नम्र भाषिणी ॥
प्रार्थिते गणाधीश स्वामि तो। खरा करीं अतां पूर्ण बोल तो ॥ ११ ॥
सत्य बोलसी आजि तू माय वो। विस्मृती मला कदापि ही न हो ॥
पुत्र होउनी वधिन सिंदुरा। सौख्य पाववीन दिव्य अंबरा ॥ १२ ॥
साप्रत प्राकृत बाळक होउनि रजवि चित्त गणाधिश माझें ॥
पाळखिं घालुनियां हलवीन मि घेइन मी मुखचुंबन तूझें।
घालुनि माडिवरी तुज न्हाणिन लाविन स्नेह सुगंधित जें जें ॥
त्यावरि उष्ण सलील हि ओतुनि फुंकिन कान बरे बहु वोजे ॥ १३ ॥
मान्य करोनि च तो सुकुमार कुमारपणे करि त्या रुदनातें।
हृत्कमळीं द्विभुजीं कवळी मग घेउनि जाय त्वरें सदनातें ॥
नेउनि नदन ते नगनंदिनि दे हळदी स्वकरें सखियांतें।
लावुनि कुंकुम घालुनि आसन बाळक ठेवि तया समुद्रातें ॥ १४ ॥

समास.

---

## जनार्दनकृत रामस्तुति.

देव सर्व इंद्रआदि धेनुयज्ञपाशा। त्रास देत दैत्यराज लंकनाथ नित्यशां ॥
मूनिमित्य ब्रह्मदेव शेषशायि वीनवी। रामराज भक्तकाज वेषधारि लाघवी ॥ १ ॥
भानुवंशि पूर्णब्रह्म रामरूप शोभलें। ताटिकेसि मोक्षदान अध्वरासि रक्षिलें ॥
अहल्येसि उद्धरोनि गौतमासि तोषवी। रामराज भक्तकाज वेषधारि लाघवी ॥२॥
त्र्यंबकासि मोडितां चि दैत्य देव कांपती। माळ घालि भूमिजा सुमनें सूर वर्षती ॥
पाहतांच वीर्य शौर्य शक्ति हीन भार्गवी। रामराज भक्तकाज वेषधारि लाघवी ॥३॥
पितृवाक्य सत्यनेम दावि भाव हा जना। निघे वनाप्रती शीघ्र सूरकार्यसाधना।
सिते सह पंचवटीवासी नटीं जान्हवी। रामराज भक्तकाज वेषधारि लाघवी ॥४॥
मृगवेष राक्षसासि मारि नीच हस्तकीं। रामशुद्धि देवरासि पाठविता जानकी ॥
सिता नेत लंकनाथ आदिशक्ति वैष्णवी। रामराज भक्तकाज वेषधारि लाघवी ५
अनेक भक्त तारुनी सुग्रिवासि गौरवी। वाळि मारि रामचंद्र कपिसैन्य आणवी ॥
सिताशुद्धि ते आणुनी शिळा सेतु बांधवी। रामराज भक्तकाज वेषधारि लाघवी ॥६॥
रावणासि बोधमार्थ शिष्ट राम पाठवी। गर्वरासि नायकेचि मृत्यु त्यासि वोढवी ॥
सकुटुंब रावणासि स्वर्गसुखा बोळवी। रामराज भक्तकाज वेषधारि लाघवी ॥ ७ ॥
वासवादि दिग्पती करोनि बंध मोचना। राज्यपटीं चिरंजीव स्थापिलें बिभीषणा ॥

सितेप्रती दिव्य घेत कीर्ति घोष गाजवी । रामराज भक्तकाज वेषधारि लाघवी ॥ ८ ॥
अयोध्येसि येउनी भेटि भरत बंधुची । पट्टाधीश रामराव ध्वजा यश कीर्तिची
करी दया जनार्दना तरी च देह सोडवी । रामराज भक्तकाज वेषधारि लाघवी ॥ ९ ॥

समाप्त.

---

## अनंतकविकृत अहिमहिआख्यान.

अहिमहि विनवीती काय आज्ञा करावी
दशमुख म्हूण चिंता हे नदी ऊतरावी
मम सुत अतिकाया मारिला राघवानें
मजप्रति बहुवाटे हें चि अश्लाघ्यवाणें ॥ १ ॥
अहीमही बोलत रावणातें । कळों न दिल्हें पहिलें अम्हातें
कशास जाता सुत मृत्युपंथें । आणोनि देतों जिंत राघवातें ॥ २ ॥
गेली ती गोष्ट आतां पुनरपि करणें चावटी व्यर्थ दीसे
देहींचे जीव जैसे यम हरि हरु ते राम सौमित्र तैसे
वंदोनी रावणातें अहिमहि निघती दूत बीभीषणाचे
येवोनी सांगती तैं टपति रघुविरा चार ते रावणाचे ॥ ३ ॥
ऐकोनियां बिभिषणें निज दूत-वार्ता । नीवेदिलें नळनिळांगदजांबुवंता
जावोनि सांगत असे हनुमंत कानीं । बोले कपी तुह्मि रहा दृढ रामध्यानीं ॥ ४ ॥
सैन्यास तो परिघ सदृढ लांगुलाचा । बांधोनि सावध बसे सुत अंजनीचा
दुर्गास तें कपिविरे मुखदार केलें । देखोनियां सकळ सैन्य अचेत झालें ॥ ५ ॥
रात्रौ सितापति म्हणे मजला फणींद्रा । सुषुप्तिनें पिडियलें करुं चाल निद्रा
जावोनि मंचकिं सहोदर नीजताती । श्रीराम घोष करुनी कपि गर्जताती ॥ ६ ॥
ते काळीं दोघ बंधू अहिमहि कपटी पातले मध्यरात्रीं
देखोनी पुच्छदुर्गा मग तळिं त्रिशुळीं खाणिताती धरित्री
नाहीं त्या अंत पुच्छा खणित बहु जरी शेष पर्यंत गेले
साडोनी शूळ तेव्हां मग अहिमहिनीं ऊर्ध्व उड्डाण केलें ॥ ७ ॥
जाती ते व्योममार्गें रविशशि त्यजुनी नाहिं त्या अंत पुच्छा
त्याहूनी उच्च दीसे मग भुवसदना आक्रमीलें स्वइच्छा
होतां सुप्रास तेथें वरुनि उतरुनी वस्त्रसद्मांत जाती
टाकोनी मोहनास्त्रा झडकरी विवरीं त्या रिपू शीघ्र नेती ॥ ८ ॥
सुमस्तकीं शेषरघूत्तमांते । बांधोनि नेलें उदधी-तटातें
करोनि आज्ञा मकरध्वजाला । वर्जीं मुखें येतिल पथ त्यांला ॥ ९ ॥

ते दोघ नेले महिकावर्तीसी । ज्या मंदिरीं रीघ न हो समासी
त्या स्थानकीं ठेवुनि रावणारी । सभोंवते रक्षण चापधारी ॥ १० ॥
येरीकडे वानर सर्व रामा । पाहों चला बोलति पादपद्मा
मिळोनियां ते कपिरीस आले । न देखतां राम तयीं गळाले ॥ ११ ॥
श्रीरामशेषा गति काय झाली । चिंतकरोनी च मुखें विराली
नेला गमे तो रजनीचरानें । उपेक्षिलें कां गुणसागरानें ॥ १२ ॥
कंठीं मिठी घालुनि वायुपुत्रा । दावीं कपी बोलति रामवक्त्रा
धिःकारुनी रुद्र म्हणे तयांतें । मला गमे बुद्धि नसे तुम्हांतें ॥ १३ ॥
समीप ते तिष्ठति सर्व वैरी । ऐकोनि पीडा करितील भारी
श्रीराम आहे म्हणऊनी वाणी । ऐसें वदा व्यापक चापपाणी ॥ १४ ॥
नळनिळांगदरिसादिक घेउनी । विवर संचर पूरस होउनी
बहुत समृत सधर्मिक वीवरीं । पडत मूर्च्छित चौजण भूवरी ॥ १५ ॥
फिरवुनी कपिविरें दृढ लांगुलें । कवळुनी त्वरित खांदि च वाहिलें
विवर ते त्यजुनि बाहिर पातला । तव निशाकर दिवाकर भेटला ॥ १६ ॥

नळनीळअंगदादि जांबुवंतबाहिरीं
नेत्र ऊघडोनि पाहताति ऊर्ध्व अंबरीं
देखताति सर्वत्रास लांगुलीं विवेष्टिलें
मारुतीस बोलताति कां अम्हांसि बांधिलें ॥ १७ ॥
मूर्छना दरींत हें अम्हांसि नाहिं ठाउकें
आणिलें विवेष्टुनी बहूत वाटतें तिखें
सोडुनी तयांसि बोलिला स्वरूप पालटा
विप्रवेश धरोनियां चला सिंधुच्या तटा ॥ १८ ॥

पांच विप्र देखोनि लोचनीं । मत्स्यसूत धांवे चि ते क्षणीं
अगशक्तिनें पांच लोटले । अंजनीसुतें मुख ताडिलें ॥ १९ ॥
वीर पेटला बाण लावुनी । विंधितो बळें ओढि ओढुनी
रुद्र चेतला वृक्ष ऊपटी । झोडितो करें सिंधुच्या तटीं ॥ २० ॥
वृक्ष मारुनी वक्षमंडळीं । मगृरि-आत्मजा आणिलें तळीं ।
वेढि कंठनाळ् वक्षि बैसला । मृत्युकाळि बोल् साह्य आपुला ॥ २१ ॥
कपिसि तो मकरध्वज बोलिला । मरणकाळि सखा न दिसे मला
मम पिता जरि मारुति आसता । निवटुनी तुजला मज रक्षिता ॥ २२ ॥
नळनिळांगदरिसादिक हांसती । वदतसे तयिं स्वमुखें सुत मारुती
कपि म्हणे जनक मारुति तो कसा । श्रुत करीं अनृत भासत मानसा ॥ २३ ॥

कपिविरें कनकपट्टण जाळिलें । फिरूनि अमृतदधी मुख क्षाळिलें
जिवनिं जो वदनखांकर टाकिला । जननिनें मगरिनें मग गीळिला ॥ २४ ॥
तो ऊर्ध्वरेता जन बोलताहे । मातेस तैं पासुनि गर्भ राहे
त्या पूर्णमासीं मज जन्म झाला । मी बाप जाणें पवनात्मजाला ॥ २५ ॥
ऐकोनियां मारुति ऊठलासे । आलिंगिला बाळक सत्य भासे
बाहोनि आणीं मगरीस आतां । जाणोनि बोलें तुज बाहि ताता ॥ २६ ॥
प्रतार-नामा परिसोनि आली । देखोनि विप्रां मग ते बुझाली
तें रूप नोहे पुर दग्ध केलें । तये क्षणीं वानर-रूप झालें ॥ २७ ॥
देखोनि तीनें प्रणिपात केला । घेई पुढें त्या मकरध्वजाला
रुद्रें तिला सांगुनि सर्व वार्ता । शोधीतसें मीं रघुराज भर्ता ॥ २८ ॥
ऐकोनि बोले मगरी तयासी । ते दोघ नेले महिकावतीसी
अहीमहींनें बळिदान त्यांचें । नियोजिलेंसे तुळजेसि साचें ॥ २९ ॥
तों नळ नीळ हि अंगद बोलति परस्पर केंवि च सिंधु तरावा
प्रार्थितसे मकरध्वज त्यांसिच या वदनांतरिं वास करावा
नेइन पैल थडी कुसुमापरि अंतरिं हेतु दुजा न धरावा
लागति कानीं परस्पर हा मुख मेळवितां कवणें अवरावा ॥ ३० ॥
बोलतसे हनुमंत मुखीं जरि चाविल भेदिन टाळु हि याची
निर्भय होउनियां बसणें अनयास तुह्मास हि नौक फुकाची
मारुतिला ह्मणती कपि यावरि चौकि धरू अह्मि सिंधुतटाची
जाउनि तूं महिकावति शुद्धि करीं रघुनाथ सलक्षमणाची ॥ ३१ ॥
त्यांसि ठेवुनी वायुच्यात्मजें । रामनाम घे आननांबुजें
सिंधु लंघुनी पार पावला । रूप त्यागुनी सान जाहला ॥ ३२ ॥
रेणुच्या परी रूप घेतलें । जाउनी बरें ग्राम शोधिलें
अंबिकालयीं तो प्रवेशला । कोपरें बहू मारितो तिला ॥ ३३ ॥
घेउनी तितें न्हाणि टाकिलें । ते क्षणीं विशाळ रूप घेतलें
लावुनी कपाट अंबिकासनीं । बैसला कपी तोंड वासुनी ॥ ३४ ॥
अंबिका पुजे दूत पातला । देखुनी कपाट सांगुं धांवला
कोपली असे फार अंबिका । दार दीधलें ग्रामनायका ॥ ३५ ॥
कुशब्दा ऐकोनी अहिमहि त्वरें धांवति पदीं
तुह्मी अम्बे इच्छा कवण पुरवूं सांग सपदी

वदे अंबारूपी कपिविर तयांलागिं वचनें
प्रसन्ना मी तुम्हांवरि बहुत सतुष्ट भजनें ॥ ३६ ॥
सुभक्ती देखीली ह्मणुनि निज रूपा प्रगटिलें
तुम्ही या रूपातें नयनिं पहतां दग्ध बुबुळे
कपाटें यासाठीं दिधलि परि पोटीं बहु क्षुधा
गवाक्षाचे द्वारीं प्रचुर दधि ओता घृतसुधा ॥ ३७ ॥
तदा त्यां अंबेचें वचन परिसूनी हर्ष जहला
सुगंधी त्या माळा वरूनि कुसुमाच्या वरुषल्या
गवाक्षानें पचामृतघट भरूनी रिचविले
कपीनें कंठींचे सकळ तुळजे हार दिधले ॥ ३८ ॥
रिकामे दुग्धाचे अमित घट झाले परि तळीं
स्रवेनाती बिंदू शिव शिव हि बोले कपि बळी
उभे न्हाणीपाशीं पहाति तयिं ते सर्व मिळुनी
न येतां देखोनी दडपिति करीं दंड धरूनी ॥ ३९ ॥
यष्टि घालुनि पाहती तंव कष्टि बोलत अंबिका
दोंकडे मज जाचणी जिवि आठवी बहु त्र्यंबका
दुग्ध तें सरता चि देखुनि गर्जुनी कपि बोलिला
येउं द्या मज अन्नराशि जठराग्नि हा बहु चेतला ॥ ४० ॥
शब्द ऐकुनि अन्नदूराडि घेउनी तळिं लोटिती
भक्षिलें शत कोटि खंडीच तें हि देखुनि मारुती
बोलिला मग भक्त हो अजि तृप्ति नाहिं च आझुनी
रामसौमितरांसि लौकरि पाठवाचि शृंगारूनी ॥ ४१ ॥
त्यांसि भक्षिलियावरी वरदान देइन मी तुम्हा ।
आमुचे जिविचें चि जाणुनि बोलली हि मनोरमा ॥
शीघ्र जाउनि यां अहीमहिं बंधु बाहिर काढिती ।
मोहनास्त्र चि काढुनी मग तेल लावुनि न्हाणिती ॥ ४२ ॥
न्हाणुनी मग हेमवासन लेववूनि शृंगारिती ।
टीळका निढळीं लवूनि बहू फुलाहर घालिती ॥
वीविधू करूनी तदा बहु यत्न दोघ शृंगारिले ।
अंगि चंदन लावुनी मग संभ्रमे च हि चालिले ॥ ४३ ॥
ठाकली उभि ऊपरीवरि आहिरावण-अंगना ।
ज्ञाहली अति लुब्ध लोचनिं पाहतां रघुनंदना ॥

धन्य ते सति जीस हा पति कोणतें तप साधिलें ।
रामरूपिं च वेधली तिस ध्यान अंतरिं लागलें ॥ ४४ ॥
यावरी पुढें चालतां नरनारि ठाकुनि पाहती ।
राममूख सुलोक सर्व चकोर होउनि पाहती ॥
अंबिके बळिदान यांच चि काय पाहुनि योजिलें ।
रामरूप चतुरमूख यकाग्र होउनि निर्मिलें ॥ ४५ ॥
रामशेष हि आणुनी बहु प्रार्थिती जगदंबिके ।
यावरी तुझि काय आज्ञ चि ते करीं सुखदायके ॥
शक्तिरूपि चि बोलला कपि देउळांतरिं लोटणें ।
काहिं मुक्त कपाट पाहुनि लोटिलें महिरावणें ॥ ४६ ॥
रामशेष तो प्रवेशतां चि रुद्र तांतडी ।
पाद लावुनी कपाट झांकि सर्व झापडी ॥
बोलिला कपी तयां विशाळ रूप दावुनी ।
अंतकाळिचा सखा स्मरावयासि त्या क्षणीं ॥ ४७ ॥
राम्म्हणे वरदायिनी तिन्हि लोक हे मज चिंतिती ।
तो चि मी रघुनाथ ये क्षणिं आठवूं कवणाप्रती ॥
आमुचा तनु-प्राणरक्षण मारुती जरिं आसता ।
विघ्न हें हि दुरी करोनि चि संकटीं अजि रक्षिता ॥ ४८ ॥
ऐकता हनुमंत सद्गद कंठ फारचि दाटला ।
दावुनी निजरूप ते क्षणिं रामपायिंच लोटला ॥
राम देखुनि वायुपुत्र हि नीर लोचनि चालिलें
राघवें उचलोनि मारुति तें भुजींच आलिंगिलें ॥ ४९ ॥
राममारुति घालुनी मिठि खाति पावुनि स्फुदती ।
शेष वीनवि अंतरीं प्रभु वैरि बाहिरि ऐकती ॥
राम्म्हणे पवनात्मजा अहिमाहिसी कस मारणें ।
बोलिला कपि दर्शनासचि बाहुनी शिर छेदणें ॥ ५० ॥
ऐकोनि बोले रघुनाथ वाणी । द्रष्टीसि मी कैं च अधर्म नाणीं ॥
विश्वास तो देउनि जाण त्यांतें । मारूं नये रे शरणागतातें ॥ ५१ ॥
तो वीनवी मारुति रामचंद्रा । मीं मागतों एक दयासमुद्रा ।
मारावया दे महिरावणाते । भेदीं पुढें तूं अहिरावणाते ॥ ५२ ॥
अवश्य बोले रघुराज दाता । प्रार्थी कपी या तुझि शक्ति आतां ॥
तो शक्तिरूपें महिरावणासी । बोले सख्या ये मम दर्शनासी ॥ ५३ ॥

प्रसन्न झाल्ये तुझिया सुभक्ति । ऐकोनि धांवे तव उग्र शक्ति ॥
देखोनि त्याने दृढ चित्त केलें । तेथें पुढे येउनि कर्म ठेलें ॥ ५४ ॥
जावोनि लागे हनुमंतपायीं । तैसा चि त्यानें रगडोनि ठायीं ॥
विलंब तो देखुनि चेव आला । अंबा नव्हे मारुति सिद्ध झाला ॥५५॥
तैं वेंगडी बोंबडि प्राप्त झाली । जावोनि सांगे ह्मण धाड आली ॥
पूर्वीं च जेणें पुर दग्ध केलें । अबालयीं वानररूप झालें ॥ ५६ ॥
अशा वाक्यें पोटीं भय बहुत सर्वांसि भरलें ।
उभा युद्धालागीं अहि समरिं ठाके भुजबळें ॥
कपी बोले रामा त्वरित अहिशत्रू निवटणें ।
ह्मणे वायू-पुत्रा शरधनुविणें काय करणें ॥ ५७ ॥
कपी मार्झे आहे शरधनु अहीरावणगृहीं ।
त्वरें दे आणोनी वधिन शरजाळें मग अही ॥
कपीनें ते काळीं क्षण न लगतां आणुनि दिलें ।
ह्मणे रामा आता त्वरित निवटीं राक्षस-कुळें ॥ ५८ ॥
कपींद्रू दोघे बंधु नमुनि बसवी स्कंधि त्वरें ।
निघे तो बाहेरी तंव रघुपती विंधित शरें ॥
शरा सोडी ओढी पडति रिपुकोटी पटपटां ॥
खीला तो वाहे खुडुनि शिरकंजे तटतटां ॥ ५९ ॥
विमर्दोनी सेना तंव पुढें अहीरावण उभा ।
शरें विंधी त्यातें अनुपम दिसे राघवप्रभा ॥
शराचे संधानें महिवरि बहू शोणित पडे ।
अशुद्धाचे बिंदू तितुक अरि होती चहुकडे ॥ ६० ॥
रणातें माजूवीतो अगणित महीरावण पहा ।
जनाचा तो आत्मा ह्मणत हनुमंता अजित हा ॥
मरेना हा शत्रू त्रिपुरवरदी भासत मला ।
वधू जातां एका बहुत रिपु होती कपिकुळा ॥ ६१ ॥
रघुपती त्यजुनि मारुति चालिला । झडकरी नगरिं संनिध पातला ॥
प्रिय न ये मरण कां अहिरावणा । समरिं कष्ट बहु त्या रघुनंदना ॥६२॥
सदनिं ते अहिरावणकामिनी । मरण तीस पुसा तुमि जाउनी ॥
कथिल सर्व तुम्हां गुज जीविंचे । वचन तीस वदा बहु युक्तिचें ॥ ६३ ॥
वचन ऐकुनि मारुति ये पुरा । सदनिं बैसलिसे नृपसुदरा ॥
दशरथात्मजसेवक देखुनी । परम आवडिनें नमि कामिनी ॥ ६४ ॥

धरुनि मारुति आसनिं बैसवी । कवण हेत असे तुझिये जिवीं ॥
रघुपती युवती तुज चिंतितो । समरिं आज पती न चि जिंकतो ॥६५॥
बहुत दाशरथी करि झगरा । समरिं मृत्यु नये तुझिया वरा ॥
पडति रक्त-सडे जितुके मही । त्वरित उद्भवती तितुके अही ॥ ६६ ॥
मरण सांग खरें पतिचें मला । म्हणत सुंदरि ते कपि तूं भला ॥
पतिस मारुनि देशिल काय रे । जरि सितापति दाखवि पाय रे ॥६७॥
जरि मला वरिल तो महिजापती । कथिन मीं मरण ते तुज मारुती ॥
कपि ह्मणे पति रघूत्तम दीधला । सति म्हणे वचन हें कवि दे मला॥६८॥

घेवोनी भाष तेव्हां मग सति पतिचा सांगते मृत्यु आतां ।
पाताळीं अमृताची डळमळ भरली मोठि रे वायु-सूता ॥
आज्ञाधारी पतीचे भ्रमर मुखपुटें आणुनी अमृतातें ।
रक्ताचा बिंदु जेथें स्रवति वरि सुधा ऊठवीती मृतातें ॥ ६९ ॥

रोधीं पाताळदारा त्वरित कपिविरा येउं नेदीं सुधा ते ।
ऐकोनी शीघ्र गेला कपि बहुत करी आपदा षट्पदांतें ॥
तेणें ते चूर्ण केले अमित रगडिले पातला स्वामि त्यांचा ।
त्याशीं युद्धासि येतां मग धरित करीं मारुती कंठ त्याचा ॥ ७० ॥
मारावा वायुपुत्रें तंव भ्रमर-मुखें करुणा थोर भाक्रे ।
देईं तूं जीवदाना म्हणत कपि तया नाणिं तूं सुध मूखें ॥
नाणीं नाणीं त्रिवाणी वदत कपि तये वाहिल्या शीघ्र आणा
+ × ॥ ७१ ॥
तेव्हा ते स्तब्ध झाले अमृत अलिकुळें टाकिलें शीघ्र आणूं ।
येवोनी राघवातें वदत कपि सितीं बाण लावीं कृशानू ॥
रामा एक्या शरानें दिसति बहु अही राघवा मारिं आतां ।
रामें त्या तीव्र बाणें अहि-शिरकमळें लाविलीं व्योमपथा ॥ ७२ ॥
मर्दुनियां अहिरावण तो महिजावर बोलत चाल कपींद्रा ।
संकट एक असे रघुनायक काय करूं भुवनत्रयचंद्रा ॥
मैं रिपु हा न मरे अहिरावण स्त्रीसि तुला विकिलें भवनेत्रा ।
घेउनि भाष तिनें मज दुस्तर गोंवियलें अस बुद्धिसमुद्रा ॥ ७३ ॥
राम म्हणे मम बाण सुवा यक एक चि पत्नि विरा व्रतधारी ।
जाणसि तूं कपि ध्यावि च संकट भाष कशी दिधली अविचारी ॥
हीं जशि युक्ति नियोजिलि त्वां पवनात्मज हें तसं विघ्न निवारीं ॥
ऐकुनि जाय कपी तंव मंदिरिं तिष्ठत बैसलिसे अहिनारी ॥ ७४ ॥

ऐक सखे रघुराज तुझा पति हा चि रणांगणिं निश्चय केला ।
राम तुझा तरि संग करील·अभंग सुमंचक नाश न झाला ।।
येरि म्हणे मम मंदिरिं मंचक वज्र पडे परि भंग न त्याला ।
बोलतसे कपि भंगत मंचक तैं न चले मंम मुक्त ग बोला ।। ७५ ।।
नारिपासुनी रुद्र चालिला । ते क्षणीं त्वरें भृंग बाहिला ।।
शब्द ऐकतां भृंग येउनी । ठाकला पुढें हस्त जोडुनी ।। ७६ ।।
काय काज तें सांगिजे मला । ते क्षणीं तया रुद्र बोलिला ।।
जाउनी अहीरावणागृहीं । चाव मंचका पासुनी मही ।। ७७ ।।
पर्णतुल्य तो भृंगनायका । ठेवुनी त्वचा बांधि मंचका
काढि आवघा गर्भ कोरुनी । भृंग चालिला वाक्य ऐकुनी ।। ७८ ।।
भक्षुनी त्यजी कौंठ तो करी । भृंग तेंवि तो मंच कातरी
प्राथि येउनी रामकिंकरा । कोरिलें प्रभू मंचकांतरा ।। ७९ ।।
कपी येउनीयां म्हणे राघवातें । चलावें प्रभू कामिनीमंदिरातें
धरोनी कपी चालवी शीघ्रँ रामा । घरा आणितां पातली शीघ्र वामा ।।८०।।
रघूराज-पादांबुजीं मग्न झाली । उठी नायका भृंग होऊनि ठेली
रघूराज स्नेहें वदे पाहिं मातें । कपी चीमटी तूमची हे रमा ते ।। ८१ ।।
उठोनी वधू ते धरी रामपाणी । चला राघवा तों ह्मणे रुद्र कानीं
तुह्मी मंचकीं जाउनी स्वस्थ बैसा । तुह्मा सूटका ते अयोध्यानिवासा ।।८२।।
सजी जो हरी ब्रह्मयानायकातें । जडत्वासि त्या काय ऊणीव तेथें
तिनें मंचकीं आणुनीयां विहारें । प्रभू बैसतां भंगला अगभारें ।। ८३ ।।
सुपर्यंक तो भंगतां भग्न चित्ता । वदे तो कपी भाष ते मुक्त आतां
रघूनाथजी शीघ्र तुह्मीं चलावें । दया त्यागुनी पूर्ण निष्ठूर व्हावें ।। ८४ ।।
रघुपती धरुनि मारुति ऊठवी । मग रडे सति पती जिविं आठवी
न च कळे कपि तुझें जिविंचें कुडें । रघुपती मन बहूत चि सांकडें ।।८५।।
कपि खुणावुनि च नेइल राघवा । त्यजिन मीं त्वरित ये क्षणि या जिवा
सति ह्मणे तुज मि शापिन मारुती । रडतसे पडत मूर्च्छित ते क्षिती।।८६।।
बोले रघूत्तम अनूत्तम खेद त्यागीं । द्वापार तें प्रगटतां मम रूप भोगीं
होशील तूं बहुत सुंदर सत्यभामा । सोळासहस्र ललनांतरिं पट्टवामा ।। ८७ ।।
ऐसें वदोनि तिजला वरदान दिल्हे । श्रीराम तैंच मग तेथुनि शीघ्र गेले
घेवोनियां कपिसवें मग शेषबंधु । चाले पथीं विजयि होउनि दीनबंधु ।। ८८ ।।
आले त्वरें तिघ हि ते उदधीतटातें । देखोनियां मगरि वंदित राघवातें
पादांबुजा नमियलें मकरध्वजानें । शेषाग्रजा कथियलें पवनात्मजानें ।। ८९ ।।

* मंदिरातें ( पाठांतर ). १ तेथें ( पाठांतर ).

तो सिंधु लंघुनि प्लवंगमर्दीनबंधु । देखोनि ते नमिति त्या कपि बुद्धिसिंधु
धावोनियां नळनिळांगदजांबुवंतें । आलिंगुनी धरिति रामपदांबुजातें ॥ ९० ॥
श्रीरामशेष कपि घेउनियां निघाले । ते संभ्रमें करुनियां चमुमाजि आले
श्रीराघवा नयनिं पाहुनि सर्व सेना । आनंदली सुख मुखें मज बोलवेना ॥९१॥
श्रीसूर्यवंशकुळभूषण राम आला । त्या दर्शनें बिभिषणा बहुलाभ झाला
वीराजलों निज सुखें रघुराजमूर्ती । वाखाणिती सकळ वानर थोर कीर्ती ॥९२॥

अनामा निःकामा अमितसुखधामा रघुपती
तुतें वर्णी वाणी श्रमित बहु झाला अहिपती
अनंता वेदांता करिशिल अनाथावरि दया
तरी सीताकांता मम भवभयें नेई विलया ॥ ९३ ॥
रामाचीं चरितें सुखाब्धिभरितें कोट्यांतरीं गायिजे
शत्रूतें अहितें पवित्र महितें सीता चि ते साहितें
बधूचीं चरितें सुमुक्त उचितें थावीं जना संचितें
भूशीतें रवितें अनंतकवितें सभाविता गायितें ॥ ९४ ॥

समाप्त.

---

वाराणसी-पुरपते भज विश्वनाथा । माझा प्रणाम तुमच्या चरणास आतां
मी मागतों सहज पावन एक शिक्षा । यावी मला चरित शांभव वेद-दीक्षा ॥ १ ॥
श्रीबिंदुमाधव तुला स्मरतां स्वभावें । संसारसिंधु मग बिंदु तव प्रभावें
माझी कृपानिधि कधीं न करीं उपेक्षा । ठेवीं मला निजपदांबुजिं हे अपेक्षा ॥२॥
श्रीधुंडिराज गणनाथ गजानना रे । संसारपिंपळ समूळ विनाशना रे
तू देव सुंदर धुरंधर विघ्नहर्ता । वाराणसीस मज येथुनि ने समर्था ॥ ३ ॥
मी प्रार्थना करितसें तुज दंडपाणी । माझे उदंड अपराध मनासि नाणीं
श्रीभैरवा चुकावें रौरवयातना रे । वाराणसीस मज ठेवि सनातना रे ॥ ४ ॥
तूं स्वामिकार्तिक उमापति-नंदना रे । सेनापती करितसे तुज वंदना रे
आनंद फार करितोसि महा स्मशानीं । त्वां मारिले असुर घाव दिला निशाणीं॥५॥

---

## व्यंकटेशस्तुति.

व्यंकटेशजी नाम चांगलें । आवडे मला चित्त रंगलें
ध्यान मानसीं लागली प्रिती । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ १ ॥
देखिली तुझी दूरुनी पुरी । हर्ष वाटला बहुत अंतरीं
ध्यान मानसीं लागली प्रिती । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ २ ।

व्यंकटेशजी स्वामि राजसा । पावसी मला हा चि भर्वसा ।
म्हणुनियां तुझी मांडली स्तुती । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ ३ ॥
व्यंकटेशजी तूज वेगळें । दीन दिसतों दावि पाउलें
करुणांतरीं भाकिजे किती । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ ४ ॥
व्यंकटेशजी कूळदेवता । तूं चि श्रीगुरु माउली पिता
इष्ट मित्र संबंध संपती । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ ५ ॥
त्रिभुवनासिया तूं चि रक्षिता । शेष शीणला गूण वर्णितां ॥
वेद ही तुझी नेणती स्तुती । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ ६ ॥
कमलजापती कमळलोचना । कमलश्रीगुरु भक्तरक्षणा ॥
कमलश्रीगुरु सानंद गाजती । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ ७ ॥
साधना तरी काय मी करूं । भक्ति कोणती सांग हो धरूं ॥
तीर्थयात्र ही फिरलों किती । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ ८ ॥
हृदय फूटलें कंठ दाटला । नीर लोचनीं पूर लोटला ॥
धीर मी धरूं मानसीं किती । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ ९ ॥
उशिर हा तरी फार लागला । मार्ग लक्षितां दीन शीणला ॥
अजुनि ही किती अंत पाहसी । पाव गा त्वरें लक्ष्मीपती ॥ १० ॥

## गोसावीनंदनकृत सीतास्वयंवर.

### शार्दूलविक्रीडितवृत्त ( मंगळाष्टकांची चाल. )

विश्वामित्र वसिष्ठ सर्व हि ऋषी आले सितासिंवरा ।
सांगातें रघुराज पूर्ण विजयी लोकत्रयीचा हिरा ॥
हातीं त्र्यंबक बाण घेउनि उभा शोभे असा नोवरा ।
गोसावीसुत स्वामिराज नृप तो रामाय तस्मै नमः ॥ १ ॥
केली चित्रविचित्र सुंदर सभा शृंगारिलीं मंदिरें ।
राजे सर्व हि रावणादिक बरे बोलाविले आदरें ॥
त्यामध्यें रघुराजस्या जनकें ते देखिले गोजिरे ।
गोसावीसुत-स्वामिराज नृप तो रामाय तस्मै नमः ॥ २ ॥
चिंता फार करी मनीं जनक तो ही जानकी नोवरी ।
द्यावी त्या रघुनायकास स्वकरें वाटे मला अंतरीं ॥
केला त्यां पण हा परंतु धनु हें ओढील कैशा परी ।
गोसावीसुत-स्वामिराज नृप तो रामाय तस्मै नमः ॥ ३ ॥
क्रोधें रावण गुर्गुरी मग म्हणे कैलासि आलीं भटें ।

राजा हा बहु भाळला जनक तो त्यासीं च बोले हटें ॥
रामाचा वडिवार फार वदसी हे बाळ तो धाकुटें ।
गोसावीसुत-स्वामिराज नृप तो रामाय तस्मै नमः ॥ ४ ॥
क्रोधें रावण ऊठिला मग सभेपूढें उभा राहिला ॥
पाही चाप पराक्रमें उचलितां भूमीवरी आटिला ॥
नाकीं तोंडिं रुधीर वाहत असे भूमीवरी पाडिला ।
गोसावीसुतस्वामिराज नृप तो रामाय तस्मै नमः ॥ ५ ॥
विश्वामित्र म्हणे रघुत्तमविरा तू नोवरा साजिरा ।
घे गा त्र्यंबक सज्य ओढुनि करें सीतेसि तू नोवरा ॥
रामें सद्गुरु वंदिला मग सभेपूढें उभा राहिला ।
गोसावीसुत-स्वामिराज नृप तो रामाय तस्मै नमः ॥ ६ ॥
रामें त्र्यंबकचाप ओढुनि करें मोडोनियां टाकिलें ।
पुष्पाचा वरुषाव देव करिती त्रैलोक्य आनंदलें ॥
सीता येउनि माळ घालित गळां सर्वस्व तें अर्पिलें ।
गोसावीसुत-स्वामिराज नृप तो रामाय तस्मै नमः ॥ ७ ॥
ऐके हर्षसुखें कुरंगनयना चंद्रानना कामिनी ।
रामाचें रूप देखतां चि नयनीं तल्लीन झाली मनीं ॥
सुवर्ण द्रव घेउनी निज करें ओंवाळिती स्वामिनी ।
गोसावीसुत-स्वामिराज नृप तो रामाय तस्मै नमः ॥ ८ ॥
भेरी ढाळ मृदंग ढोल गजरे धों धों दमामे किती ।
वीणा आणिक सनध्य नवतसे वाद्यें बरीं वाजतीं ॥
\+ \+ नृत्यांगना नाचती ।
गोसावीसुत-स्वामिराज नृप तो रामाय तस्मै नमः ॥ ९ ॥

## अन्याय कोणाकडे.

जन्मापासुनि काळ हा दवडिला त्वां व्यर्थ माझा हरी ।
नाहीं साधन साधिलें तिळभरी का निर्मिली वैखरी ॥
सध्यास्नान जपार्चनादिक पुजा तूझी मला ना घडे ॥
कर्ता तू चि हरी म्हणोनि पुसणें अन्याय कोणाकडे ॥ १ ॥
कृष्णा सत्तर दोनशें दिन मला गर्भीं तुवां घातलें ।
गर्भापासुनि सोडुनी हरि पुढें अज्ञान रे दीधलें ॥
तें निर्दाळुनियां हरी विषयिं तां गोवीयलें स्त्रीकडे ।

कर्ता तूं चि हरी म्हणोनि पुसणें अन्याय कोणाकडे ॥ २ ॥
ऐसा किंचित काळ घालुनि पुढां संसार्णवीं व्यापिलें ।
गेलें व्यर्थ नराजवादि करूनी आयुष्य रे चांगलें ॥
केलें पोषण दान घेउनि हरी वार्धक्य देहीं नडे ।
कर्ता तूं चि हरी म्हणोनि पुसणें अन्याय कोणाकडे ॥ ३ ॥
झालें वार्धक देह तो हि गळलाकांति पहा भंगिली ।
चक्षू घ्राण गळे मुख स्त्रवतसे काया हरी वीटली ॥
कर्णादीक हि पाद दंत अवघे जिव्हा हरी नातुडे ।
कर्ता तूं चि हरी म्हणोनि पुसणें अन्याय कोणाकडे ॥ ४ ॥
ऐसें भाषण श्रीहरी परिसुनी प्रत्युत्तरा दीधलें ।
जैसें तूं वदलासि मानव मुखीं आम्हाकडे लाविलें ॥
जैसें साचित पूर्वींचें तव असे तें भोगणें रे घडे ।
कर्ता कोण म्हणोनि पुसणें अन्याय कोणाकडे ॥ ५ ॥
कर्ता निर्मित मी असें तुज नरा सत्कर्म तूं नातुडें ।
ऐसें मी तुजला नसे शिकविलें प्रारब्ध तूझेकडे ॥
तूं साठी घटिकातुनेक घटिका श्रीसाधना ना घडे ।
कर्ता कोण मनीं विचारूनि पहा अन्याय कोणाकडे ॥ ६ ॥
अज्ञानें न कळे तुला मति हृदीं कैसा भजावा हरी ।
झालें ज्ञान तधीं असेल जरि तूवां आठवीला हरी ॥
तेव्हां तूं विषयांत मग्न दुसरें मित्रत्व तुम्हांकडे ।
कर्ता कोण मनीं विचारूनि पहा अन्याय कोणाकडे ॥ ७ ॥
नाहीं तीर्थ विलोकिलें जनिं तुवां नाहीं हरा पूजिलें ।
नाहीं भोजन घातलें द्विजवरा नाहीं हवीं होमिलें ॥
गोभूमीतिळवस्त्रहीनयउदका द्याया मती नातुडे ।
कर्ता कोण मनीं विचारूनि पहा अन्याय कोणाकडे ॥ ८ ॥

---

## कृष्णकेशवकृत देवीस्तुति.

सुंदरे गुणमंदिरे करुणाकरे कमलोद्भवे ।
सिद्धचारणपूजिते जनवंदिते महावैष्णवे ॥ धृ० ॥
त्राहि हो मज पाहि हो मज पाहि हो महालक्ष्मी ।
हेम बावन रत्नकोंदण तें सिंहासन आसनीं ॥ १ ॥

एक एक विचित्र माणिक जोडिले मुकुटावरी ॥
त्यासि देखुनि लोपला शशि चालला गगनोदरीं ॥ २ ॥
कुंडलें श्रवणीं रविशशिमंडळासम वर्तुळें ॥
बोलतां सुरनायकावरि हालताति चंचळें ॥ ३ ॥
कंचुकी कुचमंडळावरि हार चंपक रूळती ॥
पारिजातक सेवती बटमोगरी अणि मालती ॥ ४ ॥
पींवळा पट तो कटीतटिं वेष्टिला बरवे परी ॥
सौदामिनीहुनि तेज अधिक शोभतें उदरावरी ॥ ५ ॥
कामुकावरि मन्मथें शर सज्जिले तैशा निऱ्या ॥
गर्जती पद पंकजीं किति नूपुरें अणि घागऱ्या ॥ ६ ॥
इंद्र चंद्र महेंद्र नारद पादपंकज अर्चिती ॥
कुंकुमागरूकस्तुरी प्रिति आदरें तुज चर्चिती ॥ ७ ॥
*निर्जरें तुज पूजिलें बहुशोभसी कमलासनीं ॥
काय हो तुज वर्णुं मी मज पाव गे कुळस्वामिनी ॥ ८ ॥
कोटि तेतिस देवता सर्व घेउनी विंझणे करीं ॥
चामरें चिर पल्लवें तुज ढाळिती परमेश्वरी ॥ ९ ॥
नाम अमृत दे निरंतर याचकांप्रति गिरिसुतें ॥
जोडुनी कर विनवितों पाव हो वरदेवते ॥ १०
संकटी तुज वांचुनी मज कोण रक्षिल अंबिके ॥
कृष्णकेशव प्रार्थितो मज पाव हो जगदंबिके ॥ ११ ॥

---

## दामोदरकृत लिंगमाळा.

आशंकरा स्मरहरा वृषभध्वजातें । श्रीकंठ दिग्वसन भूषण भव्य ज्यातें ॥
आकांत घेधित हृदयीं अभिवास ज्याचा । श्रीशैलनाथ जप तूं मनुजा सुवाचा ॥१॥

व्याघ्रचर्म परिधान जयासी । नीलकंठ वदती जन ज्यासी ॥
दारुकावन विचित्र विहारी । नागनाथ जप तूं अवधारीं ॥ २ ॥
शोभतो कुरळ भार जटेचा । वामभाग मिरवे गिरजेचा ॥
भाळनेत्र वृषभध्वज जो कीं । वैजनाथ जप तूं इह लोकीं ॥३॥
विभूतिचें भूषण भव्य ज्यासी । स्मशानवासी म्हणती जयासी ।

---

१ "वरी" असा ही पाठ आहे.
२ "अद्भुत लाजते मर्मवैखरी" असा ही पाठ आहे.
* देह-गेह-विरक्त होऊनि तुजलागिं अर्चिती
नागवेली सूपुला कर्पूर दिव्य तांबूल अर्पिती ॥ १ ॥
असेही एक अधिक कडवें एका प्रतींत आहे.

कपालमालाधर वंद्य लोकीं । घृष्णेश्वरातें भज सर्वदा कीं ॥४॥
नगीं निवास कानन थोर आहे । ज्या पर्वतावरुनि सागर दीसताहे ॥
भीमानदीउगम जेथुनि दिव्य आहे । तो भीमशंकर मना स्मर सर्वदा हे ॥५॥
जीर्णांत जीर्ण निगमागम ज्यासि गाती । रेवातटीं प्रगट जो जन देखताती ॥
तो भूत निजभूत गम नीगमाचा । ॐकार तो स्मर मना मनकायवाचा ॥६॥
मदनदहन केलें शंकरें थोर कोपें । अनल नयन-तेजें भानु प्रत्यक्ष लोपे ॥
भ्रुकुटि कुटिल योगें क्रोध हा आवरेना । भजन करि तयाचें जो महाकाळ नाणा ॥७॥
सौराष्ट्रदेशीं वसुधा प्रसिद्ध । निरंतरें सेविति येथ सिद्ध ॥
हाळाहळीं युक्त असे प्रसिद्ध । धरी किरीटी स्मर सोमनाथ ॥ ८ ॥
श्वशुर गृह निवासी वल्लभा प्रीय ज्यासी । अभिनव जलधारा वंद्य लोकांसुरांसी ॥
वृषभ पुजनाचें प्रेम विख्यात आहे । भजन करि तयाचें बद्रिकेदार पाहे ॥ ९ ॥
पृथ्वीप्रमाण करितो परि वेगळी जे । देवासुरां अति महा मरणासी काजे ॥
जीचा वियोग घटिका पळ ही असेना । तो विश्वनाथ गिरिजापति कां स्मराना ॥१०॥
गंगा शिरीं वसविली गिरिजाभिमानें । जे गौतमासि दिधली जन सर्व जाणे ॥
तो ××× प्रत्यक्ष ब्रह्मगिरीसि पाहे । त्या त्र्यंबकासि भजता मग काय नोहे ॥११॥
रघुपति सुरकार्यालागिं लंकेसि गेले । उभयजळनिधींचे संगमी स्थीर झाले ॥
हृदयिं निशिदिनीं ध्यान पैं शंकराचें । म्हणउनि रचियेलें लिंग रामेश्वराचे ॥ १२ ॥
हे लिंगमाळ बरवी हृदयीं धरावी । प्रातः प्रभातसमयीं सहजें वदावी ॥
तोडील दुःख भवसागरिंचे अनेक । दामोदरा स्मरण शंकर नाम एक ॥ १३ ॥

## अमृतरायकृतजगदंबावर्णन.

### कटाव.

जगदंबा माता । आनंदें वंदिली आतां ॥ धृ० ॥

जिच्या मुकुटि लोपति रविकोटी । केश नील कुटिल वेणिका-जुटी । त्रिगुण विणवटी । निटिळ समपटी । कस्तुरि मळवटी । कीं, विलसित चंद्ररेख तळवटीं । भ्रकुटि धनुकोटि । ओढोनि करि उभय नयन शर सुटी । भव-विभव लुटी प्रपंचभय लुटी । नेत्रयुगकपापांग सुखदटी । नासिकसरतटीं । बेसर जणु राजहंस शेवटीं । अधरयुगपुटीं । निगम पुटपुटी । वदनीं द्विज दाटी । रुचिर हनुवटी । केयूर बाहुवटी । हातसरघटित शोभति मणगटीं । शिवाचें मन गुंतुन राहिलें हनुवटी । चरणतल किसलयदल पर्ण कुटी । उपासकांसी संरक्षी गोरटि गोमटी । तू हिमगिरिबेटी । नाजुक धाकुटी । शंभुसह पटीं । बसलिस सुरभेटिस । येति ब्रह्माविष्णुच्या कोटी । बेल पाटीर वाटी । विमानाच्या थाटी । मुखि

भाट बोलनि माय मोठी। वंदोनि मातरोटी। केळें नारळें ओटींत। आत्मरूप पा दांत। भरभरून वांटिती। सुरविटप वाटत। जय जय शंकरवनिता ॥ १ ॥

अखंड परशिवनिर्डात। सखीसह क्रिडा। करित मुखिं विडा। द्युमणि तानवडा। लज्जित कानवडा। जडित करिं चुडा। अलख शिरीं जुडा। ग्रथित पदीं जुडा। वळित मऊ खडा। कौस्तुभ खडा हृदय-कुच-गढांत। मणिगणलडा। लोंबति कोण विडा। भज जाय पिडा। किमर्थ हा ईडा। कां हो इंद्रिय कोडा। अंबेचा भक्त गुडा। तयासि हत्ती घोडा। चित्तानुरूप जोडा। सुपुत्रधन जोडा। विस्तीर्ण योग्य वाडा। कल्पतरूच्या झा-डाचा बाग घोर गाडा। भरुनि मोहरा हाडा। भरूनि हिरे पाडा। पांडासि मो-ठा ताडा। गायी म्हशी रेडा। येतासि विप्रझुडा। म्हणती पात्रें मांडा। रे मांडा नित्य मांढा। जेवण नित्य लोकीं। निर्दोष कीर्ति। भुक्ति मुक्ति योग युक्ति। ज्ञा-नशक्ति सद्विरक्ती। लाहुनियां काशीवास। भेटो लागीं भाग्यवान। भालचंद्र भागवत। भागीरथी सुरसरिता ॥ २ ॥

सहज रजतनग नभीं। सुरभि सम उभी। मदन जिच्या नाभीं। मानि शंभुसि नाभा। अंतरिं आत्मलाभीं। निरत ब्रह्मलोभी। व्यापक शुभाशुभीं। काष्ट जिवी स्तंभीं। मृत्तिका जैवी कुंभीं। आब्रह्मस्तंभदर्भी। परमाणूच्या ही गर्भी-तुरग इभ इभीं। रणांत दुंदुभी। वाजवि शस्त्र करभि कभी। नाग चित्ते शरभ शरभीं। त्या हि भीम नादें भय धरिलें शुंभनिशुंभीं। अंबेनें रणात मारिले दोघे दंभी। प्रताप स्वारी विजयाची चौर डौल कुंभी। जयजयकार वाजत्री वाजति पुढारंभीं। कोतवाल नंदी वरित आनंदित शूळपाणी। हस्तिदंताची पालखी पाणी सोन्याचें ढाळुनी काम खिलगारी। विश्वकर्म्या हातींची रचिली वक्रदांडी। तेथें आसन मांडीं। तळीं तक्ये मांडी। स्वामीकार्त्तिक धुंडी सहित चाले चंडी। पुढें धावती वायुवेग अश्वारूढ गुंड्या धरूनि मुख्य देवांच्या का-मिनी करी तमाम हाटक हस्त खंडी। मानस क्षेत्र भक्तीचें शृंगार पिंडि पिंडीं। त्या बाण रावण चंडी। आदि शिव गणाच्या। दर्शना येति झुडी। ते हरहर महा-देव उच्चारिती तोंडीं। कियाळ वृत्त खंडी। वाटेंत मोतिं मुष्टिनें टाकिति खड-खडा। ऐशी अंबा जीवन्मुक्ता अन्नपूर्णा। भर्गाचें भाग्य वर्णा। अमर समर गण समरसती चरणीं तळीं उतरूनि शशी नमिती अनुपमित अमृतरूप अग-णित गुणभरिता ॥ ज० ॥ ३ ॥

## कटाव अमृतरायकृत नारदी.

भवभ्रम हा नारदाचा । श्रीकृष्णें सर्व हि हरिला ॥ धृ० ॥
ब्रह्मसुत अवधूतपूत जो सूत हरीचा प्रियकर नंदन ब्रह्मसनातन वृंद समाजीं मुकुंद स्मरणें सदा विचरणें भवभयवार्ता कधी ही नेणे समुद्र उदरीं मत्स्य मत्स्यिणें रमतां पाहुनि दृष्टी देखुनि कष्टि जाहला प्रपंच आम्हीं नाहीं पाहिला जन्मभार हा व्यर्थ वाहिला द्वारकेंत श्रीकृष्ण विष्णु गोपाल बाल तो कृपाल आहे वढाळ होउनि धुमाळ घालीं साल माल वनमाल शोभती मयूर पिच्छ ते मुकुटावरती सहस्र सोळा नूतन वायका अष्ट नायका यदुकुळटिळका कटकाचा पति अटकाव चि त्या काळि सावळी असो बावळी शक्ति नसो अशक्त असो वा मागुनि हरिसी विषय सुखासी भोगुनि देऊं त्याची त्याला । भवभ्रम० ॥ १ ॥

सलज्जगतिनें जवळ जाउनी गृहांत आमच्या नसे कामिनी चैन पडेना दिवस यामिनी अग्निहोत्र मज अवश्य घेणें अनुभवोनियां पुनरपि देणें अभिलाषाची वृत्ति नेणें रमाकांत एकांत पाहुनी कांता तुमच्या समीचीन घरीं कमी चि नसतां शुद्ध बुद्ध ते मुनिवर वदला विरहसर्पे कदर्प डोंबला भ्रमला जाणुनि अबला मागे कमलापतिचे करकमलानें कमलोद्भवसुत धरि करकमला कमलनाभ तो प्रसन्न वदला जयीं स्थळीं मी नसेन स्वामी तया स्त्रियेशीं निजसुखधामीं हेतू पुरवा नुरवा कांहीं बरवा प्रपंच नीट करावा वाहवा तुमची जनांत होइल मनात कांहीं विकल्प न धरा अधरामृत तें पान करावें अविलंबानें शीघ्र उठावें ऐसें पाहुनि त्वरित निघाला पाहत चालिला त्या श्रीहरिला भामेमंदिरीं कृष्ण निजेला कालिंदीला घेत कडेला लक्ष्मणेचा निजकर धरला जांबुवतीनें विडा अर्पिला मयूरभद्रा चुरि चरणाला मूळ धाडितो दत्त सुनेला मंडप बांधी व्रतबंधाला ऐसा झाला भरोनि उरला ठायीं ठायीं सर्व व्यापिला ॥ भव० ॥ २ ॥

लज्जित मुनिवर बहुत होउनी अर्जित हरितें उर्जित आमुचें कधीं न करिशी तुझी च मर्जी तसें अचरसी म्हणउनि मुनि तो करि स्नानासी दिव्यरूप ते रंभा नटली चीर कचुकी अंगीं तटली नाकीं सुपाणी प्रभा फाकली पुष्ट कुचद्वय उदर त्रिवळी प्रथम बुडीशी सगर्भ झाली साठ पुत्र एकदा प्रसवली प्रभव विभव पुढें शुक्ल प्रमोदित ऐसे साठी वितूनि पोटीं दीठ नीट उभि कपिला षष्ठा या विषयाची न तुळे गोष्टी कठिण वेळ बहु प्राप्त जाहली कपटि हरीनें कटी लगोटी हटीनलां मज अपटी दिधलां अमृतेश्वर गुरुदास म्हणुनिया पाळी अपुला ॥ भव० ॥ ३ ॥

## जयरामसुतकृत.

## कटिबंध-( संतमालिका )

हरिगुण हे हरिजन भजनीं । जन तारुनि आपण तरले । ध्रु० ।

ब्रम्हा शंभु कुबेर प्रभंजन इंद्र चंद्र यम भास्कर पावक वाक्पति वरुण वशिष्ट पराशर वाल्मिक व्यास महाकवि गौतम विश्वामित्र अगस्ती भार्गव ऋषभदेव सनकादिक नारद कपिलमुनि दाल्भ्य भृशुंडी पिप्पलाद शुक नामदेव श्रुतदेव शमिक जड भरत दत्त ऋषी याज्ञवल्क्य भृगु भरद्वाज उपमन्यु कदर्यु पुंडरीक मुनि मुद्गल कवी हरि अंतरिक्ष पिप्पलायन आविर्होत्र प्रबुद्ध चमस्कर भाजन द्रमिलासुर मैत्रेयी विभांडक असितदेव दुर्वास देव द्विज सुदेव संजय जयमिनी वैशंपायन षण्मुख हरिश्चंद्र इक्ष्वाकुनृपती नल चंद्रहास मुचकुंद मुनी ध्रुव अंबरीष आणि पृथु लक्ष्मण गुहक भरत भक्त रुक्मांगद अंगद धर्मांगद सुग्रीव बिभीषण जांबुवंत हनुमंत सुदामा जनक बळी प्रल्हाद अजामिळ गणिका पिंगळा गरुड गजेंद्र विदुर व्याध गंगासुत अर्जुन धर्म भीमदेव सहदेव सुभद्रा नकुळ पृथा गोपाळ गोपिका उद्धव यदु अक्रूर परिक्षिती आणि शेष श्रीयाळ जटायु जानकी शर्वाणी शबरी अनुसूया सरस्वती भागीरथी यमुना अहल्या अरुंधती सध्यावळी त्रिजटा देवहुती पांचाळी रुक्मिणी राधा ऋषिपुण्या चंद्रावळी उग्रसेन वसुदेव देवकी कुब्जानंद यशोदा । हरिगुण० ॥ १ ॥

झाले नित्य मुक्त निजज्ञानें धाले बोधसुधारसपानें त्यजिले कामक्रोधअभिमानें त्यांचीं परिसावीं अभिधानें श्रीशंकराचार्य जगद्गुरु भाष्यकार श्रीधर मधुसूदन हस्तामलक मुकुंदराज नृप जयतपाळ ज्योतिरानंद मच्छिंद्र मीन गोरक्ष भर्तृहरि सदानंद गयनी चौरंगी परमहंस कृष्णद्वयपान मध्व महामुद्गल नारायण श्रीनिवास जयदेव निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान चांगया मुक्ताई रेवणसिद्धेश्वर सिद्ध जालंदर अच्युत दामोदर सारंग सरस्वती नारसिंह वडवाळ वटेश्वर सनकदास नवलक्षसाळया निपटचर्पट चांद बोधला विक्रम गोपीचंद कानिफा मुक्ता मैनावती मृत्युंजय माळो नरहरी वंका बंका परनंद विसोबा खेचर नामदेव हरिदेव भागवत परिसा कान्हो पाठक शिल्पीकार गोविंद सावता चोखामेळा पिसाबहिरा नरसीमेहता जनमिंद्र पुरंदर विठ्ठल गोराकुलाल सजणा कूर्मदास हरिदास कान्हया मलुकदास रोहिदास त्रिलोचन द्विज नरहरी सोनार लतीब जाट हरिवल्लभ दामा रामानंद उदासी नानक सहजानंद कबीर कमाल किशोर संखा सुरदास मुधेया तुलशीदास पीपाजी सजना रामदास यशवंत बाजिंदा शाहुशेन शमना माधवा माखन प्रेमानंद मदालसा कान्होपात्रा मिरा हरी कृष्णा जनी बहिणी कर्माबाई हरि सज्जना हरिगुणभजनीं जन तारुनि आपण तरले ॥ २ ॥

कोणी ब्रह्मनिष्ठ गुरुभजनीं योगी वीतरागी रति सगुणीं भावुक नामकीर्तनीं मौनी सज्जन॰ श्रवण करावे श्रवणीं कनकदास विज्ञानसिद्धि नागेश रेणुकानदन मौनी भानुदास विख्यात जनार्दन एकनाथ गुरुभक्त रामय्या पुरुषोत्तम लोला विश्वंभर चिंतामणी मुक्तेश्वर मुद्गल कृष्णदास अवधूत दिगंबर दासोपंत रमावल्लभ लोलिंबराज संतोषनिलया गंगाधर कोन्हेर मुरारि शांतलिंग॰ श्रीकृष्णयोगीया कृष्णदास जयराम तुकोबा रामदास आनंदमूर्ति पूर्ण शिवराम मल्लारि बोधला रघुपति शेष निरंजन केशवनाथ वामन विठ्ठल कवि रंगनाथ रुक्मण्णा चिद्घन कल्याण चंदसखी मानपुरी रामकृष्ण वासुदेव माधव तुकया बधु कुमर नारायण मध्वमुनीश्वर निपट निरंजन पंढरीचा प्रल्हाद साधु जयराम काशी गोसावीनंदन हरि नारायण राघव चिद्घन श्रीधर गुरुगोपाळ अनंत महंत संत असे जगीं गुप्त प्रगट जडमूढ पिशाच हि बालोन्मत विदेही निरंकुश वर्णियेले हरिभक्ति चतुर्विध मुक्त मुमुक्षु विरक्त उपासक सर्व गुणें झाले भगवत्पर जाती विजाती म्हणूं च नये मग पावन हे सुकृति विकृति गात असे जयराम सुताची वाणी ॥ हरिजन हे॰ ॥ ३ ॥

समाप्त.*

---

## रामात्मजकृत तुकाई ( तुळजापुरची देवी ) वर्णन.

॥ पद ॥

भक्तवत्सले भाग्यनिधी जयभगवति भुवनेश्वरी । दया करीं मज दीना उद्धरीं ॥ धृ॰ ॥ भजनपरायण भवभयहारण भक्तकाजकैवारी । व्रीदावळी गाजे भुजगावरी । ब्रह्मादिक स्तविति बहुधा परि निगमागमगोचरी । आनंदीं निजानंद निर्भरीं । ब्रह्मांडीं बहुरूप धरूनि व्यापक बाह्यांतरीं । भवानी ब्राह्मी करुणाकरी । बलवर्धिनी भैरवी भयनाशिनी भाविकजनसुखकरी । दया करीं मज दीना उद्धरीं ॥ १ ॥

त्रिपुरसुंदरी सुंदर लहरी त्रिंबकप्राणेश्वरी । जयंती त्रिदशाधीपसा करी । तुरजत मज तीव्र त्रिविधे त्रिगुणे त्रिजगेश्वरी । तुकाई त्रिविधिताप संहरीं । त्राहि त्राहि मां पाहि रेणुके श्रमलों बहुतां परी । तुजविण नाहीं मज दुसरि । तारिं तारिं महिषासुरमर्दनी रामवरदेश्वरी । दया करीं॰ ॥ २ ॥

प्रणवरूपिणी परब्रह्मिणी प्रसिद्ध तुळजापुरीं । नांदसी जगदंबा सुंदरी । प्रयागसम कल्लोळ तीर्थ परि गोमुखतदनतरीं । सुमज्जन प्राणि पुनीत करी । प्रासादिक प्रत्यक्ष दर्शन देउनियां प्रिय करी जपा तप फलश्रेयस्करी । पुण्य क्षेत्र श्रीपीठ परात्पर पावन परमेश्वरी । दया करीं॰ ॥ ३ ॥

---

* रा॰ रा॰ रामजी भोंडजी खानोलकर यांनीं पाठविलेलीं प्रकरणें येथें संपलीं.

पतितोद्धारण पापनाशनी पुष्टितुष्टिप्रशकरी । पवित्रे प्रेमळ पद्माकरी । पद्मज-पुरंदरादि प्रमुख ज पूजिती परमादरीं । प्रफुल्लित पारिजातमंदरी । परमामृत नैवेद्य समर्पुनी स्तोत्र करिति परोपरी । अर्पण प्राणे पीतांबरी । पाळय मां श्री-देह वरप्रदे अच्युतपद शंकरी । दया करीं० ॥ ४ ॥

आदिकारणे आगमसारिणे अर्चिती आगमोत्तरीं । आनंदी आत्मनिष्ठ परि-करी । अखिल भोग अणिमादि त्या तिष्ठति तुक्षिये द्वारीं । आराधिनी यमु-नागिरिमंदिरीं । अरूणतरूणसम चरण सरोरूह रामात्मज दृढ धरी । मनोरथ-वल्ली सफलित करीं । नित्य जयश्री नित्य शुभ श्रीमंगळमाहेश्वरी । दया करीं० ॥ ५ ॥

---

## रघुनाथ यादव चित्रगुप्त कृत
## शिव पराक्रम वर्णन.

जयेन लभते लक्ष्मीं मृत्युनापि सुरांगनाः ॥
क्षणविध्वंसिनी काया का चिंता मरणे रणे ॥ १ ॥
शूरत्वाप्रति लब्धता मघवता दीवौकसादी सदा ।
ऐसा अर्थ समर्थ जाण भुतळीं अन्यत्र नाहीं कदा ॥
सर्वी प्राण हि गेलिया हित असे सत्कीर्ति ते वार्णतो ।
ऐसें हे शिव भूपती वदतसे अष्ट प्रधानांप्रती ॥ १ ॥
आला अफ्जल मस्तखोर कपटी ग्रासावयाला म्हणी ।
त्यातें दंडिन मी प्रतापतरके कौतूक पाहें रणीं ॥
श्रीअंबे वरदे गुमान न धरी ऐसा असे पातला ।
दानी देइन नीकरें निजबळें श्रीतूळजे तूजला ॥ २ ॥
शिव सर्जा वदला सकोप हृदयीं दंडावया पामरा ।
स्मश्रू पीळुनियां करें चमकला कंपीत झाली धरा ॥
मघवादीक समस्त देव गगनीं येऊनियां दाटले ।
पाहा कौतुक आगळें म्हणवुनी अभ्यतरीं तिष्ठले ॥ ३ ॥

---

दत्ताजीपंतांनीं एकान्तस्थळीं शिवराजास धीर धरून कार्यभाग शौर्यानें सिद्धीस न्यावा असा उपदेश केल्यावर महाराज ही त्या प्रमाणें शौर्यकर्माचरण करण्याचा निश्चय करते झाले त्या बद्दल---

शीवाजी नृपती समर्थ गरिमा प्रौढ प्रतापें अती ।
दावी शस्त्र धरूनियां च चपळें त्या अफ्जहोला प्रती ॥

मार्गी तूं सरल्या हिनत्व अगळे शोधोनि पाहे मना ।
दंडीं पामर एकदां निज करें ऐशी किजे साधना ॥ १ ॥
जैसा रावण मारिला निज करें श्रीरामचंद्रे तसा ॥
राजा अफ्‌जल दंडिजे च निकरें जाणा रिपू हा तसा ।
येताहे मुढ चालुनी च निकटीं ठेवूं नको ये घडी ॥
व्हावें सावध सावधान प्रभुजी घालीं त्वरें तू उडी ॥ २ ॥
प्रेमातें भुलला च खान कुमती मारावया तूजला ।
भेटीतें प्रभु येतसे इस घडी व्हैसा असे पातला ॥
साक्षी त्या करणे जयासि वरणे श्रीअंबिका तुष्टवीं ।
भीमें कीचक ताडिला तदुपरी येमालया पाठवीं ॥ ३ ॥
खानाची मिठि सोडवूनि चपळें दावीं तया कौतुका ।
शिव्‌सर्जा न ढळे कदापि नृपती देईं बळे त्या धका ॥
उदरीं मारुनि बीचवा च निकरें घेईं च प्राणा ह्मणी ।
आहे प्राण तुते विलंब न लवीं दुष्टासि दंडीं रणीं ॥ ४ ॥
इत्ताजीपतवाक्य श्रवण हि करुनी भूपती तुष्ट झाला ।
सन्मानें गौरवूनी निज हित विषया मागुती पाठवीला ॥
यावें घेऊनि खाना ह्मणवुनि चपळें गुह्य हे जाणवीलें ।
* * * * * * ॥ ५ ॥

---

शिवाजी महाराज अफ्‌जुल खानास भेटावयास निघाले तेव्हांचें त्यांचें वर्णन.—

जीरे टोप शिरीं कटीस बरवी पेटी जरी बादली
आंगीं बख्तर घातलें वरि झगा वीचित्रता दाविली ॥
मुक्तांकीत तुरा सलंब कलगी वीराजिली मस्तकीं ।
भूमूल्याव तुरा जडीत खरगे आपूर्व जाणा निकी ॥ १ ॥
कर्णीं तीं कुंडलें झळाळति बहू आमोल्य मुक्ताफळें ।
चंद्राहूनि सतेजता चि अगळी अन्यत्र ती नातुळे ॥
कंठीं हेमजडीत ( रत्न ) पदकें नाभिप्रभा दावितीं ।
शीवाजी नृप भोंसला दिनमणी वीराजिला हे क्षितीं ॥ २ ॥
भूपें मस्तकिं बादली भरजरी मंदील तो बांधिला ।
तेजें आधिकता त्रिभूपरि [ असे ] देदीप्य वीराजला ॥
तैशी चादर उंच ते भरजरी अंगावरी घेतली ।

पट्का तो कटिं वेष्टिला निजकरें आपूर्वता दाविली ॥ ३ ॥
पायीं घालुनि चोळणा वरि बरा कांचा नृपें बांधिला ।
खानाचा जिव घ्यावया निजबळें शाहूजीसुनू चालिला ॥
क्रोधें कपित अंतरीं म्हणतसे त्या अफूजला मारितों ।
आलाहे मतिमद पामर कसा तात्काळ निर्दाळितों ॥ ४ ॥
जाणा बीज दुजी फिरंग तुळजा पैं बीचवा हस्तकीं ।
तैसें खेटक वाग्नखें विलसलीं तीं तीव्र पाहा निकीं ॥
स्मश्रू पीळुनियां सकोप हृदयीं अफूजल्ल वीलोकितां ।
याचा प्राण हरीन या च समयीं नाहीं दुजा रक्षिता ॥ ५ ॥

---

पुढें देवघरांत इष्ट मंडळीसह जाऊन श्रीजगदंबेचे चरणीं मस्तक ठेवून प्रार्थना केली तीः—

श्रीअंबे [ मजला ] कृपा करूनिया निर्दाळिजे अफूजला ।
आला हा कपटी तयासि चपळें दावीं प्रभेची लिळा ॥
माझा हा अभिमान [ आइ ] तुजला श्रीरेणुके स्वामिणी ।
शीवाजी नृप भोंसल्यास वर दे प्रत्यक्षा चिंतामणी ॥ १ ॥
प्रार्थितां कर जोडुनी शिव नृपें कौतूक झालें अती ।
दिधूलीं मस्तकिचीं प्रसादसुमनें इच्छीत दासाप्रती ॥
आतां हे भय काय जाण हृदयीं दंडावया पामरा ।
ऐशी हे वदली सनेम वचनें संतोष राजेश्वरा ॥ २ ॥

---

येणें प्रमाणें दर्शन होऊन मातोश्रीकडे जाऊन चरणीं मस्तक ठेविलें तो प्रकारः—

जोजावू चरणांवरी नृपवेंर ठेवोनियां मस्तका ।
आज्ञा अर्पणता करीं च जननी सपादिं तूं कौतुका ॥
आला भेटिस अफूजला हिनमती कापट्य चित्तीं असे ।
मृत्यूनें वरिला म्हणोनि बकरा दाणीस मी देतसें ॥ १ ॥
शिवबा तू जय पावशील चपळें भीमाहुनी आगळा ।
माझा आशिस पूर्ण जाण चि असे आगाध तूझी लिळा ॥
श्रीअंबावरदें च येवन अरी पायातळीं घालिजे ।
विजयातें वरुनी सनेम गरिमा विस्तीर्णता [ती] किजे ॥ २ ॥
कुंतीचे सुत भीम अर्जुन जसे तैसा चि तू भूतळीं ।

बापा आर्यशिखामणी च असशी तूं भोंसल्याचे कुळीं ॥
वेगें कौतुक दाखवीं च समरीं मारूनियां अफ्‌जला ।
राज्याची अभिवृद्धि [ पूर्ण ] करणे आशी हि माझी तुला ॥ ३ ॥
कुंतीचे अजि पगतीस बसवीं तूं शीवबा रे मला ।
भीमें कीचक मारुनी भुजबळें कीर्तिध्वजू रोंविला ॥
तैसें या समयीं करूनि सकळां कौतूक हें दाविजे ।
अफ्‌जल्ला वधुनी [स्वमस्तकिं] टिळा त्या शोणितें लाविजे ॥ ४ ॥
माते आशिस पूर्ण जाण चि तुझा मीं मस्तकीं वंदिला ।
सिंहासन्मुख जंबुका गति नसे हा निश्चयो कल्पिला ॥
अफ्‌जल्ला वधुनी जयास वरितों अंबाप्रसादें जनीं ।
तूझा पुत्र तरी च जाण जननी दंडीन दुष्टा रणीं ॥ ५ ॥
जीजाबू वचनें वदे च शिवबा मारीं त्वरें अफ्‌जला ।
यातें जीत हि सोडशील तरि रे हे आण माझी तुला ॥
कपटी पामर पातला हिनमती म्हैसा तया लक्षिजे ।
दाणी देउनियां रणीं शिर करीं छेदूनिया आणिजे ॥ ६ ॥

---

सभेमध्यें खानाची व राजाची भेट:—

आज्ञा घेउनियां नृपाळ चपळें आला सभाभूवनीं ।
अफ्‌जल्ला हृदयीं च विव्हळ असे अशोक झाला जनीं ॥
जीविता प्रति मूकला च दिसतो अन्यत्र नाहीं कदा ।
आयुष्यावधि पूर्णता च भरली उन्माद झाला सदा ॥ १ ॥
अफ्‌जल् चालुनि [ येतसे ] निजहिता भेटावयातें नृपा ।
भेटोनी मतिमंद वाजट कसा अशीक मारी फका ॥
आला काळ समीप पूर्ण घटिका पैं पातली ये क्षणीं
शीवाजी सरजा समर्थ नृपती दंडील यातें रणीं ॥ २ ॥
देखोनी सदरे मनीं प्रजळला [ हे ] बादशाला नसे ।
झाला विस्मित अंतरीं मुढमती वीचित्रता हा दिसे ॥
शाहूजीसूत समर्थ एक अवनीं घेईल वीजापुरा ।
ऐसा निश्चय अंतरीं च गमला त्या दुर्मती पामरा ॥ ३ ॥
क्रोधें कापतसे थराथरि वपू आरक्त नेत्रा करी ।
ऐकोनी नृपवाक्य जाण हृदयीं आनिष्टता वीवरी ॥
मद्यें उन्मत होउनी भुंकतसे श्वानापरी तो कसा ।

शीवाजीनृप सागरापरि असे आलक्षिले वायसा ॥ ४ ॥
श्वानाते नृप वारितो निजमुखे बोलो नको पामरा ।
शीवाजी नृपनायकासि नयनें वीलोकिजे रे बरा ॥
वेगीं रक्षुनि प्राण जाण अपुला ऊठोनि जा ये क्षणीं ।
मी देतो जिवदान तूं हिनमती मी एक चिंतामणी ॥ ५ ॥

---

अफ्जलखानाचें उत्तरः—

शीवा तू बरजोर क्यौं कर हुवा मै अफ्जला देखयो ।
चलना ईस घडी हुकूम तुजकू है पैरवी रे कियो ॥
मेरीं बात सुनो मजाख न कियो जाने बचेगी शिवा ।
पाच्छाहाइतराजिमो मत अयो कीयो बडेकी दुवा ॥ १ ॥
शीवा तू बदमस्त क्यौं कर हुवा तूरा लगाया बडा ।
हाता ले तरवार अफ्जल अया शीताब होना खडा ॥
कुनूबी होकर तैं मजाख मजसूं है बात जानो बुरी ।
चलना ईस घडी डरो मत शिवा कोई न बाजा पुरी ॥ २ ॥
पाच्छाही सब छीन लेकर शिवा बेमान क्यौं रे हुवा ।
दर्या अफ्जल [ वो ] बडा वाजिर मो किस्सा न तेरे कुवा ॥
पकुडो हिम्मत जांदगी इस घडी मै जोरसे रे अया ।
कीयो रोष न पैरवी अखनसो येह् सून मेरा कहा ॥ ३ ॥
शीवा कंबरजोर माकुल नही गाफील क्यौं रे हुवा ।
देखीयो अफ्जालका दिदर आखार् जानिसे तेरू मुवा ॥
जादा हेतुलवात रोष किय येही बात क्यौं रे करी ।
पाच्छासे बाडि जादगी च करिया किस्सा न तेरे बुरी ॥ ४ ॥
ऐरे अफ्जल बाग हो कर अया देखो शिवा येह्घडी ।
अब् तेरे सपडा मजाख न चले कैदेंत हो रे दडी ॥
नखूरा ते सब छोड दे मज कियो जाने बचेगी शिवा ।
पाच्छाके दरबदगीस चलना देखो अच्छी रे हवा ॥ ५ ॥

---

यावर महाराजाचें उत्तरः—

मद्यें उन्मत होउनी मुढमती अफ्जल्ल बोले कसा ।
जातीचा हिन येवनासि न कळे सिंहापुढें हा ससा ॥
आला काळ समीप जाण घटिका पर्णत्वता पावली ।

श्रीअंबे प्रति गोंधळासि बकरा दाणी असे दीधलो ॥ १ ॥
देखोनी शिवभूपतीस जळला सक्रोध तो अंतरीं ।
घ्यावा प्राण असें चि जाण गमलें आनिष्टता वीवरी ॥
भ्रांतीचे पटलें कसा यवन तो उन्मादता पावला ।
तेव्हा त्या नरनायके मुढमती पापिष्ठ वीलोकिला ॥ २ ॥
अफजल्ला शिवभूपती निजकरें मृत्युप्रती देतसे ।
श्रीअंबा नरनायकासि सदयें येशासि अर्पीतसे ॥
आयुष्यावधि पूर्णता चि भरली अन्यत्र नाही कदा ।
म्हैशासूर रूपें असे यवन [ हा ] दडीन या दुर्मदा ॥ ३ ॥
आला अफजल बेनवा मुढमती भेटावयातें नृपा ।
शीवाजी सरजा हटेल न ढळे आहे हराची कृपा ॥
देखोनी सदरा अवेश न धरे त्या येवनातें मनीं ।
बोले उन्मत होउनी निज मुखें जाणा अमित्राखुनी ॥ ४ ॥
कां रे बोलसि वाजटा धिटपणे लज्जा न वाटें तुला ।
आता मी निकरें चि मारिन रणी हा निश्चयो कल्पिला ॥
केवा काय तुझा च मर्कट जसे चेष्टा करी आगळी ॥
शीवाजी सरजा समर्थ अवनीं या भोंसल्याचे कुळीं ॥ ५ ॥
ऐकें रे मतिमदटा बरळसी सर्जा शिवाजी पुढां ।
सिंहा सन्मुख काय जाण करशी तू अफजला रे मुढा ॥
हस्तीं हे तुळजा फिरंग चमके घेईल प्राणा क्षणी ।
नाही सोडविता [ तुला ] मज दिसे प्रत्यक्ष तो रे रणीं ॥ ६ ॥
बीजापूर हि बेदरादिक क्षणी मीं जिंकितों एकदा ।
खानाशा सुल्तान मारिन करीं अन्यत्र नाहीं कदा ॥
दिल्ली आदिकरूनियां च अवघे त्या पातशा दंडितों ।
हेमाऊबलत्वासि घेइन बळें कीर्तीस विस्तारितो ॥ ७ ॥
तेथें अफजल [ तू ] किसान मजला दृष्टीपुढें दीसते ।
आतां जाशिल केउता परतुनी दडीन आता तुतें ॥
येई रे शरणागतासि चपळें कां प्राण देशी मुढा ।
शीवाजी सरजा समर्थ अवनीं तूं तृण माझे पुढां ॥ ८ ॥
तूझी माय भटारणी स्मर मनीं या रे क्षणीं पामरा ।
नाहीं आकलता हि मूढमति तू त्वां भक्षिली रे सुरा ॥
शीवाजी सरजा समस्त भुतळीं धीलोकुनी पाहिजे ।

जातीचा हिन येवना अझुनि रे प्राणासि [ तूं ] रक्षिजे ॥ ९ ॥
तूते मारुनि [एथ] रक्त टिकला लावोन भाळीं अता ।
श्रीअंबावरदें प्रताप मजला नाही च अन्यत्रना ॥
अफ्जल्ला करुणा तुझी च हृदयीं आमोघता पातली ।
माझे रे भवनासि येउनि गती कां रे अशी लाविली ॥ १० ॥
बीजापूरपती रडेल हृदयीं ऐकोनि तूझ्या वृता ।
ऐसें हें न करीं कदा मुढमती नाहीं मती योग्यता ॥
तुळ्जा हस्तकिंची फिरंग चमके आतूरता अंतरीं ।
अफ्जल्ला रुधिरान्धके प्रिय असे ते प्राशना सत्वरी ॥ ११ ॥
भटारिच्या पोरा परम कपटीया मुढमती ।
शिवाजीसर्जाची नकळ तुजला आजुनि गती ॥
नको देऊ प्राणा त्वरित फिर मागे च सदना ।
न ठाके रे माझे क्षण भरि [ हि तू ] जाण कदना ॥ १२ ॥

---

अफझलखान भेटावयास पुढें सरसावतो त्याचें वर्णन.—
क्रोधें शीवनृपावरी च उठला अफ्झल्ल पापी कसा ।
वेष्टूनी उदरांत खंजिर बळें तो मारिला हो ठसा ॥
पोटीं तो भडकावुनी च करिचा खंजीर लागू नसे ।
शिवसर्जा लघुलाघवीं निजबळें कौतूक केलें कसें ॥ १ ॥
डावे हस्तकिंचे चपेट धरणी पैं वागनखे मारिलीं ।
खानाचे हृदयीं प्रवेश करितां आंतें भुई पाडिली ॥
तेव्हां विव्हल होउनी कुमति [तो] वेडावला अंतरीं ।
शिव सर्जा उडि मारुनी सरकला रोखूनि पाहे अरी ॥ २ ॥
आंतें सांवरुनी करें च उदरी त्या अफ्जलें घातलीं ।
मूर्च्छा येउनि चांचरी मुढमती ऐशी दशा लाधली ॥
तुळ्जा आड करोनिया शिवनृपें तत्काळ सांभाळिला ।
पट्टे घेउनिया सकोप न धरे ऊठोनियां धावला ॥ ३ ॥
अफ्झल्लें उदरासि [ देउनि ] करा सक्रोधता नावरे ।
पट्याची शिग मारिली निजबळें त्या दुर्मती निष्ठुरे ॥
भूपें मारुनिया उडी चुकविली तें अल्प लागू नसे ।
जीरेटोप विदारुनी जवभरी जाण क्षतू तें दिसे ॥ ४ ॥

---

अफझलखानाचा नाश झाल्यावर त्याच्या लोकांची दशा झाली तीः—

भुतांचे गणू [ जेवी ] नम्र स्मशानीं । तसे नागवे वीर अफूझलखानी ॥
ना अन्नपाणी क्षुधाक्रान्त रानीं । बजोरासि केली शिवें मेजवानी ॥ १ ॥

ऐशी रीते करून खानाचें शिरकमल देवीस अपूर्न राजे यांणीं देवीची प्रार्थना आरंभलीः—

श्रीअंबे कुलदैवते विनवितों जोडुनि हस्तद्वया ।
शीवाजी सरजावरी निशिदिनीं आमोघ कीजे दया ॥
अफूजल्ला जननी तुझे [ च ] वरदें निर्नाम केला रणीं ।
दासाचा अभिमान पूर्ण धरणें तूं श्रेष्ठ चिंतामणी ॥ १ ॥
विजयातें वरिलें कृपा करुनियां श्रीअंबिके संकटीं ।
ऐसा अफजल दंडुनी निजकरें आलो तुझे नीकटीं ॥
शस्त्राची दिपिका धरोनि समरीं लीलो करू कौतुकें ।
केला गोंधळ साजिरा च जननी हे येश आले निकें ॥ २ ॥
श्रीअंबे वरदे नृसिंह समरीं मी दास होऊनियां ।
अफजल दडुनियां अरी च निकरें संपादिलें या जया ॥
शीवाजी नरनायकासि जननी सरक्षणें संकटीं ।
दासाचा अभिमान पूर्ण धरणें आहे तुझे नीकटीं ॥ ३ ॥

शास्तेखानास दंडिलें त्याची हकीकतः—

शास्तेखान नवाब मूर्ख अगळा चालोन आला कसा ।
शीवाजी नृपती समर्थ अवनी अद्भुत ज्याचा ठसा ॥
केलें हीन हि पामरास चपळें तोडानि बोटें क्षणीं ।
धाकें कांपतसे कुटील उदरीं जिंकील आतां रणी ॥ १ ॥
पाच्छाके दरबदगीस अब मैं जाता नहीं ये घडी ।
शास्तांको डरशा लगी च दिलमों जानो हमेशा बडी ॥
जानी दौलतकी नहोंचि मजकू आशा कभू प्यारसे ।
शीवा है बरजोर रोष न कियो जानो च ईमानसे ॥ २ ॥
शास्तातें मरणाहुनी च अगळें केलें नृपानें कसें ।
दंडोनी निकरें अरीस चपळें कौतूक झालें असें ॥
मारामार करूनियां निजबळें शाहूजीसुनूं पावला ।
कीर्तीचे ध्वज लाविले च अवनी आखण्ड वीराजला ॥ ३ ॥

स्त्रीयांमाजि कुटील मूर्ख कपटी शास्ता दडाला भयें ।
आतां मारिल भूपती च मजला निष्ठूरता निर्दयें ॥
पाच्छानें मज धाडिलें करूं कसें शाहूजीसुनू हा बळी ।
कीर्तीचे ध्वज लाविले निशिदिवा या भोंसल्यांचे कुळी ॥ ४
सेना भीत समस्त जाण हृदयीं आपूर्व झालें कसें ।
शीवाजीनृपति समर्थ अवनी अन्यत्र कोणी नसे ॥
पाच्छाके दरबदगीस न चले दीदार ये की घडी ।
जादा देखनमों करामत असे जाना दिलेमों बडी ॥ ५ ॥
पाच्छाचे अमिरादि [ सर्व ] वजिरं मारील हा भूपती ।
दिल्ली घेउनियां प्रतापतवकें संरक्षिताहे क्षिती ॥
ईराणादिक हें तुराण अवघें घेईल राजा बळें ।
हस्तीं शस्त्र धरूनि [ सर्व ] चपळें खाणील शत्रूमुळें ॥ ६ ॥

---

मिरजा राजा जयसिंग यांजकडे रघुनाथ पंडित यांनीं दूतत्व केलें त्यासयांचें बोलणें:—

अद्यापि नोज्झति हरः किल कालकूटं ।
कूर्मो बिभर्ति धरणिं खलु पृष्ठभागे ॥
अंभोनिधिर्वहति दुःसह वाडवाग्निं ।
अंगीकृत सुकृतिनः परिपालयन्ति ॥ १ ॥

कूर्मावतारीं धरिलें क्षितीला । अंभोनिधीनें वडवानळाला ॥
समर्थ ज्याला धरितात हातीं । त्या कारणें प्राण हि वेंचितातीं ॥ २ ॥

शीवाजी नृपती सुनू तव असे सांभाळिजे संकटीं ।
येताहे बळिया समर्थ अवनी आयादरें नीकटीं ॥
पाच्छाचें भय आगळें म्हणवुनी विज्ञापना आयका ।
इत्यादी वचनें कदापि प्रभुचीं कांहीं कशीं नायका ॥ ३ ॥
दिधल्या ठाकुरजीवरील तुळशी सकृप होऊनियां ।
याचा हा अभिमान पूर्ण धरणें येणें चि आहे जया ॥
मानूनी सुत रामसिंग प्रभुजी चित्तीं दुजें नाणिजे ।
क्रीया रक्षणता अशाच समयीं आख [ ण्ड ] ता हो किजे ॥ ४ ॥
श्रेष्ठांचीं वचनें सनेम असतीं बोलोनि गेला विधी ।
कीर्तीचा गरिमा भरूनि उरवी तू एक अंभोनिधी ॥
मिर्जा भूपति धार्मिका विलससी चातुर्यचन्द्रा सदा ।

शीवाजी नरनायकावरि दया कीजे प्रभो एकदा ॥ ५॥
श्रीरामें वर दीधला निज मुखें बीभीषणातें ह्मणे ।
दडीतों रिपु रावणासि निकरें तात्काळ पाहो रणीं ॥
लंकेचें तुज राज्य जाण दिधलें यावत् रवीचन्द्रमा ।
श्रेष्ठांचा वचनें सनेम प्रभुजी आखण्ड कल्पद्रुमा ॥ ६ ॥
मिर्जा भूपति तू कृपार्णव जगीं श्रीरामचन्द्रापरी ।
शीवाजी सरजा सुनू तव असे मानाभिमाना धरीं ॥
कीर्तीची भुवनें भरोनि उरवीं सत्कीर्ति संपादिजे ।
येणें हा जय पावशील अगळा दातृत्व विप्रा दिजे ॥ ७ ॥

---

दिल्लीस जावयाचे वेळेस महाराजांनीं श्रीभवानीशंकरास प्रार्थना केली:–

शंभो तू करुणाकरा पशुपते भक्ताभिमानी सदा ।
दासाचा अभिमान पूर्ण धरणें हे प्रार्थना जी पदा ॥
द्यावें येश अशाच जाण समयीं सत्कीर्तितें पाविजे ।
शत्रू दंडुनियां प्रतापतवकें या सकटीं रक्षिजे ॥ १ ॥
मालोजी मम पूर्वजावरि प्रभो आमोघ केली दया ।
तशा हा वर [ सर्वदा ] निशिदिनीं अर्पीतसे हो जया ॥
दडीं येवन हस्तके मम सदा ठेवू नको एक ही ।
पुण्याचा अभिवृद्धिता च करण सतुष्ट व्हावी मही ॥ २ ॥
श्रीअंबे तुळजे कृपा करुनियां संभाळिजे सकटीं ।
धांवें या समयीं उदास न करीं यावें दिना नीकटीं ॥
पाच्छाचे सदनाप्रती च मजला जाणे असे एकदा ।
ऐसें हें घडलें कुटील कपटी दडीं त्वरें दुर्मदा ॥ ३ ॥
शास्ता अफ्जल दंडिला तदुपरी निर्दाळिजे पाच्छहा ।
शिवसर्जाप्रति रक्षणें च जननी संपादिजे या यशा ॥
मिर्जा हा जयसिंग मित्र मजला झाला अती सकटीं ।
श्रीअंबे सुदया करुनि चपळे यावें दिनानीकटीं ॥ ४ ॥

---

दिल्ली येथे बादशहाचें दरबारीं महाराज गेले तेव्हांचें वर्णन:––

शीवाजी नरनाथ भूतळवटीं वीराजला हो क्षिती ।
धैर्यौदार्य हि धूर्तता च अगळी धार्मीकता हो निती ॥
पाच्छाची परवा नसे चि प्रभुतें भीमार्जुनासारिखा ।

देखोनी, अवरंगजेब [ परि ] तो आला असे पारिखा ॥ १ ॥
आतां सावध जाण फार असणें ऐसें वदे पाच्छहा ।
आहे तारक या घडीस मजला पाहो सवा ईनशा ॥
शीवाजी मज दीसतो चि नयनें प्रत्यक्ष तो केसरी ।
अफजल्लावत हे गतीच घडती जानो च भाई बुरी ॥ २ ॥
पाच्छाची भृति फाटली च चपळें देखोनि राजापती ।
बेमानी जरि केलिया इस घडी होईल शास्तागती ॥
जैसा व्याघ्र हि धांवतो च निकरें देखोनियां श्वापदां ।
तैसा हा रिपु भासतो च मजला अन्यत्र नाहीं कदा ॥ ३ ॥

---

महाराज दिल्लीहून गुप्तरूपें निघून गेल्यावर बादशहाची स्थितिः—
गानी समर्थचि समर्थ नृपू शिवाजी । दिल्लीश्वरासि निकरें दिधली च बाजी ॥
लावून चूर्ण वदनादिकनाशिकाला । शिक्षा करोनि प्रभुजी चपळें पळाला ॥ १ ॥
भला मर्द तूं शीव सर्जा च गाजी । म्हणे पादशाहा दिली आजि बाजी ॥
कसा या गतीनें निघालासि राया । तुला लोक मी पाठवीले धराया ॥ २ ॥
जाणा बावन पाच्छहासि रिपु हा सर्जा शिवाजी असे ।
दिल्लीचा अवरंगजेब [ परि तो ] सामर्थ्य त्या ही नसे ॥
शाहूजीचा सुत भूतळीं विलसला आर्य प्रतापी सदा ।
दंडी तो अवघे [ हि ] येवन करें अन्यत्र नाहीं कदा ॥ ३ ॥
शीवाजी सरजा समर्थ नृपती भूमण्डळीं आगळा ।
कीर्तीचि ध्वज लाविले निशिदिनीं आमोघ याची कळा ॥
जाणा या अवरंगजेब रिपुला दंडील हा नीकरें ।
श्रीअंबा वर दे जयासि तरि त्या सरक्षिले श्रीहरें ॥ ४ ॥
गेला हा शिव भूपती पळुनियां नानागतीनें कसा ।
झाला विस्मित पाच्छहा च हृदयीं अद्भूत ज्याचा ठसा ॥
सोडीना मनला असें चि दिसतें मारील जीवें क्षणीं ।
दंडीले अवघे च येवन कसे जाणा प्रतापें रणीं ॥ ५ ॥

---

दिल्लीहून परत आल्यावर महाराजांनीं श्रीअंबेची प्रार्थना केली तीः—
श्रीअंबे तुळजे कृपा करुनियां राज्यावरी आणिलें ।
केला विन्मुख पाच्छहा मुदमती ह्यासकटीं रक्षिलें ॥
तूझा दास पतीत जाण जननी सांभाळिजे सर्वदा ।

माझा हा अभिमान पूर्ण धरणें अन्यत्र नाहीं कदां ॥ १ ॥

---

तानाजीस महाराजांनीं सत्तावीस किल्ले परत घ्यावयास पाठविलें त्याचें वर्णन:–

तानाजी मर्द गाजी समरिं अरि सदा भीत होते चि जाणा ।
दोर्दण्डें दंडिताहे अभिनव गरिमा घेतसे शीघ्र प्राणा ॥
याजागीं शीवराजें निवडुनि चपळें लोभ केला अपार ।
शौर्यिलें कीर्ति झाली अगणित भुतळीं सेवकांमाजि थोर ॥ १ ॥

---

तानाजीच्या शौर्याचें वर्णन:––

तानाजी मर्द गाजी समरिं च अरिला मारिला नीकरानें ।
ऐसा हो जाण योद्धा अघटित करणी अर्पिली श्रीहरानें ॥
मेला हो स्वामिकार्जी म्हणवुनि मघवें मान्यता यास केली ।
शाहूजीच्या सुतसेवकांत भुतळीं या कीर्ति विस्तीर्ण झाली ॥ १ ॥

---

महाराजांची सिंहासनावर बसून राजपद स्वीकारण्याची योग्यता:—

शीवाजी नृपती समर्थ अवनीं श्रीविष्णुची साम्यता ।
ऐसें श्रीविधि बोलतो निशिदिनीं आहे सदा योग्यता ॥
झालें पातक आगळें म्हणुनियां क्षात्रत्व संपादिलें ।
दुष्टां संहरिलें च जाण निकरें धर्मास संरक्षिलें ॥ १ ॥
शाहूजीचा सुत हा महेंद्र अवनीं सर्जा शिवाजी सदा ।
कीर्तीची गरिमा भरोनि उरली अन्यत्र नाहीं कदा ॥
जैसा कर्ण हि धर्म भूपति [ पुरा ] त्या तुल्यता हा असे ।
सर्वज्ञांबुनिधी निरूपम जगीं सौंदर्यता वीलसे ॥ २ ॥

---

सिंहासनारूढ व्हावयाचे वेळीं जिजाऊ आईसाहेब यांचा आशीर्वाद:—

बापा तूं शिवबा प्रतापनिधि रे सिंहासनीं रूढणें ।
शत्रू जिंकुनि आवघे अतिरथी दुष्टांसि निर्दाळणें ॥
श्रीअंबा वर दे जयासि वरणें साम्राज्य कीजे सदा ।
देवब्राह्मणपूजनीं रत असे अन्यत्र नाहीं कदा ॥ १ ॥
शिवबा तू अवरंगजेब निकरें दंडीं प्रतापें रणीं ।
दिल्ली घेउनि आसनावरि रूढें तात्काळ ये च क्षणीं ॥
श्रीतुळजाकुळदेवते स्मरुनियां सत्कीर्ति संपादिजे ।
स्वकरें शस्त्र धरूनियां निज बळें धार्मीकता रक्षिजे ॥ २ ॥

सिंहासनारूढ झाल्यानंतर संपूर्ण रयतेस पाचारून कौल दिला तद्विषयीं वर्णनः–

शीवाजी नृपती प्रतापनिधि हा सिंहासनीं रूढला ।
जैसा विक्रम भोज जाण अवनीं अत्यंत वीराजला ॥
पृथ्वी जिंकुनि सार्वभौमपद हें संपादितो निश्चयें ।
नाहीं पीडण ही प्रजांस अगदीं व्हावें तुम्ही निर्भयें ॥ १ ॥
जाणा धर्म हि नैषधापरि असे शाहूजीसुनू भूपती ।
कीर्तीची गरिमा भरूनि उरली आमोघता ये क्षिती ॥
घ्या रे कौल प्रजाप्रती वदतसे म्हाराज अत्यादरें ।
नमूना रे भय अंतरीं अनुदिनीं दंडीन दुष्टा त्वरें ॥ २ ॥
शीवाजी नृपती समर्थ भुतळीं मानूं नका रे भया ।
दिल्हा कौल प्रजांस जाण प्रभुनें आमोघ केली दया ॥
म्लच्छाचा शक मोडिला च निकरें चिंता न कीजे मनीं ।
कीजे कींर्द महामुरी च चपळें दीवा सदा यामिनी ॥ ३ ॥
शीवाजी [ नृपती ] प्रजांस वदतो घ्या कौल माझा क्षणीं ।
तुमच्या रे प्रतिपालनास अवनीं म्हाराज मी रे धनी ॥
दिल्लीपासुनि जिंकिलें निज बळें हें राज्य जाणा च रे ।
केला हीन हि पाच्छहा मुढमती श्रीअंबिकेचे वरें ॥ ४ ॥
जोडोनी कर आवघ्या च वदती जाणा प्रजा भूपती ।
श्रीरामें वर दीधला च सदयें पाहें बहूता रिती ॥
तैसें पालन ह्या जगीं च करणें हे प्रार्थना जी पदा ।
कीर्तीची गरिमा भरूनि उरवी अन्यत्र नाहीं कदा ॥ ५ ॥
श्रीरामावत कौल देउनि अम्हा सरक्षणें भूपती ।
धर्मीका गुणसागरा प्रभु जगीं ऐशा प्रजा बोलती ॥
पडता संकट दर्शनास चपळें द्यावें अम्हां सर्वदा ।
कीजे दाद विलंब तो च न त्वरीं ही प्रार्थना जी पदा ॥ ६ ॥
देणें कौल असा च जाण अमुतें म्हाराजचूडामणी ।
भूपा क्लेश हरूनियां सुख दिजे तूं एक चिंतामणी ॥
इत्यादीक हि सेवकांकरिं अम्हा देऊं नको सर्वथा ।
तूझा कौल नृपा कदापि न किजे भूमंडळीं हो वृथा ॥ ७ ॥
ऐकूनी शिवभूपती वदतसे जाणा प्रजांतें अती ।
चिंता हे न किजे कदापि हृदयीं अन्यत्र नाहीं गती ॥
ऐसें बोलुनियां सनेम वचनें संतुष्टवीली प्रजा ।

मार्थां ठेवुनि हस्तकासि सदयें दिल्ही समस्तां रजा ॥ ८ ॥
असा कौल [ तो ] देउनीया प्रजांला । नृपाअंतरीं तोष अद्भूत झाला ॥
प्रभूची लिला वर्णिली चित्रतेनें । अती आदरें हो रघूनाथजीनें ॥ ९ ॥

---

महाराजांनीं प्रजास कौल दिल्यावर त्यांस आनंद झाल्याचें वर्णन:—

झाला नाथ अनाथतारक जगीं शाजीसुनू भूपती ।
पृथ्वींतील प्रजा समस्त हृदयीं आनंद हा मानिती ॥
आता हे भयकल्पना च अमुतें नाहीं कदा निश्चयें ।
शीवाजी नरनायका जय असो श्रीअंबिकेचे दयें ॥ १ ॥

सिंहासनारूढ नृपाळ झाला । आनंद हा ची अवघ्या प्रजांला ॥
ऐसा धणी हरिहरें दिधला प्रतापी । केले च येवन बळें मुढ अप्रतापी ॥२॥

---

भागानगरचे मोहिमेस गेल्यावर तेथे पोंचल्यानंतर त्यांचा आदरसत्कार झाला तदुत्तर भाटानीं स्तुति केली तीः—

सबदुनयेके अफताब शहाजीसुत छत्रपति शिवराज ।
श्रीशंकर विष्णु अवतारबिराजतहै राजनमों शिरताज ॥
बीजापूर हैदराबाद बाकी अच्छी दौलताबाज ।
जोरसे काफरकू मार डालकर किया अपना काज ॥ १ ॥
वेह महाराज शिवराज ॥ धृ० ॥
अफजल भुवा बल बहादर हुवा गाफिल ।
शिवराजनकू न हीं तमा ज्यानी दौलतसे किया फैसल ॥
शाबास कष्टयातनकी ईशास्ति दुवाबद मस्त ।
नवरंग दीलसे दिल मो मगता है भिस्त ॥ २ ॥

---

महाराजानीं मालवणास सिंधुदुर्ग बांधिला तो सर्व जंजिऱ्यांत प्रमुख झाला त्याचें वर्णन.

सिंधूदुर्ग असेच कौस्तुभ मणी झारंन वीलोकिता ।
नाहीं आन विधी च [ यास ] वदला याची च या योग्यता ॥
देवादी असुरांप्रती हि भुधरां दिल्हा नसे सागरें ।
तो हा शीवनृपास लाभ घडला श्रीशंकराचे वरें ॥ १ ॥
सिंधूदुर्ग समर्थ जाण मणि हा वीराजला भूतळीं ।
दुष्टांचे भय आगळे म्हणुनियां संरक्षिला म्हाजळीं ॥

सुवर्णांकित द्वारका तदुपरी लंका नये तूळिता ।
कौस्तूभाहुनि आगळा चि गरिमा त्याचा च त्या योग्यता ॥ २ ॥
सिंधूची उपमा सिंधूसि च असे तैसी च त्या हो नभा ।
ऐसा अर्थ विलोकिजे च विदुषें आमोघ दावी प्रभा ॥
जंजीरा महि मूल्य [ वान ] मणि हा वीराजला या क्षिती ।
त्याची साक्ष तयाप्रती च प्रभुजी सर्वत्र वाखाणिती ॥ ३ ॥
किल्ले आणिक जजिरे गणुनियां केली नृपें माळिका ।
सिंधूदुर्ग समर्थ [ त्यांत ] मणि हा वीराजला हो निका ॥
इत्यादीक स्थळें जशीं उडुगणें चंद्रोपमा त्यां नसे ॥
जंजीरा विधु दूसरा च भुतळिं हे सत्य जाणा असे ॥ ४ ॥
सिंधूदुर्ग स्थळावरूनि चपळें लंका किजे सांडणें ।
जंजीरा अति आर्यता महितळीं मेरूसि केलें उणें ॥
काल्पी फुल्लचरी अयोग्य नयने दासी च वीलोकितां ।
नाहीं या उपमा दुजी त्रिभुवनीं याची च या योग्यता ॥ ५ ॥
सिंगालदीप रमणीय हुनावराला । ओंवाळणी करुनियां त्यजणें तयाला ॥
वीलायता मसकता हिनता च आली । गोमातकादिक स्थळें तृणतुल्य झाली ॥६॥
तैसी चांच हि पूर्तकाल उपमा पावे च ना सर्वथा ।
सिंधूदुर्ग समर्थ जाण विलसे इत्यादि पाहो वृथा ॥
ऐसा हा नृपतीस [ दुर्ग ] सदये श्रीसागरें अर्पिला ।
काळाची गति भिन्नता च घडली प्रत्यक्ष नीरिक्षिला ॥ ७ ॥
खांदेरी जयदुर्ग जाण विजया नाहीं कदा मान्यता ।
तैसी राजपुरी च खोकरि जगीं झाली च आयोग्यता ॥
जाणा मुंबइचे सदैव लवणें दृष्टी त्वरें काढिजे ।
सिंधूदुर्ग समर्थ एक विलसे त्यातें च वीलोकिजे ॥ ८ ॥
झाल्या कुंठित ऊपमा च अवघ्या अन्यत्र आणूं नका ।
जंजीरा धणि आर्यता च विलसे आहे जगीं हा निका ॥
बोखाडा अणि रेडिला च चपळें झाडावया लाविजे ।
फूलाबा अस भालदार चतुरें प्रत्यक्ष वीलोकिजे ॥ ९ ॥
जाणा तो जळिं पद्मदुर्ग म्हणवी तांडेल आहे सदां ।
उंदेरी अति सान हीन चि असे दीनत्व भावी पदा ॥
सिंधूदुर्गप्रिया अती रमणिका रत्नागिरी नेटकी ।
दूजी अंजनवेलि फार विलसे आहे स्वरूपें निकी ॥ १० ॥

नागांगना वसइ नृत्य करी सदैवा । तैसी च ते सुरत दाखवि सर्व भावा ॥
येलूर जाण नटवा मनरजनाला । आपेक्षिला निशिदिनी अति मान त्याला ॥११॥
असे दौलतावाद डोंबारणी हे । उडी मारिली नीकटी ते न राहे ॥
शिलेमान पाहो क्षिती पापरूपी । यमूनाजळीं तो दडाला कुरूपी ॥ १२ ॥
किंल्ले कोट अगण्य जाण चि असे सेना सदा भूतळीं ।
सिंधूदुर्ग [ चि ] स्वामि [ हा हि ] सकळां आशोभ आहे जळीं ॥
त्याचा नाटकि वर्णिला च गरिमा चातुर्य वीलोकिजे ।
सन्मानें प्रतिपाळणासि करणें हें ईतुके अर्पिजे ॥ ३ ॥

---

महाराजांवर श्रीरामदासस्वामींनीं कृपाळू होऊन राजनीति सिंहगडाधीश्वर यास स्वहस्तें लिहून पाठविली ती महाराजानीं संभाजीचे पुढें उपदेशिली ती येणें प्रमाणेः—

महाराजा नरशार्दुळा शिवनृपा प्रौढप्रतापा जनीं ।
राज्याची अभिवृद्धता च करणें संतुष्टवीं मेदिनी ॥
श्रीअंबावरदे जयासि वरूनी शंभूस निर्दाळिले ।
धार्मीका गुणसागरा निशिदिनीं प्रत्यक्ष नीरिक्षिलें ॥ १ ॥
कौसल्याजननी तदूपरि दुजी श्रीरेणुका भूतळीं ।
कुंती पांडुप्रिया समर्थ प्रभुजी त्या सोमवंशाकुळीं ॥
तैसी हे तव मात जाण विलसे जीजावती सुदरा ।
धन्यत्वाप्रति पावली त्रिभुवनीं पूजोनि श्रीईश्वरा ॥ २ ॥
भूभाराहरणाप्रती च चपले मन्वाकृती पातला ।
वैकुंठाप्रति त्यागुनी च प्रभु हा अद्भूत वीराजला ॥
क्षत्रीयान्तक होउनी शिवनृपा येशध्वजा लाविली ।
आहे श्रीतुळजा प्रसन्न तुजला सत्कीर्ति सपादिली ॥ ३ ॥
श्रीअंबावरदें रिपूसि वधुनी धर्मासि संरक्षिले ।
दोर्दण्डें महि जिंकुनी च सकळां आचोज तें दाविलें ॥
होऊनी क्षितिइन्द्र जाण चपळें सिंहासना रूढला ।
राजा श्रीशिव तो हरी हि हृदयीं आमोघ संतुष्टला ॥ ४ ॥
भूपा धन्य तुझी अगाध गरिमा लोकत्रयीं वर्णिती ।
राजेन्द्रा नरकेसरी च प्रभुजी अन्यत्र नाहीं क्षिती ॥
राया माण्डलिका परीच गणिले गोमायु ती पामरें ।
दास्यत्वा महि लावुनी च रिपुतें केलीं जगीं किंकरें ॥ ५ ॥

हस्तीं श्रीतुळजा फिरंग चमके वज्राहुनी तीव्रता ।
चाचल्यें चमके अरीस हरिलें नाहीं च अन्यत्रता ॥
शत्रूंचीं शिरपंकजें अगणितें छेदोनि पाडीं रणीं ।
पर्णप्राय गळीत [ त्यांस ] करूनी आणीं तयांतें क्षणीं ॥ ६ ॥
नष्टाचे रुधिरे च कुंकुम धराभाळीं सदा लेववीं ।
दावूनी भिम हा प्रताप सकळा श्रीअंबिका तुष्टवीं ॥
शौर्यत्वाप्रति आगळा च असती शाहूजीसुनो आगळा ।
भूपा येवन दण्डुनी निजकरें अद्भुत कीजे बळा ॥ ७ ॥
निःक्षत्री करूनी धरा निजबळें दण्डी च दुष्टांप्रती ।
व्हावें भार्गव या कलींत प्रभुजी सत्कीर्त्तिनें वर्णिती ॥
दावीं आक्रम आगळा निशिदिनीं सर्वां जनांतें सदा ।
श्रीअंबावरदें जयासि वरणें अन्यत्र नाहीं कदा ॥ ८ ॥
चंडीयाग चि कोटि यज्ञ नृपती त्या वाजपीतें करीं ।
पृथ्वी जिंकुनी अश्वमेध अगळा सत्कीर्त्ति दीगान्तरीं ॥
धर्मीदीनहुषाप्रती च गरिमा आमोघता दाविजे ।
ऐसा तूं जय पावशील प्रभुजी हा निश्चयो कल्पिजे ॥ ९ ॥
राया विक्रमशालिवाहनशकां आच्छादिजे एथुनी ।
ऐसे हे नृपती विचित्र करणें तूं एक चिंतामणी ॥
व्हावें चक्रवती धरेवर प्रभो प्रौढप्रतापा सदां ।
विष्णूची प्रतिमा समर्थ असती अन्यत्र नाहीं कदां ॥ १० ॥
यावच्चन्द्ररवी सदैव नृपती कल्याण हो आगळें ।
श्रीअंबावरदें जयासि वरणें प्रौढप्रतापा बळें ॥
जैसा बाळ विधू दिनेंदिन असे वृद्धीस पैं पावला ।
तैसा आक्रम व्हढवीं च प्रभुजी आशी हि माझी तुला ॥ ११ ॥
श्रीरामदासयतिचे प्रभु घे अशीस । कल्याण हें तव सदां नृपता विशेष ॥
जिंकीं प्रतापतवकें धरणी समर्था । कौतूक दाखविं बळें अति जाण पार्था॥१२॥
कर्णादि धर्म नृपती स्तवनासि लावीं । राघूदिल्पास प्रभुजी गरिमा च दावीं ॥
त्या नैषधा गुणनिधे अती तुष्टवावे । भोजादि विक्रमचुडामणि लाजवावे ॥१३॥
शीबी करूनि परता आणि त्या श्रियाळा । तैसें च त्या दशरथा प्रभुजी नृपाळा॥
जन्मेजयासि हृदयीं अति तुष्टवावे । ऐसें चि कौतुक प्रभो जगिं दाखवावें ॥१४॥
जनूकादि जाणा ऋतुपर्णराया । तूं योग्य व्हावें स्तवना कराया ॥
शाहूजी सुनो हें हृदयीं धरावें । कलीमाजि धर्माप्रति वीवरावें ॥ १५ ॥

घेघे आशीस राया अनुदिनिं यतिचे आन नाणीं नृपाळा ।
वैरी दण्डोनि साचे निज हित करणें पृथ्विच्या तू नृपाळा ॥
माझा हा हेतु जाणा पुरवि च चपळे शाहजिसूनो सुकाळीं ।
वेगीं शस्त्रा धरूनी गुणनिधि प्रभुने दण्डिला जेवि वाळी ॥ १६ ॥
तैसें या अवरंजेब अरितें दण्डीं सकोपें क्षणीं ।
वीलबा न लवीं प्रतापतवकें कौतूक दावीं रणीं ॥
शीवाजीसरजा समर्थ असती अन्यत्र नाहीं कदा ।
पृथ्वी जिंकुनि सार्वभौम पद हें संपादिजे एकदां ॥ १७ ॥
नित्यानित्य सनेम जाण वचना पाळीत जावें नृपा ।
तेणें हा जय पावशील अगळा होईल श्रीची कृपा ॥
जैसे धर्मदिलीप [ पूर्वि ] सकाळी न्यायें प्रभू वर्तले ।
तैसें राज्य करूनि दाखविं जना ऐसे च आपेक्षिलें ॥ १८ ॥
जैसा विक्रम वर्तला अनुदिनीं तो भोज या हो क्षितीं ।
तैसा अर्थ करूनियां च बरवा संरक्षिजे रे निती ॥
परदु:खाप्रति जाण होउनि त्वरे सांभाळिजे नीकटीं ।
आनाथास हि नाथ तूं चि प्रभुजी पाळीत जा संकटीं ॥ १९ ॥
आर्यत्वाप्रति आगळा च असती शाहजीसुनो या क्षिती ।
शौर्यत्वें रिपु दण्डिले च निकरें सत्कीर्ति वाखाणिती ॥
शीवाजीसरजा विचित्र करणी तू दाखवीं या जना ।
नाहीं आन विलोकिला च प्रभुजी सिद्धीस ने कामना ॥ २० ॥
शीवाजीसरजा समर्थ असती भक्तोत्तमा भूतळीं ।
शौर्यत्वें अति आगळा विलससी या भोंसल्यांचे कुळीं ॥
अफजल्ला वधुनी [ बहूत ] निकरें येशास संपादिलें
वीजापूरपतीस कौतुक नृपा अत्यंत तां दाविलें ॥ २१ ॥
शास्तांखान [ हि ] दण्डुनी करबळें सत्कीर्ति संपादिली ।
तानाशा सुलतान हीन करूनी त्वां शूरता दाविली ॥
फिरंगी शामल हिंगमार अरबी त्या नायराला क्षणीं ।
इंग्रेजादिक पामरें च समरीं केली प्रतापें सुणीं ॥ २२ ॥
बहलूलादी मरतेभद्दामर त्वरें लाहूर तू जिंकिलें ।
दिल्लीचा भ्रम फेडुनी च निकरें कीर्तीस विस्तारिलें ॥
हुमणाबाद चितोड जाण चमली भीशी च बंगालिया ।
राठोडादिक द्वारका निजबळें शत्रूस नेशी लया ॥ २३ ॥

आयोध्यादिक मारवाड कलपी काश्मीर घेशी बळ ।
अजमेरीं जयपूर जाण नृपती खाणून शत्रूमुळें ॥
विन्दू आणिक बेंगरूळनगराची जोड पैं लाधसी ।
हुम्माऊ मुलतान मानसपुरा वेगें प्रभो जिंकिसी ॥ २४ ॥
हेमाद्री अणि बद्रिकाश्रम रमाशामादिकांतें क्षणीं ।
अट्का पट्टण पावळादि चपळें जाणा प्रभो ये क्षणीं ॥
दण्डीं बावन पाच्छहासि निकरें आशीस माझा तुला ।
श्रीअंबा वर दे जयासि वरणें हा निश्चयो कल्पिला ॥ २५ ॥
फरासी रिपुपामरांसि नृपती वेगें चि न्यावें लया ।
जिंकीं सर्व हि बंदरें च्च प्रभुजी संपादिजे या जया ॥
सत्ता येक करूनि जाण अवघी राज्याधिकारा किजे ।
धर्मातें अति वाढवीं च नितिनें ब्राह्मण्य संरक्षिजे ॥ २६ ॥
वल्पाकीत धरा जिणोनि चपळें धर्मध्वजा लाविजे ।
शाहूजीचा तनयो समर्थ अवनीं कीर्तीस विस्तारिजे ॥
पूर्वीच्या नृपतींहुनी च अगळी लीळा जगीं दाखवीं ॥
धर्मा रक्षणता करूनि प्रभुजी श्रीसांब हीं आठवीं ॥ २७ ॥
जिंकावें करनाटकास नृपती प्रौढप्रतापें क्षणीं ।
पाळेगार हि पामरासि निकरें तू एक चिंतामणी ॥
श्रीअंबावरदें अमोघ चि जया संपादिजे सर्वदा ।
ऐसें श्रीविधिवाक्य जाण चि असे अन्यत्र नाहीं कदा ॥ २८ ॥
बस्वापट्टण बेदनूर निकरें घेऊनि लावीं ध्वजा ।
सोंधे सावनुरा विलम्ब न लवीं पाळीं सनेमें प्रजा ॥
बंकापूर किनूर जाण चि बळें पैं कोपळाला घडीं ।
शिर्टी डंबळ या स्थळांसि चपळें कीजे प्रभू तातडी ॥ २९ ॥
घेइ गुत्तिसि चित्रदुर्ग प्रभु रे घेईं क्षणीं एकदा ।
बाळापूर कनोर जाण पटणा अन्यत्र नाहीं कदा ॥
पिल्गोंडा गति हीं स्थळें शिवनृपा संपादिजे ये क्षणीं ।
दण्डीजे रिपुदुर्जनासि निकरें प्रत्यक्षता पैं रणीं ॥ ३० ॥
जागा उत्तम कुम्भकोण नृपती पुण्यस्थळें रक्षिजे ।
कड्पे अर्कट या प्रतीच प्रभुजी कीर्तीस संपादिजे ॥
चंजी दुर्घट आवघ्यांत विलसे त्याणें च चंजावरा ।
कीजे आक्रम आगळा गुणनिधे लावीं जयाचा तुरा ॥ ३१ ॥

मच्छलीबंदर नीकरें च नृपती शिंगाल्द्वीपान्तरा ।
गोंवे घेउनियां जयांसि वरणें श्रीशीवराजेश्वरा ॥
शाहूजीचा सुत [ तू ] समर्थ [ बरवें ] शूरत्व कामा अती ।
कीर्तीची गरिमा भरोनि उरवीं हे क्षत्रियाचो रिती ॥ ३२ ॥
घ्यावी रे गुजराथ जाण चि बळें पैं सूरतेतें क्षणीं ।
उज्जनीपासुनि माळवा हि अवघा भूपा बळें ये क्षणीं ॥
बालेघाट ही माहुरादिक स्थळें सरक्षणा रे किजे ॥
तैसा बेदर जिकुनी च निकरें सत्कीर्त्ति विस्तारिजे ॥ ३३ ॥
राया विंशति सप्त जाण बरवीं आलूर पैं पाळि या ।
दोर्दण्डे रिपु जिकुनी च निकरें संपादिजे या जया ॥
त्या रे बेदरपामरासि सहसा ठेवूं नको भूवरी ।
ममआज्ञाप्रतिपालनासि करणें हा अर्थ चित्तीं धरीं ॥ ३४ ॥
घेईं जुन्नर खानदेश नृपती गोदातिरा सत्वरीं ।
पुण्यें देश सुपें च जाण प्रभुजी हे हाव चित्तीं धरीं ॥
माणदेशादिकडे [ त्वरीत ] वळतां नीरीक्षणें तें किजे ।
तैसा बेदर जिकुनी च निकरें सत्कीर्त्ति विस्तारिजे ॥ ३५ ॥
घेईं बाघन पैं गिरे तदुपरी त्या वीर गाट्या म्हणीं ।
दण्डीं बेदर पातल्या गुणनिधे प्रत्यक्ष [ शत्रू ] रणीं ॥
जाणा देसक आवघे हि नमतीं निर्नाम कीजे तयां ।
विश्वासा न धरीं कदापि प्रभुजी मानीत जावें भया ॥ ३६ ॥
हेमाद्री अणि मारवाड निकरें त्या बद्रिका हो श्रमा ।
सत्ता येक करोनि राज्य विवरीं मानूं नको रे तमा ॥
तैसें क्षेत्र समर्थ काशिपुर तें संरक्षणें भूपती ।
पुण्या पार नसे अपार गरिमा हे धार्मिकाची निती ॥ ३७ ॥
घेईं फळ्टण जाण तें प्रभुवरा पैं बंगल्याला म्हणीं ।
बाईपासुनि खालसा च करणें तात्काळता ये क्षणीं ॥
आहे उत्तमता कराड नृपती तैसें च कोल्हापुरा ।
पुण्यक्षेत्र पवित्रता गुणनिधे पाळीं च राजेश्वरा ॥ ३८ ॥
बेळ्गांवादिक हीं स्थळें चि नृपती घ्यावीं म्हणा नीकरें ।
सर्वज्ञा गुणसागरा हव धरीं लावीं जयाचे तुरे ॥
मिर्जेपासुनि देश जाण अवघे सत्ताबळें जिंकिजे ।
हुक्केरी अणि रायबाग प्रभुजी दुष्टांसि निर्दाळिजे ॥ ३९ ॥

राया कोंकण सोडवीं च अवघे तेथें अपूर्वे स्थळें ।
कुडाळादिक बारदेश प्रभुजी सक्रोध ते नेबळे ॥
तैसें ते चिपळूण राजपुरिला घेई नृपा सत्वरी ।
कुल्लाबा जयदुर्ग खोकरिप्रती पैं जंजिरा खोकरी ॥ ४० ॥
घे रे अंजनवेलि ते चि नृपती युक्तीबळें एकदां ।
सर्देपासुनि जंजिरे आणि गडा अन्यत्र नाणीं कदा ॥
मुंबईचा प्रभु यत्न ही करुनियां हातातळीं घालिजे ।
दुष्टांतें समरीं च जाण चपळें कौतूक हें दाविजे ॥ ४१ ॥
बारा कुंबळ माहुळे च भुपती तात्काळ तीं घेइजे ।
विश्वासू बरवे च लोक अति ते लक्षीकटीं पाळिजे ॥
जागे उत्तम पाहुनी च प्रभुजी सरक्षणातें करीं ।
किल्ले आणिक जंजिरे च वसवीं हे वासना रे धरीं ॥ ४२ ॥
माहूळें बरवे बहू नृपति तें सन्निद्ध ठेवी सदां ।
दूजे कुंजर प्रौढता च दिसती अन्यत्र नाहीं कदां ॥
त्याचें तूं अनुमोदनें चि प्रभुजी द्यावीं स्थळें आगळीं ।
जीवांचा न तयां तमा गुणनिधी ऐसें च जाणा बळी ॥ ४३ ॥
जैसे ते कृषिरक्षणासि कुळबी माळे प्रभू घालिती ।
तैसे तूं गड बांधणें चि चपळें संरक्षणातें क्षितीं ॥
होवोनी अति सावधान हृदयीं राज्यासि वृद्धी किजे ।
पाया उत्तम हा चि होय नितिचा शोधूनि वीलोकिजे ॥ ४४ ॥
गुह्याचें निज गुह्य एक तुजला हें सांगतों भूपती ।
अपूणाहूनि वरिष्ठ सेवक कदा ठेवूं नको सम्पती ॥
कावेसींत कदापि जाण नृपती येऊं नको सर्वदां ।
येणें घात असे कृपा गुणनिधी प्रौढान्तरीं रे वृथा ॥ ४५ ॥
राज्याचे नितिचा समर्थ तुजला हा बोध केला असे ।
ऐकें रे गुणसागरा नरपते अन्यत्रता पैं नसे ॥
सेना नीकटि ठेविजे प्रभु अती येणें तुला मान्यता ।
शत्रूचें भय हे कदापि न घडे जाणा जगीं प्रौढता ॥ ४६ ॥
आविन्धापति नीकरें च प्रभुजी शिक्षा किजे रे बरी ।
वेगें प्रौढ प्रताप दाखवि जना आभटि चित्तीं धरीं ॥
साधूनी रिपुचीं स्थळें निजबळें हे योग्यता रे असे ।
शत्रूचें भय वागवीं च हृदयीं अन्यत्र तें पैं नसे ॥ ४७ ॥

पूर्वीचे नृपती [ जसे ] तदुपरी राज्याधिकार किजे ।
ऐसे शासन चालवीं च नृपती सत्कीर्ति संपादिजे ॥
धर्माचा न लपो करीं च प्रभुजी वृद्धीस न्यावें सदा ।
नित्यानित्य हि आधिकोत्तर गती आपेक्षिजे सपदा ॥ ४८ ।
पापाचा न करीं च सग्रह नृपा घेणें जयातें असे ।
वेदाज्ञावत् वर्तणें चि प्रभुजी हे योग्यता वीलसे ॥
सारासारविचार जाण करुनी प्रौढ प्रतापा वरीं ।
धैर्यत्वा धरुनी अमोघ चि सदा कारुण्यता वीवरीं ॥ ४९ ।
येशस्वी विजयी समर्थ नृपती तू पौर्णिमेचा विधू ।
आहे श्रीवरदा हि नित्य विदुषी श्रीशंकराची वधू ॥
सौख्यातें अति भोगणें च प्रभुजी यावद्रवीचद्रमा ।
सर्वज्ञा कुलतीलका गुणनिधे प्रत्यक्ष कल्पद्रुमा ॥ ५० ॥
ऐश्वर्यें तुज सर्व जाण नृपती पैं लाधलीं एकदां ।
कीर्तीची गरिमा भरोनि उरवीं अन्यत्र नाणीं कदा ॥
श्रीसांबें तुज मत्पदासि दिधले शाहजीसुनो आगळे ।
कृत्कर्मादि करूनि दाखवीं प्रभो धार्मीकतेचे बळें ॥ ५१ ॥
राया अष्ट दिशा जिणोनि अवघ्या लावीं जयाचा तुरा ।
ऐशी आशिस तूजला मम असे हो वन्द्य तूं श्रीवरा ॥
भक्तीभाव धरूनि पत्र लिहिले पूजे प्रभो धाडिले ।
वस्त्रें मुक्त मणी च द्रव्य नृपती श्रीस्वामितें अर्पिलें ॥ ५२ ॥
पत्रीं जाणविले नृपा मजप्रती सिंहासनीं रूढलों ।
कर्णीं ऐकुनिया प्रभो हृदयि मी सतोष पैं पावलों ॥
राया चक्रवती समर्थ अगळा धार्मीक सिंधू दुजा ।
पूर्वीं तू नवधा सुभक्ति धरुनी केली हराची पुजा ॥ ५३ ॥
त्याचें हे फळ पावलास नृपती आगाध तूझी लिळा ।
धर्मा रक्षणता करूनि प्रभु रे संरक्षणें भूतळा ॥
क्षोतीन्द्रा शिव भोंसल्या तुज प्रती हें मागणे हो असे ।
वेदाज्ञावत राज्यराम करणें सत्कीर्ति येणें वसे ॥ ५४ ॥
पून्हा तूं भुपती नवीन दुसऱ्या सृष्टीप्रती निर्मिले ।
गागाभट्ट अणूनियां च निकटी क्षत्रत्व सपादिलें ॥
सांगोपांगाविधीं सुकर्म अवघें वृद्धीस नेवोनियां ।
केला यज्ञ समर्थ जाण नृपती आपेक्षिलें या जया ॥ ५५ ॥

वेदाज्ञावत् निश्चयासि अणुनी साहित्य संपादना ।
गागाभट्ट समर्थ जाण असता केली प्रभो स्थापना ॥
दूजा व्यास हि वाल्मिकी च ऋषि हा सज्ञानता आगळी ।
काशीवास करोनि साधन अती या ब्राह्मणाचे कुळीं ॥ ५६ ॥
विद्यासूर्य समर्थ यास भुतळीं नाहीं कदापी दुजा ।
गागाभट्ट कृपानिधीस स्मरणे प्रत्यक्षता श्रीअजा ॥
सामर्थ्यें सदया करोनि नृपती क्षत्रत्व संपादिलें ।
केलें चक्रवर्ती निरूपम प्रभो कीर्तीस संपादिलें ॥ ५७ ॥
क्षीतीन्द्रा शिव भोंसल्या गुणनिधे धन्यत्वता लाधली ।
पुण्या पार नसे च जाण प्रभु रे सत्कीर्ति संपादिली ॥
जाणा भूतळि या नवीन शक हा वीराजतो सर्वदा ।
श्रीअंबावरदें रिपूसि वधुनी आपेक्षिली संपदा ॥ ५८ ॥
राया एक विचार सार करणें सदृढ नेमें सदा ।
आहे राजनिती तदूपरि प्रभो सांभाळिजे महत्पदा ॥
धैर्यत्वा धरूनी च सत्व अपुलें सरक्षणातें करीं ।
सुत्रामासनावरी रूढुनियां धार्मीकता वीवरीं ॥ ५९ ॥
तूझे सूकृत आगळे म्हणुनिया सिंहासनीं रूढला ।
होवोनी जनईश्वरू नृपति तू कीर्तिध्वजू लाविला ॥
शाहूजीचा तनयो समर्थ गरिमा लोकत्रयीं फांकली ।
धन्यत्वा अति पावलास प्रभुजी लीळा जगीं दाविली ॥ ६० ॥
मन्त्री लेखक बुद्धिमन्त अगळे धार्मीक ज्यां वासना ।
तैसे नित्य समागमें च वसवीं अन्यत्र नाणीं मना ॥
कपटी पामर पातकी अकुळिचे त्यागूनि देईं झणी ।
राज्याचे अभिवृद्धिते च करणें ते रक्षिजे जे गुणी ॥ ६१ ॥
दीवायामिनि सावधान नृपती आखंडता आसणें ।
आमित्राप्रति लक्षुनी च प्रभुजी आणी तयांतें उणें ॥
राया पूर्ण हि चाळकांपरि सदा पैं चाळणा रे करीं ।
शाहूणे धूर्त चतूर हेर बरवे ते धाड देशांतरी ॥ ६२ ॥
आमित्रांप्रति रोखूनी च असणें बुद्धीबळें सर्वदा ।
विश्वासा न धरीं कदापि प्रभुजी अन्यत्र नाणीं कदा ॥
ठेवूनी च लया अगण्य प्रभुजी राज्यास सरक्षिजे ।
जातीवन्त विरांस प्रेम करूनी अध्यक्षता रे दिजे ॥ ६३ ॥

जाणा कर्बुर येवनासि नृपतीं ठायीं सदा ठेविजे ।
नित्यानित्य हि देश घेउनि बळें राज्यासि सरक्षिजे ॥
हे बुद्धी करुनी सकोट गड पैं पाहे सदा भूपती ।
बांके पर्वत देखुनी हि चपळें निर्भी स्थळें नीगुती ॥ ६४
जळदुर्गी अति दुर्घटां चि प्रभुजी पैं नेटक्या निर्मिजे ।
दिवसें दीवस भूपती सबळता राज्याभिवृद्धि किजे ॥
सेनानायक धाडुनी च निकरें मर्दी त्वरें येवना ।
तैसे ते नृप माडलीक अवघे जिंकोनि घ्यावे धना ॥ ६५॥
अपणांहूनि वरिष्ठता च असल्या सख्यत्व त्यां लाविजे ।
युक्तीचे बळ लावुनी च चपळें निर्नाम त्यांतें किजे ॥
गुह्यागुह्य कदापि जाण इतरां सांगू नको भूपती ।
प्राणाचा जरि मित्रभाव असल्या हे राजचिन्हाकृती ॥ ६६ ॥
दोर्दंडे भिंम हा प्रताप करिं त्या कर्कोटका तुल्यता ।
साधावें प्रभु राज्य जाण सबळें येणें असे योग्यता ॥
नाना यत्न करोनियां रिपुजना पायातळीं घालिजे ।
येशाचीं भुवनें भरोनि उरवीं सत्कीर्ति संपादिजे ॥ ६७ ॥
जिंकोनी अवरंगजेब नृपती घेई च नागालया ।
ऐसा हा अभिमान पूर्ण धरणें संपादिजे या जया ॥
फेडीं भार धरेवरील अवघा धर्मासि सरक्षिजे ।
श्रीसूरा नरकिन्नरांसि भुधरां आचोजता दाविजे ॥ ६८ ॥
आचार्यो गुरुआश्रितासि प्रभु रे शास्त्रार्थ वीचारिजे ।
नित्यानित्य विवर्णता च करुनी सम्प्रियता कल्पिजे ॥
निगमाज्ञा अभिवंदुनी च मुकुटीं वर्ते सदा भूपती ।
अन्यायां वतु दडिजे गुणनिधी ही धार्मिकाची निती ॥ ६९ ॥
श्रेष्ठापासुन अतराय घडल्या कीजे क्षमा आगळी ।
धर्मन्यायविवर्णता च करणें सत्कीर्ति हे भूतळीं ॥
अष्टौ जाण प्रधान बुद्धि-उदधी सन्मानिजे सर्वदां ।
एकामेक हि ऐक्यरूप करणें बीभक्ति नाहीं कदां ॥ ७० ॥
मन्त्रीयांत कदापि जाण न पडे भिन्नत्वता अन्तरीं ।
ऐशा त्या दरजांत रक्षण किजे हा अर्थ चित्ती धरीं ॥
भूपा सावधता असोनि बरवी आलस्य नाणीं मना ।
भ्रांती त्यागुनियां जनीत विषया हे कल्पिजे साधना ॥ ७१ ॥

ठेवीं लेखक चित्रगुप्त दुसरे गुह्यार्थ पैं लेखना ।
विश्वासू चतुरज्ञ सावध. अती अन्यत्र नाणीं मना ॥
जाणा हिंसक पातकी नृपसभे आलक्षिजे सर्वदा ।
त्यांचा संग करू नये गुणनिधे हा निश्चयो एकदा ॥ ७२ ॥
वैसे पाकसुनिष्पतीस प्रभुजी सात्वीक हो ठेविजे ।
चातुर्यी अति आगळे गुणनिधे त्यांच्या च हातीं किजे ॥
तेव्हां भोजन भूपती च करणें हा धर्म तूं चालवीं
ऐशी राजनिती विवीध परिची कीजे सदां पैरवी ॥ ७३ ॥
भांडाराप्रति रक्षणासि बरवे ठेवीं कुळींचे नृपा ।
त्यांचे गूण विलोकुनी निशिदिनीं आमोघ कीजे कृपा ॥
जाणा कूटिल तस्करासि प्रभुजी आलक्षिजे मानसीं ।
वेदाज्ञा प्रभु मानुनी च हृदयीं सज्ञान लावीं कसीं ॥ ७४ ॥
धैर्यत्वा धरूनी च शौर्य मिरवी सरक्षुनीयां जिवा ।
सक्रोधे रिपु दंडिजे निजबळें संपादिजे वैभवा ॥
गुह्याचें [ जरि ] बोलणें च प्रभुजी तें युक्तिमार्गे किजे ।
ध्यानीं आणुनियां सनेम वचनीं गुह्यार्थ पैं ठेविजे ॥ ७५ ॥
कार्याकारण कल्पुनी निजहिता सामोपचारा करीं ।
दांभीकार्थ हि भाव जाणुनि बरा वीचित्रता वीवरीं ॥
मंत्री साधक आसल्यास निकटीं गुह्यार्थ सांगे तथा ।
ज्याची अल्पमती असेल प्रभुजी मानीत जा या भया ॥ ७६ ॥
राहूनी अति सावधान नृपती संरक्षणें आपणा ।
नित्यानित्य हि अंतरीं च करणें अद्भूत पैं चाळणा ॥
ध्यानीं श्रीकुळदेवतेस स्मरणें हे धार्मिकाची निती ।
येणें तूं जय पावशील नृपती अन्यत्र नाहीं गती ॥ ७७ ॥
शाहूजीचा सुत तू पवित्र नृपती धर्माधिपातुल्यता ।
भूभारा हरणासि येउन प्रभो केली अती प्रौढता ॥
धन्यत्वें अति आगळा चि असती जाणा दुजा केसरी ।
विष्णूची प्रतिमा च मानवरूपें सत्कीर्ति दीगांतरी ॥ ७८ ॥
त्याची सार्थकता करूनि सकळां सतुष्टवावें सदा ।
निज धर्माप्रति अंतराय न करीं अन्यत्र नाणीं कदा ॥
षट्शास्त्रे प्रभुजी सनेम वचनें संरक्षिजे अंतरीं ।
येशाचीं सदनें भरूनि उरवीं मानाभिमाना धरीं ॥ ७९ ॥

ऐकें राजनिती समर्थवचनें दांभीकता त्यागिजे ।
गर्वाचा अभिमान अंतरिं कदापी अल्प ही नाणिजे ॥
ध्यानीं श्रीजगदंबिके स्मरुनियां पूजार्चनातें करीं ।
यजूनादीक हि याजनें निशिदिनीं अत्यादरें वीवरीं ॥ ८० ॥
राया शांबरिमांत्रिकास निकटीं ठेवूं नको दुर्मदा ।
येणें घात अमूप [ जाण चि ] असे पैं पावसी आपदा ॥
तैसे जारणमारणादि कुमती कौटिल्य कामा न ये ।
वशाचा क्षय निश्चयें च प्रभुजी वर्ते सदा या भयें ॥ ८१ ॥
राया स्तंभनमोहनादि गुटिका हे हात नव्हे कदा ।
नीचांचा न करीं च संग प्रभुजी आयोग्य येणें पदा ॥
संसर्गी न करीं च जाण नृपतीं केल्या अती आपदा ।
ठेवीं वशज नीकटीं च विदुषां हे योग्यताहे सदा ॥ ८२ ॥
इत्यादी व्यसनां मधें मन कदां गोंवूं नको भूपती ।
भृंगा मद्य अफू कदापि न शिवें जे अज्ञता कूमती ॥
गांभीर्ये अति धैर्यता च धरुनी बोलें सगर्भे सदां ।
राया हांसत हांसता च न वदें सर्वज्ञता रे कदां ॥ ८३ ॥
वारंवार कदापि जाण हृदया पाहों नको भूपती ।
हर्षाचे समयीं प्रमीत वदणें चातुर्यता हे रिती ॥
बोलावीं वचनें सखोल प्रभुजी तीं नेटकीं युक्तिनें ।
सर्वांचीं सुदया करूनि अति हे सरक्षिजे तीं मनें ॥ ८३ ॥
डोंबारी अणि भोरपी हि इतरा नृत्यांगना वेश्मनीं ।
भूपा नाणि तया कदापि नयने दीवा च पैं यामिनी ॥
शास्त्रज्ञादिक पंडिता सुगणकां सन्मानिजे सर्वदा ।
अभ्युत्थान हि अर्पणासि करणें अन्यत्र नाणीं कदा ॥ ८५ ॥
भूपा मिथ्य क्रिया हि सेवकजना देऊं नको सर्वथा ।
तेणें संचित [ पुण्य ] जाण प्रभुजी होऊनि जाई वृथा ॥
बोलावीं वचनें कृपा गुणनिधी तीं सत्य कीजे जनीं ।
क्षणएक क्षणभंगुरत्व न वदें दीवा सदा यामिनी ॥ ८६ ॥
वेश्यासंग हि दासिचा प्रभु कदा दृष्टीपुढें नाणिजे ।
पद्वारा करितां जयो चि न घडे हा अर्थ वीलोकिजे ॥
जैसा विक्रम भोज जाण विवरें तैशा गती वर्ततां ।
तेणें कीर्ति सदैवता च प्रभु रे आहे सदां योग्यता ॥ ८७ ॥

रायां मिथ्य कदापि जाण न वदे आयोग्यता तूजला ।
येणे राज्य लयासि जाइल प्रभो हा निश्चयो वर्तला ॥
गेला बोलुनि हें विधीच विदुषा आसत्य नाहीं कदा ।
कीर्तीची गरिमा भरोनि उरवी सपादिजे म्हत्पदा ॥ ८८ ॥
टेहूळ्या तस्कर नीकटीं हित नसे राज्यासि आयोग्यता ।
धार्मीकाप्रति सांगणें च नलगे सपादिजे आर्यता ॥
भूभारा हरुनी प्रजाप्रति सदा संतोषवृत्ती किजे ।
येणें हा जय पावशील नृपती सत्कीर्ति विस्तारिजे ॥ ८९ ॥
कीजे स्नान पवित्रता च अगळी संध्यादि आनुक्रमें ।
जप्जाप्या गुरुशीं भजून पुढती सत्कर्मता उत्तमें ॥
सांगोपांग सनेम धर्म विषयीं अत्यादरें पैं करीं ।
गोदानादिक हेम अर्पण करीं हे नीतिरीती धरीं ॥ ९० ॥
राहूकेतु हि पर्वणीस नृपती आमोघ दानें किजे ।
ग्रामादीक [ हि ] जाण घोष भुमिका वाजीगजा अर्पिजे ॥
धान्यादी वसने धनासि अगळें दे तुष्टवी ब्राह्मणां ।
तेणें तूं जय पावशील प्रभुजी मेरू किजे ठेंगणा ॥ ९१ ॥
पाहूनी अतिशिष्ट ब्राह्मण तयां अग्राहरें अर्पिजे ।
यावच्चंद्ररवी सनेम वचनें तीं अक्षयी रे किजे ॥
मुद्रांकीत हि राजपत्र करुनी वृद्धीस न्यावें सदा ।
ऐशी राजनिती प्रमूख मिरवे अन्यत्र नाणीं कदा ॥ ९२ ॥
तूझी कीर्ति विलोकुनी च प्रभुजी येतील जे दर्शना ।
त्यांतें आड ही काष्टका न करणें हे कल्पिजे वासना ॥
ज्ञाते पंडित ही गुणीजन तया सन्मानिजे आदरें ॥
वस्त्रादी धन अर्पुनी हि प्रभुजी सतुंष्टवीं निर्भरें ॥ ९३ ॥
गूणागूण विलोकुनी च प्रभुजी वीवर्णता हो करीं ।
ज्ञाते पंडित शिष्ट जाण असतां हें लक्षिजे अंतरीं ॥
येणें हा जय पावशील प्रभुजी सत्यत्व मानीं सदा ।
धर्मन्याय विचारणां च करणें तें अन्य नाणीं कदा ॥ ९४ ॥
सुत्रामाआसनावरी रुढुनियां धार्मीकता वीवरीं ।
आधर्मीरत झालिया गुणनिधे दुष्कीर्ति दीगान्तरीं ॥
व्हावे सावध रे नृपा अनुदिनीं आज्ञा असे तूजला ।
चित्री चित्रगतीं विलोकुनि प्रभो तो धर्मता पावला ॥ ९५ ॥

कर्माकर्मगती निरूपम असे बा भोजनाचे परी ।
भ्रम्भासादिक भावितां पुनरपी माया मदाते वरीं ॥
क्रियमाणादिक संचितास तिसरें प्रारब्धता जाणिजे ।
चित्रीं चित्रगती प्रमोद अगळा त्यागोनियां ते दिजे ॥ ९६ ॥
कर्मीं असुनियां अलिप्त ह्मणती ते हो पशूधार्मिका ।
जाते ही गति वीगती च नकळे तो केवि जाणा निका ॥
ब्रह्मीं ब्रह्मरूपें सगूण सदना वांछा धरीं भूपती ।
अर्भाले भिन कल्पना च करणें अङ्गीकतेची रिती ॥ ९७ ॥
ज्ञाता तूं शिवभूपती म्हणुनियां संतुष्ट झालो मना ।
श्रीरामीं निजभक्तिभाव धरूनी कीजे अती साधना ॥
सप्रेमे रसना ललांत करणें आलोचना त्यागिजे ।
भावें भाविकता स्मरोनि हृदयीं सप्रेमता पाविजे ॥ ९८ ॥
कल्पा मायिकता त्यजोनि स्मरणें दिनिश वृद्धी किजे ।
प्रापच्चीं परमार्थसाधन असे हें अंतरीं भाविजे ॥
जैसा त्या किरिटीस बोध समरीं केला अती नीगुती ।
ब्रह्माकारविराटरूप धरूनी पैं दाखवीली गती ॥ ९९ ॥
तैसा हा तुज भूपती निजमुखें संबोध केला अती ।
पर्यायें परिहारणासि विचरें हे धार्मिकाची निती ॥
धन्यत्वें अति आगळा चि प्रभु तू अन्यत्रता नातुळे ।
चिन्हांकीत हि चिन्मयासि स्मरणें भावीक भक्तावळे ॥ १०० ॥
आत्मा स्थीर नसे चि जाण प्रभुजी मायीक मिथ्या असे ।
प्रापंचीं परमार्थसाधन किजे हे योग्यता वीलसे ॥
अवतारादिक अन्तरीं निजहिता ध्यानस्थ होऊनियां ।
अन्तीं हो मति स्वागतीं च वरिली पावोनि गेले लया ॥ १०१ ॥
भ्रान्तीचे प्रसरें च * * * * अप्रत्यक्ष वीलोकिलें ।
* * * * * *
ज्ञाता साच कदापि जाण न मनीं या वैभवीं कौतुका ।
सारासार विचारणा च घडवी तो एक पाहो निका ॥ १०२ ॥
आर्या तूं शिवभूपती गुणनिधे हें सर्व हि जाणसी ।
ब्रह्माकार निरूपमा चि प्रभुजी अत्यादरें पावसी ॥
शान्ती चित्त समाधिता च वसवी अन्यत्र नाणीं मना ।
सद्गुणाप्रति लाधसी च चपळे हे कल्पिजे भावना ॥ १०३ ॥

केला बोध तुवें स्वरूपरचना आगम्यता दाविली ।
आम्हीं स्वत्व सुखासि योग्य चि अशी विश्रान्ति आपेक्षिली ॥
नीती हा विचरे अशाच गतिनें उन्मादता त्यागुनी ।
झाली नीगममौन्यता च प्रभुजी दीवा सदा यामिनी ॥ १०४ ॥
शिवूभूपा हृदयीं सनेम् वचने सरक्षणें सर्वदा ।
प्रापचीं परमार्थ आर्य चि प्रभो अन्यत्र नाहीं कदा ॥
कीजे राज्य यथाविधी च विदुषा साराश जाणूनियां ।
येणे तूं अति पावशील अवनीं आपेक्षिसी त्या जया ॥ १०५ ॥
जाणा विक्रम नैषधादि जनकें कीर्तीस सपादिलें ।
धर्मे कौतुक श्रीसुरांस सकळां अत्यन्त तें दाविलें ॥
पाहों त्या रघुदीलिपें त्रिभुवनीं शौर्यत्वता दाविली ।
आर्यत्वें स्वहितास ही घडवुनी धार्मीकता रक्षिली ॥ १०६ ॥
तैसा अर्थ करूनियां शिवनृपा धर्मीसि सरक्षणें ।
शूरत्वा अति आगळा च अससी नाहीं कदापी उणें ॥
वेदाज्ञा मुकुटीं च वंदुनि प्रभो लवीं जयाचा तुरा ।
प्रापंचीं परमार्थ साधन किजे हे मान्यता श्रीवरा ॥ १०७ ॥
मन्माया तिमिराप जाण हरणा वांभोजनीची गती ।
लीलानाटक भावितां गुणनिधे धैर्यत्वता हो अती ॥
नीती कल्पुनि कौतुकासि वरणें अन्यत्र नाणीं मना ।
ब्रह्माकारनिरूपमेस प्रभुजी सज्ञान हें साधना ॥ १०८ ॥
राया सावध सावधान हृदयीं व्हावें समर्था सदां ।
राज्याची अभिवृद्धिता च करणे युक्तीबळें एकदां ॥
जैशी विक्रम शालिवाहन शक् हा तैसा किजे भूतळीं ।
धार्मीका अति आगळा चि अससी या भोंसल्यांचे कुळीं ॥ १०९ ॥
ऐकें राजनिती कृपाहिमकरा शाहूजीसुनो भूपती ।
मिथ्या अल्प हि नाणिजे च हृदयीं हे ज्ञातियांची रिती ॥
पूर्वीचे नृपतींवत् च प्रभुजी राज्याधिकारा किजे ।
भावी भाविकता च स्मरोनि हृदयीं ऐश्वर्य सपादिजे ॥ ११० ॥
कीजे स्वप्रियपालना अनुदिनी त्या ही प्रजाचे प्रिती ।
घ्यावें आशिस भूपती हित असे शास्त्रार्थ आहे निती ॥
नेमाहून अधीक द्रव्य सहसा घेऊ नको पैं सदां ।
त्यातें पीडणता कदापि न किजे सद्बुद्धभावें सदां ॥ १११ ॥

आल्या दाद हि घेउनी च निकटीं क्लेशा अती पैं प्रजा ।
तेव्हां सावध होउनी च स्मरणें जाणा प्रभू श्रीअजा ॥
आधर्माभित होउनी च विचरें हें मान्य सर्वांप्रती ।
त्यांचे संकट हारुनी गुणनिधे सत्कीर्तितें वर्णिती ॥ ११२ ॥
राजद्वारिं प्रजांसि आड सहसा कोणी नये तें किजे ।
आज्ञा वेतरपाणि यांसि करणें येवूं प्रजेतें दिजे ॥
आनाथे अलिया कदापि प्रभुजी अत्यादरें दर्शना ।
त्याचा हेतु किजे च पूर्ण नृपती जाणा प्रजापालना ॥ ११३ ॥
त्यांचे क्लेश हरूनियां नृपवरा सौख्याप्रती अर्पिजे ।
नित्यानित्य हि सेवकांस प्रभुजी आज्ञा सकोपें किजे ॥
नेमाहूनि धनासि आधिक [ उणें ] पैं अल्प ही घेतल्या ।
रसना छेदुनि ते क्षणीं च नृपती धाडीं च येमालया ॥ ११४ ॥
ऐसें निष्ठुर सांगणें निशिदिनीं या सेवकांतें नृपा ।
पाळावी सदया प्रजा गुणनिधे अत्यंत कीजे कृपा ॥
जातींवन्त सनेम जाण वचनें देशासि सरक्षितीं ।
ऐसें योजुनि ठेवि सेवक प्रभू अत्यादरें या क्षिती ॥ ११५ ॥
ज्याचे स्वाधिन केलिया च नृपती जाणा प्रजापाळणा ।
अब्दामाजि तयांप्रती च अणुनी कीजे च वीचारणा ॥
ठेवूनी प्रभु हेर गुप्त चपळें सांचोल पैं घेइजे ।
नाहीं जुलूमज्याजती च कवणा हें नित्य वीलोकिजे ॥ ११६ ॥
तकुटादी निमतान खण्ड बरवा पाहोनियां रे पिका ।
त्यातें सोड हि देउनी च प्रभुजी हीशाब कीजे निका ॥
साहूणी मोजणि रास जाण करुनी संतोषवावीं कुळें ।
घटेंक्षावण ज्याजती न करणें घेऊ नको हे बळें ॥ ११७ ॥
दिधूला कौल खरा करूनि प्रभु रे नांभावणी पैं कुळा ।
ऐसा अंमल चालवी च प्रभुजी सपूर्ण पृथ्वीतळा ॥
तेणें हा जय पावशील अगळा कल्याण येणें असे ।
परपीडापरिहारणासि अवनीं अन्यत्र कोणी नसे ॥ ११८ ॥
वाणी ऊदमि चाट यांसि प्रभु रे येवोनियां लावणी ।
त्यांतें नेमुनिया जकात निकि पैं सामाजिका ठेवुनी ॥
कुळमोझा करुनी निकाल करणें हा कौल द्यावा तया ।
ठाणीं पैं पतकीं निगावण मुखें हे आणिजे निश्चया ॥ ११९ ॥

हकदारी च [ असेल ] ज्याजति प्रभो रास्ती दिजे नेमुनी ।
वतनी बाब खरी परंतु गडदू जाणा प्रजालागुनी ॥
मार्गी ठेवुनि हेर गुप्त चपळे घ्यावा हि शोधो निका ।
केल्या ज्याजति नेमिल्याहुनि प्रभो शिक्षा किजे सेवका ॥ १२० ॥
राष्ट्रामाजि स्वधर्म चालवि निका पाळूनियां ब्राह्मणा ।
हवनादी जपजाप्य जें हि करणें नाही तया तूळणा ॥
याजनायाजन वेदध्यायन प्रभो घोषे अती गर्जती ।
अन्नछत्रें जगिं चालवीं च अगळीं हे धार्मिकाची निती ॥ १२१ ॥
राज्यामाजि कदापि तस्कर प्रभो नाहीं असे रे किजे ।
हिंसादीक [ हि ] जार ज्यासि निकरें तात्काळ त्यां दण्डिजे ॥
मातातात अलक्षता च करुनी क्लेशा सदा अर्पिती ।
ऐसे पुत्र कुटील पातकि तयां शिक्षा किजे नीगुती ॥ १२२ ॥
सासूतें छळती स्नुषा अनुदिनीं राष्ट्रीं च आयेप्यता ।
तैसे श्रीगुरुतें च शिष्य प्रभुजी येणें असे न्हीमता ॥
पाहा सेवक स्वामिचें अनहिता जो वर्तला पातकी ।
त्यातें दण्ड किजे विलंब न करीं हे गोष्टि आहे निकी ॥ १२३ ॥
इत्यादी यक बेरिजा करुनियां हीशेब घ्यावा बरा ।
जाणा गांवगना अकार गणुनी कूळारगाचा पुरा ॥
कानू कैद हि मानसीं अणुनियां पाळीं प्रजा नेटकी ।
सत्ता एक तुझी कदापि दुसरी सर्वज्ञता वाउगी ॥ १२४ ॥
हावाला मजमू सुभेस प्रभु रे नेमूनियां देइजे ।
हुजूराती जवळील लोक बरवे म्हालास पैं ठेविजे ॥
वतनाचा हक देशमूख अणि त्या पाटील इत्यादिकां ।
त्यातें आडथळा कदापि न करीं सरक्षिजे लौकिका ॥ १२५ ॥
तैसा खासगिचा मुलूख अवघा जप्ती करावी बरी ।
घेऊनी प्रभु राज्यभाग नितिनें माया प्रजांची धरी ॥
ऐशी राजनिती समर्थ नृपती हे जाणवीली असे ।
वेदाज्ञावतु वर्तणें निशिदिनीं अन्यत्रता हो नसे ॥ १२६ ॥
बाकी राहिलिया कुळास तसदी देऊ नको सर्वथा ।
दीजे सोड उरेल जाण हिशबी नाहीं तया अन्यथा ॥
त्याचें जीवन पाहुनी च प्रभु रे सरक्षणें या रिती ।
रोगें पीक हि गेलियावरि कदा घालूं नको ज्याप्रती ॥ १२७ ॥

रयतेचा जिव पाहुनी च प्रभुरे अर्नापिजे हो तया ।
त्याची रक्षणता करूनि बरवी येणे चि आहें जया ॥
त्याला आउत बैल जाण नसल्या कैसी करावी रिती ।
ग्रामस्थांप्रति सांगुनी च प्रभु रे साभाळिजे हे निती ॥ १२८ ॥
ठेवूनी इजदार लेखक बरा काबील सर्वांमतें ।
रयता रक्षुनि राजभाग अपला जो नेमिला प्राप्तिनें ॥
जाणा देश हि दण्डकावतु प्रभो पाळीं प्रजा सर्वदा ।
त्यातें भूपति अल्पता अनुदिनीं नाहीं कदा आपदा ॥ १२९ ॥
ऐसा अर्थ करूनियां शिवनृपा कीर्तीस विस्तारिजे ।
योग्यायोग्यविचारणा च हृदयीं हें अन्तरीं आणिजे ॥
गुह्याचें निजगुह्य जाण बरवे चित्तात ठेवीं सदा ।
कार्याकारणता निरूपम गती अन्यत्र नाहीं कदा ॥ १३० ॥
हुजरातीं पतकें बहूत रितिने वीलोकुनी ठेविजे ।
जाणा वंशज जातिवन्त बरवे त्यातें च नावाजिजे ॥
जुमलेदार हि बारगीर निकटीं शौर्यत्वकर्मी अती ।
शीलेपोश करूनि नित्य प्रभुजी अत्यादरें रक्षिती ॥ १३१ ॥
वाड्यातिल जीं मुलें चि सगुणें सौंदर्यता आसती ।
बुद्धीमन्त विलोकुनी च प्रभुजी सरक्षणे नीगुती ॥
हाल्लेहाल हवालदार नृपतीं नाईक पैं ठेविजे ।
जातीवन्त घांददाज अगळे ऐसे च वीलोकिजे ॥ १३२ ॥
भूपृष्ठीं तुज [ ला ] सदैव असती जे शस्त्रधारी सदा ।
त्यांचें अन्तर पाहुनी गुणनिधी अर्पी प्रभो सपदा ॥
आतपत्रादिक बालव्यंजन करीं पैं चामरें ढाळती ।
विश्वासू कुळिचे सदैव निकटीं दासत्व सपादिती ॥ १३३ ॥
ऐसें योजुनियां नृपा निशिदिनीं पैं पाळणातें करीं ।
धनधान्या वसनास अर्पुनि तया दारिद्र्यता सहरीं ॥
निकटीं वेतरपाणि यासि प्रभुजी योजोनियां ठेविजे ।
चातुर्ये बहुरूपवन्त विदुषा ऐसे च वीलोकिजे ॥ १३४ ॥
जाणा हो प्रमदागृहीं च प्रभु रे क्लीबाप्रती ठेविजे ।
राया त्या परिचारिकांसि चतुरां सांभाळणा योजिजे ॥
सप्ता ही वरूषांहुनी च पुरूषे जाऊ नये मन्दिरीं ।
ऐशी आट हि साक्षपे च करुनी हे निरय चित्तीं धरीं ॥ १३५ ॥

क्रा०२१ २९६४



क्षेत्रांभीतरिं जाण वृद्ध बरव्या विश्वासुकां ठेविजे ।
त्यांचा शोध क्षणक्षणा च करणें ऐसें च आपेक्षिजे ॥
स्त्रीयांचे परिपाटिलाचि नृपती सन्मानिजे सप्रीती ।
दारा एक रुपें समस्त करुनी आयोग्य नाहीं गती ॥ १३६ ॥
सुमतें नृपती विलाकुनि घटी जावें स्त्रियेमन्दिरीं ।
आधीं मुख्य हि श्रेष्ठ जाण ललना हे योग्यता वीवरीं ॥
स्त्रीयाच्या वचनास लुब्ध प्रभुजी होऊ नये रे कदा ।
वेदाज्ञाप्रतिपाळनासि करणें चातुर्यचन्द्रा सदा ॥ १३७ ॥
राया गुह्य कदापि जाण अपुल सांगों नये पैं स्त्रियां ।
तेणें घात असे कृपा गुणनिधे पावे च ना रे जया ॥
कार्याकारण बोलणें चि घडवीं लालित्य संपादनीं ।
ऐसा हा नितिमार्ग श्रेष्ठ चि प्रभो वर्ते दिवायामिनी ॥ १३८ ॥
सर्वां रे ललनावरी च प्रभुजी कीजे कृपा सारिखी ।

*　*　*　*　*

रोषें वर्तति त्यांस जाण नितिनें संबोधनानें किजे ।
कल्हातें सदनीं कदापि न करीं सर्वांसि सांभाळिजे ॥ १३९ ॥
ममता दाखवुनी स्त्रिया तुजप्रती आनिष्टता सांगती ।
स्त्रीयार्थू न घडे अशी च कळ या नाना मतें भाविती ॥
प्रमदांचे वचनास लपट कदी होऊ नये सर्वथा ।
याचा अर्थ हि शोधुनी च प्रभु रे मानू नको पैं वृथा ॥ १४० ॥
परस्त्रीया अवलोकनासि न करीं शाहूजीसुनो प्राज्ञका ।
येणें येश कदापि जाण न घडे पावेल राया धका ॥
निद्रा अल्प करीं च जागृत असें श्रीरामध्यानीं सदा ।
धर्माची अभिवृद्धिता च करणे अन्यत्र नाणीं कदा ॥ १४१ ॥
नित्यानित्यविचारणा च करणें कीर्तीस विस्तारिजे ।
शत्रूचे बळ पाहुनी च प्रभु रे दुष्टास निर्दाळिजे ॥
गडकोटादिक रक्षणासि नृपती ठेवून सेना अती ।
राज्याचे सदरेवरी गुणनिधे हे मुख्य आहे रिती ॥ १४२ ॥
कपटी आधम शत्रुची निशिदिवा पैं बातमी आणिजे ।
त्याचें साधन युक्तिने च करुनी मर्दोनियां टाकिजे ॥
कत्रीमा रितिनें बहूत ममता लावीं नृपा अन्तरीं ।
विषशस्त्रादिक हा प्रयोग करणें पै यत्न नानापरी ॥ १४३ ॥

अन्तस्थ प्रभु हेर धाडुनि सदा कीजे अती चाळणा ।
राया सावध नित्य जाण असणें संपादिजे सद्गुणा ॥
मन्त्री मुख्य विलोकुनी च प्रभुजी गुह्यार्थ त्यां बोलणें ।
शत्रूचें बळ पैं कदापि न पडे ऐशा परी वर्तणें ॥ १४४ ॥
स्वामित्राप्रति तू अपार ममता दावी प्रभो सर्वदा ।
साधावी बहु.ई रिती गुणनिधे काळू त्वरें एकदा ॥
अपूणाहून वरिष्ठता च असल्या ता दण्डिजे भूपती ।
कीर्तीचा गरिमा भरोनि उरवीं आमोघता ये क्षिती ॥ १४५ ॥
व्यसनीं मानस अल्पता हि प्रभुजी गोवूं नको सर्वथा ।
* * * शिवसागरा च नृपती आर्जीक जाणा वृथा ॥
माया एणिजळावभास चतुरा मिथ्या च आहे जनीं ।
कर्माकर्मगती विचित्र गरिमा कल्पू नको यामिनीं ॥ १४६ ॥
तुझी राजसभा सुधर्म गतिची या भूतळीं वोलसे ।
योग्यायोग्य निरूपमा च दिसती जाणा प्रभो सरसे ॥
मन्त्री लेखक नीकटीं सुशिलता ज्ञाते सदा आसती ।
वस्त्रें दिव्य हि धूवटें चि बरवीं गन्धाक्षता या गती ॥ १४७ ॥
ऐसे राजसभेसि जाण प्रभुजी येतात पैं सर्वदा ।
मर्यादा धरुनी चि वर्तति बहू अन्यत्र नाहीं कदा ॥
आज्ञासेतु तुझा चि एक नृपती श्रेष्ठत्व सर्वाजनीं ।
त्याची पाळणता करुनि असती एकात्मभावें मनीं ॥ १४८ ॥
जोडोनी करनीरजें निशिदिनीं जे वन्दिताती पदा ।
ऐसे सेवक आसती [ बहु बरे ] अन्यत्र नाहीं कदा ॥
वचनामाजि चतूर [ बैसति ] सभे सन्मान [ ते ] पावती ॥
योग्यायोग्य विचारुनी गुणनिधे सुज्ञान ज्यातें अती ॥ १४९ ॥
जाणा कैतवि जे विचार करुनी त्यातें प्रभो दण्डिजे ।
ऐशी राजनिती समर्थ प्रभु रे अन्यज्ञता नाणिजे ॥
वचनीं सादरता रसोत्पति बहू ते योग्य मानूनियां ।
नित्यानित्य तयावरी च नृपती आमोघ कीजे दया ॥ १५० ॥
जाणा लेखक बुद्धिमन्त बरवे चातुर्य ज्ञाते असे ।
मुक्तांकीत सुवाच्य अक्षरकळा पैं कल्पना वोलसे ॥
ऐसा हो गुणि नीकटीं च प्रभुजी सरक्षणे सर्वदा ।
सद्विद्या पात्र करूनियां च नृपती अर्पी अती संपदा ॥ १५१ ॥

अपणाहानि वरिष्ठ सेवक कदा ठेवू नको भूपती ।
येणे राज्य ल्यासि जाइल प्रभो अज्ञानता हे निती ॥
मर्यादा अणि तो गुमान न धरी पापिष्ठ जाणा असे ।
त्याचा त्याग किजे विवेकउदधी अन्यत्रता जो नसे ॥ १५२ ॥
क्षीतींद्रा नृपती सगूण चि विवेका सेवि तूं सर्वदा ।
नित्यानित्य हि चाळणा च करणे दंडीं त्वरे दुर्मदा ॥
पागेचीं पथकें विलोकुनि प्रभो तीं नेटकीं ठेविजे ।
हुजरातींत हि मावळां गणुनियां अत्यादरें रक्षिजे ॥ १५३ ॥
जंजीरे गड कोट दुर्घट स्थळें देऊं नको ईतरां ।
येणे अप्रशिखा घडेल प्रभुजी वीचार कीजे बरा ॥
व्हावे सावध अंतरीं निशिदिवा राज्याभिवृद्धी किजे ।
शत्रू दंडुनि आवघे च नृपती येशासि संपादिजे ॥ १५४ ॥
भृत्यादीसदना कदापि नृपती जाऊं नको रे सदां ।
त्यांचा शोध करूनियां गुणनिधे लावीं तयां आपदा ॥
कार्याकारण बोलणें नृपवरा आभिज्ञता कल्पुनी ।
ऐशी राजानिती समर्थ प्रभुजी वीलोकणें शोधुनी ॥ १५५ ॥
मम्आज्ञा प्रतिपाळणासि करणें शाहूजीसुनो सर्वदा ।
राज्याचा मद अंतरीं न धरितां संपादिजे संपदा ॥
अपूणा रक्षुनि सावधान मतिनें शत्रू विभांडीं रणीं ।
शौर्याचे तवकें प्रताप मिरवीं आमित्र कीजे सुणीं ॥ १५६ ॥
राज्याचे सदरेवरी बळकटी ठेवूनि सेना किजे ।
पाच्छाचा न धरीं तमा च प्रभु हे [ त्यां ] अंतरीं कल्पिजे ॥
तैसे मांडलिकादिकांस नृपती सख्यत्व पैं लाविजे ।
मंत्री धाडुनियां विचार विवरीं पाहूनियां योग्य जे ॥ १५७ ॥
गुह्यागुह्य हि रक्षुनी प्रकटतां दांभीक दावोनियां ।
राज्याचे स्वहितास जाण करणें येणें च आहे जया ॥
हेराची प्रभु बातमी अणवुनी वीवर्णता पैं किजे ।
शत्रूंचे बळ पाहुनी च नृपती तात्काळ त्यां दंडिजे ॥ १५८ ॥
इत्यादी वचनावरी च सहसा जाऊं नको भूपती ।
शोधूनी बरवे रिती च प्रभुजी वर्ते सदा सूमती ॥
माया दावुनिया अरीस निकरें वीलोकिजे सर्वदा ।
विश्वासा न धरीं सनेम वचनें अन्यत्र नाणीं कदा ॥ १५९ ॥

जे कोणी तुजला अमोघ ममता दावूनियां वर्तती ।
हृदयीं कैतवता धरूनि प्रभुजी आघात पैं कल्पिती ॥
त्यांला नष्टपणें च भाव धरिं हें [ त्वां ] गुप्त संरक्षिजे ।
कार्या सादरता असोनि नृपती आनिष्ट वोलोकिजे ॥ १६० ॥
कार्यांकारण राजनीति तुजला सांगीतली भूपती ।
सज्ञानें आति जाण होउनि त्वरें वर्ते सदा भूपती ॥
यामाजी जय आगळा निशिदिनीं चातुर्यचंद्रा सदा ।
कीर्तीचीं सदनें भरूनि उरवीं आमोघता रे सदा ॥ १६१ ॥
पूर्वी जे नृपती विचार बरवा संपादुनी वर्तले ।
वेदाज्ञा प्रतिपाळुनी च प्रभुजी कीर्तिध्वजा लाविले ॥
सांगोपांग विधी निरूपम गमे शाश्वतता भूतळीं ।
केलें राज्य अखीलता [ हि ] विदुषा या क्षत्रियांचे कुळीं ॥ १६२ ॥
शीवाजी नृपती अखंड विलसे जिंकोनियां रे मही ।
शाहूजीचे कुळिं तूं प्रतापनिधि हा आभिज्ञते सर्व ही ॥
स्वकें [ ही ] तुळजा फिरंग धरुनी दंडीं रिपू एकदा ।
घ्यावें बावन पादशासि चपळें अन्यत्र नाणीं कदा ॥ १६३ ॥
सांगोपांग विधी सनेम करुनी राज्याभिवृद्धी किजे ।
जाणावीं शिरिं रामदासवचनें तूं मस्तकीं वंदिजे ॥
नित्यानित्य हि राजनीति विचरें शाहूजीसुनो अंतरीं ।
येणें भूपति आगळा जय असे आखंड दिगांतरीं ॥ १६४ ॥
केली हे अति संरसें सुमतिनें टीका प्रभो नेटकी ।
पदें उत्तम योग्यता च विदुषा अन्यत्र नाहीं च कीं ॥
जाणा श्रीरघुनाथ नायक प्रभू चातुर्य तो चंद्रमा ।
आहे दीन पतीत लेखनकला पाहूनी अती उत्तमा ॥ १६५ ॥
पाहा हो चित्रगुप्त नाम चि मला श्रीस्वामीनें [ दीधलें ]
जाणा शंकर भारती च प्रभुनें आखंड नावाजिलें ॥
शंभूराज धनी समर्थ मजला जीजासतीचा पती
त्याचा दास चतुरता च अगळी वीराजताहे क्षिती ॥ १६६ ॥

---

या प्रमाणें राजनीति राजपुत्र संभाजी राजे यांस महाराजांनीं श्रुत केली. श्रीरामदासस्वामींचें नीतीप्रमाणें वर्तणूक करून पुण्यश्लोक म्हणवून सिंहासनाधीश्वर पूर्व सुकृतें झाले. समर्थांच्या आज्ञेसतु अणुमात्र उल्लंघिला नाहीं.

अनश्वर हा देह जाणा । मिथ्यामाया अवलक्षणा ।
तेथें विचार ज्ञानकि किरणा । स्पर्शों नये सर्वथा ॥ १ ॥
जनित कर्माची गहना गती । त्यातें वैष्णवी मायेची भ्रांती ।
जैशी बुद्बुदसमूहाची उत्पत्ती । कोठें कांहीं दिसेना ॥ २ ॥
अधर्मे वर्तला तरी नर । त्यास कैंचा सुखोपचार ।
तये भ्रांतीतें उत्तर । नरक घोर वाहताती ॥ ३ ॥
करूनि अज्ञानाचा पसार । भ्रांतीमय करिती अनाचार ।
लक्ष्मीमदाचा सागर । पूर्ण पात्रे भरूनियां ॥ ४ ॥
येथें सारासार एक जाणें । सत्य सद्भावें वर्तणें ।
करूनियां जगपाळण । कीर्ती कीजे भूलोकीं ॥ ५ ॥
मनोवृत्तिश्रामण्याचा अर्थ । भ्रमाचा चुकवावा अनर्थ ।
अविचार कर्माचा स्वार्थ । करूं नये पां ॥ ६ ॥
अंतीं मती स्वागती भावितां । देह निमालिया कैंची ममता ।
आपणा आपण आणुनी चित्ता । विदेहित्वें वर्तावें ॥ ७ ॥
ऐसा वदला शिव नरेंद्र । जो शांतिक्षमेचा समुद्र ।
शौर्य कर्मा महारुद्र । सुबुद्धीचा चंद्रमा ॥ ८ ॥

समाप्त.

---

## भामिनीविलासाचें पद्यात्मक भाषांतर.*

### अन्योक्ति विलास–पहिला.

श्रीविघ्नेशमहं प्रणम्य ललितां देवीं गुरुं मातरम् ।
तातं सत्कनकाव्यकल्पनपटून् व्यासादिकान् सत्कवीन् ॥
श्रीबुट्टिल्युपनामदाजिन इय विज्ञापितो भाषया ।
टीकां सज्जनवल्लभां विरचये भामाविलासोपरि ॥ १ ॥

टीका ( शार्दूलविक्रीडित )

वंदोनी गणराज देवि ललिता तैसा गुरू तो पिता ।
माता आणि कवी ही संस्कृत कवित्वालाप आलापिता ॥
व्यासानीं बहु तेवि दाजिबुटिचे विज्ञप्तिनें मी करीं ।
टीका सज्जनवल्लभा बहु बरी भामाविलासावरी ॥ १ ॥

---

* हा ग्रंथ रा० रा० वामन दाजी ओक हल्लीं वास्तव्य संबळपुर यांनीं नागपुरीं असतांना पाठविला.

माधुर्य० ॥ १ ॥

सीमा माधुर्याची जी वाङ्मयरूपअब्धिरंभूता ।
पी तूं केवळ सुखदा वसुधेवरि मम जना सुधाकविता ॥ १ ॥

दिगंते० ॥ २ ॥

दिशा ह्यांचे अंतीं समद गज येती श्रवणते ।
दयेचा ठेवा कीं करिणि लघु आणी हरिण ते ॥
अतां तीक्ष्णाग्रें ह्या नख हरि अनौपम्य चि धरे ।
तयाचें पांडित्या प्रकट जगिं कोणावरि करे ॥ २ ॥

पुरा सरसि० ॥ ३ ॥

जिथें कमळपंक्तिचे रज सुगंध देती वना ।
तिथें विधिसरोवरीं प्रथम जो करी जीवना ॥
मराळ मग मंडुकें करिती ज्यांत आवृत्तितें ।
अरे वदतसे जळीं करिल तो कसा वृत्तितें ॥ ३ ॥

तृष्णालोल० ॥ ४ ॥

तृष्णायुक्त चकोरिं पाहतसतां प्राचीप्रती कैरवें ।
संकोचा त्यजितां धनुष्य मदनें टंकारितां तो रवें ॥
तैशा मानिनि मान टाकितसतां धात्या प्रसंगीं असे ॥
मेघाडंबर काय इंदुविषयीं कार्यास योजीतसे ॥ ४ ॥

अयि दल० ॥ ५ ॥

विकसितकमळा वा ऐक हे कैक नाना ।
अलि तव रस पीती आणि गाती तनाना ॥
परि परिमळ तुझा विस्तरे जो दिशांला ।
पवन कि निरपेक्षी अन्य हा मित्र झाला ॥ ५ ॥

समुपागतवति० ॥ ६ ॥

तव निकट दैवयोगें आला अलि या नको अनादरूं वा ॥
कुटजा ह्या सरसाला कमळाला फार मान्य सुरतरू वा ॥ ६ ॥

तावत्कोकिल० ॥ ७ ॥

वनमध्य वसति धरुनि तुं हे कोकिळ विरस दिवस घालिव हे ॥
तोंवरि जोंवरि अलिकुलकलिताम्रतरू फलाणि कुसुम वहे ॥ ७ ॥

कमलिनि मलिनी० ॥ ८ ॥

कमलिनि अपमानिली बकांहीं । म्हणुनि नको धरूं चित्ति खेद कांहीं ॥
तव रसपरिपाकजाणणारे । जगिं अलि होत बहूत वांछणारे ॥ ८ ॥

**नितरां नीचो० ॥ ९ ॥**

आहे मी अति नीच किं यापरि मनिं खेद धरूं नको कूपा ॥
काय अतिसरसगुणहृदय तूं परगुण घेसि म्हणुनि गणि रूपा ॥ ९ ॥

**येनामंद० ॥ १० ॥**

विकसित सरज सरोजीं दिन बहु ज्या षट्पदें क्रमियले हो ॥
त्यानें कुटजेच्छा ही केली म्हणवूनि दुःख आलें हो ॥ १० ॥

**अयि मलयज० ॥ ११ ॥**

हे चंदन तव महिमा कवणाचे वाणिचा विषय हो हा ॥
कीं फणि वसिती गरळा त्यां ह्या गंधें चि पोषिसी तो हा ॥ ११ ॥

**पाटीर तव० ॥ १२ ॥**

चंदन तव परिपाटी कोण धराया समर्थ आहे बा ॥
कीं जे घासिति तुजला त्यां ही गंधें चि पुष्टि देसी बा ॥ १२ ॥

**नीरक्षिर० ॥ १३ ॥**

जलदुग्धविवेचनिं तूं जरि हंसा अळस लेश धरशील ॥
तरि जगीं कुलव्रताते आतां बा अन्य कोण रक्षील ॥ १३ ॥

**उपरि करवाल० ॥ १४ ॥**

वरि खड्गधार जैसी तैसे अति तीक्ष्ण अहिवरापेक्षां ॥
सर्वोत्कर्षे भासति लोक मनीं मधुर जेंवि ती द्राक्षा ॥ १४ ॥

**स्वच्छंद दलदरविंद० ॥ १५ ॥**

स्वच्छंदें तव मकरंद भक्षणारे । गातील भ्रमर समीप राहणारे ॥
पद्मा बा दिशिदिशि गंध न्यावयाला । वायू हा कुशल न अन्य योग्य याला १५

**याते मय्यचिरात्० ॥ १६ ॥**

झालों मी जरि शुष्क सत्वर महा ग्रीष्माचिये भानुनें ।
तेव्हां पांथसमूह जाइल कुठें संतप्त ऐसे उनें ॥
मानें वास्तव नित्य नित्य तनु ही ज्याची असे रोडकी ।
ते हे मार्गतटाक धन्य जलधी धिग्जन्म जें द्वाड कीं ॥ १६ ॥

**आपेदिरे० ॥ १७ ॥**

आकाशमार्गिं अजि सर्व पतंग गेले ।
ते भृंग आम्र मुकुलावरि बा निमाले ॥
हा हा सरोवर परी अज दीन मीनें ।
जावें कुठे जरि तुझें जळ होय ऊनें ॥ १७ ॥

**मधुपा इव०** ॥ १८ ॥

कमलिनि मधुपापरि तूं वायूविषिं गंधलोभ ठेवुं नको ॥
कीं जनहर्षार्थे चि हा पूजित ही याचकत्व घेत टिको ॥ १८ ॥

**गुंजति मंजु०** ॥ १९ ॥

मधुकर मंजुळ गुंजा करित असे याविषीं नको धरूं गे ॥
मालति मौन किं दाते सुरतरु यालागिं वाहती शिरिं गे ॥ १९ ॥

**यैस्त्वं गुणगण०** ॥ २० ॥

चंदन ज्या सर्पीही तूं गुणवंत हि असेव्य साधूंला ॥
केलासि त्या समस्तां रक्षिसि महिमा तुझा न वानीला ॥ २० ॥

**गाहितमखिलं०** ॥ २१ ॥

फिरला सकळवनांतीं भोंवतिं पादप समस्त पाहीला ॥
आम्रतरो मधुपें जगिं तव सादृश्य किं तुलाच मानीला ॥ २१ ॥

**अपनीतपरिमलांतर०** ॥ २२ ॥

तुच्छ इतर परिमळ ज्या पुढें चि त्या कल्पवृक्षकुसुमीं तूं ॥
ठेवुनि पद अलि इच्छिसि पुष्पांतरिं जावयास धन्य किं तूं ॥ २२ ॥

**तटिनि चिराय०** ॥ २३ ॥

विंध्योत्पन्ने पूते हे नदि चिरकाळ हा विचार करीं ॥
शुष्केस हि तुज रथ्याजलग्रहण योग्य काय या च परी ॥ २३ ॥

**पत्रफल०** ॥ २४ ॥

फलपत्रपुष्पशोभारहित अणी कंटकें सदा युक्त ॥
ऐसा बर्बुर तूं मग तुजवरि आम्ही किमर्थ आसक्त ॥ २४ ॥

**एकस्त्वं गहने०** ॥ २५ ॥

हे कोकिल एकट तूं नको करूं या वनीं मधुर वाणी ॥
समजातीं जाणुनि तुज न मारिती अदय काक हे जाणीं ॥ २५ ॥

**तरुकुल०** ॥ २६ ॥

हिमनग हिमसमुदायीं कोण असा गुण किं धरिसि ज्या योगें ॥
कीं जो तरुशोभाहर जगिं जगदुःखद किं दोष हा भोगे ॥ २६ ॥

**कलभ तवांतिक०** ॥ २७ ॥

हे गजबाळ निकट तव आला अलि या नको अनादरूं बा ॥
मदजळसुंदरकरिवर याला धरितात आदरें शिरिं बा ॥ २७ ॥

**अमरतरु०** ॥ २८ ॥

सुरतरुकुसुमसुगंधग्रहणें परिपूर्ण काम ज्याचा हो ॥
त्या मधुकरास कुसुमांतरसेवा फार होय निंदा हो ॥ २८ ॥

पृष्टाः खलु० ॥ २९ ॥

पुसलें पिकांस बहुसें मधुपें ते वृंद पाहिले सकळे ॥
आम्रतरो तुजलागीं उपमा कोठें जगीं च त्या न कळे ॥ २९ ॥

तोयैरल्पै० ॥ ३० ॥

माळया थोडें जळ तरुसि ला घालुनी उष्ण काळीं ।
पुष्टी त्वां जी सदय दिधली ती च पर्जन्यकाळीं ॥
नानाधारा त्यजुनि बहुशा भोंवतीं यावरी हो ।
देण्यालागीं घन हि जगीं कां योग्यता तो धरी हो ॥ ३० ॥

आरामाधिपतिः० ॥ ३१ ॥

माळी मूर्ख जळें विहीन पृथिवी दाहा दिशां ही मधें ।
मोठ्या वाहुटळी प्रचंड रविचा संताप जैसा विधे ॥
आहे मारवदेशिं चंपतरुचा संहारहेतु असा ।
मेघा तूं विधिनें सुधावितरणीं पाठीवलासी कसा ॥ ३१ ॥

न यत्र स्थेमानं० ॥ ३२ ॥

जिथें हस्ती दानोदकमलिनभृंगांकिततनू ।
भयानें भ्रांताक्षी स्थिर न दिसती ज्या शिनुशिनू ॥
तयाचे त्या द्वारीं अमरपद तो सिंह भजतो ।
ध्वनी भालू हीचा हर हर जिथें मुक्त लसतो ॥ ३२ ॥

दधानः प्रेमाणं० ॥ ३३ ॥

तरूंलागीं माळी वितरत समा प्रीति सुकुळीं ।
दया हा ठेवीना पुरति वनिं या बाळबकुळीं ॥
परी हा त्या काळीं विकच कुसुमांचे परिमळें ।
दिगंता विस्तारी भ्रमर रव झंकार विमळें ॥ ३३ ॥

मूलं स्थूलमतीव० ॥ ३४ ॥

मूळ स्थूल बलाढ्य पुष्ट बहुशा शाखा तुझ्या रे तरो ।
वस्ती दुर्ग गिरीवरी मग कसी ही भीति धारा धरो ॥
आहे एक परंतु चित्तिं मम ती चिंता गळ्या कांहिंसी ।
कीं दावानळजाळ सन्निध असे या तू कसा साहसी ॥ ३४ ॥

ग्रीष्मे भीष्मतरैः० ॥ ३५ ॥

सूर्ये ग्रीष्मऋतूंत भीष्म किरणें संतापिला जो असे ।
तो हा चातक संकटें दिन बहू ध्यानें तुझे नेतसे ॥
दैवें तूं दिसतां अतां जरि घना गारा तयाचे शिरीं ।

बारे वर्षसि कीं विचार चि असा कोणास सांगूं तरी ॥ ३५ ॥

**दवदहन० ॥ ३६ ॥**

वनदहनविशाळज्वाळयोगें जळाले ।
गलितदळ किं वल्ली म्लान जे वृक्ष झाले ॥
त्यजुनि जळधरा तूं या समस्तां गिरीचे
शिरिं वितरिसि पाणी गर्व हा फार जाचे ॥ ३६ ॥

**शृण्वन्पुरः० ॥ ३७ ॥**

ऐकोनियां कठुर गर्जन अंबुदाचें ।
रे पांथ विव्हळु नको मनिं तूं अशाचें ॥
जो विश्वदुःखहरणीं निज जीवनाला ।
देतो न जाणसि गड्या अशिया घनाला ॥ ३७ ॥

**सौरभ्यं भुवनत्रये० ॥ ३८ ॥**

सौरभ्यें भुवनत्रयीं विदित तूं लोकाधिका शीतता ।
कीर्ती ही दश ज्या दिशा रमणि बा त्यां अंगणीं संगता ॥
हे श्रीखंड परंतु ऐक किं तुझे सर्वां गुणां भक्षिते ।
कोठाऱ्यांत वसे विषा बकितसे जी सर्पपंक्ती किं ते ॥ ३८ ॥

**नापेक्षा न च० ॥ ३९ ॥**

प्रत्युपकारापेक्षा ज्यास नसे चतुरता न परिचय ही ॥
न स्नेह तो तथापी उन्नत घन वारि तापसंचय ही ॥ ३९ ॥

**समुत्पत्तिः० ॥ ४० ॥**

तुझी उत्पत्ती या विमळ जळिं वस्ती हरि करीं ।
सुगंधें देवांला प्रिय किं तुज लक्ष्मी गृह करी ॥
असे हे दूजे ही गुण रुचिर पद्मा तुज बहू ।
द्विजोत्तंसीं होती रति जरि तरी उन्नति सहूं ॥ ४० ॥

**साकं ग्रावगणै० ॥ ४१ ॥**

पाषाणासम लोळती मणि तुझे तीरीं रवींबिंबसे ।
मत्स्यांहीं सम विष्णु ही तव जळीं निद्रा सुखें घेतसे ॥
ऐसा हा अविवेक पाहुनि तसें गांभीर्य दुग्धांबुधे ।
निंदुं कीं स्तवुं मी तुला वद बरें या सर्व लोकांमध्यें ॥ ४१ ॥

**किं खलु रत्नैः० ॥ ४२ ॥**

कां हे रत्न कशाला मेघा परि काय ही तनू तुजला ॥
हे अर्णवा तृषितजनमुखिं तव सलिल हि नये हि लाज मला ॥ ४२ ॥

**इयत्यां संपत्तावपि० ॥ ४३ ॥**

जळाची संपत्ती असि हि असतां या समयिं गा ।
तृषार्त्तांची तृष्णा जरि न हरिसी तूं तरि च गा ॥
रवि ग्रीष्मामध्यें त्यजिल मग विगोळ बहुसे ।
तटाका ते काळीं कृश मग कसा वारिसि तितें ॥ ४३ ॥

**अयि रोषमुरीकरोषि० ॥ ४४ ॥**

जरि तू न करिसी च रोष तुला । तरि आम्हि वदुं कांहिं येक बोला ।
जलधे तव [ किं ]अर्थि मेघ ही हा । जल देत धरितोसि त्यासि तूं हा । ॥ ४४ ॥

**न वारयामो० ॥ ४५ ॥**

वर्षानदी जन्हुसुताप्रवाहीं । तूं मीळतां पर्तविणार नाहीं ॥
आम्ही परतू तुज सागतों हें । तीचे पुढें योग्य तरंग नोहे ॥ ४५ ॥

**पौलोमीपतिकानने० ॥ ४६ ॥**

इंद्राचे वनि राहणार सुरवृक्षांचीं फुलें हुंगुनी ॥
ज्या भृंगे त्यजिले किं ते च सुर ही अम्रातिथी रंगुनी ॥
ते दैवें तुज संन्निधी मधुअतां अकांक्षितां त्याविषीं ।
पद्मा तूं धरितोसि लोभ तरि बा बोलू अम्ही कीं विषीं ॥ ४६ ॥

**भुक्ता मृणालपटली० ॥ ४७ ॥**

हे राजहंसा वद ज्या किं तुवां तटाकीं ।
तें भोगिलें उसपिलें जळ पद्म बाकी ॥
जय गुर मग तस बहु सावल र ।
व्हावें तया अज कसें किं कृतोपकारें ॥ ४७ ॥

**प्रारंभे कुसुमाकरस्य० ॥ ४८ ॥**

येतां ची ऋतु तो वसंत बरवा आम्राचिये मंजिरी ।
पुंजीं मंजुळ गुंजिता करुनि जो त्या उत्सवातें करी ॥
तो तूं त्यासि दशा अशी विधिवशा आली कृशा आज रे ।
या वेळे भ्रमरा तया त्यजसि ना तूझेविना नीच्च रे ॥ ४८ ॥

**एणीगणेषु० ॥ ४९ ॥**

हे कृष्णसार हरिणीगणिं गर्वयुक्त । लावोनि नेत्र वनिं खेळसि कामसक्त ॥
हस्तींद्रगंडगतमुक्तमयी हरीची । क्रीडास्थळाचि मनिं जाण हि सींव साची ॥ ४९ ॥

**जठरज्वलन० ॥ ५० ॥**

यद्यापि जठराग्नीनें दग्ध अशा हरिपुढें मृग हि येती ॥
तदपि हि करिचे अरिनें हरिणाली कैसि वधियेती ॥ ५०

**येन भिन्नकरिकुंभ० ॥ ५१ ॥**

ज्यांणि भेदुनि करींद्रकुंभ ही । मौक्तिकांहिं परिपूजिली मही ॥
त्यांनिं आज मृगसंनिधी कसा । सांगिजे स्वपुरुषार्थ नीचसा ॥ ५१ ॥

**स्थितिं नो रे दध्याः ॥ ५२ ॥**

सख्या हस्ती राया निबिडवनभूमीवरि इथे ।
मदांधाक्षा तूं बा स्थिति करूं नको जा निज पथें ॥
इथे हस्तीभ्रांतीकरुनि नखविस्फाटन गिरी ।
दरीमध्यें कीं हा सुखि निजत असे उद्भट हरी ॥ ५२ ॥

**गिरिगव्हरेषु० ॥ ५३ ॥**

गिरिगव्हरांत अतिगर्वगुंफिला । गजराजबाळ तुं कशास शीरला ॥
जरि बा उठे हरिशिशु स्तना पिता । मग होय तो करिणि मात्र ठेविता ॥५३॥

**निसर्गादारामे० ॥ ५४ ॥**

स्वभावें वृक्षाला उपवनपती रोंवित असे ।
तये आरामीं तो बकुळ हि कुठें लावित असे ॥
असें जाणे कोण प्रचुर निज गंधे दश दिशा ।
भरे हा कोणांतीं बसुनि जग आणी निज वशा ॥ ५४ ॥

**यस्मिन् खेलति ॥ ५५ ॥**

ज्याचे खेळात अब्धी अति चपळ तरंगें बहू क्षोभतांना ।
दिग्दंती मंथनाद्रिभ्रमणविषयिच्या भ्रांतिनें टाकितीना ॥
जो कीं उत्तुंग मत्स्याप्रति कवळितसे जो स्वखेळाविशीं हा ।
टाके अब्धीस खेळो कवण मनुज उत्संगिं मत्स्येश तो हा ॥ ५५ ॥

**लूनं मतंगजैः० ॥ ५६ ॥**

कांहीं मोडियलें गजें अणि जनें जे शीतसंहारिणी ।
बाकी ग्रीष्मजभानुभीष्मकिरणें जे शुष्क निष्कारणी ॥
त्या या काननिं ही लवंगलतिका दावाग्निदग्धा दिसे ।
जी या कोंणि असोनि गंधवि दिशा हें दुःख मोठें असे ॥ ५६ ॥

**स्वर्लोकस्य शिखामणिः० ॥ ५७ ॥**

स्वर्गीचा तुं शिरोमणी सुतरूसस्थान तैसे रिती ।
पुण्याचा परिणाम इंद्रशचिचें हें सत्य जे मानिती ॥
ते हे प्रार्थिति साधु दैव किं अह्मा हें सर्व काळीं दिसो ।
तूझे पासुनि दूर नंदनवना हा खांडवाग्नी असो ॥ ५७ ॥

**स्वस्वव्यापृति० ॥ ५८ ॥**

जेव्हां लोक समस्त आपअपुले कार्याविषीं गुतती ।
तेव्हां चंचुपुटें चि पंजरकपाटालागि मी त्या रिती ॥
तोडोनी वनि जाइन स्वमनिं या कामामृता पीतसे ।
रावा ते क्षणि पंजरांत गजशुंडेसा फणी जातसे ॥ ५८ ॥

**रे चांचल्यजुषो० ॥ ५९ ॥**

ऐका चंचळ हो अरे हरिण हो अद्रीवरी राहतां ।
इच्छा कां धरितां महानदिमध्यें स्नानाविषीं पोहतां ॥
येथें मत्त गजेंद्र जात असता तो भोवऱ्यानें बुडे ।
पाषाणापरितो रसातळिं जडे पाणी असें वावडें ॥ ५९ ॥

**पिब स्तन्यं० ॥ ६० ॥**

मृगेंद्राचे बाळा स्तन पिं वुं कशाला कठुर हे ।
दिशा यांचे अतीं नयन गजबुद्धी करुनि हें ॥
धरीसी नोहे हा गज कि नवनीलांबुद दिसे ।
तिहीं लोकाच्या जो हरुनि परितापा ध्वनतसे ॥ ६० ॥

**धीरध्वनिभिरलं० ॥ ६१ ॥**

मेघा धीरध्वनि हा पुरे पुरे कीं मदीय जठरीं हा ॥
मासिक गर्भ गजाचे भ्रातीनें उच्छलांग मारी हा ॥ ६१ ॥

**वेतंडगंडकंडुती० ॥ ६२ ॥**

गजकुंभखाज विझवी जो हरिणांचा नृपाळ या सिंहें ॥
हरिणांचे समुदायापुढें पराक्रम कसे वदावे हे ॥ ६२ ॥

**नीराक्षिर्मलतो० ॥ ६३ ॥**

उत्पत्ती विमळांबुपासुनि तुझी कांतामुखस्पर्धिनी ॥
कांती कृष्णकरीं निवास कि सुरांत सौख्यसवर्धिनी ॥
सौरभ्याचि परंपरा आणि कवीवाणीस्वराचा हि तू ।
ठेवा हें कमळा किती विनवुं की संतुष्ट या भृंगि तू ॥ ६३ ॥

**लीलामुकुलितनयनं० ॥ ६४ ॥**

गजनायक लीलेनें लावुनि डोळे कशास निजतोसी ॥
परिणाम दुष्ट सिंहें वाढतसे वैर ऐक वाणि असी ॥ ६४ ॥

**विदुषां वदनाद्वाचं० ॥ ६५ ॥**

पंडितजनवदनांतुनि अविचारीं वाक्य कधिं हि न च निघती ॥
गजदंता परि ते जरि निघतीं तरि परततां न जगिं दिसती ॥ ६५॥

**औदार्यं भुवनत्रये० ॥ ६६ ॥**

त्रैलोक्यांत उदारता विदित कीं उत्पत्ति अब्धीमधें ।
वस्ती नंदनकाननीं सुरभिता गिर्वाणचित्तीं लधे ॥
ऐसे दातृवरा गळ्या सुरतरो तूझे गुण प्रौढ हे ।
होती अर्थिजनार्थ अर्पणविधी एक्या विचारें कि हे ॥ ६६ ॥

**एको विश्वसतां० ॥ ६७ ॥**

विश्वासू जन मारितो मि मजसा लोकीं नसे निर्दयी ।
व्याधा यापरि चिंतुनी निज मनीं तापू नको तू लयीं ॥
क्षेत्रीं तीर्थि नृपालयीं खळ बहू त्वत्तुल्य कीं राहती ।
साधूचे रिपु गूढचित्त बहुसे पापास जे साहती ॥ ६७ ॥

**विश्वास्य मधुरवचनैः० ॥ ६८ ॥**

कश्यपतनये पृथ्वी माते सुविचार नष्ट तुझा ही ।
मृदु वचनें सुजनाला वंचिति जे नर वहासि त्यांला ही ॥ ६८ ॥

**अन्या जगद्धितमयी० ॥ ६९ ॥**

अन्या च लोकहितकारकवृत्ति साची । अन्या च कोणि रचना वचनावलीची ॥
लोकोत्तरा च कृति आकाति दुःखितेष्टा । त्या सर्वपंडितचरित्रि न वाणि चेष्टा ॥६९॥

**आपद्गतः खलु० ॥ ७० ॥**

आपत्तिकाळि हि महामनचक्रवर्ती । विस्तारितो जगिं अपूर्व उदार वृत्ती ॥
कृष्णागुरू जरि पडे दहनीं तरी ही । लोकोत्तरा परिमळा परि विस्तरे ही ॥७०॥

**विश्वाभिरामगुणगौरव० ॥ ७१ ॥**

लोकाभिरामगुणगौरवगुंफिल्याचे । ते रोष ही रमविती सकळां सुधींचे ॥
लोकेष्ट गंधपरिपरितकेशराचीं । अत्यंत रम्य कटुता [हि] असे तयाची ॥७१॥

**लीलालुंठितशारदापुर० ॥ ७२ ॥**

जे लीलें लुटती सरस्वतिपुरांतद्रव्यभाराप्रती ॥
त्यांच्या सन्निध थोडसे पदाति जे ते गर्व कीं दाविती ॥
तेव्हां आजउद्यां सुखें च फणिचे पक्षीशिशू मस्तकीं ॥
देती पाय गजांचिये मृग तसे सिंहाचिये स्थान कीं ॥ ७२ ॥

**गीर्भिर्गुरूणां० ॥ ७३ ॥**

पित्रादिकांचे कटुरोक्तियोगें । जो गांजिला तो च महत्व भोगे ॥
न लागली चाकि जयां मणींतें । न राहताती नृपमस्तकीं ते ॥ ७३ ॥

**वहति विषधरान्० ॥ ७४ ॥**

करि जवळि पटीर या अहीला । धरि शिरिं दीपक तो हि काजळाला ॥

प्रतिदिनिं विधु हा कलंक सेवी । पिशुनजनाप्रति भूपसंघ ठेवी ॥ ७४ ॥

**सत्पुरुषः खलु हिताचरणैः०** ॥ ७५ ॥

अप्रार्थिला करि हिताचरणें जनाला। आनंद सज्जन बहूत चि दे मनाला॥
हा तर्क कीं निज करें विधु कैरवाला। उल्लासवी विनविलें कवणें तयाला ॥ ७५ ॥

**कृतमपि०** ॥ ७६ ॥

केल्या ही उपकारा दुग्धापरि पिउनि अनयप्रयत्न करी ॥
उपकारकारकातें माराया भुजगसा खळ स्वकरीं ॥ ७६ ॥

**पांडित्यं०** ॥ ७७ ॥

पांडित्या त्यजुनी जयाविषयिं म्यां बंदित्व संपादिलें ।
चित्तें ही अति दुर्लभश्रमद जे त्या श्रमांनि ज्या ठेविलें ॥
स्थानारूढ असोनि हो पिशुनि त्या पूर्वोप्रकारा किती ।
काढीलो अपकार संप्रति तरी कीं सांगु कोणाप्रती ॥ ७७ ॥

**परार्थव्यासंगात्०** ॥ ७८ ॥

परार्थी व्यापारें त्यजित निज अर्थाप्रति बरा ।
अभेदें ऐक्यातें वहत गुणिलोकांविषिं खरा ॥
स्वभावानें ज्याचें स्फुरत मन मोठेपण बरें ।
असा सर्वोत्कर्षे पुरुष विलसे दक्ष जगिं रे ॥ ७८ ॥

**वंशभवो०** ॥ ७९ ॥

उत्पन्नसुवंशीं ही गुणवंत हि पुरुष पूज्य सत्संगीं ॥
न हि तूंबीफळविरहित वीणादंडा महत्व ये रंगीं ॥ ७९ ॥

**अमितगुणोपि पदार्थो०** ॥ ८० ॥

अगणितगुण हि पदार्थ कि एके दोषें चि निंदिला जातो ॥
सकळरसायनयोग्य हि उग्रें गंधें चि लशुन जैसा तो ॥ ८० ॥

**उपकारमेव तनुते०** ॥ ८१ ॥

आपद्गत ही सज्जन उपकार चि सर्वदा करीत असे ॥
दृष्टांत याविषयिं बा मृत किंवा मूर्छित पारदारव्यरसें ॥ ८१ ॥

**वनांते खेलंती०** ॥ ८२ ॥

वनक्रीडाकाळीं शशशिशु विलोकूनि चकिता ।
लपे जी भर्त्याचे हृदिं अभय घे मैथिलसुता ॥
अहो ती ही सीता दशवदनहातां गवसली ।
मध्ये क्रव्यादाचे सुकठिन अवस्थेंत असली ॥ ८२ ॥

पुरो गीर्वाणानां० ॥ ८३ ॥

पुढें देवांहींचे निज भुज भले ठोकुनि वरा ।
पुरारीचे पूढें बसुन करि जो सन्मुख शरा ॥
अहो त्या कामाचें सुरतरुणिनेत्रार्चित असें ।
वपू तें या काळीं नयनदहनें दग्ध चि दिसे ॥ ८३ ॥

युक्तं सभायां० ॥ ८४ ॥

सभेंत हें योग्य चि मर्कटांचे । शाखा तरूंच्या मृदु पीठ साचें ॥
वाणी बरी चीत्कृति कीं नखांहीं । आतिथ्य दतादिनिकर्तनें ही ॥ ८४ ॥

किं तीर्थं० ॥ ८५ ॥

मित्रा सांग तुं तीर्थ कोण सखया तूं ऐक कीं विष्णुचे ।
सेवा वा चरणांचि रत्न अमला बुद्धी किं भेदादिचे ॥
नाशी सिद्ध जि ऐकतां स्मृति हि ती कीं मित्रतत्वज्ञता ।
देते जी उपकारता किं रिपु ही दुर्वासना संचिता ॥ ८५ ॥

निष्णातोपि वेदांते० ॥ ८६ ॥

व्युत्पन्न हि वेदांतीं दुर्जन साधुत्व कधिं हि सेवीना ॥
चिरकाळ जलधिमध्यें मग्न हि मैनाक मृदु किं नांवहि ना ॥ ८६ ।

नैर्गुण्यमेव० ॥ ८७ ॥

नैर्गुण्य चि धन्य दिसे सगुणत्वावरि असो किं धिःकार ॥
वनि तरु इतर किं राहाति तोडिति चन्दनतरूसि जन फार ॥ ८७ ॥

परोपसर्पणानंत० ॥ ८८ ॥

परसेवनाविषयींच्या अनंतचिंतास्वरूपदहनाचे ॥
ज्वालाशतें अचुंबित मन ज्यांचें ते चि तरु भले वाचे ॥ ८८ ॥

शून्येऽपि च गुणवत्ता० ॥ ८९ ॥

गुणहीनाप्रति निजगुणजालें सगुणत्व देत सज्जन तो ॥
झांके छिद्र विराजे कर्तानि कीटापरी किं गुणधन तो ॥ ८९ ॥

खलः सज्जनकार्पास० ॥ ९० ॥

दुर्जन सज्जनरूयिचे रक्षणिं अग्नी च अन्य लोकांचे ॥
दुःखाग्निशमनिं वायू उलटें हें स्तवन वाच निज वाचे ॥ ९० ॥

परगुह्यगुप्तिनिपुणं० ॥ ९१ ॥

परगुह्य झांकितोहे गुणमय सकळांनिं इच्छिजेत असे ॥
ऐशा नव वस्त्रापरि सुजना खळ आखुसे डसाति बहुसे ॥ ९१ ॥

कारुण्य० ॥ ९२ ॥

करुणाकुसुमीं गगन चि शांतीशित त्या विषीं दहन जाणा ॥
कीर्तिसुगंधा लशुन चि खळ सुजनालागिं दुःखदायि गणा ॥ ९२ ॥

धत्ते भरं० ॥ ९३ ॥

घे भार कुसुमपत्रफळावळीचा । मर्मव्यथा वहत शीतजरोग साचा ॥
जो देह देत इतरांस सुखाविषीं हो । ह्या दातृवर्यतरुला अम्हि वंदितों हो ॥९३॥

हालाहलं० ॥ ९४ ॥

पीण्याविषीं विष किं इच्छित कौतुकानें ।
चुबावया दहन इच्छित आदरानें ॥
आलिंगनाविषिं इच्छित तो फणीतें ।
स्वाधीन जो करूं ह्मणे जगिं दुर्जनातें ॥ ९४ ॥

दीनानामिह० ॥ ९५ ॥

दीनांचें त्यजुनि समग्र धान्य साचें । औदार्या प्रकटविसी शिरीं गिरीचे ॥
पावोनी विपुल महत्व हीं तुझा हा । मेघा श्रीमदअविवेक जाणिला हा ॥ ९५ ॥

गिरयो गुरवः० ॥ ९६ ॥

गिरि मोठे त्यांपेक्षां पृथ्वी ब्रह्मांड तीहुनी मोठें ॥
प्रलयसमयीं हि निश्चळ जे मोठे ते तयांहुनी मोठे ॥ ९६ ॥

व्योमनिवासं कुरुते० ॥ ९७ ॥

गगनिं स्थिति तो करितो वायूवरि रम्य चित्र तो लिहितो ॥
रेषा रचितो जळिं तो दुर्जनिं जो मनुज आदरा करितो ॥ ९७ ।

हारं वक्षसि० ॥ ९८ ॥

कोणे एके मूर्खें मर्कटकंठांत हार घातीला ॥
तो त्यास चाटुनीयां हुंगुनि त्यावरि सुखेंचि हो बसला ॥ ९८ ॥

मलिनेपि रागपूर्णां० ॥ ९९ ॥

मलिन हि तू असतां जी स्नेह करी हसतसे वदत असतां ॥
चंचळ असतां सरसे भृंगा त्या पद्मिनीस कां त्यजतां ॥ ९९ ॥

स्वार्थं धनानि० ॥ १०० ॥

स्वार्थी धनास धनिकाजवळोनि पावे ।
ये काळिमा मुखिं असें न विचित्र व्हावें ॥
लोकार्थ ही जलनिधींतुनि मेघ पाणी ।
घेतो समस्त हि दिसे युत काळिम्यांनीं ॥ १०० ॥

**जनकः सानुविशेषो० ॥ १०१ ॥**

पर्वत पिता तुझा बा जाती काष्ठाचि संग सर्पाचा ॥
हे मलयज तू स्वगुणें तथापि झालासि इष्ट लोकांचा ॥ १०१ ॥

**कस्मै हंत फलाय० ॥ १०२ ॥**

हे साधो फळ चिंतुनी कवण तूं विद्यार्जनीं सज्ज बा ।
स्वात्मालंकरणीं जरी तरि हिता वाणी बरी ऐक बा ॥
जे वस्तू हृदयास हारिति बरें शोभा भरे ते च या ।
पुष्टाला कळिला किं वाढविति गा हें ठेविं चित्तालया ॥ १०२ ॥

**धूमायिता दश दिशो० ॥ १०३ ॥**

धुमापरी दश दिशा दिसती तसे हे ।
अग्नीपरी कमळ वायु हि ज्ञाळती हे ॥
तूझेविना अशि अधोगति कोकिळाला ।
आम्रावरी करिति भृंग किं गुंजिताला ॥ १०३ ॥

**भिन्ना महागिरिशिलाः० ॥ १०४ ॥**

हस्तींचिये श्रमभरें स्वनखें गिरींच्या ।
त्या फोडिल्या निज बळें चि शिळा भरींच्या ॥
त्या केसरीस अज दैव फिरे म्हणोनी ।
कोठें हि मांस लघु लेश न ये घडोनी ॥ १०४ ॥

**गर्जितमाकर्ण्य० ॥ १०५ ॥**

थोडें गर्जित ऐकुनि निज जननीअंकस्थ सिंहबाळक हा ॥
उड्डाणार्थ निजांगा आकर्षुनि लीन होय रात्रि जहा ॥ १०५ ॥

**किमहं वदामि० ॥ १०६ ॥**

वदुं काय मी तव मतास खला । गुणपक्षपात बहुसा तुजला ॥
गुणवंत सर्व सुजनाविषयीं । तुजलागिं विस्मृति मसे हृदयीं ॥ १०६ ॥

**रे खल० ॥ १०७ ॥**

रे खळ तव चरितातें विचारुनी पंडितांत सांगिन मी ॥
किंवा तुझे कथेनें पुरे किं जी दग्ध म्हणुनि न वदिन मी ॥ १०७ ॥

**आनंद० ॥ १०८ ॥**

हर्षमृगाचा वणवा विनयतरूचा प्रमत्त हस्ती हो ॥
विज्ञानदीपकाचा वायू हा खळ समागमप्रिय हो ॥ १०८ ॥

**खलास्तु कुशलाः० ॥ १०९ ॥**

सज्जनहितविघ्नाविषिं दुर्जन अति कुशळ असति या लोकीं ॥

अपराध हि नसतां फणि हरिति प्राणास हेतु अवलोकीं ॥ १०९ ॥

वदने० ॥ ११० ॥

वदनीं पिशुनाचिये विधीनें । रचिली जीभमिषें भुजांगे मानें ॥
जरि हें न तरी कसे अमंत्री । असि ये जे अवलीढ मृत्युतंत्री ॥११०॥

कृतमहो० ॥ १११ ॥

केलें तुवां महोन्नत कर्म अमळ कीर्ति मेळविलि बहुसी ॥
यावज्जीव सखे तुज देवू आशीर्वचाप्रती स्वरसीं ॥ १११ ॥

अविरत० ॥ ११२ ॥

सदुपकारक सज्जनवाक्य हें । अमृतसें अति गोड किंचित हें ॥
जलधिसें अति धीर कि कीर्ति ही । शारदपूर्णकळेपरि शीत ही ॥११२॥

एत्य कुसुमाकरः० ॥ ११३ ॥

येवुनि वसंत माझे चिर निद्रित वाणिलागिं उठवील ॥
ऐसें पिक चिंतितसे तंव हृदयीं व्याधबाणफळ रुतल ॥ ११३ ॥

निर्गुणः० ॥ ११४ ॥

करि वस्त्रालंकारें आडंबर तरि न मूर्ख शोभतसे ॥
बहिरंगपुष्पलक्ष्मीशोभित शाल्मलि जशी न भासतसे ॥ ११४ ॥

पंकैर्विना० ॥ ११५ ॥

शोभे पंकावांचुनि तटाक अणि दुर्जनाविना सुसभा ॥
कटु वर्णाविण काव्य हि विषयाविण साधुचित्त घे शोभा ॥ ११५ ॥

तत्वं किमपि० ॥ ११६ ॥

कोणी विरळ पुरुष जागिं कविकवितेचें रहस्य जाणे हो ॥
मकरंदाचा मार्मिक कोण असे षट्पदाविना प्रिय हो ॥ ११६ ॥

सरजस्कां० ॥ ११७ ॥

सरजा पाण्डुरवर्णा कंटकसमुदाययुक्त केतकि ते ॥
भ्रमरा सेविसि तुज कांशी लाज न ये परि अयोग्य मज दिसतें ॥११७॥

यथा तानं० ॥ ११८ ॥

तानाविण राग जसा मानाविण ही नृपेंद्र जैसा कीं ॥
दानाविण गज जैसा ज्ञानाविण तो यतींद्र तैसा कीं ॥ ११८ ॥

संतः स्वतः० ॥ ११९ ॥

लोकांचे उत्तम गुण होती प्रकट स्वयें न इतरानें ॥
परिमळ कस्तूरीचा न प्रगटे जगिं कधीं हि शपथानें ॥ ११९ ॥

अयि वेत० ॥ १२० ॥

अग सखि धरू नको गर्व कस्तूरि चित्तीं ।
सकळपरिमळाला मान्य गंधें स्वपीती ॥
गिरिदरित असे जो लीन अत्यंत दीन ।
करिसि निज पित्या त्या सौरभें प्राणहीन ॥ १२० ॥

दूरिकरोति० ॥ १२१ ॥

नाशी कुबुद्धि अणि धूत असे मनाला ।
जो पीतसे बहुत जन्मज पातकाला ॥
प्राण्याविषीं बहुत जो करूणा धरीतो ।
सत्संग काय न सुमगळ विस्तरीतो ॥ १२१ ॥

अनवरत० ॥ १२२ ॥

निशिदिनिं परोपकारीं व्यग्र असे चित्त ज्या किं सुजनाचें ॥
बाहिर कटु तद्वचन हि भासति भेषज समान सुमनाचें ॥ १२२ ॥

श्यागुंजन्० ॥ १२३ ॥

ऐकोनी मधुकरपुंजमंजुगीता । तें प्रेम श्रवणसुखें चि फार होतां ॥
भूमीसी निज शिर लावुनी तरूचे । कांतारीं दिसति कुटुंब या रीतीचे ॥१२३॥

मृतस्य० ॥ १२४ ॥

मेल्यास लाभाविषयीं किं वाञ्छा । दानाविषीं त्या कृपणास इच्छा ॥
रुची स्वकांतीं कुलटेस शांती । सर्पास सृष्टींत खळा न नीती ॥ १२४ ॥

उत्तमानां० ॥ १२५ ॥

उत्तमकुळस्त्रियांचा नाहीं विश्वास मग कुठे दुजिचा ॥
चद्रप्रिया हि कमलिनि रमति भ्रमराहिशीं किं रस मनिचा ॥ १२५॥

अयाचित० ॥ १२६ ॥

प्रार्थित सुखा न दे जो अप्रार्थित देह रे समस्त हि जो ॥
लोकांचा तो हा विधि उच्छृंखल खल समान लोकिं सजो ॥ १२६ ॥

दोर्दंडद्वय० ॥ १२७ ॥

दोर्दंडद्वय कुंडलाकृति लसे कोदंड चडध्वनी ।
तेणें खंडिसि चडमडळरिपू तूला रणीं पाहुनी ॥
राया गांडिवमुक्त कांड वलय ज्वालावली तांडवी ।
जाळे खांडवमध्य पांडवि कृती का न स्मृती मांडवी ॥ १२७ ॥

खंडितनेत्रा० ॥ १२८ ॥

खंडितललनालोचनपरंपरारंजनास पंडित जे ॥

ते सुखवोत दिगंता चंडकराचे मयूख मंडित जे ॥ १२८ ॥

श्रीबुट्टीकुलालंकारगुणिजनावतंसश्रीमन्मित्रवर्यदाजीबाबुट्टयुद्योतित रुक्मिणीवल्लभसूरिसुनु कविगंगाधरकृतायां भामिनीविलाससमश्लोकी महाराष्ट्रभाषाव्याख्यायां सज्जनवल्लभासमाख्यामन्योक्तिविलासो नाम प्रथमो विलासः ॥

**प्रथम विलास समाप्त.**

---

## अन्योक्तिविलासावर टिपण.

॥ श्रीमन्महागणपतये नमः ॥

येथें असें जाणावें कीं एकेकविलासांत जे जे श्लोक आहेत त्या त्या श्लोकांचे निर्माणाची सगती व अलंकार व व्यंग्य व कठिणपदाचा पर्याय हे यथाक्रमें मी माझे मित्रमंडळीस कळवावे म्हणून टिपणनामें परिभाषा लिहितों, त्यांत काव्यप्रकाशकाराची मती अशी आहे कीं, दोषरहित गुणयुक्त अलंकारयुक्त जे शब्दार्थ तें काव्य म्हणावें. त्यांत दोष म्हणजे क्लिष्ट कल्पनादिक, गुण म्हणजे माधुर्यादिक, अलकार म्हणजे उपमादिक [असतात,] आणि काव्य तीन रीतींचें कीं, उत्तम मध्यम, अधम. उत्तम म्हणजे मुख्य अर्थापेक्षां अधिक चमत्कार करणार व्यंग्य ज्यांत असतें तें. मध्यम म्हणजे व्यग्य आणि मुख्य अर्थ जेथें समान असतात तें. अधम म्हणजे शब्द विचित्र आणि अर्थ विचित्र परतु व्यग्य नाहीं तें. व्यग म्हणजे ध्वनित ज्याला तात्पर्यार्थ भावार्थ म्हणतात तें. प्रायः सर्व काव्यात रस व त्यांचे विभाव अनुभाव सात्विक व्यभिचारी, कोठें शृंगारवर्णनांत हाव व्यंग असतात, आणि कोठें अलंकार ही व्यग असतात. तें काव्यातून कसे निघतात तें सर्व मित्रजनांस या भामिनीविलास काव्यांत प्रगट करितों. त्यांत अन्योक्ति विलासाचे चमत्कार शृगार विलासापेक्षा थोडे आणि शृगार विलासोपजीव हा म्हणून पहिल्यानें सांगतों, त्यांत सकेत श्लोकांचे अंक १।२। सं०=सगती, अ०=अलंकार, व्यं०=व्यंग । प०=पर्याय । असे जाणावे ॥ इति सूचना ॥

श्लोक. । १ । स० । शृंगारादिविलासोपजीवत्वें करून प्रारंभास योग्य अन्योक्तिविलासांत निर्विघ्नकाव्यसमाप्त्यर्थ ऐश्वर्यसंपन्न मृगेंद्रस्वरूप वस्तुनिर्देशात्मक मगल सुचवीत होत्साता ग्रथकार अप्रस्तुत मृगेंद्र वर्णनमिषेंकरून आपला गर्वविशेष दाखवितो. म्हणजे येथें अप्रस्तुतमृगेंद्रवृत्तांत कथनेंकरून तत्सदृश प्रस्तुतपंडितेंद्रवृत्तालाची प्रतीति होते म्हणोन सारूप्यनिबंधनात्मक अप्रस्तुतप्रशंसालंकार होतो. अप्रस्तुत म्हणजे अप्रकरणपठित, प्रस्तुत म्हणजे प्रकरणपठित, अन्योक्तिशब्दाचा ही अर्थ हाच होतो कीं, अन्य म्हणजे प्रस्तुताहून भिन्न जो अप्रस्तुत त्याची उक्ति म्हणजे कथन अशा अर्थावरून सर्वअन्योक्तिविलासातर्गत अन्योक्तिश्लोकांत अप्र-

स्तुतप्रशंसालंकार मुख्य आहे, म्हणून तो प्रतिश्लोकीं लिहिणार नाहीं. जेथें दुसरा येईल तो मात्र लिहूं. व्यं० । शत्रु सर्वथा कोणीच उरला नाहीं । प० । करिणी=हस्तिनी, तीक्ष्णाग्रैं=तिखट ज्यास अग्रभाग.

श्लो० ३ सं० । कोणी एक गृहस्थ सार्वभौमाजवळ राहत होता तो दैववशें नष्टाधिकार होऊन अयोग्य मांडलिका जवळ राहत होतसाता त्याचे सेवेस आपुलें अयोग्यत्व हंसवृत्तांतें सांगतो. व्यं० जेथें नीच फार तेथें मोठ्यांचें राहणें फार अप्रयत्य; प० जीवना=जळा; विधिसरोवरीं=मानससरोवरीं; जीवना=वांचण्यातें. मराळ=हंस, मंडुकें=बेडकें, आवृत्तीतें=भ्रमणातें, वृत्तीतें=व्यवहारातें. श्लो० ४ कोणी नवीन राज्याभिषिक्तास काढण्याविषयीं उद्युक्तखळास खद्योतवृत्तांतेंकरून म्हणतो कीं, तुझ्यानें त्याचें कांहींच होत नाहीं. प० कैरवें=कमळें, रवें=शब्दें. श्लो० ५ सं० कोणी अरविंदवृत्तांतेंकरून राजास म्हणतो कीं, तुझे जवळचे जवळच राहतील परंतु मी थोडे दानानें संतुष्ट होऊन तुझें यश लोकांत गाईन. अ० वर्णनीय वस्तु प्राप्त असतां ही अन्य म्हणाल म्हणून भेदकातिशयोक्ति । व्यं० । बहु ग्राहकाहीं कांहीं न करणें आणि अल्पग्राहकानें प्रशंसा फार करणें हें आश्चर्य । प० कैक=कितीएक, अलि=भ्रमर । श्लो० ६ सं० कोणी एका सार्वभौमाजवळ राहणारा पंडित मांडलिकाजवळ दैववशें आला असतां तो त्याचा अपमान करूं लागला, म्हणून कुटजमधुकरवर्णनमिषेंकरून कोणी म्हणतो कीं, याचा अपमान करूं नको । व्यं० । तस्मात् मोठ्यांना मानीत जा, हा मधुकर याचा अपमान करणें योग्य नव्हे. प० कुटजा=हे कुड्याच्या वृक्षा । श्लो० ७ सं० कोणी विपत्तिग्रस्त मोठ्या पुरुषास कोकिळआम्रवर्णनमिषेंकरून कोणी आश्वासन देतो. व्यं० आम्रवृक्षाचा उदयकाळ आला असता यथेच्छ मकरंदलाभ तुला होईल । प० अलिकुलकलित=भ्रमरसमुदायानें व्याप्त । श्लो० ८ सं० मूर्खजनांनीं अपमानीत तरुणीतें कमलिनीभ्रमरवर्णनमिषेंकरून कोणी आश्वासन करितो. व्यं० एवंच तादृशभ्रमरास पाहून संतोषमान. प० परिपाक=पूर्णता । श्लोक ९ सं० नीच कुळीं आपुलें जन्म म्हणून दुःखितातें कोणी म्हणतो । व्यं० सर्व तुझें पाणी पितो आणि गुण घेतो हृदय तुझें सरस म्हणून तूं स्तुत्य आहेस. श्लो० १० सं० कोणी सार्वभौमाचें प्रधानत्वाचा अनुभव घेऊन कालांतरीं नीच सेवा फार निंद्य । श्लोक ११ सं० दुष्ट दुर्वचन बोलत असतां ही आपण मधुर बोलणारा जो सज्जन त्याची कोणी स्तुति करतो । प० फणी=सर्प । श्लोक १२ सं० दुःखदात्यास ही आनंदप्रद सज्जनास कोणी स्तवितो. प० परिपाठी=अनुक्रम । श्लो० १३ सं० सदसद्विचार न करणाऱ्यास कोणी म्हणतो । व्यं० कोणी ज्ञ पालन करणार नाहीं । प० विवेचनीं=वेगळालें करण्याविषयीं । श्लोक १४

सं० कोणी सज्जनातें स्तवितो. अ० येथें सज्जनस्वभाववर्णनास्तव स्वभावोक्ति; व्यं० सरसहृदयपणा। प० महिवरापेक्षा=सर्व राजापेक्षा, जेंवि=जैसी, ती=सर्वानुभूता; द्राक्षा =द्राक्षाफळ. श्लोक १५ स० आपुले जवळच्याही संस्तुत राजास कवि म्हणतो कीं, मी तुझें यश दिगंतरास नेईन. व्य० त्वद्गंधवाहकभ्रमरापेक्षां निरपेक्षी वायु तुझी कीर्ति दिगंतरास नेतो. तस्मात् यावर प्रसन्न हो. विकसितकमळा वा या श्लोकापेक्षां कांहीं एक बोलण्याची रीत वेगळी म्हणून पौनरुक्त्यदोष नाहीं. श्लोक १६ स० कोणी परसतापहारक सज्जन स्तवनपूर्वक दुर्जनातें वंदितो. अ०सूर्यकिरणें शुष्क असतां ही शुष्कलेस पांथदुःखानुसंधानजनितचिंतासमूह हेतु सांगितल्य आणि ह्मणून किं काय इत्यादि पदें दिसत नाहींत म्हणून गम्या हेतूत्प्रेक्षा. श्लोक १७ सं० परलोकास जाण्याविषयीं उद्युक्त राजातें पाहून केवळ त्याचाच अश्रित कोणी कवि त्यास म्हणतो। व्य० एकाश्रितास अन्यगति नाहीं। प० पतंग=पक्षी मुकुल=कळी, मीनें=मत्स्यानें. श्लोक १८ सं० परार्थ जो याचना करितो त्याविषयीं कृपणत्व नसावें याविषयीं कोणी सांगतो. व्यं० शास्त्रात स्वार्थयाचकास दान करणें उक्त आहे मग परमार्थयाचकास करणें काय सांगावें. श्लोक १९ सं० सार्वभौमें वंदितचरण अशा पंडिताचा अपमान करणारी [जी] मांडलिकाची राणी तिला कोणी म्हणतो. व्यं० मोठ्यास मान्य [ जो तो ] सर्वांस ही वंद्य आहे. प० गुंजा=शब्द. श्लोक २० स० दुष्ट वारंवार पीडा देत असतांही त्यास आश्रय देणाऱ्या साधूस कोणी स्तवितो. प० असेव्य=सेवेस अयोग्य. श्लोक २१ सं० कोणी उत्तम राजास अनुपमत्व सांगतो. अ० तुझे सारखा अन्य कोणी नाहीं तर तूंच आहेस या अर्थे अन्वयालंकार। प० पादप=वृक्ष. श्लोक २२ सं० मोठ्याचा आश्रय करून नीचाचे आश्रयास इच्छिणाऱ्या पुरुषास कोणी म्हणतो. श्लोक २३ स० कोणी पवित्र पुरुष नीचापासून द्रव्य घेतो त्यास कोणी हें अयोग्य ह्मणून सांगतो। व्य० येथें आपणास हितोपदेशकत्व. प० पूतें= हे पवित्रे; रथ्या=सडकेवरील रथादिकांची चाकोरी। श्लोक २४ सं० क्रूर जनांनीं सेवित आपल्यास राजा मानणार परंतु राजचिन्हें ज्याला नाहींत त्यास कोणी म्हणतो कीं तुझे येथें आम्हाला येण्याचें प्रयोजन नाहीं। प० बर्बुर=हे बाभुळीचे वृक्ष. श्लोक २५ सं० मूर्खसभेंत आत्मगुणकथनास उद्युक्त पंडितास कोणी ह्मणतो. व्य० त्वां मधुर ध्वनि करतांच हे कावळे तुला कोकिळ जाणून अवश्य मारतील। प० समजाती=एक जात. श्लोक २६ सं० परपरितापक दोष धरणाऱ्या राजातें कोणी म्हणतो कीं दोष टाकून दे. श्लोक २७ सं० कोणी सार्वभौमपंडितास हे मांडलिका तू चांगला मान असें ह्मणतो. व्यं० मोठ्यानें मानिलेल्यास त्वां ही मानच द्यावा कधीं न अपमान करावा. प० निकटीं=जवळी;

करिवर=गजेंद्र। श्लोक २८ सं० महाराजाश्रयानें पुष्कळ धन मिळवून ही नीचाश्रयास इच्छिणाऱ्या पुरुषास कोणी निंदितो. प० सुरतरु=कल्पवृक्ष. श्लोक २९ सं० कोणी राजातें स्तवितो।व्यं० मधुपपदें तारतम्याभिज्ञत्व। कोकिल प्रश्नें ही तेंच। अ० उपमा कोठेंच नाहीं येथें अन्वयालंकार; प० पिकास=कोकिळास। वृंद=समुदाय. श्लोक ३० सं० विपत्तिकाळीं थोडाही उपकार संपत्तिकाळचे मोठ्या उपकारापेक्षां ही श्रेष्ठ असें कोणी सांगतो. श्लोक ३१ सं० प्रारब्ध अनुकूळ असतां प्रतिकूल करणें सर्व ही लयास पावतें हें कोणी सांगतो. अलं० चपकास संहार कारण असतां संहार नाहीं म्हणोन विशेषोक्ति। प० वधे=मारतो; मारवदेशीं=मारवाडदेशांत; सुधावितरणीं=अमृतवृष्टीविषयीं. श्लोक. ३२ सं० परलोकास गेलेल्या सार्वभौमाचे स्थानीं नीच शत्रु बसले हें पाहून कोणी शोक करितो. प० दानोदक=मदजळ, मिलित=प्राप्त, भृंग=भ्रमर, अंकित=चिन्हित, तनु=शरीर, मुक्त=मोतीं, लसतां=शोभत असतां. श्लोक ३३ सं० गुरुनें अवहेळलेला परंतु आपले सुबुद्धीनें विद्या संपादून जनास आनंद देणाऱ्या शिष्याचें वर्तमान कोणी सांगतो। अ० पुष्पफलोद्रेकाचें कारण दया तें नसतां पुष्पफलोद्रेकरूप कार्य झालें म्हणून विभावनालंकार। प० सुकुळी=कुलीन, विकच=विकसित. श्लोक ३४ सं० मंत्रीप्रभृतींचे सहायें आपणास निर्भय मानणाऱ्या राजातें कोणी म्हणतो कीं हा तुझे जवळ च खळ आहे याचें भय मान। अ० भीतीचें कारण नसतां ही एक वणवा मात्र माझे मनास चिंता उत्पन्न करितो या निषेधाक्षेपें भयदर्शनास्तव विभावना. श्लोक ३५ सं० बहुत दिवस कोणी एक याचक कोणा एके गृहस्थाचे धनलाभाविषयीं आशा करीत असतां तो येऊन त्यानें सर्वथा विपत्ति दिली म्हणून तो याचक त्याला म्हणतो. अ० इष्ट प्राप्तीची इच्छा असतां अनिष्टप्राप्ति झाली म्हणून विषम। प० भीष्म=भयंकर ॥ श्लो० ३६ ॥ स० दरिद्र्यास टाकून धनवंतास धन देणाऱ्या राजातें कोणी म्हणतो। अ०। अग्नीनें दग्ध [अशा] तरुस टाकून गिरिशिखरावर वृष्टि झाली म्हणून असंगति। व्यं०। हा गर्व टाकून विचारवंत हो। प०। दवदहन। वणवा। वितरिसी। वर्षसी। जावें। गाजे॥ श्लोक ३७॥ सं० निरंतर कडू बोलत असताही धन फार देणाऱ्या राजातें पाहून दुःखित [होणाऱ्या] पुरुषाचें कोणी समाधान करतो। अ०। येथें पूर्वार्धाचे अर्थास उत्तरार्धाचा अर्थ हेतु होऊन दृढीकरण करितो म्हणून काव्यलिंग। व्यं० दात्याचें वचन कठोर ही सहन करावें लागतें॥ श्लोक ३८॥ सं० निरंतर धनदानसौजन्यादिगुणयुक्त परंतु खळसंसर्गी अशा राजातें कोणी म्हणतो। व्यं० लोकांत ही मोठा दोष सर्व गुणास झांकितो हें प्रसिद्ध आहे। श्लोक ३९ सं० लोकाचे प्रत्युपकारास न इच्छितां आपण

उपकार करणाऱ्या राजातें कोणी म्हणतो। प० अपेक्षा=इच्छा, उन्नत=उंच, संचय=समुदाय। श्लोक ४० सं० कुलीन आणि देवब्राह्मणाचा सत्कार करणाऱ्या राजातें कोणी स्तवितो। प० हरिकरीं=कृष्णाचे हातीं; रुचिर=सुंदर, उन्नति=मोठेपणा, सहूं=सहन करूं। मानूं हें तात्पर्य. ॥ श्लोक ४१ सं० पंडित आणि मूर्ख यांस एकरूप पाहणाऱ्या राजातें कोणी म्हणतो. अ० पाषाणें सम मणी आणि मत्स्यें सम विष्णु या अर्थे सहोक्ति. श्लोक ४२ सं० लोकांपासून धन हरणाऱ्या आणि दातृत्वाचा अभिमान धरणाऱ्या राजातें कोणी निंदितो. प० सलिल=जल। श्लोक ४३ सं० याचकास न देणाऱ्या परंतु देऊं मग असें म्हणणाऱ्या राजातें कोणी म्हणतो कीं देशील तर आतांच दे. अ० बहुसंपत्त्यादिक कारण असतांही दानरूपकार्याची उत्पत्ति दिसत नाहीं म्हणून विशेषोक्ति. श्लोक ४४ स० याचकापासून द्रव्य घेणारा जो धनसंपन्न राजा त्यास कोणी निंदितो. व्यं० हें तू फार अनुचित करतोस. प० रोष=क्रोध। श्लोक ४५ स० मोठ्या लोकांशीं स्पर्धा करणारा जो दैववशें प्राप्तयत्किंचितधन पुरुष त्यास कोणी म्हणतो. व्यं० वर्षानदीशब्दें असें जाणावें कीं पूर्वीं कधींच अशी स्पर्धा केली नव्हती आतां या थोडे जलानें येवढी स्पर्धा करितोस हें योग्य नव्हे. श्लोक ४६ सं० सार्वभौमें मानित असा पंडित मांडलिकाजवळ येतो व तो त्याला अपमानितो असें पाहून कोणी म्हणतो. अ० अतिपूज्यत्वादिकारण असतांही आदररूप कार्य न झालें म्हणून विशेषोक्ति। प० थिरगुनी=स्थीर होऊन; किविषीं=कशाविषयीं. श्लोक ४७ सं० जन्मापासून दुसऱ्याचे अन्नवस्त्र चोचणाऱ्या व आपल्याकडून कांहींच उपकार न घडविणाऱ्या पुरुषातें कोणी म्हणतो. व्यं० सरोवराचे कमळादिकांला आपुले वांचण्यानिमित्तच उपभोगितोस कांहीं कोणतेही उपकारार्थ नाहीं. श्लोक ४८ स० राजाजवळ राहून सुख फार भोगून त्याला विपत्ति येतांच टाकणारा जो नीच त्यातें कोणी निंदितो; प० मजरीपुंजीं=मंजरीसमुदायीं। श्लो० ४९ स० कोणी निर्बळास म्हणतो कीं सबळाचें भय ठेव. व्य० क्षणमात्र येथें राहशील तर सिंह येऊन तुझातें भक्षील. श्लोक ५० स० मोठा पुरुष विपत्तींत असताही नीच कर्म करीत नाहीं असें कोणी सांगतो। अ० मृगहननकारण क्षुधादिक असतांही मृगहननकार्य न झालें म्हणून विशेषोक्ति। हा करीचा अरि म्हणून यानें हें नीच कार्य न केलें या अर्थे परिकर। प० हरि=सिंह। श्लोक ५१ सं० मोठ्यावर पराक्रम करणारा पुरुष हलक्यावर कधीं पराक्रम करीत नाहीं हें सांगतो. प० त्यांनीं=सिंहानें. श्लोक ५२ स० सार्वभौमाची जागा आक्रमून बसलेला जो गर्विष्ठ मांडलीक त्यातें कोणी हितोपदेश करितो. अ० हस्तिभ्रांति या पदें भ्रांतिमान; पूर्वार्धांत येथें स्थिति करूं नको या अर्थाला हेतु उत्तरार्धाचा अर्थ आहे म्हणून काव्यलिंग।

व्यं० जर तो जागा झाला तर एके क्षणांत तुला खाईल. प० विस्फोटित=फोड लेले, उद्भट=भयंकर. श्लोक ५३ स० प्रतापी रिपूवर बालबुद्धि करून कुलीनत्वादिकांचे अभिमानें त्याची जागा घेणारा जो पुरुष त्याला हित सांगतो. अ० हस्तिनीचाही लेश न ठेवण्याचा योग असतांही लेश ठेवण्याचा योग-दाखविला म्हणून अतिशयोक्ति. पूर्वार्धास उत्तरार्धार्थ हेतु म्हणून काव्यलिंग । व्यं० स्तनपान सोडून हस्तिनीचा शोध करून सर्व कुळाचा संहार करील. प० करिणी=हस्तिनी. श्लोक ५४ सं० गुरूनें उपेक्षा केली असतांही जो शिष्य विद्वान् झाला त्याला स्तवितो. अ० असें जाणे कोण या अर्थें असंभव। प० कोणातीं=कोपऱ्यामध्यें. श्लोक ५५ सं० क्रोधें ज्यानें सार्वभौमास टाकिलें मग त्या मोठया पुरुषास जागा कोठेंच नाहीं हें सांगतो. अ० भ्रांति न टाकिती या अर्थें भ्रांतिमान. प० उत्तुंग=मोठे. श्लोक ५६ स० कोणी शत्रूस मारितांना कोणाची स्त्रीही मारिली जाते असें पाहून शोक करितो. अ० लवंगलतिका आणि वणवा याचा योग विपरीत म्हणून विषम. श्लो० ५७ स० दुर्जनानें सज्जनाचा पराभव न करावा या विषयीं सांगतो. अ० नंदनवनीं शिरोमणित्वा-दिकाचा आरोप केला म्हणून रूपक. श्लोक ५८ स० कोणी दीर्घसूत्र [मनुष्य] आपुलें इष्ट चिंतीत असतांही अनिष्ट पावतो हें सांगतो. अ० येथें शुक इष्ट चिंतीत असतां केवळ तें इष्टच न झालें असें नाहीं तर सर्पही पिंजऱ्यात प्रविष्ट झाला हें अनिष्टही झालें म्हणून विषम; प० कामामृता=मनोरथामृतातें; गजशुंडेसा =गजशुंडेसारिखा. श्लो० ५९ सं० सार्वभौमास जिंकावयास इच्छिणाऱ्या राजकुमारास कोणी हितोपदेश करितो. अ० पूर्वार्धाचें उत्तरार्ध हेतु म्हणून काव्यलिंग. श्लो० ६० सं० सर्व लोकांवर उपकार करणारास कोपानें जो पाहतो त्यास कोणी म्हणतो. अ० पूर्वार्धास उत्तरार्ध हेतु म्हणून काव्यलिंग। व्यं० सर्वांवर उपकार-करणाऱ्यास कधींही क्रूर दृष्टीनें न पाहावें. श्लो० ६१ सं० बहु वाचाळ पंडितास कोणी म्हणतो कीं फार पांडित्य करूं नको माझे जवळचा पंडित उत्साहयुक्त होऊन तुझा पराभव करील. अ० मासिकगर्भास उड्डाणसंबंध नसताही संबंध कथन केलें म्हणून अतिशयोक्ति । भ्रांतीनें येथें भ्रांतिमान. श्लो० ६२ सं० सभेंत अल्पज्ञानें वारंवार प्रश्न केला कीं कां आपण बोलत नाहीं त्यास महा पंडित उत्तर करतो. श्लो० ६३ सं० कुलीनत्वधनदातृत्वादिगुणें उत्कृष्ट राजातें कोणी पंडित म्हणतो कीं तुझे गुणांचा उत्कर्ष आम्हांवर प्रीति ठेविल्यानें फार होईल. अ० तूं उत्कृष्टच आहेस परंतु आमचे योगानें फारच उत्कृष्ट होशील या अर्थें अनुगुण. प० सुरांतःसौख्यसंवर्धिनी=देवांचे हृदयीं सौख्य वाढविणारी. श्लोक ६४ स० शत्रुस्थानीं सुखें निजणाऱ्यातें कोणी म्हणतो. श्लो० ६५

सं० कोणी मोठ्याचे सत्यत्वास वर्णितो. अ० पूर्णोपमा। श्लो० ६६ सं० योग्यायोग्यविचारशून्यदात्यातें कोणी म्हणतो. अ० जर विचार करशील तर गुण लोकोत्तर होतील या अर्थी संभावना। प० सुरभिता=सुगंध; गीर्वाण=देव; लधे=राहे; अर्पणविधि=दानविधीविषयीं; विचारें=विवेकानें. श्लोक ६७ सं कोणी व्याधातें म्हणतो। अ० तुझ्यासारखे पुष्कळ आहेत या अर्थी प्रतीप; प० लयी=फार. श्लो० ६८ कोणी पृथ्वीतें निंदितो. श्लो० ६९ सं० कोणी पंडिततें स्तवितो; अ० विद्वांसाचे यत्न प्रवृत्त्यादिक अन्य च आहे या अर्थी भेदकातिशयोक्ति; व्यं० विद्वासाचें सर्व ही आचरण अवर्णनीय आहे; प० वचनावलीची=भाषणपरंपरेची; दुःखितेष्टा =दुःख्यास प्रियकारक; चेष्टा=व्यवहार. श्लो० ७० सं० पंडित विपत्तिकाळीं ही आपले गुण टाकीत नाहींत याविषयीं सांगतो. अ० उपमा आणि उपमेय दोघांची ही उदारवृत्ति व परिमळ प्रगट करणें हा धर्म एकच पडला म्हणून प्रतिवस्तूपमा; विशेष अर्थी सामान्य अर्थाचे दृढीकरणास्तव अर्थांतरन्यास हीं; प० महामनचक्रवर्ती=विद्वत्सार्वभौम. श्लो० ७१ सं. स्वच्छांतःकरण पुरुषांचा रोष ही सुदर च होतो हें सांगतो; अ० प्रतिवस्तूपमा आणि अर्थांतरन्यास हीं पूर्व श्लोकासारिखा जाणावा. श्लो० ७२ सं० कोणी महापंडित थोडे पांडित्यानें गर्वयुक्त अशा आपुले शिष्यातें म्हणतो. अ० पूर्वार्धांतील मुख्य अर्थ उत्तरार्धांतील गौण अर्थास स्वीकारितो यास्तव अर्थापत्ति; अल्पज्ञानें पंडितापुढें बल्गना करणें आणि सर्पादिकांचे शिरीं पक्षिबालकादिकांहीं पाय ठेवणें या दोन्ही वाक्यांनीं बिंबप्रतिबिंबभाव दिसतात म्हणून दृष्टांत. श्लोक ७३ सं० पित्रादिकाचे निर्भर्त्सनेनें दुःखित पुत्रादिकांस कोणी आश्वासन करितो. अ० विरुद्ध कटुभाषणादि कारणांपासून महत्वकार्याची उत्पत्ति म्हणून विभावना, वैधर्म्ये प्रतिवस्तूपमा, अर्थांतर न्यास ही. श्लोक ७४ सं० संसारांत कोणीच दोषरहित नाहीं हें सांगतो; अ० येथें दोषवत जे चंदनादिक त्यांच्या जवळी करी या क्रियेत अन्वय असतां शिरीं धरी, सेवी, ठेवी या क्रियापदें पुन्हा पुन्हा आवृत्ति केली म्हणून अर्थावृत्ति दीपक; जवळ करणें, शिरीं धरणें, सेवणें, ठेवणें ह्यांस एकरूपताच आहे म्हणून मालारूपा प्रतिवस्तूपमा अलंकार होतो असे रसगंगाधरकार ह्मणतात. प० पाटीर=चंदन, अहिला=सर्पाला, विधु=चंद्र, पिशुन=द्विजिव्ह; खळ= लबाड. श्लो० ७५ सं० मोठ्याचे अंतःकरणीं लोकास आनंद करणें सहज असतें याविषयीं सांगतो. अ० उत्तरार्धांतील विशेष अर्थी पूर्वार्धांतील सामान्य अर्थाचें दृढीकरण करितो यास्तव अर्थांतरन्यास, आनंदविकास हे दोन धर्म समबिंबप्रतिबिंब आहेत म्हणून दृष्टांत. श्लो० ७६ सं० कोणी दुर्जनास निंदितो. अ० उपमा. श्लो० ७७ सं० उपकारकाजवळ अपकारक खळाविषयीं कोणी प्रस्ताव

करितो. व्यं॰ पात्रापात्रविचारशून्यता आमची म्हणून आमचाच अपराध; प॰ बंदित्व=भाटपण. श्लो॰ ७८ सं॰ कोणी सज्जनाचें सर्वोत्कृष्टत्व कोणास सांगतो. श्लोक ७९ सं॰ पूज्य लोकांचे समागमें जो पूज्य लोक असतो त्यासच लोक पूजितात हें सांगतो. अल॰ अर्थांतरन्यास, वैधर्म्यानें प्रतिवस्तूपमा असें रस गंगाधरकार म्हणतात; वंशगुणपदांत श्लेष; प॰ रंगीं=नृत्यस्थळीं; श्लोक ८० सं॰ गुणिजनांत गणनीयही पुरुष एके दोषें करून निंदिला जातो याविषयीं सांगतो. अ॰ पूर्णोपमा. श्लो॰ ८१ सं॰ मरत असताही सज्जन उपकारच करितो याविषयीं सांगतो. अ॰ उदाहरणालंकार; प॰ पारद=पारा. श्लो॰ ८२ सं॰ जानकीदुःखवर्णनप्रस्तावें करून अवश्य होणारें दुःख मोठ्यासही होत असतें हें सांगतो; अ॰ सीतेस न होणार तें झालें या अर्थीं विषम; प॰ शशशिशु=सशाचें बाळ; चकिता=भयभीता; हृदिं=हृदयीं; क्रव्याद=राक्षस. श्लो॰ ८३ सं॰ पुज्याचा अनादर आणि गर्व नाशाचें कारण होत हें सांगतो; अ॰ त्रिपुरासुरसंहारक शंकराचे पुढें शरसन्मुख केले मग त्याचें भस्म कां न व्हावें या अभिप्रायें परिकर; त्यानें च भासमान विषम. श्लो॰ ८४ सं॰ मूर्ख स्वभावातें वर्णितो; अ॰ वानरस्वभाववर्णनास्तव स्वभावोक्ति; प॰ पीठ =आसन; चित्कृति=चीं चीं शब्द; निकर्तन=तोडणें. श्लो॰ ८५ सं॰ हरिपाद-पद्मभजनादिकांस प्रश्नोत्तरांहीं उत्कृष्टत्व सांगतो; अ॰ आर्यी प्रश्नपूर्वक परिसंख्या; व्यं॰ हरिपादपद्मभजनादिकांहून वेगळें तीर्थादिक कांहीं नाहीं. श्लो॰ ८६ सं॰ दुर्जनाचें मन वेदांतश्रवणानेंही निर्मळ होत नाहीं हें सांगतो. अ॰ उपमा; प॰ जेंवी=जसा; ना=नाहीं. श्लो॰ ८७ सं॰ गुणवंताची विपत्ति पाहून मूर्खत्वाचें सुखकारणत्व वर्णितो; अ॰ दोषास गुण म्हटलें म्हणून लेश; प॰ नैर्गुण्य =मूर्खत्व. श्लोक ८८ सं॰ यांचा न करणाऱ्यास स्तवितो; अ॰ चितास्वरूपदहनाचें ज्वालाशतें या अर्थीं रूपक; प॰ अचुंबित=अस्पर्शित. श्लो॰ ८९ सं॰ आ-त्मगुणें गुणहीनास सगुण करणाऱ्या आणि दोष झांकणाऱ्या अशा सज्जनातें स्तवितो; अ॰ श्लेषोत्थापित पूर्णोपमा; प॰ कर्तनि=कातनकिडा. श्लो॰ ९० सं॰ नी-चाचा नीचपणा कोणाच्यानेंही वर्णवत नाहीं हें सांगतो; प॰ रक्षणि=भक्षणि; शमनीं=प्रदीपनीं; हा उलटा प्रकार याला विरुद्धलक्षणा म्हणतात. श्लो॰ ९१ स॰ दुर्जन सज्जनांचा द्रोह करीत च असतात हें सांगतो. अ॰ श्लेषोत्थापित पूर्णोपमा. प॰ आखुसें=उंदरासारखें. श्लो॰ ९२ सं॰ सज्जनदूषकत्वेंकरून खळास कीर्तीचा लाभ कधींच होत नाहीं हें सांगतो; अलं॰ रूपक अथवा गगनादि-कांचे ठायीं जसा कुसुमादिकांचा अभाव तसा खळाचे ठायीं दयादिकांचा अभाव या अर्थें गम्योपमा. श्लो॰ ९३ सं॰ लोकांकरितां स्वशरीरही देणाऱ्या

[व] आपण दुःख भोगणाऱ्या अशा सज्जनातें स्तवितो; प० शीतज रोग=हिंवापासून झालेला रोग. श्लो० ९४ सं० दुर्जनवशीकरण आत्मनाशार्थ जाणावें हें सांगतो; अ० येथें सदृश जो तो या पदांनीं वाक्यार्थांचे ऐक्याचा आरोप होतो म्हणून निदर्शन; व्यं० विषपानादिकांची इच्छा जशी आत्मनाशाचें कारण तशी दुर्जनवशीकरणेच्छा होय. श्लो० ९५ सं० पात्राचा अनादर करून अपात्रीं दान करणाऱ्या राजातें निंदितो. श्लो० ९६ सं० मोठेपणा वर्णितो; अ० उत्तरोत्तर वर्णनें सार. श्लो० ९७ सं० सर्वथा खळास सत्कार संभवत नाहीं हें सांगतो; अ० निदर्शना; व्यं० जसें व्योमवासादिक संभवत नाहीं तसा खळसत्कार. श्लो० ९८ सं० रम्य वस्तु मूर्खास अर्पिली असतां तिचा नाश होतो याविषयीं सांगतो; अ० स्वभावोक्ति. श्लो० ९९ सं० स्वतः अतिआसक्त नायिकेतें टाकून जाणाऱ्या नायकातें कोणी म्हणतो; अ० सौंदर्यादिकांचा अभाव असतां प्रेमोत्पत्ति आणि अप्रेम नसतां त्याग म्हणून विभावना; व्यं० कोणीही नायक आपल्यास गुण नसतां आपलेवर आसक्त कामिनीतें टाकीत नाहीं; प० सरसे=प्रेमयुक्त होते. श्लो० १०० सं० लोकांस जो याचा करितो त्याचे मुखीं अवश्य काळीं येतो याविषयीं सांगतो; अ० दृष्टांत; प० विचित्र=आश्चर्य. श्लो० १०१ सं० पुरुष निज गुणें महत्व पावतो हें सांगतो; अ० विभावना. श्लो० १०२ सं० सज्जनातें कांहीं पुसून कोणी शिक्षितो; प० चित्तालयांत=चित्तरूपगृहांत. श्लो० १०३ सं० तुझेविना तुझे मित्रास बहुत दुःख होतें असें कोणी कोणातें सांगतो. अ० विभावना; प० मधो=हे वसंता. श्लो० १०४ सं० दैव पराङ्मुख होतां पुरुषार्थ निष्फळ होतो हें सांगतो; अ० पराक्रमरूप. कारण असतांही मांसलाभ कार्य न झालें म्हणून विशेषोक्ति आणि भ्रांतिमान. श्लो० १०५ सं० कश इमानी पुरुष शत्रूला क्रोधें करून मरायास उद्योग करितो हें सांगतो; प० रात्रिज =रात्रीं जन्मलेला. श्लो० १०६ सं० दुर्जनातें स्तुतिमुखें करून निंदितो; अ० व्याजस्तुति. श्लो० १०७ सं० कोणी खळास बोलतो. अ० खळा तुझें चरित्र सांगतों असें म्हणून विचारपूर्वक निषेध केला म्हणून आक्षेप. श्लो० १०८ सं० खळसमागमातें निंदितो; अ० हर्षे च मृग इत्यादि अर्थे रूपक तथापि उल्लेख; श्लो० १०९ सं० पुन्हा खळातें निंदितो; अ० दृष्टांत; प० अवलोकीं =जाणीं; श्लो० ११० सं० खळातें निंदितो; अ० मंत्ररहित पुरुषास मारितें या हेतुस्तव ही खळाची जीभ नव्हे तर सर्पिणी होय या अर्थे हेत्वपन्हुति; प० अमन्त्री=मंत्ररहित; मृत्युतन्त्री=मृत्यूचे स्वाधीन. श्लो० १११ सं० कोणी सज्जनास म्हणतो; अ० उत्तम कर्म त्वां केले तेणें करून कीर्ति झाली म्हणून आशीर्वाद देतो या अर्थी कारणमाला; प० स्वरसीं=स्वप्रीतीनें. श्लो० ११२ सं० सज्जनातें स्तवितो;

अ० उपमा. श्लो० ११३ सं० कोणी पिकवृत्तांत कोणास सांगतो; अ० पूर्णोपमा. श्लो० ११४ सं० निर्गुणानें कितीही आडंबर केला तरी शोभत नाहीं हें सांगतो; अ० पूर्णोपमा; प० बहिरंग=बाहेरचा रंग. श्लो० ११५ सं० सरोवरादिकास वर्णितो; अ० व्याजोक्ति. श्लो० ११६ सं० काव्यास वर्णितो; अ० दृष्टांत; प० प्रिय हो=हे गडेहो. श्लो० ११७ सं० कामबाणें रोमांचिततनु रजस्वलेतें उपभोगणाऱ्या नायकातें कोणी म्हणतो; अ० रजादिप्रतिबंध असतांही उपभोगरूप कार्याची उत्पत्ति म्हणून विभावना. श्लो० ११८ सं० रागादिकातें वर्णितो; अ० विशेषोक्ति आणि मालोपमा; प० दानाविण=मदोदकाविण. श्लो० ११९ सं० गुणातें वर्णितो; अ० दृष्टांत. श्लो० १२० स० आपुले धन्यास मारून उदयाप्रति पावला आणि गर्व वहातो त्यास कोणी म्हणतो; अ० येथें कस्तुरीच्या आमोदरूप गुणास मृगघातकत्वें करून दोष म्हटलें म्हणून लेश; प० स्वपित्तिं=आपुले पित्तानें म्हणजे आपल्या हातानें. श्लो० १२१ स० सत्संगास वर्णितो; अ० पूर्वपूर्वास उत्तरोत्तर कारण आहे म्हणून कारणमाला. श्लो० १२२ सं० साधूंचे वचनास वर्णितो. अ० अपूर्णोपमा; प० भेषज=औषध. श्लो० १२३ सं० या स्थळींचे सर्व लोक गुणज्ञ आहेत हें सांगतो; प० कांतारीं=वनीं श्लो० १२४ स० मृत कृपणादिकास वर्णितो; अ० दृष्टांत; प० नकाराचा सर्वत्र अन्वय=इतक्यास इतक्या गोष्टी पडत नाहींत हें तात्पर्य. श्लो० १२५ सं० स्त्रियांचा विश्वास कधींच न धरावा हें सांगतो; अ० अर्थांतरन्यास. श्लो० १२६ सं० ब्रह्मयातें वर्णितो. अ० विषम; प० विधि=ब्रह्मा अथवा प्रारब्ध; उच्छृंखल=अनर्गल. श्लो० १२७ सं० मोठ्याचे योगानेंच मोठ्याचें स्मरण होतें तें सांगतो; अ० स्मरण; प० दोर्दंडद्वयीं=दोहीं बाहुदंडाचे ठायीं; कुंडलाकृति=कुंडलाकार; लसे=शोभे; कोदंडचंडध्वनी=धनुष्याचा भयंकर शब्द; खंडिसि=तोडिसि; राया=हे राजा; गांडिव=अर्जुनचाप; मुक्त=सुटलेले; कांड=बाण; वलय=समुदाय; ज्वालावली=ज्वाळाची परंपरा; तांडवी=नृत्याचे ठायीं; खांडव=वन; मध्यपांडवीं=अर्जुनाचे ठायीं स्मृति=स्मरण; मांडवी=ठेववी;| श्लो० १२८ सं महाभाष्यकाराचे मतेंकरून ग्रंथाचे मध्यभागीं मंगळ करितो; प० खंडित ललना=खंडित नायिका; अन्योपभोगचिन्हित प्रातःकाळीं जिचा पति येतो ती खंडिता नायिका; दिगंता जे मंडिती सुशोभित करिती ते चंद्रकराचे सूर्याचे किरण सुखवोस सुखी करोत हें आशीर्वादात्मक मंगल होय.

इति भामिनीविलासटीकाटिप्पणे कविगंगाधरकृते अन्योक्तिविलासः

---

## अथ द्वितीयो विलासः

**न मनागपि० ॥ १ ॥**

न जया अणुमात्र राहुशंका । न दिसे पांडु धरी न जे कलंका ॥
सखि भामिनि हे तुझे मुखाचि । द्युति ही नित्य चि वाढते सुखाची १

**नितरां परुषा० ॥ २ ॥**

सखि कोमल अंग हें तुझें गे । जरि झालें तरि मानितों वझें गे ॥
तरुपल्लव आणि पद्ममाला । कठुरा कीं त्यजितो मि त्या मृणाला ॥२॥

**स्वेदांबुसांद्रकण० ॥ ३ ॥**

घर्मांबुचे कण विराजति कीं कपोलीं । हिंदोलसे हलति कुंडल कर्णपालीं ॥
ऐशी दशा रुचिर त्या मदिरेक्षणेची । आनंद अंकुरवि चित्तिं अठीवता ची ॥३॥

**कस्तूरितिलक० ॥ ४ ॥**

कस्तूरिचा तिलक रेखुनियां ललाटीं । सज्जावरी हसत बैस तुं सांजवाटीं ॥
प्राणप्रिये कमळ हे उगवोत आणी । उल्लासवोत वदनास दिशामुखांनीं ॥ ४ ॥

**तन्मंजु मंदहसितं० ॥ ५ ॥**

ते श्वास ते मृदुल मंद चि हास ती ही । कीं निष्कलंक मधुराननकांति जी ही ॥
अद्यापि मोहविति हें मम चित्त सार्चे । संध्याप्रफुल्लकमलोपमलोचनेचे ॥ ५ ॥

**प्रातस्तरां प्रणमने० ॥ ६ ॥**

त्या पाहटेस नमितां वडिलांस त्यांहीं । तूं होय निर्मल कि पुत्रिणि या परी ही ॥
कल्याण वाणि वदतां तरुणी स्वकांतीं । आनंदपूर्ण नयनास धरी सुकांती ॥ ६ ॥

**गुरुजन० ॥ ७ ॥**

गुरुजननिकटीं मला कि पाहे । म्हणोनि विव्हलता भया चि साहे ॥
अशि हरिणदृशीचिये दशीला । न मि विसरें अणुफुल्लपद्मशीला ॥ ७ ॥

**बदरामलक० ॥ ८ ॥**

बदरामलकाम्रदाडिमाची । हरुनी कांति कीं उन्नतिक्रमाची ॥
सखये कुच सिद्ध हे तुझे गे । हरणीं कुंजरगंडकांतिचे गे ॥ ८ ॥

**जंबीरश्रियं ॥ ९ ॥**

जंबीरद्युतिसि विलघुनी सुखानें । हेमाचे घट अति तुच्छ जे किं मानें ॥
हे नीलांबुजनयने अतां तुझे तें । स्पर्धे हे कुचयुग हेमपर्वतातें ॥ ९ ॥

**कपोलपालिं० ॥ १० ॥**

मी मानितों सुंदरि यापरीं कीं । कपोल तूझे दिशि उत्तरा कीं ॥
जी शोभताहे ललितालकाहीं । जेथें स्फुरे वैश्रवणेंदिरा ही ॥ १० ॥

**नीवीं नियम्य० ॥ ११ ॥**

बांधोनियां शिथिल नीविसि त्या प्रभातीं । जी चित्र पद्मनयना शयना त्यजे ती ॥
ते वेळिं पद्ममृदुगर्भसमानकांती । जी नाभि पाहिलि ति राहत मानसातीं ॥ ११ ॥

**आलीषु० ॥ १२ ॥**

सखीसमक्षीं रतिहर्षि डोले । बाला ममालाप बहूत बोले ॥
ऐकुनि ते वेळिं मदीय वाणी । सौदामिनीकांतिस घे हिरोनी ॥ १२ ॥

**मुधैव मंतुं० ॥ १३ ॥**

वृथैव जातों अज मी असें हें । वृथैव कल्पोनि वचास साहे ॥
ते वेळिं अश्रू नयनांत आले । सखी कसें काय मशीं न बोले ॥ १३ ॥

**तदवधि कुशली ॥ १४ ॥**

तववरि हृदयीं ठसे श्रुतीचा । श्रवणज फार विवेक ही स्मृतीचा ॥
जववरि पद ठेविना कि साचा । दृशि शर तो मृगबाललोचनेचा ॥१४॥

**आगतः पतिरितीरितं० ॥ १५ ॥**

कांत आगत असे वचाप्रती । ऐकुनी चकित नेत्र भासती ॥
देहलीवरि उभी मृगेक्षणा । चंद्रिका कधिं दिसेल ईक्षणा ॥ १५ ॥

**अवधौ दिवसावसान० ॥ १६ ॥**

अवधीदिवसावसानकाळीं । सदनद्वारिं धरीत नेत्र बाळी ॥
मग पाहु तयीं अली मला ती । परिफुल्लाबुजशी मुखें दिसे ती ॥ १६ ॥

**वक्षोजाग्रं० ॥ १७ ॥**

हस्तानें जो स्पर्शुनीयां स्तनातें । राहे ऊभा दूर त्याचे मुखातें ॥
नेत्राचे त्या शोण कोणें करोनी । पाहे पाहे भामिनी क्रोध दानीं ॥ १७ ॥

**गुरुमध्यगता० ॥ १८ ॥**

गुरुचे मधियें उभी नतांगी । कमळाचे कळिनें चि ग्या स्वरगीं ॥
मृदुताडित पाहुनी मला ते । नमवी भ्रू हलवी कि कुंडलांते ॥ १८ ॥

**विनये नयनारुणप्रसाराः० ॥ १९ ॥**

दिससी विनतींत शोणनेत्रा । असती तूं प्रणतींत अश्रुपात्रा ॥
मग जीवनसहाय प्रयाणीं । कासि तूं होसिल दुष्ट हें न जाणीं ॥ १९ ॥

**गुरुभिः परिवेष्टिता० ॥ २० ॥**

गुरुंहीं परिवेष्टिताही बाला । निज गंडस्थळकंडुचे मिषाला ॥
करुनी निज बाहुनाळ दावी । स्वकटाक्षे बहुशी मला सुखावी ॥ २० ॥

**अकरुण मृषा ० ॥ २१ ॥**

रे रे निर्दय रे असत्य जडधे तूं सोड हा सेव कीं ।

तुझा स्नेह बराच म्यां वळखिला बोले असें फार कीं ॥
नेत्रांतूनि गळे कि अश्रु सकळें हीं भूषणें टाकिले ॥
त्या तन्वीस तुझे विना कवण गे दावील निद्रे भले ॥ २१ ॥

**तीरे तरुणी० ॥ २२ ॥**

तटाकतीरीं तरुणी हसे ती । सरोज नीरांत विकासताती ॥
पाहून धांवे उभयत्र बाळा । मरन्दलुब्धा शिशुभृंगमाळा ॥ २२ ॥

**वीक्ष्य वक्षसि० ॥ २३ ॥**

पाहुनि प्रियउरीं सपत्निचें । हारचिन्ह रतिरोषदानिचें ॥
स्कंधसंस्थिता हि तन्वि आंवरी । तत्क्षणीं च निज बाहुमंजरी ॥ २३ ॥

**दरानमत्कंधर० ॥ २४ ॥**

कांहीं लवे मान अणीक कांहीं । मीळे जियें लोचनयुग्म तें ही ॥
विश्वासयोगें शिथिलांग झालें । तें अंगनासंगम आठवीलें ॥ २४ ॥

**रोषावेशान्निर्गतं० ॥ २५ ॥**

रोषावेशें एकटा मी निघालों । द्वारीं कांहीं बोलण्यासी रिघालों ॥
जाणोनीया आलि ती चंचलाक्षी । लक्ष्मी जैशी मंदिरांतूनि लक्षी ॥२५॥

**हृदये कृतशैवलानुषंगा ॥ २६ ॥**

हृदयावरि शैवलास लावी । इकडे ही तिकडे निजांग ठेवी ॥
प्रियनाम सखीमुखीं च येतां । मग दे दृष्टि करीत दीन आर्ता ॥ २६ ॥

**इत एव निजालयं० ॥ २७ ॥**

इकडोनि निजालयीं गतेची । वनितेची गुरुलोकसंयुतेची ॥
भ्रुकुटी लवलि कीं मान फीरे । स्मरतों सस्मित त्या मुखास मी रे ॥२७॥

**प्राणाव० ॥ २८ ॥**

जीवनहरणाविषयीं हालाहलतुल्य होसि या मानें ॥
अमृता भुमी न मानी चंद्रा तो मूर्ख जो असा मानें ॥ २८ ॥

**कथय कथमिवाशा० ॥ २९ ॥**

वद कशि मज आशा जीवनाची असावी ।
मलयभुजग वायू वाहती तीक्ष्ण भावी ॥
अणि करि मृदु गुंजा मंजु आम्रांतरी हा ।
विकळ करि मदीया चेतना भृंग ही हा ॥ २९ ॥

**निरुध्य यांतीं तरसा कपोतीं० ॥ ३० ॥**

वेगें पळे त्याचि कपोतिलागीं । कपोतकाचे धरिं अग्रभागीं ॥
मी यापरी आचरतां सखीनें । तें नम्र केलें मुख हासण्यानें ॥ ३० ॥

**तिमिरं हरति० ॥ ३१ ॥**

तम वारिति दश दिशास्थित ही । हरित ती तप्तजनताप कीं सही ॥
वदनद्युति तव चकोरलोचने । कमळाचिये द्युतिसि देति लोपनें ॥३१॥

**कुचकलशयुगांतर्मामकीनं० ॥ ३२ ॥**

कुचकलशयुगाचे मध्यभागीं नखाचें ।
क्षत मम सखि पाहे गुप्त जें कीं सुखाचें ॥
तव मम वदनाला पाहुनीया गवाक्षीं ।
चकितनयन गेली मंदिरीं ते मृगाक्षी ॥ ३२ ॥

**विधाय मद्वदनानुकूलं० ॥ ३३ ॥**

करोनियां सन्मुख मन्मुखाचे । कपोलमूलाप्रति जी सुखाचे ॥
माझे हृदब्जीं निजली सखी ते । इंद्राचिये लक्ष्मिस तुच्छ गा ते ॥३३॥

**मुहुरर्थितयाद्य निद्रया मे० ॥ ३४ ॥**

बहुयाचित ही चतुर्थ यामीं । निशिचे भेटवि झोंप कीं प्रिया मी ॥
मग चुंबितसे तयेच काळीं । रवि ही निर्दय जाहला सकाळीं ॥ ३४ ॥

**श्रुतिशतमपि भूयः शीलितं० ॥ ३५ ॥**

श्रुतिशत हि बहूसे ऐकिलें भारता ती ।
स्मृतिशत हि करींना तेंवि संतापशांती ॥
जशि मृदुल पलंगीं मैथुनश्रांत कांता ।
मुखि कपटनकोर युक्तवाणी स्वकांता ॥ ३५ ॥

**लवलीं तव लीलया कपोले० ॥ ३६ ॥**

सखि पांडुर गाल हे तुझे गे । लवलीकांतिसि जिंकिती बरे गे ॥
अवलोकुनि पुंडरीक याला । धरिताती निजमानसीं व्यथेला ॥ ३६ ॥

**यौवनोद्गमनितांतशंकिता० ॥ ३७ ॥**

जानकीनयनपद्मइंदिरा । बाधती रघुवरा किं सुंदरा ॥
लाजती तरूलतेसि शंकिता । पहाती द्युतिबळादि लोभितां ॥ ३७ ॥

**अधिरोप्य हरस्य हंत चापं० ॥ ३८ ॥**

अज मोडुनि चाप शंकराचें । परितापा शमवोनि बांधवांचे ॥
मिथिलाधिपकन्यकाकरातें । धरि हातीं न धरी प्रभु स्वहातें ॥ ३८ ॥

**भुजपंजरे गृहीता० ॥ ३९ ॥**

भुजपंजरांत धरिली नवी च वरिली वरें किं एकांतीं ॥
कांता भासतसे जशि बालमृगी व्याधरचितजालान्तीं ॥ ३९ ॥

**उपनिषदः परिपीताः० ॥ ४० ॥**

उपनिषदामृत प्यालों गीता ही मतित ठेविता झालों ॥
न च ही विधुवदना मनसदना बाहेर पाहता झालों ॥ ४० ॥

**अकरुणहृदय प्रियतम० ॥ ४१ ॥**

निर्दयहृदय प्रिय तुज मी न इतःपर कधीं हि सोडिन कीं ॥
ऐशी होउनि विकळा बाला सखिकर धरोनि वदते कीं ॥ ४१ ॥

**लोभाद्वराटिकानां० ॥ ४२ ॥**

लोभें कपर्दिकेचे ताक विकायास फिरतसे रमणी ॥
परि त्या व्रजकुमरीला लब्ध असे पथि महेंद्रनीलमणी ॥ ४२ ॥

**रूपारुचिं निरसितुं० ॥ ४३ ॥**

अरुचीचे हरणास्तव हरि मुखलावण्य रुचि घे सुदशीं ॥
शिव शिव तिजला झाली जगीं अरुचि आणि तनूचि ही चहुशी ॥४३॥

**किं जल्पसि मुग्धतया० ॥ ४४ ॥**

का सखि मूर्खपणें तूं वदसी मम तनु सुवर्णवर्ण असे ॥
ते जरि दहनिं पडे तरि तवांग सादृश्य पूर्ण घेत असे ॥ ४४

**औत्सुक्यात् परिमीलिता० ॥ ४५ ॥**

अभिलाषें मिळताती लज्जेनें संकुचित असति बरवे ॥
नवसंगतनरनारीनियन असे परि विलास करिति नवे ॥ ४५ ॥

**गरिमाणमर्पयित्वा० ॥ ४६ ॥**

मोठेपण देउनियां लघुपण घे तरुणि कुचतटाचें जें ॥
त्या अविवेकतरुणजनधैर्याला मम नती असो सहजें ॥ ४६ ॥

**स्पंचति वयसि प्रथमे० ॥ ४७ ॥**

जातसतां शिशुपण ते येतसतां सुदशीला तरुणपण हें ॥
वाणी गमन हि विभ्रम धरिती अत्यंत कीं मधुरपण हें ॥ ४७ ॥

**निःसीमशोभासौभाग्यं० ॥ ४८ ॥**

सीमाविरहित कांती सुंदर नयनारविंद सुंदरीचें ॥
अन्योन्यवीक्षणाचें सुख विरहें दिसति काय लहरीचें ॥ ४८ ॥

**गुरुमध्ये हरिणाक्षी० ॥ ४९ ॥**

गुरुंमध्यें रमणीला इच्छीं मारावया खड्यानें मी ॥
तव ती करून चपल दृशि वर्जी आणि दंतिं ओंभली नेमी ॥ ४९ ॥

**नयनांचलावमर्शं० ॥ ५० ॥**

जी कांता कधिं पूर्वी प्रियनयनांचलकटाक्ष हि न साहे ॥

देशांतरिं जाणार प्रियें ति आलिंगिली हि उगि राहे ॥ ५० ॥

**मानपराग्वदनापि०** ॥ ५१ ॥

मानें पराङ्मुखी ही प्रिया प्रियाचे हृदीं जशी निजली ॥
वरि करुनि बाहु अळसें मान असे गंड धरित जी सजली ॥ ५१ ॥

**लोचनफुल्लांभोजद्वय०** ॥ ५२ ॥

विकसितनयनसरसिजद्वयलोभें चपल चित्त ज्याचें तो ॥
कस्तूरीतिलकमिषें हा अलि सखि तव ललाटिं उल्लसतो ॥ ५२ ॥

**अधिरजनि प्रियसविधे०** ॥ ५३ ॥

रात्रीं प्रियनिकटीं सखि बळेंचि वडिलांहिं बसवितां धरुनी ॥
आतां होइल कैसें ऐसें चिंतित सशंक होय मनीं ॥ ५३ ॥

**चिंतामीलितमानसो०** ॥ ५४ ॥

चिंतादुःखित मानसीं मदन हा तूझ्या सखी निष्प्रभा ।
प्राणाधीश तुझेविनतिविषयीं हा घाबरोनी उभा ॥
मुग्धे सर्व असो तुं ऐकिसि जरी मी ही तरी बोलतों ।
टाकीं मान किं पूर्णचंद्र मुख हें जिंकील निर्हास्य तो ॥ ५४ ॥

**अलंकर्तुं कर्णौ०** ॥ ५५ ॥

अलंकारी कर्णांप्रति म्हणुनि सीत्कार वदनीं ।
मृगाक्षी दुःखातें सहत मुख ही जी वळवुनी ॥
तुला हस्तव्यापार हि सुकृत सारें धरितसे ।
म्हणोनी तानोडा जगिं मि तव जन्मा स्तवितसें ॥ ५५ ॥

**आयातैव निशा०** ॥ ५६ ॥

ही आली च निशा निशापतिमयूखांहीं दिशा व्यापिल्या ।
आणी मानवती स्त्रिया निजगृहीं त्या भूषणें शोभल्या ॥
हा मुग्धे त्यजिनासि मान अझुनी रोषें तुझे ही तनू ।
तन्वी बालमृणालकाहुनि सुके राहे न राहे जणू ॥ ५६ ॥

**वाचो मांगलिकीः०** ॥ ५७ ॥

वाणी मंगल त्या प्रयाणसमयीं ऐकोनि लोकांहिच्या ।
क्रीडामंदिरिं जे गवाक्षि मुख तें ठेवूनि नेत्रांहिच्या ॥
धारांहीं स्नपितस्तनी चलदृशी निश्वासशुष्काधरा ।
बाला पाहतसे अशी हर हर स्वप्राणनाडीश्वरा ॥ ५७ ॥

**यद्वाधि०** ॥ ५८ ॥

सहचरी जधींपासूनि रुशीला । प्रियसखे दैववशें चि दूर झाला ॥

सकळही तर्धींपासूनि ग माझे । न धरिती इंद्रिय कीं स्वकार्य ओझें ॥५८॥

निखिलां० ॥ ५९ ॥

घरिं येवूनियां प्रिये निद्राला । मजला जागविलें कथामृताला ॥
वदवेना बहू अतां सखे गे । वदु नको तुझि जीभ लोहशी गे ॥ ५९ ॥

निपत० ॥ ६० ॥

गळणार अश्रुपातावरोधनें ज्यांत अचळ तारा कीं ॥
ते त्या हरिणाक्षीचे लोचननीलाब्ज कधिं मि पाहिन कीं ॥ ६० ॥

यदि लक्ष्मण० ॥ ६१ ॥

जरि लक्ष्मण ती मृगेक्षणा । न दिसे कीं मम याचि ईक्षणा ॥
तरि या जड जीवनें मला । त्रिजगीं ही फल काय कोमला ॥ ६१ ॥

भवतः० ॥ ६२ ॥

घरिं जातसतां दयावती ते । तरुणांचे समुदाय चालती ते ॥
मग ते गमना निमित्त आज्ञा । भजती त्यांवरि दृष्टि ठेवि सुज्ञा ॥ ६२ ॥

पापं हंत० ॥ ६३ ॥

केलें पाप बहूत थ्या विधिहतें सीता वनीं आणिली ।
ती माझेविण चंद्रसुंदरमुखी वांचेल कीं मानिली ॥
आता पाहु कसें मुखा सुकृतिंचे ते कां मशीं बोलती ।
जावो राज्य रसातळीं रुचि मला नाहीं अशा जीवितीं ॥ ६३ ॥

उपसि० ॥ ६४ ॥

प्रिय ये सवतीघरांतुनी । सुखिभार्ती मग त्यास पाहुनी ॥
सदृशी दृशिकोण जाहले । प्रतिसंरक्त रुचींत नाहले ॥ ६४ ॥

क्षमाप० ॥ ६५ ॥

अपराधाविषयींचे विनतीचें स्थान मुख्य जे असती ॥
त्या चरणीं प्रिय पडतां सुदृशीदृशिकांति लालना दिसती ॥ ६५ ॥

निर्वास० ॥ ६६ ॥

स्त्रीयांहिचें धैर्य गळी वनारी । त्या कृष्णकांतीप्रति पाहणारी ॥
तीचा हि आगवुक रोष झाला । स्मरोनि अन्याय कि वाढवीला ॥६६॥

राज्ञो मम० ॥ ६७ ॥

मज जो प्रातिकूळ असे तया नृपतिपासुन चि मला भय गे ॥
बाले मज पांयाला देउनि वसती तया भया हारें गे ॥ ६७ ॥

मलयानिल० ॥ ६८ ॥

दहनसदृश मलयानिल क्षणभर मणिगृह हि वनसदृश माने ॥

प्रियविरहविकळहृदया वनिता जळहीन मीन मी जाणें ॥ ६८ ॥

**कालागुरु० ॥ ६९ ॥**

कालागुरुद्रवातें हालाहलतुल्य जाणते बाला ॥
व्यालावर्लासदृश ही जाणतसे नीलपद्मजा माळा ॥ ६९ ॥

**विधिवंचित० ॥ ७० ॥**

विधिवंचित मी सखे ग गेली । प्रियसंकेतनिकेतनीं उगेली ॥
करण्याविषिं काय इच्छितो कीं । नृपकदर्प मी जाणिना असें कीं ॥ ७० ॥

**विरहेण० ॥ ७१ ॥**

विरहें व्याकुळहृदया शोक करी कात कांत कात असें ॥
जाता चीं सनिध ही मुग्धा गतपरिचयासि पाहतसे ॥ ७१ ॥

**दारिद्र्यं भजते० ॥ ७२ ॥**

दारिद्र्यास भजे कलानिधि अणी ही पूर्णिमा म्लान कीं ॥
पद्मांचे वनिं भोवतीं दिसतसे उद्दाम मालिन्य कीं ॥
आणी भासति त्या दिशा किं सखया आनद होतो बरा ।
तू स्वीकारिसि काचनांगि वदनाभोजीं विकासेंदिरा ॥ ७२ ॥

**पाटीरभुजंगपुंगवमुखा० ॥ ७३ ॥**

येती चंदनवृक्षसंगिं अहिचे वक्त्रांतुनी वात हे ।
देती ताप किं ताम्र आम्रतरु ही कीं जाळती नेत्र हे ॥
हा हा कोकिल कूजितप्रचूर हे हालाहला झोंकिती
बाला बालमृणालकोमलतनू प्राणा कशा रक्षिती ॥ ७३ ॥

**आयातैव निशा मनो मृगदृशा० ॥ ७४ ॥**

ही आली च निशा किं जी मृगदृशाचित्तास उत्कंठवी ।
माझा मान कसा किं सांप्रत मुनींधैर्यास हा रक्षवी ॥
ऊहापोह असा सरोजनयना स्वीकारिते जोंवरी ।
कामच्छत्रसमान बिंब विधुचें हें भासलें तोंवरी ॥ ७४ ॥

**प्रभातसमयप्रभां० ॥ ७५ ॥**

प्रभातसमयप्रभा लपवितें रतासक्तिनें ।
म्हणोनि मि सख्याचिये नयन झाकितें पाणिनें ॥
परंतु सखि हा असा चतुर कीं सुगधांकितें ।
सुमंद पवनें रवीउदय तर्कि तो जाण ते ॥ ७५ ॥

**विदूरादाश्चर्यस्तिमित० ॥ ७६ ॥**

दुरोनी आश्चर्ये अचळजवळी चचळ असे ।

पुन्हा होतां आज्ञा न स्फुरित निज कांती करितसे ॥
गुरुलोकांमध्यें मग मि दिसतां लाज धरिते ।
मृगाक्षीचें ऐसें नयनयुग शोभेस वरितें ॥ ७६ ॥

**कपोलावुन्मीलत्पुलकनिकुरंबे० ॥ ७७ ॥**

कपोलीं तीचे मी नव पुलक पाहोनि करितां ।
यथाकिंचित् स्पर्श स्फुरितमुखपद्में चि हसतां ॥
वदे कांता द्राक्षारससदृशवाणी निज रसें ।
तया पद्माक्षीचे वचनअमृता मी वदुं कसें ॥ ७७ ॥

**राजानं जनयांबभूव० ॥ ७८ ॥**

हे चंद्रा तुजलागिं राजपदवी ज्यानें दिली तो विधी ।
वृद्धत्वें अज शक्तिकुंठित असे मूर्खत्ववारांनिधी ॥
आता उन्मदखंजरीटनयनावक्त्रारविंदास कीं ।
नित्यश्री किं अखंड राज्य जगिंचें देतो विधी काय कीं ॥ ७८ ॥

**आविर्भूता यदवधि० ॥ ७९ ॥**

प्रादुर्भावा मधुसम जधींपासुनी कृष्णकांती ।
आली नानाजनदृशी समाकर्षणीया जगान्तीं ॥
श्वासोच्छ्वासें वदन किं तधींपासुनी गडपाडू ।
शून्या वृत्ती कुलसुदृशिचें लागली चित्त काडूं ॥ ७९ ॥

**प्रसंगे गोपानां० ॥ ८० ॥**

प्रसंगीं गोपांचे गुरुतर समारंभकरणीं ।
हरीची ऐकोनी पुलकितकपोलांकि तरुणी ॥
विषज्वालावक्त्रांतुनि वमत जो कालिय तया ।
शिरीं त्या कृष्णाचें वदत पद नृत्यास जनि या ॥ ८० ॥

**कैशोरे वयसि क्रमेण० ॥ ८१ ॥**

तन्वींचें कृशतेस बाल्य वय हें येतां शरीरावरी ।
येणारा रतिराज सर्वनृपती तो आज्ञ ऐशी करी ॥
या हेतूस्तव पूर्णचंद्रतुलना वक्त्रांबुजीं भासते ।
पद्माची नयनीं सुधेचि सखिचे हास्यास ही दीसते ॥ ८१ ॥

**शयिता शैवलशयने० ॥ ८२ ॥**

निजली शैवलशयनीं शोभे शोभाविशिष्ट शशिलेखा ।
जैशी तैशी निकटीं आल्या कांतास दे विलोकसुखा ॥ ८२ ॥

**अधरद्युतिरस्तपल्लवा० ॥ ८३ ॥**

अधरद्युति जिंकि पल्लवा । मुख दे चंद्रकलेस लाघवा ॥
तनु अप्रतिमा चि सुभ्रुची । न विधिचे कृतिची जना रुची ॥ ८३ ॥

**व्यस्त्यस्तं लपति० ॥ ८४ ॥**

व्यत्यस्ताक्षर बोलतो क्षणभरी मौनास ही सेवितो ।
आणी सर्व हि वस्तुमात्रविषयीं दृष्टी न तो ठेवितो ॥
दीर्घ श्वास हि टाकितो अवयवीं धैर्यास ना भोगितो ।
ऐसा रावण जानकीविरहिंचे दुःखामध्ये वागतो ॥ ८४ ॥

**उदितं मंडलमिंदो रुदितं० ॥ ८५ ॥**

हिमकरबिंबविकासे विरहीसमुदाय रडत उच्छ्वासे ॥
भासे सकलतरुणि शिरिं ज्याचें शासन किं मदन तो हांसे ॥ ८५॥

**प्राद्रुर्भ० ॥ ८६ ॥**

गगनिं सजल घन येतां कज्जलसें मलिन गगन भासतसे ॥
अरुण हृदय पथिकांचें मृगदृशिचें गंड पांडु शोभतसे ॥ ८६ ॥

**इदमप्रतिमं पश्य सरः० ॥ ८७ ॥**

मित्रा पाहिं सरोवर अनुपम कमळें समावृत दिसे हें ॥
मित्र वदे हे सखया बोलुं नको नारिनेत्र मज दाहे ॥ ८७ ॥

**मुंचसि नाद्यापि रुषं० ॥ ८८ ॥**

त्यजिसि न अजुनि हि रोष तुं सखि घनमाळा किं पावली उदया ॥
ऐशा प्रियवचनानें मृगदृशिदृशिशोणरंग जाय लया ॥ ८८ ॥

**आलोक्य सुंदरि मुखं० ॥ ८९ ॥**

पाहोनि सुंदरि तुझे मुखमंदहास । पद्मभ्रमें भ्रमर पावति हे सुखास ॥
नीलेक्षणें हरिण लांछनसंभ्रमांनीं । चंचू चकोर चपला करिताति वाणी॥८९॥

**स्मितं नैतत् किंतु० ॥ ९० ॥**

नसे हें कीं हास्य प्रकृतिरमणीयें विकासितें ।
म्हणे कीं वक्त्रातें कवण कुसुमें गंधभरितें ॥
स्तनद्वंद्वें मिथ्या कनकनिभ हीं कीं फलयुगें ।
लता ह्या रम्या कीं जगिं न रमण्या भृंग हि तगे ॥ ९० ॥

**संग्रामांगणसन्मुखा० ॥ ९१ ॥**

सग्रामांगणसन्मुखीं नृप किती मेलेत ने त्याहिं जे ।
केले छिद्र तयांत नीलरुचि ही आकाशिची ज्या सजे ॥
तो हा सूर्य महीतळास कवळी अंगारतीक्ष्णाकरें ।

याला कोण शशांक जो म्हणतसे तो मूर्ख ची जाण रे ॥ ९१ ॥

**श्यामं सितं च सुदृशो० ॥ ९२ ॥**

काळें अणी न धवळें सुदृशादृशींचें ।
हें रूप कीं स्फुट विषाणि सुधा चि साचें ॥
नाहीं म्हणूं तरि कसें पतनें अशाचे ।
हो मोह हर्ष हि मनीं तरुणाजनाचे ॥ ९२ ॥

**अलिर्मृगो वा नेत्रं वा० ॥ ९३ ॥**

जे हे अलि किंवा मृग किंवा जे नेत्र कांहिं भासतसे ॥
ते हे कमळ किं इंदू किंवा हरिणेक्षणावदन भासे ॥ ९३ ॥

**सुविरल० ॥ ९४ ॥**

सुविरलमौक्तिकतारा शुभ्रवसनचंद्रिकाचमत्कारा ॥
परिपूर्णवदनचंद्रा सुंदरि तू पूर्णिमा द्युतीधारा ॥ ९४ ॥

**रूपजल० ॥ ९५ ॥**

रूपजळें दृशिमीनें नाभीभवरें सुवेणिभुजगानें ॥
विषमा नदी किं तरुणी जेथें सज्जन हि बुडति गोत्यानें ॥ ९५ ॥

**शोणाधरोष्ठ० ॥ ९६ ॥**

अधरोष्ठ शोण किरणें मिश्रित रमणीय दंतपंक्तिरुची ॥
हे सखि तव मुखकमळीं केशर भासति किं पूर्णरुची ॥ ९६ ॥

**दयिते रदनत्विषां० ॥ ९७ ॥**

तुझिये रदनद्युतींमिसें । सखि हे केशर भासती असे ॥
मकरंदसतृष्ण भृंग ही । धरिती बालसुवेश हे सही ॥ ९७ ॥

**तथा तिलोत्तम० ॥ ९८ ॥**

मृगबालकनयना जी तिलोत्तमेतुल्य आपणा गमते ।
तत्संगें मज हा ची लोक स्वर्लोक जाहला स्वमतें ॥ ९८ ॥

**अंकोयं० ॥ ९९ ॥**

कस्तूरिपंककृत अंक तुझे ललाटीं । ऐसें विलोकुनि मुखांबुज कीं स्वचाटीं ॥
उल्लास फुल्ल अतिकोमळ पक्ष्ममूळ । चंचू सखे हलविती किं चकोरबाळ ॥९९॥

**शिशिरे० ॥ १०० ॥**

सखि पद्म जसें हिमागमें । शशिचें बिंब जसें दिनागमें ॥
न रुचे द्युति तेंवि आननीं । तुझिये रोषभरें च भामिनी ॥ १०० ॥

**चल उ० ॥ १०१ ॥**

चंचळ अलि ज्यावरि त्या कमळापरि चंचळाक्षिवदन मला ॥

दीसे जरि तरि मदन क्रुद्ध असो मज न त्याचि भीति कला ॥ १०१ ॥

शतकोटि० ॥ १०२ ॥

मी वज्रकठिणहृदयी ती केवळ अमृतमयशरीरा कीं ॥
तीचा मित्रपणामज जो दे विधि तो विवेकशून्य चि कीं ॥ १०२ ॥

श्यामले० ॥ १०३ ॥

बाळे सुनीळ चिन्हें भाळीं अंकित तुझें वदन शोभे ॥
अतरिं निद्रित भृंग प्रफुल्लकमळापरी किं मन लोभे ॥ १०३ ॥

अद्वितीय० ॥ १०४ ॥

द्युतिनें अनुपम अपणा गणोनि चंद्रा कशास हर्षसि गा ॥
विस्तृत हें भूमंडळ कवणें अवलोकिलें कि मूढा गा ॥ १०४ ॥

नीलांचलेन० ॥ १०५ ॥

नीलांचलें सुवेष्टित आनन शोभे किं हरिणनयनेचें ॥
जैसा प्रतिबिंबित शशी भासे मध्यें जळांत यमुनेचे ॥ १०५ ॥

स्तनाभोगे० ॥ १०६ ॥

गळापासुनि सुटला कुटिल अलक भासतो स्तनावरि हा ॥
जैसा शशिबिंबांतुनि लोबतसे सर्प मेरुगिरिवरि हा ॥ १०६ ॥

यथा लता० ॥ १०७ ॥

जशी लतेला स्तबकानतेला । नम्रस्तनें शोभसि तुल्यलीला ॥
तशी लतापल्लविनी समा कीं । रक्ताधरा मानिनि या तु शांकीं ॥ १०७ ॥

इदं लता० ॥ १०८ ॥

गुच्छें सुनम्रा लतिका जिथें कीं । सदैव तें कानन सेविजे कीं ॥
जरी मनाला स्तनभारधारी । हरीतिना सुदर त्या सुनारी ॥ १०८ ॥

सा मदागमन० ॥ १०९ ॥

ती मदागमनतोषसुपात्री । जागरें क्रमवि सर्व हि रात्री ॥
त्या प्रभाति मुखगंधहरांहीं । बोधिली हि न उठे भ्रमरांहीं ॥ १०९ ॥

अविचिंत्य० ॥ ११० ॥

अवितर्क्य शक्ति पुरुषार्थ ज्या असे । मग त्या प्रसिद्ध मदनाचिये वसे ॥
विधुचें विधुत्व हरि वक्त्र हे तुझें । कमळत्व सगृहीं न लोचना वझे ॥ ११० ॥

मीनव० ॥ १११ ॥

नयनें चि मत्स्ययुक्ता करचरणें फुल्लकमलसंयुक्ता ॥
केशें शैवलयुक्ता सुंदरि सरसी दिसे सुरस रक्ता ॥ १११ ॥

**पांथ मंदमते० ॥ ११२ ॥**

पांथा मदमते तूं कां संतापासि पावशील उगा ॥
वांछीं पयोधरातें जेणें संतापशांति पावसि गा ॥ ११२ ॥

**संपश्य० ॥ ११३ ॥**

स्वकांतिनें भासवि सर्व लोका । शरीर जीचें कृश कीं विलोका ॥
जे तीजला पाहति त्या जनांचे । ज्योत्स्नातडित्संशय चित्ति नाचे ॥ ११३ ॥

**सपल्लवा० ॥ ११४ ॥**

सपल्लवा काय दिसे किं मजरी । प्रफुल्लपद्मा किं सरोजिनी खरी ॥
स्मिताननो पाणिपदें सुशोभिता । मनीं असा संशय तीज पाहतां ॥ ११४ ॥

**नेत्राभिराम० ॥ ११५ ॥**

नयनाभिरामरामावदनाप्रति पाहुनी किं सकळ जनीं ॥
कीं हें सरसिज अथवा तुषारकरबिंबसंशय स्वमनीं ॥ ११५ ॥

**कनक० ॥ ११६ ॥**

कनकापरि गौर जानकी । करि आलिंगन त्या प्रियास कीं ॥
वनि चातकपोत पाहुनी । घनविद्युद्भ्रम घेति नर्तनीं ॥ ११६ ॥

**वनितेति० ॥ ११७ ॥**

इजला वनिता यापरि ह्मणती जे ते म्हणोत निजवाचे ॥
तरुणाला फलरूपिणि होय तपस्या किं हें असे साचें ॥ ११७ ॥

**स्मयमान० ॥ ११८ ॥**

सस्मितवदना पाहुनि विलासिनीचे किं त्या स्थळीं सकळ ॥
भ्रमर हि चकोर पक्षी हर्षें उत्कर्ष मानिती चपळ ॥ ११८ ॥

**वदन० ॥ ११९ ॥**

मुग्धे वदनसरोजीं हास्यद्युतिलेश धरिसि ज्या वेळे ॥
जाणें मि पंचबाणें जग वश केलें असे कि त्या वेळे ॥ ११९ ॥

**कालिंदकन्या० ॥ १२० ॥**

कालिंदकन्याजळिं अर्ध मग्न । बक स्वशब्दीं असती निमग्न ॥
वाटे किं वैरें गिळिले तमानें । आक्रोशती चंद्रशिशू भयानें ॥ १२० ॥

**परस्परालिंगन० ॥ १२१ ॥**

परस्परालिंगनिंचे सुखानें । ते पुष्ट कांतास्तन हें च मानें ॥
त्याहांचि उंची न सहे म्हणोनी । हा मध्य होतो कृश मत्सरानीं ॥ १२१ ॥

**जनमोहन० ॥ १२२ ॥**

सखि हा तव वेणिरूप आहे । जनमोहप्रद अंधकार पाहें ॥

न इये मुखचंद्रकांति जाये । म्हणुनि श्यामळ कांति पूर्ण ज्या ये ॥१२२॥

दिग्विनिर्श० ॥ १२३ ॥

आकंठ पाण्यांत निमग्न हा हे । कीं सूर्यसेवेस करीत आहे ॥
ही पद्मपंक्ती मृगलोचनेचे । स्तनत्वलाभार्थ किं काय हेचे ॥ १२३ ॥

वियोग० ॥ १२४ ॥

विरहाग्निकुंडरूपी हृदय तुझें हें वियोगिनी जाणें ॥
कीं येथें तप करितो प्रियसंगसुखार्थ मुक्तहार गणें ॥ १२४ ॥

निधिलावण्य० ॥ १२५ ॥

निधी लावण्याचा तव मुख घडी जो विधि तया ।
असे भ्रांती मोठी सखि अशि किं या पद्मतनया ॥
उपेक्षी कीं तूला विकळसम हा या जगिं करे ।
कलाहीना दीना विधुसि नृपती जो निज करें ॥ १२५ ॥

स्तनांत० ॥ १२६ ॥

कुचयुग्ममध्यरत्नस्वरूप बाहेर येत अनुरागें ॥
सखि तुझें मन पाहे प्रियाप्रती मति अशी मला वागे ॥ १२६ ॥

जगदंत० ॥ १२७ ॥

त्रिभुवन जो निज अमृतप्रचुरमयूखांहिं भरितसे भारी ।
तो हा मृगशिशुदृशीचे वदनमिषें चंद्र काय उदय करी ॥ १२७ ॥

तिमिर० ॥ १२८ ॥

तिमिर शारद चंद्र हि तारका । कमळ विद्रुम चंपक कोरका ॥
मिळति एकट हे जरि सर्व ही । तरि तिचे वदना तुलना सही ॥१२८॥

प्रिये वि० ॥ १२९ ॥

टाकीं प्रिये रोष अशी प्रियाची । सस्नेहवाणी परिसोनि साची ॥
गळे किं नेत्रांतुनि वारिधारा । मनांतुनी मान तिचे उदारा ॥ १२९ ॥

राज्याभिषेक० ॥ १३० ॥

मदनास त्रिभुवनिचा जाणुनि राज्याभिषेक होणार ।
भूमंडळास लिपी सुखें सुधाकर किं काय शुभचार ॥ १३० ॥

आननं० ॥ १३१ ॥

मृगबाललोचनेचें चपलालकयुक्त वदन पाहुनियां ।
भ्रममाणभ्रमरभरें आवृत कमलास मी स्मरें मनिं या ॥ १३१ ॥

यांती ग० ॥ १३२ ॥

गुरुजन सहित गमन करि हंसत असे मंद मंद मुखकमळीं ।

मान हि फिरवुनि तरुणी पाहे तत्क्षणिं अपुत्र जगिं झाली ॥ १३२ ॥

**नयनानि० ॥ १३३ ॥**

नयनास असो किं खंजनाचें । बहु चांचल्य सदैव दैव साचें ॥
परि या सुदृशीमुखास कैसें । सम तें नश्वरकांति पद्म बैसे ॥ १३३ ॥

**मृणाल० ॥ १३४ ॥**

मृणालमंदानिलचंदनाची । बाळाणिशैवालकुशेशयाची ॥
शैत्यप्रतीति न च होय त्यां हो । वियोगसतप्त किं चित्त ज्यां हो ॥ १३४ ॥

**विबोध० ॥ १३५ ॥**

अविकसितवदनपद्मा पद्मिनि ते जागवी करस्पर्शें ।
अनुरागपूर्णभास्कर कुरकरि जो तापतस्कर स्वयशें ॥ १३५ ॥

बदोनि सुंदर वचें बहु वारितां ही ।
मी रोषयुक्त किं विदेशगतीस साहीं ॥
बाळा करांगुलिवशें किं बिडालबाळें ।
माझे पथास अवरोध करी स्वचाळें ॥ १३६ ॥

**अभूद० ॥ १३७ ॥**

असे निर्विघ्नानें कुसुमशरकोदंडमहिमा ।
जनाचे नेत्राचा ज्वर हि लय पावे सह तमा ॥
सुधाधारावर्षी तव वदन हें तन्वि मग हा ।
कशाला कीं इंदु प्रतिदिवसिं पावे उदय हा ॥ १३७ ॥

**विनैव० १३८ ॥**

महा विवेकें जगिं पूज्य होती । त्यांहांस शस्त्राविण कापिताती ॥
अगाधमायामयदिव्यलीला । त्या शोभती पद्मदृशी किं बाला ॥ १३८ ॥

**नदवधि० ॥ १३९ ॥**

नधिपासुनि लीलेचें गृह हें तारुण्य शशिमुखी पावे ॥
तधिपासुनि तरुणांचें दहनाविण दाह हृदय ही पावे ॥ १३९ ॥

**न मिश्रय० ॥ १४० ॥**

न ते मिळवि नेत्र ही हंसुनि ही वदेना किं हो ।
कपेत तुमचे करी भ्रुकुटि वक्र कीं कांत हो ॥
सपत्निचि कथा अशी प्रियसमीप तीं सांगतां ।
स्वयें स्वविषिचे प्रियप्रणयि घेतसे व्यंगता ॥ १४० ॥

**वडवानल० ॥ १४१ ॥**

वडवानळइंदिराविषाहीं । मगरव्याळगणांहि तुल्य पाहीं ॥

उपजोनि वाढला शशी तो । मनुजप्राण म्हणोनि घेतसे तो ॥ १४१ ॥

लभ्यते० ॥ १४२ ॥

मिळे किं पुण्यें गृहिणी मनोज्ञ । योगें तिचे पुत्र पवित्र सुज्ञ ॥
योगें तयाचें यश होय लोकीं । तयें यशें नांदत देवलोकीं ॥ १४२ ॥

प्रभुरपि० ॥ १४३ ॥

प्रभु ही याचितसे जरि तरि हे सुंदरि लघुत्व पावतसे ॥
कीं मी तवाधरार्थी तुवां चि केलों निराश विमुखवशें ॥ १४३ ॥

जलकुंभ० ॥ १४४ ॥

जलकुंभपूर्णरस तू सरोवरांतुनि भरूनि आणिसि गे ।
परि तत्र तीरनिकुंजीं गुप्त सुरत कामराज जाणत गे ॥ १४४ ॥

त्वमिव० ॥ १४५ ॥

पथिका तुजसा मम पति झाडोझाडींच दुःख भोगितसे ।
कीं मी अझुन हि याचें कवण कुशल याहुनी हि अन्य असे ॥ १४५॥

किमिती० ॥ १४६ ॥

का तू कशा कशोदरि काय तुला फळ किं अन्यवृत्तातें ।
वद कीं मम हर्षार्थ चि पथिका तव सुदरी कथिल तुज तें ॥ १४६ ॥

तुला न० ॥ १४७ ॥

न पाहुनीयां निज साम्य कोठें । नको धरूं गर्व किं गौरि मोठें ॥
आहेत नानाफळभारयुक्ता । लता बहू काननिं गर्वसक्ता ॥ १४७ ॥

इयमु० ॥ १४८ ॥

विकसे तुझिये मुखाचि कांती । विकसे नेत्र सरोजयुग्म अन्तीं ॥
मज वाटतसे किं नीळ मेघे । जगिं हा मेघमय प्रकाश ओघे ॥ १४८ ॥

आसायं० ॥ १४९ ॥

सायकाळावधि जळिं कमल तपे सेवुनि किं रवीलागीं ॥
मानिनि या समयीं ते पावतसे तव मुखोपमेलागीं ॥ १४९ ॥

अयि मदि० ॥ १५० ॥

सखि जरि तूं निजमुख हें मद स्मित रुचिर थोडसें करिसी ॥
तरि हें जाण किं आता राकापतिसार्वभौमपद हरिसी ॥ १५० ॥

मधुरव० ॥ १५१ ॥

अत्यंत रुचिर हांसे अपणाशीं आपण हळु हळु बोले ॥
त्रैलोक्य लाल पाहे शून्यविषय मद्यपी मनीं डोले ॥ १५१ ॥

मधुरसा० ॥ १५२ ॥

अधर गोड तुझा मदिरेहुनी । म्हणुनि दे वदनीं मम ठेवुनी ॥
निज करें धरि हा कर सुंदरी । मग पडे मम भीति घरेवरी ॥ १५२ ॥

शलेनोपा० ॥ १५३ ॥

कसाही कष्टानें चढुनि बसला सौधशिखरीं ।
तिथें ही एकांतीं कुसुमशयनीं निद्रित नरी ॥
नृपाची कांता जी कृशतनु भयें चचलदृशी ।
सनिःश्वासें तीला सुकृति हसती लोक रविशी ॥ १५३ ॥

गुंजंति मं० ॥ १५४ ॥

भोवति मजुल गुजति जावुनि धांवति कितीक सन्मुख ही ॥
राहति निकटि कितिकिती पतति सरसीमधें शिलीमुख ही ॥ १५४ ॥

यथायथा० ॥ १५५ ॥

जशी जशी ग्या कमलेक्षणा कीं । पुन्हा पुन्हा प्रेमळ भोगिली कीं ॥
तशी तशी तत्वकथेपरी ते । बोधोनिया एक रसा करीते ॥ १५५ ॥

हरिणीप्रे० ॥ १५६ ॥

ग्या घरि मृगनेत्रा कीं गृहिणी न दिसे न होय तें भवन ॥
यद्यपि सकळा ऋद्धी असति तथापि हि गणा कि तें चि वन ॥ १५६ ॥

लोलालको० ॥ १५७ ॥

ते चूर्णकुतल कीं चचल भासताती । नेत्रारविंद हि अमंद चि हासताती ।
ऐसे रिती तरुणलोचनहारणारी । कांताचिये सदनि चालत जाय नारी ॥१५७॥

दंतांशु० ॥ १५८ ॥

दतांशु सुदर कि पद्म रमापहारी । मृगाक्षिचें वदन सांद्रसुधाविहारी ॥
विद्वद्वरिष्ठ विधि यास घडून कैसे । ना चद्रबिंब पुनरुक्त समान पुसे ॥१५८॥

सानुकंपा० ॥ १५९ ॥

सस्नेह सदय चतुर हि शीलें ज्या फार रुचिर भासति कीं ॥
कामिनिच्या मनवृत्ती रसिकाचें हृदय रम्य हारति कीं ॥ १५९ ॥

अलकाफणी० ॥ १६० ॥

फणिबाळसमान केश जीला । धरिती नेत्र सपुखबाणलीला ॥
विलसे कि तडिल्लतेत प्रमाणें । असि कांता सुरधामि मी न जाणे ॥ १६० ॥

वचने० ॥ १६१ ॥

तुझिये वचनांत माधुरी जे । हृदयीं पूर्ण दया हि पूर्वि साजे ॥

अजि हे हरिणाक्षि या गुणाची। गति अन्य च कीं दिसे मला किं साची॥१६१

**अनिशं० ॥ १६२ ॥**

नयना रमवीतसे सदा। मुख जें गर्व धरी स्वसंपदा॥
मग त्या निशि हीनशोभ जें। तुलने पंकज तें कसें सजे॥ १६१ ॥

**अंगैः सु० ॥ १६३ ॥**

ती अति सुकुमारांगी शोभा कुसुमाचि हारितसे अंगें॥
हा पुष्पबाण माझे प्राण विकळ करी शराचिये रंगें॥ १६३ ॥

**खिद्यामि० ॥ १६४ ॥**

ती कोमलचरणा पथिं खिन्न असे अतिनितंबभारानें॥
तीचें रूप विलोकुनि विकळ मनीं मी हि खेद बहु मानें॥ १६४ ॥

**मथुरा० ॥ १६५ ॥**

मथुरापुरीं जातसे मुरारी। तंव तो प्राण हि भार गोपनारी॥
प्रलयाग्निसमान पूर्णिमासी। सदनाकाश हि होय अंबुराशी॥ १६५ ॥

**केलीमंदिरमागतस्य० ॥ १६६ ॥**

क्रीडामंदिरिं जावुनी हळुहळू त्या दूर केल्या सख्या।
क्रोधें निद्रित कामिनीस विजणा वारीतसें मी सख्या॥
तेव्हां जाणुनि हीं न जाणत जशी तैसे रिती लावुनी।
दोळे ती मम हस्त ठेवित उरीं मी श्रांत हें बोलुनी॥ १६६ ॥

**मांथर्यगमनं० ॥ १६७ ॥**

बाल्यासवें गमन होय किं मंद तीचें।
चित्तासवें अधरबिंब हि लाल तीचें॥
आणी नितंब बरवा मदनासवें कीं।
मोठा असे सकळिकांहुनि तीजला कीं॥ १६७ ॥

**श्वासोनुमानवेद्यः० ॥ १६८ ॥**

जाणें श्वास तिचा मी तर्केंची शीत अंग चपळ दृशी॥
ही तत्कथा असो रे इतरकथा सांग तूं समयसदृशी॥ १६८ ॥

**पाणीकृतः पाणि इलासुतायाः० ॥ १६९ ॥**

त्या जानकीचे करिं राम ठेवी। जो हस्त सस्वेद किं कंप सेवी॥
तुषारसंगानिलविव्हळाची। ती अंबुजाची द्युति घेत साची॥ १६९ ॥

**अरुणमपि विद्रुम० ॥ १७० ॥**

माधुर्यातिशयानें बाले तव अधर हा चि अधर करी॥
अतिकोमळ ही किसलय आरक्त हि ती प्रवालतरू लहरी॥ १७० ॥

सुदृशो जितरत्नमालया० ॥ १७१ ॥

सखिची जितरत्नजालिका । सुरती जी श्रमबिंदुमालिका ॥
कैनकांपरि ते ललाटकीं । बरि अन्योन्यहचोस देति कीं ॥ १७१ ॥

परपुरुषदृष्टिपात० ॥ १७२ ॥

परपुरुषनेत्रवज्रभीता । प्रविशे रामहृदंबुजांत सीता ॥
परकामिनिसर्पिणीभयानें । प्रविशे तो हि तिचे असें मि मानें ॥ १७२ ॥

अंगानि दत्त्वा० ॥ १७३ ॥

कनकांगि अंग देउनि तरुणांचे प्राण विकत घेसी तूं ॥
हें योग्य चि परि लोचनसरोजकोणें न योग्य नाणीं तूं ॥ १७३ ॥

जितरत्नरुचां० १७४ ॥

जितरत्नरुची असे रदाचे । सहवासें मनिं जीस हर्ष सांचे ॥
अशिया तव नासिकेस मोत्तीं । करितें नीच कि रोषयुक्त चित्तीं ॥१७४॥

विलसत्या० ॥ १७५ ॥

नासाग्रमौक्तिकानें शोभतसे वदन त्या सुनयनेचें ॥
जैसें बुधसयुक्त कि भासतसे बिंब पूर्णचंद्राचें ॥ १७५ ॥

निभाल्य भूयो० ॥ १७६ ॥

पुन्हा पुन्हा पाहुनि गौर कांती । नको धरूं गर्व तुं मानसांतीं ॥
घरोघरीं पाहि तुझ्या तनूशा । मुधे सुवर्णावळि त्या बहूशा ॥ १७६ ॥

करिकुंभतुलामुरोजयोः० ॥ १७७ ॥

गजगंडतुळा स्तनास गे । कवि देती भयशून्यचित्त गे ॥
सखि सादर ऐकिसी कसी । उलटें ही सुलटें स्त्रियाहिंसीं ॥ १७७ ॥

परिरब्ध० ॥ १७८ ॥

आलिंगना रोषवशें अनादरी । तेव्हां निजे कांत पराङ्मुखा धरी ॥
कां दुःख मानें किं असें भयें सती । आलिंगुनी त्यास असे किं चुंबिती ॥१७८॥

चेलांचलेनाननशीतरश्मि० ॥ १७९ ॥

वस्त्रें मुखेंदुप्रति झांकितां ही । श्रीकृष्णवक्त्राप्रति पाहतां ही ॥
व्रजांगनेची मदजन्य कंपें । दिली असे नीवि अकाळ झंपे ॥ १७९ ॥

अधरेण समागमाद्रे० ॥ १८० ॥

अधरें सहवास दंति होतां । अरुणत्वें मग शुक्ररंग जातां ॥
हसितास साम्य पावुनीयां । मग ये शुक्ल सुरग धावुनीयां ॥ १८० ॥

सरसि सहोदर० ॥ १८१ ॥

हे मृगनयने तव मुखसरसिरुहोदरसुगंध वाहतसे ।

धरि निर्जित बिंबाधरमणिसम अणि दंतवीटि तकुं कसें ॥ १८१ ॥

**शयिता सविधेप्यनीश्वरा० ॥ १८२ ॥**

निजलो पतिसन्निधी हि जे । परि ते कामफळास ना भजे ॥
सुदृशी प्रियवक्त्रपद्म तें । दृशि किंचिन्मिळवोनि पाहते ॥ १८२ ॥

**वदनारविंदसौरभ० ॥ १८३ ॥**

वदनारविंदसौरभलोभें स्खलताति भोंवतीं भृंग ॥
मी अधरामृत इच्छीं तव धरि सुदृशीदृशी रुषारंग ॥ १८३ ॥

इति श्रीबुट्टीकुलालंकार गुणिजनावतंस श्रीमन्मित्रवर्य दाजीबाबुट्युद्योतित रुक्मिणीवल्लभसूरिसूनु कविगंगाधरकृतायां भामिनीविलाससमश्लोकीमहाराष्ट्रभाषाव्याख्यायां सज्जनवल्लभासमाख्यायां शृंगारविलासो नाम द्वितीयो विलास. ॥ २ ॥

---

## शृंगारविलासावर—टिप्पण.

श्री अंब । श्रीगणेशाय नमः। आतां शृंगारविलासाचें टिप्पण लिहितों; श्लोक ॥ १ ॥ सं० । आतां पंडितराज अन्योक्तिविलासेंकरून दिल्लीचे पादशाहास प्रसन्न करून त्यानें दिली जी आपली लवंगिका नामक कन्या तिचे विनोदार्थ शृंगाररसप्रधान द्वितीय विलासास प्रारंभ करितो. त्यांत प्रथमत. कोणी नायक नायिकेतें स्तवितो । अ० । राहुशंका नसणें या हेतूनें मुखकांतीची वृद्धि म्हणून काव्यलिंग। आणि राहुशंकाभावादिक येथें वस्तु सांगितली तेणेंकरून उपमेयमुखाचा चंद्रापेक्षां उत्कर्ष सांगितला म्हणून व्यतिरेक । तो अर्थाचे शक्तीनें व्यंग्य होतो । व्यं० । लोकांत ही चिंतेनें कांती क्षीण होते, चिंता नसल्यास ती वाढते ही गोष्ट प्रसिद्ध आहे । प० । अणुमात्र । थोडी ही । पांडु । शुभ्र । द्युति । कांती ॥ श्लोक० ॥ २ ॥ सं० । नायिकेचे अंगाचे नाजुकपणास वर्णितो ॥ येथें ही व्यतिरेक. । प० । कठुरा । कठोर ॥ श्लोक ॥ ३ ॥ सं० । कोणी विरही कोणा एका नायिकेचें अनुभवलेलें मंजुळ हसितादिक सख्याजवळ सांगतो ॥ व्यं० । येथें चिंताविशेषविभावें करून आक्षेपेंकरून जाणायास योग्य जें भ्रू हलविणें आणि शरीराचा अचांचल्यअनुभव तिहींकरून व्यज्यमान स्मृति नामक व्यभिचारी भाव रसिकाचे हृदयांत प्रवेश करून चमत्कार करितो म्हणून भावध्वनि । प० । संध्या० । सायंकाळ । श्लो० ॥ ३ ॥ सं० । कोणी सख्याशीं बोलतो ॥ व्यं० । आनंद अंकुरवि या अर्थांतून उत्तरोत्तर आनंदाची वृद्धि होते हें । प० । हिंदोल । झुला । पाळीं । प्रांतीं । मदिरेक्षणेची । मत्तखंजननयनेची । श्लो० ॥ ४ ॥ सं० । कोणी सखी नायिकेतें बोलते ॥ व्यं० । मुख्यार्थें करून

तुझें मुख अंकचंद्रिकायुक्त चद्ररूप आहे हें व्यंग्य आहे ह्मणून व्यंग्यरूपकालं-कारध्वनि । प० । सांजवाटीं । सध्याकाळीं ॥ ५ ॥ श्लो० ॥ ६ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीचा वृत्तांत कोणास सांगतो ॥ व्यं० । लज्जाख्य व्यभिचारीभाव । दृष्टि शृगाररसाची, जिला कांतादृष्टि ह्मणतात । विलास नामक हाव आहे । अ० स्वभावोक्ति । प० । पुत्रिणि । पुत्रवती । सुकांती । रम्यकांती ॥ श्लो० ॥ ७ ॥ सं० । कोणी विरही बोलतो । अ० । उपमा । व्यं० । भय आणि औत्सुक्य आहे ह्मणून भावसंधि । या दोघांहींकरून आणि संतापें करून विप्रलंभशृंगार । प० । अणु फुल्ल । कांहीं एक उगवलेले ॥ श्लो० ॥ ८ ॥ सं० । कोणी नायक नायिकेतें वदतो ॥ अ० । एकया कुचाला च बदरादिकाचे शोभेकरून वर्णिलें ह्मणून पर्याय । आणि उत्तरोत्तर कुचांचाच उत्कर्ष वर्णिला ह्मणून सार । प० । बदर । बोर । आमलक । आंवळा । आम्र । आंबा । दाडिम । दाळिंब ॥ श्लो० ॥ ९ ॥ सं० तरुणीचे स्तनांची उंची वर्णितो । अ० । सार । प० । जबीर । निंबू । द्युति । शोभा । हेमपर्वताते । मेरूते ॥ श्लो० ॥ १० ॥ सं० नायक नायिकेतें स्तवितो ॥ अ० । उत्प्रेक्षा । प० । ललितालकांहीं ॥ सुंदरकेशांहीं । स्फुरे । भासे । श्रवणेंदिरा । कर्णशोभा । हे सुंदरीपक्षीं जाणावें । आतां उत्तर दिशेचे पक्षीं । ललितालका । ही । रम्यकुबेरनगरी ॥ वैश्रवणेंदिरा । कुबेरलक्ष्मीयुक्ता ॥ श्लो० ११ । सं० । कोणी कोणे स्त्रीचें सौंदर्य सख्यास सांगतो । व्यं० । स्मृति व्यभिचारीभाव । प० । नीवी । वस्त्रग्रंथी । श्लो० ॥ १२ ॥ सं० नायक सख्याशीं बोलतो । व्यंग्य । लज्जाव्यभिचारीभाव । विलास हाव । प० । आलाप । भाषण । सौदामिनी । वीज ॥ श्लो० ॥ १३ ॥ सं० । नायक आपुलेवरची नायिकेची प्रीति सख्यास सांगतो ॥ व्यं० ॥ शृंगारस्थायीभाव रति अ० । स्वभावोक्ति ॥ श्लो० ॥ १४ ॥ सं० । कोणी कोणाशीं बोलतो ॥ श्लो० ॥ १५ ॥ सं० । कोणी विरही आपुला अभिलाष सांगतो ॥ व्यं० । रविकिरणसंतप्तास चंद्रिका जशी शीतळ करिते तशी विरहाग्निसंतप्ताला मला ती मृगाक्षी कधीं शीतळ करील हे ॥ अ० । उपमा । प० । देहली । देहलद=देलज ॥ श्लो० ॥ १६ ॥ सं० । नायक स्वप्रियावृत्तांत सख्यास सांगतो ॥ व्यं० । येथें संकेत काळीं प्रियागमनरूप विभावेंकरून मुखविलासादिरूप अनुभावें करून व्यज्यमान हर्षात्मक व्यभिचारीभाव । अलं० । यत्नावांचून इष्टलाभ झाला ह्मणून प्रहर्षण । श्लो० ॥ १७ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीपुरुषांचा वृत्तांत कोणास सांगतो । व्यं० । येथें भलते वेळेस स्तनस्पर्शरूप विभावेंकरून लाल डोळे एकतंड बहाणेंरूप अनुभावें करून अमर्षात्मक व्यभिचारीभाव ॥ श्लो० ॥ १८ ॥ सं० । नायक प्रियावृत्तातें सख्यास सांगतो । व्यं० । हे अमकया मोठें अनुचित केलेंस

या अर्थे अमर्षात्मक व्यभिचारीभाव ॥ श्लो० ॥ १९ ॥ सं० । नायक सुरतीं भेकाड नायिकेतें ह्मणतो ॥ अ० । अकारणप्रणतीपासून अनुधाराह्मप कार्य ह्मणून विभावना ॥ प्रणतीरूप कार्य असतांही संतोषरूप कार्य न झालें म्हणून विशेषोक्ति ही । जीवनसंशय या अर्थी अतिशयोक्ति तस्मात् यांचा संकर आहे। श्लो० ॥ २० ॥ सं० । नायक आपुलेविषयींची नायिकेची प्रीति सख्यास सांगतो ॥ व्यं० । सुरताभिलाष । अ० । अपन्हुति । आणि पतीचा आशय जाणून हें मलाही संमत आहे या अर्थी बाहुनाळप्रदर्शनरूप चेष्टा कामिनीनें केली म्हणून सूक्ष्मालंकार ही । प० । कंड । खाज । श्लो० ॥ २१ ॥ सं० । कोणी स्वप्नांत नायिका बोलते असें पाहून निद्रेला म्हणतो ॥ अ० । प्रहर्षण । व्यं० । स्वप्नात्मक व्यभिचारीभाव विप्रलंभशृंगार हा ॥ श्लो० ॥ २२ ॥ सं० । कोणी कोणाशीं बोलतो ॥ अ० । सशयालंकार । नायिका पद्मीनी । प० । सरोज । कमळ । नीरांत । पाण्यांत ॥ श्लो० ॥ २३ ॥ सं० कोणी कोणे नायिकेचें वर्तमान कोणास सांगतो । अ० । स्वभावोक्ति । व्यं० । सपत्नीहारचिन्हदर्शनरूपविभावें-करून स्कंधावरून भुजआकर्षणरूप अनुभावेंकरून रोषात्मक व्यभिचारीभाव । नायिका खंडिता । प० । तन्वि । कृशांगी ॥ ॥ श्लोक २४ ॥ सं० । कोणी विरही सख्याशीं बोलतो ॥ प० । संगम । संभोग ॥ श्लो० २५॥ सं० । कोणी स्ववृत्तांत सख्यास सांगतो ॥ अ० । पूर्णोपमा । व्यं० । रत्यात्मक स्थायीभाव । प० । लक्षी । पाही ॥ ॥ श्लोक० ॥ २६ ॥ सं० । कोणी दूती नायिकेची विरहव्यथा नायकाजवळ सांगते ॥ व्यं० । येथें प्रियविरहें विभावें अंगविक्षेपादिकें अनुभावें व्याधिनामक व्यभिचारीभाव । प० । आर्ता । दुःखिता ॥ ॥ श्लो० । २७ ॥ सं० । नायक सख्यास ह्मणतो ॥ नायिका परकीया ॥ श्लोक ॥ २८ ॥ सं० । कोणी चंद्रातें म्हणतो ॥ श्लोक । २९ ॥ सं० कोणी विरहिणी सखीशीं बोलते । अ० । समुच्चय । श्लो० ॥ ३० ॥ सं० । कोणी सख्याशीं बोलतो । अ० । कामिनीचा सुरताभिलाष जाणून कपोतचेष्टा दाखवून तुझी ही गति अशी च करीन या अर्थे विहित ॥ व्यं० । कपोतदर्शनविभावें वदननमनें अनुभावें लज्जात्मक व्यभिचारीभाव ॥ ॥ श्लो० । ३१ । सं० । कोणी सखी नायिकेतें सांगते । अ० । वदनकांतीनें चंद्रकार्य केलें म्हणून तुझें मुख चंद्र होय असें रूपकालंकाराचें ध्वनित ॥ प० । लोपनें । लपणे । श्लो० ॥ ३२ ॥ सं० । कोणी आपुले प्रियेचा वृत्तांत सख्यास सांगतो । अ० । कुच-कलश या अर्थी रूपक । व्यं० । लज्जात्मक व्यभिचारीभाव । हाव विलास ॥ श्लोक ३३ ॥ सं० । कोणी प्रियावृत्तांत सख्यास सांगतो । अ० । इंद्राचे ही लक्ष्मीस तुच्छ मानी या अर्थी अतिशयोक्ति । व्यं० ।

विपरीत रतिरूप विभावें स्पंदराहित्यशयनादिकें अनुभावें श्रमात्मक व्यभिचारी-भाव ॥ प० । हृदयीं ॥ हृदयकमळीं ॥ ॥ श्लोक ३४ ॥ सं० । कोणी सख्याशीं बोलतो । व्यं० । सूर्योदयें विभावें प्रियावियोगादिकें अनुभावें विबोध नामक व्यभिचारीभाव । प० । झोंपवीं आणि प्रिया भेटवीं ॥ श्लोक ॥ ३५ सं० कोणी कोणाशीं बोलतो । अ० । श्रुतिशतभारतादिकांचे अभ्यासें संताप शांति असतां ही ती नाहीं या अर्थी विशेषोक्ति । संतापशांतीचें अकारण नकारापासून ही झाली या अर्थी विभावना ॥ श्लोक ३६ ॥ सं० । कोणी सखी विरहिणी नायिकेतें बोलते ॥ प० । लवली । हर्परेवडी । पुंडरीक । पांढरें कमळ ॥ श्लोक ३७ ॥ सं० । कोणी कोणाशीं बोलतो ॥ व्यं० । लज्जा आणि औत्सुक्य यांचा संधि ॥ श्लो० ३८ ॥ स० । मिथिलापुरींचे लोक जानकी स्वयंवरप्रसंगीं संदेह करितात । अ० । संदेह । व्यं० । चिंताख्य व्यभिचारी भाव ॥ श्लो० ॥ ३९ ॥ स० । कोणी कोणातें नवा वृत्तांत सांगतो । अ० उपमा । व्यं० । नवविवाहितनायिकाकरग्रहणें विभावें कंपें अनुभावें त्रासात्मक संचारी ॥ हा रसाभास म्हणवितो कीं कांतास रस आहे परंतु कांतेस नाहीं । प० । जालांतीं ॥ जाळ्यामध्यें ॥ श्लोक ४० ॥ सं० कोणी म्हणतो कीं कामिनीवर माझी प्रीति निर्बाध आहे । अ० । विशेषोक्ति । निर्वेदकारण असतां ही निर्वेद नाहीं झाला म्हणून ॥ श्लोक ४१ ॥ सं० । प्रवासावरून कांत येऊन कांतेचें वर्तमान दूतीस पुसूं लागला तेव्हां दूती कांतेचें विरहावस्थेंतील वर्तमान सांगते । व्यं० । प्रियविरहें विभावें असंबद्ध भाषणें अनुभावें उन्माद व्यभिचारी भाव ॥ श्लोक ४२ ॥ सं० कोणी गोपीचा वृत्तांत सांगतो । अ० । प्रहर्षण ॥ प० । महेंद्रनीलमणी । श्रीकृष्ण ॥ श्लोक ४३ ॥ सं० । गोपीचें भाग्य वर्णितो । अ० । विषम ॥ श्लोक ४४ ॥ सं० कोणी दूती नायिकेचें अंगसौंदर्य वर्णन करीत होत्साती बोलते । अ० । प्रतीप ॥ श्लोक ॥ ४५ ॥ सं० । कोणी नवसंगमदंपतीचे नेत्रोत्सवातें वर्णितो । अ० । स्वभावोक्ति ॥ श्लोक ४६ ॥ स० तरुणाचें धैर्य फार थोडें हें सांगतो । अ० । फार देऊन थोडें घेतलें या अर्थी परिवृत्ति । प० । नति । नमस्कार ॥ श्लोक ॥ ४७ सं० । कोणी कोणाशीं बोलतो ॥ अ० । यौवनवर्णनांगत्वेंकरून वर्णनीय वाण्यादिकांचा माधुर्यधारणक्रियेंत अन्वय केला म्हणून तुल्ययोगिता ॥ विभ्रमनामक हाव ॥ श्लोक ॥ ४८ ॥ सं० । कोणी नायिकेचे नेत्रद्वयास वर्णितो ॥ अ० । उत्प्रेक्षा । प० । लहरीचें । चंचळतेचें ॥ श्लोक ४९ ॥ सं० । कोणी नायिका वृत्तांत सख्यास सांगतो । अ० । स्वभावोक्ति । प० । जिभली । जीभ । नेमी । ठेवी ॥ श्लोक ५० ॥ सं० कोणी मानवती मुग्धेचें वर्तमान कोणास सांगतो ॥ व्यं० । रति स्थायीभाव ॥

श्लोक ॥ ५१ ॥ सं० । कोणी मानिनीचा वृत्तांत कोणास सांगतो ॥ श्लोक ५२ सं० । कोणी नायिकेचे ललाटावरचे कस्तूरीतिलकास वर्णितो ॥ अ० । अपन्हुति ॥ प० । उल्लसतो ॥ शोभतो ॥ श्लोक ॥ ५३ ॥ स० कोणी नवोढेचा वृत्तांत कोणास सांगतो । अ० । स्वभावोक्ति ॥ श्लोक ५४ ॥ सं० । कोणी सखी कोणे मानिनीतें सांगते ॥ अ० । काव्यलिंग । व्यं० । जो वरि मान तो वरी तुझे मुखीं हास्य नाहीं ह्मणोन चंद्र तुझे मुखास जिंकील । प० । निर्हास्यते । हास्याभावें ॥ श्लोक ॥ ५५ ॥ सं० । कोणी तानोडातें वर्णितो । अ० । प्रस्तुत कर्णाभरणाचे वर्णनें अप्रस्तुत नायकाची परिस्फूर्ति होते म्हणून समासोक्ति । प० । सीत्कार ॥ सी सी शब्द ॥ श्लोक ५६ ॥ सं० कोणी सखी मानिनीतें मानहरणार्थ बोलते । अ० । विशेषोक्ति । विषम हिं । यांचा संकर ॥ श्लोक ५७॥ कोणी कोणे एकाची प्रिया विषयीं प्रीति सख्यास सांगतो ॥ व्यं० । येथें आलंबन विभावें नायकें अनुभावें विश्वासाश्रुपातादिकें व्यभिचारी भावें विषादचिंतावेगादिकें अभिव्यज्यमान वियोगकाळची रति आहे म्हणून विप्रलंभ शृंगार । अ० । स्वभावोक्ति ॥ नायिका मुग्धा प्रवत्स्यत्पतिका ॥ ॥ श्लो० । ५८ ॥ सं० । नायिका स्वनायकाविषयींची प्रीति सखीस सांगते ॥ व्यं० ॥ प्रियाविरहें अनुभावें इंद्रियकार्यत्यागें अनुभावें जाड्यात्मक व्यभिचारीभाव । नायिका प्रोषितपतिका ॥ श्लो० । ५९ ॥ स० । प्रियागमनद्वितीयदिवशीं रात्रीचें वर्तमान सखी वारंवार पुसत असतां नायिका बोलते । व्य० । रात्रिजागरें विभावें फार न बोलणें या अनुभावें आलस्यात्मक संचारीभाव । नायिका । आगतपतिका । प० । लोहसी । लोखंडासारखी ॥ श्लो० ॥ ६० ॥ सं० । देशांतरस्था नायिकेचे नेत्र पाहण्याविषयीं उत्सुक नायक ह्मणतो ॥ व्यं० प्रियाविरहें विभावें चिंतारूप अनुभावें औत्सुक्य व्यभिचारीभाव ॥ अ० । रूपक ॥ ॥ श्लो० ६१ ॥ स० । सीताविरहदुःखित राम लक्ष्मणाशीं बोलतो ॥ व्यं० । प्रियाविरहें विभावें विश्वनिष्फळत्वकथनें अनुभावें निर्वेदाख्य सचारीभाव ॥ श्लो० ॥ ६२ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीचें वर्तमान सख्यास सांगतो । येथें रसाभास ॥ ॥ श्लो० । ६३ ॥ सं० । सीताविरहें राम कोणाशीं बोलतो ॥ अ० । विषाद स्मृति वितर्क लज्जा शंका निर्वेद हे मिळून भावशबल अलंकार । प० । विधिहत । हतप्रारब्ध । वानिली । सर्व ही पतिव्रतांनीं स्तविली ॥ श्लोक ६४ ॥ सं० । कोणी कोणा एकाचें वृत्त सख्यास सांगतो । व्यं० । अमर्ष व्यभिचारीभाव । अ० । विभावना । नायिका खंडिता । प० । सुविभातीं । मोठ्या प्रातःकाळीं ॥ श्लोक ६५ ॥ सं० । कोणी एकाचें वृत्त कोणास सांगतो । व्य० । पादपतनें विभावें नेत्रारुण्यप्रशमें अनुभावें अमर्ष व्यभिचारी भावाची शांति

दिसते ह्मणून भावशांति ॥ ॥ श्लोक ६६ । सं० । कृष्णास पाहणाऱ्या गोपींचें वृत्त सांगतो ॥ श्लोक ॥ ६७ ॥ सं० । कोणी कोणे तरुणीशीं बोलतो । अ० । पर्यायोक्ति । व्यं० । कामराजापासून भय हें ॥ ॥ श्लोक ॥ ६८ ॥ सं० । कोणी विरहिणीचें वृत्त कोणास सांगतो । अ० । उपमा ॥ नायिका प्रोषितपतिका ॥ श्लो० ॥ ६९ ॥ सं० । विरहिणी वृत्त सांगते ॥ अ० । उत्प्रेक्षा । प० । व्याल। सर्प ॥ श्लोक ७० ॥ सं० । नायिका सखीशीं बोलते । व्यं० । शंकाख्य व्यभिचारीभाव । प० । विधि । दैव । निकेतनीं । स्थानीं । कंदर्प । मदन ॥ श्लो० ७१ ॥ स० । नायक सख्याशीं बोलतो । व्यं० । उन्मादाख्य संचारीभाव । अ० । विशेषोक्ति । प० । गतपरिचयेसि । बेवळखी सारखी ॥ ॥ श्लो० ७२ ॥ स० । सखी मानिनीशीं मानहरणार्थ बोलते ॥ प० । विकासेंदिरा ॥ विकासाची शोभा ॥ श्लोक ॥ ७३ ॥ सं० । कोणी पांथ कोणाशीं बोलतो । अ० । काव्यलिंग ॥ श्लोक ॥ ७४ ॥ सं० कोणी कोणा स्त्रीचें वृत्त कोणास सांगतो ॥ अ० । चंद्रप्रकाश होतांच अनायासें मान गेला ह्मणून समाधि ॥ श्लोक ॥ ७५ ॥ सं० । नायिका सखीतें रात्रीचें वृत्त सांगते ॥ ॥ श्लोक ॥ ७६ ॥ सं० । नायक नायिकेची आपले वरची प्रीति मित्रास सांगतो ॥ अ० ॥ उत्तरोत्तर उत्कर्ष ह्मणून सार। श्लोक ७७ । स० कोणी कोणा एके स्त्रीयेचें वाणिचातुर्य कोणास सांगतो ॥ श्लोक ७८ ॥ सं० । चंद्रोदयें विकळ विरही चंद्राशीं बोलतो ॥ व्यं० । नश्वरलक्ष्मी तूं ह्मणोन चंद्रा गर्व करूं नको हें ॥ ॥ श्लोक । ७९ ॥ सं० । कोणी कोणाचें वृत्त कोणास सांगतो । व्यं० । विप्रलंभशृंगार ॥ प० ॥ मधु । अमृत ॥ श्लोक ॥ ८० ॥ कोणी कोणे स्त्रीचें वृत्त कोणास सांगतो ॥ ॥ श्लो० । ८१ । सं० । कोणी कोणे स्त्रीचे वयाचे सधीस वर्णितो । नायिका मुग्धा ॥ ॥ श्लो० । ८२ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीचें वृत्त कोणास सांगतो ॥ व्यं० । ग्लानी व्यभिचारीभाव । प० । शैवल । शेवाळ ॥ ॥ श्लोक ॥ ८३ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीचें वृत्त कोणास सांगतो । व्यं० । लावण्यातिशय आणि चिताख्य व्यभिचारीभाव ॥ श्लो० । ८४ ॥ सं० कोणी रावणाचें वृत्त कोणास सांगतो । व्यं० । रसाभास । श्लोक ॥ ८५ ॥ सं० । चंद्रोदयीं विरही जनाचें रोदन आणि मदनास आनंद हें वर्णितो ॥ अ० । दोघांचे एकदाच वर्णनें समुच्चय ॥ ॥ श्लोक ॥ ८६ ॥ सं० । कोणी मेघमंडळास वर्णितो । अ० । समुच्चय । प० । अरुण । लाल ॥ श्लो० । ८७ । सं० । कोणी सखीशीं बोलते ॥ अ० । अतिशयोक्ति ॥ ॥ श्लोक ॥ ८८ ॥ सं० । कोणी मानिनीचें मानदूरीकरण कोणास सांगतो ॥ व्यं० । रोष शांत झाला ह्मणून भावशांति ॥ श्लोक ॥ ८९ ॥ स० । कोणी स्त्रीचें सुंदरपण वर्णितो । अ० । दोघांना

दोन रीतीचें ज्ञान झालें म्हणून उल्लेख ॥ श्लो० । ९० । सं० नायिकेचे स्मितादिकांस विकासादिरूपें वर्णितो ॥ अ० । अपन्हुति । प० । भ्रम हि जगे । जीचेवर राहे ॥ ॥ श्लोक ॥ ९१ ॥ सं० । कोणी चंद्रोदयें क्षुब्धहृदय विरही कोणाशीं बोलतो ॥ अ० । भ्रांतिमान ॥ ॥ श्लोक ॥ ९२ ॥ स० । कोणी स्त्रीचे नेत्रांतील श्याम शुभ्र रूपातें वर्णितो । अ० । अपन्हुति ॥ श्लो० ॥ ९३ ॥ स० । कोणी नायिकामुखातें वर्णितो । अ० । संदेह ॥ श्लो० ९४ ॥ सं० । कोणी सुंदरीस पौर्णिमारूपें वर्णितो । अ० । संदेह । रूपकही ॥ ॥ श्लो० ९५ सं० कोणी नायिकेतें नदीरूपें करून वर्णितो ॥ अ० । रूपक ॥ श्लोक ९६ ॥ सं० । कोणी नायिकादंतपंक्तीस वर्णितो ॥ अ० । पूर्णोपमा ॥ प० । केसर । किंजल्क ॥ ॥ श्लो० ९७ ॥ कोणी नायिकेतें वर्णितो । अ० । अपन्हुति । प० । सतृष्ण । लालस ॥ श्लो० ९८ ॥ स० । कोणी सुंदरीलाभें सर्व सुखलाभास तुच्छ मानीत होत्साता सांगतो ॥ अ० । उपमा । प० । स्वमतें । आपुले मतें ॥ श्लो० ९९ सं० । कोणी नायिकेचे मुखास वर्णितो । अ० । भ्रांतिमान । ॥ श्लो० । १०० ॥ कोणी मानिनीतें प्रसन्न करितो । अ० । उपमान आणि उपमेय यांचा एक शोभारूप धर्म वर्णिला म्हणून दीपक आणि उपमा ॥ ॥ श्लो० । १०१ स० । कोणी कोणाशीं बोलतो ॥ अ० । उपमा । प० । कला । अंश ॥ श्लो० १०२ ॥ स० । सीतेतें आठवून दुःखी राम आपुल्याशीं बोलतो । अ० । वज्राचें आणि सुधेचें सादृश्य नाहीं म्हणून विषम ॥ श्लोक ॥ १०३ ॥ सं० । कोणी नायिकाननातें स्तवितो ॥ अ० । पूर्णोपमा ॥ ॥ श्लो० ॥ १०४ ॥ सं० । कोणी विदेशस्थ तरुण चंद्रकिरणें संतप्त होऊन चंद्राशीं बोलतो ॥ ॥ श्लो० १०५ । सं० । कोणी नायिकाननशोभेतें वर्णितो ॥ अ० ॥ पूर्णोपमा ॥ ॥ श्लो० १०६ ॥ स० । कोणी नायिकेचे केशांस वर्णितो । अ० । कल्पितोपमा ॥ ॥ श्लो० । १०७ । सं० । स्तनांहीं मी नम्र म्हणून गुच्छांहीं नम्र लतेची उपमा आहे असा गर्व धरणारी जी नायिका तीतें सखी बोलते ॥ अ० । वर्णनीय नायिकेचा अनादर म्हणून प्रतीप । प० । रक्ताधरा ॥ लाल अधरोष्ठाला ॥ श्लो० १०८ ॥ सं० । कोणी वनाचें उद्दीपकत्व सांगतो ॥ अ० । स्मरण ॥ ॥ श्लो० १०९ । सं० । कोणी नायिकावृत्तांत सख्यास सांगतो ॥ व्यं० ॥ निद्रा सञ्चारीभाव । अ० । जागिवली असतां ही जागी न झाली या अर्थी विशेषोक्ति ॥ नायिका आगतपतिका पद्मिनी जातीची ॥ ॥ श्लो० । ११० । स० । कोणी नायिकेतें वर्णितो ॥ श्लो० ॥ १११ ॥ सं० । कोणी स्त्रीते सरसीरूपें वर्णितो । अ० । रूपक । प० । रक्ता । प्रीतियुक्ता ॥ श्लो० ॥ ११२ ॥ सं ॥ कोणी पांथाशीं बोलतो ॥ व्यं० ॥ कामसंतापपरिहारार्थ स्तनस्वीकार हे ॥ ॥ श्लो० ॥ ११३ ॥

सं० ॥ कोणी कोणे स्त्रीचें वर्तमान कोणास सांगतो । अ० । संदेह । प० । ज्यो-
त्स्नी । चांदणी रात्र । तडित् । वीज ॥ ॥ श्लो० । ११४ ॥ सं० । पूर्वीचीच
। अ० । संदेह । श्लो० ॥ ११५ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीचे मुखातें वर्णितो
। अ० । संदेह । प० । तुषारकर । चंद्र । आणिला हें क्रियापद वरतून आ-
णावें ॥ ॥ श्लोक ॥ ११६ ॥ सं० ॥ कोणी कोणाशीं बोलतो । अ० । भ्रांति-
मान ॥ ॥ श्लोक ॥ ११७ ॥ सं० । पूर्ववत् ॥ अ० । अपन्हुति । श्लोक ११८
सं० पूर्ववत् ॥ अ० । भ्रांतिमान उल्लेख ही । श्लोक ११९ ॥ सं० कोणी नायिके-
तें स्तवितो । अ० । उत्प्रेक्षा ॥ श्लोक ॥ १२० सं । कोणी यमुनाजळांतील बकास
वर्णितो ॥ अ० । उत्प्रेक्षा ॥ प० । चंद्रांशु । चद्रकिरण ॥ श्लोक १२१ सं० । कोणी
कोणे स्त्रीचे दोन स्तनांचा मध्यभाग वर्णितो ॥ अ० उत्प्रेक्षा ॥ श्लोक ॥१२२॥सं०।
कोणी कोणे स्त्रीतें स्तवितो । अ० । उत्प्रेक्षा ॥ प० । ज्या । जयाला । ये । येत आहे ॥
श्लो० १२३ ॥ सं० । कोणी जळांतील कमल पंक्तीतें वर्णितो । अ० । उत्प्रेक्षा ॥ श्लो-
क ॥ १२४ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीचे मुक्ताहारास वर्णितो ॥ अ० । उत्प्रेक्षा ।
प० । गणे । असें गणितो ॥ ॥ श्लो० । १२५ ॥ सं० । कोणी नायिकेशीं
बोलतो । अ० । उत्प्रेक्षा ॥ श्लो० १२६ । स० कोणी नायिकेचे मनास व-
र्णितो । अ० । उत्प्रेक्षा । रूपकही ॥ ॥ श्लोक । १२७ सं० । कोणी ना-
यिकामुखातें वर्णितो ॥ अ० । उत्प्रेक्षा । अपन्हुति ही ॥ ॥ श्लोक ॥ १२८ ॥
सं० कोणी स्त्रीचें मुखसौंदर्य वर्णितो ॥ अ० । अभूतोपमा । प० । तिमिर ।
अंधकार ॥ शारदचंद्र । चंद्र शारदाचा । विद्रुम । पोवळें । कोरका । कळ्या ।
श्लोक ॥ १२९ ॥ सं० । कोणी कोणे दंपतीचा वृत्तांत कोणास सांगतो ॥ ॥
श्लो० । १३० । सं । कोणी चंद्रातें वर्णितो । प० । चार । सेवक ॥ श्लोक ।
१३१ स० ॥ कोणी कोणाशीं बोलतो । अ० । स्मरण ॥ ॥ श्लोक
१३२ ॥ सं० कोणी कोणे स्त्रीचें वृत्त कोणाजवळ सांगतो ॥ प० । गुरुजन ।
वडील लोक । व्यं० । तिचे नेत्रकटाक्ष पडताच सपूर्ण पुत्रोत्पादक तरुण म-
रून गेले मग कोठून पुत्र उत्पन्न होतील हें ॥ ॥ श्लोक ॥ १३३ ॥ सं० ।
कोणी कोणाशीं बोलतो । अ० । प्रतीप ॥ श्लोक ॥ १३४ । सं० । विरहिणीस
शीतळ वस्तूचे ठायीं ही शीतळपणाचा अनुभव होत नाहीं हें सांगतो ॥ वि-
नोदोक्ति अलकार ॥ प० । कुशेशय । शतपत्र कमळ ॥ ॥ श्लोक ॥ १३५ ॥
सं० । कोणी कोणाशीं बोलतो । अ० । प्रस्तुतसूर्यवर्णनें अप्रस्तुतनायकवृत्तांत
भासतो म्हणून समासोक्ति ॥ नायिका खंडिता पद्मिनी जातीची । प० । कुक्करी
कुक्करा करी ॥ ॥ श्लोक ॥ १३६ ॥ सं० कोणी आपुले घरचें नायिकाप्रेम
मित्रास सांगतो ॥ प० । बिडाळ । मार्जार ॥ श्लो० १३७ ॥ सं० । नायिका-

मुखानें चंद्राचें कार्य केलें असतां चंद्रोदय व्यर्थ होय हा अर्थ कोणी सांगतो ॥ अ० । चंद्राचे अनादरें प्रतीपालंकार । प० । कुसुमशर । मदन ॥ ॥ श्लो० १३८ ॥ स० । कोणी स्त्रीयांचा उत्कर्ष सांगतो । अ० । विभावना । प० । माया । कपट ॥ श्लो० १३९ ॥ सं । कोणी स्त्रीचे तारुण्योदयातें वर्णितो ॥ अ० । विभावना ॥ ॥ श्लो० ॥ १४० सं० । कोणी सवतीचें वृत्त नवन्यास सांगते । अ० । विषम । प० । ती । सपत्नी । प्रियप्रणयीं । प्रियाचे स्नेहाचे ठायीं ॥ व्यंगता । शून्यता ॥ ॥ श्लो० १४१ ॥ सं० । कोणी चंद्राचें विरहीसंहारकत्व युक्तीनें साधितो । अ० । विषादिकांचे बरोबर वाटला म्हणून मारितो या अर्थी परिकर ॥ ॥ श्लो० १४२ ॥ स० । कोणी ह्मणतो कीं, परंपरासंबंधेंकरून स्त्रिया स्वर्गांचें साधन होय । अ० । कारणमाला ॥ ॥ श्लो० १४३ ॥ सं० । कोणी ह्मणतो कीं, याचिनें हलकेपणा येतो । अ० । अर्थांतरन्यास । प० । विमुखवशें । तोंड फिरविण्याचे योगें ॥॥ श्लो० १४४ ॥ सं० । कोणी सुरत करून ही आली आहे असें श्वासोच्छ्वासें तर्कून तिला ह्मणतो ॥ ॥ श्लो० । १४५ ॥ सं० । कुशलप्रश्न करणाऱ्या पांथातें कोणी नायिका म्हणते । नायिका प्रोषितपतिका ॥ ॥ श्लो० ॥ १४६ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीतें पुसतो । नायिका स्वकीया ॥ ॥ श्लो० १४७ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीशीं बोलतो । अ० । नायिकेचें अनादरें प्रतीप । प० । गौरी । हे गोजरे ॥ श्लो० ॥ १४८ ॥ सं० । कोणी सखी नायिकेशीं बोलते । अ० । उत्प्रेक्षा । प० । पोषे । पुष्ट होतो ॥ श्लो० ॥ १४९ ॥ सं० । कोणी कोणे स्त्रीशीं बोलतो । अ० । उत्प्रेक्षा ॥ ॥ श्लोक । १५० । सं० । पूर्ववत् । अ० । चंद्राचे अनादरें प्रतीप । प० । राकापति ॥ चंद्र

* * * * * * * * * * * * *

श्लो० ॥ १५४ ॥ सं० । भ्रमरगुंजारवें उद्दीप्तमदना बागेंत विहार करणारी नायिका नायकाशीं बोलते । व्यं० । असे उद्दीपनविभाव असतां सुरत अवश्य स्वीकारावें हें ॥ अ० । स्वभावोक्ति । प० । शिलीमुख । भ्रमर ॥ श्लो० १५५ ॥ सं० । कोणी कोणाशीं बोलतो ॥ अ० पूर्णोपमा ॥ ॥ श्लोक ॥ १५६ ॥ सं० । कोणी कोणाशीं बोलतो ॥ श्लोक । १५७ । सं० । कोणी कोणे स्त्रीचे गमनचातुर्यातें वर्णितो ॥ नायिका अभिसारिका । प० । चूर्णकुंतल । कुरळकेश ॥ श्लो० ॥ १५८ ॥ सं० । कोणी स्त्रीचें मुखसौंदर्य वर्णितो ॥ अ० । उत्प्रेक्षा । प० । दंतांशु । दंतकिरण । पद्मरमापहारी । कमळशोभाहारक । एणाक्षीचें । हरिणनयनेचें । सांद्रसुधाविहारी । निबिडअमृताहरी । विद्वद्वरिष्ट । पंडितांत श्रेष्ठ । विधि । ब्रह्मा । पुनरुक्त । वारंवार भाषण । पुसे । पुसून टाकी ॥ ॥ श्लोक ॥ १५९ ॥ सं० । कोणी स्त्रीचे मनोवृत्तीस वर्णितो ॥ श्लोक ॥ १६०

।। सं० । कामज्वरसतप्त कोणी विरही पुरुष ह्मणतो कीं; स्त्रिया सुखसाधन न होत । प० । सुखसाधनें । सुखाचा ठेवा ।। श्लो० १६१ ।। सं० । कोणी नायक नायिकेतें म्हणतो । प० । हा । खेद ।। श्लो० १६२ ।। सं० । कोणी नायक म्हणतो कीं नायिकेचें मुखपद्मसमान नाहीं । अ० । प्रतीप ।। श्लो० १६३ ।। कोणी विरही पुष्पातें पाहून मित्राशीं बोलतो ।। अ० । असंगति ।। श्लो० ।। १६४ ।। कोणी कोणाशीं बोलतो । अ० । असंगति । प० । नितंब । कटिपश्चात् भाग ।। श्लोक ।। १६५ ।। सं० । कृष्ण मथुरेस जात असतां भविष्यद्विरहावस्था कोणी कोणास सांगतो ।। अ० । अतिशयोक्ति । प० । सदनाकाश । गृहांतील अवकाश ।। श्लोक ।। १६६ ।। सं० । कोणी स्ववृत्तांत सख्यास सांगतो ।। अ० । श्रमकथन मिषें इष्टसाधन म्हणून पर्यायोक्ति ।। श्लोक ।। १६७ ।। सं० । कोणी कोणे स्त्रीचें यौवनोदयचिन्ह वर्णितो । अ० । सहोक्ति । प० । बाल्य । बाळपण ।। श्लोक ।। १६८ ।। सं० । कोणी दूत विरहिणीची अवस्था सांगत असतां नायक त्यास म्हणतो । प० । समयसदृशी । समयासारखी ।। श्लो० ।। १६९ ।। सं० । कोणी सीता आणि राम ह्यांचा शृंगार वर्णितो ।। प० । सस्वेद । घर्मयुक्त ।। श्लोक ।। १७० । सं० । कोणी नायिकेचे अधरोष्ठातें वर्णितो । अ० । व्यतिरेक । प० । अधर । अधरोष्ठ । अधर । नीच ।। श्लोक १७१ ।। सं० । कोणी नायिकेचे कपाळावरील घर्मबिंदूतें वर्णितो ।। अ० । अन्योन्यकांतिदानें अन्योन्यालंकार ।। ।। श्लोक । १७२ । सं० । कोणी कोणाशीं बोलतो । नायिका । स्वीया ।। नायक अनुकूल । प० । थाने । स्तवे ।। श्लो० १७३ ।। सं० । कोणी नायिकानेत्रकटाक्षें विव्हळ होऊन तिला ह्मणतो ।। अ० । अतिशयोक्ति ।। श्लोक १७४ ।। सं० । कोणी नायिकेचें नासामौक्तिकातें वर्णितो ।। अ० । शत्रु [जें] दंत त्यास जिंकून सकतां याची पक्षपाती जी नासिका तिजला जिंकिलें म्हणून प्रत्यनीक ।। श्लोक १७५ ।। नायक नायिकेतें म्हणतो । अ० । अर्थांतरन्यास ।। श्लो० ।। १७६ ।। सं० । कोणी कोणे स्त्रीचें मुखसौंदर्य वर्णितो । अ० । उपमा ।। श्लोक ।। १७७ ।। सं० । नायक नायिकेशीं बोलतो । अ० । अनादरें प्रतीप । श्लोक ।। १७८ ।। कोणी स्त्रीपुरुषांचा वृत्तांत कोणास सांगतो । अ० । प्रहर्षण ।। श्लो० ।। १७९ ।। सं० । कृष्णास पाहणाऱ्या गोपींचा वृत्तांत कोणी कोणाजवळ सांगतो । प० । झपें । झंप ह्मणजे झांपड अर्थात् मोह तेणेंकरून ।। श्लोक १८० । सं० ।। कोणी कोणातें म्हणतो । अ० । पुनः स्वगुणप्रतीरत्नव पूर्वरूपालंकार ।। ।। श्लोक ।। १८१ ।। सं० । प्रियानें प्रश्न केला कीं सखे विडा कां घेत नाहींस तेंव्हां तिनें उत्तर केलें कीं, एवढा वेळ मी विडे खाऊन च आलें असें उत्तर देणारी जी नायिका तीतें नायक बोलतो ।। प० । वीटि । विडी ।। श्लो० ।। १८२ ।। सं० ।

कोणी नवा वृत्तांत कोणाजवळ सांगतो । व्यं० । विप्रलंभशृंगाराची स्थायी भावरूपिणी रति । प० । वक्त्र । मुख ॥ ॥ श्लो० ॥ १८३ ॥ स । कोणी स्वानुभूत नायिकावृत्तात कोणाजवळ सागतो ॥ अ० । रूपक । प० । रूषारग । क्रोधाचा रंग ॥ लाल झाल्या हे तात्पर्य । व्यं० । अमर्ष व्यभिचारीभाव ॥ हें ध्वनिकाव्य होय याला उत्तम काव्य ह्मणतात ॥ इति भामाविलासटीकाटिप्पणे कविगंगाधरकृते शृंगारविलासः ॥

---

## करुणविलास-तिसरा.

**दैवे पराग्वदनशालिनि० ॥ १ ॥**

दुर्दैव येत असतां रमणीमणी तो । जातां सुरेंद्र नगराप्रति शोक होतो ॥
बा रे मना तु कवणा वदसी अवस्था । तूला चि कोण करि शीतळ आज सुस्था ॥१॥

**प्रत्युद्गता सविनयं० ॥ २ ॥**

येवोनियां विनययुक्त सुमंद हांसे । प्रेमे विलोकुनि मनोहरवाणि भासे ॥
ऐसे रिती अज कशी पहिलेप्रमाणें । बाले मला न करिसी अति शीतवाणें ॥ २ ॥

**सर्वेपि विस्मयपथं० ॥ ३ ॥**

ते सर्व हीं विषय विस्मरणास आले । यत्नार्जित प्रबळ शास्त्र हि तें विरालें ॥
माझे मनात विलसे अधिदेवतेसी । ती एक बाळमृगलोचनि मात्र लैसी ॥ ३ ॥

**निर्वाणमंगलपदं० ॥ ४ ॥**

निर्वाणमगलपदाप्रति जातवेळे । त्वां सोडिली मम दया हि सखे स्वचाळे ॥
कीं भामिनी मज न पाहासि रम्य नेत्रें । जे नीळपद्ममदभगद गर्वपात्रें ॥ ४ ॥

**धृत्वा पदस्खलनभीतिवशात्० ॥ ५ ॥**

माझे करास धरुनी तु विवाहकाळीं । आरोहिलीस बहुल्यावरि पूर्वि बाळी ॥
आतां मला त्यजुनिया अमरावतीला । जातेस याविषयिं चित्त धरी भयाला ॥ ५ ॥

**निर्दूषणा रसवती० ॥ ६ ॥**

निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा । सालंकृति श्रवणकोमलरम्यवर्णा ॥
ती माझिये चि कवितेपरि चित्तहारी । माझे मनातुनि न जात असे किं दूरी ॥६॥

**चिंता शशाम सकलापि० ॥ ७ ॥**

शांतीस पावत असे कमळा चि चिंता । कांतीस पावत असे शशिबिंब आतां ॥
वृद्धीस पावत असे पिकशब्द भारी । कांते जधींपसुनि तू परलोकधारी ॥ ७ ॥

**सौदामिनीविलसित० ॥ ८ ॥**

सौदामिनी विलसितापरि देउनीयां । इंद्रापरी सरस भोग दिनोदिनीं या ॥

जैशी अमत्रनृपतीप्रति राज्यलक्ष्मी । गेलीस तेंवि मजला त्यजुनी कि लक्ष्मी ॥८॥

**केनापि मे विलसितेन० ॥ ९ ॥**

कोणेविषीं तरि मला सखि कोप आला । त्याचे वशें तुज नसे किं पतिव्रतेला ॥
अन्यांचियेय सदनि योग्य गती म्हणोनी । गेलीस मुक्तिरमणीसदनीं पळोनी ॥ ९ ॥

**काव्यात्मना मनसि० ॥ १० ॥**

तूझे विलास अमृता परि गोड जे कीं । ते काव्यरूप मम मानसिं वागले कीं ॥
तूझेविना अन कसे रमणीयशाले । झाले मनोहरकवित्व जनांत बोलें ॥ १० ॥

**या तावकीनमधुरस्मित० ॥ ११ ॥**

तूझ्या मृदु स्मितकळा रमणीय होती । भूमडळीं कवि जिला विफळत्व देती ॥
जातां चि तूं कि सखये अज पौर्णमासी । घे वोढुनी सकळ हें जग इंदिरेशीं ॥११॥

**मंदस्मितेन सुधया० ॥ १२ ॥**

जी मदहास्यअमृतें मज न्हाणुनीयां । उत्फुल्लनेत्रकमळें परिपूजुनीयां ॥
दे नित्य मगल अशी गृहदेवता ती । कामेश्वरी न हृदयांतुनि जातसे ती ॥ १२ ॥

**भूमौ स्थिता रमण नाथ० ॥ १३ ॥**

भूमीवरी असुनि नाथ मनोहरा हे । सबोधनें चढविसी मज नाकि तू हे ॥
ते नाकपृष्ठ भजतां चि कुरगनेत्रे । धूळीमधें अज कि लोळविसी स्वयात्रे ॥१३॥

**लावण्यमुज्ज्वलमपास्य० ॥ १४ ॥**

लावण्य शीळ अणि नीति कि नम्रता ही । हास्याणि भी कि गुण सर्व हि फार ते ही ।
तूझेविना स्थळ विहीन कि यां समस्ता । टाकोनि सुंदरि कशी त्रिदिवीं तु सुस्ता ॥१४॥

**कांत्या सुवर्णवरया० ॥ १६ ॥**

तू स्वर्णकांति अणि निर्मळ भोवतालीं । ज्वाळा सतेज बहु टाकित वाढियेली ॥
चित्तास हारिसि अशास्तव कजनेत्रे । जाळीतसे दहन होउनि कोपपात्रे ॥ १५ ॥

**कर्पूरवर्तिरिव० ॥ १५ ॥**

कर्पूरवर्तिसम लोचनताप हारे । जी पद्ममाळसम कंठसुखास धारे ॥
माझे चि रम्य कवितेपरि चित्त मोहे । नारी हि वद्य अमरीपरि ती च राहे ॥१६॥

**स्वप्नांतरेपि खलु भामिनि० ॥ १७ ॥**

स्वप्नात ही परनरास न पाहणारी । तू भामिनी असिसि कीं व्रति राहणारी ॥
आतां गुणें रहित त्या परपूरुषाला । भोगावया कशी ग जासि परालयाला ॥ १७ ॥

**दयितस्य गुणानपि० ॥ १८ ॥**

शयनी प्रियसद्गुण स्मरे जी । सखि म्या सांप्रत आज पाहिली कीं ॥
अणि आज च ती कशी कृशांगी । वदतां मी न वदे किं हो निजांगीं ॥ १८ ॥

**रीतिं गिराममृतवृष्टिकरीं० ॥ १९ ॥**

रीती तिची अमृतसी वचनाचि आणी । ती आकृती बहुत वर्णिली जी कवीनीं ॥
लोकोत्तरा च करूणारसयुक्तवृत्तो । वर्णावया उदित सर्व हि चित्तवृत्तो ॥ १९ ॥

इति श्रीबुद्धिकुलालंकार गुणिजनावतंस श्रीमन्मित्रवर्य दाजीबाबुप्रोत्साहित रुक्मिणीवल्लभसूरिसूनु कविगंगाधरकृतायां भामिनीविलाससमश्लोकीमहाराष्ट्रभाषाव्याख्यायां सज्जनवल्लभासमाख्ययायां करूणविलासो नाम तृतीयो विलासः

## अथ शांतविलास-चवथा.

**विशालविषयाटवी० ॥ १ ॥**

विशालविषयाख्य जें वन तयांत जो फारसा ।
असे दहन कंकणापरि तयें जळे जो असा ॥
पिवो मनचकोर हा हरिमुखेंदु पीयूष हो ।
सुशोभित जयामध्यें वसति माधुरी सर्व हो ॥ १ ॥

**अये जलधिनंदिनी० ॥ २ ॥**

अगा जलधिकन्यका नयननीर ज्याचे पदा ।
सदा त्रिविध ताप हा वितरितो मला आपदा ॥
प्रभातकमळाचिये प्रबळ गर्व जे हारिती ।
तये सुखदलोचनें मज विलोकिं संहारिती ॥ २ ॥

**स्मृतापि तरुणातपं० ॥ ३ ॥**

मनिं स्मरण केलिया हरितसे किं संताप जे ।
स्थिरद्युतितडिल्लता बहुशतें वृता जी सजे ॥
कलिंदकुमरीतटीं बहुसुरद्रुमाचे तळीं ।
असे ति घनमाळिका मम मतीस चुंबो बळीं ॥ ३ ॥

**कलिंदनगनंदिनी० ॥ ४ ॥**

कलिंदगिरिनंदनीतट-वनास जो भासवी ।
गतागत बहुश्रमें श्रमित पांथ जो हासवी ॥
लतांहि बहु वेष्टिला रुचिरकांतिनें शोभला ।
तमालतरु तो मम श्रम हरो त्वरेनें भला ॥ ४ ॥

**जगज्जा० ॥ ५ ॥**

जगातें जो ज्योत्स्ना प्रचुरअमृतें वर्षित असे ।
जनाचा संताप त्रिविध हि सदा जो हरितसे ॥

वसे वृंदारण्यीं नमिति सुर ज्यातें त्रिकळ ही ।
हरो माझें मोहा जलधरनवा तो अकळ ही ॥ ५ ॥

**ग्रीष्मचंड० ॥ ६ ॥**

ग्रीष्मउष्णकरमंडळिचें जें । भीष्मजाळ मज जाळित तेजें ॥
वर्षे मेघसमया समयीं तो । हर्ष देत हरि दुःख हरी तो ॥ ६ ॥

**अपारी० ॥ ७ ॥**

अपारीं संसारीं कठिण विषयारण्यसरणी ।
तिथे मी भ्रांतीनें फिरफिरू असें कीं भ्रमरणी ॥
परी कालिंदीचे तटिं नवतमालद्रुम बरा ।
हरो संतापातें मम अज अशा या अवसरा ॥ ७ ॥

**आलिंगिति० ॥ ८ ॥**

आलिंगिते जलधीची कुमरी जयाला । जैशी प्रियंगुलतिका घनि त्या तमाळा ॥
तो अंतकाळिं हृदयीं मम कृष्ण भासो । कीं पद्मनाभ परमेश तमास नासो ॥८॥

**नयना० ॥ ९ ॥**

निजजननयनानंदा तुदपि संदेहरहितसंदोहें ॥
ती घनमाळा माझे संतापातें हरो धरो बाहे ॥ ९ ॥

स्वामी जी अमृतोपमानवचनें शिक्षा मला दीधली ।
स्वप्नीं ही मन तींत मी न च धरीं कीं गर्विता लाधली ॥
ऐसे ही अपराध पोटिं धरुनी मानीं मला आपुला ।
तूझेहूनि दयाळु मत्सम हरे तो मत्त ना राहिला ॥ १० ॥

**पाताळं० ॥ ११ ॥**

पाताळीं अथवा सुरेंद्रपुरिं वा मेरुशिरीं ही चढा ।
अब्धी सात हि ते तरा परि सरेना वासनेचा वढा ॥
आधिव्याधिपराक्रमें हत तुम्हां कल्याणवांछा जरी ।
त्या श्रीकृष्णरसायनास जन हो का अन्य कष्टें तरी ॥ ११ ॥

**गणिका० ॥ १२ ॥**

गणिका अजामिळादिक रक्षसि तूं हो प्रसन्न मजवरि ही ॥
मी बुडलों भवगर्तीं करुणामूर्ती नको उपेक्षु तु ही ॥ १२ ॥

तटीं स्वर्गंगेच्या बसुनि नयना झांकुनि बरें ।
कलत्रादी नाना त्यजुनि विषयां निश्चयभरें ॥
धुवोनी मोहातें नवघनरुची जे मधुर कीं ।
असे चैतन्यीं मी कधिं बसेन हो लीनमन कीं ॥ १३ ॥

**मृद्वीका रसितां० ॥ १४ ॥**

द्राक्षा भक्षिलि शर्करा हि तशि रे प्यालासि दुग्धाप्रती ।
प्याला स्वर्गीं सुधा अणीक डसला रभाधरा त्या रिती ।
आता सांग खरें मला मम जिवा तू फीरला या भवीं ।
कृष्णे त्यक्षर दोन यासम कुठे गोडी असे वा नवी ॥ १४ ॥

**वज्रं पापमहीभृतां० ॥ १५ ॥**

आहे पापगिरीस वज्र रस कीं संसाररोगास जे ।
मिथ्याज्ञानतमास सूर्य चि तसें क्लेशाख्यवृक्षास जें ॥
आहे कीं वणवा महाप्रबळ जें मोक्षालयद्वार कीं ।
तें हें कृष्ण असें जगांत विलसे वर्णद्वय प्रौढ कीं ॥ १५ ॥

**रे चेतः कथयामि० ॥ १६ ॥**

रे चित्ता तुज सांगतों हित कि जो वृंदावनीं चारितो ।
गाईंचे समुदाय नीळघनसा बघूं नको टाकु तो ॥
कीं सौंदर्यसुधाधरस्मित वसे तो सर्व तूझे हरी ।
वस्तू इष्ट अणी तुला हि बहुसा मोहांत टाकी हरी ॥ १६ ॥

**अव्याख्येयां वितरति० ॥ १७ ॥**

चित्तीं मत्ता वितरत असे प्रीत जी फार मोठी ।
कंठीं लज्जा तम हरित असे बोलवेना स्वचाटीं ॥
द्राक्षादींला बहुमत अशी माधुरी दाविणारी ।
कृष्णेत्याख्या भज कि रसने तू रसा जाणणारी ॥ १७ ॥

**संत्येवास्मिन् जगति बहवः ॥ १८ ॥**

पक्षी फार कि या जगीं असति कीं त्याहांमध्यें चातकीं ।
माझी प्रीति असे बहू कि नयना होतां चि ते दृष्ट कीं ॥
जैसे ते स्मरती घना निजसख्या तैसे परी माझिये ।
चित्तीं ब्रह्म बसे सदा निजपदी कृष्णाख्य तें निश्चयें ॥ १८ ॥

**विश्वग्भुवनमभितो भासते० ॥ १९ ॥**

ज्याचे तेजें सकळ जग हें भासते जो समस्ता ।
ज्ञानालागीं विषय बरवा पूसती त्या प्रशस्ता ॥
आज्ञा जीते इतर कविला कोणता विष्णु ऐसे ।
लोकाचे हो अविनय असे वर्णु मी आज कैसे ॥ १९ ॥

**सेवायां यदि साभिलाषमसि ॥ २० ॥**

चित्ता सेवन इच्छिसी जरि तरी लक्ष्मीपती सेवि गा ।

ध्यानातें जरि वांछिसी तरि हरी चक्रायुध ध्याय गा ॥
गाण्यातें जरि इच्छिसी तरि कथा त्या शंभुची गायि गा ।
निद्रेतें जरि इच्छिसी तरि निजानंदीं बरा नीज गा ॥ २० ॥

**भवग्रीष्मप्रौढातपनिवहसंतप्त० ॥ २१ ॥**

भवग्रीष्मोष्म्याने धगधगित संतप्त तनु जे ।
बळें तोडोनीयां निगड अविवेकाख्य सहजें ॥
विशुद्धीं या ब्रह्मामृतसरसि न्हातीं कि सुकृती ।
नसे आशा जेथे म्हणवुनि असे शीतळ अती ॥ २१ ॥

**बंधोन्मुक्त्यै खलु मखमुखान् ॥ २२ ॥**

जे पाशांचे शिथिलकरणीं यज्ञकर्मे करीती ।
जे शांत्यर्थीं मुनिशतमतें फार चिंता धरीती ॥
ने पापाचे जलधितरणीं बूडती अल्पतीर्थीं ।
तींहीं भ्रांती सकळ मनुजा होय हो या अपार्थीं ॥ २२ ॥

**प्रथमं चुंबितचरणा० ॥ २३ ॥**

पूर्वी चुंबुनि चरणा जघाजानूनाभिहृदयाला ॥
आलिंगुनि मम वृत्ती इच्छी हरिमुखसरोजकांतीला ॥ २३ ॥

**मलया० ॥ २४ ॥**

मलयानिल कालकूट आणी । रमणीकुंतल भोगिभोग नागीं ॥
श्वपचाणिक विप्र या अभदीं । स्थिति होवो मम आत्मरूप वेदी ॥ २४ ॥

**निखिलं० ॥ २५ ॥**

जग सर्व ही नाशवंत हें । मग हो गात्र कशांत काय हें ॥
जन त्याविषयीं श्रमाप्रती । करिती काय म्हणोनि सप्रती ॥ २५ ॥

**प्रतिप० ॥ २६ ॥**

प्रतिपळिं लोक समस्तहि मृत्युमुखीं जाति हे विलोकुनि ही ॥
शिव शिव अझुनि न विरमे विषयापासोनि हें कि हो मन ही ॥ २६ ॥

**सपदि० ॥ २७ ॥**

सकळ ही अजि राज्यलक्ष्मि जावो । उपरि अनेक ही खड्गसंघ येवो ॥
यम मम शिर ही जरी कि तोडी । तरि मम बुद्धि कधी न धर्म सोडी ॥ २७ ॥

शत्रु मम शिरीं बहुसे टाको अनि अस्त्रदहनजाल्यातें ॥
किंवा असिधारा ही परि मी अणुमात्र बोलिना त्यातें ॥ २८ ॥

**तरुणोपायं० ॥ २९ ॥**

तरुणोपाय न पाहुनि माझे जीवा कशास दुःखसि हा ॥

कां या मनमार्गी कधिं आला नाहीं किं माधव हा ॥ २९ ॥

**श्रियो मे मा संतु० ॥ ३० ॥**

गजवृंद गंडभृंगभ्रमभरझंकारसुभग मज न रुचे ॥
ती लक्ष्मी यद्योगें घूर्णित लोकांस हरि-रुची न सुचे ॥ ३० ॥

**किं निःशंकं शेषे० ॥ ३१ ॥**

कां तूं निजसि अशंकित वृद्धावस्थेंत मृत्यु जवळि असे ॥
अथवा सुखें चि निज बा जान्हवि जननी समीप जागतसे ॥ ३१ ॥

**संताप० ॥ ३२ ॥**

इकडे तिकडे फिरुफिरु संतापवुं मी कशास हें मन हो ॥
की मम शिरिं सतत असे नंदकुमार प्रभू परात्पर हो ॥ ३२ ॥

**रे रे मनो मम मनोभव० ॥ ३३ ॥**

रे रे मना मम मनोभवशासनाचें । मी सेवितों चरणयुग्मसरोज साचें ॥
संसारगर्ति मज पाडिसि बा जरी तूं । तो पुत्रशोक मग भोगिसि बा तरी तूं ॥३३॥

**मरकतमणिमेदिनी० ॥ ३४ ॥**

मरकतमणिंचा महीध्र किंवा । तरुण तमाल तरू कि हा असावा ॥
रघुपतिस विलोकुनी मुनींहीं । बहुरिति संशय घेतला मनीं हा ॥ ३४ ॥

**तरणितनया० ॥ ३५ ॥**

हीं हो कीं यमुना न हीं जलमयी ती भासते या जगीं ।
किंवा नीलमणीचि कांति कि न ते कीं मंजुळा ना उगीं ॥
ऐसी रामतनुद्युती वनिं बरी जे पाहती ते मनीं ।
घेती संशय सर्वथा परि जन प्राणी तसे ते मुनी ॥ ३५ ॥

**चपलाजलदच्युता० ॥ ३६ ॥**

घननिर्गत वीज कीं तरूला । त्यजुनि हीं लतिका पडे धरेला ॥
कवि हीं कपि संशयीं बुडाला । श्वसिते जाणनसे कि मैथिलीला ॥ ३६ ॥

**भूतिर्नीचगृहे० ॥ ३७ ॥**

लक्ष्मी नीचगृहांत विप्रसदनीं दारिद्र्य मोठें असे ।
साधू ते मरती कि वर्ष शत हे आयुष्य दुष्टा दिसे ॥
देवा यापरि पाहुनी अपनयें तूझे मला क्रोध ये ।
मोठा हा परि दीन मी तु भगवान् काही च कर्ता न ये ॥ ३७ ॥

**आमूलाद्रत्नसोनोर्मलय० ॥ ३८ ॥**

जे जे मेरुगिरी कि चंदनगिरी सवेष्टिताभोनिधी ।
पर्येतों कवि जे प्रवीण बहुसे बोलोत ते हा विधि ॥

कीं द्राक्षारसतुल्य गोड कविता चातुर्य दावीतसे ।
जो तो पंडितराज धन्य न तसा कीं अन्य लोकीं असे ॥ ३८ ॥

गिरां देवी वीणागुण० ॥ ३९ ॥

वीणा वाजविणें त्यजोनि बरवें ही शारदा देवता ।
ज्याचें काव्यसुधारसास बहुशी पीतें किं सत्कारितां ॥
तें हें पंडितराजकाव्य हि बरें जैं ऐकुनी मस्तका ।
सौख्यें डोलविना किं तो नरपशू किंवा पशूराज का ॥ ३९ ॥

मधु द्राक्षा साक्षादमृत० ॥ ४० ॥

मधु द्राक्षा किंवा अमृतरस रामाधरसुधा ।
कदाचित् कोणाला कार्धि न वितरो मोद किं सुधा ॥
परंतु ज्यांहांला न सुखवि जगन्नाथकविता ।
जगीं ते जाणावे मृत चि नर कीं वांचत सदा ॥ ४० ॥

निर्माणे यदि मार्मिकोसि० ॥ ४१ ॥

द्राक्षा जी परिपक्व भासत असे तीचे रसाचे परी ।
काव्याची बरि माधुरी जरि करी मित्रा मला ते तरीं ॥
दावीं नाहिं तरी जसें कलुष कीं आत्मीय ही स्याज हो ।
तैशी ती कविता तुझी निज कृता हे जाणिजे आज हो ॥ ४१ ॥

मद्वाणी० ॥ ४२ ॥

दुःखास तू धरूं नको मनिं हे स्ववाणी । कीं मत्सरें खळ अनादरिती अज्ञानीं ॥
काव्यारविंदमकरंदमधुव्रताचे । वक्त्रांत तू करिसि फार विलास साचे ॥४२॥

विद्वांसो० ॥ ४३ ॥

अन्याचे कवितारसतवास धरिती विद्वांस ते मौन कीं ।
लक्ष्मीचे विभवाख्य मद्य पिउनी भूपाळ संघूर्ण कीं ॥
माझा काव्यविपाक देवनगरी रामाधरस्पार्धि हा ।
कोणाचे वदनाबुजांत बरवा नाचे पहा रम्य हा ॥ ४३ ॥

धुर्यैरपि माधुर्यैर्द्राक्षाक्षीरेक्षुमाक्षिकसुधानां० ॥ ४४ ॥

द्राक्षादुग्धमधुसुधाइक्षुमधुरतेस वंद्य जो किं असे ॥
पंडितनृपकवितेचा मधुरपणा सज्जनांत भासतसे ॥ ४४ ॥

शास्त्राण्यधीतानि० ॥ ४५ ॥

शास्त्रा अभ्यासिलें किं नित्य विधि ही ते सर्व संपादिलें ।
दिल्लीवल्लभपाणिपल्लवतळीं तारुण्य ही घातिलें ॥

आतां टाकुनि वासना मधुपुरीमध्यें हरी सेवितो ।
केला पंडितराजियें सकळ ही व्यापार जो नाहिं तो ॥ ४५ ॥

**दुर्वृत्ता जारजन्मानो० ॥ ४६ ॥**

दुर्वृत्त जारजन्मे हरितिल माझे सुपद्यरत्नांला ॥
या हेतुस्तव केली पेटी ध्यां त्यांचियां चि अवनाला ॥ ४६ ॥

**उपसंहार.**

ज्याचा तात कि रुक्मिणीपति असे माता असे रुक्मिणी ।
विद्यादायक विश्वनाथ गुरु ही जो सर्वविद्याग्रणी ॥
जो गंगाधर नाम विश्रुत असे त्यानें स्वमित्रादरीं ।
टीका सज्जनवल्लभा विरचिली भामाविलासावरी ॥ ४७ ॥

इति श्रीबुद्धिकुलालंकार गुणिजनावतंस श्रीमन्मित्रवर्य दाजीबा
बुद्ध्युद्योतित रुक्मिणीवल्लभसूरिसूनु कविगंगाधरकृतायां
भामाविलासमश्लोकीमहाराष्ट्रभाषाव्याख्यायां सज्जनवल्लभा-
समाख्यायां शांतविलासो नाम चतुर्थो विलासः

---

आतां करुणरसप्रधान श्लोक तृतीय विलासांत सांगतो ॥ श्लोक ॥ १ ॥ सं० । येथें स्वस्त्री मरणापासून झालेलें दुःख मनास च सांगितलें जातें म्हणून आधीं तेंच सांगितलें॥ आणि येथें असें समजावें कीं, एकोणीस ही श्लोक शोकरूप च आहेत म्हणून याची संगती वेगळाली लिहिण्याचें कारण नाहीं । प० । रमणीमणी । स्त्रीरूप रत्न ॥ श्लो० ॥२॥ श्लो० ॥३॥ पूर्णोपमा ॥ श्लो० ॥ ४ ॥ प० । निर्याण । मरण । नीळकमळाचे अहंकारास भंग देणारा जो गर्व त्याचें पात्रभूत हा चौथे चरणाचा अर्थ ॥ श्लोक ॥ ५ ॥ श्लो० ॥ ६ ॥ प० । श्रुतिकटुत्वादि दोष रहित माधुर्यादिक गुणयुक्त अलंकारयुक्त अशी कविता ॥ शृंगारादि रसांचे स्थायीभावादिकें पूर्ण उपमा । प० । वर्ण अक्षर ॥ आतां कांतिकडे असें कीं अप्रिय भाषणादिदोषरहित । सौंदर्यादिगुणें युक्त हावभावादिकें युक्त भूषणयुक्त । वर्ण । भाषणाचीं अक्षरें । अ० । श्लेषालंकार आणि उपमा ॥ श्लो० ॥ ७॥ प० । हतास । अहंभावास । श्लो० ॥ ८ ॥ प० ॥ सौदामिनीविलसितापरी । विजेचे चमकेप्रमाणें । अमत्र अविचारी । लक्ष्मी । गृहशोभा । अ० । उपमा ॥ श्लो० ॥ ९ ॥ प० । गती । गमन ॥ श्लो० ॥ १० ॥ श्लो० ॥ ११ ॥ प० । जगदिदिशीं । जगशोभेशीं । श्लो० ॥ १२ ॥ प० । उत्फुल्ल । प्रफुल्लित । अ० । प्रस्तुत स्त्री ।

वृत्तांतास वर्णित असतां मंत्रशास्त्रोक्त अप्रस्तुत कामेश्वरीदेवनावृत्तांतस्फुरण झालें म्हणून समासोक्ति ॥ श्लो० ॥१३॥ प० । नाकीं । स्वर्गीं । नाकपृष्ठ । स्वर्गस्थान । स्वयाचे । आपुले ॥ श्लो० ॥ १४ ॥ प० । त्रिदिवीं । स्वर्गीं । सुस्व । स्वस्थ. श्लो० ॥ १५ ॥ अ० । उत्प्रेक्षा ॥ श्लो० १६ ॥ प० । अमरी । देवांगना । अ० । मालोपमा ॥ श्लो० ॥ १७ ॥ प० । परपुरुष । परमात्मा । परालय । मोक्षगृह ॥ श्लो० ॥ १८ ॥ प० । निजांग । आपलें अंग ॥ श्लो० ॥ १९ ॥ अ० । रीतिप्रभृतिवर्णनीय पदार्थांचा स्तवनरूप एके क्रियेंत अन्वय म्हणून तुल्ययोगिता ॥ इति भामाविलास टिप्पणे कविगंगाधरकृते करुणविलासः

---

श्रीगणेशाय नमः । आतां शृंगाररसाचे पुरानें पूर्णहृदय म्हणून संसार त्यागबुद्धि न झाली याविषयी आधीं करुणरस सांगून त्या करुणरसें संसार त्यागबुद्धि झाली म्हणून शांतचित्त पंडितराज शांतरसप्रधान चतुर्थ विलास सांगतो ॥ येथे ही प्रति श्लोकीं सगती शांतीची म्हणून प्रतिश्लोकीं लिहीत नाहीं । परतु स्थळविशेषीं लिहिण्यात येईल ॥ श्लो० ॥ १ ॥ प० । कंकणापरी । मंडळाकार । पीयूष । अमृत ॥ श्लो० ॥ २ ॥ प० । नीरजाचें । कमळाचें । पदा ॥ हे अश्रया । सहारी । ती आपदा दूर करी ॥ श्लो० ॥ ३ ॥ अ० । व्यतिरेक ॥ प्रसिद्ध मेघमाळेपेक्षा श्रीकृष्णमूर्तिरूप मेघमाळेचा उत्कर्ष आहे म्हणोन । प० । वृता । वेष्टिता । कलिंदकुमरी । यमुना । बळीं । बळानें ॥ श्लो० ॥४ ॥ प० । कलिंदगिरिनंदिनी । यमुना । या दोन्ही श्लोकात विजा आणि लता गोपी । मेघमाळा आणि तमालतरू श्रीकृष्ण ॥ श्लो० ॥ ५ ॥ ज्योत्स्ना । चंद्रिका । येथे ही मेघ श्रीकृष्ण ॥ श्लो० ॥ ६ ॥ येथें ससाररूप सूर्याचे त्रिविध संतापरूप जाळ मला जाळती म्हणोन हरिरूपमेघ वृष्टी कृपेची करून मला रक्षो हे तात्पर्य अ० । उपमा ॥ श्लो० ॥ ७ ॥ प० । सरणि । पाउलवाट ॥ श्लो० ॥ ८ ॥ प० । जलधिची कुमरी । लक्ष्मी । प्रियगुलतिका । हाळा । तमास । मोहास । नासो । दूर करो । श्लो० ॥९॥ प० । दुदवी । पुष्ट करी । सदोहे । समुदायें करून बाहे । हस्तें ॥ श्लो० ॥ १० ॥ प० । गर्विता ॥ अहंकार । मत्त । उन्मत्त । अ० । अन्वय ॥ श्लो० ॥ ११ ॥ प० । आधि । चिंता । व्याधि । रोग ॥ श्लो० ॥ १२ ॥ प० । भवगर्तीं । संसाररूप गर्तेंत ॥ श्लो० ॥ १३ ॥ प० । कलत्र । स्त्री ॥ श्लो० ॥ १४ ॥ ॥ श्लो० ॥ १५ ॥ प० । रस । रसायन । अ० । कृष्ण या दोन अक्षरास बहु प्रकारें वर्णिलें म्हणून उल्लेख आणि रूपक ॥ श्लोक ॥ १६ ॥ श्लोक ॥ १७ ॥ प० । मग्न । निमग्न । लग्न । लागली । आख्या । नाम । रसने । हे जिव्हे ॥ श्लो० ॥ १८ ॥ श्लो० ॥ १९ ॥

प० । अविनय । अन्याय । अ० । विषमोक्ति ॥ श्लो० ॥ २० ॥ श्लो० ॥२१॥ प० । भव । संसार । निगड । बिडी । सरसीं । तटाकीं । अति । अत्यंत ॥ श्लो० ॥ २२ ॥ प० ।अपार्थी । निष्फळ ॥ श्लोक ॥ २३ ॥ प० । जंघा । पोटऱ्या । जानु । गुडघे । ऊरू । मांड्या । नाभि । बेंबी ॥ श्लोक० ॥२४॥ प० । वेदी । ओटा । श्लोक ॥ २५ ॥ श्लो० ॥ २६ ॥ ॥ श्लोक ॥ २७ ॥ प० । संघ । समुदाय । श्लो० ॥ २८ ॥ प० । असिधारा । खड्गधारा । श्लोक ॥ २९ ॥ प० । हा । खेद ॥ श्लोक ॥ ३० ॥ प० । वृंद । समुदाय । भ्रम । भ्रमण । यद्योगें । जिचे योगानें ॥ श्लोक ॥ ३१ ॥ श्लोक ॥ ३२ ॥ श्लो० ॥ ३३ ॥ प० । मनोभवशासनाचें । मदनदाहक शंकराचें ॥ श्लो० ॥ ३४ ॥ प० । मरकत । पाच । महीध्र । पर्वत ॥ श्लो० ॥ ३५ ॥ प० । उग्री । शुष्क । या दोन श्लोकांत संदेहालंकार ॥ श्लो० ॥ ३६ ॥ प० । घन निर्गत । मेघांतून निघाली । कांति हा । पंडित ही । कांपे । मारुती । श्वसितें । श्वासोच्छ्वासें । मैथिली । सीता ॥ श्लो० ॥ ३७ ॥ श्लो० ॥ ३८ ॥ श्लोक ॥ ३९ ॥ प० । पशुराज । श्रेष्ठ बैल । कां । कीं ॥ श्लो० ॥४०॥ प० । मधु । मद्य । रामाधरसुधा । स्त्रीओष्ठामृत । मोद । आनंद । सुधा । चांगला ॥श्लोक ॥४१॥ श्लो० ॥ ४२ ॥ प० । काव्यरूप कमळाचे रसाविषयीं जे भ्रमर त्यांचे । हा त्रिचरणाचा अर्थ ॥ श्लो० ॥ ४३ ॥ प० । विभवाख्य । ऐश्वर्यनामक । संपूर्ण समस्त । विपाक । परिपक्वता ॥ श्लो० ॥ ४४ ॥ प० । इक्षु । ऊंस ॥ श्लो० ॥ ४५ ॥ प० । दिल्लीवल्लभ । दिल्लीचा पादशाह ॥ श्लो० ॥ ४६ ॥ स० । अडतीसाव्या श्लोकापासून पंचेचाळीसाव्या श्लोकापर्यंत आपले कवितेचें माधुर्य व आपलें सर्वोत्कृष्टत्व सांगून प्रस्तुत या श्लोकांत ग्रंथ करण्याचें कारण पंडित-राज सांगतो । प० । जारजन्मे । रांडलेक । पद्य । श्लोक । अवनाला । रक्षणाला ॥ श्लोक ॥ ४७ ॥ स० । प्रस्तुत टीकाकार आपले मायबापाचें व गुरूचें व आपलें नाम सांगत होत्साता टीका करण्याचें कारण सांगतो ॥ प० । तात । बाप । रुक्मिणीपति । विठ्ठल ॥ आतां टीकाकार उद्योगदाय-काचें नाम प्रसिद्ध व्हावें याविषयीं इतिश्री लिहितो ॥

इति भामाविलास टिप्पणे कविगंगाधरकृते शांतविलासः

समाप्त.

# वामनपंडितशिष्यकृत
## ध्रुवचरित्र.

नमन करुनि आधी श्रीगणाधीशमूर्ती । प्रणवस्वरूप तुझे वर्णिती वेदकीर्ती ॥
तदुपरि गुरुनाथा वंदिलें वामनासी । ध्रुवचरित कराया स्फूर्ति दीजे मनासी ॥१॥

स्वायंभूमनुचा सुपुत्र पहिला उत्तानपादाख्य जो ।
सत्कर्मीं रत जो सदा हरि भजे सतांपदी ऐक्य जो ॥
त्याच्या श्रेष्ठसुतें सुनीतिकुमरें आराधिलें श्रीवरा ।
कल्पांतीं न चळे अशा ध्रुवपदीं पावोनि श्रेष्ठा वरा ॥ २ ॥

श्रीरमारमण जो क्षीरांधिनिवासी । इंद्राहुनी अचल तें पद दे ध्रुवासी ॥
अद्यापि ही दिसतसे गगनीं जनासी । त्याची कथा श्रवणमात्र अघासि नाशी ॥३॥
कथा हे अशी वर्णिली व्यासवाणी । इतीहास इत्यादि काहीं पुराणीं ॥
तयांतील संक्षेप ही लेश वाचे । हरी पावला भक्तिभावें ध्रुवाचे ॥ ४ ॥

चतुर्थ स्कंधींची सुरस रचना भागवत हे ।
माहापापें नासी श्रवण करितां हो चरित हें ॥
शुक स्वामी वक्ता परम नृप पुण्यें चि सरिता ।
दिसां सातांमध्यें करित निजमोक्षासि सरिता ॥ ५ ॥
तुम्ही श्रोते ज्ञाते सकळ श्रुतिशास्त्रें विधि तसे ।
कथा नाना काव्ये बहुत कविता ही स्फुरतसे ॥
मतीमंदा मातें स्वय चि वदवी सद्गुरुदया ।
दयाळू होऊनि श्रवणिं रति दीजे म्हणुनियां ॥ ६ ॥

उत्तानपाद मनुपुत्र महा उदार । आवंतिकापुरपती अतिसत्वधीर ॥
कांता तयासि असती सुरुची सुनीती । दोघीजणी परमसुंदर दीव्यकांती ॥ ७ ॥

सुनीतीनीतीच्या ध्रुव उदरिं तीच्या जनमला ।
द्विजांनीं ते काळीं शुभदिन तिथी काळ गणिला ॥
पुढें पांचां वर्षीं गृह त्यजुनि जाईल विपिनीं ।
तपातें साधोनी प्रगट हरि देखेल नयनीं ॥ ८ ॥

देवाहुनी अचळ तें पद यासि लाभे । सामुद्रिकी सकल लक्षण युक्त शोभे ॥
श्रीविष्णुचा परम होइल दास जाणा । हे बोलतां गणित तें कळलें सुजाणा ॥९॥
प्रितीचि सुरूची प्रीया राजयाची । तिला पुत्र होणें मनीं हेतु हा ची ॥
वयें धाकुटी सुंदरी आवडे ते । अती लाघवें वश्य केलें नृपातें ॥ १० ॥
अशी हे सुरूची मनी पुत्रकाम । धरोनी करी ते व्रतादीक नेम ॥
तयानंतरें तीस ही पुत्र झाला । असे उत्तमू ठेविलें नाम त्याला ॥ ११ ॥

नृपाच्या प्रिया पुत्रवत्या समान । सुरूचीपरी पावली श्रेष्ठ मान ॥
सुनीतीवरी प्रीति नाहीं नृपाची । वसे भिन्न गेहीं हरीकीर्तनेची ॥ १२ ॥
एके दिनीं नृप सिंहासनिं बैसलासे । सन्नीध केवळ सती सुरुची विलासे ॥
तीचा सुपुत्र अति सुंदर उत्तमातें । माडीवरी बसवुनी करि लालनातें ॥ १३ ॥
तैं पातला ध्रुव नृपासनसान्निधानीं । पातिव्रतासुनितिपुत्र हि तो समानी ॥
बापास ही हरुष थोर मनांत झाला । माडीवरी उचलुनी वसवी तयाला ॥ १४॥
पितापुत्र दोघां मनीं भाव एक । ध्रुवें लक्षिलासे पित्याचा निशांक ॥
वरी जों बसावें तदा ते सुरूची । अती मत्सरें बोलिली गोष्टि नीची ॥ १५ ॥
धिःकारुनी मग म्हणे सुरुची ध्रुवातें । तू योग्य होसिल कसा नृपआसनातें ॥
ऐसें वदोनी ढकली सुरुची ध्रुवातें । हें देखतो परि पिता न वदे चि तीतें ॥१६
तू जन्मलासि उदरीं हतभाग्य जीते । या बैससी नृपपदींच कसा त्यजीं तें ॥
येतासि काय उदरि मज सुंदरीच्या । होतासि तूं महिपती सदये हरीच्या ॥१७॥
झालासि राजसुत तू परि व्यर्थ पाहीं । राजाधिकार न घडे तुजला कदां हीं ॥
अन्योदरीं जनन होउनि हीन झाले । सापत्नभाव धरूनी मग त्यासि बोले ॥१८॥
न होतासि तूं पुत्र माझा कसा रे । वृथा जन्म आयुष्य गेलें चि सारें ॥
करी यत्न आता भजें श्रीपदातें । पुन्हा जन्मल्या पावसी या पदातें ॥ १९ ॥

सुरूची सापत्नी वचन शरसंधान करितां ।
त्वरें झाले भग्न ध्रुवहृदय धैर्या न धरितां ॥
गळा दाटे बाप्पे नयनिं जळधारा वरुषती ।
मुखीं श्वासोच्छ्वासें अधर बहु कंपीत दिसती ॥ २० ॥

पीता निवारी न कदापि तीतें । तो वश्य झाला सुरुचीसुतातें ॥
पाहोनि ऐसें मग तो निघाला । मातागृहातें परतोनि आला ॥ २१ ॥

सापत्नी जननी सखेदवचनीं बोले ध्रुवालागुनी ।
ऐकोनी श्रवणीं सशोक नयनीं ताताकडे पाहुनी ॥
वाढे दुःख मनीं वदे न वचनीं पाणी भरे लोचनीं ।
भूपातें त्यजुनी सुनीतिसदनीं आला दिनीं आननीं ॥ २२ ॥

अधर कांपत कंठ ही दाटला । परम दुःख जळार्णव लोटला ॥
गळति अश्रु मुखीं दुख खेद तो । सुरुचिशब्दशरें क्षतयुक्त तो ॥ २३ ॥
यथापूर्व सांगोनि वृत्तांत माये । सुनीतीसि तो खेद पोटीं न माये ॥
म्हणे तात सिंहासनासन्निधानीं । सुरूचीमुखें पावलों मानहानी ॥ २४ ॥

वचन परिसता ही खेद झाला मनासीं ।
ढळ ढळ जळधारा चालिल्या लोचनासी ॥

सुरुचिवचनदुःखें अंतरीं नावरोनी ।
रुदन करित तेव्हां दीर्घ लांपे करूनी ॥ २५ ॥
पुनरपि मन तेव्हां शांत केलें विवेकें ।
त्यजुनि सकळ खेदा बोलिली ती सुवाक्यें ॥
सुरुचिवचन बापा सारिखें सत्य आहे ।
हरिभजन करी जो तो चि राज्यासि लाहे ॥ २६ ॥
दुर्भाग्य मी म्हणउनी वदली सुरूची ।
हें अन्यथा न तनया तिचि गोष्टि साची ॥
कीं मी प्रिया म्हणवितां पति फार लाजे ।
भूपाळका मज अशी युवती न साजे ॥ २७ ॥
दुर्भाग्य मी जठरिं रे तुज जन्म झालें ।
माझ्या वधें करूनि रे तुज वाढविलें ॥
जन्मांतरीं हरि तुवा पुजिला चि नाहीं ।
आतां परोक्ति न मनीं मनि खेद कांहीं ॥ २८ ॥
जे चिंतिती निशिदिनीं हरिच्या पदातें ।
नाशी अनादि भवकल्मषआपदांतें ॥
कल्याणपूर्णसुख दे भजतां चि दासीं ।
लक्ष्मी अशी पदरजीं अनुरक्त दासी ॥ २९ ॥
विधिहरसुरइंद्र आपुलाल्या पदासी ।
त्यजुनि मग निघाले श्रीहरीच्या पदासी ॥
इतर हि निजदासां इच्छिलें तें चि देतो ।
सकळ हि जगदात्मा वेद ऐसें वदे तो ॥ ३० ॥
अनादि हा मार्ग असा चि बापा । मुमुक्षु लोकांप्रति शुद्ध सोपा ॥
शुकादि किंवा विबुधा जनासी । उपाय हा भोगवितो पदासी ॥ ३१ ॥
दयालेशासाठीं जन भजति यत्नें कमळजा ।
करीं हस्तपद्मातें धरुनि गवसी पादजल ज्या ॥
दया त्याची सर्वोत्तमकमलपत्राक्ष सदया ।
विनादुःख ध्वसी तव इतर नाहीं च तनया ॥ ३२ ॥
हें ऐकिलें त्या ध्रुव बाळकानें । मातामुखें बोधक शब्द कानें ॥
जाया वनालागुनि सिद्ध झाला । मनीं स्मरे त्या जगदीश्वराला ॥ ३३ ॥
कुमार जातां समयीं वनासी । सखेद झाली जननी मनासी ॥
म्हणे सुपुत्रा तुजवांचुनी रे । क्रमूं कशी या भवनीं क्षणा रे ॥ ३४ ॥

ध्रुवा माझ्या बाळा तुजविण गृहीं वेळ न गमे ।
गमे हा कल्पांत तव गमन होतां च्चि नियमें ॥
सिमेहोनी दुःख बहुत मजला वाटत असे ।
अशा माझ्या तान्ह्या पुनरपि तुतें पाहिन कसें ॥ ३५ ॥
शरीरीं ही तूझ्या दिसति बरव्या राजस कळा ।
कळायुक्ती बुद्धी नृपतिसम कीं साम्य सकळा ॥
परी अद्यापी रे वनविजन नेणे तव मती ।
कसा जासी बापा वनचरमृगे व्याघ्र फिरती ॥ ३६ ॥
नसे पाहीं कांहीं परम सुकुमारा मृदु पदा ।
धनीं कांटे मोठे रुतति फिरतां घोर अपदा ॥
क्षुधा पोटीं लागे अशन समयीं कोठुनि मिळे ।
अशी चिंता तूझी हृदयिं करितां दुःख न ढळे ॥ ३७ ॥
वनामध्यें रात्री विचरति भुतें गर्जति पिसीं ।
दुजें कोणी नाहीं भयचकित होतां झडपसी ॥
कशी निद्रा घेसी कुश तृण खडे ही अवनिसी ।
अशी चिंता तूझी करुं मि किती कंठुं दिननिशी ॥ ३८ ॥
तुझे भाते बाणा लघु धनु अळंकार बरवे ।
महासौंदर्येंशी तव तनुजनीं दिव्य मिरवे ॥
स्वनेत्रीं देखेंना तरि क्षण त्रुटी कठिन कशी ।
सुरुचीं हे साची प्रकटली महा घोर विवशी ॥ ३९ ॥
मला या संसारीं तुजविण नसे सौख्य दुसरें ।
महा दुःखें पोटीं तुज नयनिं पाहोनि विसरें ॥
सुनीतीचीं वाक्यें अति निकट मायामय मनीं ।
ध्रुवे तीं ऐकोनी करि बहु समाधान वचनीं ॥ ४० ॥
हरी हा विश्वात्मा परम करुणासिंधु म्हणती ।
स्वभक्तांतें रक्षी बिरुद श्रुतिशास्त्रार्थ वदती ॥
असा श्रीचा कांतू कठिण विपिनीं रक्षिल मला ।
सुखें राहें माते अभयवर देऊनि मजला ॥ ४१ ॥
नमस्कारितां ते आशीर्वाद देते । करीं गा दया श्रीहरी लेंकुरातें ॥
मनोभीष्ट सिद्धीस नेई ध्रुवाचें । वनीं रक्षि यातें करीं बोद साचें ॥४२॥
जननितें नमुनि ध्रुव बाळकें । निघतसे विपिना अति कौतुकें ॥
नगरिचे जन लोक समस्त ते । म्हणति मूर्ख नृपास कितेक ते ॥४३॥

ध्रुवा ऐसें बाळ सगुण दुसरें आन न दिसे ।
सुरूचीच्या वाक्या नृप तरि कसा मानित असे ॥
अरण्यातें जातां समर्थ समजावूनि कुमरा ।
गृहा नेईना कां जन वदति ऐसे नृपवरा ॥ ४४ ॥
जनास ही खेद अपार झाला । येती जळें ते क्षणि लोचनाला ॥
बहु स्त्रिया पावित लोक जाती । दूर प्रदेशीं अवघे रहाती ॥ ४५ ॥
नमी तो मातेतें त्यजुनि मग माया शंकरी ।
करी प्रस्थानातें गमन करितां चिंतन करी ॥
करी जों तों पावे परम करूणासागर हरी ।
हरी जो तापातें उचलुनि कृपासिंधुलहरी ॥ ४६ ॥
पुढां चालतां राहिली लोकमांदी । सुनीती फिरे मानसीं घोर खेदीं ॥
ध्रुवें लंघिली मेदिनी चालिलासे । वनें दुर्गमें घोर कर्में विलासे ॥ ४७ ॥
रिसें सारसें शार्दुळादीक जाती । मृगें व्याघ्र मार्गीवरूनी च जाती ॥
न शंके मनीं धीट ही फार चित्तें । हरीचिंतनें वारिलें सर्व चिंते ॥ ४८ ॥
तडागां नद्यां ही गिरीच्या श्रमातें । उलंघोनि देखे पुढें आश्रमातें ॥
मुखीं वेदघोष ध्वनी सुस्वरांचे । ऋषी बैसले पूजनीं ईश्वराचे ॥ ४९ ॥
मखनियमकजाया बोलती त्या ध्रुवातें । कठिण विपिन हिंडे सांग तूं कोण एथें ॥
जनक जननि तूझी कोणती लेंकुरा रे । त्यजुनि सदन रानीं हिंडणें तूज कां रे ॥५०॥
कीं चूकलासी जननीजनकासि वत्सा । पावूं तुझ्या सदनिं तूज वदे स्वइच्छा ॥
ये आमुच्या सदनिं आणि हरूं श्रमातें । वदूनियां मुनिसजा निज आश्रमातें ॥५१॥
ऋषींच्या पत्न्यांला ध्रुव मधुर शब्दें वदतसे ।
पिता विष्णू माझा जननि कमळा तो म्हणतसे ॥
चुकेलों त्यांतें मी बहुत फिरतां कष्टत असें ।
करा त्यांची भेटी मज जरि तुम्हांतें विदितसे ॥ ५२ ॥
ऐकोनियां शब्द असे ध्रुवाचे । एकी पुढें बोलति एक वाचे ॥
यातें शिशू बाइ कसें म्हणावें । जातो तसा त्याप्रति जाउं द्यावें ॥ ५३ ॥
लंघोनियां जो ऋषिआश्रमातें । जातां मनीं तो न मनी श्रमातें ॥
तों भेटला नारद त्यासि वाटे । देखोनि आनंद मनांत वाटे ॥ ५४ ॥
करीं शोभे वीणा सुरस हरिचें गायन करी ।
करीपादन्यासें क्रमित पथ येतो शंकरी ॥
ध्रुवातें देखोनी सदय मग होऊनि पुसतो ।
गृहीं ऐश्वर्यातें त्यजुनि विपिनीं काय फिरतो ॥ ५५ ॥

तूं क्षात्रवंशी सुनू नृपाचा । सखेदसा दीससि पूर्ण साचा ॥
घरीं दुरुक्ती अपमान लाहे । सर्वज्ञ त्यातें मग पूसताहे ॥ ५६ ॥
म्हणे लेंकुरा खेद हा कायसा रे । वदे तो तया स्वामि सर्वज्ञ सारे ॥
सुरुची गृहीं विंधिलों शब्दबाणीं । क्षतें तीं बरीं जो करी चक्रपाणी ॥५७॥
त्याकारणें जात असें वनासी । भेटेन आतां भवभंजनासी ॥
ऐकोनि ऐशीं वचनें तयाचीं । निवृत्ति त्याच्या करितो मनाची ॥ ५८ ॥
यानंतरें जाउं नको वनासी । घेऊनि जातों तुझिया गृहासी ॥
दूषूनि राया सुरुचीसतीतें । स्थापीन तूतें तुझिये पदातें ॥ ५९ ॥
ब्रह्मादि ही हुडकिती हरिच्या पदासी । भेटेन मी म्हणसि त्या जगदीश्वरासी ॥
हें तों अपूर्व न घडे तुज लेंकुरा रे । कीं तो मिळे न तपल्या तप निर्जरां रे ॥६०॥
समाधियोगास हि आकळेना । वेदश्रुतीतें महिमा कळेना ॥
तूं बाळ पांचा वरुषां वयाचा । नको करूं आग्रह जावयाचा ॥ ६१ ॥
ध्रुव म्हणे परिसें मुनिराज या । परतता सहसा न पवें जया ॥
सुरुचिनें वचनें शर विंधिलें । पुनरपी न वचे मन भंगलें ॥ ६२ ॥
भक्तिदायक रमा निज दासी । मुक्ति ज्या प्रति सदां उपवासी ॥
त्या जगद्गुरुपदाविण मातें । राज्य तें न सहसा सुखदातें ॥ ६३ ॥
आकाश ही जरि तुटोनि पडेल माथां । आतां पडो तरि तपीं न चळें समर्था ॥
हा ब्रह्मगोळ जरि आजि लयासि जातो । जावो तथापि हरिचा निज दास होतों ॥६४॥
ऐसें वदोनि मुनिच्या चरणारविंदीं । ठेवी स्वमस्तक म्हणे मज मोहबंदीं ॥
निर्मुक्तता करुनि दे सदय स्वदीक्षा । मी वत्स तूं जनक हे पुरवीं अपेक्षा ॥६५॥
मुनिवरें दृढ निश्चय देखिला । मग तया करुणें अवलोकिला ॥
वरद हस्तक मस्तकिं ठेविला । तदुपरी मुळ मंत्र निरूपिला ॥ ६६ ॥
ॐकारशब्द पहिला नमो म्हणोनी । त्या नंतरें भगवते चहु अक्षरानीं ॥
यकार अंतिक वदोनि हि वासुदेवा । हा द्वादशाक्षर मनीं उपदेश ठेवा ॥ ६७ ॥
त्या नंतरें सगुणता जगदीश्वराची । घे ध्यानपद्धति मनोगत सिद्धि साची ॥
कीं सांवळी तनु गळां वनमाळि शोभे । श्रीवत्सलांच्छन उरीं जगदब्ज लोभे ॥६८॥
भुजा चार हातीं धरी शंखचक्रें । गदा पद्म ज्यातें भिती दैत्यचक्रें ॥
करीं कंकणें बाहुपूरें बिरांचीं । महा तेज कंठीं प्रभा कौस्तुभाची ॥६९॥
पदीं नूपुरें गर्जती वेद घोषें । कटीं मेखळा सोज्वळा त्यांत भासे ॥
विजेचे परी घेतला भाव आंगी । प्रभा वेगळी कोण तेथें विभागी ॥७०॥
ऐसी ध्यानउपासना ध्रुवमना बोधूनियां पद्धती ।
प्राणायाम सदैकन्यास करवी मुद्रा अशी ज्या रिती ॥

वायूधारण आसनस्थ बसणें नेत्रांबुजें झांकुनी ।
एवं साधनसंपती नृपसुता सांगे बरी तो मुनी ॥ ७१ ॥
माथां किरीट श्रवणीं द्युति कुंडलांची । लोपे गळां श्वेत प्रभा रविमंडळाची ॥
समिश्र कुंतळ कपाळिं टिळा प्रभा ते । शोभे जशी अरुण पूर्वदिशा प्रभातें ॥७२॥
निजगुरुकर माथां लाभ झाला तयासी ।
स्थिरचरजगदात्मा भास होतो तयासी ॥
भवभय मग नाहीं मीपणा ठाव कैचा ।
अचळपदिं च राहे दास तो सद्गुरूचा ॥ ७३ ॥
ध्यानादि षोडशपुजा उपचार अर्चा । बोधूनि त्या प्रकटली मति वाक्यचर्चा ॥
सच्छिष्य तो ध्रुव गुरुक्त क्रमेंकरूनी । साधीन हें मनिं धरी दृढ आवरूनी ॥७४॥
मधुवन यमुनेच्या जाउनीयां तटाकीं ।
रमणिय अवनीतें आसनार्थी विलोकी ॥
तुळसिदळसहस्रीं कुंदमंदारजाती ।
मिळवि पुजनद्रव्यें न स्मरे दीनराती ॥ ७५ ॥
बत्तीस लक्षण विचक्षण त्या ध्रुवातें । देखोनि नारद कृपें द्रवला स्वचित्तें ॥
तो बोलिला ध्रुव मला कृतकृत्य केलें । माझे मनोरथ दयान्वित सिद्धि नेले ॥७६॥
या नतरें गुरु पुजी नविनोपद्रव्यें । केली यथाविधि अनन्य रिती स्वभावें ॥
साष्टांग दंडवत घालुनियां तयानें । केला प्रसन्न मुनि शिष्यविशादरानें ॥ ७७ ॥
यानतरें मुनिगुरु नृपनदनाचा । बोधूनि मार्ग हि बरा हरिपूजनाचा ॥
संतोषचित्त मग तेथुनिया निघाला । उत्तानपादभवनाप्रति शीघ्र गेला ॥७८॥
देखोनि नारदमुनीश्वर त्या नृपानें । आच्छादिलें वदन उतरअंबरानें ॥
या नतरें पुसतसे विधिपुत्र त्याला । राया तुझा हरुष कां अतिमंद झाला ॥७९॥
हे पूज्यमान परिसें मुनिवर्यमूर्ती । दृष्टीसि थोर पडले वदुं मी अकीर्ती ॥
कीं द्वेषबुद्धि सुरुची छळितां ध्रुवासी गेला समस्त त्यजुनी हि अनु पुरीसी ॥८०॥
परम अधम मी हो वश्य झालों स्त्रियेसी ।
अकरुण सुरुची ते बोलिली मत्सरासी ॥
सगुण कुमर माझा त्रास लाहे सभेसी ।
मज निकट निवारी मी तधीं खेद त्यासी ॥ ८१ ॥
वनीं तो एकाकी मनुज दुसरें नाहिं जवळी ।
क्षुधा लागे तेव्हां अशन कैचें त्या तरुतळीं ॥
करी निद्रा जेव्हां रिस वृक भुतें भक्षिति तया ।
अगा चित्तीं माझ्या हरुष अवघा जाय विलया ॥ ८२ ॥

वदे तो मुनी कीर्त्तिवंता भुपाळा । हरी मस्तकीं सर्वदा त्याचि बाळा ॥
असे कीं महा भक्त तो धीर चित्ता । असें जाणुनी टाकि तूं सर्व चिंता ॥ ८३ ॥

अभयवचन ऐसें देउनी त्या नृपासी ।
त्वरित गमन केलें श्रीहरीकीर्त्तनासी ॥
गगन विपुळ पंथें स्वर्गलोकासि गेला ।
क्षणभरि स्थिर नोहे दक्षशापोक्ति ज्याला ॥ ८४ ॥

मैत्रेय सांगे विदुरा कथा हे । कीं त्या ध्रुवा श्रीहरिची कृपा हे ॥
शुकेंद्र तो हे चि परीक्षितीतें । बोधी करी पावन तो क्षितीतें ॥ ८५ ॥
पुढें कथा पाहुनि गोड आहे । ध्रुवासि त्या श्रीहरि भेटला हे ॥
तो लाभ इच्छूनि तुम्ही हि सारे । ऐकाल तेव्हां भवदुःख हारे ॥ ८६॥
गायत्रें त्या भवघ्नत्राणें । आराधिला श्रीहरि मननानें ॥
एकासनीं बैसुनियां तपातें । करूनि सोसी हिम आतपातें ॥ ८७ ॥

त्रिरात्री तो सेवी कवठ बदरीचें फळ असे ।
क्रमी मासातें त्या उपरि दिन सा निर्जळ असे ॥
वनीं वल्ली वृक्षांनिगळित फळीं त्या तदुपरी ।
स्विकारी आल्हादें रस कटुक तेव्हां तदुपरी ॥ ८८ ॥
तिजा मासीं तीर्थें उचित तितुकीं पीउनि वना ।
अहोरात्रींमधें अविकळ दिसे नित्य हि वना ॥
चतुर्थीं मासीं तो सुजळ त्यजिलें ध्यान धरुनी ।
दिना बारा अंतीं अनिळ अशना नेम करुनी ॥ ८९ ॥
ऐसा मत्र चतुर्थ मास जपुनी एकासनीं बैसला ।
अष्टांगाचित योगसिद्ध शरिरीं वज्रापरी भासला ॥
अष्टाविंशति सोज्वळा प्रतिकळा झाल्या चि मोठ्या तधीं ।
लोहे अमृतधार सप्तदिवसीं तो पुष्ट देहावधी ॥ ९० ॥

नृपसुत तप साधी एक निष्ठा मनात । शचिपति भय मानी सर्व देवांसमेत ॥
तपच्यवन कराया यत्न चिंता सुरांसी । करूनि वचन सारें लक्षिलें मानसासी ॥९१॥
सभेमाजि बोलावुनी उर्वशी ते । म्हणे इंद्र तीतें छळीं हो ध्रुवातें ॥
तधीं ते वदे लेंकरू तें सुरेशा । नव्हे कार्यसिद्धी वृथा सोडि आशा ॥ ९२ ॥

अहि अजगर मोठे तक्षकादीक जाती ।
विषधर विषधारा आननांतूनि जाती ॥
निवडुनि सुरनाथें टाकितां तें ध्रुव तो ।
गरुड सम दिसे त्यां भाव तेव्हां कळे तो ॥ ९३ ॥

ऐरावती तो मग पाठवीला । गर्जे तयातें अविलोकियेला ॥
श्रीनारसिंहाकृति त्यास भासे । भयें पळे इंद्रपुरीं प्रवेशे ॥ ९४ ॥

शचिपति मग क्रोधें मेघ बोलावुनीयां ।
कठिण वचन बोले कीं ध्रुवातें छळाया ॥
युगसम शिळधारीं होउं द्या आजि वृष्टी ।
मधुविपिन बुडों द्या सध्रुवान्वीत सृष्टी ॥ ९५ ॥

क्षितिताळिं हरमायां छत्ररूपें ध्रुवासी । जळधरजळवृष्टी स्पर्शे नाहीं तयासी ॥
शतमख करि चिंता काय आता करावें । परम तप ध्रुवाचें कोण युक्ती छळावें ॥ ९६ ॥

न चाले जो कांहीं छळण तंव तो श्रीदशपती ।
वना आला वेगें युवतिसम होऊनि सुनिती ॥
महा मोहालापें रुदन करिते कीं तुज वनीं ।
तुला भेटो आल्यें क्रमुनि गिरिदुर्गें चि अवनी ॥ ९७ ॥

कुताळी दो हातीं अधर अधरें चुंबित असे ।
मिठी घाली कठीं जननिसम वाक्यें वदतसे ॥
ध्रुवा माझ्या बाळा मधुर वचनें कां न वदसी ।
सख्या मज्जीं माता मृतक तुझिया वाक्यपियुषीं ॥ ९८ ॥

गृहा ये तू आतां त्यजुनि विपिनातें झडकरी ।
सुरुची बा राजा विनित मज झाली झडकरी ॥
म्हणे राजा पुत्रा नृपपद हि देईन तुजला ।
तुझे सापत्न्याहीं नृपवश हि सर्वांहि त्यजिला ॥ ९९ ॥

उपाय यत्नादिक फार केले । ध्रुवापुढें सर्व हि व्यर्थ गेले ॥
समाधिसिद्धींत निमग्न झाला । देहस्थितीभाव नसे तयाला ॥ १०० ॥
उभा असे एक पदाग्रीं तो । दुजा पदा जानुवरी धरीतो ॥
धरा तळीं कंपित फार झाली । लोकत्रयाची मग शक्ति गेली ॥ १०१ ॥
जाज्वल्य माळा जडलि जगाची । कांपे धरा शक्ति अशी ध्रुवाची ॥
ब्रह्मांडपोटीं स्वरूपीं जयाच्या । तो राहिलासे हृदयीं ध्रुवाच्या ॥ १०२ ॥
आधार जो ब्रह्मशिवा जगाहे । ध्यानीं तया ठेवुनि मग्न राहे ॥
ज्या देवता इद्रिय साभिमानी । त्या पावल्या उद्भुत त्या तपानीं ॥ १०३ ॥

सकळ हि अवरोधी कुंभकीं वायु साधी ।
सुरगण जिवजाती कोंडल्या श्वासबंधीं ॥
सुर नर मुनि तेव्हां त्रासले खेद भारी ॥
शरण सकळ गेले ज्या स्थळीं कैटभारी ॥ १०४ ॥

सत्कर्मानिं बद्धांजलियुक्त उक्ती । गोविंद दामोदर माधवेति ॥
वायू जगाचा अवरोध झाला । करीत उक्ती स्तुति त्या ध्रुवाला ॥१०५॥
दयाळ देवांसि वदे हरी तो । उत्तानपादात्मज जो ध्रुव तो ॥
मद्दर्शनालागिं रिघे वनांत । त्याच्या तपें ताप तुम्हां जनांत ॥ १०६ ॥
आता तया देइन दर्शनातें । तेव्हां महा सौख्य तुम्हां जनांतें ॥
होईल ऐसें वदला परेश । त्वरा करी त्याप्रति जावयास ॥ १०७ ॥
खगपतिवरि बैसे वेग तो वर्णवेना । गरुडगति नभाच्या अंतरीं लक्षवेना ॥
पवनन गमनेच्या जो तयाकाशि आला । ध्रुवहृदयनिवासी तो चि प्रत्यक्ष झाला ॥१०८॥

हृदयकमळिं त्याच्या चित्स्वरूप प्रकाशी ।
प्रकट हरि च तो कीं क्षीरधीजानिवासी ॥
नमुनि चरण तेव्हां हर्षला रूप पाहे ।
जय जय जगदीशा धन्य मी धन्य आहे ॥ १०९ ॥
घोषें युक्त जसा समुद्रसरिसा गर्जे हरीची स्तुती ॥
ॐकारादि क्रमोपनिषदें श्रुत्यर्थ वानी मती ।
नित्यानंदसुखार्णवार्थ लहरी श्रीपाद दीनावरी ॥
तैसी बुद्धि सुसिद्धिदायक तधीं आरूढलो वैखरी ॥ ११० ॥
पित्याप्रती बाळक ज्या रितीनें । दावीतसे भाव तया रितीनें
दावोनियां तो ध्रुव सौख्य लाहे । तशी पिता श्रीहरिची कृपा हे ॥१११॥
कंबू तो निजहस्तकीं मग तया भाळस्थळीं लाविला ।
ॐकार स्वमुखें पाहा मग कसा स्तोत्रें करूं लागला ॥
जो वेदीं स्तविला विराटमय जो आनंदरूपें हरी ।
ज्ञानाच्या स्तवना नमूनि तयिं ती आरंभिली वैखरी ॥ ११२ ॥
जै जै जै जगदीश्वरा स्थिरचरा व्यापूनि सर्वांतरा ।
जै जै जै श्रुतिगोचरा परतरा विश्वंभराडंबरा ॥
जै जै जै सुर शंकरा गिरिधरा माणिक्यमाळाधरा ।
जै जै जै अभयकरा शुभकरा दीनोद्धरा पाहि मां ॥ ११३ ॥
अणोरणीयान्महतो महीयान् । तद्रूप ऐसें वदती श्रुती या
द्विसप्तमायामय सर्वधीशा । नमोस्तु ते श्रीभगवान् परेशा ॥ ११४ ॥
नमो नमो जीवकळाविहारा । नमो नमो निर्गुणनिर्विकारा ॥
नमो नमो व्यापक विश्वसारा । नारायणायेति नमो नमस्ते ॥ ११५ ॥
सर्वांतरीं प्रकट होउनि बोलविसी । निद्रिस्थ बुद्धि असतां हरि जागवीसी ॥
सजावनीं अखिल भक्ति जनासि देसी । प्राणेंद्रियें सकळ चालकता करीसी ॥११६॥

हे लक्ष्मीरमणा अलक्ष अगुणा सर्वांतरीं देखणा ।
भूभारोत्तरणा दयाळ करुणा त्रैलोक्यसंरक्षणा ॥
× × × × × × × × ।
विश्वाच्याभरणा विचित्र निपुणा श्रीषड्गुणा पाहि मां ॥११७॥
वंदे पंकजलोचना सुखघना स्वामी जगत्पावना ।
क्षीराब्धीशयना सुपर्णगमना दुर्बुद्धिविध्वंसना ॥
वंदे ब्रह्मसनातना त्रिभुवना ब्रह्मादिकां शासना ।
त्राहि त्राहि नमो नमो भगवते लक्ष्मीपते पाहि मां ॥ ११८ ॥

तूं नित्य मुक्त परि जो अति शुद्ध आत्मा । कूटस्थ आदिपुरुषाधिप जो त्रिधामा ॥
सर्वज्ञ सर्वगत ईश्वर विश्वकर्ता । सतापरी तुज चि तू सह गा अकर्ता ॥११९॥
त्वत्कीर्ति जे न गणवे निगमागमांते । निर्धूत निर्गुण निरामय ब्रह्म तूं तें ॥
लीलावतार परिकल्पितपीतवासा । कंजेक्षणा हरि नमो त्रिजगन्निवासा ॥१२०॥
तूं कल्पवृक्ष हरि अक्षयमोक्षदानी । हे नेणती तुज भवी जन ते निदानीं ॥
जे अल्प स्वल्प अस इच्छुनियां अपेक्षा । काळानळीं पडति पावति कर्मशिक्षा ॥१२१॥

दयासागरें श्रीरमानायकानें । ध्रुवाची स्तुती आयकीली स्वकानें ॥
मनोभीष्ट जें इच्छिलें लेंकरानें । वरा ओपिलें ते क्षणीं श्रीवरानें ॥१२२॥
नाना तपें साधुनियां श्रमासी । देवां ऋषी आणिक योगियांसी ॥
ऐशास ही दुर्लभ निश्चयेशीं । ध्रुवा वसे जाऊनि त्या पदासी ॥ १२३ ॥

अचळ बहुत कल्पीं भंग नाहीं जयासी ।
ग्रहगण ऋषि तारा त्याहुनी उंच होसी ॥
भ्रमण करिति तूझ्या भूवना मंडला रे ।
सदयवदन ऐसें श्रीजगन्नाथ बोले ॥ १२४ ॥

तेतीस सहस्त्रें वरुषें सरेसी । पाळीं धरा हे अति वैभवेंशीं ॥
पाळूनि वर्णाश्रमसविधीसी । त्यानंतरें जा अढळासनासी ॥ १२५ ॥

शुभ वर कर माथां ठेवुनीयां ध्रुवासी । गरुडगमन तेव्हां चालिला स्वाश्रमासी ॥
सदय हृदयसिंधू भक्त संरक्षणाचा । अचळ भुवनपाळू काळ तो दुर्जनाचा ॥१२६॥
घेऊनियां वरद तेथुनियां निघाला । तो पातला पुरिस तों अनुताप झाला ॥
सांडूनियां हरिपदांबुजसौख्यधामा । जातो कसा परम मूर्ख मि लुब्ध कामा ॥१२७॥
आष्टांग योग बहु साधन योग युक्ता । नाना तपें मुनिऋषीश्वर साधुसंतां ॥
लक्ष्मीस ही परम दुर्लभपायधूळी । प्रत्यक्ष तो मज सखा सुरराजमौळी ॥१२८॥
हें भाग्य टाकुनि कसें हत भाग्य झालें । संपादिलें धन श्रमें मग हारवीलें ॥
देवादिकीं त्वरित बुद्धिसि भ्रंशवीलें । माझें च सुबहुदु:सह त्यांसि झालें ॥ १२९ ॥

आनंदसिंधुसलिलांत निमग्न झालों । मायिक सर्व विषयांतुनि भिन्न ठेलों ॥
तो मी पुन्हा नृपपदाप्रति जात आहें। धिग्बाळबुद्धि चळलों स्वमति स्वभावें ॥१०३॥
पुरीं रडे आठवि ती ध्रुवासी । चिंतार्णवीं खेद महा पित्यासी ॥
माझा पुन्हा केंवि कुमार भेटे । लक्षूनि राहे मग त्या सुवाटे ॥ १३१ ॥
सुवार्ता तों आली ध्रुव पुनरपी येत नगरा ।
असें एकाएकीं श्रवण करिती त्या नृपवरा ॥
न वाटे हें सत्य म्हणउनि पुन्हा काय वदला ।
अभद्रातें भद्रा करि कवण तो देव मजला ॥ १३२ ॥
साद्यंत वार्ता मग वार्तिकानीं । निवेदितां ऐकिलि ते स्वकानीं ॥
आनंद झाला मग राजयासी । वस्त्रें धनें देत असे तयांसी ॥ १३३ ॥
आला हो पुत्र आला म्हणउनि जनका थोर आनंद झाला ।
मातेचा प्राण आला शुभ दिन फळला दान देती द्विजांला ॥
सामोरा राव आला हय रथ [ बहु ] गजभारशृंगार केला ।
वाद्यांचा घोष झाला जन वदति चला पाहुं या त्या ध्रुवाला ॥१३४॥
मणिमय रथ त्यातें राव आरूढ झाला ।
अभिनव सुख त्याचा सर्व संताप गेला ॥
हय चपळ बळाचे जुंपिले त्या रथासी ।
त्वरित मग पुढें तो जाय आणावयासी ॥ १३५ ॥
सुनीती सुरूची सुखी फार होती । बसोनी पुढें शीबिकारूढ जाती ॥
बहू हर्ष आबाळवृद्धा जनासी । पाहायास ते लोक जाती ध्रुवासी ॥१३६॥
पूर्णचंद्र ध्रुव देखुनि डोळां । सिंधुतुल्य नृप टाकुनि वेळा ॥
ऊर्मि बाहु पसरूनि च धांवे । सौख्य तें वदनिं केंवि वदावें ॥ १३७ ॥
मिठी घाली कंठीं स्वमुखि मुख तो चुंबित असे ॥
स्रवे आनंदाश्रू निढळ निढळा लावित असे ॥
पुन्हा हुंगी माथां नवल अधरस्फुंदन घडे ।
गळा दाटे बाष्पें सुखमय पुन्हा मूर्छित पडे ॥ १३८ ॥
ऐसा यामविराम होउनि घरा आला स्वदेशावरी ।
बाष्पें सद्गद वाक्य बोलत असे तो चोचरे वैखरी ॥
रे पुत्रा मज कां त्यजूनि विपिनीं बा वास केला तुवां ।
गेला त्या दिवसा धरोनि तनया ना सेविलें वैभवा ॥ १३९ ॥
सुरूचीस आधीं नमस्कार केला । प्रसादें तुझ्या श्रीहरी प्राप्त झाला ॥
तुझी पूर्व प्रारब्ध रेखा चि तैशी । म्हणे ते सुता वंद्य होसी सुरासी ॥१४०॥

सुनीती जे माता चरण ध्रुव माथां नमितसे ।
मुखाला दे तेव्हां उदक नयनीं वाहत असे ।
म्हणे पुत्रा मातें त्यजुनि अजि गेलासि विपिनीं ॥
कधीं देखें तूतें म्हणउनि अपेक्षा अनुदिनीं ॥ १४१ ॥
आलिंगिलें त्या मग उत्तमासी । सुबंधु दोघे अति संभ्रमेशीं ॥
स्नेहावधि ज्यांचा न कदापि आटे । आश्चर्य तेव्हां सकळांसि वाटे ॥१४२॥
रायें अगामनिगमांत विचार केला । राज्याधिकार करितां बहु काळ गेला ॥
यालागिं जाइन म्हणे विपिनीं प्रभातें । न स्पर्शतां बरवि होय रविप्रभा ते १४३
ऐसें शुकाचार्य [ तयासि ] वदे नृपासी । पदाभिषेक करुनी मग त्या ध्रुवासी ॥
सिंहासनीं बसविलें सुनितीसुतातें । त्या नंतरें त्वरित जाय अहो वनातें ॥१४४॥
प्रकृतिकुळद्विज देवां मानली राजनीती ।
सहज वरद झाली श्रीरमाकांतमूर्ती ॥
म्हणउनि सकळांसी फार आनंद झाला ।
ध्रुव नृप म्हणतां हो राज शोभेत आला ॥ १४५ ॥
ऐसें शुकाचार्य वदे नृपासी । कांता सुपुत्रू ध्रुव राजयासी ॥
भोगील तें वैभव संभ्रमेशीं । त्या नंतरें जाइल त्या पदासी ॥ १४६ ॥

समाप्त.

---

## राधाकृष्णसंवाद.

गोविंदा गोपाळा कृष्णा विष्णू मुकुंद घननीळा ।
धृतकौस्तुभवनमाळा पीतांबरधारि देवकीबाळा ॥ १ ॥
कोणी एके दिवशीं रतिसुख देऊनि सत्यभामेला ।
गेला तो राधेच्या सदनीं जो कां बहूत घामेला ॥ २ ॥
राधा प्रितीनें पुसते हरीसी । आरक्त ते लोचन कां तुम्हासी ।
कोणे स्त्रियेशीं रतिसग केला । मुखीं असे पिंगट वर्ण आला ॥ ३ ॥
श्वास मुखीं नखरमुखक्षतचिन्हें पाहिलीं तिणें सकळ ।
नकळत मज सवतीशीं रतला म्हणऊनि जाहली विकळ ॥ ४ ॥
पडतां विकळ सकळगुणसपन्न हरी म्हणे अहो राधा ।
आतां सांग सखे मज कैशी इतुक्यांत जाहली बाधा ॥ ५ ॥
चिरा मस्तकींचा कसा चोळलासे । विचारें कधीं पेंच कां मोकळासे ।
सुगंधादिकीं केश ते सिक्त होती । बहू वेळ तू कुठें गुंतलासी ॥ ६ ॥

करितीस कलह कां तूं कथितों मी ऐक धरूनि विश्वास ।
होतांचि स्मृति धांवत आलों म्हणऊनि दाटला श्वास ॥ ७ ॥
कोठें गेलां होतां माधवजी घर्म केंवि अंगाला ।
सांगा लाज नका धरूं पाहों द्या काय लागलें गाला ॥ ८ ॥
वनीं पोंवळी गाय माझी पळाली । तियेलागिं आणावया रात्र झाली ।
अशा जाग्रणें नेत्र आरक्त झाले । मुखीं तेज नाहीं असे कष्ट केले ॥ ९ ॥
गाई चारित उष्णीं फिरलों म्हणऊनि घर्म अंगाला ।
कस्तूरीतिलकातें लावीतां हात लागला गाला ॥ १० ॥
मग ती विभुलागिं पुसे तुमची विपरीतसंगमी चर्या ।
मर्यादेसी मनहूनि कोण मिळाली तुम्हांस यदुवर्या ॥ ११ ॥
मध्यान्हीं अतिगंधि तीं सुमनसें आणावया पातलों ।
आकाशीं घन दाटले म्हणउनी जाईतळीं बैसलों ॥
पुष्पांचि रसबिंदु जाण पडले तेणें सुगंधू सये ।
पागोटें जरि गुंतलें तरुवरी हें ठाउकें ही नव्हे ॥ १२ ॥
ओष्ठीं दिसे अंजन कां तुम्हासी । ठसावलें कंकण पृष्ठिकेसी ।
वक्षस्थळीं माळ हि रूतलीसे । अशा विनोदें हरिलागिं पुसे ॥ १३ ॥
वनीं जांबुळें भक्षिलीं येतयेतां । दिसे ओष्ठ काळा सखे तूज आतां ॥
अकस्मात येतां तुझे मंदिरासी । तुझे हार गे लागले पृष्ठिकेसी ॥ १४ ॥
माझें दुर्दैव सख्या म्हणउनि तुज गोष्ट हे बरी सुचली ॥
जारा बारा घरच्या चोरा तुज सांग कोण ती रुचली ॥ १५ ॥
घरीं गाय वत्सें असे मोकळी गे । तयाचें लघू शृंग तें लागलें गे ॥
अशीं उत्तरें देत तो राधिकेसी । पुरे बोलणें कृष्णजी तूजपाशीं १६॥
इति राधाकृष्णसंवाद.

---

## आनंदतनयकृत कृष्णचरित्र.

सदनीं ठेवुनि सून एकली । प्रथम यौवन सुंदरी भली ॥
कलश आपण घेउनी करीं । द्विरदगामिनि जाय लौकरी ॥ १ ॥
खेळे खेळ अनंतलील करुणासिंधू नटाचे परी ।
जैसें पद्मपलाशसद्म न जळीं तद्रूप दावी परी ॥
ज्याचें हें ब्रिद चोर जार मुकुटोत्तसाध्य बिंबाधरा ।
त्याची वद्य कथा तया विनटल्या त्या गोपबिंबाधरा ॥ २ ॥
व्रजपुरीं मधु एक एकदां । रविसुतेप्रति ये महामदा ॥

चरणिं वाजति भूषणावली । असितवाहिनि तीर पावली ॥ ३ ॥
गेली मृगांकवदना उदकासि गोपी । तों पै तिच्या निजगृहा हरि विश्वरूपी॥
धुंडुनियां कलश भक्षितसे दधी तें । देखे तया त्वरित सून दयोदधीतें ॥ ४ ॥
ऐसा हरी जंव हरी [ मधु ] दुग्ध भारी । आली घरांतुनि सदा घरसून नारी ॥
कृष्णा नव्हे उचित हें करितोसि चोरी । मी एकली घरिं असें तुज कोण थोरी ५
असासि एकलि नीरजानने । म्हणुनि पातलों चारुयौवने ॥
वदुनि यापरि हस्तकीं धरी । विनवितो तिस आदरें हरी ॥ ६ ॥
वदोनी असें गोपकांता करानें । घरामाजि नेली तया श्रीवरानें ॥
पलंगी वळे नीजवी हाटकाच्या । अशा धन्य लीला जगन्नाटकाच्या ७
अशांत शातकुंभ पूर्ण घेतला शिरावरी । तयीं कुचांबराचला उरोभवे चि आवरी ॥
मंद मंद चालते नितबकुंभगौरवें । ठेवितां पद क्षितीस मंदु बोलतां रवें ॥ ८ ॥
जलकलश धराया ऊर्ध्व होतां चि हात ।
स्तनयुगकलशांते ऊर्ध्व कोंडे पहात ॥
उतर उतर मूर्खा थोर उचावलासी ।
मज सम तुं न होसी व्यर्थ भांबावलासी ॥ ९ ॥
आली घरासि युवती उदकुंभ ठेवी । जीची रतीस न लभे रुचिरत्व ठेवी ॥
शोधी सुनेसि तंव ते न दिसे पहातां । ओ दे न ते मग मुली म्हणुनी वहातां ॥१०॥
अंतःपुरांत निरखी जलदृष्टि ओघें । तों मंचकीं पहुडलीं दिसताति दोघें ॥
आहे दुजा कवण अंतरिं ठीक राया । पाहे चि तों निरखिलें अमरैकराया ॥११॥
निद्रा दिसे उभयतां सुरतश्रमानें । देखोनियां असुख घे स्वकुलाभिमानें ॥
जोडा दिसे सरस यास्तव तोष मानी । दुष्कर्म कीं म्हणुनि राग मनांत मानी ॥१२॥
उभयतांचिया दृष्टि दे मुखीं । जवळि जाउनी एणिदृङ्मुखी ॥
अधरविद्रुमीं दंत रुतले । दिसति त्यांचिया रंग लोपले ॥ १३ ॥
कच कुचा निरीबंध सूटले । सुमनमाळिकाव्यूह तूटले ॥
घरमबिंदुचे वृंद दाटले । अवयवभ्रमें एक वाटले ॥ १४ ॥
देखोनि ये रिति तया अति कोपशीला । झाले म्हणे अहह काय करूं अशीला ॥
निःशंक हे रमतसे परपूरुषातें । सूने दटावित असे धरुनी रुषातें ॥ १५ ॥
धिगी ऊठ गे ऊठ नष्टे खट्याळे । दुवे सगती वंश माझा विटाळे ॥
कसा आणिला बोल माझ्या कुळासी । कसें दाखवूं तोंड या गोकुळासी ॥१६॥
कृष्णा तू करिसी अशीं गुरुतरें कर्में कुला नाशकें ।
ऐशा या कलहा गड्या करिसी कां आतां न साहू शकें ॥
लोकांच्या सुमती मुली तितुकिया केल्या तुवा मोहिता ।

या तूझ्या करणीसमान करणी लोकत्रयीं ना हिता ।। १७ ।।
थांब थांब अगुणा घननीळा । सांगतें वृत तुझ्या जननीला ।।
नीज नीज बरवा शिकवीतें । कर्म हेंच सकळां शिकवी तें ।। १८ ।।
दावूनिया रिति तया अति धार्ष्टिकानें । आली गृहांगणि मग त्वरिता गतीनें ।।
घाली कवाड अति गाढ करारघोषें । लावी कुलूप खिळि बोलतसे प्रघोषें ।। १९।।
कोंडितां यदुवरास गृहांतरीं । वाटला परम तोष अंतरीं ।।
क्रीडती वधुवरें सुनिकेतनीं । जें न सौख्य रतिमीनकेतनीं ।। २० ।।
तें पाथिकातें बहु देत साक्षी । आली यशोदे प्रति सारसाक्षी ।।
म्हणे तुझा पुत्र न मी लवेना । चरित्र त्याचें मज बोलवेना ।। २१ ।।
तूं वर्णिसी कृष्ण महागुणाचा । प्रभाव त्या आधिक निर्गुणाचा ।।
कीं माझिया आदरुनी सुनेला । आलिंगुनी गुंतवि वासनेला ।। २२ ।।
आणावया सलिल मी यमुनातटासी । जाऊनि ये तव विलोकितसें नटासी ।।
आलिंगुनी धरुनि मत्सुतवल्लभेला । मिथ्या नव्हे धरुनि आणिन ये सभेला ।।२३।।
नंद ही शिकविना तनुजातें । सद्गुणीं शिकविना मन ज्यातें ।।
चित्त हीं अजुनि कां न वराडी । जाहला परवधूसि बराडी ।। २४ ।।
अचाटकर्म हा करी न ये चि सांगतां मला ।
दिसा च गोप सुदरी धरीतसे सुकोमला ।।
विचार ही दिसे चि ना वदों मि काय मामिसें ।
घरोघरीं हरी भरे उगा चि नाहिं त्या मिषें ।। २५ ।।
उगा नसे महानग प्रभाव मी वदों किती ।
स्वभाव या प्रमाणिंचा समस्त लोक सांगती ।।
करीं धरी हरी प्रपच आपणेंचि सच्चिता ।
दुजा धरी न सांगतो अपाप होय नाचता ।। २६ ।।
सोसूं किती अगुण हे तुझिया सुताचे । ज्याच्या बळें बहुत जीव पुरस्थितांचे ।
चोरी करी मज न दुःख असे तयाचे । मोहीं मुली म्हणुनि हें च मनांत जाचे ।।२७।।
लाडका करिसि यास एवुला । राग ये वदलिया सये तुला ।।
मूल हें चपळ जाण मी नसें । ये घरा जायें सुजाण मीनसें ।। २८ ।।
तन्वगीतें धरुनी उभय भुजयुगीं शुद्धसौख्यासि सांगे ।
निद्रा घे पूर्णचद्रानन तनय तुझा धीट मोठा असा गे ।
हासे देखोनि मातें झटक उठवितां काय सांगूं कपाळा ।।
नाहीं हा भीत काहीं म्हणुनि जव वदे तों मिळे लोकपाळा ।। २९।।
यशोदा म्हणे आयका बायका हो । न देखों शके हे जगन्नायका हो ।।

कसें घेतलें हें पहा ढाल मोठें। घरूं पाहते चंड वायूस मोटे ॥ ३० ॥
किती बोल ते बापुड्या या मुला गे। असा बोल याच्या नखा ही न लागे ॥
पहा गे कशी कोण गोष्टी कशाला। निघे ना कधीं टाकुनी सद्मशाला ॥ ३१ ॥
वर्णिती हरि शुचित्व पुराणें। त्यावरी अजि कशीं कुफराणें ॥
बोलते × × × × वदनाचे। नेणुनी च गुण चिद्गगनाचे ॥ ३२ ॥
हा ह्मणा अगुण ही अविचारी। ती खट्याळ कशि पैं न विचारी ॥
बोलिया उगलिया नुसत्या या। दाविसी मुरहरा नसत्या या ॥ ३३ ॥
ऐशी नंदवधूचिया मुखविधूपासूनि वाक्चंद्रिका।
देखोनी पशुपांगनास्यजलजीं मीनाचिया मुद्रिका ॥
जों माता करि हास्य लोकपतिची तों दंतसूर्याशुभा।
लक्षूनी अतिदक्षसीं प्रकटते वाङ्माधुरीभा शुभा ॥ ३४ ॥
मामी तुह्मी काय भराल रागें। जाणोनियां सर्व सुतानुरागें ॥
नेणा च कांहीं करणी तयाची। जो गोपिकातें स्मरराग याची ॥ ३५ ॥
करी धरुनि सुंदरी करि विलास नानापरी।
करी परिसरोवरीं करिणिसंग मी श्रीहरी ॥
शिरे व्रज घरोघरीं सहित खेळिये झांभरी।
हरूनि दधिघागरी करि रिती मुलातें भरी ॥ ३६ ॥
दोघांस ही सांपडवूनि खाटे। आल्यें तुह्मा बोल खरा न वाटे ॥
प्रत्यक्ष घ्यां कोंडुनियां कवाडें। लावूनि आल्यें निरखाल वाडें ॥ ३७ ॥
दोघांतें धरुनी करीं करि गमा चाले महा सभ्रमें।
मार्गें हांसति गौळणी हरिपुढें हे घेतलीसे भ्रमें ॥
तों आली सुत घेउनी लगबगां पाशीं यशोदेचिया।
मामी यास पहा अहा म्हणतसे चिन्हास ही याचिया ॥ ३८ ॥
कांहीं हास्य न आंवरे हरिचिया मातेसि नाना परी।
बोले सुंदर डोळसे कवण हा झोंबे तुझ्या कोंपरीं ॥
हा तूझा सुत कृष्ण कीं निरखितां तेन प्रभा सांवळी।
देखे गौर तनू स्वकीय सुत तैं तत्काळ भांबावली ॥ ३९ ॥
टाळी पीटुनि हांसती सकळिका गोपी तटस्था किती।
चाकाटूनि उगी च तन्मय म्हणे श्रीकृष्ण मोठा कृती ॥
चित्तीं चित्त नुरे तनूसि विसरे ढेंकूळसेंची विरे।
तो आनंदसुतप्रभू विनटला सर्वत्र चिद्भानु रे ॥ ४० ॥

समाप्त.

## आनंदतनयकृत-विश्वामित्रयज्ञरक्षण.

त्यानंतरें मुनि म्हणे विजयाभिरामा। आतां चला निजपथेंचि विपद्विरामा ॥
यज्ञाविना दिवस विप्र न ते सहाती। सिद्धाश्रमीं सकळ वाट तुझी पहाती ॥ १ ॥
निष्कंटका वनतती भुजविक्रमानें। केली द्विषद्वधु वधूनि पराक्रमानें ॥
ऐसेंचि येथुनि निशाचर ते क्रमानें। मारानि राज्यधर हो प्रभु शक्रमानें ॥ २ ॥
हे ताटिका वनमृगादिजिवांसि कांटा। होती वनीं करित भक्षुनि पाप सांठा ॥
हे राक्षसी कुलतरूतिल एक फांटा। त्वां तोडिला तरु समग्र तुझा चि वांटा ॥३॥

नेली शुंभवधू वधूनि विलया हे मात पैं मातली।
देखे दृष्टिसि पुष्पवृष्टि गगनीं देवावली पातली ॥
गाती किन्नर कीर्ति वर्णिति मुखीं अत्युन्नता कंधरीं।
कीर्ने भारिव घोर वाटिव तुझी गंधर्व विद्याधरी ॥ ४ ॥
आली पूर्ण कळावयासि सकळा नागामृगा हे नगा।
झाला उत्सव ऊर्ध्व पुच्छ करूनी जाती अगा हे नगा ॥
ऐसा दावित तोष भावित मनीं चाले मुनी बोलतां।
श्री स्वामी म्हणती धनुर्धर पथीं ते चालतां चालतां ॥ ५ ॥
तेव्हां राम पुसे पुढां वन दिठी देखोनि दूर क्षिती।
शोभे शाद्वल पुष्पकुड्मल फळीं शाखा लगा रक्षिती ॥
वल्ली गुल्म सुफुल्ल पल्लव तरु व्योमीं च उंचावले।
मोठें चित्र विचित्र पाहुनि दिठी आलोक लांचावले ॥ ६ ॥

या हिंडती निबिड ते मृग विप्रदेशीं। झाडातळीं घन निकुंजतरु विदेशीं ॥
माझ्या सख्या समज आश्रम हा च लाहो। येती मृगादिक हि आश्रम हा चला हो ॥७॥

तोषे राघव दोघ जे निरखिती आरण्य उत्तुंगसे।
जेथें व्याघ्र मृगेंद्र गाधिप करी जाती फणी मुंगसे ॥
जाती स्वैर जनासि वैर मिळुनी प्रेमास्पदें रक्षिती।
तों येती द्विजराज सन्मुखगती त्यांतें दिठी लक्षिती ॥ ८ ॥

जे आश्रमीं सकळ वाट पहात होते। आले मुनी जवळि जोडुनि हात हो ते ॥
तेजोभरें तपनरूप तपोनिधी ते। ज्यांचा स्वधर्मरत शुद्ध तपोनि धीतें ॥ ९ ॥

ते जों वंदिति गाधिनंदनपदा त्याच्या पदा वंदिती।
राजीवेक्षण रामलक्ष्मण तयां ते गाढ आलिंगिती ॥
ऐशीं देत यथाविधि प्रतिपदीं आलिंगनें वंदनें।
जाती तों रघुराज आश्रम दिठी पाहे मनें पावनें ॥ १० ॥

कुंजा गुंजात पुंज पुंज आलिंच मंजु ध्वनी गुंजती।

## आनंदतनयकृत–विश्वामित्रयज्ञरक्षण.

त्यानंतरें मुनि म्हणे विजयाभिरामा । आतां चला निजपथेंचि विपद्विरामा ॥
यज्ञाविना दिवस विप्र न ते सहाती । सिद्धाश्रमीं सकळ वाट तुझी पहाती ॥ १ ॥
निष्कंटका वनतती भुजविक्रमानें । केली द्विषद्वधु वधूनि पराक्रमानें ॥
ऐसेंचि येथुनि निशाचर ते क्रमानें । मारूनि राज्यधर हो प्रभु शक्रमानें ॥ २ ॥
हे ताटिका वनमृगादिजिवांसि कांटा । होती वनीं करित भक्षुनि पाप सांठा ॥
हे राक्षसी कुलतरूतिल एक फांटा । त्वां तोडिला तरु समग्र तुझा चि वांटा ॥३॥

नेली शुंभवधू वधूनि विलया हे मात पैं मातली ।
देखे दृष्टिसि पुष्पवृष्टि गगनीं देवावली पातली ॥
गाती किन्नर कीर्ति वर्णिति मुखीं अत्युन्नता कंधरीं ।
कीर्ते भारिव घोर वाटिव तुझी गंधर्व विद्याधरी ॥ ४ ॥
आली पूर्ण कळावयासि सकळा नागामृगा हे नगा ।
झाला उत्सव ऊर्ध्व पुच्छ करूनी नाती अगा हे नगा ॥
ऐसा दावित तोष भावित मनीं चाले मुनी बोलतां ।
श्री स्वामी म्हणती धनुर्धर पथीं ते चालतां चालतां ॥ ५ ॥
तेव्हां राम पुसे पुढां वन दिठी देखोनि दूर क्षिती ।
शोभे शाद्वल पुष्पकुड्मल फळीं शाखा लगा रक्षिती ॥
वल्ली गुल्म सुफुल्ल पल्लव तरु व्योमीं च उंचावले ।
मोठे चित्र विचित्र पाहुनि दिठी आलोक लांचावले ॥ ६ ॥

या हिंडती निबिड ते मृग विप्रदेशीं । झाडातळीं घन निकुंजतरु विदेशी ॥
माझ्या सख्या समज आश्रम हा च लाहो । घेतां मृगादिक हि आश्रम हा चला हो ॥७

तोषे राघव दोघ जे निरखिती आरण्य उत्तुंगसे ।
जेथें व्याघ्र मृगेंद्र गाधिप करी जाती फणी भुजगसे ॥
जाती स्वैर जनांसि वैर मिळुनी प्रेमास्पदें रक्षिती ।
तों येतां द्विजराज सन्मुखगती त्यांतें दिठी लक्षिती ॥ ८ ॥

जे आश्रमीं सकळ वाट पहात होते । आले मुनी जवळि जोडुनि हात हो ते ॥
तेजोभरें तपनरूप तपोनिधी ते । ज्याचा स्वधर्मरत शुद्ध तपोनि धीतें ॥ ९ ॥

ते जों वंदिति गाधिनंदनपदा त्याच्या पदा वंदिती ।
राजीवेक्षण रामलक्ष्मण तया ते गाढ आलिंगिती ॥
ऐशीं देत यथाविधि प्रतिपदीं आलिंगनें वंदनें ।
जाती तों रघुराज आश्रम दिठी पाहे वनें पावनें ॥ १० ॥
कुंजीं गुंजति पुंज पुंज अलिचे मंजु ध्वनी गुंजती ।

बर्ही ते नटती कपोत घुमती त्या कोकिला कूजती ॥
हंसादि द्विज हंकती वृकशिवासिंहादिक्या हुकती ।
कुंभी भीष्कति सर्प फुत्कति वनीं तैशा च नानाकृती ॥ ११ ॥
ऋषी सांगे रामा बहु दिवस मी एथ चि असें ।
तपें जाती सिद्धी म्हणुनि पद सिद्धाश्रम असे ।
महर्षी ते हर्षे तप करित सानंद वसती ।
परंतु श्रीरामा निशिचर कुल ध्वंसवसती ॥ १२ ॥
येति संघ बहु पापभंडांचे । देख हे ढिग अनेक हडांचे ।
भक्षिलीं द्विजकुळें अवलोकीं । राक्षसीं कपटकृत्रिमलोकीं ॥ १३ ॥
ऐशी सांगत मात हात धरुनी ते पातले ग्रालिका ।
येती सन्मुख विप्र आणि सुमुखी विप्रांगना बालिका ॥
त्यांहीं पाय धुवूनि अर्चुनि यथान्यायें च नीराजना ।
केली राघवलक्ष्मणासि हृदयीं आनंद संजीवना ॥ १४ ॥
गेले ब्रह्मसभेस सर्व बसले राजे महालक्षणी ।
आतां यावरि काय तें चि गुरुजी आज्ञापिजे ये क्षणीं ॥
कौसल्येय वदे तदा मुनिवरें उल्लासले ईक्षणीं ।
तों गाधेय म्हणे समर्थ चि तुम्ही साधूजगद्रक्षणीं ॥ १५ ॥
यज्ञारंभ उद्यां सहा दिवस या कर्मा मिती तों वरी ।
आम्हा मौन असा महा नियम हा शास्त्रप्रवेशावरी ॥
यज्ञीं विघ्न करावया प्रगटती त्या दुष्ट रक्षोगणा ।
रक्षीं रक्षुनि धर्म धार्मिकमती सज्जीं धनुर्मार्गणा ॥ १६ ॥
त्यानंतरें गाधिकुमारं दीक्षा । धरी मखीं कर्म शिखीसमक्षा ॥
शिक्षावया राक्षस लक्ष साठी । दीक्षा धरी रामनृपाळ मोठी ॥ १७ ॥
रचून ते मंडप कुंड वेदी । तत्तद्विधी ज्ञाननिधी निवेदी ॥
गाधेय आधीं सुमुहूर्त साधी । आराधितो अंतरिं वृत्ति साधी ॥ १८ ॥
व्योमीं होम सुधूम भूमि भरतो उद्दाम वेदध्वनी ।
दिग्देशीं घुमला महोत्सव भला आरंभला तद्दिनीं ॥
गेल्या पांच निशा अशा मग दिशा आकाश हे मेदिनी ।
आले व्यापित ते निशाचर तशा पूर्णाहुतीच्या दिनीं ॥ १९ ॥
आला मारीच मारा करित च गगनीं ऊर्ध्वबाहू सुबाहू ।
हाहू गर्जे चमू तों प्रभु शर चढवी ? म आजानुबाहू ॥
होतो टंकार शाका धरिति रिपुकुळें ...ळघंटा म्हणूनी ।

मुढा हुंकार हुंकारुनि उठति दळें चंड शत्रू गणोनी ॥ २० ॥
आले वर्षत अस्थिमांसरुधिरा जों स्तोम होमावरी ।
तों आधीं च सवेग मार रघुनी बाणोत्करीं सावरी ॥
बाराही निशि रे अणून विचरे ऐसा चि भारी गुरु ।
मांडी मंडप कांडमंडिततळीं कोदंडदीक्षागुरु ॥ २१ ॥
आले शुंभ सुबाहु अन्य हि तसा मारीच अग्रीं उभे ।
सेना ही ककुभेमधें पसरिली कापट्यकर्मीं दुभे ॥
खाले यज्ञसभेंत सुज्ञ मुनि तो शोभे सवें वल्लभें ।
कीं ज्याला न लभे चि भीति भजतां यज्ञक्रिया दुर्लभें ॥ २२ ॥
काळे कर्कश मेघसंघ गगनीं फांकोनि झांकोळले ।
तैसे दाहि दिशा निशाचर महासंदोह आंदोळले ॥
द्वारीं राघव दोघ लाघवगती टंकारितां कार्मुकें ।
तेणें घोर घन प्रघोष घुमतां ते कांपती कौतुकें ॥ २३ ॥
म्हणे राम तूं लक्ष्मणा लघुराया । क्षणामाजि निर्दाळितों मी धुरा या ॥
उगा तूं पहा कौतुकें बाणलीला । म्हणे तों चि आरंभ झाला कलीला ॥ २४ ॥
गाढा वीर गुढारल्या निजरथीं संमूढ आरूढला ।
मारीचाह्वय पुढारला भुजबळें झुंझावया रूढला ॥
तों रामें मह्वजास्त्रमंडितशरें वक्षस्थळीं ताडिला ।
तेणें शंभर योजनें उडविला सिंधूतटीं पाडिला ॥ २५ ॥
कांहीं चिंतुनि कार्यभाग न वधी रक्षी तयातें बळें ।
तों आला सहसा सुबाहु समरीं सगें दळें दुंबळे ॥
तो उद्दंड अति प्रचंड चढवी कोदंड रामावरी ।
श्रीरामें रणकर्कशें निरखिला तो ये पुढें तोंवरी ॥ २६ ॥
आला सन्मुख तो रिपू प्रमुख तो लीलालघू लाघवें ।
आग्नेयास्त्र नियोजुनी निजशरीं संप्रेरिलें राघवें ॥
तेणें चूर्ण चि शीर्ण तूर्ण पडली भूमी तनू लोटली ।
वर्णीं काय सुखार्णवीं जग चि घे टाळी सुरीं पीटली ॥ २७ ॥
प्रभु बाहुजकुलमणि बाहुनि समरिं सुबाहुसि दमुनि बाहु करें ।
अजि बाहुनि विरदल बाहुनि गुरु शर बाहुरहित करि बाहु नरें ॥
द्रुपवारणगत परिवार न मग अनिवार उठति परिवार तते ।
अनिवार हि चढाति सवार धरुनि तरवार करिति परिवारति ते ॥२८॥
रघुवीर नृपतिकुलहीर सुभट रणधीर निबिडतर तीर जसा ।

शरभार गगनीं अनिवार रचुनि भडिमार करित सुकुमार कसा ॥
रिपुधूर उठति भरपूर सकळ अविदूर भरिति शरपूर तदा ।
चकचूर करिति कर ऊर चरण शिर सूरकुलज रणशूर तदा ॥ २९ ॥
अरिनिकर निकट गजतुरग शकट जव करिति लगट रघुरमणकरीं ।
शर सुटति सणण रव उठति खणण रिपु पडति दणण रण धरणिवरी ।
वरि वदति अमर अजि असम समर करि नृपतिकुमर जय विजयि भला ॥
गजवजति असुर दरि दडति भिसुर मग वसुमतिसुर परिवंदि सकळा ॥ ३० ॥
मनिं धरुनि पडप नाभिं लंपुनि गडप वरि हाणिति झडप रिपुनिकर करें ।
परि रघुप विशिख तळपुनि नख शिख तनु खिळति सशिख शिखिसम रे ॥
रणनिपुण सुघड रिपु पडति दुर्धड तृण धरिति उघड मग रदनिकरें ।
सुर वदति विजय नर म्हणति अभय मुनि नटति निलयतटिं निज गजरें ॥ ३१

गेला राक्षस सर्व भार विलया संपूर्ण यज्ञक्रिया ।
झाला सिद्ध समस्त ही अवभृथस्नानादिक प्रक्रिया ॥
विश्वामित्र महा ऋषि प्रमुख ते सारे सभामंडळीं ।
श्रीराम स्तविती पराक्रम असा नाहीं च आखडळीं ॥ ३२ ॥
योद्धा शस्त्रशास्त्रमंडित महायोद्धा अयोध्यापती ।
श्रद्धालु प्रभु यज्ञदेवविबुधींवृद्धासह्य सपती ।
बद्धा मोचक तू च साच म्हणुनी बद्धांजळी राघवा ॥
सिद्धार्थी द्विजसंघ वर्णित उभे सिद्धाश्रमीं आघवा ॥ ३३ ॥

गाधेय गर्जत वदे रघुरामचंद्रा । झालों कृतार्थ बहु चित्तचकोरचंद्रा ॥
गेला चि तो विहित यज्ञ समग्र सिद्धी । सिद्धाश्रमासि तरि आज खरी प्रसिद्धी ३४
जी जी म्हणे रघुकुलेश्वर आणि काहीं । आज्ञापिजे दमिन ये क्षणिं आणिकां हीं ॥
निष्टंक कार्य कथिजे तव किंकरानीं । कीजेल जो मग असाल निशंक रानीं ३५
ऐकोनि हें निज भुजीं ऋषिराजराजी । आलिंगिती हृदयिं बाणधनुर्धरा जी ॥
कल्याण हो परम मंगल हो कृपाळा । तो सर्वशोभन म्हणे द्विजदेवपाळा ॥३६॥

सारें सारुनि नित्यकर्म करुनी देवार्चनें भोजनें ।
देती हारतुरे विडे मग उठी धूपादिदिव्यासनें ॥
संफुल्लायतलोचना शशिमुखी त्या ब्राह्मणी नायका ।
आनंदें मग आरत्या करिति त्या रामा जगन्नायका ॥ ३७ ॥

आता पुढील रचना परिसा कशी ते । भंगोनि चाप रघुराज वरील सीते ॥
निर्दोष हे करिल रामकथा मनातें । आनंदनंदन कवी विनवी जनातें ॥ ३८ ॥

इति आनंदतनयकृत विश्वामित्रयज्ञरक्षण.

### रामात्मजकृत

## कृष्णदानकथा-श्लोक.

सोळा सहस्रीं सदनांत नांदे । स्वसौख्य तुल्य प्रमदा जना दे ॥
रुचोनि हें तोष मनीं मुनीला । पाहों म्हणे मागुति मेघनीला ॥ १ ॥

बहुत करुनि येणें द्वारके माजि ज्याचें ।
व्यसन परम ज्याला कृष्णपादांबुजाचें ॥
घडि घडि मुखि नामें सुस्वरें गाइ वीणा ।
करिं धरुनि मधुरत्वें चित्त वेधे प्रवीणा ॥ २ ॥

सत्यागृहीं प्रविशतां विधिनंदनातें । देखोनि दूर हरि ये करि वंदनातें ॥
हातीं धरूनि बसवी कनकासनीं त्या । दावी जना सुजनसंगति एक नित्या ॥३॥
पाळा ऋषींच्या हरि मध्यभागीं । लक्षी तयातें नयनीं शुभांगी ॥
संतुष्ट मोठी मनिं कृष्णसंगें । दानावली तेथ निघे प्रसंगें ॥ ४ ॥

### ओव्या.

व्हावे आकर्ण विशाल नयन । तरी दान कीजे नीलनलिन ॥
दीर्घ नासा अपेक्षून । तिलकुसुमें देइजे ॥ ५ ॥
वदन सुंदर आणि सतेज । व्हावें तरी देयिजे जलज ॥
पृथु वर्तुल घन उरोज । इच्छितां फळं देइजे ॥ ६ ॥
उद्वाहीं व्हावी शोभा । तत्सविध दान करा रंभा ॥
रथदानें स्थूलनितंबा । स्त्रिया होती निश्चयें ॥ ७ ॥
इह जन्मींचें संपत्तिजात । जन्मावरी असावें सतत ॥
तरी आवडे जो जो अर्थ । तो चि दीजे विप्रातें ॥ ८ ॥

### श्लोक.

पूर्वीं ऋषी कश्यप तत्सतीनें । दिला महादेव हि पार्वतीनें ॥
इंद्रासि [ ती ] इंद्रसती पुराणीं । हे गोष्ट चित्तीं धरि कृष्णराणी ॥९॥
उठोनियां नारद कौतुकानें । सत्येसि बोले अजि हे स्वकानें ॥
आकर्णिली सादर दानराजी । तीमाजि तूझें मन कोठ राजी ॥१०॥

### पद.

हरिचा विरह नसो नसो । तो सदा जवळी वसो ॥ ध्रु० ॥
हरिपदपद्मीं मानस माझें षट्पदापरि विलसो ।
पूर्ण काम हरि मजदासीसी सहसा ही न रुसो ॥ १ ॥

सुरवर जिंकुनि आणिला तरुवर अंगणिं तो हि वसो ।
प्रमदावर्गीं सौंदर्यादिक मजवांचुनि न दिसो ॥ ९ ॥
मान्यपणें हरि कृत्यविशेषें मजलागीं च पुसो ।
जन्म अनंत हि घडतां मजला अचुकपणें गिवसो ॥ १ ॥

### श्लोक.

कांता सर्वोत्तमाची बहु बहु वदली गोड हे शब्द भारी ।
केला प्रेमातिरेकें अवश वश जिणें सर्वदा कैटभारी ॥
सांगे जाणूनि तीचें हृदय मनिं तिला दान गोविंदजीचें ।
भर्ता हो जन्मजन्मीं हरि च मज असे चित्त सापेक्ष जीचें ॥ १२ ॥

### पद.

दान करीं कृष्णाचें भामे ॥ ध्रु० ॥
अनल्प फल तुज फळे सुकृत हें नव्हे सुवच जें वाचे ॥ दान० ॥ १ ॥
नसे हित दुजें नको भय धरूं सपत्न जन लोकांचें ॥ दान० ॥ २ ॥
रामसुत प्रभु सर्व विरह कधीं नव्हे वचन हें साचें ॥ दान० ॥ ३ ॥

### पृथ्वीछंद.

तुला वश हरी असा सुकृत पुंज त्वां अर्जिला ।
म्हणे न कधिं सर्वथा न मन दे असें हो जिला ॥
असे सुदिन आजिचा सविधि दान कीजे भलें ।
महोत्सव निरीक्षणीं कुतुक हें मला लाभलें ॥ १४ ॥
कृष्णार्पणीं महसमर्थ भव्या द्विजातें । अर्पीतसे सह सदक्षिण पारिजातें ॥
सत्या म्हणे तुज चि देइन दानवारी । देवर्षि तीस वरिचे वरि तो निवारी १५

### पद.

काय हरी तें करूं करू ॥ ध्रु० ॥ शिष्य करूं तरि पूर्ण परात्पर । मम गुरुचा ही गुरु गुरू ॥ का० ॥ १ ॥ वेद जयातें नेणाति त्याला कवणे स्थळिं मी धरूं धरू ॥ काय० ॥ २ ॥ अनंतगुणगण विवरुनि ज्याचे जन भवसागर तरू तरूं ॥ काय हरी तें करूं करूं ॥ ३ ॥

### श्लोक.

सात्राजिती वदतसे विधिनंदनातें । कीं कोण घेइल दुजा भवभंजनातें ॥
घेशील तूं चि तरि देइन दानवारी । हातीं तुझ्या सुरतरूसह दानवारी ॥१७॥
देखूनि निर्धार असा सतीचा । अंगीकरी भक्तजनाप्त तीचा ॥
म्हणे ऊठ घेऊनि ये त्या हरीतें । चरित्र ज्याचें मन मोहरीतें ॥१८॥

### कामदावृत्त.

उठुनि सत्यभामा हरिप्रिया । त्वरित घेउनी ये निजप्रिया ॥
मुनिमुखें अभिप्राय जाणवी । उचित तेथ सभार आणवी ॥ १९ ॥
मिळति सर्व ही तेथ नायका । नयनिं पाहती विश्वनायका ॥
म्हणति धीट हे देतसे पती । सकळ लोक हे ज्यास कांपती ॥२०॥

### श्लोक.

अगयि नवल मोठें धैर्य ईचें कळेना ।
श्वशुरनणदुल्या ही सासुवा आकळेना ॥
भय न धरि पतीचें लाडकी हे बजागी ।
उचित अनुचिती ही केंवि होईल नागी ॥ २१ ॥
उगवला मनिं संशय तोडिते । मति बसे मधुसूदनिं जोडि ते ॥
म्हणति लोक इला बहु धादली । तदपि ते अणुमात्र न मदली ॥२२॥

### पृथ्वीवृत्त.

पतीसहित ते सती करुनि मंगलस्नान हो ।
मनीं घडिघडी करी नवस विघ्न येथें न हो ॥
अलंकृत तनू सवें कनक वस्त्र ही नेसली ।
हरीजवळि येउनी त्वरित आसनीं बैसली ॥ २३ ॥

**पद**—राग कलंगडा—कोण दया करणार, चाल.

मजसम कोण हि सुंदर आन ॥ ध्रु० ॥
मी च सभाग्य गुणाढ्य हि मी जगीं मान करी भगवान् ॥ १ ॥
पूर्णमनोरथ मीच निरंतर नाहिं कधीं व्यवधान ॥ २ ॥
धन्य मि मज मानला हरी त्रिभुवनभुवननिधान ॥ ३ ॥
द्व्यष्ट सहस्र हि टाकुनि भवनें येथ धरी अभिमान ॥ ४ ॥
उत्तीर्ण प्रभुला करीं होउनी आदरिलें निजदान ॥ ५ ॥
काय जनासी काज जगद्गुरुचें चि असो मज ध्यान ॥ ६ ॥
रामसुतप्रभु भक्तजनाचें पाहिल केंवि निदान ॥ ७ ॥

### श्लोक.

पुण्याहघोष करिती बरवा द्विजाती । सप्त स्वरें विविध वाजति वाद्यजाती ॥
जाऊनि थोरपण ये लघुता तरूते । तों तों बहू जवळि होय जगद्गुरूते ॥ २५॥

### सवाई

तों यदुराज करावरि शोभत रोपित भव्य जणों तुळसी ।

थोर न लहान अलौकिक कौतुक देखति लोक समस्त ऋषी ॥
घालुनि माळ गळांत हरीस हि गोविपलें सहसा तरूसी ॥
वाजति टाळ मृदंग मधुर स्वर टाकिति दिव्य फुलें त्रिदशीं ॥ २६ ॥

### दिंड्या.

बैसवीला नारद रत्नपीठीं । पूजा करी येउनी गोरटी ॥
रत्नहार घालुनी तया कंठीं । गोवितांहे देवर्षि हांसे पोटीं ॥ १ ॥
कल्पवृक्षासहित कृष्णपूजा । सद्भावें वी सारूनी कृष्णभाजा ॥
करी संकल्प किं हा यदूराजा । जन्मोजन्मीं हो प्राणनाथ माझा ॥ २ ॥
कोटि धेनू तिळराशि हेमराशी । सकल्पिल्या त्या क्षणीं दक्षिणेसी ।
सत्यज्ञानानंद तो ज्याचापाशीं । रिद्धिसिद्धी ही तया घरीं दासी ॥ ३ ॥
देवऋषीच्या करिं सह पारिजात । ठेवुनीयां कृष्ण करांबुजांत ॥
सोडि तया ऊपरी दानवारी । संकल्पानें सिद्धीस दानवारी ॥ ४ ॥

### पृथ्वीवृत्त.

विनोद करि नारद प्रभुस घे म्हणे आसना ।
उठें त्वरित चाल ये मजसवें त्यजीं वासना ॥
करी वचन मान्य घे हरि कमंडलू सबळी ।
कडासन हि पुस्तकें मृदुल पादुका कवळी ॥ २८ ॥

### श्लोक.

पुढें नारद श्रीपति त्या च मार्गे । असे दोघ ही चालिले राजमार्गें ॥
ती गोष्ट साहस्र हि बायकांला । कळे दिलें हो जगपालकाला ॥ २९ ॥

### ओव्या.

मिळोनिया अवघ्या नारी । येती भामेचिया द्वारीं ॥
तियेसी म्हणती तुवां हरी । काय म्हणोनी दीधला ॥ ३० ॥
आम्हां सर्वांचें जीवन । तुवां केलें नारदाधीन ॥
तुज सारिखी विचारहीन । कोणी नाहीं देखिली ॥ ३१ ॥
आम्ही न हो काय वनिता । तुवां चि कैशी दाविली सत्ता ॥
कोणी म्हणती असो आतां । विचार कीजे पुढारीं ॥ ३२ ॥
कोणी वसुदेवदेवकीनिकट । जाऊनि वृत्तांत सांगती स्पष्ट ॥
कोणी धावूनियां धीट । घेऊन येती हलधरा ॥ ३३ ॥
निंदा करिती नारदाची । म्हणती बुद्धि भ्रंशिली त्याची ॥

४९८९२

कोणी म्हणती माइलेची । भीड पडली कृष्णातें ॥ ३४ ॥
ऐशीं अश्राव्य ऐकूनि वचनें । सत्यभामा राहिली मौनें ॥
तव कृष्णें खुणाविलें नयनें । नारद बोले ते काळीं ॥ ३५ ॥
सुवर्णभार दइजे मातें । येणें उपायें सोडीन यातें ॥
पारडीं घालूनि कृष्णातें । वचन नोहे अन्यथा ॥ ३५ ॥
अवश्य म्हणूनि चक्रधरा । पारडीं बैसवीती सुदरा ॥
सुवर्णभार अर्पूनि चतुरा । तोलित्या झाल्या कृष्णातें ॥ ३६ ॥
वरचेवरी घालिती हेम । परि नुचलेचि वैकुंठधाम ॥
सर्वांमनीं संकट परम । सरलें हेम म्हणऊनी ॥ ३७ ॥
तव पातली पट्टमहिषी । जे का रुक्मिणी लावण्यराशी ॥
तिणें उपाय निज मानसीं । कृष्णमुद्रिके नियोजिला ॥ ३८ ॥

## पद.–रघुवंशीं राया या चालीवर.

जननी हे सर्वजनाची ॥ ध्रु० ॥
जे हरिला प्रिय जीस हरि प्रिय सतत हे धणी पुरवि मनाची ॥ १ ॥
निर्गुणि निर्गुण सगुणि सगुण जे कृष्णवधू बहु सगुण गुणाची ॥ २ ॥
प्रति अवतारिं आपण अवतरे कुलदैवत जे रामसुताची ॥ ३ ॥

## श्लोक.

वृंदावनीं तुळसिला करि वंदनातें । तूं सोडवीं म्हणतसे यदुनंदनातें ॥
घेऊनि ये गलित पत्र तिचें स्वहातीं । सोळा सहस्र हि सख्या तिजला पहाती ४०
गलित तुळशिचें तीं पत्र तें त्यांत टाकी । तंव घनवट बैसे पारडें भूतटाकीं ॥
नयनिं विधिसुताच्या पातले प्रेमपाणी । चकित निज मनीं तो राहिला सीरपाणी ४१

## गद्य.

जय जय श्रीतुळसी जय तुळसी त्वद्रधोदक हरितार्थीनें तनु होते शीतळशी ॥
अमृतलें मी समान होईन जरि मज तूं आतळसी ॥ ४२ ॥

## श्लोक.

सिंधु श्रीहरिवंश तेथिल कथा बिंदू च हे सत्कथा ।
घेती कर्णपुटीं त्रितापभय हें त्याला नसे सर्वथा ॥
केली प्राकृत पद्यबधरचना रामात्मजें स्वाकृती ।
तीतें संतत सद्गुणप्रिय भले पाहोत जे का कृती ॥ ४३ ॥

इति रामात्मजविरचिता कृष्णदानकथा समाप्ता.

## शुकरंभासंवाद-शार्दूलविक्रीडितवृत्त.

सव्वांशे सरिता भरूनि उदरीं कृष्णा सवें जातसे ।
साठांची गणती करूनि पुरती तीमाजि भीमा वसे ॥
सव्वांशे सरिता जियेसि भिडती ते तुंगभद्रा मिळे ।
पन्नासां सरिसी ह्यग्रिवनदी गर्भी जिच्या मीसळे ॥ १ ॥
वेणा आदिकरूनि साठि तिनशे गंगा मिळाल्या जिला ।
पूर्वेचा उदधी महासुरनदी देखोनियां कांपला ॥
संकोचे सरितापती म्हणउनी केलीं मुखें दोन तीं ।
पूर्वेच्या उदधीसि विष्णुसरिता कृष्णा मिळे ये रिती ॥ २ ॥
रंभा येउनि वाग्विलास वचनें बोले शुकेंद्राप्रती ।
संसाराविण या जगत्रयिं नसे आणीक जी सद्गती ॥
ब्रह्मा विष्णु महेश सर्व युवती आधीन कीं वर्तती ।
माना ही विनती मनांत न धरा संदेह द्यावी रती ॥ ३ ॥
जाणा निर्गुण ब्रह्म त्यास न गमे माया करी यूवती ।
दोघांच्या निजसंगमें करुनियां हे जाहली उत्पती ॥
येथें मायिक जीव कीं विरमती केवा तयांचा किती ।
माना हे विनती मनांत न धरा संदेह द्यावी रती ॥ ४ ॥
पक्वान्नें घृतपाचकें रुचिकरें गोडी पियूषापरी ।
तुम्हांलागुनि योजिली तरि किजे आरोग्यता जी बरी ॥
भोगा देउनि भोग तांबुल स्वयें देईन मी सन्मिती ।
माना ही विनती मनांत न धरा संदेह द्यावी रती ॥ ५ ॥
पर्यंका जडिले बहू कुसरिनें रत्नांचिया मंदिरीं ।
आहे शेज वरी अनेक कुसुमें संयुक्त जी साजिरी ॥
तेथें येउनियां सुखें पहुडणें सौख्यासि नाहीं मिती ।
माना हे विनती मनांत न धरा संदेह द्यावी रती ॥ ६ ॥
संसारीं सुख जाणते तरि कसे योगी तया त्यागिती ।
सांडूनी निज मंदिरें दरकुटीं कष्टांसि कां भोगिती ॥
टाकूनी गिरिजेसि शंकर तया काशासि गेला वना ।
रंभे जाई उगी च गे ल्वकरी कां मांडिली वल्गना ॥ ७ ॥
विष्टा मूत्र विशेष जाण हृदयीं श्लेष्मा मुखीं फारसा ।
ऐके कश्मल कामिनी म्हणतसे साक्षात तू आरसा ॥

नाडीलें बहुतां अनर्थ भुल गे ऐशा तुह्मी अंगना ।
रंभे जाइ उगी च गे लवकरी कां मांडिली वल्गना ॥ ८ ॥
रंभा बोलतसे अजी शुकमुनी नारी जशा ईतरा ।
आम्हांलागिं तुह्मीं तसें गणितसां कैसेन योगीश्वरा ॥
त्या पोटीं मळ वाहती विमळ कीं आम्हींच देवांगना ।
चीरीं त्या उदरा सुगंध घमके विश्वास आणा मना ॥ ९ ॥
रंभे ऐक म्हणे तदा शुकमुनी तू माझिया उत्तरा ।
पूर्वीं हें कळतें मला हि पुरते येतो तुझ्या उदरा ॥
ऐसें ऐकुनि वाक्य निष्ठुर मनीं अत्यंत कोमायली ।
मी दासी म्हणवूनि दीन वदनें पादांबुजीं लागली ॥ १० ॥
धरितिल हृदयीं हा प्रेमसंवाद साधू । म्हणउनि अभिधानीं ग्रंथ हा हें चि साधू ॥
गुणलव कथिले हो वामनें केशवाचे । धरूनि चरण चित्तीं श्रीहृषीकेश वाचे ॥११॥
इति वामनविरचित रंभाशुकसंवाद संपूर्ण.

---

## हरिकविकृत आत्मनिरूपण-श्लोक.

जो शब्दीं श्रवणीं असोनि न कळे श्रोत्रास निःशब्द तो ।
त्वक्स्पर्शीं असतां अलिप्त चि सदा जो वेगळा राहतो ॥
रूपें चक्षुमधें असोनि न दिसे नेत्रीं अगा डोळसा ।
नेणे घ्राण जयास आणि रसना घेऊनि गंधा रसा ॥ १ ॥
ऐसा ही गुरुचे कृपें करूनियां तद्रूप ची तें दिसे ।
जेव्हा पाहति मानिती बहु मनीं आश्चर्य त्याचें असे ॥
जो कां होउनि सर्वरूप हि सदा आहे अरूप स्वयें ॥
आश्चर्या च परी कृतार्थ जन जे ते पाहती विस्मयें ॥ २ ॥
आश्चर्यांत परी गुरू वदतसे शिष्यास आत्मा अरे ।
ज्या शब्दें चि करूनिया कळतसे तो शब्द मागें सरे ॥
ज्या शब्दें नव चंद्र देखत असे तो शब्द शाखे दुरी ॥
ठेवी दाखवि आत्मचंद्र गगनीं आश्चर्य तेव्हां करी ॥ ३ ॥
आश्चर्यें बहु आयके गुरुकुळीं या कारणें जो वसे ।
कीं जो एक तनूंत मात्र दिसतो सर्वत्र ही तो दिसे ॥
जें ब्रह्म श्रुति वर्णिती निखिल तें आत्मा च कीं मी असें ।
तें सर्वत्र हि सर्व मी च हृदयीं आश्चर्य मानीं असें ॥ ४ ॥

आश्चर्ये अवलोकितो वद हि आहे [ कीं ] गुरु सिद्ध तो ।
तो तो शिष्य चि विस्मये करुनि जो याळगीं आयीकतो ॥
तो सद्यःस्थिति वर्णिली जरि नसे त्याला तथापि स्वयें ।
त्या शुद्धानुभवास पाहत असे तो ही महा विस्मयें ॥ ५ ॥
नित्यानित्यविचार ज्यासि कळला ज्याला मुमुक्षा मनीं ।
त्याला काचन कामिनी तृणसमें दुःसग तो टाकुनी ॥
जो सतप्त चहूंकडे हुडकितो सतास जिज्ञासु तो ।
होता श्रीगुरुच्या मुखे श्रवण तो आत्मा असा पाहतो ॥ ६ ॥
चित्तीं काम वसे तथापि हि वसे जाऊनि सत्संगतीं ।
सेवा प्रश्न करी मनांत हि धरी जे गोष्टि ते सांगती ॥
ऐसा ही अनुतप्तचित्त नसतां तो आत्मया आयके ।
सांगे ही गुरु आयकोनि बरवें यातें न जाणों शके ॥ ७ ॥
ऐसे चौं चरणात चार जन हे सांगीतले वेगळे ।
पाहे आणिक देख दोघ जण जे सिद्ध स्वयें आगळे ॥
जो कां आयकतो चि साधक तिजा होणार तो ही नसा ।
चौथा आयिकतो तथापि न कळे आत्मा जया तो असा ॥ ८ ॥
एथे काकु म्हणोनि सस्कृतगती रीती पुढें आणिती ।
नेणे त्यास चि जाणतो म्हणुनियां शास्त्रें चि वाखाणिती ॥
आश्चर्यें अवलोकितो वदतसे जो आयके या रिती ।
हें तों आयकुनी च जाणति तिघे हे गोष्टि कां मागती ॥ ९ ॥
आश्चर्यें अवलोकिती वदति हीं आयीकतीं आत्मया ।
ते तों जाणति आयकोनि च तिघे हे सिद्ध होऊनियां ॥
नेणे कोणि हि आयिकोनि न घडे ऐसें पुन्हां बोलतो ।
तेव्हां तो तुमच्या मतें भलतसा श्रोता तया जाणतो ॥ १० ॥
तेव्हा तो श्रवणाधिकार नसता कोणी जरी आयके ।
नेणे हें न घडे असें जरि घडे हा अर्थ होऊ शके ॥
आतां ज्यास गुरु वदेल न कळे त्याला घडे ना असें ।
हे साधेल तरी गुरु भलतिया सांगेल सांगा कसें ॥ ११ ॥
देखोनी अधिकार ज्यास वदतो ते जाणती हे तरी ।
जे तीघे चरणत्रयी कथियले ते हे चि बोले हरी ॥
एव या चरणें करुनि वदतां पूर्वी च ते साधिले ।
या पादें पुनरुक्तिरूप तरि या अर्थासि कां आणिलें ॥ १२ ॥

सांगे श्री गुरु ज्यास त्यास न कळे हें तों घडेना कसें ।
आम्ही वास्तव अर्थ हा वदतसों हे बोलणें ही तसें ॥
गर्भी नारदवैखरी परिसतां प्रऱ्हाद झाला कृती ।
तें जाणोनि हि राहिली न हृदयीं मातेस त्याच्या स्मृती ॥ १३
सांगे श्रीगुरु ज्यास त्यास न कळे ऐसें घडेना खरें ।
तेव्हां जो अधिकारशून्य चि कळो त्यालागिं ही तें बरें ॥
ऐसा त्यास वदे च ना गुरु असें बोलेल आतां तरी ।
अर्थ व्यर्थ चि जो तुम्ही करितसां हें आयका यावरी ॥ १४ ।
जाणाया अधिकार त्यास न कळे आत्मा घडेना असें ।
तेव्हां डोळस जो तयास न दिसे हें ही घडेना जसें ॥
यावा हें भलत्या स ही कळतसे आणीक पादत्रयें ।
जे तीघे कथिले तया च वरुनी हा अर्थ अर्थ स्वयें ॥ १५ ॥
आश्चर्यें अवलोकितो तरि च कीं ज्याला गुरु भेटला ।
देखोनी श्रवणाधिकार बरवा आत्मा तया बोधिला ॥
ऐसे आणिक दोष या च रितिनें हें तो नव्हे अन्यथा ।
या ही ऊपरि हें चि साधित असा तेव्हां वृथा हे कथा ॥ १६ ।
कीं ज्याला अधिकार सांगुनि गुरु सांगे स्वयें आयके ।
तो नेणे जन आयकोनि न असे होऊं कधीं ही शके ॥
आश्चर्यें वदतां तयांत हि अहो आश्चर्य हें तों महा ।
कीं जो डोळस मार्ग ही परिसतो तो चालतो हो पाहा ॥ १७
शुश्रूषा अनुताप आणि कुशल प्रज्ञा गुरु देखती ॥
त्याच्या काकुळती करुनि हि कृपा येतां तया सांगती ।
त्याचे अंतरिं काम किल्बिष वसे यालागिं बिंबात्मता ।
बिंबेना प्रतिबिंब यद्यपि कळे भावार्थ हा तत्वता ॥ १८ ॥
आत्मा जो प्रतिबिंब दुःख सुख हे भोगीतसे पाहतां ।
आत्मा तो कळला तथापि कळणें आत्मा च बिंबात्मता ॥
कांहींसा अधिकार देखति तयां हे श्रीगुरु सांगती ।
योगें बिंबसुखानुभूतिपथ ही त्यानंतरें दाविती ॥ १९ ॥
एथें जो अतिशुद्धचित्त विषयप्रेमा नसे ज्या नरा ।
तो अभ्यास करुनि पावत असे बिंबात्मते तो बरा ॥
वैराग्याविण बिंब ज्यासि न कळे तो भ्रष्ट योगी पुन्हा ।
ये जन्मा म्हणऊनि कृष्ण चि पुढें बोले चि हें अर्जुना ॥ २०॥

कोणाला अधिकार पूर्ण असतो कोणास कांहीं उणा ।
आला जो शरणागत प्रभु तया सांगे गुरूच्या खुणा ॥
शिष्याची मग त्यावरी जशि जशि प्रज्ञा कृपा हे तशी ।
शिष्याला फल तैं वसिष्ठ हि वदे रामासि वाणी अशी ॥ २१ ॥

## योगवासिष्ठे वसिष्ठः

उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्रपालनं । ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धशिष्यप्रज्ञैव केवलं ॥ १ ॥
टीका ॥ आत्मज्ञानकिली न ये गुरुविणें हातास कोण्या गुणें ।
या लागीं च गुरूपदेश निगमीं जो युक्त तो पाळणें ॥
कीं ज्ञानानुभवासि कारण तरी प्रज्ञा च ते राघवा ।
शिष्यासी उपदेश ही तरि फळे कीं शुद्ध ते जेधवां ॥ २२ ॥
एवं श्रीगुरुमेघ वर्षत असे सर्वां प्रपन्नांवरी ।
ज्याची घागर फूटकी जरि भरे पारे न त्या भीतरी ॥
या भावें च म्हणे हरि श्रवण ही होऊनिया आत्मया ।
कोणी एक न जाणतो निज सखा चिन्मात्मया अद्वया ॥ २३ ॥
आत्मनिरूपण समाप्त.

---

## स्फुट श्लोक.

देखुनियां परिपूर्ण सुधाकर सर्व सुखी परि जार रडे ।
वर्षत चांदण त्यांत समस्त हि तस्कर झोपडिमाजि दडे ॥
साधुसभे जन उद्धरती परि पापि न जाउं सके तिकडे ।
वामन संतकृपांबुधिदुष्टिन पालथिये घटिं पाणि पडे ॥ १ ॥

---

## विठ्ठलकविकृत वामनचरित्र–आर्या.

जो भक्तिनें अदितिच्या आला उदरासि त्याचि बटु हरितें ।
वदुनि चरित तयाचें गातां कलिजन्यवृजिन कटु हरितें ॥ १ ॥
स्वसुतांचें दितिजानीं हरिलें सर्वस्व म्हणुनि तडफडली ।
अदिति पतीस निवेदी दुस्तर चिंता समग्र जड पडली ॥ २ ॥
हास्य करूनि कश्यप मुनि बोले दयितेस आर्यिके सुभगे ।
हे हरिमाया चित्र चि विचारितां काय तें अशुभ शुभ गे ॥ ३ ॥
यश अपयश जय अपजय समयविशेषें चि पावती जतू ।

परि तें मायिक विसरुनि हरि न विसरिजे जगत्पटीं तंतू ॥ ४ ॥
अदिति वदे मुनिराया हें ब्रह्मज्ञान काय वनितातें ।
तुष्ट करावें मातें स्वसुतातें विविधदुःखजनितातें ॥ ५ ॥
सत्वर सुतासि माझ्या सुरभुवनप्राप्ति संपती सहित ।
व्हावी सुख मज तेणें लेंकीं सुख तें चि दंपतीस हित ॥ ६ ॥
मुनि तीस वदे चतुरे सुतहितकारिणि विचारिता गमतें ।
सकलसुखास्पद विष्णुव्रत विश्वीं मान्य आत्मयोनिमतें ॥ ७ ॥
उपासि पयोव्रत आख्या तें आचरिता चि कामनापूर्ती ।
हे गोष्टि सत्य मानीं मी तुज सांगेन कां मनापूर्ती ॥ ८ ॥
मुनिगदित विधिपूर्वक विष्णुव्रत साग आचरोनि सती ।
झाली त्रिभुवनधन्या तत्तुल्या अन्य बहु तशा नसती ॥ ९ ॥
तीच्या व्रतपुण्यवळें वरदेशें तीस दाविली वरता ।
सायुध साग चतुर्भुज वर माग म्हणे सुरांबिके पुरता ॥ १० ॥
अदिति वदे सर्वज्ञा हृद्गत तुजलागिं काय सांगावें ।
विश्वमनोगत जाणसि नाम तुझें त्यजुनि दुःख कां गावें ॥ ११ ॥
दनुजत्रस्तसुतास्तव जीव तुझा सति उदास कळकळला ।
मी भक्तपक्षपाती वृत्तांत तुझा मला सकळ कळला ॥ १२ ॥
मी पूर्णकाम परि निजभक्ताचा पक्षपात मज करणें ।
त्वरित चि पूर्ण मनोरथ करितों हा अंतरीं समज करणें ॥ १३ ॥
सुत होऊनि तुझा मी स्वपदाप्रति पाववीन सुरबंधु ।
का तुज हृद्गत चिंता मी असतां दीनबंधु सुखसिंधु ॥ १४ ॥
आश्वासुनि सुरमातेप्रति अंतर्धान पावला हरि तो ।
जो दुःख दुःखिताचें स्मरतां तत्काळ मदन परिहरितो ॥ १५ ॥
तदुपरि पतिसहवासें झाली ते अदिति अजितगर्भवती ।
ती जाणे खुण कश्यप जाणे तैशी च पद्मभव ती ॥ १६ ॥
गर्भस्तुति करि हरिची ब्रह्मा येऊनि निकट पाय नमी ।
तू स्वजनपक्षरक्षक तेथे बहु काय करुनि गायन मी ॥ १७ ॥
विधि विनवुनि जाय तदा अमरांचे वृंद जाहले तुष्ट ।
म्हणती सहाय अजित मग कोठुनि ना कष्ट न शत्रू दुष्ट ॥ १८ ॥
ज्याचे रोमविवरगर्भीं धरि जो ब्रह्मांडकोटिच्याकोटी ।
तो अज अव्यय अच्युत अवतरला [ हो ] अदीतिचे पोटीं ॥ १९ ॥
बाहुचतुष्टा करधृतचक्रगदाशंखपद्म रमणीय ।

पीतांबरधर आंगें नयननलिनयुग विलोल कमनीय ॥ २० ॥
नीरदनीलद्युतिमान् चलमकराकारकुंडलें लसती ।
श्रवणीं श्रीमद्वदनीं कुंडलमणिसुप्रभा करी वसती ॥ २१ ॥
श्रीवत्सांकित वक्षःस्थल वनमाला विराजती कंठीं ।
तत्सुरभिगंधहर्षें मधुकरमाला सदा समय कंठीं ॥ २२ ॥
मस्तकिं किरीट वलयांगदयुत बाहुप्रदेश शोभविती ।
रुणझुणति पदीं नूपुर योगिमनोमधुकरांसि लोभविती ॥ २३ ॥
यापरि कश्यपसदनीं तो माधव निजतनुप्रभा मिरवी ।
कंठीं कौस्तुभ ज्याच्या जैसा अतिनीलगगनगामि रवी ॥ २४ ॥
ते काळीं भूतेंद्रियदेवांतें हर्ष जाहला भारी ।
प्रतिती तेथें चि नसे भावी जो मी च पद्मनाभारी ॥२५॥
निजगर्भीं अवतरला हरि निरखुनि तोष देवजननीला ।
तैसा च कश्यपातें होय म्हणे धन्य धन्य घननीला ॥ २६ ॥
बटुवेषवामनातें निरखुनि मुनिवर्य हर्षले सकळ ।
करविति कर्में कश्यप पुढें करुनि न पडतां मनास कळ ॥ २७ ॥
उपनीयमान बटुतें सावित्रीतें कथी तदा सविता ।
दे ब्रह्मसूत्र गीष्पति दे पुत्रालागिं मेखला सविता ॥ २८ ॥
मृगचर्म मेदिनी दे दे दंड शशांक जो धरि शशाला ।
जननी कौपीनातें दे छत्र स्वर्ग वंदुनि तशाला ॥ २९ ॥
दे विधि कमंडलूतें देती सप्तर्षि नूतन कुशाला ।
दे अक्षमालिकेतें सरस्वती रम्य परम पुरुषाला ॥ ३० ॥
दे यक्षप पात्रातें दे भिक्षेतें उमा अनादि सती ।
तो तरला हरिलीला हे रम्या ज्याचिया मना दिसती ॥ ३१ ॥
नयनीं फुटल्या रसना त्यातें गमला सुधासुरसमेळा ।
तो ब्रह्मवर्चसें बटु रुचला राया बुधा सुरसमेळा ॥ ३२ ॥
व्रतबंधकर्म विधिवत् संपादुनि जेथ यज्ञ बळि कारितो ।
त्या नर्मदातटाकीं याचकवेषें चि जाय बटु हरि तो ॥ ३३ ॥
तो अश्वमेधयज्ञीं भृगुवंशोत्पन्न विप्र त्या सहित ।
पृच्छक ते क्षणि तेथें शंकित यजमान होय त्यास हित ॥ ३४ ॥
बोलति परस्परें ते येतो यज्ञासि कोण हा रविसा ।
कीं वन्हि कीं सनक हा भा सर्वांच्या हि येथ हारविसा ॥ ३५ ॥
त्या यज्ञमंडपीं ते करितां तर्कासि छत्रधर बटु तो ।

आला सभेंत पाहुनि नृप चित्तीं हर्षला परम पटु तो ।। ३६ ।।
दंडकमंडलु हातीं मौंजी माजासि शोभली बरवी ।
सर्वांसि जो स्वतेजें प्रत्युत्थानादि तत्क्षणीं करवी ।। ३७ ।।
आसन देऊनि बळी स्वागत पुसता मनीं चमत्कार ।
भासे ज्यासि परम सुख मानुनि त्यातें करी नमस्कार ।। ३८ ।।
बटुचरण प्रक्षालुनि घे माथां भूप दुरितहर जळ तें ।
जेणें शशिधर खरगर निववी स्वशरीरपुरित हर जळतें ।। ३९ ।।
नृप बोले विप्रशिशो आगमनें यज्ञ जाहला सांग ।
झाले तृप्त पितर परि काय अपेक्षा तुझी मला सांग ।। ४० ।।
जें जें वांछिसि चित्तीं तें तें निःशंक वित्त मागावें ।
कांचन रथ गज वाजी किंवा घे ब्रह्मवित्तमा गांवें ।। ४१ ।।
बोलसि यथार्थ राया सत्यत्वाचा तुझ्या कुळास ठसा ।
दृष्ट श्रुत न च ऐसा कोणी वंशात जाहला शठसा ।। ४२ ।।
या तुझिया वचनाचे हे साक्षी विप्रवर महाराजा ।
परलोकाच्या ठायीं वेत्ता प्रल्हाद ही तुझा आजा ।। ४३ ।।
रणतीर्थदानविषयीं पाठीं तुझिया कुळांत नर सरला ।
नायिकला चि कदापि हि तू का सरसील साग न रस मला ।। ४४ ।।
यास्तव मत्पदामितिनें तुजपासुनि तीन पाउलें च मही ।
मी वांछितसें राया तुज दातृत्वासि किमपि न श्रम ही ।। ४५ ।।
येणें चि तृप्ति असतां चिंतीना चित्त वस्तु या परतें ।
दातृत्वशक्तिपरतें मागावें तें अयोग्य पापरतें ।। ४६ ।।
हास्य करुनि बलि बोले येथें विप्रापुढें करी पाणी ।
वांछित काय तुझें हें असो शिशो सोडितों करीं पाणी ।। ४७ ।।
भाव नृपाचा समजुनि दानातें शुक्र तद्रूरु निवारी ।
बोले राया हरि हा वससी स्वकरांत कां धरुनि वारी ।। ४८ ।।
बटुसा तुज गमतो परि तंतु चि हा विश्वमायिकपटाचा ।
विबुधहितास्तव धरिला वेष तुला वंचनार्थ कपटाचा ।। ४९ ।।
जरि न कळे हें चरित तुज परि मजला हें नृपा सकळ कळतें ।
श्रम पावशील यास्तव मानस तुज सत्कृपास कळकळतें ।। ५० ।।
अनृत वदावें तरि मज सकट ते काय आज वद गुरुजी ।
वाग्दत्त जाहल्यावरि मजवरती व्यर्थ करिसि गुरुगुरु जी ।। ५१ ।।
विष्णु असो अथवा हा याचक कोणी तरी असो भलता ।

मी देउनि चुकलों तूं याची कां छेदितोसि लोभलता ॥ ५२ ॥
नायिकतां स्वाज्ञापित दे बळितें शुक्र शाप कविवर तों ।
हतदैव पुरुष जैसा नेणुनि निज हित मनांत न विवरितो ॥ ५३ ॥
मद्वचनोल्लंघनफल पावसि निःश्रीकता नराधिपते ।
पडती व्यसनीं जे गुरुवचन न धरिती मनीं नराधिप ते ॥ ५४ ॥
कथिलें गुरुनें हा सुरकार्यार्थी हरि तवाहित रिपू जी ।
तद्वचन शाप न गणुनि तो बलि त्या माधवा हि तरि पूजी ॥ ५५ ॥
तत्पत्नी विंध्यावलि कलश करीं त्यांत विमल जल भरिलें ।
ओती बटुचरणावरि धुउनि चरण ते नृपें शिरीं धरिलें ॥ ५६ ॥
त्या कर्मातें स्तविती सुरमुनिगंधर्वकिन्नरादि किती ।
वर्षति कुसुमसमूहें यश गाउनि सुजन मस्तकें तुकिती ॥ ५७ ॥
विस्मयकर रूपातें अनंतगुण जाहला तदा वरिता ।
पातालभूमिनभादिकचक्रांतरिं पाहतां न ठाव रिता ॥ ५८ ॥
भुवनें स्वतनुविभागीं हरिनें बळिलागिं दाविलीं चवदा ।
जैसा सधन पसारी दावी स्वदुकानमंडपीं सवदा ॥ ५९ ॥
एकपदें क्रमिली महि पदे द्वितीयें त्रिविष्टपें भरलीं ।
तृतिय चरण मोजावें तरि विधिभवनातळीं स्थळें सरलीं ॥ ६० ॥
तें हरिपद विधि भावुनि प्रवेशतां विधि सभासदांसहित ।
निरखुनि वदुनि पूजुनि म्हणति पदातें करीं स्वदासहित ॥ ६१ ॥
हरिपदमार्जित जल तें सरिद्वरा होय भारता राया ।
गगनपथें उतरे या महिवरि कृतदुरितभार ताराया ॥ ६२ ॥
सर्वस्वहरण बलिचें निरखुनि ते दानवी सकळ सेना ।
वामनहननार्थ निघे चित्त जिचें लव नृशंस कलसेना ॥ ६३ ॥
नंदसुनंदादि तदा हरिगण ताडिति तदीय कटकातें ।
बळि दनुजांसि म्हणे कां मरतें मत्सैन्य फुकट हटका तें ॥ ६४ ॥
अस्मद्धितकर हरि तो झालासे साह्य विबुधनिकरातें ।
जय अपजय कालोद्भव समजुनि करिती न विबुध निकरातें ॥ ६५ ॥
जो त्रिदशपक्षपाती त्यातें हा पक्ष कायसा मान्य ।
धरिला सुरार्थ जेणें पहा पहा काय काय सामान्य ॥ ६६ ॥
या बलिवचनश्रवणें दितिदनुसुतकुल रसातळीं शिरलें ।
कुशल हि काय करिल तरि जरि समयें दैव पाठिशीं फिरलें ॥ ६७ ॥
तदुपरि हरिचित्ताशय जाणुनि त्रिनतासुतें तया बळिला ।

धरूनि वरुणपाशांहीं दृढ बांधुनि ताढितार्थे आवळिला ॥ ६८ ॥
श्रीहरिभावार्थ असा कीं याचा निरसिजे अहंममता ।
यास्तव हरूनि दोन्ही दावी बळिलागिं आपुली समता ॥ ६९ ॥
श्रीविहत परि स्थिरमति धर्मात्मा जो कधीं न पापरत ।
त्यासि वदे हरि दिधलें या वचनातें न धर्मपा परत ॥ ७० ॥
बे जें इच्छिसि मातें त्या तुझिया सकळ कामना पुरती ।
मागसि मज बळिलागुनि तें मागें गोष्टि वामना पुरती ॥ ७१ ॥
ऐसें असतां तुज मी मागितलीं तीन पाउलें धरणी ।
तें देउनि मज आतां वाक् सरकीं महत्पुरःसरणी ॥ ७२ ॥
एका चि पाउलें महि भरली दुसऱ्या पदें गगन भरलें ।
दे तिसरें पद उरलें नाहीं तरि बोल मद्वचन हरलें ॥ ७३ ॥
वाग्दत्त न परिहरतां जासी नरकासि विगतसंदेह ।
ऐसें चि अहममतायोगें श्रमलेत बहुत मदेह ॥ ७४ ॥
ऐसा छळिला जरि तरि न ढळे सत्वासि दानवेश शमी ।
तो वदतो श्रीहरितें मद्वचनातें कसा नसें वश मी ॥ ७५ ॥
तुजलागिं वचन दिधलें त्यातें देवा न मी कदापि सरें ।
पदयुग्मपूर्ति झाली तरि दे पद वद्य मस्तकीं तिसरें ॥ ७६ ॥
भीती मज नरकाची न दरिद्राची न वरुणपाशाची ।
लोकीं दुर्वादाची भीति मला एक इतर काशाची ॥ ७७ ॥
पारीक्ष्य परम गुरु तूं असुरांचा सर्व गर्व हारविसी ।
तम निरसी विश्वाचें ह्मणवुनि कीं काय दोष हा रविसी ॥ ७८ ॥
तुजशीं वैर करूनि बहु विबुधेतर खळभवांबुधी तरले ।
गुह्य असें नेणोनि जे पाय तुझे त्यांस मात्र अंतरले ॥ ७९ ॥
सकल प्रपंच मिथ्या समजुनि तव चरणपल्लवीं जडला ।
त्या प्रहरादश्रेयें निरुपम मज योग हा तुझा घडला ॥ ८० ॥
शरण पितामह माझा अनुसरला पतितपावना तूतें ।
झाला सुखी च तत्कुलसंभव हा पतित पाव नातूतें ॥ ८१ ॥
ते समयीं प्रहराद हि येउनि वर्णूनि वद्य गुण बळिचा ।
स्तवितांहे श्रीहरिला रक्षावा दास दनुजकुलबळिचा ॥ ८२ ॥
बलिपत्नी विंध्यावलि वदुनि देवासि सुवदनें विनवी ।
त्वद्दत्त समर्पुनि तुज देती हे मूढ काय जोड नवी ॥ ८३ ॥
विधि विनवी देवातें या समयीं योग्य काय हा निकर ।

सर्वस्व अर्पिलें तुज तें बळिलागुनि कायहानिकर ॥ ८४ ॥
फलजलदूर्वार्पण तुज करितां देतोसि बा निज गतीतें ।
यासि घडेल कशी ते तुज चि समर्पूनि हानि जगतीतें ॥ ८५ ॥
स्तुति विधिची ऐकुनि हरि बोले देवाधिदेव धात्यासी ।
मद्भक्तगर्वहर मी तो ठेवीन सांग कां त्यासी ॥ ८६ ॥
बहुत चि छळिला मी परि हा माझ्या उतरला छळकसातें ।
याच्या सत्वगुणाचे वंचिन तरि मी महत्फल कसा तें ॥ ८७ ॥
मन्वंतर सावर्णीमनुचें सरतां चि नाकपालकता ।
पावेल इंद्र होउनि मग इतरांची उडेल चालकता ॥ ८८ ॥
तंव पर्यंत सुतळ जें रचिलें अतिरम्य विश्वकर्मकरें ।
तेथें असोनि येणें भोगावीं शुभ फळें सुशर्मकरें ॥ ८९ ॥
आधिव्याधिजराभयबाधा जेथें न जननमरणाची ।
तेथें राहुनि येणें स्मृति रक्षावी मदीय चरणाची ॥ ९० ॥
हे इंद्रसेन राया जावें सुतळासि दितिजपरिवारें ।
मच्चक्र तेथ रक्षक न कृतांतार्चे हि जेथ परि वारें ॥ ९१ ॥
रे बळिराया तुझें निरुपम मन मानलें महाशील ।
यास्तव तुझिया द्वारीं बसेन मजला सदा पहाशील ॥ ९२ ॥
वंदुनि हरितें सह गण गेला सुतळासि बळि वसायाला ।
त्याच्या भक्तीस्तव हरि सोडू तरि मी म्हणे कसा याला ॥ ९३ ॥
बळि सुतळाप्रति जातां उपेंद्र ही जाय विबुधलोकासी ।
हृष्ट करुनि अदितीतें केला देवेंद्र तेथ मोकासी ॥ ९४ ॥
यापरि हरिचीं चरितें ऐकुनि गाउनि भवार्णवीं तरती ।
त्यांच्या चरणरजाची विठ्ठलहृदयांत पूर्ण सतत रती ॥ ९५ ॥
इति विठ्ठलकविविरचित वामनचरित्र संपूर्ण.

---

## शुकरंभासंवाद—आर्या.

श्रीनरहरिपदपद्मीं मानसमधुपासि पाजवील सुधा ।
कामासि तो चि जिंकिल करिल पदरजें पवित्र हे वसुधा ॥ १ ॥
वंदुनि संतमनाप्रति वर्णिन विश्रांत मान्य शुक थोरे ।
शुकरंभासंवादश्रवणें चित्तांत शांतिसुख थोरें ॥ २ ॥
प्रथत निरंजनदेशीं उपवन घन शांत जें विवेकाचें ।
वैराग्यवसतोऽज्जृंभितासन तेथ मानस शुकाचें ॥ ३ ॥

त्याच्या तपसामर्थ्यें सहस्रकरचंद्र लोपती तारा ।
अमरासनें हि चळती स्वर्गी शक्रासि ना निघे थारा ॥ ४ ॥
ते काळीं मुनि नारद येतां स्वर्गासि वासवाजवळी ।
सकळ सुरांसह सुरपति वंदुनि पदयुग्म आदरें कवळी ॥ ५ ॥
पूजा करुनि यथाविधि सप्रेमें श्रीविरिंचितनयातें ।
प्रश्न करी संक्रंदन वचनें दावूनि पूर्ण विनयातें ॥ ६ ॥
भूमंडळप्रदेशीं स्वामी तप कोण आचरे सुकृती ।
सर्वज्ञ तुम्ही जाणा त्रिभुवनभुवनांत धन्य परम कृती ॥ ७ ॥
मुनि वदतां शुकमहिमा श्रवण करुनि शक्र मानसीं विवरी ।
कवण तपातें खडुनि निःसार करी तयासि भूमिवरी ॥ ८ ॥
यापरि हृदयीं विवरितां तपनाशालागिं कल्पिली ललना ।
स्त्रीयोगें बहु थकले ज्ञानी हि तपांत पावले चलना ॥ ९ ॥
त्रिपुरांतक चतुरानन मी सुरपति इंद्र तापसांत किती ।
विश्वामित्र पराशर शृंगी व्यासादि कोण करिल मिती ॥ १० ॥
दर्भी जभाहित संरभें रंभोरु आणवी रंभा ।
संभावुनि परमोचित जृंभित शब्दें कल्पि तो समारंभा ॥ ११ ॥
तुम्ही स्त्रियांनि बहुत चि तपोनिधी करुनि दाविलेत रिते ।
तूं ही जाणसि तेथें किमर्थ बोलूनि दाखवूं तरि तें ॥ १२ ॥
जाउनि मृत्यूभुवनीं शुकमुनिच्या सत्तपासि नाश करीं ।
साहित्य युक्त घेउनि जैसा मीनासि दाश पाश करी ॥ १३ ॥
मान्य करुनि ती सुकुचा रंभा निर्जरवरेशपाय नमी ।
विनवी केविं ठरे शुक करितां संगीत नृत्य गायन मी ॥ १४ ॥
चंद्रमुखी चपलाक्षी चूर्णकचा चारुचित्रचीरधरा ।
लिकुचकुचा चामीकररुचिरुचिरा पाहते शुकोद्यधरा ॥ १५ ॥
सीमंतमध्यदेशीं सिंदूरारक्त रेखितें रेखा ।
वेणीफणी सुकुंकुम कज्जल धरितां चि काय शुकलेखा ॥ १६ ॥
नासाभरण सुराजित कर्णफुलें जडुनि रत्नकापासी ।
मुक्ताहारांगदकंकणरम्या पावल्ये शुकापाशीं ॥ १७ ॥
धरितें बहु मृदु जांबूनदरंजित रम्य रत्न हीरमणी ।
लीन निरंतर चरणीं वंद्य नसे काय मोहिनी रमणी ॥ १८ ॥
मंजीरशिंजितें मी रंजवितें राजयोगिरायातें ।
स्त्रीचरित विदित असतां सहस्राक्ष कां शिणो गिरा यातें ॥ १९ ॥

जीं जीं वाक्यें वदली तच्छतगुणितें सुरांगना नटली ।
पाहूनि सुरपतीच्या चित्तांत चि तत्क्षणीं निशा पटली ॥ २० ॥
मलयपवन कुसुमाकर मित्रमुकुटमणी सहायकर जोडी ।
ती सहसा साहित्यें गीतें संक्रदनासि कर जोडी ॥ २१ ॥
पुरुहूताज्ञा वंदुनि रंभा भूमंडळीं शुकाजवळी ।
येऊनि गायनाचे फेरे मारुनि बहु निज माज वळी ॥ २२ ॥
कुसुमाकरें रचुनि वनशोभासंपत्ति दाविली बरवी ।
फलपुष्पसुरभिगंधित सभोंवतीं रम्य वाटिका हिरवी ॥ २३ ॥
स्पर्शुनि कुसुमसमूहा मलयानिल तेथ भवत आकाशीं ।
मंद सुगंध सुशीतल लागे जाऊनि मुनिस नाकासी ॥ २४ ॥
कारंडवकोकिलशुकहंसमयूरादिपक्षिनादानें ।
उद्यान द्दय तेथें मर्त्यांच्यानें अवद्य नादानें ॥ २५ ॥
परिमलजलकासारीं सुवर्णपद्मासभोंवतें भ्रमती ।
भ्रमर प्रमोदगुंजारवें शुकालागिं दावि संभ्रम ती ॥ २६ ॥
आयास बहुत रंभा करितां योगी नव्हे चि तो जागा ।
कां पुनरावृत्ति करी ज्याला संप्राप्त होय तो जागा ॥ २७ ॥
अयुतदलपंकजगत वायु निरोधुनि आत्मलाभानें ।
पूर्ण सुखी मग कोठुनि देहेंद्रियजन्य त्याजला भानें ॥ २८ ॥
जे रजनी विश्वाची तेथें तो योगिराज जागतसे ।
त्या द्रष्ट्याची रजनी तेथें हे भूतजात वागतसे ॥ २९ ॥
ब्रह्मानंदसमुद्रीं निमग्न जो जाहला दिवारजनी ।
त्या लाभावुनि त्याला बोलें बोलाल काय सार जनीं ॥ ३० ॥
यत्न विफल विलोकुनि शुकतनुवरि चैलपल्लवें वारा ।
घाली चळे न तो मग मानी रंभा वृथा स्वपरिवारा ॥ ३१ ॥
सी ब्रह्मनिष्ठितातें स्पर्शून करें बळेंच हालविते ।
आनंदनिर्भराच्या वृत्यमृतीं कालकूट कालविते ॥ ३२ ॥
स्पर्श करिल हरिमाया वास्तव उदरांत जननिच्या बारा ।
वत्सर वसे तपस्वी रंभेचा त्यास काय परि वारा ॥ ३३ ॥
वर्षे द्वादश होतां श्रीहरि जामीन देउनी ज्यासें ।
बाहेर आणिला जो तो रंभेच्या भ्रमेल हव्यासें ॥ ३४ ॥
परतोनि शुका पाहें या उद्यासोच्चस्वरासि ओ देती ।
सकलवनस्पति तेणें सह रंभा काय करून मोदे ती ॥ ३५ ॥

तीच्या दुराग्रहास्तव समाधि सोडूनि लागला बोलूं ।
यानंतर दोघांचे परस्परें स्पष्ट बोल ते बोलूं ॥ ३६ ॥
कोठील कोण तूं का येथें येणें किमर्थ सांगावें ।
मी दीन तापसी मजपाशीं येऊनि फुकट कां गावें ॥ ३७ ॥
शृंगारमूर्ति रंभा सुरलोकीं मान्य देवरायातें ।
आलें स्वामीस्तव मी आज्ञा मज आजि दे वरायातें ॥ ३८ ॥
स्त्रीलब्धिलुब्ध असतों तरि कां मी बायिला वनीं वसतों ।
संसारसुखीं ठसतों तरि कां मी बायिला जनीं बसतों ॥ ३९ ॥
हरिहरविधि संसारीं रमती कांतांसवें महा ज्ञानी ।
स्त्रीसंभोगाविण सुख अन्य वदावें स्मरूनि सुज्ञानीं ॥ ४० ॥
प्रापंचीं सुख असतें तरि कां योगी वनांतरीं बसती ।
स्त्रीस विसर्जुनि फसती तरि कां एकांत सेवुनी बसती ॥ ४१ ॥
अतिविमलतरलहारा हरिणाक्षी वृत्तपीनकुचभारा ।
संभोगाविण संसृति ये त्याचा व्यर्थ देहभव सारा ॥ ४२ ॥
मांसासृक्मज्जास्थीसांकर्यें व्याप्त जो मळें मूत्रें ।
त्या देहातें स्तविसी रंभे जो बद्ध नाडिकासूत्रें ॥ ४३ ॥
मर्त्यस्थलोकवनितेपरि दुर्गंधी ते कशी रिघे नाकीं ।
उदर विदारुन दाविन कुंकुमकस्तूरिगंध घे नाकीं ॥ ४४ ॥
मातें द्वादशवर्षें भोगियलें येथ मातृउदरदरी ।
हें ठावें असतें तरि आलों असतों तुझे चि कीं उदरीं ॥ ४५ ॥
हें वाक्य ऐकतेक्षणिं रंभा लागे शुकाचिये चरणीं ।
स्वामी क्षमा करावी प्रवर्तलें व्यर्थ कीं दुराचरणीं ॥ ४६ ॥
पायरि विनवुनि मुनितें खिन्नमुखी जाय शक्रसदनासी ।
मुनि सहज समाधिसुखीं स्थिर झाला दमुनि दुष्ट मदनासी ॥ ४७ ॥
भागवतादिपुराणीं शुकदेहोत्पत्ति विविध बोलियली ।
ते विबुधांप्रति ठावी मी आयकिली तशी च हे लिहिली ॥ ४८ ॥
श्रीमन्नृसिंहचरणीं शुकरंभासंवाद अर्पिला भावें ।
विठ्ठल म्हणतो गंगोदक ते गंगेसि काय लाभावें ॥ ४९ ॥

समाप्त.

## मुकुंदकविकृत–सारीपाठकथा.

### श्लोक.

कैलासशैलशिखरीं शिव आणि काली । सारीस मांडुनि विनोदति ते चि काळीं ।
तों तेथ नारद मुनीश हि पावला हो । वीणा करीं सहित घे हरिनामलाहो ॥ १ ॥

### अश्वघाटी.

आला मुनी निज घराला म्हणूनि शिव झाला सतोष हि तदा ।
भालाक्ष पाहत चि घाला मुनी विनत झाला गजांतकपदा ॥
खेळासि तत्पर चि झाला तया पुरहरालागीं नारद वदे ।
बोलाविना चहुं पटाला न रंग हि कराला उगा चि श्रम दे ॥ २ ॥

### श्लोक.

संतोष व्हावा जरि आपणाला । बोला मुखें काहिं तरी पणाला ।
ऐशी ऋषीची परिसोनि वाणी । दोघांचिया तैं न सुखासि वाणी ॥ ३ ॥
कामादिकीं जो कधिं नाकळीला । दोघांस ही लावुनियां कळीला ॥
बैसे मुनी पहात तो तमासा । डोले सुखें जेविं जळांत मासा ॥ ४ ॥

### चूर्णिका.

श्रीमत्स्वच्छशशधरशकलविलसितोत्तमांग गंगातरंगरंजितजटातट मुनिजनसेवितपदकमलपरागें । मुनिवरनिगदितवचन मनन करूनि अति सानुरागें । शरदभ्रविभ्रमितशुभ्रतरभूतिकृतांगरागें । भक्तहृत्कमलभृंगें मत्तमातंगशुंडादंडायमानभुजदंडनिर्जितचंडवेतंडदंडधरभीतिहरानें प्रेमयुक्त नेम करूनि व्याघ्रचर्मनृकपालमाला पणालागिं ठेविली ॥ ५ ॥

### श्लोक.

बोले तैं अबला म्हणे स्वपतिला हा खेळ तों जिंकिला ।
ठेवा जी पहिला दुजा नग भला जो संग्रहीं चांगला ॥
शंभू तैं चकला म्हणे अजि मला हारें न हे चित्कला ।
कीं हा काळ मला न साह्य ममला चिंतांबुधीं मज्जला ॥ ६ ॥

### चूर्णिका.

त्यानंतरें काळीतकें शेषभूषणाला । परशुडमरूपट्टीशखट्वांगादि आयुधाला ।
वृषभगजाजिनाला ठेवितां एकेक डाव करूनि चट्टा हिरोनि घे नगराजबाळा ।
विलोकितां अशाला लज्जाकुलित शिव देखोनि जगज्जननि म्हणे नमस्ते नमस्ते हर हरा ॥ ७ ॥

## अश्वधाटी.

पिंगाजटा रुळति अंगावरी धरि कुरंगासि हस्तकमळें ।
शृंगार सर्व हि भुजंगाधिपाकति अनंगारि जैं डळमळे ॥
गंगाधरानतक संगासि नाशक अभंगासि होउनि सदा ।
शुभांगा * * * * * वदे नतपदा ॥ ८ ॥

## शार्दूलविक्रीडित.

घ्यावीं वस्त समस्त हे मज नको क्रीडार्थ हा खेळ जी ।
स्त्रीने हारविलें म्हणोनि हृदयीं वाहू नका काळजी ॥
या वाक्यासरिसा मुनी मग कसा बोले महेशाप्रती ।
निर्लज्जें वसणें तयाहुनि बरें जाणे दिगंताप्रती ॥ ९ ॥

## अश्वधाटी.

माया अपार अनुमेया न तूज सुरराया अजिंक्य समजें ।
वायां पणासि करूनीयां उगी च तनु आयास युक्त करिजे ।
जाया वरी भव काया न [च] दावि तव पायांसि हें नमन घे ॥
जाया निरोप मज दे या क्षणीं क्षण वसाया रती न मन घे ॥ १० ॥

## श्लोक.

गेला असें वदुनि नारद शंकरातें । सक्रोध शंभु तयिं चालियला वनातें ।
तों आड येउनि वदे गिरिजा सुहासा । कां जातसा करुनि राग अजी महेशा ॥११॥

## सवाई.

बोलु नको मजशीं बहु लाडपणें च न चाड तुझ्या वचनाची ।
काय वदा मजपासुनि अंतर जें तुमच्या हृदयास हि जाची ॥
ऐकुनियां शिव बोलतसे ललनावचनें श्रवणीं न पडावीं ।
हांसुनि तें गिरिजा वदली कधिंपासुनि ज्ञानकळा हि वदावी ॥ १२ ॥
बोलतसे भव कोपभरें गिरिजा म्हणुनी हृदयीं कठिणा जी ।
जासि पिशाचगृहीं रहिवास तयां लवलेश नसे करुणा जी ॥
भीड त्यजूनि च बोलसि वास्तव जाइन येथुनि शीघ्र वनाला ।
जाल किती दिस हाल वनांतरिं याल उद्यां परतोनि घराला ॥ १३ ॥

## श्लोक.

वाक्य हें परिसुनी शिव बोले । यापरी उगि च फार न बोलें ।
जातसें त्यजुनियां सदनाला । पाहिना च अधुना वदनाला ॥ १४ ॥

यापरी वदुनियां गिरिजेला । पातला अतित्वरें गिरिजेला ।
सोसुनी हिम हि वर्षतपातें । बैसला करुनि तीव्र तपातें ॥ १५ ॥

### पंचचामरवृत्त.

कित्येक दीस लोटले तरी नये चि कां पती ।
म्हणोनि शोध घ्यावया निघे तदा उमा सती ॥
वनीं वनीं फिरे पुसे ऋषींस आणि योगियां ।
तुम्ही महेश देखिला तरी वदा वनांत या ॥ १६ ॥
असा करीत शोध तेथ पातली कृशोदरी ।
महेश जेथ आदरी तपासि सेवुनी दरी ॥
विलोकुनी तयासि ते मनीं विचार ते करी ।
अशा रुपें चि गेलिया शिवासि कोप ये तरी ॥ १७ ॥

### श्लोक.

चिंतूनि ते बहुत वेळ कपर्दियोषा । ल्यासि पालटुनियां धरि भिल्लिवेषा ॥
नेसोनि बर्ह कनकाभरणीं विराजे । पाहोनि जीस कुसुमायुधमाय लाजे ॥१८॥

### अश्वधाटी.

बाळी सुकर्णयुगिं घाली शिरीं सुमनजाळी सुवासित भली ।
भाळीं टिळा जडित ल्याली सुरत्न नगमेळी बहु झळकली ॥
चाली जिची जितमराली अशी गिरिश वांछी सुहीरकरदा ।
आलीसमेत मग आली शिवा निकट ठेली अभीष्टवरदा ॥ १९ ॥

### श्लोक.

तेव्हां मंद सुगंध मारुत सुटे झंकारशब्दें अळी ।
आलापासि करी पिका चि सह ते नाचे मयूरावळी ॥
चापातें कुसुमायुधें शर गुणीं सज्जूनि आकर्षिलें ।
झाले साह्य समस्त हे परि शिवें ध्यानीं मना योजिलें ॥ २० ॥

### कामदावृत्त.

आत्मचिंतनीं लक्ष लावुनी । बैसला मुनी जेंवि आसनीं ॥
याउरी मला पाहतो कसा । पावली उमा शोक तो असा ॥ २१ ॥
झाली स्तब्ध क्षणेक त्यावरि कशी कल्पूनि बुद्धीस जी ।
वीणा घेउनि मंजु मंजुळ रवें गानीं च वाणी सजी ॥
ऐशी श्राव्य सुकर्णरंध्रयुगलीं जातां समाधी त्यजी ।
नेत्रातें उकलूनि पाहुनि म्हणे ब्राह्मी कला नित्य जी ॥ २२ ॥

असें वेधतां चित्त तीच्या गुणानें । वदायासि आरंभिलें निर्गुणानें ॥
म्हणे कोण तूं एकटी या वनीं गे । तुला पाहतां मोहिलें की अनंगें ॥२३॥
भिल्ली मी चिरकाल निर्भय मनें रक्षीतसे या वना ।
वाणी ऐकत तो म्हणे बहु बरें होईं मदीयांगना ॥
ते बोले न वदें अतःपर असें रागीट माझा पती ।
हें ऐकेल तरी अनर्थ चि घडे काळादि ज्या कांपती ॥ २४ ॥
मी एक थोर सकळां विबुधांत मानीं । नाहीं दुजा मज असा त्रिजगांत मानी ॥
तूं सर्वश्रेष्ठ तरि कां तुजलागिं जाया । नाहीं उगा च फिरतोसि वनोवनीं या ॥२५॥
जाया असे परि करूनि स्मितानना तें । मी खेळतां बहु करी च विनोदनातें ॥
यालागिं सोडुनि तिला मग या वनाला । आलों असें समज हृद्गत जीवनाला २६

## चामरवृत्त.

सहास खेळतां विनोद बोलिली सती तिला ।
त्यजी अशा दुजी कशी वरील सांग तूजला ॥
अशी निराश बोलतां पुन्हा हि नेत्र लावुनी ।
करीत ध्यान चित्सुखें उमेश तोष पावुनी ॥ २७ ॥
मागुती हळुच गान ते करी । मानसीं विकळता च ते करी ॥
ऐकुनी मृग सुखासि पावले । टाकितीं मग पुढें न पावलें ॥ २८ ॥
तेव्हां ते निकटीं च बैसुनि हटीं गातां चि तो धूर्जटी ।
कंठीं सिंहकटीचिया मग मिठी घालावया तो उठी ॥
तेव्हां सुभ्रुकुटी विलोकुनि दिठी बोले अतीगोरटी ।
आशा दुष्ट न ती धरीं वळकटी गुंतूं नको संकटीं ॥ २९ ॥

## कामदावृत्त.

मी परांगना साध्य होइंना । जाण निश्चयें तूं तपोधना ॥
यापरी सती बोलिली बहू । काम मोहिला ना म्हणे साहूं हूं ॥ ३० ॥
टाळुनी तिचा बोल तो पहा । बोलतो कसा शोकतापहा ॥
कल्पना त्यजीं दूर तीकडे । बैस येउनी माझिये कडे ॥ ३१ ॥

## अश्वधाटी.

झाला बहूतर विशाला नसे दश दिशा [ हा ] उगा भ्रमत जो ।
शाला सुरंग न दुशाला गळां धरि विशाला स्वतंत्र मत जो ॥
माळा अनेक नृकपालांचिया गळिं अशाला कशास युवती ।
माळावया न पद काळातका उगि च बाळा कशी सुखवती ॥ ३२ ॥

**आर्या**–रक्षक मद्द्रव्याला कुबेर केला असे सुमित्र भला ॥
देइल फार धनाला शाल दुशाला उणें नसे चि मला ॥ ३३ ॥
**श्लो०**–बापें प्रत्यक्ष दाक्षायणि पति बहुसा निंदितां ते शुभाक्षा ।
कांक्षा सोडूनि काया हुत करि च तदां तो विरूपाक्ष शिक्षा ॥
दक्षाला लावि तेंव्हां उपरि गिरिसुता होउनी मागुती ते ।
अंगीकारी तुम्हाला म्हणुनि पुरहरा पावली या गतीतें ॥ ३४ ॥
**सवा०**–शुंभ निशुंभ वधीं बहु चंड अखंड मला उपहास करी ते ।
या करितां त्यजिलें सदना अधुना न लगे कठिणा नवरी ते ॥
भिल्लि वदे कपटी बहु तूं शिरिं वाहुनि जन्हुसुता अनुरागें ।
त्या हि वरी पण आपण ठेवुनियां हरिलें म्हणुनी त्यजि रागें ॥ ३५ ॥
ऐकत हें बसला न वदे च पुन्हा शिव पाहुनियां च सतीला ।
गान करी हळु मान हि हालवि मान त्यजी श्रवणें भव भोळा ॥
काय उपाय करूं कसि होय मला महिला वश ते चपला हे ।
चिंतुनि यापरि कोप त्यजूनि उमापति आण अशी वदलाहे ॥ ३६ ॥

## शिखरिणीवृत्तं.

त्यजी पृथ्वी नागाधिप जळधिमर्याद विघडे ।
अकाळीं सूर्याला चरमगिरिविश्रती परि घडे ॥
न सोडीं तूतें मी समज मनिं तूं तें दृढ तरी ।
प्रिये होईं पुष्पासुधजलधिमध्यें मज तरी ॥ ३७ ॥
यापरी वदत काकुळतीनें । ऐकुनी स्मित करूनि सतीनें ॥
पाल कां जरि मदीय घराला । शांतवीन तरि पंचशराला ॥ ३८ ॥
ऐसें वदोनि उठली मग ते भवानी । जीची चरित्ररचना सुरवृंद वानी ॥
बोलें अशा म्हणत तो तरि शूलपाणी । वाहे शिरीं सुरधुनी अति रम्य वाणी ३९
जंव हळु सरके तों पाठिशीं शंभु येतो ।
समजुनि वश ऐसा मानसीं निश्चयें तो ॥
त्यजुनि कृतकवेषा ते धरी नैज रूपा ।
झगझगित विराजे नित्य जे चित्स्वरूपा ॥ ४० ॥
कांचोळी तगटी कुचीं तटतटी साडी लसे भर्जरी ।
कंठीं चिंचपटी चुडे मनगटीं बोटीं मुदी साजिरी ॥
साजे दाम कटीं सुभव्य प्रगटीं रूपासि तैं तो दिठी ।
पाहोनी बहु ठीक शंकर मिठी घाली गळां नेहटी ॥ ४१ ॥

## चूर्णिका.

तत्समयीं अनेक यानगतशतमखादि सुर सुजातपारिजातकद्रुमकुसुमनिकर वर्षो- नियां निज करीं प्रत्यूहमत्तगजकेसरी विविध सुगंधचंदनकस्तूरिकेसरीं उत्कंठित हो- ऊनि नीलकंठ विध्युक्त पूजिती सुकमळीं तंव उठोनि नगराजबाळी होऊनि बद्धां- जळी बोलती झाली तेधवां ॥ ४२ ॥

## श्लोक.

ते पाहिजे तरि वदा अजि वामदेवा । आणूनि देइन तुम्हां अजि देवदेवा ॥
शंभू तदा स्मित करूनि म्हणे मला गे । तूं वांचुनी प्रियतमा दुसरी न लागे ॥४३॥
परस्परें हास्यविनोदरीती । करीत दोघे हि अनेक रीती ॥
हळूहळू तोषभरें च जाती । समागमें विष्णुमहेंद्र जाती ॥ ४४ ॥

## सवाई.

डोलत डोलत चालत हांसत बोलत शंकर तोष हि लाहे ।
जात सवें गिरिजा विरजा मग राजत शैल विराजित पाहे ॥
त्यावरि मंदिर सुंदर पाहुनि हाटकपाट विशाळ बसाया ।
घालुनि माळ गळ्यांत सुवासित अर्पुनि गौरि नमी सुरराया ॥ ४५ ॥

## श्लोक.

आनंदला शंकर तो सुराला । देता चि कीं ईप्सित हो वराला ॥
घेऊनि आज्ञा मग सर्व जाती । तें क्रीडती वद्य सदा द्विजाती ॥ ४६ ॥

## आर्या.

जे ब्रह्मोत्तरखंडीं कथिली ह्यासें कथा तिची टीका ।
सादर परिसति त्यांला दे सौख्याला अशी जिची टीका ॥ ४७ ॥

## अश्वधाटिकावृत्त.

मंदाकिनीधर अमंदासुखैक शुभकंदा सुहीरकरदा ।
कुंदाभशुभ्रतनु वृंदारकानत मुकुंदार्चितांघ्रिवरदा ॥
गंधासि लुब्ध अरविंदाचिया सुमकरंदा जसा भ्रमर तो ।
वंदारुभक्तजनमंदारका पदरविंदा तसें मन रतो ॥ ४८ ॥

## शार्दूलविक्रीडित.

ज्याची सत्कविता प्रसिद्ध मिरवे संतांचिया मंडळीं ।
तो गोविंद पिता पवित्र जननी सावित्रि नामें भली ॥

त्याचा पुत्र मुकुंद पुत्र गिरिजाकांतास सद्भक्तिनें ।
पूजी सद्वचनावली सुकमळीं गुफोनियां युक्तिनें ॥ ४९ ॥
इति मुकुंदकविविरचिता सारिपाटकथा समाप्ता.

---

## नारायणकृत-विचारमाला.

आर्धी प्रापंच सारा सुतधनविषयानर्थहेतूस वारा ।
वारा बुद्धी निवारा समजुनि बरवें त्यागिजे हृद्विकारा ॥
सारा मायापसारा वमुनि धरू नका दुर्मतीचा फुगारा ।
सेवा संसार सारा गुरुवरदकृपासगपीयूषधारा ॥ १ ॥
संसारीं भलत्या भरीं भरूं नको अभ्यास सोडूं नको ।
मिथ्या देहसुतादि तुच्छविषयीं आनंद मानूं नको ॥
पूर्वीचें गृहसौख्य तें स्मरूं नको होणार चिंतूं नको ।
ब्रह्मानंदनिमग्नचित्त असतां कांहीं च कांहीं नको ॥ २ ॥
मिथ्या मान नको शरीर अपुलें हें सत्य जाणूं नको ।
हा मी तो जन अन्य हें मनि कदा जाणून आणूं नको ॥
कामक्रोधविकार हे धरूं नको तूं खेद मानूं नको ।
आत्मारामहृदिस्थ शंकर सदा सेवून सोडूं नको ॥ ३ ॥
प्रापंचीं ममता कधीं धरूं नको लोभांत गुंतूं नको ।
लोकीं तूं खळ दुष्ट नष्ट भलत्यासंगांत बैसूं नको ॥
कांहीं कर्म करू नको गुरुमहापथासि मोडूं नको ।
जो कोणी भवदुःख सर्व निरसी तो देव सोडूं नको ॥ ४ ॥
तूं कांहीं ममता भ्रमीं भ्रमुं नको मोहांत गुंतूं नको ।
कांहीं दुःखशरीरभोग अपुला हा सत्य जाणूं नको ॥
लोकीं वाद नको अहमति नको मायापसारा नको ।
आत्मा तू च समाधि भोगुन कदा काळास शंकूं नको ॥ ५ ॥
नाना देश फिरूं नको जनिं वनीं राहून भोगूं नको ।
लोकीं लाज धरू नको हरिकथाविश्वास सोडूं नको ॥
कर्णीं दुष्ट कठोर शब्द पडती तें दुःख मानूं नको ।
भोगें दुःखसुखादि सारुनि निजानंदास भंगूं नको ॥ ६ ॥
नाना नेम नको व्रतें करूं नको कर्मांत गुंतूं नको ।
पुण्याची मनिं कामना धरू नको मूर्खांत बैसूं नको ॥
देहाचें सुखदुःख तें गणु नको चिंता भवाची नको ।

**श्रीनारायण**नाम सार जपतां जन्मास येऊं नको ॥ ७ ॥
झालें होइल होतसे जग असें चित्तांत कल्पूं नको ।
केलें कर्म करीन हें करितसें हें सत्य मानूं नको ॥
लोकीं तूं खळसंगती धरूं नको स्नेहांत गुतूं नको ।
मी माझें च कुटुंब हें म्हणूं नको वेदास सोडूं नको ॥ ८ ॥
संसारीं असतां प्रवाहपतितद्वंद्वासि त्रासूं नको ।
खेदाखेद मनांत आणुनि मनीं जाणें विचारूं नको ॥
कांहीं घेइन हे मती धरूं नको सोडीन हें ही नको ।
आत्मा तूं परिपूर्ण एक असशी सिद्धांत सोडूं नको ॥ ९ ॥
लाभीं हर्ष नको विषाद हि नको निंदाप्रशंसा नको ।
हानीचा मनिं शोक तू धरूं नको देहीं अहंता नको ॥
कोणाचें इतिकृत्य तें स्मरूं नको माझें तुझें हें नको ।
आप्तासी ममता नको गुरुपरब्रह्मासि सोडूं नको ॥ १० ॥
कांहीं मंत्र नको क्रिया करूं नको वार्ता जनासी नको ।
देहाध्यास कुलाभिमान हृदयीं कर्तव्य ठेवूं नको ॥
कर्ता मी च असें कदां म्हणुं नको कार्यांत गुंतूं नको ।
रामोपासन लोकसिद्ध असतां ऐक्यत्व खंडूं नको ॥ ११ ॥
कोणाशीं मनिं वक्रता धरूं नको भिन्नत्व ठेवूं नको ।
कोणाचे गुणदोष ही गणुं नको मैत्री जनाची नको ॥
चिंता तू निजमानसीं करूं नको देहात्मबुद्धी नको ।
ब्रह्मावीण दुजें कदा स्मरूं नको सद्भाव सोडूं नको ॥ १२ ॥
नाना ग्रंथ नको तपें जप नकों तू वाद घालूं नको ।
नाना धर्म हटादियोग हि नको आशा धनाची नको ॥
नाना तर्क नको मनीं भ्रमुं नको रागास येऊं नको ।
ब्रह्मास्मीति भुलूं नको निजपदानंदास भंगूं नको ॥ १३ ॥
शंका भीति नको वृथा भ्रमं नको दुःसंग सेवूं नको ।
देहाचे कृत कर्म तें निजशिरीं वाहोन घेऊं नको ॥
नाना मार्ग नको उपाधिमळ हा आत्म्यास लावूं नको ।
चित्तीं दोषकलंक संशय नको अद्वैत सोडूं नको ॥ १४ ॥
देहाची ममता कदा धरू नको आशा गृहाची नको ।
लोकांशीं मनि भीड तूं धरू नको निंदेस शंकूं नको ॥
पोटाची हृदिं काळजी करूं नको हा देह दडूं नको ।

सत्संगाविण संगती करूं नको सद्बुद्धि सोडूं नको ॥ १५ ॥
नानाछंद नको वृथा श्रम नको संसारधंदा नको ।
मायामोह नको विनोदकरणें ही बालबुद्धी नको ॥
संसारीं लघु कामना धरूं नको लोकांस निंदूं नको ।
श्रीसच्चिद्घनरामनाम जपतां आलस्य आणूं नको ॥ १६ ॥
प्रारब्धीं सुखभोगयोग नसतां तें दैन्य मानूं नको ।
इंद्राची बहु संपदा गणुं नको क्षुद्रार्थ वांछूं नको ॥
कोणाशीं ममता जगीं धरू नको द्वैतास पाहूं नको ।
माया कल्पित दुःखजाल असतां तूं धैर्य सोडूं नको ॥ १७ ॥
सीतारामउपासना त्यजं नको उद्विग्न होऊं नको ।
देहाचें कृतकर्म दुःख अपुलें कोणासि सांगूं नको ।
कन्यापुत्र नको वृथा जनपराधीनत्व ठेवूं नको ।
भूलोकांत महाप्रसंग पडतां तूं सत्व सोडूं नको ॥ १८ ॥
मायामोह नको सुसंग असतां सोडून जाऊं नको ।
चिंताशोक नको परार्थ करितां लोकांस लाजूं नको ।
वर्मोच्चार नको जनांत नसतां गोष्टी भवाच्या नको ।
चित्तीं राग नको उमावरमहावैराग्य सोडूं नको ॥ १९ ॥
नानाचार नको कुकर्म करणें हे क्षुद्रबुद्धी नको ।
मायाकल्पित वित्तवाजिकरि हे भोगार्थ वांछूं नको ।
कायाक्लेश नको जनीं मुढ अशा संगांत बैसूं नको ।
जेथें जाउन येत ना मुनि कदा तें धाम सोडूं नको ॥ २० ॥
निद्रालस्य नको शरीरसुख हें चित्तांत वांछूं नको ।
देहीं घातक दुष्ट तस्कर महाहंकार ठेवूं नको ॥
कोठें जाउ नको दुराग्रह नको दुर्वासना त्या नको ।
जें दृग्गोचर तें नसे गुरु असा निर्धार सोडूं नको । २१ ॥
मातृभ्रातृ नको गृहाश्रम नको सन्मान इच्छूं नको ।
कन्यापुत्रकलत्र हे तुज नको दुष्कर्मबुद्धी नको ॥
स्वर्भोगास वृथा तपश्रम नको संतान कांता नको ।
सेवीं रामपदा सदा मनिं कदा आत्मा विसंबूं नको ॥ २२ ॥
तूं ते देह नको दशेंद्रिय मनोबुध्यादिकें तीं नको ।
मायाभान असा वृथा भ्रम नको दृश्यांत गुंतूं नको ॥
जाग्रत्स्वप्नसुषुप्ती हे तुज नको तुर्योन्मनी ही नको ।

काहीं शून्य नको सदा विमल तूं साक्षित्व ठेवूं नको ॥ २३ ॥
जेथें भाव कळा समस्त अटती तें शेष सोडूं नको ।
भावातीत असा सदैव असतां कांहीं विचारूं नको ॥
श्रीनारायण देव एक दुसरा तूं देव ध्याऊं नको ।
ब्रह्मानंदमहानिरंजनपदीं जाऊन येऊं नको ॥ २४ ॥
घाली गळां जो सुविचारमाळा । होईल तो काळ तया निराळा ॥
आनंद भोगील निरंजनाचा । तो वानिता मौन धरील वाचा ॥ २५ ॥
इति श्रीमत्परमतपःपरायण श्रीमन्नारायणविरचित विचारमाला समाप्त.

## नारायणसुतकृत
## कबीरजन्मचरित्र.
### आर्या.

गंगातटनिकटीं तो दैवें यवनास तोक सांपडला ।
जैसा अवचित लाभे मार्गीं अधनास धनकसा पडला ॥ १ ॥
जो कवि कवनारंभीं निज हृदयीं आठवील हरिकमला ॥
वाग्देवी कां न म्हणे तद्वदनीं नर्तनीं च हरिल मला ॥ २ ॥
श्रीमद्रामानंदस्वामी श्रीरामचंद्रपदभक्त ।
वाराणसींत होता भिक्षु श्रीब्रह्मनिष्ठ सुविरक्त ॥ ३ ॥
श्रीगुरुकृपें चतुर्दश शत वत्सर आयु काल दर ज्यास ।
नाहीं किमपि तयाच्या पुरजन वंदी सदा पदरजास ॥ ४ ॥
त्याच्या मठांत विप्रस्त्री विधवा ते असे सदाचरणीं ।
संमार्जनादिक करी मन जीचें भिक्षुच्या सदा चरणीं ॥ ५ ॥
पडला होता तांबुल उष्ट + × × + ×
तो तत्प्रसाद मानुनि भक्षी अपराध यांत काय तिचा ॥ ६ ॥
तद्भक्षण करितां ती पतिव्रता जाहली गरोदर ती ।
जीला ठाउक नाहीं परपुरुषाशीं कधीं विनोदरती ॥ ७ ॥
दैवानुरूप घडलें होतां षण्मास वाढलें पोट ।
चिंता करितांझाली नसतां अन्याय कर्म हें खोट ॥ ८ ॥
जाउनि रहासि सती ते पाय धरुनि भिक्षुनायका विनवी ।
मी वदतें गुरुजी हो घडली जी गोष्ट आयकावि नवी ॥ ९ ॥
मच्चित्तानें च कधीं न सेविला किमपि दुष्ट ईश पथ ।
याविषयीं हरि साक्षी अंतर्यामी करीन मी शपथ ॥ १० ॥

अन्याय कर्म नसतां उदरीं हा गर्भ राहिला च कसा ।
काय करूं मी आतां पडला माझ्या च विधि असे अकसा ॥ ११ ॥
ऐसें वदोनि साध्वी गुरुसन्निध बहुत खळखळां रडली ।
मग भिक्षु म्हणे तीतें अभिनव हीं गोष्टि तुज कशी घडली ॥ १२ ॥
शोक नको करूं आतां सांगेन उदयिक काय तें तुजला ।
तो श्रीहरिचरणातें रात्रीं चित्तांत चिंतुनी निजला ॥ १३ ॥
स्वप्नांत भक्तवत्सल दर्शन दे सत्य बोलका यतिला ।
वंदन करुनि मुनि म्हणे हें झालें सत्य बोल काय तिला ॥ १४ ॥
परपुरुषसंगरहिता पतिव्रता मन्मठीं अहे विधवा ।
अंतर्वत्नी भूसुरपत्नी झाली कशी च ती विधवा ॥ १५ ॥
मग विधिजनक कनकपट बोले निष्कपट मस्करींना ही ।
गोष्ट कशी घडली वा वदतों मी यति मस्करी नाहीं ॥ १६ ॥
त्वद्वदनींचा होता तांबुल उच्छिष्ट वायसा पडला ।
झाडावयासि येतां आंगणि तो त्या सतीस सांपडला ॥ १७ ॥
तो उचलुनि घे हस्तीं भाव धरुनि शुद्ध निजवदनीं घाली ।
संमार्जनकर्म करून नमुनी स्नानास गुरुपद निघाली ॥ १८ ॥
तद्भक्षणयोगानें मुनिवर्या गर्भ राहिला पोटीं ।
मिथ्या गोष्टि नव्हे ही वनिता आहे पतिव्रता मोठी ॥ १९ ॥
त्या साध्वीच्या उदरीं भक्तशिरोमुकुटमणि अवतरेल ।
ज्याचें दर्शन घेतां संसाराब्धींत मानव तरेल ॥ २० ॥
वैराग्यभक्तिचा जो विख्यात जगांत फार पथ करील ।
विधिनंदन सनंदन ज्यापुढें सनक हार पथ करील ॥ २१ ॥
त्याच्या प्रसूतिसमयीं जननिस होणार वेदना नाहीं ।
तद्गुण किती मी वर्णूं वर्णु न थकतील वेदनाना ही ॥ २२ ॥
स्वप्न असें अवलोकुनि ऐकुनियां भगवदुक्तिला जागा ।
झाला यति सत्युक्तप्रश्नोत्तर द्यावयास मग जागा ॥ २३ ॥
तापस तापहर उषसि सांगे अजजनकसूक्त त्या सतिला ।
दोघांसि किमपि न सुचे झालें आश्चर्य परम त्या सतिला ॥ २४ ॥
चिंताजलधिनिमग्ना भग्नाभमुखी सुखिन्नमानस ती ।
मुनिपदपद्मीं लावुनि दृष्टि उभी खालिं घालि मान सती ॥ २५ ॥
अश्लाघ्य अन्य नाहीं सुजनास जनापवादसम जावी ।
यास्तव येथुनि ही हें चिंतुनि मुनि मग तिला हि समजावी ॥ २६ ॥

न ढळे होणार कधीं ढळेल परि गिरि सुमेरु कनकाचा ।
शोक नको च करू सखे चुकल कसा लेख सनकजनकाचा ॥२७॥
स्मरहरनगरींत जरी वससिल फससील व्हइल बोभाट ।
खटपट करितिल कांहीं भट चट सारे अहेत गे बाट ॥ २८ ॥
त्वद्रेहीं दोन सुमा दे विप्रा करुनि सत्पुत्रा गाई ।
तूं येथें राहुं नको कोठें तरि दिवस चार जा गाई ॥ २९ ॥
मद्भक्तपुत्र होइल तुजला वदला हरी बरी खबर ।
होतां प्रसूत तूं सुतघात करूं नको नको बरी खबर ॥ ३० ॥
मग धृतपद्मासनमुनिपद्मपद्मा नमुनि जोडिले पाणी ।
वाणी गद्गद झाली बोले प्राणास सोडिलें पाणी ॥ ३१ ॥
जें होणार घडो तें दे आज्ञा भिक्षुनायका जातें ।
देउनि धन विप्रातें ठेवुन येईल काय कानातें ॥ ३२ ॥
जाउनि धनगेहातें दों हातें सर्व धन तिनें लुटिलें ।
सुरवरनगरवियोगें सदय हृदय फार मग तिचें फुटलें ॥ ३३ ॥
त्रिभेश्वरचंडिससखसहस्रकरबिंदुमाधवाला ही ।
बाहेर नमुनि गेली तद्विरहें भाजली जशी लाही ॥ ३४ ॥
साध्वी परम सुशीला चालतसे मार्ग दिवस सारा ती ।
काशीतीर्थपदासी मन जीचें न विसरे दिसाराती ॥ ३५ ॥
तीर्थें हिंडत आली कोठें ही पावली प्रतिष्ठा न ।
गंगारोधसिं पाहे क्षेत्र बरें माउली प्रतिष्ठान ॥ ३६ ॥
कोठें सुस्थळ न मिळे फिरे घरोघरिं तिला बिऱ्हाडासी ।
जातो श्रीमंताच्या घरिं बा गरिबा जसें वऱ्हाडासी ॥ ३७ ॥
होता विप्र गरिबसा तद्गृह गेली सती पहायास ।
तो दीनदयाळु तिला दे खोली लहानशी रहायास ॥ ३८ ॥
तद्द्विज गेहीं राहे न फिरे बाहेर फार विधवा ती ।
सत्काळ सदा घाली बहुत भली करुनियां विविध वाती ॥ ३९ ॥
त्या विप्रसदनिं झाले राहुनियां चारपांच दिवस तिला ।
चिंता करित चि होती तों भरले पूर्ण मास नव सतिला ॥ ४० ॥
ती चिंता शोकभरें नेत्रांतुनि अश्रुबिंदु गळताती ।
कांहीं निद्रा कांहीं जागी तों प्रसवली नकळतां ती ॥ ४१ ॥
झाला पुत्र मग तिला रात्रीं निद्रेंत जेंवि देवकिला ।
गुरुपदसेवनसुकृतें कोणी तद्दुदित शब्द नायकिला ॥ ४२ ॥

सावध होउनि पाहे राकापतितुल्यतेज तोकास ।
शोकास बहुत व्याली पार नसे मग तिच्या हि शोकास ॥ ४३ ॥
मी दुर्भाग्य कशाला बाळा तूं जन्मलासि या उदरीं ।
रोषासि काय तें हो जरि असतां अन्न आपुल्या पदरीं ॥ ४४ ॥
चतुरानन मंदमते वदतें मी बोल हा खरा परिस ।
योग्यायोग्य तुज कसें न कळे तूं देसि बा खळा परिस ॥ ४५ ॥
ऐसा विलाप करितां उरली मागील रात चार घडी ।
शिशुसहित मग निघाली वसन न घेतां चि ते तशी उघडी ॥ ४६ ॥
जरि जन नव्हता तरि ही पाणवठा दूर गेलि सोडून ।
गंगातटनिकट उभी सुत घेउनि विनवि हस्त जोडून ॥ ४७ ॥
गंगे ओ दे सदये सांभाळीं दीन हा तुझा बाळ ।
स्वकरें च घालितें घे ओटींत तुझ्या न कांपितां नाळ ॥ ४८ ॥
ऐसा शोक करुनियां तोक धरुनि ह्रदयिं हळुहळू रडली ।
बाष्पाश्रुमुखी न सुखी होतां सत्पुत्र भूतळा पडली ॥ ४९ ॥
मी दुष्ट आइ न तुझी गंगा माता तुझी च बा तोका ।
ही रक्षील उपेक्षिल विश्वाचा जो तुला च बा तो कां ॥ ५० ॥
जळदेवता तुह्मी हो रक्षा बाळास या कुणी नाहीं ।
ऐसें वदोन ठेवी पृथुकातें वसन झांकुनी नाहीं । ५१ ॥
स्नान करुनियां साध्वी मोहभरें फिरुनि शिशुकडे मुरडे ।
कवटाळुनि घट्ट धरी घालुनियां तन्मुखांत मुख वरडे ॥ ५२ ॥
कुरवाळुनी स्वहस्तें ती शिरमुखकमल पाहते अरुण ।
जावेना टाकुनिया बाळक तों उदय पावला अरुण ॥ ५३ ॥
ऐकुनि शोक सतीचा कोकनदसुहृत्करोनि शिक्षा या ।
अरुणास पाठवि पुढें वाटे मज दीन बाळ रक्षाया ॥ ५४ ॥
टाकुनि अर्भक दुःखें वाट धरी नीट विप्र-भवनाची ।
तेथें स्नानास अला साधु भला मुमिण जात यवनाची ॥ ५५ ॥
गंगातट-निकटीं तों दैवें यवनास तोक सांपडला ।
जैसा अवचित लाभें मार्गी अधनास धनकसा पडला ॥ ५६ ॥
अवलोकितां शिशूतें त्याच्या तोषास मग नसे पार ।
गंगेनें च मज दिला झाली हे गोष्ट चांगली फार ॥ ५७ ॥
निर्जितपापतरंगे गंगे तूं देवि कोमला मातें ।
मज नाहीं पुत्र ह्मणुनि दया करुनि बाळ हा दिला मातें ॥ ५८ ॥

न ढळे होणार कधीं ढळेल परि गिरि सुमेरु कनकाचा ।
शोक नको च करूं सखे चुकल कसा लेख सनकजनकाचा ॥२७॥
स्मरहरनगरींत जरी वससिल फससील व्हइल बोभाट ।
खटपट करितिल कांहीं भट चट सारे अहेत गे व्राट ॥ २८ ॥
त्वद्रेहीं दोन सुता दे विप्रा करुनि सत्पुत्रा गाई ।
तू येथें राहुं नको कोठें तरि दिवस चार जा गाई ॥ २९ ॥
मद्भक्तपुत्र होइल तुजला वदला हरी वरी खबर ।
होतां प्रसूत तूं सुतघात करूं नको नको बरी खबर ॥ ३० ॥
मग धृतपद्मासनमुनिपद्मपद्मा नमुनि जोडिले पाणी ।
वाणी गद्गद झाली बोले प्राणास सोडिलें पाणी ॥ ३१ ॥
जें होणार घडो तें दे आज्ञा भिक्षुनायका जातें ।
देउनि धन विप्रातें ठेवुन येईल काय काजातें ॥ ३२ ॥
जाउनि धनगेहातें दो हातें सर्व धन तिनें लुटिलें ।
सुरवरनगरवियोगें सदय हृदय फार मग तिचे फुटलें ॥ ३३ ॥
विश्वेश्वरचंडिससखसहस्रकरबिंदुमाधवाला ही ।
बाहेर नमुनि गेली तद्विरहें भाजली जशी लाही ॥ ३४ ॥
साध्वी परम सुशीला चालतसे मार्गी दिवस सारा ती ।
काशीतीर्थपदासी मन जीचें न विसरे दिसाराती ॥ ३५ ॥
तीर्थें हिंडत आली कोठें ही पावली प्रतिष्ठा न ।
गंगारोधसि पाहे क्षेत्र बरें माउली प्रतिष्ठान ॥ ३६ ॥
कोठें सुस्थळ न मिळे फिरे घरोघरिं तिला बिऱ्हाडासी ।
जातां श्रीमंताच्या घरिं बा गरिबा जसें वऱ्हाडासी ॥ ३७ ॥
होता विप्र गरिबसा तद्गृह गेली सती पहायास ।
तो दीनदयाळु तिला दे खोली लहानशी रहायास ॥ ३८ ॥
तद्द्विज गेहीं राहे न फिरे बाहेर फार विधवा ती ।
सत्काळ सदा घाली बहुत भली करुनियां विविध वाती ॥ ३९ ॥
त्या विप्रसदनिं झाले राहुनियां चारपांच दिवस तिला ।
चिंता करित चि होती तों भरले पूर्ण मास नव सतिला ॥ ४० ॥
ती चिंता शोकभरें नेत्रांतुनि अश्रुबिंदु गळताती ।
कांहीं निद्रा कांहीं जागी तों प्रसवली नकळतां ती ॥ ४१ ॥
झाला पुत्र मग तिला रात्रीं निर्द्वंत जेंवि देवकिला ।
गुरुपदसेवनसुकृतें कोणी तद्धुदित शब्द नायकिला ॥ ४२ ॥

सावध होउनि पाहे राकापतितुल्यतेज तोकास ।
तोकास बहुत ल्याली पार नसे मग तिच्या हि शोकास ॥ ४३ ॥
मी दुर्भाग्य कशाला बाळा तूं जन्मलासि या उदरीं ।
सोगयासि काय तें हो जरि असतां अन्न आपुल्या पदरीं ॥ ४४ ॥
चतुरानन मंदमते वदतें मी बोल हा खरा परिस ।
योग्यायोग्य तुज कसें न कळे तूं देसि बा खळा परिस ॥ ४५ ॥
ऐसा विलाप करितां उरली मागील रात चार घडी ।
शिशुसहित मग निघाली वसन न घेतां चि ते तशी उघडी ॥ ४६ ॥
जरि जन जव्हता तरि ही पाणवठा दूर गेहि सोडून ।
गंगातटनिकट उभी सुत घेउनि विनवि हस्त जोडून ॥ ४७ ॥
गंगे ओ दे सदये सांभाळीं दीन हा तुझा बाळ ।
स्वकरें च घालितें घे ओटींत तुझ्या न कापितां नाळ ॥ ४८ ॥
ऐसा शोक करूनियां तोक धरूनि हृदयिं हळुहळू रडली ।
बाष्पाश्रुमुखी न सुखी होतां सपुत्र भूतळा पडली ॥ ४९ ॥
मी दुष्ट आइ न तुझी गंगा माता तुझी च बा तोका ।
ही रक्षील उपेक्षिल विश्वाचा जो तुला च बा तो कां ॥ ५० ॥
जळदेवता तुह्मी हो रक्षा बाळास या कुणी नाहीं ।
ऐसें वदोन ठेवी पृथुकातें वसन झांकुनी नाहीं । ५१ ॥
स्नान करूनियां साध्वी मोहभरें फिरुनि शिशुकडे मुरडे ।
कवटाळुनि घट्ट धरी घालुनियां तन्मुखांत मुख वरडे ॥ ५२ ॥
कुरवाळुनी स्वहस्तें ती शिरमुखकमल पाहते अरुण ।
जाविना टाकुनियां बाळक तों उदय पावला अरुण ॥ ५३ ॥
ऐकुनि शोक सतीचा कोकमदसुहृत्करोनि शिक्षा या ।
अरुणास पाठवि पुढें वाटे मज दीन बाळ रक्षाया ॥ ५४ ॥
टाकुनि अर्भक दुःखें वाट धरी नीट विप्र-भवनाची ।
तेथें स्नानास अला साधु भला मुमिण जात यवनाची ॥ ५५ ॥
गंगातट-निकटीं तों दैवें यवनास तोक सांपडला ।
जैसा अवचित लाभे मार्गीं अधनास धनकसा पडला ॥ ५६ ॥
अवलोकितां शिशूतें त्याच्या तोषास मग नसे पार ।
गंगेनें च मज दिला झाली हे गोष्ट चांगली फार ॥ ५७ ॥
निर्जितपापतरंगे गंगे तूं देवि कोमला मातें ।
मज नाहीं पुत्र ह्मणुनि दया करूनि बाळ हा दिला मातें ॥ ५८ ॥

माहीं केलें सेवन पूजन मी यवन जातिचा कृपण ।
माते मला सुत दिला तुझें मी वर्णु काय थोरपण ॥ ५९ ॥
स्नान करुनि गडवडिनें घे उचलुनि शावकास दों हातें ।
अति-सुप्रसन्न-मुख तो तोष-भरें यवन जाय गेहातें ॥ ६० ॥
रे लुगइ छोकरा ले कैसी हय देख अच्छि ॥ इनकूं ।
हमकू दिया खुदानें ले शक्कर बाट अच्छि बह्मनकूं ॥ ६१ ॥
ऐसें वदोनि शावक पावकसमतेज दे तिच्या पाशीं ।
विधिनें वांचविला तो पडला होता च मृत्युच्या पाशीं ॥ ६२ ॥
यवन स्त्री पतिपासुन घेउन सुकुमार बाळ तो तान्हा ।
आजन्म वांझ असतां फुटला यानास लावितां पान्हा ॥ ६३ ॥
पाहुनि सुमुहूर्त बरा त्या शिशुचें नाम ठेविलें कबिर ।
तो सद्भक्त-शिरोमणि देवासी आवडे जसा अबिर ॥ ६४ ॥
तो कबिर यवन-गेहीं असतां सोडून खेळ तोकपणीं ।
टाळ-विणा चिमणासा नाचे घेऊनि घालितो कफणी ॥ ६५ ॥
तें पाहुनि जनक ह्मणे सुत सुत घेऊन कां विणायास ।
न बससि होईल कसें कोणीं देऊं नका विणा यास ॥ ६६ ॥
ऐसा उपदेश करी नानापरि तो न सोडि भजनाला ।
जो भीइना पित्याला बघल कसा तो बहिर्मुख जनाला ॥ ६७ ॥
यवन म्हणे वनितेला कबिराला सांग तूं विणायाला ।
निजधर्म कर्म सोडुन कशास तरि पाहिजे विणा याला ॥ ६८ ॥
मग ती म्हणे मुला बा नित्य किति तुला च सांगुं विणतांना ।
तद्वचनें काम करी परि गाई रामनाम विणतांना ॥ ६९ ॥
तो सद्गुण निर्गुणगुण गुणगुणगुण करि गुणांत गुण चाळी ।
लावुनि समाधि निश्चल घडिघडि बैसे चि जेंवि पांचाळी ॥ ७० ॥
यापरि दश संवत्सर पैठणि राहुनि करी भजन कबिर ।
यापटुन पाठ दे जागा यातें कनकनाभ-जन कबिर ॥ ७१ ॥
तों एक फकिर फीरत फिरत अला साधु यवन-गेहातें ।
घालुनि भोजन त्याचें पद-संवाहन करी कबिर हातें ॥ ७२ ॥
तो अवलिया कबीरा सांगे सत्क्षेत्र काशिच्या माता ।
देऊन कान ऐके झाली बहु रात निज म्हणे माता ॥ ७३ ॥
ऐकुनि मनिं कबिर म्हणे कैसें तरि करुनि काशिला जावें ।
स्पष्ट वदावें आतां जननीतें न जनकासि लाजावें ॥ ७४ ॥

तों कबिर कविवर वदे यात्रेविषयीं अईस जनकासी ।
कां शीण तुम्हां वाटे कां शीस हि वेंचितां चि कनकासी ॥ ७५ ॥
इतर पुऱ्यांपरिस अधिक शशि-शेखर-नगरिची जनक कोटी ।
मोठीं सुकृतें ज्यांचीं ते तेथें वेंचिती कनक कोटी ॥ ७६ ॥
मग तन्माता हि म्हणे करितां तरि करुनि काय घन-जतन ।
सत्क्षेत्रीं तें वेचूं तुमचें तरि काय हो इथें वतन ॥ ७७ ॥
काशीवास घडल हो तो उत्तम बहुत देश कां नाहीं ।
ऐकावा निजहितकर बाळाचा सदुपदेश कानांहीं ॥ ७८ ॥
ऐसें वदतां च सदां मग निश्चय करून तो यवन आया ।
विश्वेश्वर-नगरीप्रति गेला घेऊन सूनु-धन-जाया ॥ ७९ ॥
शशधर-धर-नगर भगर विद्येचें सुखद मानवाला जें ।
तें पाहुन नाचतसे परंतु न कबीर तो नवा लाजे ॥ ८० ॥
तेथें रामानद-प्रभुचें यश बहुत ऐकिलें कानें ।
मग तो च गुरु करावा धरिलें चित्तांत यवन लेंकानें ॥ ८१ ॥
नित्य त्रिकाळ जाती यतिच्या जन नगर-वासि नमनास ।
दाराबाहेर बसे कबीर तो कोणि आणि न मनास ॥ ८२ ॥
जाय नदीस युग घडी उरतां मार्गीं घडी सदां रात ॥ ८३* ॥
भिक्षु पुसे त्यास तदां तू कोठिल कोण काय संदेश ।
कबिर म्हणे मी आहें दीन यवन मज करा हि उपदेश ॥ ८४ ॥
हें ऐकुनि यति बोले करिंना उपदेश मी च यवनाला ।
तूं ऊठ बसुं नको रे जा सत्वर येथुनी स्वभवनाला ॥ ८५ ॥
ऐसें निष्ठुर वदतां दृढ निश्चय करुनि आपुल्या मतिचा ।
मग जाउनि कबिर बसे गंगा-तिरिं धरुनि घाट त्या यतिचा ॥ ८६ ॥
स्वर्गंगातटनिकटीं लपुनि बसे तो चि विष्णुचा दास ।
स्नाना जातां येतां नमन करी नित्य भिक्षु-पादास ॥ ८७ ॥
एके दिवशीं निजला होता तो घाट-पायरी-निकट ।
पडला अवचित यतिचा कबिरावरि पाद पादुकांसकट ॥ ८८ ॥
त्या समयिं कोण येथें हा निजला धरुनि मार्ग जायाचा ।
उठ राम राम म्हण [बा] काय समय हा च तरि निजायाचा ॥ ८९ ॥
ऐसें यतिराज सहज वदला तो समजतां न यवनातें ।
तो कबिर भक्त-भूपति मानी उपदेश तो निजमनातें ॥ ९० ॥

* या आर्येचें दुसरें अर्धे मिळालें नाहीं.

झाला उपदेश म्हणे कबिर धरि यतींद्र-पाद दों हातें ।
हें थोरास उचित दे सुरनग फल घालितां न दोहातें ॥ ९१ ॥
स्नान करुनि गंगेचें गेला तो कबिर भक्त भवनातें ।
मग सद्गुरु-प्रसादें नित्य करितसे विचित्र कवनातें ॥ ९२ ॥
विद्वज्जन मान्य असे कबिररचितकवन दोहरा सरस ।
श्रीहरि टाकुनि धांवे यच्छ्रवणप्राप्तमोहरा सरस ॥ ९३ ॥
शिव हि म्हणे गिरिजे तूं कबिराचा एक दोहरा परिस ।
जो ऐकिल्या परम सुख मज देतो कोटि मोहरांपरिस ॥ ९४ ॥
काय नवल ऐकुनियां जग सुख पावेल हें कवि रसा कीं ।
तो डोलवील मस्तक ज्याचा ऐकूनियां कबिर साकी ॥ ९५ ॥
कित्येक लोक ऐकुन कबिराचें रसिक दोहरा-कवन ।
सोडुन धन-सुत सेविति लागुनियां विगतमोह राकवन ॥ ९६ ॥
ज्याच्या मार्गी हि फिरे हरि मस्तकिं धरुनि निज करें चि फणी ।
तद्गुण किति मी वर्णूं दशशतमुख वर्णितां थकेल फणी ॥ ९७ ॥
साधुमुखें श्रवण करुनि रचिलें ह्या कबिर-गूढ-जननातें ।
जरि विदित असें नसतां लाविति भलतें चि मूढ जन नातें ॥ ९८ ॥
निज-भक्त-चरित्र सदा ऐके देवोनि नित्य हरि कान ।
यास्तव साधु-जनाहीं गावें हें चरित सत्य हरिखोन ॥ ९९ ॥
नाहीं अक्षररचना उत्तम नाहीं तयांत यमक बरीं ।
साधुचरित मानुनि गा न धरुनि नेइल कदापि यम कबरीं ॥१००॥
भवजलधिमग्न दुर्बल संतप्त त्रिविध तीव्र तापानें ।
हा नारायणविप्र प्रभुजी तारा निज प्रतापानें ॥ १०१ ॥

इति कबिर-जन्म-चरित्र समाप्त.

---

## पवाडा दामाजीपंताचा.

बादशहानें दामाजीपंत केले कारभारी ।
मंगळवेढ्याचें काम सोंपविलें हात ठेविला शिरीं ॥

---

* ज्या दुष्काळात दामाजीपंतानें सरकारी धान्य गरीब लोकांकडून लुटविलें तो इ० सन १४६० म्हणजे शके १३८२ साली पडला होता. त्या वेळीं बेदर येथें हुमायून नांवाचा आपणास ब्राह्मणीवंशीय म्हणविणारा यवन राजा होता तो इसवी सन १४५७ पासून इसवी सन १४६१ पर्यंत गादीवर होता. ह्या वंशाचे एकंदर १८ राजे होते. इसवी सन १३४७ पासून १५२६ पर्यंत ह्यांनीं राज्य केलें. प्रथमत: ह्या वंशाची राजधानी कलबुर्ग्यास होती. पुढें इसवी सन १४२६ त बेदर राजधानी झाली.

रयतेस कौल देऊन त्यानें केली खिस्तदारी ।
आला पिकाचा लोंढा पर्जन्य वर्षला भारी ॥
तिसरा वांटा कुणब्याचे पदरीं घातला मोजून ।
लक्ष खंडी गल्ला सरकारी ठेविला भरून ॥ १ ॥
मंगळवेढ्याचे कौल घेतले दामाजीपंतान ।
बेदरचा बादशाहा याचे सदर दिवाण ॥ ध्रु० ॥
बहुत दिवसा उपरांत काल महामाई पडली ।
कडाडली धारण विकली होना पायली ॥
आसपासच्या गांवांनीं हैबत सोडीली ।
हकीकत येऊन दामाजीपंतास सांगितली ॥
लहान थोर गरिबाला लुटिवलें उडीवलें धान्य ।
लक्ष खंडी गल्ला सरकारी दिला उधळून ॥ २ ॥ मंगळ० ॥
दामाजीपंताचे तुम्ही हो ऐका प्रधान ।
केशवराव कानडा जातीचा होता ब्राह्मण ।
बादशहाला पाठविली नालस्ती लिहून ।
तीन कोड वीस लाख होन घ्या पतापून ।
केले रवाना स्वार मसाला दिले पांच होम ।
दस्त करा दामाजीपंत हा जाईल निघून ॥ ३ ॥ मंगळ० ॥
ढालाइतांनीं दस्त करुनी दामाजीपंत ।
एक रात्र मुकाम केला मंगळवेढ्यात ।
चालले घेऊन वाटेन् पायीं चालवीत ।
म्हणे दामाजीपंत सावकार आहे पंढरींत ।
दूतांला सांगितलें बाहेर बसा तुम्ही स्वस्थ ।
रुक्मिणीचा कांत विठ्ठला येतो भेटून ॥ ४ ॥ मंगळ० ॥
गेले राउळांत देव धरला कवटाळून ।
चरणीं ठेविला माथा दुःख सांगितलें गीरवून ।
चित्त भावार्थानें गाऱ्हाणें घ्यावें परिसून ।
लज्जाराखा आतां तुजवांचुन मजला कोण ।
एवढी कीर्त्ति केली तुझिया नांवा कारण ।
हुंदक दाटला कंठीं भरले नेत्र उदकानें ॥ ५ ॥ मंगळ० ॥
हुंडीच्या कारणें विठोबा झाले तयार ।
गेले बेदरास तिनदां केलासे जोहार ।

सदर दिवाण पुसती तूं कोठील महार ।
पंढरीचा मिरासी तेथील मी वतनदार ।
तीन क्रोड वीस लाख होन घ्या पंतापून ।
बांधले शिरपाव आला खबर घेऊन ॥ ६ ॥ मंगळ० ॥
दूत बोलती दामाजीपंत कां बसलां निचिंत ।
छद्द जाईल निघून बरी नाहीं राहिली अवस्था ।
गेले बेदरास देखिला बादशहानीं येतां ।
भरून पावले रुपये विठू महार आला होता ।
धाडले शिरपाव मंगळवेढ्या कारण ।
भक्तासाठीं कीटल केलें पांडुरंगानें ॥ ७ ॥ मंगळ० ॥
बादशाही सदर दिवाण पंढरीस आले भेटीला ।
गेले राउळांत नमस्कार केला देवाला ।
पाषाणाची मूर्ति दिसते दामाजीपंताला ।
अनामीचें रूप दाविलें होतें बादशहाला ।
दौतलेखणी पुढें ठेविली हात जोडून ।
दामाजीपंतानें वाहिली पायांची आण ॥ ८ ॥ मंगळ० ॥

## पवाडा शिवनेरी किल्ल्यावर.

श्रीमंत धनी सवाई । त्यासी प्रसन्न शिवाबाई । त्यानें बहीण मानिली देवी ।
मोत्यें पोंवळें अलंकार लेवी । चाल । चौघडा झडे नित्य मोहोर ।
होतो वाद्यांचा गजर । भरगच्ची पातळ थोर । पुजारी चढवी ।
सभामंडपाचे ठायीं । कारंजे मध्यें रोषनाई ।
टाक्याशी गणती नाहीं । त्यांत मोती टाक सवाई ।
त्याचें पाणी प्यालें आई । थंडगार झाली देवी ।
त्यां पलीकडे गंगायमुना । दोही टाक्यां मध्यें रमणा ।
कमानी टांके दाणा । अंत त्याचा नाहीं ।
सारा किल्ला फिरून पाहीं । सदरची आणीक रोषनाई ।
एकाहून एक शिपाई । पगडीला समले लावी ।
साती दरवाज्यांवर साती । चौकी पहारे ते राती ।
त्याची अगदींच झाली माती ।
गेले सरकार ॥ ३ ॥ बादशाही तखत जुन्नर ।
चौ देशांमध्यें महा शूर । पांडवी प्रतापी वीर ।

सदर दिवाण पुसती तूं कोठील महार ।
पंढरीचा मिरासी तेथील मी वतनदार ।
तीन क्रोड वीस लाख होन घ्या पंतापून ।
बांधले शिरपाव आला खबर घेऊन ॥ ६ ॥ मंगळ०
दूत बोलती दामाजीपंत कां बसलां निचित ।
शुद्ध जाईल निघून बरी नाहीं राहिली अवस्था ।
गेले बेदरास देखिला बादशहानीं येतां ।
भरून पावले रुपये विठू महार आला होता ।
धाडले शिरपाव मगळवेढ्या कारण ।
भक्तासाठीं कौटल केलें पांडुरंगानें ॥ ७ ॥ मंगळ० ।
बादशाही सदर दिवाण पंढरीस आले भेटीला ।
गेले राउळांत नमस्कार केला देवाला ।
पाषाणाची मूर्ति दिसते दामाजीपंताला ।
अनाथीचें रूप दाविलें होतें बादशहाला ।
दौलतलेखणी पुढें ठेविली हात जोडून ।
दामाजीपंतानें वाहिली पायांची आण ॥ ८ ॥ मंगळ०

---

## पवाडा शिवनेरी किल्ल्यावर.

श्रीमंत धनी सवाई । त्यासी प्रसन्न शिवाबाई । त्यानें बहीण मानिली देवी ।
मोत्यें पोंवळें अलंकार लेवी । चाल । चौघडा झडे नित्य मोहोर ।
होतो वाद्यांचा गजर । भरगच्ची पातळ थोर । पुनारी चढवी ।
सभामंडपाचे ठायीं । कारंजे मध्यें रोषनाई ।
टाक्याशी गणती नाहीं । त्यांत मोतीं टाक सवाई ।
त्याचें पाणी प्यालें बाई । थंडगार झाली देवी ।
त्यां पलीकडे गंगायमुना । दोही टाक्यां मध्यें रमणा ।
कमानी टांके दराणा । अंत त्याचा नाहीं ।
सारा किल्ला फिरून पाहीं । सदरची आणीक रोषनाई ।
एकाहून एक शिपाई । पगडीला समले लावी ।
साती दरवाज्यांवर साती । चौकी पहारे ते राती ।
त्याची अगदींच झाली माती ।
गेले सरकार ॥ १ ॥ बादशाही तखत जुन्नर ।
ची देशांमध्यें महा शूर । पांडवी प्रतापी वीर ।

त्यांनीं पहाड कोरिले सारे । गड तखत केला शिवनेर ।
शिवा बाइचें आव घर । मोरचंग उडती वर ।
नंदादीप म्होरे । बादशाही तखत जुन्नर ॥
ची देशामध्यें महशूर ॥ ध्रुवपद. ॥
केल्या महाराजांनीं कीर्ती । पंच लिंग शहरावरती ।
कारंजीं समोर उडती । स्नानसंध्या ब्राह्मण करती ।
ते अनुष्ठानाला बसती । महा विघ्नें आलीं वरती ।
शिव हर हर शंकर म्हणती । वेद पढती ।
आदिमाया ही आदि शक्ती । तुळजापुरी देवी म्हणती ।
तिथून कोसभर वरती । तिची पाळण्यामध्यें वस्ती ।
तें महा विघ्नांचें घर । तेथें भजती ल्हान थोर ।
नित्य होतो जयजयकार ।
भक्त मानवती । शिवरात्र निरहार धरती ।
पाताळेश्वरासी जाती । बेल चंदन मोहोर वहाती ।
सांबाचें पूजन करती । आडकेश्वर पर्वतावरती ।
कुंडांत गुप्त भागीरथी । उत्तरेश्वरीं ब्राह्मण जाती ।
सोमवारीं ॥ २ ॥ बादशाही•
भाद्रपद चतुर्थीला । येते यात्रा गणपतीला ।
नाचे रंग हमामा भरला । रव लागली पहाडाला ।
वाट नाहीं मिळत जायाला ।
मनुष्यासी मनुष्य दाट । निसरून पडती फटफट ।
दर्शनास सभामंडप म्होरे उतरीला । राजा पांडवांनीं घडला ।
नकशीचे खांब त्याला । पुढें जागा बैठकीला ।
काय सांगू आणीक बढाई । फुलझाडें ठायीं ठायीं ।
नौबद वाजे शाई शाई ।
माहीत अवघ्यांला । लेण्यांत चतुर्भुज बसला ।
लेण्याचें नांव पावला । त्यांच्या पावत आहे नवसाला ।
त्यांनीं घाट बांधित नेला ।
दोहीं भोंवतीं लावली राई । आंबे मधि एक बागशाई ।
बागाची आणिक रोपनाई । मारती लहर बादशाही ॥ ३ ॥
बादशाही तख्त• ॥
जुमामशिदींत लोक बोलती । जुन्या बादशहाची कीर्ति ।

दोहीं बाजूंला बैठका कुराणिक बसती ।
अमन शाहरची वस्ती । पांची वकता निमाज होती ।
बावन पुऱ्यांची गणती । बावन चावडी वरती ।
चारी रस्ते चहुंकुन येती । कारंजीं फवारे उडती ।
जन लोक तमाशा पहाती । गणुयशवंता गुण गाती ।
खंडू भोनू कैक रती । गंगाराम लुटती बहार ।
पेंठ बुधवार ॥ ४ ॥ बादशाही तखत जुन्नर

समाप्त.

---

## पवाडा बापूगोखल्याचा.

बापू गोखले बरोबर होते माहुलीशी ।
बोलावूं पाठविलें लष्कर विंचूरकराशी ।
माधराव श्यामराव बाबारास्ते विश्वासी ।
आबा पुरंदरे नारो विष्णु होते चाकरीसी ।
मलकीन साहेब लाट आला डांग चौकीसी ।
त्याचे बरोबर मोरु दीक्षित होते मसलतीसी ।
लढूं नका देऊं लाट बोलला बाबासाहेबासीं ॥ १ ॥
गंगाधरशास्त्रीच्या बरून राज्याचा नाश झाला ।
दक्षिणच्या पेशव्यावि घाला कधि नव्हता आला ॥ ध्रु० ॥
लाट साहेब गेल्यावर मग यांनीं फौजा धरिल्या ।
लिपर कर्मी लष्कर बोलावून मसलती ठरल्या ।
पुण्यास येऊन दोन पलटणा गारपिरावर ठरल्या ।
युक्तियुक्तिनें उठवून लावल्या खडकीवर पडल्या ।
अश्विन वद्य एकादशीच्या तलवारा झडल्या ।
शके सतराशें एकुणचाळीस ईश्वरनामी भरल्या ।
तेराव्या दीसींचा ऐकून घ्यावा दाखला ॥ गंगाधर० ॥ २ ॥
तिसऱ्या पाहऱ्या पासून सारी रात्र कत्तल झाली ।
धरणी माय ठिकाण देइना मुरद्यांची काहीली ।
गारेसारखें पाणी पडलें गोळ्यांचे खालीं ।
आरब गोसावी लढणीं पडले जखमांचे पायीं ।
झमाझम तलवारा पूर रक्ताची नदी भरली ।
बाबासाहेब निघून गेले ऐका हो माहुली ।

लढत पुण्यधर बापू गोखले प्रहर दिवस आला ॥ गंगाधर० ॥ ३ ॥
कर्मरेषा कोणासि टळेना ऐका गुणग्राही ।
पति प्रवासामधिं कशी गत झाली त्या ठायीं ।
बरी कोणाची झाली कोणाची वाईट सवाई ।
मनोमनसाक्षी पंढरीनाथ ज्याची त्यास ग्वाही ।
सगनभाऊ म्हणे पुढले भविष्य मज ठाऊक नाहीं ।
कोठील लढाई कोठील फितुर कोण आपले पाहीं ।
निबल गुणिजन म्हणे कलंक चंद्रासी लागला ॥ गंगाधर० ॥ ४* ॥

---

## खंडूअर्जुनाकृत अश्वमेधांतील दुंदुभीवधावर पवाडा.

कौरव पांडव लढले संग्राम झाला दारूण ।
कौरव निर्दाळिले राज्य जिंकिलें पांडवानें ।
घडली गोत्रहत्या अश्वमेध आरंभला त्यानें ।
पृथ्वीवरती वारू सोडला घोडा श्यामकर्ण ।
दळ मिळालें अपार त्यामध्यें मुख्य अर्जुन ।
वृषकेतु मेघवर्ण चवथा बभ्रूवाहन ।
मध्यें मुख्य चंद्रहंस छपन्न कोटी यादव सैन्य ।
हंसध्वज नीलध्वज ताम्रध्वज बलवान ।
पुढें चालतो वारू त्याच्या पाठीशीं चाले सैन्य ।
दरे डोंगरें गिरी कपाटें जातो वलांडून ।
सप्त द्वीपामधें घोडा फिरे असा तो जाण ।
ज्या ठायीं महाक्षत्रिय त्या ठायीं घोडा जातो चालून ।
कैक लढती कैक येती हात बांधून ।
कैक द्रव्य अपार देती रथ गाड्या भरून ।
आला समुद्रतीरासी वारू नवखंड फिरून ।
आले ध्रुवमंडळीं गेले घोडा घेऊन ।
भोजकोट नगरीस ठेविला दुंदुभीप नेऊन ।
पांडवसेना वेडी झाली घोड्या वांचून ।
पुढें चालतां पहा देखिला कडा समुद्राचा ।
सर्व दिशा अंधकार न कळे रिगाव जायाचा ॥ १ ॥

---

* "थोर पुरुषांचे पवाडे" या नांवाच्या पुस्तकांत छापिलेल्या बापू गोखल्याच्या पवाड्यांत हीं चार कडवीं नाहींत म्हणून हीं एथें छापिलीं आहेत.

भोजकोट नगरीचा दुंदुभी वीर प्रताप त्याचा ।
गजासुराचा पुत्र त्याला वर होता शंभूचा ॥ ध्रु० ॥
गुप्त झाला घोडा न कळे कोणीकडे गेला ।
आतां वारूची शुद्ध बोलती पुसावी कोणाला ।
आले नारदमुनी त्यांनीं वृत्तांत सांगितला ।
भोजकोट नगरास घोडा दुंदुभीनें नेला ।
काळू नदीचें तास चवदा गांवें रुंदीला ।
उतरून कैसें जावें चिंता पडली अवघ्यांला ।
रोमावळ पिंजारून मारुती नदीतटीं बसला ।
एक एक रोमावळ योजनें बारा गणतीला ।
बिलगलें सैन्य मारुती तेथून उडाला ।
काळू नदीचे पैल तीरास जाऊन उतरला ।
दुदुभीची चौकी होती त्या वाटेला ।
तीन हजार मुख्य होते त्या बेटाला ।
कितीक लांबी रुंदी सांगा भोजकोट नगराला ।
सव्वाशें योजनें राव नगरी विस्ताराला ।
साडे सातशें वेशी सातशें खिडक्या त्या शहराला
दोन हजार दोनशें बुरूज पहा त्या किल्ल्याला ।
बारा योजनें लांबी रुंदी फिरे [ पुत्र ] श्वसनाचा
सोळा योजनें उंच महाल एकवीस ताळांचा ॥ १ ॥
भोजकोट नगरीचा० ॥
चवदाशें बाग राजाच्या नगराच्या भोंवतें ।
एक लक्ष बावन हजार ताकीददार त्यांजवरते ।
दुंदुभीला तीन हजार भुजा शिरें तीन शतें ।
तीनशें प्रधान राया एकाचढी एक होते ।
पांचशें मसुदे चतुर शहाणे बुद्धिवंत ।
तेराशें सरदार चौदा लाख नाईक जमात ।
अठरा अठरा कोटी दळ एकेका संगातें ।
साठ कोटी अंबाऱ्यांवरती चौसष्ट कोटी रथ ।
सवाशें योजनें उंच ध्वजस्तंभ गेला गगनात ।
अष्ट भैरव रक्षक त्या ध्वजस्तंभावरते ।
सोळा हजार वारू चालवीति रथ दुंदुभीचा ।

तीन लक्ष वर्णिती व्रती प्रताप रायाचा ॥ ३ ॥
भोजकोट नगरीचा वीर दुदुभी प्रताप त्याचा ॥ ध्रु० ॥
आली पांडवसेना देखलें भोजकोट नगर ।
हाका देती वीर लागला वाद्यांचा गजर ।
अठरा लाख सनया वाजती सोळा लाख सूर ।
चौदाशें काहला तीनशें भेरींचा गजर ।
दहा लक्ष रण शूर अठरा लाख मिरवत तोडर ।
तीस लक्ष दळ उठलें प्रधान गिरिजाशंकर ।
आला रणभूमिसी उभा राहिला समोर ।
पांडव वीर कोपले दारूण सोडती शर ।
उडविलें शीर मारिला प्रधान गिरिजाशंकर ।
कळलें दुंदुभीला क्रोधें खवळला फार ।
युद्ध करी तुंबळ संग्राम ऐका तयाचा ।
रणीं पडले घायाळ वाहिला पूर अशुद्धाचा ॥ ४ ॥
भोज कोट ० ॥
दुंदुभी अर्जुन रणीं ठाकले वीर क्षत्रिय भारी ।
शरजाळें सोडती उडती बाणाच्या लहरी ।
दुंदुभीनें अर्जुनाचा रथ उडवीला अंबरीं ।
रथ घोडे मारुती अर्जुना सहित श्रीहरी ।
सप्त योजनें नेऊन टाकिले समुद्राचे उदरीं ।
पडले माशाचे मुखीं त्यानें गिळिले वरचे वरी ।
कितीक लांबी रुंदी सांगू माशाचे शरीरीं ।
कितीक दिवस होते आत कितीक दिवशीं आले बाहेरी ।
हरि अर्जुन झाले ब्राह्मण गेले दुंदुभीच्या मंदिरीं ।
करीं चक्राचें स्नान राजा यश होईल भारी ।
आणती सवालक्ष नारी पाणी घंगाळांतरीं ।
हरीनें चक्र टाकिलें घंगाळा भीतरीं ।
हरि म्हणे एकदां च पाणी घाला आंगावरी ।
पाणी घालतां शिरें भुजा गळालीं सारीं ।
मारिला दुंदुभी मग लुटली अवघी नगरी ।
दोन पुत्र स्थापिले तेव्हा त्या राज्यावरी ।
अश्वमेधकथा कुठवर सांगावी सारी ।

खंडू अर्जुना करीं दाखला पाहून पुराणाचा ।
धोंडी कुशाबा म्हणे पोऱ्या हात धर नागेशाचा ।
भोनकोट न० ॥ ५ ॥*

## कोल्हापूर वर्णन.

हे नरा, करिं तूं त्वरा, जाय करविरा, अती सौख्य तुला, देइल विष्णूची दारा ॥ ध्रुवपद ॥ बहु श्रेष्ठ असे करवीर, पंचनदीतीर, चित्त करिं स्थीर, तया स्थळीं राहीं ॥ या जगदंबेचे पाय सदा मनिं ध्याईं ॥ रंकाळतळें, पद्माळें, वरुण पेठाळें, आदि पाहा स्थान ॥ स्वर्गपदाचे देव देति बहु मान ॥ त्र्यंयबुली, माय हि भली, सदय दासासी ॥ दर्शन घेता आशा भवातें नाहीं ॥ गोमती, धरुनि सन्मती, अर्धी कर दान ॥ दे विष्णुपदीं पिंड हो पितृउद्धरण ॥ हे देव किति मीं गणु तीर्थें किति म्हणुं शेष पां थकला ॥ तिथें मानव तनुच्या कांहिं चालेनात अकला ॥ असे शहर, नित्य बाजार, बहुत गुलजार, असे कीं गुजरी ॥ छत्रपतीची पुण्यशील पाहा स्वारी ॥ ओंकार राम विठ्ठल विष्णुमंदिरा ॥ नवदुर्गा कात्यायनि पाहा एक वीरा ॥ हे नरा० ॥ १ ॥ करिं खेट, दाविना पाठ, रणांगणीं भिडती ॥ मग ब्रह्मादिक हे देव पाठिशीं दडती ॥ हरिपदा भीति गदा मदा असूर खळ टाळी ॥ ही साधुजनाला मुक्त करुनि कुरवाळी ॥ पानपात्र मातुलिंग करि शिरीं लिंग व्याल अशी ती ॥ ध्यान मनिं धर हें बा मग काय असे तो कळे यमाचा केवा ॥ किती पाप जोडलें शाप नाहिं अनुताप स्तोत्र उच्चारितें इंद्रपदाहुन श्रेष्ठ होती अधिकारी॥ कालिका मयूरवाहका मगळमूर्ति त्या तस्करता ज्ञानकळा दे पुरती ॥पाहा देव सभोंवते बरे हृदयीं धर स्मरणी । हे मान कृतकी काय विधीची करणी । जळनळ उडती, फवारे वरि चौघडे वाजाति, घटा ती सुचवी आरती, पाहा लाभ तो मोठा किती, पूजन किती एक भजन करती अन्नदान गाति बहु तान देति धन कुअमरां । आज्ञापालक देत असे सुख दारा ॥ हे० ॥ २ ॥ कटितटीं, नेसे पीतपटी, हेमवरपटी, करीं मनगटीं, केशरि उटी, तिलक हनुवटी, भाळीं मळवटी, बहुत सुकुमार हि भजक जनाचा दुस्तर भव हा तारी शंखतीर्थ करि पुनीत करि दुरितनाश करि बापा ॥ मग वैकुंठांचा मार्ग तया पा सोपा ॥ सरमाळ पाहतां, काळ पळे तुटे नाळ, लेखन भाळ शुद्ध ते उरती ॥ मग जन्ममरणें हीं सहज च मागें सरती ॥ या स्थळा नसे उपमा, अशी ही रमा, नसे या धरणी । येतां शरण श्री चरणी, पाडितो करणी, द्विज राम करी निष्काम लावि भजनासी, तुझे पाय पाहिल्या घडे त्रिशत हे काशी,

* कृष्णा बिन तुकाराम पाचंगे गोंधळी राहणार नारायणगांव ता० जुन्नर जिल्हा पुणें यानें हा व याच्या पूर्वी छापलेले पवाडे आम्हांस दिले.

दृढ नाम जया अंतरीं, आणिक वैखरी नाम उच्चारी, तो धन्य धन्य या आला असे ससारा ॥ हे नरा० ॥ ३ ॥

समाप्त.

## अमृतरायकृत—कटावें* १.

आहा रे मूर्खा जन्मोनी काय केलें रे ॥ ध्रु० ॥ पैसा पाहुनि म्हणती या जी, रौप्य पाट मांडिला बसा जी, वाजीवर गोमाशी ताजी, तैसे गुलाम करिती हांजी, अर्जी विनविति फर्जी, जैसा गुर्जर श्वानापरी धांवती, या या म्हणती, अडणीवरती सुवर्णताटीं रत्नखचित वाट्या मांडुनि, पाट रुप्याचे, सोले ओले, मिरें धणे चमचमित फोडणी हिंगाची, ती भुकटी घालुनि तीक्ष्ण आमटी, दाटी जाहली पदार्थांची, पात्रीं शाखा चोखा, आंबे साखर लिंबें, दाळिंबाचे दाणे काढुनि, नीतळ शीतळ, पन्हें फुटाचें, तिखटमिठाचें, थालिपिठाचें, मिष्ट बहू तें पिष्ट, बदामी वाटुनि डाळी, भजीं निराळीं, घोसदोडके, वांगीं सगळीं, चवळी विवळी, आणि पडवळीं, मेथी पोथी, केळें, राय आंवळे, भात शुभ्र तो जिरेसाळिचा, खाजी करंजी, ध्याजी दाजी, आग्रह करिती, साखरमांडा, उंडा भरपूर्णाचा धोंडा, तोंडा पुरता घोळिति गोंडा ॥ आहा रे मूर्खा जन्मोनी का० ॥ १ ॥

### कटाव २.

जलदश्याम पीतांबरधर करीं शंख चक्र, शिरीं मुकुट खचित, श्रीवत्स हृदयीं, गळां वैजयंती, कौस्तुभविराजित नलिनकंठ, भुज भ्रुकुटि घ्राण हनु, बाल बाल तनु, कान कुंडलमंडित, शुभ्र श्रीखंडतिलक लघु, अलक कुटिल मृदु, मंद हसित, अति ललित अधर, हे मधुर बचन, शशिवदन रदनछम, रदनतनक, हरि मदनजनक, शिव सनकवरद, कटिं कनक बसन, करिं कटक प्रमुख सब अलकार सह, निरहंकार ओंकार, मुरत साकार सुरत ॥ १ ॥

### कटाव ३.

येणें कोठुन जाणें कोठें, मार्ग दीर्घ तो क्रमुनि भ्रमुनियां, सेवन करितां नाना योनी, माता माझी, मी मातेचा पिता होउनी, आकांत करिती, किती मांझी प्रिया पुत्र मग क्रिया आचरती, श्रद्धायुक्तें श्राद्धें करिती ॥ १ ॥

### कटाव ४.

ऋषि राजे कोटिकोटि बहु भोजन करिती, सुवर्णताटीं अन्न मागतां, अमृतासाठीं न देऊं म्हणती, अन्न पालटी सर्वत्रांला वांटी ॥ १ ॥

---

* हे कटाव रा० रा० विष्णु धोंडदेव भागवत वीरमाडगर यांनीं कोल्हापूर एथून पाठविले.

## कटाव ५.

चक्रपाणि करिं फणी घेउनी, फणीश्वरासम वेणी घाली, भांग दुभांगी, नाग मागतें चंद्रकोर, त्या समोर केवडा, जडावाच्या हिरे जडित कडीमधें सुरती मोतीं, नसती वांकडी, दिव्य राखडी, तीं हि फांकडी, सरळ आंकडी, सनग सनग मग, वरतीं फुलें सेवती, मध्यें मुक्ताग्रथित मूद तीं, जाणों करती, मुख थारा प्रति थरा सह या त्रिदिविजवरा, घोंस बाळिका, तोषदायका, कामीमानसा, रगडी बुगडी, छाप दरिकव, तापहरण ते, काप शोभती, सरळनासिकेमधें नथ हालती, वरी चौकडी, खालिं झिरमुळी, मधीं हलकडी, तींच लालडी, घींत इदुची जोत पोत ते, ग्रथित सद्गुणी, आणि तन्मणी, वज्रपाणि त्र-ज्रटीक आणि खाशा, गुजरायीच्या ठुशा, क्षुद्र घटा, कठा मध्यें मोत्यांचा बहु मोठा कंठा ॥ १ ॥

---

## कटाव ६.–सुदामचरित्र.

श्रीकृष्णें सुदामजीला सोन्याची नगरी दिधली स्वानुभूतिहृदयामधिली ॥ ध्रु०॥ ब्राह्मण ब्रह्मनिष्ठ बहु मोठा, त्याचा प्रपंच हीन करटा, मुले भुकेनें करिती तटा, घरात वाजे नकारघंटा, स्त्री बरवंटा, धैर्याचा वरवटा, मनात परवटानें पोट बळें वेंटाळुनि, बाहु कंवटाळुनि, पुरुषवचनें ते कधिं कटाळेना, चित्त विटाळ नेणे, नसतां मूठपसाभर दाणे, पतिव्रता तीव्रता न जाणे, कातातें एकांतीं नेउनि म्लान वदन मऊ बोल बोलली केविलवाणें, जी जी स्वामी द्वारकेंत श्रीकृष्ण विष्णु, गोपाळ तूमचा बाळमित्र, चिरकाळ नांदत आहे, ऐसे ऐकिलें कानें, त्याचें तुमचें दर्शन होतां, अपार धन देईल सन्मानें, समर्थ श्रीहरि सखा सुखानें, तुह्मासि अर्पिल सोनें नाणें, प्रेमें आलिंगिल जिवाचें, तुम्हीं कुटुंबी सदा हिनवाणे, कापतसा दारिद्र्याहितानें, हरी भेटतो आर्जवानें, उचित दिसे जीं तेथें जाणें, यापरि ब्राह्मण दुबळा, त्याची अबला, लक्षुनि बुबुळानें, त्या बळानुजप्रभुयदुपतीभेटीसाठीं मधुर मृदु बहु प्रकार प्रियकर वाक्यें वदली ॥ श्रीकृष्णें० ॥ १ ॥

सुदामा बोले साधु स्वभावें, काते द्वारकेसि जरि जावें, हरिच्या भेटिस काय न्यावें, लाजिरवाणें काय म्हणावें, निष्कामत्वें त्यासि पहावें, परम लाभ तो पुण्यश्लोका विलोकावे, तें ऐकुनिया, क्षमाशील क्षुत्क्षामा रामा, श्यामांगी चौठायीं यासुनि, चारि मुठी पोह्यांचें चूर्ण जीर्ण चैलखंड चिंध्या जोडुनिया, चौपट पदरिंस लहानशी गाठुडि बांधुनियां, ते चारुमतीनें, चतुर गतीनें, चित्त हरण चैतन्यवृत्तीनें, अहं ब्रह्म सिद्धांत रितीनें, पती पुढें ठेविली तीनें, गळति कण म्हणउनि तेणे कक्षापुटीं रक्षियली ॥ २ ॥

श्रीकृष्णें० ॥ झाल्या प्रातःकाळीं स्नानसंध्योपासन, दर्भासन तें गुंडाळुनियां, कुशाग्र तो द्विज, कुशां एक कुशस्थळीच्या शुभ प्रपाणीं, पाणि पियासि पाणी जोडुनि,

अंजलिपात्रमात्र सहाय यात्रेकरू तो, पथापथातें विराग माने, मनोरथाचा साज, बांधिला माज, आज यदुराज, हरिचा मुलाज, मतिला ऐसा सलाज शंकित जातां, अवाज न होतां, गरिब नवाज माधवजीची द्वारवती देखियली ॥ श्रीकृष्णें० ॥ ३ ॥

चरती कामधेनुखिल्लारें, सुवर्णरत्नखचित धवलारें, फुललीं कांचनमय कल्हारें, कौतुक रचिलें हरिमल्हारें, समुद्रवलयित मलय मेरुसम निलय हरीचें, प्रलयसंपल्या कुवलय उगवे, करुणालय आलवाल, यादवप्रवालवल्ली भली उगवली, कृष्ण घन कल्पद्रुम फळली, कोमळतासलें पल्लवली, मुक्ताफळें चहूं देशीं स्रवलीं, अमृतफळें नम्रलें लवली, सोमवश तेजें टवटवली, स्थैर्यमंडपावरी सांठवली, संतवसंता भेटतां शांती लवली, धवळी भूतप्रभावळी उद्भवली ॥ श्रीकृष्णें० ॥ ४ ॥

जाहले हात पाय त्या नळ्या, नाडी दिसती वरी वेगळ्या, सुकलें मांस पडल्या वळ्या, नखीं वेष्टियल्या आंगोळ्या, उपोषणें चिरकालें झालीं, सरकाळें अंगाचीं वाळूनि, देह तपें जाहलासे जर जर, उभा अस्थिचा केवळ पंजर, तो भूनिर्जर, निगमगर्भ कृश दुर्भर, बोटीं दर्भ पवित्र, सदा मुखीं स्तव, ब्रह्मसूत्र सित गळां, परि निबर दोडका, तेंवि रोडका, धर्म जोडका, अडका जवळि नाहिं तथापि, अडकाठी ही कोणी न करितां, तीन देवड्या ओलांडुनिया, चौथें मुक्त द्वार हरीचें, वेधतांचि देखिलें हरीनें, लगबग लगबग, अंकीं रुक्मिणी बसली, ते पर्यंकीं लोटुनी, उडी घालुनी, धांवत धांवत स्वयें येउनी, ब्राह्मणचरणीं मस्तक ठेवुनी, दंडवतानें मिठी घालुनी, उठीं उठीं म्हणतां चि सुदामा, चहूं भुजीं कडकडुनि आलिंगुनि, प्रेमबाष्प वारि लोचनीं, स्फुदत स्फुदत कडे घेउनी, नाचत नाचत, पूर्ति नव्हे प्रियमूर्ति द्विजाची, निजासनीं बैसविली ॥ श्रीकृष्णें० ॥ ५ ॥

ब्राह्मण बैसविला पर्यंकीं, त्याचे चरण मळले पंकीं, ते ठेवुनि आपुले अंकीं, शंकितमति नाहिं द्विजरंकीं, जिंकित केवळ, अंकितसा अवलोकित पंकज, अंकुर हस्तें शंकरसमान शंकर सुदामभूदेवाचे पाय चूरिले, जानु जंघा गुल्फ पद कठोर भिगुळीका, आर्ती अंगुळिका, नखमातीसहीत ते सावरिले, हळू हळू पदतळ, कुरवाळुनियां कंटक हरिले, सुगंध शीतळ निर्मळ जळ, रखुमाबाई ओती कांचनपात्रीं, प्रक्षालुनियां अंचळवस्त्रें, पुसोनि निर्मळ हृदयीं धरिले, नेत्रीं लावुनि, मुकुट काढुनि, मस्तकीं वरिले, चंदनचौकीवरी विस्तरिले, क्षणक्षणा अवलोकुनि प्रेमें बहु आदरिले, स्वागत सुख शब्दांहीं भरिले, धन्योहं कृतकृत्य असें म्हणुनि मस्तकीं धरिले, चरणोदक सहकुटुंब सेवुनि, दांडे वांसे स्तंभ शिंपिले, नवकेशरघनसारमलयपाटीरघनरसें भाळ चार्चिले, सुखकारकशशिकिरणकरें उद्वर्तुनिया सर्वांग अर्चिलें, ब्राह्मणचरणीं तनु मन धन सर्वस्व अर्पिलें, दशांग गुग्गुळ, धूप कूपभर तूप, यूपसम तूळवर्तिका, सूपसविस्तर, दीपमाळिका कूप, लाविले अमूप, मध्यें भूप विप्रवर रूप, भव्य भरपूर आणि

कर्पूर दिवे बहु आहे घव घव घव घव, ते तूपसाखर अमूप, वक्र करंज्या, शुभ्र फेण्या, पंचखाद्य नैवद्य हृद्य मृदु दुग्धदधि, वाद्यपुरःसर गद्य पद्य, अनवद्य सद्य सुख विद्यमान, शुभ नद्यजलशाय, मध्य मध्य पानीय सहित श्री आद्य हरीनें नैवेद्य, समर्पुनि वेदवेद्य ब्राह्मणा पुढें त्या भरुनि पराता त्वरा करुनि पृथु पात्रें निवेदिलीं ॥ श्रीकृष्ण० ॥ ६ ॥

सत्यभामा छत्र धरी, सत्या शैब्या चामर वारी, जांबुवंती व्यजन सांवरी, भद्रा मयूरपिच्छ उभारी, सूक्ष्म दृष्टिनें, पक्ष्म न लावुनि लक्षुनियां पैं, उभी लक्ष्मणा, मित्रविंदा छत्र आतपत्र, कालिंदि इंदिवरसमानहस्ता, जोडुनि संदी, तो द्विज वंदी, आनंदित बहु अष्ट नायका, द्व्यष्टसहस्रा शिष्ट नायका, कृष्ण निष्णुपदानिष्ठ तिष्ठती, इष्ट हरीसी अभीष्ट जाणुनि, मिष्ट मिष्ट रस प्रविष्ट करिती, मीठ मोहऱ्या मुष्टि भरुनियां, दृष्टि उतरती, ऊर्जित अदृष्टें कष्टरहित तो, हृष्ट पुष्ट सतुष्ट, मिष्ट मृदु विष्टरवासी, वसिष्ठ तैसा हृष्ट हृष्ट, उत्कृष्ट त्रिविष्टपश्रेष्ठ, देव श्रीपुष्पवृष्टिनें, स्पष्ट भाळ अवशिष्ट शिखा, अस्पष्ट अशी त्या ज्येष्ठ हरीनें, कनिष्ठ होउनी, एकनिष्ठ ते ब्राह्मणकाया, दैवी संपत्ति, बरवी पूजियली ॥ श्रीकृष्णें सु० ॥ ७ ॥

सुंदर हंसतूळिकास्वपिती, वस्तुता ब्राह्मण जैसा नृपती, सेवे लागुनी स्त्रिया जपती, संनिध बैसला तिमया त्रिपती, नम्र हस्तकें विप्रहस्त हस्तातें घेउनि, प्रशस्त चित्तें, कुशल प्रश्नें, वर्तमान मागील पुसे जो सुदामनीतें, तुह्मी आम्ही बाळपणीं, उज्जनीमाजी, घरीं गुरुजीच्या पढत असों तें आठवतें कीं, सांदीपिनीसद्गुरूची भार्या, आर्या जननी, इंधनार्थ रनांत पाठवी, वनांत आपण सर्पण वेचूं, काष्ठें संचूं, फिरतां फिरतां, अकस्मात अकाळीं, प्रपंच काम दुरासद वायू झडझडी, क्रोध बोधरिपु वीज कडकडी, लोभ क्षोभकर मेघ घडघडी, आत्ममोहजळ लोट भडभडी, मद मीपण कटु झाड कडकडी, मत्सररूप येत हुडहुडी, परमार्थाचा मार्ग चुकलों, गुरुपद × × × × श्रम मूकलों, असत्प्रलापें बहुत कष्टलों, आत्म सुखांतुनि वृथा भ्रष्टलों, अंधकार अज्ञानरात्रीं, घन तो गुरुसेवन साधन योगें, भाग्योदया कृतप्रातःकाळीं, गुरु माउली, आत्मपावलीं, धाउनि आली, त्वरित पावली, मधुर बोलणें करीत साउली, कृष्ण कृष्ण, सुदाम सुदामा, विवेकविपाक हाक मारितां, आपआपणा सांपडलों, पायां पडलों, गुरुमाउलीच्या पोटीं दडलों, गुरु दैवत, गुरु माय बाप, गुरु दीनबंधु, गुरु कृपासिंधु, गुरुबधहरण, गुरु आद्यदीप, गुरुदुःख देखतां प्रसन्न जाहला, गुरुभक्तीनें गुरुमानवला, आत्मलाभ कृतकृत्यपणाचीं उपनिषदांतिल शिरोवाक्यें वरदानें ओपियलीं ॥ श्रीकृष्णें० ॥ ८ ॥

तुमचें दैव तें आहे तमाम, आत्मसुखीं हो अंतर्याम, सफलित झाला प्राणायाम, प्राप्त होईल धनसुतधाम, या वरदानें मी बळराम, मथुनि रथ पृथु मथुरे आलों, मथुनि

नि दैत्यखळ, जेथुनि यादवदळ, तेथुनि निघुनियां, आतां येथेंचि राहिलों, तुम्ही निरंतर गुरुकुळवासी, गुरुआज्ञेनें समावर्तनें, विवाह शुभ केला कीं नाहीं, प्रापंचिक बोला जी कांहीं, चित्त अनुकुळ नवरी मिळाली कीं सांगा, काय किती घरीं मुलें लेंकरें, योगक्षेम कसकसा चालतो, पहिल्यापासुनि, तुमची वृत्ति उदास सदा, सदसदास ब्रह्मविदास, जगत्सुहृदास, सदास ते रतली उपनिषदास, न पावुनि विषयमदास, त्रासली मानस प्रिय वैराग्यभाग्य, समभोग्य योग्य, आरोग्य तुह्मी छांदोग्य, मृग्य अवधूत पूत हरिदूत मान्य पुरुहूतवंद्य हें स्तवन करुनियां, अवघा घरींचा समाचार बहु पुसुनि, आपुलें महत्व गाळुनि, विप्रवराची क्षिप्र प्रसन्न मनोवृत्ति आनंदा पावविली ॥ ९ ॥ श्रीकृष्णें सु०.

तुमची भार्या तूर्याग्रहणी, शांती दया तियेला विहिणी, रुक्मिण्यादि जियेला बहिणी, आमुची वडील मान्य वहीनी, काय तियेनें पाठविलें तें आठविलें, मजला भक्तिभातुकें, कोडकौतुकें, थोडें हि बहु गोड मोदकें, पान भाजिचें, मोड फुलाचा, दोड फळाचा, रोड बदरीची फोड, जोडतां वोढवितो मुख धोड, खाजवनें खोड आमुची पतितपावन, होड नावरे सोड, सख्या तूं सोड गांठुडी, म्हणउनि लज्जित, सुदामकरींचे पोहे हसडुनि, आवाडेनें हरि सावाडितां, बचके विचकुनि, मुख आपसरुनि, पृथुमुष्टि सुखें सेवियली, दुसरी मुष्टि धरी रखुमाई, मायिक चिद्ग्रंथि विभेदुनि, पृथुकतंदुळात्मककण भर्जित, बीज विवर्जित, केवळ विचारदुकूल जीर्ण, श्लथश्री भगवंतीं अर्पितांचि सुटली, चतुष्टय महावाक्यमय विरागभक्ति, ज्ञानानुभवें पटाश्रिताते, तद्वत तत्पद आपुलें अर्पिसें घे, त्वंपद ते तूं ब्रह्म, असति हें, असिपद घेता, श्रीरुक्मिणीनें धरिला कर, निकरें निर्विकार, ताळित व्हावया संप्रज्ञात, समाधिजनित, स्मृतिवृत्ति जननीनें हरिली ॥ १० ॥ श्रीकृष्णें० ॥

पोहे सत्कृत पोहे, चिद्रहस्य पोहे, सेविलं जो हे, तो भव पोहे, दरिद्र नोहे, सुवर्ण लाहे, लाहे कामधेनुची वोहे, घरींचे दोहे, सदनी मोहे, तो साम्राज्यपदीं आरोहे, तो हेमांबर नेसुनि सोहे, निजसुखमाहेरातचि राहे, आत्मा आहे, हें मी बाहें, उचलुनि साहे, तयास बाहे वाहे, नयनीं पाहे, तो मज आहे, तुच्छवत् तद्वत भेद न साहे, त्याचे चरणरजीं अवगाहे, निगमप्रवाहे बाहे, त्याप्रति खादी वाहे, आहे संसाराची न लाहे, असें म्हणुनि श्रुति श्रवण मनन आणि निदिध्यास साक्षात्कारादिक मुठी ती शेवटील प्रियतर देवें चाखियली ॥ श्रीकृष्णें० ॥ ११ ॥

श्लोक.

सुदामाचे पोहे धरुनि वदनीं देत मिटक्या ।
अशी गोडी कैंची अमृतघुटक्यामाजि लटक्या ॥

न सीमा भामाद्यादिकअधरपानांत विटक्या ।
असें श्रीभिक्षेचा विटति कुटक्शमाजि तुटक्या ॥ १ ॥

कृष्णें वृत्ति करुनि पागुळी, आपुली वागवूनि आगोंळी, घालुनि मोतीयांची रांगोळी, करवी ब्राह्मणासि आंघोळी, चौकन्हाण विहिणीचें, तैसें ब्रह्मश्रीबहिणीचें, हिरवे नवे केळीचे, खांब कोंवळे लांब लांब सह, इक्षुदंडवरि मंडप साखरनिंबोळ्याचे घोंस, पोसले लाल दुरम्या, नारंग्या सारंग्या लटकती, द्राक्षांचे घड पिकले, रसाळ मधुप झोंबती, मुक्त लोंबती, वारिजात नयन फुल पारिजात शुभ्र चादवे यात खुलेल कमळ फुलारें फुलले, विठाबाइनें ठाणें सोडुनि, ठाणक्या लखलखीत ठेवल्या, रावें हंस ज्यास लाविले, नौरत्नाच्या चौरंगावरि, श्रीरंगानें झुलत सुखप्रद विप्र बसविला, पीतांबर पडदणीस देउनि, खंबाइती भरजरी नेसवुनि, दीनबंधुनें सुगधराय, चमेली वरचापेल बुक्याचा लेप देउनी, बेल फुलेल बुक्याचें उटणें, कृष्णहस्तें उष्ण उष्ण जळ, घम घम कर्पूरवर्तिका बाजभ्यांचा बाजा वाजति, त्या फुलबाज्या, हवाया चंद्रजोति- बहुत सुटती, मखरीं लोंबती घागरमाळा, घटा घणघण, भौंत्या भवत्या फिरती बायका, अष्टनायका, द्वारावतिचे कृष्णरावजी, त्याचे बधू वडील भावुजी, महा साउजी, जडावाचिया खडावांत हळु पाय देउनी, क्षिरोदक परिधान करवुनी, उच दुशाल खुशाल समोर मशाल अति विशाल, त्यावुनि सुदाममूर्ति भोजनार्थ माजघरीं चालावली ॥ १२ ॥ श्रीकृष्णें० ॥

मांडुनि स्वस्तिक सुवर्णपाट, अडणीवरि सोन्याचे ताट, भंवता फलशाखांचा थाट, काठी वरण पिंवळें दाट, मीठ मिरें वरि अलें लिंबु, तूतिया खोबरें किसून कोशिंबिर सुदर, अम्ल रायतें, रुचिर आयतें, कोमळ अंगीं, सगळीं वागीं, शुभ्र कारलीं, मेथी पोथी, बोथीं केळें, कोंथिबिर हळदीसह, कार्थी तार्थी सार्थी चरूसह चाकवत चुका चवळी विवळी कवळ्या शेंगा चिमकुरादळ चिरुनि, चांगली चमचमित फोडणी देउनि चरारीत, चारोळीसभारें, मउ चिमणीं बोंडें, चिचपान चिचोंळीं तोंडे, कोहळा काशीफळें, काकडी कुहिरिया, कमळकंद कोवळि काचरी, दूध भोंपळे, दिव्य दोडके, दाळ दिंड शेवाळ वाळकें, शेंगा सुरण अरुवार परवरें, पडवळी तोंडलीं, कोंडली कंद मूळ फळ फूल पत्र तरु वेलमात्र घृतपाचित शाका, वडे नसती वावडे, सार आवड, तिखट तिळवडे, सारंजिनवडे, सहित पापडे कार्थिक वडे, आणिक कोरवडे, शिऱ्या सगट गट पुऱ्या, बऱ्या गुरवऱ्या, काचोऱ्या सांजोऱ्या, मालत्या बोटवे, शुभ्र देटवे, सायसहित शेवाया, शर्करा पायस लुचया, मांडे पाडूरवर्ण पूर्ण पोळिया, घृतें घोळिल्या द्विजें गिळिल्या, दुरडी भरुनी घिरडीं, भाजुक साजुक, नाजुक राजसवाणे कानवल्यासी मानवले, साखरफेण्या घिवर घारगे, मोतीचूर जिलेबी दळिया, बारिक ओदन, दे अनुमोदन, घमघमाट तो आमोद न राहे, भात केशरी परम कूसरी,

दहीं दूध घृत मधु साखर, निंबू घन राव जावभर, पन्हें फुटाचें, मठ्ठा मिठ्ठा, मटमटा बहु मधुर लापसी, लोणकडें थिजलें गायिचें तूप, मधुर सुवासिक महा चंगाळ, थोर गंगाळ, वाटीभर एक एक घरींचें, सोळा हजार पदार्थ आले निज भाग्यें भोजनीं अन्न ब्रह्मरसानुभवानें विप्र जेविला, उरलें भानें, सादर नम्र समरभानें करिति प्रीतिनें, पचारति सहस्र नव रंगेरी पानें, विडा अर्पिला अतिसन्मानें, कात रुक्म रंगेरी पानें, चिकणी सुपारी सोनेरी कोनें, लवंग सोनेरी सवंग केलें वेळा जायफळ सौवर्णिपर्ण चर्णकृत मौक्तिक भाजनिं चना अर्कनिभ अर्क वर्ख शर्करा सक्षाळित.... .... ....हस्तें सेवितां चि कर्क गुरु समगर्क सुदामा, तर्करहित नृप अलर्क तैसा समाधिशयनीं शयन करूनी इंद्रभुवनपद सुवर्णपट्टण आत्मलक्ष दक्षणा लक्ष शत मूर्तिमंत अगोदर देवें त्यासी न कळतां हुंडी करोनि गांवाची गांवा पाठविली ॥ श्रीकृष्णें० ॥ १३ ॥

कदापि धन हरिलागीं न याची, वृत्ति अयाचित सत्य तयाची, निस्पृहता मोहरा रुपयांची, कळली हरीस मुख्य तयाची, एक रात्रि हरिसंगें कढुनि, कल्पसमय विकल्परहित श्रीकृष्ण चतुर्भुज सगुण ब्रह्म विलोकुनि, चिंतुनि स्नानसंध्या सूत्रमात्र चिन्मात्रपणें करी नित्यतृप्त आश्रित हरीचा, महानिराश्रय श्रुत्यंतैकश्रवण परायण तो, विगतश्रम स्वाश्रमासी चालिला, सुदामा औदासिन्यें स्थिति उदामा देखुनि, मानवला हरिनामा बोळवीत आला द्विजसंगें, कांहीं हरीस कधीं न मागे, हरि धांवे त्या मागें मागें, रमागेह सेवित पद मार्गें, सर्वांगेंशीं पुढें पुढें हरि वेडा होउनि विप्र गड्याला पायघड्या, उघड्या बहु घाली, चहूं भुजानें लुगड्यानें वरि करित साउली, निधड्या मतिनें विड्या देत, सुख दुःख आपुलें जाहिर करुनियां, बाहिर निघुनि मग आहेर सहित, निज माहेरघरींहुनी लेकी विहिणी वहिणी बोळवीत पुढील मजलेची करुनि निश्चिती, ब्रह्ममूर्ति गौरविली ॥ श्रीकृष्णें० ॥ १४ ॥

मार्गीं ब्राह्मण तो अविकार, जाणे विवेक मुख्य प्रकार, जवळी नाहीं एकपकार, आठवी श्रीहरीचे उपकार, अधन मित्र जरी सधन होइल, तरि साधनरहित मदबंधन पावल, आडवाटेनें धावल, द्विज मज विसरल, अघ कसें हें सरल, भव कधीं हो तरल, निज हित अंतरल, अतितरल मानस, काम तरळ भरल, अहिगरळ करळ भर कांशि उतरल, मन विषयिं चरल, भेदमति संचरल, अनुचित अचरल, ज्ञान कोठुनि जिरल, आयुष्य किति हो पुरल, देह तारुण्य झुरल, बळ समूळ सरल, तें झुरळ तसा प्राणि जन्मातें फिरल, तेथें अज्ञान शिरल, पुण्य कांहीं न उरल, किमपि न अवरल, मन विषयीं स्थिरल, लोभ अति पसरल, स्थितीहुनि घसरल, उपरम निसरल, अशी हरिला बहु माझी आली, करुणा नव नव करुणाघन मोह धरणा हरि आपुलें म्हणवी, त्यासि धन नाहिं देत कांहीं, असेल हित रितें हि हि-

रोनि नि·· ·· ·· ·· ·· ·· ·· ·· ·· ··ले कदा न हरिलें, हरिस्वरूप·· ·· ·· ··
·· ·· ·· ·· रावया हरि जवळि फिरत जरि असो म्हणो तरि नाहि दुसरा, आजि सण दसरा, जग हरिमय निखिल सकळ अविकळ हे उपकृति हरिची सादर आठविली ॥ १५ ॥ श्रीकृष्णे० ॥

चाले आत्मसावधानी, मानस हरिच्या अनुसंधानीं, येतां आश्रमसंनिधानीं, देखे सुवर्णराजधानी, गरुडटके नेटक पताका, सोनटके मोटके चित्रिले, चहुंकडे लखलखाट, कांचन घाट, नद्यांचे पाट वाट, तरि चिंतामणिचे थाट, दाटकला द्रुम, सोपानवापिका, वनें उपवनें, स्वच्छ जीवनें, कल्पलता सफलिता, घरोघर दाडे वांसे किलच्या सोनें, खांब उथाळीं मोहट्या सोनें, भिंती आंत बाहेर ही सोनें, पाट सज्ज्या चौकटीस सोनें, बृहत्कपाटामध्यें सोनें, आंगण ओट्यालागुनि सोनें, दिवाणखाना पाहतां सोनें, गजरथहयपडशाळा सोनें, भाणवसा सोन्याची चूल, उतरंडी मडकीं पाहतां सोनें, हंडे गंगाळें ही सोनें, शौच कराया माती हातीं घेतां सोनें, यवे बटकींचे देवांगना, अंगणांत बाहिर ही सोनें, चुंबळ घागर तें ही सोनें, सुवर्णमय दश दिशा पूर्ण आपणासहित जी सिद्धि रिद्धि युत आर्तस्वर हरि अलापित, अजि कार्तस्वर रमणीय घरें रत्नांचीं देउनि, स्वस्ति श्रीद्वारकाधीश अमृतेश्वरसंतें श्रीभगवतें ब्राह्मणास ब्रह्मानंदमय संपत्ति सतति शाश्वत अर्पियली ॥ श्रीकृष्णे० ॥१६॥

इति सुदामचरित्र संपूर्ण.

---

## उद्धवचिद्घनकृत श्रियाळचरित्र.

### दिंडीवृत्त.

गुरूपावूलें आठवूनि चित्तीं वरी आपुला आपगिला संतीं ॥
निज ज्ञानें मज बोलविलें श्रोतीं कथा ऐकतां हरे मोहभ्रांती ॥ १ ॥
करा आनंदघोष हरिनामें वरी टाळीया वाजवुनी प्रेमें ॥
क्षितिपृष्ठीवरि मोक्षपुऱ्या सातीं त्यांत काशी बरी वानियेलि संतीं ॥ २ ॥
तेथें राजा श्रीयाळ पुण्यकीर्त्ती अन्नदानें शिव वोळगिला भक्ती ।
इच्छिलें दे भोजन सर्व काळीं सर्व सुखाडें दीनजना पाळी ॥ ३ ॥
असें ऐकूनी पंचवक्त्रधारी येत भेटीसी होउनी भिकारी ।
गलितकुष्ट दुर्गंधि अती भारी त्रास घेती पाहूनि नरनारी ॥ ४ ॥
राजदृष्टीसन्मुख उभा राहे कपटवेषानें सत्व कसा पाहे ।
म्हणे राया इच्छीत अन्न देसी आलों ऐकूनी दूर देशवासी ॥ ५ ॥
राव बोले तू माग इच्छितासी येरु बोले तू धन्य सूर्यवंशी ।

---

१ सात=अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका । पुरि द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायकाः ॥ १ ॥

नरमांसाच्या भोजनासि देई अंगिकारोनी भूप नमी पायीं ॥ ६ ॥
नको धर्मा देऊ येर चोर नको विक्रीत पापशरीर ।
नको अन्यायी दुष्ट अपस्मार नको अमंगळ रोग विकार ॥ ७ ॥
राव बोले मी आपणासि देता येरू बोले तूं मागत्याचा दाता ।
पुढे ठाके चांगुणा पतिव्रता म्हणे भिक्षुक मागत्याचि माता ॥ ८ ॥
तुझे येकचीं येकलें तें बाळ अति सुकुमार नाम चिल्हाळ ।
देईं सप्रेमें मज मासकवळ करीं संतृप्त क्षुधातृषाव्याल ॥ ९ ॥
असें ऐकतां तोष बाळकासी म्हणे धन्य मी तुमचिये कूशी ।
करा अर्पण भूक अतीतासी नाशवंत हें येत कारणासी ॥ १० ॥
सत्वें सद्भावें बाळकासि देतां नव्हे व्याघ्र मी फाडुनियां खातां ।
कुटा कांडा पाक करा तुम्ही आता खेद मोह तो टाकुनियां चिंता ॥११॥
पतिव्रता चांगुणा माऊली बाळ उचलुनी गृहामाजि गेली ।
धरी पोटाशीं मुखीं मुख घाली अतिकरूणें शांतवी बाळ बोली ॥ १२ ॥
सख्या ससारतारक तूं होसी सत्य रक्षाया कुळीं जन्म घेसी ।
निज हस्तें रे तुज पुढे धाडीं मोक्षपुरीची वाट बरी काढीं ॥ १३ ॥
खडे कंटक कर्म कूप झाडीं सत्वसामर्थ्यें शिवपद जोडीं ।
विळी पाटावरि वाम चरण ठेवी बाळ उचलूनी धार गळां लावी ॥ १४ ॥
बळें कापीतां नेत्रकमळ लावी मान कापून शीर मनीं भावी ।
मोह ममतेचा वायु झळवला आधि अतीता जेविं भुकेला ॥ १५ ॥
डोळां पाहेन कसा हरपला शीर ठेवून घडा पाक केला ।
पूजि अतीता ताट पुढे ठेवी येरू न जेवी उभय नेत्र लावी ॥ १६ ॥
अपवित्र हें मांस कोण जेवी शीर रांधूनी भीक घालावी ।
सती वीनती करी महादेवा क्षमा अपराध करूनियां जेवा ॥ १७ ॥
माय मस्तक उखळांत कांडी गाय ओंवीया शंकरासि तोंडीं ।
पाक संपादी ताट पुढे मांडी येरू जेवीना घांस न घे तोंडीं ॥ १८ ॥
तुम्हां दोघांसी उपवासि ठेवूं मी च येकला काय म्हणुनि जेवूं ।
वरी हांसेल देव महादेवू असें भूकेलों अन्य घरा जाऊं ॥ १९ ॥
पतीलागीं वीनवी पतिव्रता उदरीं माझीये नव मास होता ।
काय दिवसानें भार नव्हे आतां बसा सांगातीं जेवूं अतिथि आतां ॥२०॥
दोघें आणूनी बैसविलीं पात्रीं तरी अतीत घास न घे हातीं ।
निपुत्रीकाचें अन्न अधःपाती टाकि घेऊनी कोण जेविताती ॥ २१ ॥
एक पुत्र दीधला तूजसाठीं तूं चि निंदितोसि आम्हा दोषदृष्टी ।

देईं पायीं च ठाव नीज पीठीं झाला अतीत शीव जगज्जेठी ॥ २२ ॥
जटामस्तकीं विखुरल्या भारि मागें गंगेचें वाहतसे वारि ।
सर्प विशाळ भस्म चंद्रधारी रजतपर्वतीं मदनदहनकारि ॥ २३ ॥
झालों संतुष्ट तुमचिया बोला मातापित्यासी पुत्र भेटवीला ॥
नमस्कारें वीनवी उभयतां नसे मागणें तू चि जोंवि आतां ॥ २४ ॥
देईं पायीं च ठाव उमाकांता तुझी भक्ती मज द्यावि हे चि आस्ता ॥
आौट घटिकेचें राज्य शिवा द्यावें नगर आज्ञासहीत उद्धरावें ॥ २५ ॥
पुढें ऐसे कोणास न पीडावें । केलें तैसेंची बोलियलें देवें ॥
म्हणें उद्धवचिद्घन पाहीं । राज्य ठेवीलें त्यासि भय नाहीं ॥ २६ ॥
इति उद्धवचिद्घनकृत श्रियाळाख्यान समाप्त.

---

## आनंदतनयकृत

# शिबिचक्रवर्तीआख्यान.

दीना जनासि करुणानिधि सत्यवादी । ज्याला भला म्हणति वारिजसंभवादी ॥
सत्कीर्ति ज्या विभुचि सर्व दिगंतवर्ती । जो सत्वसिंधु विजयी शिबि चक्रवर्ती ॥ १ ॥
श्रीकृष्ण धर्मनिधि धर्मकथा चि धर्मा ।
सांगे म्हणे शिबिचिया परपार धर्मा ॥
नाहीं जगीं परिस तो इतिहास राया ।
देहादि मोह भय सर्व हि ओसराया ॥ २ ॥
राजा यज्ञसभेंत यज्ञ करितां प्राज्ञाचिया मंडळी ।
जेथें सुज्ञ मिळालिया प्रगटला यज्ञेश यज्ञावळी ॥
ज्याच्या दानगुणा नसे चि तुलना श्रीब्रह्मवृंदें भलीं ।
आनंदोनि भला भला निगदिती संतुष्टता पावली ॥ ३ ॥
सत्वाथिला शिबिनृपाळ महायशाचा ।
व्यापी सुघोष आजि देश दशा दिशांचा ॥
यालागिं *पाकरिपु पावक† ही महीतें ।
आले छळूं अति अगम्य जगा तिहीं ते ॥ ४ ॥
झाला ससाणा सुरसंघराणा । झंकारघोषें प्रगटी किराणा ॥
अशी कपोताकृति तो पुढारा । धावूनि ये त्या शिबिच्या बिढारा‡ ॥५ ॥
अक्षीं लक्षुनि ते क्षणीं क्षितिवरी पक्षीशपक्षीं सया ।
भक्षाया अतिदक्षसा धृतवियत्कुक्षीहुनी राजया ॥

---

* इंद्र. † अग्नि. ‡ घरा.

झेंपावे तंव वक्ष पक्ष हि चळीं कांपे सभा पावला ।
लक्षूनी शिबिदीक्षिताप्रति वदे तू रक्ष रक्षा मला ॥ ६ ॥
मारिल हा झडप हाणुनियां ससाणा ।
या दुर्भयीं च थर कापुनि त्या ठिकाणा ॥
आला पडे शिबिचिया चरणाच पाशीं ।
बा कींव येत तंव काकुळता नृपासी ॥ ७ ॥
अजि कृपाळु बा कीर्ति कोमळा । हृदयिं साठवीं आपुल्या मला ॥
वदनिं माझिये दीनता पहा । तुजविना नसे दीनतापहा ॥ ८ ॥
परिसुनी अशा पारवारवा । शिबि म्हणे तया पारव्यार वा ॥
नृपतिनें तदा आपले करें । बसविला जसा बाप लेकरें ॥ ९ ॥
नृपतिमाजिये ये कपोत जी । नृपभयांबुधी येक पोत जी ॥
भिउ नको नको दीन बा खरा । तव रिपू वदे दीन पाखरा ॥१०॥
खग पडे तदा हीत पावला । तव रिपू हतोहात पावला ॥
झडप घेत ये वाडपा रवें । पळतसे नृपा आड पारवें ॥ ११ ॥
राजा म्हणे खबुतरा भय सगताला ।
माझ्या नसे भय कदा शरणागताला ॥
हारो न तो किति यमादि भयंकराचें ।
नाहीं तुला भय चतुर्मुखशंकराचें ॥ १२ ॥
मर्यादेसि टळेल वारिधि जरी सूर्येंदु तारा गती ।
या काळीं च ढळेल मेरुशिखरीं चालेल मुगीगती ॥
मर्त्या देखुनिया पळेल यम तो वाळेल गंगा जरी ।
माझ्या या शरणागता भय नसे कल्पांत झाला तरी ॥ १३ ॥
कदाचित शिणोनियां त्यजिल मेदिनी तो फणी ।
कदाचित तृणाकुरा उबगिजेल दिग्वारणीं ॥
कदाचित दिवामणी क्षिति निजेल तो भागला ।
परंतु भुवनत्रयीं भय कदापि ना तूजला ॥ १४ ॥
परिसुनि शपथेची राजगंभीरवाणी ।
मग कपटकपोतें बैसिजे राजपाणी ॥
तव झडकरि आला यागशाळे ससाणा ।
क्षुधित बहुत काळें तो उभा दैन्यवाणा ॥ १५ ॥
तदा वदे श्येन दयासमुद्रा । धरूनियां याचक दीनमुद्रा ॥
त्वत्कीर्त्ति ऐकों जन उद्धराया । म्या देखिलें आजि विरुद्ध राया ॥ १६ ॥

तू धार्मिकोत्तम असें वदताति राजे ।
ठायीं तुझ्या अति अधर्म नृपा विराजे ॥
मी दीर्घकाळवरि पीडितसें भुकेला ।
माझा कसा हिरुनि घांस हि घात केला ॥ १७ ॥
एक्या जिवें चि अशना करुनी विधाता ।
कां बा प्रवर्तसि अनेक कुटुंबघाता ॥
माझे चि का विषयिं आज दया उडाली ।
हिंसानदींत तव कीर्त्ति दिसे बुडाली ॥ १८ ॥
आहा कसा वदनिंचा मृदु घास नेला ।
संतृप्त कोण करि यावरि वासनेला ॥
धर्मी असे कपट आधिक वासवाशी ।
दैन्यावलंबन करोनि मुखासि वाशी ॥ १९ ॥
राया कैसी कर्म रेखा कपाळीं । मातें धर्मे त्यागिलें त्या कपाळीं ॥
आले माझे सर्व ही प्राण कंठा । हा वैकुंठा हा विधी नीलकंठा ॥२०॥
ऐशी करुनि करुणालवाला । मागे कपोत मुखि शब्द करी मवाळा ॥
राजा म्हणे मग तयासि अगा जिताला । नेदीं कदापि च रणा शरणागताला ॥२१॥
बोले विभू सरस आणिक मास आणा ।
तें मी न घें म्हणुनि वाहत दीर्घ आणा ॥
श्येनास जी अशन जाण कपोतमांसीं ।
हे निर्मिलें चि विधिनें पतगोत्तमासी ॥ २२ ॥
बोले श्रुती भक्ष कपोत श्येना । आहार त्या वांचुनिया असेना ॥
सर्वज्ञ जी सर्व तुम्हासि ठावें । म्यां यासि नेघोनि कसें उठावें ॥ २३ ॥
हा काय रे सार अपारव्याला । घे आणिका त्या मृत पारव्याला ॥
आम्हां तनूतें न शिवों शवाची । आज्ञा अशी सारससंभवाची ॥ २४ ॥
दिंडी—नृप बोले जरि देह हा निमाला । जरी येती धनगे (ख) हहानि माला ॥
खग नेदीं च कपोत हा तयाला । जनीं रक्षूं च कपोत हात याला ॥ २५ ॥
दे आपुली तनु तरी पतगप्रमाण । या ही विना अशन सर्व हि अप्रमाण ॥
पारावतासम भरें निजमास खंडीं । दाता नसे तुजविना नृपती त्रिखंडीं ॥२६॥
श्लोक—खगतनू तुके मांस भातुकें । निजशरीरिंचें पूर्ण जोतुकें ॥
परिसुनी असें लोक कांपती । त्वरित ऊठिला भूमिकापती ॥ २७ ॥
राजा म्हणे याहुनि लाभ काय । तों ऊठिला रुचिर मन्मथभव्य काय ॥
धर्माप्रती हरि म्हणे अती धन्य माय । रत्नासि त्या प्रसवली यश तें न माय ॥२८॥

तेव्हां आणवि तो तुला त्रिभुवनीं जीला नसे हो तुला ।
पक्षी तो जड जीतुला निजतनूचें मांस दे तीतुला ॥
जोखी तों खग भारला समपणें नोहे चि तो थारला ।
राजा धार्मिक थोरला म्हणुनियां देहो करी थोरला ॥ २९ ॥
निजोरुजंघांतरिं खड्गधारा । खंडी तदा शोणितपूर्णधारा ॥
भूमीवरी वाहती पाहती ते । अहो नृपाची अतुल स्थिती ते ॥ ३० ॥
आक्रोशेंविण आग्रहाविण तसा तो काम रागाविना ।
कीं स्वाभाविक शांत तुष्ट हृदयें चित्ता कशी भाविना ॥
देहातें तृणतुल्य भावुनि करें खंडोनि खड्गाननीं ।
जों अर्पी निज मांस तों वसुमती कांपे जनीं काननीं ॥ ३१ ॥
पारव्यांत निज मांस जों करें । अर्पिजे धृतिबळें दयाकरें ॥
तों कुटी खगतनू जडावली । अर्पितो वरिवरी हडावली ॥ ३२ ॥
अर्पितां घडिघडी निजमांसा । पाहती सकल लोक तमासा ॥
ये चि ना तुक समानपणाला । कीं तदा बसविलें अपणाला ॥ ३३ ॥
राजा प्रसन्न बसला सगळा तुळेसी ।
देदीप्यमान वदनीं न उणा कळेसी ॥
सारा समान तुळलाचि कपोतभारें ।
केले जयध्वनि तदा सुरलोकभारें ॥ ३४ ॥
ते देव धन्य म्हणती नृपसत्यधीरा । तू अंबरा पडतया गमलासि धीरा ॥
तोषोनियां स्तवुनियां गगनीं फुलांची । गंभीर वृष्टि करिती अति मंजुळांची ३५
अप्राप्य जो सुरनरा वर माग राया । घे स्वर्गसंपत्ति करीं गुणसागरा या ॥
कांहीं अपेक्षित नसे मखपूर्ण कीजे । घ्या आहुती कवल अर्पिति पावकीं जे ३६
झाले सुखी मखशिखी मघवा मखीं ते ।
वाखाणिती अखिल कीर्ति सख्या मुखीं ते ॥
सृष्टींत शिष्ट तरि दृष्टिस सुष्टकर्मी ।
झालासि दृष्ट मदहृष्ट चि पुष्टकर्मी ॥ ३७ ॥
तुळावया धैर्यबळा नृपाळा । खळाकृती भूमितळीं कृपाळा ॥
आलों निवालों अति तुष्ट झालों । घालों तुझ्या साच रसीं बुडालों ॥३८॥
निकें म्हणुनि मागुती वरद ते वदों लागती ।
नृपाळमहिमागती अमर होति दोलागती ॥
नृपा सफलकाम हो त्रिभुवनीं तुझें नाम हो ।
अगा स्वसुखधाम हो सकललोकविश्राम हो ॥ ३९ ॥

रमावर सुखी करो समुळ मोहमाया हरो ।
भवाब्धिभय ओसरो भुवनि भव्य कीर्त्ती भरो ॥
तुझ्या सुचरितें तरो त्रिजग दिव्य भाग्यें भरो ।
असे वर सुरीं परोपरि दिले जना उद्धरो ॥ ४० ॥
सदा सुकृत अंकुरो तुज अभीष्ट सारें पुरो ।
मती निजपदीं मुरो सकळयज्ञदीक्षागुरो ॥
करोनि अशि उत्तरें शिबिविडौज त्या नंतरें ।
सुखाउनि निजांतरें त्वरित जाति अभ्रांतरें ॥ ४१ ॥
त्यावरि तो शिबिराज विराजित वाजत गाजत याग करी ।
दिव्य शरीर दयानिधि धीर समर्पित आहुति भव्य करीं ॥
गर्जति वेदरवें द्विजराज असे च किजे कांहि काळवरी ।
राहुनि भोगुनि त्यागुनि हें जग तो मग मोक्षपदासि वरी ॥ ४२ ॥
ऐशी असे अति पुरातन गोष्टि राया ।
भ्यां बोलिल्या नृपतिकीर्त्ति युधिष्ठिरा या ॥
तैशी च रे तुज असो यशसपदा ते ।
आणीक नाहित असे च अमूप दाते ॥ ४३ ॥
जो हे कथा परिसतो अतिभक्तिभावें ।
जीवांमधें परिस तो गमला स्वभावें ॥
ज्याचा कथारस सुकर्णपयासि पावे ।
त्याचे जगीं चरण वंदुनिया जपावे ॥ ४४ ॥
आकर्णिती जरि अपार बळ श्रुतीतें ।
कुंतीसुता परिस त्या च फलश्रुतीतें ॥
सायुज्यमुक्ति मग अर्पिल त्यासि माळा ।
कामादिमोहरिपुचा निरसे उमाळा ॥ ४५ ॥
धर्मासि धर्मगुण यापरि शब्द धर्मी ।
सांगे मुकुंद गुणसुंदर थोर धर्मी ॥
ते आणिती चतुर जाणपणें मनाला ।
आनंदनंदन कवी विनवी जनाला ॥ ४६ ॥
इति शिबिचक्रवर्तिआख्यान संपूर्णम् .

## नामदेवकृत ओव्या.

येक अर्बुद शाण्णव कोटी मापा । तीन लक्ष दाहा सहस्र लेखा ॥
सातशें तीन मास पाहतां । तया हिरण्यकश्यपा काय झालें ॥ १ ॥
चौदा चौकडिया लंकनाथा । नव्याण्णव सहस्र राया दशरथा ॥
ते ही गेले शुद्धपथा । येर सर्वथा नुरे ची ॥ २ ॥
चौदा कल्प मार्कंडेय पडे । तैं येक रोमहर्षणाचें रोम झडे ॥
बकदाल्भ्याचें निमिष मोडे । गेले येवढे रे जना ॥ ३ ॥
बकदाल्भ्याचें वेंचे आयुष्य । तैं बकहंसाचें उपडे पिस ॥
बकहंसाचा मृत्युप्रवेश । तैं येक श्वास भृचंडीचा ॥ ४ ॥
मरणात होय भृचंडीचा । तैं येक दिवस कूर्माचा ॥
नामा ह्मणे केशवाचा । वेगीं देवाचा पंथ धरा ॥ ५ ॥

---

## नारदाचा व्यासास उपदेश.

### आर्या.

भगवत्कीर्त्तनमहिमा वर्णाया ब्रह्मदेव ही न शके ।
तेथें प्राकृतमतिनें वर्णावें म्यां कसे तया मशकें ॥ १ ॥
नभ आक्रमिती शक्त्यनुसार शलभ हंस तेंवि मी ब्रह्मा ।
दोघां अंत न कळता समबुद्धिविषीं विशेष त्यां आम्हा ॥ २ ॥
पक्षबळें हंसाला गति फार ह्मणोनि काय न उडावें ।
शलभें तसें न कां म्या कीर्त्तनगौरव यथामती गावें ॥ ३ ॥
योगनिरत नारदमुनि पाहुनि बहु कष्टतो तयामाजी ॥
सेवुनि कीर्तिसुधेला यात चि तनु हे बुडो ह्मणे माजी ॥ ४ ॥
या गोष्टीचा अनुभव सत्यवतीनंदना असे ठावा ।
कीर्त्तनमहत्व तेणें होइल येथें चि स्पष्ट तो गावा ॥ ५ ॥
तो श्रीव्यासमुनि जयग्रंथीं स्त्रीशूद्रसर्ववर्णांचे ।
धर्म बहु मुख्यत्वें वर्णी जे हरिति ताप कर्णांचे ॥ ६ ॥
त्या योगें तो भगवान् क्षोभुनि चित्तानदींत त्या बुडवी ।
मोहसमीर तयाची देहस्मृति जीर्णपर्णसें उडवी ॥ ७ ॥
स्वमनीं ह्मणे जरी म्या साधारण धर्म वर्णिले सारे ।
सुखसागरीं तदापि मन होउनि न बुडे चि शांत कंसारे ॥ ८ ॥
रोगी आळसि अल्पप्रज्ञ क्षीणायु मनुज पाहूनी ।
वेद हि विभागिला म्यां [ काय ] करावें अणीक याहूनी ॥ ९ ॥

ऐशी स्वहिताविषयीं अंधजना वाट दाविली नीट ।
काय उणें यामध्यें पडले सांगा करूं नका वीट ॥ १० ॥
नारद म्हणे मनीं त्वां निरूदककूपीं च बुडविले सारे ।
हरिभक्तिराजमार्ग त्यजुनी हा नीट मार्ग कैसा रे ॥ ११ ॥
भारतआदि पुराणें केलीं परि त्यांत एक चुकलासी ।
गुणवर्णन मुख्यत्वें केलें नाहीं म्हणोनि सुकलासी ॥ १२ ॥
गुणकीर्त्तन जे करिती त्यांसि न कोणी हि ताप तळमळवी ।
आइक विमळें भगवद्भक्त न केव्हां हि पादतळ मळवी ॥ १३ ॥
भगवत्कीर्त्तिसुधेतें सेवुनि जे जाहले सदा मत्त ।
न धरिति भय काळाचें जिंकूं म्हणती तयांस ही संत ॥ १४ ॥
हें सांगुनियां गेला मग भागवत प्रबंध हा केला ।
ज्याचे श्रवणीं रिघला त्याचे पावे चि देव हाकेला ॥ १५ ॥

---

## परशुरामकृत.

# आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर यांचें वर्णन.

ब्रह्मानंदरसें चि मूर्ति बरवी जीची दिसे ओतली ।
यालागीं पहतां चि नेत्रकमलें सृष्टी [ हि ] आनंदली ॥
भक्ताची भवभीति सर्व हरली अद्वैतता लाधली ।
ऐशी सद्गुरुमाउली निरखिली आनंदमूर्ती भली ॥ १ ॥
कृष्णावेदवतीतटीं प्रकटली श्रीब्रह्मनाळस्थळीं ।
चित्त श्रीरघुनाथपादकमळीं अर्पूनियां राहिली ॥
मायेची फळि फोडुनी अति बळी धिःकारिला हा कली ।
ऐशी सद्गुरुमाउली निरखिली आनंदमूर्ती भली ॥ २ ॥
नेणे आणिक कांहि जें गुरुविणें त्या चातकाचे परी ।
पूर्ण व्यापकता चिदैकमतिनें लक्षूनि विश्वांतरीं ॥
आब्रह्मादिपिपीलिकांत समता सत्ता स्वयें लाधली ।
ऐशी सद्गुरुमाउली निरखिली आनंदमूर्ती भली ॥ ३ ॥
धांवे धेनुपरी च हुंबरुनियां जी दीन वत्साप्रती ।
कारुण्यस्तन त्यासि पाजुनि बळें जी देतसे सद्गती ॥
तुर्यातीत पदीं बसूनि बरवे प्रेमें बहू माजली ।
ऐशी सद्गुरुमाउली निरखिली आनंदमूर्ती भली ॥ ४ ॥

जीची कीर्त्ति चतुःसमुद्रपरिखापर्यंत विस्तारली ।
जे का संसृतितापतप्त निववी होवोनियां साउली ॥
जेथें वृत्ति विसावली निजसुखें विश्रांति ते पावली ।
ऐशी सद्गुरुमाउली निरखिली आनंदमूर्तो भली ॥ ५ ॥
लीला देखुनि फार अद्भुत जिची ज्या नावरे गैव्हर ।
आनंदें बहु डोलती अचल जे पाषाण ते स्थावर ॥
तेथें जगम मानवादिक तरी सद्भक्तिनें आथिली ।
ऐशी सद्गुरुमाउली निरखिली आनंदमूर्तो भली ॥ ६ ॥
आनंदें नटली भवासि विटली आशेतुनी सूटली ।
मोहभ्रांतिरती समूळ तुटली संदेहता फीटली ॥
तद्बोधें मनइंद्रियें हि सुटलीं मुक्ती तरी लूटली ।
ऐशी सद्गुरुमाउली निरखिली आनंदमूर्ती भली ॥ ७ ॥
वर्णायासि जिचा अशेष महिमा मौनावली वैखरी ।
जेथोनी परते थकोनि मन हे ते व्याप्त सर्वांतरीं ॥
जे हें दृश्य चि नासतां निजरूपीं राहे सदा आचळी ।
ऐशी सद्गुरुमाउली निरखिली आनंदमूर्ती भली ॥ ८ ॥
दाटीता अठ भाव पूर्ण हृदयीं स्तोत्रा वदे वैखरी ।
पारिसोनि कृपें ठिवीत सुगुरू हस्तासि तेव्हां शिरीं ॥
आनंदें मनिं परशुराम अपुल्या होतां कृपासाउली ।
ऐशी सद्गुरुमाउली निरखिली आनंदमूर्ती भली ॥ ९ ॥

---

**पद**—राग हमीरकल्याण.

राम तव पदतामरसं हार्दि मे सदा निधेहि ।
राम नौमि मामवामरारिविराम काम काम मा मनोरम ॥ राम तव पद० ॥ ध्रु० ॥
इंदिरा हृदयारविंदेंदिरा लीलाविधृतमंदिरा मुनिमानसमंदिरा रघुवीरा ।
किं दया न ताता सेवकवृंद पारिजाता ।
जय रघुनंदनेंदु कुंदमंदहास सुनंद नंदवंद्य सुंदरानन ॥ राम तव० ॥ १ ॥

अंगदार्चित धृतहेमांगदा सरक्षितरुक्मांगदा करुणाकलितापांगदा दाशरथेशा रगराजपाला नतशरभंग सत्यशीला विधृतरथांग रंगमंगलांग वरद विहग पुंगवागसेव्यमृदुपद ॥ राम तव० ॥ २ ॥

नीलकाया पंक्तिरथबालका माधव भक्तपालका भृगावलिनीकालका ध-

रणीशा लोलसगुणशरणा निंबनृपालविनुतचरणा घनकरुणालवालतालजाल दलन विशाल नीलशैलबालिकाग्रज ॥ राम तव० ॥ ३ ॥

## श्रीधरकृत नवरत्नमालिका.

भक्तास्तव प्रकट होउनि शुष्क काष्ठीं । केली तयावर दयामृतपूर्ण वृष्टी ॥
तेणें परी च चुकवीं मम जन्मफेरे । अद्यापि कां नरहरी करुणा नये रे ॥ १ ॥
विश्वासलों दृढ मनीं तुझिया पदासी । कीं वारिसील ह्मणुनी मम आपदांसी ॥
तें दाविसील नयनीं कधि सांग बा रे । अद्यापि कां नरहरी करुणा नये रे ॥ २ ॥
मी हीन दीन कुमती तुज वर्म ठावें । ऐशावरी त्यजुनि कोप उदार व्हावें ॥
गाती तुझें पतित पावन नाम सारे । अद्यापि कां नरहरी करुणा नये रे ॥ ३ ॥
माझे अपार तमपातकसंघ जाळीं । क्रोधाग्निनें हरि तुझ्या सहमूळ नाळीं ॥
तैसा करीं भव जसा दृढ बंध हा रे । अद्यापि कां नरहरी करुणा नये रे ॥४॥
देवा तुझें हृदय कोमळ फार आहे । ऐशा परी निगमशास्त्र हि आण वाहे ॥
तें वाक्य काय लटिकें करितोसि बा रे । अद्यापि कां नरहरी करुणा नये रे ॥५॥
श्रीपद्महस्त मम मस्तकिं ठेवि बापा । दृष्टीसि दाखवि बऱ्या निज चित्स्वरूपा ॥
हे दान दे वचन आन न मी वदें रे । अद्यापि कां नरहरी करुणा नये रे ॥६॥
आयुष्य घालुनि अधीक मृत द्विजाला । त्वां वाचवोनि जगिं वाढविली स्वलीला ॥
होसी समर्थ मज चाळविसी वृथा रे । अद्यापि कां नरहरी करुणा नये रे ॥ ७ ॥
वेंचावयासि करुणाघन लोभ वाटे । त्यागूनि दे बिरिद लाविं मला सुवाटे ॥
नाहीं तरी झडकरी मज भेट दे रे । अद्यापि का नरहरी करुणा नये रे ॥ ८ ॥
पाप्यासि तारुनि बळें जन सोकवीले । तूझें चि कर्म तुजला चि फळासि आलें ॥
ते सांडिसी तरि तुला सुटतें कसें रे । अद्यापि कां नरहरी करुणा नये रे ॥ ९ ॥
ही श्रीधरें रचुनियां नवरत्नमाळा । प्रेमें चि अर्पिलि बरी पुरुषोत्तमाला ॥
हे घेकिता नृहरि संकट सर्व वारी । श्रीपादसद्गुरुयतीश्वर चिद्विहारी ॥ १० ॥

इति श्रीश्रीधरविरचित नवरत्नमालास्तोत्र संपूर्ण.

## राधाविलास.

### आर्या.

राधाविलास गाऊं भावें वंदुनि तदीय पायांस ।
आयास सर्व सांडुनि सेवूं हरिप्राप्तिच्या उपायास ॥ १ ॥
एके दिवशीं गेली श्रीराधा नंदभाजसदनासी ।
आनंदलि अवलोकुनि शारदिंदीवरसुहास्यवदनासी ॥ २ ॥

सर्वज्ञ प्रभु जाणे राधेच्या भक्तिरससदोघास ।
ध्याया घांस विसरला लागे अन्योन्य वेध दोघांस ॥ ३ ॥
माय यशोदा बोले काय मुकुंदा उगाच पाहासी ।
जेवीं झरझर चर्वण करि बा ताकामधें च लाह्यांसी ॥ ४ ॥
चळला जेवि न राहे दावी मग ऋक्ष वृक्ष खग घारे ।
पारावत शुक पिक बक कलहंस हि पाहुनी न हरि घरे ॥ ५ ॥
राधेसि म्हणे घे गे पाहू दे तुजकडेस येतो का ।
आनंदूनि करें कर धरी उचलि शणि उरस्थळीं तोका ॥ ६ ॥
छळिलें म्हणे यशोदा तुजजवळीं हा अमद हंसतो कीं ।
राधामुखचंद्राची कृष्णचकोरासि काय रुचि तोकीं ॥ ७ ॥
खेळवुनी कांहींसा बोले या नंदनासि घ्या मामी ।
कांत घरासी आला असेल जातें स्वकीय धामा मी ॥ ८ ॥
राधेपासुनि माता घे स्तन देतां चि एकदां पीत ।
चळला पुनश्च वळला पाललागीं नंददार दापीत ॥ ९ ॥
फार खवळला राधे काय करावा उपाय राहील ।
कैसा आतां वाटे घेतां तूं तुजकडे न पाहील ॥ १० ॥
ये राधिका म्हणे उडि मातेपासून नंदसुत टाकी ।
गगनांतुनि हंस जसा उतरे मानसतडागसुतटाकीं ॥ ११ ॥
झाल्या उशीर मत्पति आल्या ताडील आजि मज माये ।
स्वल्प हि अंतर पडतां क्रोध मनीं मग कदापि न समाये ॥ १२ ॥
सांगे व्रजेश्वरी तिस निजसदनाला मुकुंद ने जा गे ।
मागेल कांहि तरि दे चपळाच्या रक्षणीं सये जागें ॥ १३ ॥
कोपेल कांत जरि तरि एयिल हें वृत्त जाहलें साग ।
कृष्णासि खेळवूनी करितां गृहकृत्य हीं घडे सांग ॥ १४ ॥
आनंदमूर्ति योगि-ध्येया राधेसि लाधली ठेवी ।
नेउनि निजसदनाला शयनस्थळि मंचकावरी ठेवी ॥ १५ ॥
स्थिर चित्त तिचें झालें निरीक्षितां कोटिकामकमनीया ।
मदनें विह्वळ होउनि बोले ऐसा रुचे वर मनीं या ॥ १६ ॥
अनुपम सुकाल परि हा रतिरस नेणे चि कीं युवा नाहीं ।
तरणें विलाससिंधुस युवतीकेनें घडे न यानाहीं ॥ १७ ॥
राधापूर्वाराधन जाणुनि सर्वज्ञ लागला वाढूं ।
तो कां प्रणतसुरद्रुम इच्छित राधेस कामफल वाढूं ॥ १८ ॥

वृषभानुजा किशोरी तैं तिजला वर्ष पूर्ण चवदावें ।
कृष्ण किशोर हि पंधावर्षात्मक मूर्ति मान नव दावें ॥ १९ ॥
हरि तो स्वकरेंकरुनी मुक्त करुनि कंचुकीस हुडकावी ।
तों ती उरोज कंजें रतिचतुरा तत्करास झिडकावी ॥२० ॥
प्रार्थिति योगी ज्या हृद्ग्रंथिविमुक्तिस हठादिनिकरानें ।
तो कंचुकिची सोडी गाठ सखीच्या बळें निज करानें ॥ २१ ॥
हें काय म्हणे निशिचें कृत्य कसें हो दिसा च साधेल ।
लाधेल सौख्य सुरतीं परि येतां कांत कर्म बाधेल ॥ २२ ॥
कृष्णक्ष्वेलिविलोकन हंसाद्यद्भुत विलोकुनी क्रीडा ।
झाली सिद्ध रमाया उत्सुक दावूनि थोडकी व्रीडा ॥ २३ ॥
होऊं नका उतावीळ धीर धरा हो क्षणैक जाऊ द्या ।
उघडें दार पहा हो लावुनियां अर्गळेसि येऊ द्या ॥ २४ ॥
झडकरि उठोनि राधा द्वारा लावुनि विलाससद्माला ।
आलीला आलिंगुनि चुंबी तन्मुख शरत्सुपद्माला ॥ २५ ॥
सन्मचकीं सुमनाचे सेजेवरि शोभतात दोघे तीं ।
हरिचर्वित तांबूला मुखिं मुख घालूनि जाहली घेती ॥ २६ ॥
राधाउरोजयुगुला मर्दुनियां बाळचंद्र करजाचे ।
करितां शांतविली जे भवभयतप्ता नितांत कर ज्याचे ॥ २७ ॥
मग कुंदकुड्मलद्युति हरिनें बिंबाधरीं खुणा केली ।
राधा म्हणे प्रियतमा कधिं ही अभ्यासिली सुरतकेली ॥ २८ ॥
नीवीमोक्ष विलक्षण कमलेक्षण रति विलक्षणी कृतिचा ।
नव संगमा विलोकुनि हस्त धरी राधिकाभिनव पतिचा ॥ २९ ॥
कृष्णकरणऐक्यसुखें राधा भावी मनांत हर्षानें ।
मासऋतूनें अयनें पति यावा सावकास वर्षानें ॥ ३० ॥
हरिची मारकती द्युति कंजाक्षीवरि तशी तिची कीर्ती ।
त्या एकांतींचा रस वर्णी गौरी मुकुंद सत्कांती ॥ ३१ ॥
राधाकृष्णश्रीमत्सुरतानंदाप्रमेय जो भर तो ।
ब्रह्मादीं जीवांच्या हृदयीं मोदाप्रती तयीं भरतो ॥ ३२ ॥
तत्पति तशात येउनि द्वारीं हाका तिला न कां मारी ।
मनि कामिनी म्हणे हा रतिसिद्धित रुद्र कां न कामारी ॥ ३३ ॥
उठली घाबरली वृषभानुसुता हात ठेवुनी भाळीं ।
बसली प्रार्थी जगदीशेस म्हणे संकटांत सांभाळीं ॥ ३४ ॥

कैशी दैवगती ही जावें कां नंदभाजसदनाला ।
का आणावा सदना ने म्हणता फुल्लपद्मवदनाला ॥ ३५ ॥
मर मर मारा घोरा माराया काय योग केलास ।
शिशुमूर्तीविषयीं रे हृदयीं कैसा तरी उदेलास ॥ ३६ ॥
चिंतार्णवीं निमग्ना भीरु भयें नेत्रपक्ष्म ही नुचलें ।
हरिच्या कृपाकटाक्षें जावें त्याला च शरण हें सुचलें ॥ ३७ ॥
झाला म्हणे शिशु युवा तो आता तोक कां न होईल ।
कामानळा विझवि तो भय वारुनि अभय कां न देईल ॥ ३८ ॥
प्रार्थी हा कामारि द्वारीं पति वाटतें कळेना कीं ।
लघु तनु धरावया मन माधवजी अजुनि कां वळेना कीं ॥ ३९ ॥
त्रिभुवनकमनीयाला तुमच्या पाहुनि आजि न फसावें ।
तरि लागतें कशाला मन हें घोरांत घालुनि बसावें ॥ ४० ॥
गोविंद म्हणे करणें शिशुचा युव साधलें चि आजाला ।
तू तरि साग सखे कीं युव तो शिशु कोणते स्थळीं जाला ॥ ४१ ॥
राधा ह्मणे खरें जी तरुणाचा तो कधी न पाहीला ।
कोण असा तरि निमिषें शिशुचा युव होउनी च राहीला ॥ ४२ ॥
या ब्रह्मसृष्टिविश्वांतिल मूळ न हें मला कळों आलें ।
म्हणवुनि वैकुंठपते शरण चरणपंकजाप्रती आलें ॥ ४३ ॥
हें व्रत तुमचें देवा भक्ताला संकटांत रक्षावें ।
तरि भक्तांत अली ही कृपाकटाक्षें गणूनि लक्षावें ॥ ४४ ॥
लघु हो अथवा देवा ही दासी निजपदासि सदया ने ।
ऐकुनि करुणावाणी अभिनव केलें दयार्द्रहृदयानें ॥ ४५ ॥
तत्क्षणिं देखत देखत शिशु झाला दुडदुडा पुढें रांगे ।
मुदितमना मग राधा आलिंगुनि वदन चुंबि अनुरागें ॥ ४६ ॥
हरिच्या पदप्रसादें जी झाली संकटाब्धिला तरती ।
निर्भयचित्तानें दे निजपतिला युक्तिनें च उत्तर ती ॥ ४७ ॥
झालें जागी उठलें आलें थांबा कवाड ऊघडतें ।
आगमसमयीं कधि ही न निजें परि तें च आजि मज घडतें ॥४८॥
राधादासीऐसा ऐीला दुर्लभ हि कृष्णएकांत ।
लगबग उघडी दारा गृहांतरीं कर धरूनि ये कांत ॥ ४९ ॥
निज आली गृहि नाहीं मनुष्य दुसरें म्हणूनि दाराला ।
लावुनि घेउनि निजलें मचकिं नंदात्मजा उदाराला ॥ ५० ॥

केव्हा आला न कळे द्वारासी भागलेत हाकांनीं ।
नाहीं पडों दिला कीं निद्रेने शब्द हा कानीं ॥ ५१ ॥
सप्रेम गोप हरिला घेउनियां वदन चुंबि आनंदें ।
हें पुत्ररत्न लाभे केलें तरि पुण्य काय गे नंदें ॥ ५२ ॥
मी कार्याला जातां तूं असती एकली च गृहवासी ।
कांते कालक्रमणा आणित जा नित्य वासुदेवासी ॥ ५३ ॥
म्हणतां परी कदाचित कृष्णासह मी निजेन अवचट कीं ।
रागें भराल सत्य हि जरि वदल्ये तरि म्हणाल ही लटकी ॥ ५४ ॥
जेववितां कृष्णाला येतां तुम्हि जरि उशीर लागेल ।
उघडाया दाराला मनिं सहज चि कामबंधु वागेल ॥ ५५ ॥
शंका नाणीं आणी गोप म्हणे क्रीडणार्थ हरिला गे ।
राहिन उभा कि परतुन येइन तुजला उशीर जरि लागे ॥ ५६ ॥
आनंदे हरि राधा दध्योदन जेववूनि कृष्ण कडे ।
घेउनि निघे गजगती नेला गोविंद नंदराणिकडे ॥ ५७ ॥
बोले व्रजेश्वरीला ये ये घे हा मुकुंद सत्वरशी ।
हा वेळ गुतलें कीं कृतकृष्णाद्भुत सुशील सत्वरसीं ॥ ५८ ॥
राधे म्हणे यशोदा त्वद्गृहिं खेळे करी न रुदनातें ।
काल क्रमेल तव ही नित्य अशी नेत जा स्वसदनातें ॥ ५९ ॥
मारा हाक मला जरि जेवींना घेतली खळ रिकामी ।
नेइन माधव येउनि गृहकृत्यीं गुतलें न जरि मामी ॥ ६० ॥
न्यावा हरिला प्रतिदिनिं व्हावा तद्गृहिं युवा क्षणेकानें ।
भगवद्रतिरसमग्ना भाग्यवती स्पर्शिली न धाकानें ॥ ६१ ॥
कृष्णानंदनिमग्ना राधेचा वर्णवे न भाग्यविधी ।
म्हणवुनि व्रजौकसांचें भाग्य स्तवि राहिला उगा च विधी ॥ ६२ ॥

समाप्त.

---

## अष्टक.

अलक्ष्यलक्षास हि जो हरीतो । तो आत्मभावें चि तदा हरी तो ॥
भिन्नत्व यातें च कदा न पाहे । निरंजनीं नित्य असाच आहे ॥ १ ॥
निचेष्टिता निर्गुणता विराजे । स्वयं प्रकाशे सहजें विराजे ॥
ज्योतिर्मयानंदघनश्चिदात्मा । अव्यक्तव्यक्तांतरिं तो चि आत्मा ॥ २ ॥
वेदांतमत्तात्मक भासताहे । नसोनि भासे तरि तें चि आहे ॥

त्या वेगळें कांहिं नसे चि सृष्टी । श्रुत्यर्थसारार्थ करा स्वदृष्टी ॥ ३ ॥
धुंडोनि पाहें तरि तो चि आहे । देहांतरंगीं वरि तें चि आहे ॥
व्यापोनियां ऊर्ध्व दशांगुलातें । सनातनें सांठविलें जगातें ॥ ४ ॥
घृतापरी तें चि थिजोनि ठेलें । विज्ञानभावें [ हि ] विरोनि गेलें ॥
कालांतरीं त्यासि कदा न बाधा । × × × × × × × ॥ ५ ॥
निरंजनीं भाव जयासि पाहीं । प्रपंचवार्ता तंव लेश नाहीं ॥
त्या विश्वरूपासि विलोकिताहे । तद्रूप चिल्लक्षण लक्षिताहे ॥ ६ ॥
एकाग्रता होउनि भावना ते । निरूपिलें निर्ममभावनेतें ॥
चतुष्टयादीक गळोनि गेलें । निर्दोष निर्द्वंद्व समाधि आले ॥ ७ ॥
या अष्टका निर्मित सद्गुरू तो । सत्पादपादांबुजनिर्गमी तो ॥
निरामयी नित्य असे स्तवाच्या । त्या शंकरा द्वैत नसे त्रिवाचा ॥ ८ ॥

---

## शंकराचार्यांच्या सौंदर्यलहरीचें श्लोकबद्ध मराठी *भाषांतर.

गणाधीशालागीं नमन करितों मी निशिदिसें ।
बरी वाचा माझी सरळ कवितें फार सुवसे ॥
कवित्वीं दोषांचा समुह सहजानंद निवसे ।
शुकाच्या बोलींचा गुण म्हणुनि तुम्हां नमितसें ॥ १ ॥

**शिवः शक्त्या० ॥ १ ॥**

भवानीशीं योगें जरि शिव असे थोर जगतीं ।
नसे अंबायोगें तरि सकळ हि व्यर्थ म्हणतीं ॥
अशी तू आराध्या हरिहरविरिंच्यादिक सुरां ।
तुझ्या रूपाचें हें स्तवन करितो कोण दुसरा ॥ १ ॥

**तनीयांसं पांशुं० ॥ २ ॥**

तुझ्या रेणू अंबे लघु चरणिचा पावुनि विधी ।
धरूनीयां माथां सकळ करितो विश्व वरधी ॥
शिरीं वाहे फारा करुनि हरि पांशूसि जननी ।
पिनाकी हा यातें वपुषिं धरितो दाह करूनी ॥ २ ॥

**अविद्यानामंतः० ॥ ३ ॥**

अविद्याचा चित्तीं तिमिर रविभा भास न करी ।

---

* मूळ ग्रंथ कलकत्ता एथें काव्यसंग्रह नामक पुस्तकांत पृ० ३४१ ते पृ० ३६० पर्यंत छापला आहे.

जडाला चैतन्याकरजरसिंचा झर धरी ॥
दरिद्राला चिंतामणिसमुहमालाक्षर बरी ।
भवाब्धीमाजीं जे बुडतिल तयां दाढ शुकरी ॥ ३ ॥

**त्वदन्यः पाणिभ्यां० ॥ ४ ॥**

विरिंच्याद्यां देवां अभयवरदा ती च असती ।
नसे अंबे तू हो प्रकटितवरा भीति दिसती ॥
भयातें रक्षाया अधिक फळ द्यायासि जननी ।
तुझे पाये आहे शरण सकळांला त्रिभुवनीं ॥ ४ ॥

**हरिस्त्वाराध्य० ॥ ५ ॥**

स्वभू तूतें आधीं पुजन करुनी मोहनिरुपें ।
हराला स्त्रीरूपें भुलवि पहिलें विश्व अमुपें ॥
तुला कामो आधीं नमन करुनी सुंदर रुपें ।
महामोठ्यांचें हें मन वश करीतो चि अरुपें ॥ ५ ॥

**धनुः पौष्पं० ॥ ६ ॥**

धनु' पुष्पांचें हें भ्रमर [ सर ] ज्या पांच हि शर ।
वसताशीं मैत्री मलयपवनाचे रणधर ॥
तरी कामो तुझ्या नयनिंचि कृपा पावुनि बरी ।
समस्तांला मोहकरुनि भुलवीतो वसुवरी ॥ ६ ॥

**क्वणत्कांचीदामा० ॥ ७ ॥**

क्वणत्कांची माजीं गजसुतकपोलांसम कुचा ।
कृशा आहे मध्यें मुखजितशरच्चंद्र नभिचा ॥
धनुर्बाणा हातीं अपरकरिं पाशांकुश धरी ।
पुढें राहो ऐशी मज भगवती पाहुन बरी ॥ ७ ॥

**सुधासिंधोर्मध्ये० ॥ ८ ॥**

सुधासिंधूमध्यें सुरविटप ह्या आपरिकरीं ।
मणिद्विपामाजी निपसमुहचिंतामणिघरीं ॥
शिवाकारीं मंचीं परम शिव याची सहचरी ।
अशीतें जे ध्याती विमलसुजलानदलहरी ॥ ८ ॥

**मह्यीं मूलाधारे० ॥ ९ ॥**

मही मूलाधारीं उदक विधिच्या ठायिं अनळा ।
असे स्वाधिष्ठानीं हृदिं मरुत आकाश हि गळा ॥
असे भ्रूच्या ठायीं मन सकळ भेदूनि असती ।

सहस्रारीं पद्मीं विहरसि भवानी तुं पतिशीं ॥ ९ ॥

**सुधाधारासारैः० ॥ १० ॥**

सुधाधारासारें गळलि चरणापासुनि तुझ्या ।
प्रपंचा सिंचोनी मग बरि चिदा वोज सहजा ॥
पुन्हा वांचोनीया उदगपरि व्यापूनि सकळा ।
सहस्रारीं अंबे विहरहसि भा आस सकळां ॥ १० ॥

**चतुर्भिः श्रीकंठैः० ॥ ११ ॥**

गृहद्वारें चारी वलयति नखानें शशिकळा ।
तसें शून्याखालीं वसुदळ बरें कंकणकळा ॥
कळा त्रेताळीसा गगनिं नयनीं नव खच्या ।
अशी यंत्रद्वारा भुमिवरि शिवेसी मनिं धरा ॥ ११ ॥

**त्वदीयं सौंदर्यं० ॥ १२ ॥**

तुझ्या सौंदर्याची न दिसत असे कांहिं उपमा ।
असो जैशी तैशी विधिकविवरा चंद्रउपमा ॥
पदा देखायाला मनिं धरुनिया देवगणिका ।
तपांच्या ह्या राशी करुनि न मिळे पादरजिका ॥ १२ ॥

**नरं वर्षीयांसं० ॥ १३ ॥**

नरा वृद्धा अंधा अतिशितल जो चंद्र चि असे ।
तुझ्या नेत्रप्रांतीं पडत असता धावति कसे ॥
सुटे वेणीगाठी कुचभरभरें कंचुकि फिटे ।
तुटे कांचीभारें वसन रहिता कामिनिकटे ॥ १३ ॥

**क्षितौ षट्पंचाशत्० ॥ १४ ॥**

धरे छप्पन्नाची पयसि द्वय पन्नास अनळीं ।
कळा बासष्टी ह्या चहुं चरणिं पन्नास अनिळीं ॥
नभीं दोनी तीसांवरि मनिं कळा साठि चतुरा ।
मयूखावर्तें हें पदयुग तुझें दाखवि सुरां ॥ १४ ॥

**शरज्ज्योत्स्नाशुभ्रां० ॥ १५ ॥**

शरच्चंद्राभासा हिमकरजटाजूटमुकुटा ।
बरा भाता हातीं स्फाटिकगुटिकापुस्तकधरा ॥
सकृत् ध्याती तूतें नमन करितां देशिल वर ।
मधुक्षीरद्राक्षाहुनि अधिक वाचेसि प्रसर ॥ १५ ॥

**कवींद्राणां चेतः० ॥ १६ ॥**

कवींद्रांच्या चित्तीं कमलवनबालातपवती ।
अशीतें जे ध्याती विरलअरुणा तू भगवती ॥
विरिंच्याद्यां गोडा परम चतुरा व्याख्यकरा ।
अशा वाचेतें तूं करशिल भवानी श्रुतिसरा ॥ १६ ॥

**सवित्रीभिर्वाचां० ॥ १७ ॥**

अशा वाणीला जे हिमकरमणी छेदिति रुपें ।
वशिन्या सावित्रीयुत जननि [ ही ] चिंतित तुतें ॥
सुकर्ता काव्याचा परम चतुरेशी कवि करी ।
जशी वाणीवाणी रस अधिक त्याच्या मुखि शरी ॥ १७ ॥

**तनुच्छायाभिस्ते० ॥ १८ ॥**

तुला ध्याती अंबे उदित रविचें तेज विमला ।
भुमीस्वर्गामध्यें तुज अरुणरूपें स्मर तिला ॥
तयां वश्यां
× × × × ॥ १८ ॥

**मुखं बिंदुं कृत्वा० ॥ १९ ॥**

× × × × ।
कला हे कामाची जननि नर जो भूमि जपता ॥
स्त्रिया कामासक्ता अतिशय तयां हे लघु असे ।
त्रिलोकीला आधीं करिल वश हा निश्चिय दिसे ॥ १९ ॥

**किरंतीमंगेभ्यः० ॥ २० ॥**

समस्तांला अंबे अमृतरस घालूनि जिविसी ।
तयेला जो ध्यानीं अमृतमयरूपें धरि वशी ॥
स सर्पांच्या गर्वा शमवि गरुडाचेपरि तशी ।
भवाग्नी तप्तांना अमृतनयनें तूं सुखविसी ॥ २० ॥

**तडिल्लेखातन्वीं० ॥ २१ ॥**

तडिल्लेखातन्वी तपनशशिवैश्वानरयुता ।
षडाधारावर्ती परम विलसे हे निजलता ॥
अशा ठायीं योगी विचरति सदा आत्मनिवती ।
सहस्रारीं पद्मीं स्वरुप निज देखोनि मिळती ॥ २१ ॥

**भवानि त्वं दासे० ॥ २२ ॥**

भवानी तूं दासावरि मज कृपे पाहिं गिरिजे ।
स्तुतीची हे इच्छा धरुनि म्हणतों तू चि सहजें ॥

तथा देसी तेव्हां परम निज सायुज्यपदवी ।
मुकुंदब्रह्मेंद्रादिक मुकुट ओंवाळिति भुवी ॥ २२ ॥

**त्वया हृत्वा वामं० ॥ २३ ॥**

तुवां नेलें डावें वपु परम आसक्त मनसा ।
असे दुसें उजवें शरिर परि नेलें सुमहसा ॥
तसें सांगों तूझें अरूण रूप हें तीन नयन ।
स्तनाभारें साजे शशिशकल मांथां चि धरून ॥ २३ ॥

**जगत् सूते धाता० ॥ २४ ॥**

करी धाता सृष्टी हरि जन पहा पाळित असे ।
हरी शंभू लोकां विणतिध तुझा तो पति असे ॥
करी आज्ञा जे जे परवशतया तो करितसे ।
भ्रुकपाचा हेतू मनिं धरुनि कार्यें रचितसे ॥ २४ ॥

**त्रयाणां देवानां० ॥ २५ ॥**

तिघांला देवांला त्रिगुणजनितालार्चनफलें ।
तुझ्या पादाब्जांचें पुजन करितां त्यांसि घडलें ॥
असे कैसें होई तरि तव पदाब्जासनिं शुभे ।
असें सर्वां आहे धरुनि कर मांथां तळिं उभे ॥ २५ ॥

**विरिंचिः पंचत्वं० ॥ २६ ॥**

विपत्तीतें धाता हरि मरण पावे यम तसा ।
कुबेराला मृत्यू मरण सकळांला करितसा ।
तसा मृत्यू इंद्रा उपजत असे मीलितदृशा ॥
महासंहारीं हा शिव विलसतो एक महसा ॥ २६ ॥

**सुधामप्यास्वाद्य० ॥ २७ ॥**

सुधा ऐशी प्याला अरिभयजरानाशकरणी ।
विपत्तीतें जाती विधिशतमखादीक तरणी ॥
असें मोठें कंठें गरळ गिळितां शंकर असे ।
तुझ्या ताटंकाचा जननि महिमा थोर हि दिसे ॥ २

**किरीटं वैरिंचं० ॥ २८ ॥**

विरिंचीच्या मौळीं दुरि करिं हरीचा मुकुट हा ।
तसा इंद्राचा ही पडशिल भवानी तिरखटहा ॥
शिवाची तूं भेटी प्रतिदिन मिळायासि वळसी ।
अशा दूती वाचा नतिपुलसुरांच्या कठिणशी ॥ २८ ॥

**जगो जल्पः शिल्पं० ॥ २९ ॥**

असो माझी वाचा जप करू धुनाना चमुदरा ।
गती तूझी वर्ती अशन करितां तो कुतवरा ॥
न ती जाणों निद्रा मनवचनशी तूज मिळती ।
तयाची जे चेष्टा तुज पुजनपर्याय घटती ॥ २९ ॥

**ददाने दीनेभ्यः० ॥ ३० ॥**

दिनेच्छा तू देसी नियत मन इच्छेस्तव सदा ।
तसें सौंदर्याला अनुपम रसानें नव खरा ॥
तुझ्या पायीं माझा जिव वसतु मदारसुभगे ।
फुलाच्या सौगंधीं अलि वसति कुदासनि जगे ॥ ३० ॥

**चतुःषष्ट्या तंत्रैः० ॥ ३१ ॥**

चतुःषष्टी तंत्रीं सकल भुवनातें करुनियां ।
पुढें ते ते सिद्धी जननि सकळां देशिल तयां ॥
असो त्या निर्बंधें सकळ पुरूषार्थें चि घडलीं ।
स्वतंत्रें हीं तंत्रें भुमिवरि शिवेचीं उतरलीं ॥ ३१ ॥

**शिवः शक्तिः कामः० ॥ ३२ ॥**

शिवातें शक्तीतें मदनभुमितें भानुशशितें ।
उभा स्वामी भानू नमुचिचपरा मारशसितें ॥
मुळीं हृल्लेखा ह्या रचुनि तिनठायीं तुज वर ।
अशा वर्णातें जे जपतिल शिवे ते सुरवर ॥ ३२ ॥

**स्मरं योनिं लक्ष्मीं० ॥ ३३ ॥**

स्मरातें योनीतें तिसरि कमला ते मग मनू ।
अशा योगें केल्या अनुपम सुखाची रसतनू ॥
जपातें जे ऐसे स्फटिकमणिमालेसि धरिती ।
शिवाग्नीच्या ठायीं सुरभिघृतहोमासि करिती ॥ ३३ ॥

**शरीरं त्वं शंभोः० ॥ ३४ ॥**

शिवाची तू मूर्ती तपनशशि वक्षोराह तुझे ।
शिवाला शक्तीला न दिसत असे भेद सहजें ॥
असें अस्तां दोघां उभयसमता हे मुळ करी ।
नसे वाचा अर्थें कुसरि घटनेची च दुसरी ॥ ३४ ॥

**मनस्त्वं व्योमस्त्वं० ॥ ३५ ॥**

रसा तू नीरे तू रवि मरुत आहे चि मनु तूं ।

शिवे विश्वाकारे सकळ जन ही तूं चि मुळ तूं ॥
तुझी माया ऐशी सुरमुनिनराना परवशी ।
चिदानंदाकारें शिवयुवति भावें चि रचशी ॥ ३५ ॥

**तवाज्ञाचक्रस्थं० ॥ ३६ ॥**

तवाज्ञाचक्रस्था तपनशशिचें तेज धरित्या ।
परा ईशानाला मनन शिवसी तूज मिळता ॥
पुजा तूझी सर्वो जनसमूह व्यापूनि वससी ।
निजालोकीं ऐसे प्रतिनिधि तुझे हे रविशशी ॥ ३६ ॥

**विशुद्धौ ते शुद्ध० ॥ ३७ ॥**

विशुद्धाच्या ठायीं स्फटिकसम तेजेंशिं वसतां ।
शिवातें देवीतें भजन करितों व्योमजनिता ॥
जयाचे कानीनें शशिकिरणतेजें सम असे ।
तमातें नाशूनी सकळ जगती शोभत असे ॥ ३७ ॥

**समुन्मीलत्संवित्० ॥ ३८ ॥**

विकाशी हे संवित् कमलजरसींचा आदर धरी ।
भजे हंसद्वंद्वीं मुनिजनमना लालस चरी ॥
जयाच्या नामे ही दशगुणित विद्या मुखि सरी ॥
समस्तां दोषाला निरसुनि पयातें दुध करी ॥ ३८ ॥

**तव स्वाधिष्ठाने० ॥ ३९ ॥**

तुझ्या स्वाधिष्ठानीं हुतहव करी दाहक रूपा ।
अशा वर्षा रूपा स्तवन करितों हे करि कृपा ॥
जशी लोकीं लोकां दहन करिता तूज दिसते ।
दयार्द्री दृष्टीनें निवविसि सदा शैलदुहिते ॥ ३९ ॥

**तडित्वन्तं शक्त्या० ॥ ४० ॥**

विजेचें जैसें हें अरुण रूप तैसें तुज असे ।
स्फुरे नाना रत्नीं तिमिर-हर भूषायुत दिसे ॥
तुझे मेघाभासासम रूप असे श्याम गिरिजे ।
हराच्या नेत्रानें भुवन जळतां राखसि निजें ॥ ४० ॥

**तवाधारे मूले० ॥ ४१ ॥**

तुझ्या मूलाधारीं शिवसहित तूं नाचत दिसे ।
शिवाला मी मानीं नवरसयुतें नाटकि असे ॥

उर्मी दोघें तुम्हीं जगतत्रयसंहारक करें ।
दयार्द्रा दृष्टीनें जग जिववितसी हे मुळधरे ॥ ४१ ॥

**गतैर्माणिक्यैक्यं० ॥ ४२ ॥**

सुवर्णाच्या नानामणिखचित अंबे गगनिंची ।
निळी ह्या आकाशीं मुकुट म्हणतो जो नर रूची ॥
अशाच्या कांतीनें शशि सकल कांतीयुत दिसे ।
म्हणे इंद्राचें हें धनुष धिषणेसी दिसतसे ॥ ४२ ॥

**धुनोतु ध्वांतं नः० ॥ ४३ ॥**

तुझ्या हा केशांचा समुह मनिचें नासि तिमिर ।
बहू मोठा काळा चिकण सरला सुंदर वर ॥
जयाचा घ्यायाला परिमळ फुलें वास करिती ।
असें मानीं इन्द्राउपवनिं असोनी विलसती ॥ ४३ ॥

**वहंती सिंदूरं० ॥ ४४ ॥**

शिरीं सिंदूराची विलसत असे रेघ विमळा ।
नवें बंदी केलें कुरळ तिमिरें सूर्यशकला ॥
करू आम्ही तूशीं कुशल मुख-सौंदर्य-लहरी ।
स्वशोभेनें दोन्ही तट करूनि भांगो मिष धरी ॥ ४४ ॥

**अरालैः स्वाभाव्या० ॥ ४५ ॥**

अळीच्या सूतांशीं सम निबिड आहे कुरल ते ।
असें तूझें हासे लपन कमलाला गिरिसुते ॥
तुच्या नेत्रांचें हे भ्रमर मुख सौगन्ध्य हरती ।
मिषें हास्याच्या हे दशन-रुचि मांदें चि वसती ॥ ४५ ॥

**ललाटं लावण्य० ॥ ४६ ॥**

ललाटाची शोभा अनुपम असे हे गिरिसुते ।
दुजें मानूं इन्दू-शकल मुकुटीं काय दिसते ॥
विपर्यासें दोघे करूनि शकले एक घडितो ।
सुधासाराचा हा हिमकर भवानी विलसतो ॥ ४६ ॥

**भ्रुवौ भुग्ने किंचित्० ॥ ४७ ॥**

भ्रुवौ तूझ्या कांहीं कुटिल भुवनाचे भय-हरा ।
असे नेत्रांची या मधुकरसमा कांति रुचिरा ॥
मनीं माना उज्व्या करिं धरूनि मौर्वी त्रिनयना ।
करी डाव्या हातें धनुषशरसंधान घटना ॥ ४७ ॥

**अहः सूते सव्यं० ॥ ४८ ॥**

तुझ्या नेत्रीं उजव्या दिन दिनकरातें गिरिसुते ।
तसा डाव्या नेत्रीं शशि उदय रात्रीं विलसते ॥
तुझ्या तिसऱ्या नेत्रीं विकसित च हेमाम्बुजरुची ।
मनीं मानूं संध्या दिवस-निशिचा भाग विरची ॥ ४८ ॥

**कवीनां संदर्भः० ॥ ४९ ॥**

कवींचे गानादी पदसमुह शृंगारभरिते ।
कटाक्षप्राच्या पातें भ्रमर-शिशु कर्णीं च वसते ॥
कधीं सोडीना ते नवरस तुझा स्वाद तरला ।
परोत्कर्षासाठीं अरुण नयनाची धरि कला ॥ ४९ ॥

**विशाला कल्याणी० ॥ ५० ॥**

विशाला कल्याणी वरशचि अयोध्या कुवळिका ।
कृपासिंधू जाणा तसिच मधुरा भोग-लतिका ॥
अवती ते दृष्टी बहु नगर-थोरी च विलसे ।
पुरी साती त्यांची मज नयन-शोभा बरि दिसे ॥ ५० ॥

**शिवे शृंगारार्द्रा० ॥ ५१ ॥**

शिवे शृंगाराचा द्रवविण मुखीं कुत्सनवती ॥
असे रागें गंगेवर हरचरित्रें स्मयवती ।
शिवा सर्पा भ्याली वरकमल शोभे चि जननी ॥
सखीसंगीं स्मेरा तुझि सकरुणा दृष्टि जननी ॥ ५१ ॥

**गते कर्णाभ्यर्णं० ॥ ५२ ॥**

तुझ्या कर्णप्रांतीं गरुडसमपातीं च धरिती ।
हराच्या चित्ताला रतिरसझरा फार करिती ॥
अशीं नेत्रें दोन्हीं गिरिवरकुळीं भूषण-करें ।
धरी कर्णीं ओढी स्मरशरविलासा जनिं भरे ॥ ५२ ॥

**विभक्तं त्रैवर्ण्यं० ॥ ५३ ॥**

तिघांच्या जन्माला विधिहरिशिवा भेदक खरीं ।
तुझीं नेत्रें तीन्हीं मज कळत आहे परवरी ॥
हरी वामीं उजव्या विधि नयनिं तिसऱ्या हर असे ।
रजः सत्वं क्रूर तम इति गुणांचे त्रय दिसे ॥ ५३ ॥

**पवित्रीकर्तुं नः० ॥ ५४ ॥**

तरायाला आम्हां पशुपतिपराधीन मनसे ।

दया मित्रीं नेत्रीं पुनित परभावें विहरसे ॥
अधीं वाणी गंगा तपन-तनया लोचनमिसें ।
त्रिवेणीचा मेळा अरुषित काळा मज दिसे ॥ ५४ ॥

**तवापर्णे कर्णे०** ॥ ५५ ॥

तुझे डोळे कानीं पिशुन कथनाचें गुज धरी ।
भयें वर्ती पातीं करुनि बुडती अंबु शफरी ॥
दिवा दीजे बोधें कुमुददलपाटा मुकुलितें ।
पहाटे जाऊनी निशि उघडुनी श्री विलसते ॥ ५५ ॥

**निमेषोन्मेषाभ्यां०** ॥ ५६ ॥

निमेषे उन्मेषें प्रलयउदयातें जग करी ।
तुला ऐसें बोलें सुजन जगतीचें भय हरीं ॥
तुझ्या उन्मेषानें जग उपजतें झाकिसि जरी ।
तरी मृत्यु त्याचा ह्मणुनि वरती पाहणि धरीं ॥ ५६ ॥

**दृशा द्राघीयस्या०** ॥ ५७ ॥

विशाला दृष्टीनें विकसित इषन्नील कमलें ।
दुरस्था दीनाला मजवरि कृपे पाहिं कपिले ॥
अशानें मीनासी व्यय तुज न हो काहिं दुसरा ।
शशी हर्म्यीं रानीं समकर पडे तेज खचरा ॥ ५७ ॥

**अरालं ते पाणी०** ॥ ५८ ॥

तुझ्या वक्रा भ्रू ह्या कुसुमशरचापभ्रमकरी ।
जनाला मोहातें हिमगिरिसुते पीयुष खरी ॥
सुगंध-भ्रांतीनें नयन उभयें षट्पदसित ।
अपांगा लोकाला शर निशित संधान करित ॥ ५८ ॥

**स्फुरद्गंडाभोग०** ॥ ५९ ॥

तुझीं ताटकें हीं प्रतिफलति गालावरि बरीं ।
चहूं चक्राचा हा मुखरथ म्हणे काम समरीं ॥
शिवाला जिंकाया रविशशि रथांगें भुमि रथ ।
तयाहूनी मोठा भुवन-विजयी काम करथ ॥ ५९ ॥

**सरस्वत्याः सूक्तीः०** ॥ ६० ॥

जरी वाणी वाणी अमृत रस सारा स्वि लहरी ।
भवानी आई हें श्रवण-पुटकीं सादर भरीं ॥
चमत्कारें गाता चपल श्रवणीं कुंडलगण ।

झणत्कारीं शब्दीं प्रतिवचन देतो कवि ह्मण ॥ ६० ॥

**असौ नासावंशः०** ॥ ६१ ॥

तुझ्या नासावेला निकट गत हा घोंस फळला ।
गिरींद्राच्या वंशी ध्वजवरपटीं तूं शशिकळा ॥
जयामध्ये मोत्यें शितलतर निश्वास घडलीं ।
समृद्धीनें त्यांच्या विलसत असे कीं स्वमुरली ॥ ६१ ॥

**प्रकृत्या रक्तायाः०** ॥ ६२ ॥

स्वभावें जो तांबूडा चिकण सरला ओष्ठ सुदते ।
प्रवालाची शोभा मज दिसत नाहीं कठिण ते ॥
न ताम्रत्वें तुंडीफल शितल आहे जलमय ।
असो जैसा तैसा अधर-सम तो विद्रुमचय ॥ ६२ ॥

**स्मितज्योत्स्ना-जालं०** ॥ ६३ ॥

स्मितज्योत्स्नाजालें वदन तव चंद्रासि पिवती ।
चकोराला झाली मधुरसपणें तोंडि विकृती ॥
असे अस्तां चंद्री अमृत-लहरी आंबट रूची ।
पिवंती स्वच्छंदें निशि अतिशयें कांजिक रूची ॥ ६३ ॥

**अविश्रांतं पत्युः०** ॥ ६४ ॥

निरंतर्यें शंभो गुण गण कथा-बोल जपते ।
जपापुष्पाकारा जननि तुझि जिव्हा विजयते ॥
जिच्या अग्रीं वाणी स्फटिक इव शोभे गिरिसुते ।
जपापुष्पीं जैसा स्फटिक मणि आणी विलसते ॥ ६४ ॥

**रणे जित्वा दैत्यान्०** ॥ ६५ ॥

रणीं जिंकोनीयां दुरि करुनि टोपासि असुरा ।
तसा शर्वाणीशीं त्रिपुरहर निर्माल्य हि शरा ॥
विरिंचीद्रोपेंद्रैः शशिशकल-कर्पूर- धवला ।
लयातें ते पावे तव वदन तांबूल-कवला ॥ ६५ ॥

**विपंच्या गायंती०** ॥ ६६ ॥

गिरा वाणी गातां बहुविध शिवाचा हि महिमा ।
तुवां आरंभीलें स्तुतिवचन भागासि करि मा ॥
तुझ्या माधुर्यानें लपवित असे तंत्रिरव हा ।
विण्यातें हे वाणी वसनकरुनी झांकित पहा ॥ ६६ ॥

**कराग्रेण स्पृष्टं० ॥ ६७ ॥**

पित्याने बोटाग्रीं धरुनि दयया उच्च वदनीं ।
तशी शंभूनें ही मुहुरधरपानासि करुनी ॥
सुखादर्शा लोभें चुबुक धरुनी काम करवी ।
कशी बोलावी हे वदन उपमा तूज बरवी ॥ ६७ ॥

**भुजाश्लेषान्नित्यं० ॥ ६८ ॥**

भुजीं आलिंगाया मकर धरितो मान कुरळा ।
मनीं मानू कां हे मुखकमल-नालाचि कमला ॥
स्वतः श्वेता काळा अगरु बहु पकें चि मलिना ।
मृणालीची शोभा धरित असते हार-तुलना ॥ ६८ ॥

**गले रेखास्तिस्रः० ॥ ६९ ॥**

गळा रेखा तान्हीं भुत भवति भावी च करिसी ॥
विवादाचे नेणा त्रिगुण-गुण तंत्री परवशी ।
विराजे तो नानाविध मधुररागाधर असे ॥
तिघा ग्रामांची हे स्थिति नियम-सीमा मज दिसे ॥ ६९ ॥

**मृणालीमृद्वीनां० ॥ ७० ॥**

मृणालीच्या तंतू सम भुज तुझे चारि असती ।
असा तो धाता हा वदनि करितो चौं स्तुतिगती ॥
नखापासूनीयां भय मज मुखीं नाहिं रचिलें ।
तसें चौं शीरांचें अभय मज हो सार धरिलें ॥ ७० ॥

**नखानामुद्द्योतैः० ॥ ७१ ॥**

नखांची कांती हे नवनलिनरागासि हसते ।
करांच्या कांतीला कवण उपमा ये गिरि-सुते ॥
असो एक्या पक्षीं कमल उपमा रक्त रमणें
जया ठायीं लक्ष्मी चरणिं अलिता राग सुगुणें ॥ ७१ ॥

**समं देवि स्कंदद्विप० ॥ ७२ ॥**

पिती दोघे स्वामी गुह गणपती हे स्तनयुग ।
तसें माझ्या खेदा हरु उदरिंचें प्रस्नुत युग ॥
बघंती देखोनी कर धरितसे व्याकुल मनीं ।
स्वकुंभातें पाहे गणपति समाधान करुनी ॥ ७२ ॥

**अमू ते वक्षोजौ० ॥ ७३ ॥**

तुझे हे वक्षोजा अमृतरसमाणिक्यकलश ।

शिवाची तू देवी गिरिवर पताका मज दिसे ॥
पिती ते अद्यापी अविदितवधूसंगम सदा ।
कुमाराचें आहे वय गजमुखा पर्वतभिदा ॥ ७३ ॥

वहत्यंब स्तंबे० ॥ ७४ ॥

गळा मुक्ताहारा गज असुर कुंभांतरगिका ।
असे केली मुक्तामणिंहि अमला हारलतिका ॥
कुचाभोगामध्ये अधर रुचि आरक्त पडली ।
प्रवाळीं गुफीली पुरविजयिनाकीर्ति धवली ॥ ७४ ॥

तव स्तन्यं मन्ये० ॥ ७५ ॥

स्तनापासूनीयां स्रवत पय हें तें गिरिसुते ।
तुझ्या दुग्धाधारा मज कळत वाणी-रूप सुते ॥
दया अंबे दालें रुदित शिशु देखोनि पहिलें ।
कवीला प्रौढाला कविवरद हा प्राशन फळे ॥ ७५ ॥

हरक्रोधज्वाला० ॥ ७६ ॥

हराच्या क्रोधाग्नी लहरिनिवहें युक्त शरिर ।
बहू खोला नाभी सरसि करि पात स्मरविर ॥
तया माजी झाली अचलतनया धूमकलिका ।
अशी ते तो जाणे जन जननि रोमाचलतिका ॥ ७६ ॥

यदेतत् कालिन्दी० ॥ ७७ ॥

असे कालिंदीच्या अतिलघुतरंगा समाळिका ।
कशा माजामध्ये उदरिं झळके नीळकलिका ॥
स्तनाभोगासंगे अति लघु दिसे व्योम-निलिमा ।
प्रवेशाची इच्छा धरुनि मिळते नाभि-दरि मा ॥ ७७ ॥

स्थिरो गंगावर्तः० ॥ ७८ ॥

स्थिरो गंगावर्ती स्तनमुकुलरोमावलि लता ।
जलावाळीं कुंडीं कुसुमशर तो जो हुत व्हता ।
रतीचे हे लीलाघर दिस न नाभाति गिरिजे ।
शिवाच्या नेत्राचे विवरसमुहो सिद्ध सहजे ॥ ७८ ॥

निसर्गक्षीणस्य० ॥ ७९ ॥

स्वभावें क्षीणाला कुचतटभरें हा श्रम धरीं ।
नतीनें भिन्ना हा करि तव शशी क्षीण दुसरीं ॥
तुझ्या मध्याला हें कुशल परि हो शैल-तनये ।

नदी-तीरीं वृक्षा गति आणि तशी त्या परिचयें ॥ ७९ ॥

**कुचौ सद्यः स्विद्यन्०** ॥ ८० ॥

शिवे स्वेदोबिंदू कुचतटपटीमाजि निघती ।
तयांची जैं धारा उदरवलिमाजीं विलसती ॥
तया राखायाला कृश उदर तूझें सजवली ।
त्रिठायीं रोमाची त्रिवलि लवली ते च रचिली ॥ ८० ॥

**गुरुत्वं विस्तारं०** ॥ ८१ ॥

नितंबाची थोरी लघुपण विशालेसि गिरिजे ।
तसें कोणा साम्यें निरुपम सुखाचे हि सहजें ॥
असें असतां त्याला म्हणाति वरदे थोर सम हा ।
नितंबाची थोरी लघुपण विशालेक परि हा ॥ ८१ ॥

**करींद्राणां शुंडा०** ॥ ८२ ॥

गजेंद्रांच्या शुंडा कठिण शितला हेम-कदली ।
तसें साम्या दोन्ही अनुपउपमा देवि भुतलीं ॥
तशा वाटोळ्या ह्या प्रणतिकठिणी अंतर गुणे ।
अशा सुव्यक्तीनें भगवति शिवाला रतिपणें ॥ ८२ ॥

**पराजेतुं रुद्रं०** ॥ ८३ ॥

शिवाला जिंकाया द्विगुणशरगर्भा गिरिसुते ।
असे भाते दोन्ही मदन कत जंघा विलसते ॥
असें नसता दोघा दशशरफला पाउलिं कळे ।
नखाग्राच्या मीसें सुरमुकुटशाणेसि धरिलें ॥ ८३ ॥

**श्रुतीनां मूर्धानो०** ॥ ८३ ॥

श्रुतींचे मूर्धे हे धरिति मुकुटाचे परि शिवे ।
तसे माझ्या माथ्यावरि धरिं भवानी पद नवे ॥
जयाच्या पाद्यार्घ्यो शिवशिरजटाजूट नदि हे ।
तया लाक्षाशोभा हरिमुकुटमाणिक्य-रुचि हे ॥ ८४ ॥

**नमो वाचं ब्रूमो०** ॥ ८४ ॥

वचा सूक्तें बोलों नयन रमणी हे पदयुगें ।
तुझी रक्त आलीं क्रतु अधिक शोभेति सुभगे ॥
शिवाला हे इच्छा जरि मज घडे संग सहजें ।
अशोकाला जैशी युवतिचरणाची रति भजे ॥ ८५ ॥

मृषा कृत्वा गोत्र० ॥ ८६ ॥

मृषा केले नामग्रहण चरणींगेति विभवा ।
ललाटीं भर्तारा चरणयुगुलीं मारिसि शिवा ॥
चिरात् पोटीं शल्यें दहनकृत दुःखें धरि भजे ।
पदा भूषा शब्दीं प्रतिवचन देतो मनसिजे ॥ ८६ ॥

हिमानी हंतव्यं० ॥ ८७ ॥

तुझ्या पादाब्जाला कमलउपमा साधु न बरी ।
निशामालिन्याला मलिन-पण हे देख कुसरी ॥
उभी लक्ष्मी पात्रें अनवरत देती श्रियफला ।
तुझे पाये पद्मा जयति म्हणिजे काय नवला ॥ ८७ ॥

पदं ते कीर्तीनां० ॥ ८८ ॥

विपत्तीतें नाशी पदयुगल कांती अतुल दे ।
कसें नेलें संतीं कठिन कमठीसाम्य सुखदें ॥
तसें तुझ्या हातीं उपयमनकालीं स्मरहरा ।
जया देणें दीलें उपलि दयया चित्तचतुरा ॥ ८८ ॥

नखैर्नाकस्त्रीणां० ॥ ८९ ॥

नखीं नाकस्त्रींचें करकमल संकोच धरिसें ।
तुझें पादाब्ज हें दिवि तरुवराला हसतसे ॥
फलातें अर्थ्याला दलकरमिसें देत विरला ।
दरिद्र्याला मोठी श्रिय दिनिपदें देत सकला ॥ ८९ ॥

कदा काले मातः० ॥ ९० ॥

कवींद्राची माते वद सुकवितालक्षरसें ।
तुझ्या पादाब्जाचें निसृतजल कें घेइन तसें ॥
प्रकृत्तीनें मूका सरल कवितेचा भर महा ।
जया घेती वाणी मुखकमलतांबूलरस हा ॥ ९० ॥

पदन्यासं क्रीडा० ॥ ९१ ॥

तुझ्या चालण्याची गति शिकुन घ्यावा मनिं बरी ।
तरी हंसा ये ना तुझि तशि विशाला चि कुसरी ॥
तसा मंजीराचा रव पद विनिक्षेपजनिता ।
मिसें घेती लीला पद भुमिवरी हंस धरितां ॥ ९१ ॥

गतास्ते पंचत्वं० ॥ ९२ ॥

कसा पंची झाला विधिहरिहरा विश्वपु हा ।

हिरण्याधो गर्भो अनवरत कार्पासपट हा ।।
तुझ्या तेजाचें हें प्रतित फळलें काय शरिरा ।
रुपाच्या शृंगारा रसनयन शंभू सुखकरा ।। ९२ ।।

**आराला केशेषु० ।। ९३ ।।**

जिच्या केशां थोरी सरल मुखिचें मंद हसित ।
शिरिषाभा देहीं स्तन उपलसाम्या च धरित ।।
असे तन्वी माजीं स्थुलतर नितंबासि वसती ।
जगातें रक्षाया अरुण रूप हें काय जयती ।। ९३ ।।
नितंबाच्या ठायीं जननि महिमा हा चि अणिमा ।
स्तनाभोगीं गुर्वी कटि वर दिसे काय महिमा ।।
तुझ्या नेत्रीं प्राप्त्यादिक चतुर सिद्धी विलसती ।
अशीतें जे ध्याती प्रतिदिन तयांष्टी च पुजिती ।। ९४* ।।

**समानीतो० ।। ९५ ।।**

तुझ्या वक्त्राचा हा दिनमणि बरा दर्पण असे ।
भया हानीचा हा स्तिमित करणी रक्त विलसे ।।
तुझ्या ऐशी कोठें शशिविजित शोभा विकरित ।
निशाकाळीं पद्मा विकसतपणें हीच दिसत ।। ९५।।

**कलंकः कस्तूरी० ।। ९६ ।।**

नव्हे इंदूबिंब मकरतकरंडा जलमये ।
कला कर्पूराच्या निलिपण दिसे कस्तुरिचये ।।
तुझ्या भोगासाठीं प्रतिदिन क्षयो यासि घडतो ।
विधाता चंद्राला पुनरपि तुझ्याज्ञेन करितो ।। ९६ ।।

**पुराशतेरंतः० ।। ९७ ।।**

तुझ्या पादाब्जांचा पुजनमहिमा कोण बरवा ।
तवेकीं निष्ठाला अदळपद भार्गेशि पुरवा ।।
तसें सांगो तूशी शतमखमुखादीक अतुला ।
तुझ्या द्वारोपान्तीं स्थित चि अणिमाद्यादि सकळा ।। ९७ ।।

**कलत्रं वैधात्रं० ।। ९८ ।।**

त्रिधात्याच्या स्त्रीतें किति किति भजेना कविवरा ।
तसा लक्ष्मी होतो धन करुनि भर्त्तार नवरा ।।

---

* श्लोक ९४ व ९५ हे कलकत्ता एथील काव्यसंग्रहांत आढळत नाहींत. ९४ ह्या संस्कृत श्लोकाचे आरंभींचे शब्दही आमचे जवळचे प्रतींत नाहींत.

शिवातें टाकूनी नवलसि तशी नाम तुजला ।
अशी अंबे योरी भुवनजननी तूं पर कला ॥ ९८ ॥

**स्वदेहोद्भूताभिः ॥ ९९ ॥**

स्वदेहापासूनी किरण अणिमाद्यादिकयुता ।
अशी जीची सेवा करूनि अहमस्मीति भजतां ॥
शिवाच्या भाग्याला तृणरूप म्हणे काय नवल ।
महासंवर्त्ताग्नी प्रतिदिन सदातीं करि पल ॥ ९९ ॥

**गिरामाहुर्देवीं० ॥ १०० ॥**

विधात्याची देवी म्हणति तुजला आगमविदो ।
हरीची तूं लक्ष्मी शिवमहिषि कोणी तुज वदो ॥
तुरीयानिर्वाच्या अनुपम असे योर महिमा ।
महामाये विश्वा भुलविसि परानंद चरमा ॥ १०० ॥

**समुद्भूतस्थूलस्तन० ॥ १०१ ॥**

स्तनाभारें साजे स्थुल रूप तुझें चारु सहित ।
कटाक्षें कंदर्पा जिवविसि कदंबा वपु मत ॥
सुराला एकांतीं भ्रम जनविसी काय नवल ।
तुझ्या भक्ता अंबे तुजविण नसे ब्रह्म विमल ॥ १०१ ॥

**सरस्वत्या लक्ष्म्या० ॥ १०२ ॥**

कशा वाणी लक्ष्मी विधिहरिचे भार्या मज दिसे ।
रतीपातिव्रत्या रूप दुर करी त्या म्हणतसे ॥
तुझ्या भक्ता ऐसा परम रस घेतां उपजतो ।
चिरंजीवी हा तो दुरि करूनि संसार भजतो ॥ १०२ ॥

**निधे नित्यस्मेरे० ॥ १०३ ॥**

शिवे नित्या योनी अनुपम गुणैश्वर्य करणी ।
न भेदाज्ञानेशीं बहु रूप तुझे चित्त हरणी ॥
नसे दैवाधीना सकळ निगमे तूज पुजिती ।
भयातीते सत्ये श्रुतिसम असो हे स्तुतिगती ॥ १०३ ॥

**प्रदीपज्वालाभिः० ॥ १०४ ॥**

रवीला ज्वालांहीं प्रदिप जरि नीराजरचना ।
हिमांशूला चंद्रोपलजल चि हे अर्घ्यघटना ॥
समुद्रापासूनी जल धरूनि त्यालार्पित तसें ।
तुझ्या वाचा अंबे स्तविति तुजला हा मद दिसे ॥ १०४ ॥

## उपसंहार.

अशुद्ध परिभाषा ही या कृता मदचेतसा ॥
शोधयंतु विशेषज्ञा गुणागुणविशारदाः ॥ १* ॥

इति श्रीमच्छंकराचार्यविरचित सौंदर्यलहरीपरिभाषा अमृतलहरीनाम्नी समाप्ता.

---

# नानासाहेब पेशवे यांस

## शिवरामकविकृत उपदेश.

स्वस्ति श्रीयशकीर्त्ति पूर्ण विजयी औदार्य संपन्न हो ।
श्रीमत् श्रीप्रिय बाजिरावसुत तू सर्वत्र कीं मान्य हो ॥
तूं कीं मुख्य प्रधान छत्रपतिचा विख्यात उर्वीवरी ।
बाळाजी तव नाम पंडित असें श्रीराजमुद्रेवरी ॥ १ ॥
सद्वंश धन्य कुलभूषण धन्य तू कीं ।
विद्वज्जना द्विजकुळा प्रिय पूर्ण तूं कीं ॥
तूं पुण्यशीळ तुज भूतदया समान ।
चातुर्य ज्ञान शुर सत्व कृपानिधान ॥ २ ॥
भूदेवां प्रतिपाळिसी हरिप्रिया अत्यंत सन्मानिसी ।
दुष्टांतें दमिसी भल्या न छळिसी सर्वांतरा जाणसी ॥
सत्पात्रीं भजसी असार त्यजिसी सद्बुद्धिनें वागसी ।
नाना रंगरसीं कदा न रमसी सप्रेम तूं मानसीं ॥ ३ ॥
नाना धर्म तुला कितेक घडले निष्कामना बुद्धिनें ।
उर्वीचे नृप सर्व वश्य तुज कीं आपार देती धनें ॥
त्या द्रव्यें द्विज साधु तृप्त करिसी सप्रेम संवादसी ।
धर्मार्थे निज काम मोक्ष सह तूं नाना सुखें नांदसी ॥ ४ ॥
निःसीम पुण्य तप पूर्विल हो उदेलें ।
नाना तुवा सुकृत दान [ चि ] शुद्ध केलें ॥
यालागिं ब्राह्मणकुळीं अवतंस तू कीं ।
श्रीभार्गवासमसमान चि अंश तूं कीं ॥ ५ ॥
तत्वार्थी तत्वज्ञाना विवरण करुनी होय तो शुद्ध जैसा ।
सिद्धांतीं निश्चयाचा भवगजरिपुचा केसरी पूर्ण जैसा ॥
तो की साधू निजाचा सहज गुण असा स्वात्मभावार्थ ज्याचा ।

---

* रा० रा० कृष्णाजी विष्णु कालगावकर यांनीं हें भाषांतर पाठविलें

सत्संगें साधकांचा क्षिण चि परिहरे बोध बाधी निजाचा ॥ ६ ॥
तू देही देह भाव साच चि नसे तूं प्राक्तनातीत कीं ।
निर्हेतें अहिकुंडलान्वित जसा विस्मीत ना स्वस्थ कीं ॥
अस्ती भाति तुझा चि तूं प्रिय तुतें आत्मा चि आत्मार्पणें ।
यालागीं देह नाम साच चि नसे नाना जशीं दर्पणें ॥ ७ ॥
अध्यात्म श्लोक परि प्राकृत भास यांसी ।
जो सद्गुरु भजनशीळ कळेल त्यासी ॥
अन्हेर प्राकृत म्हणोनि करूं नये हो ।
नानार्थ वित्पति तयांत गणून ये हो ॥ ८ ॥
हे कीं श्लोक असे चि नवविधा भक्तीरसें तूजला ।
नाना शोधुनि अर्थ निश्चय रुपें हे लीहिले कीं तुला ॥
पाहें अर्थ विलोकुनी अनुभवें अर्थार्थि कीं होउनी ।
होसी श्रीधर शीवराम चि स्वयें मीं तूं असे नुर्वुनी ॥ ९ ॥

समाप्त.

---

## अष्टादशश्लोकी गीता.*

न इच्छीं जय ही कृष्णा न राज्य अथवा सुखें ।
राज्यभोगें जीवितें ही गोविंदा काय आमुतें ॥ १ ॥
न हा होतो मरतो वा कधीं ही । देहासंगें होउनी होत नाहीं ॥
अजा नित्या शाश्वता या पुराणा । देहासंगें मारितां मारवेना ॥ २ ॥
तत्वज्ञ गुणकर्मांच्या दोभागीं स्थ अकर्तृता ।
पाहे कीं स्वस्वविषयीं इंद्रियें हीं निवर्तती ॥ ३ ॥
कर्ता अग्नि हविद्रव्यें ब्रह्म ब्रह्मीं च अर्पिणें ।
कर्मी ब्रह्मसमाधिस्थ त्यार्णे ब्रह्मीं च पावणें ॥ ४ ॥
विद्या सद्गुणसपन्नीं ब्राह्मणीं धेनु ही मधें ।
गजीं श्वानांत चांडाळीं पाहती सम पंडित ॥ ५ ॥
धारणायुक्त बुद्धीनें व्हावें स्थीर हळू हळू ।
योजूनि चित्त चिन्मात्रीं कांही चिंतू नये कधीं ॥ ६ ॥
पच भूतें बुद्धि मन अहंकार हि आठवा ।
माझी प्रकृति हे ऐशी अष्टधा भेद पावली ॥ ७ ॥

---

* मूळ सस्कृत अष्टादश श्लोकी गीता संस्कृत अनेककविकृत प्रकरणें पृष्ठ २२९ ते २३१ यांत छापिली आहे.

ओं हें एकाक्षर ब्रह्म जपे मातें स्मरे असा ।
अर्चिरादि पथें जाय ब्रह्मा सह तया गती ॥ ८ ॥
अन्य टाकूनि मातें चि चिंतिती यजिती जन ।
जे नित्य युक्त त्यांचा तो मी योगक्षेम वाहतों ॥ ९ ॥
आतां या बहु ही ज्ञानें जाणसी किति अर्जुना ।
जें अधिष्ठूनि उरलों एकांशें ही न हें जग ॥ १० ॥
ऐसें हृषीकेश तुझ्या स्थितींत । हें विश्व हर्षें अनुरागयुक्त ।
दिशांप्रती राक्षस जाति धाकें । समस्त ही वंदिति सिद्ध लोकें ॥ ११ ॥
निरस्पृही शुद्ध जो दक्ष उदासीन गतव्यय ।
आरंभ सर्व ही टाकी आणि भक्त तो चि प्रिय ॥ १२ ॥
न लिंपे जेंवि आकाश सूक्ष्मत्वें सर्व ही स्थळीं ।
सर्वत्र सर्व देहीं ही तसा आत्मा न लिंपतो ॥ १३ ॥
जाणे प्रकाश प्रवृत्ती मोहसत्वादि लक्षणें ।
प्रवृत्तिकर्मी न द्वेष निवृत्ति जो अपेक्षिना ॥ १४ ॥
प्राणी यांच्या शरीरांत मी वैश्वानर होउनी ।
प्राणापानीं पचवितों मी च अन्नें चतुर्विधें ॥ १५ ॥
जो शास्त्र चि सोडूनी स्वेच्छाचारें चि वर्ततो ।
न तो पावेल सिद्धीतें न सुखा न बरी गती ॥ १६ ॥
नेदी क्लेश असें वाक्य सत्य ही प्रिय ही हित ।
वेदवेदार्थ अभ्यास वाचेचें तप बोलिजे ॥ १७ ॥
स्मृती आली मोह गेला प्रसादें अच्युता तुझ्या ।
असें मी गतसंदेह तुझें वचन मानिन ॥ १८ ॥
जेथें श्रीकृष्ण योगेश जेथें पार्थ धनुर्धर ।
माझ्या मतें तेथ जय भाग्य श्री नीति शाश्वत ॥ १९ ॥

अष्टादश श्लोकी गीता समाप्त.

---

## राजाराम प्रासादीकृत पदें.*

### पद १.

सीतास्वयंवरातील. नंदगृहाच्या अव० या चालीवर.

काय कुमारमणें आणिला ॥ कठिण समय असला ॥ अनावर ॥ ध्रुवपद ॥

---

* या पदांचे राग, चाली, वगैरे माहिती वे० शा० सं० रा० रा० पांडुरंग आबा जोशी मोघे हरदास वसईकर यांनीं दिली आहे. हीं सर्व पदेंही त्यांनींच दिलीं.

ध्यो तरि मानें वरिलाचि सख्या तूं । काय तयाचे तेजा वानूं ॥
वाटे मज तो उगवला भानू । ऋषिमंडळिं बसला ॥ सबांधव ॥ १ ॥
उद्धत भय दे रावण मानी । न कळे मेला वीस करांनीं ॥
मोडिल धनु मग पडिलें रानीं । पण करुनी फसला ॥ जनकनृप ॥ २ ॥
काय असुनि हें राज्य रसादिक । व्यर्थ म्हणुनियां जीव असादिक ॥
राजारामीं रत प्रासादिक । असतां विभु तसला ॥ वरिल क्षणि ॥ ३ ॥

## पद २.

अक्रूरगमनांतील. मंदगृहाच्या• या चालीवर.

नंद यशोदे-नगरिं सखे ग बाइ । हा कोण रथवाला ॥ ध्रुवपद ॥
एक वदे श्रीहरिला नेतो । बळरामहि त्या संगें जातो ॥
उगि च वदे हरि सत्वर येतो । जगणें कैशाला ॥ किं आतां ॥ १ ॥
अक्रूराभिध हा मथुरापुरिचा । परि दिसतो क्रूर वृषभ धुरीचा ॥
काढुनि नेतो हरि हा उरिचा । आक्रांत जाहला ॥ तेव्हां कीं ॥ २ ॥
घे जा प्राण अशा त्या कामी । करती विलाप राजारामीं ॥
प्रासादिक हे शोक वदेनां मी । त्यांणीं जो केला ॥ तेव्हां कीं ॥ ३ ॥

## पद ३.

कृष्णवर्णनाचें. भागला हा जीव• या चालीवर राग भैरवी.

लागला मज छंद हरिचा न सुचे कीं व्यवसाय घरींचा ॥ ध्रुवपद ॥
कृष्ण दिसे मज जनिं वनिं बाई ॥ पीत पटाचा पदर जरीचा ॥ १ ॥
काय वदूं कौस्तुभमणि झळके । जो राधेचा हार उरींचा ॥ २ ॥
होता प्रेमा परिस विसरला । तिलक ठशाचा जेंवि जरीचा ॥ ३ ॥
राजारामीं लीन प्रासादिक । जो नावाडी भवजल-तरीचा ॥ ४ ॥

## पद ४.

राग पूर्वा त्रिवट कृष्णवर्णन.

गाई रे मुरलींत कान्हा तो यशोदेचा तान्हा तेणें न पिति पान्हा शिशु हि गाई रे मुरलींत कान्हा गाई रे ॥ ध्रुवपद ॥
नृत्य हि रुचिर करि वाजति मधुर भरितदा नूपुरें झण झण गाई रे ॥ १ ॥
त्रिधि ताल धरी शिव हि मग लगबग डमरु वाजवित खण खण खण गाई रे ॥ २ ॥
मुरलि मुरलि परि परिसुनि मुलिसी भरे डमर-ज्वर फण फण फण गाई रे ॥३॥
दास राजारामिं लिन प्रासादिक ते चरण पाहण्याकरितां ते मुनिजन-गण गाई रे ॥ ४ ॥

## पद ५.

देवीवर्णन, राग भैरवी त्रिवट, लागला मज छंद० या चालीवर.

भागला हा जीव भवानी दाखिव पदराजीव भवानी ॥ ध्रु० ॥
लक्ष नको चौऱ्याशी जनि या भव ही तूं भाजीव भवानी ॥ १ ॥
निज जन रसनेकरविं अमाया नामसुधा पाजीव भवानी ॥ २ ॥
पतित असे परि पावन करुनी यमदूतां लाजीव भवानी ॥ ३ ॥
राजारामीं लीन प्रासादिक त्रिभुवनिं यश गाजीव भवानी ॥ ४ ॥

## पद ६.

परमेश्वरप्रार्थना. साधन नाम चि तारें या चालीवर.

तुजविणें कोण दया करणार ॥ ध्रु० ॥
श्रीजगदीश हरे सुखसिंधो ह्मणतां अघ हरणार ॥ १ ॥
चिंताडोहीं बुडतां तेथें येऊनि कर धरणार ॥ २ ॥
त्यागुं नको मज निज यश राखीं विश्वातें भरणार ॥ ३ ॥
राजारामीं लीन प्रासादिक वचना अनुसरणार ॥ ४ ॥

## पद ७.

भक्तप्रिय राग कल्याण त्रिवट.

पांडुरंग भज सांडुनियां सुत धाम काम विचारें ॥
जो खलदंड मुंडमंडिताग्र शिरिं धरि तो अखंड पुंडलीक-मंडन पांडुरंग० ॥ ध्रु० ॥
पंढरी सप्तपुरींमध्यें सुंदरी वंदित ही ईश पुरंदरी सोडुनि वरिती गि-रि कंदरीं मुनि ई ई ईतें ॥
जेथें बहु तरला पतित जन जेथें बहु तरला श्रीहरि पाहुनि अवत-रला भीमातीर धीर धीर नीर घनगभीर वीर दीर रेवतीचा ॥ पांडुरंग० ॥ १ ॥
पावतां सर्वां भक्तांसी धांवता तें देखुनियां कीं सांवता लपला कां इत रागावता हरि ऐइइसा ॥
वेदा गवसे ना हरि जो वेदा गवसे ना त्यासि प्रिय नाहवि सेना सु-तार जळूं मळूं वळूं हि लगो जनिस हळू हळू दळूं चळूं न दे व्रत पांडुरंग० ॥ २ ॥
श्रीतुकाराम ज्ञानेशासी तुका रोहिदास हि नत जी तुका चोखा गोरा ही तीतुका हरि पाआआआई ॥
दाम्याचा नाम्या बोधला दाम्याचा नाम्या तो तरि विसरावा कां त्या

नमिति हरवक्त तक्त सक्त भक्त जवळि न नक्त फक्त भक्तियुक्त हे नर पांडुरंग० ॥ ३ ॥
पाहिला विठ्ठल मीं मस्तक वाहिला पदिं वरुनी रुक्मिणी राहिला दिं-डीरवनीं प्रभु राहिला जन हो ओ ओ ओ तो ॥
रत राजारामीं प्रासादिक रत राजारामीं या भूवैकुंठग्रामीं कधिं तु-ह्मि गाल गाल गाइ जाउनि साल साल सालसा त्यजुनि वच ॥ पांडुरंग० ॥ ४ ॥

## पद ८.

शबरीचरित्रांतील हरि मजला चालवेना या चालीवर.

रघुपति कां हो भेट देइना ॥ ध्रु० ॥
माझे गुरुजि मातंग- । ऋषि बोलिले श्रीरंग ॥
वेगें भेटेल अभंग । तें वचन गुणासी येईना ॥ १ ॥
ज्याच्या विलोकनासाठिं । करुनियां पर्णकुटि ॥
वनिं तपें करिं मोठिं । परि कार्य सफल होइना ॥ २ ॥
तनु पहातां न बरि । फार मलिन कबरि ॥
भार असोहि शबरि । तार म्हणुन परि निकट नेइना ॥ ३ ॥
दास राजारामीं लीन । झाले प्रासादिक दीन ॥
जैसे जळाविणें मीन । विभु कसा येऊनि यश घेइना ॥ ४ ॥

## पद ९.

पमंगारी सारिगा या चालीवर

क्रम करीं कीं असा क्रम करीं ॥ ध्रुवपद ॥
भ्रमरसम रमुनि मन वरीं पदसारसा क्रम करीं कीं असा ॥ १ ॥
राम चरण कमल मुनि-जन धरि धरि तसा कीं असा ॥ २ ॥
सारीं असुलद चद कदनदपद सदयसा कीं असा ॥ ३ ॥
राजारामीं रत प्रासादिक धरुनियां भरवसा ॥ ४ ॥

## पद १०.

आल्यें सहज मी आल्यें रे यदुवीरा सहज मी आल्यें ॥ ध्रु० ॥
तू कोठिल मी कोण कुणाची । नवलचि आजि जाहलें ॥ १ ॥
सोडिं पदर दर कांहिं नसे तव । पाहती नगरजन भले ॥ २ ॥
राजारामीं लीन प्रासादिक । निजसुख पर लाधलें ॥ सहज मीं आलें ॥ ३ ॥

## पद ११.

बोला अतां हें बोला बोला हो जातां कुठें अतां हें बोला ॥ ध्रु० ॥
सजल तटाकीं गजेंद्रपदातें नक्रें दिधला झोला ॥ बोला हो० ॥ १ ॥

घरिं नसणें बसणें पार्थ-रथीं चाकरसें कामाला ॥ २ ॥
यवन कबीर नामें महा साधू विणिला त्याचा शेला ॥ ३ ॥
दीनवत्सल नामास्तव जानों काय वदावें तुला ॥ ४ ॥
राजारामीं लीन प्रासादिक मनिचा संशय गेला ॥ बोला हो० ॥ ५ ॥

## पद १२.

सुजनता धरीं सुजनता धरीं रे कांहीं तरी सुजनता धरीं धरीं ॥ ध्रु० ॥
ह्मणती तुजला या गोकुळिचा निजजनिता चौधरी ॥ १ ॥
ह्मणती गोपी सोडुनि शिशुपण दास जना उद्धरीं ॥ २ ॥
राजारामीं लीन प्रासादिक उतरीं भवसागरीं ॥ ३ ॥

## पद १३.

उत्तररागिणी नादरदरदीं तथीं तथीं ना या चालीवर.

नमितसें रमेऽब्धि कन्ये वैष्णवि होसिल काय
मूकसम घड घड घड घड घड घड घड घड बोलुनी सुखी कर ॥ ध्रु० ॥
कर धर हर शिव की मत्कर अघ जों-वरी नसे यमप्रदर्शन
जाहल्यावर नर सुर जनजननी कराल काय धराल काय हराल काय ॥ १ ॥
करधृत खेटक मातुलिंग सत्पानपात्र पारदे भवाचल
गड गड गड गड गड गड गड गड कोसळे समुद्वर ॥ २ ॥
राजारामीं रत प्रासादिक देह हा नसेचि यास्तव अंतक
कड कड कड कड कड कड कड कड खात दांत मजवर ॥ नमितसें ३

## पद १४.

गोपीविनोद. काय मनाला सं० या चालीवर.

अहा हरि हा काय धरिसि कर गौळणी बहुजणि असतां रे ॥ ध्रु० ॥
कुंजवनीं गोपिकां सहित मी चुकवुनि तुजला फिरतें रे ।
कोठुनि येथें कसा अलासी अपराध हि तिळ नसतां रे ॥ १ ॥
बोलू तरि शिण होतो सखया नख या दृष्टि न पडतें रे ।
दडतें जरि माहेरिं परि घडतें पाप अणिक तुम्हीं हसतां रे ॥ २ ॥
सदय विभू कळवळला तेव्हां कर जोडुनि वंदितसे ती रे ।
राजारामीं लीन प्रासादिक हर्ष मनीं पद ठसतां रे ॥ ३ ॥

## पद १५.

नाममहात्म्य प्रीति धरीं हरि या चालीवर.

हा भवसिंधु तरावा । मी ना राम मुखीं गावा ॥ ध्रु० ॥
गणिका-गेहीं लपट होसी । किति तरी फजित करावा ॥ १ ॥

दौलत करुनी बहु मिरविशी । किति तरी धनसुत थावा ॥ २ ॥
शतबुद्धि ठायीं करिल बिठाई । तव मन हार तरावा ॥ ३ ॥
गुरुरायाचे लागें पायां । बायां काय न जावा ॥ ४ ॥
राजारामीं लीन प्रासादिक । हांसत संग धरावा ॥ ५ ॥

## पद १६.

गान्हाणीं — रागें भरली यशोदा० या चालीवर

कां रे ऐसा झालासी धुंद तूं । गान्हाणें हें किती असे कां बोल कां रे ऐसा ॥ ध्रु० ॥

ऐक यशोदे गे गुण याचे मुल नाहीं दुजा । असा मुल नाहीं दुजा ॥
लोणि शिके शिंगे पाडी घाटी काठिवाला तुझा । हरी काठीवाला तुझा ॥
ठेवूनि लोणि गे पाहि नयनीं मांजराच्या झुजा । लावी मांजराच्या झुजा ॥
न वदसि पोता जागी होतां हंसत निघाला खोटा मोठा चंडोल ॥ कां रे० १
दुसरी ग बोले मग बहु कुसरी आंवर पातें झणी ॥
असुनि आमुचे पति नांवाचे हाचि झाला धणी ॥
गरतपणा गे माझा घेउनी आला हेंचि क्षणीं ॥
न कळे कां तुज काय वदूं मज लाज हि वाटे पाचि माझि कां शोल ॥
कां रे ऐसा० ॥ २ ॥
तिसरी बोले घरीं करी चोरी काय थोरी तरी । याची काय थोरी तरी ॥ १ ॥
जाति धराया गे चार सहा अठरा ही परी ॥
बधन पावेना थकलें मी धीट मोठा हरी ॥ तुझा धीट मोठा हरी ॥
पिकलें हें खुळ गोकुळिचा कुळधर्म बुडाला कांहिं मिळेना देतां मोल ॥
कां रे ऐसा० ॥ ३ ॥
वदे मग माता तीं गण-नाथा नवस करीतें तुला । हाचि नवस करीतें तुला ॥
करिन चतुर्थिचें व्रत तुझें गुण दे या मुला । नीट गुण दे या मुला ॥
कंदुक दे म्हणुनि छळि राधे नवल वाटे मुलां । याचें नवल वाटे मुलां
न वसे धामीं राजारामीं लीन प्रासादिक ज्याणीं केला बिगोल ॥ कां रे ऐसा० ॥ ४ ॥

## पद १७.

सद्गुरुमहिमा. — त्रिवट.

हा सुलभ उपाय जन्म मरण चुकवाया मनुजा धरिं सद्गुरुचे पाय ॥ ध्रु० ॥
सोसुनि शीतोष्णादिक विजनीं श्रमविति किति नर काय ।
त्यक्तवसन पंचाग्निसाधनें किति करसिल हायहाय ॥ १ ॥
निश्चय तद्वचनीं ठेवुनि जानें भवनीर तरुनि जाय ॥

गुरु-विण तुज अन्य सुलभ तरि साधन दिसतें काय ॥ २ ॥
जिवा शिव करी देशिक हे शिक घेशी कारि उरुगाय ॥
राजारामीं रत प्रासादिक सतत सद्यश गाय ॥ ३ ॥

### पद १८.

तदरदानिदीं तनोम् या चालीवर

मदनजनना हा रे रे सुख-सदना । नंदनदना कुंदरदना ॥ ध्रु० ॥
गांजिति मज स्मरशर दुर्धर हे देईं आलिंगन तो हि शुद्ध रंगधर सुंदर मदना १
व्हावें शरण गानें भावें यश बहु दयाघना ते तरि कठिण हि गुणगणना ॥ २ ॥
वससी तरि कुणिकडे म्हणुनि जनिं राजारामीं लीन जाण प्रासादिक करि मनना ३

### पद १९.

पंढरीमहात्म्यवर्णन. धुंदी जाली दरबारीं या चालीवर.

दिवस आज धन्य आनंदाचा । देव पाहिला पंढरीचा ॥ ध्रु० ॥
भक्तवर पुंडलीक ज्याचा । महिमा मोठा आषाढीचा ॥
करुनिया प्रदक्षिणा नाचा । बोलति राम कृष्ण वाचा ॥
जेथें लाग नसे अरिचा । देव पाहिला पंढरीचा ॥ १ ॥
निकट ज्या रुक्मिणीसह राही । भक्ता बाउ नको राहीं ॥
म्हणतसे विश्वाची आई । विटेवरि उभी विठाबाई ॥
प्रेमरस जाइल कीं कांहीं । म्हणवुनि खळगा करि पायीं ॥
काबळी तकट पदर जरिचा । देव पाहिला पंढरीचा ॥ २ ॥
म्हणाति बुध हरिचरणीं लागा । वारकऱ्यात नीट वागा ॥
ईप्सित विठ्ठलासि मागा । प्रभूच्या कीर्तनांत जागा ॥
क्षितिवरि नसे अशी जागा । जेथें वाहे चंद्रभागा ॥
दर्शनें लाभ घडे हरिचा । देव पाहिला पंढरीचा ॥ ३ ॥
प्रेमे नामाचा दंगा । करुनिया दुष्कर भवभंगा ॥
लावुनि तुळशि बुका अंगा । भेटा सदय पांडुरंगा ॥
वरदा या राजाराम-संगा । प्रासादिक सादर प्रसंगा ॥
हेतु मग पुरला अंतरिंचा । देव पाहिला पंढरीचा ॥ ४ ॥

### पद २०.

सीतास्वयंवरास जाण्याचें मदगृहाच्या जवळ० या चालीवर.

राम म्हणे सानुज मी येतों गुरुवर्या न्या हो जनकपुरीं ॥ ध्रुवपद ॥
विश्वामित्र म्हणे मग रामा पत्रास्तव जाणे हें आम्हा ॥
श्रम होतील पथिं तुज सुखधामा आग्रह हा राहो नको धरूं ॥ १ ॥

ऋषिवर्या सोडुनि सत्संगा । स्थिति योगें न क्षिण झगटो अगा ॥
नृप तेथें चापाच्या भगा । करितील ते पाहों नयनभरी ॥ २ ॥
घे मुनि मग सगें रघुराया । उद्धरवी पथिं गौतमजाया ॥
राजाराम प्रासादिक पाया । लागुनि धन्या हो ॥
तीस हि म्हणे । राम म्हणे धन्या हो ॥ ३ ॥

## पद २१.

सीतास्वयवरांतील; पायीं पैजण वाजत झण झण या चालीवर.

जनक विनोदें कन्यार्पण करि जनक वि० ॥ ध्रुवपद ॥
मडप थंड अखंड विराजित । तोषतसे मुक्त घोस हि लोंबति ॥
स्तभ कनक परी ॥ १ ॥
भूप अमूप तसे द्विज आठवि । पत्रें त्यां पाठवि शीघ्र पहा तीं ॥
वेळा गणक वरी ॥ २ ॥
राजारामीं लीन प्रासादिक । जनकरुणार्णव धन्य असे या ॥
म्हणति सनक हरि ॥ जनक विनोदें० ॥ ३ ॥

## पद २२.

शूर्पणखा विटबना, जनकविनोदें० या चालीवर.

पायिं पैंजण वाजत झण झण ॥ ध्रुवपद ॥
शूर्पणखा पण खास करुनि मनिं । यास वरिन मी च म्हणुनि अली ॥
जैं घर घरधनी ॥ १ ॥
टाकुनि रूप स्वकीय उभि भुलवी । त्रैलोक्याचा नाथ पहा ॥
हा रघुवीरमणी ॥ २ ॥
राजारामीं प्रासादिक लेखन । घेउनि जाय त्वरें मग लक्ष्मण ॥
वर वर वर हाणि ॥ पायिं पै० ॥ ३ ॥

## पद २३.

तेनेनादर दरतों तनन या चालीवर ॥ कल्याण रागी तराणा.

कुजभगिनि कांत करुणा करा वद झणीं तू ये करणि तुजविणें अज नाहीं कुणी ॥
अनाथनाथ नावनाकधि तरि करिल कोण यम रणीं हाणिल शर सणणण-
णण ॥ कुजभ० ॥ ध्रुवपद ॥
घडि पळ घडि पळ वय जाय कपें पाहें म्हणतो साहें थोडि अहे तुझिये
चरणिं ये मरकटवत्तरफडतें मन जडवि जडवि ॥ कुजभ० ॥ १ ॥
भवसागरिं बुडें हरि गरुडावरि बसुनि किंवा तसा च परि लवकर ये ॥
मंगल त्वत्सग हा घडवि घडवि ॥ कुजभ० ॥ २ ॥

राजारामिं रत प्रासादिक वचनासमान देणार तुजसमान नाहिं नाहिं गु- णि या सुंदरवर कुंदरदन भर दर्डावे दर्डावे ॥ कुजभ० ॥ ३ ॥

### पद २४.

उद्धवगमनांतील; उद्धवा शांतवन कर जा० या चालीवर.

उद्धवा सुखि आहे कीं । तो मनमोहन हरि माझा ॥ ध्रुवपद ॥
उद्धवा जन्मला येथें । हरि पाहीं त्याची न्हाणी ॥
या स्थळीं घातलें पायीं । कृष्णासी उष्ण मि पाणी ॥
ऐकुनि त्या हरिसी छळिलें । गोपींची बहुत गान्हाणीं ॥ चाल ॥
पाठविला धेनूपाठीं । त्याचि ही घोंगडी काठी ॥
घालितां जेउं या ताटीं । वदला मज पान्हा पाजा ॥ १ ॥
मृत्तिका भक्षितां मज कीं । धरुनिया लगबग जाता ॥
धांउनियां धरितां वदला । अइ सोडीं मजला आतां ॥
परि मारीं उखळीं बांधीं । दुष्ट मी कैची माता ॥ चाल ॥
तें दुःख भतां ओसणतें । स्मरतां मनिं हृदयीं हणतें ॥
दुष्ट या भूमिवर म्हणते । असि नसल दुसरी भाजा ॥ २ ॥
आवरे न दुःख नंदासी । हबरडा फोडुनि बोले ॥
उद्धवा केवळ अमुचें । गोकुळिचें निज सुख गेलें ॥
अक्रूरें दुष्टें कैसें । मोहक मज करूनी नेलें ॥ चाल ॥
उठ जेवीं आतां नंदा । म्हणे कोण अभाग्या मंदा ॥
बोळवितां मीं गोविंदा । वदला मज मागें जा जा ॥ ३ ॥
त्या गोकुळिच्या मग नारी । उद्धवा बोलती भारी ॥
मथुरेसि नेउनि कंसारी । अपुली का आली स्वारी ॥
हा प्राण अहे तों यावें । हें कळवा त्या अधिकारी ॥ चाल ॥
तो कृष्णाचि राजारामीं । पाववी प्रासादिक धामीं ॥
राहिला स्वसुख विश्रामीं । मथुरेचा होउनि राजा ॥
उद्धवा सुखि आहे कीं । तो मनमोहन माझा ॥ ४ ॥

### पद २५.

तो चि काय मथुरेचा राजा । झाला काय मथुरेचा राजा ॥
होता जो व्रजांत नित्यजात । वरूनि म्हणति तक कुणि पाजा ॥ ध्रुवपद ॥
रविजातटिं अन्नकवल सेवी न म्हणे चि शिळा ताजा ॥
निज गोपांसि वदे न बसा कीं उठुनि गाइ चारा जा ॥ १ ॥
दास्यकार्य करि आपण कुब्जा बटिक भली ती भाजा ।

काय तिचा बडिवार फारसा त्यजिल्या जिणें लाजा ॥ २ ॥
उद्धव शुद्ध वदे परि न पडे गोपवधूच्या काजा ।
राजारामीं रत प्रासादिक स्वामी व्यापक माझा ॥ तोचि का० ॥ ३ ॥

## पद २६.

कृष्णलीला. चतरंगकु गावरसद्या या चालीवर.

हरि मला बहुत घरीं जाच जाच अज काचण भारी तरि सारि नसता येउनि तरि धरि करिं वरि हरि मला ॥ ध्रुवपद ॥
हृदयिं थोर आन नसे तुजविणें त्यजुनि त्यजासि काय करूं जिणें ॥
परि टपणि घर-धणी असति म्हणुनि भिणें हें व्यसन अजि परिहरिं. हरि हरि मला० ॥ १ ॥
मानीसि जाण वचन हें न लटिकें भकसि तरि हि लौकिक न टिके ॥
आणि नमन करितें शरणि गमन हें आहे निकें ॥
राजारामीं प्रासादिक तरि हरि मला बहुत० ॥ २ ॥

## पद २७

कृष्णलीला

नको पदरा धरू अह्मि व्रजवासि नारी ॥ ध्रुवपद ॥
भये विकलें कोठें म्हणुनि कळेना ॥
कोण कोणाचा तू अनावर होसि भारी ॥ १ ॥
सये कसला गे धीट याचि मोठी कटकट ॥
दिन रजनीं असे लपुनि उभा द्वारीं ॥ २ ॥
नंदयशोदेसि हा लाविंसि डाग कां ॥
मत्सदनीं तरि म्हणतिल काय सारीं ॥ ३ ॥
राजारामिं लीन कीं होईं प्रासादिक ॥
सोडीं पटा हटा नमितसें पूतनारी ॥ नको पदरा धरूं ॥ ४ ॥

## पद २८.

जा हरि माघारा अतां येतों असावि दया ती ॥ ध्रुवपद ॥
हित गुज मज बोलत बसलासी । श्रम झाले बहु रातीं ॥ १ ॥
मित्र तुझा एक विप्र सुदामा । हृदयिं वसोत हिनाती ॥ २ ॥
राजारामीं लीन प्रासादिक सदया आलि दया ती ॥ जा हरि० ॥ ३ ॥

## पद २९.

यदुवीरा आतां नताला तारीं श्रमलों भारी ॥ ध्रुवपद ॥
या भवसागरीं तुजसम सदया कोणि दिसे न उतारी ॥ १ ॥

मम दुरितक्षय करीं काष्ठाचा चूर जसा कातारी ॥ २ ॥
मीपण पळवीं समज गुणात्मकीं एक तुझी ज्ञातारी ॥ ३ ॥
राजारामीं कार्य प्रासादिक झणि करणी दातारी ॥ ४ ॥

## पद ३०.

साधन नाम चि सार या चालीवर.

स्मर दत्ताचे पाय मनुजा ॥ ध्रुवपद ॥
जन्मा येऊन नरदेहाच्या त्याविण सार्थक काय ॥ १ ॥
ज्याचें स्मरण न करिता प्राण्या आयुष्य व्यर्थची जाय ॥ २ ॥
राजारामीं लीन प्रासादिक धन्य सद्गुरुमाय ॥ ३ ॥

## पद ३१.

गान्हाणीं चाल त्रिवट.

यशोदे बाई आज निरुपाय झाला । कृष्ण घडोघडी छळितो आम्हाला ॥ध्रुवपद॥
नवनीत शिरिं बाइ घेऊनि जाता । करितो आम्हावरी भलतीच सत्ता ॥
करिं बाई याच्या बंदोबस्ता । सांगु किति गान्हाणीं सुत तुझा चळला ॥ १ ॥
आजपासुनि बाई येईल गृहा हा । ताडीन मी याचा विचार पहा हा ॥
कसे न म्हणसील बाई सदनीं च राहा । पती माझा रागिट मारिल याला ॥ २ ॥
निशिदिनीं लागे हा आमुच्या छंदा । न सुचे अम्हाला गृहीं क्षण धंदा ॥
सांगु किती बाई दिवसाुनि तिंदा । राजारामीं वसे प्रासादिकाला ॥ यशोदे बाई आज० ॥ ३ ॥

## पद ३२.

राग तोडी चौताल.

करवीरवासिनी आइ तुला काशी करूणा नये तरि करवीर० ॥ ध्रुवपद ॥
अंबा जगदंबा भवस्तंभा क्षय करिल असा होता भरवसा तो अजवरी ॥१॥
चरणा शरणागत परि स्मरणातें नाणिशी हा न पडे कीं समज मला ॥
जमला रस रिपुस माज मजवर तर दर नाश सुरवर नर जननि पहा ॥ राजारामीं लीन प्रासादिक करिं धरिं ॥ करवीर० ॥ २ ॥

## पद ३३.

साधन नाम चि सार या चालीवर.

भज मन दक्षिणपति केदार ॥ ध्रुवपद ॥
राजिवनेत्र सुवाजिवरि बसे दीनाचा सरदार ॥ १ ॥
खड्ग त्रिशुल धरि करिं धरि करिं जो ॥ रत्नासुरसंहार ॥ २ ॥
राजारामीं लीन प्रासादिक ॥ करितो जगदुद्धार ॥ भज० ॥ ३ ॥

## पद ३४.

आग्यहीन मी देवकी या चालीवर.

दत्तात्रेय चतुराक्षरी मंत्र महा सर्वांसी ॥
जप हा अखंड करणें जाणुनि नर तनु परवासी ॥ ध्रुवपद ॥
दत्त बोलतां सहज जीवा होईल आनंद ॥
दरिद्र दुःख ही जाळुनि विलया होसी सुखकंद ॥
दमयंतीसम पावसि कीं पुण्य श्लोक पद ॥
दवडुनि अज्ञान जड तम हें करिं सत्सवाद ॥ १ ॥
तात जगाचा जो त्या गांवा त्रिगुणात्मक दत्ता ॥
तापस जन विश्रांति स्थाना हर्षद जो संता ॥
ताल स्वर सह गानप्रिय यत्सर्वात्मकसत्ता ॥
तारक नत-सुख कारक करि जो षड्रिपुंच्या घाता ॥ २ ॥
त्रेधा सर्व निवारण होई पाहतां सुचरित्रें ॥
त्रेपंनामधें युग्म कमि अध्याय पहा नेत्रें ॥
त्र्यंबक विष्णु ब्रह्मात्मक हे तोषति शमिपत्रें ॥
त्रेसष्टां वरि एक अशा हि कळा जुन या स्तोत्रें ॥ ३ ॥
यश प्रभूचें भावें गावें रूप हि तें ध्याय ॥
यमदंड हि मग सहजें निरसे धरितां ही सोय ॥
यवढें निज सुख दे गुरु जैसें मीनातें तोय ॥
यत्सुख राजारामीं लीन प्रासादिक होय ॥ दत्तात्रेय० ॥

## पद ३५.

राधा आली कृष्णाजवळी रथ त्याणें लोटिला हो ॥ ध्रुवपद ॥
गोकुळात क्रीडा करितो गोपाळांसि लपणीं धरितो ॥
शंख करें न करीं धरितो हात लावि गोटिला हो ॥ १ ॥
अक्रूराच्या करण्या ऐशा नंदासि आवडल्या कैशा ॥
यशोदेला तरि या ऐशा काय बुद्धि खोटिला हो ॥ २ ॥
त्यागुनिया आपुल्या पतिला शरण आल्या ज्या श्रीपतिला ॥
वाटे त्याणीं माझ्या मतिला ब्रह्मरस घोंटिला हो ॥ ३ ॥
गाइल्या ज्या सुख सदासि कृष्ण कथा प्रिय ज्यां त्यासी ॥
राजारामीं लीन दासी प्रसादाच्या कोटिला हो ॥ राधा आली० ॥ ४ ॥

## पद ३६.

दत्तराज गुरो सुखधामा सतत कृत औदुंबर विश्रामा ॥ ध्रुवपद ॥

पडतिल कोणि अंतिं न कामा स्त्री सुत काका मामा ॥ १ ॥
कोण तुला दवडी भवपामा सुंदर मेघश्यामा ॥ २ ॥
कां रे प्रसाद राजारामा विनवी पावन नामा ॥ दत्तराज० ॥ ३ ॥

## पद ३७.

दत्तात्रय श्रीपद या चालीवर.

जनिं भले भले बहु तरले अनुसरले भजनें त्यजुनि योग
विविध भोग म्हणति जनार्दना सनातना सुगम विचार हाच ॥ ध्रुवपद ॥
सतत राम कृष्ण हा वदनिं जप हे करुणाघन हरि यदुपते
मंदरधर कुंदरदन सुंदर विश्रांति हृदया परात्परा रमावरा करुनि असाच
नाच ॥ १ ॥
ज्ञानदेव नामदेव तुकया नाथ कमाल कबीर नरहरी
रंगनाथ आनंदमूर्ति जयराम रामदास केशव हे हि पांच ॥ २ ॥
म्हणुनि सार साधनांत नाम चि गा सतत निज सुखद जन हो ॥
राजारामीं लीन प्रासादिक सुलाभ लाभ लाचला चुकवुनि काळ जाच ॥
जनिं भले भले ॥ ३ ॥

## पद ३८.

हरि मला बहुत घरिं जाच या चालीवर.

पंढरी दिनाची माय जींत सुखदायक रुक्मिणिनायकाद्य विभो जो सतत
उरुगाय नांदे ॥ पंढरी० ॥ ध्रुवपद ॥
द्विज शूद्र हि भोळे वारकरी । जाति पथिं वरती माधुकरी ॥
खाति अमृत ते मानुनि भाकरी । वर मिरच्या मिळल्या हि कांदे ॥ १ ॥
किती भोमा पाहतां नर नाहती । विष्णु चि ते होऊनि राहती ॥
स्वेच्छा हि विचरते दृढ गमती । धन्य ते हि खगेंद्र खांदे ॥ २ ॥
राजारामीं रत प्रासादिक । म्हणति निजभजनाचे शिक ॥
जिच्या करितां पतकरिता साधक अधिक अधिक सत्संग सांदे ॥ पंढरी दि० ३

## पद ३९.

हो सावध मनुजा लौकरी । वय पल जाय घडी ॥ ध्रुवपद ॥
नेणुनि संसृतिचें ओझें । किति माझें माझें ॥
म्हणसि तुझें तुज परि साजे । मन कांहि न लाजे ॥
वय दवडिसि दुर्मिळ खाजें । श्रुतिदुंदुभि वाजे ॥ चाल० ॥
नायकसि म्हणु तुज काय पशु जाण ।
लाभोनिया व्यर्थ होतें नरदेहाचें ठाण ।

दारापुत्र मारितातिं वचनांचे बाण ।
हें का प्रिय तुज घर घर प्राण्या दृष्टि करीं उघडी ॥ १ ॥
यमलोकीं अथवा नार्की । नेतिल तुज पहा कीं ॥
करितिल धन झांकाझांकी । पापपुण्य बाकी ॥
दारासुत तुजला टाकी । हें मनिं तूं स्मर कीं ॥ चाल० ॥
ठेवितिना कोणी तत्वें गेलीं पांची पांच ।
तुझें कर्म तुजपाशीं त्यासि येतो नाच ॥
बरें पाहें मागें पुढें तेथें मोठा जाच ।
अनुताप मनीं धर धर प्राण्या वसविल काळ जडी ॥ २ ॥
अम्मल मायेचा मोठा । करिल तुझा तोटा ॥
जरि असती धाटा मोठा । या वितभर पोटा ॥
साठि फिरवी पसरुनि ओंठा । क्षण नाहिं विसोटा ॥ चाल ॥
परि बोल मनीं सिते त्यजुनियां हट ।
तरि भवजल-तमि होईल पहांट ।
राजारामीं लीन दिसे प्रासादिका वाट ।
भगवत यश मनिं भर भर प्राण्या ॥
पावसि पैल-थडी । हो सावध मनुजा लौकरी ॥ ३ ॥

## पद ४०.

यदुराया ही लाज तुम्हांला ॥ ध्रुवपद ॥
कोठें गुंतलासि द्वारकावासी । आला समय हा हृषिकेशी ॥
तुजविण मी हें सांगुं कोणासि । देवा धांव आता गहजप झाला ॥ १ ॥
दीनवत्सल हि ब्रिदावळी गाजे । अनाथाचा नाथ नाम तुज साजे ॥
बोल परिसा हे दयाघना माझे । सर्व परि आह्मां तुमचा हुमाला ॥ २ ॥
भ्रमरासि जैसा असे मकरंद । तैसें तुम्हांविणें आह्मां सुखकंद ॥
राजारामीं लीन प्रासादिका छंद । पुरवाया हरि धाउनि आला ॥
यदुराया ही० ॥ ३ ॥

## पद ४१.

कारे हरी मसि जाउं न देसी । जारे घरिं हरि कां हट घेसि ॥
थारे नाहित काय तुम्हांसि । बा रे पतिभय फार आह्मांसि ॥ १ ॥
जाईं समजाविती कृष्णाला । आह्मी वाट धरावी कशाला ॥
तो हि गोकुळीं पालनवाला । साही त्रिभुवनपालनवासि ॥ २ ॥
हाय हाय सोडीं पदर जातों धार्मी । खाय खाय नवनीत घरिं घरिं नामी ॥

काय काय म्हणुनि वदुं राजारामीं । जाय जाय सदनीं प्रसादिक येसी १

पद ४२.

देवा कोण आतां तारी । धुंदी झाली दरबारीं ॥ ध्रुवपद ॥
पांडव तुज म्हणति खासा । दवडिसि त्यांतें वनवासा ॥
छळीं निशि येउनि दुर्वासा । परि तो पावे सुग्रासा ॥
गोपी अनुसरल्या रासा । विरहें देसि तयां त्रासा ॥
आवडे तुज कुब्जा नारी । देवा कोण आतां तारी ॥ १ ॥
त्वन्मुखिं थाकि कुचविष घोंटी । मानिसि देवकीसम पोटीं ॥
ज्याचीं आचरणें खोटीं । वंदविसि तेयुनि शतकोटी ॥
कीर्तनि नारदराति मोठी । थड त्या न मिळे लंगोटी ॥
असि काय चाल तुझी भारी । धुंदी झाली दरबारीं ॥ २ ॥
त्वां जे भक्त विभो केले । ते विचित्र करिते झाले ॥
कोणीं पशूनें बोलविलें । अमृत मृतातें सेवविलें ॥
कन्ये पुंस्त्व चि लेवविलें । मृतपितरांतें जेववीलें ॥
मारुनि कां उठवा घारी । धुंदी झाली दरबारीं ॥ ३ ॥
अघटित-घटना पटु देवा । नकळत लीलेचा ठेवा ॥
इच्छि मन निज धन हिन ठेवा । यातें पादिं कां न च ठेवा ॥
वद या राजाराम सेवा । पुरविं प्रासादिक हेवा ॥
घेउनि दाद भवा वारीं । धुंदी झाली दरबारीं ॥ ४ ॥

पद ४३.

प्रियधाम बहुतकाम तुजसि राम फुकाचा ।
कां रे नाठविसी तूं हा उपदेश सुखाचा ॥ ध्रुवपद ॥
ज्याचा पाय पडतां दगड दिव्यकाय झाला ।
वानुं काय स्वसुख दायक रघुराज पाला ॥ १ ॥
ऋषि-संग धरुनि रंग धनुभंग करोनी ॥
अयोध्येस ये रमेश जनकजेसि वरोनी ॥ २ ॥
गेल्या वक्त हें चि तक्त न मिळे नक्त दिल्यानें ॥
हरिसि आवडे भक्त बहु आसक्त मनानें ॥ ३ ॥
तरले भावुक किति दावु चरित कां हो कळेना ॥
असुनि ठाउक तुज हा उपाय कां हो जडेना ॥ ४ ॥
एक गोड नाम जोड सकळ सोड मदासी ॥
राजारामीं लीन प्रासादीक पदासी ॥ प्रियधाम बहुत० ॥ ५ ॥

## पद ४४.

काय मनाला संशय गमला सांग मला रघुराया रे ॥ ध्रुवपद ॥
रुचिर मधुर कटु आम्ल कळाया चाखिलीं बोरें निज दंतें रे ॥
पक्षिउच्छिष्ट कशास आणिन मी रमाधवा तुज खाया रे ॥ १ ॥
क्षुधित असाल वनांत म्हणवुनि बहु फिरलें जगदीशा रे ॥
धावत आज परि भासतसे मज श्रम गेले कीं वाया रे ॥ २ ॥
राजारामीं लीन प्रासादिक मग तीं बोरें भक्षितसे रे ॥
भाग्यचि हे सुरगण म्हणाति असा प्रसाद मिळाया रे ॥ काय मनाला सं० ॥३॥

समाप्त.

# मराठी अनेककविकृत कविता भाग २ रा.

## शुद्धिपत्र.

| पृष्ठांक | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ४ | आरिसा | आरसा |
| ,, | ११ | जें | जे |
| ,, | २५ | .बहुत | बहूत |
| २ | २ | मंतरें | मंतरें |
| ,, | ६ | तो पूर्ण | जो पूर्ण |
| ४ | २२ | पुढे | पुढें |
| ६ | ४ | चेवबा जा | चेवबा जो |
| ,, | २० | म्हणुनि | म्हणुनी |
| ७ | ३२ | सर्मि | सर्मी |
| ८ | ३१ | ऐकुनिया | ऐकुनियां |
| ११ | ४ | पूजा | पुजा |
| १२ | ८ | परिहरि | परिहरु |
| ,, | १० | नीध हे | नीधि हा |
| ,, | १४ | ऐसा परि | ऐशापरि |
| ,, | २१ | ऐसें | केलें |
| ,, | २४ | देव | देव |
| १४ | १८ | बहुत | बहूत |
| १६ | १०' | बाधनार्थ | बोधनार्थ |
| १७ | २ | घेत | देत |
| ,, | ३० | झडकरी | झडकरि |
| ,, | १२ | पंथ | पांथ |
| १८ | १ | रघि | रीघ |
| २० | ७ | घृतसुधा | घृतदुधा |
| ,, | १७ | जिवि | जिवि |
| ,, | २५ | जिविचें | जिविचें |
| २१ | २३ | मारुति तें | मारुतितें |
| २३ | १८ | करुणा | कारुणा |
| ,, | १६ | सूध | सूध |
| ,, | २८ | भवनेत्रा | भुवनेंद्रा |
| २५ | २ | धावोनिया | धांवोनियां |
| २८ | ७ | कांति | कांती |
| ,, | २५ | वस्त्रहीनियउदका | वस्त्रहीनउदका |
| ,, | ३१ | आसनी | आसनीं |
| २९ | २४ | घेधित | घेत |
| ,, | ,, | अभिवास | अधिवास |

| पृष्ठांक | ओळ | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३० | १३ | मरणासी | मरणासि |
| ,, | १८ | निशिदिनीं<br>ध्यान | निशिदिनीं<br>त्या ध्यान |
| ,, | २६ | भ्रकु टि | भ्रुकुटि |
| ,, | २७ | सुखदटी | सुखदिठी |
| ३१ | ५ | अलख | अलक |
| ३२ | ४ | ब्रह्मसना-<br>तन वृंद | ब्रह्मसनातन<br>नंदनवनींचा<br>अनंद भोगी वृंद |
| ,, | ५ | मत्स्य मस्तितें | मत्स्य कच्छ ते |
| ,, | ६ | पाहुनि<br>दृष्टी | हे शब्द मुळीं<br>च नकोत |
| ,, | ,, | देखुनि<br>कष्टि | देखुनि हृदय-<br>सपुटीं कष्टि |
| ,, | ७–८ | वडाळ होउनि<br>धुमाळ | सुढाळ मौ-<br>क्तिकमाळ |
| ,, | ८ | साल | शील |
| ,, | १२ | सलज्जगतिनें | म्लानवदन<br>अति अस्व-<br>स्थ होउनी<br>सलज्जमातिनें |
| ,, | १५ | ते मुनिवर | तो मुनिवर |
| ,, | ,, | विरहसर्प | विषयसर्प |
| ,, | २२ | दत | त्वरित |
| ,, | २२ | सुनेला मंडप | सुनेला स्वयें<br>घेउनी कडे<br>मुलांला मंडप |
| ,, | २७ | बुडीशी | बुडीशीं |
| ,, | २८ | दीठ | धीट |
| ,, | २६ | न तुळे | "केवढि गोष्टी<br>कटि लगोटी,<br>कठिण काळ<br>मज, प्राप्त जा-<br>हला, कपटी<br>हरिनें, अपटी |

| पृष्ठांक. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| | | | दिधली, ईश्वर माया पूर्ण प-टली, तुटली ममता, छेदि अहंता अमृते-श्वर दास म्ह-णोनि पाळि आपुला " अ सा "न तुळे " पासून शेवट-पर्यंत निराळा पाठ एका प्र-तींत आहे. |
| ३१ | ५ | ब्रम्हा | ब्रह्मा |
| ,, | ९ | आविहत्रि | आविर्होत्र |
| ,, | १२ | गृहक | गुहक |
| ,, | १० | देवहुती | देवहूति |
| ,, | ३१ | शाहुशेन | शहाहुसेन |
| ३४ | १३ | हरिभक्ति | हरिभक्त |
| ,, | २५ | तुरज त | तुज रत |
| ३५ | ११ | दावो | दावों |
| ३७ | १६ | प्रत्यक्षा | प्रत्यक्ष |
| ,, | १७ | प्राथिता | प्रार्थिता |
| ४१ | ११ | पर्णत्वता | पूर्णत्वता |
| ४२ | ७ | कुलैदवेत | कुलदेवते |
| ४४ | १३ | पृर्ण | पूर्ण |
| ,, | १० | तज्ञा | तूज्ञा |
| ,, | १३ | करणं | करणें |
| ४६ | १२ | सुतसेवकांत भुतळीं | सूतभृत्यामधिं भुताळि |
| ४७ | २५ | पडला | पडता |
| ५१ | २८ | राघादिल्यास | रघ्वादिकांस |
| ,, | ३३ | कलीमाजि | कलींत |
| ५३ | १३ | सकाळी | सकळी |
| ५३ | ३ | अजमेरीं | अजमेरीं |
| ५४ | ११ | दोर्दंण्डे | दोर्दंण्डें |
| ,, | २० | हि नमती | हिनमती |
| ५५ | ८ | मुबइचा | मुंबैला |
| ,, | १४ | माहूळॅ बरवे | माहूळे बरवे |
| ,, | ,, | ते सन्निध | ते सन्नीध |

| पृष्ठांक | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५५ | १६ | त्यांचे | त्यांचे |
| ५६ | ४ | लपो | लयो |
| ५८ | २४ | निगमाज्ञा | निगमाज्ञा |
| ६१ | १५ | आर्पिजें | आर्पिजे |
| ६२ | २८ | वैष्णवीं | वैष्णवी |
| ६३ | १२ | पाहों | पाहो |
| ,, | १८ | वाभोजिनीची | अंभोजिनीची |
| ,, | २७ | हें | हे |
| ६६ | १ | रयतेचा | रयतेचा |
| ,, | ४ | नसल्या | नसती |
| ,, | २८ | निकटीं | निकटीं |
| ६७ | ६ | सुमतें | सुमतीं |
| ,, | १० | अपुल | अपुलें |
| ,, | २२ | परस्त्रीया | परस्त्रीया |
| ,, | १३ | पै | पैं |
| ६८ | १२ | एणि | एण |
| ,, | २१ | बहु वरें | बहु वरें |
| ,, | २४ | वचनामाजि | वचनामाजि |
| ६९ | २ | अपूर्णाहानि | अपूर्णाहूनि |
| ,, | ९ | हुजरातींत | हुजूरातींत |
| ७० | २८ | शाभूराज | शभूराज |
| ७१ | ११ | भूलोकीं | भूलोकीं |
| ,, | २८ | व्यासानीं | व्यासांनीं |
| ७२ | ११ | कमळपत्तिचे | कमळपत्तिचें |
| ,, | ,, | देती वना | दे जीवना |
| ७४ | ९ | साधला | साधूंला |
| ७५ | १३ | ससारहेतु | ससारहेतू |
| ,, | २३ | कुसुमांचें | कुसुमाचे |
| ,, | १२ | विधे | वेधे |
| ,, | १६ | मलिन | मिलित |
| ,, | १९ | लसता | लसता |
| ,, | ३१ | सुतुळीं | सुकुळी |
| ७६ | ४ | वनदहन | दवदहन |
| ,, | १९ | प्रत्यपकारापेक्षां | प्रत्युपकारापेक्षा |
| ,, | २२ | हरि करीं | हरिकरीं |
| ७७ | १५ | अग्रातिथी र-गुनी | अग्राति थीरंगुनी |
| ,, | १७ | कीं विषीं | किंविषी |
| ,, | १९ | राजहंसा | राजहंस |
| ७८ | ८ | विस्फाटन | विस्फोटित |

| पृष्ठांक. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७९ | १५ | दिस | दिसे |
| ८० | २२ | गुफिल्याचे | गुफिल्यचे |
| ,, | २३ | गंधपरिपरित | गधपरिपूरित |
| ८१ | २८ | पारदारव्यरसें | पारदाख्यरसें |
| ८२ | १ | नखाही | नखांहीं |
| ,, | १७ | नांव हि ना | जेंवी ना |
| ८३ | २१ | हसतसें | हसतसे |
| ८४ | ४ | स्वपीती | स्वपित्तीं |
| ,, | २८ | दार्दडद्वय | दार्दडद्वयिं |
| ,, | ३० | ताडवी | तांडवीं |
| ,, | ३१ | खांडवमध्य पांडवी | खांडव मध्यपांडवीं |
| ८७ | ५ | समाख्याम | समाख्यायाम |
| ,, | २० | व्यग | व्यग्य |
| ,, | २३ | ,, | ,, |
| ,, | २५ | ,, | ,, |
| ८८ | २९ | फार निंद्य | फार निंद्य असें म्हणतो |
| ८९ | २ | महिवरांपेक्षा= सर्वराजांपेक्षां | अहिवरांपेक्षा-सर्पराजांपेक्षां |
| ,, | ११ | अश्रित | आश्रित |
| ,, | १५ | परमार्थे | परार्थे |
| ,, | ३३ | निकटीं-जवळी | निकट-जवळ |
| ९० | १४ | देणाण्या | देणाऱ्या |
| ,, | २७ | गाजे | डाजे |
| ९३ | ५ | दानविधीविषयीं | दानविधि |
| ,, | २८ | पाटीर | पटीर |
| ,, | ,, | अहिला | अहीला |
| ,, | ,, | खळ= | खळ, |
| ९४ | १३ | पृज्याचा | पूज्याचा |
| ,, | १७ | चित्कति | चीत्कृति |
| ,, | ३० | आखुसें-उंदगसारखे | आखुसे=उदरासारखे |
| ९५ | १५ | काळीं | काळिमा |
| ,, | १८ | चित्तालयात | चित्तालया |
| ,, | १० | तुझेविना | तुझेविना |
| ,, | २२ | कुश इमानी | कुश मानी |
| ९६ | १५ | साधूचें | साधूचे |
| ,, | २६ | स | स० |
| ९८ | ११ | तदववधि | तदवधि |

| पृष्ठांक. | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ९८ | १९ | गुरूभि | गुरुभिः |
| ९९ | १० | बाहूमजरी | बाहुमंजरी |
| ,, | २२ | लवलि कीं | लवली कि |
| १०० | १३ | भेडवि झोंप कीं | भेटवि झोंप वीं |
| १०२ | १५ | बोलतीं | बोलतें |
| ,, | १६ | निर्हास्य ता | निर्हास्यते |
| १०३ | १० | मानिली | वानिली |
| ,, | २२ | सदृशीं | सुदृशी |
| १०५ | १५ | आविभूता | आविर्भूता |
| ,, | १० | नानाजनदृशी | नानाजनदृशि |
| १०७ | ७ | तरूणाजनाचे | तरुणाजनाचे |
| ,, | १९ | केशर | केसर |
| १०९ | ७ | ज्योत्स्ना | ज्योत्स्नी |
| ११२ | २१ | ओघे | पोषे |
| ,, | २६ | ते | तें |
| ११३ | २० | हासताती | हासताती |
| ,, | २३ | पद्म रमापहारी | पद्मरमापहारी |
| ,, | ,, | मृगाक्षिचें | एणाक्षिचें |
| ,, | २२ | पृसे | पूसे |
| ,, | ३० | तडिल्लेत | तडिल्लते |
| ,, | ,, | सुरधामिं मी | सुखसाधनी |
| ११४ | २ | हें | हा |
| ,, | ११ | मथुरापुरीं | मथुरापुरिं |
| ,, | १६ | जावुनी | जाउनी |
| ,, | २८ | पाणि इलासुताया० | पाणिरिलासुताया० |
| ११५ | ७ | मानें | वानें |
| ,, | १८ | दिली | दीली |
| ,, | ,, | झंपे | झपें |
| ११६ | २ | दतविटि | दंतवीटि |
| ,, | २३ | ३ | ५ |
| ,, | २८ | सध्या० | संध्या० |
| ,, | २९ | वृद्धि | वृद्धि |
| ११७ | ३ | ५ | हा अंक मुळींच नको |
| ,, | ५ | कांतादृष्टि | कांतदृष्टि |
| ,, | १८ | कुबेरलक्ष्मीयुक्ता | कुबेरलक्ष्मी |
| ,, | ३१ | एकतड व्हाणें | होणें |
| ,, | ३२ | रूप | या |

| पृष्ठांक | ओळ | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ११८ | १ | कंड | कडू |
| ११९ | १ | हृदयीं | हृदब्जीं |
| ,, | ७ | अकारण | कारण |
| ,, | १५ | सचारी | संचारी भाव |
| ,, | १६ | नायिका वृ-त्तात | नायिकावृ-त्तात |
| ,, | १२ | ठेवी | चावी |
| १२१ | १० | गतपरिचयेसी | गतपरिचयासी |
| ,, | २० | विप्रलर्लभशृ - गार | विप्रलभशृ गार |
| १२२ | २ | भ्रम हि जगे | भृंग हि तगे |
| ,, | २४ | स्तनाहीं | स्तनांहीं |
| १२३ | ५ | वरतून | बाहेरून |
| ,, | १५ | गणे \| असें ग-णितो | गणें \| असें गणितों |
| १२४ | ५ | साधितो | सांगतो |
| ,, | ,, | वाटला | बादला |
| ,, | १७ | स्वर्गींचें | स्वर्गीचें |
| ,, | १७ | नायिकेचें | नायिकेचे |
| ,, | ३० | निविडअमृता-हरी | निबिडअ-मृताहारी |
| १२५ | १५ | ह्याचा | ह्यांचा |
| ,, | २० | वाने\|स्तवे | वानें\|स्तवें |
| १२६ | २० | जे | जीं |
| ,, | २१ | भिति | भीति |
| ,, | २८ | कमळा चि | कमळाचि |
| ,, | ३१ | सौदामिनी वि-लसितापरि | सौदामि-नीविल-सितापरि |
| १२७ | २ | कशी | कशि |
| १२८ | ३ | वाणली | वाणिलि |
| ,, | १५ | जलधिकन्यका नयननीर ज्याचे | जलधिक-न्यकानय-ननीरजाच |
| ,, | १६ | संहारिती | संहारिं ती |
| ,, | २२ | बहुसुरदुमाचे | बहुसुरदुमांचे |
| ,, | २३ | बळी | बळीं |
| १२९ | १३ | जलधीची | जलधिची |
| ,, | १० | बाहे | बाहें |

| पृष्ठांक. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १३० | ६ | कण्णे त्यक्षर दोन यासम | कण्णेत्यक्षर दोन यासम |
| १३१ | १६ | जंघाजानरु | जंघाजानूरु |
| ,, | २० | अभदी | अभेदी |
| ,, | २२ | ही | हि |
| ,, | २८ | सकळ ही | सकळ हि |
| ,, | ,, | अनेक ही | अनेक हि |
| १३२ | २४ | त्यजुनि | त्यजुनी |
| १३३ | १० | त्याज्र | त्याज्य |
| ,, | १८ | हे | हें |
| ,, | २३ | संधूर्ण | संपूर्ण |
| ,, | ३१ | शास्त्रा | शास्त्रीं |
| ,, | ३२ | घातिले | घातिलें |
| १३४ | ६ | त्यांचिया | त्याचिया |
| ,, | २१ | नियीण | निर्वाण |
| ,, | २४–२५ | वर्ण अक्षर | वर्ण=अक्षर |
| ,, | २७ | ह्नतीस \| अह-भावास | शांतीस\|अ-भावास |
| ,, | २८–२९ | अमत्र अवि-चारी | अमत्र=अ-विचारी |
| ,, | ३० | जगदिंदिरेशी | जगईदिरेशी |
| ,, | ३१–३२ | प्रस्तुत स्त्री \| वृत्तात | प्रस्तुत स्त्री-वृत्तांत |
| १३५ | ४ | स्वयाचे\|आपु-ले | स्वयाचें\| आपुलें ग-मनानें |
| ,, | १५ | नीरजाचें\|क-मळाचें | नीरजाचे \| कमळाचे |
| ,, | १६ | सहारी \| ती आपदा दूर करीं | सहारीं\|ती आपदा दूर करीं |
| ,, | २५ | करून | करून \| |
| १३६ | १८ | त्रिचरणाचा | तिसऱ्या चरणाचा |
| १३७ | ६ | सतापदी . | सतांपदीं |
| ,, | ९ | श्रीरमारमणजो क्षीराब्धिनिवासी | श्रीइंदिरार-मण क्षीरनि-धीनिवासी |
| ,, | ३१ | अशीं | अशी |
| ,, | ३२ | उत्तमूं | उत्तमू |

| पृष्ठांक. | ओळ. | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १३८ | ४ | नृप सिंहासनिं | भूपति आसनिं |
| ,, | २४ | ही | हि |
| १४० | ८ | तव | तवं |
| ,, | १७ | किती कंठुं | किति कठूं |
| १४२ | २ | सुनू | सुनु बा |
| ,, | २७ | श्रीवत्सछांछन | श्रीवत्सलांच्छन |
| १४३ | २२ | उतर | उत्तर |
| ,, | २४ | पडलें | पडळें |
| ,, | २५ | हि अबु | सुख तें |
| १४५ | १३ | भेटो | भेटों |
| १४६ | १२ | बोलविसी | बोलवीसी |
| १४७ | १७ | ओपिलें | अर्पिलें |
| ,, | १९ | जाऊनि | आउनि |
| ,, | ११ | च सुबहु | चि पुण्य बहु |
| १४८ | १४ | [ बहु ] गज-भार | गज यां फार |
| १५१ | ४ | धुंडुनियां | धुडूनियां |
| ,, | ५ | [ मधु ] | [ दधि ] |
| १५२ | ३ | पहा ढाल | चि बालांट |
| १५४ | १४ | गाधिप | गाधिज |
| १५५ | १ | भीष्कृति | चीत्कृति |
| ,, | ,, | फुत्कृति | फूत्कृति |
| ,, | २० | आम्हा मीन | आम्ही दीन |
| १५६ | २ | मूढा | मूढा |
| ,, | ४ | सावरी | सांवरी |
| ,, | ५ | वाराही निशिरें अणून | वारा ही न शिरे अणू न |
| ,, | १५ | तूं | त्या |
| ,, | १७ | गुढारल्या | गुढारला |
| ,, | १२ | सुबाहू | सुबाहु |
| १५७ | २४ | निष्टक | निःशक |
| ,, | ,, | किंकरानीं | किंकरानीं |
| १५९ | २२ | घरिचे | घरिचे |
| ,, | १२ | म्हणे ऊठ घेऊनि ये त्या हरीतें | येई म्हणे घेउनि त्या हरीतें |
| १६० | ९ | स्वशुर | श्वशुर |
| १६२ | ५ | दईजे | देइजे |
| १६३ | १९ | पियषापरी | पियूषापरी |
| १६५ | ५ | शुद्धनुभवास | शुद्धानुभवास |

| पृष्ठांक. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १६७ | ११ | शुद्ध ते | शुद्ध तों |
| ,, | २४ | कटु | पटु |
| १६८ | २१ | अगराचें | अमराचें |
| ,, | १० | नशती | नाशती |
| ,, | ३३ | चक्रददा | चक्रगदा |
| १६९ | ७ | वलयागद | वलयांगद |
| ,, | १० | स्वर्ग | भर्ग |
| १७२ | २१ | करी | करीं |
| ,, | ३३ | सहस्राक्षा को | सहस्र नयन न |
| १७६ | १ | दोघांचें | दोघांचे |
| १७७ | ४ | माडुनि | मांडुनि |
| ,, | १५ | पहात | पाहत |
| १८० | ३२ | माळावया | भाळावयां |
| १८१ | १३ | मान त्यजी | भान त्यजी |
| १८२ | २३ | अश्वघाटिका-वृत्त | अश्वधाटिकावृत्त |
| १८३ | ९ | सुतधनावैषयानथहेतूस | सुतधनविषयानर्थहेतूस |
| १८५ | १७ | नसतां | असतां |
| ,, | २१ | कायाक्लेश | कायक्लेश |
| ,, | ३३ | जागृतस्वप्नसुषुप्ती | जागृत्स्वप्नसुषुप्ति |
| १८६ | १ | नारायणसुतकृत | नारायणकृत |
| ,, | ७ | गळीं | गळां |
| ,, | ८ | वानिता | वानितां |
| ,, | १० | नारायणसुतकृत | नारायणकृत |
| १८७ | २५ | किती | किति |
| ,, | ,, | वर्णु न | वर्णुन |
| ,, | ,, | वेदनाना | वेद नाना |
| १८८ | १ | नारायणसुतकृत | नारायणकृत |
| ,, | २५ | खोली लाहानशी | खोलि लहानशी |
| १९० | २२ | विणतांना | विण ताणा |
| ,, | २७ | कनकनाभ-जनकाविर | कनकनाभ-जनकविर |
| १९१ | २ | कां शीस | काशीस |
| १९२ | ७ | प्रासमोहरा सरस | प्रासमोहरासरस |
| १९४ | १० | त्याची | त्यांची |

| पृष्ठांक. | ओळ. | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २०२ | २८ | पदरिंत | पदरिं |
| २०३ | २२ | त्याचें | त्याचे |
| २०५ | २ | नि दैत्यखळ | दैत्यखळ |
| ,, | ,, | जेथुनि | जथुनि |
| २०६ | ८ | खुलेल | खुलले |
| ,, | १३ | वार्जन्यांचा बाजा | वाजन्त्र्यांचे बाजे |
| २०७ | ३ | थिजले | थिजलें |
| २०८ | २४ | सती | सतीं |
| ,, | २५ | तेथें | तिथें |
| २०९ | ११ | नव्हे | नव्हें |
| ,, | ,, | खातां | खाता |
| २१० | ८ | आम्हासहित | आम्हांसहित |
| ,, | १० | म्हणें | म्हणे |
| ,, | २० | मडळी | मंडळीं |
| ,, | २१ | पावली | पावलीं |
| २११ | १ | रक्षा मला | राजा मला |
| ,, | ७ | काकुळता | काकुळती |
| ,, | १० | पारव्यार वा | पारव्या रवा |
| ,, | १२ | माजिये | मांडिये |
| ,, | ,, | नृपभयाबुधी | मृगभयाबुधी |
| ,, | १६ | सगताला | अंत झाला |
| ,, | १८ | हारो न | हा श्येन |
| २१२ | ८ | माझें | माझे |

| पृष्ठांक. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २१२ | १६ | करूनि करुणालवाला | करूनि करुणा करुणालवाला |
| ,, | १७ | नेदी कदापि चरणा | नेदीं कदापि चरणा |
| ,, | २५ | तनूतें | तनू ते |
| ,, | २६ | धनगे ( स्त ) हहानि | धनगेहहानि |
| ,, | २८ | दे आपुली श्लोक | दे आपुली |
| ,, | ३० | श्लोक-खगतनू | खगतनू |
| ,, | ३२ | मन्मभव्य काय | मन्मथभव्य काय |
| २१६ | ३० | माजली | साजली |
| २१९ | १६ | खवलळा | खवळला |
| २२४ | २ | चैतन्याकरजरसिंचा | चैतन्याकरजसुरसींचा |
| २२५ | ८ | चताभि॰ | चतुर्भिः |
| २२६ | १८ | निश्चिय | निश्चय |
| २२७ | ९ | स्ते | सूते |
| २२८ | २८ | वक्षोराह | वक्षोरुह |
| २२९ | २१ | हुतहव. | हुतवह. |
| २३१ | २ | अह्नः | अहः |
| २३७ | २३ | सुकवितालक्तरसें | सुकवितालकरसें |
| २३८ | २० | मकरतकरडा | मरकतकरंडा |

समाप्त

[ काव्येतिहास-संग्रह. ]

( २८ )

# अनेक–कवि–कृत–कविता

## भाग ४ था.

हा ग्रंथ

जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए. ( डेक्कन कॉलेज )

यांनीं

यथामति शुद्ध करून प्रकाशित केला

तो

पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिला.

इ० स० १८८९

शके १८११.

# MARATHI POEMS BY VARIOUS AUTHORS.

EDITED BY.

**JANARDAN BALAJI MODAK B. A.**

*rinted at the "Dnyan Prakash Press"*

POONA.

1889 A. D.

1/0

# अनुक्रमणिका.


| विषय. | कविनाम. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ गजेंद्रमोक्ष | —— | १ |
| २ वामन चरित्र | वामन पंडित | ४ |
| ३ स्फुट श्लोक | ,, | ५ |
| ४ गंगारत्नमाला | नरहरि | ६ |
| ५ महावाक्यार्थसार | बालकृष्ण | १९ |
| ६ द्रौपदीस्वयंवर | अनंत कवि | ४१ |

# अनेककविकृत मराठी कविता
# भाग ४ था.

## गजेंद्रमोक्ष.

### सवाईवृत्त.

श्रीनिजमूर्ति तुझें पदसेवन जीवन देउनि नीववि काया ।
जें भवतारक तापनिवारक लावि गिरा तव नाम वदाया ॥
मानस मीपण टाकुनि निश्चल हो स्वरूपीं रत छेदुनि माया ।
रंग अभंग करीं नलगे मज इंद्रपदादिक ही गुरुराया ॥ १ ॥
पार अपार हरादिक नेणति तो गुरुराज सखा मजला ।
बोलियला मुनिमानसमोहन मागसि तें दिधले तुजला ॥
बोल सुखावह डोलति सज्जन सांग गजेंद्र कसा तरला ।
तो वर लाहुनियां सरसा मग रंग सुखानुभवीं भरला ॥ २ ॥
एक मनोरम तो गिरि उत्तम ज्या त्रिकुटाचळ नाम विराजे ।
दीर्घ शतेंशत योजन मंडित त्या तुळणा सम मेरु चि साजे ॥
वृक्षलता बहुतां परि डोलति कोकिळशूकमुखारव वाजे ।
खेळति पक्षिकुळें विविधाकृति शार्दुल गर्जति अंबर गाजे ॥ ३ ॥
किन्नरगायननादसुधारस ऐकति सिद्ध मुनींद्र सुखें
योगलिलेप्रति साधक साधिति तें सुख वानिल कोण मुखें ।
एक निवृत्त परात्परशोधक डोलति ऐक्यपणें हरिखें
त्या अनुपम्य पदाप्रति दाविल श्रीगुरुवांचुनि कोण सखे ॥ ४ ॥
आमृततुल्य सरोवरिंचे जल सेवुनियां क्रीडति वनगाई
हेममयी कमळी रत षट्पद मज्जनपान अती सुखदायी ।
पादप पुष्पफळांकित उत्तम तेथिल वानिल कोण नवाई
मानुनियां सुख भोज्य विराजतसे गजराज मदोन्मत ठायीं ॥ ५ ॥
भीम पराक्रम काळ तुळे सम दिग्गजनाम भयें दुर जाती
निर्जरनायकवाहन ही भयभीत धरातळिंचे गज कीती ।
मेघमुखाहुनि घोष विशेष भयें क्षिति लंघिति श्वापद जाती
कोण गणी अगणीत बळा गजराज करी समवेत स्वजाती ॥ ६ ॥

यापरि हिंडतसे वन धुंडित सेवित कोमल पल्लव चारा
कामवशें विचरे विधि टाकुनि बोधित कोण तया अविचारा ।
क्रोध कदा न शमे अघदायक मोह सदा स्त्रवती मदधारा
मत्सर दंभ निरंतर गर्व अनावर सर्व अनर्थ पसारा ॥ ७ ॥
एक दिनीं फळ पल्लव सेवुनि व्याकुळ प्राण तृषा सकळांसी
उत्तम तीर निरीक्षुनियां निर देउनि तृप्त करी सहवासी ।
तोय मुखीं जव घालितसे तंव वोढवलें सळ अद्भुत त्यासी
नक्र जळीं पद ओढित जेंवि दिवाकरबिंब बळें ग्रह ग्रासी ॥ ८ ॥
रोवुनि दांत पदीं पद ओढितसे गज ताडित त्यासि बळें
थाप जळावरि मारितसे परि नक्र पराक्रम तो न ढळे ।
गोवियला गजराज निरीक्षुनिया परिवार समूळ पळे
युद्धवशें तनु जर्जर होउनि व्याकुळ तो गज शक्ति गळे ॥ ९ ॥
चिंतितसे गज संकट हें मज बंधु सुता सुत निष्ठुर पाहा
प्रीय कलत्र स्वगोत्रज मित्र तयांप्रति तो उचितार्थ नव्हे हा ।
वैभव तों सुखसभ्रम दाविति कृत्रिम लाघव लाविति मोहा
व्यर्थ अनर्थकरें प्रतिपाळुनि शेवट येकट येकट हा हा ॥ १० ॥
कामविलास सुखावह मानुनि अर्चितसे मज लागुनि जाया
बंधु वदे धनसंग्रह दे मज याविण तो स्नेह दाविति वाया ।
सूत सभाग्यपणीं अनुकूल उपेक्षिति जे दिनिं जर्जर काया
पामर मी भुललों मृगतृष्णिक भूलविलें ममतामोह माया ॥ ११ ॥
खेद करी अनुताप धरी अवलोकित काय उपाय करावा
आठवला सुखदायक मंत्र दयानिधि तो जगदीश वरावा ।
वारिल संकट तो सुखसागर भावबळें भवसिंधु तरावा
त्याविण आणिक मित्र नसे कळलें गुज हा मज लोक परावा ॥ १२ ॥
अंबुज एक करें अवलंबुनि भक्तिपुरःसर डोलतसे
हृत्कमळीं कमळापति चिंतुनि मंद गिरा मग बोलतसे ।
द्वैत तूं निजमूर्ति सखा तुजवीण दुजें मज कोण असे
पाव अपाय निवारुनि मी मज दावुनि वारिं समूळ पिसें ॥ १३ ॥
तूं अज अव्यय नित्य निरामय तूं सदचिन्मय सौख्यविधाना
हा जगडंबर भासत सद्वत ओघ तरंग जळावरि नाना ।
कुंडल किंकिणि नूपुर कंकण कांचन एक बहू अभिधाना
वेद वदे जगदंतर एक निरंतर नातळसी भवभाना ॥ १४ ॥

विश्वरूपा अरूपा अविकार अनाम असंग अनंत अपारा
शास्त्रपुराण विवाद सदा करिती परि निश्चित नेणति पारा ।
विश्व तुझ्या स्वरूपीं परिकल्पिति विद्वत वानिति विश्व अधारा
नेति वदूनि सरे श्रुतिवाद न वाच्य अवाच्य वृथा श्रम सारा ॥ १५ ॥
साच नसे मृगतोय सुनिश्चित आश्रय भानु तयाप्रति पाहे
लोह चळे परि चुंबक अक्रिय निष्क्रिय तेंवि विलासत आहे ।
दृश्य नसे घन चिद्रुप तद्रुप तंतुपटस्वरूपें दिसताहे
हें निज गुह्य अलौकिक जाणति संत अनंत सुखें रमताहे ॥ १६ ॥
निर्गुण जें रूप या परिचें विणभेद सगूण हि त्या वदती
ते सुखदायक मानुनि एक विराग धरूनि मनें भजती ।
भक्तिसुखें तुज अर्चिति उत्तम ते परिमीतिरहीत किती
त्या करुणा वरि श्रीचरणाप्रति मी शरणागत आर्तमती ॥ १७ ॥
उद्धरिला अजमीळ अहंकृति तारियली गणिका अघराशी
हिंसक व्याध जिवांप्रति मारुनिया शर भक्षित त्यांसी ।
चोज करें गुज सांग तयाहुनि पातक काय असे मजपाशीं
दीनदयाकर हे बिरुदावळि वानिति वेद निरंतर कैशी ॥ १८ ॥
पीडितसे ग्रह वारुनि यासि अनुग्रह दे मज नित्य सुखा
कीर्ति करीं निज भूषण तारुनि दुष्कृतराशि पशू विमुखा ।
मी तृणभक्षक मंदमती महिमान अगोचर शेषमुखा
जाणसि अंतरिचें अति संकट आन नसे तुजवीण सखा ॥ १९ ॥
अंतरिचा अनुताप विलोकुनि तो करुणाघन येउनि नेटें
नक्र जळीं जव ओढितसे तंव हाणितले निज चक्रचपेटे ।
फोडुनियां मुख काढित बाहिर नक्रगजा अति अद्‌भुत मोठे
पद्मकरें अभयंकर देउनि सोडविले पशुदेह सुनाटें ॥ २० ॥
अमृत हस्तक ठेवुनियां कुरवाळित मस्तक तो सुखदानी
वाजति मंगळ घोष सुकीर्ति सुभाषित बोलति देव विमानीं ।
भक्तिसुखाहुनि थोर नसे सुखकारक वेद वदे गुज कानीं
मायिक ते लटकीं अघदायक जानकिनायक एक निदानी ॥ २१ ॥
भक्तिसुखें प्रह्लाद तरे मुनि नारद भक्तिसुखें चि तरे
भक्तिसुखें सनकादिक पावन भक्तिसुखें उपमन्यु तरे ।
भक्तिसुखें ध्रुवबाळ सुखावह व्यासमुखें जगताप हरे
वाल्मिकि अंबरिषी बळि भीष्म शुकादिक तन्मय भक्तिभरें ॥ २२ ॥

उद्धव अर्जुन धर्म बिभीषण रामपदीं रत चित्त जयाचें
अक्रुर वैष्णव भक्त कपी हनुमंत सभाग्य जिणें विदुराचें ।
भानुकुळीं रुकुमांगद भक्त सुधाकरवंशिं परीक्षिति साचें
ऐक्य निरंतर चित्स्वरूपीं निज भक्ति वदे श्रुति नाम तयाचें ॥ २३ ॥
भक्त सुपावन नित्य सुखी मन उन्मन होउनि भेदविना तें
भोगिति भोग अतींद्रिय देखति एकपणें चि जना विजनातें ।
सारुनि मीपण भाविति आपण अद्वय अक्रिय ज्ञानघनातें
रंग विना निज वस्तु सदोदित प्रत्यय निश्चित साधु जनातें ॥ २४ ॥

समाप्त.

---

### वामनपंडितकृत

## वामनचरित्र.

### घनाक्षरी वृत्त.

करीं कमंडलू दंड दावी कौतुकें उदंड ।
ध्यावा हृदयीं अखंड भवगजकेसरी ॥ १ ॥
सुखी सर्वांचें ही मन करी कमळनयन ।
सहस्राननशयन दावी शब्द कूसरी ॥ २ ॥
इंद्रासी दे इंद्रपद बळीमस्तकीं स्वपद ।
गंगा आणूनी त्रिपद जगीं पुण्य पसरी ॥ ३ ॥
पायीं पावन जीवन कथा जीवाचें जीवन ।
ऐशा वामनीं वामन नेणे बुद्धि दूसरी ॥ ४ ॥ १ ॥
अहो बळी भाग्यवंत ज्याच्या दारीं भगवंत ।
देतां जग अंतवंत अनंतत्व पावला ॥ १ ॥
देऊनि हीं तिन्ही लोक अणुमात्र नेणे शोक ।
मस्तकें हीं पुण्यश्लोक चरणींचें पावला ॥ २ ॥
सर्व अर्पूनि ही धीर तिजा पावलासी शिर ।
देतां न लावी उशीर आनंद दुणावला ॥ ३ ॥
शाप देतां शुक्र खळ तरी नव्हे चि विकळ ।
दान करूनी सकळ म्हणे डाव फावला ॥ ४ ॥ २ ॥
इंद्राहूनि ही कल्याण करी बळीचें सुजाण ।
तया देवाची च आण नव्हे गोष्टी लटकी ॥ १ ॥
केला इंद्र भाग्यवंत देउनी ज्या अंतवंत ।

संपदा त्या भगवत करी ज्याच्या बटकी ॥ २ ॥
इंद्र इंद्रपददास बळी त्यावरी उदास ।
दासीसम ज्या पदास लेखीना निपट कीं ॥ ३ ॥
म्हणूनि च विश्वपाळ झाला द्वारीं द्वारपाळ ।
जयापाशीं सर्वकाळ असुराच्या कटकी ॥ ४ ॥ ३ ॥
बळी हा चि सत्वगुण यास करा हो निपुण ।
भाग्या अपत्याची खूण कळतां ठसा पडे ॥ १ ॥
तंतूलागीं सर्व पट देतां काय खटपट ।
तैसें अर्पितां निपट विश्व हें न सांपडे ॥ २ ॥
ऐसें दान दें जे सत्व नुरे त्यास ही भिन्नत्व ।
आत्म-निवेदन-तत्व नेणती हे बापडे ॥ ३ ॥
व्यर्थ घेऊनी सन्यास वेष दावीती अन्यास ।
होतां वामनीं हा न्यास कर्मशेंडी ऊपडे ॥ ४ ॥ ४ ॥

समाप्त.

---

## स्फुटश्लोक-पृथ्वीछंद.

असेल जरि पूजिला विपुल हस्तकें श्रीहरी
नसेल जरि योजिला विषम भाव सर्वांतरीं ।
करूनि विहितें बरीं समुळ अर्पिलीं ईश्वरीं
तरी च गुरु केसरी भवगजासि नाहीं करी ॥ १ ॥
महेश महदादिकीं वसति एक भेदें विना ।
अशीच जरि भावना सतत वर्तली या मना
दया सकळ भूति कीं वसति जन्मजन्मांतरीं
तरी च गुरु केसरी भवगजासि नाहीं करी ॥ २ ॥
जगासि जनका न कां विमळ लक्षणीं लक्षिलें ।
सकांक्षवत सक्रिये परम आदरें लक्षिलें ।
निशापति दशावशें विगतसंशयो अंतरीं
तरी च गुरु केसरी भवगजासि नाहीं करी ॥ ३ ॥
अनाथ पद वागवी स्मरण सर्वदा जागवी
विषाद मद मोह तो समुळ चित्तिचा त्यागवी ॥
सदा विदुषसंगती निजहितापती जे धरी ।
तरी च गुरु केसरी भवगजासि नाहीं करी ॥ ४ ॥

अनंदगिरिशीखरीं मनमयूर नाचे सदा
दिवानिशि हि नाठवे सकळ संपदा आपदा ।
निजानुभव रंगला विशद बोध अर्कापरी
तरी च गुरु केसरी भवगजासि नाहीं करी ॥ ५ ॥

समाप्त.

---

## नरहरिकृत गंगारत्नमाला.

### वृत्त शार्दूलविक्रीडित.

गौरीहारमणी अमर्त्यरमणी नक्षत्रतारामणी
विद्यारत्नखनी अघाद्रिनिसणी लोकत्रयाचा धणी ॥
बैसायासि फणी हृदब्जतरणी जो भक्तचिंतामणी
राहो तच्चरणीं प्रणामसरणी माझी जगत्कारणीं ॥ १ ॥

### वृत्त वसंततिलका.

भागीरथि त्रिपथगे पदवंदनातें । मी दीन गे करितसें मतिमंद माते ॥
हेतू मनांत भरला तव गुण गाया । जावो न मागत असें इतुकें चि वाया २

### वृत्त शार्दूलविक्रीडित.

विश्वामित्र निजाश्रमीं मख करी पाहोनि रात्रिंचरीं
केला त्रास विशेष सोडुनि बळें रक्तास्थिवृष्टी वरी ॥
व्हाया राक्षसनाश क्षत्रियकरें आणावया राघवा
साकेतानगरीस गाधिज मुनी आला स्वयें तेधवां ॥ ३ ॥

### वृत्त मालिनी.

दशरथ मुनि येता दे तया आसनाला । करुनि सकल पूजा ठेवि पादाब्जि भाला ॥
नमुनि करि विनंती काय इच्छा मनाची। कळविसि जरि दासा पूर्ण होईल साची ४
मुनिवर मग बोले राजया ज्ञानराशी । निज सुत मज द्यावा यज्ञ रक्षावयासी ॥
परिसुनि वचनाला भूपती खेद पावे। निजगुरुप्रति बोले सांग कैसें करावें ॥५॥

### वृत्त उपेंद्रवज्रा.

लहान हा राम वसिष्ठराया । न होय माझें मन यासि द्याया ॥
कसें गुरूच्या मरजीस येतें । वदाल जें सत्य करीन मी तें ॥ ६ ॥

### वृत्त उपजाति.

गुरू म्हणे वंदिति देव ज्याला । न पाहतां सानुज दे वयाला ॥
वसिष्ठवाक्यें सह लक्ष्मणाला । देवोनि रामा सुखवी मुनीला ॥ ७ ॥

## वृत्त मालिनी.

कुशिकतनय रामा घेउनी सानुजाला । अतिमुदित निघाला यावया आश्रमाला ॥
कथन करित गोष्टी रामरायासि चाले । तंव रवि दिनमध्यें पातला ऊन झाले ॥ ८॥

## वृत्त उपजाति.

वसंतकालीन मुळीं उन्हाळा । असोनि मध्यान्ह तयांत झाला ॥
अत्यंत तापें परितप्त तो कीं । कुमार श्रीराम दिशा विलोकी ॥ ९ ॥
स्वेदोदकें सर्व शरीर न्हालें । उष्णें तसे गाल हि लाल झाले ॥
मार्गश्रमें तापविलें मनाला । पाही तदा सानुज काननाला ॥ १० ॥

## वृत्त शार्दूलविक्रीडित.

ओढे वोस कितेक मार्गि दिसती भूमी तशी तापली ।
अंगा लागति उष्ण वातलहरी छाया पदीं आपली ॥
पांथ श्रांत पथि श्रमें तरुतळीं विश्रांतिला पाहती ।
तापें तप्त समस्त पक्षिगण ते वृक्षांतरीं राहती ॥ ११ ॥
सूर्याचे किरणीं जलभ्रम मृगा होतां त्वरें धावती ।
तेथे शून्य विलोकितां तृषित ते व्यर्थ श्रमा पावती ॥
झाले लाल पलाश वृक्ष दिसती निष्पर्ण जे फूलले ।
भृंगे सोडुनि पद्म येति जवळी तद्रक्त ते भूलले ॥ १२ ॥

## वृत्त उपजाति.

कोठें तरू पल्लवयुक्त मोठे । तळीं तयांच्या मृगवृंद लोटे ॥
छाया जयांची वरि दाट भारी । योरापरी सश्रित ताप वारी ॥ १३ ॥

## वृत्त शार्दूलविक्रीडित.

कोठें गांव तयांत शूद्र वसती सन्नीध त्यांच्या मळे ।
मोटाचा रव कानि अद्भुत पडे शृंगी वहाली वळे ॥
तेथें मोहरले रसाळ फिरती भृंगे तयां भोवते ।
पायातें सुख देति चालति बरीं जीं कोकिलांचीं रुतें ॥ १४ ॥

## वृत्त मालिनी.

अतिशय रवितापें ताप होतां चि रानीं । त्यजुनि गवत खाणें दीधलें तें गुरांनीं ॥
सकळ मिळति छाया पाहुनी एक ठायीं । रंवथ करित कोठें बैसल्या थंड गायी ॥१५॥

## दिंडी.

पुढें जातां पाहोनि जान्हवीला । राममित्तीं संतोष फार झाला ॥
वंदुनीयां गाधीजमुनीपायां । म्हणे सांगा ही कोण मुनीराया ॥ १६ ॥
नाव काय ही उत्पन्न कोण ठायीं । पाहतां ची संतोष दे मला ही ॥

दाट झाडी अत्युच्च दों तटा या । स्वयें तापा साहोनि करी छाया ॥ १७ ॥
आम्र जंबू जंबीर ताल जाती । नभा स्पर्शाया काय ऊर्ध्व जाती ॥
वरी चाष हि कोकील मत्त रावे । पाय जातां बोलाविताति यावें ॥ १८ ॥

## वृत्त भुजंगप्रयात.

पहा या नदीचे तटीं पर्णशाळा । मनोरम्य ज्या दीसताती विशाळा ॥
सती या ठिकाणीं पती पूजिताती । द्विजन्मे किती सामवेदासि गाती ॥१९॥

## वृत्त शार्दूलविक्रीडित.

आहा जी मुनिराय धन्य जहलों पाहोनिया आश्रमा ।
माझें चित्त सुखावलें पुनरपी हें आठवी न श्रमा ॥
चाले निर्मळ वेदघोष मजला ऐकावया येतसे ।
स्वाध्यायाभ्यसनीं द्विजौघ अवघा हा मग्न झाला असे ॥ २० ॥
एथें आश्रमसन्निधी च तटिनी स्वच्छोदका वाहती ।
वैरा श्वापद टाकुनी हि सहजा शत्रूसवें खेळती ॥
हर्त्तापोटिंशि वासरू दडतसे आखू न ओतूस भी ।
व्याघ्रागावरि मान ठेवुनि पहा ही गाय आहे उभी ॥ २१ ॥

## वृत्त उपजाति.

निर्वैर या पाहुनि आश्रमातें । भारी च होतें सुख आजि मातें ॥
प्रेमें वृकांनी मृग लाजवावे । जेथें अशा टाकुनि काय जावें ॥ २२ ॥

## साकी.

मध्यान्हीं रवि आला पाहुनि, नदीजलाचे कांठीं ॥
दर्भ करीं निज कर्म कराया, झाली मुनिंची दाटी ॥ २३ ॥
शिशू किती उपनीत ऋषींचे, आले गंगातीरीं ॥
दंड कमंडलु दर्भ मुष्टिकरीं, कृष्णाजीन शरीरीं ॥ २४ ॥
जटामुकुट शिरिं कटिस मेखला, भस्म विलेपन तनुसी ॥
ब्रह्मसूत्रयुत वामनमूर्ती, सुखविति पहतां मजसी ॥ २५ ॥
पहा पहा हे पोहुं लागले, उदकीं जाउनि कैसे ॥
देह जलांतरिं मान दिसे वरि, भासति कच्छप जैसे ॥ २६ ॥
अनक मारिती हका परंतु, परतीराला जाती ॥
अहंपुर्विके करुनि पुन्हा ते, परतुनि सत्वर येती ॥ २७ ॥
लाटा येतां त्यांवरि मारुनि, करयुग शब्दा करीती ॥
पुढे पोहता गुप्त जाउनी, मागुनि त्यांतें धरीती ॥ २८ ॥
बुडे एक त्या बुडकी दुसरा, तव तो वरता आला ॥

जंवळी येतां सुसर पाहुनी, मागे परते भ्याला ॥ २९ ॥
स्नान करोनी तीरें पातले, धरिती कौपीनाला ॥
भस्म लावुनी कंठि घालिती, रुद्राक्षांच्या माळा ॥ ३० ॥
मध्यान्हीं सुस्नात सर्व ही, पवित्रपाणी झाले ॥
ब्रह्मकर्म मुनि समाप्त करुनी, काही परत निघाले ॥ ३१ ॥

**दिंडी.**

ऊर्ध्वदृष्टी कित्येक उभे नीरीं । मुनी बसले अनेक रम्य तीरीं ॥
कंकपक्षी देखोनि मुनीध्याना । तसे होती घालोनि पोटिं माना ॥ ३२ ॥
जिचे तोयीं मत्स्यादि जंतु राहे । शीत मंजुल सुगंध वायु वाहे ॥
गमे स्पर्शे निष्पाप करी काया । वदा ईचें माहात्म्य मुनीराया ॥ ३३ ॥

**वृत्त वसंततिलका.**

ऐकोनि रामवचना मुनिगाधिजाला । आनंद होय पथिचा श्रम ही रिझाला ॥
रामा म्हणे मज तुवां अजि धन्य केलें । प्रश्नें सख्या सकल कल्मष दूर गेलें ॥३४
जीच्या तरंगपवनें पशु ही तरावे । स्नानें तसें सकल पातक संहरावें ॥
जीतें मुनींद्र सुर किन्नर सिद्ध गाती । ही राघवा हरिपदी सुरसिंधु गाती ॥३५॥
ईचा अगाध महिमा त्रिधि शेष भानू । वर्णूं न ते शकति मी वद काय वानू ॥
विस्तार मंदमतिच्या वदनें कशाचा । होतो परंतु कथितों तुज अल्प साचा ॥३६॥
देई सुखासि इह लोक परत्र लोकीं । उंचा पदार्थ दुसरा न जगीं विलोकीं ॥
गंगेविणें म्हणउनी जगदीश्वरानें । ही मस्तकीं धरियली गिरिजावरानें ॥ ३७ ॥
सर्पा खगेंद्र धरुनी वदनीं करोनी । जातां नदींत पडला अहि तो मरोनी ॥
तात्काळ होउनि चतुर्भुज त्या च पक्षी । राजावरी चढुनि विष्णुपदास लक्षी ॥३८॥

**वृत्त शार्दूलविक्रीडित.**

गंगा ही हरिपादपंकजभवा स्वर्गावरी राहिली ।
तेथें स्वर्गनदी म्हणोनि पहिले नांवाप्रती पावली ॥
तेथोनी मग शंकरें निजजटाजूटांतरी वाहिली ।
आली भूमिवरी हरी अघ जरी पाप्यांनिं ही गाहिली ॥ ३९ ॥
रामा पुण्यहरीपदाबुलहरीबिंदू शरीरा जरी ।
स्पर्शे तत्क्षणि जो असेल पदरीं तत्पापवृंदा हरी ॥
घेतां नांव जिचें अनंत जनुचें जें पाप देहीं असे ।
गंगा त्या सकलासि घालवितसे ती भूवरी ही वसे ॥ ४० ॥

**वृत्त इंद्रवज्रा.**

भागीरथी जान्हवि स्वर्गसिंधु । तारावया ही च अनाम बंधु ॥

स्नाननिमित्तें निघतां पदांतीं । या अश्वमेधक्रतुपुण्य देती ॥ ४१ ॥

वृत्त कामदा.

ऐकुनी पुन्हा राम बोलिला । कां शिवें शिरीं घेतलें इला ॥
विष्णुपाउलापासुनी अली । ही मुने कशी साग भूतळीं ॥ ४२ ॥

वृत्त उपजाति.

भागीरथी कां इजला म्हणावें । कशी वदा जान्हवि नांव पावे ॥
आश्चर्य मातें बहु होत आहे । दीनार्थ जी भूवरि माय वाहे ॥ ४३ ॥
मुनी म्हणे आयिक रामराया । जो लागला मृत्युकरा मराया ॥
सकृत जरी घे नर नाम वाचे । तात्काळ नाशी भय तें भवाचें ॥ ४४ ॥

वृत्त शार्दूलविक्रीडित.

साकेताधिपनंदना हरिपदीं गंगा जगन्माउली,
ऐकें सागतसें सख्या तुज कशी स्वर्गांप्रती पावली ॥
जीच्या सानुज आयिकोनि सकला हो सच्चरित्रा सुखी,
नित्य श्रीकर सर्वदा हि तुझिया तन्नाम राहो मुखीं ॥ ४५ ॥
प्रल्हादात्मज जो विरोचन तया सत्पुत्र झाला बळी,
नामें सर्व सुरांसि जिंकुनि करी राज्य त्रिलोकीं बळी ॥
तत्रासें स्तविला रमेश अमरीं जो भक्तचिंतामणी,
घे तो कश्यपगेहिं जन्म अदितीपोटीं जगाचा धणी ॥ ४६ ॥

वृत्त यूथिका.

साक्षि जो सकलहृत्कमळीं वसे । अखिलांगि सुत होउनि तो दिसे ॥
ब्रह्मदेव सुर घेउनि ये तदा । कश्यपादि अवघे नमिती पदा ॥ ४७ ॥

आर्या.

ऱ्हस्वाकृति धरि म्हणुनी, वामन हें नांव ठेविलें बाळा ॥
उपनयनयोग्य झाला, ते चि क्षणिं देव शिक्षि जो काळा ॥ ४८ ॥

वृत्त स्वागता.

कश्यपादि मुनिवृंद तसाची । देववृंद करि आयति साची ॥
ब्रह्मदेव सकलेप्सित दे त्या । सावधान सुमुहूर्त वदे त्या ॥ ४९ ॥

वृत्त शार्दूलविक्रीडित.

गायत्री रवि दे कमंडलु विधी द्यौ छत्र दंडा शशी,
कौपीना अदिती कुशा मुनिपती कृष्णाजिना भू तशी ॥
सूत्रा गोपति माळ ब्रह्मयुवती पात्रा धनांचा पती,
शोभे वामन संस्कृती रुकनि त्या भिक्षेस देई सती ॥ ५० ॥

## वृत्त उपजाति.

ऐके तदा वामन यज्ञ चाले । बळीघरी ब्राह्मण ही निघाले ॥
निघे स्वयें आवधि देवमाया । सुरेंद्र यातें निजराज्य द्याया ॥ ५१ ॥
यज्ञांगणीं ये बटु ब्रह्मचारी । मुखें वदे वेद समग्र चारी ॥
पाहोनि उत्थान समग्र घेती । तेजें तया आसन उंच देती ॥ ५२ ॥
बळी तया पाहुनि देवराया । प्रेमें नमी होउनि नम्र पायां ॥
म्हणे मला धन्य तु आजि केलें । त्वद्दर्शनें कल्मष सर्व गेलें ॥ ५३ ॥
सिंहासनीं बैसवि वामनाला । संतोष झाला बळिच्या मनाला ॥
ब्रह्मादिकीं यद्यश शुद्ध गावें । पूजी तया दैत्यपती स्वभावें ॥ ५४ ॥

## वृत्त कामदा.

माग जें तुला पाहिजे असे । राय घे म्हणे सर्व देतसें ॥
ऐकुनी तया बोलिला हरी । सांग कोण त्वत्तुल्य भूवरी ॥ ५५ ॥
पूर्वजांचिये नांव राखिले । एक मागतों पाहिजे दिले ॥
मत्पदें धरा तू त्रिपाद दे । ऐकुनी बळी बोलिला मदें ॥ ५६ ॥
गांव आथवा राज्य माग कीं । काय पाहिजे सांग आणखी ॥
देव बोलिला ईतुकें पुरे । लोभ केलिया काय ही नुरे ॥ ५७ ॥

## वृत्त पृथ्वी.

तदाग्रह विलोकुनी बळि तया त्रिलोकीश दे,
त्रिपाद पृथिवी तदा गुरु कवींद्र त्यातें वदे ॥
न हा द्विज बटू हरी कपटि वंचुनी बा तुला,
जगत्त्रय हि इच्छिलो सकळ द्यावया शत्रुला ॥ ५८ ॥
नको म्हणत आसतां गुरु धरा तयाला दिली,
विरोचनसुतें तदा वचनसत्यता राखिली ॥
तदैव जगदीश्वरें निजविराटरूपच्छलें,
अनत हि पदद्वयें जग समग्र ही व्यापिलें ॥ ५९ ॥
म्हणे तृतिय पाउला स्थळ कुठे वदें बा तदा,
करी शिर पुढे बळी हरि तयावरी दे पदा ॥
अमान्य गुरुवाक्य जो करि तयासि आधःस्थळीं,
करोनि हरिनें सुराधिपतिला त्रिलोकी दिली ॥ ६० ॥

## वृत्त स्रग्धरा.

गेला जो ऊर्ध्वपाद त्रिभुवनगुरुचा तन्नखें रंध्र झालें,
ब्रह्मांडाच्छादनाला तदुपरि जळ जें शुद्ध तें आंत आलें ॥

दुष्परिहार परंतू, सुलभ उपायासि सांग चि तराया ॥ ८५ ॥

**वृत्त उपजाति.**

पाहोनि त्याच्या विनयासि रामा । प्रसन्न झाला कपिलेशनामा ॥
ठेवोनिया मस्तकिं हस्त त्याच्या । मुक्तीस युक्ती वदला पित्याच्या ॥८६॥
गंगाजळावांचुनि यांसि पाहीं । पवित्र कोणी करणार नाहीं ॥
गंगाचि दे पापिजनासि मुक्ती । सुखेच्छुला देइ तशी च मुक्ती ॥८७॥

**वृत्त पृथ्वी.**

तुझे पितर इच्छिती सुरनदीजळा हे तुला ।
सुकर्म कथिलें नसे इतर मुक्तिचे हेतुला ॥
प्रयत्न करिं जाय तूं हरिद्वताश्व हा घेउनी ।
पितामह करी तुझा मख तयासि दे नेउनी ॥ ८८ ॥
तथास्तु म्हणुनी निघे मुनिपदांबुजातें नती ।
करोनि हय घेउनी निजपुरीस ये सम्मती ॥
पितामह हि नातना सहय पाहुनी तोषला ।
म्हणे पदिं नतासि त्या सगरवंशि तूं हो भला ॥ ८९ ॥
समाप्त करुनी क्रतू नृपति राज्य त्या देउनी ।
रिघे सगर काननी जितसपत्न झाला मुनी ॥
पितामहसमान तो सगरनातु रक्षी प्रजा ।
तया सकळ वानिती नृपति नाहिं ऐसा दुजा ॥ ९० ॥

**साकी.**

राज्य करी नृप अंशुमान परि, पितरां मुक्ती व्हावी ॥
वसे हेतु तध्दृदयीं वास्तव, तें चि कर्म हा दावी ॥ ९१ ॥
राज्यभार मग सकळ निजात्मज, दिलीपमस्तकिं ठेवी ॥
वनी निघाला तपासि व्हाया, प्रसन्न गंगादेवी ॥ ९२ ॥
बहु वर्षे करि वनीं तपा परि, प्रसन्न नाहीं झाली ॥
घडेल कोठुनी लिहिलें नाहीं, विधिनें जे निजभाळीं ॥ ९३ ॥
वितथयत्न तो जाय लयाला, ऐके दिलीप मानी ॥
स्वयें इच्छि निजपितरां द्याया, सुतनय गंगापाणी ॥ ९४ ॥
राज्य निजात्मज भगीरथातें, देउनि काननिं आला ॥
तो हि पित्यापरि व्यर्थमनोरथ, जाय दिलीप लयाला ॥ ९५ ॥

**वृत्त उपजाति**

भगीरथें आइकिलें स्वकानीं । केलें महत्पाप मदें स्वकानीं ॥

पिता परंधामपदास गेला । जाणोनि पुत्रें मग यत्न केला ॥ ९६ ॥
देवोनि राज्यासि निजात्मजातें । निघे मुनी वानिति देव ज्यातें ॥
गंगाजळातें पितरांसि द्याया । सुपुत्र ये काननिं रामराया ॥ ९७ ॥
जेथें असंख्यात अमर्त्य येती । गंधर्व विद्याधर सिद्ध गाती ॥
अगम्य जो पातकि मानवाला । हिमाचळीं त्या नरपाळ आला ॥ ९८ ॥
चहूंकडे निर्झर वाहताती । हिमें दिसे चित्रविचित्र जाती ॥
निजांगना घेउनी देव येती । जेथें सदा अद्भुत सौख्य घेती ॥ ९९ ॥
शार्दूळ सिंह द्विप रीस दृष्टी । पडे किती वानर खड्ग गृष्टी ॥
पापी कसा जाय तया ठिकाणीं । भीतिप्रदीं जाय सुपुण्यखाणी ॥१००॥
जेथें दिसे उंच पवित्र झाडी । स्वपल्लवें स्वर्गमलासि झाडी ॥
कोंदाटलीं पक्षिरवें वनें तीं । बोलावुनी देवगतीस नेती ॥ १०१ ॥
हिमाचळीं जें सुख देव यांतें । न होय तें नंदनिं मंदवातें ॥
कळेल कोणा महिमा तयाची । रामा सुता ती गिरिजा जयाची ॥१०२॥
किती जयाच्या वरतीं सरें तीं । सभोंवती हीरकतुल्य रेतीं ॥
स्वच्छोदकानें परिपूर्ण कांठीं । क्रीडावया देवविमानदाटी ॥ १०३ ॥

वृत्त स्वागता.

भूप एक कमळाकर पाहे, स्वादु ज्यांत जळ निर्मळ वाहे ॥
दीसताति कमळें फुललेलीं, आंत देव करिती जलकेली ॥ १०४ ॥

वृत्त कामदा.

पंकजें जयामाजि फूललीं, मत्त फीरती भोंवतीं अली ॥
पद्मगंध त्या पर्वतीं तसा, सौख्य देतसे प्राणिमानसा ॥ १०५ ॥
हंस बैसले पंकजांवरी, मत्स्य खेळती जीवनांतरीं ॥
निर्मळोदकीं कासवें तळीं, पाणकोंबडीं हिंडती जळीं ॥ १०६ ॥

वृत्त वसंततिलका.

कारंडवीं बदकसारसचक्रवाकीं । केलें प्रपूर्ण निनदें ध्वनि जाय नाकीं ॥
देवांगनारचित संतत केलियोगें । वक्षोजपंकगत गंध जळासि लागे ॥ १०७ ॥
गंधासि लुब्ध मृग पक्षि सदैव नाना । तद्वारिच्या करिति पीयुषतुल्य पाना ॥
दंती परस्पर करें जळ टाकिताती । खेळावयासि करिणींसह आंत जाती ॥१०८॥

वृत्त मालिनी.

मधुर रव पिकांचा कानिं ये एक ठायीं ।
शुक सह मृदु शब्दें बोलती सारिका ही ॥
जलचरबकहंसध्वान ऐकावयासी ।

नृपतिश्रवणिं येतां चित्त तापासि नासी ॥ १०९ ॥

**वृत्त भुजंगप्रयात.**

करी व्याघ्र शब्दासि एके ठिकाणीं । कडेलोट चाले खळाळोनि पाणी ॥
पडे ओघ खालीं जळाचा कडाडे । न त्या साहतां ती मही ही धडाडे ॥११०॥
कडे तूटले एक ठायासि खालीं । मदे मत्तदंतीकदंबें निघालीं ॥
तशा हस्तिला पाहतां शैलकाया । गमे मेघ जाती तळीं काय राया ॥ १११ ॥
गुहेमाजि जे नीजले सिंह त्यांला । महत्तोयशब्दें गमे शत्रु आला ॥
प्रतिस्पर्धतेनें स्वयें गर्जताती । तया ऐकतां श्वापदें दूर जाती ॥ ११२ ॥
तपस्वी उभे राहिले एक पायीं । तसे बैसले नेत्र झाकोनि कांहीं ॥
नसे मास देहीं त्वगस्थी च राहे । दिसे एक डोयी जटाभार वाहे ॥ ११३ ॥
किती पर्ण भक्षोनिया राहताती । जितेंद्रीय कोणी सदा ब्रह्म ध्याती ॥
किती वायुभक्षी किती धूम्रपानी । किती देह टाकोनि जाती विमानीं ॥ ११४ ॥

**वृत्त कामदा.**

एक ठायिं ते वाहती झरे, कूटतुल्य ही बर्फ पाझरे ॥
तूटले कडे श्वापदां नसे, मार्ग पाहतां भीति होतसे ॥ ११५ ॥
म्लान दीवसा ज्या वनस्पती, अग्निचे परी रात्रि दीसती ॥
त्या मणिप्रकाशीत वारुळीं, बैसले किती थोर कुंडली ॥ ११६ ॥

**वृत्त शुद्ध कामदा.**

चंदनाचिये वृक्षि वेष्टना, करुनि डोलवी कुंडली फणा ॥
जो कधीं नसे पक्षि पाहिला, नृपविलोकितां स्तब्ध राहिला ॥११७॥
पर्वताचिये शीखरावरी, शरभ बैसुनी ओरडा करी ॥
वैनतेय ही त्यान काननी, धरुनियां उडे सर्प आननीं ॥ ११८ ॥
खालि पाहुनी हस्ति केसरी, वरुनि घे उडी मस्तकावरी ॥
वानरें उड्या वृक्षि मारिती, तनय घेउनी पोटिशीं किती ॥ ११९ ॥
पायिं चालतां सर्प थोरले, अजगरादि ते मत्त पाहिले ॥
पाहि जो पुढें व्याघ्र एकला, महिष फाडुनी खात बैसला ॥ १२० ॥

**वृत्त उपजाति.**

करी तशा घोर नगी तपाला, भक्षोनियां शुष्क गळीत पाला ॥
जिंकोनि सर्वेंद्रियवृत्ति राही, कित्येक संवत्सर पी निरा ही ॥ १२१ ॥

**उपेंद्रवज्रा.**

पुढें करी मारुतभक्षणाला, न घालवी व्यर्थ नृप क्षणाला ॥
अनेक संवत्सर या च रीती, तपाचरी ज्या न कुणी चरीती ॥ १२२ ॥

## वृत्त उपजाति.

त्याच्या तपाला अति काय वानूं । दिसे जसा स्वीकृतकाय भानू ॥
अत्युग्र ज्याच्या पहतां तपा ती । जळोनि गेलीं सुरनेत्रपातीं ॥ १२३ ॥
त्रिपूरुषीं यत्न करोनि झाली । क्रिया चि तेजोमय ती निघाली ॥
जाणावया पूर्वजस्वर्गतीला । कापेल कां सांग न स्वर्ग तीला ॥ १२४ ॥

## वृत्त शिखरिणी.

सहस्राब्दें ऐसें भगिरथ करी उग्र तप जें ।
तया योगें गंगाहृदयिं करुणा फार उपजे ॥
धरोनी देहातें सकळजनतापापहर ती ।
उभी राहे भावें नृपप्रमुख रामा प्रहर ती ॥ १२५ ॥
भया पाहे त्यातें करिल नयनें भस्म यतिला ।
अशा पाहोनी त्या बहुत उपजे विस्मय तिला ॥
म्हणे राया पाहें नयन उघडीं चिंतिसि जिला ।
प्रसन्ना मी आहें वद कवण बा कष्ट तुजला ॥ १२६ ॥
नृपाच्या गंगेचा मधुर श्रवणीं शब्द पडला ।
तृषार्ताच्या जैसा वदनिं अमृतस्राव घडला ॥
किती वानूं झाला तिजसि बघता हर्ष न मिती ।
उभी गंगा जेथें विधिमुख जिला देव नमिती ॥ १२७ ॥
सहस्रादित्यांची जणु समरुची एकवटली ।
जगत्पापाधारा खनन करण्या काय नटली ॥
अशी देखे माता चरणिं करि लोटांगण तदा ।
नृप झाली प्रेमोद्गतनयनतोयें मग पदा ॥ १२८ ॥

## वृत्त वसंततिलका.

झाला नृपासि अतिहर्ष न माय चित्तीं । रोमांचरूप उमटे सकलांगभित्ती ॥
प्रेमें तदक्षियुगलांतुनि जाय पाणी । होतां सगद्गद गळा वदवे न वाणी ॥ १२९
पाहोनि माय करितां नमना तयाला । आणी कृतार्थ करणें चि मनांत याला ॥
ठेवी भगीरथशिरीं करपंकजा ती । जेणें सुरेंद्रपदवीस हि मर्त्य जाती ॥१३०॥
वंदोनि पादकमळीं उदयोस्तु तीला । ऐसें वदोनि करि विष्णुपदीस्तुतीला ॥
माते सभाग्य मजवांचुनि कोण आहे । जो मस्तकीं मि तव पादरजांसि वाहे १३१

## वृत्त ललित.

जाणती तुला सुर न दीन मी, जाणुनी असे सुरनदी नमीं ॥
वाटतें मला सफळ आजसें, काक मानसीं उतरतां जसे ॥ १३२ ॥

देवता मुनी नमिति सर्वदा, तूजवांचुनी कवण सर्वदा ॥
अमरेंव ही तुजसि वानितां, थोर पावला विबुधमान्यता ॥ १३३ ॥

### आर्या.

माते सहस्रवदना, नाहीं सामर्थ्य तव गुणा गाया ॥
नागा ही तुजवांचुनि जाऊं कवणा अभीष्ट मागाया ॥ १३४ ॥
तुजवांचुनि मत्पितरां कवणा सामर्थ्य सांग ताराया ।
रविनेंचि जाय तम जें, उगवुनि करितील काय तारा या ॥ १३५ ॥
मत्पूर्वज कपिलाच्या, शापें गेले मरोनि नरकाला ।
दैवें करील परवश, झाल्या प्रतिकूळ काय नर काला ॥ १३६ ॥
यास्तव मदर्थ ये तूं, भूवरि करण्यासि शुद्ध पितरां या ।
वितराया स्वर्गतिला, होईं सोपानपद्धति तराया ॥ १३७ ॥

### वृत्त शार्दूलविक्रीडित.

गंगा ऐकुनि भूपवाक्य वदली राया कसें हें घडे ।
वेगें कोण धरील सांग मजला जी भूवरी मी पडे ॥
भूमी भेदुनि खालती निज बळें जाईन मी अन्यया ।
याचा काय विचार सांग मजला ये भूपते त्वन्मता ॥ १३८ ॥

### दिंडी.

म्हणे नृपती जाईन शंकरातें, भक्तियोगें मी शरण आजि माते ।
तज मुकुटीं वाहील शूलपाणी, भक्तराज हीं जाण सत्य वाणी ॥ १३९
वदोनीयां गंगेसि तदा ऐसें, जाउनीयां कैलासनगीं बैसे ।
करी ध्यान चित्तांत शंकराचें, वेदमंत्रेंकरूनि स्तवी वाचे ॥ १४० ॥

### पद.

ये सज्जनहृदयकमलवास शंकरा रे ये ॥ ध्रु० ॥
दक्षाध्वरहर हर भव सच्चित्सुखपूर्णविभव ।
निर्दाळीं भय भवभय ज्ञानसागरा रे ॥ १ ॥ ये० ॥
जगताचा मायबाप तूंच हरिसि सर्व पाप ।
निववुनि मच्चित्तताप, सुखवि पामरा रे ॥ २ ॥ ये० ॥
करिता स्तवनासि राय, प्रगटे शिव सदयकाय ।
रघुपतिसुत धरुनि पाय, घे म्हणे वरा रे ये० ॥ ४ ॥ १४१ ॥

### वृत्त भुजंगप्रयात.

उभा राहिला येउनी शूलपाणी, वरं ब्रूहि ऐशी वदे मूळ वाणी ।
नृपा ऐकता थोर आनंद झाला, जसा मेघशब्दें मनीं चातकाला ॥ १४२ ॥

नृपें देखिला चंद्रकोटिप्रकाश, करी जो प्रभू भक्तहृत्तापनाश ।
शिरीं चंद्र भाळीं शिखी कंठि काळा, चतुर्बाहु शोभे उरीं सर्पमाळा॥१४३
दिसे कृत्तिवासा शिवा वाम अंगा, तनूभूषणीं लेइलासे भुजंगा ।
प्रसन्नासि त्या पाहुनी देवराया, धरी नम्र होवोनि भूपाळ पाया ॥ १४४
म्हणे राय आणीक तें काय मागूं, असे सत्य माझेवरी आनुरागू ।
कृपाळू जगन्नायका देवराजा, म्हणोनी च दृष्टी पडीलासि माझ्या ॥१४५
परी लागली एक चिंता मनासी, दयाळा तुम्हावाचुनी कोण नाशी ।
गती द्यावया पूर्वजा येत आहे, तया स्वर्नदीचा शिरीं भार वाहें १४६
नृपाची अशी ऐकुनी दीनवाणी, तथास्तू म्हणे राजया शूलपाणी ।
सवें घेउनी तो निघे भूतसंघा, शिरीं घ्यावया विष्णुपादोदगंगा ॥ १४७
हिमाद्रीवरी शंभु जावाई आला, श्वशूरासि दावावया विक्रमाला ।
म्हणे हाक मारीं नृपा स्वर्धुनीतें, पहा भार घेतों शिरीं आज मी तें १४८

**वृत्त पृथ्वी.**

करी स्मरण भूपती जवर आठवोनी पदा ।
असे सुरतरंगिणी नृपतिदक्षिणांकीं तदा ॥
म्हणे भगिरथा तुझी समज कन्यका जा मला ।
पतीजवळि पोंचवीं जगति हो यशस्वी भला ॥ १४९ ॥
विलोकुनि म्हणे तिला नृप दिली मला पामरा ।
पितृत्वपदवी तुवां जननि वंद्य जी सामरा ।
महत्व दिधलें तसें झटिति तातकार्या करीं ॥
शिरीं तुज धरी जगत्प्रभु अतां चि ये भूवरी ॥ १५० ॥

**वृत्त वसंततिलका.**

त्यातें तथास्तु म्हणुनी मग गुप्त झाली, येण्यासि भूमिवरि वेगबळें निघाली ।
भागिरथी म्हणति यद्दुहिता म्हणोनी, गंगेसि धन्य गमला न तदन्य कोणी १५१

**कटाव.**

सुरलोकाहुनि गंगा खालीं, भूमीवरि येण्यासि निघाली,
शर्वजटीं ती उडीच घाली, देवमंडळी पाहूं आली,
फिरति विमानें दाटी झाली, मुनिगणसतति सर्व मिळाली,
जयोस्तु म्हणुनी स्तवनें करिती, सुरांगना ओंवाळिति अरती,
किन्नर टाकिति पुष्पें वरती, हाहा हूहू तुंबरु गाती,
सर्व अप्सरा प्रेमें नाचति, घो घो शब्दें पूर चालला,
अरुण सावरी सूर्यरथाला, नक्षत्रांच्या वाहती माळा,

मौत्यापरि त्या दिसति तळाला, पाहुनि पर्वत फेन मळाला,
ऐरावतिचा गर्व गळाला, द्विरदांगापरि लाटा वाहती,
विमाननावा वरी पोहती, विचित्र रंगा तरंग दाविति,
भुजंगांगपरि प्रवाह धावति, लयासि कच्छप मत्स्य पावती,
तरंगवातें पाप हरावें, स्मरण करीता निर्मळ भावें,
काळाचें भय मुळीं न पावे, स्नानें विष्णुपदाला जावें,
पवित्र ज्यांनीं चरित्र गावें, एकवीस कुळ उद्धारावें,
त्या गंगेचें दर्शन घ्यावें, तरीच मनुजें जन्मा यावें,
गंगा आली, शिवजटेंत गुप्त झाली ॥ १५२ ॥

**वृत्त शार्दूलविक्रीडित.**

गंगागर्वहरावया सगरजा तारावया गावया ।
कीर्ती भक्तजनीं पवित्र हि जगत्पापा विनाशावया ॥
व्हाया शांत त्रिधोत्थ ताप सदयें श्रीविष्णुपादोद्भवा ।
गंगा मस्तकिं घेतली सुरवरें वर्णू किती त्या भवा ॥ १५३ ॥
होता गर्व नदीस वेग धरिता नाहीं च कोणी परी ।
येतां शंभुजटेंत सर्व हरला बिंदूपमेला धरी ॥
झाली गुप्त जटांतरीं न कळली जावोनि कोठें वसे ।
थोरांशीं अभिमान जो धरि तया लोकांत थारा नसे ॥ १५४ ॥
होता गुप्त शशांकशेखरजटीं भागीरथी तेधवा ।
होतां खिन्न करोनि यत्न पहिला त्या खेद झाला नवा ॥
ध्याला भूप ह्मणे अतां करूं कसें देवाधिदेवा मला ।
रक्षीं दे पितरांसि स्वर्गगतिला सोडोनि गंगाजळा ॥ १५५ ॥
ऐकोनी करुणार्द्रवाक्य द्रवला शंभू नृपाचें तदा ।
टाकी त्या च हिमालयीं अति शुची गंगाप्रवाहा मुदा ॥
संपादोनि पराक्रमें चि दिधली जावाइ यानें खरी ।
दावायासि गमे जना श्वशुर त्या कीर्तीस वाहे शिरीं ॥ १५६ ॥
झाले सात प्रवाह त्यांत इतरद्वीपीं सहा चालती ।
आला एक भगीरथार्थ जहला तो तीन भागाकृती ॥
ब्रह्माविष्णुशिवात्मक प्रकृतिचें त्रैगुण्य तें भिन्नता ।
पावे काय जगच्छिवार्थ वहतें स्वीकारुनी तोयता ॥ १५७ ॥
गंगोत्री पहिली दुजीस ह्मणती मंदाकिनी यापरी ।
तत्पूर्वेस असे जिला अलकनंदा नांव ती तीसरी ॥

गंगोत्रींत असे भगीरथशिळा केदार मंदाकिनी ।
काठीं तीसरिचे वसे नर अणी नारायण श्रीमुनी ॥ १५८ ॥
गंगा सोडुनि दीधली निजजटेपासोनि ती जातसे ।
कैशी हें पहवें ह्मणोनि बदरीकेदारमध्यें वसे ॥
ऐसें पर्व विलोकुनी अलकनंदेचे तटीं स्वर्गती ।
द्याया भक्तजना वसे नर सवें नारायण श्रीपती ॥ १५९ ॥

## वृत्त मालिनी.

निजपदविभवाचें काय माहात्म्य आहे ।
समजुनि मनि ध्याया येउनी विष्णु राहे ॥
नरसह तप चाले उग्र नारायणाचें ।
सुरमुनी अति हर्षे पाहुनी गात नाचे ॥ १६० ॥
हरिहर वसती ज्या स्वर्नदीपुण्यकांठीं ।
सतत सुरमुनींची दर्शनालागि दाटी ॥
अनुपम किति वानूं स्थान तें मी स्ववाचा ।
शतजनुकृतपुण्यें लाभ होतो तयाचा ॥ १६१ ॥
सुलभ सुरपदाचा लाभ यज्ञादिकर्त्यां ।
असुलभ बदरीच्या काननीं वास मर्त्यां ॥
करुनि सुरनदीचें स्नान केदारनाथा ।
नमि जरि नर त्याच्या येतसे मुक्ति हाता ॥ १६२ ॥
अतिशय महिमा तो थोर नारायणाचा ।
भवभय हरि ज्याचें नाव घेतांचि वाचा ॥
करुनि अलकनदास्नान जो मूर्ति पाहे ।
सकृदपि नर वैकुंठासि जावोनि राहे ॥ १६३ ॥

## वृत्त वसंततिलका.

अन्वर्थक प्रकट नांव हिमालयाचें । भारीच बर्फ दिसतांति थवे जयाचे ॥
षण्मास यास्तव सुपुण्य तया स्थळासी । देवांविणें गमनशक्ति नसे नरासी १६४॥

## वृत्त भुजंगप्रयात.

शरत्कालि पूजा करोनी तयाची, कपाटासि लावोनि येतात साची ॥
वसंतांति केल्या खुलीं तीं कपाटें । असे नूतन पूजाचि सर्वांसि वाटे ॥१६५॥
जया देव येवोनियां पूजिताती । सुरस्त्रींसवें नित्य गंधर्व गाती ॥
वसंतापुढें मार्ग त्या ठायिं जाया । शरत्कालपर्यंतची रामराया ॥ १६६ ॥
पुढें ओघ तेथोनि येतात खालीं । मग्ने ऐक्यता त्यांत दोघांसि झाली ॥

मिळे यत्र गंगोत्रि मंदाकिनीतें । धरी स्थान रुद्रप्रयागाभिधेतें ॥ १६७ ॥
दिला भाग रुद्रासि तेथें सुरांनीं । असें सेवितां मुक्ति दे जें नरानीं ॥
तया तीर्थि साहोनियां ताप साचा । तपातें करी स्तोम तो तापसांचा ॥१६८॥
असे श्रीपुरी पूर्व अंगास खालीं । रमा कांतनारायणासाठिं आली ॥
तपोभंगभीत्यर्थ दूरीच राहे । ह्मणोनी पुरी श्री असें नाव वाहे ॥ १६९ ॥
पुढें तीनही ओघ एकेचि ठायीं । मिळाले मुळीं भिन्नता ज्यांसि नाहीं ॥
अवस्थात्रयीं द्वैतभावासि वाहे । परी आत्मरूप स्वयें एक आहे ॥ १७० ॥
सुरेंद्राचि ती ब्रह्महत्या हराया । सुरीं याग केला असे याचि ठाया ॥
तशा देवयज्ञीं हरी तुष्ट झाला । म्हणे कांहिं मागा सुरांतें वराला ॥ १७१ ॥
तया बोलिले देव देसी वरासी । तरी ईतुकें दे दयाळा अह्मांसी ॥
अम्हीं याग येथें असे आजि केला । धरो तीर्थ देवप्रयागाभिधेला ॥१७२॥
करी स्नान जो दान त्या मुक्ति व्हावी । तपा जो करी त्या स्वरूपासि दावीं ॥
तथास्तू म्हणोनी हरी गुप्त झाला । वसे नांव देवप्रयाग स्थळाला ॥ १७३ ॥

**साकी.**

ह्मणे गाधिसुत सुरप्रयागापासुनी गंगा आली ॥
उल्लंघोनी हिमालयातें, पर्वतराजाखालीं ॥ १७४ ॥
तये ठिकाणीं हरिद्वार हें स्थान असे रघुराया ॥
स्वर्गद्वारचि जाण लक्ष्मणा विष्णुदर्शना जाया ॥ १७५ ॥
शिवद्वेष मनिं धरुनि यज्ञ ते ठायीं दक्षें केला ॥
यज्ञपती शिव कोपें दक्षासह मख नाशा नेला ॥ १७६ ॥
सभय सुरांनीं स्मरतां, ते क्षणिं श्रीहरि तेथें आला ॥
शिवासि जातां शरण सुरांसह शिव ही येता झाला ॥ १७७ ॥
शर्वाज्ञेनें बस्तमुखातें लावुनि गंगास्नाना ॥
घालितांचि तो सजिव दक्ष करि, शिवस्तुतीतें नाना ॥ १७८॥
रुद्रातें सुर भाग देउनि, स्तविती जोडुनि पाणी ॥
वरदराज तो संतोषे मग, वदे सुरांते वाणी ॥ १७९ ॥
हरिभानिचें द्वार म्हणोनी, हरिद्वार हें राहो ॥
नांव पुरीला एथें येतां, पतितहि मुक्ती पावो ॥ १८० ॥
क्रतुदर्भानें पूर्णगर्भ हें, तीर्थ जाहलें याला ॥
कुशावर्त हें नांव असातें, ने स्नानें मोक्षाला ॥ १८१ ॥
असें वदोनी शंभु राहिला, बिल्वकेश या नावें ॥
पश्चिमभागीं गंगातीरीं पुरींत हरि ही राहे ॥ १८२ ॥

मायानगरी तीच राघवा, हरिहर जेथें वसती ॥
त्या गंगेला काय वर्णुं मी, सहस्र जिव्हा नसती ॥ १८३ ॥
शर्वजटोद्भव वीरभद्र जो, दक्ष वधाया आला ॥
हरिद्वार या क्षेत्रा मार्गें, प्रेमें वसता झाला ॥ १८४ ॥
क्षेत्राजवळी पश्चिमवाहिनि, रामा गंगा झाली ॥
पुढें अग्निच्या दिशे लक्षुनी, वेगें सिंधु निघाली ॥ १८५ ॥

### आर्या.

आहे तदग्रभागीं, जो निंदी दक्ष लोकपा वांया ॥
दावाया सुपथ तया, कनखल हें तीर्थ लोक पावाया ॥ १८६ ॥
तत्तीरीं दक्षेश्वर पुण्यक्षेत्र हि असे नरा ज्याचा ॥
बा लाभ सुखद जैसा इंद्राच्याही तसा न राज्याचा ॥ १८७ ॥
ऐशीं अनंत तीर्थें, जींत मला वर्णवे न रामा तीं ॥
नेती विष्णुपदातें, यत्तीरज लागतां नरा माती ॥ १८८ ॥
संक्षेपें तुज कथितों, गंगातीर्थांसि रामराया गा ।
यत्स्नानें स्वर्ग मिळे, जो न मिळे करुनि पामरा यागा ॥ १८९ ॥
त्याच्या पुढें हि पश्चिम भागीं रानांत गडमुनीसाठीं ।
मुक्ती द्याया आला गडमुक्तेश्वर वसे धुनीकांठीं ॥ १९० ॥

### वृत्त भुजंगप्रयात.

तयाच्या पुढें हस्तिनापूर रामा, असे चद्रवंशांत जो हस्तिनामा ।
महा शूर तो भूपति श्रेष्ठ झाला, सुरांच्या सभेमाजि गाताति ज्याला ॥१९१॥
अपापी निरोगी चिरायू तसा ही, वसे लोक जेथें परोत्कर्ष साही ।
अकालीं नसे मृत्यु राज्यात याच्या, रिपुत्रास स्वप्नीं न राज्या तयाच्या॥१९२॥
करी यज्ञ भागीरथीतीरि भारी, सुखे नांदती ज्या स्थळीं मर्त्य नारी।
प्रतापी पुरा आपुलें नांव ठेवी, प्रसन्ना जया सर्वदा सिंधुदेवी ॥ १९३ ॥

### वृत्त शार्दूलविक्रीडित.

फर्कावादपुरी पुढें हि दुसरी भागीरथीच्या तिरीं ।
नाहीं जीस सरी प्रकाश पसरी सोन्याचिया गोपुरीं ॥
राजा जींत हरी जना सुख करी प्रख्यात जो भूवरी ।
गंगा ध्यान धरी वसे द्विजकरीं दे दान लक्षावरी ॥ १९४ ॥
रम्य क्षेत्र तसें पुढें दिसतसे ज्या ऊपमा ही नसे ।
ब्रह्मावर्त असें जयासि विलसे नांव स्वयें स्वर्गसें ॥
गंगाकांठि वसे जयांत निवसे ब्रह्मेश्वर श्रीरसे ।

संपूर्ण स्वयशें जनाघ दवसें नाशी सुखा देतसे ॥ १९५ ॥

वृत्त उपजाति.

यज्ञार्थ पूर्वी अति शुद्ध लोकीं, ब्रह्मा स्थळा येउनियां विलोकी ।
गंगातटा वांचुनि अन्य जागा, न ये मनालागिं पवित्र यागा ॥ १९६ ॥
महीवरी पातलिं देवयानें, आरंभिला अध्वर देव यानें ।
गंगातटाकीं विधियज्ञ चाले, गधर्व विद्याधर सिद्ध आले ॥ १९७ ॥
देवांगना सुंदर नाचताती, गंधर्व ही सुस्वर साम गाती ।
स्वयें करी यज्ञ धणी जगांचा, वर्णील त्या काय मनुष्यवाचा ॥ १९८ ॥
करोनि यज्ञासि नदीतटाकीं, सुवर्णपात्रांसि नदींत टाकी ।
गंगाजळीं स्नान करावयासी, आला विधी घेउनि स्वर्गवासी ॥ १९९ ॥
सुस्नान यज्ञावभृतार्थ झालें, संतुष्ट होवोनि विरिंचि बोले ।
गंगेत आवर्त मदर्थ झाला, म्हणोनि मन्नाम व्हईल याला ॥ २०० ॥
यावांचुनी प्रीति नसे दुजाची, म्हणोनि मी राहिन कांठिं याची ।।
बोलोनि ऐसें विधि त्या च ठायीं, ब्रह्मेशलिंगाकृति राहिलाहे ॥ २०१ ॥
जो ब्रह्मतीर्थांत मनुष्य न्हाला, ब्रह्मेश्वराच्या करि पूजनाला ।
पापांचि ती जाय जळोनि कोटी, पुन्हा न ये तो नर मायपोटीं २०२

वृत्त यूथिका.

सत्यलोक कथिला वरि आगमें, क्षेत्र रम्य बघतां मज हा गमे ।
सर्व देव वसताति जया स्थळीं, तीर्थजाति अवघी निवसे जळीं २०३

वृत्त पृथ्वी.

पुढें सरळ चालली निजपतीस भेटावया
हिमाचलसुकन्यका पितृकुला त्यजोनी दया ।
सती पितृगृहातुनी श्वशुरगेहिं जातां जशी
पुन्हा न परते जनीं कुलपतीसुता ही तशी ॥ २०४ ॥
हिमाद्रितुनि ये मवें कुशिकसिंधु भेटीस तीं
समर्थ तनया निघे सदिस देत भेटी सती ।
पुरें उभयतां तटीं असति दोन ही तीं तशीं
प्रकाशकर शोभती श्रवणभूषणें तीं जशीं ॥ २०५ ॥
सुरम्य पुर सव्य जें जडितरत्नमाणीक हें,
यथार्थ अपसव्य तें उघड कर्णपूर स्वयें ।
तया स्थळिं बकादि जी शुकपिकादि पंक्ती वसे
दिसे श्रवणभूषणा जडित रत्नमोतीं जसें ॥ २०६

### वृत्त शिखरिणी.

पुढें आली रामा करित तटदेशा सफळ ती ।
करावें ज्या कामें भजन विमदें त्यास फळती ॥
सुता द्याया धांवे जननि पय जें कश्मल हरी ।
हका मारी शब्दें करुण हृदया पुण्यलहरी ॥ २०७ ॥

### वृत्त शार्दूलविक्रीडित.

आली धांवत जी तशी च यमुना भागीरथी भेटिला ।
हर्षें पाहुनि पातली निजसखी घे ती हि पोटीं तिला ॥
दावायासि जगीं अभेद यमुना ही वैष्णवी श्यामला ।
गंगा जी शिवशक्ति तींत मिसळे ज्ञानें चि दृश्या मला ॥ २०८ ॥
दोघी संगति पावतां चि तिसरी ब्राह्मी तदंशाच ती ।
दावी गुप्त सरस्वती हि असता प्राकट्य मध्यें सती ॥
गंगा आणि सरस्वती हि यमुना ज्या ठायीं झाल्या जमा ।
मोक्षद्वार सख्या त्रिवेणि म्हणती लोकीं तया संगमा ॥ २०९ ॥
ब्रह्माविष्णुमहेशशक्ति मिळती त्या एकमेकींमधें ।
यांचा संगम देवतांसि अवघ्या स्वर्गाहुनी सौख्य दे ॥
आले देव समस्त यास्तव तया ठायासि सानंद ते ।
पुष्पें वर्षति गाति नाचति स्वयें स्तोत्रें करीती शतें ॥ २१० ॥

### स्रग्धरा.

ब्रह्म्यानें सोमयाग प्रथम करुनि तत्तीरिं सोमेश्वरासी ।
स्थापोनी दीधलासे वर जरि असला नीच ही पापराशी ॥
वेणीस्नानें चि त्याचें सकल अघ हरे पूजिल्या देव भुक्ती ।
स्वर्गीं रोंवी ध्वजा जो सुरपतिपद घे देहपातें हि मुक्ती ॥ २११ ॥

### वृत्त उपजाति.

वेणीपरी संगम जाहलासे, त्रिवेणि हें नांव मनोज्ञ भासे ॥
सर्वामरीं यज्ञ उदंड केले, प्रयाग हें नांव म्हणोनि झाले ॥२१२॥

### वृत्त शार्दूलविक्रीडित.

गंगा होउनि पश्चिमाभिमुख त्या कालिंदिला भेटली ।
जेथें तें स्थळ तीर्थराज म्हणुनी प्रख्यात या भूतळीं ॥
तेथें माधव लोक मुक्तिकरितां प्रीती धरोनी वसे ।
तीर्थें ज्यांत अनंत तीर्थ दुसरें ऐसें न कोठें असे ॥ २१३ ॥
वेणीमाधव तीर्थराज म्हणती तो हा प्रयागाभिधें ।

राहे कल्पतरू च कामद जना भूमंडलाच्या मधें ॥
पापांधार हरावया उगवला कीं सूर्य भूमीवरी ।
तीर्थक्षेत्र हरिप्रिय त्रिजगतीं नाहीं दुजें यापरी ॥ २१४ ॥
वेणीमाधवसंनिधानिं धरुनी चित्तांत सद्धेतुला ।
सौभाग्यार्थ जिणें त्रिवेणिकरितां वेणी दिली त्र्यंगुला ॥
रामा सत्य चि सत्य सत्य कथितों मी हें त्रिवार स्वयें ।
सौभाग्यासि धका कधीं च सतिच्या जन्मांतरीं ना न ये ॥ २१५ ॥
एथें क्षौर असे अवश्य कथिलें पावावया मानवा ।
तद्द्वारें गळताति कोटिजनुंचीं पापें पुन्हा ना नवा ॥
होतो स्वर्गपदासि पात्र नर तो देवांगनांसी सुखी ।
जातो इंद्रपदासि जो न करि हें तो रौरवाच्या मुखीं ॥ २१६ ॥

## वृत्त वसंततिलका.

तेथें चि अक्षयवटस्थळ देवजागा, लक्षोनि देव वसती अवघे प्रयागा ॥
जो सर्वदेवमय पादप त्या तळीं जें, होतें अनंत जरि अल्प हि पुण्य कीजे २१७
जो पिंड अक्षयवटीं पितरांसि देतो, आसप्तमा निजकुला त्रिदिवासि नेतो ॥
ना देववृक्षवटदर्शन तें प्रयागीं, दे वाजिमेधफल जें इतरत्र यागीं ॥ २१८ ॥
जो ये प्रयागिं सुकृती नर माघमासीं, पूजी करोनि अवगाहन माधवासी ॥
तो घोर जन्ममरणांतुनि मुक्त झाला, जातो विमानिं बसुनी हरिच्या पुराला२१९

## आर्या.

नरकस्थ पूर्वजां, हेतू व्हावा सुपुत्र एक मणी ॥
माघांत तीर्थराजस्नाना जो जाय मकरसंक्रमणीं ॥ २२० ॥
येतीं समस्त तीर्थें, स्नानाला मकरसंक्रमीं जेथें ॥
तीर्थांसि तीर्थता दे, काय वदूं ज्यास्त सांग मी तेथें ॥ २२१ ॥
उदगयनीं सुलभ अमरमार्ग म्हणुनि सौरियात या नांव ।
सुर दर्शनार्थ येती, पाहुनि गंगेसि ये च पान्हाव ॥ २२२ ॥
माघीं वेणिस्नायी पितरा दे नर तिलोदकाला जो ।
कुळ एकवीस त्याचें शतमख देखोनि पदीं न कां लाजो ॥ २२३ ॥
गंगापश्चिमभागीं रम्य क्षेत्र प्रयाग त्या जवळी ।
तीर्थस्नानार्थ वसे थोर भरद्वाज सत्तपा कवळी ॥ २२४ ॥

## वृत्त उपजाति.

प्रयागमाहात्म्य वदावयासी, समर्थ नोहे विधि सत्यवासी ।
त्यातें वदाया मज काय शक्ती, नामें जयाच्या यमपाशमुक्ती ॥ २२५ ॥

आर्या.

सितकृष्ण तोय भासे, अद्यापी पावली जिथें संगा।
पूर्वाभिमुखी होउनि, यमुनेसह चालली पुढें गंगा ॥ २२६ ॥

वृत्त वसंततिलका.

पाणी सुनिर्मळ जिथें अति रम्य भासे, मोठे लहान फिरती अगणीत मासे ॥
तैसे च कच्छप असंख्य जळांत काहीं, तीरीं बहूत रमती तप घ्यावया ही २२७
भौरे अनंत फिरताति अगाध पाणी, तेथील नक्रसमुदाय न अंत जाणी ॥
लाटांवरी भिडति येउनि उंच लाटा, तीरास लागति न होय जळांत सांठा २८

वृत्त उपजाति.

एकापुढें एक सहस्र नावा, धांवोनि जाताति नसे विसावा ॥
तरंगवेगें वरखालिं होती, होड्या किती त्यांवुनि पार जाती ॥ २२९ ॥
भागीरथी शब्द करीत वेगें, येऊन सारी यमुनेसि मागें ॥
येता तिचा वेग मिळोनि दोघी, प्रेमें पुढें चालति पूर्वभागीं ॥ २३० ॥
भागीरथीचें अति शुभ्र वारि, काळी दिसे सूर्यसुता हि भारी ॥
दोघींमधें जें जळ लाल आहे, सरस्वती ती प्रगटोनि वाहे ॥ २३१ ॥

वृत्त शार्दूलविक्रीडित.

आकाशापरि तोय त्यांत ढगसे फेनौघ ते चालती ॥
उष्णें अग्नि तशा सशब्द लहरी विद्युल्लता हालती ॥
नावा त्यांत विमानपंक्ति तळिंचीं मोतीं जशा तारका।
रामा विष्णुपदासि याचि धरिं तूं चित्तीं सदा तारका ॥ २३२ ॥

वृत्त पृथ्वी.

नरामर शतावधी पुलिनिं बैसुनी ते किती।
सुधारससमान त्या अति अतृप्त तोया पिती ॥
सुकांत पुलिनांत ते पसरले दुहों बाजुला।
गमे जननि पाजवी पय धरोनि तेथें मुला ॥ २३३ ॥
मृदू सुखद वालुका लखलखीत शोभे वरी।
हिरे चुरुनि वोपिले म्हणुनि स्वच्छ तेजा धरी ॥
सुखें भरित मत्स्य ते वरिवरी उड्या मारिती।
सुरा कळविती न ती वरि जळीं अम्हां जी रती ॥ २३४ ॥
मदांध गज आंतुनी करिति जीं कराग्रें वरी।
करेणुसह चालतां दिसाति पंकजाचे परी ॥
खळाळुनि जलौघ तो करित भोंवरे चालला।

तयांत फिरती तरी करीति अप्सरांच्या कला ।। २३५ ।।
हिमाद्रिभव चालतां पवन पत्रपुष्पें जळीं ।
समर्पण त्रिवेणिच्या करि म्हणोनि झाला बळी ।।
तटा निकट भूरुह श्रमहर स्वयें वाकले ।
जनासि सुख द्यावया सुजनसंगतीच्या फळें ।। २३६ ।।

साकी.

उभय बाजुनें चित्र तरूंची, दाट लागली छाया ।।
पांथस्थाला सुखकर मोठी, श्रमहर मार्गी जाया ।। २३७ ।।
जंबु कंवठ सुरदारू नारळी, केळि पोफळि अंबे ।।
फणस पेरू आणि लिंबतरूंच्या, भरले तीर कदंबें ।। २३८ ।।
सरल कुटज वट वृक्ष सातवण, प्लक्ष दाडिमी चांफा ।।
शाल ताल, किति तमाल उंबर, घालविती जनतापा ।। २३९ ।।
मंदारामल बकुल बिल्व कुट, अशोक चंदन जाती ।।
वृक्षिं बैसले पक्षि सर्वदा, भागिरथीगुण गाती ।। २४० ।।

वृत्त कामदा.

दूर जाउनी फीरली पुढें, स्वर्गवासिनी उत्तरेकडे ।।
उत्तरामुखी स्नानदुर्लभा, दर्शनें चि दे माय सुप्रभा ।। २४१ ।।

वृत्त शार्दूलविक्रीडित.

जीच्या पश्चिमकांठि सुंदर असे वैकुंठ जें भूवरी ।
की कैलास जयास नांव विलसे बाराणसी या परी ।।
रामा योग नको तपोबळ नको यज्ञादि सिद्धी नको ।
जेथें मुक्ति मृतासि होय सखया वेदांतविद्या नको ।। २४२ ।।

वृत्त उपजाति.

गंगा उदग्वाहिनि ज्या पुरासी , अनंत जन्मार्जित पुण्यराशी ।।
संपादिलासे पदरांत जेणें, तें पाविजे सत्य तरी च तेणें ।। २४३ ।।

आर्या.

सर्गस्थितिलयकर्ता, ज्याचें घेतां चि नांव भव नाशी ।।
ये काशींत महेश्वर, तो चि दिवोदास भक्त भवनाशी ।। २४४ ।।
तो विश्वेश्वर राहे, येउनि भक्तार्थ काशिकेमाजी ।।
त्याच्या वासें पुरवी, मनुजाच्या सर्व काशि कामा जी ।। २४५ ।।

वृत्त पृथ्वी.

सुवर्णरचितें गृहें बहुत दाट वस्ती असे ।

तयांतुनि शिरावया मुळिं च वाव पापा नसे ॥
जयावरि सजे हिरेखचित ज्यांस पाचू मणी ।
जसे बसविले खडे दिसति स्वच्छ ते कोंदणीं ॥ २४६ ॥
अनंत असती जिथें सुभग रत्नदेवालयें ।
प्रकाश पसरे नभीं किरणरूप तो चि स्वयें ॥
शिवार्य जगताचिया करि नभांत संचार हा ।
तया न कळतां जनीं म्हणति सूर्य बाळा पहा ॥ २४७ ॥
महेश्वरसमीप या सुरविमानदाटी च ती ।
अहर्निश हि दर्शनास्तव दिवस्पती भांडती ॥
नसे इतर याहुनी अमरपूर स्वर्गावरी ।
अतज्ज्ञ जन तो चि जो वितथभेद चित्तीं धरी ॥ २४८ ॥

**वृत्त मालिनी.**

शिवमय नगरी ती जाणुनी मौलिबासी ।
हिमकर सदनाच्या राहिला उर्ध्वदेशीं ॥
म्हणउनि रघुराया चंद्रशालाभिधाना ।
अजुनि धरित आहे रक्षिती थोर माना ॥ २४९ ॥

**वृत्त उपजाति.**

राजा जिथें देव धणी जगांचा, माझी तया वर्णिल काय वाचा ॥
मंत्री तसा भैरवराज मोठा, राहे उभा घेउनि हस्ति सोटा ॥ २५० ॥
सोटा जया पाठिसि लागला तो, पुण्योदयें काशिस तोचि जातो ॥
जो दाखवी नेउनि विश्वनाथा, राहो तया भैरवपायिं माथा ॥ २५१ ॥

**वृत्त वसंततिलका.**

जो काळभैरव अशा धरि सत्य नांवा, पापासि काळ अणि भैरव दुष्टभावा ॥
जे लागती सुजन येउनि नाथपाया, तो त्यावरी करि कृपाभर पूर्ण छाया २५२

**वृत्त भुजंगप्रयात.**

जिथें अन्नपूर्णा जगन्माय रामा, जगन्नाथराणी करी पूर्ण कामा ॥
वसे काशिकागेहिं जी सर्व दात्री, धरी द्यावया अन्न हस्तांत पात्री ॥ २५३ ॥
करी अन्न देवोनि पूर्ण प्रजेला, म्हणोनी धरी अन्नपूर्णाभिधेला ॥
कटाक्षें पहाया जिणें आपणासी, पदीं देवतावृंद डोईस घांसी ॥ २५४ ॥
विधी बाळ शंभू पती दास नंदी, कृपें ज्यासि पाहे तया काळ वंदी ॥
अपांगें रची जी जगा आदिमाया, नमस्कार माझा तिच्या रम्य पायां ॥ २५५॥

वृत्त स्वागता.

धुंडिराज गणनायक काशी-मध्यभागिं पुरविघ्न विनाशी ॥
विश्वनाथ जवळी सुखधामा, दर्शनें पुरवि जो जनकामा ॥ २५६ ॥

वृत्त शार्दूलविक्रीडित.

गंगा भारति सूर्यसूनु किरणा वा धूतपापा तसे ।
पांची एकवटोनि तीर्थ निपजे तें पंचगंगा असे ॥
तन्नामें वरि घाट त्यावरि उमाकांतप्रिय श्रीपती ।
बिंदूमाधव नांव ज्यासि पडलें मोक्षप्रदा यत्स्मृती ॥ २५७ ॥
लोकेशस्थिति सर्व देववसती तैशी च भागीरथी ।
पाहोनी नयनांबुबिंदुसि त्यजी सानंद लक्ष्मीपती ॥
झाला यास्तव बिंदुमाधव हरी विख्यात वाराणसी ।
वासी धन्य जयासि नित्य नमिति वैकुंठ ते त्याजसी ॥ २५८ ॥

आर्या.

गंगेंत पंचगंगातीर्थस्नानें चि शक्रपद पावे ॥
मग माधवासि पूजी तेणें वैकुंठि कां न वद जावें ॥ २५९ ॥

वृत्त वसंततिलका.

त्याच्या च सन्निध असे मणिकर्णिका हे ।
ज्या नांव तीर्थ वरि घाट हि रम्य आहे ॥
तीर्थे सदैव वसती अवघीं जिये तें ।
जो देह त्यांत त्यजि त्या हररूप देतें ॥ २६० ॥
राहो विशेष तुज सांगतसें च थोडें ।
अस्थी हि ज्यांत पडतां सुरलोक जोडे ॥
प्राशी जळासि करि जो अवगाहनासी ।
आश्चर्य काय जनना मरणासि नाशी ॥ २६१ ॥

वृत्त भुजंगप्रयात.

शिवाचे गणीं मुख्य जो दंडपाणी, हतीं दंड घेवोनि पापासि खाणी ॥
पुरीमध्यभागीं उभा दंडधारी, दिसे हाक मारोनि पाप्यांसि तारी ॥ २६२ ॥

वृत्त उपजाति.

विशेष माहात्म्य मुनीमुखानें, वाराणसीचें परिसोनि कानें ॥
होवोनियां उत्सुक आयकाया, प्रश्ना करी सन्मुनितें वदाया ॥ २६३ ॥

वृत्त स्रग्धरा.

काशीमाहात्म्य भारी वदसि मुनिवरा सर्व विस्तार याचा ।

क्षेत्रस्यांची स्थिती ही सुखकर मजला सांग कैशी स्वयाचा ॥
नाहीं गंगाचरित्रामृतमधुररस प्राशितां तृप्ति माझी ।
गेलासे मार्गजातश्रम अणिक असें ऐकण्याला मि राजी ॥ २६४ ॥

**वृत्त शार्दूलविक्रीडित.**

बोले मंजुल वाक्य जें रघुपती ऐकोनि त्यातें मुनी ।
झाला गाधिज तुष्ट त्या मग वदे आलिंगना देउनी ॥
रामा दाशरथे सलक्ष्मण सख्या आईक वाराणसी ।
बाळा मी अवलोकिली कथितसें प्रत्यक्ष तूतें जशी ॥ २६५ ॥

**वृत्त भुजंगप्रयात.**

म्हणे राम सांगा कशी काशिकेला, तुम्ही श्रीमुनीराज सर्वज्ञ गेला ॥
असे ऐकण्याचा अती हेतु माझा, मला काशिमाहात्म्यपीयूष पाजा ॥२६६॥

**वृत्त शार्दूलविक्रीडित.**

सांगे कौशिक पूर्ववृत्त सखया राजा हरिश्चंद्र या ।
नामें जो तव पूर्वज क्षितितळीं चित्तीं जयाचे दया ॥
स्वप्नीं अर्पुनि सर्व राज्य मजला जो सत्यशील स्वयें ।
पुत्रस्त्रीयुतदक्षिणेसि सुकृती देण्यासि काशीस ये ॥ २६७ ॥
त्याचें सत्व हरावया बहु तऱ्हे त्या त्रास केला परी ।
सत्यापासुनि राय नाहीं टळला शांती च चित्तीं धरी ॥
जेणें स्त्रीसुतविक्रयासि करुनी डोंबाघरीं वाहिलें ।
पाणी यापरि सत्व अन्य नृपतीमाजी न मी पाहिलें ॥ २६८ ॥
काशीवास करोनि मुक्त जहला राजा ऋणापासुनी ।
मातें वास नृपासवें चि घडला वाहे जिथे स्वर्धुनी ॥
केलें मी तप त्याच मुक्तिनगरीमध्यें सुवंशोद्भवा ।
तूं ही जाउनि काशिला नदिजळीं नाहोनि पूजीं भवा ॥ २६९ ॥

**वृत्त उपजाति.**

एके दिनीं मी दिनकृत्य रामा, विलोकिलें जें परिपूर्णकामा ॥
आईक तें तूजसि सांगतों हें, यथामति विस्तर फार नोहे ॥ २७० ॥
उठोनि जेथे सुकृती प्रभातीं, स्नानासि त्या भागिरथीस जाती ॥
स्त्रिया हि घेवोनि कितेक बाळां, गाताति मार्गीं हरिसद्गुणाला ॥ २७१ ॥
कन्या मुळीं तीं हिमपर्वताची, तीरासि थंडी म्हणवोनि साची ॥
थंडीमुळें कांपति ओंठ भारी, शिवाक्षरें तीं निघताति सारीं ॥ २७२ ॥
कृष्णाजिना दंडकमंडलूला, कांठावरी ठेवुनि भस्म माळा ॥

मंदाकिनिवंदनपूर्व न्हाती, लावोनि देहासि सदैव माती ॥ २७३ ॥

वृत्त शार्दूलविक्रीडित.

दुर्गाघाटि कितेक पंचनदिच्या घाटाप्रती पावती ।
कोणी श्रीमणिकर्णिकेप्रति किती त्या ब्रह्मघाटाप्रती ॥
घाटि घाटि विचित्र दाटि मिळती वाटा न जाया जना ।
गंगादर्शन सर्व पाप हरुनी आनंद दे तन्मना ॥ २७४ ॥

वृत्त उपजाति.

विस्तीर्ण पात्रें परतीरवासी, मोठा तरू अल्प दिसे जनांसी ॥
पोहोनि उल्लंघिति त्या हि तोया, क्षणांत येती परतोनि ठाया ॥ २७५ ॥
त्या पांच कोशांतिल जंतु ते ही, शिवत्व मानोनि शवासि देही ॥
खाती न वा ती जवळी वहाती, समीप त्यांच्या बुध सर्व न्हाती ॥ २७६ ॥
स्नाना करोनी मग भस्म सारे, विलेंपिती देहिं न पापवारें ॥
लागो म्हणोनी अति शुभ्र त्यांची, जशीं शरीरें दिसती शिवाची ॥ २७७ ॥
माळा किती घेति करीं जपाला, किती करीती अघमर्षणाला ॥
पूजेमधें मग्न कितेक झाले, करोनि कर्मासि घरीं निघाले ॥ २७८ ॥
जळीं उभे एक हतांत माळा, त्रिपुंड्र शोभे धरिला कपाळा ॥
करोनियां निश्चल चित्तसद्मा, ध्याती सुबुद्धी शिवपादपद्मा ॥ २७९ ॥
होतां चि सूर्योदय फार वारें, सुटे करीती रव पक्षि सारे ॥
लाटा तटा येउनि लागताती, पात्रें किती वाहुनि त्यांत जाती ॥ २८० ॥
सूर्योदयीं ब्राह्मण अर्घ्यदाना, करोनि देवां स्तविताति नाना ॥
आकंठ पाण्यांत उभे किती ते, लावोनि दृष्टी वसती रवीतें ॥ २८१ ॥
घेवोनि कोणी करिं मृत्तिकेला, लिंगाकृती पार्थिव रम्य केला ॥
पूजोनि त्या निश्चल एकभावें, संप्रार्थिती पुत्रफळासि द्यावें ॥ २८२ ॥

वृत्त पृथ्वी.

स्त्रिया सुरनदीजळीं सकळ नाहुनी त्या सती ।
दुकूलवसनें किती सुभग पैठण्या नेसती ॥
तशा मृदुल अंजिरी सुतनु भर्जरी शालुला ।
गजेंद्रगति नेसल्या कटिस घेति तान्ह्या मुला ॥ २८३ ॥
मुळीं च धनिकांगना रुचिरकांति हो त्या भल्या ।
हिरण्यमणिभूषणां धरुनि फार त्या शोभल्या ॥
शिरीं भुजग केवडा मुद फुलें हि वेणीवरी ।
तशी श्रवणिं मौक्तिकप्रचुरकापबाळ्यावरी ॥ २८४ ॥

ठुशीसगट तन्मणी शुभद सूत्र पेट्या गळीं ।
जनांसि प्रतिबिंबल्या वसति देवता या जळीं ॥
विचित्रतर कंचुकी धरिति ज्या कशीदा वरी ।
जरीपदर त्यावरी दिसति अप्सरांच्या परी ॥ २८५ ॥
जळीं करुनि पूजना विपुल कुंकुमा टाकिती ।
असोनि जल शुभ्र तें दिसति लाल लाटा किती ॥
जन भ्रमति प्रत्यहीं अरुण तोय तें पाहतां ।
पहा म्हणति जाहली प्रगट भारती ही अतां ॥ २८६ ॥

**वृत्त भुजंगप्रयात.**

करीं झारि शोभे जिच्या सोनियाची, निघे सुंदरी चाल जैशी गजाची ॥
फिरोनी करी स्वर्नदीवंदनाला, चढे घाट गालावरी घाम आला ॥ २८७ ॥
हतीं पूजनद्रव्य घेवोनि ताटीं, सखी वाट पाहे उभी एक घाटीं ॥
दुजी चालली कुंभ घेवोनि नारी, मुखें नाव घे शर्व शंभो पुरारी ॥ २८८ ॥

**वृत्त शार्दूलविक्रीडित.**

नेसे शुभ्र पटी गळा हनुवटी गालासि लावी उटी
घे ती सिंहकटी बृहत् कटितटीं गंगाजळाची घटी ।
चाले पंचवटीस पार निकटीं भागीरथीचे तटीं
पूजोनी सुवटीं विधी हरि जटी देवा नमी शेवटीं ॥ २८९ ॥

**वृत्त भुजंगप्रयात.**

सुता स्नान घालोनियां एक माता, म्हणे वंदनाला करीं ईस ताता ॥
करी बाळ भागीरथीवंदनाला, कटीं घे तया फार आनंद झाला ॥ २९० ॥
कटी बाळ एके हतीं दिव्य झारी, चढे घाट मैत्रीणिला हाक मारी ॥
मृगाक्षी करीं घेउनी अक्षमाळा, प्रदक्षीण कोणी करी पिंपळाला ॥ २९१ ॥
असे कुंभ काखेस गंगाजळाचा, डबा त्या च हातीं निशाकुंकुमाचा ॥
दुज्या हाति घेवोनि ताब्या निघाली, तटाकीं सती पिंपळा पाणि घाली॥२९२॥

**वृत्त मालिनी.**

कलश धरुनि हातीं विप्रजाती घरासी
निघति वदनपद्मापासुनि मंत्रराशी ।
तटिनितटिं किती ते वंदुनी जान्हवीला
करिति विमलगंगासंगमाच्या स्तुतीला ॥ २९३ ॥

**वृत्त वसंततिलका.**

नाहोनि सर्व जन यापरि माधवासी, यात्रेकरासहित चालति क्षेत्रवासी ।

जो घाट पंचनदिचा ह्मणवोनि रामा, तेथें वसे हरि जना करि पूर्णकामा॥२९४॥
सुस्नात मी तटिनिकाठिं विलोकिताहें, जों तोंवरी सुरमुनीस जळांत पाहें।
केलें तया जवळ जाउनि वदनातें, कौशल्यप्रश्न करि नारद तो हि मातें ॥२९५॥
स्नाना करोनि मुनि हाटककौपिनाला, नेसोनि घालि गळिं पांडुर अक्षमाळा ॥
कृष्णाजिनासि धरि प्रावरणार्थ अंगीं, वीणा करांत करि गायन त्या च रगीं॥२९६॥
गावोनि भागीरथिगुण विचित्ररागें, गंगेसि भक्ति मज दे म्हणवोनि मागे ॥
श्रीविश्वनाथपददर्शन घ्यावयासी, माझ्यासवें मुनि निघे मग स्वर्गवासी ॥ २९७ ॥

## वृत्त शार्दूलविक्रीडित.

गेलों घाट चढोनि नारदसवें वंदावया माधवा
झाला माधव मंदिरात बघता संतोष अ युत्सवा ।
वीणातूर्यमृदंगनाद भरला गंधर्व गाती किती
पूजा चाललि विप्रवृंद करिती नाहीं तयाला मिती ॥ २९८ ॥
गंगातोय कितेक घालिति वरी सूक्तें मुखें बोलती
घंटा वाजति वाटली मज तदा वैकुंठभूमी च ती ।
कोणी वाहति तूळशी किती तया पत्रें बकुली फुलें
कोणी अर्पुनि पारिजात नमिती भक्तीबळें पाउलें ॥ २९९ ॥
धूपामोद चहूंकडे पसरला चाले गवाक्षांतुनी ।
येती देव वरोनि त्यांसि गमला बोलावि हा जाउनी ॥
ओंवाळोनि घृताक्त दीप शतशा नैवेद्य त्या अर्पिती ।
पक्वान्नें रचिलीं अनंत असती ज्यामाजिं नानाकृती ॥ ३०० ॥
ऐसें पूजुनि लोकपाळपतिला पौराणिकांच्या मुखें ।
वेदांतादिकथाश्रुतीस करिती बैसोनि तेथें सुखें ॥
देवातें स्तविती कितेक नमिती गाती किती नाचती ।
झाला मंडप पूर्ण सर्व सुजनीं पोथ्या किती वाचती ॥ ३०१ ॥
आलों देव पहात तेथुनि अम्हीं तों घेउनी बैसले ।
जाई पाच गुलाव मालति जुई चंपादि माळी फुलें ॥
केले हारतुरे तसे च गजरे संद्विक्रयें द्यावया ।
चाले वस्त चहूंकडेस जहली दाटी तया घ्यावया ॥ ३०२ ॥

## वृत्त उपजाति.

ताटें भरोनी सुमनासि देती, माळी तयांपासुनि लोक घेती ॥
किती तुरे घेउनि पुष्पमाळा, जाताति द्याया जन भैरवाला ॥ ३०३ ॥
पदोपदीं रम्य शिवालयें तीं, पूजावयाला नरनारि येती ॥

वाहोनियां बेल फुलें शिवाला, वदोनि त्या मागति दे शिवाला ॥२०४॥

## वृत्त शार्दूलविक्रीडित.

कोणी पद्मशरें सहस्रकमलें वाही शिवार्चा करी ।
झाला ढीग अनंत पुष्पकमले प्रत्येक लिंगावरी ॥
मार्गोमार्गी सुगंध वास सुटला जाई जुई मोगरी ।
चांफा मालतिचा तसा बकुलिचा लोकास सौख्या करी ॥२०५॥
मार्गी वदित शंकरासि निघतां ते बाले देखिले ।
प्रत्येका नउ सात आठ मजले चित्री जसे रेखिले ॥
दोहींभार्गी समान ऊर्ध्व दिसती त्यांला मण्यांचे सजे ।
जेथें बैसुनि सौख्य घेति ललना देवागनाला न जे ॥ २०६ ॥
सर्वांची वसती वरी च न तळीं ओलींमुळें राहती ।
कोणी सांगति वेद कोणि पढती कोणी स्वयें पाहती ॥
व्याकर्ण श्रुतिसार तर्क शिकती जेथें अनंतावधी ।
चाले मंगल सर्व ठायिं नगरी शून्या नसे ती कधीं ॥ २०७ ॥
गंधी गंधपदार्थ मार्गि विकती तद्गंध सौख्यासि दे ।
मेवाविक्रय हालवाई करिती तें दाविलें नारदें ॥
बुंदी बेसन मोतिचूर जिलिबी बर्फी बतासे खवा ।
पेढे साखरकाजु माल भरला फेण्यादि सारा नवा ॥ २०८ ॥
ऐसें सर्व पहात नारदसवें विश्वेशदेवालया ।
आलें ईश्वरदर्शनार्थ तव तो रस्ता नसे जावया ॥
विप्र क्षत्रिय वैश्य शूद्र वनिता बैरागि दंडी यती ।
जाती येति अती च दाटि करिती पूजा किती वंदिती ॥ २०९ ॥

## वृत्त शिखरिणी.

वियन्मार्गे अंतर्गृहिं मजसि ने नारदमुनी ।
उभे होतों तेथें जवरि शिवलिंगा प्रणमुनी ॥
दिसों लागे गंगाधरसतिपतीलिंग मजला ।
शुचिच्छायें तेव्हां हिमनग तसा ईश गमला ॥ २१० ॥

## वृत्त शार्दूलविक्रीडित.

स्नाना घालुनि रुद्रसूक्तशतकें जो केशरें चर्चिला ।
शोभे शंकर बेलपुष्पकमळीं विप्रव्रजें अर्चिला ॥
धूपें धूपित होय सर्व नगरी दीपप्रकाशें तदा ।
कैलासापरि भासले स्थळ वसे विश्वेश जेथें सदा ॥ २११ ॥

ढक्का ढोल मृदंग शंख डमरू डिंडिम तूर्यें किती ।
वाद्यें वाजति नाकिं शब्द भरला नाहीं च त्याची मिती ॥
चाले वास चहूंकडे घमघमा नैवेद्य त्या अर्पिला ।
कर्पूरार्तिक दावनी नरपती सद्भक्तिनें तर्पिला ॥ ३१२ ॥
ऐसा उत्सव सर्व दावुनि मुनी त्या अन्नपूर्णे नमी ।
धुंडीभैरवदंडपाणिप्रमुखां देवांसि ही वंदुनी ॥
गेला स्वर्गपदासि नारद मला विश्वेश दृष्टी पडे ।
होतों तोंवरि नित्य काशिनगरीं यात्रा हि तैशी घडे ॥ ३१३ ॥

## वृत्त वसंततिलका.

तापत्रयाग्निपरितप्त प्रपाचिं सारा, प्राणी फिरे परि सुखार्थ कुठे न थारा ॥
जाणोनि मोक्षसुख सर्व जनांसि द्याया, क्षेत्रात देव करूणार्द्रव राहिला या ३१४
सांगू किती तुज कृपा जगदीश्वराची, काशींत अंतिं कथि तारक मंत्र हा चीं ॥
आहे असा कवण देव दयार्द्र ताता, वाराणसींत पतितांस हि मुक्तिदाता ३१५

## वृत्त उपजाति.

देवांत विश्वेश पुरींत काशी, नदींत गंगा भवमृत्युनाशी ॥
असोनि ऐसें त्रय एक ठाया, कां व्यर्थ हे तापविती स्वकाया ॥३१६॥

## वृत्त वसंततिलका.

एकेकलिंगमहिमा वदवे न शेषा, अद्यापि जाणु शकला न विरंचि लेशा ॥
तेथें किती वद मती मज पामरासी, काशीपतीपदिं असोत प्रणामराशी ॥३१७॥

## वृत्त कामदा.

दक्षिणेकडे काशिच्या असी, उत्तरेकडे वारुणा तशी ॥
देवसिंधुला मीळती नद्या, पाय पातका सागता न द्या ॥ ३१८ ॥
दक्षिणोत्तरा सीम काय ती, जाणुनी वसे सर्व ही यती ॥
अंतरीं नसे पापगंध ही, पांच कोस ती पावनी मही ॥ ३१९ ॥

## आर्या.

त्या मध्यंतरक्षेत्रा पंचक्रोशी असें पहा नांव ॥
भवसागरा तराया वाटे ती ठेविली महा नाव ॥ ३२० ॥

## साकी.

पांच कोस त्या अनंत असती तीर्थें गंगेमाजी ॥
ज्यांचें दर्शन घेतां हरती दुर्धर पातकराजी ॥ ३२१ ॥
पुढें फिरोनी पूर्व दिशेला स्वर्गतरंगिणि चाले ॥
कुदेश असता गंगागमनें सुदेश अवघे झाले ॥ ३२२ ॥

सरयुगंडाकिनद्यासि पोटीं घेउनि जातां गंगा ॥
मध्यें जन्हुनृप यज्ञ करीतां वेगें करि मखभंगा ॥ ३२३ ॥
जहला होता गर्व नदीला नाहीं वेग धराया ॥
सामर्थ्य कोणी परि जन्हुनें घालविला तो वाया ॥ ३२४ ॥
योगबळें नृप नदीस प्याला तदैव गंगा प्याली ॥
मुक्त कराया आपणास ती जन्हूतनया झाली ॥ ३२५ ॥
मुखें सोडिली रायें तेव्हां जान्हविनावा पावे ॥
सगरजासि मग पूत कराया प्रेमें गंगा धांवे ॥ ३२६ ॥
ज्यांकरिता बहुश्रमें भगीरथ घेउनि गंगा आला ॥
पडले असती कपिलाश्रमिं ते पूर्वजलधितीराला ॥ ३२७ ॥
कपिलमुनीच्या नयनाग्नीनें भस्म जाहले जेथें ॥
साठ हजार सगर कराया मुक्त पावली तेथें ॥ ३२८ ॥

### वृत्त शार्दूलविक्रीडित.

आली धांवत माय जेंवि धरि ती तान्ह्या मुला पोटशीं
गंगा भस्म हि जाहल्या सगरजा पोटांत घेई तशी ।
गेले साठ हजार भस्म असतां स्पर्शें जिच्या मुक्तिला
रामा यास्तव नित्य नित्य सखया चित्तांत चिंतीं तिला ॥ ३२९ ॥

### वृत्त भुजंगप्रयात.

तशा ब्रह्मदंडे जरी भस्म झाले । तरी जान्हवीनें चि ते मुक्त केले ॥
अशी कोण अन्या कृपा पूर्ण आहे । महापापियां जी करी मुक्त पाहें ॥३३०॥
पुढें धांवली स्वामिभेटीस बा ती । मिठी कंठिं घालावया काय जाती ॥
करोनी जगा पूत माहात्म्य ती तें । सहस्राननें वर्णि प्रेमें पतीतें ॥ ३३१ ॥

### वृत्त मालिनी.

जलनिधिनृपतीची जान्हवी पट्टराणी ।
पसरुनि जणु भेटी घे असंख्यात पाणी ॥
जननिजनक घेतां भेटिला हर्ष झाला ।
सुरमुनिगण सारे टाकिती पुष्पमाळा ॥ ३३२ ॥

### वृत्त शार्दूलविक्रीडित.

आली सागरसन्निधी विरहिणी स्त्री ती जशी प्रेमळा ।
चुबाया पतितें सहस्रवदना झाली गमे बा मला ॥
होतां भेट तरंगपंक्ति मिळती त्या एकमेकींमधें ।
गंगासागर यापरी विधि तयां पाहोनि हर्षें वदे ॥ ३३३ ॥

त्रैलोक्यांतिल तीर्थवृंद अवघा पापें जनाची हरी ॥
गंगासागरिं आत्मशुद्धि करिता येवोनि स्नाना करी ॥
यातायात कशास तीर्थ गमनीं हे मूळ पर्वी मिळे ।
स्नाना जाति अनंतकोटि वसती स्वर्गीं तयांचीं कुळें ॥ ३३४ ॥
गंगेचा महिमा यथामति तुला सांगीतला राघवा ।
जो नित्य श्रवणा करील पठणा गंगानदि उद्भवा ॥
भोगी भोग कलत्रपुत्रगृह तो पावोनि संपत्तिला ।
अंतीं मोक्षपदासि जाय सुकृती सर्वांपरी वंदिला ॥ ३३५ ॥
प्रज्ञानिर्मळता निरोगतनुता स्त्री सूज्ञ विद्युल्लता ।
लक्ष्मीनिश्चलता सुपुत्रफलता सर्वत्र सन्मान्यता ॥
आयुष्यस्थिरता यशप्रचुरता आत्मानुसंधानता ।
दे हें गांगचरित्र नित्य पठतां अंतीं जना मोक्षता ॥ ३३६ ॥

### वृत्त उपजाति.

पावोनियां दुर्लभ जन्म वा हें । प्रत्यक्ष या देविस जो न पाहे ॥
जन्मासि येवोनि निरर्थ झाला । गंगेविणें तारिल कोण याला ॥ ३३७ ॥
तांबूलचूर्णांनुनि अंतकाळीं । वेश्या मुखें विप्रमुखांत घाली ॥
गंगा तयानें चि विमानिं त्याला । घालोनि देवी स्वपदासि नेला ॥ ३३८ ॥
असोत जंतू जळिं राहती ते । तरू हि काष्ठें वरि वाहती तें ॥
जे स्पर्शिले दुर्बळ गांग वातें । मीं देखिले नंदनिं धन्य गा ते ॥ ३३९ ॥
ज्या शक्ति गंगेसि न जावयाला । सुदूरपूर्णत्व हि ये वयाला ॥
गंगा असें नांव जरी मुखाला । अंतीं हि ये स्वर्गनिवास त्याला ॥ ३४० ॥

### वृत्त वसंततिलका.

ऐकोनि गांग महिमा अति हर्ष झाला । रामासि सानुज करीं अवगाहनाला ॥
प्रार्थी स्तवोनि कर जोडुनि एक भावें । माते सदैव वदनीं तव नाम यावें॥३४१॥
गंगास्तवें अतिबळी रघुराज झाला । जावोनि राक्षस वधी मुनिच्या मखाला ॥
पावे पुढें जनकनंदिनिरत्नमाळा । येवोनिया पितृपदीं मग ठेवि भाळा॥३४२॥

### वृत्त उपजाति.

गंगाचरित्रांकितरत्नमाला । करोनि मी अर्पिलि सज्जनांला ॥
असे तया ही च विनंति माझी । कठीं धरायासि असोत राजी ॥ ३४३ ॥

### वृत्त मालिनी.

नरहरिकृतगंगारत्नमाला सुगाथा ।
नरकृतकलुषातें जी हरी कंठि घेतां ॥

त्रिविधपरम तापें जाहला ताप ज्याला।
निववुनि परितापा शांति दे हे चि त्याला॥ ३४४॥
इति नरहरिसूरिविरचितं भागीरथीचरित्रवर्णनं।

समाप्त.

---

बाळकृष्ण विरचित

## महावाक्यार्थसार.

### श्लोक.

मी आहें अथवा नसें म्हणवुनी संदेह कोणा नसे।
झाला यद्यपि तो हि संशय पहा शोधोनि जेणें दिसे॥
तो कालत्रितयीं अबाधित असे सद्रूप ऐशा रिती।
छांदोग्य श्रुति बोलती उघड ही सद्रूप आत्मस्थिति॥ १॥
जेथीं वृत्तिलयोदयस्थिति जशी जो भासता आसती।
तैसे बाह्य पदार्थ इंद्रियगणा ज्याच्या प्रभे दीसती॥
अग्नी सोम रवी प्रकाश मिरवी ज्या स्वप्रभा घेउन।
सांगे स्पष्ट गुरु श्रुति स्मृति तसें चिद्रूप तो आपण॥ २॥
जो आनंद गमे सदैव विषयीं तो आत्मयाच्या गुणें।
आत्मीं आत्मपणें चि निर्विषयकीं आनंद तो निर्गुणें॥
तो आनंद निजस्वरूप म्हणुनी सच्चित्सुखत्वें श्रुती।
एवं लक्षण आपणा विधिमुखें ब्रह्मत्व तें दाविती॥ ३॥

सत्ता प्रकाश सुखरूपचि ब्रह्म आहे।
ते शब्द भिन्न परि वस्तु न भिन्न पाहें॥
तस्मात अखंड रस आपण जाण बा हें।
वेदें विशुद्ध सकलाश्रय स्वस्थ राहें॥ ४॥

सत्तारूप नसोनि जी प्रकृतिसद्ब्रह्मा श्रयें भासली।
सत्यत्वें अबुधा जिणें निजबळें आवर्णता दाविली॥
रज्जुव्याल जसा नसोनि दिसतो किंवा मयूखी जळ।
तैसा भास नसूनिया दिसतसे अज्ञान हें चीं मुळ॥ ५॥
सद्रूपात्मपणा धरूनि मिरवी ब्रह्माश्रयें जी भली।
ब्रह्मा विश्वनिमित्त कारण अशी सोपाधिता दीधली॥
तीचें सत्वरजस्तमात्मक असे त्रैगुण्य त्यापासुनी।
जो भूतेंद्रियदेव सर्व उपजे विक्षेप जाणा मनीं॥ ६॥

भूतें सर्व तमोगुणें प्रसवली जा सक्ष्म ही मागुती ।
ती पंचीकरणें करी निमिळता स्थूलाकृती भासती ॥
तेथें भाव अनेक जो धरितसे तो जीव नांवें असे ।
जो एकत्व धरी समष्टि म्हणुनी तो ईश नांवें वसे ॥ ७ ॥
अधिष्ठान घेऊनि तादात्म्ययासी । अयः पिंड अग्नीसुदृष्टांत त्यासी ॥
अतां वाच्यलक्षांश फोडोनि दावूं । सुखें ब्रह्मजीवैक्य जाणूनि राहूं ॥ ८ ॥
मायोपाधि जगासि मूळ असुनी सर्वज्ञ पारोक्ष्यसा ।
अंतर्यामि समस्त विश्व सृजुनी जो का नियंता तसा ॥
एक ब्रह्म असोनि ईश्वर असा वाच्यांश हा तत्पदीं ।
एथें ब्रह्म करोनि भिन्न पहतां लक्ष्यार्थ येतो त्वदीं ॥ ९ ॥
स्थूलांतःकरणाद्युपाधि धरिता अज्ञापरोक्षत्व जें ।
जीवात्मैक्य करोनि त्वपदिं तदा वाच्यार्थ हा जाणिजे ॥
ते अंतःकरणादि त्याग करिता लक्ष्यार्थसे बोलती ॥
यासी त्वत्पदलक्षणा करूनियां एकार्थ दावी श्रुती ॥ १० ॥
जीवेशैक्य असोनिया तिळभरी भिन्नत्व पाहे जरी ।
मूढत्वें नरजन्ममृत्युभय हें संसारिं पावे तरी ॥
यालागीं मनिं भिन्नतेसि न धरा वेदार्थ गर्जे चि हा ।
एकत्वीं गमल्या विरोधि सुसुखें या लक्षणेनें पहा ॥ ११ ॥
गंगेवरी घोष म्हणोनि जेथें । ये वाक्य कीजे मग लक्षणेतें ॥
प्रवाह सोडोनि तटासि घेता । वाक्यार्थ येतो सकळासि हाता ॥ १२ ॥
जाणा तुम्ही कीं जहल्लक्षणा हे । मुख्यार्थाचा त्याग हा जींत आहे ॥
वाक्यार्थैक्यीं लक्षणा ही घडेना । लक्षत्यागें मेळ कांहीं पडेना ॥ १३ ॥
कोणी बोले पांढरा धावताहे । येथें घोडा घेतला जात आहे ॥
सर्वांशाचा त्याग जीमाजि नाहीं । जाणा तुम्ही आजहल्लक्षणा ही ॥ १४ ॥
ही ही येथें लक्षणा संभवेना । भागत्यागें तीसरी योग्य जाणा ॥
वाच्यत्यागें तत्त्वमस्यादिलक्ष्यीं । ब्रह्मोद्बोधें ईशजीवैक्य रक्षीं ॥ १५ ॥
गृहस्थ कोणी पहिला बघावा । तो जाउनी मागुति दूर गांवा ॥
मुंडूनि डोई परतोनि येतां । बसे स्मृतीला पहिल्या हि गोता ॥ १६ ॥

दोन देश दोन वेष दोन काळ टाकितां ।
पिंड एक या परी कळोनि ये च तत्वता ॥
या परी च ईश जीव गा उपाधि सारिली ।
अहं ब्रह्म एक ही च स्वानुभूति राहिली ॥ १७ ॥

तूं सच्चिदानंदरूप दृश्य कदापि हें नव्हे ।
असा गुरू श्रुतीचा हि ऊपदेश स्वता हि घे ॥ १८ ॥
शिष्य स्वयें अनुभवी श्रवणादिक साधनें ।
अहंब्रह्म सर्वाधार सच्चिदानदलक्षणें ॥ १९ ॥
मजविणें कांहिं नाहीं एक मी अद्वितीय पहा ॥
दृश्यादृश्यभावातीत ठाव नाहिं अनूभवा ॥ २० ॥
वाक्यार्थभावसारोयं ग्रंथो विरचितो मया ॥
विश्वनाथस्य शिष्येण बालकृष्णेन धीमता ॥ २१ ॥

समाप्त.

## अनंतकविकृत द्रौपदीस्वयंवर.

### मालिनी.

गणपति मति देई ग्रंथ मातें कराया । कथिन तव कृपेनें द्रौपदी-सैंवरा या ॥
वदवि विधि-कुमारी बैस येऊनि वाणी । तुजप्रति विनवीतों जोडुनी दोनि पाणी १

### उपजाति.

आतें पुजूनी गुरुराज याला । कदापि तें द्वैत नसे जयाला ॥
अद्वैतमाळा धरुनी जपे तो । अधोमुखीं लक्षित आजपे तो ॥ २ ॥

### शार्दूलविक्रीडित.

श्रोते हो तुम्हि आदरें परिसिजे या द्रौपदी-सैंवरा ।
पाडूनदन कौरवें कुमतीनें घातीयले जोहरा ॥
कृष्णें द्वादश योजनें विवर त्यांसाठीं असे निर्मिलें ।
लाखाजोहारिं पांडवासि कपटें त्या कौरवीं जाळिलें ॥ ३ ॥
पार्थाचा रथ-सारथी यदुपती रक्षीतसे पांडवां ।
साही वांचुनि बाहिरी च निघता आला हरी आडवा ॥
क्षेमा देउनि पांडवां करतळें प्रेमामृतें स्पर्शिलें ।
बोले श्रीहरि जोहरीं श्रम तुम्हां झाले असें ऐकिलें ॥ ४ ॥

### कामदा.

ऐकतां चि तो धर्म बोलिला । तू चि आसतां काय भें मला ॥
जेवि बाळका सर्व माउली । तेंवि तूं अम्हा कृष्ण माउली ॥ ५ ॥
इच्छिती पिलीं खोपिं बैसुनी । चचुवापुटीं धांव पक्षिणी ।
येउनी करी पाखसाउली । तेंवि तूं अम्हां कृष्णमाउली ॥ ६ ॥

**चामर.**

सत्वसिंधु बोलतां दयाब्धि काय बोलिला ।
भाव-इंदु पाहतां चि प्रेमसिंधु फूगला ॥
पावरी उठोनि तूम्हि दक्षिणेसि जाइजे ॥
व्यास जें तुम्हां कथील तें चि तूम्हि ऐकिजे ॥ ७ ॥
धर्म भीम पार्थ माद्रिसूत कृष्ण वंदिती ।
कुंति आत ते म्हणोनि तीस वंदि श्रीपती ॥
श्रीहरी नमोनि शीघ्र साहि पंथ चालती ।
ठांयि ठांयि थोकती फिरोनि कृष्ण पाहती ॥ ८ ॥
तो हरी तयांसि मोह पालवी पितांबरें ।
जा म्हणे सुखें तुम्हांसवें सदैव मी फिरें ॥
ऐकतां चि धर्मराज तेय काय बोलिले ।
आमचें दयाळुवें असंख्य ऋण घेतलें ॥ ९ ॥

**उपजाति.**

अनंत विघ्नें पतितांसि झालीं । श्रीकृष्णनामें ति हि दूर केलीं ॥
विश्वश्रवा नाम द्विजोत्तमाचें । त्याचे घरीं आश्रम सश्रमांचे ॥ १० ॥
घरोघरीं आगम वेद घोषें । वाखाणिती ते श्रुतिवेद तोषें ॥
सुग्राम देखूनि तिहिं वास केला । साही जणांचा श्रम सर्व गेला ॥ ११
जन्मेजयें प्रश्न मुनीसि केला । ऐकावया भूप मनीं भुकेला ॥
मुनी म्हणे द्रौपदि-सैंवरासी । ऐकें नृपा बैसुनि सावकासी ॥ १२ ॥

**स्रग्धरा.**

पूर्वीं द्रोणें बळानें द्रुपद रथ-ध्वजीं बांधुनी आणिलासे ।
रायें वैरा स्मरोनी तयिं निजसदनीं यज्ञ तो मांडिलासे ॥
यज्ञांतीं दिव्यकांती रमणिय नृपती कन्यका प्राप्त झाली ।
ते काळीं नाम साचें द्रुपद म्हणतसे द्रौपदी रम्य बाळी ॥ १३ ॥
तेव्हां राजा विचारी उपवर नवरी सुंदरी देउं कोणा ।
होता मोठा प्रतापी अनुपम जगतीं पार्थ तो वीर-राणा ॥
गांधारें कापटें तो सहुदरसह त्या जोहरीं जाळिलेंसे ।
राया कांहीं न सूचे म्हणउनि मग तो द्वारके चालिलासे ॥ १४ ॥

**श्येनी.**

द्वारका असंख्य-पाप-हारका । तारका भवार्ण-विघ्नहारका ॥
लेखिली नवे सुरम्य लोचनीं । धन्य गे त्रिवीधताप मोचनी ॥ १५ ॥

भूपतीसि पूसिलें अधोक्षजें । कोण कारणें करूनि येइजे ॥
तो म्हणे सहस्त्र आननांबुजा । यज्ञ मी करीतसें चतुर्भुजा ॥ १६ ॥
यज्ञि म्यां करूनि तृप्त पावका । तेन दीधली प्रसाद-कन्यका ॥
तीसि नोवरा त्रिलोकि पाहतों । कोठ हो न ये प्रशस्त चित्त तो ॥१७॥
एक आस होति माझ अंतरीं । अर्जुनासि व्हावि हे चि नोवरी ॥
दुष्टि जोहरीं तयासि जाळिलें। वाक्य ऐकतां चि कृष्ण बोलिले ॥१८॥

मदिरा.

ऐक नृपा मम बुद्धि सुबुद्धि भुमंडळ हें चि वरागळ आहे ।
अर्जुन एक नसे तरि काय तुं जाउनि सैंवर मांडुनि पाहें ॥
सैंवर ऐकुनि या महिचे नृप येतिल धांवत ते लवलाहें ।
जवरि पांडव वांचल आसाति ते तरि येति अचिंत तुं राहें ॥ १९ ॥
भूप म्हणे जननाथ अनाथ मि पूर्ण सनाथ करीं मजलागीं ।
चाल तु राज-सभे यदुराज विराजितसे तुज वर्णिति योगी ॥
तूंचि अभेद अखेद [ चिजा ] तुज शोधिति * * * * * योगी ।
सेविति नीर समीर शरीर हि दडिति तूस्तव होति विरागी ॥ २० ॥
ऐकुनियां नृपवाक्य चतुर्भुज सत्वर [ सिद्ध ] नृपा सवें चाले ।
भूपति रेवतिचा पति श्रीपति शीघ्र तिघे नगराप्रति आले ॥
येउनियां द्रुपदें मुळ पाठविलें तंव दूत दिगंतरिं गेले ।
सैंवर ऐकुनि पत्र विलोकुनि ते नृप सिद्ध तत्क्षणिं झाले ॥ २१ ॥

शार्दूलविक्रीडित.

पृथ्वीचे नृपती असंख्य मिळती या द्रौपदी-सैंवरा ।
तेव्हां तो हरि लाघवी स्वमतिनें योजी कुवाडें विरां ॥
गर्ता खाणुनियां कढाइ चढवी स्नेहासि त्या घातलें ।
त्याखालें दृढ मूर्तिमंत हरिनें त्या पावका स्थापिलें ॥ २२ ॥
वंशीं तो मिन साधुनी मग करें रोंवीतसे श्रीहरी ।
स्नेहाचा धुम लागतां गरगरां फेरे फिरे अंबरीं ।
योग्याची जरि दृष्टि निश्चळ बहू तें पाहतां चाचरे ॥
मेषोन्मेष न लागतां मग त्वरें मीलक्ष फेरे फिरे ॥ २३ ॥
तेव्हां तो चि हरी वदे स्वयंवरीं गर्जोनियां वैखरी ।
खालीं लक्ष धरी अलक्ष न करी मीनासि भेदी शरीं ॥
त्याला ही नवरी सुनिश्चित वरी ने घेच भूपांतरीं ।
तीं बाणीं न करी विभेदन जरी टाकीन तैलांतरीं ॥ २४ ॥

ही वार्ता * * * * * * लवकरि द्वीपांतरीं फांकली ।
पत्रातें नयनीं विलोकुनि त्वरें आली कुरुमंडळी ॥
तेव्हां त्या श्रुतिपाठकां सकाळिकां हे गम्य झालें असे ।
ते काळीं द्विजवृंद येउनि स्वयें विश्वश्रव्याला पुसे ॥ २५ ॥

उपजाति.

विश्वश्रवा बोलत पांडवांसीं । साही चला सत्वर सैंवरासी ॥
भिक्षा तुम्हां सत्य मिळेल कांहीं । स्वयंवरीं तृप्त चि व्हाल साही ॥२६॥

इंद्रवज्रा.

धर्मे तया नम्र सुप्रश्न केला । स्वामी तुम्हां देखुनि जीव धाला ।
सांगा तुम्ही सैंवरिची प्रतिज्ञा । ऐकोनियां बोलति विप्र सुज्ञा ॥ २७ ॥

चामर.

द्वारका-विहारकें कठीण यंत्र मांडिलें ।
त्यातळीं कटाहि आगणीत तैल तापलें ॥
तैल धूम्र लागतां चि व्योमिं यंत्र फीरतें ।
देवदानवां अभेद मानवा अलक्ष तें ॥ २८ ॥
राव खेदरूप चिंतितो सदैव अर्जुना ।
त्यांत तो हरी दशा हि प्राप्त जालि ते चि ब्राह्मणा ॥
वाक्य ऐकतांचि सत्वसागरासि तर्क बाणला ।
सैंवरासि आम्हि येउं ये क्षणीं तुम्ही चला ॥ २९ ॥
तीं सवेग ब्राह्मणासवें चि जाति साजणें ।
पंथिं व्यास येउनी सुतृप्त केलि दर्शनें ॥
व्यास देखतां चि धावुनी पदांबुज वंदिती ।
तो म्हणे स्वयंवरासि जा तुम्हीं सुनिश्चिती ॥ ३० ॥
पार्थ यंत्र भेदुनी वरील रम्य द्रौपदी ।
आम्हीं जाउं बोलती म्हणोनि लागती पदीं ॥
व्यास वाक्य बोलतां लयासि शीघ्र पावला ।
साहि चालतां चि देखताति जान्हवी-जळा ॥ ३१ ॥

मदिरा.

देखुनि जान्हविचें तट ते करसंपुट जोडुनि लंपट होती ।
अंब तुझ्या धृतकंबुपदांबुजउद्भवअंबुसि जे नर न्हाती ॥
पाहिं तुं पावनि किल्मिषनाशनि त्राहिं म्हणोनि जळांतरिं गेले ।
सारुनि स्नान विधी तिळतर्पण दान हि पांच जणीं तयिं केलें ॥ ३२ ॥

भक्तिपुरःसर पूजुनि ईश्वर पंक्तिसि निश्चळ भोजन झालें ।
भीम म्हणे शृणु धर्म कृपानिधि येथुनि पाहिज सत्वर गेलें ॥
हें चि निकें वद त्याक्षणिं काढि समार्गाचि भीम तयीं पुढ चालिे॥
+ + + + + + ॥ ३३ ॥
होय तत्क्षणिं अस्त गभस्ति दिशांतरिं × × × × तम दाटे ।
जाति बरोबरि साहि जणें तंव घोर वनीं पदिं मोडाति कांटे ।
आणुनि कांवि हुताशन लावुनि तेज पडे मग चालति वाटे ॥
मार्गिं महाबाळि खेळतसे रळि सेवक वर्जिति जा तुम्हि वाटे ॥ ३४ ॥

**उपजाति.**

चित्रांगदें रम्य विलास केला । क्षुधीत तो भक्षित जीव गेला ।
काम स्त्रियांचा अति घेतला हो । भोगी जसा पर्वत हीमनाहो ॥ ३५ ॥

**इंद्रवज्रा.**

सांगोनियां धाडित सर्व दूतां । वर्जा तुम्ही निर्भय पंथ येतां ।
साही चुड्या घेउनि येति पंथें । ते दूत धिक्कारिति पांडवांतें ॥ ३६ ॥
मारावया धावत पांडवांतें । भीमें तयां टाकुनि व्योम पथें ।
मुष्टि-प्रहारें किति चूर्ण केले । सांगावया एक पळोनि गेले ॥ ३७ ॥

**उपजाति.**

तो काय झालें म्हण सेवकांसी । येती बळी मारित सावकासी ॥
असे गणना किति रे तयाची । विख्यात ते सागति साजणांची॥ ३८॥
× × × ॥
कशासि ते वागवितांति दाढी । बलाढ्य ते आणिक दूत धाडी ॥३९॥

**इंद्रवज्रा.**

मारावया धांवति पांडवांतें । भीमें तयां टाकुनि व्योमपंथें ।
जे वाचले जीव घिऊनि गेले । चित्रांगदा सन्मुख शंख केले ॥ ४० ॥
ऐकोनि चित्रांगद कोपलासे । येऊनि बाणीं बहु वर्षलासे ॥
देखोनियां अर्जुन बाण सोडी । चित्रांगदाचे शर सर्व तोडी ॥ ४१ ॥

**शार्दूलविक्रीडित.**

गंधर्वें मनिं विस्मयासि करुनी जाऊनियां अंबरीं ।
कानाशीं धनु ओढुनी [ त्वरित तो ] पार्थासि विंधी शरीं ॥
पार्थें तैं अभिमंत्रुनी स्वकरिंचा चूडी नभीं टाकिली ॥
ते काळीं नभ व्यापुनी दश दिशा पृथ्वींत विस्तारली ॥ ४२ ॥
मंत्राचे निज शक्तिने प्रजळल्या जाल्या असंख्या चुड्या ।

तो पाहे तंव दीसनी चहुकडे अग्नीचिया वावड्या ॥
तेव्हा तो बहु पोळला रिचवला तेथूनियां मेदिनीं ।
मारावें जंव अर्जुनें तंव स्त्रिया आल्या पुढें धांवुनी ॥ ४३ ॥

### स्रग्धरा.

ताता जामात रक्षीं म्हणवुनि वदती त्या स्त्रिया अर्जुनातें ।
तेव्हां धर्में स्वधर्में सहुदर धरिला वांचवीलें तयातें ॥
गंधर्वें त्या अगर्वें उठुनि मग पुसे स्वामि कोठील राजे ।
या पंथें कोठ जातां द्विजकुळ म्हणता वेश तुम्हां न साजे ॥ ४४ ॥
ऐकें गंधर्ववीरा पुससि बहु जरी पांडुचे पुत्र आम्ही ।
तेव्हां त्यां बोळखीलें मज हि न कळे चोरिलें नाम तुम्ही ॥
तेव्हां त्यां आदरानें करुनि मिति तदा नेतसे तो गृहासी ॥
पूजा तें आदरानें करुनि षड रसें घातलें भोजनासी ॥ ४५ ॥

### कामदा.

भक्तिनें चि ते भुक्ति सारुनी । बैसले सुखें बंधु आसनीं ।
ठेवि त्यां पुढें वस्त्रभूषणें । त्यासि वर्जिलें पांच ही जणें ॥ ४६ ॥
आम्हि जातसों गुप्त सैंवरा । वीर बोलिला मंत्र हा खरा ।
तूज अर्पितों मंत्र चाक्षुसी । तो जपूनि तूं यंत्र भेदिसी ॥ ४७ ॥
अग्निअस्त्र तें देइं तूं मला । ते क्षणीं तया योग साधला ।
आधि चाक्षुसी देत अर्जुना । पार्थ तो करी अस्त्र-अर्पणा ॥ ४८ ॥

### चामर.

यावरी बहूत पांडवांत ऐक्य जाहलें ।
तोषुनी तया सुवाक्य काय तैंच बोलिलें ।
शीघ्र मी तुम्हां पंचाळपूर आजि लोचनीं ।
दावितों चला + + + + + स्कंधिं वाहुनी ॥ ४९ ॥
बोल बोलतां चि ते पंचाळपूर पावले ।
साजणासि ग्राम नेउनी + + + दाविलें ॥
तयासि तो पुसोनि वीर गुप्त होउनी ।
साहि बैसले [तया स्थळासि] स्नान सारुनी ॥५०॥

### उपजाति.

ग्रामांत साहीजण शीघ्र जाती । विदोविदी देखति सर्व जाती ॥
घरोघरीं दाटणि भूपमेळा । कुलालशाळे तिहिं वास केला ॥ ५१ ॥

...ाठवि चक्रपाणी । ग्रामांत आतां मज नाहिं कोणी ॥
...ीन दयाळ आला । साह्यजणें वंदिति मेघनाळा ॥ ५२ ॥

### मदिरा.

धर्म म्हणे मज + + + + + + आजि सुदीन उदेला ।
देउनि त्यास करांगुळि भूषण + + + + श्रीहरि शीघ्र निघाला ॥
धर्म म्हणे हरि येउनि ये स्थळिं + + + रूप सुवल्लभ जाला ।
हे चि मनांतरिं खंति करी तंव तेचि क्षणीं मग भीम भुकेला ॥५३॥
बंधुवरा + + + + अति तीव्रचि तो उदरीं जठरानळ जाला ।
धर्म म्हणे मुदि घेउनि + + + वद पोटभरी मज घाला ।
+ + + + + + + + + + + + + ॥ ५४ ॥

### चामर.

भीम मुद्रिका + + + + घिऊनि चालिला ।
दाखवूनिया जनासि घ्या म्हणोनि बोलिला ॥
काय मोल बोल काय + + + + वा इचें ।
... ना सुभोजना जोंवरी मला रुचे ॥ ५५ ॥
तृप्त मी जरी + + + मुद्रिका तुम्हा दीधली ।
मी अतृप्त राहिलों फिरोनि घेइंजे भली ॥
एक बोलती कि हा सुवर्ण-पथ भासतो ।
भोजना निमित्त हा अनर्घ्य रत्न वीकितो ॥ ५६ ॥
बैसला प्रधान त्यासि ते निरोपिती तांतडी ।
पुले रत्न वीकितो अमोल्य मोल कापडी ॥
दूत धाडुनी [ सभेसि ] आणिला चि सत्वरी ।
काय मोल बोल काय वा इचें तुं शट्करी ॥ ५७ ॥
तृप्त मी तरी तुम्हासि मुद्रिका हि दीधली ।
अतृप्त राहिलों फिरोनि घेइजे ही भली ॥
बोलिला प्रधान कापड्या तु जेविसी किती ।
सैवरीं असंख्य खांडि तें हि अन्न रांधिती ॥ ५८ ॥

### कामदावृत्त.

भीम जाउनी स्वस्थ बैसला । कोपरें करें भूमि ठाकला ।
अन्न आणुनी त्यात घालिती । कोटि नायिका त्यासि वाढिती ॥ ५९ ॥

दोहि बाहुनींच ग्रास घे मुखीं। पात्रि ना उरे चि एक शीं।

**कामदा.**

ओंठ चावुनी नेत्र भोंवडी। राहिलेति कां बोट मूरडी।
अन्न तूट देखोनि बायका। जाति त्या पळोनीच नायिका ॥ ४ ॥

**श्येनी.**

बैसला प्रधान त्या निरोपिती। सर्व भक्षिलींच पाक-निष्पती ॥
अन्न भक्षुनी हि नाहिं तृप्त तो-। ते क्षणींच धांव घेत भीम तो

**कामदा.**

बोलिलासि तूं काय रे मसी। तृप्ति नाहिं ना येक कूसिसी ॥
देइ मात्रि तूं शीघ्र मुद्रिका। तो म्हणे नु का दीधली फुका ॥ ६३
ऐकतां चि तो दुष्ट पातला। मुद्रिकेमुळें लोभ सूटला ॥
× × × × ॥६४

**चामर.**

\+ \+ \+ \+ \+
\+ \+ \+ \+ \+

लोभ तो धरूनियां भिमासि गर्व दाखवी।
चेतलाचि भीम तें मुखांतरींच हात चाखवी ॥ ६५ ॥
सव्य बाहुनें कितीक आपटी महीत्तरी।
वाम बाहुनें कितीक टाकितो चि अंबरीं ॥
मुद्रिके निमित्त युगान्त युद्ध मांडलें।
केशवें चि येउनी त्वरीत त्यासि वर्जिलें ॥ ६६ ॥

**शिखरिणी.**

अतीताशीं झुंजा त्वरित उमजा या वरि जरी।
फिरोनी घे मुद्रा मग बळ समुद्रा दिलि करीं ॥
अतां तुम्हीं जावें फिरुनि मग यावें स्वयंवरा।
नमूनी तो गेला हरि गुज निरोपी सहुदरा ॥ ६७ ॥
बसूनीयां मातेजवळि गम भीमें विनविलें।
स्वकारीलीं अन्नें परि जठर कांहीं न भरलें ॥
उपाहारा कांहीं उम जननि देईं लवकरी।
तुझ्या हातें तृप्ती मज जशि चकोरा हिमकरीं ॥ ६८ ॥

REFBK-0019892